
बाळ सामंत

# महापर्व






महाराष्ट्रातील एक लोकप्रिय ललित लेखक आणि विनोदकार म्हणून बाळ सामंत ख्यातनाम आहेत. १९५० पासून ते सातत्याने बहुविध स्वरूपाचे लेखन करीत असून विनोदाबरोबर त्यांनी गंभीर स्वरूपाचे वैचारिक लेखनही केले आहे. अपर्णा वार्षिक आणि शब्दश्री मासिक या गाजलेल्या नियतकालिकांचे त्यांनी संपादन केले. अपर्णा वार्षिकातील निवडक लेखांची 'मुलखावेगळी माणसे' आणि 'जगावेगळी माणसे' या दोन पुस्तकांच्या वर्षाच्या आंत दुसऱ्या आवृत्त्या निघाल्या. सामंत हे एक साक्षेपी संपादक असून त्यांची 'मराठी नाट्यसंगीत,' 'मोठी माणसं' आणि 'हितगुज' ही संपादित पुस्तके त्यांच्या चोखंदळ संपादनाची साक्ष देतात. अगदी अलीकडे त्यांचे 'शापित यक्ष' हे चरित्र सर्वार्थाने गाजले आणि जाणकार समीक्षकांनी मराठीतील एक उत्कृष्ट चरित्रग्रंथ म्हणून त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

तसेच १९८३-८४ या वर्षातील मराठीतील सर्वोत्कृष्ट चरित्र म्हणून या ग्रंथाला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे देण्यात येणारे 'वि. ह. कुलकर्णी पारितोषिक' मिळाले.

'महापर्व' हा त्यांचा नवा संपादित ग्रंथ असाच तोलामोलाचा आहे. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या प्रमुख स्वातंत्र्य-सेनानीचे हे हितगुज आजच्या पिढीला प्रेरणादायक ठरेल यात शंकाच नाही.




स्वराज्य हा माझा
जन्मसिद्ध हक्क आहे.
— लो. टिळक
दांडीयात्रा

**प्रथमावृत्ती :** जानेवारी, १९८६

**प्रकाशक :** सूर्यकांत देशमुख
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.

© : **प्रकाशकाधीन**

**मुद्रक :** चिंतामणि प्रिंटींग प्रेस

**ऑफिस :** २०४ महावीर अपार्टमेंट नं. २
जे. पी. रोड, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५७.
टे. नं. ५७८११३.

**किंमत : रु. १००/–**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात
आपल्या सर्वस्वाचा होम करणाऱ्या
सर्व ज्ञात आणि अज्ञात हुतात्म्यांच्या
स्मृतीस ......

# मनःपूर्वक आभार

पुढील मित्रांनी आपल्या अधिकारात या ग्रंथात समाविष्ट केलेल्या आत्मवृत्तातील उतारे ग्रंथात उद्‌धृत करण्यास मोठ्या उदार अंतःकरणाने संमती दिली.

मोरारजीभाई देसाई
श्रीपाद अमृत डांगे
ना. ग. गोरे
माधवराव बागल
यशवंतराव चव्हाण
वामनराव चोरघडे

द. का. कुंटे
द. म. सुतार
श्री. रं. कुळकर्णी
द. ब. लोहार
श्रीपाद जोशी
अप्पा पंत
मोहन धारिया

प्रेमा कंटक (शंकरराव देव आत्मवृत्त)
विश्वनाथ पाटील (स.का.पाटील अप्रकाशित आत्मवृत्त)
माया चिटणीस (डॉ. चिटणीस—आत्मवृत्त)
नीलकंठ खाडीलकर (खाडीलकर स्मरणी)
विठ्ठलराव गाडगीळ (पथिक—गाडगीळ आत्मवृत्त)
बाळ सावरकर (सावरकर—जन्मठेप)
श्री. डाकवे (मोडक गुरुजी आत्मवृत्त)
का. न. केळकर (केळकर गतगोष्टी)

पुढील व्यक्तींनी या ग्रंथांसाठी संदर्भ साहित्य आणि छायाचित्रे मिळवून देण्यास मदत केली.

अच्युत तारी
सुरेंद्र बारलिंगे
अनिरुद्ध कुळकर्णी
श्री. रं. कुळकर्णी
किरण ठाकूर
गुं. फ. आजगावकर
रोझा देशपांडे
मधुकर चावरे

# निवेदन

माझे मित्र श्री. बाळ सामन्त हे सव्यसाची लेखक या नात्याने सर्व महाराष्ट्राला परिचित आहेत. ते उत्तम संपादक पण आहेत. लेखकाप्रमाणेच चांगल्या संपादकाच्या अंगी पण कल्पकता असावयास पाहिजे असते. श्री. सामन्त यांच्या ठिकाणी ती ओतप्रोत आहे. त्यामुळेच जेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शताब्दी निमित्ताने आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्यासंबंधी मंडळाने साहित्य प्रसिद्ध करावे अशी चर्चा झाली, त्यावेळी श्री. बाळ सामन्त यांच्या मनात, ज्यांनी स्वातंत्र्याकरिता आपले आयुष्य खर्च केले अशा देशभक्तांच्या आत्म-चरित्रातून काही वेचे प्रसिद्ध करावे अशी कल्पना आली. अशा संपादनातून आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्याचे बहुअंगी स्वरूप नीटनेटकेपणाने पण प्रकर्षाने आपणासमोर उभे राहू शकते आणि त्या त्या वेळचा काळ आणि स्थिती सजीव

होऊन आपल्या दृष्टीसमोर येतात आणि आपणांस आपल्यात समाविष्ट करून घेतात असे मंडळास वाटल्यामुळे असे "महापर्व" निर्माण करण्यास मंडळाने श्री. सामन्तानांच आवाहन केले, आणि त्यांनी ती जबाबदारी उचलली.

अत्यंत परिश्रम करून संपादन केलेला हा ग्रंथ पाहताना तो 'बाल'ग्रंथ नसून बलवन्त ग्रंथ आहे, नवीन पिढीला स्फूर्ती देणारा ग्रंथ आहे या विषयी शंका राहात नाही. आपापल्या दृष्टिकोनातून स्वातंत्र्याच्या लढ्याचे, त्यातील प्रसंगांचे जीवंत चित्र उभे करून त्यातून स्वातंत्र्याच्या लढ्याचा एक वेगळाच आविष्कार आपणास या वेच्यांतून दृग्गोचर होतो. अर्थात या आविष्कारात काही त्रुटी नाहीत असे मी म्हणणार नाही. उदाहरणार्थ श्री. एस.एम.जोशी यांच्या भूमिगत आयुष्यातील, ते इमाम या नावाने वावरत असतानाचा भाग या महापर्वात येणे उचित झाले असते. पण त्याला श्री. बाळ सामन्त यांचा इलाज नव्हता. विनंती करूनही "मी एस.एम." या ग्रंथातील भाग या ग्रंथात अन्तर्भूत करण्याची परवानगी श्री. सामन्त यांना मिळाली नाही. पण श्री. बाळ सामन्तानी ज्या वेच्यांची निवड केली आहे त्यासंबंधी "हे ही नसे थोडके" असे निश्चितच म्हणावे लागेल. त्यात महाराष्ट्रातील आणि मराठीतील जवळ जवळ सर्वच आत्म-चरित्रातील उतारे आपणास दिसतील. त्यात नानासाहेब गोरे दिसतील, दिगंबरराव बिंदू आढळतील, स्वामी रामानन्दतीर्थांचे दर्शन होईल, पुंडलीकजी कातगडे यांचा परिचय होईल, आप्पासाहेब पंतांचे व्यक्तिमत्त्व जाणवेल, द.म.सुतार आणि श्री. लोहार यांच्याशी संवाद साधता येतील, ग.य.चिटणीसांचे विचार समजून घेता येतील, स. का. पाटील यांच्याशी गप्पागोष्टी करता येतील, जयकर, काकासाहेब गाडगीळ, विठ्ठल रामजी शिंदे, उषाबाई डांगे इत्यादींच्या भेटी घेता येतील. सावरकर, चापेकर, केळकर इ.च्या ओळखी होतील. एकूण स्वातंत्र्य लढ्यातील अनेक मातब्बर लोकांशी आपली गाठ पडेल. महाराष्ट्रातील प्रत्येक कुटुंबाने संग्रही ठेवावे असे हे पुढील पिढ्यांना स्फूर्तिदायक ठरणारे पुस्तक आहे यात शंका नाही. माणसाने काय वाचावे किंबहुना काय वाचू नये हे या ग्रंथावरून सहजपणे कळते. तेव्हा या वेच्यांच्या संपादनाबद्दल मी श्री. बाळ सामन्त यांचे अभिनंदन करतो व त्यांनी हा ग्रंथ प्रकाशनासाठी साहित्य आणि संस्कृती मंडळाला दिला याबद्दल त्यांचे आभार मानतो.

सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

४२, यशोधन,
मुंबई—४०० ०२०
दिनांक १५ डिसेंबर, १९८५.

# मनोगत

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात महाराष्ट्राची कर्तबगारी असामान्य आणि अमोल अशी आहे. या स्वातंत्र्य चळवळीचे बीजारोपण महाराष्ट्रातच झाले आणि लो. टिळकांच्या रूपाने या चळवळीला एका विलक्षण झंझावाताचे स्वरूप प्राप्त झाले. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे," हा स्वातंत्र्याचा महामंत्र काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र दुमदुमला. लो. टिळकांच्या, महात्मा गांधींच्या पावलांचा मागोवा घेत या देशातल्या स्वातंत्र्य चळवळीच्या यज्ञकुंडात महाराष्ट्रानेही आपली आहुति दिली. या स्वातंत्र्य युद्धात भाग घेतलेल्या लहान थोर स्वातंत्र्यसेनानींनी आपली आत्मवृत्ते आणि आठवणी लिहून ठेवल्या आहेत. स्वातंत्र्याचा इतिहास लिहिणाऱ्या संशोधक लेखकाला ही आत्मकथने म्हणजे अत्यंत मोलाचे संदर्भग्रंथ. या काळात

महाराष्ट्रातील स्वातंत्र्याच्या चळवळीने झपाटून गेलेल्या हजारो कार्यकर्त्यांचे हृद्गतच वाचकांना पानोपानी गवसते. आज या थोर स्वार्थत्यागी स्वातंत्र्य-सेनानींचे आम्ही सारे ऋणी आहोत.

"महापर्व" हा संपादित ग्रंथ म्हणजे या थोर स्वातंत्र्यसैनिकांच्या आत्मवृत्तातील निवडक उतारे. या पुस्तकाची कल्पना मला सुचताच मी ती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांच्यासमोर मांडली आणि ती त्यांनी तात्काळ उचलून धरली. त्यामुळेच आज हे पुस्तक आपल्यासमोर येत आहे. या पुस्तकातील समाविष्ट केलेले उतारे, चित्रे आणि चरित्र विषयक माहिती याबाबतीत मला माझ्या स्नेह्यांचे आणि चरित्र नायकांचे नातेवाईक आणि मित्र यांचे साहाय्य झाले. ह्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. मराठी वाचक या पुस्तकाचे योग्य ते स्वागत करतील अशी मला आशा आहे.

**बाळ सामंत**

# अंतरंग

लोकमान्यांचे मार्गदर्शन १
गंगाधरराव देशपांडे

ही अंत:काळची मिरवणुक अधिक प्रिय २९
दामोदर हरी चापेकर

लोकमान्यांच्या सान्निध्यात ४५
नरसिंह चिंतामण केळकर

अंदमानात आमचे पुतळे उभारतील ६९
विनायक दामोदर सावरकर

जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ९७
मुकुंद रामराव जयकर

नेपाळची कामगिरी १०७
कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर

माझे गुरू ११९
माधव श्रीहरि अणे

कानपूर खटला आणि कारावास १२५
श्रीपाद अमृत डांगे

मुळशीचा निःशस्त्र व सशस्त्र लढा १४१
आ. वा. मोडक

कायदेभंगाच्या चळवळीत १४९
विठ्ठल रामजी शिंदे

राजकारणाचा ओनामा १५९
उषा श्रीपाद डांगे

जालीम सरकार नही रखनी १६७
नरहर विष्णु गाडगीळ

महाराष्ट्र कायदेभंग मंडळ १८७
वा. वि. आठल्ये

स्वराज्य पत्र व तुरुंगवास २०७
शंकरराव देव

सत्याग्रह छावणी २२९
द. का. कुंटे

जनरल आवारी २४५
वामन कृष्ण चोरघडे

भंगीकामाचा सत्याग्रह २६१
आप्पा पटवर्धन

हॉटसनवर गोळी का झाडली? २७७
वासुदेव बळवंत गोगटे

तुरुंगाच्या वाऱ्या २९५
मोरारजी रणछोड देसाई

मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी ३१५
स. का. पाटील
स्वतंत्र भारत सभा ३२३
ग. य. चिटणीस
आर्थर रोड ते विसापूर ३४७
यशवंत कृष्ण परुळेकर
२६ जानेवारी १९३४ ३६९
त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर
राजकीय झगडयास सुरुवात ३८५
माधवराव खंडेराव बागल
साबरमती आश्रमातील शिक्षण ४१५
पुंडलीक कातगडे
माझे विदयापीठ ४४१
यशवंतराव बळवंत चव्हाण
बेचाळीसच्या लढयात ४७१
द. ब. लोहार
एका वेगळया जगाचे दर्शन ४९५
श्रीपाद जोशी
प्रखर कसोटी ५०७
रामानंद तीर्थ
काँग्रेसचा अखेरचा लढा ५२७
द. म. सुतार
कारागृहाच्या भिंती ५४७
नारायण गणेश गोरे
अखेरचा लढा ५६१
दिगंबरराव बिंदु
स्वतंत्र जंजिरा संस्थान ५७१
मोहन धारिया
आपुले मरण ५८३
श्रीधर रंगनाथ कुळकर्णी
माझ्या आयुष्यात गांधीजी ५९५
अप्पा पंत



# महापर्व



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# गंगाधर बाळकृष्ण देशपांडे

जन्म : ३१ मार्च १८७१, मृत्यू : ३० जुलै १९६०.

**लो. टिळकांचे सहकारी आणि निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते**

जन्म कोल्हापूर संस्थानातील जलालपूर या गावी. बेळगाव व पुणे येथे शिक्षण १८९७ साली एल्. एल्. बी. झाले. १८९७ ते १९०५ पर्यंत बेळगावात वकीलीचा व्यवसाय. सुरूवातीला रानडे, गोखले यांच्या राजकारणाकडे ओढा. पण त्यानंतर लो. टिळकांकडे आकृष्ट झाले आणि कालांतराने त्यांचे एक निकट सहकारी बनले. त्यांनी 'धुरीण' (१८९९) 'राष्ट्रमत' (१९०७) आणि 'लोकमान्य' (१९२९) ही वृत्तपत्रे चालवली. लखनौ करार, काँग्रेस स्वराज्य पक्ष व होमरूल लीग याबाबतीत टिळकांबरोबर सहकार्य. त्यानंतर ते म. गांधीच्या राजकारकारणात सामील झाले. गांधींच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल सरकारने त्यांची मालमत्ता जप्त केली. १९२४ च्या बेळगाव येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य आणि काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष ही पदे त्यांनी भूषविली. खादी केंद्रे आणि चरखा संघ उभारण्याच्या कार्यात

त्यांनी भाग घेतला. १९३० आणि ४२ च्या चळवळीत त्यांनी कारावास भोगला. कर्नाटकसिंह म्हणून ते नंतर ओळखले जाऊ लागले, एवढी त्यांची कर्नाटकच्या राजकारणावर छाप होती.

त्यांनी राजकीय विषयावर स्फुट लेखन केले. त्यांचा पत्रव्यवहार 'अनुग्रह' या नावाने प्रकाशित झाला आहे.

हा उतारा त्यांची 'माझी जीवनकथा' या त्यांच्या आत्मवृत्तातून सादर केला जात आहे.

## लोकमान्यांचे मार्गदर्शन

—गंगाधर बाळकृष्ण देशपांडे

पुण्यात १८८४ साली हिंदूमुसलमान समाजात वितुष्ट येऊन हिंदूंनी गणपतीचा उत्सव सार्वजनिक रीतीने करण्याची पद्धत घातली. यात टिळकांनी पुढाकार घेतला होता. प्रथम उत्सव पुण्यात सुरू झाला त्या वेळी मी तेथे होतो. दारूवाल्याच्या पुलानजिक जी मारामारी झाली त्या रात्री मी उत्सव पाहण्याकरिता व मेळ्यांची गाणी ऐकण्याकरिता गायकवाडाच्या वाड्यात गेलो होतो. दंगा होऊन खून झाले होते व खुनाबद्दल काही हिंदू लोकांवर खटले भरण्यात आले होते. त्यात श्री. तात्यासाहेब नातू—आमचे स्नेही बाबासाहेब सोमण यांचे वडील बंधू, हे त्या वेळी बी. ए.च्या वर्गांत शिकत होते—वगैरे मंडळी होती. दंग्यामुळे व या खटल्यामुळे पुण्यात बरीच खळबळ उडाली होती. खटला सेशन कमिट झाल्यानंतर डिस्ट्रिक्ट जज्जापुढे चालला होता. त्या वेळी खटला ऐकण्याकरिता मी जात असे. खटल्याचा निकाल होऊन आरोपी निर्दोषी ठरले. त्या वेळेपासून गणपती-उत्सवाला पुण्यात बराच जोर आला होता. पुण्याचे उदाहरण पाहून मुंबईस व महाराष्ट्रातील इतर ठिकाणी त्याच पद्धतीवर सार्वजनिक गणपती-उत्सवाला सुरुवात झाली. उत्सव धार्मिक आहे व तो परंपरागत चालत आहे, यात नवीन काही नाही, अशा प्रकारे या उत्सवाचे समर्थन करण्यात येत असे. पण मला ते पटत नव्हते. मुसलमानांच्या मोहरमच्या सणातून लोकांना परावृत्त करून त्या उत्सवाच्या बदली हिंदूंना एखादा उत्सव असावा, याच हेतूने गणपती-उत्सवाला प्रारंभ झाला असावा, असे माझे मत त्या वेळी झाले होते आणि तेच मत अद्यापि कायम आहे. यापूर्वी बेळगावास ज्याप्रमाणे बेळगावच्या हिंदूंनी शिमग्याच्या सणाला नवीन वळण देण्याचा उपक्रम केला होता, त्याचप्रमाणे हाही पुण्याच्या लोकांचा प्रयत्न होता. पण बेळगावास सार्वजनिक उत्सवांना देशाभिमानमूलक चळवळीची जोड देणारा कोणी पुढारी न भेटल्यामुळे बेळगावच्या शिमग्याचे स्वरुप १९०४-५ पर्यंत उत्सवाचेच राहिले. पण पुढे बंगालच्या चळवळीमुळे शिमग्याच्या सणातही व्याख्याने वगैरे होऊ लागली. ही हकीकत यापूर्वीच आली आहे. गणपती-उत्सवात मात्र पहिल्यापासून व्याख्याने वगैरे करवण्याची पद्धत सुरू होती.

## बेळगावातही गणपती-उत्सव

पुण्याच्या पद्धतीवर १९०६ साली गणपतीचा सार्वजनिक उत्सव करण्याची कल्पना बेळगावच्या रविवार पेठेतील व्यापारी लोकाच्या डोक्यात आली. पेठ चांगल्या स्थितीत असल्यामुळे उत्सवाकरिता दोनतीन हजार रुपये खर्च करणे त्यांना कठीण नव्हते. त्यापैकी ज्या कित्येकांनी पुण्याचा उत्सव पाहिला होता त्यांची हौस विशेष होती. केवळ गाणेबजावणे, कथाकीर्तने, मांडवआरास, अन्नदान, इत्यादी जुन्या मामुली उत्सवाच्या प्रकारावरच भर न देता नवीन पद्धतीचा म्हणजे व्याख्याने, प्रवचने वगैरे करवण्याचा मंडळीचा विचार ठरला. नवीन पद्धतीने बेळगावात अशा प्रकारचा उत्सव साजरा करावयाचा म्हणजे माझा व माझ्याशी सहकार्य करणाऱ्या मित्रांचा संबंध आलाच पाहिजे, इतकी बहुजनसमाजात आमची प्रतिष्ठा वाढली होती. त्यामुळे ही व्यापारी मंडळी गोविंदराव याळगींना घेऊन माझ्याकडे आली व त्यांनी आपला विचार मला कळवला. मुसलमानांचे अनुकरण करून त्यांच्या उत्सवाला कमीपणा आणण्याच्या उद्देशाने, टिळकांच्या प्रोत्साहनाने उत्सवाचा आरंभ झाला होता, असे माझे मत असल्याने या उत्सवाकडे बरेच दिवस मी तिरस्कारदृष्टीने पाहात असे. पण यावेळी स्वदेशी चळवळीने मला पूर्णपणे भारले असल्यामुळे व यापूर्वीच शिमग्याच्या उत्सवात व्याख्याने देण्याला मी सुरुवात केल्यामुळे गणपती- उत्सवाला तात्त्विक विरोध मी करीत नसे. देशाच्या हल्लीच्या परिस्थितीत लोकांची प्रवृत्ती देशकार्याभिमुख करणे व त्याकरिता वाटेल त्या संधीचा फायदा घेणे यात काही गैर नाही असे मला वाटू लागले होते. स्वदेशी चळवळीला सर्वस्वी मी वाहून घेतले नसते तर माझ्यामध्ये कदाचित ह्या बदल झाला नसता. असो. रविवार पेठेतील व्यापारी मंडळीनी उत्सव नवीन पद्धतीवर करावा असे माझे मत मी दिले व व्याख्याने वगैरे करवण्याची तजवीज करण्याचे मी पत्करले. रविवार पेठेतील मंडळींचा बेत पक्का ठरून त्यांनी वर्गणी गोळा करण्याला प्रारंभ केला. ही गोष्ट जाहीर झाल्याबरोबर शहरात दहावीस ठिकाणी उत्सवाची तयारी झाली व सर्वांनी माझे सहकार्य मागितले. प्रत्येक ठिकाणी एकदोन व्याख्याने देण्याचे मी कबूल केले. इतकी तयारी झाल्यानंतर रविवार पेठेत अपेक्षेपेक्षा जास्ती वर्गणी जमू लागली व शहरातही उत्साह वाढतो आहे असे दिसू लागल्यानंतर टिळकांना बेळगावास आमंत्रण द्यावे अशी कल्पना आली.

## टिळकांना निमंत्रण

टिळकांच्याबद्दल माझी पूर्वीची मनातील तेढ कमी झालेली होती, तरी प्रथमप्रथम त्यांना आमंत्रण देण्याला माझे मन तयार होईना. माझ्या पंचवीस-

तीस व्याख्यानात काही ठिकाणी सामाजिक विषयावर बोलण्याचाही माझा विचार होता. टिळकांना आमंत्रण दिल्यानंतर त्यांनी येण्याचे कबूल केल्यास लोकांचे लक्ष त्यांच्याकडे व त्यांच्या व्याख्यानाकडे लागणे अगदी स्वाभाविक होते. त्यांच्या भाषणात राजकीय विषयच असणार हेही ठरल्याप्रमाणेच होते. या धामधुमीत सामाजिक विषयाला कमी महत्त्व येणार हे ओळखल्यामुळे टिळकांना आमंत्रण देण्याबद्दल माझे निश्चित मत होईना. पण गोविंदराव याळगींनी हा विचार उचलून धरला होता. त्यांचा व माझा इतका संबंध आला होता की, त्यांनी आपल्या कार्यतत्परतेमुळे माझे मन जवळजवळ पूर्णपणे आकर्षण करून घेतले होते. त्यांचा शब्द मोडण्याचे माझ्या हातून झाले नाही. माझ्या सार्वजनिक आयुष्यात असे अनेक प्रकार घडले आहेत व माझ्या या जिवलग स्नेह्याच्या प्रोत्साहनाने मी अनेक जबाबदारीची व जोखमीची कामे अंगावर घेतली आहेत. फक्त प्रोत्साहन देऊन आपण नामानिराळे राहणाऱ्यांपैकी ते नव्हते. माझ्यावर जे जे प्रसंग आले त्या त्या प्रसंगात ते माझे सहभागी होते; इतकेच नव्हे तर आपला पैसा, आपली सर्व शक्ती खर्ची घालून आपल्यावर संकटे ओढून घेण्यालादेखील त्यांनी कमी केले नाही. असो.

गोविंदरावांचा आग्रह पाहून टिळकांना आमंत्रण देण्याला मी संमती दिली. पण एवढ्याने हे भागण्यासारखे नव्हते. टिळकांचे दौरे वगैरे ठरले असल्याने पत्रोपत्री किंवा तारा वगैरे देऊन आमंत्रण देण्याने ते स्वीकारले जाणार नाही अशी भीती वाटून प्रत्यक्ष चारपाच व्यापारी मंडळींनी पुण्यास आमंत्रणाकरिता जाण्याचा विचार केला. प्रत्यक्ष टिळकांची व माझी थोडी ओळख होतीच आणि 'केसरी'तून चळवळीच्या हकीकतीत बेळगावच्या लोकांत माझ्याच नावाचा बराच पुकारा होत होता. त्यामुळे मला बरोबर घेऊन गेल्यास आमंत्रण स्वीकारले जाईल असे मंडळींना वाटले व त्याप्रमाणे त्यांनी मला कळवले. माझ्यापेक्षा नातूंची व त्यांची ओळख जास्ती आहे आणि ते बेळगावचे पुढारी आहेत तेव्हा त्यांना घेऊन जा, असे मी त्यांना विनविले. पण त्यांना हा विचार पसंत पडला नाही व मलाच आपल्याबरोबर येण्याबद्दल त्यांनी आग्रह केला आणि शेवटी मीही कबूल झालो. तेलंग व मंडळींनी या उत्सवासंबंधाने व टिळकांच्या येण्यासंबंधाने प्रतिकूल वातावरण करण्याचा उघड व प्रच्छन्न प्रयत्न चालवला होता. माझा या होणाऱ्या कार्यक्रमांशी संबंध आहे असे कळताच त्यांच्या प्रयत्नाची गती जास्ती जोरात आली. मीही माझ्या परीने जास्ती सावधगिरीने काम करू लागलो. टिळकांनी आमंत्रण स्वीकारून येण्याचे कबूल केल्यास उत्सव कोणत्याही प्रतिक्रियेला भीक न घालता जोरात पार पडला पाहिजे असेही माझ्या मनात आले. म्हणून सर्व जबाबदारी माझ्यावरच असली

तरी बेळगावातील प्रतिष्ठित मानण्यात येणाऱ्या सर्व लोकांची सहानुभूती मिळवण्याचा विचार मी केला आणि प्रथम नातू व छत्रे वकील यांची भेट घेतली. छत्रे वकिलांनी हे काम अंगाबाहेर टाकल्याप्रमाणे केले, पण त्यांचा विरोध होणार नाही अशी मी खात्री करून घेतली. नंतर नातूच्यांकडे गोष्ट काढली. त्यांनी मला ताबडतोब संमती दिली. ही संमती मिळताच मी एक "टिळक स्वागत मंडळ" स्थापून नातूंना अध्यक्ष होण्याबद्दल विनंती केली व त्यांनी ती मान्य केली. छत्रे हेही स्वागत मंडळाचे सभासद झाले. बेळवी वगैरे इतर आम्हाला विरुद्ध नसलेली मंडळी स्वागत मंडळात दाखल झाली. त्यामुळे मला धीर आला व तेलंगांच्या विरोधाला जुमानण्याचे कारण नाही असे मला वाटले. रविवार पेठेच्या मंडळीतर्फे टिळकांना "काही जरुरीच्या कामाकरिता भेटावयाचे आहे तर जरूर आपला मुक्काम कोठे आहे हे कळवावे" अशा अर्थाची तार माझ्या सहीने केली आणि तारेखाली "देशपांडे वकील" अशी सही केली.

टिळकांकडून दुसरेच दिवशी येण्याबद्दल जबाब आला. मी व रविवार पेठेची तीन-चार मंडळी मिळून पुण्याला आलो. गावात जात असतानाच रास्त्यांच्या वाड्याजवळ लो. टिळक गाडीतून जात असताना दिसले. तेव्हा आमची गाडी थांबवून मी उतरलो. त्यांची गाडीही थांबली आणि नमस्कार वगैरे झाल्यानंतर मी आता स्टेशनवर जात आहे, दोन प्रहरी दोन-तीन वाजण्याच्या सुमारास तुमचे सर्व कागदपत्र घेऊन या, असे ते म्हणाले. मला त्यांचे बोलणे समजले नाही. कोणत्या कागदपत्रांना उद्देशून ते बोलले याचा मला बोध झाला नाही. तथापि ते गडबडीत असल्यामुळे मी "बरे" म्हणून सांगून परत आलो. दोन प्रहरी तीन वाजण्याच्या सुमारास आम्ही त्यांना भेटण्याकरिता गेलो. ते माडीवर आपल्या नेहमीच्या जागी आरामखुर्चीवर पडले होते. हातात आडकित्ता असून सुपारी कातरण्याचे काम चालू होते. आम्ही जाऊन बसल्यानंतर "काढा तुमचे कागद!" असे ते म्हणाले. "कागद कसले ? आपल्याला गणपती-उत्सवाला आमंत्रण देण्याकरता आम्ही आलो आहोत." असे मी उत्तर दिले. "तुम्ही वकील म्हणून तारेत सही केली होती; यावरून काही कायद्याचा सल्ला घेण्याकरिता येणार आहात अशी माझी समजूत झाली." असे बोलून टिळकांनी बेळगावची हकीकत विचारली. उत्सवात कार्यक्रम कोणते ठरले आहेत याचा तपास केल्यानंतर नाशिकाहून बेळगावला येण्याचे त्यांनी कबूल केले. बेळगावचा मुक्काम तीन दिवसांचा ठरविण्यात आल्यानंतर आम्ही निरोप घेऊन निघालो. मोकळ्या मनाने टिळक माझ्याबरोबर बोलले आणि आढेवेढे न घेता त्यांनी आमंत्रण स्वीकारले याबद्दल मला व बरोबरीच्या मंडळींना आनंद झाला. टिळकांना माझ्याबद्दल आपलेपणा वाटतो, असा माझ्या मित्रांचा ग्रह झाला.

कोणत्याही देशकार्याला शक्य ती मदत करण्याचे व्रत टिळकांनी घेतले आहे, म्हणून सवड आहे असे कळताच त्यांनी आमंत्रण स्वीकारले, माझा काही संबंध नाही, असे मी मंडळींना कळविले. पण त्यांची समजूत झाली नाही व त्यांनी आपलेच म्हणणे आग्रहाने मांडले. परत आल्यानंतर याच गोष्टीचा पुकार त्यांनी केला. त्यामुळे माझी मान्यता थोडी वाढली असे मला दिसून आले.

बेळगावास आल्यानंतर मेळे वगैरे तयार करणे, मिरवणूक काढणे, व्याख्यानांच्या जागा वगैरे ठरवणे, ही सर्व कामे मी गोविंदराव याळगी यांच्यावर सोपविली. बेळगावला टिळक येणार हे समजताच जवळच असलेल्या शहापुरातील सराफबाजारच्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर उत्सव करण्याचा बेत केला. कुरुंदवाड संस्थानातील अनगोळ-वडगावच्या लोकांचीही तयारी झाली. आपल्या उत्सवाला टिळकांनी यावे अशी त्यांनी माझ्याकडे मागणी केली. शहापूर हा गाव व्यापाराचा असून तेथे सराफीचा व विणकऱ्यांचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. विणकर लोकात व इतर व्यापाऱ्यात स्वदेशीसंबंधीने मी चळवळ केली होती व त्यांचीही मला, चळवळीला सहानुभूती मिळत होती. म्हणून टिळकांच्या मुक्कामात एक व्याख्यान शहापुरास होण्याचा कार्यक्रम ठरविण्यात आला. अनगोळलाही पानसुपारीला जाऊन येण्याचे ठरवले. हा उत्सव केवळ बेळगाव शहरापुरताच न होता त्याची व्याप्ती वाढावी व जिल्ह्यातील लोकांशी दळणवळण वाढावे अशा इच्छेने मी स्वागत मंडळाचा चिटणीस या नात्याने टिळकांच्या स्वागताकरिता तालुक्याच्या गावांतील व इतर मोठ्या गावांतील प्रमुख लोकांना आमंत्रणे पाठवली आणि स्वतः काही ठिकाणी टिळकांच्या आगमनाचे महत्त्व समजावून दिले. टिळकांचे महत्त्व आमच्या प्रांतात वाढू नये या उददेशाने 'धुरीण' पत्र काढण्याच्या प्रयत्नात सहकार्य करणाऱ्या मला टिळकांच्या स्वागताकरिता व त्यांच्या आगमनाचे महत्त्व पटवून देण्याकरीता धडपड करताना पाहून कित्येकांना आश्चर्य वाटले. प्रवाहपतितात माझी गणना कित्येकांनी केली. काही परिचित टिळक-अभिमानी मंडळी "आता कसा आमच्या मताला आलास!" असे म्हणू लागली.

## टिळकांचे बेळगावात शुभागमन

टिळकांचे १९०६ साली बेळगावला येणे ही बेळगावच्या व एकंदरीत आमच्या प्रांताच्या दृष्टीने एक अपूर्व गोष्ट घडली, असे म्हणण्यास हरकत नाही. आज 'कर्नाटक' शब्दाने मुंबई इलाख्यांतील बेळगाव, धारवाड, विजापूर व कारवार हे चार जिल्हे व मद्रास इलाख्यातील मंगळूर, बळ्ळारीचा अर्धा भाग, म्हैसूरचे संबंध संस्थान, कुर्ग, आणि निजामशाहीतील गुलबर्गा व रायचूर जिल्हे इतक्या व्यापक प्रदेशाचा बोध होतो. पण त्या वेळी 'आमचा प्रांत' म्हणजे मुंबई

इलाख्यातील चार जिल्हे इतकीच आकुंचित कल्पना होती. बाकीच्या कर्नाटकाशी या मुंबई कर्नाटकाचा संबंध नव्हता. मुंबई कर्नाटकातदेखील कारवार जिल्ह्याचा रेल्वेशी संबंध नसल्याने तो जिल्हाही तुटक असाच राहिला होता. धारवाड येथील काही मंडळींच्या प्रयत्नाने कर्नाटक एकीकरणाची कल्पना येऊ लागली होती. १९२० साली नागपूर काँग्रेसमध्ये भाषावार प्रांत करण्याचे ठरून संबंध कर्नाटकाला काँग्रेसमध्ये स्वतंत्र स्थान मिळाले. १९२४ साली कर्नाटकची काँग्रेस बेळगावला भरून एकीकरणाच्या कल्पनेला दृश्य स्वरूप दिसू लागले. १९३०-१९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीमुळे हे स्वरूप जास्ती व्यक्त होऊ लागले. अशी स्थिती आज असली, तरी टिळकांच्या १९०६ च्या आगमनाच्या वेळी असे स्वरूप नव्हते. बेळगाव, धारवाड व विजापूर हे तीन जिल्हेच साधारणपणे सार्वजनिक कामात पडणारे असे मानले जाई. निदान मुंबई इलाख्यापुरतेच बोलावयाचे तर वरील गोष्टच तंतोतंत लागू पडत होती. बेळगावचे नातू, छत्रे, भाटे, या मंडळींना त्या काळच्या परिस्थितीला अनुरूप अशा सार्वजनिक कामाची हौस होती. यापैकी पहिले दोघे मुंबई कायदे कौन्सिलचे दक्षिण भागातर्फे सभासदही होते. भाटे यांनी प्रयत्न केला होता; पण त्यांना यश आले नाही. विजापूरचे देसाई वकील हेही कायदे कौन्सिलचे सभासद होते. पण त्यांचा सार्वजनिक आयुष्यक्रम बेळगावच्या मंडळींच्या मानाने कमी दर्जाचा होता. धारवाडास मुदवेडकर, विठ्ठलराव जोशी, पित्रे वकील यांच्यासारखी काही तरूण होतकरू मंडळी पुढे येऊ लागली होती. पण जुन्या मंडळीत नाव घेण्यासारखे कोणी नव्हते असे म्हटले तरी चालेल. निदान राजकीय उलाढालीच्या बाबतीत धारवाड जिल्हा मागासलेला होता. विजापुरास नवीन मंडळीपैकी श्रीनिवासराव कौजलगी यांनीं स्वदेशी चळवळीत पुढाकार घेतला होता. पण या सर्व प्रांतांतून सार्वजनिक कामाकरिता सुसंघटनात्मक अशी एखादी एकसुत्री शक्ती उत्पन्न झाली नव्हती. टिळक हे बेळगावला पुढे सन १९१६ मध्ये प्रांतिक परिषदेला आले होते व बेळगाव जिल्ह्यातील संकेश्वरला गेले होते. धारवाड किंवा विजापूर जिल्ह्यात ते गेले नसावेत. १९०६ पूर्वी बेळगाव जिल्ह्यात दोन वेळा जरी ते आले होते, तरी त्या वेळी त्यांची प्रसिद्धी इतकी नव्हती व त्यांची कर्तबगारी इकडील लोकांना माहीत नव्हती. १८९७ सालच्या खटल्यापासून त्यांची लोकप्रियता वाढीला लागली होती व त्यांची माहितीही आमच्या प्रांतातील लोकांना होऊ लागली होती. भाटे, छत्रे, नातू वगैरे मंडळींचा व त्यांचा प्रत्यक्ष परिचय होता आणि बरेच लोक त्यांच्या कायद्याच्या वर्गात शिक्षण घेऊन आले होते. तरी त्यांचा निकट संबंध येऊन त्यांच्या कार्यात प्रत्यक्षपणे भाग घेणारे कोणी नव्हते असें म्हटले तरी चालेल. तो योग १९०६ साली त्यांच्या बेळगावला येण्याने घडून आला.

तेव्हापासून त्यांचा अनुयायी म्हणून काम करण्याचे भाग्य मला लाभले. तेव्हापासूनच त्यांच्या संबंधाने माझ्या मनात जी पूर्वी तेढ होती ती नाहीशी झाली व माझी निष्ठा वाढली. १९०६ पासून १९२० पर्यंत मधला सहा वर्षांचा त्यांचा बंदिवासाचा काल सोडल्यास माझा व त्यांचा प्रत्यक्ष संबंध अनेकदा आला आणि वऱ्हाड नागपूरपासून आमच्या प्रांतापर्यंत त्यांचे जे अनेक प्रमुख अनुयायी होते त्यांत माझी गणना होऊ लागली. माझ्या अंगी जी काही थोडीबहुत सार्वजनिक कामे करण्याची पात्रता आली आहे त्यांचे सर्व श्रेय टिळकांनी मला प्रथम जे प्रोत्साहन दिले त्यालाच दिले पाहिजे. माझ्यासारखी कमी दर्जाचीं व कामाची हौस असणारी माणसे पुष्कळ असतात. पण टिळकांसारख्या पुढाऱ्यांचा निकट संबंध येण्याचा योगायोग त्या सर्वांना लाभत नाही. एखादया माणसात सार्वजनिक कामाला उपयोगी पडण्यासारखा एखादा जरी साधारण गुण उत्कर्षाने असलेला टिळकांना दिसला व तो त्यांच्या सान्निध्यात आला म्हणजे टिळक त्या गुणाचा गौरव करून त्या माणसाचा संग्रह करीत. त्याला आपलेपणाने वागवीत. लोकसंग्रहाचे हे प्रमुख रहस्य समजून काम करणारे पुढारी त्या वेळी टिळकांखेरीज कोणी नव्हते. टिळकांचे विरोधी याच त्यांच्या गुणाला "सवंग लोकप्रियतेला लाचावणे" असे निंदाव्यंजक नाव देत. माझाही समावेश या मंडळीत होत असे. पण १९०६ पासून प्रत्यक्ष अनुभवाने या त्यांच्यावर लादल्या जाणाऱ्या आरोपात तथ्य मुळीच नाही असे मला आढळून आले. आपल्या अनुयायांशी अथवा आपल्याशी सहकार्य करणाऱ्यांशीच ते आदराने वागत असे नसून राष्ट्रकार्याकरिता आपला स्वतःचा अभिमान विसरून ते आपल्या विरोधी माणसांशी वागतानाही आपल्याकडे कमीपणा घेत असत. कार्याकडे त्यांची दृष्टी असे व या कार्याकरिता ते वाटेल ती धस सोसून लोकांचा संग्रह करीत. प्रतिपक्षावर पुष्कळ प्रसंगी त्यांनी तीव्र व मर्मभेदी टीका केली आहे; नाही असे नाही. पण ती टीकादेखील कार्याकडे दृष्टी ठेवूनच करण्यात आली आहे; त्यात प्रतिपक्षातील माणसांचा पाणउतारा व्हावा व आपली स्वतःची प्रौढी वाढावी हा हेतू नसे. हे त्यांच्या आयुष्यांतील अनेक प्रसंगांवरून निःपक्षपातीपणाने पाहणाऱ्यांना दिसून येईल. असो.

### टिळकांची व याळगींची भेट

ठरल्याप्रमाणे टिळक बेळगावला उत्सवाकरिता नाशिकहून आले. नाशिकला उत्सवाकरिताच ते गेले होते. ते येण्यापूर्वी बेळगावास तीनचार दिवस सारखा पाऊस पडत होता. त्यामुळे आम्हाला निरुत्साह वाटत होता. पण कर्मधर्मसंयोगाने ते आल्या दिवसापासून पावसाने उघाडी दिली. गोविंदराव याळगींनी मिरवणुकीची तयारी जय्यत ठेवली होती. पुढाऱ्यांची मिरवणूक

काढण्याचा हा बेळगावात पहिलाच प्रसंग होता. या उत्सवाचा व टिळकांच्या येण्याचा गवगवा बराच झाला होता; त्यामुळे बाहेरगावचे हजारो लोक आले होते आणि मिरवणूक बऱ्याच उत्साहाने पार पडली. अशा प्रकारचे कार्यक्रम करण्यात काळाचा व शक्तीचा अपव्यय होतो असा अलीकडे केव्हाकेव्हा आक्षेप घेण्यात येत असतो. मिरवणुकी काढणे ही एक मामुलीच बाब होऊन बसल्यामुळे या आरोपात सत्यांशही नाही असे म्हणवत नाही. तथापि त्या वेळी टिळकांसारख्या असामान्य पुढाऱ्याच्या मिरवणुकीमुळे लोकांत जागृती उत्पन्न करण्याला किती मदत होत असे, याची कल्पना आज होणे कठीण आहे. मिरवणूक संपल्यानंतर त्यांना त्यांच्या उतरण्याच्या ठिकाणी—म्हणजे त्यांच्या कायद्याच्या वर्गातील त्यांचे शिष्य दादासाहेब नरगुंदकर यांच्या घरी—पोचवण्यात आले. दहापंधरा मिनिटे विश्रांती घेतल्यानंतर मला टिळकांनी एकीकडे बोलाविले, व "आजच्या मिरवणुकीत प्रामुख्याने भाग घेणारा गिड्डा, गोरासा, मध्यम बांध्याचा तरूण कोण?" असा प्रश्न केला. माझे स्नेही गोविंदरावांना उद्देशून त्यांनी हा प्रश्न केला होता. मी त्यांना तसे उत्तर दिले. यानंतर मला त्यांनी बजावले, "मी नाशिकहून येत आहे. तेथेही मला उत्साही, तरुण, होतकरू मंडळी भेटली. पण त्यांच्या डोक्यात भलतेसलते विचार असल्याचे मला दिसून आले. तुमच्या या गोविंदरावांचे तरुण मंडळीवर चांगले वजन आहे असे दिसते. तेव्हा त्यांना संभाळा व भलत्या गोष्टीकडे त्यांना जाऊ देऊ नका." वगैरे. माझा विशेष परिचय नसता आपलेपणाने अशा प्रकारचे विचार मला सांगितल्याबद्दल मला आनंद झाला. गोविंदरावांना समक्ष बोलावून त्यांची व टिळकांची ओळख करून द्यावी व त्यांच्या तोंडूनच गोविंदरावांना सांगवावे, म्हणून गोविंदरावांचा तपास केला. पण त्यांच्या स्वभावाप्रमाणे एक काम संपल्याबरोबर उगीच पुढेपुढे करीत बसून वेळ न घालविता दुसऱ्या कामाच्या तयारीकरिता निमूटपणे ते पूर्वीच निघून गेले होते. त्यांची भेट झाल्यानंतर टिळकांनी सांगितलेली गोष्ट मी त्यांना कळवली व ते नको नको म्हणत असताही टिळकांकडे नेऊन त्यांची ओळख करून दिली. ही ओळख पुढे वाढत गेली.

## टिळकांच्या चर्येवरील तेज

टिळकांच्या मुक्कामाच्या पहिल्या दिवशी रविवार पेठेतील गणपतीपुढे त्यांचे भाषण झाले. मांडव जरी मोठा होता, तरी टिळकांचे दर्शन घेण्याकरिता व भाषण ऐकण्याकरीता जो प्रचंड लोकसमुदाय जमला होता त्याचा समावेश मंडपामध्ये होणे अशक्य होते. म्हणून मंडपाला लागून असलेल्या चव्हाटयावर व्याख्यानाची सोय केली होती. व्यासपीठावर उभे राहून टिळकांच्या तोंडून

दहापंधरा वाक्ये निघतात न निघतात तोच झिमझिम पावसाला सुरवात झाली. सभेत हजारो छत्र्या उघडल्या गेल्या. त्यामुळे सभेतील शांती मोडू लागली. व्याख्यानाच्या वेळी या प्रकारे बेरंग होण्याची चिन्हे दिसताच मी प्लॅटफॉर्मवर गेलो आणि माझ्या मोठ्या आवाजात लोकांनी छत्र्या मिटाव्या व पावसाने चिंब भिजण्याचा प्रसंग आला तरी जागच्या जागी बसून शांतपणे व्याख्यान ऐकावे अशी विनंती केली. त्याबरोबर एकदोन मिनिटात सर्व छत्र्या एकदम मिटल्या गेल्या. फक्त अपवाद म्हणून तेलंगांनी मात्र आपली छत्री मिटली नाही व आपले मनोधैर्य दाखवले! फक्त टिळकांच्या डोकीवर छत्री धरण्यात आली होती. पण आपल्या एकट्याच्याच डोक्यावर छत्री धरल्याचे टिळकांना समजताच छत्री मिटण्याबद्दल टिळकांनी संगितले. त्याप्रमाणे तीही मिटली गेली. पण सुदैवाने दोनचार मिनिटांतच पाऊस थांबून स्वच्छ ऊन पडले. तेव्हा तेलंगांनीही आपली छत्री मिटली. तेव्हा लोकांत हशा पिकला!

टिळकांचे भाषण जवळजवळ दोन-तासपर्यंत झाले. यापूर्वी संमती-वयाच्या कायद्याच्या चळवळीत आणि काँग्रेसमध्ये व बेळगावच्या प्रांतिक कॉन्फरन्समध्ये मी त्यांची भाषणे ऐकली होती. पण या भाषणाचा परिणाम फार दिवस माझ्या मनावर राहिला. अद्यापि त्यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दे मला आठवतात. अंतःकरणाला भिनून जाणारे त्यांचे विचार आणि ते सोप्या, सरळ, सर्वांना समजण्यासारख्या शब्दात मांडण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. देशाची हीन स्थिती होण्याला इंग्रजांची राज्यपद्धती कसकशी कारणीभूत झाली याची चिकित्सा करताना त्यांना एक प्रकारचा त्वेष येई आणि त्या त्वेषाच्या आवेगात त्यांच्या डोळ्यात व चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज चमकत असे, असे माझ्या अनुभवाला पुढे पुष्कळ वेळा आले. पण या स्वरूपाचे प्रथम दर्शन मला याच सभेत झाले. टिळकांची अनेक छायाचित्रे माझ्या पाहण्यात आली आहेत; पण त्यांमध्ये या तेजाचे चित्र माझ्या पाहण्यात आले नाही.

### टिळकांची वक्तृत्वशैली

हिंदुस्थानातून चाळीसपन्नास कोटी रुपये दरसाल कापडाच्या पायी परदेशात जातात असे एक विधान त्यांनी आपल्या भाषणात केले. अर्थात सुशिक्षित व पांढरपेशा लोकांना यात न समजण्यासारखे काही नव्हते व ही गोष्ट त्यांना नवीही नव्हती. पण, सभेत कांबळी घेऊन हजारो लोक खेड्यापाड्यांतून आले होते इकडे टिळकांचे लक्ष गेले, आणि त्यांना आपले हे विधान समजून देण्याकरिता त्यांना समजेल असे उदाहरण त्यांनी दिले. त्यांनी "तुम्ही गोकाकची गिरणी पाहिली आहे ना?" असा लोकांना उद्देशून प्रश्न केला. "होय" असे बहुतेक सर्वतोमुखी उद्गार निघाले. बेळगाव जिल्ह्यात ही एकच गिरणी

असल्यामुळे पुष्कळ लोकांना तिच्याबद्दलची कल्पना आहे. म्हणून या गिरणीचे उदाहरण घेऊन टिळकांनी आपल्या म्हणण्याचे स्पष्टीकरण केले. ते असे: गोकाकची गिरणी सुमारे वीस लाख भांडवलावर उभारण्यात आली आहे. एक कोटी रुपयात असल्या पाच गिरण्या उभारता येतील. पन्नास कोटी रुपयात अडीचशे गिरण्या स्थापणे शक्य आहे. तेव्हा प्रत्येक वर्षी कापडाकरिता आमच्या देशातून जो पैसा जातो त्यातून दरवर्षी दोन-अडीचशे गिरण्या उभारल्या जातील. पूर्वी चाळीसपन्नास कोटी रुपये परदेशी जातात या विधानामुळे सभेत चुळबूळ झाली नाही. पण स्पष्टीकरण ऐकल्याबरोबर खेड्यांतील लोकांच्या तोंडावरदेखील आश्चर्यभरित मुद्रा दिसली आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. त्याचप्रमाणे स्वदेशीबरोबर बहिष्काराचे समर्थन उत्तम प्रकारे त्यांनी केले. दुसरे दिवशी शहापूर व अनगोळ येथे भाषणे झाली व तीही हजारो लोकांनी ऐकली. शेवटच्या दिवशी त्यांना थाटाची मेजवानी देण्यात आली. त्यावेळी गावांतील बहुतेक शिष्ट मंडळींना आमंत्रण देण्यात आले होते. जेवण झाल्यानंतर आपल्याला नेमस्त असे समजणाऱ्या एका गृहस्थांनी त्यांना प्रश्न केला की, समजा, उद्या आमच्या लोकांच्या हाती सत्ता आली, तर तुम्ही (टिळक) काय करणार? टिळकांनी थोडे हसून उत्तर दिले, "माझे काम आताप्रमाणेच सत्ता चालवणाऱ्यांच्या कारभारांतील दोष दाखवून सुधारणा करण्याचे." त्या नेमस्त गृहस्थांचे तोंड बंद झाले.

शहापूरास प्रतिष्ठित व्यापारी वर्गांत सारस्वत ब्राह्मणांचा भरणा जास्ती आहे. १९०६ च्या गणपती-उत्सवात त्याच मंडळींनी प्रामुख्याने भाग घेतला होता. टिळक हे चित्पावन ब्राह्मण म्हणून त्यांच्या स्वागतात सारस्वत ब्राह्मणांनी भागघेणे योग्य नाही, अशा प्रकारची चळवळ बेळगावांतील एकदोन सारस्वत ब्राह्मणांनी केली होती. तीत तेलगांचे अंग असावे असा पुष्कळांना संशय आला होता. पण या चळवळीचा परिणाम काही झाला नाही. एका सारस्वत ब्राह्मणांने टिळकांना खासगी रीतीने प्रश्न केला की, "तुम्हाला आमच्या जातीत जेवणाला हरकत आहे की काय?" "अभक्ष्य पदार्थाखेरीज इतर कोणतेही पदार्थ तुमच्या घरी खाण्यास मला काहीच हरकत नाही. इतकेच नव्हे, पंचद्रविड ब्राह्मणांना हरकत असू नये व अभक्ष्य पदार्थांचा त्याग केल्यास रोटीव्यवहार चालूहोईल" असे त्यांनी उत्तर दिले. शहापूरच्या जैन मंडळींनी त्यांना पानसुपारी केली. त्या वेळी जैन धर्म हा हिंदू धर्मांतूनच निघाला असून त्यातील व हिंदू धर्मांतील समान्य तत्त्वे कोणती व जैन धर्मांची स्वतंत्र अशी तत्त्वे कोणती याचे टिळकांनी विवेचन केले. हिंदू वैदिक धर्मापेक्षा जैन धर्म पुरातन व स्वतंत्र आहे असे ज्या जैनांचे मत होते त्यांना टिळकांचे म्हणणे पटले नाही आणि त्यामुळे थोडा वादविवाद झाला.

या प्रमाणे तीन दिवसांचा कार्यक्रम आटोपून टिळकांची स्वारी पुण्याला गेली. या तीन दिवसांच्या सान्निध्याने माझ्यामध्ये बरेच परिवर्तन झाले. इतक्या थोड्या कालात माझ्यामध्ये परिवर्तन घडण्यासारखे काय होते असे कोणी विचारल्यास त्याचे समाधान करणे मला अशक्य आहे. म्हणून मला कोणी उतावळ्या स्वभावाचा म्हणून किंवा भावनाप्रधान म्हणून दोष देतील कित्येक देतात हेही मला माहीत आहे. तथापि या टीकेकडे लक्ष न देता माझ्या सार्वजनिक आयुष्यावर टिळकांच्या या भेटीचा काय परिणाम झाला व तो अखेरपर्यंत कसा टिकला याचे दिग्दर्शन करणे मला योग्य वाटते. टिळकांच्या पश्चात हिंदी राजकारणाची मुख्य सूत्रे गांधींच्या हाती गेली. त्या वेळी व तेव्हापासून आजपर्यंत गांधींशी यथाशक्ती मी सहकार्य करीत आलो. त्यामुळे टिळकांच्या मार्गाला मी सोडले असाही एक आरोप माझ्यावर करण्यात येत असतो. पण माझ्या मते १९०६ पासून आतापर्यंत जवळजवळ पंचवीस-सव्वीस वर्षांत टिळकांच्या सहवासामुळे ज्या ध्येयाची मी माझ्या अंतःकरणात स्थापना केली त्यापासून मी च्यूत झालो आहे असे मला वाटत नाही. या संबंधीचे विवेचन पुढे १९२० सालच्या हकीकतीत येणारच आहे. असो.

टिळक गेल्यानंतर 'चिकित्सक' पत्रातून टिळकांवर तेलगांनी खूप हल्ला चढवला आणि छत्री प्रकरणाची हकीकत देऊन टिळकांची व माझी टवाळकी केली. तेव्हापासून पुढे काही तरी सबब काढून किंवा माझ्या भाषणांचा विपर्यास करून माझ्यावर टीका करण्याचा तेलगांनी चंग बांधला होता. त्या टीकेचा परिणाम असा झाला की, लोकात माझी प्रतिष्ठा वाढतच गेली. पण त्या वेळी सरकारची माझ्यावर नजर न जाता मी बचावलो गेलो याचे कारण माझी भाषणे टिपून घेण्याकरिता पुण्याहून शॉर्टहँड रिपोर्टर्स येत असत. त्यामुळे 'चिकित्सका'त येणारी माझ्या भाषणांची हकीकत व तीवरील टीका किती विपर्यस्त आहे हे अधिकाऱ्यांना सहज दिसून आले असले पाहिजे.

## 'टिळकांचा खास जिल्हा'

गणपतीचा उत्सव संपल्यानंतर आम्ही स्वस्थ बसलो नाही. जिल्ह्यात फिरतीवर जाऊन बरीच व्याख्याने दिली. चिकोडीचे सखारामपंत कुलकर्णी वकील, अथणीचे व हल्ली बेळगावात वकिली करीत असलेले नारायणराव जोशी यांचा परिचय झाला. त्यांच्या मदतीने चिकोडीस व अथवाणीस बरीच चळवळ झाली. त्याचप्रमाणे बहुतेक सर्व तालुक्याच्या गावात जाऊन जागृति केली. काही होतकरू मंडळीचा प्रत्यक्ष परिचय झाला व तो अदयापपर्यंत कायम आहे. चार मंडळी मिळून एकोप्याने कामाकडे दृष्टी ठेवून काम करण्याची सवय अदयापि आम्हाला लागावयाची आहे. ही सवय लागत चालली आहे या बद्दल मतभेद

नाही. पण चांगल्या चांगल्या कार्यकर्त्यांतदेखील मत्सर, व्यक्तिद्वेष इत्यादी दुर्गुण दिसतात व त्यामुळे कार्यहानी होते, असा अनुभव अदयापिही ऐन आणीबाणीच्या प्रसंगीदेखील येतो. त्या वेळी हा अनुभव मला थोडाबहुत आलाच. टिळकांच्या विशेष कृपेतला मी आहे अशी समजूत झाल्याने आणि माझ्या शक्तीप्रमाणे मी तनमनधने करून चळवळीत विशेष भाग घेत असल्याने जनतेत माझ्यासंबंधाने थोडी आवड उत्पन्न होणे स्वाभाविक होते. ही लोकप्रियता मिळविण्याकरिताच धडपड आहे, असा आरोप माझ्यावरही झाला. हा अनुभव सर्व सार्वजनिक कामे करणाऱ्यांना थोडाबहुत असतोच. गांधींसारखा सत्यप्रिय, सरळ, अजातशत्रु देखील अशा आरोपातून सुटला नाही. मग इतरांची कथा काय? प्रथमप्रथम माझ्याबरोबर काम करणाऱ्यांपैकी दोघांतिघांनी आम्हाला सोडले. पण गोविंदराव याळगी, हणमंतराव देशपांडे, लाड, भीमराव पाटील वगैरे मंडळींचे सहकार्य मला पूर्णपणे मिळू लागले. पूर्वीच्या वडील व पुढारी मंडळींचा पाठींबा आम्हालाच मिळू लागला. त्यामुळे बेळगाव जिल्हा म्हणजे टिळकांचा खास जिल्हा अशी आमच्या जिल्ह्याबद्दल प्रसिद्धी होऊ लागली. टिळकांनाही बेळगावबद्दल विशेष आपलेपणा वाटत असे हे मला माहीत आहे. याबद्दल पुढे १९१६ साली टिळकपक्षाच्या वतीने जी प्रांतिक परिषद बेळगाव येथे भरली होती त्या संबंधाने हकीकत देतेवेळी पुन्हा उल्लेख करावा लागेल. नातू हे हयात असेपर्यंत त्यांच्याकडे बेळगावच्या पुढारीपणाचा मान होता. त्यांच्या पश्चात बेळवींकडे तो गेला. आणि हे दोघेही टिळकांचे अभिमानी, म्हणून त्यांच्या हाताखाली त्यांच्या धोरणाने कामे करण्यास आम्ही पूर्ण तयारीने सिद्ध होतो. त्यामुळे टिळकांच्या राजकारणाचाच प्रभाव आमच्या जिल्ह्यावर जास्ती पडत चालला. टिळक हयात असेपर्यंत कर्नाटक, महाराष्ट्र, वऱ्हाड, नागपूर, इत्यादी प्रांतांतून हीच स्थिती होती. पण टिळकांच्या पश्चात ही स्थिती पुष्कळ ठिकाणी टिकली नाही. पण आमच्या प्रांतात व विशेषत: आमच्या बेळगाव जिल्ह्यात तसे झाले नाही. व्यक्तिद्वेष, मत्सर, जातीजातींतील बेबनाव यामुळे सार्वजनिक कामात बिघाड होतो. पण आमच्या जिल्ह्यात हा दोषदेखील कमी प्रमाणात आहे. याचे श्रेय देखील १९०६ पासून बेळगावच्या नातू, छत्रे, भाटे, बेळवी वगैरे पुढाऱ्यांनी जे वळण घालून दिले त्यालाच दिले पाहिजे.

१९०६ सालच्या नवरात्राचा व दसऱ्याचा सणही आम्ही सार्वजनिक रीतीने पाळला. अलीकडे कर्नाटकात प्रांतीय चळवळीने जोर घेतल्यामुळे नवरात्र हा कर्नाटकचा 'राष्ट्रीय' सण असा मानण्यात येऊ लागला आहे. पण गणपती-उत्सव मात्र पूर्वीच्या पद्धतीवरच चालू आहे.

## पंढरपूरात टिळक

कार्तिकी शु. ११ ला पंढरपूरास मोठी यात्रा भरत असते. त्या वेळी टिळकांना आमंत्रण देऊन स्वदेशीसंबंधीने चळवळ करण्याचा तेथील मंडळींचा विचार ठरला. यापूर्वी १९०६ साली प्रदर्शन भरविण्यात आले होते. आणि टिळक त्या प्रदर्शनाला गेले होते. एकादशीला टिळकांचे जावयाचे ठरले. माझे स्नेही कोल्हापूरचे गणपतराव मोडक हे तेथे इंग्रजी शाळेवर हेडमास्तर होते. कोल्हापूरचेच बापू सरदेसाई म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर होते. त्यांच्या प्रोत्साहनाने टिळकांना यात्रेला आमंत्रण देण्याची कल्पना निघाली होती. १९०६ साली महाराष्ट्रातही कित्येक ठिकाणी माझी व्याख्याने झाली होती. टिळकांचा व माझा संबंध आला आहे, असे थोडच्याबहुत ओळखीच्या माणसांना समजले होते. यामुळे पंढरपूराहून मलाही आमंत्रण आले. पंढरपूरला येण्याबद्दल टिळकांनीही मला पत्र लिहिले. त्या प्रमाणे टिळक पुण्याहून निघणार होते त्याच दिवशी मी पुण्यास पोचलो व त्यांच्या बरोबरच प्रवास केला. आमच्याबरोबर चिंतामणराव वैदय, डॉ. नानासाहेब देशमुख, वासूकाका जोशी, काका पाटील वकील वगैरे मंडळी होती. या सर्व मंडळीची व माझी प्रथमच ओळख झाली. यांपैकी शेवटच्या दोघांचा व माझा संबंध विशेष आला. काका पाटील व डॉ. देशमुख हे हल्ली मयत आहेत. पंढरपूर येथे थिएटरमध्ये चिंतामणराव वैदय यांच्या अध्यक्षतेखाली परिषदवजा एक सभा भरली होती. चिंतामणरावजींचे नाव आम्ही कॉलेज मध्ये पुष्कळ वेळा ऐकले होते. बहुतेक परीक्षांतून हे पहिल्या वर्गांत पास झाल्याबद्दल व युनिव्हर्सिटीची बक्षीसे, स्कॉलरशिप्स वगैरे मिळवल्याबद्दल यांची ख्याती होती. ते इकडे परत आले होते व इकडील राजकारणात त्यांनी भाग घेण्याला प्रारंभ केला होता. राजकारणात ते टिळकांच्याच सल्ल्याने वागत, असे माझ्या कानावर आले होते. अशा विद्वान व नावाजलेल्या गृहस्थांचे भाषण ऐकण्याची मला फार इच्छा होती. पण त्यांचे पंढरपूरचे भाषण मला फारसे आवडले नाही. रात्री वाळवंटावर हजारो वारकऱ्यांसमोर विष्णुबुवा जोग यांच्या अध्यक्षतेखाली टिळकांची भाषणे झाली. देशातील कोटद्यावधी लोकांच्या गरिबीकडे पाहून ती दूर करण्याचा प्रयत्न न करता नुसते तोंडाने 'विठ्ठल, विठ्ठल' म्हणून टाळ कुटल्याने विठ्ठलाची प्राप्ती होत नसते, अशा अर्थाचें एक वाक्य टिळकांच्या तोंडून एका भाषणात निघाले. त्यामुळे वारकरी लोकांत थोडी गडबड उडाली. विष्णुबुवांनी टिळकांच्या म्हणण्याचा अर्थ समजावून सांगितला. जोग स्वतः सांप्रदायी वारकरी असून त्या वर्गांत त्यांची प्रतिष्ठाही विशेष असे. त्यामुळे श्रोत्यांचे समाधान होऊन सभा शांतपणे 'पुंडलीकवरद हरि विठ्ठल'च्या गजरात समाप्त झाली. थिएटरात व वाळवंटावर माझीही भाषणे झाली. टिळकांच्या समोर भाषण करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे मला मोकळ्या मनाने

भाषण करता आले नाही. तथापि सभा संपल्यावर माझ्या भाषणाबद्दल टिळकांनी उत्तेजनपर उद्गार काढले. टिळकांच्या भाषणाचे टिपण घेण्याकरिता 'केसरी' ऑफिसांतील भावे या नावाचे एक गृहस्थ आले होते. त्यांनी माझ्या भाषणांचेही टिपण घेतले होते. त्यांनी ते मला वाचून दाखवले. भाषण करीत असता माझ्या मनात भीती वाटत होती तरी रिपोर्ट ऐकल्यानंतर भाषण अगदीच वाईट झाले नसावे असे मलाही वाटले.

सभेचे काम वगैरे संपल्यानंतर आम्ही दहा-पंधरा मंडळी मिळून एकंदर देशस्थिती संबंधाने चर्चा करीत होतो. अनुभवी व मोठ्या माणसांशी मिळूनमिसळून वागण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्याने मला भीड वाटली. म्हणून चर्चेत भाग न घेता मुकाट्याने ती ऐकण्याचेच काम मी केले. पंढरपूरच्या या मुक्कामात काका पाटलांची चांगली ओळख झाली. याच ओळखीने पुढे स्नेह वाढला व त्यांची अनेक प्रसंगी मदत मिळाली. ती हकीकत पुढे येणारच आहे.

### टिळकांचे मला मार्गदर्शन

पंढरपूरचे काम आटपून मी बेळगावास परत आलो. नंतर थोड्याच दिवसांनी गुर्लहोसूरचे गणपतराव किर्लोस्कर माझ्याकडे आले. गुर्लहोसूरच्या उत्सवाकरिता टिळकांना आमंत्रण देऊन आणावण्याचे तेथील मंडळींनी ठरवल्याचे सांगून माझ्याकडूनही एक पत्र त्यांनी मागितले. पण अल्प परिचयाचा फायदा फार घेऊ नये असे वाटल्यावरून मी पत्र दिले नाही. तरी गणपतराव एकटेच पुण्याला आमंत्रण देण्याकरिता गेले. हे अण्णासाहेब किर्लोस्करांचे बंधू. चिदंबर दीक्षित म्हणून त्या प्रातात प्रसिद्ध सत्पुरुष होऊन गेले त्यांच्या नावाचे एक देवालय गुर्लहोसुरास आहे. दीक्षितांना हा गाव इनाम आहे. ते चिदंबरेश्वराचा उत्सव करीत असतात. उत्सवात कथाकीर्तन, अन्नसंतर्पण वगैरे नियमित जुन्या पद्धतीप्रमाणेच होत असे. पण बोटेस्वामी या नावाचे एक संन्यासी गुर्लहोसुरास जाऊन राहू लागले होते. त्यांच्या प्रोत्साहनाने उत्सव मोठ्या प्रमाणावर होऊ लागला होता. १९०५ साली मी उत्सवाला गेलो होतो व स्वामींनी माझी व्याख्याने करवली होती. १९०६ सालीही माझा जाण्याचा बेत होताच.

गणपतरावांनी पुण्याला जाऊन टिळकांची भेट घेतली व गुर्लहोसूरला येण्याबद्दल अत्याग्रह केला असावा. गणपतराव गेल्यानंतर एकदोन दिवसातच टिळकांची मला तार आली आणि त्यांनी गुर्लहोसूरचे आमंत्रण स्वीकारल्याचे मला कळवले. ही गोष्ट जिकडेतिकडे प्रसिद्धही झाली. मी तिकडील तयारी करिता म्हणून बेळगावच्या गोविंदराव याळगी वगैरे मित्रांसह चारपाच दिवस पूर्वीच गेलो होतो. आणि आजूबाजूस असलेल्या तालुक्याच्या संवदत्ती, बैलहोंगल

वगैरे गावांत व्याख्याने दिली होती. टिळक येणार म्हणून उत्सव मोठ्या प्रमाणात होण्याचा संभव होता, हे जाणून स्वामींनीही तयारी चांगली केली होती. गुर्लहोसूर हा गाव बेळगाव जिल्ह्यातील संवदत्ती तालुक्यात असून बेळगावपासून सुमारे ५०-५५ मैल व धारवाडहून २५ मैल दूर आहे. त्या वेळी मोटारीची वगैरे सोय नसल्याने घोड्यांच्या किंवा बैलांच्या गाडीतून प्रवास करावा लागत असे. बेळगावहून गुर्लहोसूरला जाण्यापेक्षा धारवाडहून जाणे जास्ती सोयीचे वाटल्यावरून तोच मार्ग निश्चित करण्यात आला होता. टिळकांच्या बरोबर या दौऱ्यात शिवरामपंत परांजपेही होते. धारवाडास एक दिवस टिळकांचा मुक्काम झाला व तेथे दोघांची भाषणे झाली. धारवाडपासून गुर्लहोसूरला येताना वाटेत लागणाऱ्या प्रत्येक खेड्यात हजारो लोकांपुढे त्यांची भाषणे झाली. हा प्रांत अगदी कानडी बोलणाऱ्यांचा असल्यामुळे मुदवेडकर हे कानडीत भाषणांचा सारांश सांगत. खेड्यांतील हजारो लोकांच्या समवेत टिळक गुर्लहोसूरला आले. तिकडील खेड्यात देशभक्तीचे बीज प्रथम टिळकांनीच पेरले. १९३० व १९३२ च्या चळवळीत तिकडील अगदी मागासलेल्या म्हणून समजलेल्या प्रांतांतील करेकट्टी, होसूर, हुली, मुरगोड वगैरे लहानलहान खेड्यांतील लोकांनी भाग घेतला व अद्यापि ते शिक्षा भोगत असून आपली देशसेवा अर्पण करीत आहेत.

गुर्लहोसुरास मलप्रभा नदी आहे. टिळक नदीवरच स्नानाला गेले. डोहात ते तास दीडतास सारखे पोहत होते. पोहण्याचे निरनिराळे प्रकार त्यांनी करून दाखवले. टिळकांना इतक्या उत्तम प्रकारे पोहता येते हे पाहून हजारो लोकांना मौज वाटली. सायंकाळी देवळासमोरील पटांगणात टिळक व परांजपे यांची व्याख्याने झाली व मुदवेडकरांनी कानडीत सारांश सांगितला. बिऱ्हाडी आल्यानंतर टिळकांनी मला "तुम्हाला कर्नाटकात काम करावयाचे आहे की महाराष्ट्रात काम करावयाचे आहे?" असा प्रश्न केला. "महाराष्ट्रात कार्यकर्ते पुष्कळ आहेत; म्हणून मला कर्नाटकातच काम करणे जास्ती आवश्यक वाटते" असे मी उत्तर दिले. "असे असेल तर तुम्हाला कानडी बोलण्याची सवय केली पाहिजे. आणि कर्नाटकातील प्रमुख वस्ती लिंगायत लोकांची आहे, याकरिता त्यांच्या धर्माचा अभ्यास करून माहिती करून घेतली पाहिजे" असे त्यांनी सांगितले. "लिंगायत धर्माचा व लोकसेवेचा संबंध काय?" असे मी त्यांना विचारले. "ज्या लोकात आपल्याला काम करावयाचे असते त्यांचेबद्दल, त्यांच्या चालीरीतींबद्दल माहिती असणे जरूर आहे. हिंदुस्थानात अनेक धर्मपंथ असले, तरी त्यांतील तत्त्वे बहुतेक सारखीच असतात, म्हणून भिन्न पंथांच्या लोकांच्या धर्माचा अभ्यास केल्यास त्यांच्याबद्दल आदर वाटून, धर्माधर्मांतील भेद नाहीसे झाले नाहीत तरी परस्परांबद्दल सहानुभूती वाटते. म्हणून लिंगायत

लोकांच्या धर्माचा कर्नाटकात काम करणाऱ्यांनी अभ्यास करावा." असा खुलासा टिळकांनी केला. यावरून त्यांच्या बुद्धीचा व्यापकपणा किती होता व दूरदृष्टी कशी होती हे समजून येते. महात्मा गांधीही हिंदुस्थानांतील हिंदू, मुसलमान, पार्शी, ज्यू, ख्रिस्ती वगैरे निरनिराळ्या धर्मांच्या अनुयांयामध्ये सलोखा व्हावा म्हणून अशाच प्रकारचा उपदेश करीत असतात. परधर्माच्या अभ्यासाने परस्परात आदरबुद्धी उत्पन्न होऊन आपल्या धर्मांबद्दल तुलनात्मक प्रकाराने श्रद्धा जास्ती वाढते असा स्वानुभव ते सांगतात. महाराष्ट्रांतील टिळकांचे अनुयायी म्हणवून घेणारे कित्येक माझे मित्र गांधींच्या या मताची थट्टा करीत असतात, हे मला माहित आहे. त्यांनी टिळकांनी मला जो उपदेश केला त्यांचे रहस्य ध्यानात आणावे.

## भाषेबाबत राष्ट्रीय दृष्टी

गुर्लहोसूरच्या भाषणात प्रारंभीच टिळकांनी "भाषेच्या दृष्टीने आम्ही मराठी लोक बाडगे आहोत" असा उल्लेख केला. महाराष्ट्रात मराठी भाषा प्रचलित होण्यापूर्वी बऱ्याच भागात कानडी भाषा चालत होती, पण अलीकडे ती अजीबात नाहीशी झाल्याप्रमाणे आहे, असे ते म्हणाले, आणि या बाडगेपणाबद्दल कानडी लोकांनी आपणाला मराठीत भाषण करावे लागते या बद्दल क्षमा करावी अशी विनंती केली. त्यामुळे श्रोत्यांत अभिमानसूचक अशा टाळ्यांचा कडकडाट झाला. या भाषेच्या बाबतीतदेखील महात्मा गांधींचे मत महत्वाचे आहे, म्हणून त्याचा उल्लेख येथे करणे जरूर आहे. हिंदुस्थानात भिन्न धर्मांप्रमाणे भिन्न भाषाही आहेत, व भाषेला अनुरूप देशाचे स्वभाविक प्रांत पडतात. (१९२० सालापासून काँग्रेसच्या कारभारात भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व मान्य करून प्रांतांची वाटणी केली आहे. लो. टिळकांनीदेखील Decentralisation कमिटीपुढे हाच भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा मांडला होता.) यासाठी हिंदुस्थानांतील कार्यकर्त्यांना सार्वत्रिक भाषा म्हणून. हिंदूस्थानी, आपली प्रांतीय भाषा व इतर प्रांतांच्या भाषा आणि हे शक्य नसल्यास आपल्या प्रांतांच्या शेजारी असलेल्या प्रांतांच्या भाषा कामापुरत्या तरी अवगत असल्या पाहिजेत, असे त्यांचे सांगणे आहे. भाषाभिमानामुळे प्रांताभिमान उत्पन्न होतो व त्यामुळे एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला धक्का बसतो, हे अलीकडे अनुभवाला येऊ लागले आहे. त्याच्यावर गांधी सांगतात हा उत्तम उपाय आहे, हे आम्ही लक्षात ठवले पाहिजे.

हल्ली येरवाडयाच्या तुरुगांत आम्हाला या गोष्टीकडे लक्ष देऊन एकांतवासाचा उपयोग या कामी करण्यास गांधींनी बजावून सांगितले आहे. त्याप्रमाणे आमच्या 'बी' वर्गांतील सहा मंडळीपैकी दोघांनी उर्दूच्या व तिघांनी

गुजरातीच्या अभ्यासाला प्रारंभ केला आहे. कानडी-मराठी भाषेसंबंधाने टिळकांनी गुर्लहोसूरच्या भाषणात केलेल्या या विधानाला कर्नाटकांत बरेच महत्त्व दिले जाते व त्याचा उपयोग कानडी-मराठी वादात केला जातो. केव्हा केव्हा वादाच्या भरात या विधानाचा दुरूपयोगही केला जातो.

## टिळकांच्या आग्रहाने कानडी भाषा

पेशवाईच्या अखेरीतील रणधुरंधर बापू गोखले हे चिंदबर दीक्षितांना गुरुस्थानी मानीत व गुर्लहोसूरास त्यांचे त्या वेळी येणे जाणे असे. गुर्लहोसुरास आल्यावेळी आपल्याला राहण्याला सोयीचे व्हावे म्हणून त्यांनी एक वाडाही बांधला आहे. त्याचप्रमाणे कर्नाटकांतील महाराष्ट्रीय सरदारांपैकी रामदुर्गकर भावे यांनी दीक्षितांच्या घराण्याला इनाम जमिनी दिल्या आहेत. दीक्षितांच्यापैकी एक शाखा ग्वाल्हेरीस आहे. शिंदे सरकारकडून काही इनाम गावे त्या घराण्याकडे चालत आहेत. गोखल्यांचा वाडा टिळकांनी पाहिला. गोखल्यांची काही पत्रे दीक्षितांकडे आहेत किंवा काय त्याचा तपास टिळकांनी केला. तेव्हा गुर्लहोसूरापासून दोन मैलांवर असलेल्या बडली गावी दीक्षितांच्या घराण्याची एक शाखा असून त्यांच्या संग्रही जुने कागदपत्रे असल्याचे समजले. बडलीकर दीक्षितांचाही आपल्या गावी येऊन जाण्याबद्दल आग्रह होता. म्हणून टिळकांनी बडलीला जाण्याचे कबूल करून तेथील दीक्षितांना गोखल्यांचा पत्रव्यवहार असल्यास पाहण्याकरीता तयार ठेवण्यास सांगितले. गुर्लहोसूरहून धमणी गाडीतून त्यांनी प्रवास केला. टिळक, परांजपे व मी असे तिघे एकाच गाडीत होतो. त्यामुळे बेळगावला जाईपर्यंत पुष्कळ विषयांवर बोलण्याची संधी मला मिळाली. वाटेत बडली या गावी बापू गोखल्यांची पत्रे पाहण्याकरीता दोन तास घालविले. त्या दिवशी बैलहोंगलला मुक्काम केला.

बैलहोंगल हा गाव बेळगाव जिल्ह्यात कापसाच्या व्यापारासंबंधाने प्रसिद्ध आहे. येथे लिंगायत लोकांची वस्ती मोठी असून त्यांच्याच हाती त्या वेळी सर्व व्यापार होता. लिंगायतांमध्ये व ब्राह्मणांमध्ये कोणत्याही प्रकारचे भेदभाव त्या वेळी नव्हते. आम्ही तेथील एका श्रीमंत लिंगायत व्यापाऱ्याच्या वाड्यांतच उतरलो होतो. रात्री सभा झाली. टिळक, परांजपे यांना मानपत्रे अर्पण करण्यात आली. पूर्वी एकट्या टिळकांनाच मानपत्र देण्याचे तेथील मंडळींनी ठरविले होते. हे टिळकांना समजताच परांजपे यांना सोडून आपणा एकट्यालाच मानपत्र देणे शिष्टाचाराला सोडून होते, असे टिळकांनी मला कळवले. म्हणून परांजपे यांनाही मानपत्र देण्यात आले. यावरून बरोबरीच्या माणसाबद्दल टिळक किती सूक्ष्म रीतीने पाहात असत याचा मला धडा मिळाला. रात्री सभेत टिळक व परांजपे यांनी लहानच भाषणे केली. समाज

कानडी जाणणाऱ्यांचाच होता व भाषांतर करून सांगणारे कोणी मिळाले नाहीत; यामुळे खेडचापाडचांतून आलेल्या हजारो लोकांची निराशा झाल्याची चिन्हे दिसू लागली. हे पाहून टिळकांनी मला कानडीत भाषण करण्यास सांगितले. मराठीत भाषणे करून मला सभाधीटपणा थोडासा आला होता; पण कानडीत भाषण करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता; म्हणून भाषण करण्याचें धैर्य मला होईना. पण टिळकांनी आग्रहच केला व "मन मोकळे करून वाटेल ते बोला पण कानडीत भाषण झालेच पाहिजे" असे निक्षून सांगितले. त्यामुळे माझा नाईलाज झाला व माझ्या अशुद्ध कानडीचे प्रदर्शन करण्याचा माझ्यावर प्रसंग आला. तथापि जमलेल्या खेडचांतील लोकांची भाषा व माझी भाषा यांत बरेच साम्य असल्यामुळे माझे भाषण त्यांच्यावर परिणाम करण्यासारखे झाले. माझ्या भाषणात टिळकांच्या भाषणाचा सारांश सांगण्याचा प्रयत्न करीत असता त्यात माझ्या पदरचे तिखटमीठ, मसाला वगैरे बरेच मिसळले गेले. तेव्हापासून खेडचापाडचांतून जेथे मराठी समजत नसे तेथे कानडीतून मी भाषणे करू लागलो.

## वीरनवालीवरील अत्याचार

बैलहोंगलच्या मुक्कामात टिळकांना 'केसरी' चा ताजा अंक मिळाला. त्यामध्ये पंजाबमध्ये वीरनवाली नावाच्या एका हिंदू स्त्रीवर मूर नावाच्या एका अँग्लोइंडियनाने बलात्कार केल्याची हकीकत आली होती. ती वाचून टिळकांना अतिशय असमाधान वाटून रात्री झोप चांगली लागली नाही. पहाटेला ते जागत बसलेले पाहून "झोपेत कां नाही?" असे मी त्यांना विचारले. तेव्हा "केसरी वाचलात काय?" म्हणून मला त्यांनी प्रश्न केला. मी 'होय' असे उत्तर दिले. तेव्हा "वीरनवालीची हकीकत वाचून आपल्याला एक प्रकारची चीड आली व त्यामुळे निवांत झोप लागेना" असे त्यांनी सांगितले. कोठली व कोण वीरनवाली आणि कोठे व कोण टिळक! पण हिंदुस्थानातील एखादचा असहाय्य स्त्रीवर उन्मतपणे बलात्कार केला जातो याचा संताप होऊन अतिशय थकलेल्या स्थितीत देखील टिळकांना झोप आली नाही. या एका लहानशा उदाहरणावरून देखील देशाभिमानाची कल्पना किती जाज्वल्य व तीव्र होती याचे स्पष्ट चित्र मला पाहावयाला मिळाले. एका दीन गरीब स्त्रीला एवढचा आत्मीय भावनेने पाहणारे पुढारी संबंध हिंदुस्थानात किती असतील, असा विचारही माझ्या मनात आला. हिंदुस्थानांतील लोकांच्या अन्नबद्दल, त्यांच्या गरिबीबद्दल, त्यांच्या सर्व प्रकारच्या हीनदीन स्थितीबद्दल पुढाऱ्यांमध्ये एकात्मता उत्पन्न झाल्याखेरीज राष्ट्राचे काम त्यांच्या हातून यशस्वी रीतीने होणार नाही, ही कल्पना आज माझ्यामध्ये अनुभवाने दृढमूल झाली आहे. पण तिचा उगम बैलहोंगलास टिळकांच्या त्या दिवसाच्या वृत्तीमुळे झाला. दुसरे दिवशीदेखील त्यांनी

परांजप्यांशी भाषण करताना दोनचार वेळा वीरनवालीसंबंधाने उल्लेख करून आपल्या लोकांच्या दैन्याबद्दल दुःख प्रदर्शित केले.

बैलहोंगलहून आम्ही मुरगोडास तेथील नाईक यांच्या आग्रहावरून गेलो. मुरगोड हा गाव पूर्वी रंगाबद्दल प्रसिद्ध असून तेथे चिटे, जाजमे वगैरे उत्तम प्रकारची होत असत. तो धंदा आता बुडाला आहे. परदेशी रंगाचाच जिकडे तिकडे प्रवेश झाला आहे. जुन्या पद्धतीने रंग तयार करणारे कोणी तेथे आहेत किंवा नाहीत याचा तपास टिळकांनी केला.एकदोन म्हातारे माहितगार त्या वेळी त्यांना मिळाले. त्यांनी आपली पूर्वीची रंग करण्याची पद्धत सांगितली. सभेचे काम आटोपल्यानंतर बेळगाव जिल्ह्याच्या कलेक्टरचा मुक्काम त्या वेळी तेथेच होता असे आम्हाला समजले. माझी व त्यांची ओळख थोडीशी होती. हे टिळकांना समजल्यानंतर "आपण भेटीला येतो" असे पत्र लिहून कळवण्याबद्दल त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे मी पत्र लिहिले. कलेक्टरचे नाव बी. ए. ब्रँडन असे होते. माझ्या पत्राला त्यांचे उत्तर आले व तीनचारच्या दरम्यान टिळक आले तर आपल्याला अतिशय आनंद होईल असे त्यांनी कळवले. टिळक, परांजपे व मी असे आम्ही तिघेही तंबूवर गेलो. साहेब वाट पहातच बसले होते. त्यांच्या टेबलावर टिळकांची 'ओरायन' व 'आर्क्टिक होम ऑफ द वेदाज्' ही पुस्तके होती. रीतीप्रमाणे मी, टिळक व परांजपे यांची ओळख करून दिली. ब्रँडन हे न्यायप्रिय होते, पण फार उद्दाम असावेत, असा माझा ग्रह झाला होता. पण टिळकांशी बोलताना त्यांनी फारच नम्रता व अदबी दाखवली. राजकारणासंबंधाने एक अक्षरही न काढता टिळकांच्या पुस्तकाबद्दल त्यांनी बरेच प्रश्न विचारले. विषय शास्त्रीय असून गहन आहे, असे कलेक्टर म्हणाले, तेव्हा कित्येक वर्षांच्या अभ्यासाने व विचाराने ही विधाने मी केली आहेत असे टिळकांनी सांगून साधारणपणे एक तासपर्यंत अगदी सोप्या भाषेत त्यांनी विषय समजावून दिला व त्यांचा निरोप घेतला. वाटेत टिळक म्हणाले, "वस्ताद दिसतो. राजकारणासंबंधाने एक शब्द न काढता, मतभेद होण्यासारखा विषय त्याने टाळला आणि मला जो प्रिय विषय व ज्यासंबंधाने वादविवाद होण्यासारखा नव्हता, अशा विषयावर बोलणे करून शिष्टाचार सांभाळला."

मुरगोडहून बेळगावला गेलो व तेथेही सभा होऊन "राष्ट्रीय शिक्षण" या विषयावर भाषणे वगैरे झाली.

गुर्लहोसूरच्या मुक्कामापासून त्यांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा होताच. रा. हणमंत रामकृष्ण पागे (पुढे हे. रा. ब. झाले) यांची योजना झाली होती.

गुर्लहोसूरच्या मुक्कामात किर्लोस्कर यांचे एक आप्त श्रीधर हरी खरे यांची व माझी ओळख झाली होती. यांची व टिळकांची ओळख होती. टिळक

गुर्लहोसूरला येणार म्हणून त्यांच्या व्यवस्थेकरिता हे गृहस्थ मुद्दाम आले होते. माझा व टिळकांचा ऋणानुबंध बराच आहे, असे त्यांना या वेळी वाटले असावे. म्हणूनच त्यांनी आपल्या विलक्षण धाडसाने व युक्तीने कोल्हापूर प्रकरणी निरपेक्षपणाने माझा बचाव करण्याचा प्रयत्न केला. ही हकीकत पुढे येणार आहे.

### बेळगावात शिवाजी-उत्सव

टिळक बेळगावाहून गेल्यानंतर इंग्रजी सहाव्या व सातव्या वर्गातील प्रबुद्ध मुलांकरीता मी एक वर्ग काढला होता. त्या वर्गांत मॅझिनीचे चरित्र व त्याच्या लेखांतील उतारे मी शिकवीत असे. हायस्कूल व मिशन स्कूल मिळून ७५-१०० विदयार्थी येत असत. मुलांच्या शिक्षणापेक्षा त्यांच्याशी आपला संबंध यावा व आपले विचार त्यांना कळवावेत हाच हेतू हा वर्ग काढण्यात होता. काही विदयार्थी आमच्या नादी लागले होते. सभात, मिरवणुकीत व इतर सार्वजनिक कामात त्यांचा उपयोग होत असे. स्वयंवसेवकांची म्हणून त्या वेळी कायमची एखादी संस्था नव्हती, म्हणून अशा होतकरू विदयार्थ्यांचा उपयोग करून घ्यावा लागत असे.

महाराष्ट्राप्रमाणे शिवाजी-उत्सव बेळगावास करावा अशी कल्पना मनात आली. पण तो उत्सव सार्वजनिक करण्याइतके धैर्य व साधने आमच्याजवळ नव्हती. म्हणून तो आम्ही गोविंदराव याळगी यांच्या घराच्या अंगणात मांडव घालून करीत असू. पुढे या उत्सवाला मोठे स्वरूप येऊन मारूतीच्या देवालयात तो सार्वजनिकपणे होऊ लागला व अदयापिही होत असतो.

### कलकत्याची कॉंग्रेस व टिळक

१९०६ च्या कलकत्ता कॉंग्रेसचे अध्यक्षस्थान टिळकांना असा कांही बंगाली गृहस्थांचा विचार होता. वंगभंगाच्या चळवळीला टिळकांनी पूर्ण पाठिंबा दिल्यामुळे नागपूरपासून दक्षिणेस थेट गदग-विजापूरपर्यंत चळवळ जोरांत आली होती. त्या वेळी स्वदेशी व बहिष्कार चळवळीला बंगालच्याबाहेर टिळकांइतके कोणीही पुरस्कार करणारा मिळाला नव्हता. त्यामुळे बंगाल्यांत टिळकांची लोकप्रियता बरीच वाढली होती. म्हणून टिळकांना अध्यक्षस्थान देण्याची कल्पना निघून वर्तमानपत्रांतून या बाबतीत जोराचे लेख येऊ लागले. पण टिळक हे जहालांचे अध्वर्यू व त्यांच्या हाती कॉंग्रेसची सत्ता गेल्यास कॉंग्रेसचे धोरण जहाल होणार, असे नेमस्त पुढाऱ्यांना वाटू लागले. ही आपत्ती टाळण्याकरीता त्या नेमस्त मंडळींकडून दादाभाई नौरोजींचे नाव अध्यक्षपदा- करिता सुचविण्यात आले. दादाभाईबद्दल सार्वत्रिक पूज्यभाव होता व त्यांच्या नावाला कोणाकडून विरोध येणार नाही अशी खात्री होती, म्हणून त्यांचे नाव सुचविण्यात आले. इतर कोणत्याही पुढाऱ्यांचे नाव सुचविले गेले असते, तर टिळकांनाच बहुमत मिळाले

असते, असे वाटल्यावरून फेरोजशहा वगैरे मंडळींनी ही युक्ती काढली. दादाभाईंचे नाव पुढे आल्याबरोबर सर्वत्र मान्यता मिळाली. दादाभाई त्या वेळी इंग्लंडात होते व बरेच वृद्ध झाले होते. तरी हिंदुस्थानावर आणीबाणीचा प्रसंग हाता हे जाणून त्यांनी अध्यक्ष होण्याचे मान्य केले. बंगालच्या फाळणीमुळे खुद्द बंगाल्यांत तर चळवळीला जोर आलाच होता; पण इतर प्रांतांतूनही या चळवळीचे धक्के कमीअधिक प्रमाणावर बसत होतेच. त्यामुळे कलकत्याच्या काँग्रेसला बरेच महत्त्व आले होते. महाष्ट्रात व बंगाल्यात स्वदेशी चळवळीबरोबर राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ चालू झाली होती. बहिष्कार या शब्दाची व्याप्ती केवळ विलायती मालापुरतीच न राहता इतर ब्रिटिश मालापर्यंत जाऊन पोहचू लागली होती. १९०५ साली काशी येथे गोखले यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रीय सभेत बंगालच्या चळवळीला पाठिंबा देण्याचा ठराव जरी मंजूर झाला होता, तरी 'बहिष्कार' हा ब्रिटिश मालापुरताच असावा, त्या शब्दाचा अर्थ यापेक्षा जास्ती व्यापक असू नये, असा नेमस्त मंडळींचा कटाक्ष होता. बंगाल्यांत अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, अश्विनीकुमार दत्त वगैरे मंडळींनी वंगभंगाच्या चळवळीचे निमित्ताने उत्पन्न झालेल्या जागृतीला व्यापक स्वरूप देऊन राष्ट्राचे स्वातंत्र्यच राष्ट्राच्या जिवंतपणाचे खरे लक्षण आहे या मुद्द्यावर जोर देण्याला प्रारंभ केला होता. त्यामुळे देशात एक नवे चैतन्य आले होते. पुष्कळ तरुण या नवीन कल्पनेने भारून गेले होते. कलकत्याच्या काँग्रेसमध्ये कामाच्या मामुली पद्धतीला फाटा मिळून नवीन दिशा लागणार, अशी चिन्हे दिसत होती.

कलकत्ता काँग्रेसला येण्याबद्दल मला टिळकांनी पत्र लिहून कळवले. माझ्या मनात जाण्याचे होतेच. टिळकांचे पत्र येताच निश्चय ठाम झाला व मी माझ्या काही मित्रांसमावेत कलकत्त्याला निघालो. कर्नाटकांतील इतर जिल्ह्यांपेक्षा बेळगाव जिल्ह्यांतून या काँग्रेसला जास्ती प्रतिनिधी गेले होते असे मला आठवते. कलकत्त्यास महाराष्ट्राचे व कर्नाटकाचे प्रतिनिधी एकाच जागेत उतरले होते. टिळक, दास यांच्या घरी होते. आम्ही उतरलेल्या ठिकाणी जहाल व मवाळ या दोन्ही पक्षांचे प्रतिनिधी होते. त्यामुळे दररोज कडाक्याचे वादविवाद होत असत. टिळक पक्षाची मंडळीच जास्ती होती. इतर प्रांतांतील पुढारी आम्ही उतरलेल्या ठिकाणी येऊन भाषणे करीत असत.

एक दिवस मद्रासचे कृष्णस्वामी आयर आले होते. ते नेमस्त पुढाऱ्यात मोडत होते. त्यांनी एक तडफदार भाषण करून महाराष्ट्रीय प्रतिनिधींवर बरीच छाप पाडली अशी समज झाली. आमच्या बाजूने भाषण करणारा कोणी जाडा पुढारी आला नव्हता, त्यामुळे प्रतिनिधींत थोडी चलबिचल झाल्याप्रमाणे मला

वाटले. माझ्याने राहवेना म्हणून मी तडक टिळकांकडे गेलो. टिळक बंगालच्या पुढाऱ्यांबरोबर आपल्या पक्षातर्फे जे ठराव मांडावयाचे होते त्याचा मसुदा तयार करण्यात गुंतले होते. दहापंधरा मिनिटे वाट पाहिल्यानंतर मी त्यांच्याजवळ गेलो व हळूच "काही सांगावयाचे आहे." असे बोललो. त्याबरोबर थोडे बाजूला येऊन "काय सांगावयाचे आहे?" असे त्यांनी मला विचारले. मी झालेली हकीकत कळविली व "महाराष्ट्रातील प्रतिनिधींत थोडा बुद्धीभेद झाल्याप्रमाणे मला दिसतो. याकरिता आपल्या बाजूच्या कोणा तरी मोठ्या पुढाऱ्याला पाठवा अथवा आपणच थोडा वेळ येऊन जा," असे मी सांगितले. टिळक थोडे हसले व "तुम्ही जा. मी येणार आहे असे तेथे सर्वांना कळवा. माझी माणसे मला माहीत आहेत. कांही काळजी करू नका." असे बोलले. मी तेथून आमच्या बिऱ्हाडी आलो व टिळक भाषण करण्याकरीता येणार आहेत असे प्रसिद्ध केले. त्यामुळे सर्व मंडळी आतुरतेने वाट पहात बसली. इतक्यात टिळक आले व त्यांनी जमलेल्या मंडळींपुढे अर्धाएक तास भाषण करून आपल्यातर्फे येणाऱ्या ठरावांची माहिती करून दिली. टिळकांच्या भाषणाचा परिणाम त्यांच्या अपेक्षेप्रमाणेच झाला व मंडळीत खूप उत्साह आला. नेमस्त मंडळी थोडी हिरमुसल्यासारखी झाली. टिळकांनी निघताना माझ्याकडे पाहात हसतहसत "झाले तुमचे काम?" असे म्हटले व पुन्हा दासांच्या बंगल्याकडे ते गेले. पण जाता जाता "पुन्हा काही गडबड झाल्यास मला कळवा" असे म्हणाले.

या वेळी माझी व नाशिकचे बाबासाहेब खरे यांची ओळख झाली. त्यांचे नाव मी ऐकले होते. पण त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचा प्रसंग आला नव्हता. त्यांची कळकळ व उत्साह पाहून मला आनंद वाटला व त्यांची जास्ती ओळख व्हावी अशी इच्छा झाली

काँग्रेसची सर्व सुत्रे आपल्याच धोरणांनी चालावीत एवढ्या हेतूने टिळकांना मागे सारून दादाभाईंना अध्यक्षस्थान देण्याचा नेमस्तांनी घाट घातला होता. तरी दादाभाई हे निःपक्षपातीपणे व सनदशीर मार्गाने चालणारे असल्याने फिरोजशहा मेथांची दंडेली फारशी चालली नाही. बहुमताला अनुसरूनच जे ठराव पास व्हावयाचे होते ते पास झाले. टिळकांच्या व बंगालच्या पुढाऱ्यांच्या वाटघाटीत जो मसुदा तयार झाला होता त्याचप्रामाणे ठराव मंजूर झाले. याच ठरावांना पुढे राष्ट्रीय पक्षाची चतुःसूत्री असे नाव देऊन लोकजागृती एक वर्षांपर्यंत जहाल पक्षाने अखंड चालवली. ही चतुःसूत्री म्हणजे स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण. यात महत्वाच्या विषयासंबंधाचा ठराव स्वराज्यावरचा होता. पण तो स्वतः दादाभाईंनीच आपल्या भाषणात उचलून धरल्यामुळे तो बिनसायासाने मंजूर झाला. बाकी ठरावांसंबंधाने बरीच चर्चा

झाली आणि फिरोजशहा व त्यांचे कट्टर अनुयायी यांच्या मनाविरूद्ध ते पास झाले. त्यामुळे फेरोजशहा वगैरे मंडळींनी दादाभाईंना नेमण्याची जी युक्ती योजली होती ती त्यांच्याच अंगावर आली.

यापूर्वी मी चारपाच काँग्रेसना हजर होतो. पण केवळ प्रेक्षक या नात्यानेच तटस्थ वृत्तीने पाहात असे. या १९०६ सालच्या काँग्रेसमध्ये खासगी चर्चेत मी बराच भाग घेतला होता व आपल्या पक्षाकडे बहुमत करण्याची खटपट केली होती.

याच वर्षी टिळकांचे 'नव्या पक्षाची तत्त्वे' (Tenets of the New Party) या विषयावर एक फारच मुदद्देसूद व ओजस्वी भाषण झाले होते. टिळकांच्या पश्चात व गांधींच्या हाती काँग्रेसची सुत्रे गेल्यापासून गांधीच्या असहकार (non-co-operation) व (civil disobedience) सविनय कायदेभंग या चळवळींच्या तत्वावर वेळीअवेळी हल्ला चढवणारे कित्येक, टिळकांचे अनुयायी आहेत हे प्रसिद्धच आहे. टिळक हयात असते तर त्यांनी गांधींच्या या चळवळीला हाणून पाडले असते, अशा प्रकारची निश्चयात्मक विधाने त्यांच्या तोंडून वारंवार ऐकू येतात. गांधींच्या चळवळीच्या बुडाशी असलेल्या तात्विक विचारांची टिळकांनी त्या वेळी जरी गांधींच्या पद्धतीने चर्चा केली नसली, तरी नवीन पक्षाच्या तत्त्वांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे होते व खरी परिणामकारक चळवळ करावयाची झाल्यास कोणत्या मार्गांचे अवलंबन करणे जरूर आहे या गोष्टींची त्यांची रूपरेखा ध्यानात आल्यावाचून रहात नाही. टिळक हयात असते तर त्यांनी कोणते धोरण स्वीकारले असते, या वादाचा निःपक्षपातीपणाने पाहिल्यास कसा निकाल लागला असता, हेही स्पष्ट दिसण्यासारखे आहे. हे भाषण मी अनेक वेळा काळजीपूर्वक वाचले आहे. माझ्या संबंधाने बोलावयाचे म्हणजे १९२० साली गांधींनी पुरस्कारलेल्या नव्या चळवळीत भाग घेण्याला जी अनेक कारणे झाली त्यांत टिळकांचे हे भाषण हे एक प्रमुख कारण होते.



# दामोदर हरी चापेकर

जन्मः २५ जून १८६९, मृत्यूः १८ एप्रिल १८९८.

**महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतिकारक**

जन्म पुणे जिल्ह्यात चिंचवड येथे. वडिल कीर्तनकार. शिक्षण पुणे येथे. शाळेत असतांना वासुदेव बळवंत फडके यांच्या हौतात्म्याचा मनावर परिणाम. टिळकांच्या शिवाजी उत्सवात आणि गणेशोत्सवात भाग. विदयार्थीदशेत व्यायामाचा नाद. पंचवीस तरुणांची एक गुप्त संघटना याच काळात स्थापना केली. १८९५ साली हे मंडळ 'चापेकर क्लब' म्हणून प्रसिद्ध. सैन्यात शिरण्याची इच्छा. पण प्रवेश मिळाला नाही. १६ ऑक्टोबर, १८९६ रोजी मुंबईत फोर्टमधील राणीच्या पुतळ्याला जोड्यांचा हार घातला.

१८९६ मध्ये पुण्यात प्लेगची साथ. या प्लेगनिवारण कार्याचा सूत्रधार वाल्टर चार्लस् रँड याने या काळात पुणेकर नागरिकावर दडपशाही केली. त्यामुळे चापेकरानी रँडचा खून करण्याचा निर्णय घेतला. २२ जूनला राणीच्या हीरकमहोत्सवा-निमित्त गर्व्हमेंट हाऊसवर मेजवानी आणि उत्सव होता. त्या-

दिवशी त्यांनी रँडचा खून करण्याचे ठरवले. पण पहिल्या फेरीत चुकून रँड समजून आर्यस्ट या अधिकाऱ्यावर गोळी झाडण्यात आली. पण त्याच्या पाठोपाठ रँडची गाडी येताना दिसताच दामोदर पंताना त्यांची चूक उमगली आणि त्यांनी त्याच्या गाडीवर उडी घेतली आणि गोळ्या झाडून रँडचा खून केला. मुंबईचे गुप्तपोलिसप्रमुख सुपरिंटेंडेट ब्रुईन यांच्याकडे तपासाचे काम सोपवण्यात आले. दोन महिनेपर्यंत खुनी कोण हे सापडेना. पण चापेकरांचे एक सहकारी नीळकंठ शंकर द्रविड यांनी दिलेल्या माहितीवरून २८ सप्टेंबर १८९७ रोजी त्यांना मुंबईत अटक केली आणि त्यांच्यावर खटला भरला. शेवटी मुंबई हायकोर्टाने त्यांना फाशीची शिक्षा फर्मावली. आणि १८ एप्रिल १८९८ रोजी त्यांना फाशी देण्यात आले. त्यानंतर ८ मे आणि १२ मे १८९९ रोजी त्यांचे बंधु बाळकृष्ण आणि वासुदेवराव यांना फाशी देण्यात आले. हा उतारा दामोदर हरि चापेकर यांच्या आत्मवृत्तातून सादर करण्यात येत आहे.

## ही अंतःकाळची मिरवणुक अधिक प्रिय

दामोदर हरी चापेकर

### साथीचा जोर

इतक्यात शहरात ग्रंथीक सन्नीपाताचा आजार वाढत चालल्याची वार्ता ऐकू येऊ लागली. सरकार या विषयी चांगला बंदोबस्त करते असे लोक बोलू लागले. तो बंदोबस्त मुंबईसारखाच होणार असेही लोक म्हणत. मुंबईत जो बंदोबस्त होता तो आम्हास बिलकूल पसंत नव्हता. तेव्हा आमचा निर्णय झाला की, जर या ठिकाणी मुंबईसारखा बंदोबस्त सुरु जाहला तर आपण या विरुद्ध ओरड करायची. याप्रमाणे विचार करतो तो हळूहळू ती पद्धती सुरू जाहली.

### त्याच्या बंदोबस्तासाठी रँडसाहेबाची नेमणूक

आणि थोडयाच दिवसात ऐकण्यात आले की, कोणी रँडसाहेब म्हणून आले तो या कामावर नेमला. शोध करता हाच रँडसाहेब बहादूर सभ्य गृहस्थास कैदीची शिक्षा देणार. मग आम्ही विचार केला की, कचेरीच्या इतर अधिकाऱ्यांना त्रास देऊन त्यांना सावध न करता मुख्य इसमास शासन करावे. रँडसाहेबाची आम्ही तो चांगला आहे की, वाईट आहे याबद्दल चांगल्या तऱ्हेने चौकशी केली. ती सर्व शहरात सर्वतोमुखी तो दुष्ट आहे असे ऐकण्यात येईल. याबद्दल सर्वप्रसिद्ध आहे. तथापि आपल्या शहरांत त्याचा दुर्गुण दृष्टीस पडण्याची आमची फार इच्छा जाहली. रँडसाहेब नेमला इतके ऐकिल्यापासून आम्ही दोघे भाऊ आणि भिस्कुटे असे तिघे त्याच्या तपासास लागलो. पण तो दृष्टीस पडेना. कोण म्हणे तो अजून आला नाही. कोणी म्हणे आला. अशा अनंत गप्पा शहरांत पसरत. आम्ही लष्कर हद्दीत दररोज हेलपाटे घालू लागलो, पण त्याच्या बंगल्याचा शोध लागेना. कमेटीवर पुष्कळ वेळा गेलो. त्याठिकाणी हंगकांगचा बेव्हरीन कर्नल फिलिप्स डाकतर वगैरे गोरे दिसत. त्यापैकी कर्नल फिलिप्स हाच आम्ही रँडसाहेब समजत होतो. पण तो भ्रम एके दिवशी चांगल्या आधारावरून पिटला. हा कसा समजेल या चिंतेत आम्ही निमग्न होतो. कोणाला प्रसिद्ध रितीने विचारता येईना. कटवार शोधायचा असा किती दिवस आमचा प्रयत्न नुसता रँडसाहेब दृष्टीस पडण्यास लागला याचे कारण तो त्यावेळेस इथे

आलाच नव्हता. उगाच गप्पा लोकांत पिकत की तो आला आणि कामावर रुजू जाहला. पण पुष्कळ दिवसानी तो कामावर रुजू जाहला असे आमचे मत आहे. त्यादिवशी ही मूर्ति आम्हास स्पष्टपणे पहाण्यास मिळाली तरी आम्ही तोच रँडसाहेब आहे अशाविषयी बहुमुखानी खात्री करून घेतले. नंतर त्याची गाडी पाहिली आणि मग गाडीवाल्यास भिस्कुटचाकडून विचारिले की, रँडसाहेब कोठे रहातात. तेव्हा कळले की, रँडसाहेब क्लबमध्ये रहातात. मग आम्ही क्लबमध्ये बाहेर खेपा घालू लागलो. पण पत्ता लागेना. मग लष्करमध्ये जाणे सोडून आम्ही गाडीचे मागून तपासणीवरच जाऊ लागलो. त्या ठिकाणी सकाळ संध्याकाळ तो आम्हास पहाण्यास मिळे. तपासणी सुरू झाल्यापासून तो रोज सकाळी बुधवारात येऊन नंतर ज्याठिकाणी तपासणी असेल त्याठिकाणी जात असे. बुधवारात येई त्यावेळेस त्याला पाहण्यास पुष्कळ लोकांची गर्दी होत असे. प्रथम दिवशीच तपासणी जाहली ती बुधवारात जाहली. त्यावेळेस जो देखावा दृष्टीस पडला तो अपूर्व होता. लोकांस या तपासणीचा प्रकार माहीत नसल्यामुळे ते बेसावध होते. त्यांना जर ठाऊक असते की, ही तपासणी म्हणजे जीवनलूट आणि तपासणी करणारे गोरे हे बंडखोर आणि त्यांचे नाईक कर्नल फिलिप्स लुई गोरे होते. रँडसाहेब या बंडखोरीवर हुकूम फर्माविणारे मुख्य आहेत. ही बुलूट इंग्रजांचे मनांत चरायची म्हणून पूर्वी जॉन म्हणून एक डाकू नेमून त्याच्याकडून सर्व लहानथोर गोरगरिबांच्या घरास मोठमोठी भगदाडे पाडली. याचे कारण इतकेच की, पुढे आपणास दिवसाढवळ्या दरोडा घालण्यास यायचे आहे. त्यावेळस त्यात असलेल्या तिजोरीच्या पेटचा किंवा चीजवस्तु दिसावी म्हणून काही इंग्रज बंडखोरांनी ही अगोदर तजवीज करून ठेविली. जॉनसाहेबांनी प्रथम साधारण तपासणी करून गरीब कोण श्रीमंत कोण याची बारीक तपासणी केली. नंतर त्याची नोंद बंडखोरांना प्रथम दिली असती.

## रयतेवर जूलुम

आमच्याइकडे दरोडेखोर प्रथम बारीक तपासून मग रात्री दरोडा घालतात. तोच प्रकार कायदयाच्या ढोंगाखाली हिंदु लोक गरीब पाहून इंग्रज बंडखोरांनी चालविला. हे मायबाप सरकार आपल्या रयतेचे गळे अशा रितीने कापत असे. जर प्रथम लोकास कळले असते तर कोठेतरी जीव लपविण्यास चीज वस्तु सोडून गेले असते. पण त्याचा हा प्रकार ध्यानात न येऊन ते आपल्या घरी पडले होते. इतक्यात पहिल्या दिवशी या बंडखोरांची टोळी बुधवारात आली. बरोबर नाकेबंदी करून कुलुपे तोडून दुकाने फोडण्यास आरंभ झाला. असा होता तो देखावा. खरोखरीच असा प्रकार राजाकडून प्रजेवर झालेला कधी कोणीही इतिहासात वाचला नसेल की ऐकिला नसेल, परशत्रूकरिता तयार ठेवलेल्या

फौजेचा उपयोग परचक्र आल्यावर कोणी करील, पण हे आमचे इंग्रज हकदार आणि यांची मर्दानी फौज बंदुका आणि संगीना घेऊन अभागी झालेल्या अर्धमेल्या रयतेवर स्वारी करून त्यांना काबीज करून इस्पितळात रवाना करतात. धन्य आहे की नाही त्यांची. नाहीतर आम्ही. त्यांची फौज कोणीही मारील पण विशेष म्हणजे आजारी झालेलेना त्यांचे एक पाऊलही वाया जात नाही, त्या लोकास हस्तगत करणे हाच मर्दानी होय असे आमचे इंग्रजांचे म्हणणे. म्हणून तर त्यांनी त्याकरिता कवाईत शिकवून तयार केलेली पलटण उपयोगात आणली. अशा तऱ्हेने या बंडखोराची लूट सुरू झाली. या लुटीबरोबर आम्ही नेहमी जात होतो. जावयाचा उद्देश, अन्याय स्वचक्षूने पहावयाचा, मी त्याला तपासणी म्हणण्यापेक्षा लूट म्हणणे पसंत करीतो. ही लूट चालू असली म्हणजे रँडसाहेब मुख्य त्यामध्ये. असे बडे बडे काही इकडून तिकडे फिरत असायचे. म्हणजे कुलुपे कशी तोडतात, माल लांबवितात कसे, झोटिंगशाही काय चालली आहे, बरोबर काम करितात की नाही याची देखरेख यांचेकडे होती. त्यावेळेस यांच्या डोक्यांत एक प्रकारची धुंदी असते. तीमुळे ते कोणाही हिंदु गृहस्थास ओळखत नाहीत. बंडखोर मंडळीना, नाही तिकडे जाळपोळ, पाडतोड, धरपकड याखेरीज दुसरे आढळत नसे. ज्यांनी हा देखावा पाहिला असेल तो या नराधमाना बंडखोरावाचून दुसरी उपमा देतील असे मला वाटत नाही. ही लूट कोणत्या प्रकाराने होई याविषयी नियम केले होते. त्या लेखी नियमांत पुष्कळ सौम्यपणा ठेविला होता. वर्तणुकीमध्ये त्याच्या अंगी अगदी उलट प्रकार दृष्टीस पडत असे. नियमांत कोणाच्या देवधर्म सोवळेओवळे याचा जेणेकरून उपमर्द होईल अशी वागणूक कोणी करू नये असा स्पष्ट उल्लेखं आहे. पण वागताना हे गोरे मुद्दाम आम्हांला चीड उत्पन्न होईल अशी वर्तणूक अमलांत आणीत असत, आणि हा प्रकार रँडसाहेब मोठ्या खुषीने पाहत असें. यावेळेस जी आमच्या मनाची स्थिती होत असे ती लिहिण्यास आम्ही असमर्थ आहोत.

## रँडसाहेबाचा खून करण्याचा निश्चय

आम्ही निश्चय केला की, याचा जीव घ्यायचा, सोडायचा नाही. असा एक निश्चय झाल्यावर आम्ही त्या तयारीस लागलो. आमच्याजवळ नुसत्या तलवारी होत्या. दोन पिस्तुले होती. पण दारू नव्हती म्हणून ती निरुपयोगी होती शीघ्र काम करण्यास पिस्तुले चांगले. पर काय करिता, साहित्य आणा कुठून. तलवारीनेच आम्ही काम करावयाची उमेद धरली. आमच्या जवळ असलेल्या तलवारीहून दोन तलवारी उत्तम निवडून काढल्या. त्याला गळचांत अडकविण्याकरिता पट्टे लांविले. काळे म्यान होते त्यास पागोटे गुंडाळून ते पांढरे केले. अशी तयारी करून आम्ही जागा शोधू लागलो. पण आम्हाला दुसरी

कोठें जागा आढळेना. मग आम्ही हे काम कमिटीच्या ऑफिसापाशीच करावयाचे ठरविले. एवढीच अट होती की, संध्याकाळचे आठ तरी निदान वाजले पाहिजेत. गावातल्या रिकामटेकड्या लोकांनी रँडसाहेबास निनावी धमकीची पत्रे पाठवून त्यास सावध केला होता. तेणेकरून आम्हास फार त्रास झाला होता. रात्र तरश करीना. जाता येता बरोबर स्वार ठेवू लागला. तरी आम्ही आपली हिंमत किंचितही कमी होऊन दिली नाही. आम्ही दोघांना ठार करण्याचा निश्चय केला. तलवारी घेऊन आम्हास रात्रीशिवाय निघता येईना आणि तो काही रात्र करीना, असे किती दिवस जाहले. गावात जुलुम आणि तापाची साथ वाढली. सर्व शहर उजाड झाले. आमच्या वडिलास लांब लांबहून बोलावणी आली की, तिकडे तापाची साथ वाढली आहे तर आपण इकडे यावे. वडीलही जाण्यास तयार जाहले. पण आम्हास हे काम कर्तव्य असलेमुळे दूरदेशी जाणे आम्हास पसंत पडेना. म्हणून आम्ही वडिलांच्या जाण्यास हरकत घेऊ लागलो. पुणे सोडावयाचा त्यांचा अगदी आग्रह दिसला, तेव्हा आम्ही ठरविले की, दूर जाण्यापेक्षा जवळ आपले घरी चिंचवडला जाणे सोईस्कर होईल. चिंचवड हे पुण्यापासून पाच कोसावर आहे. आम्ही विचार केला की, जर चिंचवडास गेलो तर रोज तेथे येऊन काम करून जाऊ असा विचार करून आम्ही चिंचवडचा सल्ला दिला आणि तो वडिलांना पसंतही पडला. म्हणून त्यांनी चिंचवडास आमचे चुलत्यांना पत्र पाठविले. पण त्यांनी अनेक हरकती लिहून चिंचवडास येणे चांगले नाही असा आपला अभिप्राय कळविला. अशा रितीने आपले बंधुप्रेम व्यक्त केले तेव्हा जवळ आसपास दुसरी जागा आढळेना. अखेर आम्ही प्रयत्न करून आमचे व्याही परसावे यांची बाग खडकीस आहे, ती त्यांना विनंती करून मिळविली. ती आम्हाला चिंचवडपेक्षा सोईस्कर वाटली आणि त्या ठिकाणी आम्ही सुमुहूर्त पाहून गेलो. आम्ही तिघे या भयंकर कृत्याच्या पाठी लागलो असा संशयसुद्धा कोणास उपजू नये याबद्दल आम्ही फार सावधगिरी ठेवित होतो. खडकीच्या बागेत असताना त्या ठिकाणी आणि एक आरनोन्रस नावाचा मिशनरी खडकी बाजारात राहतो. त्याची आमची ओळख, त्याच्यापासून आम्ही पंचवीस तीस केप मागून घेतले. पण दारू कोठे मिळेना, पण इतक्यांत कोथरूडचे बागेत कचरे म्हणून माळी आहे त्याच्या इथे दारू सापडण्याचा संभव आहे असे सांगितल्यावरून आम्ही तिघे एक रात्री मजेखातर म्हणून गेलो आणि दारू छरे चोरून आणिले.

### रँडसाहेबाच्या जुलुमाची पराकाष्ठा व लोकांत असंतोष

रँडसाहेबाचे जुलुमाची पराकाष्ठा झाली. सर्वतोमुखी रँडसाहेबास मारावयाच्या गोष्टी ऐकू येऊ लागल्या. सर्व लोक आपल्यात कोणी स्वधर्मा-

भिमानी मर्द नाही म्हणून खेकसू लागले. गावात दररोज नवीन जुलमाचे प्रकार होऊ लागले. कित्येक ठिकाणी देवस्थाने भ्रष्ट केली कित्येक ठिकाणी बायकांच्या अब्रूवर अपहार केला. देव फोडले. गोरगरिबाचे या बंडखोरानी नुकसान अतोनात केले. असा प्रकार चालला असता दररोज खडकीहून पुण्यास येऊन पुन्हा संध्याकाळी परत जात होतो. ऐन उन्हाच्या वेळी खडकीहून पुण्यास जाणे आणि खडकीस येणे हे कृत्य आमच्या वडिलास आवडले नाही. त्यांनी आम्हास परोपरीने सांगितले बाळानो, हे तुमच्या प्रकृतीस मानवणार नाही. पण आम्हाला हे काम कर्तव्य असल्यामुळे लपून छपून पुण्यास जाणे सोडले नाही. हे वडिलांस समजून ते रागवले आणि पुण्यास येऊन राहिले. तसे आम्ही सर्व मंडळींसह खडकीचा बाग सोडून पुण्यास येऊन राहिलो. तापाची साथ शहरात जोराने चालू होती. पण आम्हाला एक आनंद जाहला की, आता प्रयत्न करावयास सुलभ जाहले.

## तापाच्या साथीत भिस्कुटेचा मृत्यू

इतक्यात आमचा प्रियमित्र भिस्कुटे दत्तात्रय या दुष्ट तापाने आजारी झाला. ज्या दिवशी तो तापाने आजारी झाला त्या दिवशी तो आमच्याकडे येऊन ताप आला म्हणून बोलला पण त्यानीच सांगितले की घाबरू नका. ताप साधा आहे. असे म्हणून तो घरी निघून गेला. तो पुन्हा आम्हास भेटला नाही. त्याची आमची मित्रता आहे असे त्याच्या घरच्या माणसाना ठाऊक नव्हते म्हणून आम्हाला त्यांच्या घरी समाचारास जाता येईना. म्हणून मी धाकटे भावास त्याच्या तपासास पाठविला पण या बंडखोराची भीती ज्याच्या त्याच्या मनांत असलेमुळे कोणीही भिस्कुटे आजारी आहे हेच कबूल करीना. हरहर परमेश्वरा! काय ही आम्हा हिंदू लोकांची पराधीनता कळसास जाऊन पोचली. भिस्कुटयाचा पत्तासुद्धा आम्हास कळेना. या दुष्टाचे पारिपत्य करून ही खबर भिस्कुटयानी आजारीपणांत ऐकली पाहिजे. असे म्हणून आम्ही फार परिश्रम केले. पण तसा योग न येता भिस्कुटे आमचा त्याग करून परतले, अशी वार्ता मात्र आमच्या कानी येऊन आदळली त्यावेळेस आम्हास परमावधीचे दु:ख जाहले. अशा कामी जिवाचा मित्र मिळणे किती कठीण आहे याचा विचार प्रत्येकाने करावा. आमच्या दुर्दैवाने तो आम्हास लाभला नाही. आम्ही गावाबाहेर जाऊन वर वर हात करून आकाशाकडे पाहून तोंडाने बोललो की, तू आमच्याबरोबर स्वधर्म हिताच्या कामास पुष्कळ झटलास याबद्दल ईश्वर तुला सद्गति देवो. लौकरच चांडाळाची रवानगी यमलोकास करून देतो. तू काळजी करू नकोस. यापेक्षा तुझी आशा फेडण्यास दुसरा मार्ग आम्हास नाही. असे भिस्कुटयास बोलून देहाच्या क्षणभंगुरपणाविषयी विचार करीत करीत गावात आलो. मित्राची

उडलेली दशा पाहून आम्ही जगाबद्दल फारच निराश झालो. असे वाटे की, परमेश्वर आम्हास सुद्धा असेच एखादे दिवशी उचलून नेणार करिता जे होईल ते होवो. आता रात्रीची संधि न सांपडली तर दिवसा काम करावयाचा पण सोडावयाचा नाही असा विचार करून भिस्कुटे गेले. म्हणून आम्ही किंचितही विचार कमी न करता आमचा उदयोग उलट जारीने चालविला.

**रँडसाहेबास मारण्याचा बेत**

होता होईल तो आपला बचाव करून काम करावयाचे, न सापडल्यास एकाची आहुती झाली तरी हरकत नाही. बंडखोराची टोळी ज्या वाटेस आमच्यापर्यंत येई त्यावाटेस आम्ही सज्ज होऊन बसत होतो. कारण न जाणो या गोऱ्या तोंडानी जर अमर्याद वर्तणूक आपले घरी केली तर एकच प्रायश्चित दयावयाचे असा आमचा निश्चय होता. या हलक्या सोजरास मारण्याला भूल नाही. करिता अशा वेळी रँडसाहेब मिटला पाहिजे. करिता आम्हापैकी एक भाऊ रँडसाहेब कुठे उभा आहे हेही पाहून ठेवित होता. कदाचित घरांत कमी जास्त वर्तणूक यांनी दाखविली की, त्याला मी टहलकावे आणि बंधूनी रँडसाहेबास, अशा तयारीने प्रत्यही तयार रहात होतो. पण सुदैवाची गोष्ट की, आमच्या घरी ते आमच्या सांगण्याबाहेर वागत नव्हते. कधीकाळी असेही झाले की आमचा भाऊ अनाडी होता. त्यावर हे बंडखोर आले त्यावेळी आम्ही अगदी सशस्त्र होऊन तयार होतो. मी या शहरात कोणी स्वाभिमानी आहे, हे या बंडखोरास दाखवावयाचे अशा बेताने होतो. आम्ही आपल्या घरी या बंडखोरासाठी खुबीने वडिलांचे माडीवर आणि बंधूच्या खोलीत मात्र मोडून जात होतो. बाकीच्या भागांत देवघर, स्वैयंपाकघर, बायकांचे घर-इतक्या ठिकाणी आम्ही या नरपशूंना जाऊ देत नव्हतो. आणि आमच्या घरापाठीमागील बाजूस आमची म्हैस बांधली आहे, ती या गोऱ्या तोंडास पाहून मारायला धावे. तिची भयाण मुद्रा पाहून हे गोरे पाठीमागच्या बाजूस जात नसत. अशी आमच्या घरी म्हैस सुद्धा होती याबद्दल आम्हाला फार अभिमान वाटे. अशा रितीने आम्ही तयार असल्यामुळे ईश्वरास काळजी वहावी लागत असे. आमच्या घरी ते आमच्या सांगण्याप्रमाणे वागत असत. नाही म्हणण्यास एके दिवशी एक गोरा म्हणाला की, तुमच्या घरात मला गेले पाहिजे. तेव्हा आम्ही उभयतानी सक्रोध मुखाने सांगितले की, जाणे होणार नाही. तेव्हा काय त्याला ईश्वराने बुद्धी दिली तो जास्त प्रकार न करिता निघून गेला. बाहेर मात्र जुलूम जाहलेले मी स्वतः पाहिले. आपण पण आमच्या घरी कांही एक चीड उत्पन्न होण्यासारखा प्रकार न झाल्यामुळे आम्ही सावकाशपणे या रँडचे काम करीत होतो. साधारण तक्रारी आमच्या त्या गोऱ्या सोजराबरोबर पुष्कळदा जाहल्या पण त्या रस्त्यावर आम्हीहून काढलेल्या कुरापतीवरून झाल्या.

## शिपायाच्या बंदुका पळविल्या

अशा रितीने ही तापाची आणि जुलुमाची साथ वाढून परमेश्वर इच्छेने कमी कमी होण्यासही लागली. कांही दिवसांनी तपासणी बंद जाहली तरी स्मशानभूमीवरचा गेट मात्र ऊठू लागला नाही. या प्रत्येक गेटावर दोन दोन शिपाई हत्यारबंद असत. त्यांच्या बंदुका पार करावयाची इच्छा आम्हाला जाहली.म्हणून आम्ही सर्व गेट पाहून ठेवली. त्यात आम्हाला लकडी पुलावरचे गेट सोईवार पडले. त्या ठिकाणी मी पुजाऱ्याचा वेष घेऊन चारपाच वेळ गेलो होतो. एके दिवशी बलभिमास नमस्कार करून त्याची आज्ञा मोडून मी त्या घरी घेऊन आलो. दोन बंदुका आणिल्या. आम्हा उभयतास त्या पाहून फारच आनंद झाला. तो किती झाला हे लिहिण्यास आम्ही समर्थ नाहीत. आम्हास इतकी उमेद आली की आम्ही फौजेबरोबर सुद्धा तोंड देऊ. पण आमच्या दुर्दैवाने ते दिवस आम्ही पाहिले नाहीत. पुन्हा दिसावयास संभव नाही. बंदुका आणल्या पण काडतुसे कोठे होती. काडतुसाचा प्रयत्न आम्ही पुढे करणार होतो. बंदुका चोरीस गेल्याची बातमी दुसरे दिवशी गावांत पसरली. त्यांत कवायती शिपायांची आणि त्याच्या शौर्याची लोक तारीफ करू लागले व नेणारेबद्दल आश्चर्य दाखवू लागले. सर्व कामात आम्हास या गोष्टीचा फारच आनंद झाला. काडतुसे नसल्यामुळे बंदुका या कामात उपयोगी पडण्याचा बिलकुल संभव नव्हता. म्हणून त्या नीट नेऊन ठेवून दिल्या. तपासणी बंद झाल्यापासून रँडसाहेबाचे येणे जाणे शहरात नियमवार राहिले नाही. वाटेल तेव्हा तो येई आणि जाई. त्यामुळे शहरात काम करण्याचा उपाय खुंटला. मग आम्ही लष्कर हद्दीत क्लब मध्ये जाऊन त्याचा बेटीचा तपास चालविला ती खोली पाहून ठेवली आणि पाहून दररोज संध्याकाळचे वेळी बुधवारी आणि रविवारी तो प्रार्थनेस जाई त्या ठिकाणी एका युरोपियन कान्स्टेबलचा आणि आमचा संवाद झाला होता, तेव्हा आम्ही विपर्यास करून क्लबमध्ये गेलो होतो. तेथून आठदहा वेळा जिमखान्यावरही गेलो होतो. जिमखान्यावरही एके दिवशी एक युरोपियन कॉन्स्टेबलची आणि आमची झकमक झाली होती. अशारितीने आम्ही किती प्रयत्न केले याचा सादयंत वृत्तांत लिहीता विस्तार फार होईल. करिता तांत्रिक माहिती घेऊन मी त्याप्रमाणे आटपते घेतो. 'प्रयत्नांती परमेश्वर' असे म्हणतात ते काही खोटे नाही आमचा एकसारखा प्रयत्न चालू होता. आमचे मुंबईला जाणे अगदी नजीक आले. आता आमच्याकडून हे काम परमेश्वर कसे करून घेणार या विचारात आम्ही पडलो. परमेश्वराची परोपरीने आम्ही प्रार्थना केली की देवा, हे काम आमच्या हातातून करवून धर्मसेवा तू घेतली पाहिजे. लोकांचे जुलमांविषयी उद्‌गार ऐकले की आम्हांस वाटे की हे सर्व लोक नवीन राजास गाऱ्हाणे सांगतात तसे आम्हालाच हे सांगत आहेत. त्यामुळे आम्हास असे वाटे की, आपण या लोकांचे

ऋणी आहोत. हे जर काम न जाहले तर सर्व लोकांचे ऋण आमच्या बोडक्यात तसेच राहून लोकास तोंड दाखविण्याची आपणास शरम वाटणार आहे. करीता देवा, याची तुला लाज आहे. असे आम्ही वारंवार श्री गजाननाची प्रार्थना करीत होतो.

## जुबिलीच्या समारंभाचे वेळी स्तूत्य कृत्य करण्याचा निश्चय

होता होता जुबलीचा दिवस नजीक येऊन ठेपला. जुबलीचा बडा सण होणार, तो कसा होणार, काय होणार, याविषयी वर्तमानपत्रातून उल्लेख होऊ लागले. तेव्हा आमचा समज झाला की, या समयास एकंदर लहानथोर युरोपियन लोक गव्हर्नरचे बंगल्यावर जातील. ती वेळ आल्यास इष्ट आहे असे जाणून आम्ही दोघे तो प्रांत पहाण्यास निघालो. बाजूचे सर्व लहानथोर रस्ते पाहून आम्ही पाऊल ठेविले. सर्व जगाचा विचार करता लकडी पुलाकडून गेले म्हणजे राष्ट्रीय सभामंडप ज्या ठिकाणी पडला होता, त्याचे अलिकडे जो पिवळा बंगला आहे, त्या बंगल्यापासून पाट गेला आहे. त्या पाटावरून गेले म्हणजे गणेशखिंडीतल्या मोठचा रस्त्यास पिवळचा बंगल्याकडे मिळावे आणि त्याच ठिकाणी आपले स्तुत्य कृत्य करावे आणि परत जावे असे आम्ही ठरविले. कदाचित पाऊस आल्यास निवाऱ्याची जागा म्हणून आम्ही तेथे आपले बाजूचे रिकामे बंगले पाहून ठेविले. आम्ही ज्यावेळेस पाहणी केली त्यावेळेस पाटावरून जात असता पिवळचा बंगल्याशेजारी काही युरोपियनाच्या पोरी पाण्यात खेळत होत्या त्याना आम्ही उगीच रागे भरलो. आणि पुढे जगज्जनीदेवी चतुरसिंगी मातेच्या दर्शनास गेलो. त्याठिकाणी तिला विनंतीदाखल एक पद म्हणून प्रार्थना केली.

पद

आई अंबे जगदंबे जोति सत्कर्मी जय दे।। रिपुमर्दनाचा आईभवानी आम्हाला वर दे (आ) आम्ही नाही तुजवाचूनि कोणी जगी आसरा।। पुण्य पत्तनी धर्म बुडविला रँडाने सारा।। त्या मारा, अविचारा हात आमुच्या, गे अंबे धैर्य शौर्य मज दे।। आई अं.।। १।।

याप्रमाणे तिची स्तुति करून आम्ही घरी परत आलो. घरी आल्यावर आम्ही परमेश्वराची आराधना करावयास आरंभ केला. आम्ही तनमनधन अर्पून गजाननाची प्रार्थना केली. त्या जगदिशास माहित. त्याचे फल गजाननाने आम्हास दिले असे आमचे मत आहे. प्रथमतः हत्यारे कोणती बरोबर घ्यावी याविषयी आम्ही विचार केला. आमचे असे ठरले की, एकेक तलवार आणि एकेक पिस्तुल प्रत्येकाने बाळगावे. माझे बंधुनी एक कुठार ही बरोबर घ्यावयाचे ठरविले जसा समय प्राप्त होईल तसा ते प्रयोग करण्याचे ठरविले. तलवारी

पूर्वीच आम्ही तयार करून ठेविल्या होत्या, हे वाचकास स्मरत असेलच. मजजवळ जो पिस्तुल मी घेण्याचे ठरविले तो बिघडलेला होता. त्याचा एकच बार उपयोगांत येत असे. बापूरावजवळचा एकनळी पण मोठ्या मोळीचा असे. अशी हत्याराची आम्ही गाठबंदी करून वेळेची मार्गप्रतिक्षा करीत बसलो. आम्ही सर्व दिवस ईश्वरचिंतनात घालविला. या कृत्यात यशापयशाचा निश्चय झाल्यामुळे आमचे घरगुती कामात बिलकुल लक्ष नव्हते. हो, एक गोष्ट लिहिण्याची राहिली. जुबलीचा समारंभ ऐटीने करावयाचे सरकारचे मत होते. त्याप्रमाणे गावात किंबहुना सर्व हिंदुस्थानांत हा जुबलीचा सण राजेराजवाड्यांनी सुद्धा मोठ्या जातीने पाळला. वास्तविक पाहिले असता ही वेळ आनंदोत्सव करण्याची नव्हती. मुंबई इलाख्यात तापाची साथ, कलकत्त्याकडे धरणीकंप आणि सर्व हिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ अशी तीन प्रकारचा भयंकर अनिष्ट, गावांत रयत दुःखी असताना, ती रयतेची पिडा दूर न करिता, 'दुष्काळांत तेरावा' या म्हणीप्रमाणे त्याच्याकडून आपला साठावा वाढदिवस करून घेणे म्हणजे केवढा मोठेपणा होय. हे इंग्लंडच्या राणीवरच शेकणार आहे. राजा आणि प्रजा यांचे नाते पितापुत्राप्रमाणे आमच्या शास्त्रात समजतात. त्या न्यायाने ही आम प्रजेची माता होय. पण हिच्या कृतीवरून हिला प्रजारक्षक माता म्हणण्यापेक्षा मुलाचा फराळ करणारा खवीस कां म्हणू नये? खरी जर थोर मनाची राणी असती तर आता आनंद समयास मुलासारखी आपले प्रजा समजून तिला माया जास्त वाटून तिचा दुवा घेतला असता, पण तसा प्रकार दृष्टीस पडला नाही म्हणून आम्हास हा उत्सव बिलकुल पसंत पडला नाही. आम्हाला या समयास उच्छाव दाखविण्यापेक्षा निरुत्साह दाखविणे हेच खऱ्या आर्यपुत्राचे कर्तव्य आहे. असे वाटते.

### राणीच्या मूर्तीची रस्त्यांत स्थापना व तीस खेटराची माळ.

उगीच पत्रात अगर आपणा तोंडापुरते बोलून राजभक्ती दाखविणे हे आम्हास बिलकुल आवडत नाही. अशी नेभळी प्रजा प्रस्तुत सर्व हिंदुस्थानांत भरली आहे. इंग्रज सरकारची एकंदर कृती याना पसंत पडत नाही. पण हे अजागळ लोक वर्तमानपत्रांत आणि सभेमध्ये बोलण्यात राजभक्तीची कमाल करून देतात. कोणी कालांतरानी शालजोडीतले जोडे राणीसरकारला मारतात आणि एकशेचौविसावे कलम लागू केले की, माझा ते दिवसाचा असा अर्थ नाही, तसा आहे, अशा वादास उभे रहातात. यापेक्षा प्रत्यक्ष इंग्रजास त्याचे सभेस खेटर मारणे किंवा तिला कलंक लावणे हजारपटीने बरे आहे. खोटे नांवाने आम्ही या कृत्यास प्रवृत्त झालो. हा आठ दिवसाचा उत्सव साजरा करण्यास आमचे लोकाना खुशी नव्हती. तरी 'सत्तेपुढे शहाणपण नाही' या म्हणीप्रमाणे नाखूषीने

पण कांहीतरी उत्सव साजरा करीत होते. पण आम्ही हिची आज्ञाधारक प्रजा आहोत असे समजत नाही, सबब आम्ही तिचा उत्सव समजून निरुत्साह दर्शविण्याचा विचार केला, आणि या वाढदिवसाचे दिवशी प्रातःकाळी भर बुधवारच्या रस्त्यांत मध्यभागी या आंग्लराणीची मूर्ति योग्यस्थळी विराजित करण्याचा संकल्प केला. आम्ही मुद्दाम पुष्कळ उकिरडे हिंडून मोठ्या प्रयत्नाने जुनी जुनी अतिजीर्ण खेटरे मिळविली. ही खेटरे आम्हास फार मिळाली नाहीत. तरी दहा खेटरे मिळाली. त्या प्रत्येक खेटराचे तळव्यास एकेक राणीची चित्री लावून ती बुधवारच्या राजरस्त्यावर विराजित केली. त्यावर आमचे विद्वान बंधु म्हणतील की, तुम्ही प्रत्यक्ष काम कोठे केले. लपूनच की नाही. ही माझ्या मित्रानी यद्यापि आम्ही त्यावेळेस ती कामे लपून केली तरी आम्ही जाणून होतो, आज ना उदया आम्हाला मैदानांत यावे लागणारा आणि मोठ्या अभिमानाने पुढे येऊ. तो आनंदाचा दिवस आज सुदैवाने प्राप्त जाहला याबद्दल गजाननाचे आभार मानतो.

यांप्रमाणे सकाळी तो प्रकार करून संध्याकाळ होताच गणेशखिंडीत जाण्यास तयार जाहलो. जातेसमयीं आम्ही सर्व घरदार बायकामुले आईबाप इष्टमित्र यांची आशा सोडली. परंतु निघताना श्रीमंगल मूर्तीस अत्यादरपूर्वक नमन करून आणि तनमन निव्हारी ठेवून वडील मातुश्रीचे चरणपंकज मनांत आणून सर्व लहानथोर मंडळीचा निरोप मनांत घेतला. फार तर काय, आमच्या अत्यंत प्रीतीतली आमची गरीब म्हैस तिला सुद्धा आम्ही जाताना स्पर्श करून तिच्यासुद्धा सर्व लहानथोर मंडळीस मनांत म्हणालो, हे माझे घरांतील प्रिय बांधव हो, तुमच्या सर्वांच्या पुण्याईने आम्हास यश मिळो. असे म्हणून आम्ही बाहेर पडलो. निघताना आम्ही आपले धर्मपुस्तक तेही बरोबर घेतले होते. ही वेळ सुमारे सात किंवा साडेसात वाजण्याची होती. नुकताच दिनकर अस्ताचलास गेला होता. क्षणोक्षणी अंधःकार वृद्धिगत होत होता. आम्ही गावाबाहेर आल्यावर चतुःश्रुंगी भवानीचे मनःपूर्वक पूर्वी म्हटलेले पद म्हटले. थोडयाच वेळात ठरलेल्या रस्त्याने गणेशखिंडीत पोचलो. पोहोचता क्षणी रँडसाहेबाची गाडी आमच्या दृष्टीस पडली. पण त्या गाडीबद्दल सर्व तऱ्हेने आमची खात्री न झाल्यामुळे आम्ही ती वेळ सोडून जेवायची वेळ कामास कायम केली. समारंभ पाहाण्यास लोकांची गर्दी पुष्कळ झालेली. त्यांत आमचे ब्राह्मण फारच कमी होते. डोंगरावर लावलेल्या लाकडाचा प्रकाश आणि लोकांची गर्दी यामुळे आम्हास तलवारी घेऊन वागणे कठीण पडे. म्हणून आम्ही तलवारी बंगल्या-जवळच एक दगडी पूल आहे त्या पुलाखाली त्या दोन तलवारी आणि एक अशा रीतीने ठेवले की प्रसंग आला तर आम्हाला घेता येतील. नंतर आम्ही सडसडीत होऊन हिंडू लागलो. कदाचित कोणी ओळखीचा भेटेल म्हणून आम्ही रस्त्यांत न

हिंडता अंधारात एका शेतात खुशाल ईशचिंतन करीत बसलो. जेव्हा गाड्या शहरांतून येणे संपले आणि परत शहरांत गाड्या जाऊ लागल्या त्यावेळेस मी फाटकापाशी जाऊन उभा राहिलो. आमचे ठरले की, मी गाडी पकडून आणावी आणि माझ्या बंधुनी मला पिवळ्या बंगल्यापाशी काम करीत असता मदत करावी. मी गाडीबरोबर धावत येत असतो. खुणेकरिता गोंद्या असा ध्वनि करावा आणि त्या ध्वनिवर बंधूनी समजावे. की गाडी आली आणि त्यांनी तयार असावे असा विचार होऊन मी फाटकाजवळ गेलो. बऱ्याच गाड्या गेल्यावर पाठीमागून ही गाडी आली. मी पूर्ण तऱ्हेने ओळखली आणि तिच्यापासून १५ पाऊले पायी मागे धावत चाललो. जसा पिवळा बंगला नजीक आला तसा मी गाडीस लगट करून गोंद्या, असा ध्वनी केला. तो करताच माझा प्रिय बंधु मला येऊन मिळाला मी गाडीचा पाठीमागचा पडदा गुंडी काढून उघडला आणि सुमारे वीतभर लांबून निशाण मारले असावे.

## गणेश खिंडीत रँडसाहेबावर गोळी झाडली

आमचे प्रथम असे ठरले होते की, दोन्ही पिस्तुल रँडसाहेबासच मारावे म्हणजे त्याच्या जीवितांची शंका राहणार नाही पण बंधु मागे राहिल्यामुळे माझ्या पिस्तुलाचे निशाण बघून रँडसाहेबाची गाडी निघून गेली. पाठीमागचे गाडीत कोणी आम्हाला पाहून कुजबूजत आहे असा संशय बंधूस येऊन त्यांनी गाडी पाठीमागून त्याच्या डोक्याचे निशाण धरून गोळी झाडली. आणि आम्ही आलेल्या मार्गाने शीघ्रगतीने निघून गेलो. तलवारी दुसऱ्या दिवशी नेण्याचा आमचा विचार होता. घरी आल्यावर परमेश्वराचे अत्यंत आदरपूर्वक स्तवन केले. त्या रात्री आनंदामुळे आम्हास झोप आली नाही. पहाटे स्नानविधी करून फराळ खावा म्हणून वरून ह्याबद्दल काय गडबड आहे ते पहाण्याकरिता आम्ही गेलो. पण कांही हाती लागेना. सुमारे दहा अकरा वाजता गांवांत बातमी पसरत चालली. संध्याकाळला जिकडेतिकडे चर्चा होऊन आनंदही आनंद होऊन गेला. गरीबापासून तो श्रीमंतापावेतो, लहान मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वास ज्याअर्थी आनंद वाटला त्याअर्थी आम्हाला किती जाहला असेल याची कल्पना वाचकानीच करावी. लोकास आनंदी बघून आम्हास आनंद. नाहीपेक्षा रँडसाहेबांचे आणि आमचे कांही एक वाकडे नव्हते. त्यानी जर आमचे धर्मात हात घालण्याकडे दुर्लक्ष केले असते, सोजीर कायदेशीर वागतात की नाही, हे जर पाहून वागता तर आम्हाला असे करण्याचे काम पडले नसते.

## रँडसाहेबाचे गुण

रँडसाहेबाचे पाठीमागे आम्ही सरासरी तीन साडेतीन महिने संचार केला. तितक्या सहवासांत आमचे मन त्याचे विसी फारच उत्तम होते. नव्हे आम्ही

मानी आहोत तसाच रँडसाहेबही मानी होता. रँडसाहेबास कोणतेही व्यसन नसावे असे आमचे मत आहे. त्याचे ठिकाणी बालटपणा बिलकुल नव्हता. जिमखान्यात तो लँटेनीस खेळत असता आम्ही पाहिला. तो कधीही लेडीबरोबर खेळत नसे. यावरून परस्त्रीचा त्याला तिटकारा होता. इत्यादी बरेच गुण त्याचे आमचे लक्षात आले. पण उपयोग काय? तो आमचा धर्मशत्रू बनला. त्यामुळे त्याचा सूड घेणे आम्हाला जरूर पडले. त्याला इलाज नाही.

## हत्यारे लपविली

त्यानंतर मोठी गडबड उडाली व या बद्दल गावांतही अनंत गप्पा जाहल्या. कोणी म्हणे घराची तपासणी करून हत्याराचा झाडा घेणार. तेव्हा आमचा विचार जाहला की, आपणास मुंबईस जाणे आहे तेव्हा येथे हत्यारे टाकून जाणे इष्ट नाही. असा विचार करून आम्ही ती सर्व हत्यारे एके ठिकाणी मजबूत बांधून ती लोटे यांचे घरी विहिरीत बुडविली व पुलाखाली राहिलेल्या तलवारी पोलीसांनी फरासखान्यांत नेल्या होत्या असे आम्हास कळले. तेव्हा तिकडे आम्ही गेलो नाही. पण जाऊन तिची खणानारळाने ओटी भरली आणि तिचा निरोप घेऊन दुसऱ्या दिवशी जगदंबेच्या दर्शनास आम्ही सर्व कुटुंब मंडळीसह दुपारी १।। (दिडाचे) गाडीस मुंबईस जावयास निघालो. वाटेत स्टेशनावर जाताना मुंबई पोलिसची मंडळी गाड्यातून भेटली. त्याना पाहून आम्ही ताबडतोब ओळखले. अशा वेळी आमचे रहाणे येथे असावे असे आमचे मत होते. पण नाही. तेही बरे जाहले. काल इथे असतो तर काही कमी जास्त करावयाची इच्छा व्हावयाची. असे एकदां बरे वाटे. एकदा वाईट वाटे.

## मुसलमानांना दोषी ठरविण्यासाठी प्रयत्न

या प्रकारे आम्ही मुंबईस आलो. त्यांनी तर या कृत्यामुळे किती त्रास या इंग्रजास आणि या रयतेस पडला याचा एक मोठा ग्रंथच होईल. करीता त्याचे वर्णन करणे मात्र इष्ट वाटत नाही. याचा सर्व रोख ब्राह्मण जातीवर होता तो निघून मुसलमानावर जावा म्हणून आम्ही एक युक्ती योजिली. ती अशी की, एक काझी नावचे पत्र पाठवावे पण ते मुसलमानीमध्ये पाठवावे हे चांगले. पण ती भाषा जाणणारे आमच्यात कोणीही आढळेना. म्हणून इंग्रजीत पत्र पाठविले असता चालेल असा विचार करून मागे जसे राणीच्या पुतळ्याच्या वेळी आम्ही सूर्यादयाचे एडीटराकडून पत्र पाठविले तसेच आताही मुंबईचे नावे एडीटरास लिहून त्यास असे कळविले की, तुम्ही माझ्या वतीने इंग्रजीत पत्र पाठवा की, हे काम आम्ही केले आहे त्याची नकल पोलीसात असेल ते या पत्रात छापावे असे माझे मत आहे.

असे पत्र आम्ही पाठविले पण यापासून फायदा न होता उलट तोटाच झाला. या पत्रावरून ब्रुईनसाहेबांनी ताडले की, राणीचा पुतळा, वेलणकर, ही कामे ज्यांनी केली त्यांनीच हे काम केले असावे. असा अंदाज त्यांनी करून त्याप्रमाणे शोध चालविला हे आम्हास कळले. पण झाली चूक सुधारता येईना. वेलणकराचे कामी आमची मोठी चूक जाहली होती. तो आम्हाला ओळखीत होता. ते मोठे साधन यांना कळून याविषयी पोलीसाना संशय येई त्याला हे वेलणकराकडे घेऊनजाऊन खात्री करून घेत असा क्रम चालला.

## खून केल्याची कबूली

आम्ही सावधगिरीने मुंबईस तीन महिने घालविले. इतक्यांत एके दिवशी एकाएकी पोलिसाचे साधे बोलावणे आले ते गोपाळराव साठ्यासंबंधी होते. त्याच्या बोलावण्याप्रमाणे मी निघालो. त्यानी मला पुण्यास आणिले आणि ब्रुईनसाहेबाजवळ नेले. त्या ठिकाणी मी लोकहिताचा विचार करून कांही विशेष अटीवर पोलीस, पो. सु. ब्रुईन याजजवळ मी खुनाची कबूली करून त्यासंबंधी सर्व बारीक सारिक हकिगत मी मोठ्या अभिमानानी यशाकरिता सांगितले. त्याची खात्री पटण्याकरिता दुसऱ्या पुष्कळ बारिकसारीक गोष्टी मीहून कळविल्या. इतकेच नव्हे तर ते पुराव्यानिशी सिद्‌ध करून दिले. राणीचे तोंड काळे करण्याबद्‌दल वागळे यांचे जोडे असल्याबद्‌दल खात्री करून दिली. वेलणकरांबद्‌दल त्यांची समक्ष रुजवात करून दिली. मुंबईस ह्या मिल्टन साहेबापुढे जबानी दिली. त्यावर मी सही केली. प्रथमतः हे कृत्य मी एकट्यानेच केले असे मी पोलिसास कळविले पण ते माझे बोलणे हत्याऱ्याच्या गळ्यांत पागोटे आणि नाडी निघाल्यामुळे परत घेणे भाग पडले. दुसरा कोणीतरी यात असावा असा मंडळीचा ग्रह झाला. करिता मी भावाचे नाव सांगून त्यालाही या यशाचे वाटेकरी केले. या कृत्यात सर्व पुरावा मीच दिला या नंतर पोलिस ब्रुईन या उभय साहेबांची माझी बोलाचाली झाल्यावरून मी फार दिवसापासूनचा माझ्या अंगी खिळलेला इंग्रजीविषयी द्‌वेष विसरून गेलो. त्यानी माझ्या विषयींचा सत्यपणा अदचापपर्यंत दाखवला. तसाच तो पुढेही परिणामपर दाखवेल असे मी परमेश्वराजवळ मागतो.

# परिशिष्ट

## वडिलांना लिहिलेले पत्र

श्रीगजानन प्रसन्न ता. १२-१०-९७

वडील मातोश्री याचे चरणी दामोदराचे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.

ईश इच्छेने प्राप्त जाहलेल्या स्थितीत मी आनंदात आहे. त्यांतून वडील मातुश्रीचे कृपेकरून याठिकाणी माझे मित्र ब्रुईन व केनेडी यांनी जी माझी उत्तम व्यवस्था ठेविली आहे ती पाहून मी अगदी शत्रूभाव विसरून गेलो आहे. अर्थात मला राजकीय कैदी समजून खायला, प्यायला, ल्यायला या तीन गोष्टींत कोणत्याही प्रकारची आडकाठी नाही. वाटेल त्याला भेटावयाची परवानगी आहे. दुफारी बाहेर फिरावयास जातो. त्यावेळी आप्तइष्ट मित्रास भेटतो. माझा देवधर्म सोवळेओवळे ही उत्तम प्रकारे पाळली जातात. तेणेकरून मला कोणत्या प्रकारचे दु:ख वाटत नाही. आता आपला उभयता वडील मातुश्रीचा वियोग जाहला खरा पण त्यास उपाय नाही. आजपर्यंत आपण उभयतानी आम्हास पुष्कळ प्रकारे करून बोध केला. परंतु आम्हास रुचला नाही. व अजूनही आम्ही केले हे वाईट केले असे आम्हास वाटत नाही. इतकेच नाही तर पुढे फासावर जातानासुद्धा वाईट वाटणार नाही याविषयी आम्ही पदर पसरून माफी मागतो. आम्ही ज्यावेळी भयंकर कृत्यास हात घालीत होतो. त्यावेळी ही पुढील भावी स्थिती मनांत येत असे नाही असे नाही. पण त्याची पर्वा करीत नव्हतो व आताही आम्ही करीत नाही. लग्न समारंभात निघालेल्या मिरवणुकीपेक्षा आम्ही या अंतकालच्या मिरवणुकीस जास्त महत्त्व देतो. यावरून आमचा कल वडिलांच्या ध्यानात येईलच. यापूर्वी अनेक कारणामुळे वडिलास खुलासा कळविणे झाले नाही. म्हणून याठिकाणी जरा जास्त लिहिले आहे. याबद्दल खात्री असावी. परवा मी मुंबईस ज्यावेळी आलो त्यावेळी माझा विचार नव्हता की, आपली भेट घ्यावी. कारण यावेळेस जितका निकट संबंध ठेवावा तितका तुमचा प्रेमवृद्धिगत व्हावयाचा संभव आहे असे समजून भेट घेण्यास तयार नव्हतो. पण ब्रुईनसाहेब यांच्या अत्याग्रहावर मी त्यांना सांगितले की, त्यांना पोलिस चौकीत न आणता वागळे यांचे घरी आणावे आणि त्या ठिकाणी भेटू. त्याप्रमाणे त्यांनी तो योग जुळवून आणिला. त्या भेटीत मजकडून अमर्यादा जाहल्याचा आपल्यास भास जाहला असेल असे आता मला वाटते. म्हणोन हे पत्र पाठवून कळवितो व.। मी तेथे आल्यावर सर्व प्रकार पाहिला. येताक्षणीच गंगीने अण्णा म्हणून वारंवार मारलेल्या हाकाही ऐकिल्या. मी वडिलांचा सद्‌गदित झालेला चेहराही पाहिला. मी मातोश्रीची माझ्या विरहाने अशक्त झालेली मूर्तीही पाहिली. तसेच इतर सर्व लहानथोर मंडळीचे मजकरिता रडवे व केविलवाणे चेहरे पाहिले.

पण तो समय मोहजालांत पाडण्याचा असल्यामुळे मी तिकडे मोठ्या कष्टाने दुर्लक्ष केले. आता उभयतांनी चिरंजीव वासुदेवाकडे पाहून दिवस आनंदात न्यावे. चिरंजीव बाळकृष्णाने मोठा अविचार केला. वासुदेवाचे लहान वय मनांत न आणिता त्याचा उगाच घेऊन गेला. याविषयी मला फार दु:ख होते परमेश्वर त्याला सद्‌बुद्धि देवो आणि वासुदेवास घरी येऊन तो माझ्या दु:खाचा

वाटेकरी होण्यास मला भेटावयास येवो. म्हणजे आम्हाला तुमची काळजी उरणार नाही. मी रँडसाहेबाचे मारण्याचे स्तुत्य कृत्य आम्ही दोघानी केल्याचे साफ, कबूल केले आहे. तेव्हा देशोदेश भटकून त्यास ही खरी हकिकत जर ज्यास समजेल तर खात्रीने तो मला येऊन भेटेल. आम्ही आपल्या पोटी जन्म घेऊन आपल्या किंचितही उपयोगी पडलो नाही. उलट क्लेश मात्र दिले. याविषयी आम्ही उभय बंधु तुमची क्षणोक्षणी माफी मागतो. प्रस्तुत आम्हाला या जगांत एक परमेश्वर किंवा आपण वडील मातुश्री याखेरीज कोणालाही ओळखत नाही. साम्राज्यलक्ष्मीस लाविलेला अक्षई डाग या गोष्टीची चांगली साक्ष देत आहे. सरतेशेवटी मी सर्व श्रोते मंडळीची प्रार्थना करतो, आम्ही तर पोटी जन्म घेऊनही वडिलांस सौख्य दिले नाही. तुम्ही मात्र वारंवार समाजात वडील मातुश्रीचा सांभाळ आजपर्यंत करीत आला तशीच सद्बुद्धी परमेश्वर तुम्हास पुढे देवो. असीही आम्ही परमेश्वराजवळ प्रार्थना करीतो. राहिल्या मंडळीस आमचे विचारणे कळवावे. ती. मातुश्री आदीकरून मंडळीचे शांतवन सर्व विवेकेकरून करण्यास वडील समर्थ आहेत. आता एकदा भेटलो काय आणि पुष्कळदा भेटलो काय शोकास कारण होणार आहे. म्हणून मीं कोणालाही पुण्यास येण्याची तकलीप देत नाही. मात्र विश्वनाथ लक्ष्मण पतंगे यांस पाठविण्याची योजना व्हावी म्हणजे मला कांही खासगी गोष्टीत त्यांचा सल्ला घेणे आहे. ती इच्छा पूर्ण होईल. अखेर परमेश्वराजवळ मी एवढेच मागतो की, जन्मोजन्मी असे मातापितर बंधु-भगिनी आदिकरण मंडळीची अशीच जोड मिळून आमचा स्वधर्माचे ठिकाणी असलेली भक्तीही अशीच राहून वडिलांच्या पुण्यप्रतापाने उत्तरोत्तर चढत्या प्रमाणावर असो. ती. नानास फार फार नमस्कार कळवून समग्री जाहलेल्या उपराधीची क्षमा कर म्हणावे. याहून जास्त काय लिहू.

परमेश्वर आम्हास इष्टगती देवो.

माझी स्तोत्रपाठाची पोथी साहेबाबरोबर पाठवून देणे.

आपला—दामोदर हरी चापेकर



# नरसिंह चिंतामण केळकर

जन्मः २४-८-१८७२, मृत्यूः १४-१०-१९४७.

**जन्म पंढरपूर तालुक्यातील मोर्डानिब या गावी.**

माध्यमिक शिक्षण मिरज येथे. १८९१ साली पदवीधर. १८९४ साली एल्. एल्. बी. सातारा येथे काही महिने वकीली. नंतर पुण्यास लो. टिळकांचे मदतनीस म्हणून दाखल झाले. लॉ क्लास आणि 'मराठा' पत्राचे संपादकत्व त्यांच्यावर सोपविण्यात आले. १८९७ साली टिळकांना शिक्षा झाली तेव्हा 'केसरी' आणि 'मराठा' यांचे संपादकत्व त्यांच्याकडे आले. १९१० ते १९१८ आणि १९२० ते १९३१ पर्यंत केसरीचे संपादकत्व त्यांच्याकडे होते. पुणे सार्वजनिक सभेने दुष्काळासंबंधी फॅमिन कोड अंमलात आणून शेतकऱ्याना सूट आणि माफी मिळावी यासाठी चळवळ सुरू केली त्यात भाग घेतला.

१९१८ साली पुणे नगरपालिकेत प्रवेश. १९१८ ते १९२४ पर्यंत नगरपालिकेचे अध्यक्ष. १९१६ साली बेळगाव परिषदेत कॉंग्रेसमध्ये शिरण्याचा ठराव मंजूर झाला व केळकरांना कॉंग्रेसचे सेक्रेटरी म्हणून निवडण्यात आले. होमरुलच्या शिष्टमंडळाचे

सचिवपद त्यांना देण्यात आले. टिळकांनंतर गांधींच्या असहकारीतेच्या चळवळीत यांनी भाग घेतला नाही पण कौन्सिल बहिष्काराच्या चळवळीचा पुरस्कार केला. १९२३ साली काँग्रेसमध्ये कौन्सिल प्रवेशवादी स्वराज्यपक्ष निघाला. या पक्षाचे ते अध्यक्ष. कायदे मंडळाच्या निवडणुकीत प्रचंड बहुमताने निवडून आले. त्यानंतर स्वराज्य पक्षातून फुटून हे प्रतिसहकार पक्षात सामील झाले आणि या पक्षातर्फे ते १९२७ साली कायदेमंडळावर निवडून आले. १९२७ साली त्यांनी टिळकचरित्र लिहिले. राजकारण आणि समाजकारण यात व्यग्र असूनही त्यांनी कथा, कादंबरी, नाटक आणि वैचारिक स्वरूपाचे विपुल लेखन केले.

साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले पण महाराष्ट्राच्या अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक उत्सवांचे अध्यक्षपद त्यांनी गाजवले. एक सव्यसाची चतुरस्र लेखक, थोर पत्रकार, देशप्रेमी, राजकारणी या नात्यानी त्यांनी महाराष्ट्राचे राजकीय आणि सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन समृद्ध केले. त्यांच्या 'गतगोष्टी' या आत्मवृत्तातील हा उतारा.

## लोकमान्यांच्या सान्निध्यात

नरसिंह चिंतामण केळकर

१८९७ सालातील राजद्रोहाचे खटले झाल्यावर सरकारने वर्तमानपत्रां-संबंधाने एक नवे धोरण योजून पाहिले. ते म्हटले म्हणजे 'प्रेस कमिटचा' नावाची मंडळे नेमून त्यांच्याद्वारे वर्तमानपत्रात कोठे काय येते हे दक्षतेने माहीत करून घेण्याचे. या मंडळांवर काही सरकार अधिकारी व काही सरकारच्या विश्वासातले खासगी गृहस्थही नेमण्यात येत. वर्तमानपत्रे बारीक दृष्टीने वाचून त्यात आक्षेपार्ह मजकूर दिसेल तो डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यास कळविण्याचे काम त्यांच्या गळचात घालून दिले होते. हा मजकूर लक्षात आल्यावर पुढे मार्ग दोन. एक खटला करणे व दुसरा संपादकाला समक्ष बोलावून त्याच्याशी संभाषण करणे. या संभाषणात फिरून दोन प्रकार असत. संपादक सामान्य व लेचापेचा आढळला तर त्याला जरब देऊन वाटेस लावणे; व तो बरोबरीच्या नात्याने बोलणारा भेटला तर त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करणे. टिळकांच्या खटल्यानंतर मजकडे दीड वर्षावर संपादकत्व होते. त्यात असे प्रसंग चार-दोन आले. पण मजवर खटलाच करावा इतका, म्हणजे टिळकांइतका, मी सरकाराला त्रासदायक झालो नव्हतो. हा एक तरुण मुलगा कडक लिहीत असेल तर नवशिकेपणाच्या भरात असे लिहींत असेल असे समजून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडून मला संभाषणाकरिता निमंत्रण पाठविले जाई.

या अवधीत अशा रीतीने बोन्स, शेपर्ड, लँब या कलेक्टरांनी व कमिशन वुडबर्न यांनी मला भेटीला बोलाविले.

मेमध्ये तेव्हाचे कलेक्टर लँबसाहेब यांच्याशी असाच एक प्रसंग आला. पण त्यात बरीच भानगड झाली. तारीख १३ मे रोजी लँबसाहेबांच्या निमंत्रणावरून मी त्यांच्या भेटीला गेलो. या भेटीत त्यांनी मराठचातील काही लेखांसंबंधाने मला खुलासा विचारला, व मुंबईसरकारच्या हुकुमावरूनच मी हा खुलासा मागत आहे असे ते मला म्हणाले. मला समक्ष तोंडी काय खुलासा देता आला तो मी दिलाच. पण घरी आल्यावर मी त्यांना पत्र लिहून विचारले की, "तुम्ही माझा खुलासा तोंडी घेतला तो सरकारकडे पाठविणार असाल. परंतु मला असे वाटते

की, सरकारकडून तुम्हाला आलेल्या पत्राची एक प्रत तुम्ही मजकडे पाठवा. मी त्यावर लेखी खुलासाच तुम्हाकडे पाठवीन तो तुम्ही सरकाराकडे पाठवावा हे बरे.

पण मी लँबसाहेबांचा पिच्छा सोडला नाही. लगेच मी त्यांना एक पत्र लिहिले व त्याबरोबर एक मसुदा पाठविला. त्यात समक्ष भेटीत त्यांचे माझे जे बोलणे झाले त्याचा सारांश लिहून काढला होता. मी तो प्रसिद्ध करण्याची त्यांना परवानगी मागितली. कारण असे दाखविले की, "तुम्ही आम्हाला भेटीला बोलाविता ती गोष्ट बरीच आहे. कारण पुष्कळ गोष्टींचा परस्पर खुलासा समक्षच होतो. पण तुम्ही पडला मॅजिस्ट्रेट. आम्ही पडलो संपादक. तुम्ही आम्हाला भेटीला बोलाविले असे बाहेर कळल्याने तुमच्याविषयी काहीच गैरसमज होण्यासारखा नाही. पण आमच्याविषयी मात्र तर्कवितर्क सुरू होतात. कोणी म्हणतो यांना मॅजिस्ट्रेटाने तंबी दिली! कोणी म्हणतो मॅजिस्ट्रेटाजवळ काही कबुल्या देऊन आले! तेव्हा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे तुमचे आमचे झालेले भाषण सारांशरूपाने प्रसिद्ध व्हावे. तुम्ही होऊन ते करणार नाहीच पण आम्ही करू. कारण आम्हाला त्याची गरज. भाषणाचा सारांश प्रसिद्धच करणार त्याअर्थी त्यात न घडलेली गोष्ट किंवा न बोललेले शब्द अर्थातच मी लिहिणार नाही. पण सारांश छापल्यानंतर तुम्ही तो वाचावा त्यापेक्षा तो छापण्यापूर्वी तुम्हाला दाखवावा हे अधिक योग्य. म्हणून मी तो तुमच्याकडे आगाऊ पाठवीत आहे. तरी काही चूकबिक असली, तर दुरुस्त करून कागद मजकडे परत पाठवावे.'

लँबसाहेबांच्या व माझ्या संभाषणात रागाची अशी बरीच उत्तरे प्रत्युत्तरे झाली होती. ती प्रसिद्ध करण्याला माझी तयार होती पण लँबसाहेबांची नव्हती यात त्यांच्याकडे सहजच कमीपणा येत होता. याचा मी पुरा फायदा घेतला. भाषणातील एक मुद्दा असाही होता की, प्लेगच्या व्यवस्थेत ज्या सवलती एका गावी लोकांना मिळत नाहीत त्या दुसऱ्या गावी लोकांनी दंगेधोपे केले असता त्यांना मात्र मिळतात. 'मराठा' पत्रात मी हे विधान उघड केले होते. त्यावर सरकारचे म्हणणे असे की, "आम्ही सवलती देतो त्या कोणाच्या दंग्याधोप्याला भिऊन देत नाही. आम्हाला त्या योग्य वाटतात म्हणूनच देतो." या विधानासंबंधाने आमच्या संभाषणात बरीच चर्चा झाली. त्या चर्चेत लँबसाहेबांचा युक्तिवाद लटपटीत व भाषण फुकट गुर्मीचे, आणि उलट माझा युक्तिवाद भरीव, भाषणही जोराचे असे असल्यामुळे, लँबसाहेब ते प्रसिद्ध करू इच्छित नव्हते हे उघड झाले. म्हणून या विषयावर मराठ्यात एक स्वतंत्र अग्रलेखच 'The Editor and The Magistrate' या नावाखाली मी घातला, व त्यात खालीलप्रमाणे स्पष्ट लिहिले. "संभाषणप्रसिद्धीला जर बंदी, तर मला भेटायला यांनी बोलवावेच का? त्यांचे म्हणणे त्यांना पत्राने मला कळविता आले नसते

काय?/बरे, बोलावून इकडले तिकडले मराठ्यांतले पुष्कळ लेख काढून हा असा वाईट आहे तो तसा वाईट आहे असे त्यांनी सांगितले. पण त्याला मीही कशी उत्तरे दिली हे साहेब जाणतातच. ती उत्तरे किंबहुना ते सर्व संभाषण प्रसिद्ध करण्याला मी तयार असता मॅजिस्ट्रेटसाहेबांनी मात्र तयार न व्हावे हे आश्चर्य नाही काय? मॅजिस्ट्रेटनी भेटीला बोलावले आणि आम्ही संपादक लोक गेलो तरी पंचाईत. भेटीला गेलो म्हणजे त्यांनी आढ्यतेने बोलावे. पण आम्हालाही स्वाभिमान नसतो असे नाही. आम्हीही उत्तरास उत्तर देतो. मग ती छापण्याला हरकत का असावी? आम्ही लिहितो त्यात काही गुन्हा असेल तर आमच्यावर खटला करावा. पण तोंड दाबून 'खाजगी संभाषणाचा' हा बुक्क्याचा मार का?

हे प्रकरण मी असे चव्हाट्यावर आणले त्याने फारच मौज झाली. हिंदुस्थानातील बहुतेक हिंदी पत्रांनी माझा अग्रलेख आणि हा सर्व पत्रव्यवहार प्रसिद्ध केला, व सरकारी कारावाईवर सडकून टीका केली. त्याचा परिणाम बराच चांगला झाला. कोणी म्हणाले, "केळकरांनी चांगलेच धैर्य दाखविले." कोणी म्हणाले, "केळकरांनी लँबसाहेबाची अब्रू चांगलीच बाहेर काढली." 'हिंदु'पत्राने तर असे म्हटले की, "लँबसाहेबांनी केळकरांवर जो पाश टाकला त्यात स्वतः तेच बिचारे सापडले!" असो.

लँबसाहेबांच्या भेटीचा फिरून एकवेळ प्रसंग आला. त्याचे कारण ली वॉर्नरसाहेबांचे 'हिंदी नागरिक' या नांवाचे पुस्तक प्रसिद्ध झाले होते त्यावर मी बरीच टीका केली होती.पण या भेटीत ते माझ्याशी जपून बोलले. यानंतर ते लवकरच बदलून गेले. पुढे ते कमिशनर व कौन्सिल मेंबर होऊन आले असता त्यांच्या माझ्या कारणपरत्वे भेटी होत. पण पूर्वीची डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटची त्यांची उर्मटपणाची वृत्ती नव्हती.

यानंतर कमिशनर वुडबर्न यांनी मला असेच एकदा भेटीला बोलाविले. त्याचे कारण असे घडले. वायव्य सरहद्दीवरील युद्धात ब्रिटीश सैन्याला फारसे यश आले नाही याबद्दल चोहोकडे थट्टा होत होती. त्याप्रमाणे मीही मराठा पत्रात केली. भेटीतील संभाषणात त्यांनी माझी खात्री पटविण्याचा प्रयत्न केला की, इंग्रजी सैन्याचा खरोखरच जय झाला! मी म्हटले, "तो कसा?" साहेब म्हणाले, "आमचे सैन्य एका बाजूने टिऱ्हा प्रांतात शिरले व दुसऱ्या बाजूने बाहेर पडले." त्यावर मी थट्टेने विचारले की, "एका बाजूने शिरून फक्त दुसऱ्या बाजूने परत आपल्या मुलखात यावयाचे यालाच तुम्ही विजय म्हणणार की काय? मग हा प्रवास न करताच तुमच्या सैन्याला घरबसल्या आमचा जय झाला असे म्हणता आले नसते काय?" तेव्हा वुडबर्नसाहेबांना खरोखरच हसू आले व त्या विषयावरचे भाषण संपवावे म्हणून ते इतकेच म्हणाले की, "केळकर, तुम्ही

हल्ली लहान आहात. या लष्करी गोष्टींचे महत्त्व अजून तुम्हाला कळत नाही. ते पुढे कळेल."

याच भेटीत वुडबर्न साहेबांनी एक गमतीचा प्रश्न मला विचारला. त्यापूर्वी सुमारे एक वर्षभर मी प्लेग-व्हॉलंटियरचे काम चांगले बजाविले होते म्हणून हरि नारायण आपटे व इतर एक दोन प्रोफेसर (मला वाटते त्यात प्रो. गोखले यांचेही नाव होते) यांच्या नावाबरोबर माझेही नाव वर सरकाराकडे कळविण्यात आले होते. ही गोष्ट मला सांगून वुडबर्न साहेबांनी औपचारिकरीत्या माझे अभिनंदन केले. पण ते मला हळून म्हणाले, "तुम्हाला एखादी पदवी देण्यासंबंधाने मी सरकारला लिहिले तर तुमची काही हरकत आहे काय? त्यावर मी म्हणालो, "नको. कृपा करून तसे काही एक करू नका." ते म्हणाले, "मग तुमच्या कामगिरीबद्दल गुणग्रहणदर्शक असे काही करावेसे सरकारला वाटले तर त्यांनी काय करावे?" हा प्रश्न ऐकून प्रथम मी थोडा गोंधळात पडलो. पण लगेच मला उत्तर सुचले. मी म्हणालो, "आम्ही लोक प्लेग-व्हॉलंटियर झालो ते गावच्या नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने. कर्तव्य म्हणून. इतर पुष्कळ लोकांनी असेच आस्थेने काम केले आहे. तेव्हा त्यांना "चांगल्या नागरिकत्वा"चे सर्टिफिकेट आपण मनाने दयालच. पुणे शहर म्युनिसिपालिटी ही मुख्यतः अशा नागरिक सभासदांचीच आहे. तेव्हा या सर्व प्लेग-व्हॉलंटियरांचे गुण सरकार घेते हे त्यांना दाखवावयाचे तर शहर म्युनिसिपालिटीवरील प्लेगच्या खर्चाचा बोजा सरकारने कमी करावा व म्युनिसिपालिटीवर असलेल्या सरकारनियुक्त सभासदांची संख्या पूर्वीइतकीच ठेवावी. ती आठांनी वाढविणार असे म्हणतात तर वाढवू नये." माझ्या या उत्तराने वुडबर्नसाहेबांना आश्चर्य वाटले ते त्यांना गुप्त ठेवता आले नाही. त्याचे कारण उघडच असे होते की, इतर कित्येक गृहस्थांनी आमच्यासारखेच प्लेग-व्हॉलंटियरचे काम केले होते, पण त्याकरिता रावबहादुरी किंवा रावसाहेबी उघडपणे मागून केलेले अनेक अर्ज कमिशनरच्या टेबलावर पडले होते. म्हणून त्यांचे नेटिव्ह असिस्टंट, बाबासाहेब पेंडसे, यांच्याजवळ वुडबर्नसाहेब मागाहून म्हणाले की, "केळकरांनी माझ्या एका प्रश्नाला अपेक्षेबाहेर उत्तर दिले."

याच सुमारास नवीन 'काळ' पत्राचे संपादक शिवरामपंत परांजपे यांच्याही लेखाकडे प्रेस-कमिटी व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांचे लक्ष गेले. युरोपियन लोक देशी लोकांना छळतात मारतात हा नेहमीचाच विषय परांजपे यांनी लिहिला होता. पण तो अर्थात् त्यांच्या पद्धतीने, म्हणजे कुत्सित विनोदपद्धतीने. ते सरळ रागावून लिहित नसत. वक्रोक्तीचा आश्रय करीत. अशाच रीतीने एका अंकात त्यांनी असे लिहिले होते की, "युरोपियन लोकांनी

हिंदी लोकांना लाथा मारल्या म्हणून काय झाले? त्यांच्या दहापाच लाथाही न सोसण्याइतके हिंदी मनुष्याने नादान कमकुवत राहावे ही काय रीत झाली?" इत्यादी इत्यादी. परांजपे यांची वक्रोक्ति एकदा सुरू झाली म्हणजे मग ती वरील पद्धतीने कशी फैलावत जात असे त्याचा परिचय मराठी वाचकवर्गाला चांगलाच आहे. परंतु सांगण्याचा मुद्दा हा की, सरळ रागाने शिव्या दिल्या व नावे ठेवली तर मनुष्य जितके चिडते त्यापेक्षा अशा वक्रोक्तीच्या म्हणजे कुत्सित विनोदाने अधिक चिडतो याचे एकप्रकारे प्रत्यंतरच मिळाले. कारण याच विषयावर मराठ्यात मी या वर्षात काही नाही तरी दहावीस वेळा स्फुटे किंवा अग्रलेख लिहिले असतील. आणि माझीच गोष्ट म्हणून मी सांगत नाही, पण तेव्हाचे ते लेख आजही वाचतांना मी यथार्थपणे असे म्हणू शकतो की ते लेख पुष्कळच कडक होते. अलीकडच्या केसरी-मराठ्यातील लेखांपेक्षा ते कमी कडक होते असे मुळीच वाटत नाही. आणि त्यांच्यावर खटले कसे झाले नाहीत याचे एकप्रकारे आश्चर्यच वाटते. ते कसेही असो. माझ्याप्रमाणे शिवरापंतांवरही प्रेस-कमिटीचा हात पडला. कमिटीचे अध्यक्ष डिस्ट्रिक्ट मॅजिस्टेट यांनी परांजपे यांना एक दिवस बोलावणे पाठविले व सरळ असे विचारले की, "या तुमच्या लेखाबद्दल माफी मागता की नाही? बोला.' पुढील आठवड्याच्या अंकात त्यांनी माफी मागताना सरकारला दोष दिला, व आपली टीका यथार्थ होती असाही युक्तिवाद केला. परंतु दिलगिरी प्रदर्शित केली, यामुळे युक्तिवादाला फारशी किंमत उरली नाही. या गोष्टीचा मराठ्यात उल्लेख करून मी फक्त इतकेच म्हटले की, "काळकर्त्यांनी माफी मागून टाकल्यामुळे त्यांचा लेख राजद्रोहाच्या कलमाखाली येतो की नाही हे पाहण्याची संधी उरली नाही." "मी लिहिले ते विनोदबुद्धीने लिहिले. त्यात त्या विषयावर इतर लोक टीका करतात त्याहून विशेष वावगे असे काही नाही. आणि प्रेस-कमिटी झाली म्हणून तिने विनोदी लिहिणे काय म्हणून वावगे मानावे? जाऊ दयाच हा वाद कोर्टापुढे" असे म्हणून, माफी न मागता, परांजपे यांनी यापुढील जबाबदारी प्रेस-कमिटीवर टाकली असती तर बरे झाले असते असा माझा रोख होता. पण कोर्टही उघड व शुद्ध रागापेक्षा कुत्सित विनोदालाच अधिक चिडते! असो. एकंदर धोरण असे दिसले की, आज प्रेस-कमिटी नेमली तिच्या अनुभवावरून सरकार पुढे मागे प्रेस-सेन्सॉरशिप स्थापण्याचा विचार करीत असावे. परांजपे यांनी माफी मागितली याबद्दल पुष्कळांना खेद झाला व त्यांच्या विनोदप्रियेतला थोडा कमीपणा आला.

आपण तुरुंगात असतानाही बाहेर आपली वर्तमानपत्रे कशी काय चालली आहेत याची चौकशी टिळक अर्थात् करीत. घरच्या खुशालीचा मामुली प्रश्न होताच, धोंडोपंताना त्यांचा पुढचा प्रश्न वर्तमानपत्रांसंबंधाचा असे. शिक्षेनंतर

हरिपंत गोखले यांनी वर्तमानपत्र छापण्याचे नाकारले तेव्हा, पुढील आठवड्याच्या अंकास वेळ थोडा उरल्यामुळे, स्वतः सुचेल ती व्यवस्था करूनच विद्वांस टिळकांच्या भेटीस गेले; व विठ्ठल छापखान्यात पत्रे छापविण्याची व्यवस्था केल्याचे त्यांना मागाहून टिळकांना कळविता आले. पण वर्तमानपत्रे छापविण्याच्या कामी त्यांची सल्लामसलत घेण्याचा प्रसंग थोड्याच दिवसात फिरून दुर्दैवाने आला.

सोमवार ता. १४ मार्च, १८९८ रोजी दुपारी चार वाजण्याचे सुमारास विठ्ठल छापखाना ज्यात होता त्या फडक्याच्या वाड्यास आग लागली. आग रात्री नऊ वाजेपर्यंत जोरात होती. वाड्याच्या मागील चौक व देवालय याखेरीज सर्व इमारत जळून खाक झाली. पुढील चौकात तळमजल्यावर शेठ गोकुळदास यांचा लाकडी सामानाचा कारखाना असून त्याच्याच दुमजल्यावर विठ्ठल छापखाना होता. या दोन्ही कारखान्यांतील बहुतेक सर्व माल जळाला. गोकुळदास यांच्या काही खुर्च्या वगैरे थोडे सामान बाहेर काढता आले. पण विठ्ठल छापखान्याचा एक टाईप किंवा कागदाचा तुकडाही आगीच्या तडाख्यात राहिला नाही, आग लागली त्या वेळी केसरीची बाहेरची, म्हणजे जाहिरातीची, बाजू तयार होत होती व आतील मजकुराची प्रुफेही तयार झाली होती. मात्र सर्व छापखाना जळाल्याने फिरून पहिल्यापासून वर्तमानपत्राची तयारी करावी लागली. पण या वेळी जगद्धितेच्छु छापखाना उपयोगी पडला, व ता. १५ मार्चचा केसरीचा अंक निम्मा, म्हणजे दहा कॉलमच का होईना, रातोरात काढून दुसरे दिवशी नेहमीप्रमाणे वाटता आला. केसरीच्या सबंध अठ्ठावन वर्षात निम्मा निघालेला असा हा एकच अंक होय. पण तेव्हा आगीची हकीकत वाचून वाचकांना सहानुभूतीमुळे हा निम्मा अंकच सबंध अंकाहूनही थोर वाटला.

जगद्धितेच्छु छापखान्याने वेळेवर मदत करून बाजू सावरली हे खरे; पण केसरी कायम छापून देण्यास त्याचेही मालक तयार नव्हते. घरचा आर्यभूषण छापखाना कबूल होईना, मग परक्या छापखान्याला दोष कसा दयावा? जगद्धितेच्छुने आणखी चारदोन आठवडे सवलत देण्याचे कबूल केले, पण कायमची व्यवस्था म्हणून काहीतरी करावयास पाहिजेच होती. याकरिता धोंडोपंतांनी टिळकांची गाठ घेतली. पण आगीचे वर्णन मुंबई टाईम्स वगैरे पत्रांतून पूर्वी आले असल्यामुळे जेल सुपरिंटेंडेंट यांच्या नजरेस ती बातमी पडली होती व त्यांनी ती टिळकांना मुद्दाम कळविलीही होती. धोंडोपंत दिसताच 'आपला छापखाना तर जळाला, पुढे काय व्यवस्था करतोस?' हा पहिलाच सवाल टिळकांनी आपण होऊन केलेला पाहून धोंडोपंतांस बरेच वाटले. कारण तुरुंगातल्या माणसाला भेटून नवीन संकटाची बातमी आपण होऊन सांगणे ही

गोष्ट कोणासही अप्रियच वाटणार. पण टिळकांनी याविषयी पूर्वीच मनात योजना करून ठेवली होती. आर्यभूषण छापखान्याचे एक मालक हरिपंत गोखले असले तरी दुसरे एक मालक कै. प्रो. वासुदेवराव केळकर हे होते. त्यांचा वारसा त्यांच्या मुलाकडे आला होता; व तो अज्ञान म्हणून त्याची व्यवस्था केळकरांचे मामेभाऊ व टिळकांचे स्नेही नारायणराव फाटक मुन्सफ हे पहात होते. म्हणून टिळकांनी फाटकांस पत्र देऊन "मी परत येईपर्यंत केसरी मराठा पत्रे छापून दया" असे त्यात लिहिले. आणि फाटक यांनीही टिळकांचे पत्र पहाताच 'पत्रे छापून देतो काळजी करू नका' असे टिळकांस आश्वासन देण्यास धोंडोपंतांना सांगितले. त्याप्रमाणे केसरी फिरून ता. १९ एप्रिल १८९८ पासून आर्यभूषण छापखान्यांत छापण्यास सुरवात झाली. ही हकीकत टिळकांस कळल्यावर त्यांना पुष्कळच समाधान वाटले.

तुरुंगाचे सुपरिंटेंडेंट सॉलोमन हे यापुढे लौकरच विलायतेस गेले. जाताना त्यांनी टिळकांची मुद्दाम गाठ घेतली, व 'मी येथून कायमचा जात आहे तसे तुम्हीही लवकरच येथून सुटून घरी परत जाल' असे टिळकांस सांगितले. त्यांच्या मागून कर्नल जॅक्सन आय्. एम्. एस्. हे सुपरिंटेंडेट होऊन आले. त्यांनी टिळकांचे जेवणखाण, काम, दिवाबत्ती, पुस्तके वगैरेमध्ये फारशी ढवळाढवळ केली नाही. पण त्यांच्या मनाचा हलकेपणा किरकोळ गोष्टीतही दिसून येत होता. याचे एक उदाहरण पूर्वी दिलेच आहे. दुसरे उदारहरण असे की, टिळकांना पायात जोडा घालण्याची परवानगी मिळाल्यामुळे त्यांनी नवीन जोडा मागितला व तो पाठविण्यात आला. परंतु तो फार लालभडकच दिसतो, असला जोडा तुरुंगात खपणार नाही, असे म्हणून त्यांनी जोडयाला मुद्दाम काळा रंग देऊन तो टिळकांचे स्वाधीन केला!

टिळकांच्या सुटकेचा पहिला म्हणजे फेब्रुवारीतील प्रयत्न फुकट गेला. पण त्यांच्या शिक्षेचे पहिले वर्ष संपण्याचे जसजसे जवळ आले तसतसे त्यात यश आले. सुटका मुदतीआधी व्हावी तर टिळकांनी अर्ज करावा ही सरकारची अट सहजच भागण्यासारखी होती, व अर्ज करून टिळकांनी ती भागविलीही. पण सुटकेच्या अटी काय याचा खल पुष्कळ दिवस चालला होता. टिळकांनी अर्जात फक्त इतकेच लिहिले होते की, मला शिक्षा झाल्यावर पुष्कळ गोष्टी उघडकीस आल्या आहेत. आणि खुनाचा व माझ्या लेखांचा काही संबंध नाही. म्हणून मला मोकळा करा. पण साधल्यास यात कायमचा हात साधून घ्यावा या हेतूने राजकारणात न पडण्याची अट सरकार टिळकांवर घालू पहात होते. दुसरी अट सुटकेप्रीत्यर्थ झालेल्या सत्कारसमारंभात भाग न घेण्याची. पण ही गोष्ट टिळकांनी तेव्हाच मान्य केली. "मी मानाकरिता हपापलेला नाही तेव्हा सत्कारसमारंभ सोडून देण्यात मला काहीच कठिण वाटत नाही" असे ते म्हणाले. पण पहिली अट त्यांस

मुळीच मान्य होण्यासारखी नव्हती, व या मतभेदामुळे सुटकेच्या प्रश्नाला तोंड लागेना.

या खटपटींत टिळकांतर्फे त्यांचे सल्लागार दाजीसाहेब खरे व सरकारतर्फेचे मध्यस्थ ब्रुइनसाहेब यांच्या खेपा येरवडयास बऱ्याच झाल्या. ब्रुइनसाहेबांना येरवडयास जाण्याचे इतर रीतीनेही काम पडे. पण प्रत्येक खेपेस टिळकांकडे जाऊन भेटून, पूर्वीच्या घरच्या परिपाठाप्रमाणे, त्यांच्याशी गप्पागोष्टी मारण्याचा प्रघात ब्रुइनसाहेबांनी ठेवला होता. कदाचित् ब्रुइनसाहेबांच्या चलाखपणावर सरकारचा विशेष भरवंसा असल्यामुळे, चाफेकरांकडून जसा त्यांनी वाटेल तो कबुली जबाब काढून घेतला तसाच, टिळकांनाही भुरळ घालून, आपल्याला हव्या त्या अटी लिहून घेण्यात त्यांना यश मिळेल अशीही कदाचित् सरकारला आशा वाटत असावी. पण जितके ब्रुइनसाहेब पक्के होते तितके टिळकही पक्के होते. हे साहेब मायावी असतात, गोड बोलतात, अघळपघळ बोलतात, साखर पेरतात, वगैरे गोष्टींचा अनुभव टिळकांना जुनाच होता. तथापि टिळकांसमोर नाटक करण्याची ब्रुइनसाहेबांची खोड गेलेली नव्हती. एकदोन वेळ ब्रुइनसाहेबांनी अगदीच लगट केली. 'माझ्या हाती हा कागद आहे यावर तुम्ही नुसती सही करा म्हणजे मी तुम्हाला आता येथून असा घेऊन जाऊन माझ्याच गाडीतून तडक घरी पोचवितो,' असेही त्यांनी म्हणून पाहिले. पण टिळकांनी ब्रुइनसाहेबांची गाडी व स्वतःचे घर ही दोन्ही पूर्वी पाहिलेलीच होती! ते असल्या झुकांडीने फसणारे नव्हते.

अखेर सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात ही कारवाई फळाला आली. टिळकांना काय कबूल आहे व काय कबूल नाही याचा विचार न करता, मुंबई सरकारने स्वतःच्या अटी घालून टिळक त्यावर सही करतील तर त्यांना सोडावे असा ठराव तर काढला. पण टिळक त्या मान्य करीत नाहीत असे नक्की वाटल्यावर सरकारलाही आपल्या ठरावाची दुरुस्ती करावी असे वाटू लागले. इतरही अनेक गोष्टी घडून आल्या त्यावरून सरकारचे मन त्याचे त्याला खाऊ लागले होते. पार्लमेंटमध्ये लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन् (हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी) यांजवर मधूनमधून प्रश्नांची सरबत्ती होत होती. व ते जी उत्तरे देत त्या त्यात सरकारच्या गुर्मीचा काटा थोडाथोडा मागे जात आहे असे दिसून येऊ लागले होते. स्ट्राचीसाहेबांच्या अर्थासंबंधाने सरकारास जी पूर्वी कधी शंका नव्हती तीही त्याला आता हळुहळू येऊ लागल्याचा भास झाला. मुंबई कायदेकौन्सिलच्या सप्टेंबरांतील बैठकीत पुण्यांतील प्लेग-व्यवस्थेवर काही सभासदांनी टीकेची पुष्कळच झोड उठविली. तिला उत्तर देताना सरकारने प्लेग अमदानींतील पुष्कळशा चुका प्रांजलपणे कबूल केल्या, व अखेर पुण्यावरील जादा पोलिस उठविल्याचे जाहीर केले. ब्राह्मणी पुणे वाईट, पुणे वाईट, असे म्हणता म्हणता

स्वतःच्या बकाली मुंबईचाच अनुभव त्यांना असा आला की, प्लेगचे दुःखनिवारण करण्याकरिता झाले तरी अधिकाराचा जुलूम करण्याला काही सीमा असलीच पाहिजे. मुंबईस प्लेगच्या जुलमामुळे मोठमोठे दंगे झाले. खुद्द युरोपियन डॉक्टर व अधिकारी यांना आपल्यावर केव्हा कोण हात टाकील याचा नियम नाही अशी दहशत पडली. या इलाख्यात सिन्नर वगैरे ठिकाणी, पंजाबांत भारशंकर येथे व इतर अनेक ठिकाणी दंगेधोपे झाल्याने, पुणे वाईट तरी पुष्कळ बरे असे सरकारास कबूल करावे लागले. खुनाकरिता म्हणून पुण्यावर जादा पोलिस बसविले म्हणावे तर खुनाच्या कटाचा संशय केव्हाच पार उडाला होता. मग जादा पोलिस ठेवण्याचे कारण काय? पण ते उठविले म्हणजे मग टिळकांना तरी तुरुंगांत का ठेवावयाचे? असा प्रश्न आपोआप उत्पन्न झालाच. त्या सालच्या मे महिन्यात पोलिटिकल एजंट क्रोसाहेब यांनी पुण्यातील लोकांच्या सहिष्णुतेला जाहीर सर्टिफिकेट दिले; व असेही सांगितले की, 'चाफेकराचा खटला मजपुढे चालू होता तेव्हा मी अगदी लक्ष घालून बारीक नजरेने पाहत होतो, पण कटाचा असा मागमूस मला कोठे यत्किंचितही दिसला नाही.' क्रोसाहेबांच्या या भाषणाने पूर्वीचे लँबसाहेबांचे पुण्याची बदनामी करणारे भाषण परस्पर उडून गेले. त्यामुळे जादा पोलिसांचा खर्च पुण्यावर चालू ठेवणे हे तर सर्वस्वी अयोग्य असेच ठरले, तथापि पुढचे नुकसान बचावले तरी मागच्याची वाट काय? व या प्रश्नाला उत्तर म्हणून 'तुमचे टिळक कैदेतून सोडतो म्हणजे तुम्हाला हवी ती भरपाई मिळाली की नाही' असा उत्तरार्थक प्रश्न सरकारने पुणेकरांना कृतीनेच विचारण्याचे ठरविले असावे.

अखेर शनिवार ता. ३ सप्टेंबर रोजी टिळकांच्या सुटकेचा प्रयत्न नेटाला लागला. मि. ब्रुइन यांनी मुंबईचे पोलिस कमिशनर मि. व्हिन्सेंट यांना सांकेतिक शब्दांनी तार देऊन, दाजीसाहेब खरे यांस पाठवून दया म्हणून सांगितले. व्हिन्सेंट हे त्या दिवशी खंडाळ्यास गेल्यामुळे त्यांना रविवारी ती तार तेथे पोचली. त्याच पावली ते मुंबईस परत गेले; व अपरात्री आंग्रे यांच्या वाडीत जाऊन दाजीसाहेब खरे यांना निजलेले उठवून पुण्यास ताबडतोब जाण्याचे वचन त्यांनी खरे यांजपासून घेतले. सोमवारी दाजीसाहेब दोन प्रहरी एक वाजण्याचे सुमारास पुणे स्टेशनावर आले तो ब्रुइनसाहेबांचा मनुष्य तेथे हजर होता; त्याने खरे यांस गावात येऊ न देता तसेच परस्पर ब्रुइनसाहेबांच्या बंगल्यावर नेले. मग उभयता मिळून येरवड्यास गेले. टिळकांसमक्ष सरकारी अटींची फिरून चर्चा झाली. तेव्हा खरे यांनीही आपले मत म्हणून असे सांगितले की, 'पुढे राजकारणात न पडण्याची अट इतकी वाईट आहे की ती मान्य करण्यास मी टिळकांना कधीच सल्ला देणार नाही." शेवटी टिळक व खरे यांच्या विचारे एक नवी अट अशी सुचविण्यात आली की, फिरून टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन जर गुन्हा

शाबीत झाला तर, आधी सुटका झाल्याने शिल्लक उरलेली सहा महिन्यांची शिक्षा टिळकांनी तेव्हा पुरी भोगून दयावी. ब्रुइनसाहेबांनाही हे म्हणणे संयुक्तिक दिसले. पण ते त्यांना आपल्या अखत्यारीत मान्य करता येईना. म्हणून खरे व ब्रुइन दोघेही कोणताच निकाल तेथे न लावता परत आले. खरे यांनी पुणे शहरात येऊन टिळकांच्या घरी आम्हा मंडळीस दोन दिवसात झालेली हकीकत खासगी रीतीने सांगितली, व सोमवारी रात्रीच्या गाडीने ते मुंबईस परत जाण्यास निघाले तो स्टेशनावर ब्रुइनसाहेब फिरून हजरच. ते खऱ्यांना म्हणाले "टिळकांच्या सुटकेविषयी मी अदयाप निराश झालो नाही व यासंबंधी तुमचेही काम अजून संपले नाही. उदया मुंबई सरकारचा ठराव शक्य तर बदलून घेण्याचा प्रयत्न होणार आहे. तुम्ही परत फिरा." त्यावरून खरे गावात परत आले. मात्र खरे यांनी ब्रुइनसाहेबांशी बोलताना परत जाण्याविषयी एकच अट घातली होती ती अशी की, मुंबई सरकारचा ठराव हाती पडण्यास संध्याकाळ झाली तरी, तुरुंगाच्या नियमांची सबब न सांगता, रातोरात टिळकांस सोडले पाहिजे. 'मला रहा म्हणता तर मी उदया टिळकांना आपल्या हाताने नेऊन घरी पोचवू शकेन असे तरी करा. नाही तर मी राहणार नाही.' सरकारी ठराव झाल्यावर पुढची गोष्ट सोपी होती म्हणून ब्रुइनसाहेबांनी ती मान्य केली.

दुसरे दिवशी (मंगळवार ता. ६ सप्टेंबर) गव्हर्नरच्या कौन्सिलपुढे टिळकांच्या सुटकेच्या प्रश्न निघून बहुतेक सर्व वेळ वाटाघाटीत गेला. अखेर रात्री ८ वाजता ठरलेल्या शर्तीप्रमाणेच टिळकांच्या सुटकेचा ठराव घेऊन, ब्रुइन व खरे हे येरवडयास गेले. तेथे नवीन अटीवर टिळकांची सही झाली, व लगेच टिळकांची सुटका होऊन ते व खरे मिळून रात्री १०॥ वाजण्याचे सुमारास विंचुरकरांचे वाडयात पोचले. अशा रीतीने बरोबर ५१ आठवडे पक्की सक्तमजुरीची कैद भोगून टिळक परत घरी आले. "शिक्षा झाली तीही मंगळवारी व सुटका झाली तीही मंगळवारी! योगायोग कसा तो पहा!" असे म्हणून पुष्कळ भोळ्या माणसांनी मनाच्या शकुनवंतीला गंधाक्षता वाहिल्या. पण आठवडयाचा प्रत्येक वार दर साता दिवसांनी हटकून येत असल्यामुळे, जगात घडणाऱ्या गोष्टीपैकी एक सप्तमांश गोष्टींना या योगायोगाचा लाभ हटकून मिळतच असतो?

हा हा म्हणता टिळकांच्या सुटकेची बातमी पुणे शहरातच काय पण सर्व हिंदुस्थानभर तारेने पसरली, व दुसरे दिवशी दोनप्रहरपासून अभिनंदनपर तारा व पत्रे येऊन पडण्यास सुरुवात झाली. आपल्या गावी येण्याविषयीची कित्येक निमंत्रणे त्यांतच होती. टिळकांनी त्या सर्वांचे केसरीच्या द्वारे आभार मानले. काही दिवस घरी विश्रांती घेतल्याशिवाय त्यांना बाहेर पडणे शक्यच नव्हते, तथापि टिळकांनी वाडयात पाऊल ठेवल्यापासून त्यांना भेटण्यास येणाऱ्या

लोकांची जी रीघ लागली ती मात्र कोणासही थांबवेना. त्या व दुसरे दिवशी टिळकांना भेटण्याला दहा हजार मनुष्य गेले असावे असा अंदाज मुंबईच्या दैनिक इंग्रजी पत्रात दिला होता. दुसरे दिवशी पुण्यातील काही देवळात दीपोत्सव करण्यात आला. सरदार खाजगीवाले यांनी यंदाच्या गणपती उत्सवात आपला गणपती विसर्जन न करता टिळकांच्या सुटकेकरिता म्हणून राखून ठेविला होता. त्याचाही विसर्जन समारभ चार दिवसांनी थाटाने करण्यात आला. पुढे क्रमाक्रमाने टिळकांच्या प्रतिपक्षांतील गोखलेप्रभृति मंडळीही त्यांना सवडीने येऊन भेटून गेली. टिळकांकडून त्यांच्यासंबंधी तुरुंगांतील काही माहिती किंवा त्यांच्या पुढील हालचाली व विचार यांजविषयी माहिती मिळविण्याकरिताही वर्तमानपत्रे वगैरेंकडून अनेक कुशल बातमीदार आले होते. पण टिळकांनी बहुतेकांची निराशा नाईलाजाने केली. तरी पण पुष्कळांनी काही ऐकीव, काही काल्पनिक, काही अनधिकृत अशा बातम्यांच्या कोंड्यामांड्याची भाकर, वर फोडणी घालून, वाचकांस खावयास दिली. कित्येकांनी ऐकीव माहितीच्या चारदोन काड्यांतून खंडोबा उभा केला होता. पण कोणतेही विकृत शब्द किंवा विचार आपणावर व्यर्थ लादले जावे हे बरे नाही, म्हणून टिळकांना केसरीद्वारा असे जाहीर करावे लागले की, एका सुधारक पत्राखेरीज इतर कोठेही प्रसिद्ध झालेले माझे संवाद किंवा विचार कोणी खरे मानू नयेत. टिळकांच्या सुटकेला उद्देशून हरएक प्रकारचे समारंभ अनेक ठिकाणी झाले, पण त्या समारंभात स्वतः टिळकांना हजर रहावयाचे नव्हते अगर अप्रत्यक्ष रीतीने भागही घ्यावयाचा नव्हता. यामुळे त्यांतील काहींचे स्वारस्य सहजच कमी झाले, व टिळक हजर राहते तर जे इतर काही समारंभ झाले असते ते या कारणाकरिता मुळी झालेच नाहीत.

१८९८ च्या डिसेंबरामध्ये मद्रास येथे राष्ट्रीय सभा भरली. तिला टिळकांच्या बरोबर मीही गेलो होतो. उमरावतीच्या राष्ट्रीय सभेत टिळकांचे नाव उच्चारून त्यांच्या अभिनंदनाचा ठराव आणू द्यावा की नाही, आणि त्यांची तसबीर काँग्रेसच्या मंडपात ठेवू द्यावी की नाही, याचा वाद होऊन दोन्ही बाबतीत प्रतिकूल निकाल झाल्याचे मागे सांगितलेच आणि आता तर या राष्ट्रीय सभेला टिळक मूर्तिमंत हजर राहणार! यामुळे एका विशिष्ट मनोवृत्तीच्या लोकांची पाचावर धारण बसली. कारण टिळकांनी राष्ट्रीय सभेला प्रतिनिधी म्हणून हजर राहू नये असे म्हणण्याचा अधिकार कोणाला होता? बरे, ते हजर असता आपणही हजर राहिलो तर त्यांच्याशी सहवास घडतो तो टळत नाही. म्हणून काही मवाळ लोक या सभेला हजरही राहिले नाहीत. जे हजर राहिले त्यांपैकी काहींनी अंतस्थ अशी कारवाई केली की "टिळकांचे जे जे हक्क म्हणून आहेत ते बजावण्याच्या आड येऊ नये, परंतु सभेत भाषण करणे ही गोष्ट काही

कोणी हक्काची समजत नाहीत. तो हक्क फक्त अध्यक्षांकडून निमंत्रण होईल त्यांचाच आहे. तेव्हा टिळकांना भाषण करण्याविषयी जबाबदार व्यवस्थापकांनी आपण होऊन विचारू नये; व विचारलेच तर ओझरते औपचारिक विचारावे. म्हणजे ते काय समजावयाचे ते समजतात!" असो. टिळकांना हे धोरण मनात हेरून, त्यांची निवडणूक 'सब्जेक्ट' कमिटीत झाली होती तरी कोणत्याही बाबतीत विशेष पुढाकार घेतला नाही व भाषणही टाळले. याच काही लोकांनी उलट उपयोग मात्र करून घेतला तो असा की, "टिळकांनी सरकाराला सहा महिनेपर्यंत कोठे भाषण करणार नाही अशी सुटकेच्या वेळी कबुली दिली म्हणून ते बोलले नाहीत.!" पण आपल्या मौनव्रतापासून असले भलतेच अनुमान निघू नये म्हणून एका वर्तमानपत्राच्या बातमीदाराने त्यांची मुलाखत घेतली असता टिळकांनी वरील गोष्टीचा स्पष्ट इन्कार केला.

पुण्याच्या एका पत्राने, टिळक मद्रास कॉंग्रेसमध्ये हजर होते. यामुळे, काही लोकांना काय वाटले याची कल्पना देण्याकरिता, टिळकांना A skeleton at the feast अशी उपमा दिली. या म्हणीचा अर्थ प्रसिद्धच आहे. "मेजवानी सुरू आहे. लोक रंगांत आले आहेत. आणि बबर्जीने पक्वान्न किंवा मदचाच्या सुरया काढून घेण्याकरिता कपाट उघडावे तो आत एखादया मृत मनुष्याच्या हाडांचा सापळा अवचित दृष्टीस पडावा" असा हा या म्हणीचा अर्थ आहे. पण हा दाखला इतका ग्राम्य व बीभत्स आहे की, तो दिल्याने टिळकांचें काही एक उणे न होता, तो दाखला देणाराचीच योग्यता लोकांना दिसून आली. टिळक हजर राहणार म्हणून फेरोजशहा मेथा, सेटलवाड, कामा वगैरे एकाच प्रभावळीत बसणारी काही काही मंडळी मद्रासला गेली नाहीत असे काही पत्रांनी प्रसिद्ध केले. पण या लोकांनी ते खोटे असल्याचे जाहीर करण्याचा समंजसपणा दाखविला.

टिळक मद्रासकडील प्रवासाला निघाले असता वाटभर त्यांचा सत्कार होण्याचा जो क्रम पुढे पुष्कळ वर्षे अबाधित चालू होता, त्याला हचा मद्रासच्या प्रवासापासून सुरुवात झाली असे म्हणता येईल. माझी आठवण बरोबर असेल तर, ज्या गाडीने टिळक मद्रासला गेले त्यांच गाडीने रावबहादूर रानडे, गोपाळराव गोखले, वगैरे मंडळीही गेली. आणि या मंडळीना सोडून टिळकांच्या डब्याकडे लोकांनी धाव घेण्याचा प्रकार याही वेळी दिसून आला. रानडे, गोखले यांचाही सत्कार काही कमी झाला असे नाही. पण तो काही निवडक लोकांकडून होत असे. टिळकांकडे मात्र सर्व जनतेचा ओघ वळे. याची कारणे उघड होती.

या प्रवासात मद्रास इलाख्याची हद्द सूरू होते त्या पहिल्याच स्टेशनावर काही लोक टिळकांच्या डब्याशी आले. त्यांतला एक गृहस्थ विशेष पुढे येऊन टिळकांच्या पायाला हात लावून म्हणाला, "सर्! सर्, मी मद्रास युनिव्हर्सिटीचा

बी. ए. आहे. आपली स्वारी मद्रासला निघाली, तरी आता मद्रास इलाख्यात सुरू झालेला प्लेग हटकून नाहीसा होईल अशी माझी खात्री आहे; व ते सर्वस्वी आपल्या पायांच्या पुण्याईने." आगगाडी सुरू झाल्यावर टिळक आम्ही मंडळींकडे वळून म्हणाले, "हा पहा महाराष्ट्रीय व मद्रासी यांच्यातला फरक." कोणी एकाने विचारले, "ते कसे काय?" त्यावर टिळक म्हणाले, "प्रथम आधी महाराष्ट्रीय मनुष्य, म्हणजे पदवीधर, असा कोणाच्या पायाला हात लावून नमस्कार करावयाचा नाही. दुसरे असे की, कारण नसताना मी युनिव्हर्सिटीचा बी. ए. आहे हे सांगणार नाही. आणि तिसरे असे की, कोणी कितीही मोठा असो, त्याच्या आगमनाने त्या स्थानातला प्लेग नाहीसा होईल अशी आचरटपणाची स्तुति महाराष्ट्रीय पदवीधर कोणाची करणार नाही. त्याला इंग्रजी चांगले बोलता येत नाही म्हणून तो कदाचित् ओशाळेल, चांगले बोलता आले तरी थोडे व दुरूनच बोलेल, पण किंचित् लवून नमस्कार व डोळयाने दिसणारी आदरबुद्धी दर्शविण्यापलीकडे तो लघळपणा करणार नाही." असो. मद्रासेस टिळकांचा सत्कार काय झाला वगैरे गोष्टी टिळक चरित्राच्या पहिल्या भागाच्या शेवटी मी दिल्याच आहेत. म्हणून त्या येथे पुन्हा देत नाही.

मद्रासच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध बंगाली वक्ते, व सात्विक धर्मशील गृहस्थ, आनंदमोहन बोस हे होते. आणि खरोखरच हा पुरुष असा होता की, त्याच्या सात्त्विकपणाची छाप कोणावरही पडावी. माझी निवडणूक, विषयनियामक कमिटीत टिळकांच्या बरोबर झाली होती, व प्रेस-कमिटचा-संबंधाने एका ठराव सभेत घेण्याचे ठरले. तेव्हा मुंबईच्या 'चँपियन' पत्राचे संपादक मि. चेंबर्स यांनी ठराव मांडावा असे ठरल्यावर त्या ठरवाला मी अनुमति दयावी असे स्वत: बोस यांनी सुचविल्याचे मला स्मरते. मराठा पत्रांतील हकीकती त्यांनी वाचल्या होत्या व त्या विषयावर त्यांचे माझे खासगी संभाषणही थोडे झाले होते. प्रेस-कमिटचा नेमण्याची सुरुवात मुंबई इलाख्यातच झाली होती; व ही प्रेस-कमिटी म्हणजे काय चीज आहे याची नक्की कल्पना बाहेरच्या प्रांतातील लोकांना नव्हती. म्हणून या कमिटीच्या घटनेसंबंधी मी माहिती विचारल्यावरून कलेक्टर लँबसाहेबांनी मला जे पत्र लिहिले होते तेच मी राष्ट्रीय सभेपुढे झालेल्या माझ्या भाषणात वाचून दाखविले. तेव्हा "आपण या कमिटचांबद्दल ऐकतो त्याहूनही खरा प्रकार वाईट आहे," असे लोकांनी उद्गार काढले.

मद्रासेस टिळक जाणार हे ऐकताच तेथील हिंदु व मद्रास स्टँडर्ड पत्रांनी आणि अनेक सार्वजनिक संस्थांनी आनंद प्रदर्शित केला. मद्रासेस राहण्याची त्यांची सोय समुद्रकाठी 'कर्नन कॅसल' किंवा 'आइस हाऊस' नामक बंगल्यात करण्यात आली होती. बंगल्याची जुनी इमारत ही लॉर्ड क्लाइव्ह मद्रासेस होता

त्यावेळी नवीन बांधण्यात आली होती असे सांगतात. १८९८ साली तिचे मालक बिलगिरी आय्यंगार नावाचे एक नामांकित सॉलिसिटर हे होते. त्यांनी टिळकांचे सर्वप्रकारे आदरातिथ्य केले. लखनौ ॲडव्होकेट पत्राचे संपादक व टिळकांचे परम स्नेही पंडित गंगाप्रसाद वर्मा हेही टिळकांबरोबर येथेच उतरले होते. मद्रासच्या मुक्कामात अनेक प्रमुख गृहस्थांनी टिळकांना पानसुपाऱ्या किंवा मेजवान्या दिल्या. विशेषत: राजा सर टी. माधवराव यांच्या घरी मद्रासेतील जुन्या महाराष्ट्रीय वसाहतवाल्यांनी टिळकांना बडी मेजवानी दिली व या प्रसंगी परप्रांतांतील महाराष्ट्रीय लोकांमध्ये मराठी भाषेची अभिवृद्धी कशी करावी याविषयी बरीच चर्चा झाली. राजा सर टी. माधवराव यांची एक लहानशी सोन्याची साखळी त्यांच्या चिरंजीवांनी टिळकांना नजर केली. स्मार्त वैष्णव लोकांच्या देवळांतून देवदर्शनाला टिळकांस निमंत्रणे आली. मद्रास सोडण्यापूर्वी टिळकांनीही कित्येक वर्तमानपत्रकर्ते, प्रमुख मद्रासी वकील, प्रो. रंगाचार्य यांसारखे विद्वान् पंडित वगैरेंना 'कर्नल कॅसल' मध्ये मेजवानी दिली. या प्रसंगी एम्. ए., एल्एल्. बी. अशा मोठमोठ्या पदव्या मिळविलेले वकील व शिक्षक वगैरे लोक तिकडील रूढीमुळे एकत्र जेवावयास न बसता, तळमजल्यावर सर्व आय्यर म्हणजे स्मार्त व वरच्या मजल्यावर सर्व आय्यंगार म्हणजे वैष्णव अशा वेगळ्या पंक्ति करण्यात आल्या; व एकाच वाढप्याने स्मार्त व वैष्णव यांना वाढलेले चालत नाही असे असल्यामुळे टिळकांबरोबर गेलेल्या मित्रमंडळींना निरनिराळ्या वाढप्यांच्या जोड्या करून या पंक्ति वाढाव्या लागल्या! या वाढण्यात मीही होतो.

या मद्रासच्या सभेच्या प्रसंगीच माझी व सी. वाय. चिंतामणी आणि जी. ए. नटेसन् यांची प्रथम ओळख झाली. नटेसन् यांनी याच वेळी काँग्रेससंबंधी एक पुस्तक प्रसिद्ध केले होते. चिंतामणी यांनी न्या. रानडे यांची सामाजिक परिषदेसंबंधी भाषणे पुस्तकरूपाने एकत्र छापली होती. मी कोणतेही एखादे पुस्तक छापले नव्हते पण 'मराठा' पत्राचा संपादक म्हणून त्यांनी माझे नाव ऐकले होते. आम्ही तिघेही जवळ जवळ एकाच वयाचे आणि उमेदीने पुढे जगात डोके वर काढू पाहणारे. तेव्हा अशा समानशील लोकांची मैत्री तेव्हाच जमावी यात आश्चर्य नाही. आता तिघांचे तीन प्रकार झाले आहेत. तरी आमची मैत्री पहिल्या दिवसासारखी आहे. वक्तृत्व व इंग्रजी लेखन या दोन्ही दृष्टींनी चिंतामणी हे माझ्याहीपेक्षा अधिक समृद्ध. साधनांच्या दृष्टीने मला टिळकांचा तरी आधार होता. म्हणजे एक प्रकारे मोठाच आधार होता. पण चिंतामणी हे पदवीधरही नसता केवळ आपल्या हिमतीवर व विद्वत्तेवर निरनिराळी कामे निरनिराळ्या ठिकाणी करून एवढ्या योग्यतेला चढले. ते नेमस्त पक्षात समाविष्ट आहेत व एकवेळ मिनिस्टरही होते. पण ते स्वार्थी आहेत असा आरोप

कोणी त्यांच्यावर करू शकत नाही. नटेसन् यांची गोष्ट मात्र उलट आहे. ते भरमसाट बोलतात. अंगी खरी विद्वत्ता नाही. तथापि छापखाना चालविणे व लोकप्रिय इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध करणे या कामी त्यांची धंदेवाईक बुद्धी फार चांगली चालत असल्यामुळे, मी व चिंतामणी या दोघांनाही खिशांत घालतील इतकी कमाई नटसेन् यांनी केली. ते 'इंडियन रिव्ह्यू' नामक मासिकाचे संपादक असून नामांकित युरोपियन लोकांचे लेख हस्तगत करण्यात ते मोठे कुशल आहेत. पण लेखक म्हणून त्यांना कोणी मानीत नाही.

टिळक मद्रास, सीलोनकडून परत येताच त्यांच्यापुढे आणखी एक संकट वाढून ठेवल्यासारखे आले. रँडसाहेबांच्या खुनाची झळ टिळकांच्या अंगाला लावावी असा सरकारकडून प्रयत्न सुरू होता. पण ती लागणे शक्य नव्हते. चाफेकरप्रकरणी अनेक कबुलीजबाब झाले, पण त्यात टिळकांपर्यंत अप्रत्यक्ष पर्यायाने पोचण्यासारखाही काहीच पुरावा निष्पन्न झाला नाही आणि ग्लोब व टाईम्स ऑफ इंडिया पत्रांना टिळकांची माफी मागावी लागली. खुनांना चिथावणी देण्याच्या रूपाने केसरी, मराठ्याचाही संबंध चाफेकर-द्रवीड-प्रकरणी आणण्याचा प्रयत्न असाच फुकट गेला. मात्र योग कसा येतो तो पहा. आणि ती सर्वच हकीकत वाचनीय आहे म्हणून ती येथे देतो.

रँडचा खून चाफेकरबंधूंनी केला अशी मूळ बातमी त्यांचेच मित्र व खेळगडी द्रविडबंधु यांनी दिली! चाफेकरबंधु व द्रविडबंधु हे सर्वजण पुण्यातील सदाशिव पेठेत फार थोडया अंतरावर राहत असत, व एकमेकांच्या चालचलणुकीची एकमेकास पुरी माहिती होती. बातमी देण्याच्या वेळी द्रविडबंधुपैकी एक गणेश हा खोटे कागद केल्याच्या आरोपावरून तुरुंगांत होता. त्याच्या बातमीवरून दामोदर चाफेकराला अटक होऊन, चौकशी होऊन, तो फाशी गेल्यावर सरकारने गणेश यास तुरुंगांतून सोडून दिले; व खुनाकरिता जाहीर केलेल्या वीस हजार रुपयांपैकी दहा हजाराचे बक्षीसही त्यास दिले. पण द्रवीड यास ते अपुरे वाटले. कदाचित् चाफेकराचा दुसरा भाऊ सांपडून फाशी गेल्यावर उरलेले दहा हजारांचेही बक्षीस देऊ असा सरकारचा बेत असावा. पण द्रविडाला दम निघेना. "मी बातमी दिली तिच्या आधारावर दामोदर पकडला गेला असता बाळकृष्ण पळाला हा पोलिसांचा अजागळपणा होय, माझा दोष नाही. बक्षिसाच्या जाहीर अटीप्रमाणे मी माहिती दिली व ती खरी ठरली.; तेव्हा आताच मला सगळे बक्षीस मिळाले पाहिजे" अशी उघड तक्रार द्रवीड याने 'ॲडव्होकेट' वगैरे पत्रांतून चालविली. शिवाय दहा हजार रुपये बक्षीस देताना त्यातलेच दोनशे साठ रु. इन्कम्‌टॅक्स म्हणून सरकारने कापून घेतले याचीही तक्रार त्याने केली. यावर ता. ७ फेब्रुवारी १८९९ रोजी लिहिताना केसरीने सरकारच्या कंजुषपणाची

चेष्टा करून इकडे द्रविडाची तरफदारी केली. पण तिकडे द्रविडांनी दिलेली माहिती साधार जाहीर करण्याविषयी सरकार रयतेस जबाबदार आहे असेही विधान केले होते. या टीकेतील "सरकारास ज्याप्रमाणे द्रविडास आपल्या या कृत्याबद्दल जाब दिला पाहिजे" या शब्दांपैकी "द्रविडास आपल्या या कृत्याबद्दल जाब दिला पाहिजे" येवढेच शब्द टिळकांच्या कोणा शत्रूने लक्षात ठेवले होते, किंवा निदान पुढच्या आठवडयात द्रविडबंधुंचे खून होताच हे शब्द त्याला आठवले! दामोदरच्या चौकशीत द्रवीड साक्षीदार म्हणून आला होता, पण त्याने बातमी काय व कशी दिली याचा उल्लेख साक्षीत निघाला नाही. मात्र सरकारला बातमी पटली होती; पण उरलेले दहा हजार केव्हा कोणास दयावे याचाच वाद चालू होता. ब्रुइनसाहेब उरलेले दहा हजार रुपये द्रविडास देण्याच्या विरुद्ध होते; यामुळे द्रविडाचे व साहेबांचे खडाजंगी भांडणही याच आठवडयात झाले होते. पण हे बक्षीस बाजूसच राहून द्रविडबंधुंना प्राणास मुकावे लागले. त्याचा प्रकार असा.

ता. ८ फेब्रुवारी १८९९ रोजी रात्री दहा वाजण्याचे सुमारास द्रविडबंधुंच्या दाराशी कोणी दोघे इसम आले व त्यांनी तुम्हाला ब्रुइनसाहेबांनी बोलाविले आहे असे हिंदुस्थानी भाषेत सांगितले. हे खाली उभे असताच द्रविडबंधु माडीवरून उतरले; व चौघेही मिळून खुन्या मुरलीधराच्या देवळावरून मंडलिकांच्या चाळीच्या कोपऱ्यावरून वळले. इतक्यात पिस्तुलांचे आवाज ऐकू येऊन "खून खून पोलीस पोलीस" अशा भयंकर आरोळ्या ऐकू आल्या. उभयता द्रविडबंधुंना गोळ्या लागून ते जखमी होऊन पडले, व दोघेही दुसरे दिवशी इस्पितळात मृत्यु पावले. खुनी इसमापैकी एक पेरूच्या गेटाकडे व एक नागनाथाच्या पाराकडे पळून गेला. पोलिसांनी रात्री शहराभोवती नाकेबंदी केली व रेल्वेचे सर्व उतारू तपासले. रात्रीच ही बातमी गावभर पसरली. अशा रीतीने वीस महिन्यापूर्वी गणेशखिंडीत झालेल्या खुनाचा प्रतिध्वनि खुन्या मुरलीधराच्या कोपऱ्यावर उमटला! मग फिरून धरपकड, फिरून जादा पोलीस, वगैरे गोष्टींचे भयानक चित्र लोकांच्या कल्पनेपुढे उभे राहिले. दुसरे दिवशी या खुनाची बातमी विलायतेस जाऊन तिकडील पत्रांतून टीकेचा भडिमार पुन्हा सुरू झाला. इकडे पोलीस तपास जारी होऊन त्यात चाफेकरांचा धाकटा बंधू वासुदेव, त्याचे कोणी स्नेही, रानडे व साठे, यांना फरासखान्यात बोलावून नेण्यात आले. फरासखान्यात प्रश्नोत्तरे चालू असता फौजदार रामजी पांडू हे वासुदेवास काही टाकून बोलले, तेव्हा त्याने अंगरख्यात लपविलेले सहाबारी पिस्तुल बाहेर काढून ते प्रथम रामजी पांडू व नंतर ब्रुइन यांजवर झाडले. तेव्हा वासुदेवावर इतरांनी झडप घालून त्याच्या हातातील पिस्तुल काढून घेतले व हातकडया घातल्या. लगेच वासुदेव व रानडे यांनी द्रविडबंधूंचे

खून आपणच केले अशी कबुली दिली त्याबरोबर वासुदेवाने असेही सांगितले की, उदया माझा भाऊ बाळकृष्ण याजविरुद्ध माझी साक्ष व्हावयाची त्यापेक्षा मी आधीच मेलेला काय वाईट? असे वाटून मी तुम्हा सर्वांचे खून करून नंतर स्वतःचाही खून करण्याचा बेत केला होता. तात्पर्य, अशा अकल्पित रीतीने द्रविडबंधूंच्या खुनांचा पत्ता लागून पोलिसांच्या नशिबाने गुन्हेगार आपल्याच पायांनी फरासखान्यात येऊन कैद झाले. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणे झाडाच्या देठातून देठ निघावे त्याप्रमाणे खुनांतून खून निघू लागल्यामुळे इंग्रजी पत्रांनी कटाच्या कल्पनेचे घोडे नाचविण्यास सुरुवात केली. ता. ७ फेब्रुवारीच्या केसरीतील 'द्रविडास आपल्या या कृत्याचा जाब दिला पाहिजे' येवढेच शब्द उचलून, दुसऱ्या दिवशी घडलेल्या खुनास केसरीने ही आदल्या दिवशी चिथावणी दिली असा युक्तिवाद या पत्रांनी लढविला. पण या कल्पनेला, खुनी ठरलेले दोघे चाफेकरबंधू किंवा रानडे अगर साठे यांच्या जबाबात किंवा इतर कोठेही काही पुरावा मिळाला नाही, व मिळणे शक्यही नव्हते. बाळकृष्ण, वासुदेव व रानडे या सर्वांना ता. १३ मार्च रोजी फाशीची शिक्षा सुनावण्यात आली, आणि त्यांनींही ती आनंदाने स्वीकारून 'पुढच्या जन्मीची शिक्षाही वाटेल तर आताच दया', असे ठणठणीत सांगितले!

ह्या गोष्टीला उद्देशून मी मराठा पत्रात वासुदेव व रानडे यांना दिलदार, धैर्यवान् ही विशेषणे लाविली. एवढ्याचाच आधार घेऊन फिरून इंग्रजी पत्रांनी टिळकांवर आडवी तिडवी टीका करण्यास सुरुवात केली. त्याला कारण इतकेच की वासुदेव वगैरे तरुण मुलांचे धैर्य असामान्य होय ही गोष्ट इतर चारचौघांप्रमाणे केसरीनेही प्रतिपादण्यास कमी केले नाही.

डायनामाईट उडल्याने वातावरण हादरते तसे रँड साहेबांचा खून झाल्यामुळे राजकीय वातावरणाचे झाले. तथापि हा खून म्हणजे जुलमी अधिकाऱ्याला ती एक ईश्वराघरची शिक्षा असेच सर्व देशभर लोकमत होते. ते प्रकट करण्यास केसरी व मराठा पत्रांनी कमी केले नाही. आणि प्रत्यक्ष खुनी कृत्याचे समर्थन न केले तरी अपराध्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले नाहीत. इतकेच नव्हे, तर खुनी झाली तरी चाफेकरादि तरुण मुले मर्द होती असे केसरी-मराठा व काळ या पत्रांनी उघड म्हटले व प्रतिपादिले. आम्ही केसरी-मराठ्याचे तरुण संपादक सावधपणे लिहित असलो तरी भ्यालो किंवा गांगरलो नव्हतो.

शिवरामपंताच्या काळपत्रांतील खुनासंबंधीच्या लेखांना सरकारनेच काय मुंबईतील फेरोजशहा प्रभृति राजकीय पुढाऱ्यांनीही हरकत घेतली. आज काँग्रेसच्या कारभारात म. गांधी हे जसे सर्वाधिकारी, तसेच तेव्हाच्या काँग्रेस कारभारात फेरोजशहा मेथा हे सर्वाधिकारी होते. त्यांनी टिळक, केसरी व

मराठा यांच्यामागे असे टुमणे लावले की "शिवरामपंत परांजप्यावर काँग्रेस स्वत: काय शिस्त चालवावयाची ती चालवील. पण टिळकांच्या केसरी मराठा पत्रांनी काळपत्राचा उघड निषेध न केला तर ती पत्रे काळ पत्राची साथीदार आहेत असे काँग्रेसचे अधिकारी म्हणतील." मोठी दहशत घालण्यात आली. पण ही अन्यायाची बाजू आम्ही परतवली. ती हकीकत टिळक चरित्रातला एक उतारा घेऊनच देतो.

"टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना न्यायकोर्टाने शिक्षा दिली तरी लोकांनी त्यांना दोषी मानले नाही. ही गोष्ट टिळकांचे भक्त अनुयायी किंवा पक्षपाती यांनीच केली असे नसून राजकारणांतले त्यांचे जे प्रतिपक्षी त्यांनीही तेच केले. पण पुण्यास नवीन निघालेल्या काळ पत्राने पुण्यातील प्लेगचा जुलूम, रँडशाही, खून वगैरे संबंधाने जे कित्येक लेख लिहिले ते केवळ सरकारास झोंबले असे नाही तर लोकपक्षांतील कित्येक गृहस्थांनीही ते फार कडक असे मत काही गुप्त तर काही प्रकट रीतीने व्यक्त केले. विशेषत:मुंबईच्या कित्येक देशी वर्तमानपत्रकारांनी आणि मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनमधील मेथाप्रमुख गृहस्थांनी बरेच काहूर उठविले. आणि त्यातही विशेष मुद्दा हा होता की "काळ पत्र पुण्यातले. टिळकांची केसरी व मराठा ही पत्रेही पुण्यातली. आणि काळ पत्राचे संपादक हे टिळकांचे अनुयायी व शिष्य. असे असता काळ पत्राचा निषेध टिळकांकडून किंवा टिळकांच्या वर्तमानपत्राकडून व्हावा तितका होत नाही." वास्तविक वर्तमानपत्रात लिहिणारा ज्याचा तो स्वतंत्र असतो. आणि आपल्याला न पटणारे असे दुसऱ्या एखादया पत्राने काही लिहिले तर त्याचा उघड निषेध करण्याची जबाबदारी इतरांवर हटकून पडते असे ठरेल, तर तो एक प्रकारचा जुलूमच होईल. पण मुंबईच्या लोकांनी हा विवेक लक्षात ठेवला नाही. या बाबतीत टिळकांची विचारसरणी 'प्राप्तौनिषेध::'या सूत्रावर रचलेली होती स्वत: टिळकांवर खटला झाला त्यात पुढे आलेल्या कोणत्याही पुराव्यावरून टिळकांना अत्याचार आवडतात असे सरकारासही दाखविता आले नाही. अर्थात् टिळकांवरील जबाबदारी एवढयावरच पुरी झाली असे कोणीही मानावयास पाहिजे होते. कारण हा अमूक असे करतो, तो अमूक तसे करतो, असे सांगून त्याला नावे ठेवणे हा नुसता उपद्व्याप होय. आणि लोकांना नावे ठेवण्याने स्वत:स येणाऱ्या अप्रत्यक्ष भलेपणाची फुशारकी मिरवीत बसणे हे हिंदुस्थानच्या वर्तमान स्थितीत अनिष्टच होय. काळ पत्राचे धोरण बरोबर की चूक हे जाहीर रीतीने सांगण्याची जबाबदारी टिळकांवर, केसरीवर किंवा इतर कोणावर काय म्हणून? आणि पुढे सन १९०८ च्या खटल्यानंतर 'टिळकांचा जाहीर रीतीने निषेध करा' असे टुमणे सर जॉर्ज क्लॉर्क यांनी स्वत: सर फेरोजशहा मेथा यांच्या मागे लावले तेव्हा त्यांनी असे उत्तर दिले म्हणतात की, 'ही गोष्ट मजकडून

कालत्रयी घडणार नाही. टिळकांची मते वाईट असली तर त्याकरिता काय प्रायश्चित भोगावयाचे ते ते भोगीत आहेत किंवा भोगतीलही. परंतु मी त्यांचा जाहीर निषेध करावा ही गोणी माझ्या मानेवर लादणार तुम्ही कोण व ती मी का घ्यावी?' पण हा न्याय पूर्वी दहा वर्षे मात्र फेरोजशहा मेथा यांना सुचला नाही. टिळक १८९८त कैदेत असता फेरोजशहा मेथा यांनी एक वेळ ॲडव्होकेट सेटलूर यांच्या मार्फत केळकरांना संभाषणाला बोलावून रागाने असे सांगितले की 'तुम्ही केसरी आणि मराठा या पत्रांतून जर काळ पत्राचा निषेध न कराल तर तुमचे आमचे बनणार नाही. तुमच्यावरच काय पण सर्व पुण्यावर मुंबईची अवकृपा होईल.' 'I shall run my pencil through the name of Poona wherever it may occur' हेच बरोबर त्यांचे केळकरांना शब्द होते. तेव्हा केळकरांनीही त्यांना असे सांगितले की 'मताच्या कामात जो तो मुखत्यार व जबाबदार असतो. आणि जेथे प्रत्यक्ष निषेध नाही तेथे अवश्य सहानुभूति समजावी असा सिद्धांत तुम्ही मांडू लागला तर सर्वच अनवस्था होईल. अर्थात् काळ पत्राचा निषेध करीत नाही म्हणून केसरीवर काट, आणि केसरी पुण्यातला म्हणून पुण्यातल्या राष्ट्रीय पक्षावर काट, असा जुलूम तुम्ही करू लागाल तर ते कोण मानील?

केळकरांपेक्षाही टिळकांवर या बाबतीत अधिक तीव्र टीका होऊ लागली. चँपियन, रास्त गोफतर वगैरे वर्तमानपत्रांनी तर काळ पत्रावर ताबडतोब खटला करावा असेही ध्वनित केले. फार काय बंगाल्यांतील काँग्रेस कमिट्यांनी काळ पत्राला काँग्रेसच्या जातीतूनच बहिष्कृत करण्याचा ठराव केला. ही धुसफूस बरेच दिवस चालू होती. पण टिळकांनी ही बहिष्काराची नसती बाजू अंगावर घेतली नाही. त्यांचे म्हणणे असे की कोणीही मनुष्य आपले मत देताना एखादे वेळी घसरेल. किंबहुना त्याचे मत साफ चूक असेल. पण त्याचा व आपला प्रतिपक्षी जर एक असेल तर त्याचा निषेध करून प्रतिपक्षाचे हात आपण अधिक बळकट का करावे? चुका दाखवून देणे आणि बहिष्कार घालणे यात फारसे अंतर नाही.

१८९९च्या फेब्रुवारीत प्रवासाहून पुण्यास परत आल्यावर टिळकांची प्रकृती बरीच सुधारल्यामुळे, फिरून केसरीत लिहिण्यास सुरुवात करावी असे त्यांच्या मनात येऊ लागले, व प्रारंभही झाला. 'पूर्वी करीत आलेले काम तसेच फिरून चालू' करण्याचे टिळकांनी या सालच्या जानेवारीतच जाहीर केले होते; व ता. ४ जुलै १८९९ पर्यंत जरी त्यांनी केसरीचे प्रत्यक्ष डिक्लेरेशन केले नाही तरी मधून मधून लेख लिहिण्यास सुरुवात केली होती. टिळक व मद्रासची काँग्रेस, केसरी, काळ व चँपियन यांचा वाद, नातूबंधूंची कैद, पुणे शहरावरील खुनी कटाचे आरोप, तारमास्तरांचा संप व शिवाजी उत्सव वगैरे विषयांवर आलेली

काही स्फुटे आणि एखादा अग्रलेखही टिळकांनी लिहिलेला होता. तसेच ता. २१ फेब्रुवारीपासून ता. २८ मार्चपर्यंत कोकणातील खोतीच्या विषयावर जी एक पाचसहा अग्रलेखांची मालिका प्रसिद्ध झाली ती सर्व टिळकांच्या लेखणीतून उतरलेली आहे. स्वतः टिळक हे आपल्या गावचे खोत असल्याचे कोणास फारसे माहीत नाही. खोतीचे त्यांच्या हिश्श्याचे उत्पन्न म्हणण्यासारखे फारसे मोठे नव्हते तरी खोतीचा अभिमान त्यांना फार होता. त्यांचे मित्र दाजीसाहेब खरे यांनी कायदेकौन्सिलात या वेळी या विषयावर बरीच झोड उठविली होती, आणि सर्वांत मोठे कारण म्हटले म्हणजे खोतांच्या हक्कावर घाला घालणारे सरकारी बिल तत्त्वतः जुलमाचे असल्यामुळे निव्वळ सार्वजनिक दृष्टीनेही टिळकांचे लक्ष या प्रश्नाकडे तीव्रतेने जाणे स्वाभाविकच होते. पण या सार्वजनिक चळवळीला टिळकांचे खोती प्रश्नाचे सांगोपांग ज्ञान हेच विशेष उपयोगी पडले, व या विषयावरील केसरीतील लेखमालेमुळे बिलात योग्य त्या दुरुस्त्या केल्या पाहिजेत असे सरकारासही वाटू लागले.

अखेर ता. ४ जुलै १८९९ पासून टिळकांनी केसरी पुन्हा हाती घेतला. १८९७ च्या सदतिसाव्या अंकापर्यंत केसरी टिळकांच्या नावाने निघत होता. अडतिसाव्या अंकापासून टिळक यांचे नाव त्यांच्या शिक्षेमुळे केसरीवरून निघाले होते, ते १८९९ च्या सत्ताविसाव्या अंकावर फिरून केसरीवर दिसू लागले. दरम्यानचे केसरीचे ९१ अंक माझ्या नावाने निघाले होते.

ता. ४ जुलैच्या केसरीच्या अंकावर फिरून स्वतः टिळकांचे नाव प्रकट झाल्यावर वाचकांना किती आनंद झाला असेल याची कोणासही सहज कल्पना करता येईल. मात्र टिळक फिरून केसरी हाती केव्हा घेणार हे आधी केसरीत जाहीर झालेले नसल्यामुळे, ता. ४ जुलैचा अंक वाचणाराचे लक्ष शेवटच्या ओळींकडे न जाण्याचा एरवी संभव होता. पण या अंकांतील अग्रलेखात स्वतः टिळकांनी आपल्याविषयी व इतरांविषयी काही व्यक्तिविषयक खुलाशाचा मजकूर, थोडाबहुत खाजगी स्वरूपाचाही, लिहिलेला होता. शिवाय त्यातील अग्रलेखाचा मथळाच इतका असामान्य होता की, तो वाचकांच्या नजरेतून चुकून जाण्याचा संभव नव्हता. उद्गारचिन्हांकित "पुनश्चहरिः ॐ" ही अक्षरे पाहताच सामान्य वाचकाने तेव्हाच तर्क केला असता की, 'हे पहा टिळक फिरून केसरीचे संपादक झाले'! या लेखाच्या मथळ्यात टिळकांनी वेद पारायण करणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणे हरिःॐ हे वैदिक शब्द योजले होते; पण पहिल्याच वाक्यातील 'कर्मलोप' व 'स्वाध्यायास' सुरवात हे शब्द पाहिले म्हणजे टिळक हे नेहमी वैदिक भावना व परंपरा यात कसे समरस होऊन गेलेले असत हे मार्मिक नजरेच्या मनुष्याच्या तेव्हाच लक्षात येते. प्रथम त्यांनी आपणास हे दिवस दिसून

पुन्हा केसरी हातात घेता आल्याबद्दल ईश्वराचे आभार मानले. तसेच वैदिक ऋणत्रयाप्रमाणे लौकिक म्हणून एक चौथे ऋण मनाने निर्माण करून ते उदार भावनेने फेडले. हे लौकिक ऋण फेडणे म्हणजे केसरीवरील खटल्याचे वेळी व त्यानंतरही अनेक बाबतीत अनेक लोकांनी द्रव्यद्वारा व इतर रीतीने जी मदत केली त्याबद्दल लोकांचे जाहीर रीतीने आभार मानणे हे होय. हे ऋण टिळकांना इतके मोठे वाटले की, ते आमरणान्त सेवा करूनही फिटणे नाही असे म्हणून, आपणास सोडविणारे जामीनदार, गैरहजेरीत आपली वर्तमानपत्रे चालविणारे मदतनीस, परप्रांतांतून सहानुभूतिपूर्वक मदत करणारी वर्तमानपत्रे वगैरेचे आभार त्यांनी खरोखरच मनःपूर्वक मानले.



# विनायक दामोदर सावरकर

जन्म : २८ मे १८८३, मृत्यू : २६ फेब्रुवारी १९६६

**विख्यात क्रांतिकारक, देशभक्त, कवी आणि ग्रंथकार**

जन्म नाशिक जिल्ह्यात भगूर येथे. तेथेच प्राथमिक शिक्षण झाले. माध्यमिक शिक्षण नाशिक येथे. त्यानंतर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात ते उच्च शिक्षणासाठी येऊन दाखल झाले. १९०५ साली पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते शामजी कृष्ण वर्मा यांच्या शिष्यवृत्तीने इंग्लंडला उच्चशिक्षणासाठी गेले. तेथे इंडिया हाऊसमध्ये राहून कायदयाचा अभ्यास करताना त्यांनी भारतीय स्वातंत्र्याला अनुकूल अशा चळवळीत प्रामुख्याने आणि उघडपणे भाग घेतला. त्यामुळे त्यांना बार अॅट लॉ. ची पदवी नाकारण्यात आली. १९१० साली मार्च महिन्यात ते पॅरिसहून लंडन येथे आलेले असताना त्यांना अटक करण्यात आली. ८ जुलै १९१० रोजी त्यांनी, त्यांना घेऊन जाणारी बोट मार्सेलीस बंदराजवळ येताच बोटीतील शौचकूपाच्या खिडकीतून उडी मारून पलायन करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न फसला पण त्यामुळे सावरकरांना जागतिक कीर्ती मिळाली. त्यानंतर सावरकरांना अंदमानात चौदा वर्षे काळ्या

पाण्याची शिक्षा झाली. या कारावासाची अत्यंत रोमांचकारी कहाणी त्यांनी आपल्या 'माझी जन्मठेप' या ग्रंथात कथन केली आहे. त्यानंतर १९२४ साली त्यांना रत्नागिरी येथे स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. १९३७ साली त्यांच्यावरचे सर्व निर्बंध उठल्यावर त्यांनी हिंदू महासभेच्या कार्यात भाग घेतला आणि काही वर्षे महासभेचे अध्यक्षपद भूषविले.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी त्यांनी तरुणांनी सैन्यात प्रवेश करावा असे आवाहन केले. सावरकर हे प्रखर सामाजिक सुधारणावादी होते. त्यांनी काव्य आणि नाटचवाङ्मयात मोलाची भर टाकली आहे. मॅझिनी चरित्र, सत्तावनचे स्वातंत्र्य समर, आणि माझी जन्मठेप ही त्यांची महत्त्वाची पुस्तकें.

पुढील उतारा त्यांच्या 'माझी जन्मठेप' या ग्रंथातून घेतला आहे.

## 'अंदमानात आमचे' पुतळे उभारतील

—वि. दा. सावरकर

आता ज्या त्रितल चाळींत मला बंद केलेले होते तिच्यांत राजकीय बंदिवानांवांचून इतर बंद्यांस कामासाठी आणि राहण्यासाठी सोडविण्यात आल्याने मला तुरुंगांतील बऱ्याच उलाढाली कळू लागल्या. ज्या विषयासंबंधी मला उत्सुकता होती तो विषय म्हणजे अर्थातच राजकीय बंदिवानांची तेथील स्थिती आणि माझे ज्येष्ठ बंधूंची खुशाली हा होता. त्याविषयी गुप्तपणे या ना त्या रीतीने मला बरीच माहिती कळली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी भयंकर कृत्ये करून जे लोक तसल्याच भयंकर शिक्षा पावले त्यांची काय गति झाली, हे जाणण्याची वाचकांस उत्कंठा असेल; म्हणून ते वृत्त सविस्तर तर नव्हेच पण संक्षिप्तपणेही जरी येथे देता येत नाही तरी जितके देता येईल तितके देऊन आणि सूचित करून ठेवण्यास हा प्रसंग योग्य आहे. एतदर्थ त्यांची प्रारंभिक काही माहिती देतो.

### बॉंबगोळेवाले

अंदमानामध्ये प्रथमत: जे आधुनिक राज्यक्रांतिकारक गेले त्यांत माणिकतोळा बागेच्या कटातील बंगाली गृहस्थ आणि त्यांचे अगदी मागोमाग महाराष्ट्रांतील श्री. गणेशपंत सावरकर आणि श्री. वामनराव जोशी हे गृहस्थ होते. त्यांच्या मागेपुढेच बंगाल्यांतील एका राजकीय दरवड्याच्या संबंधांत पाच सहा लोक आले होते. या सर्व राजबंदीत यावज्जीवन काळेपाणी झालेले म्हणजे बंगाल्यांतील तिघे आणि महाराष्ट्रीय दोघे होते. बाकी बंगाली मंडळी दहा वर्षांपासून तीस वर्षांपर्यंत शिक्षा झालेली होती. मी तेथे गेलो तेव्हा या मंडळीव्यतिरिक्त अलाहाबादेच्या स्वराज्य पत्राचे चार संपादकही सात ते दहा वर्षे शिक्षा लागून आलेले होते. परंतु त्यांचेवर राज्यक्रांति करण्याचा आरोप नसून राजद्रोहाचा ठेवलेला होता. इतकेच नव्हे तर ते खरोखरच राज्यक्रांतीच्या तत्वाशी अगदी अपरिचित आणि व्यवहाराशी विरुद्धही होते. परंतु केवळ राजद्रोहाच्या अपराधासाठी शिक्षा देऊन त्यांस क्रांतिकारकांत नेऊन ठेवल्याने

त्यातील काहीजणांस राज्यक्रांतीची तत्वे देखील परिचित आणि व्यवहारसंमत होऊ लागली, इतकाच काय तो त्या शिक्षेचा परिणाम झाला. मला आता कोणत्या खटल्यात कोण कोण होते आणि कोणा व्यक्तीची काय मते होती हे निश्चितपणे आठवत नाही म्हणून सर्वसाधारण निर्देश करून समाधान करून घेणे प्राप्त आहे. वर उल्लेख केलेल्या मंडळीव्यतिरिक्त आणखी एक राजबंदी तेथे असावेत असे वाटते. प्रथमतः गेलेल्या लोकांत बंगाली मंडळीच अधिक असल्याने आम्हा सर्वांसच लोक बंगाली म्हणत. पण पुढे पुढे जेव्हा पंजाबादिक प्रांतांतून शकडो लोक येऊन थडकले तेव्हा आम्हास असेच दुसरे एक अडाणी नामाभिमान झाले. ते म्हणजे 'बाँबगोळेवाले.'

## जीभवाले अथवा राजकैदी

राजकीय बंदिवान याचा अर्थ तर काय पण तो शब्दच ज्यांनी जन्मात ऐकला नाही त्या हजारो बंदिवानांस ती कल्पना सुचणार वा समजणार तरी कशी? त्यात बहुतेकांना बाँब फेकण्याचा अभ्यास केल्याची कल्पना धारण करता आली आणि त्याच सामान्य लक्षणाने आमच्या वर्गाच्या सामान्य निर्देशाचे काम चालवून घेण्यात आले. बारीसाहेबांना जेव्हा राजकीय बंदिवानांची आवश्यकता पडे तेव्हा तेव्हा "जाव, वो सात नंबरका बाँबगोलेवाला लाव" किंवा "सब बाँबगोलेवालेको अबीके अबी बंद करो" म्हणून गर्जना होई आणि सर्वांस ते समजे. मी गेल्यानंतर मी वेळी अवेळी बंदिवानांस समजावी की, अरे, बाँबगोळ्यांनीच लढावे असे सांगण्याचा आमच्यावर आरोप नव्हता. सरकारशी लढावे हे सांगण्याचा—स्वराज्य स्थापावे हे सांगण्याचा आरोप होता. आमच्यात काही पिस्तुलांनी, काही बंदुकांनी आणि काही तर केवळ लेखणीनीच लढत होते. काहींनी तर बाँब पाहिला देखील नव्हता.तर मग बाँब चालविण्याची गोष्टच नको. जी काय आम्ही सर्वांनी चालविली ती जीभ होय. मग आम्हास तुम्ही 'जीभवाले' म्हणत जा. 'बाँबवाले' का म्हणता? 'म्हणजे' ते हसून म्हणत, 'मग तुम्ही खरे काय नाव ते सांगा. आम्ही ते म्हणू.' मी म्हणावे, आमच्या वर्गाचे खरे नाव "राजकीय बंदी" बरे, ते नाही सहज उच्चारता येत तुला? तर तू "राजकैदी" इतकेच म्हणत जा. हा शब्द मात्र त्यांना झटकन् उच्चारता येई. पुढे तो रूढ झाला. तथापि बारीसाहेबांना मात्र तो मुळीच खपत नसे. आम्हास कोणी "बाबू" (हा शब्द अंदमानात सन्मानदर्शक म्हणून लावतात.) म्हटले तरी बारीसाहेब ओरडावयाचा 'कौन बाबू है? साला! वे भी सब कैदी है!' मग ज्या बारीसाहेबास इतर बंदिवानात ज्यास लिहिणे येई त्यास बाबू म्हटल्याचा राग येत नसून केवळ आम्हास मात्र बाबू म्हणून बंदिवानांनी म्हणावे हे मुळीच खपत नसे, ते बारीसाहेब आम्हास राजबंदी अथवा राजकैदी म्हणून लोकांस थोडेच म्हणू देणार?

## 'डी' तिकीट

आम्ही 'पोलिटिकल प्रिझनर्स' नाही हे मरेतोपर्यंत बारीसाहेब घोकीत होते. कोणी बंदिवानाने त्यांच्या समक्ष राजकैदी म्हटले की साहेब गरजलेच "हः यो? कौन राजकैदी? वो तुम्हारे माफक ही एक मामुली कैदी है. बदमाष कैदीओंका 'डी' तिकिट देखता नही तुम उसके छातीपर?" बदमाषांतील अट्टल बदमाषांस खूण म्हणून एक 'डी' म्हणजे 'डेंजरस' (भयंकर) या अर्थाचे अक्षर खोदून आम्हा सर्वांस कपड्यावर लावावयास बिल्ला दिलेला असें. तरी देखील मला पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत बंदिगृहांत "बडा बाबू" म्हणूनच सर्व संबोधीत असत. फार काय स्वतः बारी देखील चुकून अनेक वेळेला बोलून जाई "अे हवालदार, जाव, वो सात नंबरके बडा बाबूको बुलाव!" त्याचप्रमाणे आमच्या उपदेशाने राजकीय चळवळीचे मर्म जसे जसे बंदिवानांस कळू लागले तसे तसे ते आपण होऊनच आम्हास "राजकैदी" म्हणून संबोधू लागले. त्या शब्दात अंतर्भूत असलेल्या स्वराज्यार्थ झटण्याच्या ज्या विचारासाठी बारीसाहेब त्या नावाचे नाव देखील काढू देत नसत त्याच विचाराचा प्रामुख्याने उल्लेख बंदिवानांच्या चित्तावर ठसावा म्हणून मी त्याच नावाने आम्हांस उल्लेखावे म्हणून सर्वांस शक्य तो शिकवी आणि अखेरी तोच शब्द प्रचलित झाला. बारीसाहेबापासून तो अगदी वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत तुम्ही 'पोलिटिकल प्रिझनर्स' नाही, साधारण पापी बंदिवान आहा हे जसे शपथेवर शंभर वेळा निक्षून सांगितले असताही आम्ही सर्व अखेर "पोलिटिकल प्रिझनर्स"च ठरलो त्याचप्रमाणे त्यांनी कितीही धाकदपट केली तरी बंदिगृहापासून तो अंदमानांतील स्वतंत्र वसतीपर्यंत आम्ही "राजकैदी" म्हणूनच संबोधिले जाऊ लागलो.

## क्रूर देवतेला नैवेद्य

मी अंदमानास जाण्याचे पूर्वी जे राजबंदी तेथे गेले म्हणून वर लिहिले त्यांस प्रथम एकाच चाळीत एकत्र ठेवण्यात आले होते. त्यांचेवर एक पठाण बंदिवान अधिकारी होता. नारळाची सोलून काढलेली जाड साले —ज्यात नारळाचे फळ सापडते ती, ज्यास तिकडे "छिलका" म्हणतात आणि कोकणात "सोडणे" म्हणतात ती— वाळवून कुटावयाची आणि त्यांच्यातील काथ्या नीट काढून साफ करून दयावयाचा हे काम त्यास दिलेले होते. हे कामही कठिणांतलेच होते तरी तेलाच्या धाण्याइतके कठिण नव्हते. वास्तविक पाहता ज्या बंदिवानांना पुरती इंग्रजीची स्पेलिंगेही येत नाहीत त्यांना देखील आल्याबरोबर किंवा थोडे आगेमागे लिहावयाचे काम देण्यात येऊन "बाबू" म्हणून बंदिवानांवर अधिकारी देण्यात येतो. पण राजकीय बंदिवानांत मात्र कोणालाही लिहिण्याचे काम न देण्यात येता त्यांच्या जन्मांतही जी त्यांनी केली नव्हती ती काबाडकष्टी कामे

देण्यात आली. क्वचित् त्यास नुसती स्पेलिंगे येण्याहून किती तरी अधिक इंग्रजी येत होते. या त्याच्या शिक्षणांतील न्यूनतेसाठी ते लिहिण्याचे काम करण्यास अपात्र समजले गेले असतील?

तथापि काम जरी काबाडकष्टाचेच होते तरी सर्वांना एकत्र राहता येई हाच लाभ त्या समाजप्रिय सुशिक्षित मनुष्यास सुखद होई. त्यातील एक दोघास काही रोग असल्याने दूध मिळे. ते दूध त्यांच्यावरील पठाण अधिकाऱ्यास नैवेदयार्थ गुप्तपणे समर्पित केले जात असल्याने ती क्रूर देवताही थोडीबहुतही कमी उग्र झालेली असे. या दोन गोष्टींमुळे एकंदरीत त्या वेळेस राजकीय बंदयांची अवस्था तुरुंगांतल्या मानाने अगदीच दुःसह नव्हती. माझे ज्येष्ठ बंधूही त्याच चाळीत असत.

परंतु काही महिने असे जाताच कलकत्त्याहून पाहणीसाठी × × × × नांवाचे एक पोलीस अधिकारी अंदमानास आले. त्यांनी येऊन जेव्हा राजकीय बंदी "छिलका" कुटीत आहेत आणि एकत्रच –जरा अंतराअंतरावरच– ठेवलेले आहेत हे पाहिले तेव्हा बंदिगृहांतही माणसास इतक्या तरी माणुसकीने वागविण्यात यावे याचा त्यांना साहजिकच विषाद वाटला. त्यांनी अंदमानाच्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. आणि हे बंदिवान काही खुनी, चोर, दरवडेखोरासारखी सच्छील आणि दयार्द्र माणसे नसून अट्टल बदमाष राजकीय बंदिवान आहेत आणि त्यांची खोड मोडेल असेच त्यास इतःपर वागविले जावे असे उच्च राजकीय तत्त्वाचे मर्म ह्या स्थानिक आडदांड अधिकाऱ्यांच्या चित्तावर ठसवून दिले.

### तेलाचा घाणा

तेव्हापासून मनु बदलला. त्या राजबंदिवानांस निरनिराळ्या चाळींत एकएकटे कोंडण्यात आले. त्यांनी आपसात अवाक्षर बोलताच बेड्या हातकड्या इत्यादी शिक्षा देण्याचा सपाटा चालला. स्नानाचे हौदावर किंवा जेवावयास दूरच्या टोकास बसले असता नुसते 'बरे आहेना?' म्हणून खुणा करण्यासाठी शिक्षा सात दिवस हातकडी ठोकून उभे राहणे अशा होऊ लागल्या आणि अंती ते छिलका कुटण्याचे काबाडकष्टाचे कामही स्पेलिंगापेक्षा अधिक इंग्रजी येणाऱ्या माणसास देणे अन्याय्य वाटून बैलाकडून करवून घेण्याच्या योग्यतेचे तेलाचा घाणा ओढण्याचे तुरुंगांतील कठिणतम काम त्यांस देण्यात आले. खोड मोडली पाहिजेना! दोन दोन महिने हे काम केल्यानंतर एक महिना पुनः छिलका देण्यात येई की पुनः तेलाच्या घाण्यास त्यांना जुंपून देण्यात येई. सकाळी उठताच लंगोटी नेसून खोलीत बंद व्हावयाचे. आत घाण्याची दांडी हातांनी चाक फिरवतात तशी फिरवावयाची. खोबरे त्या उखळीत पडले की ती इतकी जड जाई की कसलेले

हमाल देखील तिच्या वीस फेऱ्या फिरविताच रडकुंडीला येत. विशीच्या आत ते काम चोर दरवडेखोरांसही सहसा देत नसत. पण राजकीय बंदिवानांनी मात्र ती दांडी वाटेल त्या वयात फिरविण्यास हरकत नाही असे अंदमानी वैदयकशास्त्राचे मत असे. त्यामुळे त्या दांडीस हातांनी उचलून अर्धा गरका देऊन वर केल्यास बाकीचा अर्धा गरका देण्यास लागणारा जोर हातात नसल्याने तिला लोंबकळून तो पुरा करावा लागे. इतका त्या घाण्यांतील खोबरे पिसण्यास जोर लागे. इतक्या काबाडकष्टास अगदी अनोळखी आणि कोमल वयाचे ते विशीच्या आतबाहेरील सुशिक्षित राजबंदी असत. सरासरी सकाळी दहा वाजेपर्यंत एकसारखे असे गरके फिरविता श्वास जड होई. कोणा कोणास –नव्हे बहुतेकांस– खरोखरच चक्कर येऊन वारंवार खाली बसावे लागे. दहा वाजता नियमाप्रमाणे दोन तास कामे बंद असावयाची. पण "कोलूचे" म्हणजे या घाण्याचे काम बंद ठेवले जाणारे नसे. जेवण येताच खोली उघडण्यात येई. बंदिवान बाहेर येऊन थाळीत भातवरण पोळी घेऊन आत फिरला की दार पुनः बंद. जरी कोणी हात धुवून घामाने भरलेले अंग साफ करू लागला तरी देखील तितका उशीर सहन न होऊन जमादार –म्हणजे बंदिवानांतील बदमाष जो कोणी अधिकारी केलेला असे तो आईमाईवरून शिव्या हासडू लागलाच म्हणून समजावे. हात धुण्यास पाणीच मुळी कोठून मिळणार? पिण्यास पाणी मिळण्यासाठी जमादाराचे आर्जव करावे लागे. कारण कोलूत काम करताना तहान मनस्वी लागे. पाणीवाला पाणी देत नसे. चोरून कोणास तंबाखूची चिमटी दिली तरच देई. जमादारास सांगावे तर तो ओरडे "कैदीको दो कटोरा पानी देनेका हुकूम है, तुम तो तीन पी गया. और पानी तुमारे बापके घरसे लाव!" जमादाराच्या वास्तविक भाषेचे हे अगदी सभ्य शब्दात आम्ही भाषांतर केले आहे. हात धुण्याच्या आणि पिण्याच्या पाण्याची जेथे ही स्थिती तेथे स्नानाचे नाव कशास?

## 'तेल पूरा करना पडेगा!"

स्नानाचेच कशाला, जेवणाचीही तीच स्थिती. जेवण वाढून दार बंद करताच जमादाराला ही चिंता नसे की बंदिवान जेवतात की नाहीत. त्यास ही चिंता असे की, ते पुनः तो कोलू फिरवू लागले की नाही. तो सारखा त्या चाळीतील कोठड्यापुढून ओरडत चाले "बैठो मत; शाममे तेल पूरा करना पडेगा! नही तो पीटे जावोंगे और सजाभी होगी वो बात अलग ही!" हे त्याचे ओरडणे ऐकताच कित्येकांस पुढे घास गिळणेही अशक्य होई. कारण संध्याकाळी तेल कमी भरताच प्रत्यही लाथाबुक्क्यांखाली आणि सोटाखाली बंदिवान तुडविले आणि पिटले जाताना प्रत्येकजण पाहत असे. या धाकाने पोटात त्या कष्टांनी भयंकर भूक लागली असतानाही कोलू फिरविता फिरविताच उभ्या

उभ्या घामाच्या धारा ज्यात पडतातच आहेत त्या थाळीतील घास तोंडात भरीत आणि गिळीत आणि कोलू फिरवीत असेच जेवण आटोपीत असताना कित्येक बंदिवानांस मी अनेक समयी प्रत्यक्ष पाहिले आहे.

असे ते जेवण जेवून पुन: पाच वाजेपर्यंत तो कोलू फिरवीत रहावा लागे. सवयीनंतर कोणाचा चार वाजता होई. अगदी निर्ढावलेला शंभरांत एकाद-दुसराच मनुष्य सदोदित पुरे काम म्हणजे ३० पौंड तेल काढू शके. बाकीचे आज ना उदया इतके काबाडकष्ट करूनही काम पुरे करण्यास असमर्थ होत. त्यांच्यात जे नवशिके, साधे, आणि सापेक्षत: प्रामाणिक असत, हाय! हाय! त्यांच्यावरच जमादार-वार्डरांचा मार पडे. पुरे न जेवताही काम केले तरी तेल पुरे न होऊन थपडा, लाथा, काठ्या खात थकलेले ते बंदिवान तेल ओतून रडत परत चाललेले मला अजून दिसत आहेत! नरम स्वभावी बंदिवानांची ही दशा! जरा निर्ढावलेला असेल अगर, तापट असेल त्यास हातकडी, दंडाबेडी इत्यादी या मारपिटीपेक्षा सुसह्य अशा शिक्षा. या व्यवस्थेने बंदिगृहात पाय टाकल्यानंतर असलेला सच्छीलपणा, उरलेला प्रामाणिकपणा आणि अवशिष्ट असलेली लज्जा देखील माणसातून निघून जाते. ज्यांची लज्जा निघून जाते तीच माणसे शेवटपर्यंत बंदिगृहात जगतात, निदान जे काही जगतात ते बहुधा त्यांच्यातीलच असतात.

## रात्रीचे कोलूवरील काम

कारण निर्ढावलेल्या, तापट आणि अट्टल बदमाषांसही बारीसाहेब अगदीच ढिले सोडीत असे नाही. सरळ साध्यांना मारपीट प्रथम प्रथम आणि येता जाता होई. कारण गोगलगाईंना तुडविण्याचा पराक्रम करणे वीर पुरुषास केव्हाही सोपेच जाते. त्यातही त्या साध्या दुबळ्या कोडग्यांस मारपीट चाललेली पाहून ज्या बदमाषांचे तेल पुरे झाले नसे त्यासही अधिक त्रास दिला तर आपणांसही असेच प्रायश्चित मिळेल ही भीति साहजिकच पडे आणि त्यातील काही काम पुरे करण्यास धडपडत. इतक्यावर एखादे दिवशी खोबरे ओले असले आणि कोणाचेच तेल संध्याकाळपर्यंत पुरे झाले नाही तर बारीसाहेबापाशी दुसरी एक तोड होती! तिचा उपयोग होई. हे बंदिवान लोक कट करून काम कोणीच पुरे करीत नाहीत असे मोठमोठ्याने गर्जत सुमारे पाच वाजता संध्याकाळी जेव्हा सायंकाळचे भोजन वाढण्यात येई तेव्हा ज्यांचे तेल पुरे ३० पौंड होणार नाही त्यास ते पुरे होईतो जेवण मिळणार नाही म्हणून आज्ञा सुटे. सकाळी ६ पासून अविश्रांत उभ्या उभ्या जेवत दुपारचे ११ वाजता जेवून संध्याकाळपर्यंत सारखा कोलू फिरवीत जे श्रांत झालेले, त्यात तेल पुरे केलेले दहापाच बंदिवान जरी असत तरी, बाकी चाळीस-पन्नास कोलूवरील लोक खरोखरच अशक्य म्हणूनच

तेल पुरे करू शकलेले नसत. पण बारीसाहेब खुर्ची मागवून घेऊन, त्या चाळीस कुलूप ठोकून, सर्व बंदिगृहांतील कामे बरोबर पाचसहा वाजता आटोपून, नियमाप्रमाणे सर्व तुरुंग बंद झाल्याचे प्रतिवृत्त (रिपोर्ट) कळवून, केवळ तेवढ्या चाळीतील काम ठासून चालवीत बसे, त्या नियमास पायाखाली तुडवून चाललेल्या रात्रीतील कामाची बातमी बाहेर फोडण्याची कोणा शिपायाची वा नोकराची काय माय व्याली होती? बारीसाहेब आठवड्याचे आत त्याच्यावर कोणते कुभांड वा खटला रचून त्यास खड्ड्यात पाडील याचा काही नियम थोडाच होता. तेव्हा सात-आठ-नऊ, रात्री नऊ वाजेतो कोलू फिरवीत असत! येता-जाता शिपाई, जमादार मारहाण करीतच आहेत, रात्री तासामागे तास वाजत आहेत, सर्व बंदीगृह निजून आहे, तेवढी कोलूची चाळ कर्रर्र काम करीत आहे, बारी चाळीच्यापुढे खुर्चीवर डुलक्या घेत आणि मधूनच आई-माईवरून शिव्या हासडीत "अबतक तेल नही हुआ तो मारो सालेको बेत, कल मारना तो आज मारो" असे ओरडत पडलेले असत.

### रोगाचे ढोंग

ज्यांच्या हातास काबाडकष्ट शिवले नाहीत, ज्यांच्यात कॉलेजांतील अध्ययन-अध्यापन केलेले लोक होते, अशा राजकीय बंदिवानांस त्यांच्यातील सतरा वर्षाच्या मुलांसही याच कोलूचे काम महिनोगणती देण्यात आले. त्यांच्या कष्टास पारावार उरला नाही. त्यातही काही आजारी पडले तेव्हा तर मरण बरे असे त्यांस वाटू लागले. कारण आजार भयंकर स्वरूपाला पोचेतो ढोंग या कोष्टकात मोडे. त्यातही ताप –१०१ चे वर तो ताप समजला जाई– तर राजबंदी– रुग्णालयात नव्हे तर– कोठडीत कामाविना बंद केला जाई. साधारण चोरी आगलावी, दरवडे, गळेकापी इत्यादी पोर्ट ब्लेअरच्या नीतिशास्त्रातील क्षमार्ह अपराध करणारास मात्र रुग्णालयात आजारी म्हणून एक बाज निजावयास देऊन ठेवण्यात येई. पण ताप किंवा रेच किंवा उलट्या असे प्रत्यक्ष रोग नसून डोके दुखणे, हृदयविकृती, जीव घाबरणे इत्यादी रोगांनी ज्यांस जर्जर केले त्यांची दशा पुसावयास नको. त्यांच्या रोगांचे निदान ढोंग वा काम-चुकारीपणा या दोन दुखण्यांनी पछाडलेल्यांतच करण्यात येई. वेळी शिक्षाही देण्यात येई. ही गोष्ट काही खोटी नाही की बंदिवानांतील अट्टल सोदयांपाशी वाटेल तेव्हा भयंकर ताप वा रेच वा रक्ताच्या उलट्या व्हाव्या अशी औषधे आणि युक्त्या असत. पण हीही गोष्ट खोटी नाही की, असल्या औषधांनी १०३-४ पर्यंत तापाने फणफणत पडलेले पुरवले वा तीव्र पोटदुखी होऊन रक्ताचे दहा दहा रेच झाले तरी बरे, पण ही कोलूची यातना काही दिवस तरी चुको असे सळो का पळो होण्याइतके ज्या कोलूचे कष्ट असह्य होत –बदमाषही असह्य होत– त्याच कोलूस बंदिगृहाचे तोंड प्रथमच पाहणाऱ्या राजबंदीसही जुंपण्यात येई,

आणि त्यांच्यातही कोणी असल्या अप्रत्यक्ष दुखंण्याने आजारी झाला असता तो ढोंगी याच वर्गात मोडून त्या कष्टकर कामावर पुनः परत धाडण्यात येई. अशा कष्टभोगी पुरुषात माझ्या ज्येष्ठ बंधूंची गणना प्रामुख्याने झालेली असे.

## माणसाळविण्याचा प्रयोग!

कारण त्यांस घरापासून अर्धशिशीची व्यथा असे. त्यांत ते बंदिगृहातील कष्ट, मानसिक आणि शारीरिक. त्यांत घाण्यास जुंपलेले. आणि सर्वांत मोठा अपराध म्हणजे अशा हालअपेष्टेतही मागे वर्णन केलेल्या काही राजबंदीप्रमाणे ते अजून 'माणसाळलेले' नव्हते. त्यांच्या तोंडांतून अवास्तव माहितीचा वा तिरस्करणीय प्रार्थनेचा शब्दही निघाला नव्हता. म्हणून त्यांना "माणसाळविण्या"चा प्रयोग, त्या राजबंदिवानांस उघड उघड हिंस्र श्वापदे आणि स्वतःस त्यांच्या सर्कशीचा चालक म्हणविणारा बारी, अजून करीतच होताः अशा स्थितींतच आणि तिचा परिणाम म्हणून भयंकर अर्धशिशीची व्यथा त्यास पुनः जडली. सकाळी घाण्यास जुंपून तो सारखा फिरवीत असता जसजसा दिवस वाढे तसतसे डोके ठणकू लागे. तिडका उठत. उन्ह सहन होईना, तरी दिवस वाढे तशा वाढणाऱ्या डोक्याच्या त्या तीव्र ठणक्याबरोबरच "कोलू पीसो, और कुछ जानता नही, कोलू पीसो" म्हणून जमादाराची उर्मट गर्जना वाढत जाई. गोरा अधिकारी फिरतीवर येताच अर्ज केला "माझे डोके अतिशय दुखत आहे." त्यांनी उत्तर दयावे "तो माझा प्रश्न नाही. डॉक्टरला दाखव." डॉक्टर कोणी तरी हिंदुस्थानचाच असणार. तो आला की त्याने ताप आहे की नाही पाहून सांगावे, यास काही होत नाही. साहेबांकडे न्या. कारण डोके दुखण्याने तापमापक थर्मामीटर मुळीच तप्त होत नसे. डोके दुखते हे सिद्ध करण्यास दुसरा पुरावा नाही. अर्थात लबाडी असलीच पाहिजे. बंदिवानांची, त्यांतही राजबंदयांची–त्यातही गणेशपंत सावरकरांची!

## मी म्हणेन तो आजारी!

आपण करतो हे अन्याय्य आहे हे डॉक्टरला कळे पण बारीची भीती. तो येता जाता त्यास सांगत बसणार "हे पाहा डॉक्टर, तुम्ही हिंदु. हे राजबंदिवान हिंदु. हे केव्हा तुम्हाला गोड बोलून खड्डयात पाडतील नेम नाही. त्यांच्याशी माझ्या सांगण्याविना बोलताना जरी कोणी तुम्हास पाहिले तरी तुमच्याविरुद्ध प्रतिवृत्त अधिकाऱ्यांकडे होईल. तेव्हा सांभाळा; नोकरी पाहिजे तर तुम्ही म्हणून त्यांच्याविषयीची काही एक म्हणू नका. तुम्ही शिकलेले, पण मी अनुभवी. मला त्यांच्याविषयी काही एक म्हणू नका. तुम्ही शिकलेले, पण मी अनुभवी. मला कळते, हया ढोंगी लोकांचे खरे आजार कोणते, खोटे कोणते! "तेव्हा मी म्हणेन तेव्हा ते आजारी पडतात असे समजावयाचे बरं का?" असे म्हणत

स्वतःच स्वतःच्या विनोदाने हसत बारीसाहेब पुढे चालावयाचे. एकदा एका डॉक्टराने (हॉस्पिटल असिस्टंट) माझ्या बंधूंची अत्यंत केविलवाणी स्थिती पाहिली. डोक्याला तिडका असह्य होऊन ते केव्हा केव्हा भिंतीस डोके तडातड मारून घेत; तसेच उठून कोलू फिरवावयाचा. साहस करून तो डॉक्टर म्हणाला, चला मी दोन दिवस माझ्या अधिकारात तुम्हास निरीक्षणाखाली (फॉर ऑब्झर्व्हेशन) म्हणून ठेवतो. घ्या अंथरूण आणि दया ते काम सोडून. त्याच्या बोलण्याप्रमाणे माझे बंधू अंथरूण घेऊन जातात न जातात तो बारी सोटा आपटीत आला. "अे बॉंबगोलेवाला किदर जाता है" म्हणून वसकन् त्याने गणेशपंतास घेऊन जाणाऱ्या जमादारास विचारले. तो जमादार थरकांपला व म्हणाला, डॉक्टरबाबूच्या आज्ञेने काम सोडून त्यास निरीक्षणासाठी संशयित आजारी म्हणून ठेवण्यास चालविले आहे. "मला कां विचारले नाही, कोण आहे तो डॉक्टरबाबू? अे साला, वो साला!" म्हणून ओरडत त्याने बंदिगृह दणाणून दिले. "ले जाव इसकू वापस काममे लगा देव. मी डॉक्टरला पाहून घेतो आणि तुलाही –साला तुम– मला विचारल्याविना याला कोठडीबाहेर कां काढले? डॉक्टराची आज्ञा की, माझी?"! असे एकसारखे गर्जत त्याने त्या जमादाराकडून गणेशपंतांस परत त्या कोलूच्या कोठडीत बंद करून कोलूस जुंपविले! डॉक्टरचा अधिकार त्या बारीच्या म्हणजे बंदिपालाच्या अधिकाराच्या खालचा नसून केवळ सुपरिंटेंडेंटच्या हाताखालचा असे. पण राजकीय बंदिवानांचे संबंधी कोणचेही गाऱ्हाणे सुपरिंटेंडेंटपर्यंत पोचू नये म्हणून सर्व हिंदु आणि हिंदी अधिकाऱ्यांची जिवापाड खटपट असे. एतदर्थ बारीला भिऊन त्या डॉक्टराने स्वतःचा अपमान तर गिळलाच, पण बारीची क्षमा मागून पुनः कधी कोणा राजकीय बंदिवानास सुपरिटेंडंटचे सांगण्याविना कोठडीतून रूग्णालयात एक क्षणभरही नेले नाही. बाकी वाटेल तो बंदिवान–दहा दहा वेळा तुरुंग भोगूनच नव्हे तर फोडून पळालेले बंदिवानही– आजारी आहे इतके कळवून प्रत्यही रुग्णालयात जाऊ शकत. पुढे ठेवणे न ठेवणे डॉक्टराकडे असे. त्याच्या कामात बंदिपाल सहसा बोलत नसे. राजबंदयांना मात्र रुग्णालयात बहुधा मज्जाव!

त्या अर्धशिशीचे दुखणे आणि ठसके सोशीत दिवसभर कोलू फिरवीत माझे ज्येष्ठ बंधु संध्याकाळी तेल मोजून देऊन हुश्श करून जो त्या निजावयाच्या कोठडींतल्या लाकडी ओंडयावर –फळयावर– अंग टाकीत तो सारे अंग ठणकावयास आरंभ होई. कोठे झोप लागली न लागली तो दुसरी सकाळ. की, पुनः अर्धशिशी, तो जमादार, तो जो काळचा अधिकाऱ्यांचा उपमर्द आणि जाच आणि तो कोलू दत्त म्हणून उभा राही. असे आठवडे, महिने कष्टांच्या पराकाष्ठेत काढले आणि असा जन्म काढावयाचा!

## नको हे जीवन!

ते हाल किती सांगावेत! पण केवळ शितावरून भाताची परीक्षा व्हावी म्हणून आणखी एकच घटना सांगतो. अंदमानात बंदिवानास कामाचे, अन्नाचे, वस्त्राचे, मारहाणीचे इत्यादी अनेक प्रकारांचेविषयी जे त्रास देण्यात येत असत. यांत एक दिसण्यात अगदी किरकोळ, सांगण्यास अगदी संकोचास्पद परंतु सहन करण्यास अगदी स्वतःचा स्वतःसच तिटकारा आणून नको हे जीवन असे वाटविणारा त्रास म्हटला म्हणजे बंदिवानांस मलमूत्रांचा अवरोध करण्यास भाग पाडणे हा होय. सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी या वेळांव्यतिरिक्त शौचास जाणे म्हणजे जवळजवळ अपराध मानला जाई. रात्री बंदिवानास सहा साताला जे कोंडून टाकण्यात येई ते सकाळी सहाला उघडण्यात येई. त्या अवधीत लघवीला केवळ एक मडके आंत ठेतीत. अंदमानाच्या बंदिगृहात सगळ्या खोल्या वेगवेगळ्या असून प्रत्येकीत एकच बंदिवान बंद केलेला असे. म्हणूनच त्यास सेल्यूलर जेल म्हणजे कोठड्यांचे कारागृह म्हणत. उभ्या रात्रीच्या या बारा तासात बंदिवानास शौचास न लागली पाहिजे असा बारीचा नीतिनियम असे. लघवीलाही पुरे न पडेल इतके ते मडके लहान, कोणास चुकून परसाकडे लागली तर त्याने वॉर्डरास कळवावे. वॉर्डराने ती विशिष्ट गोष्ट खोटी आहे असे जर स्वतःच्या आळसाने किंवा भीतीने ठरविले तर प्रश्न तेथेच मिटला. त्या बंदिवानाने सकाळपर्यंत तसेच मलावरोध करून थांबलेच पाहिजे. बरे, वॉर्डराने जमादारास सांगितले तर जमादार बंदिवानांस भलत्यास वेळी अशी परसाकडे जाण्याची पापी लहर आल्याविषयी दहा शिव्या आणि वॉर्डरास बंदिवानाचे गाऱ्हाणे ऐकल्याविषयी पाच शिव्या हासडून, मनास वाटल्यास आणि झोपेच्या गुंगीत आठवण राहिल्यास ती गोष्ट डॉक्टराला कळवी. डॉक्टराचे परसाकडे लागली असल्याचे प्रमाणपत्र शंभर वेळांतून एकादे वेळेस मिळणार; मग ते बारीकडे पोचवून त्याची लहर लागली तर बंदिवानास परसाकडेसाठी कुलूप उघडून बाहेर काढण्यात येई. आणि सकाळी पुनः बारीसाहेबांपुढे चौकशीत ज्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर कसे द्यावे ते कोणासच सुचत नसे असा प्रश्न विचारून शिव्या हासडल्या जात त्या निराळ्याच? "तुम रातमे गिल्ला क्यौं किया –तू रात्री आरडाओरड का केलीस?" "काय करू, साहेब परसाकडे लागली! क्षमा करा!" तेव्हा सोटा आपटून शिव्या देऊन साहेब विचारीत "पण परसाकडे का लागली! रात्री तुला परसाकडे का लागली? गोंधळलेला बंदिवान फार तर उत्तरे "लागली म्हणून लागली!" त्याबरोबर जमादार मध्ये येऊन एक थोबडात देऊन म्हणे "ए साला, साहेबाची चेष्टा करतोस?"

दयाळू बारीसाहेब इतक्यावर त्या बंदिवानास बहुधा सोडून देत. एखादे वेळी दयेने फारच द्रवून गेलेल्या स्थितीत ते असले तर नुसते सोडून न देता

परसाकडे लागल्याच्या अपराधाकरिता "एक दिवस याला कोलूचे काम द्या" म्हणून शिक्षा सांगून निघून जात.

## तंबाखूची चिमटी

अशा त्रस्त स्थितीत काही बंदिवान मलावरोध करणे अशक्य होऊन त्या कोठडीत भुईवरच परसाकडे बसत. रात्रभर त्या आठदहा फुटांच्या खोलीत त्या मळाशीच उसे ठेवून निजल्यावर सकाळी कुलूप उघडताच भंग्याची मनधरणी करीत की, तुला चोरून तंबाखूची चिमटी देईन, तू गुपचूप तो मळ काढून टाक, त्याने ऐकले तर ठीक; नाही तर, वा कोणाजवळ तंबाखूच नसली तर, भंगी बोंब मारून जमादारास सांगे. जमादार लाथाबुक्क्यांनी मारण्यासारखा बंदिवान असेल तर तसा मारी, जरा तापट असेल तर बारीसाहेबापुढे नेई व खटला भरला जाई;. कसला, तर 'खोली गदळ करण्याचा' एक तर आपल्या हाताने तो मळ काढावा म्हणून शिक्षा देऊन ते काम करून घेण्यात येई; तीन-चार दिवस खोड्यामध्ये सर्व दिवस उभे राहण्याची शिक्षा देण्यात येई.

पुन: खोड्यामध्ये उभे राहण्यात तर मलाचाच नव्हे तर चार-चार, पाच-पाच तास मूत्राचाही अवरोध करावा लागे. सकाळी सहा ते दहापर्यंत व दुपारी १२ ते ५ पर्यंत हातकडीत टांगून उभे राहावे लागे. त्या वेळात परसाकडे तर राहोच पण लघवीस सोडण्यात येत नसे.

ह्या त्रासाचा मारा सर्व बंदिवानांवर सारखाच होई. परंतु तो राजबंदीस फारच जाचे; कारण ते बहुधा दिवसाही काम करोत न करोत, कोठडीत वा चाळीत बंद असणार. त्यायोगे रात्रीच नव्हे पण दिवसाही त्यास मलमूत्र-विसर्जनाची बंदी होई. निरुपाय होई तेव्हा कोठडीत वा चाळीत चोरून भुईवर वा भिंतीवर लघवी करावी लागे. इतर निर्ढावलेल्या बंदिवानांस ते काहीच वाटत नसे. ते माणसाच्या समोर देखील तसे हसत हसत करीत, पण सभ्य जनांत वाढलेल्या राजबंदीस तसे करणे भाग पडे तेव्हा तीव्र नैतिक वेदना भोगावयास लागत. देहधर्माची नैसर्गिक आवश्यकता ही त्या बंदिगृहास सरकारच्या शिस्तीविरुद्ध एक अपराध समजला जाई. चांगले खाणे, चांगले लेणे हे तर राहोच पण लागताच परसाकडे जाणे वा पोट फुगून अवरोध असह्य होण्याचे आधीच लघवीस बसणे हीही विलासप्रियताच समजली जाऊन त्या कठोर कारागृहात ती दंडनीय समजली जाई.

## अंदमानी नीतिशास्त्र

अशा शिस्तीने माझे ज्येष्ठ बंधूस कोठडीबंदी होऊन "छिलका" –मागे वर्णन केलेले काथ्याकुटीचे काम– देण्यात आलेले असताना एकदा त्यांस अमांशाचा विकार झाला. पोट दुखत असे. जेवताच खळबळून यावे. पण एकदा

खोली बंद केली की पुन: संध्याकाळी उघडणार. इतर बंदिवानांसही अमांशादिक आजार झाले म्हणजे त्यांस रुग्णालयात नेण्यात येई आणि त्यामुळे मलमूत्र यथाप्राप्त करण्याचे सौख्य –सौख्य! – त्यांस अनुभवता येई. पण आजारीपणात देखील राजबंदी कोठडीतच बंद असत. त्यांस रुग्णालयात नेण्यात येत नसे. जोवर तो अगदी अंथरुणास खिळून पडला नाही तोपर्यंत, आणि कोठडीतही आजारी असता जे एक मडके मिळे ते देखील "आजारी" असे. आजारीपणाचे प्रमाणपत्र डॉक्टर जेव्हा दुखणे विकोपाला गेल्यावर देतील तेव्हा. त्यामुळे राजबंदीस देहधर्म यथाप्राप्त न करता आल्याने असह्य त्रास होई. अर्थात माझ्या ज्येष्ठ बंधूंना अमांशाचा विकार झाला आहे ही गोष्ट शिपायाच्या -जमादाराच्या-डॉक्टरच्या कानावर घालून ही ती कानात उतरण्यास दोन तीन दिवस लागले. पोटात दुखून रेच होऊ लागले. त्यात तो अर्धाकच्चा बंदिगृहीत भात खावयाचा आणि छिलका कुटीत कोठडीत बंद होऊन राहावयाचे. तेव्हा दुपारी मधूनच रेच होताना त्याचा अवरोध असह्य होऊन खोलीतच रेच करावे लागत. पण ती संध्याकाळी उघडताना ती गोष्ट उघडकीस येताच शिव्यागाळी होत. उभ्या बंदिगृहात त्याची चर्चा करवून घेऊन पुन: शिक्षा खाण्याचा किंवा बलात्काराने तो मळ स्वत: साफ करून टाकावा लागण्याचा प्रसंग टाळण्यासाठी त्या कचऱ्याच्या ढिगात रेच करावे आणि बाहेर तो कचरा टाकण्यास जेव्हा सायंकाळी सोडण्यात येई तेव्हा ती घाण स्वत: काही एक बोभाटा न करता नेऊन टाकावी. कित्येक वेळा हातकडीत टांगलेले असताना पोटदुखीचा आणि अमांशाचा विकार झाला असूनही त्यांस सात दिवस तसेच टांगण्यात येई. त्या वेळी कित्येकदा उभ्याउभ्याच रेच लागे. दुपारी अवेळी लघवी लागली म्हणजे खोलीतल्या भिंतीवर कित्येकजण लघवी करीत. ही एक दिवसाची वा एका प्रसंगाची गोष्ट नसून वर्षानुवर्षांची होती. अशा घाणीच्या खोलीत आणि तशा गलिच्छ देहस्थितीत राहावे लागे. निजावे लागे.

गाईबैलांसही मलमूत्रोत्सर्ग यथाप्राप्त करण्यास ते कामास जुंपलेले असताही वा रात्री बेरात्रीही अडथळा करणे क्रूरपणाचे समजले जाते. पण राजकारणात वा राज्यक्रांतीत भाग घेणारा मनुष्य त्या पशूंसही मिळणाऱ्या स्वातंत्र्यास अपात्र ठरून यथाप्राप्त मलमूत्रोत्सर्ग दुपारी १२ ते ६ आणि रात्री सर्व रात्रभर करण्याचे सौख्य भोगण्याचे धाडस करील तर शिक्षेस पात्र होय असे अंदमानीय नीतिशास्त्र समजे. अंदमानाच्या बंदिगृही दंडविज्ञानाचे हे नीतिशास्त्र बदलण्यासाठी कमिशनरपर्यंत अर्ज गेले, पण बारीसाहेब म्हणावयाचे "हे सर्व खोटे आहे महाराज! या जमादारास विचारा मी कधी अशी पीडा देतो का ते. हे लोक मर्जीविरुद्ध कट करतात आणि असे खोटे आरोप आणतात!" कमिशनर आणि इतर अधिकाऱ्यांनी म्हणावे, "पुन: खोटे आरोप कराल तर शिक्षा होईल.

तुम्ही राजबंदीच नेहमी ओरड करता. इतर लोक का करीत नाहीत? इतर लोकांना ती पीडा इतकी भोगावी लागत नसे, भोगावी लागली तरी सह्य वाटे, सह्य वाटली नाही तरी लाथाबुक्क्यांचा मार आणि कोलूच्या धास्तीने बारीसाहेबाविरुद्ध ब्र काढावयाची सहसा धमक नसे.

**नैसर्गिक विधीचा हक्क!**

अखेर परसाकडे आणि लघवी लागणे किंवा लागून तिचा अवरोध करणे अशक्य झाल्यावर तरी ती करू देणे, हा शिस्तीचा भंग वा अपराध नव्हे असे ठरवून घेण्याचा महत्त्वाचा राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यासाठी हिंदुस्थान सरकारच्या गृहमंत्र्यापर्यंत चळवळ करावी लागली. हे गृहस्थ एकदा अंदमानास प्रत्यक्षच जेव्हा आले –ती कथा पुढे येईलच– तेव्हा राजबंदीतील काहीजणांनी त्यांचेपुढे आपले गाऱ्हाणे मांडले. बारी एकदम उलटला. खोटे खोटे म्हणून ओरडला. श्री. नंदगोपाल म्हणून एक पंजाबी राजबंदी जेव्हा स्पष्टच म्हणाले की, "हे पाहा या बंदिगृहातील खोल्यात तुम्ही एकदा प्रत्यक्ष हिंडा आणि तेथील भिंतींच्या कोपऱ्यांचा वास घ्या म्हणजे तुम्हास कळेल की अवेळी लघवी लागल्याने किंवा रात्रीचे मडके भरून गेल्याने बंदयांना भिंतीवर लघवी करावी लागते की नाही. ते तुमचे नाकच आमचे साक्षीदार" ह्या फटकळ बोलण्याने नंद गोपालास जरी 'चुप रहो चुप रहो!' म्हणून थांबविण्यात आले आणि बारीने "माणसाळविलेल्या" त्या राजबंद्यांतील एकदोघे त्या उत्तरास अश्लील आणि असभ्य म्हणण्याचा हांजीखोरपणा करण्यास जरी कचरले नाहीत, तरी गृहमंत्र्याने बारीचे गुपचुप कान पिळले आणि त्यापुढे हा किळसवाणा त्रास कमी झाला. किळसवाणा इतका की वारंवार देहाचा तिटकारा यावा. "स्वांगजुगुप्सा परैरसंगश्च" म्हणून योगसूत्रात ग्रंथित केलेले सत्य अनुभवास यावे. स्वतः ह्या नंदगोपाळावरही एकदा चाळीत काम करताना मलावरोध अशक्य होऊन सर्वांसमक्ष परसाकडे होण्याचा प्रसंग आलेला होता, आणि ते कृत्य जाणून केले म्हणून त्याच्याविरुद्ध कागाळी करून बारीने त्यास अपराधीही ठरविले होते.

**पहिला संप**

त्या नाना प्रकारच्या छळांचा परिणाम त्या वेळेस असलेल्या राजकीय बंदिवानांवर निरनिराळा झाला. प्रथमतः सर्वांचाच हेतु शक्य तितक्या यातना सोसूनही येईल ते काम करावे आणि तुरुंगातील नियम पाळावेत असाच होता. परंतु जेव्हा शारीरिक आणि मानसिक कष्ट असह्य होऊ लागले तेव्हा सर्वांच्याच पुढे "जगावे की मरावे" हा प्रश्न येऊन पडला. जे फारच थोडचा म्हणजे पाच-सात वर्षांच्या शिक्षेसाठीच आलेले होते त्या सर्वांचाच आग्रह होता की त्यांनी धैर्याने सर्व संकटे इतके दिवस-वर्षे-जीवनचे जीवनभर सोसावी लागणार होती की ती सोसता सोसताच कोठे तरी मरणाचे भक्ष्य व्हावे लागणार हे उघड दिसत होते.

त्यांनी मग ती संकटे सोशीत मरण्यापेक्षा ती सोसण्याआधीच का मरू नये?

या भयंकर प्रश्नाचा, जो प्रश्न त्या स्थितीत तात्त्विक नसून प्रतिक्षणी प्रत्यक्ष समोर उभा राहत असे, परिणामी राजबंदींच्या दोन टोकांवर दोन विरुद्ध दिशांचा झाला. एका टोकास मागे उदारणार्थ वर्णन केल्याप्रमाणे काहीजणांचे मानसिक आणि नैतिक धैर्य सुटून वाटेल त्या प्रकारे अधिकाऱ्यांची मनधरणी करून कसे तरी पण त्या कष्टांतून सुटावे अशी प्रवृत्ति झाली. परंतु उलट टोकास असलेल्या इतर तरुणांची, मध्यंतरी यातनांनी काही दिवस दबलेली परंतु यातनांचा आणि अभिभवाचा अतिरेक होताच पुनः एखादया खाली केलेल्या प्रज्वलित पोताप्रमाणे वर अधिकच उफाळून उसळलेली तेजस्विता त्यास "मर पण मानभंग करून घेऊ नकोस. मर, पण शक्य तोवर झुंजत मर" म्हणून चेतवू लागली. मधल्या मनोवृत्तीच्या लोकांस विवेक म्हणाला, "जग! ध्येयाविरुद्ध जोवर तुझे जगणे होत नाही तोवर शक्य तो राजनीतीचा आश्रय करून जग. पण जर ध्येयाविरुद्ध ध्येयाची अंतिम हानी करूनच जगावे लागत असेल तर मात्र त्वरित मर!"

कसा तरी जग अशी ज्यांची प्रवृत्ति झाली त्यांनी कोणत्या वर्तनक्रमाचा आश्रय केला हे मागे दिग्दर्शित केलेच आहे, झुंजतच मर आणि विवेकाने मर वा जग अशा उभय पक्षांचे लोकांनी एकत्र होऊन अखेर त्यांच्या होत असलेल्या छळाचा प्रतिकार नसला तरी प्रतिषेध म्हणून सक्त कष्टाचे काम करावयाचे नाही म्हणून निश्चय केला. तो प्रथमतः घाण्याचे काम नाकारण्याचे संपात व्यक्त झाला. हाच सेल्युलर बंदिगृहातील राजकीय बंदिवानांचा पहिला संप होय. हा फार लहान होता. परंतु बंदिगृहांत आणि बारीसाहेबाच्या छातीवर कटाने संप होणे ही गोष्ट इतकी धाडसाची मानली जात असे की, त्या थोडयाशां लोकांनी पण जुटीने कामाचा इनकार करताच शेकडो बंदिवानात मानसिक खळबळ उडून गेली. त्याच मानाने बारीसाहेबांस आपल्या शक्तीचा आणि अधिकाराचा हा अपूर्व उपमर्द आहे असे वाटून तो बंदिपाल अगदी चवताळून गेला. भोळा बिचारा बारी! हा संप म्हणजे, हा उपमर्द म्हणजे काहीच नाही, असले संप आणि उपमर्द त्यास पाहावयाचे होते हे तेव्हा त्यास कसे कळणार?

### पोर्ट ब्लेअरचा परमेश्वर

बारीसाहेब इतर बंदयांस आणि कधी कधी तर राजकीय बंदिवानांसही आपली ती जाड काठी एखादया राजदंडाप्रमाणे आपटीत म्हणत असे "देखोरे साला लोग! (साला लोग हे बारीसाहेबाच्या भाषेतील बंदिवानांच्या वर्गाचे जातिवाचक नाम असे) दुनियामे एक परमेश्वर बसता है. वो आकाशमे रहता हैं. परन्तु पोर्ट ब्लेअरमें दो परमेश्वर रहते हैं. एक आकाशमे और एक पृथ्वीपर बस्स. पृथ्वीपर रहनेवाला वो पोर्ट ब्लेअरका परमेश्वर मै हूं! अुपरका परमेश्वर

तुम्हे अुपर फल देअेगा. पर मै पोर्ट ब्लेअरका परमेश्वर तुम्हे इधरके इधरही फल देऊंगा. ठीक चलना. तुम्ही माझ्यावरच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे – दिल्लीच्या लाटकडें गेलेत तरी मी म्हणेन ती पूर्व दिशा ठरेल हे ध्यानात धरा!" एकदा आम्हास गंमत दाखविण्याकरता आणि सर्व बंदी त्यास कसे थरारत ते दाखवून आम्हास किंचित दिपविण्याचा गुप्त इच्छेने त्याने सर्व बंदिवानांच्या जोडचा-जोडचांनी लांब ओळी बसवून पेटी ऑफिसर्स आणि सैनिक जमादार उभे असताही एकदम आत घुसून विचारले, "क्यारे पेटी ऑफिसर, इस वक्त रात है या दिन!' त्या नवशिक्या बंदिवानांतीलच नव्याने बढती मिळालेल्या अधिकाऱ्याने –पेटी ऑफिसरने– सांगितले "दिन है हुजूर." बारीसाहेब एकदम चवताळून म्हणाला, 'नही रात है.' पेटी ऑफिसर म्हणाला, "दिन है.' तेव्हा बारीसाहेब रागारागाने त्याच्या त्या जुन्या मुरलेल्या जमादाराकहे वळून गर्जला, "क्या जमादार, अब दिन है या रात? हमको सफा रात मालू पडती है." जमादार म्हणाला, "जी हुजूर अब तो सफा रात पडी है!" तेव्हा बारीसाहेब किंचित खोचून म्हणाला, "तुम तो ठीक बोले. पण तुम्ही नव्या पेटी ऑफिसरास नीट शिक्षण देत नाही हे तर उघडकीस आले ना? पुनः असे झाले तर बघा!" नवीन कोणीही पेटी ऑफिसर झाला की त्याला 'हां जी—हुजूर' आणि क्रूर पठाण जमादार खरोखरच बारीबाबा म्हणेल त्यास 'हो म्हणत जा' म्हणून सक्त आज्ञा देत असे.

अशा ऐटीने आजपर्यंत बंदिवानांना चळचळ कापीत ज्याने ठेवले तो बारी राजकीय बंदिवानांनी केलेला त्याच्या अधिकाराचा हा लहानसा उपमर्द पाहूनही चिडून गेला ह्यात आश्चर्य नाही. त्या वेळपर्यंत राजबंदिवानांसही पठाणी अधिकाऱ्यांकडून तो अश्लील शिव्या देववी आणि काम पुरे न झाले तर किंवा राजकीय बंदिवान एकमेकांशी बोलत असता धरले गेले तरी देखील ते पठाणी वॉर्डर वा पेटी ऑफिसर त्यांच्या ताडकन थोबाडीत उडवून देत. ही गोष्ट त्याच्या कानावर घातली असताही तो उलट हंसे. पण तेच राजबंदी आता एकदम इतके उलटले की, शिवीस शिवी आणि एकादोघांनी तर थोबाडीत देण्यास आरंभ केला. काम इनकार करण्यांत ज्यांनी ज्यांनी भाग घेतला होता त्यामध्ये एकादोघांनी तर बारीची देखील शोभा उडविण्यास आरंभ केला.

उदाहरणार्थ एकच गंमतीची गोष्ट सांगतो. श्रीयुत[1] ...... ह्यांना दहा वर्षे काळेपाण्याची शिक्षा होती. हे पंजाबांतील एका संभावित घराण्यातील सुशिक्षित आणि अतिशय पापभीरू गृहस्थ असत. ह्यांना प्रथमच जेव्हा घाण्याचे काम देण्यात आले तेव्हा हे सकाळी खोलीत गेले. सरासरी दहा वाजेपर्यंत

1. यांचे नाव नंदगोपाळ : उपेंद्रनाथ बंडोपाध्याय यांचे अनुभव 'कारावास कहानी'
प्रकाशक : राजस्थान एजन्सी, कलकत्ता

सावकाश जे होईल ते काम केले. जेवावयाची घंटा होताच स्वारी खाली उतरली. कोलूमधल्या बंदयांस काम पुरे केल्याविना स्नान, जेवण इत्यादी अवश्य कर्तव्येही कशी नीट किंवा मुळीच करू देत नसत ते पूर्वीच सांगितले आहे. पण श्रीयुतांना त्याचे काय! ते नीट स्नानाचे हौदावर जात, चांगले अंग चोळून स्नान झाले की जेवण घेऊन जेवावयास बसत. तोवर इतर बंदिवानास शिवीगाळ व हाणामार करून पेटी ऑफिसरांनी परत कामावर जुंपलेले देखील असे. श्रीयुतांनाही शिवीगाळ भरपूर मिळतच होती. पण ती आपल्याला नसून दुसऱ्याच कोणास आहे असा निर्ममत्व बुद्धीने ते सावकाश जेवू लागत. वॉर्डर व पेटी ऑफिसर शिवीगाळ करीत मागे लागतच 'चलो, काम कौन तुमारा × × × करेगा. उठो' इत्यादी इत्यादी. ते थकून हवालदारास आणीत. हवालदार समजावू पाही. पण शांतपणाने श्रीयुत त्यास समजावू लागत की; हवालदारजी, प्रत्येक घास चावून गिळला तर नीट पचतो. घाईघाईने खाल्ल्याने पोट बिघडते. हवालदार निराश होऊन बारीला घेऊन आला. तुरुंगात बारी 'आता है' ही बातमी ऐकताच आता कोणावर तरी कुऱ्हाड कोसळते आहे असेच सर्वांस ऐकू येऊन सर्व दचकून राहत. पण बारी आला तरी श्रीयुत जेवतच होते. बारीने वसकन् ओरडून विचारले, 'सर्व बंदिवान गेले कामावर, तू कोण मोठा बाजीराव आहे की काय? अजून जेवतो आहेस. काम पुरे कोण करील? तुझी हाडे नरम करीन नरम. खूप समजून ऐस' श्रीयुत घास चघळीत स्मित वदनाने म्हणाले की, 'मी काही उगीच बसलो आहे रिकामा की काय? वैदयशास्त्राच्या मते प्रत्येक घास निदान दहादा तरी चावला जावा. पचनक्रियेस खरे म्हटले असता तोंडांतून सुरवात होते.' हे वैदयशास्त्रीय मत ऐकून अधिकच चिरडीस गेलेला बारी वेडेवाकडे गर्जत म्हणाला, थांब, तुझ्या अनियमिक–बेकायदेशीर– वर्तनाविषयी उदया खटला भरतो. श्रीयुत म्हणाले, दहा ते बारा वाजेपर्यंत सरकारने दिलेल्या सुटीत ह्या अज्ञान बंदिवानांस तुम्ही कामावर जुंपविले हेच अनैयमिक नव्हे काय? बारी मनात चपापला. तो दहा ते बाराच्या सुटीत देखील नियमाविरुद्ध काम तुरुंगात चालू ठेवी. अखेर तुला काय पाहिजे तितके तू घास चघळ पण जर संध्याकाळी काम न केलेस तर मात्र तुझ्या पाठीची साले वेताखाली सोलवीन अशी धमकी देऊन आणि सर्व बंदिवानांसमक्ष आपल्या आज्ञेचा असा अपमान केला तरी इतरांप्रमाणे यांसही आताच्या आता लाथाबुक्क्याखाली झोडपता आले नाही या पाणउताऱ्याने चरफडत बारी परत गेला.

### वैदयशास्त्राचे आणखी एक प्रमेय

इकडे श्रीयुतांचे अखेर कसेबसे जेवण संपले. पेटी ऑफिसर, हवालदार, बॉर्डर सर्वजणांना हायसे वाटले. त्यांनी त्यांना आणून खोलीत घाणा

फिरविण्यासाठीं म्हणून कोंडले. प्रार्थनाही केली की, आता तरी वैदयशास्त्राप्रमाणे जेवण संपल्याने काम कसून करा. कारण बंदयांचे काम अपुरे राहिले म्हणजे बारी प्रथम पेटी ऑफिसर व वॉर्डर यांचीच खरडपट्टी काढीत असतो हे विसरू नका. असे चुचकारून ते सर्व पुढच्या बंदिवानांस शिवीगाळ करीत गेले. थोडचा वेळाने परत येऊन श्रीयुत घाणा एकसारखा फिरवीत असतील म्हणून पाहातात तो काय! श्रीयुतांनी एक घोंगडी अंथरून तीवर आपला लंबाचौडा देह यथासुख पसरून आणि दुसरी घोंगडी पांघरून घोरण्यास आरंभ केला आहे! चिडून जाऊन शिव्या देत पेटी ऑफिसर म्हणाला, "अे सैतान! अरे तुला झाले तरी काय! का माझा जीव घेतोस! आता बारा वाजून गेले, तुझे जेवण झाले, आता तरी उठ!" श्रीयुतांनी डोळे उघडले, हळूच हाताने गलगा करू नका म्हणून खुणावले. नंतर तोंडाने सांगितले "जमादार! जेवण झाल्याबरोबर घाणा फिरवू लागलो असता खाल्लेले अन्न पचणार नाही, जेवणानंतर थोडी वामकुक्षी करावी असे वैदयशास्त्राचे आणखी एक प्रमेय आहे. माझी आजीदेखील असेच सांगत असे!" सर्व बंदिवान खो-खो हंसून उठले. जमादार चिडला. पण खोली उघडून श्रीयुतांस मारण्याइतका धीर न झाल्याने हसणाऱ्या दोघाचौघा बंदिवानांच्या थोबाडात चढवू लागला. संध्याकाळी अेवीतेवी काम म्हणजे १५ पौंड तेल श्रीयुतांनी पुरे केले. वास्तविक अितरांस दिवसभर खपूनही इतके झाले नसते, पण श्रीयुतांचे शरीर चांगले भक्कम होते. मन कसे होते हे वरील एका चुणुकेवरून वाचकांस समजलेच असेल. अंती त्यास कमी कामाविषयी शिक्षा झाल्या. कमी खाण्यावर ठेवले, शेवटी सुपरिटेंडेंटने करार केला की, तीन दिवस पुरे काम कराल तर तुम्हांस कोलूमधून काढू. त्याचप्रमाणे श्रीयुतांनी वैदयशास्त्रीय नियमांस तेवढचापुरता निरोप देऊन ते काम तीन दिवस पुरे केले. पण इतके नमते घेतलेले पाहताच बारीने पुनः कुरघोडी करण्यास आरंभ करून करार तोडून त्यांस घाण्यावर धाडले. तेव्हा त्यांनी साफ सांगितले, "काम करीत नाही. जा, बैल नाही; आम्ही मनुष्य आहोत!" येथूनच पहिल्या संपास आरंभ झाला. राजबंदयांची दृष्टी फिरून, ते संपापर्यंत येऊन ठेपल्याने बारी देखील मनातल्या मनात किंचित दचकला होता.

जे राजबंदी संपात समाविष्ट झाले त्यांजवर शिक्षांचा भडिमार सुरू करण्यात आला. आठ दिवस हातकडी, बेडी, कोठडीबंदी इत्यादी नैयमिक शिक्षा तर देण्यात आल्याच. परंतु नियमाविरुद्द शिक्षाही ठोठावण्यात येऊन वरील श्रीयुतांसारखे जे अगदी निधडचा छातीने वागत त्यांची गुर्मी जिरविण्यासाठी दहादहा बारा-बारा दिवस कांजीविना दुसरे खाण्यासही देण्यात आले नाही. तुरुंगात दहा दिवस कांजीवर बंदिवानास ठेवण्याचा नियम नाही. पण त्यास असे नुसत्या दोनदा तीनदा दिलेल्या पेजेवर ठेवून त्यांची शक्ति कमी झाली असता ते

मनानेही दुर्बळ होतील, अशा आशेने त्यास छळण्यात येऊ लागले. ही शिक्षा देण्यात येई, पण बंदिवानांच्या शिक्षापत्रकात ती लिहिली जात नसे. पुढे जेव्हा तिकडे हिंदुस्थान सरकारकडून एक मोठे अधिकारी शोध करावयास आले (ते वृत्त पुढे येईलच) तेव्हा राजबंद्यांनी हे अनैयमिक पीडन त्यांचे दृष्टीस आणले असता बारीने हे खोटे आहे हे शिक्षापत्रकावरूनच सिद्ध केले! आणि त्या अधिकाऱ्यांनी करवून घेतले! मला या सहबंदिवानांनी शपथेवर असे सांगितले आहे की, एका बाजूला त्यांस पेजेवर ठेवून दुसरीकडे ते विरुद्ध जात असता कोयनेलचे घोटचे घोट त्यांचे घशांत ओतले जात. त्यायोगे चक्कर येऊन पोटात आग होऊन त्यांस फारच त्रास होई. पण ह्या सर्व त्रासाने संपवाले हरत नाहीत, इतकेच नव्हे, तर त्यांचा हा एकोपा आणि धैर्य.पाहून इतर बंदिवानांवरील बारीचा अमानुष धाक उडत चालला आहे हे ओळखून अखेर आता आम्ही तुम्हास कोलूवर वारंवार धाडणार नाही. इतकेच नव्हे, पण इतर बंदिवानांप्रमाणे तुम्हासही तुरुंगाचे बाहेर प्रदेशांत काम करण्यास सोडण्यात येईल असेही आश्वासन देण्यात आले. राजकीय बंदिवानांस तुरुंगाबाहेरील जे सांगत त्यावरून बाहेर पुष्कळ स्वतंत्रता असे हे ठाऊक होते. त्या व्यतिरिक्त आपला बाहेर जाण्याचा अधिकार एकदा मान्य करून घेतला म्हणजे मग ओघानेच पाच वर्षांनंतर स्वतंत्र काम करण्याचा आणि दहा वर्षांनंतर "तिकीट" घेऊन घर करून राहण्याचा अधिकार मिळण्याचेही सूत-उवाच केल्यासारखे होईल असे जाणून कसेबसे बाहेर पडावे असे राजबंद्यांस साहजिकच वाटे. तेव्हा काही लोकांस तरी एक वर्ष तुरुंगवास भरल्याने नियमाप्रमाणे बाहेर सोडण्यात येणार आहे हे ऐकून संपाचा एक उद्देश सफल झाला असे मंडळी समजली आणि संपांतून एक एक करून निघून कामावर जाऊ लागली. थोड्याच दिवसात काही मंडळी बाहेर काढण्यात आली. खाडीमध्ये छातीमांड्याएवढ्या चिखलात उतरून चिखल भरून देणे, रस्ते झाडणे, नारळ वाहणे अशी त्यांस कामे देण्यात आली. कित्येकास गाडीस जुंपण्यात आले.

अंदमानामध्ये गाडीमध्ये सरकारी अधिकारी .बसतात आणि ती ओढण्यास बैल घोडे इत्यादी पशूंस लावले असता होणारा खर्च टाळता यावा म्हणून बंदिवानास लावतात. एकसारखी दौडीने ती गाडी ओढीत नेताना आणि मोठमोठ्या चढणीवरून धापा टाकीत ती गाडी ओढताना आणि "चलौ साला कैसा चलता है!" म्हणून वर शिव्या खाताना बंदिवान वारंवार जिकडे तिकडे पाहण्यात येत. ही रीत न आवडून बंदिवानांकडून आपली गाडी खेचून न घेणारे एक दोन इंग्रजी अधिकारीही मला माहीत आहेत. पण ती गाडी खेचण्यास साफ नाकारणारे बंदिवान मात्र कोणास माहित नव्हते. तथापि बारीच्या कुशाग्र नसल्या तरी लठ्ठाग्र बुद्धिमत्तेने तेही सर्वांचे दृष्टीस आणविले. कारण राजबंदी

किती खटयाळ आहेत हे सुपरिंटेंडेंटचे मनावर बिंबविण्यासाठी त्यांना त्यांच्यातील एकादोघा मानी आणि धीट गृहस्थांसच बाहेर गेल्याबरोबर गाडीस जुंपविण्याचे बारीने हवालदारांदिकास सांगून ठेवले. अर्थातच गाडी ओढा म्हणताच त्या निर्भीड लोकांनी माणसांची गाडी ओढण्यास आम्ही बैल नाही म्हणून उत्तर दिले. बारी लगेच सुपरिंटेंडेंटास म्हणाले, 'पहा हे खटयाळ लोक! तुरुंगांत म्हणत, बाहेर काढा, आम्ही आत कोलू करणार नाही! बाहेर काढले तर म्हणतात, गाडी ओढणार नाही! आता अशा सभ्य लोकांसाठी मी निर्दोष असे काम तरी कोठून आणू? आणि यांना जर यांच्या गाऱ्हाण्यावरून मी दुसऱ्या सुलभ वा सभ्य कामावर नेले तर इतर बंदिवान नाही का या पक्षपाताविषयी मला दोष देणार?' परंतु हेच पापभीरू बारीसाहेब मनात आले तर, ज्या बंदयांना चार अक्षरे येत नसत, मग ते दरवडेखोर असले तरी त्यांना हे कार्यालयांत आपल्या बंगल्यावर देखील आरामाची कामे देत. इतकेच नव्हे पण ह्या राजकीय बंदिवानांतच त्यांच्या कच्छपी जे लागले होते आणि हांजी हांजी करू शकत त्यासही नुसते बसवून ठेवण्यास गुपचूप आज्ञा ह्या बारीसाहेबांनी सोडलेल्या असत. तेथे त्यास ह्या पक्षपाताच्या पापाचे भय मुळीच वाटत नसे. बारीसाहेबांदिकांची पक्षपाताची व्याख्या म्हणजे ज्यायोगे त्यांच्या पक्षाचा पात-पतन होण्याचा संभव दिसतो तो पक्षपात!

मी तुरुंगांत ज्या वेळी जाऊन पोहोचलो त्या वेळपर्यंतच्या राजकीय बंदिवानांच्या वृत्तान्ताचा सारांश वर दिला आहे. हा सर्व वृत्तांत मी आल्याचे महिन्याचे आंतबाहेरच मला कळविण्यात आला. राजकीय बंदिवानांत काही लोक संपाच्या धोरणाच्या प्रामाणिकपणे विरुद्ध होते. काही जे बारी म्हणेल तसेच म्हणावयाचे असे व्रत धरलेले. त्यांच्याकडून बारीने राजकीय बंदिवानांत फूट पाडण्यात आणि संप करणे ही आपण मोठी चूक केली, ज्यांनी अधिकाऱ्यांच्या शिवीला शिवी आणि उर्मटपणास उर्मटपणाचे वर्तन आरंभले त्यांचे ते करणे अत्यंत निंद्य होते, तो असभ्यापणा होय इत्यादी चर्चा करविण्यास प्रारंभ करविला होता. साहजिकपणेच या विषयावर माझे मत काय ते काढण्यास राजबंदीचाच नव्हे तर बारीसाहेबांचाही आटोकाट प्रयत्न चालला. सरासरी आठ पंधरा दिवस मला वरच बंद ठेवल्यानंतर खालचे चाळीत दिवसा काम करण्यास आणले आणि प्रथम मागे वर्णिलेले छिलका कुटण्याचे काम दिले. वास्तविक छिलका दोन वा दीड पौंड देण्यात येतो. पण मला प्रथमच एक पौंड देण्यात आला. ही मजवर विशेष कृपा होय असे बारीने मला माझ्या योग्यतेवर एक गोडसे व्याख्यान देऊन सांगितले. ते जरी दयाळुपण असले तरी माझ्या हातात ती नारळाची सुकलेची कवची मऊ लागावीत इतके मार्दव काही त्या दयेत असणे शक्यच नव्हते. तेव्हा कुटून कुटून माझे हात सोलून निघाले. स्नायू

सुजून दुखू लागले. तळहातास मोठमोठे फोड येऊन आणि तसेच कुटावे लागून रक्त वाहू लागले. मी सुपरिंटेंडेंटास तो हात दाखवून म्हटले, काम बदलता येणार नाही का? निदान काही दिवस बंद ठेवले जावे काम! त्यांनी एका वाक्यात "तसे सगळ्यांचेच होते. तुम्हांस एक पौंड छिलका दिला. दोन दिला नाही हीच सरकारी कृपा समजा" असे उत्तर दिले आणि ते चालते झाले. अर्थातच छिलका तसाच कुटावा लागला. मी तसा कुटून काढलेल्या आणि बांधून दिलेल्या काथ्याचे जुडग्यांवर कित्येक वेळा ते रक्ताचे थेंब पडलेले असत. पण तो पौंडभर आहे की नाही हे पाहण्याच्या धांदलीत तो कुटणाऱ्याच्या हाताच्या रक्ताने माखलेला आहे की नाही हे पाहण्यास बारीसाहेबांस वेळ मिळत नसे.

### "साला लोग! बेत लगावेंगे"

तथापि प्रत्यही संध्याकाळी येऊन बारीसाहेब मजशी इंग्रजीमध्ये दहा-पाच मिनिटे बोलल्याविना जात नसत. त्यांच्या बोलण्यात लवकरच तेथील राजबंदिवानांच्या वर्तनाच्या उल्लेख येऊ लागला. एका राजबंद्याची माहिती तर काय पण नुसता नमस्कारही दुसऱ्यास पोचविण्याचा इतरांना सक्त निषेध करण्यात आला होता आणि तसे करताना कोणी धरले गेल्यास त्यास वॉर्डरकीवरून काढून वा आठ दिवस कोलूत धाडून देण्यात येत असे. परंतु त्याच राजबंद्यांची माहिती बारीसाहेब मात्र इतरांस वाटेल तशी पोचवू शकत. पण वाटेल तशी म्हणजे त्यास त्यांच्यांत फाटाफूट पाडण्यास उपयुक्त होईल अशी. बारीसाहेबांस माहीत होते की, त्यांनी काही केले तरी मला राजबंद्यांची मागची माहिती मिळाली होती. तेव्हा आपली बाजू तरी का न मांडा म्हणून बारीसाहेब ती सांगत. त्यात मुख्य पालुपद म्हणजे जे लोक त्यांच्या कच्छपी लागलेले असत त्यांची भरपूर स्तुति आणि जे संपांत भाग घेऊन कारागारांतही स्वतःचा व्यर्थ अपमान वा शिवीगाळी सहन न करता अधिकाऱ्यांशी निर्भयपणे वागत त्यांची मनमुराद निंदा आणि ह्या दोन हेतूंपासून अनुमानित होणारी मुख्य गोष्ट की, माझ्यासारख्या शिक्षित आणि प्रख्यात व्यक्तीने त्या मूर्ख अशिक्षित आणि असभ्य लोकांचे नादी लागू नये यांतच माझे कल्याण आहे हे निक्षून सांगणे. अशा बऱ्याच वेळा झालेल्या संभाषणात मी शक्य तो मौन धरले. पण केव्हा केव्हा आपल्या बांधवांची निष्कारण वाटेल ती निंदा ऐकून केवळ कोणाची कृपा संपादन करण्याकरिता तोंडदेखलेपणाने होकार भरणे मला असह्य होई आणि बारी तर नुसत्या मौनाचे समाधान न होता विचारीत सुटे, 'तुम्हांला काय वाटते? सांगा, सांगा' एकच उदाहरण द्यावयाचे म्हणजे मागे ज्या श्रीयुत –यांची मी माहिती सांगितली त्यांचे संपांतील सडेतोड वर्तन हे असभ्य होते असे म्हणून "त्याला वेड लागलेले आहे, तो हीन कुलांतला मनुष्य आहे" असे बारी मला आग्रहाने सांगू

लागले. इतकेच नव्हे तर वर मधाचे बोट लावून मला म्हणाले "तुमच्यासारख्या सुशिक्षित मनुष्यास याविषयी काय वाटते हे मला ऐकावेसे वाटते. सांगा, वेड लागलेल्या मनुष्याविना असे कोण वर्तन करील?"

**बारीने रचलेले नाटक**

तेव्हा न साहून मी स्पष्ट सांगितले की, जरी माझी आणि तुम्ही म्हणता त्या राजबंद्यांपैकी कोणाची ओळख अजून झाली नाही तरी तुम्ही सांगितलेल्या वृत्तांतावरूनही त्यात मला मतिभ्रष्टता वा असभ्यता याचा लवलेशही दिसत नाही. कष्ट असह्य झाल्यावर किंवा नियमाविरुद्ध अधिकाऱ्यांनी पीडा देण्यास आरंभ केल्यावर राजबंदिवानांस काय किंवा इतरांस काय संप करून त्यांचा प्रतिषेध करण्याव्यतिरिक्त दुसरा कोणता मार्ग सहज सांपडणार आहे? "तुम्ही काही सांगितले तरी श्रीयुत –हे चांगले कुलीन दिसतात. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे लुच्चे अगर खर्डेघाशे (रोग ऑर क्लॉर्क) ते खास नाहीत" माझे हे उत्तर ऐकून बारीसाहेब लाल झाला. पण कसेबसे त्या दिवशीचे संभाषण संपवून मजवर परिणाम करण्यासाठी त्याने दुसरेच एक नाटक दुसऱ्या दिवशी करविले. ज्या राजकीय बंदिवानांस बाहेर कामास धाडण्यांत येत असे ते अकरा वाजण्याचे सुमारास परत जेवावयास बंदिगृहांत आलेले होते. त्यांस मी जेवावयास बसलो होतो तेथेच जेवण घेण्यास बोलाविले गेले. त्यांनी पुरती स्नाने देखील केली नव्हती. त्यांचे कपडे आणि अंग चिखलाच्या पाटचा भरून वाहता वाहता उडालेल्या चिखलाने गदळ आणि घाणेरडे झाले होते. तसेच त्यांस उभे केले; इतक्यात बारीसाहेब आले आणि मजकडे उर्मटपणे पाठ फिरवून मोठ्या रागाने काठी आपटीत त्या टोळीस म्हणाले, "काय रे, आज तुम्ही जमादारांनी सांगितल्या तितक्या चिख्लाच्या पाटचा कां फेकल्या नाहीत? हे पहा हड्डी मोडून टाकीन–टाकीन! देखो जमादार, आज दुपारमे भी ए लोग सब काम नही करेंगे तो मेरे सामने लाव. इस साला लोगको बेत लगाके इनकी × × फाड डालना पडेगी!

अशी अश्लील भाषा वापरीत मला जसे काय तेव्हाच पाहिले असे दाखवून वळून तो बंदिपाल मला म्हणाला, "हे पहा, सावरकर, ह्या लोकांच्या तुम्ही नादी लागू नका. ही भिकारडी माणसे होती. तुम्ही शिकलेले आहात. यांचे काय? आठ-दहा वर्षे भरून हे आता घरी जातील, तुमचे तसे नाही. तुम्हास पन्नास वर्षे शिक्षा आहे आणि तुम्ही राजकीय बंदी नाही. तेव्हा यांच्याशी नुसते बोलणे चालणे ठेवल्यासही तुमची हानि होईल. तुम्ही आपले स्वतःचे तिकिटाकडे (बंदिपत्रक ज्यात मला पन्नास वर्षे शिक्षा दिलेली होती ते) पाहून स्वतःपुरती चिंता पाहा. तुम्ही हे सर्व ऐकले का?"

## तुम्ही राजकीय बंदिवान नाही

परंतु मी त्या प्रश्नास काहीच उत्तर न देता रागावलेलासा दिसत जेवत बसलो आहे हे पाहून जरा ओशाळलेसे झालेले बारीसाहेब, "पहा, ह्यात तुमचेच हित आहे. तुम्ही राजबंदी नसून त्या इतर चोरापोरांसारखेच एक साधारण पापी आहात." असे पुन: पुन: बजावीत निघून गेले. मी राजकीय बंदिवान नाही हे त्या दिवशी मला प्रथम कळले. ते मला पटावे म्हणून किती वेळा बारीने, सुपरिंटेंडेंटाने आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घोकले असेल त्याची गणती नाही!

बारीसाहेब गेले. माझ्यासमोर राजबंदिवानांस ती धमकी दिल्याने आपणासही अशा शिव्या आणि धमक्या आणि हाणमार सोसावी लागेल असे वाटून मी दबून जावे म्हणून बारीने हे प्रत्यक्ष वस्तुपाठीय उदाहरण मला दाखविले होते. ते पाहून मला त्या राजबंद्यांची दया आली. आपणासही दु:खे सोसावी लागतील हे कळलेही. पण त्याचा परिणाम दबून जाण्यात न होता त्यांच्याबरोबर हे अपमान सहन करण्याची पाळी आपणावरही यावी म्हणजे यांना उनाड, भिकारडे म्हणून टोमणे मारले जात असता मीही त्या भिकारड्या अशिक्षितांच्याच पंगतीत आहे हे जाणून त्यांचे मानसिक दु:ख कमी होईल आणि ते टोमणे आहेत त्याहूनही फोल ठरतील असे वाटले. त्यांच्याशी बोलण्याने मला शिक्षा मिळेल हे माहीत असूनही तेथील राजबंदिवानांतील लोकांस प्रथमच मी तेथे प्रत्यक्ष भेटू शकलो असल्याने मी नीट पुढे झालो आणि त्यांस त्यांची नावे विचारली. त्यांची म्लानवदने पाहून मी म्हटले, "माझ्यासमोर तुम्हांस तो बंदिपाल अश्लिल भाषा बोलला म्हणून तुंम्ही मनांत संकोच करू नका व धीर खचू देऊ नका. आज ते तुम्हांस भिकारडे म्हणत आहेत, उद्या मला म्हणतील. हा अपमान तुमचा नसून तुम्हांस असले दु:शब्द जो बोलतो तो स्वत:चाच तसा अपमान करून घेतो. आज आपण अवश आहो. आज आपला या जगतात अपमान होईल पण असाही अेक दिवस क्वचित येईल की अंदमानाच्या याच कारागारांत राजबंदिवानांचे पुतळे उभारले जातील आणि येथे हिंदुस्थानाचे राजबंदिवान राहत असत म्हणून हजारो लोक यात्रेस लोटतील!"

माझ्या या भाषणाचा कष्टपीडित संत्रस्तांपैकी कोणासही फारसा अर्थ कळलासा दिसला नाही. निदान मला ते विचार प्रदर्शित करताना स्वत: जे तेज मनात संचरलेसे वाटले आणि निराशा मावळतेशी भासली तसे त्यांच्या मुद्रेवर काहीच विशेषसे भाव प्रकट झाल्याचे दिसले नाही. केवळ एकजण मात्र जरा चमकल्यासारखा होऊन म्हणाला, "तुम्हाला, खरेच का असे वाटते?" मी म्हटले, "क्वचित असे होईलही! निदान झाले पाहिजे"

इतक्यात पेटी ऑफिसर आणि वॉर्डर ओरडत येऊन "ए बाबू! तुमको क्या हुवा! तुम्हांला त्यांच्याशी बोलताना बारी पाहील तर आमचा जीव घेईल. चलो! आम्ही तुमची फार मर्यादा ठेवतो. पण असे कराल तर–देखो!" असे म्हणत मला ओढून घेऊन जाऊन कोठडींत बंद करते झाले.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# मुकुंद रामराव जयकर

जन्म : १३ नोव्हेंबर, १८७३. मृत्यू : १० मार्च, १९५९

**प्रख्यात कायदेपंडित आणि राजकीय पुढारी**

जन्म मुंबईत एका मध्यमवर्गीय कुटुंबियात. सर्व शिक्षण मुंबई येथे. मुंबई विद्यापीठातून पदवीपरीक्षा झाल्यावर ते इंग्लंडला गेले आणि बॅरिस्टर होऊन परतले आणि थोड्याच काळात ख्यातनाम कायदेपंडित म्हणून त्यांचा लौकिक झाला. १९१९ साली पंजाबमध्ये जालियनवाला बागेच्या हत्याकांडाची चौकशी करण्याकरिता काँग्रेसने जी एक समिती नेमली होती तिचे ते सदस्य होते. त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत सक्रीय असा भाग घेतला नाही. पण राजकीय वाटाघाटीत मध्यस्थ म्हणून त्यांनी फार मोलाची कामगिरी बजावली. गांधी-आयर्विन करार (१९३१), पुणे करार (१९३२) यातील त्यांची कामगिरी महत्त्वाची. १९२३ ते २६ या काळात मुंबई विधीमंडळात स्वराज्य पक्षाचे नेतृत्व केले. पुढे मध्यवर्ती कायदेमंडळात ते राष्ट्रीय पक्षाचे उपनेते

होते. त्यानंतर त्यांनी केळकर प्रभृती बरोबर प्रतिसहकार पक्ष काढला. ते प्रिव्ही कौन्सिल व फेडरल कोर्टातही न्यायाधीश झाले. तिन्ही गोलमेज परिषदांचे ते सभासद होते. पुढे त्यांना संविधान समितीचे सभासद म्हणून घेण्यात आले. पुणे विदयापीठाची स्थापना ही त्यांची महत्त्वाची कामगिरी आणि या विदयापीठाचे ते पहिले कुलगुरु. त्यांचे इंग्रजी वक्तृत्व अत्यंत प्रभावी होते.

त्यांच्या आत्मवृत्तातील हा उतारा सादर करण्यात येत आहे.

## जालीयनवाला बाग हत्याकांडानंतर

मुकुंद रामराव जयकर

त्या दिवशी मुंबई हायकोर्टात नेहमीचीच धावपळ चालू होती. डिसेंबर महिना नुकताच सुरु झाला होता. हवा थंड पण बोचरी नव्हती. मी मुख्य न्यायाधिशांसमोर माझ्या एका महत्त्वाच्या अपीलाबाबत माझा युक्तिवाद मांडण्यास सुरुवात केली. इतक्यात मदन मोहन मालवीय यांनी पाठवलेली तार माझ्या हातात पडली. तारीख होती, २ डिसेंबर १९१९. लाहोरहून पाठवलेल्या तारेत पुढील मजकूर होता.

काँग्रेस पंजाब इन्क्वायरी कमिशनचे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही इथे तात्काळ याल काय? काम अतिशय तातडीचे आहे. उलट तार करा.

मी तार पाठवली.

'उदया निघत आहे.'

४ तारखेला मी तात्काळ-प्रतिसाद दिल्याबद्दल मालवीयांनी परत तार पाठवून माझे आभार मानले. प्रवासाची तयारी करण्यात थोडा वेळ गेला आणि मी १० तारखेला मुंबईहून लाहोरला प्रयाण केले आणि १२ तारखेला लाहोर येथे पोहोचलो. ज्याक्षणी माझ्या हातात मालवीयांची तार पडली तेव्हाच मला कळून चुकले की माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाचे पर्व सुरु होत आहे; मला सार्वजनिक चळवळीत स्वतंत्रपणे भाग घेण्याची एक सुबर्णसंधी मिळत आहे. या आमंत्रणाचे मला विशेष आकर्षण अशासाठी वाटले की या निमित्ताने देशातील महात्मा गांधी,मालवीय, दास, मोतीलाल नेहरू यासारख्या नेत्यांबरोबर काम करण्याची संधी मिळणार —आणि याचीच मला अधिक अपूर्वाई वाटत होती. त्यामुळे मालवीयांची तार मिळताच मी माझी सगळी कामे बाजूला ठेवली आणि लाहोरला जायला निघालो. कारण गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनीच मोठी विलक्षण होती. या माणसाला जवळून पाहावे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करावा, राजकारण आणि अध्यात्म यांचा मिलाफ करून जनतेवर अधिराज्य करणाऱ्या या नेत्याला जवळून पाहावे याच एका हेतूने मी लाहोरला गेलो.

लाहोरला पोचल्यानंतर मी मोतीलाल नेहरू यांची भेट घेतली आणि गांधीना जाऊन भेटलो. गांधी त्यावेळी रामभुज दत्त चौधरी यांच्या एका प्राचीन ऐतिहासिक वास्तूत राहात होते. मी गांधीना भेटायला गेलो तेव्हा त्यांच्या भोवती त्यांचे शिष्य आणि अनुयायी यांचा गराडा होता. सर्वांच्या अंगावर हाताने विणलेल्या घोंगड्या होत्या आणि सर्वजण खाली भारतीय बैठकीवर बसले होते. गांधीजीनी हसतमुखाने माझे स्वागत केले आणि म्हणाले 'अस्स , म्हणजे तुम्ही आमचे नवे रिक्रूट! मी म्हणालो "मी नुकताच बॅरिस्टर झालोय आणि वाटेल ते कष्ट करायला मागेपुढे पाहाणार नाही."

त्यानंतर रोज आमच्या बैठकी होऊ लागल्या. गांधी, मालवीय, दास, मोतीलाल, तय्यबजी आणि मी. सर्व कामावर दास यांची देखरेख असे. संतानम नावाचा एक चुणचुणीत तरुण आमचा सेक्रेटरी होता. आमच्या कामाची वाटणी पुढीलप्रमाणे होती. रोज सकाळी अकरा वाजता आम्ही आमच्या कचेरीत जमत असू. त्यानंतर कामाची विभागणी करण्यात येई. आमच्यातील काहीजण साक्षीदारांची तपासणी करीत. प्रश्न आणि प्रतिप्रश्न विचारताना आमच्यापैकी आणखी एक जण उपस्थित असे. साक्षीदारांची तपासणी तय्यबजी करीत. बडोदे येथे हायकोर्ट जज्ज म्हणून त्यांनी काम केले असल्यामुळे ते हे काम अत्यंत चोख पार पाडत. शिवाय त्यांना उर्दुचे उत्तम ज्ञान होते. या भागातील बऱ्याच साक्षीदारांची मातृभाषा उर्दु होती. त्यामुळे तय्यबजींचा आम्हाला चांगला उपयोग झाला. त्यानंतर मी या सर्व साक्षीपुराव्यांचे इंग्रजीत भाषांतर करीत असे. त्यांनंतर या सर्व पुराव्याचे आम्ही संकलन करीत असू. मात्र त्यातील जनतेच्या दृष्टीने खळबळजनक वाटणारा भाग आम्ही गाळत होतो. त्यानंतर संध्याकाळी गांधी आणि मोतीलाल यांची गाठ घेऊन त्यांच्याशी चर्चा होत असे. या चर्चेतून काही भाग गाळला जाऊन अंतिम मसुदा तयार होत असे. आमच्या काँग्रेस कमिटीप्रमाणे सरकारने नेमलेल्या हंटर कमिटीचेही साक्षीपुरावा घेण्याचे काम चालू होतेच. या सरकारी कमिटीवर जगत नारायण (उत्तर प्रदेश) चिमणलाल सेटलवाड (मुंबई) सुलतान अहमद खान (ग्वालेर) हे भारतीय सदस्य काम करीत होते. मी काही वेळा हंटर कमिशनच्या बैठकाना हजर राहिलो. त्याबाबत माझ्या दैनंदिनीत नोंद करताना –'सेटलवाड बचावपक्षाचे वकील म्हणून उलट तपासणी करताना नेहमीचा कणखरपणा न दाखवता थोडे दबलेले आणि दुबळे वाटले' असे लिहिले.

मोतीलाल त्यावेळी लाहोरमध्ये एका भाड्याच्या घरात राहात होते. काही काळ जवाहरलालही त्यांच्याबरोबर असे. प्रथमदर्शनी या पितापुत्रांना पाहाताच मी प्रभावित झालो. दोघांचे कपडे कसे नीट नेटके-अद्ययावत पाश्चात्य पद्धतीचे असत.

आमच्या संध्याकाळच्या बैठकीबाबत माझ्या मनावर एका गोष्टीचा ठसा कायम राहिला. आणि तो म्हणजे गांधीजींचा. ते सतत संयमाचा आणि सहिष्णुतेचा पाठपुरावा करीत. आम्ही बाकीचे सगळे जातिवंत वकील होतो. त्यामुळे आलेल्या पुराव्यातील कोणता भाग घ्यावा आणि कोणता गाळावा याबाबत एखादया निष्पक्षपाती न्यायाधीशाप्रमाणे आम्ही निर्णय घेऊ शकत नव्हतो. त्यामुळे गांधी एखादया कर्तव्यनिष्ठूर न्यायमूर्तीची भूमिका घेऊन सर्वसामान्य जनतेसमोर जे मांडले जाणार आहे ते सत्याशी इमान राखणारे असावे यासाठी ते सतत जागरुक राहात. अनेक वेळा आमचे मतभेद होत. मी तावातावाने आपली बाजू मांडीत असे व दास टेबलावर जोराने हात आपटून आपले म्हणणे मांडत. आपली बाजू मांडताना त्यांना नेहमीच असा आवेश चढे. मोतीलालही आपला मतभेद व्यक्त करीत पण काहीशा संयमाने. तय्यबजी तर एखादया न्यायमूर्तीच्या धीरगंभीरतेने आपली बाजू मांडीत. पण गांधी आपल्या क्षीण आवाजात पण तर्कशुद्धपणे प्रवाही भाषेत आमच्या युक्तिवादातील गुंता हलकेच सोडवीत.

एक दिवस तर दास इतके चिडले की टेबलावर आपली मूठ आपटीत गांधीजींना उद्देशून म्हणाले –'आता फार झालं हे, गांधीजी तुमचं म्हणणं बरोबर आणि आमचं चूक."

या साऱ्या घटनांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. निष्पक्षपाती-पणाने कोणत्याही पूर्वग्रहाच्या अथवा भावनेच्या आधीन न जाता योग्य तो निर्णय खरा बुद्धिमंत घेऊ शकतो. आमच्यासमोर असलेल्या गुंतागुंतीच्या पुराव्यातून सत्य तेच निवडून काढण्याचे काम गांधीजी करीत. जालीयनवाला बागेतील क्रूर हत्याकांडातील निर्भेळ सत्य ब्रिटिश आणि भारतीय जनतेसमोर मांडण्याचे ध्येय होते. या हत्याकांडालील रक्तपिपासू अधिकाऱ्यांचे खरे स्वरूप त्याना उघड करावयाचे होते. या घटनेतील सर्व प्रकार उघडउघड इतका भडक आणि रक्त गोठवणारा होता की त्यासाठी त्यात खराखोटा मसाला घालण्याची काहीही गरज नव्हती. त्यामुळे आमच्या चौकशीचे फलित यशस्वी करावयाचे असेल तर याबाबत आपण निर्भेळ सत्यच जनतेसमोर मांडले पाहिजे असे गांधीजींना वाटत होते आणि त्यासाठी हा पुरावा तावून सुलखावून आपण बारकाईने आणि बिनचूक असा जनतेसमोर ठेवला पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता.

मला कोणीतरी सांगितले की रोज आमची भेट घेण्यापूर्वी गांधी सकाळी अंतःकरणपूर्वक प्रार्थना करीत की या चौकशीतून सत्य काय ते शोधून काढण्यासाठी परमेश्वराने आपल्याला शक्ती आणि दृष्टी दयावी. दैवी

साहाय्यासाठी या प्रचंड कामात आपल्याला यश येणार नाही असे त्यांना वाटत होते.

या आमच्या अहवालाच्या पूर्वतयारीच्या वेळी आमची जी चर्चा चाले त्यातील एका वैशिष्टचपूर्ण घटनेचा उल्लेख केल्याशिवाय मला राहवत नाही. आमची चर्चा चाले ती मुख्यत्वे एका मुद्दयावर. तो मुद्दा म्हणजे डायरने जाणून बुजून एका बंदिस्त जागेत लोकांना कोंडले आणि त्यांना कठोर शासन म्हणून त्यांची हत्या केली की काय? आमच्यासमोर आलेला साक्षीपुरावा डायरने हे कृत्य जाणूनबुजून केले या मताला पुष्टी देणारा होता. या व्यूहामागील भयानकता पाहून आम्ही तर अशा निर्णयाप्रत आलो होतो की या मुद्दयाला पुष्टी देणारा सर्व पुरावा या अहवालात समाविष्ट करावा. अनेक विश्वासार्ह स्त्री-पुरुषांनी साक्षी दिल्या. त्या साक्षीवरून डायरने हे कृत्य जाणूनबुजून केले हे उघड दिसत होते. त्यामुळे हा पुरावा जनतेसमोर आला पाहिजे असे आम्हाला वाटत होते. त्यामुळे आम्ही अगदी सावचित्ताने पुराव्याचे धागेदोरे जुळवीत होतो.

पण अगदी प्रारंभापासून गांधी या दृष्टीकोनाशी मुळीच सहमत नव्हते. आम्ही ज्या निर्णयाप्रत आलो होतो तो निर्णय योग्य कसा आहे हे पटवून देताना त्यांच्याशी आमच्या शाब्दिक चकमकी झाल्याचे मला आठवते. पण ते आम्हाला नेहमी बजावून सांगत "मित्रानो तुम्ही तुमचं आयुष्य वकील म्हणून घालवलंय त्यामुळे एखादया न्यायनिष्ठूर निष्पक्षपाती न्यायाधीशाची भूमिका तुम्हाला कधीच घेता येणार नाही. निदान या अशा चौकशी प्रकरणात." पण त्यांचे म्हणणे आम्हाला पटत नव्हते. त्यामुळे शेवटी असा निर्णय घेण्यात आला की, मी अहवालाचा अंतिम मसुदा तयार करावा-त्यात आमची भूमिका योग्य तऱ्हेने मांडून आमच्या सिद्धांताच्या पुष्टयर्थ वाजवी असा पुरावा दयायचा आणि तो मसुदा गांधीकडे मंजुरीला पाठवायचा.

त्याप्रमाणे अत्यंत काळजीपूर्वक मी एक मसुदा तयार केला. या मसुदयात मी सर्व सत्य घटना क्रमवार देऊन आमच्या निर्णयाचे योग्य ते समर्थन केले होते. तो निर्णय असा की, डायरने जाणून बुजून एका बंदिस्त जागेचा फायदा घेऊन हे हत्याकांड केले. या मसुदयाचे वैशिष्टच असे होते की, सर्व सत्यघटनांचे तपशील एकामागोमाग अशा तऱ्हेने मांडण्यात आले होते की, आम्ही जो निर्णय घेतलाय त्याला दुसरा पर्यायच नव्हता.

दुसरे दिवशी सकाळी आम्ही जमून तो मसुदा गांधीजींना वाचून दाखवला. आमचा या मागचा हेतू त्यांना चटकन कळला आणि किंचित हसून म्हणाले 'तुमचा मसुदा मी स्वीकारतो पण त्यात काही सुधारणा करण्याची मला

परवानगी दया. आम्ही त्याला संमती दिली. त्यानंतर काही तासांनी गांधीनी आमच्यासमोर एक नवाच मसुदा पुढे ठेवला. त्यात त्यांनी आमच्या मसुदयाचे स्वरूपच बदलून टाकले होते. त्यांनी आपल्या अहवालात जागजागी काहीं वेगळ्या स्वरूपाच्या सत्यघटना नमूद केल्या होत्या. त्यांच्या स्मरणशक्ती आणि बुद्धिमत्तेची ती झळझळीत पावती होती. त्यात त्यांची अगाध सत्यनिष्ठा आणि न्यायप्रियता स्पष्टपणे प्रतीत होत होती. शेवटी साहाजिकच त्याचा मसुदा आम्ही मान्य केला.

त्यानंतर हा अहवाल गांधीजीनी माझ्या मदतीने तयार केला. या अहवालात दिसून येणारा संयम आणि सत्यनिष्ठा वादातीत होती.

सहा महिन्यांनी मी मुंबईला परत आलो. हायकोर्टात मला प्रथम भेटला इन्व्हेरॅरिटी. मुंबई हायकोर्टातील एक निष्णात वकील. हा त्यांच्या आयुष्यातील उत्तरकाळ असला तरी त्यांचा वकीलीपेशातील जोश यत्किंचितही कमी झाला नव्हता. त्याने मला विचारले, "तू इतके दिवस कोठे बेपत्ता होतास?" मी त्याला पंजाबमध्ये कोणत्या कामासाठी गेलो होतो हे सांगितले आणि आमचा अहवाल आता प्रकाशित झाला आहे हेही त्याला सांगितले. तो म्हणाला "मला वाचायला दे त्याची एखादी प्रत." मी माझ्या जवळची एक प्रत त्याला दिली. त्याने तो एका रात्रीत वाचून काढला आणि दुसऱ्या दिवशी तो मला म्हणतो कसा "असा अहवाल लिहिल्याबद्दल तुझ्या मस्तकावर चक्क गोळी झाडावी असं मला वाटलं. हा अत्यंत हानिकारक दस्तऐवज आहे आणि यात तुम्ही ज्या संयमाने आणि काळजीपूर्वक तुमचे निर्णय मांडले आहेत त्यामुळे तर हा अहवाल फारच परिणामकारक झालाय! याच्या मागे कोणाचा हात आहे" मी म्हणालो, "मुख्यत्वेकरून गांधी!" त्यावर तो म्हणाला, "तुला ठाऊक आहे, या अहवालातील संयम हाच ब्रिटिशांना हानिकारक आहे. कारण मला सारखं वाटायचं की भारताची बाजू जर बिनचूकपणे सत्यावर आधारीत आणि संयमाने मांडली गेली तर त्यामुळे आमच्या भारतातील सत्तेला फार मोठा धोका आहे. तुमची वृत्तपत्रे रोज काहीतरी फालतू मजकूर छापतात त्यापेक्षा हा अहवाल परिणामकारक आहे. मी तुला खात्रीने सांगतो की हा अहवाल इंग्लंडमध्ये वाचला गेला तर त्यावर फारच तीव्र प्रतिक्रिया होईल. कारण हिंदुस्थानातच फक्त अतिरंजित वृत्त वाचण्यात लोकांना मजा वाटते. तर इंग्लंडमध्ये याच्यापेक्षा उलट परिस्थिती आहे."

इन्व्हेरॅरिटीचे हे उद्गार मला फार महत्त्वाचे वाटतात. कारण तो मुंबई हायकोर्टातील एक आघाडीचा शिलेदार होता. कोर्टात तो आपला युक्तिवाद करताना कधीही अतिशयोक्ती, शब्दांचा घोळ किंवा सत्यापलाप करीत नसे.

हा अहवाल छापून प्रसिद्ध करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. सरकारचा हंटर कमिटीचा अहवाल मार्च १९२० पर्यंत प्रसिद्ध होणार होता. आणि त्याच्या आत आमचा अहवाल प्रसिद्ध होणे आवश्यक होते. अवधी फार थोडा होता. जहांगीर बोमनजी पेटिट यांनी मालवीयांच्या मदतीने छपाईच्या खर्चासाठी पाच लाख रुपये जमा केले होते. त्यातून पन्नास हजार रुपये मी मुंबईला येताना बरोबर आणले होते. या कामासाठी छापखान्याचे साहाय्य मिळवणे आणि त्याची काळजीपूर्वक छपाई करणे यासाठी मी एकूण तीस पदवी-धर तरुणांनी मदत घेतली. आणि रात्रंदिवस खपून आम्ही मुद्रणप्रत तयार केली. माझ्या ठाकुरद्वार येथील घराला टायपिंग ब्युरोचे स्वरूप प्राप्त झाले. हे तरुण मित्र सकाळी चहा घेतल्यानंतर कामाला लागत ते दुपारच्या जेवणाच्या वेळेपर्यंत जेवणाची एक तासाची सुटी संपली की सायंकाळी सहापर्यंत काम चालू. माझी पत्नी त्यांच्या जेवणखाणाचा बंदोबस्त करीत असे. जानेवारी आणि फेब्रुवारी हे दोन महिने यात गेले. पण एवढा प्रचंड अहवाल एकाच छापखान्याला छापणे अवघड होते. त्यामुळे हे काम सहा छापखान्यात वाटून दिले आणि फेब्रुवारी अखेर १००१ पृष्ठांचा उत्तम बांधणीचा हा प्रचंड अहवाल छापून तयार झाला. संदर्भसूचीसह. हा अहवाल घेऊन मी १३ फेब्रुवारी १९२० रोजी लाहोरला गेलो आणि तडक गांधीना भेटलो. त्यांनी मला विचारले आपल्या अहवालाचे काय झाले? मी माझ्या ब्रीफकेसमधून एक प्रत काढली आणि त्यांच्यासमोर ठेवली. ती प्रत पाहाताच गांधीना अर्थातच अत्यंत आनंद वाटलाच पण काहीसे आश्चर्य वाटले. मी त्यांना सांगितले की या कामात माझ्या मुंबईकर मित्रांची फार मोठी मदत झाली. या माझ्या मित्रांनी या कामासाठी एका पैशाचाही मोबदला स्वीकारला नाही.

त्यानंतर साक्षीपुराव्याची अखेरची नोंद करण्याचे काम सुरू झाले यासाठी शिवप्रसाद गुप्ता यांच्या बनारस येथील गंगाकाठावरच्या प्रासादात आम्ही मुक्काम केला. गांधी, मालवीय आणि मी. अधूनमधून जवाहरलालही आमच्यात सामील होई. त्याच्याही सूचना गांधीसारख्याच संयमित स्वरूपाच्या असत. मला वाटते मैत्रीच्या भावनेने आम्ही असे एकत्र जमण्याची ही शेवटची वेळ. त्यानंतर राजकीय मतभेदामुळे आम्ही पांगलो आणि एकमेकांपासून दुरावलो.

माझी चारपाई मालवीयांच्या खाटेजवळ होती. पहाटे ते जागे होत आणि आपल्या मधुर आवाजात शंकराचार्यांची स्तोत्रे म्हणत. मी अर्धवट झोपेत सकाळी ती ऐकत असे. आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत पंडित मालवीय म्हणजे एक सुसंस्कृत हिंदू, अशी त्यांची प्रतिमा कायम राहिली. त्यांचे संस्कृत उच्चार मद्रास आणि महाराष्ट्र यापेक्षा किंचित अशुद्ध असत. त्यात उत्तर हिंदुस्तानी झाक असे. काही वेळा ते ऋग्वेदातील ऋचा म्हणत.

चहानंतर आम्ही कामाला लागत असू. अगदी संध्याकाळपर्यंत. मध्ये फक्त जेवणाची सुटी. मसुद्याचें लेखन गांधीजी एकदोन लेखनिकांच्या साहाय्याने करीत. तीन आठवड्याने मी मुंबईला परतलो. अहवालाचा उरलेला भाग माझ्याकडे मुंबईला पाठवण्यात आला. त्यातले प्रत्येक पान गांधीनी स्वतः लिहिले होते. आज हे अमोल हस्तलिखित जपून ठेवले असते तर भारतीय स्वातंत्र्यइतिहासातील एक अमोल ठेवा म्हणून आमच्या राष्ट्रीय संग्रहालयात ते ठेवता आले असते. जवाहरलाल आपली सर्व शक्ती पणाला लावून या हस्तलिखिताचा शोध घेईल की नाही कुणास ठाऊक! या मसुद्यात किरकोळ दुरुस्त्या करण्याचे काम गांधीजींनी माझ्यावर सोपवले होते. त्यांच्या नम्र आणि विनयशील वृत्तीला अनुसरून शेवटी रात्रंदिवस खपून आम्ही आमचा अहवाल जनतेसमोर हंटर कमिशनच्या अहवालाच्या पूर्वी सादर करू शकलो.

याठिकाणी मला एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे. तो म्हणजे या काळात आम्ही ज्या तऱ्हेने–ज्या मित्र भावनेने–सहकार्याने खेळीमेळीने आणि विश्वासार्ह वातावरणाने काम केले. तीच वृत्ती आम्ही त्यानंतरच्या आमच्या राजकीय जीवनात कायम ठेवली असती त्यानंतरचा भारताचा इतिहास हा फार वेगळा झाला असता.



# कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

जन्म : २३ नोव्हेंबर, १८७२. मृत्यू : २६ ऑगस्ट, १९४८.

**महाराष्ट्रातील ध्येयवादी, पत्रकार, राजकारणी, थोर नाटककार आणि वैदिक वाङ्मयाचे व्यासंगी.**

जन्म सांगली येथे. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण सांगली येथेच. १८८९ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डेक्कन कॉलेजातून तत्त्वज्ञान हा विषय घेऊन बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण. त्यानंतर सांगलीच्या सरकारी हायस्कूलात नोकरी पत्करली. त्यानंतर शिक्षकाच्या नोकरीचा त्याग करून मुंबईस एल्. एल्. बी. चा अभ्यास करण्यास गेले. याच सुमारास त्यांनी सवाई माधवरावाचा मृत्यू हे नाटक लिहिले. 'विविध ज्ञान विस्तार' या मासिकातील त्यांच्या 'ब्राह्मण आणि त्यांची विदया' या ग्रंथावरील सडेतोड परीक्षणामुळे लोकमान्य टिळकांचे त्यांच्याकडे लक्ष गेले आणि ते केसरी संस्थेत दाखल झाले. १९१५ साली टिळक तुरुंगात असता केळकर केसरीचे संपादक होताच त्यांनी केसरी संस्था सोडली आणि मुंबईच्या लोकमान्य दैनिकाचे संपादक झाले. पण पुढे मालकाबरोबर झालेल्या मतभेदामुळे त्यांनी पुढे स्वतःचे

'नवा काळ' हे वृत्तपत्र सुरू केले. (१९२३) आणि ते अत्यंत लोकप्रिय केले. १९२७ साली हिंदु मुसलमानांच्या दंग्यावरील लेखामुळे त्यांना ७०० रु दंड व पोलीस सुपरिंटेंडेंटला १५०० रु. अब्रुनुकसानीदाखल दयावे लागले. १९२९ साली राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली.

खाडिलकर हे टिळक परंपरेतील एक श्रेष्ठ पत्रकार. वैयक्तिक कुचाळकी आणि द्वेष यांनी त्यांची लेखणी कधीच विटाळली नाही. खाडीलकरांचे केसरीतील परराष्ट्रविषयक आणि युद्धविषयक लिखाण फारच गाजले. अशा तऱ्हेचे लिखाण मराठी वृत्तपत्रात फार दुर्मीळ आहे.

संगीत आणि गदय नाटकातही खाडीलकरांचे यश असाधारण. महाराष्ट्र नाटकमंडळी आणि गंधर्व नाटकमंडळी यांच्या रंगभूमीवर खाडीलकरांची ही नाटके गाजली.

आयुष्याच्या उत्तरकाळात खाडीलकरांनी आपले सारे लक्ष तत्त्वचिंतनात आणि वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासात गुंतवले होते.

त्यांच्या 'खाडिलकर स्मरणी' या ग्रंथातील हे रोमहर्षक प्रकरण घेतले आहे.

# नेपाळची कामगिरी

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

१९०१ च्या सुमारास कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनाकरिता लो. टिळक व वासुकाका जोशी हे कलकत्त्यास गेले होते. तेथे त्यांना मुलींच्या बंगाली शाळेला भेट देण्याचे आमंत्रण आले व शाळा पहाण्यासाठी ते गेले. शाळेची व्यवस्था माताजी नावाच्या बाई पहात असत. भेटीसाठी गेले असताना त्या दोघांशी माताजी मराठीत बोलू लागल्या. बंगाली शाळेवरची बाई मराठी बोलते याचे दोघांनाही आश्चर्य वाटले; पण त्यापेक्षा अधिक आश्चर्य हे की माताजींनी नेपाळचे बोलणे काढले आणि नेपाळच्या महाराजांची ओळख करून देण्याची तयारी दाखवून त्यांनी तिकडे जावे असे सुचविले.

माताजींचे पूर्व वृत्त असे की त्या मूळच्या तंजावरच्या. लहान वयातच त्यांना वैधव्य आले. त्यानंतर त्या उत्तर हिंदुस्थानात यात्रेला म्हणून गेल्या. यात्रेत हिंडत असताना त्या नेपाळात पशुपतेश्वरच्या दर्शनाला गेल्या आणि त्या तेथेच नेपाळचे त्यावेळचे महाराज धीर समशेरजंग यांच्याजवळ राहिल्या. माताजी रूपाने चांगल्या होत्या. त्यानंतर धीर समशेरजंग महाराज यांचा खून होऊन वीर समशेरजंग महाराज गादीवर आले. त्यावेळी महाराजांनी दिलेले जडजवाहिर वगैरे घेऊन माताजींनी नेपाळ सोडले. दरभंग्याच्या महाराजांजवळ जडजवाहिर ठेवून कलकत्त्याला त्या आल्या व त्यांनी मुलींची शाळा काढली. कलकत्त्याला त्या आल्या तरी नेपाळचे माताजींचे संबंध सुटले नव्हते. नेपाळचे कर्नल एंजिनियर कुमार नरसिंग यांची व माताजींची चांगली ओळख होती. या ओळखीचा काही उपयोग होऊन नेपाळमधून देशाचे काही कार्य व्हावे अशी माताजींची इच्छा होती. माताजींच्या पश्चात त्यांच्या स्मरणार्थ पशुपतेश्वराच्या देवळाच्या पाहिऱ्यांवर गंगामातेची एक घुमटी बांधलेली आहे.

## नेपाळची कामगिरी पत्करली

त्यांच्या बोलण्याने लो. टिळक व वासुकाका जोशी यांचे नेपाळबद्दलचे कुतुहल जागृत झाले आणि नेपाळला जाण्यास ते निघाले. पाटणा मार्गाने ते रेल्वेने नेपाळास चालले होते. पण सरहद्दीच्या रेल्वे स्टेशनवरून संस्थानात

जाणाऱ्यांचा परवाना जवळ नसल्यामुळे त्यांना परतावे लागले. पशुपतेश्वराच्या यात्रेच्यावेळी तेवढे यात्रेकरूंना परवान्याशिवाय नेपाळात जाऊ देत असत.

नेपाळहून परत आल्यावर वासुकाका जोशी यांनी नेपाळची व माताजींची हकीकत मला सांगितली आणि त्या कामात भाग घेण्यास मी तयार झालो. माताजींशी पत्रव्यवहार चालू होताच. नेपाळच्या सरसेनापतींची गाठ माताजींनी घालून दयावी असे माताजींना पत्राने कळविण्यात आले. नेपाळचे महाराज हे नामधारी व खरी सत्ता सेनापतीची असते. त्यावेळी सेनापती चंद्रसमशेरजंग बहाद्दूर हे होते. पत्रव्यवहारात सेनापतीसाहेबांशी गाठ पडण्याची व्यवस्था करण्यात आली आणि वासुकाका व मी कलकत्त्याला गेलो. तेथे सेनापतींची गाठ पडण्यास कालगती फार झाली, पण अखेर गाठ झाली. त्यावेळी नेपाळचे विदयार्थी शिक्षणासाठी जपानला पाठविण्याची सूचना वासुकाकांनी केली व शिक्षणाप्रीत्यर्थ नेपाळचे विदयार्थी जपानला पाठविण्यातही आले.

या मुलाखतीत सेनापतींनी विचारले की तुम्हाला कौले तयार करता येतात काय? वासुकाका जोशी यांनी एकदम होय म्हणून सांगितले. त्यावेळी नेपाळच्या राजवाडयाचे काम चालू होते. त्या राजवाडयावर घालण्यासाठी कौले पाहिजे होती. ती मंगलोरी कौले तयार करण्यासाठी मी व वासुकाकांनी नेपाळला जावे असे त्या भेटीत ठरले आणि आम्ही परत आलो.

कलकत्त्याहून मी आणि वासुकाका जोशी परत आल्यावर वासुकाकांनी मला सांगितले की, तुम्ही जर नेपाळला गेलात तर माझ्यापेक्षा अधिक उपयोग होईल. कारण तुम्ही अधिक शिकलेले आहात आणि वाटाघाटी करताना तुम्ही जेवढे बोलू शकाल व करू शकाल तेवढे मला जमणार नाही. तेव्हा नेपाळला तुम्हीच जावे हे अधिक बरे. वासुकाकांचे हे म्हणणे मी मान्य केले आणि कौलाच्या कारखान्यासाठी मी नेपाळला जावे असे ठरले.

### शस्त्रांच्या कारखान्याची योजना

नेपाळात जाऊन तेथे रायफली तयार करण्याचे यंत्र न्यावयाचे व तेथे हत्यारे तयार करावयाची अशी मूळ कल्पना होती. नेपाळला जाण्यापूर्वी त्या यंत्राबद्दलची व्यवस्था करावयाची होती. यंत्राचे नकाशे त्यावेळी ग्वाल्हेरला मेकॅनिक केतकर होते त्यांचेकडे होते. त्या नकाशांकरिता २५० रुपये दयावयास पाहिजे होते. अमरावतीचे श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्याकडून हे २५० रुपये मी घेतले. कांचनगडची मोहना हे माझे नाटक मी त्यांना अर्पण केले होते. त्यामुळे त्यांच्याशी माझा परिचय होता. खापर्ड्यांकडून २५० रुपये घेऊन यंत्राचे नकाशे मिळविले. जर्मनीच्या क्रप्स कारखान्याचे एजंट त्यावेळी कलकत्त्याला होते. त्यांच्यामार्फत यंत्राची ऑर्डर दिली. यंत्रासाठी पाच हजार रुपये उभे करावयाचे

होते. त्या कामी छत्रे सर्कशीच्या मालकांची मदत झाली. त्यांच्याकडून यंत्राकरिता घेतलेले पैसे पुढे नेपाळकडून मिळाल्यावर परत केले. मेकॅनिक केतकरसाहेबांना चंद्रसमशेर महाराजांनी आपला शस्त्रास्त्रांचा कारखाना दाखविला होता आणि हा कारखाना तुम्ही चालवावा अशी मनीषा बोलून दाखविली होती. पण पगारासंबंधाने त्यांचे जमले नाही.

**बंदुकीचा सराव व सर्कशीत घोडेस्वारीचे शिक्षक**

नेपाळला जाण्यापूर्वी सुमारे तीन महिने मी छत्रे यांच्या सर्कशीत राहिलो होतो; आणि तेथे असताना घोड्यावर बसण्यास मी शिकलो, बंदूक पूर्वी मी हाताळलेली होती. सांगलीस असताना गाडगीळ सराफांच्याकडे बंदूक होती. ती घेऊन सांगलीचे सिनाप्पा कोतवाल; गाडगीळ वकील व मी असे तिघेजण सांगलीहून हरिपूरच्या वाटेवर जात असू. वाटेत एक ओहोळ लागतो. त्या ओहोळाच्या दोनही बाजूला दरड असे. एका दरडीवर नारळ ठेवून दुसऱ्या दरडीवर उभे राहून नारळावर नेम धरून तो फोडावयाचा अभ्यास आम्ही त्यावेळी करीत असू. ज्याच्या गोळीने नारळ फुटे त्याला दोन काडतुसे मिळत.

**माताजींकडचा मुक्काम**

नेपाळला जाण्याची अशा रीतीने पूर्वतयारी झाल्यावर पावसाळा उलटल्यावर मी कलकत्त्याला माताजींकडे गेलो. तेथे माताजींकडेच उतरलो होतो. बरोबर दोन माणसांच्या स्वयंपाकास पुरतील एवढी भांडी घेतली होती. माताजींकडे असताना माझा स्वयंपाक माझा मीच करीत होतो. नेपाळला गेल्यावरही सुरवातीचे काही महिने स्वयंपाक माझा मीच करीत असे. त्यानंतर मी तेथे एक स्वयंपाकी ठेवला होता.

नेपाळला कलकत्त्याहून ज्या इसमाबरोबर जावयाचे होते तो इसम येण्यास काही दिवस उशीर लागला. दरम्यानच्या काळात माझा मुक्काम माताजींकडे होता. माताजी सकाळ संध्याकाळ भरपूर गप्पा मारीत व नेपाळची माहिती देत. नंतर नेपाळकडचा मनुष्य आला आणि त्याच्याबरोबर मी नेपाळला गेलो. कलकत्त्यास येण्यापूर्वी मी वाटेत जबलपूरला उतरून तेथे कौलांचा कारखाना पाहून तेथील कौलांचे काम समजावून घेतले होते. त्याचप्रमाणे आणखी एक कौलांचा कारखानाही पाहिला होता. जबलपूरला कौलांकरिता कोणत्या प्रकारची माती वापरतात ती पाहून तिचा नमुनाही बरोबर घेतला होता.

**नेपाळात कौलांनी घेतलेली कसोटी**

नेपाळला जाताना माझ्याबरोबर नेपाळचे कर्नल इंजिनियर कुमार नरसिंगराणा यांना माताजींनी पत्र दिले होते. कौलांच्या कारखान्याची माहिती

असलेला मनुष्य म्हणूनच नेपाळात माझी ओळख करून देण्यात आली. कौलांच्या निमित्ताने दरबारात प्रवेश करून घ्या, मग पुढचा मार्ग कसा काढावयाचा ते तुमचे तुम्हालाच कळून येईल असे मला सांगण्यात आले होते.

नेपाळची कामगिरी यशस्वी होण्यास मंगलोरी कौले तयार करण्याचे काम यशस्वी होणे जरूर होते. ते कसे काय पार पडते याची काळजी मला सारखी वाटत होती. जबलपूरचे हणमंतराव कुळकर्णी ऊर्फ अप्पा हे माझे हाताखाली होते. कौलांच्या कारखान्याची माहिती त्यांनी थोडी फार करून घेतली होती. नेपाळात गेल्यावर मंगलोरी कौले तयार करण्याच्या कामास सुरवात केली. पण भट्टया जमता जमेनात आणि हे कौलांचे काम यशस्वी होते की नाही अशी चिंता एकसारखी वाटू लागली.

कौलांची भट्टी बरोबर साधून मनपसंत कौले तयार होईनात. त्यावेळी मन कावरे बावरे झाले. कौले करता येतात असे सांगून नेपाळात आलो आणि ती जर जमली नाहीत तर येथल्या लोकांना काय वाटेल असे सारखे मनाला वाटत होते. परमेश्वराचे अधिष्ठान आपल्या या उदयोगाला आहेच, आपण आपणाकडून प्रयत्नांची शिकस्त करीत आहो, तेव्हा यश आलेच पाहिजे, अशी श्रद्धा होती; पण यश येईना. अखेरचा प्रयत्न म्हणून शक्य ती काळजी घेऊन भट्टी लावली आणि अनन्यगतिक होऊन परमेश्वराची प्रार्थना केली. माझी लाज परमेश्वरानेच राखावयाची होती. त्याची काकुळतीने प्रार्थना केली की तुझ्या भरवंशावर येथपर्यंत आलो, आता एवढी लाज राख! अगोदरची खबरदारी म्हणून म्हणा, परमेश्वरास प्रार्थना पोहोचली म्हणून म्हणा, भट्टी उलगडून पाहिली तो कौले उत्तम साधली आहेत असें दिसून आले. पुढे अडचण राहिली नाही. कौले अपेक्षेप्रमाणे तयार झाली आणि नेपाळच्या राजवाड्यावर ती चढली.

## शस्त्रांच्या यंत्राची क्रप्सकडे ऑर्डर

कौलांचे काम सुरू असतानाच शस्त्रांच्या यंत्राच्या कामासाठी माझ्या कलकत्त्याला खेपा होत होत्या आणि मुंबईकडेही एखादे वेळी जात येत होतो. कलकत्त्याच्या क्रप्स कंपनीच्या एजंटने यंत्राचे कागद नेपाळकडेही पाठविले होते. पण अर्थातच त्याला नेपाळकडून उत्तर गेले नव्हते. क्रप्स कंपनीच्या एजंटकडे मी कलकत्त्यास गेलो आणि त्याला एक यंत्राची ऑर्डर दिली आणि त्याचे पाच हजार रुपयेही भरले होते. पण त्या एजंटाचे असे म्हणणे होते की एका यंत्राच्या ऑर्डरने भागणार नाही, निदान पाच सहा यंत्रे तरी घ्यावयास पाहिजेत त्यावेळी ऑर्डर घेता येईल. मी मध्यंतरी सांगलीस असताना एजंटने ह्याप्रमाणे कळविले आणि त्याच्याकडे भरलेले पाच हजार रुपयेही त्याने मनीऑर्डरने सांगलीस

पाठवून दिले. नेपाळात मी कृष्ण राव असे मद्रासी धर्तीचे नाव लावत होतो. एजंटशी पत्रव्यवहार करताना याच नावाने मी तो करीत असे. एजंटची मनीऑर्डर कृष्ण राव याच नावाने सांगलीस आली. त्या नावावर आलेली मनीऑर्डर मला कशी काय मिळते अशी धाकधूक वाटत होती. पण ती विशेष सायास करावे न लागताना मिळाली आणि एक विवंचना दूर झाली.

### नेपाळला सामानातून नेलेले पिस्तुल

त्यानंतर मी सांगलीहून नेपाळला जाण्यापूर्वी कलकत्त्याला गेलो आणि एजंटला असे समजावून सांगितले की यंत्र काम कसे काय देते हे पहाण्यासाठी तूर्त एकाच यंत्राची ऑर्डर दिली आहे. एक यंत्र पसंत पडले म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणे आणखी यंत्रांची ऑर्डर देऊ! त्यावर एजंटाची समजूत पटली आणि त्याने एका यंत्राची ऑर्डर स्वीकारली. कलकत्त्याच्या खेपेस सदर एजंटने मला एक अगदी छोटेसे पिस्तुल दाखविले आणि त्याच्या गोळ्याही माझ्याजवळ त्याने दिल्या होत्या. हे पिस्तुल नेऊन तुमच्या इंजिनियरना दाखवा असे त्याने मला सांगितले. ते पिस्तुल तयार करण्याचे यंत्रही आम्ही मागवावे असा त्यांचा आग्रह होता. नेपाळच्या इंजिनियरला पिस्तुल नेऊन दाखवण्याचे काम मी पत्करले आणि सामानात ते पिस्तुल ठेवून ते नेपाळमध्ये घेऊन गेलो. कोठे झडती वगैरे होऊन पिस्तुलाचा तपास लागतो की काय असे प्रवासात सारखे वाटत होते. पण तसा काही प्रकार न होता नेपाळपर्यंत पिस्तुल जाऊन पोहोचले आणि कर्नल इंजिनियरच्या हाती मी ते दिले. अशा रीतीने रायफलीच्या यंत्राची ऑर्डर देण्याचे काम उरकले आणि यंत्र केव्हा येते याची मार्गप्रतीक्षा सुरू झाली.

### नेपाळातील कालक्रमणा

नेपाळात कौलांचे काम पुरे झाले तोपर्यंत एकूण तीन वर्षे पुरी होत आली होती. या अवधीत एका दक्षिणी ब्राह्मण कुटुंबाच्या घरात मी रहात होतो. महाराष्ट्रीय ब्राह्मण मांसाशन कोणत्याही प्रकारचे करीत नसल्यामुळे त्यांच्याकडे नेपाळात पशुपतेश्वराच्या पूजेचे काम वर्षानुवर्षे चालत आलेले आहे. कांदा लसूणही हे दक्षिणी ब्राह्मण खात नसत. पण मी कांदा खात असे, त्याचे तेथील लोकांना आश्चर्य वाटे. नेपाळात असताना मला तेथे एकदा थंडीताप जडला व काही महिने त्याने माझी पाठ पुरवली होती. या तापात तोंडाची चव गेली होती, आणि भाताबरोबर लोणचे खावयास मिळावे असे फार वाटत असे. त्या बाजूला लोणचे कोठून असणार? पण पुजाऱ्याच्या घरी लोणचे जपून ठेवलेले होते. त्यातील थोडेसे मला आजारीपणात मिळाले. परत आल्यावर लोणचे खाताना नेपाळच्या लोणच्याची आठवण मला कितीतरी दिवस होत होती.

नेपाळात असताना बाहेर जाताना मी सुरवार वापरीत असे आणि पायात बूट घालीत असे. अंगात कोट व डोक्याला टोपी असे. महाराजांच्या भेटीला जाताना तेथील दरबारी पद्धतीचा पोशाख वापरावा लागे. महाराजांच्याकडे जाताना कोटाच्या आत दरबारी पद्धतीचा पोशाख घालत असे. नेपाळात बर्फ फार पडते. सकाळी उठावे तोपर्यंत रस्ते, खिडक्या वगैरे बर्फाने आच्छादिलेले असत. त्यामुळे तेथे बूट घातल्याशिवाय बाहेर पडावयाची सोयच नसे. 'टाईल भट' या नावाने मी तेथे ओळखला जात असे आणि राजवाड्यातून महाराजांचे बोलावणे येई ते 'टाइल भट' या नावाने येई, दरबारी कागदपत्रात माझे नाव येण्याचा प्रश्नच नव्हता. कारण कर्नल इंजिनियर कुमार नरसिंहराणा यांच्या मार्फतच माझा दरबारशी संबंध होता. नेपाळात असताना मी जो स्वयंपाकी ठेवला होता तो गांजेकस होता. बायकांचे बंड नाटकातील जंगल्याचे पात्र या गांजेकसावरून रेखाटलेले आहे. बायकांच्या बंडाची भौगोलिक पार्श्वभूमि नेपाळकडचीच आहे.

## कौलांनंतर आगकाड्यांचा कारखाना व शस्त्रांचाही!

कौलांचे काम संपल्यावर त्या कामगिरीबद्दल एकूण तीन हजार रुपये कर्नल इंजिनियर यांजकडून मिळाले, त्यापैकी एक हजार माझ्या हाताखाली काम करणारे अप्पा कुळकर्णी यांस दिले. हे काम संपल्यावर नेपाळात आगपेटचांच्या कारखाना चालवाल काय, कर्नल इंजिनियर कुमार नरसिंगराणा यांनी विचारले. आगपेटचांच्या कारखान्याचे काम करण्यासाठी म्हणून मी नेपाळात पुन्हा यावयाचे आणि शस्त्रांचे यंत्र तोपर्यंत येईल ते चालू करावयाचे असे बोलणे झाले. बंदुकांच्या यंत्राचे सामान या वेळेपर्यंत हिंदुस्थानात येऊन पोहोचले होते आणि नेपाळची वाट ते चालत होते.

नेपाळच्या मुक्कामात माझे मदतनीस जे अप्पा कुळकर्णी त्यांच्या ओळखीने कोल्हापूरचा दामू जोशी नेपाळात येऊन आमच्यात दाखल झाला. त्यावेळी बेलापूरला एक स्वामीचा मठ होता. त्या मठापैकी अप्पा व दामू हे दोघेही होते. हे स्वामी बेलापूरचे स्वामी म्हणून ओळखले जात व ५७ च्या बंडापैकी तात्या टोपे ते हेच होत असे कुजबुजले जात असे. दक्षिणेचे काही संस्थानिकही या स्वामींच्या भजनी होते. पेशवाईच्या बंडवाल्या पुढाऱ्यांपैकी एक स्वामी आहेत असे मानणाऱ्यांपैकी दामू त्याचप्रमाणे अप्पा हे होते. अप्पाच्या ओळखीने दामू नेपाळात आल्यावर नेपाळची एकंदर हकीकत त्याला अप्पाकडून समजलेली होती.

## यंत्राच्या मोडलेल्या गाड्याचे दुश्चिन्ह

नेपाळातील कौलांचे काम संपत आले त्या सुमारास जर्मनीहून मागितलेले

बंदुका तयार करण्याचे यंत्र हिंदुस्थानात येऊन त्या यंत्राने नेपाळची हद्द ओलांडली व ते गाड्यावर चढून नेपाळचा रस्ता चालू लागले. या सुमारास क्रूप्स कंपनीचा कलकत्त्याचा एजंट आपल्या देशास परत जावयाचा होता आणि त्याने मला मुंबईस भेटावयास बोलावले होते. नेपाळची सरहद्द पायरस्त्याने गाठून नंतरचा प्रवास करावयाचा असल्यामुळे नेपाळहून मुंबईच्या भेटीच्या पूर्वी सुमारे दोन महिने मी निघालो. नेपाळहून येत असताना वाटेत बंदुका करण्याचे आलेले यंत्रही पहावयास सापडावे अशी इच्छा होती. त्याप्रमाणे मार्ग आक्रमताना यंत्रही पाहिले. मी ज्यावेळी ते पाहिले त्यावेळी पेटारे गाड्यावर होते पण गाडा वाट चालताना मोडून पडलेला होता. यामुळे दुसऱ्या वाहनाची वाट यंत्र पहात होते. यंत्राच्या मोडलेल्या गाड्याने जणू काही भावी घटनांची सूचना देण्याचे काम चालविले होते.

मुंबईस आल्यावर मी क्रूप्स कंपनीच्या एजंटाला भेटलो आणि पुढच्या चार-पाच यंत्रांची ऑर्डर देण्याविषयी बोलणे केले. ही यंत्रे येण्यास पाच वर्षांचा अवधी लागणार होता. नेपाळात आगपेट्यांच्या कारखान्यासाठी म्हणून जावयाचे आणि ही यंत्रे आल्यावर रायफलींचा कारखाना सुरू करावयाचा अशी योजनाही मुक्रर झाली होती.

## योजना फुटली व फिस्कटली

पण अपेक्षेपेक्षा निराळ्या गोष्टी घडून यावयाच्या होत्या. नेपाळहून दामू जोशी कोल्हापूरला गेला. तेथे त्याला कोल्हापूर प्रकरणात अटक झाली आणि तेथे त्याचा अतोनात छळ झाला. दामूला माहीत असलेली हकीकत त्याच्याकडून कळावी म्हणून हा सर्व छळ होता. त्या छळाला दामूने दाद दिली नाही. तेव्हा निराळेच अस्त्र त्याच्यावर कोल्हापूरच्या महाराजांनी सोडले. दामूकडे वारंवार ते अशी साखर पेरू लागले की आपण शिवाजीचे अवतार असून त्यांच्याप्रमाणेच आपणास स्वातंत्र्य प्रस्थापित करावयाचे आहे. तेव्हा असल्या प्रयत्नांची जी माहिती असेल ती आपणाजवळ सांगण्यास हरकत नाही. हे ऐकताच दामू विरघळला आणि त्याने नेपाळ प्रकरणाची सर्व हकीकत कोल्हापूरच्या महाराजांना सांगून टाकली.

त्याबरोबर सर्व यंत्रे जोरात सुरू झाली. नेपाळची हकीकत कोल्हापूरच्या महाराजांकडून सरकारकडे गेली, आणि चिरोल साहेबांना कळली. कृष्णराव व क्रूप्स कंपनीकडून आलेले यंत्र यांचा जारीने तपास सुरू झाला. नेपाळ सरकारकडे पृच्छा करण्यात आली. नेपाळ सरकारने यंत्राची वासलात लावली. त्याचप्रमारणे पशुपतेश्वराची पूजा करणारा जो महाराष्ट्रीय ब्राह्मण होता, त्याची ताबडतोब तेथून रवानगी करण्यात आली. यंत्राची आपणास काहीच माहिती नाही असे

दरबारने सांगितले, आणि माझ्याबद्दलच्या चौकशीस अशा प्रकारचे उत्तर दिले की, आमच्याकडे कौलांच्या कारखान्यावर कृष्ण राव नावाचा मनुष्य होता हे खरे आहे, पण तो असल्या भानगडीत पडणारा नव्हे, याची आम्हाला खातरजमा आहे. दरबारच्या ह्या उत्तराने म्हणजे चंद्रसमशेर महाराजांच्या या जबाबाने मला या प्रकरणातून सोडविले. अशा रीतीने नेपाळमधील शस्त्रास्त्रांच्या कारखान्याच्या उद्योगाची इतिश्री झाली.

## जॅक्सन-खुनाच्या कटाचा ससेमिरा व केसरीतून खो

नेपाळ प्रकरण संपुष्टात निघाले तरी त्यानंतरही सरकारी ससेमिरा माझ्या मागे होताच. १९०८ साली लो. टिळक तुरुंगात गेले आणि केसरी-मराठावर माझे नाव आले. त्यानंतर नाशिकला जॅक्सन साहेबांचा खून झाला आणि त्याचा संबंध माझ्याशी असावा अशा समजुतीने तसे धागेदोरे जुळविण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. त्यावेळी दिल्लीला असलेल्या एका महाराष्ट्रीय अंमलदाराने माझ्याविरुद्ध रिपोर्ट केल्याची बातमी होती. पण माझा या खुनाशी संबंध काहीच नव्हता आणि पोलिसही तो जोडू शकले नाहीत.

नेपाळ-प्रकरणावरून सुरू झालेला पोलिसचा हा ससेमिरा मागे असतानाच केसरी-मराठ्यावरून माझे नाव निघाले व १९०९ च्या अखेरीस मला केसरी-मराठा सोडावा लागला. लो. टिळक तुरुंगात गेल्यापासून केसरी-मराठ्यावर आपले स्वतःचे नाव यावे असा श्री. केळकरांचा आग्रह होता आणि मला त्यांनी त्याबद्दल विचारून काही काळाने तसे करण्यास त्यांनी माझी कबुलीही घेतली होती. त्यानंतर जॅक्सन-खुनाचे प्रकरण झाले. मंगळवारच्या केसरीची प्रुफे सोमवारी संध्याकाळी मी नित्याप्रमाणे पहात असताना श्री. विद्वांसांनी मला सांगितले की, तुम्ही तुमच्या मजकुराची प्रुफे पहा. केळकरांची प्रुफे केळकर पहातील. मी कारण विचारले, तेव्हा दुसरे दिवशी केसरीवर केळकरांचे नाव येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी असेही सांगितले की, तुमच्या विरुद्ध पोलिस रिपोर्टस् आहेत. तेव्हा केसरीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तुमचे नाव केसरी- मराठ्यावरून काढले आहे.

## जसे काही मला पोलिसांच्या स्वाधीन करीत आहा

तुम्ही अशा यावेळी आणि पोलिस रिपोर्ट माझ्याविरुद्ध आहेत हे माहीत असताना मला न विचारता केसरीवरून माझे नाव काढून मला असलेले केसरीचे संरक्षण काढून घेत आहा आणि एकप्रकारे मला तुम्ही पोलिसांच्या स्वाधीन करीत आहा, यावरून तुम्हाला माझी जरुरी नाही असे स्पष्ट होते, असे त्यांना सांगून मी त्यावेळी केसरी कचेरीतून बाहेर पडलो. अशा रीतीने १९०९ सालच्या अखेरी अखेरीस केसरीवरून मी सुटलो.

यावर त्यावेळी काही न बोलता श्री. विद्वांस गप्प राहिले. पण त्यांच्याकडून माझे हे उद्गार नंतर लो. टिळकांच्या कानावर गेले, आणि त्याचा उल्लेखही नंतर लो. टिळकांच्या बोलण्यात आला. १९२० साली लो. टिळकांनी केसरी द्विसाप्ताहिक करण्याचे ठरविले. आणि ट्रस्टची योजना मुक्रर केली. त्यावेळी त्यांनी मला विचारले, मी केसरीचा ट्रस्ट करावयाचे ठरविले आहे आणि तुम्हाला एक ट्रस्टी करणार आहे. याबद्दल मी प्रथम तुम्हाला विचारीत आहे. तुम्ही न्हॉटी-रागीट-आहा हे मला माहीत आहे. म्हणून तुम्हाला प्रथम विचारीत आहे.

## कोणत्याही एका पत्राची जबाबदारी पत्करण्यास तयार

त्यावर मी सांगितले की, तुम्हाला पाहिजे त्या पत्राची, केसरीची किंवा मराठ्याची, जबाबदारी माझ्यावर सोपवा. त्या पत्राचे धोरण वगैरेची सर्व मुख्त्यारी माझी राहील. माझी त्याला मान्यता आहे. त्यानंतर द्विसाप्ताहिक केसरी माझ्याकडे रहावा असे ठरले आणि श्री. केळकरांनी त्याला मान्यता दिली.

केसरी द्विसाप्ताहिक झाल्यावर द्रौपदी नाटक पुरे करण्यास वेळ मिळणार नाही म्हणून मी द्रौपदी नाटक पुरे करण्यासाठी रजा घेतली व माझ्या रजेच्या काळात म्हणून केसरीवर श्री. केळकरांचे नाव आले. त्यावेळी लो. टिळकांनी पुन्हा मला विचारले, केसरीवरचे तुमचे नाव तुम्हाला नकळत निघत नाही ना? तुमची संमती आहे ना? संमती नसेल तर मला आताच सांगा. आपली संमती आहे असे मी सांगितले. नंतर केसरीचे श्री. केळकरांच्या नावाचे डिक्लेरेशन करण्यात आले.

## छत्र आणि गुरू गमावला

१९२० साली लो. टिळकांचे देहावसान झाले. द्रौपदी नाटक लिहिण्यात मी गुंतलेलो असताना जुलै महिन्यात माझे थोरले बंधु हरिपंत तात्या वारले. डोक्यावरचे छत्र गेले म्हणून विव्हल अंतःकरणाने बंधूंच्या उत्तरक्रियेच्यावेळी मी सांगलीस गेलो. तेथे असतानाच लो. टिळक अत्यवस्थ असल्याची श्री. विद्वांस यांची तार आली आणि मी तसाच मुंबईस गेलो. सातारचे श्री. दादासाहेब करंदीकर माझ्यानंतर मुंबईस आले. सरदारगृहात गेल्यावर लो. टिळकांची गाठ झाली. त्यांची भेट झाल्यावर त्यांनी आंघोळ-जेवण वगैरे उरका असे सांगितले. लो. टिळक शुद्धीवर असतानाची ही त्यांची व माझी शेवटचीच भेट. त्यानंतर लो. टिळक जे बेशुद्ध झाले ते पुन्हा पूर्णपणे शुद्धीवर आलेच नाहीत. पुण्याला मी परत आलो, तो बंधु आणि गुरू यांना गमावून आलो. लो. टिळकांच्या पश्चात ता. १० च्या केसरीत लो. टिळकांचे पुण्यस्मरण करणारा अग्रलेख मी लिहिला. केसरीतील तो माझा शेवटचा लेख होय.

## केसरीचा संबंध सुटला

लो. टिळकांच्या पश्चात त्यांचे दिवस वगैरे करण्याच्या बाबतीत टिळक-पुत्रांची हरकत होती व त्यावर आपला विश्वास नसल्याचे त्यांचे म्हणणे होते. मी रागावून याबाबतीत टिळक-पुत्रांना बोललो होतो. श्री. केळकरांनी जर तुमचा विश्वास दिवस करण्यावर नसेल तर करू नका असे सांगून त्यांची अनुकूलता मिळविली होती. टिळक-पुत्रांनी केसरीचा नवा ट्रस्ट केला त्यावेळी मला ट्रस्टी होण्याबद्दल विचारण्यात आले. केसरी किंवा मराठा यापैकी कोणत्याही एका पत्राची पूर्ण अख्त्यारी आपणाकडे यावी असे मी लो. टिळकांच्या ज्या जावयाच्याबरोबर माझ्याकडे निरोप आला होता, त्याच्याजवळ सांगितले, पण ते मान्य झाले नाही. टिळक-पुत्रांच्या सहीने केसरी-मराठ्याचा जो ट्रस्ट जाहीर झाला त्यात अर्थातच माझे नाव नव्हते. केसरीचा आणि माझा संबंध अशा रीतीने लो. टिळकांच्या पश्चात कायमचा सुटला. मुंबईत राष्ट्रीय पक्षाचे एक मराठी दैनिक असावे अशा वाटाघाटी पूर्वी होत असत. लो. टिळकांच्या पश्चात त्यांच्या स्मरणार्थ मुंबईत दैनिक काढण्याच्या कल्पनेने जोर धरला. डॉ. देशमुख, डॉ. भडकमकर यांच्या या बाबतीत वाटाघाटी चालू असताना द्रौपदी नाटकासाठी माझा मुक्कम मुंबईस असल्याने त्या वाटाघाटींना मी हजर असे. या नव्या दैनिकाचे संपादकत्व मी संभाळावे असे मला सांगण्यात आले आणि १९२१ साली पुणे कायमचे सोडून मी मुंबईस आलो.

## महात्माजींच्या आयुधाविषयी लोकमान्यांचा अभिप्राय

लो. टिळकांच्या निधनापूर्वी कलकत्त्याचे काँग्रेसचे जादा अधिवेशन मुक्रर झाले होते आणि ह्या अधिवेशनासाठी लो. टिळकांचे नाव पुढे आले होते. पण लो. टिळक अध्यक्षपद पत्करण्यास तयार नव्हते. तुमचे नाव सुचविण्यात येत आहे, तुम्ही अध्यक्षपद का पत्करत नाही असे मी त्यांना विचारले होते, त्यावेळी त्यांनी असे उत्तर दिले होते की, महात्मा गांधींच्या रूपाने एक प्रचंड शक्ति राजकीय क्षेत्रात प्रवेश करीत असून कलकत्त्याचा सहकाराचा ठराव अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा वेळी अध्यक्षाच्या खुर्चीवर राहून अधिवेशन चालविण्याच्या कामात जखडला जाण्यापेक्षा चर्चेत भाग घेण्यासाठी मी मोकळा असणे जरूर आहे. महात्मा गांधींच्या नव्या आयुधाने त्यांचे लक्ष पूर्णपणे वेधून घेतल्याचे त्या संभाषणात मला आढळून आले.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# माधव श्रीहरि अणे

जन्म : २४ ऑगस्ट, १८८०. मृत्यू : २६ जानेवारी, १९६८.

महाराष्ट्रातील थोर देशभक्त. लोकनायक अणे यांचे मूळ घराणे तेलंगणातील. पण काही पिढ्यापूर्वी अणे मंडळी विदर्भात वणी येथे स्थायिक झाली. माधवराव अणे यांचा जन्म वणी येथे झाला. प्राथमिक शिक्षणाबरोबर घरात वैदिक शिक्षण मिळाले. माध्यमिक शिक्षण चंद्रपूर येथे आणि उच्चशिक्षण नागपूर येथील मॉरीस कॉलेजात झाले. कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर यवतमाळ येथे वकिलीच्या व्यवसायाला सुरुवात (१९०७). त्याच सुमारास सार्वजनिक कार्यात भाग घेण्यास सुरुवात. तेथील हरिकिशोर साप्ताहिकात निशःस्त्र प्रतिकार चळवळीचे समर्थन करणारी लेखमाला लिहिली. त्यानंतर यवतमाळ येथे 'लोकमत' नावाचे साप्ताहिक सुरू केले. असहकारितेच्या चळवळीला विरोध. पण वर्षभर कोर्टावर बहिष्कार टाकला. १९२४ साली स्वराज्यपक्षातर्फे ते ॲसेंब्लीत निवडले गेले. १९२८ साली सायमन कमिशन विरोधी चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्यानंतर वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष झाले. १९२९ साली काँग्रेसने

संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय मान्य केल्यावर पं. नेहरुंच्या आदेशानुसार सर्व अधिकार पदाचा त्याग केला आणि दांडी यात्रेच्यावेळी ॲसेंब्लीच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी वऱ्हाडात समुद्र किनारा नसल्यामुळे त्यांनी जंगलसत्याग्रहाचे आंदोलन सुरू केले. त्यात त्यांना सहा महिन्याचा कारावास घडला. त्यानंतर ते काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद झाले. गांधी-आयर्विन कराराच्या वेळी त्यांना दिल्लीला सल्लामसलतीसाठी बोलावण्यात आले.

१९४३ साली त्यांची व्हाईसरॉयच्या कार्यकारिणीचे सदस्य म्हणून नेमणूक झाली. पण गांधींच्या उपोषणाच्या वेळी सरकारने आपला सल्ला मानला नाही म्हणून त्या पदाचा राजीनामा दिला. १९४८ साली त्यांना बिहारचे राज्यपाल नेमण्यात आले. पण आजारीपणामुळे मुदतीपूर्वीच राजीनामा दिला. संसदेत स्वतंत्र उमेदवार म्हणून ते दोन वेळा निवडून आले.

१९२८ साली ग्वाल्हेर येथे भरलेल्या मराठी साहित्य-संमलेनाचे ते अध्यक्ष होते.

'अक्षर माधव' या प्रा. मधुकर आष्टीकर संपादित ग्रंथातून त्याचे हे आत्मनिवेदन सादर करण्यात येत आहे.

## माझे गुरू

—माधव श्रीहरि अणे

लहानपणापासून लोकमान्यांच्या कर्तृत्वाच्या लहानमोठ्या गोष्टी पुणेकर किंवा पुण्याहून जाऊन आलेल्या मंडळींचे तोंडून ऐकण्यात मला आनंद वाटत असे, व या अशा कथा नेहमी ऐकता ऐकता लोकमान्यांचे केव्हा तरी प्रत्यक्ष दर्शन व्हावे अशी प्रबल इच्छा मनात उत्पन्न झाली. परंतु १९०२ सालापर्यंत हा योग जुळून आला नाही. या वर्षी ते कलकत्ता येथील राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनास हजर राहण्याकरिता नागपूर मार्गाने जाणार अशी बातमी आमचे कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मिळताच त्यांनी लोकमान्यांना नागपूरला एक दिवसाकरिता उतरून घेऊन त्यांचा जाहीर सन्मान करण्याचा निश्चय केला. या कामाकरिता विद्यार्थ्यांची जी कमिटी नेमण्यात आली तिच्यावर माझी नेमणूक करण्यात आली. या कमिटीच्या तर्फे मी, लोकमान्यांनी जातेवेळी अगर परत येतेवेळी नागपूर येथे एक मुक्काम करावा, अशी लोकमान्यांना विनंती करण्याकरिता नागपूर स्टेशनवर मुंबईची डाकगाडी येण्याचे पूर्वी थोडा वेळ अगोदर येऊन दाखल झालो. माझ्याबरोबर कमिटीचे दुसरे सभासद रा. नारायणराव अळेकर, नीळकंठराव भवाळकर व कै. सदाशिवराव भावे हे हजर होते. गाडी स्टेशनवर येताच आम्ही सर्वांनी लोकमान्य टिळक ज्या डब्यात होते त्याचा शोध केला. त्यांना नमस्कार केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या वतीने एक दिवस नागपूरला मुक्काम करावा अशी विनंती केली. कलकत्त्याहून परत येताना एक दिवस मुक्काम करण्याची इच्छा आहे असे त्यांनी आश्वासन दिले. गाडी जाण्यास वेळ असल्यामुळे त्यांनी जी चौकशी केली त्यात येथील कॉलेजातून विद्यार्थी विशेषतः कोणत्या विषयांचा अभ्यास करून बी. ए. च्या व एम्. ए. च्या परीक्षेस बसतात असा एक प्रश्न विचारल्याचे मला स्मरते. संस्कृत भाषा आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचीच संख्या मॉरिस कॉलेजमधून जास्त आहे असे सांगितल्यानंतर व्याख्यानाचा विषय त्यांच्या अध्ययनाशी जुळता असल्यास विद्यार्थ्यांना अधिक उपयुक्त होईल अशा अर्थाचे उद्‌गार त्यांनी काढले. त्याच वेळी हे दोन्ही विषय शिकविणाऱ्या अध्यापका-संबंधाने त्यांनी विचारपूस केली.

यानंतर ते कलकत्त्याहून परत येताना एक दिवस नागपूरला मुक्काम करून राहिले. राजाराम तुळसीराम नाटकगृहात नागपूर येथील कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या वतीने प्रिन्सिपाल महामहोपाध्याय केशव रावजी ताम्हन यांचे

अध्यक्षतेखाली त्यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. त्यात शेवटी "Lead kindly light, lead thou us on" अशी प्रार्थना करण्यात आली होती. मानपत्रास उत्तर म्हणून त्यांनी जे भाषण केले त्यातच सूत्ररूपाने जगद्विख्यात गीतारहस्य प्रथमतः प्रकट झाले ही गोष्ट गीतारहस्याचे प्रस्तावनेत लोकमान्यांनीच लिहून ठेवलेली आहे.

व्याख्यान संपून ते खुर्चीवर बसले तो त्यांच्या दृष्टीस मी पडलो. तेव्हा स्टेशनावरील आश्वासनाची आठवण देऊन त्यांनी मला जो प्रश्न केला तो माझ्या अजून स्मरणात आहे. 'संस्कृत वाङ्मय आणि पाश्चात्य तत्वज्ञान या दोन्ही विषयांना धरूनच आजचे व्याख्यान झाले ना?' व्याख्यानात पाश्चात्य व पौर्वात्य तत्वज्ञान याची मांडणी केली की नाही, हे केशवराव व प्रो. रॉय या दोघांशी वादविवाद केल्याशिवाय मला निश्चयाने सांगता येणार नाही. त्यावेळी प्रिन्सिपॉल ताम्हन व प्रो. रॉय हे दोघेही त्यांच्याजवळच बसलेले होते. त्यांनी व्याख्यानातून प्रतिपादिलेला सिद्धांत व तत्पुष्टचर्थ स्वीकारलेली विचारसरणी ही अभिनव असली तरी सर्वस्वी निर्दोष आहेत असा आपला अभिप्राय त्यावेळी व्यक्त केला. त्यानंतर लोकमान्यांनी विनोदाने "आपरितोषात् विदुषाम् न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्। बलवदपि शिक्षितानाम् प्राचेणात्मन्यप्रत्ययम् चेत:" या कालिदासोक्तीचा उच्चार केला. लोकमान्यांची ही शालीनता पाहून प्रि. ताम्हन यांचे अंतःकरण गहिवरून आले. वरील हकीगत आज २२ वर्षांनंतर जशी आठवली तशी लिहून पाठविली आहे.

वरील प्रसंगी लोकमान्यांचा मुक्काम सीताबर्डीवरील श्रीमंत गोपाळराव बुटी यांचे वाड्यात होता. गोपाळराव बुटी हे लोकमान्यांचे मोठे चहाते होते. त्यांनी लोकमान्यांचे आगमनानिमित्त रात्रौ गायनसमारंभ करण्याचे ठरविले, व नागपूर येथील सुप्रसिद्ध गवई कै. बापूजी जोशी यांना गाण्याकरिता बोलावण्यात आले. लोकमान्यांना गाणेबजावणे वगैरे ललितकलांचा फारसा नाद नव्हता. तेव्हा गाणे ऐन रंगात आल्यानंतर मजलसीतील इतर मंडळी रंगून जेव्हा सम देत किंवा शाबास, बहुत अच्छे वगैरे उद्‌गार काढीत तेव्हा लोकमान्य तक्क्याशी स्वस्थ बसून सुपारी तेवढी कातरील. हा प्रकार पाहून मजलसीतील एका प्रौढ व लोकमान्यांशी समवयस्क असणाऱ्या गृहस्थाने त्यांना सवाल केला, "महाराज! आपणाला गाण्याची फारशी अभिरुचि दिसत नाही. एवढीच कला आपल्या हातून हस्तगत व्हावयाची कशी राहिली?" लोकमान्यांनी खालील उत्तर देऊन त्या गृहस्थाची समजूत घातली. "(भगवद्‌गीता) भगवंताच्या मुखाने गाईलेले गाणे ऐकल्यामुळे मानवगीत रुचेनासे झाले. अमृत प्यायाला मिळाल्यानंतर थंडगार सरबत पिण्याची इच्छा होत नाही." असे म्हणून ते थोडेसे

हसले व सदरहू गृहस्थच नव्हे तर प्रत्यक्ष गवई देखील या उत्तराने क्षणभर चकित झाला व तेवढी चीज संपताच बापूजी जोशी यांनी तंबोरा खाली ठेवून लोकमान्यांच्या चरणावर आपले मस्तक ठेविले.

बेळगाव येथील प्रांतिक परिषदेस मी हजर होतो. स्वराज्यसंघाची स्थापना बेळगाव येथेच करण्यात आली होती. नेमस्तांशी समेट करून राष्ट्रीयसभेत राष्ट्रीयपक्षाने प्रवेश करणे जरूर आहे असा लोकमान्यांचा आग्रह होता आणि तोच योग्य होता ही गोष्ट पुढील परिणामावरून सर्वांच्याच प्रत्ययास आली. या परिषदेत विषयनियामक कमिटीतून समेटाचे ठरावावर बरीच चर्चा झाली व त्यासंबंधी बरीचशी विकृत हकीकत दैनिक पत्रातून आली व राष्ट्रीयपक्षाचे एका मुंबईतील मराठी दैनिकातून तर लोकमान्यांचे धोरणावर भडिमार करणारी लेखमालाही सुरू करण्यात आली होती. त्यांनी या परिषदेतील भाषण मुद्दाम इंग्रजीतून दिले, याचा हेतु देखील विपर्यासाला जागा राहू नये असाच होता. या भाषणाचे महत्व फार आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असल्यामुळे भाषण करण्याच्या पूर्वी काही वेळ ते राहावयाच्या बंगल्यातील विस्तीर्ण पटांगणातून एकटेच फिरून सारखे विचार करीत आहेत असे माझ्या दृष्टीस पडले, म्हणून मीही त्यांच्याबरोबर फिरू लागलो व त्यांनी मला कागदपेन्सिल आणण्यास सांगून व्याख्यानात यावयाच्या मुख्य मुद्द्यांचे टिपण करण्यास सांगितले. नंतर फिरता फिरताच त्यांनी आपले सर्व मुद्दे मला सांगितल्याप्रमाणे मी टिपून घेतले व कागद त्यांचेजवळ दिला. प्रत्यक्ष व्याख्यानाचे वेळी त्यांनी मला जवळ बोलावून तो कागद मला परत दिला. आणि व्याख्यान देतेवेळी जे काही कमी अधिक बोलण्यात येईल त्याचे टिपण करण्यास सांगितले. त्याप्रमाणे व्याख्यान सुरू झाल्यानंतर त्या मुद्द्यांचे मूळ कागदावरच मी भाषणात नवीन आलेल्या मुद्यांचे टिपण करावयास लागलो. व्याख्यान संपल्यानंतर त्यांनी सर्व टिपण तपासले. या टिपणानुसार सर्व भाषण लिहून काढून ते आजचे आज तारेने प्रसिद्धीकरिता रवाना करावयाचे आहे, असे त्यांनी मला सांगितल्यावरून मी सभामंडप सोडून बंगल्याकडे परत आलो. तेथे आल्यानंतर भाषण लिहावयास सुरुवात करण्याऐवजी पानसुपारी खाण्याकरिता तबकाचा शोध करीत बसलो. तबक मिळाले परंतु ते जवळ जवळ रिकामेच असल्यामुळे मला अर्थातच विडा खाता आला नाही. कोणीतरी मनुष्य लवकर परत येईल व नंतर विडा खाऊन लिहिण्यास सुरुवात करू अशा विचारात मी खुर्चीवर स्वस्थ बसलो होतो. इतक्यात एका मनुष्याने मजसमोरील तबक उचलून नेले, व त्यात सर्व सामान घालून ते परत आणून ठेवले. अर्थात मी विडा तयार करून खाऊ लागलो हे सांगणे नकोच. इतक्यात लोकमान्य माझ्या खोलीत आले व सहज म्हणाले, "का आता सर्व व्यवस्था नीट आहेना? आता तर लिहावयास

सुरुवात करण्यास काही व्यत्यय नाहीना?" हे ऐकल्याबरोबर मी किती खजील झालो असेन याची वाचकांनीच कल्पना करावी. यानंतर भाषण लिहून काढून त्यांना वाचून दाखविले व त्यांनी पसंत केल्यानंतर तारेने पाठविण्यात आले. लोकमान्य तारेची रसीद मागण्यास विसरले नाहीत हेही सांगणे मला अवश्य वाटते.

वऱ्हाडातून लोकमान्यांचा जो दौरा झाला त्यातच ते वणीहून पांढरकवड्यास गेले. वणीस लोकमान्यांचा मुक्काम संतशिरोमणि सद्‌गुरु आप्पाजी महाराज यांचे बिऱ्हाडी होता. परंतु महाराज त्यावेळी तेथे नसल्यामुळे त्यांचे दर्शन होण्याचा लाभ त्यांना मिळाला नाही. सुदैवाने पांढरकवडा मुक्कामी लोकमान्यांचे दर्शनाकरिता आप्पाजी महाराज हे मुद्दाम पाटणबोरी मुक्कामाहून आले होते. त्यावेळी उभयतांची गाठ पडल्यानंतर क्षेमकुशल वगैरे विचारण्यात आले. नंतर मी लोकमान्यांना महाराजांच्या दिनचर्येची माहिती थोडक्यात सांगितली. भागवत सप्ताह जसा अखंडित ३०-४० वर्षांपासून सुरू आहे तितक्याच नियमितपणे गुरुवारी केसरीचा पाठही सुरू आहे, असे उद्‌गार मी काढले. त्यावेळी उत्तरादाखल परोपकारी वृत्ति ही निरनिराळ्या प्रकृतीच्या मानाने कशी निरनिराळ्या रूपाने प्रकट होत असते याचे अत्यंत शास्त्रीय व हृदयंगम विवेचन त्यांनी केले. मला यावेळी ते त्यांचे शब्द जसेच्या तसे देता येणे शक्य नाही. परंतु त्याचा सारांश असा. "जर या परोपकारी वृत्तीच्या मनुष्याने देशाच्या सांप्रतच्या विपन्नावस्थेचा विचार करावयास सुरुवात केली तर त्याच्या प्रकृतिमानाप्रमाणे तो तीन मार्गांपैकी एका मार्गाचा स्वीकार करतो. दया, करुणा, श्रद्धा इत्यादी गुण ज्याचे ठिकाणी निसर्गतः विशेषत्वाने आहेत व प्रापंचिक सुखाविषयी तो स्वभावतः उदासीन आहे, तो साधुत्वाचे मार्गास लागतो व देशावरील संकटपरिहारार्थ परमेश्वरी कृपेची याचना करतो. ज्यांच्या स्वभावात क्रोधादिकांचा आविर्भाव विशेष, असे लोक अराजक मार्गाने आपला कार्यभाग साधण्याचे उद्योगास लागतात. परंतु ज्यांच्या ठिकाणी यापैकी सर्वच वृत्ती काही प्रमाणबद्ध अतएव व्यवहारसन्मुख स्थितीत असतात, अशी माणसे सद्यःप्राप्त साधनांनीच प्रस्तुत संकट निवारण्याचा प्रयत्न करतात. या सर्वांचा हेतू एकच असल्यामुळे मध्यम मार्गाने जाणाऱ्या माणसावर दोन्ही बाजूंच्या प्रमुख व्यक्तींचा प्रसंगविशेषी रोष होतो. परंतु कार्याची गति जशी वेगवान होत जाते तशी सर्वांचीच आक्रमणकक्षाही कमी कमी दूर होत जाते व एक काळ असा येतो की, त्यात या तिन्ही मार्गांचे लोक मध्यम मार्गाला प्रामुख्य देऊन त्याच्याच आश्रयाने व नेतृत्वाखाली आपापले उद्योग त्या मार्गाला पोषक होतील अशा रीतीने करावयास लागतात, तेव्हाच हिंदुस्थानाच्या यशाचा खरा दिवस उजाडेल."



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# श्रीपाद अमृत डांगे

जन्म : १० ऑक्टोबर, १८९९.

**थोर देशभक्त. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक**

जन्म १० ऑक्टोबर १८९९ साली मुंबई येथे. बालपण नाशिक येथे. प्राथमिक शिक्षण देवळाली येथे. माध्यमिक शिक्षण नाशिक, आणि मुंबई येथे. १९१७ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण. उच्च शिक्षणासाठी विल्सन कॉलेजात दाखल. पण कॉलेजमध्ये बायबलच्या सक्तीच्या तासावर बहिष्कार पुकारला म्हणून कॉलेजमधून काढून टाकले. १९२१ साली असहकारितेच्या चळवळीत भाग घेतला. १९२२ साली 'गांधी की लेनिन' हे पुस्तक लिहिले. ऑगस्ट १९२२ मध्ये सोशालिस्ट साप्ताहिक सुरु केले. १९२३ साली सिंगारावेलु चेट्टीयार यांनी स्थापन केलेल्या लेबर किसान पार्टी ऑफ हिंदुस्तान मध्ये सामील. त्यापूर्वी १९२३ मध्ये गया कॉंग्रेसला उपस्थित. १९२५ साली कानपूर येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाची अधिकृत स्थापना. तत्पूर्वी १९२४ साली त्यांच्यावर खटला भरला. कानपूर बोल्शेविक कटाचा खटला म्हणून प्रसिद्ध. या खटल्यात ४ वर्षांची शिक्षा. १९२७ साली

तुरुंगातून सुटल्यावर हेलफाऊंड हे पुस्तक लिहिले. ५ ऑक्टोबर, १९२७ रोजी विवाह. १९२८ साली मुंबईत गिरणी कामगारांची संघटना उभारली आणि सहा महिन्याचा यशस्वी संप केला. २० मार्च, १९२९ साली मिरत कटाच्या खटल्यात अटक. साडेसात वर्षे तुरुंगवास. म. गांधींनी त्यांची कारागृहात भेट घेतली. १९३६ मध्ये फैजपूर काँग्रेसमध्ये प्रतिनिधी म्हणून उपस्थित आणि ऑल इंडिया काँग्रेस कमिटीवर निवड. १९३८ मध्ये ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे एकीकरण करण्यात आले. १९४० साली गिरणीकामगारांचा महागाई भत्त्यासाठी चाळीस दिवसाचा संप. यासाठी ३ वर्षे कारावास. १९४४ साली वर्ल्ड फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन मध्ये भारताचे प्रतिनिधी म्हणून निवड. १९४५ साली मुंबई विधानसभेवर निवड. १९४८ साली कम्युनिस्ट पार्टीचे अध्यक्ष. १९४८ ते ५० परत कारावास. १९५४ साली पॉलिटब्युरोचे सभासद म्हणून निवड. १९५५ मध्ये गोवामुक्ती संग्रामात भाग. १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीत १ वर्षाचा कारावास. १९६७ साली लोकसभेवर परत निवड. १९७२ साली गिरणी कामगारांच्या चाळीस दिवसांच्या संपाचे नेतृत्व. १९७४ साली त्यांचा अमृत महोत्सव मुंबईत साजरा झाला. सोव्हिएत युनियनमधील 'ऑर्डर ऑफ लेनिन' हे सर्वोच्च पारितोषिक देण्यात आले.

काँ. डांगे हे प्रभावी वक्ते, भारतीय व्याकरण, तत्वज्ञान, संस्कृत वाङ्मय आणि इतिहास याचे गाढे व्यासंगी. त्याच्या 'हेलफाऊंड' ( नरकपुरी गवसली ) या आत्मकथनातील हा उतारा सादर करीत आहोत.

# कानपूर खटला आणि कारावास

## श्रीपाद अमृत डांगे

कानपूरमधील ती सकाळ!

एकूण परिस्थिती जरी काव्यमय नसली तरी गमतीदार खचितच होती! झाडांवर, घरांवर पांढुरके धुके ओसंडत होते आणि माझी उरलीसरली झोप तशीच डोळ्यांच्या पापण्यांवर रेंगाळत होती. कुठल्याशा पोलिसठाण्यात आम्ही होतो. अर्धवट झोपेत मी समोर पाहिले. एक शिपाई अगडबंब देह असलेल्या आपल्या साहेबाच्या वैशिष्ठ्यपूर्ण आकाराच्या डोक्यावर साफा (फेटा) गुंडाळायला मदत करीत होता. त्या साहेबाचे शरीर म्हणजे एखादया झाडाचा बुंधाच होता. काही केल्या धन्याच्या मर्जीप्रमारे बिचारा तो साफा आकार घेईना! एकदाचे हे काम झाले की, साहेबाची कचेरी सुरू व्हायला सिग्नल मिळाला असे समजायचे! त्या साहेबाचे नाव व हुद्दा मात्र मला माहित नाही. या माझ्या अज्ञानाबद्दल म्या पामराला खरोखरीच वाईट वाटते!! अर्धवट झोपेतील तो शिपाई त्या साहेबाचा कारभारी म्हणून काम पहात होता. बादशहाच्या त्या ऐसपैस प्रतिनिधीचा प्रचंड देह तासभर अगोदरच त्या शिपायाने गणवेषाच्या मर्यादेत बसविला होता. चामडी पट्टयाच्या कक्षेत पोट फिट्ट बसविले, दाढीचे निसटते पीळ कायदा व सुव्यस्थेच्या चौकटीत आगले. या साऱ्याबद्दल अर्धवट झोपेत असलेल्या आणि हात थरथरत असलेल्या त्या शिपायाचेच आभार मानावे की काय नकळे!

गमतीदार योग असा की नेमके याचवेळी मी सिंक्लेअरच्या Hell (नरक) मधील एक प्रसंग वाचायला सुरुवात केली. त्यात त्याने 'मेफिस्टो-फेलिस सिंहासनावर बसल्याबसल्या नरकपुरीतील गजाआडच्या कैदयांची परेड पहात बसल्याचे' वर्णन केले आहे. माझ्या या साफावाल्या दांडग्या साहेबाने सुद्धा नेमके याच वेळी कोठडीतील कैदयांना सामोरे आणावयास सांगितले होते. गरीब बिच्चारा! या विचित्र योगायोगाची गंमत वाटून मी टाकलेल्या मिस्किल दृष्टिक्षेपाची जाण बापडया पोकळ डामडौलातल्या जेलरला कुठून असणार? मी मात्र माझे Hell चे वाचन पुढे चालू ठेवले.

या साहेबाचे हे ठाणे कानपूरमध्ये निश्चित कोठे होते हे मला सांगता येणार नाही. त्या ठाण्यावर तासभर ठेवल्यानंतर मला कुठल्या तरी लॉकअपमध्ये नेण्यात आले. बहुधा कॅन्टोनमेंटमध्ये असावे. इथे मांझ्यासाठी जेवण आणले —जेवण वाढण्याची ती पद्धत पाहून माझ्या तळपायाची आग मस्तकात गेली. डाळीसाठी आणलेले भांडे गजांमधून आत येईना आणि रखवालदार तर दार उघडेना. त्याचे म्हणणे असे की, मी चपाती आत घ्यावी अन प्रत्येक घास बाहेरील डाळीत बुडवून परत आत घेऊन खावा. अन्न नाकारण्याशिवाय दुसरा पर्याय मजपाशी नव्हता. भांड्याच्या याच अडचणीमुळे मला पाणीही आत घेता येईना. माझे जेवण परत नेले, ही बाब प्रमुख अधिकाऱ्याला त्यांनी कधीच कळविली नसावी. कोर्टात जाण्याची वेळ आली. मला लॉकअपमधून बाहेर काढले. पण शिपायाच्या त्या उद्दामपणामुळे मी जेवलो नाही ही वस्तुस्थिती माझ्या स्वाभिमानामुळे अधिकाऱ्याला मी सांगितली नाही.

जिल्हा न्यायाधीशासमोर मला उभे करण्यात आले. १७ मार्चपर्यंत लॉकअपमध्ये ठेवण्याचे फर्मान जाहीर झाले.

५ मार्च ते १३ मार्च हा काळ अगदी कमालीचा कठीण काळ होता. अंडर ट्रायल म्हणून मला जे अन्न दिले जाई ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे असे. चपाती म्हणजे अक्षरशः पाण्यात मिसळलेले कच्चे पीठ. ती कणिक इतकी काळपट, इतकी जाडीभरडी आणि खड्यांनी भरलेली असायची की, तिचे घटक शोधायला बरेच पृथक्करण करावे लागले असते. "डाळ नामक जो प्रकार दिला जात असे तो पाहून तर 'पुअर हाऊस' (Poor House) मधील ऑलिव्हर ट्विस्टच्या सोबत्यांतील भुकेल्यांतील भुकेल्यांना देखील भयभीत केले असते आणि त्यांची भूक पार नाहीशी केली असती. आणि माझी खात्री आहे की, ट्विस्टच्या 'अधिकाधिक मागण्याने' भयभीत झालेल्या रखवालादारांनी जर कानपूरच्या त्या खानसाहेब अनामत उल्लाखान नामक जेलरची नेमणूक तिथे केली असती तर त्या संकटांना त्यांना कधीच तोंड द्यावे लागले नसते. सकाळचीच पाणचट आमटी आम्हाला संध्याकाळी मिळायची. मग उकडलेली भाजी. आमच्या तुरुंगातील परिभाषेत आम्ही तिला 'झालारा' म्हणत असू. लेखणी आणि शिष्टाचार दोन्ही या पदार्थांचे वर्णन करायला धजत नाहीत. काळ्याकुट्ट बादल्यांत गंज, लाकडाचे तुकडे आणि नाना तऱ्हेची पाने ...... या साऱ्यामुळे जणू काही शहरातील गटारातून नुकतेच ते मिश्रण आणले आहे असे वाटायचे. —सूज्ञ वाचकांनी या वर्णनाबद्दल मला क्षमा करावी. —आणि या साऱ्याचा मग असा काही दर्प येई की, बलाढ्य जर्मन घोडदळावर त्या दर्पाचा तीव्र भपकारा जर सोडला असता तर त्याची पीछेहाट होऊन अशी काही पळापळ झाली असती की विचारू नका. अर्थात त्या काळच्या युद्धमंत्रालयाला या पदार्थांचे ज्ञान असते

तर! या अन्नाच्या भीतीने माझा थरकाप झाला. याविरुद्ध बंड न करता शेकडो माणसे हे जीणे जगतात कसे याचा मी विचार करू लागलो. मग मात्र आचाऱ्यासमोर मी माझी जीभ बेलगाम सोडली आणि मला दिलेली भाकरी सुपरिंटेंडंटला दाखविण्यासाठी तशीच ठेवतो अशी धमकावणी दिली. तुरुंगात गुन्हेगारांच्या मनाचा थांगपत्ता लागावा म्हणून अधिकाऱ्यांनी काही हेर ठेवलेले असतात. दुसऱ्या दिवशी जेलच्या डॉक्टरांनी माझी भेट घेतली. त्यांनी माझ्या प्रकृतीची विचारपूस केली. अन्न कसे काय वाटले तेही विचारले. मी त्यांचे आभार मानले आणि म्हटले, "मुंबईत रस्त्यावरील कुत्र्यांनाही यापेक्षा अधिक चांगले अन्न मिळते!" त्या दिवशी आचाऱ्याने माझ्याकरिता स्वतंत्र 'ख्वॉन' मध्ये जेवण आणले. इतरांना मात्र तेच गलिच्छ अन्न वाढले गेले.

कोठडीत माझ्या सोबतीला दोनच पुस्तके होती. एक होते अपटन सिंक्लेअरचे Hell (नरकपुरी). याचा उल्लेख मी पूर्वीच केला आहे. आणि दुसरे मिसेस सिंक्लेअरने संपादित केलेले Parlour provocateur, ही दोन्ही पुस्तके मी केव्हाच वाचून संपविली होती आणि आता काहीतरी नवीन शोधायच्या फिकिरीत होतो. तेवढ्यात १३ तारखेच्या संध्याकाळी मला कोठडीत बंद केले असताना दरवाजापाशी पायबेड्यांच्या साखळदंडांचा खणखणाट ऐकू आला. मी त्यावेळी बाकड्यावर पहुडलो होतो. तेथून उठून मी दरवाजापाशी गेलो. दार उघडले गेले. पायात साखळदंड घातलेला एक उंच देखणा मनुष्य मजसमोर दारात उभा होता.

"डांगे, हे शौकत उस्मानी बरं का!" त्यांच्यासमवेत आलेल्या अधिकाऱ्याने मजकडे पाहून म्हटले.

"अच्छा! म्हणजे ज्या व्यक्तीमुळं मला इथं यावं लागलं ती ही व्यक्ती!' माझे हे बोलणे त्यांना चांगलेच झोंबले. तरी त्या उमद्या चेहऱ्यावर हास्याची एक छटा उमटून गेली. कसलेसे आश्चर्य अन् कसल्या तरी वेदना यांचे मिश्रण तिथे तरळून गेले. त्यांच्या गरुडाच्या तीक्ष्ण नजरेने काहीतरी अव्यक्त टिपले. पण ......पण ते सारे क्षणभरच! मग मळभ विरून गेले आणि त्यांचे भव्य कपाळ निरभ्र विशाल आभाळाप्रमाणे उजाळले. पण छे! मला तसे वाटले खरे, पण प्रत्यक्षात ते मळभ नाहीसे झाले नव्हते. तर आपल्या कणखर हृदयात त्यांनी जाणीवपूर्वक महत्प्रयासाने ते दडवून ठेवले.

मी त्यांच्याकरिता दुसऱ्या एका बाकड्यावर आरामशीर वळकटी तयार केली अन ते आडवे झाले. कुणाच्याच तोंडून शब्द फुटेना. फुटणे शक्यही नव्हते. त्या गडद अंधःकारात आम्ही विचाराखाली दबून गेलो होतो. मंद दिव्याचा सुतकी प्रकाश भिंतीवर पडला होता. आम्ही विचार करीत होतो. ते माझा अन मी त्यांचा.

"तुमच्या अटकेस मी जबाबदार आहे असं तुम्हाला का वाटलं?"

दीर्घकाळाच्या त्या शांततेचा उस्मानींनी शेवटी भंग केला. अन मघाचेच मळभ पुन्हा त्यांच्या चेहऱ्यावर हळून उमटून गेले.

"तुम्हाला गुन्हेगार ठरविण्याकरिता सी. आय. डी. नी मला इथं आणलं आहे असा माझा समज आहे; कदाचित तो चुकीचाही असेल." त्यानंतर आमचे खूप बोलणे झाले. त्याचा सारा वृत्तांत इथे मला देणे शक्य नाही.

पंधरा तारखेच्या मध्यरात्री आणखी दोघेजण आमच्यात सामील झाले. एक श्री. मुझफ्फर अहमद आणि दुसरे नलिनी गुप्ता. आल्याक्षणापासून अगदी पहाटेपर्यंत ही दोनही मंडळी सारखी बोलत होती. उस्मानी त्यांना साथ देत होते. त्यांचे बोलणे अर्धवट ऐकत अर्धवट झोपेत मी अंधरुणात आडवा झालो होतो. सकाळ झाली. मी सभोवार पाहिले. सर्व चेहरे निर्विकार होते; वागणे तुटकपणाचे होते. नलिनींशी माझी काही फारशी दोस्ती नव्हती. परंतु मुझफ्फर आणि माझ्यात मात्र अनेक पत्रांची देवाणघेवाण झाली होती. आणि म्हणूनच या निर्विकार चेहऱ्यांचे अन् विचित्र वागण्याचे मला जरा आश्चर्यच वाटले. मी शांत राहिलो; त्या वागण्याचा अर्थ लावू लागलो. सोळा तारीख अशीच निघून गेली. सतरा तारीख हा आमच्या केसीचा पहिला दिवस होता. कोर्ट भरले. अगदी राजशाही डामडौलात! आणि मिस्टर रॉस आल्स्टन यांनी मिस्टर हॉवर्ड यांच्या सहाय्याने आरोपपत्र मांडावयास सुरुवात केली. मध्यंतरी भोजनाकरिता जेव्हा कोर्ट उठले तेव्हा नलिनी उठले व मजपाशी येऊन म्हणाले, "काय रटाळ केस आहे!" आमच्यातील शांततेचा भंग झाला आणि मग प्रदीर्घ बोलणे झाले. मी मात्र अधिकच बुचकळ्यात पडलो.

गूढ उकलायला फारसा अवधी लागला नाही. बोलण्याच्या ओघात नलिनी एकदम म्हणाले, "आमच्या विरुद्ध तुम्ही माफीचे साक्षीदार आहात असा आमचा दाट संशय आहे." त्यांचे हे स्पष्टीकरण म्हणजे माझ्यावर प्रचंड प्रहार होता.

"पण असे घडलं तरी काय, ज्यामुळं तुम्ही या गोष्टी गोष्टीवर विश्वास ठेवावा?" मी उसळून विचारले. शेवटी अनेक महिन्यांपूर्वी घडलेल्या काही घटनांचा उलगडा झाला. एकमेकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे झाली; काही अस्पष्ट मुद्द्यांचे स्पष्टीकरणही झाले आणि सरतेशेवटी मुंबईस येऊन परत कलकत्त्यास गेलेल्या पार्टीतील एका भाडोत्री बदमाशाने केलेला तो एक बनाव होता असा उलगडा सगळ्यांनाच झाला. आता सर्व काही स्वच्छ झाले होते आणि आम्ही सर्वजण मनसोक्त हसलो. अगदी ड्युमासच्या तीन शिलेदारांसारखे! (Three Musketeers) आणि तीन शिलेदारांच्या शत्रूंनी म्हणजेच 'रॉयल

गार्ड'नी आपल्याला धमकावले असताना आपण मात्र दोन रात्री हाडवैऱ्यासारखे एकमेकाना पाण्यात पहात राहिलो या आमच्या वेडेपणाची तिघांनाही गंमत वाटली. ती केस म्हणजे पडद्यामागे सर्व बारकावे सांभाळून अगदी सूत्रबद्धतेने केलेल्या नाटकाची रंगीत तालीम होती. ते नाटक तथाकथित लोकहितासाठी करण्यात येत होते.

ती केस रक्तरंजित क्रांती कशी टाळता येईल याच्या चिंतेतून निर्माण झाली असे म्हणता येणार नाही. अथवा पोलादी चौकटीतील साम्राज्यशाहीच्या स्थैर्याला धोका निर्माण करणाऱ्या तरुणांच्या क्रांतिकारक व बेकायदेशीर संघटना चिरडून टाकण्याकरिता होती असेही नाही. ती केस म्हणजे त्या काळातील सरकारी धोरणाची परिणती होती, हे माझे मत चुकीचे नव्हते. कारण लवकरच अनपेक्षित अशा गोटातून त्याला पुष्टी मिळाली. खटला चालू असताना सरकारी वकीलांतील एक वरिष्ठ वकील अनौपचारिक चर्चेच्या वेळी चटकन मला म्हणाला, "अगदी १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीपासून आमचे सरकार असे सारखे आग्रहाने प्रतिपादन करीत आहे की हे बोल्शेविक, भारतीय क्रांतिकारकांना पैसे चारून ब्रिटीश साम्राज्य उलथून टाकण्याचा कट रचीत आहेत. भारतीय वर्तमानपत्रे आणि मान्यवर पुढारी मात्र हा आरोप नाकारीत आहेत आणि त्याउलट सरकारवरचं, भारतीय राष्ट्रवाद नष्ट करण्याकरिता कपोलकल्पित पिशाच्च उभी करीत असल्याचा आरोप करीत आहेत. तेव्हा ही केस जर आम्ही जिंकलो तर सरकारच्या प्रतिपादनाची सत्यता आम्ही जगाला पटवून देऊ शकू!" हे सारे जरी त्या वकिलाने म्हटले तरी मी मात्र या केसमागील उद्दीष्टांचा अंदाज करताना त्या विधानाच्या आधाराने अधिक पुढे जाणे पसंत करेन. कारण प्रस्तुत खटला जेव्हा भारत सरकारने सुरू केला तेव्हा इंग्लंडात लेबर पार्टीने सत्ता घेतली होती. त्याच्या मॉस्को बरोबर राजकीय आणि व्यापारविषयक वाटाघाटी चालल्या होत्या. त्या सरकारचा आणि तत्कालीन अनेक प्रमुख अर्थशास्त्रज्ञांचा असा विश्वास होता की, रशियातील धान्याची कोठारे आणि बाजारपेठ पश्चिम युरोपला खुली झाल्याशिवाय युरोपचे पुनर्वसन असाध्य आहे. परंतु हुजूरपक्षीयांचे हितसंबंधीय आणि लेबर पार्टीचे 'लेबर साम्राज्यशाहीवादी' यांनी हा समेट थोपविण्याचा विडा उचलला होता. आणि म्हणूनच मॉस्कोला भारतात काहीतरी कारस्थान रचायचे आहे अशी मॉस्कोची निर्भत्सना करून वाटाघाटीत त्यांना अडथळे निर्माण करायचे होते. लॉर्ड कर्झन याच म्हणण्याचे तुणतुणे वाजवीत होता आणि बनावट कागदपत्र निर्माण करून बोल्शेविकांना बेसावध गाठू पहात होता. ब्रिटिश वर्तमानपत्रांनी जरी प्रसिद्धी देण्याचे काळजीपूर्वक टाळले असले तरी कर्झनच्या या फसवणुकीच्या युक्तिवादाचा धुव्वा उडविणारी उत्तरे कुशाग्र बुद्धिमत्तेच्या एम् चिचेरिनने

कर्झनच्या तोंडावर फेकली. (ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाने 'सोविएत विरुद्धच्या बनावटी' या आपल्या प्रकाशनात योग्य पुराव्यानिशी व फोटोग्राफ देऊन हे बनावट कागदपत्र उघडकीस आणले आहेत.) भारताचा व्हाइसरॉय लॉर्ड रीडींग हा स्वतः प्रसिद्ध भांडवलदारी घराण्यातून आलेला! त्याला लेबर पार्टीच्या सरकारविषयी प्रेम कसे असणार? किंबहुना तो आपल्या हितसंबंधीयांच्या गटांना सरकारच्या या कराराविरुद्ध लढण्यास सिद्ध करीत होता. मग अशा वेळी ज्या बोल्शेविकांशी शांततेचा करार करण्यास लेबर सरकार तयार होते, तेच बोल्शेविक, ब्रिटिश साम्राज्याच्या मुकुटातील शिरोमणी असलेल्या भारतासारख्या देशात क्रांतीची बीजे पेरीत आहेत एवढे सिद्ध करता आले असते तर त्यापेक्षा अधिक चांगले शस्त्र हिन्दुस्तान सरकारला कोणते मिळू शकणार होते? त्याच्या म्हणण्यानुसार लेबर सरकारला भारत जर गमवायचा असेल तर मग त्यांनी जरूर मॉस्कोला कवटाळावे! हा सल्ला अत्यंत हळुवारपणे व योग्य वेळी दिला गेला होता. आणि आश्चर्य करीत बसलेल्या लोकांच्या डोळ्यासमोर मात्र सामर्थ्यवान क्रांतिकारी पक्षाची संघटना ठेविली गेली. खड्ग धारण केलेल्या अंध न्यायदेवतेचा निकाल मागितला गेला. हिन्दुस्तानातील इंटेलजन्स ब्युरो जर अविरतपणे रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून बसली नसती तर या देशात लाल रक्ताचे किती अत्याचार झाले असते हे रसभरीतपणे रंगविणाऱ्या वक्तृत्वांचे लोट वाहिले. न्यायदेवतेचे चिंतन, मनन, लेखन झाले आणि दोषारोप 'सिद्ध' झाले. तारा करून विजयानंद साजरा झाला आणि लंडनमधील बोल्शेविकांच्या राजदूतावर शब्दांचा भडिमार झाला, "तुम्ही एका बाजूला कराराची भाषा करता तर मग हिंदुस्तानातील तुमच्या या कटकारस्थांनाच काय?" आणि म्हणून माझ्या मते बोल्शेविक कॉन्स्पिरसी केस हे लेबर पार्टीवर प्रहार करण्याकरिता साम्राज्यशाहीच्या शस्त्रागारातील एक शस्त्र होते.

प्रस्तुत केस चालू करण्यात सरकारची कितीही उद्दिष्टे असली तरी सरकारी वकिलाने सेशन्स कोर्टात आपल्या प्रस्ताविक भाषणात विधान केले की, हे लोक साम्यवादाचा पुरस्कार करीत आहेत म्हणून यांच्यावर खटला भरला नसून केवळ इंडियन पीनल कोडच्या १२१ ए या कलमानुसार ब्रिटिश इंडियाच्या सार्वभौम राजाला हिंसक मार्गांनी पदच्युत करण्याचा यांनी कट केला म्हणून हा खटला आहे. कायदयाचा कीस काढणारी ही सर्व भाषा होती. मूळ प्रश्न त्यात डावलला होता. कारण पुरावे म्हणून जेवढे कागदपत्र समोर आणले गेले ते केवळ बर्लीनमध्ये त्यावेळी असलेले श्री. मानवेंद्रनाथ रॉय आणि आम्ही यांच्यात झालेला पत्रव्यवहार होता. वस्तुतः रॉय यांच्या पत्रांचा आशय, साम्यवादी

दृष्टिकोनावर आधारीत एक लढाऊ कामगार पक्ष सुरू करण्याच्या शक्यतेबाबत सल्ला देण्यापुरताच मर्यादित होता. त्यातसुद्धा काळजी म्हणून हिंसा या प्रश्नाची चर्चा अगदी सैद्धांतिक स्वरूपाची केली गेली होती.

कसेही असले तरी शेवटी सरकारची उद्दिष्टे फसली. कारण मार्क्सच्या शब्दात बोलायचे झाले तर अदृश्यपणे टांगा टाकीत जाणारे कपोलकल्पित पिशाच्च शेवटी वास्तव बनले. कारण आम्हाला गुन्हेगार ठरविल्यापासून एका वर्षाच्या आतच भारतीय कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला.

भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे न्यायाधीश आणि त्यांचे हुजरे तब्बल दोन महिने आमच्यावर कडाडले. भांडवलशाही संस्कृतीच्या चौकटीतही आमच्यासारखे क्रांतीकारक म्हणजे राक्षसी प्राणी कसे जन्माला आले याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. या समाजात एका बाजूला पददलितांच्या श्रमातून मिळविलेल्या संपत्तीने चक्रावून गेलेला एक विभाग तर दुसऱ्या बाजूला भुकेने, अज्ञानाने आणि जुलुमाने चिरडलेला, मरगळलेला समाजाचा दुसरा विभाग. अशा समाजव्यवस्थेविषयी असंतोष व्यक्त करणारी मंडळी या जगात जन्माला कशी येऊ शकतात याचेही ते बिचारे आश्चर्य करीत राहिले. कशासाठी हा गलबला, ही आव्हाने? छीः! आणि न्यायाधीश म्हणतात, हे तर त्या लंडनमधील एकाकी घरात आपल्या सहा मुलांच्या हालअपेष्टा पाहून बहकलेल्या त्या दाढीवाल्या म्हाताऱ्या मार्क्सच्या विकृत मेंदूचे चाळे आहेत! त्याने पांढऱ्या कागदावर आपला मनःस्ताप ओतून काहीतरी खरडून त्याला 'भांडवल' हे नाव दिले. साम्राज्यशाहीचा रखवालदार भांडवलदारी न्यायाधीश ही अशी मांडणी करतो आणि कम्युनिझमला दोषी ठरवितो!

या साऱ्याची गंमत वाटून विचारचक्रात मी गुरफटून गेलो अन विजेच्या वेगाने येणारा बदल मला दिसू लागला. त्यात मध्ययुगीन काळातील सार्वभौम सत्तेचे पलायन दिसले. सोनेरी वस्त्रप्रावणातील भांडवलशाही-खाजगी नफ्याकरिता यंत्रावर आपले राक्षसी सार्वभौमत्व गाजवणारी –आणि पुढे हातोडा कोयता चिन्हांकित लाल ध्वजही दिसू लागला.

एक थंडीची शिरशिरी माझ्या अंगातून निघून गेली. मी भानावर आलो आणि माझ्या कानावर शब्द पडले, "चार वर्षांची सक्तमजुरी!"

### लखनौमधील लॉकअप

१९२४ च्या जुलै महिन्याची ती सहा तारीख होती. रात्रीचे आठ वाजले असावेत. सीतापूरला जाण्यासाठी 'सरकारी पाहुणा' म्हणून मी लखनौ स्टेशनात आलो. पण सीतापूरला जाणारी गाडी पहाटेपर्यंत नव्हती म्हणून रात्रभर मला कडक बंदोबस्तात ठेवण्याचा प्रश्न होता. स्टेशनात एक कोठडी होती. त्यात प्रवेश

देण्याचे काम एका उद्धट आणि आळशी अशा मुसलमानाकडे होते. त्याला पेनसुद्धा नीट धरता येत नव्हते. नोंद करण्याची बाब तर अलाहिदा. माझ्या नावाची नोंद झाली आणि मला पहारेकऱ्याने लॉकअपकडे नेले. कोठडीच्या समोर मी उभा राहिलो आणि अतीव भयाने अक्षरशः माझा थरकाप झाला. ते अक्षरशः एक बीळ होते, जाडजूळ लोखंडी दरवाजाचे अन त्याच्या तोंडावर एका छोटया अधिकाऱ्याची खोली! आत प्रकाशाचा मागमूसही नव्हता, दुर्गंधी तर एवढी येत होती की, ती नाकात शिरताच पोटात चांगलेच ढवळून निघाले. त्याबद्दल त्या रांगडया प्रमुखाकडे मी माझा निषेध नोंदविला. मला उर्दू येईना आणि त्याला इंग्रजी कळेना. तो त्याला अपमान वाटला. तिथेच उभ्या असलेल्या एका अँग्लो इंडियनाकडे मी आणखी एखादा त्याचेवरील अधिकारी आहे का याची चौकशी केली. रात्रीच्या त्यावेळी आपणच तिथले बादशहा असल्याचे त्याने मला सांगितले. तो दहाचा सुमार असावा. शेवटी मी त्या कोठीत प्रवेश केला. आणि मी केलेल्या कल्पनेपेक्षा कितीतरी नवीन गोष्टींचा साक्षात्कार मला त्या ठिकाणी झाला. त्या खोलीत इतका काळोख होता की त्या खोलीचे दुसरे टोक अनंतात विलीन झाले आहे की काय असे वाटले. अलेक्झांडरबाबतच्या मुस्लीम नोंदीनुसार तो ज्या अंधःकारातून 'वॉटर ऑफ लाईफ' कडे चालत गेला, तो अंधःकार बहुधा लखनौ स्टेशनाच्या याच लॉकअपमधून नेला असावा. एक दोन मिनिटे दरवाजापाशी थांबल्यावर–दरम्यान तो बंद केला गेला –मी माझ्यासाठी जागा पाहू लागलो; किंबहुना बसण्यासाठी जागेचा अक्षरशः चाचपडत शोध घेऊ लागलो. एक पाऊल पुढे टाकताच कसल्या तरी ढिगाऱ्यावर मी अडखळलो. लोखंडी साखळयांचा आवाज झाला आणि मग मला घोरणे ऐकू आले व कुणाचा तरी श्वासोच्छ्वासही स्पष्ट जाणवू लागला. माझ्या हातातील ब्लँकेट कुठेतरी पडले आणि तेवढयात मला एक शोध लागला. त्या बोळकंडांत माणसे होती –अगदी खरीखुरी. ती बोलत होती! काय ते मला कळत नव्हते. पण बहुधा शिव्या देत असावीत; कदाचित प्रश्न विचारीत असावीत. मी भयचकित होऊन उभा राहिलो आणि माझ्या अंतरंगात भीती, आश्चर्य, दुःख, संताप यांचे तुमुल युद्ध सुरू झाले. कुणीतरी समोरच्या खोलीत तेवढयात दिव्याचे बटण दाबले. नाहीतर कोणता प्रसंग गुदरला असता कोण जाणे! माझ्या मनातील अंधःकारालाही थोडासा उजाळा आला.

मी जिथे होतो ते बोळकांडे बारा फूट लांब आणि आठ फूट रुंद होते. त्यातच कोपऱ्यात अगदी जमिनीच्या पातळीवर एक घाणेरडी मुत्री होती. त्यातील दुर्गंधी सर्वत्र पसरली होती. चालता चालता पायांच्या तळव्याना थुंकीची बळसटे चिकटत होती. जमिनीवर बेडया घातलेले सहा अंडर ट्रायल डाकू आडवे झालेले होते.

एखादा मोकळा कोरडा कोपरा मिळतो की काय याचा मी शोध घेऊ लागलो. शेवटी एकदाचा मुत्रीच्या समोरच मला तो सापडला. अन कर्म माझे! डोके मुत्रीकडे करून मला आडवे व्हावे लागले.

त्या रात्रीच्या माझ्या मानसिक यातनांचे वर्णन करणे शक्य नाही. आधीच मुत्रीच्या वासाने अर्धमेला झालेला माझा जीव जुलैच्या त्या तिथल्या उष्म्याने आणखीच गुदमरला. मला हातपाय पूर्णपणे पसरता येत नव्हते. तसे मी जर केले असते तर माझे डोके किंवा पाय यातील काहीतरी मुत्रीतच शिरले असते. त्या गोष्टीला आज चार वर्षं होऊन गेल्यानंतरही त्याच्या आठवणीने माझ्या अंगावर काटा उभा राहतो. अवघडून बसल्यामुळे माझी सर्व गात्रे चक्क आंबली आणि दुखू लागली. माझा हात पंख्याने वारा घेण्यास असमर्थ ठरला आणि दुःखाने, कष्टाने मी कण्हू लागलो. मला श्वास घेणे कठीण होऊ लागले. माझा श्वास जड होऊ लागला. कुठूनही मदत मिळण्याची शक्यता नव्हती. त्या बेडचा घातलेल्या माणसाशिवाय तिथे कुणी नव्हते. मध्येच लागलेल्या दिव्यामुळे प्रवेशद्वाराच्या डावीकडे जरा उंचावर मला एक खिडकी दिसली होती. कधीही उघडता येणार नाही अशी धुळीने माखलेली! वारा, पाणी आणि शब्द यातील कशाचाही तिथे मागमूस नव्हता. खरे म्हणजे कलकत्त्याच्या "ब्लॅक होल" प्रकरणाबद्दल घेतलेला तो सूड होता असे म्हणावे लागेल. (प्लासीच्या लढाईच्या जरा अगोदर बंगालच्या नबाबाने म्हणे या कलकत्त्याच्या हॉलमध्ये तीस इंग्रजांना असे काही कोंडले की ते गुदमरून एका रात्रीत मेले. पुढे ती कथा कपोलकल्पित असल्याचे उघडकीला आले.) तेव्हा असा हा सूड माझ्यावर घेतला जात होता. कदाचित ती 'मोपला व्हॅन' ची तालीम असू शकेल. (१९२२ मध्ये मोपल्यांचे बंड झाले होते. त्या बंडातील मोपल्यांच्या नेत्यांना गाडीच्या बंद डब्यातून खच्चून भरून ट्रायलसाठी नेले. परंतु ते प्रवासात दुसऱ्या दिवसापर्यंत गुदमरून मरण पावले.) अशी ही शोकांतिका. अर्थात माझ्या बाबतची मी शोकांतिका म्हणत नाही. कारण मी त्यातून वाचलो आहे आणि आजही जिवंत आहे.

पहाटे दोन वाजता —आणि हाही अंदाजच— परिस्थिती अगदी असह्य झाली. पण इलाज नव्हता. पण मग एकाएकी एक माणूस उठला. माझा पंखा घेऊन त्याने मला वारा घालायला सुरुवात केली. प्रथम जेव्हा त्याने माझा पंखा घेतला तेव्हा मी थरथरू लागलो. पण पुढे मी सावरलो. तो गरीबबापडा. पायांत बेडचा! त्याचाही जीव गरमीने अर्धमेला झाला होता, माझे हाल त्याला बघवे-नात. बहुधा त्याने मला पडून राहण्यास सांगितले असावे. जवळ जवळ दोन तास मी झोपू शकलो नाही. तो दयाळू माणूस किती वेळ मला वारा घालीत होता, कोण जाणे!

जुलै महिन्याच्या त्या एका रात्री त्या उष्म्यात एका भयानक, कोंदट अंधाऱ्या बोळकांडात पाणी, प्रकाश आणि सतरंजी याशिवाय सात माणसांना कोंबून ठेवणाऱ्या राज्यव्यवस्थेचे मूल्यमापन करण्याचे काम मी माझ्या वाचकांवरच सोपवितो. त्या ठिकाणी कोणत्याही उज्ज्वल दिवसाची अपेक्षा नव्हती. (चार्ल्स डिकन्सच्या 'टेल ऑफ टू सिटीज' मधील) गल्ल्यावर बसून अविश्रांतपणे विणकाम करणारी मादाम दफार्ज आमच्यात नव्हती. ती विणतच राहणार होती, कारण तिच्यासाठी भविष्यातील 'महान दिवस' येणार होता. आमच्या नशिबी मात्र होती केवळ साम्राज्यशाहीने लादलेली भीती आणि छळ.

आणि म्हणून हे लिखाण माझ्या मताचे प्रातिनिधीक म्हणून पीडित जनतेच्या कधीही पुसून टाकता येणाऱ्या कटु आठवणींच्या पोतडीत मी ठेवीत आहे. कारण एक दिवस उगवणार आहे आणि त्या दिवशी साम्राज्यशाहीला तात्कालीन लेनीनसमोर उभे रहावे लागणार आहे. पण कोणी सांगावे, कदाचित त्या साम्राज्यशाहीला सजा फर्मावण्यासाठी हात उंचावण्यास तेव्हा मी नसेनही!

लखनौ स्टेशनातील व्हीलरचा स्टॉलवाला 'स्टेटस्मन'च त्या दिवसाचे पोस्टर नुकतेच लावत होता. मी अल्पोपहाराच्या स्टॉलपाशी गेलो. अर्थात पहारेकऱ्यांसमवेत! एका पहारेकऱ्याकरवी 'स्टेट्स्मन'ची एक प्रतही मिळविली. सितापूरच्या गाडीत मला बंदोबस्तात बसविण्यात आले अन् दहाच मिनिटात त्या वर्तमानपत्रातील बंगाल विधानपरिषदेच्या अध्यक्षांविरुद्ध श्री. जे. एम्. सेन यांनी केलेला प्रसिद्ध दावा वाचण्यात मी मग्न झालो. हा दावा सेन यांनी अध्यक्षांविरुद्ध मनाईहुकूम मिळविण्याकरिता केला होता. मंत्र्यांचे वेतन पुन्हा सुरू करण्यासंबंधीचा ठराव कार्यक्रम पत्रिकेत अंतर्भूत करण्याकरिता अध्यक्षांचा जो विरोध होता तो थोपविण्याकरितां हा मनाईहुकूम होता. प्रवास दूरचा आणि कंटाळवाणा होता. औंध आणि रोहिलखंड रेल्वे म्हणजे O. R. R. रेल्वे आपल्या बेसुमार गर्दीची परंपरा सोडायला तयार नव्हती. हे पाहून मला बरे वाटले!

कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणाऱ्या बादशहाच्या त्या रानटी कल्लेबाज शिपायांवर सर्वसाधारणतः शांतता प्रस्थापित करण्याचे काम सोपविलेले असते. पण माझ्या बाबतीत मात्र त्यांनी नेमके उलट म्हणजे अशांतताच वाढविली आहे. एक गोष्ट मात्र इथे खचितच नमूद करायला हवी; अन ती अशी की, या खेपेला तरी या रानवट कल्लेबाजांच्या उपस्थितीमुळे माझ्या डब्यात अलोट गर्दीला आणि लोकांच्या बेसुमार सामान कोंबण्याला चांगलाच आळा बसला. 'सामान' या शब्दात मी मुलांचाही समावेश करीत आहे! कारण बाहेरील उतारूनी डब्याच्या खिडक्यांतून आत फेकलेल्या सामानाप्रमाणेच तीही 'मोडतोडी' शिवाय उतारूंच्या पायावर, डोक्यांवर अथवा पाठीवर पडत असत.

सितापूरला आम्ही अगदी भर दुपारी पोह्चलो. स्टेशनातून उतरल्यावर आम्ही पुढील प्रवासासाठी एक बग्गी ठरविली. ती पाहून इतिहासातील एक कथा मला आठवली. सर थॉमस मनरोने एकदा जहांगीर बादशहाला काही नजराणे दिले. त्यात एक चार चाकी बग्गी होती. ही बग्गी म्हणजे इंग्रज कलेचा एक अत्युत्तम नमुना असा मनरोचा जबरदस्त विश्वास! टोमणेवजा दोनचार स्तुतीच्या शब्दांनी जहांगीराने त्या राजदूताची मिजास जरा उतरवली आणि काही दिवस लोटू दिले. पुढे एकदा त्या राजदूतास बादशहाने दरबारात येण्याचे पुन्हा निमंत्रण दिले. तेथे गप्पा मारता मारता व सहज फिरता फिरता त्याला दोन बग्ग्या दाखविल्या व त्यातील त्याने नजराणा म्हणून पाठविलेली बग्गी कोणती ते ओळखण्यास सांगितले. आपण पाठविलेल्या बग्गीची हुबेहुब प्रतिकृती पाहून मनरो अवाक् झाला. अर्थात हिंदुस्तानातील कारागीर कोणत्याही कलेची प्रतिकृती किती हुबेहुब करू शकतात याचा अहवाल मायदेशी पाठविण्यास तो विसरला नाही. हे सारे जरी खरे असले तरी एक गोष्ट मात्र मी ठामपणे प्रतिपादन करू शकतो की, वर आमची डोकी अन खाली बिचारी धरतीमाता ही किंचितही शाबूत न ठेवणाऱ्या आमच्या बग्गीसारखी बग्गी जर मनरोने बादशहाला नजराणा म्हणून दिली असती तर जहांगीराच्या सर्वोत्तम कारागिराच्या बापज़ादच्यालासुद्धा त्या 'कलाकृती'च्या प्रतिकृतीची निर्मिती साधली नसती. आतील माणसांना सहजतेने बाहेर फेकून देण्याची कला त्या बग्गीत होती. 'घोडा' नावाचा प्राणी ते अतिसुंदर वाहन ओढीत होता. केवळ त्या जातीत तो प्राणी जन्मला म्हणूनच त्याच्या मालकाने मोठ्या मेहेरबानीखातर आपल्या ग्राम्य भाषेत त्याला ते नाव दिले एवढेच! बिचाऱ्याच्या कातडीकडे अन हाडाकडे पाहिल्यावर मात्र तो प्राणी या भूतलावरील नक्कीच नसावा याची खात्री पटे! त्याची मान आकाशाला भिडलेली, तर पाय पाताळात पोहोचलेले असे होते. वाकडी तिकडी पाठ आणि झडलेले शेपूट तेवढे या भूतलावर तो सांभाळून होता.

बग्गीतील बैठकीच्या जागेविषयी तर बोलायलाच नको. अगदी अक्षरशः ती 'अमर्याद' होती. बग्गीतून बाहेर फेकल्या जाणाऱ्या माणसाला तशी मोकळीक राहावी म्हणून पट्टचा, फळचा, खांब यासारखी बंधने त्या वाहनाने पार झुगारून दिली होती. थोडक्यात म्हणजे मनुष्य त्या 'बग्गीत' बसला आहे असे म्हणण्याऐवजी 'बग्गीवर' बसला आहे असेच म्हणणे संयुक्तिक ठरत होते. अशा त्या बग्गीत बसले की पाय खाली लोंबकळत; आणि सावधपणा न बाळगल्यास प्रवासाअंती ते गायब होत.

रखडत रखडत आणि गचके खात खात आम्ही पुढे सरकत होतो. माझ्याकडील वर्तमानपत्र आता निरूपयोगी होते आणि म्हणून मी ते सहजगत

बग्गीबाहेर पडू दिले. ते एका परोपकारी माणसाने पाहिले आणि घाईघाईने ते उचलून आमच्यामागे धापा टाकीत तो धावत सुटला आणि आमच्या सर्वांच्या नावाने बराच आरडा ओरड करून आमच्या बग्गीपुढे येऊन उभा ठाकला. घोड्याचा लटपटणारा एखादा पाय गळून पडला की काय, अथवा बग्गीचे एखादे चाक निसटले की काय अशी जबरदस्त शंका येऊन गाडीवानाने गचकन लगाम खेचली अन बग्गी थांबली. तो बापडा परोपकारी मनुष्य मजजवळ आला आणि त्याने ते दैनिक मजजवळ दिले. ईश्वरकृपेने आपण तिथे जर नसतो तर कोणता तरी दुर्धर प्रसंग आमच्यावर ओढवला असता अशा आविर्भावात तो आमच्याकडे पाहात राहिला. किंचित हसून मी ते वर्तमानपत्र पुन्हा दूर भिरकावून दिले. त्याबरोबर इनामाच्या अपेक्षेने भरलेले परोपकाराचे मापही!

लवकरच थडग्यासारख्या दिसणाऱ्या एका काळाकुट्ट दगडी इमारतीपाशी मी येऊन ठेपलो. समोर एक भयावह दरवाजा होता. चंद्रगुप्ताच्या हत्तीच्या धडकांनीही उघडता आला नसता असा! पण अहो आश्चर्यम्! तो उघडला गेला. अन् आत चालती बोलती, हाडामासाची अगदी खरीखुरी माणसे मला दिसली. उघड्या दरवाजातून मी पाऊल आत टाकले आणि एक घुमट मला दिसला. ते जेलचे ऑफिस असल्याचा मला 'शोध' लागला. 'शोध लागला,' असे मी मुद्दाम म्हणतो. मोहेंजोदारोचे संशोधक खणत असताना त्यांनाही अशाच एका घुमटाचा 'शोध लागला' असे वर्तमानपत्र त्याचे वर्णन करीत असत. आणि खरे सांगतो की, समोरच्या भिंतीवरील कॅलेंडराने १९२४ हे वर्ष मला दर्शविले नसते किंवा १८६० साली अस्तित्वात आलेल्या या सितापूरच्या जेलमध्ये मला नेणार आहेत हे जर अधिकृतपणे माहीत नसते —तर मोहोंजोदारोच्या त्या पुराणवस्तु संशोधकाप्रमाणे मी सुद्धा त्या ठिकाणचा तो घुमट, तो लिहीत बसलेला मुर्दाड कारकून, टकटक करणारे विषण्ण घड्याळ— हे सारे सारे इ.सनापूर्वी ३००० वर्षांच्या कालावधीतीलच असावे असे मानले असते! इतके ते सर्व प्राचीन अन गंभीर वाटत होते. असो. माणसाच्या मुशीतून काढलेल्या एका ठोकळ्याने आपल्या चष्म्यातून जणू काही म्युझियममधून अथवा पशु-संग्रहालयातून नव्याने आलेल्या प्राण्याकडे पहात आहोत अशा अविर्भावात माझी पहाणी केली. हा कार्यक्रम संपताच मला वॉर्डरकडे सोपविण्यात आले.

आपल्या न्यू गेट प्रिझनविषयीच्या आठवणी लिहिताना बॉझ म्हणतो, "आम्हाला पुढे नेताना जेवढे दरवाजे उघडले गेले अन बंद केले गेले तेवढे सर्व जर आमच्या लक्षात राहिले असते तर त्याच्या वर्णनातील प्रत्येक स्वल्पविरामागे आम्हाला एकेक दरवाजा आढळला असता." तेव्हा दरवाजे न मोजण्याबाबत एवढ्या मोठ्या अधिकारवाणीला उद्धृत केल्यानंतर आता मला वाटते, मला

पुढे सरकायला हरकत नाही. अनेक अरुंद वाटांतून, अनेक करकरणाऱ्या दरवाजांतून आणि कडाडणाऱ्या पहारेकऱ्यांमधून मी जात होतो. घराविना प्रचंड भिंती किंवा माणसांविना कुलूपे असे काहीसे ते सारे होते. सरतेशेवटी 'सर्कल' नावाच्या ठिकाणी मी आलो. नावाप्रमाणे तो गोलाकार होता. एकाएकी माणसाचे गुणगुणणे, बोलणे, कुजबुजणे, आणि हास्याचे फवारे सोडणाऱ्या पहारेकऱ्यांचे ओरडणे माझ्या कानावर आदळले. पितळी बटणांच्या गणवेषांतील मंडळी तिथे होती. लटपटणाऱ्या टेबलावर काहींनी आपले दंडुके टेकले होते. तेथे दोघा दोघांच्या रांगेतून येणाऱ्या माणसांच्या टोळ्यांची मोजणी चालली होती. शिव्या, लाथा अणि कुचेष्टा यांचा प्रसाद त्यांना मिळत होता. कंगाल कपडे घातलेले पुरुष तेथील कैद्यांना वाढण्याकरिता पाणचट-काळसर कालवण, गंजलेल्या बादल्यात ती प्रसिद्ध डाळ आणि प्रचंड लोखंडी रव्वॉनमधून काळपट तपकीरी भाकऱ्यांच्या थप्प्या घेऊन जात होते. त्या 'सर्कल' मध्ये प्रवेश करताच त्या लोकांनी माझे स्वागत केले. माझ्या मार्गदर्शक अधिकाऱ्याने मला त्यांना भेटायला सांगितले. मी त्यांना भेटलो. माझे नाव, माझा गुन्हा, शिक्षेचा कालावधी, माझा गाव अशा एक ना अनेक प्रश्नांचा भडिमार त्यांनी माझ्यावर केला. मी तुटक उत्तरे दिली आणि सुसंवाद साधण्यास निरुत्साही असल्याचे दर्शविले. मग त्यातील प्रत्येकाच्या मते कौतुकास पात्र ठरलो; कुणाच्या विनोदाचा तर कुणाच्या अभिनंदनाचा विषय ठरलो; काहींच्या प्रोत्साहनासही योग्य ठरलो. अशा स्वागतानंतर मला कैद्यांच्या एका गटात नेण्यात आले. ते साधी कैद भोगत होते. आंघोळ आटोपून मी जेवणाच्या तयारीस म्हणजे जेलच्या भाषेत बोलायचे झाल्यास रोटी परेडसाठी तयार झालो. माझा रोटी –डाळीचा वाटा मिळाल्यावर त्यातील कच्चेपणात व गलिच्छपणात कानपूर जेलच्या स्वयंपाकाशी साम्य आढळले, याचे मला जरा आश्चर्यच वाटले. बहुधा सर्व तुरुंगात एखादा 'चीफ आचारी' मध्यवर्ती रसोईखान्यांतूनच सर्व तुरुंगात रोटी, डाळ व भाजी पाठवीत असावा असे वाटले. एकंदरीत कानपूर काय आणि सितापूर काय, या दोन्ही ठिकाणच्या पदार्थांत इतके साधर्म्य आढळले की, जेवढे एकाच वर्तमानपत्रातच्या दोन दोन प्रतीत आढळावे!

रात्र झाली आणि आम्हाला कोठडीत बंद करण्यात आले. साठ कैद्यांसमवेत मला रहावे लागले. बरॅकमधील बर्थची एकूण संख्या चाळीस होती, त्यातील संडास व मुत्री यांच्या शेजारच्या दोन जागा रिकाम्या होत्या. पण झोपण्यास त्या अगदी अपात्र होत्या. पण हे व्यवस्थापकांना मुळीच मान्य नव्हते. सर्व फळकुटांची बाकडी भरून गेल्यामुळे उरलेली मंडळी जमिनीवरच आडवी झाली. आमची बरॅक लांबलचक, अस्वच्छ होती. छपराखाली कोळिष्टके लोंबकळत होती –आणि छपराच्या भोकातून धूळ खाली पडत होती. खरे म्हणजे

ही वास्तू माणसांच्याऐवजी घोडे, गाढव यांच्याकरिताच असावी. परंतु जेलचे चालक ज्याअर्थी कैद्यांपेक्षा गाढवानाच अधिक श्रेष्ठ मानीत त्याअर्थी त्यांच्या दृष्टीने त्या बरॅकी फारच विलासी आणि आधुनिक होत्या. लॉकअप केल्यावर नाईट वॉचमनचा पहारा सुरू झाला. तो कर्कश, तिरस्करणीय स्वरात मोठ्याने ओरडू लागला आणि बरॅक नंबर दोन मध्ये साठ कैदी, सर्व दरवाजे, कंदील, कुलुप, साखळदंड सर्व ठीक असल्याचा 'रिपोर्ट' त्याने दिला. आणि असेच रिपोर्ट अवतीभवतीच्या सर्व बराकीतून दिले गेले. या किंचाळण्याची सवय होईपर्यंत यातील प्रत्येक पहारेकऱ्याचे किंचाळणे प्रत्येक वेळा झोपेतून खडबडून जागे करी. रात्री गिनती तर इतक्या वेळा होई की, मोजणी करणाऱ्याने प्रत्येक गिनतीला जर डोक्यावर टपली मारली असती तर पाण्याखालच्या दगडाला पडणाऱ्या खड्ड्याप्रमाणे आमच्या डोक्यावरही एखादा खड्डा पडला असता.

अशी ही अनुभवाला येणारी नवनवीन आश्चर्ये या ठिकाणी सविस्तरपणे आणि कालक्रमानुसार सांगता येणार नाहीत. सध्या येथे एवढेच सांगतो की, आता प्रतिदिनी ३०० वार 'बान' विणून देण्याचे काम माझ्यावर सोपविले गेले आणि मग मला समोर दिसू लागल्या गवताच्या मोठ्या पेंढ्या अन् पुढे काढावी लागणारी दीर्घ चार वर्षं! —



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# आ. वा. मोडक

जन्म : १२ ऑगस्ट, १८९४. मृत्यू : २० फेब्रुवारी, १९८०.

**महाराष्ट्रातील एक गांधीवादी कार्यकर्ते.**

जन्म मध्यप्रांतात 'ठिंकरी' या खेडचात. बालपण ठिकरी व धरमपुरी येथे गेले. वयाच्या बावीसाव्या वर्षी ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी इंदूरच्या होळकर कॉलेजात दाखल. १९२० साली म.गांधींच्या राजकारणाकडे आकृष्ट. १९२१ साली अहमदाबाद येथील ऑल इंडिया कॉंग्रेसच्या अधिवेशनास स्वयंसेवक म्हणून उपस्थित. त्यानंतर सेनापती बापटांसह मुळशी सत्याग्रहात भाग घेतला. पाच वर्षाचा कारावास. तुरुंगातून सुटल्यावर कॉंग्रेसचे विधायक कार्य. त्यानंतर अण्णासाहेब दास्ताने यांच्याबरोबर जळगाव जिल्हचात आदिवासी विभागात विधायक कार्य. १९३६ मध्ये पुण्यास वास्तव्य. जिल्हा कॉंग्रेस कमिटीवर निवड. १९३० आणि ४० साली कारावास. रत्नागिरी जिल्हा कॉंग्रेसचे ते पाच वर्षे अध्यक्ष. मालवणच्या साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला. त्यामुळे कॉंग्रेसचे अध्यक्षपद सोडावे लागले. १९५५ साली गोवा मुक्ती संग्रामात

भाग. १९५७ साली स्वतंत्र उमेदवार म्हणून विधानसभेत निवड. त्यांच्या वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

पुढील उतारा त्यांच्या 'आत्मारामाची वाटचाल' या आत्मवृत्तातून सादर करण्यात येत आहे.

## मुळशीचा निःशस्त्र व सशस्त्र लढा

आ. वा. मोडक

१९२१-२२ सालात मी महाराष्ट्रात, पुण्यात आलो. व मुळशी सत्याग्रहात सामील झालो. हा मुळशीचा लढा अरेरावी विरुद्ध, अन्यायाविरुद्ध, जुलमाविरुद्ध आर्थिक लढा होता. धरण बांधणे, त्यापासून वीज उत्पन्न करणे, आणि त्यायोगे कारखाने चालविणे याविरुद्ध हा लढा नव्हता. टाटा कंपनी आणि परके सरकार यांनी संगनमत करून मावळ्यांना न विचारता, जमीन मालकांना न विचारता जमीनी ताब्यात घेऊन मालकांना जमिनीतून हुसकावून लावण्याचा जो अरेरावी आणि जुलमी प्रकार केला तो निंदय होता. कंपनीने आणि सरकारने वर्तमान पत्रांतून जाहीर करून जमीन मालकांना व त्यांच्या पुढाऱ्यांना बोलावून त्यांना समजावून सांगण्यास हवे होते. आणि त्यांच्या संमतीने दुसरीकडे जमीनी देऊन किंवा योग्य मोबदला देऊन तडजोडीने त्यांना हे काम करता आले असते, परंतु मगरूर टाटा कंपनी व तिचे पाठीराखे सरकार यांना जमीन मालक मावळे कसपटासमान वाटले. त्यांना काय विचारावयाचे? काम झाल्यावर मागाहून थोडेसे कॉम्पेन्सेशन देऊन टाकू. अशा थाटात बेदकारपणाने त्यांनी मावळ्यांच्या जमीनीत काम सुरू केले. त्यामुळे महात्माजींच्या सत्याग्रह पद्धतीने लढा सुरू झाला. महात्मा गांधींनी त्याला आशीर्वाद दिला. महाराष्ट्रातले सर्व पुढारी व जनता एकवटली. हा सत्याग्रह लढा महाराष्ट्र खूप शर्थीने लढला. त्याचा परिणाम चांगला होऊन टाटा कंपनी व सरकार मेटाकुटीस आले. त्यांनी मावळ्यांना व मालकांना भरपूर नुकसान भरपाई दिली. त्यामुळे असा अरेरावीचा प्रकार कंपनी व सरकार यांनी पुन्हा केला नाही. या लढ्याचा नैतिक विजय झाला. यामुळे मावळ्यांचे आर्थिक नुकसान भरून निघाले. महाराष्ट्रास युद्धाचा धडा-श्रीगणेशा-मिळाला. मुळशी सत्याग्रह समितीने हा लढा सुरू केला होता. हा लढा, एक फार मोठा अध्याय आहे. माझ्या वैयक्तिक आत्मचरित्रात तो विस्ताराने सांगणे अशक्य आहे. दे. भ. आपटे गुरुजी यांनी लिहिलेले "सेनापती बापट दर्शन" व दे. भ. बाळू काका कानिटकर यांनी लिहिलेले "आमचे सेनापती" या दोन पुस्तकात मुळशीच्या लढ्याबद्दलची माहिती भरपूर आलेली आहे. ती वाचकांनी अवश्य वाचावी अशी विनंती आहे. टाटा कंपनी, सरकार

यांनी नाना प्रकारचे अत्याचार, जुलूम जबरदस्ती केली. सत्याग्रहींचे अनन्वित हाल केले. सत्याग्रहींनी अहिंसा तत्त्वाचे पालन काटेकोरपणाने केले. त्यांनी हात तर उगारला नाहीच. परंतु अपशब्द सुद्धा उच्चारला नाही. त्यावेळी सेनापती बापट यांनी सहज म्हटले होते की, "सर्व गोष्टींना सीमा आहे. जुलुमाचा अतिरेक करणे बरे नाही" अशा अर्थाचा इशारा सरकारला आणि टाटा कंपनीला त्यांनी त्यावेळी दिला होता. परंतु चढेल कंपनी व सरकार यांना त्याचे सोईस्करपणे विस्मरण झाले असे दिसले. हा अहिंसेचा लढा तीन वर्षे चालवावा असे अखिल महाराष्ट्र मुळशी परिषदेत ठरले होते. त्याप्रमाणे तीन वर्षे हा लढा चालू होता. या लढ्याचे मुख्य सूत्रधार सेनापती बापट होते. तीन वर्षांनंतर अहिंसेचा सत्याग्रह संपला. सेनापती बापटांची तुलना महाराणा प्रतापसिंहाशी करावी लागेल. त्यांचे शील आणि चारित्र्य धुतल्या तांदळासारखे शुद्ध आहे. त्यांचा पराक्रम व निर्भयता याबद्दल शंका नव्हती. असा पुण्यप्रतापी नेता मिळाल्यामुळे महाराष्ट्राने मुळशी लढ्याचा भार त्यांच्यावर टाकून महाराष्ट्र निर्धास्त होता.

टाटा कंपनी व सरकार यांनी केलेल्या अन्यायाचा, अत्याचाराचा, जुलुमाचा त्यांना विचार करण्यास लावण्याचा एक साधा सरळ मार्ग म्हणून सेनापती बापटांनी अहिंसेचा लढा बंद झाल्यावर एक सशस्त्र लढा दिला. टाटा कंपनी हिंदी लोकांची. त्यांनी हिंदी पगारी भाडोत्री पठाण लोक ठेवून त्यांच्याकडून निःशस्त्र सत्याग्रहींचा छळ करविला. त्यांच्या मदतीस आलेले पोलीस दळ हिंदीच होते व सत्याग्रहीसुद्धा हिंदीच होते. तेव्हा कोणाच्या जिवास अपाय न होता शारीरिक शिक्षा करण्याचे सेनापती बापटांनी ठरविले व त्याप्रमाणे अगोदर नोटीस देऊन व वर्तमानपत्रातून जाहीर करून कंपनीवर हल्ला केला. त्यांच्याबरोबर त्यांचे चार सहकारी व विरोधी पक्षाकडे पठाण वगैरे मिळून कंपनीची जवळ जवळ चारशे ते पाचशे मंडळी होती. त्यांना शस्त्रास्त्राने जखमी केले आणि गोळ्या मारल्या त्या कमरेच्या खाली मारल्या. कंपनीची सगळी मंडळी –पठाण सुद्धा पळून गेली. जुलमी पठाणांना तेव्हा आमची किंमत कळली. म्हणून ते त्यावेळी आम्हाला "बहाद्दुर" म्हणू लागले. ठरलेल्याप्रमाणे काम झाल्यावर सेनापती बापटांनी हल्ला बंद केला. व पोलिसांचे ताब्यात शस्त्रास्त्रे दिली. व "तुम्हाला कायद्याप्रमाणे काय करावयाचे असेल ते करा. आमचे कार्य संपले आहे." असे से. बापटांनी सांगून ते सर्व मंडळीसह स्वस्थ बसले. पुढे खटला चालून सर्वांना शिक्षा झाल्या. येथे मुळशी संग्रामाचा अध्याय समाप्त झाला. या सशस्त्र लढ्याचा नैतिकदृष्ट्या फार चांगला परिणाम झाला. त्यापुढे कोणतीही कंपनी व सरकार यांनी सत्याग्रहींना मागे सांगितलेप्रमाणे छळले नाही, व कोणीही सत्याग्रहींच्या वाटेस गेले नाहीत.

मी अगोदर इंदूर सोडून पुण्यास आलो आणि मुळशी सत्याग्रहात सामील झालो. नंतर सहा महिन्यांनी धाकटे बंधू पुण्यास आले व सत्याग्रहात सामील झाले. नंतर वर्षभराने थोरले बंधु पुण्यास आले. मला मुळशीच्या लढ्यात तीन वेळा कारावासात जावे लागले. धाकटे बंदु दत्तात्रय मोडक यांना एकदा शिक्षा झाली होती.

## येरवडा जेलमधील धार्मिक प्रकरण

मुळशी लढ्यातल्या शेवटच्या सशस्त्र लढ्यात मला पाच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली होती. या काळात मला डोंगरीजेल (मुंबई), येरवडा सेंट्रल प्रिझन पुणे, आणि धुळे जेल या तीन कारागृहात दिवस काढाले लागले. येरवडा प्रिझनमध्ये असताना त्यावेळचे येरवड्याचे गोरे सुपरिटेंडेंट यांनी सिंधी मुसलमान कनव्हिक्ट वॉर्डर यांचे ऐकून जेलमधील हिंदू कैद्यांची तुळशी वृंदावने व काही मूर्ति काढून टाकल्या. त्यामुळे हिंदु कैद्यांची मने दुखावली गेली. तेव्हा त्यांनी त्यांना न्याय मिळेपर्यंत अन्न घेणे वर्ज्य केले. ही गोष्ट तात्यांच्या कानावर गेली. त्यावेळी तात्यांच्या बरोबरीची सशस्त्र लढ्यातील मंडळी येरवडा जेलमध्ये होती. तात्यासुद्धा येरवड्यात होते. हिंदु कैद्यांनी तात्यांकडे निरोप पाठविला की, आमच्याकडे लक्ष द्या, तात्यांनी सुपरिटेंडेंटला स्पष्ट सांगितले की, "तू फार मोठी चूक केली आहेस. ती सुधार व हिंदूंची वृंदावने व मूर्ति पूर्वीप्रमाणे करून दे." हा अन्याय तात्यांनी वर्तमानपत्रात दिला व तो जाहीर झाला. तेव्हा सर्व वर्तमानपत्रांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी येरवड्याच्या गोऱ्या साहेबाला चांगला ठपका दिला व अन्याय दूर करण्यास सांगितले. गोऱ्या साहेबाने नाक मुठीत धरून पूर्वीप्रमाणे सर्व व्यवस्थित करून दिले. तरीसुद्धा गोऱ्या साहेबावर कैद्यांचा विश्वास बसेना. तेव्हा गोऱ्यासाहेबाच्या विनंतीवरून तात्यांनी कैद्यांना विश्वास दिला. नंतर पूजा, आरती, नैवेद्य होऊन, मग सर्व कैद्यांनी अन्न ग्रहण केले. त्यावेळच्या सबंध मुंबई प्रांतात येरवडा जेलचा दबदबा फार होता. तो फार कडक जेल होता. मी, मी म्हणणारे खुनी, दरवडेखोर आणि निर्ढावलेले कैदी त्या जेलला भीत असत. वरील अपूर्व विजय तात्यांच्यामुळे मिळाला म्हणून सर्व कैदी त्यांना देवाप्रमाणे मानू लागले. हे मुख्य गोऱ्या अधिकाऱ्याला सहन झाले नाही. म्हणून त्याने आम्हा सर्वांना निरनिराळ्या जेलमध्ये पाठवून दिले. तात्यांना सिंध हैद्राबाद जेलमध्ये, मला धुळे जेलमध्ये, बाभळेना साबरमती जेलमध्ये आणि गोरे यांना विजारपूर जेलमध्ये पाठवून दिले. श्री. देव, कुकडे येरवडा जेलमध्येच राहिले.

## धुळे जेलमधील भ्रष्टाचार

माझी राहिलेली सर्व शिक्षा धुळे जेलमध्ये काढावी लागली. आरंभी पसतीस पौंड दळणाचे काम दिले होते. पुढे मग आणखी दुसरी कामे दिली. माझा नेहमीचा स्वभाव शांत व सौम्य आहे. माझ्यात अरेरावी वृत्ती नाही. त्यामुळे जेलमध्ये मजकडून पोरकटपणा झाला नाही. मात्र एकदा धुळे जेलचा जेलर व त्याच्या हाताखालील सुभेदार, जमादार यांच्याविरुद्ध मी एकदम जोराने इन्स्पेक्शनच्या दिवशी जेल सुपरिंटेंडेंट मेजर डॉ. साठे यांच्याकडे तक्रार केली. सगळा जेल हादरून गेला. जेलचे अधिकारी, जेलर, सुभेदार, जमादार माझ्याविरुद्ध झाले. परंतु कैद्यांना फार आनंद झाला. ते माझ्या बाजूला झाले. जेलच्या कैद्यांच्या खाण्यापिण्याच्या वस्तूंचे कॉन्ट्रॅक्ट दिलेले असते. ह्या कॉन्ट्रॅक्टरकडून पैसे खाऊन कैद्यांना कमी कसाचे (कमी किंमतीचे) वाईट अन्न द्यावयाचे व किंमती चांगल्या धान्याच्या लावून जेलचे अधिकारी पैसे खावयाचे. तसेच कैद्यांकडून घरून पैसे मागवून खात असत. आणि अशा कैद्यांना काम सोपे देत असत. व काम कमी करून घेत असत. बाकी कैद्यांकडून मात्र काम पिळून काढून घेत असत. या संबंधाने कैद्यांनी व खालच्या साध्या पोलीस शिपायांनी मला पुष्कळ खूप वेळा सांगितले होते. त्यांना वाटे मी कांहीतरी करू शकेन. त्यांचा माझ्यावर विश्वास होता. परंतु त्यांच्यापैकी पुरावा देण्यास आणि साक्षी देण्यास कोणीही तयार नव्हते. अशा स्थितीत मी तरी काय करणार? शेवटी मी स्वतः परिणाम भोगण्याचे माझ्या मनाशी ठरवून मागे सांगितल्याप्रमाणे एकदम जोराने मुख्य साहेबाकडे तक्रार केली. हे वरिष्ठ अधिकारी याबाबतीत निष्पाप होते. जेलर, सुभेदार, जमादार हे दोषी होते. ते मुख्य साहेबाला म्हणाले, "मोडकांनी तक्रार केली ती खोटी आहे." तेव्हा मुख्य साहेब मेजर डॉ. साठे यांनी मला स्वच्छ सांगितले की "तुमची तक्रार पुरावा देऊन सिद्ध करा नाहीतर तुमच्यावर केस भरावी लागेल." मी त्यांना म्हटले "माझ्या बाजूने जेलमध्ये साक्ष देण्यास कोणीही पुढे येणार नाही. तुम्हीच याची चौकशी करा. मी तक्रार केली ती खरी आहे. म्हणून त्याचे परिणाम भोगावयास मी तयार आहे." जेलच्या कायद्याप्रमाणे मी फंदफितुरी करीत आहे. म्हणून मला अंधार कोठडीत बंद केले व माझ्यावर सक्त पहारा ठेवला. माझ्याकडे कोणालाही येऊ देत नसत. कर्म धर्म संयोगाने याचवेळी बाहेरची जेलची पंच कमेटी जेलची तपासणी करण्याकरता आली. त्यात १) कलेक्टर २) सेशन्स जज्ज ३) डी. एस. पी. आणि दोन धुळे शहरातले प्रतिष्ठित नागरीक होते. जेलची तपासणी करण्यात आली तेव्हा मी त्यांच्या पुढे लाचलुचपत प्रकरण सविस्तर मांडले. व "चौकशी कमिटी नेमा' अशी विनंती केली. मेजर डॉ. साठे त्यावेळी होतेच. पुढे चौकशीत काय झाले हे मला कळले नाही. ती गुप्त होती व ते

कैद्याला कळू देत नसत. परंतु याचा परिणाम चांगला झाला. जेलर, सुभेदार, जमादार यांची बदली झाली. अन्न चांगले मिळू लागले. मला अंधार कोठडीतून मुक्त केले. सरकारचे अधिकारी मला भिऊ लागले व माझ्याशी आदराने वागू लागले. डॉ. साठे तर माझ्यावर खूप खूप खूष झाले. त्यांना जेलची लाचलुचपत प्रकरणे माहित नव्हती. ती माझ्यामुळे माहित झाली. जेलचे कैदीतर मला विशेषत: मुसलमान कैदी बहाद्दूर म्हणू लागले.

### ग्रंथालय व कैद्याचे शिक्षण

मी जेल मध्ये कैद्यांना लिहिण्यास व वाचण्यास शिकविले. बाहेरून वाचावयाची पुस्तके मागवून त्यांना दिली. जेल अधिकाऱ्यांच्या कानावर ही गोष्ट गेली. तेव्हा त्यांनी मला धन्यवाद दिले व अधिकृतपणे माझ्या तिकीट बुकावर ते काम लिहून दिले. या कामामुळे मला सर्व जेलमध्ये मोकळे फिरता आले. पुढे माझ्या विनंती वरून अधिकाऱ्यांनी मुंबई सरकारची परवानगी मिळवून माझ्या यादीप्रमाणे दीड हजार रुपयांची बालबोध क्रमिक पुस्तके, तसेच पाटचा, पेन्सिली मागवून ग्रंथालय स्थापन केले. जेलचे कैदी त्याला कित्येक वर्षे "मोडक ग्रंथालय" असे म्हणत. त्या जेलमधून माझी मुक्तता झाली, तेव्हा माझी दोनशे रुपये किंमतीची उत्तम पुस्तके मी त्या ग्रंथालयास देणगी म्हणून दिली.

त्या जेलचे सुपरिंटेंडेंट साहेब मेजर डॉ. साठे सज्जन गृहस्थ होते. आणि प्रख्यात सर्जन होते. धुळे जेलमध्ये मी प्राणांतिक आजारी पडलो. जेलच्या अन्नाने कधी हगवण तर कधी आव पडण्याचे सुरू झाले. आतड्यांना सूज आली. लिव्हरला सूज आली. त्यामुळे फार अशक्त झालो. बरे होण्याच्या दृष्टीने डॉ. साठे हताश झाले होते, त्यांनी तसे त्यांच्या वरिष्ठाना कळविलेही होते. "मी माफी मागितली तर त्या अटीवर सरकार सोडण्यास तयार आहे" असे ते मला म्हणाले. माझा स्वाभिमान नेहमी जागृत असे. म्हणून "मी मरण्यास तयार आहे. माफी मागणार नाही" असे साहेबांना बजावून सांगितले व प्रकृती बरी होत नाही म्हणून कंटाळून मी चालू असलेली ट्रीटमेंट घेण्यास नकार दिला. या सर्वांचा परिणाम चांगला झाला. डॉ. साठे यांनी सरकार कडून परवानी मागवून स्पेशल प्रिझनर म्हणून स्पेशल व्यवस्था केली. त्याचा परिणाम चांगला होऊन माझी प्रकृती सुधारू लागली. याच श्रेय डॉ. साठे साहेब यांना आहे. म्हणून मी त्यांना धन्यवाद देत आहे. माझी शिक्षा संपून १९२८ च्या शेवटी मी बंधमुक्त होऊन पुण्यास परत आलो. धाकटा भाऊ चि. दत्तात्रेय पुण्यासच होता.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# विठ्ठल रामजी शिंदे

जन्म : २३ एप्रिल, १८७३. मृत्यू : २ जानेवारी, १९४४.

**महाराष्ट्रातील एक कर्ते सुधारक आणि थोर समाजसेवक.**

अव्वल इंग्रजीमध्ये महाराष्ट्रात ज्या सामाजिक सुधारणेच्या चळवळी झाल्या त्यात महर्षी शिंदे यांचा प्रमुख वाटा होता. त्यांचे बालपण अत्यंत दारिद्र्यात गेले. शिवाय अनेक कौटुंबिक आपत्ती आल्या. तरीपण न डगमगता त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. १८९८ साली ते बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. या काळात त्यांनी मिल्ल आणि स्पेन्सर यांच्या ग्रंथांचे सूक्ष्म अध्ययन केल्यामुळे त्यांच्या विचाराचा त्यांच्यावर फार मोठा परिणाम झाला. त्यानंतर त्यांनी मॅक्समुल्लरच्या धर्मावरील व्याख्यानांचे सूक्ष्म परिशीलन केले. १९०१ ते १९०३ पर्यंत त्यांनी परदेशात वास्तव्य केले. या वेळपावेतो त्यांच्यावर ब्राह्मोसमाजाच्या विचारसरणीचा पगडा बसला होता.

अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी अविरत परिश्रम केले. १९३३ साली 'भारतीय अस्पृश्यांचा प्रश्न' हा ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केला. अस्पृश्योद्धाराचे कार्य हा त्यांच्या कार्याचा मेरुमणी म्हटला

पाहिजे. 'दी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी'ची स्थापना करून त्यांनी आपल्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला राष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून दिले. त्यांच्याच आग्रही प्रयत्नामुळे कलकत्ता येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरलेले असताना अस्पृश्यता निवारणाचा ठराव त्या अधिवेशनात संमत करण्यात आला. अस्पृश्यता निवारणा-प्रमाणे त्यांनी जातिभेद, क्षुद्र दैवतांची उपासना, स्त्रियांची विटंबना, होळीतील बीभत्स प्रकार इ. धर्माच्या नावाखाली चालू असलेल्या अपप्रकाराविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध बंड उभारले होते. कै. आगरकरांप्रमाणे त्यांनाही समाजाकडून फार छळ सोसावा लागला होता आणि त्यांच्यावर मारेकरीही घालण्यात आले होते. 'शिंदयांची सर्कस' म्हणून त्यांचे व्यंगचित्र काढून 'आधुनिक काळातील महान कलि पुरुष' म्हणून त्यांचा निषेधही करण्यात आला. पण या सर्व छळवादाला मोठ्या सहिष्णु अंतःकरणाने तोंड देऊन त्यांनी आपले कार्य पुढे चालू ठेवले. १९३० साली सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांना सहा महिन्याचा कारावास सोसावा लागला.

पुढील उतारा त्यांच्या 'माझ्या आठवणी आणि अनुभव' या आत्मवृत्तातून घेतला आहे.

# कायदेभंगाच्या चळवळीत

विठ्ठल रामजी शिंदे

१९३० साली एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात सोमवारी सकाळी मी हवेली तालुक्यातील पहिल्या दौऱ्यावर निघालो. बरोबर दहापंधरा तरुण स्वयंसेवकांची तुकडी होती. सत्याग्रहाचा मोठ झेंडा फडकत होता. बाजाची पेटी, टाळ आणि प्रभातफेरीची पदचावली प्रत्येकाच्या हाती होती. एक डफ-तुणतुण्यासह पोवाडेवाल्यांचा ताफा बरोबर होता. पुण्याच्या हद्दीवर फर्ग्युसन कॉलेजच्या समोर प्रथम झेंडावंदन झाले.

## दौरा

हा दौरा प्रथम पुण्याजवळील दापोडी गावी गेला. तेथून प्रत्येक खेडेगावात प्रथम प्रभातफेरी म्हणत उभ्याउभ्याच व्याख्याने देत पुढच्या गावी जात असू. दोन प्रहरी एखादया गावी जेवण्याचा बेत आधीच ठरलेला असे. स्नान वगैरे आटोपल्यावर जेवण्यास वेळ असेल तेव्हा पोवाडे सुरू होत. चिंचवड, देहू, आळंदी, चऱ्होली, लोणी, लोहगाव वगैरे लहानमोठी सर्व गावे करून पहिल्या आठवड्यात बहुतेक हवेली तालुका संपवला. ह्या आठवड्यात पायी शंभर मैलांचा प्रवास झाला. ह्या दौऱ्याचा पुढील आठवड्याचा कार्यक्रम वर्तमानपत्रात प्रसिद्ध होत असे; पण एकदोन दिवसांतच खेड्यापाड्यातून दौऱ्याची दाट वदता कर्णोपकर्णी पसरू लागली. एक गाव संपवून पथक दुसऱ्या गावी निघाले की , झेंड्याची वाट पाहात बायकामुले हद्दीवर येऊन बसत. पुढे पुढे तर हा दौरा खेड्यांतील लोकांना इतका प्रिय झाला की, एका गावचे लोक आपल्या गावचे हद्दीपर्यंत पोचवायला येत तर दुसऱ्या गावचे लोक सामोरे न्यावयाला येत. दौरा अमुक ठिकाणी असेल असे संकेताने ओळखून पुण्याहून वासुकाका जोशी, देवगिरीकर वगैरे मंडळी मधून मधून समाचार घेण्यास येत. पहिल्या आठवड्याचा दौरा संपवून शेवटचे खेडे जे लोहगाव त्याहून येत असता वाटेत येरवड्याच्या तुरुंगाच्या बाहेर उभे राहून पथकाने एक गाणे म्हटले. तुरुंगाच्या बाहेर काही कैदी काम करीत होते, आम्हीही त्यांच्याबरोबर लवकर जाऊ असा विश्वास आम्हास वाटत होता. झेंड्याचा जयजयकार झाला त्या वेळी कैद्यांनीही त्यात भाग घेतला. पोलिस कौतुकाने पाहात होते. येरवड्याजवळील

टेकडीवरील विठ्ठलदास ठाकरसी यांच्या पर्णकुटीजवळच्या धर्मशाळेत पथकाची उतरण्याची सोय केली होती. तेथे सहभोजन झाले त्या वेळी गावातील शिष्टमंडळी हजर होती. सायंकाळी जंगलीमहाराजांचे देवळात पथक थोडा वेळ राहिले. तेथून शिवाजीमहाराजांच्या पुतळ्यास हार घालून बुधवार चौकातून मोठी मिरवणूक निघाली. सदाशिव पेठेतील शिवाजीमंदिरात जाहीर सभा झाली. त्या वेळी आठवड्याचा अहवाल मी सांगितला आणि खेड्यातील समाज स्वातंत्र्याला किती आतुर झाला आहे ह्याची हकीगत मी कळवली.

## दुसरा दौरा

पुढच्या सोमवारी सत्याग्रहपथक खेड तालुक्यास निघाले. त्या वेळी एक मोटार-लॉरी भाड्याने करावी लागली. स्वयंसेवक वीस जमले. जास्त येण्यास आतुर होते. मंचर, घोडे, जुन्नर, नारायणगाव वगैरे खेड्यातून दौऱ्यांचे मोठ्या थाटाने स्वागत झाले. ह्या दौऱ्यात प्रथम मीठ विकण्याचा कायदेभंग सुरू झाला. दांडी येथून मिठाची मडकी आणण्यात आली होती. केव्हा केव्हा मिठाचा लिलाव होऊन बरेच पैसे जमत. स्वयंसेवकांचे कॅप्टन कृष्णराव महादेव काळे हे होते. ह्यांनी अवर्णनीय उत्साह दाखविला. माझ्यानंतर ह्या उत्साही युवकास ७ म. स. मजुरीची शिक्षा झाली. गाडगीळ व लिमये ही दोन मुले पोवाड्यांची बहार करीत असत. मोठ्या गावातील सभेत आसपासच्या सर्व खेड्यातील बायकामुले येऊन वाट पाहात बसत असत.

हे दिवस उन्हाळ्याचे असल्याने शेतकऱ्यांना सुटी असे. त्या वेळी वर्षाचे हंगाम, उरुस, कुस्त्या ह्यांच्या निमित्ताने मोठमोठ्या जत्रा भरत. ह्याचा फायदाही दौऱ्यास मोठा झाला. सभेतील व्याख्यान संपल्यावर विदेशी कापडाची होळी होत असे. त्या वेळी कोणावरही जुलूम होत नसे. उत्साहाच्या भरात लहान लहान मुले आपल्या डोक्यावरील मौल्यवान विदेशी टोप्या होळीत टाकीत. त्यात काही सरकारी अधिकाऱ्यांची मुले आपल्या वडिलांच्यादेखत आपल्या टोप्या फेकीत. सभा सुरू होण्यापूर्वी आणि संपल्यावर पथकाच्या गावातून फेऱ्या होत. त्यामुळे पथकाची गाणी गावोगाव म्हणण्याचा प्रघात पडला. उरुस व जत्रेतला जमाव सोडून दिला तरी इतर सभेच्या वेळीसुद्धा काही ठिकाणी ५/७ हजाराचा जमाव सहज जमे. लोकांना या दौऱ्याचे वेडच लागून गेले होते.

हा दौरा म्हणजे धार्मिक वारकऱ्यांची एक दिंडीच झाली होती. स्वयंसेवक पथकाची शिस्त धर्म म्हणून पाळीत असत. भल्या पहाटे उठून ५॥ वाजता उपासनेस सर्वजण नियमाने बसत. उपासनेच्या वेळी मी त्यांना पथकाची शिस्त, आम्ही चालविलेल्या कार्याचे पावित्र्य आणि जबाबदारी, अत्याचार आणि सहनशीलता वगैरे धार्मिक विषयांचे महत्त्व समजावून सांगत असे. ६ वाजता

सूर्योदयाचे वेळी सर्वजण झेंडावंदन करीत. नंतर खेड्यातून प्रभातफेरी निघे. ती संपल्यावर आम्ही दुसऱ्या गावी जात असू. दुसऱ्या आठवड्याचा दौरा संपल्यावर ह्या कामाने सबंध महाराष्ट्रभर खळबळ उडवून दिली. सरकार धरण्याची प्रतिक्षणी आम्ही वाट पाहात होतो. पोलिस शिपाई किंवा सी. आय. डी. भेटले तर त्यांनाही आम्ही आनंदाने मोटारीत घेत असू.

## तिसरा दौरा

तिसरा दौरा भीमाशंकर व त्याच्या पलीकडील गावी निघाला. हा प्रांत तेथील प्रसिद्ध कोळ्यांचा होता. त्यात काही गुन्हेगार प्रवृत्तीची माणसे असत. त्यांना दारू न पिणे, चोरी, अत्याचार न करणे वगैरे आमच्या कार्याची सात्विक तत्त्वे समजावून सांगणे अत्यंत कठीण गेले. ते म्हणत, "आम्ही दारू एक वेळ सोडू, पण चोरी व मारामारी कशा सोडू? तो आमच्या पोटाचा धंदा व वाडवडिलांचा धर्म आहे." हे ऐकून आम्ही अशा लोकांपुढे कायदेभंगाचे पुराण बंद ठेवीत असू आणि इतर सामोपचाराच्या गोष्टी सांगत असू. एकदोन ठिकाणी तर सभेमधून अस्पृश्यांना वेगळे बसवण्यात आले. ह्या वेळी आम्ही आपले ठाणे अस्पृश्यात नेऊन स्पृश्यांना वेगळे ठेवीत असू आणि अस्पृश्यतेचा जुना कायदा मोडायला त्यांना शिकवीत असू. खरे पाहता अशा दौऱ्यावर आम्ही सरकारचा द्वेष करावा असे कोठेच कधी सांगितले नाही. सरकारचे पुष्कळ कायदे आमच्या हिताचेच आहेत, ते अवश्य पाळावेत असेच आम्ही सांगत असू. जे कायदे प्रजेच्या हिताचे नसतात व जे प्रजेच्या विरोधास न जुमानता केलेले असतात, असेच कायदे निवडून काढून ते पाळू नयेत असे आम्ही सांगत असू.

## माझी अटक

आमच्या पथकात सर्व जातीचे तरुण होते. आम्हीही एक प्रकारच्या युद्धक्षेत्रात होतो. म्हणून कोणत्याही प्रसंगी आम्ही जातिभेद पाळीत नव्हतो. सोवळ्या तरुणास आम्ही अगोदरच येऊ देत नसू. किंबहुना अशा प्रकारच्या भेदाचे कोणालाही स्मरण नव्हते. ता. १० मे, १९३० रोजी आम्ही तिसऱ्या आठवड्याचा दौरा संपवून पुण्यास परत आलो. भीमाशंकरचा घाट चढून उतरल्यामुळे व बराच प्रवास पायी झाल्यामुळे मी फार थकून गेलो होतो. रविवारचे दिवशी कोठेही बाहेर पडलो नाही. ता. १८ मे रोजी वैशाख शुद्ध पौर्णिमेस बुद्धजयंति होती. कौटुंबिक उपासनामंडळाच्या विद्यमाने सालाबाद-प्रमाणे उत्सव करण्यास वेळ नव्हता. सकाळी मी एकटाच पर्वतीच्या टेकडीवर जाऊन ध्यान करून आलो. १२ वाजता जेवणखाण करून दिवाणखान्यात बसलो. इतक्यात पुणे शहरचे पोलिस इन्स्पेक्टर मि. मिलर व जिल्हा इन्स्पेक्टर मि. शिंदे हे मला पकडावयास दारात आले. ही कुजबुज मला अगोदरच कळली होती.

माझी प्रवासाची पिशवी, वाचनाची पुस्तके व जरुरीचे कपडे घेऊन मी गेलो. भगवद्गीता, धम्मपद, बायबल, 'सुलभ गीता', चष्मा, विंचरण्याची फणी, इतके माझे सोबती कोठेही बरोबर असणारे, तेही माझ्याबरोबर निघाले. घरातील म.गसे खिन्नवदनाने पाया पडू लागली. रस्त्यात मोटार उभी होती. पोलिसांनी मला खेडकडे नेतो असे खोटेच सांगितले. ती खोटी हूल गावात उठल्यावर बाबूराव जेधे वगैरे मंडळी खेडकडे जाऊन आली. तिसरे प्रहरी खंडाळा येथील सरकारी बंगल्यात माझे बाळपणीचे स्नेही, डेप्युटी कलेक्टर श्री. माधवराव हुल्याळ ह्यांचेपुढे मला उभे करण्यात आले. ११७ कलमाखाली गुन्ह्याला चिथावणी देण्याचा व ४७ कलमाखाली बेकायदेशीर मिठाची विक्री केल्याचा असे दोन आरोप माझ्यावर होते. दोन पोलिस, मी व मॅजिस्ट्रेट ह्या चौघांशिवाय कोर्टात कोणीच नव्हते. मी खोलीत शिरताच रा. हुल्याळ यांनी आपण होऊनच मला नमस्कार केला व आपल्या टेबलाला लागूनच मला बसावयास खुर्ची दिली. गुन्हा कबूल आहे काय असे हुल्याळ मॅजिस्ट्रेटने विचारले. मी म्हटले की, "पोलिसांनी सांगितलेली हकीकत सगळी खरी आहे. मी गुन्हा केला किंवा कसे ते सांगण्याचे काम माझे नव्हे. ते कोर्टाने ठरवावे." सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. क्लास 'बी'. अशी शिफारस झाली. पण ती वॉरंटावर न लिहिता तोंडीच पोलिसास बजावण्यात आले. त्या हलगर्जीपणामुळे तुरुंगात दोन आठवडे तिसऱ्या वर्गाचे सुख अनुभवास आले.

खटल्याचा फार्स संपल्यावर मित्र या नात्याने मी मॅजिस्ट्रेट हुल्याळ यांच्या पत्नीस भेटलो. त्यांच्या पत्नीचे डोळे अश्रूंनी भरले होते. मी विनोदाने म्हटले "आपल्याच नवऱ्याचा मी कैदी असून आपण अश्रु गाळता!" एक अंजीर खाऊन पाणी पिऊन मी मोटारीत बसलो. सायंकाळी ७ वाजता येरवडा तुरुंगात दाखल झालो. फक्त नेसूचे धोतर व अंगातला सदरा ह्याशिवाय माझे सर्व कपडे एका पार्शी वॉर्डरने काढून घेतले. मी तिसऱ्या वर्गाचा सक्तमजुरीचा कैदी म्हणून मला एकाने झोपावयाला जाडेभरडे तरट व पांघरावयाला तसेच कांबळे दिले. ना उशी ना चादर, पण दिवसभर झोप लागली. पहिल्या आठवड्यातच माझे ४/५ पौंड वजन कमी झाले. तुरुंगाच्या धक्क्याने असे प्रथम प्रथम होते. पण पुढे ते भरून निघते.; तुरुंगाच्या बाहेरच्या भिंतीला लागूनच अंधारी म्हणून जो भाग आहे त्यात मला ठेवण्यात आले. रात्री खोलीत प्रकाश नसे. म्हणून ह्या भागाला कदाचित अंधारी हे नाव असावे. पण पूर्वी ह्या भागातील खोल्यांत दिवसासुद्धा अंधार असावा. त्याशिवाय अंधारी हे नाव या भागाला अन्वर्थक नाही. कारण, ह्याच्याच पूर्वेकडील भाग स्वच्छ आणि प्रशस्त होता. अंगणात झाडे, स्नानास हौद, वगैरे चांगली व्यवस्था होती. रात्री दिवेही असत. मला १५ दिवसांनी 'बी'

क्लास मिळाल्यावर ह्या चांगल्या भागांत माझी बदली झाली. महात्मा गांधी वगैरे मोठ्या पुढाऱ्यांनाही पुढे ह्याच वॉर्डात ठेवण्यात आले होते.

## भास्करराव जाधव

ता. १ जुलै १९३० रोजी रा. भास्करराव जाधव मला मुद्दाम भेटावयास आले. त्या वेळी ते शिक्षणमंत्री होते. रुप्याचे छडीचा भालदार घेऊन आल्यामुळे चहूकडे तुरुंगात खळबळ उडाली. सुपरिंटेंडेंटच्या खोलीमध्ये भास्कररावांकडे मला नेण्यात आले. मला पोचवून सुपरिंटेंडेंट जेव्हा जाऊ लागले तेव्हा मी त्यांना बसण्याची विनंती केली. इतर कोणी भेटावयास आले असता कैद्याला १५ मिनिटांपेक्षा अधिक वेळ भेटण्याची परवानगी नसते. पण भास्करराव तब्बल दोन तास माझ्याशी बोलत बसले तरी उठेनातच. ते मराठीत बोलू लागले. भास्कररावांना मी "कां आलात?" असे विचारले. "एरव्ही समाचाराला आलो" असे सांगून ते म्हणाले, "आता तुम्ही वृद्ध झाला आहात. तुम्हास विश्रांतीची जरुरी आहे. ती घेण्याचे निश्चित करीत असाल तर मी तुम्हास नेण्यासाठी आलो आहे." मी म्हटले, "विश्रांतीच जर मला पाहिजे आहे, तर मला येथल्या इतकी बाहेर दुसरीकडे कोठे मिळणार नाही. आणि आमच्यासारखी मंडळी येथे असली तर बाहेरचीही थोडी गडबड कमी होईल." भास्करराव म्हणाले; "अहो, काय बाहेर वणवा पेटला आहे. शहरांतून आणि खेड्यांतून सारखीच धामधूम चालली आहे." "असे जर आहे तर आम्हाला येथेच राहू द्या" मी म्हटले. "मी येथे येण्यापूर्वी जर तुम्ही मनात आणले असतेत तर मी येथे आलोही नसतो. येथे आल्यावर मला बाहेर नेण्याचे मनात आणून काय उपयोग?" असा एकमेकांच्या मनातला भाव एकमेकास कळल्यावर, मग ब्राह्मणेतर पक्षाविषयी बोलणे सुरू झाले. "ब्राह्मणेतर पक्षाची संघटना चांगली होत नाही, काम होत नाही" वगैरे वगैरे माझी स्पष्ट मते मी सांगितली. एकंदरीत हे संभाषण आणि ही भेट मला आंधळ्या कोशिंबिरीप्रमाणे वाटली.

## तुरुंगातील दिनचर्या

'सी' क्लास व 'बी' क्लास यातील फरक असा आहे. 'सी' क्लासच्या कैद्यांना सकाळी १ वाडगाभर जोंधळ्याची कांजी मिळते. मग १० वाजता १ किंवा २ बाजरीच्या भाकरी आणि मुगाची आमटी. संध्याकाळी ५ वाजता पुन्हा तेच जेवण मिळते. नेसावयास खादीचे दोन मांडचोळणे व दोन सदरे मिळतात. निजावयास एक काथ्याचे तरट व दोन कांबळी. 'बी' क्लासला कांजीच्या ऐवजी सकाळी ७ वाजता अर्धा शेर दूध, १० वाजता चपाती, भात, वरण, एक भाजी, लोणी व साखर. संध्याकाळी ५ वाजता तेच जेवण. दोन्ही क्लासला चटणी वगैरे

काही तिखट मिळत नाही. 'बी' क्लासला नेसावयास ठराविक धोतराची पाने, अंगात दोन सदरे, डोक्यास खादीची गांधी टोपीसारखी टोपी. निजावयास एक गादी, एक चादर, एक उशी आणि अंथरावयास दोन कांबळी. भांडी 'सी' क्लासला १ उथळ वाडगा व १ कथलाचे टमरेल एवढीच भांडी मिळतात. 'बी' क्लासला अॅल्युमिनियमचे ताट, तांब्या, दोन वाडगे ही भांडी मिळतता. कैदयांनी ही भांडी वरचेवर स्वच्छ ठेवावीत अशी ताकीद मिळे व त्यांची तपासणी होत असे. रोज सकाळी डॉक्टर येऊन कैदयांची तपासणी करीत असे. रोग्यांस औषध आणून देत. 'बी' क्लासला खोलीतच औषध मिळे. 'सी' क्लासला दवाखान्या जाव लागे. आजार गंभीर असल्यास रोग्याची तुरुंगातील हॉस्पिटलात रवानगी होई. दर आठवडयाला स्वतः जेल सुपरिंटेंडेंट येऊन प्रत्येक कैदयाची तपासणी करून काही गरजा, अडचणी असल्यास ऐकत असे. त्याच्याबरोबर जेलर, असिस्टंट जेलर, वॉर्डर वगैरे असत. एक असिस्टंट जेलर रोज कैदयांस येऊन भेटून जात असे. ही सर्व बडदास्त राजकीय 'बी' कैदयांसाठीच असे. 'बी' क्लासचे सगळे कैदी एकाच वार्डात ठेवण्यात आले होते. त्यांना एकमेकांच्या खोलीत जाण्यास मनाई असे; पण व्हरांडयात किंवा अंगणात बोलण्यास हरकत नसे.

### तुरुंगांतील कामे

'बी' क्लासच्या सक्तमजुरीच्या कैदयांना काथ्याची जुनी तरटे उकलणे आणि उकललेल्या काथ्यांची पुन्हा नवीन दोरखंडे बनवणे हे काम सकाळी सातपासून १० पर्यंत व दुपारी १२ पासून ४ पर्यंत असे एकंदर ७ तास असे. 'सी' क्लासला बाहेरची कष्टाची कामे मिळत व धट्टयाकट्टया माणसास चक्की मिळे. म्हाताऱ्या माणसांना सवलतीने काम मिळे. पण काथ्या वळण्याचे काम फार श्रमाचे नसल्याने माझे वय ५८ वर्षांचे होते तरी माझ्या आणि माझ्याबरोबरीच्या इतर तरुण कैदयांच्या कामात काही फरक होत नसे. नित्य उठून ह्या प्रकाराशिवाय दुसरा कोणताही व्यवसाय नसल्याने कैदयांच्या मनास उदासीनता येत असे. आमच्या दालनाच्या समोरील अंगणात पूर्व बाजूस एक कलमी आंब्याचे ठेंगणे झाड व पश्चिम बाजूस एक लिंबाचे झाड हिरव्यागार पालवीने वाकलेले दिसे. वरचेवर आम्ही त्यांच्याजवळ जाऊन आमच्या मनाची उदासीनता घालवीत असू. दर पंधरवडयाने आमची वजने घेण्यात येत असत. ता. १०-८-३० रोजी माझे १४४ पौंड वजन भरले. तीन महिन्यात माझे १२ पौंड वजन कमी झाले.

### आमांश व गाउटचा आजार

येथें आल्यापासून मी जून महिन्याचे शेवटी आमांशाने आजारी पडलो. त्यांतच मला Gout म्हणजे बोटांतील संधिवाताचा विकार झाल्याचे कळले.

माझ्या उजव्या पायाची तीन बोटे नखाजवळ पाळीपाळीने दुखू लागली. हा आजार मला पूर्वी कधी झाला नव्हता. मला हॉस्पिटलात सुमारे ८ दिवस ठेवण्यात आले. ता १४ ऑगस्टला घरची मंडळी भेटण्यास आली, तेव्हा हॉस्पिटलातून भेटण्याचे ठिकाणी जाण्याचीसुद्धा मला शक्ति नव्हती. कसाबसा भेटून परत आल्यावर अंगात ताप चढला. रात्रभर बोट ठणकून फार त्रास झाला. प्रकृतीची काळजी वाटू लागली. दुसरे दिवशी सुजलेले बोट फुटले. ता. ९ पासून १९ पर्यंत हॉस्पिटलमध्येच होतो. बोटांतून पू गेल्यामुळे आराम पडला. अंधारीत परत आलो. ऑगस्टच्या शेवटी पुन्हा थोडासा आमांशाचा विकार झाला. हा अंथरुणात पडण्यासारखा आजार नाही. नेहमीप्रमाणे खाणेपिणे चालू असून काम पण करीत असे. रोज काथ्या वळण्याचे काम करावे लागल्यामुळे हाताची बोटे दुखत. पडल्या जागी उठतानाही श्रम होतात. हा प्रताप वार्धक्याचा की तुरुंगाचा हे कळेना.

## तुरुंगांतील धर्माचरण

तुरुंगात हिंदु व मुसलमान कैद्याला धर्माचरण करण्याचे काही साधन नाही. पण रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या ख्रिस्ती पंथांची साप्ताहिक उपासना चालू असते. मला अशा उपासनांची फार गरज भासू लागली. तेव्हा सुपरिंटेंडेंटच्या परवानगीने मी कॅथॉलिक उपासनेस दर मंगळवारी जाऊ लागलो. तेथे येरवड्याचे फादर लॉडर हे उपासक असत. उपासना सकाळी चालू असे. आम्हाला 'इलस्ट्रेटेड विकली' हे इंग्रजी साप्ताहिकच काय ते वाचावयास मिळे. 'विविध वृत्त' आम्हास वाचावयास मिळणार अशी बातमी असि. जेलर मि. रॉजर याने सांगितली. म्हणून आम्ही त्याबद्दल अधिकाऱ्यांकडे वारंवार पृच्छा केली असताही अधिकाऱ्यांनी त्यास सफाईने बगल दिली. आमच्या वॉर्डातील आम्ही चौदा कैदी दर रविवारी ते पत्र आधाशासारखे वाचून काढीत असू. राजकीय वार्तेची ह्यात गंधवार्ताही नसे. म्हणून या पत्राची निवड झाली होती. सोमवारी पुन्हा हे आमच्याकडून काढून घेण्यात येत असे. मजकूर संपल्यावर केव्हा केव्हा आम्ही जाहिरातीसुद्धा वाचीत असू. त्या वेळी राजकीय पक्षाची व गांधींची सरकारशी समेटाची बोलणी चालली होती. सप्रू, जयकर हे शांतिदूत गांधींना वरचेवर येऊन भेटून जात असत. तुरुंगाच्या दारावरील दुसऱ्या मजल्यांतील सुपरिंटेंडेंटच्या ऑफिसात त्यांची बोलणी चालत असत बोलणी समजली नाही तरी खाली आवाज ऐकू येई. त्यावरच आम्ही तृप्ति मानून घेत असू.

## स्थलांतर

एकदा पंडित नेहरूना उत्तर हिंदुस्थानातून येरवड्यात आणण्यात आले. त्यांच्यासाठी अंधारीचा वॉर्ड खाली करून पाठीमागे सर्कल म्हणून एक मोठे

दालन आहे त्यात आम्हा चौदा जणास एकत्र ठेवण्यात आले. हरिभाऊ तुळपुळे, बाळुकाका कानिटकर, नगरचे देवचाके, स्वामी सदानंद, इतकेच काय ते महाराष्ट्रीयन होते. बाकी सगळे गुजराथी होते, ज्या दालनात आम्ही चौदा जण होतो त्यात आम्ही येण्यापूर्वी 'सी' क्लासेस ८६ कैदी धरून ठेवण्यात आले होते. दररोज शेकडो राजबंदीचे थवेच्या थवे येत. येताना त्यांच्या जयजयकाराच्या आरोळ्या ऐकून ते आल्याची आम्हास वर्दी कळे. तुरुंगाच्या नेहमीच्या सगळ्या जागा गच्च भरल्यामुळे बाहेर तंबूतून नवीन तुरुंग निर्माण करण्यात आला होता. रोज नित्य नित्य नव्या बातम्या कर्णोपकर्णी कळत. चित्ताची चलबिचल होई सर्कलमध्ये आल्यापासून आम्ही रोज भजन-उपासना एकत्र करीत असू माझे एक भाषाशास्त्रावर व्याख्यान झाले. आमच्या बोलण्यांत राजकारण नसल्यामुळे आमच्या उपासनांकडे व व्याख्यानांकडे जेलर कानाडोळा करू लागले.

## ॲडव्हायझरी कमिटी

प्रत्येक तीन महिन्यांनी एक ॲडव्हायझरी कमिटी तुरुंग पाहण्यास येत असे. जून व सप्टेंबर महिन्यात ही कमिटी आली. मि. मॅकी, कमिशनर व त्यांच्यासह सात-आठ युरोपियन व हिंदी गृहस्थ आले होते. ही माणसे आम्ही जणू काय प्राणिसंग्रहालयातील प्राणीच आहोत, अशा समजुतीने पाहून जात. कोणी काही व कसलीही विचारपूस करीत नाहीत. मग ह्या कमिटीचा उपयोग काय? दुसऱ्या कोणाजवळ न थांबता मजसमोर सर्वांना आणले. जणू काय संग्रहालयातील मी म्हणजे अतिशय प्रेक्षणीय प्राणी. हिस्ट्री तिकिट नावाचे लहानसे पुस्तक प्रत्येक कैदयाच्या नावे असते. त्यात त्याचे वर्तन, वजन, दिनचर्या नमूद केलेली असतात. माझे तिकिट कमिटीच्या मुख्य साहेबाने पाहिले. मंडळी मुक्याचे व्रत पाळून आली तशी गेली.

मी येथे ता. १२ मे रोजी आल्यापासून तुरुंगाधिकाऱ्यांकडे लेखन-साहित्याची मागणी केली. एक महिन्याने मागणी सफल झाली. टाक असला तर दौत नाही, दौत असली तर शाई नाही आणि हे सर्व असले तर दिवा नाही असा प्रकार नेहमी चालू असे. ता. २४ जुलै रोजी माझ्या खोलीत दिव्याची व्यवस्था करण्यात आली. अडीच महिन्यांनंतर मिळणाऱ्या दिव्याच्या प्रकाशाकडे पाहून मला आनंद झाला. तो इतका की लिहण्याचे सोडून मी दिव्याकडेच पाहात बसलो. त्या दिवसापासूनच मी माझी रोजनिशी व बाळपणीच्या आठवणी लिहू लागलो.

## मुक्तता

ता. १३ ऑक्टोबर, १९३० ला मी व बाळूकाका अंगणात शतपावली करीत असता आमचा वॉर्डर सखाराम तुकाराम धाकटे (एक मराठा जातीचा

खुनी कैदी) एकदम मजकडे येऊन माझ्या पाया पडून रडू लागला. आपण वॉर्डर या नात्याने थोडेसे कडक वागल्याबद्दल पश्चाताप झाला. एवढेच तो म्हणत होता. मला मागाहून कळले की, माझी सुटका ता. १४ रोजी होणार होती हे त्याला आधी कळले होते. पण ते त्याला मला कळविण्याचा अधिकार नव्हता. ह्या शिस्तीमुळे मी त्यास पुन्हा भेटणार नाही म्हणून त्याचे हे रडे होते.

ता. १४ ऑक्टोबर, १९३० रोजी सकाळी उठल्याबरोबर जमादारांनी येऊन मी सुटलो म्हणून सामानाची तयारी करून लवकर ऑफिसात येण्याची वर्दी दिली. पुणे शहर काँग्रेस कमिटीचे चिटणीस श्री. जोशी हेही मजबरोबरच सुटले. माझी डायरी व लेख तपासून काही आक्षेप निघतील की काय अशी मला भीती होती; पण तसे काही झाले नाही. ८ वाजण्याचे सुमारास आम्ही बाहेर पडलो.

एकंदरीत सर्व अधिकाऱ्यांनी माझ्या तुरुंगवासात मला बरे वागवले. मध्यंतरी एका तरुण युरोपियन जेलरने तुरुंगाची नियमांची सबब सांगून माझी दाढी व डोकीवरचे केस काढण्याचा घाट घातला होता. "पण ती कधी निघावयाची नाही" असा मी त्यास निक्षून जबाब दिला म्हणून ते प्रकरण कसेबसे निपटले.

मी सकाळी ९/१० च्या सुमारास घरी पोचलो. दुसरे दिवशी रे मार्केटात जाहीर सभा भरवून माझे अभिनंदन करण्यांत आले. शेवटी माझ्या गळ्यात हार घालताना मी म्हटले, "आता कायदेभंग करून तुरुंगात जाणे ही इतकी सामान्य गोष्ट झाली आहे की, अशा माळा तुरुंगातून परत आलेल्यांच्या गळ्यात न घालता त्या अद्यापि तुरुंगात न गेलेल्यांच्या गळ्यात घातलेल्या बऱ्या." सभेत हंशा पिकला.

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
प्र|२५०/१
मंत्रालय.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# उषा श्रीपाद डांगे

जन्म : १६ जुलै, १८९८, मृत्यू : २३ ऑगस्ट, १९७६.

**नामवंत कामगार नेत्या.**

जन्म रायगड जिल्ह्यात वरसई येथे. मूळच्या वेणू भावे. वयाच्या विसाव्या वर्षी वैधव्य. त्यानंतर मुंबईत वास्तव्य. याच सुमारास श्रीपाद अमृत डांगे यांचा परिचय. त्यांच्या प्रेरणेने सेवासदनात शिक्षणासाठी दाखल. १९२५ ते २७ मुंबईच्या के. इ. एम्. हॉस्पिटलमध्ये शिकाऊ नर्स. ऑक्टोबर, १९२७ साली कॉ. डांगे यांच्याबरोबर विवाह. कॉ. डांगे यांच्या अटकेनंतर कामगार चळवळीत सक्रीय भाग. १९३४ साली गिरणीकामगार संपाच्या वेळी कारावास. १९३६ साली श्री. डांगे यांच्या समवेत भारताचा दौरा. कम्युनिस्ट पक्ष संघटनेच्या निमित्ताने प्रचार आणि व्याख्याने यात सहभाग.

१९३९ साली ब्रिटीश मिल्सच्या संपाचे नेतृत्व, अटक आणि जामीनावर सुटका. या संपात उषाताईंनी प्रथमच 'घेराव' तंत्राची सुरुवात केली. १९५३ मध्ये जागतिक ट्रेड युनियन तर्फे व्हिएन्ना येथे भरलेल्या सोशल सिक्युरिटी या विषयावरच्या अधिवेशनाला

उपस्थित. त्यानिमित्ताने युरोपची भ्रमंती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग. १९५८ मध्ये मास्कोला प्रयाण. १९६३-६४ साली कामकरी स्त्रियांचा मेळावा भरविण्यात पुढाकार.

## राजकारणाचा ओनामा

उषा डांगे

मीरतच्या धरपकडीनंतर १९२९ चा गिरण्यांचा दुसरा सार्वत्रिक संप सुरू झाला होता. मी सातव्या दिवशी हॉस्पिटलमध्ये जरा उठून उभी होते. समोर पाहिले तो कामगारांवर घोडेस्वार सोडण्यात आले होते. तो अन्याय पाहून माझी मी बदलून गेले. घरी येताच बारा दिवस लोटले न लोटले तोच संपाच्या पिकेटिंगसाठी गिरण्यांच्या दारावर जाऊ लागले. चाळीचाळीतून सभा घ्यायला लागले. या संपाच्या काळात रोझाचा जन्म झाला म्हणून तिला बहुतेक कामगार स्त्रिया 'संपातली बाय' म्हणून ओळखतात. सभांना जाताना पुष्कळदा रोझाला बरोबर घ्यावे लागे. मध्येच ती रडू लागली की जिला मूल असेल ती बाई तिला पाजत असे. कितीतरी कामगार बायकांचे दूध रोझा प्यायली. मी सर्वांसाठी काम करीत होते आणि सर्व माझ्यासाठी झटत होते.

मीरतच्या कटामध्ये भारतातले सर्व कामगार पुढारी पकडले गेले होते. विशेषत: त्या धरपकडीनंतर मुंबईच्या कामगारात जुना नेता असा उरलाच नव्हता. पकडून जाताना डींनी गिरणी कामगार युनियनची सर्व सूत्रे कॉ. देशपांडे यांच्या हवाली केली. त्यांना सर्वजण 'मास्तर' म्हणत. तरूण कामगारांना शिक्षण देण्याची मास्तरांची हातोटी होती. त्यानंतर मास्तरांना रणदिवे इत्यादी मंडळी येऊन मिळाली.

१९२८ पासून सर्व देशभर संपाची व लढ्याची लाट उसळली होती. ती चिरडून टाकण्यासाठी मालक व सरकार शिकस्त करत होते. पण मुंबईत १९२८ च्या संपात कामगारांचा विजय झाला होता. युनियन तसेच कम्युनिस्टांचा प्रभाव वाढला होता. असा सबंध धंदयातील दीडलाख कामगारांचा सतत सहा महिने चालू राहून अखेर यशस्वी होणारा संप परत मुंबईत किंवा आपल्या देशात झाला नाही. तसेच त्या संपात जशी संघटना उभी राहिली तशी परत कधीही पाहिली नाही. विशेषत: बायकांची संघटना वाखाणण्याजोगी होती.

ही संघटना आणि तिचे राजकीयदृष्ट्या क्रान्तिकारक स्वरूप पाहून सरकार आणि मालकवर्ग या दोघांनीही ती मोडून काढणारे हल्ले सुरू केले. गिरण्या गिरण्यांतून कार्यकर्त्यांची बडतर्फी सुरू झाली. मीरतच्या धरपकडीनंतर

कार्यकर्ते छाटून टाकण्याचा हल्ला प्रचंड प्रमाणावर सुरू झाला. पहिला हल्ला नायगावमधील मोरबागच्या गिरणीत सुरू झाला. त्याला उत्तर म्हणून तिथे संप झाला. नंतर ही छाटणी सर्व गिरण्यात झाली. एकूण सात आठ हजार लढाऊ स्त्री पुरुष कार्यकर्त्यांची ती कत्तल होती. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून युनियनच्या पुढाऱ्यांनी पुनः सार्वत्रिक संप एकोणतीस सालच्या एप्रिलमध्ये पुकारला.

संपकाळात पूर्वीच्या अठ्ठावीस सालच्या परंपरेला धरून कामगारांनी शौर्याच्या व धैर्याच्या अतुल कथा निर्माण केल्या. विशेषतः बायकांनी आघाडीची जागा कधीच सोडली नाही. सैन्यातील शिपायांप्रमाणे त्यांची संघटना झाली होती. गिरणीच्या दारावर युनियनचा पट्टा घालून त्या पिकेटींग करायला सज्ज रहायच्या. या तुफानी बायकांना झुगारून संप फोडण्याची मोठमोठ्या 'दादा' लोकांची हिंमत होत नसे. रात्रीच्या वेळी पुरुष कामगार गस्त घालत असत. अटतटीचे लढे होत. या दोन्ही संपामध्ये गिरणी कामगार बायकांनी बजावलेली कामगिरी इतिहासात अतुलनीय ठरली.

त्या काळात मुंबईच्या गिरणी कामगारांची विशेषतः बायकांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. ८४ गिरण्यांत मिळून ३०-४० हजार बायका होत्या. रहाट, गोळ्याची वाईंडींग, रंगाची वाईंडींग ही बायकांची खाती होती. बायकांवर देखरेख करायला जी बाई असे तिला नायकीण म्हणत. तिला ५ रु. दिले की, ती बायकांना कामावर ठेवायची व दर महिन्याला प्रत्येक बाईकडून एक रुपया घ्यायची. पगाराच्या दिवशी खात्यात पदर पसरून हिंडायची व ओटीत पैसे जमा करायची आणि तिचा दिवस गिरणीत काम न करता मांडला जायचा. तिचे सर्वात वाईट काम म्हणजे ती गिरणींतल्या तरूण देखण्या बायका मॅनेजर व इतर अधिकाऱ्यांना पोहोचवायची. त्यावेळी १५-१५ वर्षाच्या मुलीसुद्दा कामावर असायच्या. वाईंडींगला हात पोहोचत नसला तरी त्यांना काम मिळे. खोक्यावर उभे राहून या मुली काम करीत. त्याकाळी स्त्रियांच्या नाजुक बोटांतील कौशल्याची गिरणी मालकाना फार गरज होती. म्हणून इतक्या मुली व बायका कामावर ठेवत. सकाळी सात वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत त्या गिरण्यात राबत. घरात कोणीच नसले तर लहान मुलाला अफू घालून झोपवून ठेवीत. घरात मोठे मूल असले तर ते लहान मुलाची काळजी घेत असे. यावरून मुलांची काय अवस्था असेल याची कल्पनाच करावी. बाळंतपणाची रजा नव्हती, क्रेश नव्हते. असा तो जमाना होता.

आम्ही चाळीचाळीतून सभासद नोंदणी करीत असू. बरोबर हातात कंदील घेऊन कार्यकर्ते निघायचे. थाळी वाजवायची आणि लालबावटा घेऊन उभे रहायचे. मग वरच्या मजल्यावरचे स्त्रीपुरुष खाली येऊन सभासद व्हायचे.

सुरुवातीला बायका सभासद व्हायला घाबरत असत. कारण लाल-बावटयाची पावती हातात घेतली तर नायकीण कामावरून काढून टाकायची. जॉबर दम भरायचा. तेव्हा कोकणी बायकांचा भरणा जास्त होता. त्या म्हणायच्या, 'कित्यांत होवं लालबावटा! आमका काम मिळताला?' पण २८ च्या संपात मांडण्यात आलेल्या मागण्यांपैकी काही मागण्या मिळाल्या. युनियनला मान्यता मिळाली होती. त्यामुळे मालक-मॅनेजर, जॉबर, नायकीणी यांच्या जबरदस्तीला पायबंद बसला. नायकीणीला पैसे बंद झाले. बायकांकडून आता तिला सुपारीचे खांडही मिळेना. नाही तर कामगारांच्या श्रमानी तिचे घर भरलेले असायचे. तिची चंदी बंद झाल्यामुळे बायकांचा आत्मविश्वास वाढला. नागूसयाजी वाडी, लाल मैदान, कोंबडे गल्ली, कामगार मैदान येथे लाख लाख कामगारांच्या सभा व्हायच्या. मैदानांची नावेही आम्हीच पाडली. सभांना एकजात बायका हजर रहात. मग पुढे गिरण्यांतून मुलांसाठी क्रेश आले. बाळंतपणाची रजा मिळू लागली. कामाचे तास कमी झाले. गिरणी धंदयातील बायकांनी तेव्हा जो लालबावटा हातात धरला तो सोडला नाही.

१९२९ च्या संपात बायकांनी जे धैर्य व शौर्य गाजविले त्याच्या गोष्टी सांगाव्या तेवढया थोडयाच. सर्वत्र त्या आघाडीवर असत. एकदा पोलिसांनी सभेवर बंदी घालती. सभा मोडण्यास सांगितली. पुढाऱ्यांना पकडले, पण कामगारांनी सभा चालूच ठेवली. पोलिस लाठ्याकाठ्या घेऊन सभा जबरदस्तीने मोडू लागले. पण थोडयाच वेळात निराळेच दृश्य दिसू लागले. पोलिस पुढे पळत होते आणि बायका छत्र्या घेऊन त्यांच्या मागे लागल्या होत्या. दुसऱ्या एका प्रसंगी सार्जंटने कामगारांवर पिस्तुल रोखले. तितक्यात एक सीता नायकीण नावाची कामगार बाई पुढे सरसावली. तिने सार्जंटचे मनगट पकडले. म्हणाली, 'आमच्या पोरांना मारतोस काय?' झाले, लगेच पाच पन्नास बायका तिच्या भोवती जमा झाल्या. त्यांनी सार्जंटला घेरले. त्याच्या हातातील पिस्तुल हिसकावून फेकून दिले. दडपल्या गेलेल्या पण लालबावटयाखाली जागृत व संघटित झालेल्या कामगारांच्या ताकतीची वाढ त्या काळात झाली.

हा संप तीन महिने चालला. मग कामगार थकले. आदल्या वर्षी सहा महिन्याचा संप झाला होता. तो मिटल्यावर एक एक गिरण्यांचे संप झाले. नंतर दंगे झाले आणि आता परत तीन महिने बंद. लोक थकले व कामावर परत जाऊ लागले. एवढेच नव्हे तर दोन महिन्यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लोकांना कामावर जाण्याचा सल्ला दिला.

मग संप मागे घ्यावा की नाही याबद्दल पुढाऱ्यात मतभेद झाले. काही ठिकाणी परत जाणारे व संप चालू ठेवणारे यांच्यात चकमकी उडाल्या. मागच्या अठ्ठावीस सालच्या संपात जी एकजूट होती तशी आता नव्हती. त्या संपात एन.

एम. जोशी झाबवाला, बाबासाहेब आंबेडकर, आसवले, रावबहादूर बोले व आमची कम्युनिस्ट मंडळी या सर्वांची एकजूट झाली होती.

आता नवीन पुढारीपण देशपांडे, रणदिवे यांचे होते. त्यांच्या पद्धतीत एकजुटीच्या धोरणाला किंमत दिली जात नव्हती. अठ्ठावीस सालच्या संपात डांगे आदि कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी मुंबईच्या काँग्रेस कमिटीचासुद्धा संपाला पाठिंबा मिळविला होता. सर्व देशभर फिरून संपाला मदत मिळविली होती. पण या एकोणतीस सालच्या संपात एकीच्या ऐवजी बेकीचाच सूर जास्त होता, इतर पक्षांचा पाठिंबा सोडाच, प्रत्यक्ष लालबावटयाचे कम्युनिस्ट पुढारी मीरतच्या खटल्यात अडकल्यामुळे ती पूर्वीची एकजूट यावेळी नव्हती. त्यामुळे संप साफच फुटला. जवळ जवळ दहा हजार कार्यकर्ते बाहेर फेकले गेले.

संप, कामगारांचे लढे एकीकडे आणि दुसरीकडे मीरतचा खटला. यामुळे माझ्या मनाची सारखी ओढाताण चाले. पूर्वी डींना वेळेवर ज़ेवला नाहीत म्हणून ओरडणारी मी बाळंतीण असूनसुद्धा रात्री बाराच्या आधी जेवू शकत नव्हते. बाळंतीणीचे इतर सोपस्कार तर सोंडाच पण साध्या आमटी भाता पलिकडे दुसरे कधी जेवणही मिळत नसे. डी तुरुंगात असले तरी माझ्या कुवतीप्रमाणे त्यांचे काम चालू ठेवले याचा मला अभिमान वाटे.

मीरत खटल्यात डी पकडून गेल्यापासून तो ते सुटून येईपर्यंत मला कुणी संभाळले असेल, धीर दिला असेल तर तो आमच्या कामगारांनी. मला त्यांनी आपल्या चळवळीशी, जीवनाशी एकरूप व्हायला शिकविले. त्यामुळेच मी डींच्या ह्या दीर्घ तुरुंगवासात धैर्याने टिकले. आपण एकटे आहोत असे मला कधी वाटलेच नाही.

मी रहात होते त्या चाळीत व समोरच्या पिवळ्या चाळीत आमची अनेक घरोब्याची मंडळी होती. नावेच सांगायची तर धोंडी, धोंडीची आई, घाटीण म्हातारी, देवजी, गंगा, गंगाची आई, अहो आणि त्यांची बायको ही अगदी जवळची माणसे, धोंडी अपोलो मिलमध्ये कामाला होती. जानकी, तिची आई टेक्सटाईलमध्ये व घाटीण म्हातारी कापीदासमध्ये कामाला होत्या. म्हातारी रोज रात्री सोबतीला झोपायला यायची. अहो हे पारशी गृहस्थ रेल्वेत फोरमन होते. गंगा नेहमी आमचे घर सांभाळायची. युनियनच्या कामासाठी मला नेहमी बाहेर जावे लागे. रात्री झोपायच्या आधी मात्र रोज ही सगळीजण माझ्याजवळ येऊन बसत. मग दिवसभरच्या गप्पा व्हायच्या आणि माझ्याबद्दलची विचारपूस. जेवलीस का? भाजी कसली केलीस? रात्री झोप आली की नाही? तुझं लुगडं फाटलं का? सर्व बारीक सारीक चौकशी व्हायची. हव नको पाहिले जायचे. मोठ्या चाळीच्या घाणीचा ताईला त्रास नको म्हणून संडाससुद्धा चाळीतल्या लोकांनी माझ्यासाठी अलग बंद करून ठेवला होता.

तेव्हा आरोग्याची परिस्थिती एकूण वाईट होती. त्यामुळे इतर सर्व मुलांप्रमाणे रोझाला सुद्धा टायफॉइड, देवी, गोवर, न्यूमोनिया हे सर्व आजार झाले. तिच्या आजारपणात माझ्या बरोबरीने खस्ता काढल्या या सर्व मंडळींनी. देवी आल्या तर घट बसविण्याचे प्रकार देखील झाले. मला पटत नसले तरी बोलण्याची ताकद नव्हती. कारण मुलगी त्यांची होती. रोझाच्या या आजारीपणात त्यावेळी डॉ. उदगावकरांनी अमोल मदत केली. कोणत्याही वेळी बोलवा, डॉक्टर धावून यायचे आणि या औषधपाण्याचे त्यांनी कधी पैसे घेतले नाहीत.

रोझा जेवायला लागली तेव्हा तिला भात भरवण्याचे काम गंगाच्या मुलीचे. पण रोझाचे मुख्य जेवण अहोंच्या घरी. त्यांचा व त्यांच्या बायकोचा तिला फारच लळा लागला होता. अहोंचे जेवणाचे ताट वाढून झाले की, ते कमाच्या पुढे ठेवायचे. (ते पण रोझाला कमा म्हणत) जेवणात बोंबील, मासे, मटण, सर्व पदार्थ असायचे. मी प्रथम विरोध केला. पण ते म्हणायचे, 'ब्राह्मण असली म्हणून काय झाले? आमच्यातली तर आहे. आम्ही खातो ते ती खाईल.' वाढलेल्या ताटातले हवे ते पदार्थ रोझा खायची. मग त्याच ताटात अहोंचे जेवण व्हायचे. अशी माणसे आजूबाजूला असताना आणि तो काळ होता तसा असताना मला उत्साह वाटला नसता तर आश्चर्य.

रोझा त्याच गिरणी कामगारांच्या मुलांमध्ये वाढत होती. त्याच मुलांबरोबर एलफिन्स्टन पुलाच्या गटारावर खेळत होती. चळवळीचा परिणाम तिच्या बालमनावर होत होता. हातात थाळी व बावटा घेऊन, मुलांना घेऊन, चाळभर ती हिंडायची आणि दवंडी दयायची. 'आज रोझा एस. ए. डांगेचे भाषण होणार आहे, सर्वांनी सभेला या. लाल बावटे की जय, कांदू बंदूकी जय.' (कामगार बंधूंची जय) तिच्या या बाललीलांचे चाळभर कौतुक व्हायचे. संध्याकाळ झाली की ती अहोंची वाट पहात गॅलरीत बसायची. कारण अहो आले की, तिला चॉकलेट मिळायचे.

आमच्या या चाळीत ७०-८० बिऱ्हाडे होती. कामगारांपैकी कोणी दारू पिऊन आला तर घरात जाऊन गुपचूप झोपत असे. तोही बाहेर पडायचा नाही की त्याचा आवाज बाहेर यायचा नाही. इतका त्यांना माझा वचक वाटायचा. अर्थात ही गोष्ट अगदी नकळत झाली होती. कधी कधी मी पुढाकार घेऊन वाईट गोष्टी बंद पाडायची हेही खरे.

आमच्या शेजारी अबकारी खात्यातला एक शिपाई रहात असे. तो बायकोला रोज मारायचा. काही दिवस मी ऐकले आणि एक दिवस दारात जाऊन उभी राहिले. त्याला म्हणाले, 'अहो मामा, रोज काय मामींना मारता?

त्या पण माणूसच आहेत की. आता पुन्हा मारलेत तर पहा.' तेव्हापासून त्या बाईचा मार चुकला. दुसरी एक बाई खानावळ चालवित असे. तीसचाळीस माणसे तिच्याकडे जेवायला असायची. गिरणीचा भोंगा वाजला की वरण, भाजी, आमटी वाढून ती तयार ठेवायची. जेवणखाण आटोपली की, ही बाई पातेलीभर भात रोज गटारात नेऊन ओतायची. मी हे दोन तीन दिवस पाहिले. मग एक दिवस जेवणे चालली असताना खोलीत गेले. त्याबरोबर सगळेजण जेवण थांबवून पहात राहिले. मी त्यांना सांगितले, 'हे पहा, या बाईला उदयापासून साऱ्यावर काम करायला पाठवा.' कां ताई, असं कां म्हणतेस?' मी म्हटले, 'ही बाई रोज तीन चार माणसांचे अन्न गटारात टाकते. तिला जरा समजू दया, पैसा मिळवायला किती श्रम पडतात ते.'

त्यानंतर पुन्हा बाईने कधी अन्न टाकले नाही.

माझ्या जीवनातला हा भाग इतक्या सविस्तरपणे सांगितला, कारण अनेकांना त्या काळातील कामगारांची कल्पना नसते. त्यांमुळे त्यांना वाटते कामगारांच्या चाळीत रहाणे कसे असते कुणास ठाऊक? त्यांना चाळीस वर्षापूर्वीच्या कामगारांचे जीवन, त्यांची संस्कृती, नीती व व्यवहार याबद्दलची कल्पना यावी म्हणून या घटना सांगितल्या. आज मिळालेले हक्क म्हणजे आठ तासाचा दिवस, महागाईभत्ता इत्यादीसाठी त्या काळातील कामगारांनी प्राणांचे बलिदान दिले.

भांडवलदारांशी लढत असताना कामगारांच्या बाजूने उभ्या रहाणाऱ्यांना ते आपल्याशी एकरूप करून घेतात. मग तेथे ब्राह्मण-अब्राह्मण, मराठी-बिगर मराठी, असा भेद रहात नाही. तेथे सापडते-ते निर्व्याज प्रेम व मानवतेची निष्ठा. हा अमूल्य ठेवा या कामगारांनी मला दिला अन् तो मी जन्मभर जतन करून ठेवला.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# नरहर विष्णु गाडगीळ

जन्म : १० जानेवारी, १८९६. मृत्यू : १२ जानेवारी, १९६६.

**महाराष्ट्रातील ख्यातनाम काँग्रेस पुढारी आणि ग्रंथकार.**

जन्म राजस्थानमध्ये मल्हारगड येथे. शिक्षण मल्हारगड, पुणे आणि मुंबई येथे झाले. कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी वकीलीच्या व्यवसायाला प्रारंभ केला आणि त्याचवेळेस त्यांच्या सार्वजनिक कार्यालाही प्रारंभ झाला. १९२१ ते २४ या काळात त्यांनी पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे चिटणीस म्हणून काम पाहिले. १९२९ ते ४५ सालापर्यंत ते अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सभासद होते. १९३१ तें ४५ या काळात त्यांनी तीन वेळा महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपद भूषविले. या काळात त्यांनी युवक आणि कामगार चळवळीतही भाग घेतला.

काँग्रेसच्या चळवळीत त्यांनी अनेक वेळा कारावास भोगला. १९३४ साली ते मध्यवर्ती कायदेमंडळावर निवडून गेले व तेथे काँग्रेसपक्षाचे प्रतोद आणि चिटणीस म्हणून त्यांनी काम पाहिले. ४२ साली त्यांना स्थानबद्ध करण्यात आले होते आणि दोन वर्षांनी त्यांची सुटका करण्यात आली.

१९४७ साली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्रीय मंत्रीमंडळात त्यांची मंत्री म्हणून निवड झाली. १९५८ साली स्टेट बँकेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. त्यानंतर पं. नेहरुंच्या विनंतीला मान देऊन त्यांनी पंजाबचे राज्यपालपद स्वीकारले आणि ते ६२ सालापर्यंत सांभाळले. या काळात त्यांच्या कामगिरीचा गौरव म्हणून त्यांना एल्. एल्. डी. ही पदवी सन्मानपूर्वक देऊन पंजाब विदयापीठाने त्यांचा गौरव केला. त्यानंतर पुणे विदयापीठाचे उपकुलगुरू म्हणून त्यांची नेमणूक झाली.

सार्वजनिक जीवनात आघाडीवर असूनही गाडगीळांनी विपूल लेखन केले. सातारा येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते.

'पथिक' या त्यांच्या आत्मवृत्तातील हा उतारा.

## जालीम सरकार नही रखनी

न. वि. गाडगीळ

१५ फेब्रुवारी, १९३० ला साबरमती आश्रमात भरलेल्या काँग्रेसच्या कार्यकारिणीने कायदेभंगाचा ठराव केला. ज्यांचा अहिंसेवर विश्वास आहे व ज्यांचा विश्वास पूर्ण स्वातंत्र्यावर आहे, अशा सर्व लोकांना कायदेभंग करण्याची परवानगी देण्यात आली. त्याचप्रमाणे सरकारला जे कोणी सहकार देत असतील त्यांनी तो देऊ नये, असेही त्या ठरावात नमूद केले. पुढारी पकडल्यानंतर जे स्वतंत्र राहतील त्यांनी लढा चालवावा, असे सांगून त्या ठरावाने गांधींना सत्याग्रह सुरू करण्याची परवानगी दिली होती. एका आठवड्याच्या आत मिठाचा कायदा मोडण्याचा संकल्प गांधीजींनी केला. मिठागरे शान्तपणे ताब्यात घ्यावी, मीठ तयार करावे वगैरे कार्यक्रम खऱ्या सत्याग्रही तत्त्वाप्रमाणे त्यांनी जाहीर केला व त्याचा प्रथम त्यांनी ता. २ मार्चला व्हाईसरॉयला धाडलेल्या पत्रात उल्लेख केला. त्याचप्रमाणे त्यांना त्यांनी लिहिले की, 'ब्रिटिश राज्य हा एक शाप आहे. या राज्यात हिंदी प्रजा दरिद्री झाली आहे. तिला गुलाम करण्यात आले आहे. राजकीय गुलामगिरी व आध्यात्मिक उपासमार हा या राज्याचा परिणाम आहे. त्याच पत्रात ११ मागण्या केल्या. देशात हिंसेचे वातावरण राज्यकर्त्यांच्या दुष्कृत्यामुळे पसरत आहे. त्याला आळा घालण्यांचे प्रभावी साधन सत्याग्रह हेच आहे. मागण्या मान्य न झाल्यास आपण ११ मार्चला पदयात्रा काढून आश्रम सोडून दांडीला जाऊन तेथे कायदेभंग करू.' हे पत्र एका रेनॉल्ड या नावाच्या इंग्रज तरुणाबरोबर व्हाइसरॉय यांना धाडले. उत्तरात व्हाइसरॉयने गांधींना बजावले की, 'ते आगीशी खेळत आहेत. शान्तताभंग होईल.' याला उत्तर देताना गांधीजींनी लिहिले की, 'मी गुडघे टेकून नम्रतेने अन्न मागितले, व तुम्ही दगड दिले. इंग्रजांना हिंसाच फक्त समजते. म्हणून तुमच्या पत्रातील भाषेबद्दल मला आश्चर्य वाटत नाही. राष्ट्राला शान्ततेचा अनुभव म्हणजे तुरुंगातील शान्तता एवढाच आहे. 'हिन्दुस्थान म्हणजे एक तुरुंग आहे. ब्रिटिशांचा कायदा मी मानीत नाही. तो मोडणे माझा पवित्र धर्म मानतो.' यानंतर कायदेभंगाचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. ता. ११ मार्चला ७५ अनुयायांसह त्यांनी साबरमती आश्रम सोडला. या ७५ अनुयायांबरोबर हजारो

लोक पदयात्रा करीत होते. गोकुळ सोडून कृष्ण गेले –त्याचप्रमाणे हे दृश्य होते. स्वराज्य मिळाल्याशिवाय आश्रमात येणार नाही, ही त्यांची प्रतिज्ञा होती. ता. २१ मार्चला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक भरून तिने कार्यकारिणीच्या ठरावाला पाठिंबा दिला. ता ११ ला दांडीयात्रा सुरू झालीच होती. त्यापूर्वी वल्लभभाईंनी काम सुरू केले होते. सूर्याच्या उदयापूर्वी अरूण येतो, त्याचप्रमाणे झाले होते, त्यांना सरकारने पकडले व तीन महिन्यांची शिक्षा दिली. दांडीयात्रेला आता जोर आला. मुक्कामा-मुक्कामावर जनता लाखांनी येऊ लागली. राम दंडकारण्यात वनवासासाठी निघाला आहे, अशी वर्णने होऊ लागली. नर्मदा ओलांडली त्या वेळचा प्रसंग रामाने शरयु ओलांडल्याप्रमाणे वाटला. जागोजागी लोक भक्तिभावाने महात्माजींचा परामर्ष घेत होते. सारे राष्ट्र स्वातंत्र्याचा यात्रेवर आहे असे वाटत होते. क्षणाक्षणाला देशांतील वातावरण संताप, आश्चर्य, अभिमान व विश्वास यांनी परिपूर्ण होत होते. सागराला पृथ्वीने मर्यादा घातली आहे, पण जनसागराच्या उत्साहाला सागराला पृथ्वीने मर्यादा घातली आहे, पण जनसागराला उत्साहाला –उधाणाला मर्यादा नव्हती. 'नहीं रखनी नहीं रखनी, जालिम सरकार नहीं रखनी,' ही घोषणा कोटयवधी कंठातून निनादत होती. निद्रित भाग्याला व निद्रित देवाला जागे करण्यात येत होते. महाराष्ट्रात तीच स्थिती होती. महाराष्ट्र प्रांन्तिक काँग्रेस कमिटी केसरी पक्षाच्या हाती होती. या मंडळीवर चळवळीचा फारसा परिणाम झाला नव्हता. जी संघटना व योजना करावयास हवी होती ती नव्हती. देशाच्या अन्य भागात प्रयत्नाची शिकस्त केली जात होती.

देव सुटून आले होते. ते व इतर मंडळींनी एकत्र येण्याचे ठरविले व त्याप्रमाणे पुणे येथील चिडगुप्पीकर वाडयात ता. १२ मार्चला आम्ही सुमारे १०० वर महाराष्ट्रीय काँग्रेस कार्यकर्ते जमलो. वादविवाद लांबू लागला तेव्हा मी म्हणालो की, "सत्याग्रह ही काही वादाची गोष्ट राहिली नाही. कुणी केव्हा व कसा करावयाचा एवढेच ठरवावयाचे आहे. काँग्रेस कमिटया या कामी मदत करणार नाहीत –निदान जेथे त्या प्रतिसहकारवादयांच्या ताब्यात आहेत. म्हणून देवांची सूचना सर्वत्र सत्याग्रह आश्रम काढावे ही मान्य करून प्रत्येकाने आपण केव्हा सत्याग्रह करणार ते जाहीर करावे." पुढे म्हणालो की, "रेल्वे संपाची जबाबदारी महिनाअखेर मी पार पाडीन व काही झाले तरी ८ एप्रिलला घर सोडीन –व जो परत येईन तो तुरुंगांतूनच." या घोषणेने वातावरण बदलले, व प्रत्येकाने आपापली तारीख जाहीर केली. दोन तासात काम संपले. आश्रमव्यवस्थेची बाजू देव, दास्ताने, रमणिकराव, मार्तंडराय, देशपांडे वगैरे मंडळींनी सांभाळावयाची होती. मी लागलीच दुसरे दिवशी पुण्याची मंडळी बोलावली. पुण्याचा व जिल्हयाचा कार्यक्रम आखला. जेधे, कर्मवीर शिंदे वगैरे

मंडळी आली. मामा देवगिरीकर रत्नागिरीकडे जाणार म्हणून ते तिकडे गेले. युवक संघाच्या सभा झाल्या; जोशी, गोरे, खाडिलकर व सुमारे ३०० विदयार्थी ठिकठिकाणी सत्याग्रह करणार हे ठरले. परीक्षा संपताच हे काम ते करणार होते. वर्तमानपत्रांतून चळवळीच्या बातम्या येऊ लागल्या. गांधीजींची यात्रा चालू होती. पुण्यात बाळूकाकांनी व्याख्यांनाचा पाऊस पाडला. मीही दररोज एक तरी व्याख्यान देई. 'स्वर्गद्वारमपावृतम्' असे सांगे. वक्तृत्वाला धार आली. भूमिका राजकीय मांडून 'अहिंसाच का?' हा मुख्य विवेचनाचा भाग असे. घरातील व्यवस्था साधारणपणे ६ महिन्यांची करून ठेवली. पत्नीचे मन आनंदी होते. थोडी चिंता तिला होती, –विठ्ठल दरम्यान आजारी होता. तथापि तिने चुकूनसुद्धा माझ्या निर्णयाला विरोध केला नाही. इतकेच नव्हे तर आत्म-विश्वासाने व शान्तपणे ती वागत होती. ८ एप्रिल जवळ येत होती. अनेकांप्रमाणे मला तंटा मिटेल ही अगदी थोडी आशा होती. पण यात्रेचे वृत्तात परदेशांतील वर्तमानपत्रांतून येऊ लागले व त्यामुळे ब्रिटीश सिंहाची शेपूट पिळली गेली व त्याने पण आरोळी ठोकली. मी समजलो की, –आता तडजोड नाही, व लढा दीर्घ काळ चालेल आणि त्या दृष्टीने दोन वर्षे तरी तुरुंगात राहावे लागेल. हा हिशोब धरून काय करावे हे पत्नीला सांगितले. कोणाकडे मागावयाचे नाही हे आमच्या संसाराचे महासूत्र होते. १९२१ प्रमाणे ती आता एकटी नव्हती. दोन मुली व एक मुलगा. त्याचप्रमाणे थोरले बंधु दादा यांच्या पहिल्या बायकोचा मुलगा मोरू त्याच्या ४ थ्या वर्षापासून मजकडे होता. त्याचे शिक्षण, लग्न –सर्व काही मीच केले. तात्पर्य, या सर्वांची दोन वर्षे व्यवस्था म्हणजे बरीच रक्कम ठेवणे जरूर होते. मी कोणाजवळ फीची बाकी मागावयाची नाही असे सांगून ठेवले. त्याचप्रमाणे नगद रक्कम संपल्यावर काय काय विकावयाचे याचा क्रम ठरवून दिला होता. २ एप्रिलच्या सुमारास मी संपवाल्यांच्या वचनांतून मुक्त झालो व काँग्रेसच्या कामास लागलो.

ता. ८ एप्रिल १९३० ला सकाळी मंगल प्रभाती मुलांचा व पत्नीचा निरोप घेतला. तिच्या चेहऱ्यावर तेच स्मित होते –जे प्रथमदर्शनी हृदय आकर्षित करते झाले. पण डोळ्यांतून तिच्या मनात डोकाविण्याचा प्रयत्न करताच आतील खळबळ, श्रेष्ठ भावना, मजवरील निन्तात निष्ठा दिसून आली. मुलांचे मुके घेतले व त्यांच्या अश्रुपूर्ण गालांवरून हात फिरविला. त्या स्पर्शाने उत्साह वाढला व लागलीच बाहेर पडलो आणि टांग्यांत बसून गाडी गाठली. मार्च १२ पासून एप्रिल ८ पर्यंत महाराष्ट्रात सर्व महत्त्वाच्या गावी सत्याग्रहाश्रम स्थापन होऊन कार्यक्रम होऊ लागला होता. सत्याग्रही गोळा होऊ लागले होते. २०० मैलांची दांडी यात्रा सुरू झाली होती. जागोजागी जनता जमत होती. गांधीजींची वाणी सतेज होऊन बोलत होती. हातात मलमलीचा मोजा, पण आंत

पोलादी कर्तृत्व–त्याप्रमाणे वाणीतील माधुर्य व विचारांतील तेज यांचा अपूर्व संगम त्यांच्या भाषणांतून येत होता. ते ऋषीसारखे होते, पण शाप देत नव्हते. असत्याविरुद्ध त्यांनी संग्राम पुकारला होता –पण त्यात द्वेष मत्सर, अतिशयोक्ति ही शस्त्रे ते वापरीत नव्हते. अन्यायाविरुद्ध ते दृढनिश्चयाने लढत होते–पण त्या युद्धात धर्मयुद्धाच्या साऱ्या अटी त्यांनी पाळल्या होत्या. ते स्पष्ट बोलत, पण मृदु बोलत. एका सभेत ते म्हणाले, 'ब्रिटिश अमलाने भारताची नैतिक, भौतिक व आध्यात्मिक हानी झाली आहे. हे राज्य शाप आहे–म्हणून मी राज्यव्यवस्था मोडण्यासाठी मी बाहेर पडलो आहे. मी गॉड सेव्ह दि किंग हे गायले आहे, –अनेकांना गायला लावले आहे. अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे व विचारविनिमय या राजकारणावर माझा विश्वास होता. पण आता ते सर्व संपले आहे. यापासून सरकारला सरळ रस्त्यावर आणणे शक्य नाही. म्हणून राज्यद्रोह हा माझा धर्म झाला आहे. आमचा लढा अहिंसात्मक आहे. आम्हाला कोणालाही मारावयाचे नाही. हे शापरूपी सरकार नाहीसे करावयाचे आहे.' ही व अशी त्यांची भाषणे वर्तमानपत्रांतून येत होती. आणि मीही त्याच तालावर बोलत होतो. वर्तनात पूर्ण अहिंसात्मक होतो, वाणीला हळू हळू तसे वळण येऊ लागले होते. मनात मात्र प्रसंगी हिंसात्मक विचार येत –पण औषधाचे पथ्य न पाळल्यास अनर्थ करते हे माहीत होते. म्हणून मनावर संयम ठेवण्याचा सराव करीत होतो. षड्रिपूंपैकी मोह माझ्या वाटयाला गेला नाही, मत्सराला विवेकाने निर्बल केले होते. लोभाला माझ्या मनाने घरातच घेतले नव्हते. मदाला माझे मनाचे क्षेत्र पसंत नव्हते. राग आणि काम यांनी मनात प्रवेश केला होती. 'धर्माविरोधन कामः' हे सूत्र अनुसरीत होतो. राग तसा फारसा कधीच नसे, पण केव्हा उमटेल याचा भरंवसा नव्हता. म्हणून मी मनाच्या दाराशी विचारांचा पहारा बसविला होता. पण अत्याचाराचे, जुलुमाचे प्रसंग वर्तमानपत्रांतून वाचले म्हणजे रक्त तापे. जन्माने रजपूत व स्वभावाने मराठा आणि त्यामुळे रागात उदात्ततेबरोबर दीर्घ द्वेष हळूच प्रवेश करी. म्हणून या सत्याग्रहाच्या तपश्चर्येत माझी साधना चालू होती. भाषण करण्यापूर्वी विचार व मुद्दे यांची योजना व नंतर एखादा रागाचा शब्द गेला नाही ना म्हणून पुर्नानिरीक्षण करी. परिणाम असा झाला, की रागाचे व संतापाचे निदर्शन बोचणाऱ्या विनोदात अगर कोटीत होई. किंबहुना त्या वेळेपासून माझ्या वक्तृत्वात व्यंजना व लिखाणात चिमटे उमटू लागले. ८ एप्रिलपासून माझा मुक्काम विलेपार्ले येथील मध्यवर्ती आश्रमात होता. दररोज मुंबई, अगर उपनगर, अगर ठाणे जिल्हयातील गावे या ठिकाणी व्याख्यान होई. गर्दी सर्व सभांना होई; पण माझ्या भाषणाला अधिक होई. आरती म्हणावी –पण डफावर थाप मारून. ही नवीनता लोकांना आकर्षक वाटे. देशात पकडापकड सुरू

झालीच होती. मुंबईचे कार्य जोरात म्हणजे दिखाऊ व नाटचपूर्ण होते. महाराष्ट्रात पकडापकडी सुरू झाली. केळकर पक्षाची सभा पुण्यास होऊन ठाणे जिल्ह्यात त्यांच्या कंपनीचे खेळ सुरू झाले. बाबुराव गोखले, भोपटकर, नारायणराव सावरकर ही मंडळी तुरुंगांत आली. देव, खेर, स्वामी आनंद, वांद्रेकर वगैरे मंडळी ठाण्याच्या तुरुंगात दाखल झाली. रत्नागिरी, नाशिक —सर्वत्र तुरुंगभरती होऊ लागली. महाराष्ट्राचा वाटा महाराष्ट्र उचलीत आहे. हे पाहून आनंद वाटत होता.

तीन आठवडे व्याख्याने देऊन मला पकडले नाही. सभेत अन्य वक्ते पकडले जात. माझ्या मग लक्षात आले की श्री. भट हे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आहेत. भट, मी, गुप्ते वगैरे मंडळी शाळेत एका वर्गांत होतो. ते आय्. सी. एस्. झाले व १९३० साली ठाणे जिल्ह्यात कलेक्टर झाले. मग मी कुलाबा जिल्ह्यात जाण्याचे ठरविले. गांधीजी ५ एप्रिललाच दांडीला पोहोचले होते व ६ एप्रिलला म्हणजे राष्ट्रीय सप्ताहाच्या पहिल्या दिवशी समुद्रकाठचे मीठ उचलून त्यांनी सत्याग्रह केला. पण सरकारने पकडले नाही. मग त्यांनी सामुदायिक कायदेभंग करण्याचा आदेश देशाला दिला आणि लागलीच देशभर कायदेभंग तुफानी जोराने होऊ लागला. सरकारने पण जोरात पाऊल उचलले. नेहमीच्या दडपशाही उपायांनी काही चालेना; हे पाहून बंगाल वट कायदा २३ एप्रिलला जारी केला. २७ एप्रिलला १९१० च्या प्रेस ॲक्टमध्ये कडक दुरुस्त्या घालून दुसरा वटहुकूम काढला गांधींनी मग चरसदा व धारासणा येथील सरकारी मिठाच्या गुदामांवर धाड घालण्याची नोटीस दिली. त्यांत लिहिले की, मिठाचा कायदा रद्द करून अगर त्यांना पकडून ही धाड टाळण्यात येईल. त्याचबरोबर सविनय कायदेभंग करणाराविरुद्ध पाशवी उपायाने लढल्यास परिणाम भयंकर होतील हेही सांगितले. गांधींना ता. ५ मे रोजी पकडले, व त्याच दिवशी —त्याच वेळी सकाळी मला अलीबागला पकडले. मे १ पासून मे ४ पर्यंत मी कुलाबा जिल्ह्यांतील महाड, नागांव, पेण, नागोठणे वगैरे गावात भाषण देऊन ता. ४ ला दुपारी धरमतरच्या धक्क्यावर व्याख्यान देऊन खाडी पार केली. त्याच रात्री अलिबागच्या शान्त व मनोहर समुद्रकिनाऱ्यावर व्याख्यान दिले. सारा गाव लोटला होता. रात्री देवळांतील आश्रमात मुक्काम ठेवला. आप्त सरदार. बिवलकर यांच्या वाड्यात व्यवस्था केली होती, पण गेलो नाही. रात्री मला गुप्त निरोप आला की, उद्या सकाळी मला पकडणार. मला बरे वाटले. एक महिना तीन तीन चार चार व्याख्याने देऊन व प्रवासाने थकलो होतो. रात्री झोप चांगली लागली. पहाटे ५ ला एकदम उशाशी काही पडल्याचा आवाज आला. जवळ दिवा होता, मोठा केला. शेजारी गोडबोले स्वयंसेवक होता. त्याला उठविले व वहाण घेऊन त्या फुरश्याला मारले. ते फार विषारी जातीचे होते असे गोडबोले

म्हणाले. ते वरील छपरातून पडले. मी म्हणालो 'अस्मानी तर मी ठार केली आहे, आता सकाळी सुलतानी काय करणार ते पाहू. सात वाजता चहा घेतला. कोणी आले नाही म्हणून ७। ची मोटर पकडण्यासाठी स्टँडवर आलो. तो फौजदारसाहेब आले व नम्रपणे म्हणाले की, 'चला.' आणि त्यांनी टांगा आणला व आम्ही दोघे लॉकअपजवळ आलो. गोडबोले यांस घरी तार करण्यास सांगितले. लॉकमध्ये येऊन अर्धा तास झाला तो कळले की, महात्माजींना पण पकडले. जवाहरलाल यांना १४ एप्रिललाच पकडून तुरुंगात टाकले होते. तेव्हापासून सत्याग्रह उफाळला होता. मिरवणुकी व मोर्चे यानी देश गर्जत होता. हजारो लोक समुद्रावर मीठ लुटीत होते. हजारो चुली स्थापन करून उत्तर प्रदेशात मीठ तयार केले जात होते. जनता अनावर झाली होती. पण अत्याचारी नव्हती. चौरीचौऱ्याचा धडा तिने आत्मसात् केला होता. गांधी टोपी, आंगरखा, —पोशाख पाहताच पोलिसाचे पित्त खवळे व माणुसकीला तो पारखा होई. इंग्रज अधिकारी आगाऊपणा देशी अधिकाऱ्याकडून करीत. नोकरशाही —काळी आणि गोरी— रंगाचा फरक सोडला तर एकच होती. म्हणजे निर्दय व निष्ठुर देशप्रेम हा त्या अधिकाऱ्यांना गुन्हा वाटे. काही राक्षस कुळांत प्रल्हाद असावेत असे काही अपवाद असावेत व या अपवादामुळे अन्यांची क्रूरता उठावाने दिसे. सोलापूरला दंगा घडवून आणला. लष्करी कायदा पुकारला गेला. शेकडो ठिकाणी धरपकड होत होती. गोळीबार व लाठीमार हा दैनंदिनचा अनुभव होता. तात्पर्य, क्रान्तीची लाट देशभर उसळली होती.

ता. ५ ला ११ वाजता मामलेदार मॅजिस्ट्रेट अलीबाग यांच्या कोर्टात हजर केले. सरकारी फिर्यादी यांनी सांगितले, 'मी भाषण केले व त्यात कायदेभंग करा असे सांगितले' मला विचारताच मी म्हणालो, 'मी भाषण केले आहे व त्याचा सारांश बरोबर आहे. माझ्या मते मी देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे माझे कर्तव्य आहे तेच केले. मला अधिक सांगावयाचे नाही व भाग घ्यावयाचा नाही. कोर्टात सारी वकील मंडळी आली होती. सर्वांच्या कुतूहलाचा व अनेकांच्या आदराचा विषय झालो होतो. पुण्यातील बाबासाहेब देशमुख, एक ज्येष्ठ वकील व स्नेही होते. त्यांची कन्या व त्यांच्या नाती कोर्टात हजर होत्या. कार्यकर्ते हजर होते. मॅजिस्ट्रेटने लागलीच निकाल देऊन ६ महिन्यांची साधी शिक्षा दिली. लॉकअपमध्ये आलो तोच ठाण्याचे नानासाहेब दामले आले. त्यांचे व्याख्यान संध्याकाळी व्हावयाचे होते. मी त्यांना म्हणालो, 'आणखी १५ दिवस बाहेर रहा घाई करून नका. लांबचा पल्ला आहे.' पण त्याचा काही उपयोग झाला नाही. रात्री ७॥ वाजता त्यांना पकडले व मुक्कामाला लॉकअपमध्ये आले. ता ६ मे ला त्यांचा खटला चालला. ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्याच दिवशी १

वाजता आम्हा दोघांना बोटीने मुंबईस व तेथून ठाण्यास रवाना करण्यात आले. बोटीपर्यंत अनेक लोक आले. मुंबईत धक्क्यावर कमलादेवी चट्टोपाध्याय व मुंबई कॉंग्रेसचे शेकडो लोक आले होते. तेथून रेल्वेने ठाण्यास आलो. वाटेत स्टेशनस्टेशनवर हार पडत होते व जयजयकार होत होता. सर्वत्र गांधी टोपी दिसत होती. वर्तमानपत्रांतून चळवळीचा जोर जो येत होता त्यापेक्षा अधिक प्रत्यक्ष दिसला. ठाणे स्टेशनवर उतरताच मोठे स्वागत झाले. नानासाहेब ठाण्याचे म्हणून त्यांच्याबरोबर माझी पण मिरवणूक ठाणे जेलपर्यंत निघाली. साधारणपणे सायंकाळी ७ ला आम्ही तुरुंगात प्रवेश केला व आम्हाला कालापाणी वॉर्डमध्ये ठेवण्यात आले. गाडीतच घरी पत्र लिहिले होते. वॉर्डात खोलीत जाण्यापूर्वी बंदिस्त कैद्यांपैकी देव, खेर वगैरे मंडळींना भेटलो व प्रत्येकजण चळवळीबद्दल विचारीत होता. दुसरे दिवशी सकाळी चहा वगैरे झाल्यावर खोली स्वच्छ करून घेतली, टेबल थाटले, पुस्तके जेल लायब्ररीतून आणली व मनाशी हे सहा महिने कसे काढावयाचे हे ठरविले. वर्तमानपत्रे सुरुवातीस मिळत नव्हती. खाजगी पत्रे बारकाईने तपासली जात. आठवड्याचा इलस्ट्रेटेड विकली व विविधवृत्त मिळे. दोघांविषयी तेथे विरोधी मत होते. विविधवृत्तात थोडी तरी बातमी येई. खेर व अन्य म्हणाले की, काही तरी युक्ति काढून वर्तमानपत्र रोज मिळाले पाहिजे. जेलर नानाभाईशी गोष्ट करा व तो रोज रात्री ९ वाजता माझ्या खोलीत बॉम्बे क्रॉनिकलचा अंक टाकी. मी तो वाची व दररोज सकाळी तो राउंडवर आला म्हणजे त्याच्याकडे देई. दुपारी जेवण झाल्यावर कामासाठी एकत्र बसू त्या वेळी डोळे मिटून योगसामर्थ्ये बातम्या कळल्या असे सांगून त्या सर्वांना सांगे. हा दैनिक कार्यक्रम दोन महिने चालू होता. सत्याग्रहींची संख्या वाढू लागली. अ, ब, क हे तीन वर्ग करून सरकारने प्रतिष्ठाविषयक भांडणे लावली. मी, खेर, आनंदबुवा गोसावी, वगैरे मंडळी 'बी' मध्ये होतो. मग पुढे त्या एस्. एम्., बेडेकर, नाना कुंटे वगैरे ५० माणसे आली. स्वामी आनंद यांनी सुचविले, जेवढे आमच्या वॉर्डात आहेत त्यांनी सारखे रहावयाचे. त्याप्रमाणे आम्ही ५०, 'सी' चे सुमारे तितकेच –या सर्वांचे जेवण समान, चहा सर्वांना व तो गुळाचा करीत असू. कारण ठरलेल्या रकमेत हे सर्व करावयाचे होते. सुपरिन्टेन्डेन्ट एक आयरिश व्हिकहेम नावाचा होता. रात्री खोल्यात बंद केले जाई. पण मग मी व्हिकहेमशी बोलून त्याने आम्हाला अर्थात् वरती विचारून बाहेर निजण्याची परवानगी दिली. पण त्याजबरोबर गप्पायुग सुरू झाले. अभ्यासाला बाधा आली. मी अर्थशास्त्र व राजकारण यांचे वर्ग घेई. बुवा गोसावी 'रघुवंश' घेत. तात्पर्य, 'काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्' याप्रमाणे दिवस जात होते. वादविवाद रंगत. चालू घटनांवर रामभाऊ मंडलिक आमची मते जाणण्यास उत्सुक असत.

जेलमध्ये एकसारख्ये जीवन हा अनुभव आला नाही. काही तरी खळबळ त्या अल्पशा दुनियेत मधूनमधून घडे. बाहेरची चळवळ जोरात आहे असे कळले म्हणजे उत्साह वाटे. चळवळ थंड झाली की, 'उगीच तुरुंगात आलो, लोकांत उत्साह नाही,–' असे अनेकांना वाटे. साधारणपणे जे श्रद्धेने गांधींवर विश्वास ठेवून आले होते. त्यांना निराशेने कधीच जवळ केले नाही. जे अनुशासन म्हणून आले होते, त्यांनाही निराशा घेरू शकत नव्हती. पण अन्य मात्र, –पहिले तीन चार महिने झाल्यानंतर मनाने खंगत, व सुटल्यानंतर परत येत नसत. माझी गांधीपेक्षा कार्यक्रमावर श्रद्धा अधिक होती व संघटनेंतील एक म्हणून अनुशासनसन्मुख माझे मन होते. त्यामुळे आशावादी, –कुणी अतिरेकी आशावादी म्हणत. हा अनभव याच शिक्षेच्या वेळी आला असे नव्हे, तर पुढील १४ वर्षांत अनेक तुरुंगांत असताना आला. १५ दिवसांतून एक पत्र अगर भेट ही सवलत होती. पत्र नियमित धाडी व उत्तराची तारीख ठरवून देई. त्या दिवशी न आले तर मनात राग येई. जे जे सुटून जात त्यांबरोबर काँग्रेस कामाबद्दल पत्रे 'तिकडम्' म्हणजे गुप्त रीतीने लिही. शिवाय पुण्यांतील बरेच ठाणे तुरुंगात होते. त्यामुळे प्रत्येक जण येथील प्रत्येकाची खबर कळवी व ती सर्वत्र पोहोचविली जाई. तसेच कुणाचेही पत्र आले तरी सर्वत्रांच्या घरची खबर कळे. माझ्या पत्रात सांकेतिक लिही व पत्नी मग ती माहिती काँग्रेसच्या मंडळीना कळवी. ठाण्याच्या ४॥ महिन्यात पत्नी व मुले दोनदा भेटण्यास आली. विठ्ठल दोन वर्षाचा होता. भेटीच्या खोलीत येताच त्याने व्हिकहेमकडे पाहून 'चहा गरम, भजी गरम, इंग्रज सरकार बेशरम' ही घोषणा केली. व्हिकहेमने त्याचा अर्थ विचारला. मी सांगितला. त्याने त्यास जवळ घेऊन दोन चिक्कू दिले. मुले बरोबर असली म्हणजे अन्य काही बोलताच येत नाही. मूक भाषा डोळ्यांच्या अक्षरांनी सांगावी लागे. पण त्या १०-१५ मिनिटांचा सहवास विशेष वाटे. ठराविक प्रश्न व ठराविक उत्तरे यापलीकडे मनाची प्रतिभा व प्रेमाचा किस्सा जाऊच शकत नव्हता. जेलमध्ये मुलाखत म्हणजे कैद्याच्या पंचांगात आनंदाचा दिवस वाटे. परत येताच अनेकांचे निरोप सांगावे लागतात. कुणा न कुणाची तरी भेट रोज असे व त्यामुळे थोडी मनाला करमणूक मिळे. मध्येच एखादा 'राजा' एक मद्रासी कैदी कवलावर जाऊन बसला व मोठी खळबळ झाली. अबीदअल्लीने एक दिवस घेरा ठेवला व जेलमध्ये त्याला आम्ही हिन्दु केले अशी बातमी पिकविली व ठाणे तुरुंगातील जगात मोठी खळबळ माजविली. त्याने दुसरे दिवशी त्यावरून वस्तरा फिरविला. त्याला मुसलमान कैद्यांना भेटविले. सर्व वादळ संपले. दुसऱ्या भेटीला बापूसाहेब गुप्त्यांची आई आली होती. त्या खिन्न होत्या; त्यांना वाईट वाटत होते. बापूसाहेब सत्याग्रहासाठी उत्सुक होते. पण आईची इच्छा त्यांना मोडवत नव्हती. माझे वजन थोडे कमी झाले. सुपरिन्टेंडेंटने चिंता व्यक्त केली.

मी म्हणालो, तळाच्या ११२ पौंडाच्या लायनीखाली जाणार नाही. कारण त्याच्याखाली वजनच नाही. एक मिनिट त्याला विनोद कळेना, मग मात्र खूप हंसला. त्याला सांगताच बर्नार्ड शॉची सर्व नाटके जेल-वाचनालयाला आणवली आणि मी ठाणे मुक्कामात ती वाचून काढली. पण नाटक लिहिण्याचा विचार तेव्हा व अजूनही मनात आला नाही. मला साधी शिक्षा होती. तरी टोकरी विणण्याचे काम करीत होतो. विणलेली पेटी विकत घेऊन घरी नेली. सप्टेंबर २२ हा सुटकेचा दिन मला सांगण्यात आला. कामाबद्दल व सद्वर्तनाबद्दल ४६ दिवसांची माफी मिळाली. सुटण्यापूर्वी वॉर्डात राजबंद्यांची सभा झाली. निरोप देण्यात आला. पुण्यांतील चळवळ थांबली, तिला जोराचा धक्का द्या–वगैरे वगैरे सूचना भाषणात देण्यात आल्या. ता. २२ सप्टेंबर १९३० ला ठाणे तुरुंगांतून बाहेर पडलो व त्याच दिवशी रात्री घरी आलो.

रात्रभर ६ महिन्यांचा वृत्तान्त ऐकत होतो. 'अविदितगतयामा रात्रिरेवम् व्यरंसित्' असेच झाले. दुसरे दिवशी अनेक कार्यकर्ते भेटीस आले. केशवराव जेधे आले; मी त्यांना विचारले की, 'सत्याग्रह का केला नाही?' ते म्हणाले, 'शिंदे यांच्याबरोबर गावोगाव हिंडलो. ते डिक्टेटर झाले व त्यांना शिक्षा झाली. त्यानंतर काशीनाथबुवा पाषाणकर डिक्टेटर झाले व त्यांना पकडले नाही. मी केव्हाही तयार आहे! एकंदर पुणे व महाराष्ट्रातील गोष्टींचा विचार करून एक निवेदन शंकरराव यांना गुप्त रीतीने ठाणे जेलमध्ये धाडले. चळवळ थोडी मंदावत चालली होती. २७ जून १९३० ला अलाहाबादला कार्यकारी समितीची बैठक झाली. तिने परिस्थिती लक्षात घेऊन विलायती कापडावर बहिष्कार घालण्याचा ठराव केला. त्याचप्रमाणे सरकारी नोकरांवर बहिष्कार घालण्याचा ठराव केला; मात्र दुष्ट व ज्यांनी दडपशाहीत भाग घेतला आहे त्यांच्यापुरता मर्यादित असावा. सरकारने कार्यसमितीला बेकायदेशीर ठरवून तिच्या सर्व अधिकाऱ्यांना तुरुंगात टाकले. बहिष्काराच्या ठरावाने मोठाल्या शहरात चळवळ जोरावली. बाबु गेनू याच्या शरिरावरून ट्रक नेण्यात आली व तो मृत्यु पावला! सामान्य माणसांनी असामान्य धैर्य दाखविले. हातांतील मुठीत बेकायदेशीर मीठ सोडण्याचे नाकारून काहींनी प्राणार्पण केले! चौपाटीवर लक्षावधी लोक पाणी घेऊन मीठ तयार करीत. तो देखावा पाहून अच्युतराव कोल्हटकर मला म्हणाले, 'मी धन्य झालो... क्रान्तीचे दर्शन घडले.' तेही चळवळीत सामील झाले. तुरुंगात गेले. जवळकर कट्टर ब्राह्मणेतर पुढारी मजकडे आले. त्यांना मुंबईच्या कार्यकर्त्यांकडे धाडले, तेही तुरुंगात गेले. तात्यासाहेब केळकरांनी पनवेलच्या सभेत बेकायदेशीर मिठाच्या पुड्या विकल्या. तात्पर्य, सर्वत्र व सर्व वर्गातून हे कायदेभंगाचे वारे शिरले होते. प्रत्येक पडपशाहीच्या कृत्याने जनतेची चेतना वाढत होती. तथापि ती सान्त होती. विवेकी व विचारी नेतृत्वाशिवाय जनता

दीर्घकाल आन्दोलन चालवू शकत नाही. माझ्यामागे प्रत्येक कार्यकर्ता पुढारी आहे असे गांधींनी जाहीर केले होते. त्यामुळे अनेक गावगन्ना पुढारी झाले होते. स्थानिक हेवेदावे व ईर्षा यांमुळे चळवळीतील निष्ठा अनुशासन-हीन झाली होती. काही तुरुंगाला घाबरले होते. पण पुढे पुढे करण्याची सवय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. म्हणून मागे राहून काम करतो असा प्रचार ते करीत आणि म्हणून या सर्वांना पाखडून काढावयाचे होते. काही पकडल्यावर खटला 'लढत' होते. कायदेभंग या क्रियेत खटला लढणे हे विसंगत. मृत्यूला आमंत्रण देऊन मग मुदत मागून घेणे इतके हे विसंगत होते, —नव्हे थोडे भ्याडपणाचे होते. कायदेभंगा-मागील आदर्शाला न जुळणारे होते. जेवढा सरकार अन्याय करील तेवढा आपला जय हे महान् तत्व विसरले गेले होते. अन्यायाच्या शिखरातूनच न्यायाचा स्रोत निघतो, मरण्यात जग जगते— असे हे तत्वज्ञान होते. जीवित जगावयाचे पण तृणवत् नाही. मृत्यूला कवटाळावयाचे पण अमृताच्या इच्छेने. तात्पर्य, चळवळीत माणसे व त्यांची मने पण मापात कमी पडू लागली. लाजेकाजेस्तव सत्याग्रह करणे ही गोष्ट सत्याग्रहाला हानिकारक होई. सप्टेंबरमध्ये स्लोकममार्फत तडजोडीची बोलणी चालू आहेत असे वर्तमान आले होते. हा गृहस्थ जयकर, सप्रू यांना भेटला. त्याने गांधींची व पंडितजींची भेट जेलमध्ये घेतली. बाहेर आता लवकरच तडजोड होणार म्हणून हवा पसरली. अनेकांना वाटले, 'सत्याग्रह करावा, व महिना दोन महिन्यांत पुण्य पदरी घ्यावे.' असेही काही लोक चळवळीत सामील झाले होते. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात तडजोडीची आशा संपली. आल्यापासून तडजोड अशक्य हे मी खाजगी व व्याख्यानांतून सांगत होतो. जयकर, सप्रु ऑगस्टमध्ये गांधीजींना भेटले, पण काही झाले नाही. येरवडयाच्या तुरुंगात नेहरूद्वय, वल्लभभाई, व कार्यकारिणीचे अन्य सभासद एकत्र आणले गेले. गांधीजींचे मत निश्चित होते, व कोणीही स्वाभिमान सोडून अगर स्वातंत्र्याची मागणी सोडून तडजोड करण्यास तयार नव्हते. तडजोड संपली.

मी पुण्यास आल्याबरोबर अनेक कार्यकर्त्यांना बोलाविले. त्यात पाषाणकर व पोपटलाल होते. पाषाणकर म्हणाले, 'मी म्हणून दोन महिने चळवळ चालू ठेवली आहे.' मी म्हणालो, 'तुम्ही तुरुंगात गेला असता तरी वाढली असती.' त्यांनी उत्तर दिले, 'मला पकडीत नाहीत.' ते रोज भाषणे करीत, —फार सावधानतेने. सरकारला त्यांना पकडण्याचे कारण नव्हते. चळवळीच्या प्रवाहाला त्यांचा एक बोळा म्हणून उपयोग होत होता. मी त्यांना सांगितले, 'मी विचार करतो. पोपटलाल आले. त्यांना म्हटले की, 'पाषाणकरांनंतर तुम्हाला डिक्टेटर करतो.' त्यांनी शिक्षा किती होईल म्हणून विचारले. मी सांगितले की 'निदान एक वर्ष.' त्यांनी नकार दिला. नंतर मी

केशवराव जेधे यांना विचारले. ते म्हणाले 'तुमची आज्ञा मला मान्य.' मग मी माझ्या सदाशिव पेठमधील अर्धवट बांधलेल्या इमारतीत एक लहान झोपडे घातले व पत्नीकडून पुणे काँग्रेसचे अध्यक्ष पाषाणकर यांना पत्र लिहिवले की, 'ही जागा काँग्रेसच्या उपयोगासाठी देत आहे तिचा स्वीकार करावा.' ते पत्र त्या दिवशीच्या मार्केटमधील सभेत पाषाणकरांनी वाचले व ही सूचना स्वीकारली. मी सभेत होतो भाषण संपताच पोलिस इन्सपेक्टर यांनी त्यांना पकडले. ते स्तिमित झाले, थोडे घाबरले. मी म्हणालो, 'जोर धरा.' लागलीच दुसरे दिवशीच्या वर्तमानपत्रात जेधे डिक्टेटर झाल्याचे जाहीर झाले. त्यांचे बंधु नाराज झाले. मी म्हणालो, 'हे कर्तव्यकर्म आहे.' केशवराव व मी त्याच दिवशी दुपारी मुंबईस गेलो. तेथे सरदारगृहात सुटून आलेले कार्यकर्ते व अन्य यांची सभा होती. खूप चर्चा झाली. शिंदे यांनी जेलचा अनुभव सांगितला. माझ्या भाषणात– 'हा लढा दीर्घ कालाचा आहे, म्हणून सुटून आले त्यानी पुन्हा सत्याग्रह करावा' माझ्या भाषणाला साद मिळाली नाही. दुसरे दिवशी पुण्याला परतलो. काँग्रेसच्या सर्व कचेऱ्या जप्त, आश्रम जप्त. एकत्र येणेही कठीण झाले होते. मी सारखा हिंडत होतो. सातारा जिल्ह्यांतील बिळाशी गावी दंगा व गोळीबार झाला होता. तेथे जाण्याचे मी ठरविले. सकाळी कऱ्हाडहून निरोप आला की, 'मी येऊ नये.' पण न मानताच मी कऱ्हाडला गेलो. तेथे गणपतराव आळतेकर यांच्याकडे उतरलो. तेही नुकतेच सुटून आले होते. त्यांनी बिळाशाची हकीकत सांगितली, पण माझा निश्चय कायम होता. अनेकांनी त्याचप्रमाणे सल्ला दिला. शेवटी जी मोटर ठरली होती त्या मालकाने सांगितले की, खिंडीच्या पलीकडे कोणाला जाऊ देत नाहीत. मग तर मी अधिक निश्चयी झालो. पण कोकणी मोटरवाला मिळेना. बिळाशीच्या क्षुल्लक घटनेला सरकारने बंडाचे स्वरूप दिले होते. कोणी वकील जाईना, कोणी कार्यकर्ता जाईना. माझा नाइलाज झाला. मग त्या दिवशी संध्याकाळी नदीतीरावर राघोबा अण्णा धोपाटे यांच्या अध्यक्षतेखाली भाषण झाले. कारण डोक्यात बिळाशी घोळत होती. पुण्यास परतलो व दोन दिवसात खटल्याचे समन्स आले; नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात हजर रहावयास सांगितले. माझे चुलत साडू श्री. काका केळकर हे तेथे वॉटर वर्कस् एंजिनियर होते. ते पुण्यास आले व म्हणाले की, 'सगळे काँग्रेसवाले लबाड आहेत. तुमचा बळी देत आहेत.' मी म्हणालो, 'त्यात वाईट काय आहे?' समन्स निघाल्याने मी भटकण्यास मोकळा होतो. पाषाणकरांबरोबर माझ्या पत्नीवर पण खटला भरणे क्रमप्राप्त होते व त्याप्रमाणे तिला जाणीव करून दिली होती. खटला करावा की न करावा असा मतभेद पोलिस अधिकाऱ्यात झाला. तोपर्यंत पुण्याहून कोणी स्त्री- स्वयंसेवक तुरुंगात गेलेली नव्हती. तसेच पोलिस प्रॉसिक्यूटर कुंटे व कुर्लेकर हे खाजगी मित्र होते.

तात्पर्य, इंग्रज डी. एस्. पी. ने खटला भरू नये असा निर्णय दिला. श्री. पाषाणकर यांना तीन महिन्यांची शिक्षा झाली. त्यानंतर माफी मागण्याचा आग्रह झाला, पण त्याला ते पुरून उरले हे सांगणे जरूर आहे.

पुण्याखेरीज अन्य ठिकाणी जात होतो, पण सुटून आलेल्यांपैकी ५ टक्के-सुद्धा परत जात नव्हते. 'ब्राह्मण्ये' म्हणजे आदर्श राखिले पाहिजेत ही समर्थांची शिकवणूक माझ्या डोक्यात सारखी होती. आठवड्याला एक तरी प्रत्येक तालुक्यातून म्हणजे महिना सुमारे २०० लोकांनी कायदेभंग करावा अशी योजना आम्ही ठरविली. पण त्याप्रमाणे घडले नाही महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतून सुमारे चार हजार तुरुंगात गेले होते. नगरकडे जंगल सत्याग्रह सुरू होऊन थंडावला होता. तीच गोष्ट मध्यप्रान्तात घडली. नोव्हेंबरमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू सुटले होते. त्यांना एक समीक्षणवजा पत्र लिहिले. पक्षापक्षांच्या दृष्टिकोनांचा विचार त्यांत समाविष्ट केला होता. त्यानंतर भेटावयास जाण्यासाठी मुंबईस गेलो, तो व्ही. टी. वर मेहेरअल्लीने सांगितले की, 'त्यांना पकडले.' मी तिकीट परत केले, व पुण्यात आलो त्यांना दोन वर्षांची शिक्षा झाली. पुण्यात गोरे, खाडिलकर, जोशी सुटून आले होते. तळेगांवकरही सुटून आले होते. गोरे व खाडिलकर यांचा छळ झाला. कमीज़ास्त प्रमाणात जेलचे हाल सर्वांनीच काढले होते. परीक्षेसाठी जोशी, गोरे, खाडिलकर मंडळी मागे राहिली व मार्चअखेर पुन्हा चळवळीत पडण्याचे त्यांनी ठरविले होते. युवक-संघर्षातील बहुतेक तुरुंगात गेले होते व काही सुटले होते. पुन्हा आम्ही काहीजण मुंबईस एकत्र आलो. पण नुसतीच चर्चा सूरू होऊन संपली. मी पुण्यास परत आलो, तेवढ्यात मला शिक्षा झाली म्हणून माझे म्युनिसिपल कमिटीचे सदस्यत्व रद्द केले. सरकारला सार्थ उत्तर पुन्हा देणे म्हणजे निवडून येणे हे होते. मी उभा राहिलो. दोन अन्य उमेदवार पण होते. पण त्यांनी उमेदवारी परत घेऊन माझी निवड बिनविरोध झाली. त्याचा राजकीय अर्थ मी व अन्यांनी योग्य असाच लाविला. देशात स्वराज्याच्या प्रश्नाचा विचार करण्याससुद्धा व्हाइसरॉय तयार नव्हता. उलट वटहुकूम काढून नागरिकांचे जीवित, वित्त व स्वातंत्र्य सरकारने मर्यादित केले होते. गोलमेजवर कॉंग्रेसने बहिष्कार टाकला होता, तथापि अनेक राजे, अनुयायी नसलेले पुढारी, जातीयवादी राजकारणी, अखिल भारताचे भवितव्य ठरविण्यासाठी गोलमेज परिषदेसाठी लंडनला गेले होते. तारीख १२ जानेवारीला ही गोलमेज परिषद सुरू झाली. एकंदर ८७ सभासदांपैकी ५७ भारतांतील, १६ रियासातींतील व बाकीचे जातीय पक्षांचे हजर होते. माझ्यावरील खटल्याचा निकाल तारीख १२ जानेवारीला लागून तीन महिन्यांची शिक्षा मला झाली. माझ्या भाषणाच्या वेळी धोपाटे हे अध्यक्ष म्हणून होते. त्यांचा खटला मग सुरू झाला. त्यांत त्यांना शिक्षा झाली. त्यांनी अपील केले

व त्यांत ते सुटले. मी निकालाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी कऱ्हाडला गेलो. आदल्या दिवशी रविवार होता व मी तुरुंगात नक्की जाणार म्हणून रविवारी सकाळी पुणे नगरपालिकेची बैठक उपाध्यक्षांच्या निवडणुकीसाठी ठेवली होती. श्री. भगत व करपे दोघे उमेदवार होते. सभागृहांत दोन्ही उमेदवारांचे लोक व पहिलवान हार घेऊन हजर होते. सभा सुरू होताच रावसाहेब वायाळ उभे राहून म्हणाले की, 'मी काकासाहेब गाडगीळ यांचे नाव सुचवितो.' मी, प्रेक्षक, अध्यक्ष शेठ हणमंतराम व सभासद आश्चर्यचकित झालो. श्री. वायाळ यांनी दोन्ही उमेदवारांना पाठिंबा देण्यास सांगितला. दोघे विस्मित झाले होते व मंत्राप्रमाणे त्यांनी पाठिंबा दिला. मंत्राने गोष्ट सिद्द व्हावी तसे झाले. एकमताने मी निवडून आलो. कुणाचे हार वाया गेले नाहीत. ते सर्व माझ्या गळ्यात पडले. हस्तान्दोलने झाली. मी आभार मानले. घरी गेलो. हार ठेवले व वर पत्नीकडे गेलो. तिने बाजूच्या खोलीत नेले व गळ्यात हात टाकले. मी म्हणालो, 'वीर-पत्नी आहेस, हे काय करतेस?' तिने उत्तर दिले की, 'आळींतील लोक बोलतात आता कसचे पुन्हा तुरुंगाचे नाव ते घेतात! आणि आज तुम्ही जात आहा, मला अभिमान वाटतो. क्षणमात्र दोघांची तोंडे बंद झाली. मी तिची पाठ थोपटून निघालो.

कऱ्हाडला पोहोचेपर्यंत संध्याकाळ झाली. वाटेत सकाळच्या घटनेचा विचार करीत होतो. वायाळांविरुद्ध वरच्या वर्गाचे लोक होते त्यांची जीभ तिखट, पण त्यांचे अंतःकरण निर्मळ होते. म्युनिसिपालिटीच्या कामकाजात त्यांचे म्हणणे माझ्या दृष्टिकोणाशी जुळे. त्यांची इच्छा मला हरिभाऊ तुळपुळे यांच्याऐवजी अध्यक्ष करावयाचे होते. ते जमले नाही अर्थात् माझ्यामुळे. म्हणून एकाएकी प्रसंग साधून मला त्यांनी उच्च स्थानी बसविले. कऱ्हाडला मी गणपतराव आळतेकर यांच्याकडे उतरलो. जेवण करून ११ ला कचेरीत गेलो. १२ ला निकाल व तसाच लॉकअप्मध्ये. त्या लहानशा खोलीत चारजण होते. मी पाचवा. एक तांबव्याचे देशमुख–एक पापभीरु चांगले कार्यकर्ते. मंगळवारी मला येरवड्याला नेण्यात येणार होते. रात्रभर खोलीत घाण होती. पण देशमुखांशी अध्यात्मावर गप्पा मारता मारता झोप आली. दुसरे दिवशी मोटरने कोरेगावला नेण्यात आले व रात्रीच्या गाडीने निघून बुधवारी १४ जानेवारीला येरवड्यात मी प्रवेश केला. स्टेशनवर वर्तमानपत्रांतून सोलापूरच्या कैद्यांना चार जणांना शारदा, धर्मशेटी, मल्लाप्पा, शिंदे यांना त्याच दिवशी फाशी देणार म्हणून वर्तमान आले होते. मला अंधेरी वॉर्ड नंबर एक मध्ये ठेवण्यात आले. तेथे जेधे होते. पाषाणकर व अन्य कैदी होते. त्यांनी दुसरे दिवशी उपवास करावयाचे ठरविले होते. मीही उपवास केला. हा त्या हुतात्म्यांबद्दल होता. तेथील राजबंदींनी कामाच्या प्रमाणाबद्दल तक्रार केली होती. मी आल्याबरोबर सुपरिंटेंडेंटबरोबर चर्चा करून नवाराचे प्रमाण ४० फुटांवरून २५ पर्यंत आणले.

वर्तमानपत्रांतून तडजोडीच्या बातम्या येत होत्या. त्यामुळे अधिकारी अधिक सभ्यतेने वागत होते. वर्दी मी तीन तासात पुरी करी व राहिलेला वेळ वाचन करी. गोलमेज परिषदेचे काम चालू होते. काँग्रेसच्या गैरहजेरीत काही होणार नाही याची इंग्रजांना जाणीव होती. तारीख १९ जानेवारीला मुख्य प्रधान मॅक्डोनल्डने घटनेचा आराखडा सांगितला. घटना चालली पाहिजे, व तिची प्रगति झाली पाहिजे या दृष्टींनी विचार व्हावा. काँग्रेस जर तयार असेल तर ती केव्हाही भाग घेऊ शकते. ता. २१ जानेवारीला अलाहाबादला काँग्रेस कार्यकारिणीची सभा झाली. त्या सभेत गोलमेज परिषदेचा निषेध करण्यात आला. दमननीतीचा निषेध करण्यात आला. व चळवळ चालू ठेवावी असा ठराव झाला. हा ठराव जाहीर करण्यापूर्वी लंडनहून सप्रू व श्रीनिवास शास्त्री यांची तार आली की, 'आमच्याशी चर्चा केल्याशिवाय ठराव जाहीर करू नये.' तथापि तो प्रसिद्ध झालाच. ता. २५ जानेवारीला व्हाइसरॉयने कार्यकारिणी-वरील बंदी उठविली व तिच्या सभासदांना सोडले. आणि आशा प्रदर्शित केली की, 'ज्या भावनेने हे केले आहे त्याची कदर केली जाईल.' मॅक्डोनल्डच्या १९ च्या भाषणात असे होते की, हिन्दी सरकार मध्यवर्ती व प्रान्तांतील सरकारे कायदे मंडळांना जबाबदार असावीत. संक्रमणकालात काही व्यवस्था (Safe-guards) सेफगार्ड राहील की, ज्यायोगे अल्पसंख्यांकांचे हितसंबंध सुरक्षित राहतील. जे हक्क राखून ठेवण्यात येतील त्यायोगे भारताच्या प्रगतीला अडथळा होणार नाही व पूर्ण जबादारीचा टप्पा लवकर गाठता येईल अशी दक्षता घेण्यात येईल. काँग्रेस कार्यकारिणीची बैठक ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी, १९३१ ला भरली व तीत असा ठराव पास झाला की, कायदेभंग अगर कापड-बहिष्कार परत घेतला जाणार नाही. पंडित मोतीलाल आजारी होते व ते फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात मृत्यु पावले. सारा देश दुःखी झाला. गांधीजी म्हणाले की, 'मी विधवा झालो.' मरणापूर्वी मोतीलालजींचे मत मुख्य मंत्र्यांची योजना स्वीकारावी असे होते.

मोतीलाल यांच्या मृत्यूने देशांतील एक निष्णात, चतुर, चौरस मुत्सद्दी नाहीसा झाला. अगदी ज्या वेळी त्यांच्या सल्ल्याची जरूरी होती त्याच वेळी त्यांचा मृत्यु झाला. त्यांच्या मृत्यूपूर्वी जवाहरलाल यांना सोडण्यात आले होते. शोकाच्या पार्श्वभूमीवर राजकीय निर्णय होत होते. येरवड्याच्या तुरुंगातून सुटण्यापूर्वी आम्ही आतील मंडळींनी गांधींना भेटण्याचा प्रयत्न केला, पण जमले नाही. तसे त्यांना महिन्यातून काही मंडळी भेटून येत. माझी पाळी २६ जानेवारी १९३१ ला होती. त्यापूर्वी ते सुटले. सकाळी आमच्या वॉर्डसमोरून ते व सरोजिनी नायडू गप्पा मारीत गेले. पण आम्ही त्यांना पाहू शकलो नाही. येरवडा जेलचे ते बंधन होते. सरोजिनीबाईंनी मात्र आम्हाला निरोप कळविला की,

'अभी बहुत देर नहीं रहना होगा।' वर्तमानपत्रांतील मजकुरावरून, बहुतांशी गांधी मिटवून घेतील असे मला वाटत होते. पण इच्छा अशी होती की, मिटले जाऊ नये. कारण मन रगेल होते. देश कोपाविष्ट होता. अपमानाचा बदला मिळाल्याचे समाधान मनास हवे होते. तथापि आपण चिंतीत असतो व निर्णय देव अगर दैव देत असते. आणि तसेच झाले. लंडनमधील गोलमेजवाले २६ सभासदांनी जाहीर पत्रक काढून मुख्य मंत्र्यांची सूचना स्वीकारावी अशी सूचना केली. या योजनेत सफलतेचे बीज आहे, असा त्यांचा शोध होता. निदान आशा होती. दरम्यान सप्रू व शास्त्री भारतात आले व त्यांनी गांधीजी व कार्यकारिणीचे अन्य सभासद यांच्याशी दीर्घ चर्चा केली. ही गोष्ट १३ फेब्रुवारीला घडली. १४ ला गांधीजींनी काँग्रेसचा एकमेव प्रतिनिधी म्हणून भेटीची मागणी केली. त्यास १६ फेब्रुवारीला या असे उत्तर आले व लागलीच गांधी व सर्व सभासद दिल्लीस रवाना झाले. १६ फेब्रुवारीला भारताचा मानबिंदु व चर्चिलच्या शब्दात नंगा फकीर व्हाइसरॉयच्या नव्या वास्तूत प्रवेश करता झाला. या वास्तूला बांधण्यास दहा वर्षे लागली होती. 'दिल्ली ही कबरींची नगरी' आहे. अनेकांच्या आशा व आकांक्षांचे येथे बलिदान झाले आहे. अनेकांच्या चातुर्याला येथे समाधि मिळाली आहे. अनेक राजवंशांचा उदय, उत्कर्ष व नाश या नगरीने पाहिला आहे. दिल्लीत राजधानी आणू नये म्हणून अनेकांनी सांगितले होते. इंग्रजांना कलकत्ता नको होते. कारण व्यापारी लोकांचा दबाव होता. अलाहाबाद नको. कारण वकीलांचा दबाव पडेल. बैतुलला केल्यास फार खर्च येईल म्हणून ते नाकारले गेले. व शेवटी १९११ च्या डिसेंबरच्या दरबारात बादशहाने दिल्ली ही राजधानी होईल असे जाहीर केले होते. १९१२ मध्ये हार्डिंजवर प्रथम प्रवेशाच्या वेळी बाँब टाकण्यात आला होता. १०३ गावे घेऊन नवी दिल्ली बसविली. व्हाइसरॉय भवनावर कोटयवधि रुपये खर्च केले होते. त्या वास्तूत १९३१ जानेवारीत व्हाइसरॉयने प्रवेश केला होता व त्याच भवनात १६ फेब्रुवारी, १९३१ मध्ये भारताच्या युगानुयुगीन दारिद्रयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गांधींनी समस्तर प्रतिष्ठेने प्रवेश केला. साम्राज्याचा प्रतिनिधि लॉर्ड इर्विन व भारताचा प्रतिनिध बोलणी करण्याकरिता एकत्र आले. समान प्रतिष्ठा व प्रतिनिधित्व हेच यांतील मर्म होते. आणि म्हणून चर्चिल चिडले होते.

तारीख १६ फेब्रुवारीपासून देशांतील चळवळ थंडावली. नेहमी असेच होते. प्रत्यक्ष युद्धांतसुद्धा तहाच्या बातम्या येऊ लागल्या की सैनिकांच्या मनात घरचे विचार येतात. सर्वांत युद्धाला विरोध सैनिकांचा असतो. कारण युद्धाची सुरुवात म्हणजे मृत्यूच्या यज्ञाशी सुरुवात. आमचा लढा अहिंसात्मक होता, पण एकतर्फी अहिंसा होती. सरकारची वज्रमुष्टि होती. आमची विनयाची होती. एक फरक आवश्यक होता, –तो म्हणजे आम्ही ध्येयासाठी लढलो होतो.

आमच्या विरोधकांची तशी स्थिती नव्हती. सरकारी नोकर म्हणून त्यांना त्यांचे कर्तव्य बजावावे लागले होते. तथापि त्यांच्यापैकी काही आगाऊ व राजापेक्षाही राजनिष्ठ होते. पुरस्कार व आर्थिक प्राप्ति त्यांची प्रेरणा होती. शिवाय आमच्याशी लढण्यात मृत्यु तर नव्हताच, सामाजिक बहिष्कार पण नव्हता. ते भारतीय समाजांतील असल्याने त्यांच्याबद्दल गांधीवादी तत्वज्ञानाप्रमाणे द्वेष नव्हता, उलट सहानुभूति होती. पिसाळशाहीला सहानुभूतीची दीक्षा देणे अनेकांना कठीण वाटे. पण एकदा अहिंसा प्रकटली म्हणजे सहानुभूति अनिवार्य ठरते. शत्रुप्रतिसुद्धा. किंबहुना अहिंसेच्या संदर्भात शत्रुत्वाची विषवेल मूळच धरीत नाही. त्याजबरोबर हेही खरे की, याही देशद्रोही लोकांत देशाबद्दल नितान्त निष्ठा असणारे होते. सर्वांना देशद्रोही म्हणणे चूक होते व शहाणपणाचे पण नव्हते. गांधीजींच्या मार्गाने अनेक परिवर्तित झाले होते. तुरुंगातही थोडा-बहुत अनुभव येत होता. गांधी व इर्विन यांची भेट झाली, फोटो आले, तेव्हापासून तर अधिकाऱ्यांच्या बाबतीत विशेष फरक पडला. इकडे राजबंदीचे आशे-निराशेचे थर्मामिटर वर-खाली होत होते. स्वभावाने मी निराशावादी नाही, पण विशेष आशावादीही नाही. परंतु तुरुंगात मी मंडळीची मने उंत्साही रहावीत म्हणून माझ्या अभिप्रायात दहा-पाच टक्के आशावादी उत्तरे टाकून त्याचा स्वीकार ही करीत असे. घटनांचे विश्लेषण करी व त्यातून सामान्यपणे जो अभिप्राय युक्त वाटे. तो काढी. मात्र तो व्यक्त करताना 'काम होईल, पण विलंब लागेल' ही शैली वापरी. तुरुंगात या वेळी आणि पुढेही 'स्वयमेव मृगेंद्रता' नसताना ती मजकडे येई व त्यामुळे सैन्याची हिंमत (Moral) ठेवणे हे कर्तव्य ठरे. तोच माझा प्रयत्न असे. १५ फेब्रुवारीपासून मला इतर वॉर्डात जाण्याची परवानगी मिळाली. मी राजबंदींना सांगे की, बाजू उजवी आहे. मला काय वाटत होते ते वर येऊन गेले आहे. काही तरी भक्कम व प्रगतिकारक असे हाती आल्याशिवाय तडजोड करू नये. त्याचबरोबर इंग्लंडमध्ये मजूर पक्ष अधिकारावर आहे तोपर्यंत काही यश मिळणे शक्य व संभवनीय आहे. अन्यथा इंग्लंड, सत्तेचा कणही सोडणार नाही. १९३१ च्या सुरुवातीस आन्तरराष्ट्रीय चलनविषयक परिस्थिती इंग्लंडच्या विरुद्ध जाऊ लागली. पहिल्या महायुद्धा-नंतर इंग्लंडच्या महत्वाला व मोठेपणाला क्षयनाम संवत्सरे आला होता. इर्विन व गांधी यांची चर्चा प्रथम तीन दिवस झाली. दोन तास व दोन वेळा चर्चा दररोज होई. काही लेखी प्रश्नोत्तरे झाली. वर्तमानपत्रांतून अनुमाने येऊ लागली. मला गांधींच्या मार्गाचा थोडा अनुभव होता ती बोलणी २६ फेब्रुवारीपर्यंत तहकूब झाली. यावरून काही यशाचा संभव आहे एवढेच अनुमान मी काढले. तारीख २६ ला पुन्हा भेट झाली. नंतर पुन्हा १ मार्चला होणार असे जाहीर झाले. त्या वेळी मात्र असे वाटले, की बिनसले; व ते जाहीर कसे करावयाचे याचा

मार्ग काढण्यात गांधीजी गुंतले आहेत. उपक्रम, उपसंहारात कटुता नसावी हा गांधींचा नेहमी प्रयत्न असतो. शत्रुत्व हा वारसा विनिमयाचा नसावा हे त्यांचे कटाक्षाने पाळण्याचे व्रत होते. माझ्या वाचनात खंड नव्हता. पण मध्येच डोळ्यांना पुस्तकाकडे ठेवून मन दिल्लीच्या वाटाघाटींचा वारा घेत घेत प्रवास करी. त्या वेळी लिहिलेल्या पत्रात मी पत्नीला लिहिले की, "येथे तर डोहाळे जेवणे चालली आहेत, पण शेवटी हा सगळा वाताचा प्रकार न ठरो." आणि तुरुंगातील वातावरण बव्हंशाने तसे होते. मार्चच्या पत्रात काही खुलासे गांधींनी मागितले आहेत असे आले. ते काय असतील याचा विचार करू लागलो. मला वाटते, 'माल पटला आहे, आता भावात ओढाताण आहे, —पण कदाचित् फिसकटावयाचे.' तारीख ३ मार्चला गांधी व्हाइसरॉयच्या निवासस्थानातून परतताना खुषी दिसले. यावरून हिंदुस्थान टाइम्सने लिहिले की, तडजोड झाली. अन्य पत्रात तसे काही नव्हते. अर्थात् हे मागाहून कळले. तारीख ३ ला तडजोडीचा मसुदा काँग्रेस कार्यकारिणी सभेपुढे गांधींनी ठेवला व सभासदांना सांगितले की, 'पूर्णपणे स्वीकारला पाहिजे, किंवा नाकारला पाहिजे. त्यात आता बदल होणार नाही.' शंका निघाल्या. संशय प्रकट करण्यात आले. जे हवे ते नाही याबद्दल एकमत होते. मैफलीत पहिला दौर साधारण असतो, दुसऱ्या दौरमध्ये रंग भरतो व तिसऱ्यात शायर बेहोष होतात. माझ्या मते स्वातंत्र्याच्या मैफलीतील हा पहिला दौर होता. शायरांनी गळे साफ केले एवढेच झाले. तारीख ४ ला संध्याकाळी व्हाइसरॉयने पत्रव्यवहार व सरकारी निर्णय जाहीर केला. गांधींनी काँग्रेस कार्यकारिणीने तडजोड स्वीकारली हे ३ ला रात्रीच कळविले होते. तारीख ५ मार्चला सकाळी ८ वाजता आमची सुटका झाली. येरवडा तुरुंगाच्या दारात पुण्याचे शेकडो नागरिक हजर होते. गांधींच्या जयजयकारात हारतुऱ्यांनी आमचे स्वागत झाले. १० वाजेपर्यंत घरी पोहोंचलो.



# डॉ. वा. वि. आठल्ये

जन्म : २२ ऑगस्ट, १८९०, मृत्यू : २ ऑगस्ट, १९७६.

**थोर काँग्रेस कार्यकर्ते**

जन्म अहमदनगर येथे. प्राथमिक शिक्षण, मालेगाव, देवळाली आणि भुसावळ येथे. माध्यमिक शिक्षण नाशिक आणि कोल्हापूर येथे. १९०५ साली वंगभंगाच्या चळवळीत स्वदेशीचे व्रत स्वीकारले. १९०६ साली पुणे येथे आगमन. तेथे क्रांतिकारक चळवळीशी संबंध आला. त्याच वेळी पुण्यात महाराष्ट्र विद्यालयात दाखल. १९१० मध्ये बॉम्ब प्रकरणात अटक. तुरुंगवास. येरवडा तुरुंगात पाच वर्षे काढली. १९१५ साली लो. टिळकांची भेट. कलकत्ता येथे होमिओपाथीची परीक्षा उत्तीर्ण. १९१६ साली सातारा येथे होमरूल चळवळीचे सचिव. १९१७ साली सातारा जिल्हा काँग्रेसचे सेक्रेटरी. १९३० साली शिरोडा येथील सत्याग्रहात भाग व सहा महिन्याचा कारावास. दोन महिंन्यानी मुक्तता. पण पोलीस स्टेशनवर हजेरी देण्याचे नाकारले म्हणून एक वर्ष कारावास. नाशिक कारावासात 'प्रिन्सिपल्स ऑफ मेडिसीन अँड होमिओपाथी' या पुस्तकाचे लेखन. टिळक महाविद्यालयाने

आयुर्वेद पारंगत ही पदवी दिली. १९२८ ते ३२ हिंदुस्तान सेवादलाशी संबंध. १९५५ साली इंटरनॅशनल होमीओपाथिक काँग्रेससाठी कॅनडा येथे प्रयाण.

३६ वर्षे वैदयकीय व्यवसाय आणि सामाजिक कार्यात आघाडीवर.

त्यांच्या आत्मवृत्तातील हा उतारा.

## महाराष्ट्र कायदेभंग मंडळ

वा. वि. आठल्ये

रत्नागिरीत किंवा इतर कोणत्याही गावी असताना बहुधा रोज कोठे तरी मला सत्याग्रहासंबंधी व्याख्यान दयावे लागत असे. रत्नागिरी शहरात टेबलावर उभे राहून व्याख्यान देण्याची त्या वेळेस प्रथा होती. इंग्रजांची शक्ती व त्यांच्या नैतिक बलाचे मूल्यमापन आणि भारतीयांचा स्वातंत्र्य मिळविण्याचा निर्धार हे माझ्या व्याख्यानाचे मुख्य विषय असत.

निरनिराळ्या केंद्रांच्या योजना, भिन्न भिन्न ठिकाणांकरता प्रमुखांच्या नेमणुका, सत्याग्रह करण्याच्या जागा, इ. बाबत श्री. आप्पासाहेब पटवर्धनांशी १३ एप्रिलला मी चर्चा केली व योजना आखल्या. त्याच दिवशी संध्याकाळी रत्नागिरीच्या किल्ल्याजवळील मिठाच्या जागा पाहिल्या; तेथे मीठ उचलण्यास भरपूर संधी होती. १२ तारखेस वालावलकर व बर्वे जैतापुरात पकडले गेले.

१३ तारखेनंतर सत्याग्रह अधिकृत रीत्या सुरू व्हावयाचा होता. खुद्द रत्नागिरीत सिमेंटचे ४ चुले व ४ पॅन्स तयार ठेवले होते. अशाच योजना इतरत्रही सुचविल्या होत्या. किल्ल्याचा पायथा, भाटी (खाडी) व ४॥ मैलांवर असलेले मिऱ्या बंदर ही जवळची सत्याग्रहाची ठिकाणे योजिली होती. ह्याशिवाय ५ मैलावरील वसणी, ४ मैलावर कसोपवायंगणी, २॥ मैलांवरील शिरगांव, ५ मैलांवरील सोमेश्वर, २॥ मैलांवरील करले (येथे केवळ मुसलमान वस्ती असावी), १। मैलांवरील राजिवडे, ३ मैलांवरील कासारवेल आणि १ मैलावरील मिरकरवाडा (येथेही मुसलमान वस्ती आहे) हीही ठिकाणे डोळ्यांपुढे होती व रोज फावल्या वेळात अशा जागा शोधून काढण्याचा उदयोग चालू असे.

साबरमतीच्या आश्रमापैकी श्री. सोमणांच्या नायकत्वाखाली इकडे येणाऱ्या लोकांना ७, ८ दिवसानंतर रत्नागिरीच्या उत्तर भागातील हेदवी छावणीला पाठविण्याचे ठरविले होते.

मालवणची व्यवस्था आण्णासाहेब दास्ताने, आप्पासाहेब पटवर्धन, समर्थ विदयालयाचे महाजन, नव्या काळातील राऊत, अटकेतून मुक्त झाल्यास

वालावलकर यांनी पाहावी अशी आखणी केली होती. श्री. गं. कृ राऊळ व श्री. गवाणकर वकील यांच्यावर माहिती काढण्याचे काम सोपविले होते.

रत्नागिरी शहरातील काम विष्णुपंत आपटे, तेथील घाणेकर, शेवडे व डॉ. भागवत यांजकडे दिले. भागवतांना अगरगुळ्यात काम करण्याची सवड ठेवली होती.

साबरमती आश्रमांतील श्री. सोमण आणि श्री. जोगळेकर यांनी हेदवी ते गुहागर काम करावे व जरूर पडल्यास तिकडे त्यांनी पोट छावणी काढावी अशी योजना होती. छावणीकरता आयती घरे मिळतील अशी आशा होती.

देवगडच्या दक्षिणेस मिठबावमध्ये यूथ लीगच्या कार्यकर्त्यांनी जावे व आवश्यक वाटल्यास पोटछावणीही काढावी असे ठरविले होते. त्या भागात खारी माती भरपूर असल्याची माहिती मिळाली होती. नाटे मुक्कामी मीठ उचलण्यास वाव आहे असेही वृत्त आले होते.

१३ एप्रिलपर्यंत आखून ठेवलेल्या कामांची सामान्य रूपरेषा अशी होती. सत्याग्रह सुरू झाल्यावर व सरकारची प्रतिक्रिया पाहिल्यावर आपल्या शक्तीचे योग्य मूल्यमापन करून युद्धमंडळाची पावले पडावयांची होती.

१४ एप्रिलला रत्नागिरी शहराजवळील किल्ला व भाटी (खाडी) येथे सत्याग्रह सुरू झाला. पाच पाच सत्याग्रहचांच्या तीन तुकडचांनी त्यात भाग घेतला. सत्याग्रह सुरू झाल्यावर माझ्या दृढ परिचयाचे व विश्वासाचे कोणी तरी कार्यकर्ते रत्नागिरीत माझ्याजवळ असण्याची आवश्यकता वाटली. कारण मी पकडला गेलो तर माझ्या योजना नीट ध्यानात घेऊन पार पाडण्याची जबाबदारी कोणी तरी घ्यावयास पाहिजे होती. सातारा जिल्ह्यातील मार्गदर्शनाची जबाबदारी १ एप्रिल ते १७ एप्रिलपर्यंत श्री. गोसावी वकीलांकडे व १७ एप्रिलपासून श्री. नाथ घाणेकरांकडे टाकण्याची मी योजना केलेली होती. पण घाणेकरांचा रत्नागिरीत अधिक उपयोग होईल ह्या समजुतीने श्री. गोसाव्यांशी विचारविनिमय करून श्री. देवांनी घाणेकरांना रत्नागिरीस १४ तारखेपर्यंत पाठवावे अशी मी देवांना तार केली व त्याप्रमाणे घाणेकर १४ एप्रिलला रत्नागिरीत दाखल झाले. कायदेभंगमंडळावरील पहिले पाच सभासद पकडले जातील तेव्हा त्या जागा ज्यांनी भरून काढावयाच्या होत्या त्यात श्री. बाळासाहेब खेर व श्री. गोसावी वकील यांची नावे होती. हे सर्व माझ्या ध्यानात असल्यामुळे श्री. गोसाव्यांना रत्नागिरीस न बोलावता श्री. घाणेकरांना आणण्याची मी योजना केली.

१४ एप्रिलला किल्ल्याच्या पेठेत मी एक व्याख्यान दिले. श्री. वालावलकर व बर्वे यांच्यावरील खटल्याचा निकाल लागून १५ तारखेस त्यांना एक

महिन्याची साध्या कैदेची शिक्षा देण्यात आली. ता. १६ ला आनंदाश्रमापासून समुद्रकिनाऱ्यापर्यंत २००० लोकांची एक मिरवणूक गेली. ह्या लोकांनी समुद्राचे पाणी घरोघरी नेऊन सरकारी कायद्याविरुद्ध मीठ तयार केले. हा सकाळचा कार्यक्रम पाहून अनेक तरुण, स्वयंसेवक होण्याकरता दुपारी छावणीत आले.

श्री. घाणेकर रत्नागिरीस आल्यानंतर मी व ते जोडीने शहरात व इतर गावी एकसारखे व्याख्याने देत हिंडत होतो. १६ तारखेस आम्ही जवळच्या करले गावी जाऊन आलो. पण मीठ उचलण्यासारखी जागा तेथे हेरून ठेवता आली नाही.

रत्नागिरीच्या छावणीत इतर जिल्ह्यांपेक्षा सातारच्या स्वयंसेवकांच्या तुकड्या अधिक येत होत्या. साताऱ्याला रत्नागिरी सापेक्षतः जवळ होती हेही ह्याचे एक कारण असेल. पुढे पुढे रत्नागिरी शहरात सातारच्या लोकांचेच चेहरे रस्तोरस्ती अधिक दिसू लागले. जणु काही आपण साताऱ्यातच आहोत असा भास होई. सातारचे प्रसिद्ध व्यायामतज्ञ व मल्ल श्री. गणपतराव साठे सत्याग्रह्यांमध्ये सामील झाले त्यांचे धिप्पाड शरीर, कणखर आवाज आणि पैलवानी दरारा पाहून पोलिस त्यांच्याजवळ जाण्यासही घाबरत. १७ एप्रिलला श्री. साठे व साताऱ्याकडीलच एक श्री. भाऊ विष्णु कुलकर्णी यांना ६ महिने सक्त मजुरीच्या शिक्षा मिळाल्या.

याच तारखेस मालवणहून तार आली की बापुसाहेब सामंतांना ३ महिने साधी कैद व १०० दंड अशी शिक्षा मिळाली. शिक्षेच्या प्रत्येक बातमीने लोकात उत्साहाचे वारे भरत होते. अर्थात् त्याकरता प्रोत्साहक व्याख्याने द्यावी लागत हे सांगावयास नकोच.

ता. १७ ला सोमण, धुरंधर व जोगळेकर यांना हेदवीकडे पाठविले. हेदवीपासून ६ मैलांवर बोऱ्या गाव आहे. बोऱ्याजवळ समुद्रकाठी सुमारे ४ मैलांच्या पट्टीत पुष्कळ मीठ उचलणे शक्य होते. सोमणांनी जयगड व गुहागर ह्यांच्या दरम्यानच्या सर्व गावी दौरा व प्रचार करून तिकडील परिस्थितीचा अहवाल सुमारे ८ दिवसांनंतर आम्हास द्यावयाचा होता.

आता पुढील वृत्तांत निवेदण्यापूर्वी महाराष्ट्रातील काँग्रेसेतर राजकीय पक्षांची मनोभूमिका, कायदेभंगमंडळाची कार्यपद्धति, मंडळावरील सभासदांच्या वैचारिक बैठका, इ. चे सिंहावलोकन केले तर पुढील घटना समजण्यास थोडी मदत होईल असे वाटते.

ह्या (एप्रिल) महिन्यात कायदेभंगमंडळाचे काम ठीक चालले होते. मार्चमध्ये केळकर पक्ष व काँग्रेस पक्ष यांची तात्पुरती हातमिळवणी झाली होती. त्यामुळे विरोधी वातावरण उरलेले नव्हते. तथापि एप्रिलमध्ये केव्हा तरी

श्री. दा. वि. गोखले, श्री. पांडुआण्णा शिराळकर व श्री. महाजन हे केळकर-पक्षाच्या अथवा राष्ट्रीयपक्षाच्या वतीने श्री देवांकडे आले व राष्ट्रीय पक्षाचा एक प्रतिनिधि कायदेभंगमंडळावर घेतलाच पाहिजे अशी मागणी करू लागले. शक्य तितका विचार करून देवांनी ती मागणी अमान्य केली. पण त्यामुळे पुन: विरोधी वातावरण निर्माण होते की काय अशी क्षणभर शंका निर्माण झाली होती. तथापि तसा काही अनिष्ट परिणाम झाला नाही. कोणाच्या भिन्न विचारांना न दुखावता, मतभेदाचे मुद्दे चर्चेत टाळून व शक्य तितकी समाईक भूमिका शोधून सत्याग्रहाच्या तत्त्वांचा प्रचार करण्याचा आदेश सर्व कार्यकर्त्यांना देण्यात आलेला होता. सत्याग्रहाला अमुकच मदत करा असाही आग्रह न धरता त्या त्या जिल्ह्याने आपल्या परिस्थित्यनुरूप जेवढे साहाय्य देता येईल तेवढेच द्यावे अशी आम्ही आमची भूमिका ठेवल्यामुळे लढाऊ वृत्तीची माणसे सत्याग्रहाच्या कार्यात सामील होऊ लागली होती. उज्जयनीसारख्या दूर ठिकाणाहूनही श्री. बाळकृष्ण लक्ष्मण साठे नावाच्या एका शाळेच्या हेडमास्तराने आपले नाव सत्याग्रहयाच्या यादीत घालण्याबद्दल मोठ्या कळकळीचे पत्र मला पाठविले होते. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

१० एप्रिलला रत्नागिरीस जाऊन त्या जिल्ह्यातील कामाची सुत्रे मी हाती घेतल्यावर कायदेभंगमंडळाची मुंबई कचेरी, साताराचे सत्याग्रहकेंद्र, रत्नागिरी जिल्ह्यांतील उपकेंद्रे, हिं. से. दलाची अखिल भारतीय व प्रांतिक केंद्रे, ह्या सर्वांशी माझा पत्रव्यवहार चालू होता. कायदेभंगमंडळाचे सेक्रेटरी डॉ. आठवले आपले काम अत्यंत तत्परतेने करीत; पण त्यांचे काम यांत्रिक होते; ते स्वत: विशेष विचार करू शकत नव्हते किंवा त्यांना दूरदर्शी मार्गदर्शनही फारसे लाभत नव्हते. मुंबईत (व्हिलेपार्ल्यात) देवच त्यांचे मार्गदर्शक; पण देवांच्या शक्तीची ओढाताण होत असावी.

युद्ध म्हटले म्हणजे त्याबाबत अनेक तंत्रे सांभाळावी लागतात. पण सत्याग्रही युद्धाला जणु काही तंत्र लागतच नाही अशी अनेक पुढाऱ्यांची कल्पना त्या काळी झालेली असावी व तिचा प्रभाव देवांवर मुळीच झाला नव्हता असे म्हणवत नाही. युद्धाच्या जुन्या किंवा रूढ कल्पना आणि सत्याग्रहाची विचारसरणी यांमध्ये कार्यकर्त्यांचे मन दोलायमान होणे स्वाभाविक होते. आणि ह्या ओढाताणीतून जन्मास आलेलें तंत्र असावे तितके उपयुक्त नव्हते असे म्हटले तर ते अन्याय्य ठरणार नाही. कारण काहीही असले तरी प्रत्यक्ष परिणाम असा झाला होता की सेक्रेटरी आठवले जरी तत्परतेने व मन:पूर्वकतेने काम करीत होते तरी ही जबाबदारी त्यांच्या मानाने फार मोठी होती. एक सामान्य उदाहरण असे की साताऱ्याहून बहुधा श्री. गोसाव्यांकडून व रत्नागिरीहून माझ्याकडून त्यांना कळविण्यात आले होते की आमचा पत्रव्यवहार सरकारकडून तपासला व प्रसंग

दडपलाही जात असावा. पण ह्या शंकेला ते मुळीच थारा देत नसत. आमची शंका त्यांनी खरी मानली असती तर त्यावर एखादा चांगला उपाय योजून पत्रे सुरक्षित हाती पडण्याची त्वरित योजना झाली असती. आणि शेवटी शेवटी असे उपाय योजावेही लागलेच. पण त्यांची समजूत अशी की म. गांधींसारख्या थोर विभूतीच्या सत्याग्रहाच्या सरळ चळवळीत सरकार असे काही करील हे शक्यच नव्हते.

दुसरी गोष्ट अशी की सत्याग्रह स्वरुपाचे युद्ध –युद्ध म्हणावयाचे नसल्यास कार्य– यशस्वी व्हावयाचे म्हटले तर त्यासही शिस्त, मध्यवर्ती नियंत्रण व एकसूत्रीपणा हे गुण श्रेष्ठ दर्जाचे जरूर असतात हे तत्वतः मान्य होते असे मानले तरी त्याची अंमलबजावणी व्यवहारात कटाक्षाने झालीच पाहिजे हे ध्यानात येण्यास देवांनाही काही वेळ लागला. असे झाले नसते तर श्री. दास्ताने व आप्पासाहेब पटवर्धन यांनी कायदेभंगमंडळाच्या परवानगीशिवाय रत्नागिरी जिल्ह्यात जो आधीच सत्याग्रह केला तो झाला नसता. हा दोष मुख्य कचेरीच्या ध्यानात आणून दिल्यावरही त्याच्या दुरुस्तीचे प्रयत्न झटपट झाले नाहीत. श्री. देवांचे १९ एप्रिलचे पत्र ह्या दृष्टीने चांगले होते.

सत्याग्रहाबाबत श्री. दास्ताने प्रथम स्वतःच्या तंत्राने वागले. लोकांना तऱ्हेतऱ्हेने चेतावणी देण्याच्या हेतूने त्यांनी मालवणात परदेशी कापडाची होळीही केली. श्री. आण्णासाहेब सहस्त्रबुद्धेही रत्नागिरी जिल्ह्यात काम करीत होते; पण त्यांनी शिस्त फार कडकपणाने पाळली; शिस्त न सोडता पद्धतपूर्वक रत्नागिरी जिल्ह्यात सत्याग्रह-युद्ध खूप जोरास लागावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती व तसे प्रयत्न चालू असत.

नारकर, गोखले, फणसे, करगुटकर इ. मंडळीवर जैतापुरच्या कामाची जबाबदारी २१ एप्रिलला आम्ही टाकली व गुरुवार एकादशी २४ एप्रिल ह्या दिवशी जैतापुरात सत्याग्रह करण्यास परवानगी दिली. मी व श्री. नाथ घाणेकर जैतापूरास जाऊन आलो. २१ तारखेस दुपारी ३-१५ वाजता आम्ही रत्नागिरीस आलो तो समजले की रत्नागिरी शहरातील मीठ तयार करण्याच्या आमच्या जागा पोलिसांनी मोडल्या व श्री. आपटे, साखवळकर व मीरसाहेब यांना अटक केली. दोन दिवस आधी आप्पासाहेब पटवर्धनांनाही अटक झाली होती. महाराष्ट्रातील इतर ठिकाणी श्री. खेर, वांद्रेकर, केतकर व मंडलिक पकडले गेल्याचे वृत्त मिळाले.

२२ एप्रिलच्या सुमारास श्री. गोसावी वकीलांची पेणच्या छावणीवर नेमणूक झाली व तेथील काम त्यांनी साताऱ्याच्या छावणीप्रमाणे चोख बजावले.

सरकारने एका विशिष्ट रीतीने आपली पावले टाकण्यात प्रारंभ केला. ह्या वेळेपर्यंतच आमच्या मंडळाचे धोरण होते की मिठाच्या सत्याग्रहाशिवाय

दुसरा कोणताही करावयाचा नाही. मंडळाच्या सेक्रेटरीकडून कोणत्या जिल्ह्यात कोण व कोठे पकडले गेले याचे वृत्त आम्हांस झटपट कळू शकत होते. त्याचप्रमाणे कोठे काय काम चालू आहे हेही ते त्वरित कळवीत असत.

२४ तारखेस मला तार आली की महत्त्वाच्या वाटाघाटीकरता मी ताबडतोब मुंबईस जावे. त्याप्रमाणे मी आगबोटीने निघालो व २५ तारखेस सकाळी मुंबईस पोहोचलो. आमच्या मंडळाच्या पहिल्या पाच सभासदांपैकी दास्ताने, पटवर्धन व केतकर हे तीन तुरुंगात गेल्यामुळे देव व मी असे दोघेच उरलो. रिकाम्या जागा भरावयाच्या होत्या व पुढील क्रम लावून ठेवावयाचे होते; शिवाय पुढील धोरण ठरवावयाचे होते. देव मंडळाचे प्रमुख असल्यामुळे त्यांची जबाबदारी फार मोठी होती. ती सारखी वाढत होती आणि ती पार पाडण्याची ते शिकस्त करीत होते. ते व मी आता केव्हाही पकडले जाण्याचा संभव होता. रिकाम्या जागांवर श्री. शंकरराव जावडेकर, श्री. विनायकराव भुस्कुटे व बहुधा डॉ. लागू यांना आम्ही घेतले व महाराष्ट्राची सर्व शक्ति एकवटवून शिरोड्यात नमुनेदार व यशस्वी सत्याग्रह करावयाचा असे निश्चित ठरविले.

मुंबईतील वाटाघाटी संपल्यावर मी घाटकोपर, घनसोळी व शिरवणे येथील छावण्यांना भेटी दिल्या. रत्नागिरी जिल्ह्यांतील कार्यात शिस्त व सूत्रबद्धता जितकी अधिकात अधिक निर्माण करणे शक्य होते तितकी मी निर्माण केली होती. आता शिरोड्याचा निकराचा लढा यशस्वी करण्याची जबाबदारी माझ्यावर आणि माझ्याबरोबर जावडेवर व इतर सभासद ह्यांवरही पडली. परत रत्नागिरीस पोहोचण्यापूर्वी मी लोणावळे व नगर येथे निधीकरीता व साताऱ्यास छावणीची चौकशी करण्याकरता गेलो असावा असे वाटते. पण ह्या सर्व ठिकाणीं कोणत्याही गावी मला काही तासांपेक्षा अधिक थांबण्यास सवड नव्हती. साताऱच्या छावणीचे काम उत्कृष्ट चालले होते हे पाहून फार बरे वाटले.

२९ एप्रिलपर्यंत सरकारने फक्त ४४ प्रमुख कार्यकर्त्यांना तुरुंगात घातले; इतरांना हात लावला नाही; आमचा डाव कुजविण्याचा बेत होता. हा बेत हाणून पाडण्याकरता आम्ही आमची तयारी करू लागलो. अधिक सज्ज राहण्याबद्दल सर्व जिल्ह्यांना देवांची पत्रके पाठविली गेली. सर्वत्र मिठाची विक्री करण्याबद्दल सेक्रेटरीच्या सहीची कार्यकर्त्यांना पत्रके गेली.

आता शिरोड्याच्या सत्याग्रहाकडे वळण्यापूर्वी महात्माजींच्या सत्याग्रहाची अपुरी राहिलेली माहिती येथे थोडक्यात पुरी करतो. ६ एप्रिलला दांडी मुक्कामी त्यांनी मीठ उचलून कायदेभंग केला हे पूर्वी सांगितलेच आहे. त्यांनी परवानगी दिल्यावर, ते पकडले जाईपर्यंत अनेक ठिकाणी सत्याग्रह सुरू झाले त्यामुळे

सरकारने एक प्रकारे लष्करी राज्य सूरू केले. लोकांनी आपल्याकडून पुष्कळच शांतता राखली. तथापि जुलुमाची प्रतिक्रिया म्हणून लोकांनी काही ठिकाणी सरकारी अधिकाऱ्यांवर बहिष्कार घालण्यास प्रारंभ केला. महात्माजींनी मात्र लोकांना सांगितले की सरकारी कचेऱ्यांवर बहिष्कार घाला व अधिकाऱ्यांच्या आज्ञा पाळू नका, पण त्यांना अन्न मिळणार नाही असा करू नका.

जनता जिकडे तिकडे उत्साहाने भारलेली होती; महात्माजी धारासानांतील मिठाचा साठा लुटणार होते. पण सरकारने महात्माजींना अटक करून ता. ५ मेच्या सकाळी येरवड्याकडे नेले. (रात्री १ वाजताच त्यांना अटक झाली होती. प्रथम त्यांना आगगाडीने बोरिवलीपर्यंत व तेथून पुढे मोटारीने येरवड्यास नेण्यात आले.)

त्यांच्या अटकेमुळे स्वदेशात व परदेशांमध्ये सहानुभूतीच्या प्रचंड लाटा उसळल्या. मुंबईत व इतरत्र मोठे हरताळ पाळले गेले. परदेशांत पनामामध्ये हिंदी व्यापाऱ्यांनी हरताळ पाळला. १०२ अमेरिकन धर्मगुरूंनी रॅमसे मॅगडोनल्डना पत्र पाठवून गांधींशी व हिंदी लोकांशी तडजोड करा असे सुचविले.

आता आपण शिरोड्याच्या सत्याग्रहाच्या घटना ध्यानात घेऊ या. हा एक निकराचा लढा व्हावयाचा होता. सर्व कार्यांमध्ये मेरुमणीचे त्याला स्थान प्राप्त व्हावयाचे होते. त्याची पूर्वतयारी महाराष्ट्रात जोरात सुरू झाली. गोळीबार झाला तरी माघार घेणार नाहीत असे निधड्या छातीचे ३० सत्याग्रही महाराष्ट्रातील प्रत्येक छावणीने शिरोड्यास पाठवावेत अशी मागणी आमच्या कायदेभंग मंडळाने ५ मे रोजी केली. हे सत्याग्रही थोड्याच दिवसांमध्ये शिरोड्यास पोहोचले पाहिजेत असे सर्वत्र कळविण्यात आले. असे सत्याग्रही एकंदर ५०० घ्यावयाचे असा आमचा संकेत होता. प्रत्येक सत्याग्रह्याने आपआपल्या छावणीच्या प्रमुखाकडून परवाना आणला पाहिजे असा आदेश देण्यात आला होता.

शिरोडासत्याग्रहाच्या पूर्वतयारीचे मुख्य केंद्र स्वाभाविकच रत्नागिरी शहर झाले. ठिकठिकाणाहून तेथे येणाऱ्या स्वयंसेवकांच्या तुकड्यांना रत्नागिरी केंद्रात तात्त्विक व व्यावहारिक शिक्षण दिले जात होते. मे च्या पूर्वी मी पुन: एकदा मुंबईस गेलो होतो. ५ मेला मुंबई सोडली, श्री. जावडेकर माझ्याबरोबर रत्नागिरीस आले. मुंबईत श्री. देवांची जशी जबाबदारी वाढली तशी माझी रत्नागिरीत वाढली. वैचारिक क्षेत्रात जावडेकरांची मला चांगली मदत झाली. पण व्यावहारिक क्षेत्रात मला माझ्या पूर्व अनुभवाची व खात्रीची साताऱ्याकडील माणसे हवी होती व ती मी वेळोवेळी बोलावून घेत होतो. साताऱ्यातील श्री. भाऊसाहेब सोमण व श्री. गोसावी यांची ह्याबाबत थोडी नाखुषी दिसली. कारण साताऱ्यातील बरीच माणसे रत्नागिरीस ओढली गेली. पण शिरोडा सत्या-

ग्रहाच्या दृष्टीने रत्नागिरीची जबाबदारी साताऱच्या केंद्राच्या जबाबदारीपेक्षा अधिक मोठी होती हे त्यांना मी पटवून दिल्यावर त्यांची नाखुषी कमी झाली. एप्रिलच्या दुसऱ्या पंधरवड्यात श्री. साखवळकर व ५ मेच्या सुमारास श्री. नाथ घाणेकर तुरुंगात गेले. तथापि सामान्य स्वयंसेवकातून लायक व विश्वासार्ह माणसे मी शोधून काढीत होतो. अशांमध्ये एक जावडेकर नावाचे तरुण विद्यार्थी होते. (आता ते एक शिक्षणाधिकारी आहेत.)

शिरोडा सत्याग्रह १२ मेला सुरू व्हावयाचा होता. तत्पूर्वी तेथे काही दिवस शिबिर उघडून स्वयंसेवकांची उतरण्याची व जेवणाची सोय करणे जरूर होते व ती आम्ही केली. ती सर्व सूत्रे मी व शंकरराव जावडेकर रत्नागिरी केंद्रातून हालवीत होतो. सर्व तयारी पूर्ण झाल्यावर अथवा होण्यापूर्वी आम्ही दोघे पकडले गेलो तर आमची कामे कोणी करावयाची हे सर्व ठरवून आणि आमच्या विचाराच्या कक्षेत येणाऱ्या इतर सर्व कामांच्या योजना करून व संभाव्य अडचणींवर उपाय आखून आम्ही दोघे ८ किंवा ९ मेला शिरोड्यास गेलो.

शिरोड्याच्या शिबिराची व्यवस्था पाहण्याकरता श्री. ए. बी. पंडितांना आम्ही आधीच शिरोड्यास पाठविले होते. हे गृहस्थ मितभाषी व प्रसिद्धि--विन्मुख; आपले काम बिनभोभाट, चोख, शिस्तबद्ध व निश्चयपूर्वक पार पाडण्याची त्यांची प्रवृत्ति माझ्या ध्यानात आलेली होती. रावसाहेब पटवर्धनांना रत्नागिरीस पाठविण्यात जशी मी योग्य निवड केली होती तसे यांना शिरोड्यास पाठविण्यातही मी उचित तेच केले होते असे मला वाटते. ह्या व अशाच इतर योजना आखण्यात श्री. शंकरराव जावडेकरांची मला बहुमोल मदत झाली.

आम्ही शिरोड्यास पोहोचण्यापूर्वी पकडले जाऊ नयेत म्हणून आमच्या प्रवासाच्या कार्यक्रमाची जनतेला व सरकारला कल्पना न येऊ देता आम्ही दोघे मोटारीने सावंतवाडीहून शिरोड्यास गेलो. हेतु एवढाच की शिरोडा शिबिराची सर्व व्यवस्था नीट झालेली आहे हे डोळ्यांनी एकदा पाहावे, श्री. पंडितांना तोंडी एकदा सर्व सूचना द्याव्यात व शक्य तर शिरोडा सत्याग्रहात आपणच प्रथम कायदेभंग करावा. श्री. पंडितांनी सर्व व्यवस्था आदेशाप्रमाणे तंतोतंत केली होती. पुढे जेव्हा आम्ही पकडले गेलो तेव्हा मागील व्यवस्था पाहण्यास पंडितांसारखे गृहस्थ नसते तर फार गोंधळ होण्याचा संभव होता. पंडितांबद्दल कृतज्ञ असणे जरूर आहे.

सत्याग्रहापूर्वीच्या ३, ४ दिवसांमध्ये खुद्द शिरोडा गावांतील वातावरण सत्याग्रहाच्या तत्वाना अनुरूप असे निर्माण करण्याची कामगिरी आम्हांस करावी लागली. ह्या कामगिरीत तेथील अनंतराव नाबर, विष्णुपंत खटखटे, रामभाऊ परब आणि उमाजीपंत राऊत यांची आम्हांस चांगली मदत झाली. दूरदृष्टि ठेवून आम्ही तसे वातावरण निर्माण केले नसते तर सत्याग्रहाच्या वेळेस

रक्तपात होण्याचीही भीति होती. श्री. भुस्कुटे कायदेभंगमंडळावर होते. परंतु त्यांचा त्याग व देशभक्ति ह्याबद्दल पूर्ण आदर ठेवून म्हणावेसे वाटते की सत्याग्रहाच्या तात्त्विक चौकटी पेलण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ नव्हते.

महाराष्ट्रातील निरनिराळ्या छावण्यांमध्ये आता स्वयंसेवकांची नवी भरती न करता जुन्या भरतीपैकींच एकंदर ५०० निवडक व निर्भय स्वयंसेवक शिरोड्यास यावेत अशा अर्थाचें पत्रक ९ मेला कायदेभंगमंडळाच्या कचेरीमार्फत काढले गेले. श्री. शंकरराव देव १२ मेपूर्वीच पकडले गेले. आता पहिल्या पांच सभासदांपैकी मी एकच मोकळा होतो.

शिरोड्यात एका मोठ्या देवळाच्या आवारात सत्याग्रही लोकांची उतरण्याची सोय केली होती. आम्ही तेथे गेलो तेव्हा एखादा दुसरा दिवसच सत्याग्रह्यांची तेथे गर्दी नव्हती. पण पुढे रोज त्यांची संख्या वाढू लागली. सर्वांची व्यवस्था, सर्वांचे प्रश्न आणि सर्वांच्या अडचणी यांचा समाधानकारक निकाल लावण्यात रात्रीचे १२ व केव्हा केव्हा १, २ ही वाजत असत. आणि पुन: पहाटे ५ ला उठावेच लागे. कारण त्याशिवाय कामे आवरणे अशक्य होते.

जावडेकरांचा व माझा पूर्वीपासून थोडा परिचय होता. पण ह्या वेळेपासून आम्ही एकमेकांस चांगले जाणू लागलो. अडचणींच्या व अवघड सार्वजनिक कार्यांत जर समाधानकारक, एकवाक्यतेचे आणि यशस्वी सहकार्य झाले तर त्या सहकाऱ्यांचा स्नेह दृढ होण्यास मदत होते. आणि असेच आमचे दोघांचे झाले.

ज्या देवळात आम्ही उतरलो होतो तेथील देवाची पूजा, आरती इ. प्रकारांचे निरीक्षण आमच्याकडून रोज सहजच होत असे. लोक भाविक दिसले. देवदासींची तिकडे बरीच प्रथा असावी हे आमच्या ध्यानात आले.

प्रारंभी फक्त एकच दिवस आम्ही संध्याकाळी समुद्रकिनाऱ्याकडे फिरावयास गेलो होतो. अर्धा पाऊण मैल बरेच रेताड आम्हांस ओलांडावे लागले. वाटेत झाड दिसले नाही. समुद्रकाठी गेल्यावर तेथे एक नारळाचे झाड दिसले. तेथील एक घटना समाजशास्त्राच्या दृष्टीने नमूद करण्यासारखी होती. त्या झाडाखाली एका लहानशा खोपटांत एक बाई बसलेली आढळली. तिला बरेच प्रश्न मी विचारले. तिचे बघणे, बसणे इ. वरून तिच्या मेंदूचा विकास वानराच्या मेंदूपेक्षा फारसा अधिक झालेला नसावा असे मला वाटले. बऱ्याच वेळाने ती दोन शब्द बोलली. त्यातून आम्हांस इतकेच कळले की तिला नवरा आहे व समुद्रावर काही कामास गेलेला आहे! हिंदुस्थानांत विकासाच्या भिन्न भिन्न मानसिक अवस्थांमध्ये असलेले समाज दृष्टोत्पत्तीस येतात. अगदी बाजूच्या भागात प्राथमिक मानवाच्या अवस्थेत असलेली माणसे आढळली तर आश्चर्य मानण्याचे कारण नाही. समाजशास्त्रीय काही सिद्धांतांना बळकटी आणणारे हे अनुभव असतात.

पण ही सामाजिक निरीक्षणे करण्यास आम्हांस फुरसत नव्हती. शिरोड्याच्या छावणीत स्वयंसेवकांची संख्या पुढे तासातासाला वाढू लागली व त्यांच्या विविध सोयी व योजना करण्यात आमचा वेळ संपून जाऊ लागला. १२ तारीख जवळ आली. पहिल्या तुकडीत कोणी जावयाचें, दुसरींत कोण जातील, मी, जावडेकर व भुस्कुटे पहिल्याच दिवशी गेलो तर मागची व्यवस्था कोणी पाहावयाची याचे निर्णय घेण्यात आले.

११ मे ची रात्र, १२ मेला सत्याग्रहात भाग घेऊ इच्छिणारांच्या दृष्टीने आणीबाणीची होती. १२ तारखेस प्रथमच जरब बसावी म्हणून सरकार गोळीबार करील असा संभव होता. म्हणून ११ तारखेस रात्री किंवा तत्पूर्वी अनेकांनी आपआपल्या घरी शेवटची पत्रे पाठविली किंवा मागे राहणाऱ्या मित्रांजवळ घरी पाठविण्याकरता दिली.

पहिल्या दिवशी गोळीबाराचा जर संभव होता तर आपण पहिल्याच दिवशी जावे व भीतीने मागे राहिलो असा दोष कोणी देऊ नये ह्या हेतूने मी माझी तारीख १२ च निश्चित केली. घरी शेवटचे म्हणून एक पत्र पाठविले आणि केवळ अटक झाली तर प्रसिद्ध करण्याकरता म्हणून पुढील पत्रक तयार केले व छावणीच्या प्रमुखाच्या ताब्यात दिले :–

"महाराष्ट्र कायदेभंग मंडळाचे माझ्यासह सर्व मूळ सभासद आता कारागृहात आहेत ह्याबद्दल मला अभिमान वाटतो. आणि आमच्या जागा दुसऱ्या सभासदांनी तात्कालिक भरून काढल्या आहेत ही तर अत्यानंदाची गोष्ट आहे. अवघ्या एका महिन्यांत महाराष्ट्राचा जो पराक्रम चमकला आणि जो अपूर्व आत्मत्याग झाला त्याकडे पाहता महाराष्ट्राचा स्वातंत्र्यप्राप्तीचा निश्चय अगदी स्पष्ट झाला आहे. माझी खात्री आहे की महाराष्ट्र आपल्या निश्चयाला जागून अंगीकृत कार्य (ह्या कार्यातील) शेवटच्या मनुष्याचे बलिदान होईपर्यंत सोडणार नाही. महाराष्ट्रातील सर्वसुप्त शक्ती जागृत झाल्या आहेत. आता त्या सर्व शक्तींची संघटना करून दिव्य राष्ट्रीय तेज निर्माण करणे एवढेच आपल्यापुढे कार्य उरले आहे. ह्या महाराष्ट्रीय नवतेजापुढे सर्व पाशवी शक्ति नमल्याच पाहिजेत असा मला दृढ विश्वास वाटतो."

१२ मे, १९३० सोमवार. ह्या दिवसाच्या पहाटेस पूर्वनियोजित तुकड्या सत्याग्रहाकरता बाहेर पडल्या. एका तुकडीत मी व विनायकराव भुस्कुटे होतो; आणि ही पहिली तुकडी होती. आमच्याबरोबर काही स्वयंसेवक होते. आम्ही ठराविक ठिकाणी जाऊन मिठागराची कुंपणे तोडली. इतर तुकड्यांनी इतर ठिकाणी तेच कार्य केले. प्रथम तेथील रखवालदारांनी आम्हांस शाब्दिक विरोध केला. काही वेळाने पोलिस अधिकारी आले. त्यांनी आमच्या कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. पण आमचे काम चालू होते. "तुम्हास अटक केली

आहे" असे ते म्हणेपर्यंत आमचे काम थांबले नाहीं. अधिकाऱ्यांनी अधिकृतरीत्या अटक केल्याचे आपणांस सांगितले म्हणजे काम बंद करावयाचे असे कायदेभंगमंडळातर्फे सर्व सत्याग्रहचांना आम्ही सांगितले होते. पोलिस येऊन त्या सकाळच्या सर्व तुकडचांना अटक होईपर्यंत मिठागरांतील बरेच मीठ लुटले गेले होते. आम्हांस अटक झाली.

आमच्या पश्चात् कामांची व्यवस्था कशी व्हावी हे सर्व आम्हीं आखून दिले असल्यामुळे श्री. शंकरराव जावडेकरांनीही त्याच दिवशी दुसऱ्या एका तुकडीबरोबर सत्याग्रह केला व ते पकडले गेले. डॉ. लागू, आण्णासाहेब सहस्रबुद्धे, परचुरेशास्त्री आणि (बहुधा त्याच दिवशी) रावसाहेब पटवर्धन व अनेक स्वयंसेवक पकडले गेले. सुमारे ९० माणसे पहिल्या दिवशी अटकेत होती. मिठागराच्या अधिकाऱ्यांच्या एका चावडीत ह्यांपैकी अनेकांना ठेवण्यात आले. ह्या जागेस कस्टम हाऊस म्हणत. सत्याग्रह चालू असता तो पाहण्यास हजारो लोक उपस्थित होते. मिठागरांच्या मोडल्या जाणाऱ्या प्रत्येक कुंपणाबरोबर परसत्ता कोलमडत आहे ह्या भावनेने लोकांची मने उचंबळत होती.

१३ मेला २०० स्वयंसेवकांनी मीठ लुटण्याचा प्रयत्न केला; पोलिसांची वर्तणूक अत्याचाराची झाली; १६ स्वयंसेवकांना जखमा झाल्या; १५८ स्वयंसेवक पकडले गेले.

हा सत्याग्रह सुरू झाल्यावर सरकारने आमच्या कार्यकर्त्यांना व स्वयंसेवकांना पोस्ट व तार ऑफिसांचा वापर बंद केला; इतकेच नव्हे तर आमच्या माणसांना प्रवासमार्गही बंद केले. त्यामुळे लहान वयाच्या मुलांबरोबर संदेश पाठविण्याचे काम करावे लागले व ती मुले मोठ्या उत्साहाने मुंबईपर्यंत आमच्या निरोपांची ने आण करीत असत.

१४ व १५ तारखांना मीठ लुटण्याचे कार्यक्रम झाले; पोलिसांनी लाठ्यांचा क्रूरपणे उपयोग केला; ६२ इसमांना जखमा झाल्या. २० माणसांना बेशुद्ध होईपर्यंत पोलिसांनी मारले; ह्या दोन दिवसांमध्ये २०० ते ३०० स्वयंसेवक पकडले गेले असावेत. आमच्या योजनेप्रमाणे ५०० लोकांनी सत्याग्रहात खासच भाग घेतला. ५०० पेक्षाही अधिक माणसे सत्याग्रहांत सामील झाली असण्याचा संभव होता. आमच्या प्रतिज्ञेची पूर्तता झाली.

पोलिसांच्या अत्याचारांमुळे प्रांतभर जनता चिडून गेली. बहुधा १६ मे शुक्रवार रोजी मुंबईहून ११७ स्वयंसेवक शिरोड्यास येण्याकरता निघाले; पण पोलिसांनी त्यांना आगबोटीवर अटक केली व ठाण्यावर नेऊन सोडून दिले; नवीन कोणास आगबोटीत बसू दिले नाही; पुन: १७ मेला ११७ लोक बोटीवर चढले; पोलिसांनी त्यांना तेथे अडविले नाही पण बोट वेंगुर्ल्यास आल्यावर तेथे उतरू दिले नाही; तेथून त्यांना परत जावयास लाविले.

पुढील वृत्त सांगण्यापूर्वी शिरोड्यांत १२ मेला सुरू होऊन १५ मे अखेर यशस्वी रीतीने चालू राहिलेली सत्याग्रहाच्या संबंधांतील थोडी अधिक माहिती येथे सांगू इच्छितों. ती सार्वजनिक कार्याच्या दृष्टीने उद्‌बोधक ठरण्यासारखी आहे.

पकडलेले सत्याग्रही सर्व एकाच ठिकाणी ठेवले जाणे अशक्य होते; निरनिराळ्या ठिकाणी ते ठेवले गेले. सर्वांचे जेवणाचे व पाण्याचे हाल झाले. कस्टम हाऊस संबोधल्या गेलेल्या जागेत आम्ही ६०, ७० लोक होतो. १२ मेला आम्ही पकडले गेल्यावर सरकारी अधिकाऱ्यांनी जवळ जवळ २४ तास आमच्या जेवणाची काहीच सोय केली नाही. काही ठिकाणी जनतेने सरकारी अधिकाऱ्यांना खादचवस्तू मिळू दिल्या नाहीत, त्याची ही प्रतिक्रिया असेल. आमच्या जागेभोवती असलेल्या नारळाच्या झाडांवरील नारळ खाऊन आम्ही पहिला दिवस काढला. काही स्वयंसेवक छावणीत जाऊन येत असत. वास्तविक अटक झाल्यानंतर आमच्या स्वयंसेवकांना छावणीत जाण्याचा काहीच हक्क नव्हता. परंतु आमच्यापैकी अगदी तरुण मुलेच नव्हेत तर काही पोक्त माणसेही छावणीतच काय पण कोठेही जाऊन येत असत. आमच्या जागेला कॉंपाउन्ड नव्हते व आमच्यावर कोणी पाहरेकरीही ठेवलेला नव्हता. पोलिस सबइन्स्पेक्टर श्री. चव्हाण यांनी आम्हांस सांगितले होते की, आम्ही आमच्या जागेच्या आवाराबाहेर किंवा मागील शेतांच्या मर्यादेच्या पलीकडे जाऊ नये. त्याचप्रमाणे त्यांनी सांगितले की पाहारेकरी नाही म्हणून अटकेतील माणसांपैकी काही नाहीसे होऊ नयेत आणि पुढारी नसणारा एखादा कार्यकर्ता गेलाच तर त्याच्याऐवजी दुसरा कोणी हजर असावा असे त्यांनी विनोदी शब्दांमध्ये बोलून दाखविले होते. आमच्यावर पहारा नसल्यामुळे फारच-थोडे स्वयंसेवक अटकेच्या मर्यादा पाळीत असलेले आढळले. अर्थात् ध्यानांत येई त्या त्या वेळी आम्ही स्वयंसेवकांना बोलत होतो. अधिक वाईट वाटे ते जबाबदार माणसांच्या वागणुकीचे. हया दृष्टीने श्री. भुस्कुटयांची वृत्ति योग्य नव्हती. आमच्या आवारापासून जवळच काही अंतरावर १३ मेला सत्याग्रह झाला. तो पाहण्यास भुस्कुटे नुसते आवाराबाहेर गेले इतकेच नव्हे तर जेथे कलेक्टर व पोलिस सुपरिंटेंडेंट उभे होते तेथपर्यंत गेले! मला त्यांना निरुपायाने बोलावे लागले. ते रागावले पण शेवटी त्यांनी सत्याग्रहयाचे व्रत पाळण्याचे कबूल केले. मी त्यांना म्हणालो "तुम्ही कलेक्टराजवळ जाऊन उभे राहिलात. उदया कलेक्टरने जर तुम्हांस विचारले, 'भुस्कुटे, तुम्ही युद्‌धमंडळावरील एक जबाबदार सभासद आहात; तुम्ही अटकेच्या जागेच्या बाहेर कसे आलात' तर तुम्ही त्यास काय उत्तर दयाल? आणि तुम्ही काहीही खारट तुरट उत्तर दिलेत तरी युद्‌धमंडळाला लाजेने मान खाली घालावी लागेल की नाही? आपण आता

सत्याग्रहचाचे व्रत घेतले आहे. आपणांस त्या व्रताच्या चौकटीतच वागले पाहिजे." त्यानंतर भुस्कुटे कधीही बाहेर गेल्याचे मला स्मरत नाही.

बाहेरून आमच्या जागेत कोणीही येऊन आम्हांस भेटावे अशी परवानगी होती. त्यामुळे छावणीतील जबाबदार माणसे आम्हांस भेटून आमचा सल्ला घेत असत असे असूनही आमच्यातील काही वयस्क माणसांना छावणीत जाऊन येण्याचा मोह आवरता येत नव्हता. एकदोन दिवस आम्हांस पिण्याचे पाणीही भरपूर मिळत नव्हते. मग स्नानाचे तर बोलावयासच नको. आमच्या आवारात एक झऱ्यासारखे चौकोनी कुंड होते. त्यांतून थोडे थोडे पाणी मिळे. त्यामुळे बाहेर जाऊन येण्याचा मोह अनेकांना अनावर होई. पण हालअपेष्टांमध्ये व्रतस्थ राहण्यातच माणसाचे मोठेपण असते.

बहुधा १४ मेला, काही स्वयंसेवकांना बेशुद्ध होईपर्यंत मार मिळाला तेव्हा त्यांना भेटण्यास, आमच्यातील काही माणसे छावणीत गेली. छावणीत प्रथमोपचाराची सोय होती. व जवळपासचे डॉक्टर सर्व तऱ्हेची मदत देण्यास सज्ज होते. तथापि आमच्यातील जी माणसे तेथे गेली त्यांचा स्वार्थ असा कांहीच नव्हता. जरूर पडल्यास आपले साहाय्य व्हावे एवढाच त्यांचा हेतु होता. बेशुद्ध झालेल्या स्वयंसेवकांपैकी कोणीही दगावले नाहीत.

शिरोडचात अत्यंत संस्मरणीय सत्याग्रह झाला तो बहुधा १४ मे बुधवार रोजी. या दिवशी महाराष्ट्रीय लढ्याचे कौशल्य श्री. श्रीपादराव कुळकर्णी यांनी दाखविले. स्वयंसेवकांना यश येऊ दचावयाचे नाही असा सरकारी अधिकाऱ्यांचा निर्धार तर यश मिळवावयाचेच असा स्वयंसेवकांचा ह्या दिवशी निश्चय होता. मुख्य मिठागरांच्या वाटांवर पोलिसांची मोठी संख्या उभी होती. श्री. श्रीपादरावांनी स्वयंसेवकांच्या फळीचे तीन विभाग केले. मध्यवर्ती विभागाने पोलिसांच्या फळीकडे समोर जावयाचे व पोलिस त्या विभागावर लाठीहल्ला करण्यात गुंतल्याबरोबर उभय बाजूंच्या विभागांनी उभय बाजूंच्या मिठागरांवर वायुवेगाने तुटून पडून क्षणार्धात शक्य तितके मीठ लुटून न्यावयाचे अशी त्यांची योजना होती.

मिठाचा एक कण उचलू देणार नाही अशी पोलिसांची प्रतिज्ञा होती तर आज प्राण पणास लावूनही मीठ लुटूच अशी स्वयंवसेवकांची प्रतिज्ञा होती. पोलिसांना व त्यांच्या अधिकाऱ्यांना श्रीपादरावांच्या योजनेची कल्पना आली नाही. झगडा अटीतटीचा होता. हजारो लोक तो पाहण्यास आजुबाजूला जमले होते. आम्ही आमच्या आवारातून हे सर्व पाहू शकत होतो.

स्वयंसेवकांच्या तुकडचा छावणीकडून आल्या. समोर पोलीस उभे होते, बंदुकधारी पोलिसही सज्ज ठेवले होते. अपेक्षेप्रमाणे सर्व गोष्टी घडल्या. स्वयंसेवकांचा मधला विभाग समोर पोलिसांच्या फळीकडे गेला; पोलिसांनी

एकवटून त्या विभागावर लाठीहल्ला केला; त्यात पोलिस गुंतल्याबरोबर स्वयंसेवकफळीपैकी उभय बाजूंचे जथे विद्युतवेगाने उभय दिशांना असणाऱ्या मिठागरांवर तुटून पडले; मिठागरांची कुंपणे त्यांनी एका क्षणात मोडली; ती मोडल्याचा आवाज वीज कडकडावी तसा झाला व प्रत्येक स्वयंसेवकाने आपल्या मुठीत राहू शकेल इतके मीठ लुटून छावणीत नेले.

पोलिस पराजित झाले, खवळले व त्यांनी स्वयंसेवकांवरील लाठीहल्ला अमानुष केला. ह्या दिवशीच्या सत्याग्रहाला मिळवून दिलेल्या यशाचे योजनात्मक श्रेय श्री. श्रीपादराव कुलकर्णी यांनाच होते. शिवाय बाजूच्या मिठागरावर विद्युत्प्रहार करण्यातही ते अग्रेसर होते. ह्या सर्वांवर पोलिसांनी लाठ्या चालविल्या पण कोणीही आपल्या मुठींतील मीठ खाली टाकले नाही.

विजय अपूर्व मिळाला पण पोलिसांच्या अमानुष वर्तनामुळे शिरोड्यांतील जनता प्रक्षुब्ध झाली व १, २ दिवसांमध्ये पोलिसांचा सूड घेण्याच्या कल्पना तिच्या अंतःकरणात उसळू लागल्या.

खानदेशातील श्री. ना. म. गोखले त्यावेळेस शिरोड्याच्या छावणीचे प्रमुख होते. श्री. श्रीपादराव कुळकर्ण्यांच्या योजनेत तेही सामील होते. १६ मेला आणखी एक पण प्रचंड सत्याग्रह करून पोलिसांची खोड मोडण्याचा विचार त्यांच्या मनात वावरू लागला. लोकांचे त्यांना प्रोत्साहन होतेच.

इकडे अटकेच्या जागेत ही वार्ता ऐकून मी व श्री. जावडेकर अस्वस्थ झालो. कारण सत्याग्रहाला हिंसक स्वरूप येण्याची भीति होती. श्री. जावडेकरांनी गोखल्यांना बोलावून घेतले. पण ते जावडेकरांचे काहीच ऐकावयास तयार नव्हते व त्यांच्या मनाने घेतलेल्या निर्णयापासून ते परावृत्त होईनात. सत्याग्रहाची व्रते आतापर्यंत शक्य तितकी पाळून शिरोड्यांत मिळविलेल्या यशाला काळिमा फासला जाणार अशी चिंता निर्माण झाली. मला बाजूस नेऊन जावडेकर म्हणाले, "आतां काय करावयाचे?" मी उत्तरलो, "तुम्ही, मी व गोखले मागील शेतात एकांतात बसू. येथे अनेकांच्या देखत वाटाघाटी नकोत. पाहू या आपल्याला काही करता येते का."

आम्ही शेतात बाजूस एका झाडाखाली बसलो. ज्या विश्वशक्तीचा पूर्वी मला अनेक वेळा उपयोग झाला होता तिचे मला स्मरण झाले व मी ते अंतःकरणपूर्व केले आणि मग श्री. गोखल्यांशी बोलण्यास प्रारंभ केला. त्यांनी व श्रीपादरावांनी मिळविलेल्या अप्रतिम यशाचा उल्लेख करून मी त्यांना म्हणालो, "तुमच्या ह्या यशामुळे तुम्ही सेनापति पदवीस पात्र झालेले आहात. तुम्ही त्या जबाबदारीने सर्व घटनांचा विचार करावयाचा आहे. गावातील लोक खवळलेले आहेत. तुम्ही पुनः सत्याग्रह केलात तर, तुमची इच्छा असो वा नसो, लोक हिंसक मार्गाने जाणार हे स्पष्ट दिसत आहे. आणि तसे झाले तर तुमच्याच ह्या

अद्‌वितीय यशाला काळिमा लागणार आहे. ह्याचा पुनः पुनः विचार करा." यावर ते उत्तरले, "तुमची भीति खरी आहे व माझे मन द्विधा झाले आहे. आम्ही सत्याग्रह्याच्या व्रताप्रमाणे वागू पण गावातील लोक तसेच वागतील अशी मलाही खात्री नाही." यानंतर मी त्यांना सांगितले "तुम्ही इतका खोल विचार करू शकता ह्याचा मला आनंद होतो. सेनापति ह्या नात्याने तुम्ही स्वयंसेवकांना हुकूम दयावयाचे आहेत. त्याचप्रमाणे तुमच्या वरिष्ठांचे हुकूम तुम्हीही पाळावयाचे आहेत. वेळ घालविण्यास आता अवधि नाही. त्वरित निर्णय घेतले पाहिजेत. शिरोडयाच्या सत्याग्रहाच्या यशाची तात्कालिक जबाबदारी युद्दमंडळाच्या आम्हा पहिल्या पाच सभासदांची आहे. कारण मूळ आखणी करून तिच्याप्रमाणे सर्व कार्य शेवटपर्यंत होत आहे की नाही हे पाहता येईल तो पर्यंत पाहाण्याची नैतिक जबाबदारी आमची आहे. बाकीचे चार सभासद सल्लामसलतीस तुम्हास उपलब्ध नाहीत. म्हणून पहिल्या पाचांपैकी एक सभासद जो तुम्हास उपलब्ध आहे तो मी केवळ कर्तव्यबुद्धीने, तुम्हास आज्ञा करतो की, तुम्ही पुढे सत्याग्रह चालू ठेवू नये व मिळालेल्या दैदीप्यमान यशाला उणेपणा आणण्याची संधि कोणास देऊ नये. उदया सत्याग्रहात हिंसक मार्ग अवलंबिला गेला तर सरकारला अत्यानंद होईल, त्याला अशी संधि पाहिजेच आहे. आपल्या उज्ज्वल कामगिरीवर बोळा फिरविण्याची संधि सरकारला देऊ नका."

गोखले फार आग्रही आहेत असे मला अनेकांनी सांगितले होते. पण त्यांनी माझे सर्व म्हणणे पटवून घेतले व पुढील आपले सर्व बेत रहित केले. मी व जावडेकरांनी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद दिले. विश्वशक्तीबद्दल मला फार कृतज्ञता वाटली हे सांगावयास नकोच. गोखल्यांचे मन वळविण्यात मला यश आले नसते तर उभयपक्षी रक्तपात होउन राष्ट्राने अंगीकारलेल्या सत्याग्रहाच्या तत्त्वाला कमीपणा येऊन मिळविलेल्या जयाचे रूपांतर अपजयात होणार होते. उपचार-शास्त्रात यशापयशाचे क्षण जसे महत्त्वाचे असतात तसेच राष्ट्राच्या जीवनातही असतात. एका क्षणाच्या दिरंगाईकरता अथवा प्रमादाकरता अर्थाचे अनर्थ आणि एका क्षणाच्या औचित्यामुळे अनर्थाचे अर्थ झाल्याचे इतिहासात दाखले आहेत. गोखल्यांच्या निश्चयपरिवर्तनाचा क्षण अशाच मोलाचा होता. त्या क्षणाचे यश माझ्या पदरी पडले याचे मला नित्य समाधान वाटते.

शिरोडयाच्या सत्याग्रहाच्या काळात रत्नागिरी जिल्ह्याचे कलेक्टर सेमिंग्टन नावाचे एक तरुण गृहस्थ होते. आम्हास अटक झाल्यावर ज्या कस्टम हाऊसमध्ये आम्ही होतो तेथे सेमिंग्टन आम्हास भेटावयास १, २ वेळा आले होते. आमच्या जागेत १, २ खुर्च्या होत्या. आमची माणसे पत्रे वगैरे लिहिताना त्या खुर्च्यांचा उपयोग करीत असत. पण सेमिंग्टन आले असता सामान्य शिष्टाचार म्हणूनही आमची माणसे त्यांना खुर्चीवर बसा असे म्हणत नसत उलट स्वतः

खुर्चीवर बसून त्यांच्याशी बोलत असत. बहुधा ह्या अशिष्ट वागणुकीची प्रतिक्रिया म्हणून, सेमिंग्टननी मला व डॉ. लागूंना त्यांच्या बंगल्यावर काही चर्चा करावयाची आहे असे कळवून बोलावून घेतले. आता येतील मग येतील असे सांगून त्यांच्या माणसांनी आम्हास तेथे एका कट्टयावर बराच वेळ बसवून घेतले. शेवटी ते आले नाहीतच व आम्ही परत आमच्या जागेकडे आलो.

सर्व सत्याग्रही कैदी वेंगुर्ल्यास होते. १७ मेला आम्हास शिरोड्यांतून हालविले. पोलिसांच्या अत्याचारांमुळे लोकांनी सरकारी अधिकाऱ्यांना अन्न, धान्य, वाहन, काहीच मिळू नये अशी योजना केली होती. त्याचा सूड अधिकारी आमच्यावर घेत होते. शिरोड्याच्या आमच्या अटकेनंतरच्या पाच दिवसांच्या काळात आमचे अन्नपाण्याबाबत हाल तर झालेच होते पण आता वेंगुर्ल्याकडे आम्हास नेताना आम्हास १०, १२ मैल चालत जावयास लावण्याचा अधिकाऱ्यांचा बेत होता. आम्ही सर्वांनी प्रथम पायी जाण्याचे नाकारले. शेवटी काही अंतर पायी व काही अंतर मोटारीतून आम्हास नेण्यात आले. वेंगुर्ल्यापर्यंतच्या ह्या प्रवासात पोलिस सुपरिंटेंडेंटशी आमचे शाब्दिक खटके वरचेवर उडत होते.

वेंगुर्ल्याच्या लॉकपमध्ये अथवा कैदखान्यात आम्ही १७ तारखेस रात्रभर होतो. त्याच्या दुसऱ्या दिवशी दुपारी आगबोटीतून आमची रवानगी रत्नागिरीस झाली. वेंगुर्ल्यातील आगबोटीच्या धक्क्यावर कीर्तनकर दत्तोपंत पटवर्धनांचे एक शिष्य शिरसाट एका तरुण विधवेसह भेटले. तिचा पुनर्विवाह जुळवून देणार आहे. तुमची सर्वांची सहानुभूति ह्या कार्यास असावी असे ते मला व जावडेकरांना म्हणाले. आमची आगबोट १८ मेला रात्री रत्नागिरीस पोहोचली.

आयुष्यांत ह्या प्रथमच सत्याग्रहाच्या पूर्वतयारीच्या काळांत व अटकेनंतर रत्नागिरीस आणलो जात असताना, असा माझा समुद्रप्रवास झाला. पण ह्या एकंदर तिन्ही चारी प्रसंगी आगबोटीचा मला फार त्रास झाला. आंतडी तुटून पडतील की काय असे वाटण्याइतक्या ओकाऱ्या होत होत्या.

आम्ही १८ मेला जरी रत्नागिरीच्या तुरुंगात आलो तरी केस चालून शिक्षा लागण्यात एक महिना गेला. तथापि आमचे कारागृही जीवन १८ मेला सुरू झाले असे समजण्यास हरकत नाही.

पण कारावासाची माहिती सांगण्यास प्रारंभ करण्यापूर्वी शिरोडा सत्याग्रहाच्या समाप्तीनंतर पुढील कार्याबाबत कायदेभंगमंडळाची काय योजना होती हे येथे नमूद करतो. शिरोड्यास सत्याग्रहाकरता गेलेले पण अटक न झालेले आणि आपआपल्या जिल्ह्यांत काम करीत राहिलेले असे जे अनेक कार्यकर्ते व स्वयंसेवक मोकळे होते त्यांना स्वदेशी, बहिष्कार, इ. चळवळींमध्ये गुंतवावे असा

कायदेभंगमंडळाचा विचार होता. त्याचप्रमाणे जंगलसत्याग्रह करावयाचा असे ठरवून त्याकरता मंडळाने एक कमिटी नेमली.

शिरोड्याचा सत्याग्रह १५ मेनंतर चालू राहू नये असे आम्ही मंडळाच्या कचेरीस कळविले होते. ते का कळविले असेल हे पूर्वीच्या माहितीवरून वाचकांच्या ध्यानात येणे कठीण नाही. शिवाय पावसाळा जवळ आला होता हेही कारण ध्यानात घेण्यासारखे होते. ह्या सर्व कारणांचा विचार करून मंडळाने निर्णय घेतला की मिठाचा सत्याग्रह २२ मे नंतर कोठेच चालू राहू नये. शिरोड्यात तर १५ मेनंतर तो बंद ठेवलाच होता.

प्र २७२/१



# शंकर दत्तात्रेय देव

जन्म : २८ जाने. १८९५, मृत्यू : ३० डिसेंबर, १९७४.

**महाराष्ट्रातील थोर काँग्रेस कार्यकर्ते आणि गांधीवादी नेते.**

जन्म भोर जिल्हा पुणे येथे. वडील आचाऱ्याचा धंदा करीत. प्राथमिक शिक्षण भोर येथे. माध्यमिक व उच्च शिक्षण पुणे, बडोदे आणि मुंबई येथे. १९१८ साली बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण. त्यानंतर म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीत पडले. नंतर म. गांधींचा परिचय. १९२३ साली मुळशी सत्याग्रहात भाग आणि कारावास. त्यानंतर मिठाच्या सत्याग्रहात भाग–कारावास. त्यानंतर महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समिती सुरू केली. 'स्वराज्य'मध्ये राज- द्रोहात्मक लिखाण केल्याबद्दल दीड वर्षाचा कारावास. १९३० मध्ये महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष. १९३६ मध्ये कार्यकारिणीचे सभासद. फैजपूर काँग्रेस अधिवेशनात स्वागताध्यक्ष. १९४६ ते ५० अ. भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस. त्यानंतर संविधान समितीचे सदस्य, हंगामी संसद सदस्य, काँग्रेस निवडणुक मंडळाचे सदस्य, गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

१९५० साली काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक हरल्यावर ते विनोबांच्या भूदान चळवळीत सामील. त्यानंतर त्यांनी जवळ जवळ राजकारण संन्यास घेतला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे त्यांनी काही काळ नेतृत्व केले. त्यांच्या मताने या चळवळीस हिंसक स्वरूप प्राप्त होताच ते या चळवळीपासून दूर झाले. विपुल स्फूटलेखन, नवभारत मासिक, स्वराज्य साप्ताहिक आणि लोकशक्ती दैनिक ही नियतकालिके त्यांनीच सुरू केली. पुण्यात समाजप्रबोधन संस्था आणि समाजप्रबोधन पत्रिका द्वैमासिक त्यांच्याच प्रेरणेने सुरू झाले.

अखेरचा काळ त्यांनी सासवड येथील सर्वोदय आश्रमात घालवला.

हा उतारा त्यांचे 'दैव देते पण कर्म नेते' या आत्मवृत्तातून सादर करण्यात आला आहे.

# 'स्वराज्य' पत्र व तुरुंगवास

शंकरराव देव

गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणे प्रांतिक काँग्रेस कमिटी फेरवाल्यांच्या हवाली करून आम्ही दैनंदिन राजकारणाचा संन्यास घेतला, तेव्हा महाराष्ट्रातील नाफेरवाल्या पक्षांतील जुन्या व नव्या मंडळींच्या वाटा निरनिराळ्या झाल्या व दोघांच्या दृष्टीतील व धोरणांतील भेद लोकांच्या लक्षात येण्याला अवसर मिळाला. त्यानंतर जेव्हा मी श्री. भुस्कुटे व श्री. हरोलीकर यांच्या सहकार्याने 'स्वराज्य'पत्र ताब्यात घेतले तेव्हा आमचे म्हणणे काय आहे हे स्वतंत्रपणे लोकांपुढे मांडण्याला आम्हाला साधन मिळाले. टिळक पुण्यातिथीच्या निमित्तानें झालेल्या संमेलनात श्री. तात्यासाहेब केळकर व मी यांच्यामध्ये जो समेट झाला त्याने नवीन मंडळींच्या स्वतंत्र अस्तित्वावर आणि नीति व धोरण ठरविण्याच्या बाबतीत आमच्या स्वातंत्र्यावर, अभिक्रमाच्या शक्तीवर अथवा क्षमतेवर एक प्रकारे शिक्कामोर्तबच झाले असे म्हणावयास हरकत नाही. नाफेरवाल्या पक्षातील जुन्या नेतृत्वाचा अस्त होऊन नव्या नेतृत्वाचा उदय झाल्याची ही साक्ष होती. ही गोष्ट घडून येण्याला आणखीही एक महत्त्वाची घटना कारण झाली होती.

चंपारण्यातून परत आल्यावर 'लोकसंग्रहा'त काम करावयाला सुरुवात केली अशा रितीने मी पुण्याचा रहिवासी झालो. तेव्हापासून पुण्यात मुक्काम असे तेव्हा पुण्यातील अनेक इतर स्त्री-पुरुषांप्रमाणे बहुधा रोज सकाळी मी पर्वतीला फिरावयाला जात असे. त्या वेळची पर्वती आजच्या पुणे शहराच्या दाट वस्तीचा एक विभाग नव्हती. त्या वेळी सदाशिव पेठेतून पर्वतीकडे जावयाला निघाले की भिकारदास मारुती व शुक्रवार पेठेतून गेले तर पंचहौद मिशन ही पुण्याची शेवटची वस्ती होती. त्या नंतर कॅनाल येईपर्यंत निर्जन होते. वाट रुंद होती पण वाहन जाण्याला योग्य अशी नव्हती. वाटेत डाव्या बाजूला तळ्यातला गणपती व त्याच्याचसमोर उजव्या बाजूला एक भुताटकीचा ओसाड बंगला होता. पेशवेबाग अथवा तळ्यातल्या गणपतीचा आजचा पेशवाई थाट यांपैकी काहीही त्या वेळी तेथे नव्हते. तिन्हीसांजेनंतर किंवा सकाळी प्रकाश होण्यापूर्वी त्या रस्त्याने जाण्याला थोडी भीतिच वाटावयाची. पर्वतीच्या अगदी पायथ्याशी गेल्यावर

दहा-पाच साधारण लहान घरांची छोटीशी वस्ती होती. कॅनालवरून पार होताना दोन्ही बाजूंच्या पत्र्यांच्या भिंतीवरून हातांतील छडी फिरवीत तड्तड् आवाज करीत जाणे हा फिरायला आलेल्या मंडळींच्या करमणुकीचा खेळ होता.

पर्वतीवरून परत येताना श्री. हरिभाऊ तुळपुळे यांचा वाडा लागे. प्रशस्त अंगण व ओसरीवर मोठा झोपाळा होता. तेथे भाऊसाहेब, श्री. वासूकाका जोशी, मी,कधी कधी श्री. गणेशशास्त्री जोशी वैदय वगैरे मंडळी यांची बैठक व्हावयाची व प्रत्येकाच्या रुचीप्रमाणे अथवा नियमाप्रमाणे चहा किंवा दूध घेत घेत देशाच्या आणि प्रांताच्या राजकारणाच्या गप्पा व पुण्यातील किंवा महाराष्ट्रातील कामकाजाच्या योजना ठरावयाच्या. पुढे पुढे पुष्कळ दिवस सायंकाळी तुळशी-बागेच्या पाठी मागच्या दारी असलेल्या शास्त्रीबुवांच्या घरातील माडीवर ही बैठक व्हावयाची. शास्त्रीबुवा तसे व्यवहारी पण हौशी वृत्तीचे होते व जमलेल्या मित्रमंडळीचे आतिथ्य करण्यांत त्यांना आनंद वाटे. निरनिराळ्या ऋतूंतील फळे व अन्य फराळाचे सामान मंडळींच्या चर्चेत गोड किंवा तिखट रस भरण्याला पुष्कळ वेळा मदत करी. पुणे शहर कॉंग्रेस कमिटीचे दप्तरही शास्त्रीबुवांच्या घरीच असे. आम्ही "स्वराज्य" पत्र विकत घेतल्यानंतर काही काळ छापखाना व स्वराज्यपत्राची कचेरी अण्णासाहेबांच्या घरीच होती. त्यामुळे आम्हाला शास्त्रीबुवांचे घरही जवळ व सोयीचे होते. पण पुढे 'स्वराज्या'चा छापखाना व कचेरी शनीच्या पाराकडून नागनाथाच्या पाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर गेली, तेव्हापासून आमची बैठक साहजिकच 'स्वराज्या'च्या कचेरीत होऊ लागली. ही जागा शंकरराव जावडेकर जेथे राहात तेथून टिळक महाविदयालयाला जाण्याच्या त्यांच्या रस्त्यावर असल्यामुळे शंकररावांनाही ती अधिक सोयीची होती. आम्हा मंडळीच्या मैफली 'स्वराज्य' कचेरीत झडू लागल्या. अशा रितीने भौगोलिक अंतराने जुन्या-नव्यांमधील मानसिक अंतरही वाढविले. एक प्रकारे जे घडणे अपरिहार्यच होते ते सहज घडत गेले.

निष्ठा, निरलसता, एकाग्रता व चिकाटीचे प्रयत्न यामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थिति व सर्व प्रकरचे अल्प भांडवल अशी स्थिति असूनही या सहा-सात वर्षांत माझ्या शारीरिक व विशेषत: मानसिक शक्तीला स्वत:च्या बुद्धीच्या प्रेरणेप्रमाणे राबविण्याला अनुकूल असे क्षेत्र व वातावरण महाराष्ट्रात निर्माण झाले होते. 'स्वराज्या' सारखे गांधीजींच्या व त्यांच्या कॉंग्रेसच्या विचारांचे आणि धोरणाचे मुख्य पत्र म्हणून सबंध महाराष्ट्रात प्रांतीय मान्यता पावलेले पत्र मला माझे विचार व मते मराठी जनतेपुढे अनियंत्रितपणे मांडण्याला साधन म्हणून लाभले, तसेच या कालखंडाच्या अखेर अखेर श्री. शंकरराव जावडेकरांसारखे विचाराने निकट असेलेले व संपूर्ण जाणिवेने व सहानुभूतीने माझ्या कार्याचे मोजमाप करणारे स्नेही व सहकारी मला लाभले. लवकरच

आचार्य भागवत आम्हाला येऊन मिळाले आणि मागे म्हटल्याप्रमारे विचाराच्या व आचाराच्या क्षेत्रात प्रांतीय पातळीवर आमची एक त्रिमूर्ति बनली. आमच्या पुढे जे साध्य होते ते सिद्ध करण्यासाठी स्वतःच्या प्रकृतीप्रमाणे आमच्यापैकी प्रत्येकाची भूमिका व कार्य काय होते याबद्दल आम्हा दोघांमध्ये संपूर्ण एकोपा होता व त्या दृष्टीने परस्परांशी संपूर्ण सहयोग होता. याशिवाय जसजशी कार्याची व्याप्ति व खोली वाढत गेली तसतशी अखिल महाराष्ट्रात राजकीय व विधायक अशा दोन्ही क्षेत्रात नव्यांतील जे जुने होते त्यांचा स्नेह व सहकार्य वाढत गेली व त्याचबरोबर आणखी नवीन कार्यकर्ते लाभत गेले. माझ्या सार्वजनिक जीवनाचा प्रत्यक्ष प्रारंभच गांधीजींच्या मदतीने त्यांचा एक स्वयंसेवक म्हणून बिहारमध्ये झाला. यामुळे व असहकार युगाच्या प्रारंभीच्या दोन तीन वर्षांच्या कालावधीत काँग्रेसमध्ये काम करण्याची मला जी संधी मिळाली तीमुळे महाराष्ट्राच्या बाहेरही अखिल भारतीय प्रतिष्ठेचे व कीर्तीचे बाबू राजेन्द्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, श्री. राजगोपालाचार्य अशांसारख्या पुढाऱ्यांशी माझा जवळचा संबंध आला व त्यांचे साहाय्य मला मिळाले. या सर्वांच्या सहकार्याचा स्वाभाविक असा परिणाम झाला की, सार्वजनिक जीवनात माझे बोलणे, लिहिणे, स्वतंत्र बुद्धीने पण जबाबदारीच्या जाणिवेने होऊ लागले. अशी ही जी परिस्थिती निर्माण झाली तिचे श्रेय परिस्थितीला किती व पुरुषार्थाला किती हा प्रश्न सदा अनिर्णितच राहील.

पहिल्या जागतिक युद्धाच्या अंती ब्रिटनने केलेल्या वचनभंगातून खिलाफतीचा प्रश्न निर्माण झाला. तुर्कस्थानच्या कमालपाशाने व अरबस्तानच्या इब्न सौदने या प्रश्नाचा अंत एका तऱ्हेने केला, तर हिंदी मुसलमानांनी त्याचा अंत दुसऱ्या एका रितीने केला. खिलाफतीच्या प्रश्नावरून गांधीजींच्या नेतृत्वाखाली अल्पकाळ या देशात जी हिंदूमुसलमानांची एकी झाली होती तिचे रूपांतर खिलाफतीच्या चळवळीची पहिली लाट ओसरल्यानंतर हळूहळू दोन जमातीच्या वैमनस्यात व बेकीत होत गेले.

१९२७ साली भारतात हिंदू-मुसलमानातील वैमनस्याचा डोंब पेटला व त्याची झड महाराष्ट्रालाही लागली. या सालच्या गणपती-विसर्जनाच्या वेळी सोलापुरात हिंदू व मुसलमान या जमातींत दंगा झाला. तळेगाव दाभाडे येथेही काही क्षुल्लक कारणावरून या दोन जमातींत दंगा उद्भवला. हिंदुस्थानात होणाऱ्या या दोन जमातींतील दंग्याचे सर्वतोपरी कारण इंग्रजांची "फोडा व झोडा" ही दुष्ट नीती आहे हा एकांगी विचार, आता स्वातंत्र्योत्तर कालात या बाबतीत जो कटु अनुभव येत आहे त्याने पुष्कळच सौम्य झाला आहे; पण त्या वेळी या दंग्यांना परकीय सरकारची ही दुष्ट नीती किती प्रमाणात जबाबदार आहे या बाबतीत मतभेद असला तरी एका गोष्टीच्या बाबतीत सर्वांचे विशेषतः

राजकीय विषयांच्या अभ्यासूंचे व त्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे एकमत होते. ती म्हणजे परकीय सरकार या दुष्ट नीतीचा उपयोग करणार नाही तर हा प्रश्न निराळ्या रितीने सुटू शकेल.

साहजिकच या विषयावर माझी निर्भिड मते मी स्वराज्यांतील लेखांतून मांडीत होतो. लेखांमधून सरकारची या बाबतींतील नीती व धोरण यांवर कडकडून टीका केलेली असे. मे मध्ये 'युद्ध जाहीर करा' हा लेख मी लिहिला. सप्टेंबर १५ च्या स्वराज्यात 'निदान धर्मयुद्ध करा' हा माझा लेख प्रसिद्ध झाला. या लेखावर महाभारतांतील :–

अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिप:।*
स संहत्य निहन्तव्य: श्वेव सोन्माद आतुर:॥

हे वचन उद्धृत केले होते व ते श्री शंकरराव जावडेकरांनी मला सुचविले होते. या कालात "स्वराज्या"त लिहावयाच्या लेखाबद्दल त्यांच्या-माझ्यामध्ये बहुधा अगोदर चर्चा होत असे. मला आठवते, ज्या दिवशी मी हा लेख लिहिला त्या दिवशी जावडेकर टिळक महाविदयालयांत आपल्या कामाला जात असताना वर आले व हे वचन मला देऊन पुढे महाविदयालयात गेले.

याच वेळी देशापुढे, विशेषत: काँग्रेसपुढे, आणखी एक जितका महत्त्वाचा तितकाच नाजूक विषय निर्णयासाठी वाढून आला आणि तो म्हणजे सायमन कमिशनच्या बाबतीत धोरण ठरविण्याचा. विशिष्ट कालाची मुदत संपल्यानंतर दिलेल्या सुधारणांचा कसा उपयोग केला याची तपासणी करून हप्त्याहप्त्यांनी सुधारणा देण्याची परकीय सरकारची नीती व धोरण कालहरण करणारे अतएव दिरंगाईचे होते. इतकेच नव्हे तर ती राष्ट्राचा अपमान करणारी रीत होती. कोणत्याही लोकांचा स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क आहे अशी लोकमान्यांनी जी फार वर्षांपूर्वी घोषणा केली होती, तिची ही निव्वळ हेटाळणी होती. त्यानंतर भारताने स्वराज्य मार्गावर पुष्कळ प्रगति केली होती. विशेषत: गांधीजींनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सुरू केलेल्या असहकारितेच्या युद्धानंतर परकीय सरकारची ही हप्त्याहप्त्यांनी स्वराज्य देण्याची नीती राष्ट्राला मान्य होणे कदापि शक्य नव्हते. जावडेकर व मी दोघे संपूर्ण स्वातंत्र्यवादी बनलो होतो. १९२७ सालचे काँग्रेसचे अधिवेशन मद्रासला भरणार होते. काँग्रेसक्रीड (ध्येय) मधील "स्वराज्य संपादन करणे" हे शब्द काढून "स्वराज्य स्थापन करणे" असे शब्द घालावेत अशी सूचना मी काँग्रेसकडे पाठविली. त्याचप्रमाणे सायमन

---

* अर्थ :– मी तुमचा रक्षणकर्ता आहे असे प्रजेला सांगून जो राजा तिचे रक्षण करीत नाही त्याला पिसाळलेल्या व अंगावर धांवून येणाऱ्या कुत्र्याप्रमाणे ठार मारले पाहिजे.

कमिशनवर भारताने बहिष्कार टाकावा असा जोराचा प्रचार मी माझ्या भाषणांतून व 'स्वराज्या'तून सुरू केला.

'निदान धर्मयुद्ध करा' हा लेख स्वराज्यात प्रकाशित झाल्यानंतर थोडयाच दिवसांनी आमच्यावर सरकार लवकरच खटला भरणार आहे या अफवा चोहोकडे उठल्या. या अफवा नसून निश्चित गोष्ट आहे हे समजावयाला त्यांनतर आम्हाला फार दिवस लागले नाहीत. कारण कोणत्याही गटात बिभीषण असतातच. डिसेंबरच्या २ तारखेला तिसरे प्रहरी 'स्वराज्य' कचेरीत मला व श्री. हरोलीकर यांना पकडण्यात आले. 'स्वराज्य' कचेरीतून आम्हाला प्रथम फरासखान्यात नेण्यात आले व तेथून खडकावरच्या लॉकअपमध्ये (कच्चा तुरुंग) दोघाना ठेवण्यात आले. यापूर्वी मुळशी सत्याग्रहात मला अल्प मुदतीचा दोनदा कारागृहवास भोगावा लागला होता पण फरासखाना किंवा कच्च्या तुरुंगाचा अनुभव मलाही हा प्रथमच होता. कारण दोन्ही वेळा शिक्षा व सरळ येरवडा अशी घटना घडली होती. येरवडा तुरुंग मध्यवर्ती तुरुंग होता. तेथील स्वच्छता, टापटीप, व्यवस्था एक प्रकारे आदर्श होती. येरवडयाच्या तुलनेने खडकावरचा कच्चा तुरुंग त्या वेळी तरी नरकच होता असे म्हणावयाला हरकत नाही. आम्हा दोघांना एकाच खोलीत ठेवण्यात आले. लघवीसाठी एक मोठा टिनचा डबा ठेवला होता. डबा, खोली, तरट, घोंगडया, सर्वांवरच घाणेरडेपणाची अवकळा होती. सुदैवाने आमच्या जेवणासाठी जोश्यांच्या घरून डबा येत असे. मला वाटते, त्या कच्च्या तुरुंगात आम्ही आठ दिवस काढले. नंतर ज्या मॅजिस्ट्रेटपुढे आमचा खटला चालला त्याने तो सेशन कमिट केला. खटल्याच्या वेळी काही मित्रमंडळी व काही परिचित मंडळी हजर होती; पण मॅजिस्ट्रेटने आम्हाला सेशन कमिट करण्याला फारसा वेळ घेतला नाही. कोर्टांतून सरळ आम्हाला येरवडयाच्या तुरुंगातील अंधेरीमध्ये नेण्यात आले व दोघांना निरनिराळ्या पण शेजारच्या खोल्यात बंद करण्यात आले. अंधेरी माझ्या चांगल्या परिचयाची होती, इतकेच नव्हे तर प्रिय होती. येरवडयातं युरोपियन वॉर्डाच्या खालोखाल, स्वच्छता, हवा, प्रकाश वगैरे सर्व दृष्टींनी अंधेरी उत्तम जागा होती, या बाबतीत सर्वांचे एकमत होते. अर्थात् आम्ही कच्चे कैदी असल्यामुळे कपडे व काम या दोन बाबतीत आम्ही मुक्त होतो. बाकी आमची सर्व व्यवस्था सर्वसाधारण 'क' वर्गातील कैदयांप्रमाणे होती. त्या वेळी राजकीय कैदी असा तुरुंगात स्वतंत्र वर्ग नव्हता हे सांगावयास नकोच. तुरुंगात कोणीही सर्वसाधारण कैदी आला की, जशी झाडावरच्या पक्षांत एखादा पक्षी आला की किलबिल सुरू होते त्याप्रमाणे कैदयांत एक प्रकारची किलबिल सुरू होते. प्रत्येकाला नवीन सोबत्याची माहिती मिळविण्याची उत्कंठा असते. मग आम्ही तर विशेष प्रकारचे कैदी! आमच्या विशेषपणाची व आगमनाची खबर

अंधेरीतील कैद्यांना साहजिक मिळाली. पण त्या दिवशी आम्ही येरवड्यात पोहोचलो तेव्हा सायंकाळ झाली होती व कैद्यांना आपापल्या खोल्यांतून बंद केले गेले होते. दुसऱ्या दिवशी आम्ही दोघे तेथील सर्व कैद्यांचे 'महाराज' झालो.

सेपरेट अंधेरी मधील कैदी गुन्हेगार कैद्यांपैकीच, पण त्यांतही विशेष असतात. जे आपल्या धंद्यात पटाईत व क्रूर म्हणून प्रसिद्ध आहेत, किंवा जे तुरुंगाचे वारकरी आहेत अथवा ज्यांना तुरुंगात आल्यावर निरनिराळ्या लहानमोठ्या गुन्ह्यांबद्दल लहान-मोठ्या शिक्षा झालेल्या आहेत अशा लोकांना या खोल्यांतून ठेवले जाते. पूर्वानुभवामुळे याची थोडीफार कल्पना मला होती. पण या वेळचा या बाबतीतला एक संयोग अगदी आगळाच होता. दुसऱ्या दिवशी अंधेरीतील कैदी खोल्यांबाहेर काढले जाऊन त्यांपैकी, बरेचसे आपापल्या कामावर गेल्यावर एक गृहस्थ आपल्या पायांतील बेडीचा खळखळ, खणखण असा आवाज करीत आमच्यापाशी आले व त्यांनी स्वतः होऊन विनासंकोच, इतक्या सहज रीतीने की, जणु आपण अगदी स्वाभाविक योग्य तेच करीत आहोत अशा थाटांत स्वतःचा आम्हाला परिचय करून दिला. मूर्ति बांधीव, काळीसावळी, सडपातळ व चांगली उंच रुबाबदार अशी होती. नीटस् नाक, तरतरीत डोळे व झोंकदार मिशा—थोडा पीळ घालता येईल अशा, असा एकंदरीने थाट होता! बोलणे ठसठशीत व नागरी संस्कृतीत वाढलेल्या व वावरलेल्या माणसाप्रमाणे. पायांतील बेडी, अंगावरचे कपडे अगदी स्वच्छ असे होते. पण या माणसाकडे दुसऱ्याला तात्काळ आकर्षण करणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या डोक्यावरील टोपी! तुरुंगामध्ये बहुतेक कैद्यांची टोपी निळ्या आडव्या उभ्या रेघांची पांढरी टोपी असते, ज्यांना जन्मठेपेची किंवा लांब मुदतीची शिक्षा झालेली असते त्यांची पिवळी टोपी असते. जे पुनः पुनः तुरुंगात येतात त्यांची काळी टोपी असते. पण या गृहस्थाची टोपी पिवळी, काळी व तांबडी अशा तीन रंगांची होती! याचा अर्थ हे गृहस्थ दीर्घ मुदतीचे व पुनः पुनः आपल्या घरीं परत येणारे होते एवढेच नव्हे तर त्यांच्या टोपीचा लाल रंग असे दाखवीत होता की, तुरुंगातील कडेकोट बंदोबस्ताला न जुमानता तेथील अधिकाऱ्यांच्या हातांवर तुरी देऊन तुरुंगांतून पळून जाणारे होते. एवढेच नव्हे तर ते या कलेत इतके निपुण होते की, रात्री त्यांच्या खोलीसमोर एक दिवा सतत जळत असे व एक शिपाई खास त्यांच्यावर पहारा ठेवण्यासाठी असे. ही अखेरची बाब मुंबईचे बाबू चष्मेवाले (हे या गृहस्थाचे नाव) नवागतांना मोठ्या आत्मगौरवाने कथन करीत असत! असे हे एवंगुणसंपन्न गृहस्थ अंधेरीतील कैदी व वॉर्डरांना "दादा" होते इतकेच नव्हे तर तुरुंगातील लहान-सहान अधिकारी यांना वचकून असत. साहजिकच आहे, यांच्या कर्तबगारीचा व कौशल्याचा परिणाम म्हणून पोटावर वा प्राणावर केव्हा पाय येईल किंवा फास लागेल याचा नेम नसावयाचा! मात्र पुढे अनुभवाने

आम्हाला आढळून आले की, बाबू चष्मेवाले प्रकृतीने सौम्य व इतर कैद्यांसही लहानमोठी मदत करून त्यांना उपकृत करायाला सदा तत्पर असावयाचे. आमच्याशी तर ते अखेरपर्यंत मोठ्या अदबीने तर वागलेच पण शिवाय जणु त्यांनी आम्हा दोघांना आपल्या कृपाछत्राखाली (Patronage and Protection) घेतले आहे अशी छाप कैद्यांवर व वॉर्डरवर पडेल अशी खबरदारी ते नेहमी घेत.

स्वराज्यांतील "निदान धर्मयुद्ध करा" या लेखाबद्दल आमच्यावर १२१ व १२४ (अ) अशा दोन कलमांखाली आरोप ठेवण्यात आले होते. पिनल कोडांतील १२४ (अ) कलम लोकमान्य व महात्माजी अशा थोर पुरुषांवरील त्या कलमाखाली झालेल्या खटल्यांमुळे व दीर्घ मुदतीच्या शिक्षेमुळे त्या काली प्रसिद्धी पावले होते. त्या कलमाखाली खटला होऊन शिक्षा होणे हे हिंदी देशभक्ताला वा देशसेवकाला गौरवास्पद मानले जाई. पण पि. कोडांतील १२१ हे कलम थोडे कुप्रसिद्ध व त्याच्या खाली होणाऱ्या अमानुष शिक्षेमुळे थोडे भयंकर होते. राजाविरुद्ध अप्रीती वा असंतोष पसरविणे ही एक गोष्ट होती व त्याच्या विरुद्ध बंड करून त्याच्या जिवावर उठणे ही अगदी निराळी गोष्ट होती. या कलमाखाली इस्टेट-जप्ती, फाशी, जन्मठेप अशा शिक्षा होत्या. यांपेक्षा कमी शिक्षा, इच्छा असली तरी देण्याचा अधिकार न्यायाधिशाला नव्हता. अर्थात् माझ्या बाबतीत इस्टेटजप्तीचा प्रश्न नव्हता. त्या वेळी देशात निडरपणे परकीय सरकारची सत्ता न मानणे (defiance) व त्याचे जे बरेवाईट परिणाम होतील ते आनंदाने भोगणे या बाबतीत एक प्रकारचे वारे किंवा वेडच पसरले होते म्हणानात! विशेषत: गांधीजींच्या अहिंसात्मक बंडाने लोकात ही वृत्ति निर्माण केली होती. साहजिकच वकिलामार्फत वा स्वत: आपला बचाव करावयाचा नाही, फक्त कोर्टाला आपली भूमिका स्पष्ट करणारे एक निवेदन सादर करावयाचे असे मी ठरविले. हा निर्णय घेण्याला मला विशेष विचार करावा लागला अथवा वेळ लागला असे मला वाटत नाही. अगदीं एक सहज गोष्ट अशा रितीने मी हे ठरविले. गांधीजींचा नमुना डोळ्यांपुढे होताच. श्री. हरोलीकरही माझ्या या निर्णयाशी सहज सहमत झाले. प्रश्न फक्त हे निवेदन तयार करण्याचा उरला. तुरुंगातील अधिकाऱ्यांनी स्वाभाविकच जरूर ती साधनसमुग्री पुरविली. हे निवेदन करण्यासाठी मी काही मोठमोठे कायद्याचे व अन्य ग्रंथ पाहिले असे मला स्मरत नाही. मात्र लोकमान्यांचा बचाव पाहावयास मिळावा अशी इच्छाही होती. कारण त्याच्या मागची हिम्मत (Spirit) अजूनही मनाला प्रेरणा देत होती आणि माझी ही इच्छा पुरी झाली.

आम्हा तरुण देशसेवकांबद्दल श्री. हरिभाऊ फाटक यांना सदैव कौतुक असावयाचे! आता तर आमच्यावर १२४ अ आणि १२१ कलमाखाली

सरकारने खटला भरलेला! आम्हाला जी काही मदत लागेल ती करावयाला हरिभाऊ अगदी उत्कंठित होते. हरिभाऊंच्याने राहावले नाही. आम्ही पोरकी पोरे आहोत, तेव्हा आमच्या बाबतीत मर्जीला येईल ते करावयाला हरकत नाही अशी सरकारची समजूत होऊ नये म्हणून एके दिवशी हरिभाऊ तात्यासाहेब केळकरांना आम्हाला भेटवण्यासाठी येरवडयाला घेऊन आले. संभाषणाच्या ओघात माझी गरज मी तात्यासाहेबांना सुचविली. तात्यासाहेब चटकन समजले. ज्या भागामध्ये टिळकांचा बचाव छापला होता तो भाग त्यांनी मला पाठवून दिला. मी माझे निवेदन तयार केले व मी आणि हरोलीकरांनी त्याच्यावर शेवटचा हात फिरविला. आम्ही बचाव दयावा म्हणून वडील व बरोबरीच्या मंडळींनी आमची मने वळविण्याचा साहजिकच पुष्कळ प्रयत्न केला. १२४ कलमाची त्यांना चिंता वाटत नव्हती पण १२१ कलमाखाली होणाऱ्या शिक्षेच्या भयंकर स्वरूपामुळे आम्ही आमचा बचाव करावा असे त्यांना वाटत होतें. पण माझा स्वभाव अगोदरच ज्याला हट्टीही म्हणता येईल असा आग्रही व शिवाय तो प्रसंगही अगदी बांका व कसोटीचा होता! माझ्या निर्णयात मी काहीही बदल केला नाही हे सांगावयासच नको. श्री.हरोलीकरही अखेरपर्यंत पक्के राहिले. सर्व उपाय हरल्यावर मंडळींनी अखेर गांधीजींकडे धाव घेतली व त्यांनी आम्हाला शहाणपणाचा सल्ला दयावा असे मागणे त्यांच्याकडे जाऊन त्यांच्यापाशी मागितले. महात्माजींच्या पत्रात एक अति मार्मिक व उदात्त वाक्य होते, "If he defends, it will not be dishonourable, but there is glory if he does not. But he need not bid for glory" (त्यांनी बचाव केल्यास त्यात लज्जास्पद असे काही नाही, पण बचाव केला नाही तर गौरवास्पद होईल. पण गौरवासाठी त्यांनी अकारण साहस करण्याची जरूरी नाही.) गांधीजींच्या विचार करण्याच्या पद्धतीतील सूक्ष्मता व मार्मिकता यांचा पुढे कित्येक वर्षांनी असाच एक अनुभव मला आला होता. महाराष्ट्रात प्रेमाबाईंच्या व माझ्या आश्रमीय सहजीवनामुळे पुण्यात वादळ उठले व वातावरण अगदी गुदमरून गेल्यासारखे झाले; तेव्हा प्रेमाबाईंनीही त्या प्रसंगी गांधीजींचा सल्ला विचारला व जरूर तर महाराष्ट्र सोडण्याची आपली तयारी आहे असे त्यांनी गांधीजींना लिहिले. गांधीजींनी आपला सल्ला लिहून पाठविला. "देवांचा संग तू सोडावा अशी आवश्यकता मला दिसत नाही. जोपर्यंत दोघांची मने निर्दोष आहेत व संग केवळ सेवेसाठीच आहे, तोपर्यंत तू देवांना सोडण्याची किंवा तुझे काम बदलण्याची कोणतीही आवश्यकता मला दिसत नाही.'

त्यावेळी सेशन कोर्ट बेटावर भरत असे. ठरलेल्या तारखेला आम्हाला कोर्टात नेण्यात आले. कोर्टात खूप गर्दी झाली होती. साताऱ्याचे दादासाहेब करंदीकर वगैरे मंडळी आणि पुण्याची व पुण्याबाहेरची काही वकील मंडळीही

अगोदरपासून उपस्थित होती. आम्ही कोर्टात आल्यावर दादासाहेबांनी माझे मन वळविण्याचा शेवटचा प्रयत्नही केला. रीतसर कोर्टाचे काम सुरू झाले. आम्हाला बसावयाला कोर्टाने खुर्च्या दिल्या होत्या. योग्य वेळी मी माझे निवेदन अगदी खणखणीत आवाजातून कोर्टापुढे वाचले. बचावाची भानगड नसल्यामुळे खटला लांबण्याचा प्रश्नच नव्हता. सेशन जज्जाने ज्यूरीला खटला समजावून सांगितला. ज्यूरीने एकमताने १२१ कलमाखाली आम्हाला निर्दोषी व १२४ अ कलमाखाली दोषी ठरविले. जज्जही ज्यूरीच्या या मताशी सहमत झाले. १२४ अ कलमाखाली त्यांनी आम्हाला दोन वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा सुनावली. कोर्टात खटला ऐकण्यासाठी जमलेल्या मंडळींपैकी अनके परिचितांनी व अपरिचितांनी नमस्कार करून अथवा हस्तान्दोलन करून आमचे उभयतांचे मनापासून अभिनंदन केले. १२१ कलमाखाली आम्ही निर्दोषी ठरविले गेल्यामुळे सर्वांच्या मनावरचा भार हलका झाला होता. एक प्रकारचे आनंदाचेच वातारण कोर्टात दरवळले होते! ज्यांनी बालपणापासून मला आपल्या मुलाप्रमाणे वागविले होते व शिक्षणासाठी यथाशक्ति मदतही केली होते ते वृद्ध श्री. गोविंदराव उर्फ दादासाहेब जोशीही कोर्टात हजर होते. मला निरोप देताना ते अधिक काही बोलले नाहीत. "शेण जमिनीवर पडले म्हणजे थोडी माती घेऊनच उठते," एवढेच एक वाक्य त्यांनी उच्चारले!

येरवड्याला आम्ही त्या दिवशी परत आलो तेव्हा अंधेरीतील कैद्यांना खोल्यांतून बंद करण्याची वेळ होऊन गेली होती. साहजिकच आमच्या खटल्याचा निकाल काय झाला हे जाणण्याला प्रत्येकजण उत्सुक होता. दोन वर्षांची सक्त मजूरी घेऊन आम्ही आलो आहोत हे जेव्हा त्यांना समजले तेव्हा सर्व खरोखर हळहळले! बंदिस्त परिस्थितीत प्रत्येकाने आमच्याबद्दल आपली सहानुभूती व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी साहजिकच कच्च्या कैद्याला सक्त मजुरीची शिक्षा झाल्यानंतर ज्या प्रकारे वस्त्रांसह दीक्षा दिली जाते त्याप्रमाणे आम्हालाही दिली गेली हे सांगावयास नकोच. अशा रितीने येरवड्यातील जवळजवळ दोन वर्षांच्या आमच्या जीवनाला प्रारंभ झाला.

त्या वेळी तुरुंगातील कैद्यांना वागवताना सामान्य व राजकीय असा कसलाही भेद केला जात नव्हता हे खरे; पण हे कबूल केले पाहिजे की सुपरिन्टेन्डन्टपासून सामान्य वॉडरपर्यंत सर्वांची आमच्याशी शेवटपर्यंत जी वागणूक झाली, ती आम्ही सामान्य गुन्हेगार कैदी नसून निराळ्या वर्गातील होतो, अशीच झाली. आम्हाला काम दिले होते ते आमच्या खोलीतच बसून करण्याचे होते. त्यामुळे राहाण्याचे ठिकाण एक व कामाचे ठिकाण दुसरे यामुळे कधी कधी जी अडचण व दगदग होते तिच्यापासून आम्ही मुक्त होतो. असे करण्यात इतर कैद्यांत आम्हाला मिसळू न देण्याचाही अधिकाऱ्यांचा एक हेतू

होताच. पण त्यामुळे आमच्या झालेल्या लाभाचे महत्त्व कमी होत नाही. शिवाय काम विशेष श्रमाचे नव्हते व वर्दी करून घेण्याची कसलीही सक्ती आमच्यावर केव्हाही झाली नाही. सर्व गोष्टी सरळ व सुरळीत चालल्या. आमचे वर्तन एक आदर्श डोळ्यांपुढे ठेवल्यासारखे असे. जेलमधील 'तिकडम'च्या भानगडीत, काही किरकोळ बाबी सोडल्या, तर आम्ही कधीही पडलो नाही. इतर कैद्यांशी आमचे कधी भांडण वगैरे होण्याचाही तर प्रश्नच नव्हता, परंतु सबंध शिक्षेच्या मुदतीत तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशीही कधीच कडक शब्द वापरण्याचा प्रसंग उद्‌भवला नाही. अधिकाऱ्यांपैकी जे भारतीय होते ते तर मधूनमधून आमच्याकडे येऊन गप्पा मारीत किंवा चर्चाही करीत व त्यात त्यांना आनंदही असे. एकंदरीत आम्ही आमच्या बोलण्याने, राहाणीच्या व संभाषणाच्या सभ्य वर्तनाने असा सद्‌भाव तेथे निर्माण केला होता की, वरिष्ठ अधिकारी बदमाशांतील बदमाश कैद्याला आमच्या शेजारी आणून ठेवीत असत. हेतु हा की, आमच्या संगतीने त्यांच्यात सुधारणा व्हावी व त्यांचे काम हलके व्हावे. आणि काही वेळा या उपचार पद्‌धतीचा चांगला परिणाम येई.

याचे उदाहरण आजही माझ्या लक्षात आहे. एकदा ज्याच्या बदमाशीपुढे तुरुंगातील अधिकारी अगदी टेकीला आले होते अशा एका काळ्या टोपी कैद्याला आमच्यापाशी आणून ठेवण्यात आले. मूर्ति साधारण ठेंगणी व दिसावयाला अगदी सौम्य अशी होती. त्या मूर्तीला पाहून कोणाच्या असे स्वप्नांतही येणे शक्य नव्हते की, अस्सल बदमाश कैद्यांना वठणीवर आणणे ज्यांच्या हातचा मळ होता, त्या अधिकाऱ्यांना या वामन मूर्तीने आपल्या बदमाशीने जेरीला आणले असेल! पण थोड्याच दिवसात आमच्या शेजाराने व संगतीने त्याच्यावर चांगलाच परिणाम झालेला दिसला! सर्व कटकटी थांबल्यासारख्या दिसल्या. जेलचे अधिकारीही खूष होते व त्याला जितके दिवस आमच्यापाशी ठेवता येईल तितके दिवस ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्याची खोली माझ्या खोलीला लागूनच होती. त्याची बदमाशी तर आम्हाला पहावयास मिळाली नव्हतीच. पण त्याच्या अंगचा एक मोठा गुण आम्हाला लोभनीय व अनुकरणीयही वाटण्यासारखा होता; तो म्हणजे त्याची स्वच्छतेची भावना (sense of cleanliness) हा होय. आता मी त्याचे नाव विसरलो. अंगावर यत्किंचित्‌ही मळ, कपड्यावर अगदी बारीकसा डाग त्याला खपावयाचा नाही इतकेच नव्हे तर खोलीत कचऱ्याचा एक कणही त्याला सहन व्हावयाचा नाही. + + + बहुधा हौदावर देह वा कपडे धूत असावयाचा किंवा हातात झाडू घेऊन खोली झाडीत असावयाचा. या गोष्टींचा त्याला कधीही कंटाळा आलेला आम्ही पाहिला नाही! एके दिवशी खोलीत कोंडल्यानंतर रात्रीच्या काळोखाने वाचन बंद केल्यावर पुष्कळ वेळा घडे त्याप्रमाणे आम्ही एकमेकांशी बोलू

लागलो. संभाषणाच्या ओघात मी त्याला म्हटले " + + + तू ज्या खोलीत राहतोस ती इतकी स्वच्छ ठेवतोस; मग माणसांच्या हृदयात परमेश्वर राहातो ते हृदय किती स्वच्छ व निर्मळ असले पाहिजे!" "होय महाराज," एवढेच उत्तर त्याने दिले. दुसऱ्या दिवशी मी पाहिले की आदल्या रात्रीच्या संभाषणाचा त्याच्या मनावर खोल परिणाम झालेला होता व त्याने आपल्या वागण्यात पुष्कळ सुधारणा केली. कित्येक तुरुंगात चिडून व जिद्दीने बदमाशी करतात हे खरे पण त्यांचे हाल ते जाणू जाणे! यानंतर + + + आमच्यामध्ये अनेक दिवस सुखाने व शांतीने राहिला. तुरुंगात कैद्याला– विशेषतः बदमाशगिरीबद्दल कुप्रसिद्ध असलेल्या कैद्याला–फार दिवस एका ठिकाणी ठेवण्याची तुरुंगातील अधिकाऱ्यांची प्रथा नव्हती. काही कालानंतर + + + ला अंधेरीतून दुसरीकडे नेले. आम्हाला कळले की, + + + चे येरे माझ्या मागल्या सुरू झाले! आम्हाला खरोखर वाईट वाटले. + + + अधिकाऱ्यांशी कसाही वागो, जोपर्यंत तो आमच्याजवळ होता तोवर तो आमच्याशी अतिशय सालसपणे व स्नेहाने वागला.

अशी एकंदर परिस्थिती असल्यामुळे दिवसा व रात्री चिंतनाला आम्हाला भरपूर वेळ मिळे. त्यावेळी येरवड्यात वीज आली नव्हती आणि दिव्याच्या बाबतीत बाबू चष्मेवाल्याप्रमाणे आम्ही खास सवलत मिळालेले कैदी नसल्यामुळे खोलीत बंद केल्यानंतर खोलीच्या अगदी दारापाशी बसून डोळ्यांना शीण देऊन वाचण्याचा ज्यास्तीत ज्यास्त प्रयत्न केला तरी झोपण्यापूर्वी व उठण्यापूर्वी पुष्कळ वेळ खोलीत आंधळी कोशिंबीर असे.

पूर्वानुभवामुळेही या परिस्थितीची थोडीबहुत कल्पना मला असल्यामुळे या वेळी तुरुंगात येतानाच गीता, ज्ञानेश्वरी वगैरे काही पुस्तके मी घेऊन आलो होतो. आता मला कारण सांगता येत नाही पण या वेळेस ज्ञानेश्वरीचा खास अभ्यास तुरुंगात करावयाचा असे मी अगोदरपासून योजून ठेवले होते. योजनेप्रमाणे मी गीतेचा व ज्ञानेश्वरीचा माझा अभ्यास सुरू केला. इतर काही दुसरे वाचन मी केले नाही असे नाही, पण या वेळचा येरवडा जेलमधील माझा वेळ मी या दोन ग्रंथांच्या अभ्यासातच खर्च केला. ज्ञानेश्वरीवर माझी इतकी भक्ति जडली व तीत इतका रस वाटू लागला की, ज्ञानेश्वरीतील ज्या ओव्या मला विशेष आवडल्या त्या मी पाठ केल्या. अशा ओव्यांची संख्या शेकडोंनी मोजता येण्यासारखी होती. टिळकांचे गीता-रहस्य तर होतेच, पण बापट-शास्त्र्यांच्या ग्रंथाच्या मदतीने मी गीतेवरील शांकरभाष्याचाही चांगला अभ्यास केला. शाळा व कॉलेजमध्ये माझी दुसरी भाषा फ्रेंच असल्यामुळे संस्कृताचे माझे ज्ञान जवळजवळ नसल्यासारखेच होते. व्याकरण नव्हे पण संस्कृत भाषेशी माझा प्रथमच चांगला परिचय झाला. त्या वेळी जी मला उपलब्ध झाली अशी

गीतेवरही पुष्कळ चांगली चांगली पुस्तके मी वाचली. त्या दिवसात तर दर रविवारी कैद्यांच्या धार्मिक व सांस्कृतिक, विशेषत: धार्मिक शिक्षणासाठी बाहेरून काही मंडळींना तुरुंगात येऊन कैदयांना भेटण्याला व त्यांच्याशी संभाषण, व्याख्यान अथवा प्रवचन यांच्याद्वारे संपर्क जोडण्याला सरकारने परवानगी दिलेली असे. ख्रिस्ती, मुसलमान, तसेच हिंदु अशी भिन्न भिन्न धर्मातील मंडळी यात असत. त्यांपैकी विशेषत: हिंदू मंडळी आवर्जून आमच्याकडे येत. या मंडळीत एक गोखले नावाचे सुशिक्षित व सज्जन गृहस्थ होते. ते माझ्या स्मरणाप्रमाणे थिऑसॉफिस्ट होते. मला वाटते ते शनिवारात हल्ली जेथे मुलींचे अहिल्यादेवी हायस्कूल आहे तेथेच जवळपास राहात असत. मला हवी असत ती पुस्तके गोखले मला मिळवून आणून देत. त्यांच्यामुळे माझे हे काम फार सुकर झाले होते. त्या वेळी आम्हाला वर्तमानपत्रे मिळत नसत. श्री. गोखले व त्यांचे साथी हे रविवारी आमचे साप्ताहिक बातम्या पुरविणारे रेडिओ झाले होते.काही कारणांमुळे एखादया रविवारी ही मंडळी आली नाही तर आम्हाला अगदी चुकल्या चुकल्यासारखे वाटे, इतकेच नव्हे आम्हाला रविवारची गव्हाची पोळी व गूळ यांचे जेवण फिक्के लागे!

माझा गीतेचा अभ्यास माझ्या समजुतीप्रमाणे इतका खोल व व्यापक झाला होता व त्याबाबतीत माझा आत्मविश्वास माझ्या स्वभावाप्रमाणे इतका पक्का होता की, गीतेवर एक ग्रंथ लिहिण्याचे मी ठरविले व त्याप्रमाणे तुरुंगात असतानाच मी हा ग्रंथ लिहून पुरा केला. गीतेचा अभ्यास करीत असताना योगी अरविंद यांचा Essays on the Gita हा ग्रंथही मी स्वाभाविकच अभ्यासिला. या ग्रंथाचा अभ्यास करीत असताना मी असे पाहिले की, विषयाच्या विवेचनात बाबू अरविंद यांनी गीतेच्या पहिल्या अध्यायातील कांही श्लोक सोडले तर गीतेच्या सातशे श्लोकांची त्यांच्या समजुतीप्रमाणे व्याख्या सांगून सुंदर इंग्रजीत अनुवाद केला आहे. हा अनुवादही मी श्लोकश: वेगळा लिहून काढला. पहिल्या अध्यायांतील जेवढ्या श्लोकांचा अनुवाद Essays on the Gita मध्ये केलेला नाही तो डॉ. ॲनी बेझंट यांच्या गीतेच्या इंग्रजीतील अनुवादातून घेऊन पाँडिचेरीच्या आश्रमाच्या परवानगीने स्वतंत्र छापून प्रसिद्ध करावा अशी माझी इच्छा होती. पण दैवदुर्विलास असा की, गीतेवरच्या त्या ग्रंथाची हस्तलिखिते कशी व केव्हा गहाळ झाली ते मला सांगता येत नाही. आणि गीतेच्या श्लोकांची हस्तलिखिते एका मित्रांनी पाहून छापण्याचा विचार करतो असे सांगून एकदा नेली ती पुन्हा परत केलीच नाहीत! माझ्या जीवनाला स्थिर बैठक व स्थान असे कधीच न लाभल्यामुळे माझी मोठी हानी झाली आहे. याचा माझ्या मनाला सदा खेद वाटला आहे व हुरहुर लागली आहे. कदाचित् असाही संभव आहे की, "जेथे देवदूत पाय ठेवण्याला भितात, तेथे मूर्ख धावत सुटतात" या इंग्रजी म्हणीप्रमाणे

अनधिकाराने अनेक क्षेत्रांत पदार्पण करण्याच्या लोभाने केलेल्या प्रयत्नामुळे होणाऱ्या फजितीपासून या परिस्थितीने माझे रक्षण केले असेल!

अठरा अध्याय गीता व ज्ञानेश्वरींतील शेकडो ओव्या मी पाठ केल्या त्याचप्रमाणे यावेळी मी ईश, केन, कंठ, मंडूक वगैरे उपनिषदांतील बहुतेक श्लोक पाठ केले. हे पाठांतर करण्याला या वेळी मला अनुकूल वातावरण होते. कारण बाहेरच्याप्रमाणे तुरुंगात मनात विक्षेप उत्पन्न करणाऱ्या गोष्टी जवळजवळ मुळीच नव्हत्या. माझा विशिष्ट ग्रंथांचा अभ्यास या अवस्थेला विशेष पोषक होता. अगदी निवांत आणि निर्वेध देश व काल होता. याशिवाय आणखीही एक गोष्ट या पाठांतरासाठी मला अनुकूल होती. अंधेरीच्या जवळच युरोपियन वॉर्ड होता. थोडचा अंतरावर मागे सेपरेट होती व या तीन वास्तूंच्यामध्ये एक लहानसें मैदान आणि मधूनमधून झाडे होती. युरोपियन वॉर्डात जाण्याचा रस्ता अंधेरीतूनच होता व मी बहुधा मोकळा होतो. हे दार उघडून बाहेर गेले की खूप मोकळी जागा होती. तेथे जाऊन काहीसे मोठमोठ्याने मला हे पाठांतर करणे सोयीचे होते. तिकडे अधिकारी व कैदी यांपैकी फारसे कोणी येण्याचे प्रयोजन नव्हते. तसेच माझ्या मोठ्या आवाजाने केलेल्या पाठांतरामुळे कोणाच्या कामात व्यत्यय येण्यासारखा अथवा कोणाला खास त्रास होण्यासारखा नव्हता. मी या अनुकूल परिस्थितीचा भरपूर उपयोग करून घेतला व तितका तो करून घेण्याइतके स्वातंत्र्य आम्हाला होते. याच कालात श्री. कृष्णमूर्तींचे 'At The Feet of The Master' हे पुस्तकही वाचण्यात आले. थिऑसॉफीचे वाङ्मय गोखले यांच्यामुळे आम्हाला सहज उपलब्ध होते. या लहानशा पुस्तकातून माझ्या वाचनात एक लहानसेच वाक्य आले ते वाक्य म्हणजे "To live from moment to moment." मला पक्के आठवते की, हे वाक्य वाचल्याबरोबर मला असे वाटले की, हे वाक्य लिहिणारा पुरुष 'दर्शन' झालेला असावा. पुढे आयुष्यात श्री. कृष्णमूर्तींचा व माझा कर्मधर्मसंयोगाने जवळचा संबंध येणार आहे व त्या सबंधामुळे माझ्या जीवनसृष्टीत मोठे परिवर्तन होणार आहे याची कल्पना त्या वेळी मला नव्हती.

पण त्या वेळी माझ्या मनावर जीवनपरिवर्ती खोल संस्कार कोणी केला असेल तर तो ज्ञानेश्वरीने! गीता ही बुद्धीला खुराक देणारी होती तर ज्ञानेश्वरी भावनेला पोसणारी होती. हा संस्कार इतका खोल होता की, तुरुंगातून मुक्तता होण्याचा काल फार दूर असतानाच मी संकल्प केला होता की, तुरुंगातून मुक्तता होताच पुण्याला न जाता सरळ पायी आळंदीला जाऊन श्री ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन घ्यावयाचे आणि नंतर पुण्यात प्रवेश करावयाचा. याच वेळी मी दुसराही एक संकल्प केला. तो म्हणजे तुरुंगातून बाहेर गेल्यावर समर्थ संप्रदायाची मर्यादित अर्थाने दीक्षा घ्यावयाची आणि स्वतःचा योगक्षेम

कोरान्नाची भिक्षा मागून चालवावयाचा. संस्कार ज्ञानेश्वरीचा व दीक्षा समर्थांची या दोन गोष्टींची परस्पर संगती कशी लावावयाची हा प्रश्न मला आजही सुटलेला नाही. कदाचित् तरुणपणचा संस्कार व माझा राजकीय पिंड हे त्याचे एक कारण असण्याचा संभव आहे.

जीवनाचा विवेकाने विचार करू लागले म्हणजे भूतकालीन जीवन फक्त स्मरण आहे व भविष्यकालीन जीवन केवळ कल्पना आहेत; प्रत्यक्ष मनुष्य जे जगतो ते श्री. कृष्णमूर्तींच्या At The Feet of The master मध्ये मी वाचले होते त्याप्रमाणे, क्षणाक्षणाला जगतो तेवढेच. हा बोध मनावर ठसविणारा एक प्रसंग या तुरुंगावस्थेत घडला तो येथे देण्यासारखा आहे. तुरुंगात गेल्यानंतर बरेच वाचन झाल्यानंतर आम्हाला काही लिहावे असे वाटू लागले हे स्वाभाविकच होते. त्यासाठी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना विचारावे किंवा नाही याबद्दल आम्हा दोघात बराच खल झाला. असे होण्याचे कारण आपण परवानगी मागितली आणि समजा, यदाकदाचित् त्यांनी ती दिली नाही तर तो नकार मुकाट्याने सहन करणे आपल्यासारख्यांच्या प्रतिष्ठेला कमीपणाचे होईल अशी आमची दोघांची प्रामाणिक समजूत होती. तुरुंगातील कोणत्याही अन्य कैद्यांप्रमाणे जरी आपण एक रीतसर कैदी असलो तरी आम्ही देशसेवक आहोत व राजद्रोहाच्या कलमाखाली आपल्याला शिक्षा झाली आहे असा 'अहं' आमच्यात जागृत होता हे मान्य केले पाहिजे. तेव्हा आपण परवानगी मागितली आणि अधिकाऱ्यांनी ती नाकारली तर आपल्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्याच्या दृष्टीने आपल्याला त्याचा विरोध केला पाहिजे असे आम्ही मानीत होतो. मुळशी सत्याग्रहाच्या वेळचा माझा अनुभव जमेला होताच आणि कल्पनेच्या वारूवर स्वार होऊन त्याला एक चाबूक मारला की तो वारू आकाशात कोठे आणि कोठपर्यंत उड्डाण करील याला काही सीमाच नाही! परवानगी नाकारल्यावर अधिकारी व आम्ही यांच्यामध्ये जो तीव्र लढा होईल व त्याचे जे भयानक परिणाम येतील त्याची आम्ही आमच्या चर्चेत लालभडक चित्रे रंगविली! इतकी की, श्री. हरोलीकर यांनी ठरविले की, आपण परवानगी मागणार नाही. मी म्हटले, "मागून तर पाहू. कदाचित् मिळण्याचाही संभव आहे." यानंतरच्या साप्ताहिक आठवड्याच्या तपासणीच्या वेळी मी सुपरिंटेन्डेन्टला परवानगी मागण्याचे ठरविले. श्री. हरोलीकर यांची खोली अगोदर होती व माझी त्यानंतर कोपऱ्यांतील अगदी शेवटची खोली होती. श्री. हरोलीकर यांच्याबरोबर "हौ आर यू?" या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे प्रश्न व जबाब झाल्यावर डॉयल माझ्यापाशी आले. ठरल्याप्रमाणे मी "आम्हाला लेखनसाहित्य मिळावे," अशी मागणी त्यांचेजवळ केली. त्यावर "Will you promise that it will not be misused?" (त्याचा गैरउपयोग करणार नाही असे वचन द्याल का?) असा

प्रश्न डॉयल यांनी मला केला. "I promise," (मी वचन देतो.) एवढेच मी म्हटले. त्याबरोबर डॉयल जेलरकडे वळून म्हणाले, "Give them the necessary material," (त्यांना आवश्यक सामग्री दया.) व लागलीच खाली उतरून पुढे गेले. मी व हरोलीकर थोडा वेळ एकमेकांकडे पहातच राहिलो! आम्ही निर्माण केलेल्या काल्पनिक कुरुक्षेत्रावरील सर्व शंखनाद एका क्षणात थांबले होते! या वेळी डॉ. बेझंटच्या कोणत्या तरी पुस्तकांत सुपरिन्टेन्डन्टच्या कैदयांशी होणाऱ्या वर्तनाबद्दल त्यांनी कैदयाला दिलेला सुज्ञपणाचा सल्ला मला आठवला. तो सल्ला थोडक्यांत असा :– "सुपरिटेंन्डन्ट आपल्यापाशी आला व रागारागाने व उद्धटपणे आपल्याशी बोलला तर तुरुंगात येण्यापूर्वी चहाच्या वेळी त्याचे त्याच्या बायकोशी भांडण झाले असले पाहिजे व तो बायको वरचा राग त्याने आपल्यावर काढला असला पाहिजे असे समजावे.'! डॉक्टरबाई सांगतात त्याप्रमाणे पुष्कळ वेळा घडते हा आपला सर्वांचा अनुभव आहे.

अशा काही किरकोळ गोष्टी सोडल्या तर या खेपेच्या पावणेदोन वर्षांच्या तुरुंगवासात आमच्या जीवनाचा ओघ साधारणपणे संथ वाहात राहिला असे म्हणावयास हरकत नाही. आमचा बहुतेक वेळ वाचन, चिंतन व लेखन यांमध्येच जात असे. आमच्या या अशा जीवनक्रमांत अधिकाऱ्यांकडूनही तसा कधी प्रत्यवाय आला नाही. याचा माझ्या मनावर एक असा परिणाम झाला होता की, तुरुंगात असतांना बाहेर गेल्यावर पुढे काय करावयाचे याचा विचार शक्य तो करावयाचा नाही, याचा अभ्यास मी आयुष्यात प्रथमच केला व असे म्हणावयास हरकत नाही की, त्यात मला बरेच यश आले. तुरुंगातून बाहेर गेल्यावर दीक्षा घेण्याचा माझा संकल्प कायम होता आणि त्या दृष्टीने बाहेर गेल्याबरोबर वाईचे स्वामी केवलानंद ऊर्फ श्री. नारायणशास्त्री मराठे आणि धुळचाचे श्री. शंकर श्रीकृष्ण ऊर्फ नानासाहेब देव यांची व माझी भेट होईल अशी व्यवस्था करण्याबद्दल मी बाहेरच्या मंडळींना लिहून कळविले होते.

सन १९२९ च्या ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडचात आमची येरवडा तुरुंगातून मुक्तता झाली. त्या दिवशी सकाळी येरवडचांतून बाहेर येताच पूर्व संकल्पाप्रमाणे बरोबरचे सामान बाहेर आलेल्या मंडळीच्या हवाली करून मी सरळ आळंदीचा रस्ता धरला. आळंदीला जाऊन प्रथम श्री. ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि मग पुण्याला परतलो. श्री. हरिभाऊ फाटक यांची हौस व आग्रह मोठा! त्यांनी मिरवणुकीची व जाहीर सभेत स्वागताची तयारी केली होती. कां ते मला आठवत नाही, स्वागताची जाहीर सभा नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे सायंकाळी न होता सकाळी शिवाजी मंदिरात झाली. सभेला अगदी थोडी मंडळी आली होती. पुणेकरांना आमच्याबद्दल तसा उत्साह नसला तर त्यांत नवल नाही. वेळही अवेळ होती. सभेला तात्यासाहेब केळकर हजर

होते. कदाचित त्याचे श्रेय हरिभाऊंनाच असावे. नानासाहेब गोरेही उपस्थित होते. हे मला पुष्कळ दिवसानंतर त्यांच्याकडूनच कळले. स्वागताच्या मिरवणुका अथवा सभा यांत आनंद अथवा अभिमान मानण्याच्या वृत्तीत (mood) मी मुळीच नव्हतो. सभेलाही मी मंडळीच्या आग्रहावरूनच गेलो. अंगांत एक खादीचा कुडता, डोक्यावर एक खादीची गांधी टोपी व खांद्यावर मला वाटते, एक घोंगडी हा माझा पोशाख होता. मी सभेत फारसा बोललोही नाही हे सांगावयास नकोच. साहजिक श्रोत्यांना त्यांत रस वाटला नाही आणि सभेला रंगही चढला नाही.

स्वामी केवलानंद पुण्याला आले होते. मी त्यांची भेट घेतली व त्यांना माझे मनोगत सांगितले. शनिवार पेठेत बुरुजापाशी कोणाच्या तरी घरी ही भेट झाली असे अंधुक स्मरण मला आहे. श्री. नानासाहेब येऊ शकले नाहीत. यानंतर मनाने स्वीकारलेल्या वृत्तीप्रमाणे माझ्या जीवनात व वेषभूषेतही बदल होत गेला. वेषभूषेत बदल होण्याची जरुरीच होती असे नाही, पण संस्कार बलवान असतो. वेषभूषेत झालेल्या बदलाबद्दलचे मार्मिक मोल मला स्वतः श्री. राजगोपालाचार्य यांच्याकडून ऐकावयाला मिळाले. मला वाटते, राजाजींचा महाराष्ट्रात दौरा चालू होता. एका मुक्कामावर त्यांच्याबरोबर असलेल्या तामिळ मित्राने माझा पोषाख मद्रासी पद्धतीचा आहे असा शेरा मारला!. त्यावर ते एवढेच म्हणाले की, "असा पोषाख ब्रह्मचाऱ्याचाही असतो." या माझ्या वृत्तीमुळे व वेषभूषेमुळे माझा पुष्कळ बचाव झाला आहे हे खरे पण त्याच बरोबर त्यामुळे माझ्याबद्दल अनेक प्रकारचे आदर, अवहेलना, अपमान वगैरे सद्भाव व दुर्भाव मला सहन करावे लागले आहेत. मी कोणीतरी जुन्या पद्धतीचा शुचिर्भूत ब्राह्मण आहे असे समजून मी रेल्वेतून प्रवास करीत असताना माझ्या हातात दक्षिणा आणून ठेवली आहे. फळे वगैरे वस्तू विकत घेण्यासाठी मी एखादया दुकानापाशी गेलो असता मी कोणीतरी भिकारी भीक मागण्यासाठी आलो आहे असे समजून तिरस्काराने मला हाताने व चेहऱ्यावरील आविर्भावाने "पुढे जा," असे अनेक वेळा सांगितले आहे. मी गिऱ्हाईकच आहे असे समंजसपणे समजणाऱ्या दुकानदाराने माझ्यासारखा मनुष्य पहिल्या प्रतीची उत्तम फळे विकत घेऊ शकणार नाही असे समजून दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रतीची फळे मला दाखवून आपल्या दुकानातून माझी रवानगी करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक वर्षे मी रेल्वेच्या तिसऱ्या वर्गांतून कधी कधी खाली बसून किंवा बाकाच्या खाली झोपून प्रवास केला आहे. अशा रितीने दीर्घकाल दगदगीचा प्रवास केल्यानंतर पुढे मी त्या वेळच्या दुसऱ्या वर्गांतून प्रवास करू लागलो. त्यावेळी दुसऱ्या वर्गात रात्रीच्या प्रवासासाठी बर्थ रिझर्व्ह करता येत असे. तेव्हापासून व नंतर रेल्वेने हा दुसरा वर्ग रद्द करून हल्लीचा पहिला वर्ग सुरू

केल्यानंतर लहानमोठ्या रेल्वे कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी मला हिडिसफिडिस करून पहिल्या वर्गात शिरण्याला मज्जाव केला आहे व शिरलो असलो तर खाली उतरण्याचा बेपर्वा हुकूम केलेला आहे. एकदा तर पहाटेच्या वेळी मी थोड्या वस्त्रांनिशी पहिल्या वर्गाच्या कॉरिडोरमध्ये फेऱ्या घालीत असता प्लॅटफॉर्मावरून अटेन्डन्टने मला "हा पहिला वर्ग आहे." असे करड्या आवाजात बजावण्याला कमी केले नाही! वर्किंग कमिटीमध्ये अथवा इतर वेळी चार मित्रमंडळी जमली असता माझा पोशाख हा सरदारांचा विनोदाचा विषय होता. सरदारांच्या या विनोदाने मंडळीची करमणूक होई व ती खदखदा हसत! महाराष्ट्रात काही विशिष्ट स्त्रीपुरुषांनी माझ्याकडे अंगुलिनिर्देश करून माझ्या या वेषभूषेची कुचेष्टा व निर्भर्त्सना केली आहे. आणि आजही काल भूतकाल झाला आहे असे खेदाने म्हणू शकत नाही. काँग्रेसच्या वरिष्ठ वर्तुळात पंडित नेहरुंच्या आवडी-नावडी इतक्या तीव्र (Strong) होत्या की, त्या कोणाच्याही सहज ध्यानांत आल्याविना राहात नसत. पंडितजी म्हणजे इंग्लंडच्या खानदानी समाजात सहज सामावून जाणारे "जंटलमन" होते. माझी वेषभूषा व त्याच बरोबर त्यांच्या मते एक प्रकारे माझी बैरागी राहाणी यामुळे पंडितजींच्या व माझ्यामध्ये सदा मानसिक व भौतिक अंतर ठेवलेले आहे याची मला जाणीव आहे. आम्ही अहमदनगर किल्ल्यात असताना एका सणाच्या दिवशी पंडितजी उद्‌गारले, "शंकररावजी, आपको आपका पोशाक बदलनेकी कभी जरूरत नही रहती!" पंडितजींच्या या उद्‌गारामागची भावना कोणती होती हे सांगणे कठीण आहे.

कोरान्नाची भिक्षा मागून उदरभरण करावयाचे या माझ्या दुसऱ्या संकल्पाचा प्रारंभ व अंत जवळ जवळ एकाच वेळी झाले याचे माझ्या मनाला अति दुःख आहे; इतके की त्याचे दुःख माझा कायमचा सहकारी झाले आहे. माझी पक्की खात्री आहे की, माझा हा संकल्प मी अमलात आणू शकलो असतो तर अपेक्षेप्रमाणे माझ्या जीवनाचा अंतर्बाह्य कायापालट होऊन त्याला अगदी निराळे वळण लागले असते. पण तसे घडले नाही याचे कारणही त्या संकल्पांतच निहित होते. पुण्यांतील पांढरपेशा समाजांतील विशिष्ट वर्गाबद्दल माझ्या मनाने इतकी दहशत घेतली होती की, संकल्प करतानाच मी असा केला होता की, भिक्षेचे व्रत पुण्याच्या बाहेर महाराष्ट्रात चालवावयाचे! आणि त्याचे प्रायश्चित्त म्हणून पुण्यात मुक्काम असताना फलाहारावर राहावयाचे. याचा अर्थ हा होता की, माझ्या संकल्पनाच्या पोटी भय होते. याचा स्पष्ट अर्थ असा होता की, समर्थांनी उपदेशिलेले बैराग्य माझ्या अंगी नव्हते. अल्पानुभवानेच जेव्हा ही गोष्ट लक्षात आली, तेव्हा मी भिक्षा सोडली आणि फलाहारावर राहू लागलो. त्याचे असे झाले. सुटल्यानंतर मी वाईला गेलो होतो. वैद्यांच्या घरी माझा मुक्काम होता. संकल्पाप्रमाणे कोरडी भिक्षा मागायला जावयाचे असे मी

ठरविले. पण मी एकटा बाहेर पडलो नाही, पडण्याचे धारिष्टच झाले नाही असे म्हणणे सत्याला अधिक धरून होईल. वैदच माझ्या बरोबर निघाले. अर्थात् वैदयांची वाईत सर्वत्र ओळख होती. एखादया घरांत प्रवेश करून घराच्या अंगणांत अथवा दरवाजाच्या आत उभे राहून समर्थांचा श्लोक मी म्हटल्यावर घरांतील जो कोणी स्त्रीपुरुष, विशेषत: पुरुष मनुष्य बाहेर आला की, वैदच "मी" कोण हे त्याला सांगत. असे हे माझ्या वैराग्याचे प्रहसन मी फक्त वाईच्या एक-दोन दिवसांच्या मुक्कामातच केले. वाईच्या या छोटया नाटकाचा प्रयोग दुसरीकडे करण्याचा मूर्खपणा मी केला नाही. सन १९३२ ते १९३४ च्या लढयांत दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा होऊन येरवडयाच्या तुरुंगात जाईपर्यंत माझा हा फलाहार चालू होता.

येरवडयाच्या तुरुंगात असताना गीता व ज्ञानेश्वरीवर जडलेली भक्ति व त्यांचे पाठांतर पुढे अनेक वर्षे चालू होते. 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या संतोक्ती प्रमाणे "दिल्ली-पेकिंग मैत्री यात्रेत" जी काही थोडी निवडक पुस्तके माझ्याबरोबर होती त्यात तांबडया पेन्सिलीने रेखांकित केलेली ज्ञानेश्वरी होती. मैत्रीयात्रेंतील बहुतेक सामान मला परत मिळाले नाही. त्यात ती ज्ञानेश्वरीही होती.

गीतेवरील माझ्या अभ्यासाची बातमी केसरी ऑफिसमधील मंडळीपर्यंत पोचणे अगदी स्वाभाविक होते. या मंडळींनी टिळक-स्मारक-मंदिरात माझे गीतेवर एक भाषण करविले. या भाषणाला तात्यासाहेब करंदीकर वगैरे मंडळी उपस्थित होती. श्री. शंकराचार्यांच्या गीताभाष्याचा प्रभाव माझ्यावर पडलेला आहे असा या मंडळींचा अभिप्राय पडला. १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहात शिक्षा होऊन आम्हा मंडळींना ठाण्याच्या तुरुंगात ठेवले होते, तेव्हाही गीता व ज्ञानेश्वरी माझ्याबरोबर होत्या. स्वामी आनंद, श्री. बाळासाहेब खेर, श्री. वान्द्रेकर, श्री. जाबिर अल्ली, श्री. बुवा गोसावी वगैरे मंडळी तेथे होती. एके रात्री या मंडळीमध्ये माझे ज्ञानेश्वरीवर प्रवचन झाले. ज्ञानेश्वरीच्या भक्तीमुळे पंढरीचा विठोबा माझे पुष्कळ दिवस आवडते दैवत होणे स्वाभाविक होते. कित्येक दिवस जेव्हा जेव्हा कामानिमित्त माझे पंढरपूरला जाणे होई तेव्हा तेव्हा पंढरपूरच्या मुक्कामात मी फक्त फलाहारावर राही व विठ्ठल मंदिरांत जाऊन पुष्कळ वेळ बसत असे. पंढरपुरात माझा मुक्काम बहुधा श्री. बबनराव बडवे यांच्या येथे असे. साहजिकच या बाबतीत "व्यसनेषु सख्यम्" अशी आमची दोघांची स्थिति होती. पण राजकारण हा एक असा विषय आहे की, जो निदान माझ्यापुरता तरी अव्यभिचारी भक्ति मागणारा आहे. त्यामुळे जसजसा काल गेला तसतसा पूर हळूहळू ओसरत जातो तसा हा माझा गीता व ज्ञानेश्वरीचा व्यासंग व निकट परिचय कमी होत गेला. तथापि ज्याप्रमाणे आंबा चोखून, कोय

व साल फेकून दिल्यावरही पुष्कळ वेळ त्याची गोडी तोंडात राहाते अथवा ज्ञानेश्वरीच्या भाषेत बोलावयाचे तर पावसाळा गेला तरी काही काल ओल मागे राहाते, त्याप्रमाणे माझ्या जीवन दृष्टीत व दर्शनात आज पुष्कळ फरक पडला असला तरी गीता व ज्ञानेश्वरीबद्दल त्या वेळी लागलेली गोडी कायम आहे. विशिष्ट प्रसंगी अथवा सहज संस्कारामुळे हिंदू म्हणून माझ्या तोंडून ईश्वराचे नाव निघते तेव्हा ते 'पांडुरगांचे' निघते.

माझ्या पावणेदोन वर्षांच्या तुरुंगवासाच्या कालात बाहेर देशात विशेषतः देशाच्या राजकीय क्षेत्रात खूपच फरक पडला होता. देशात युवक चळवळीला प्रारंभ झाला होता व तिचे नेतृत्व पंडित जवाहरलाल यांच्याकडे होते. देशाने निर्भेळ स्वातंत्र्याच्या दिशेने पुष्कळ पुढे वाटचाल केली होती. संपूर्ण वसाहतीचे स्वराज्य लोकांना विशेषतः तरुण मंडळीना मिळमिळीत वाटू लागले होते. देशांतील युवक वर्ग जागृत व सक्रिय झाला होता व तो देशाच्या राजकारणाला वळण देण्याच्या मनस्थितीत होता.

युवक चळवळीने महाराष्ट्रात युवक वर्गाच्या एका नवीन नेतृत्वाला जन्म दिला होता. श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. नानासाहेब गोरे, श्री. एस्. एम्. जोशी व श्री. र. कृ. खाडिलकर हे त्या चळवळीचे नेते होते. यांच्यामध्ये काकासाहेब गाळगीळ बरेच वडील (Senior) होते. मी बडोदे कॉलेजमध्ये शिकत असताना गाडगीळ माझे सहाध्यायी होते. पण तेथे त्यांचा व माझा विशेष परिचय झाला नाही. श्री. विनायकराव भुस्कुटयांच्या बरोबर मी मुळशी सत्याग्रहात काम करीत होतो तेव्हा काकासाहेबांनी पुण्यात वकिलीचा मांड नुकताच मांडला होता व केसरी वाडयांतील मंडळीच्या बरोबर सहप्रवासी (fellow traveller) अशा नात्याने आपल्या सार्वजनिक सेवेच्या कार्याला प्रारंभ केला होता. साधारणपणे युवक चळवळीला देशात व महाराष्ट्रात प्रारंभ होईपर्यंत काँग्रेसचे देशकारण व महाराष्ट्राचे ब्राह्मण-ब्राह्मणेतर कारण या दोन्ही बाबतीत काकांची नीती व धोरण गायकवाड वाडयाच्या प्रवाह-क्षेत्रांत साहजिकच गुटमळत होती. ते प्रतिसहकार पक्षांत होते व त्यांनी काही काल 'मराठया'च्या संपादकवर्गातही काम केले. माझ्या मते युवक चळवळीने हळूहळू त्यांना या क्षेत्राच्या कक्षेतून बाहेर काढले व जेव्हा लाहोर काँग्रेसनंतर स्वातंत्र्यासाठी गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी सत्याग्रहाचे आंदोलन सुरू झाले तेव्हा काकांनी त्यात उडी टाकली. गांधीजींनी जे वेळोवेळी सत्याग्रहाचे लढे केले त्यात काकांनी भाग घेतला, कमालीचा त्याग केला व कष्ट सहन केले. पण अखेर पर्यंत ते काँग्रेसनिष्ठच राहिले. त्यांनी सत्याग्रहनिष्ठेचा कधी स्वीकार केला नाही.

पण याच कालांत देशाच्या व विशेषत: कॉंग्रेसच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी एक महत्त्वाची घटना घडली होती; ती म्हणजे सरदार पटेल यांच्या नेतृत्वाखाली बारडोली तालुक्यांतील शेतकरी वर्गाने शेतसारा वाढीविरुद्ध केलेला यशस्वी सत्याग्रह! बारडोली सत्याग्रहाचा एक मोठा परिणाम म्हणजे त्याने सत्याग्रहाच्या यशस्वी प्रयोगाच्या बाबतीत भारतीयांच्या श्रद्धेचे पुनरुज्जीवन केले व त्याचबरोबर त्यांची स्वातंत्र्याची भूक प्रज्वलित केली. अर्थ एक होता की, तुरुंगात जाण्यापूर्वी काही वर्षे व तुरुंगात असताना माझ्या हातून जे काही अल्प-स्वल्प तप झाले होते त्याच्या राजकीय क्षेत्रांतील परीक्षेचा काल लवकरच येणार होता.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# द. का. कुंटे

जन्म : २७ ऑक्टोबर, १९०८.

**महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते.**

जन्म अलिबाग, जिल्हा रायगड येथे. उच्च शिक्षण विल्सन कॉलेज मुंबई. त्यानंतर मुंबईच्या लॉ कॉलेजातून एल्. एल्. बी. ची पदवी. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल कारावास. त्यानंतर १९३२, १९४०, आणि १९४२ साली कारावास भोगला. १९३४ साली अलिबाग नगरपालिकेत प्रवेश. १९३७ साली विधानसभेत प्रवेश. त्यानंतर १९४६ साली मुख्यमंत्र्यांचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमणूक. १९५२ साली मुंबई विधान- सभेचे सभापती म्हणून निवड झाली.

रायगड जिल्ह्यात काँग्रेस संघटना मजबूत करण्यात श्री. कुंटे यांचा पुढाकार. काही काळ महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाचे सभासद व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सभासद. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रीय सहभाग व संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या सदरहू समितीचे अध्यक्ष.

१९६७ साली लोकसभेचे सदस्य स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडून आले.

१९६१ ते ७५ पर्यंत रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक चळवळीत पुढाकार. अलिबाग येथील जनता शिक्षण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष.

१९३५ ते ७७ पर्यंत अलिबाग येथील 'राष्ट्रतेज'. या जिल्हापत्राचे संस्थापक-संचालक.

१९६८-६९ साली भारत सरकारने नेमलेल्या प्रशासकीय सुधारणा समितीकरिता शासनातर्फे चालविण्यात येणाऱ्या निरनिराळ्या विज्ञान मंडळाच्या कारभार विषयक सुधारणा सुचविणारा अहवाल सादर.

१९६२ ते ६४ या काळात मुंबई गृहनिर्माण मंडळाचे सदस्य. खादी कमिशनच्या अभ्यास गटाचे सभासद.

प्रस्तुत उतारा हा त्यांच्या 'वाटचाल' या आत्मवृत्तातून घेतला आहे.

# सत्याग्रह छावणी

द. का. कुंटे

१९३० हे राजकारणात पडणाऱ्या माझ्या पिढीच्या बहुतेकांचे प्रवेशाचे वर्ष. लाहोर काँग्रेसने संपूर्ण स्वराज्याचा ठराव केला व त्यासाठी सत्याग्रह होणार हे उघड झाले. देशातील राजकारण तापू लागले. २६ जानेवारीला देशभर लाखो भारतीयांनी संपूर्ण स्वराज्याची शपथ घेतली, परंतु शपथ घेणाऱ्यात मी नव्हतो. १२ मार्चला गांधीजी साबरमती आश्रमातून सुरत जिल्ह्यातील दांडीकडे आपल्या निवडक ८०-९० सत्याग्रहचांसह पदयात्रा करीत निघाले. त्या नवलयात्रेचा प्रतिध्वनी साऱ्या जगभर उमटला. ६ एप्रिलला गांधीजी दांडीस पोहोचले आणि देशभर मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. साहजिकच मुंबई शहर हे नेहमीप्रमाणे या आंदोलनाचे प्रमुख केंद्र बनले. काँग्रेस हाऊसवर स्वयंसेवक नोंदणी सुरू झाली. शहरामध्ये पोलिसांनी काही अतिप्रकार केले म्हणजे नावे नोंदवू इच्छिणाऱ्या सत्याग्रहचांनी काँग्रेस हाऊसचे आवार भरून जात असे.

एके दिवशी सायंकाळी माझा मित्र व खोलीतील सहरहिवासी, संजीव अमलाडी, नाव नोंदविणारांच्या रांगेत उभा राहिला. पण त्याचा क्रम येण्याआधीच त्या दिवसापुरती नोंदणी बंद झाली. त्याला परत यावे लागले. त्या वेळी आम्ही काँग्रेस हाऊसपासून शंभर यार्डावर राहात होतो. घडणाऱ्या गोष्टींची चर्चा आम्ही मित्र करीत असू. त्याचबरोबर मी मख्खपणाने दुसऱ्या एलएल.बी. चा अभ्यास करीत होतो कारण २४ एप्रिलला परीक्षा होती. वडिलांचे पैसे खर्चून मी शिकत होतो याची जाणीव पण होती. त्याचबरोबर भरवसा होता की परीक्षा पुरी होईपर्यंत चळवळ संपणार नाही आणि संपलीच तर चिंता करण्याचे कारण नाही.

असो. परीक्षा दिली आणि मनाशी काही निश्चय करून घरी अलिबागेस गेलो. चळवळीत सामील होण्याचा विचार वडिलांना सांगितला. पण संमती देणारे वडील थोडेच. त्यांनी फेरविचार करण्यास सांगितले. मुंबईस परत आलो, मित्रांस भेटलो. त्याचप्रमाणे विनायकराव सावरकर यांचे बंधू बाबाराव सावरकर यांस भेटलो. ते म्हणाले, 'जाऊ देत या लोकांना तुरुगात, म्हणजे

आपणाला मैदान मोकळे राहील.' हे ऐकून मला फार खेद झाला. दिनांक ५ मे रोजी सकाळच्या बोटीने अलिबागेस परत गेलो. त्या दिवशीच्या वर्तमानपत्रात गांधीजींना इंग्रज सरकारने भल्या पहाटेस पकडल्याची बातमी वाचली आणि माझा निर्णय पक्का झाला. घरी गेलो आणि वडिलांच्या मनाविरुद्ध वागत असल्याने घर सोडून कपडे व अंथरून-पांघरूण घेऊन सत्याग्रह छावणीत राहण्यास गेलो. सदर छावणी डोंगरे हॉलजवळच्या व्यायामशाळेच्या इमारतीत होती. आता तेथे तालुका पंचायत समितीची कचेरी आहे. तेथील सत्याग्रही प्रामुख्याने खानदेशमधील होते. विनायकराव उपाध्ये, ग. भा. पंडित अशासारखे एकदोनच स्थानिक होते. वामनराव लिमये यांनी धडाडीने सत्याग्रह तर केला पण काही कारणाने त्यांना शंभर रुपये दंडावर सोडण्यात आले. ही एक पिछेहाटच होती. दांडी तुकडीतील सासवने आश्रमातील शास्त्रीजी (चिंतामणशास्त्री जोशी) व नाना काणे यांना आधीच शिक्षा झाली होती. तसेच काकासाहेब गाडगीळ व ठाण्याचे नानासाहेब दामले यांनाही अलिबागेस शिक्षा झाल्या. परंतु छावणीची संख्या वाढत नव्हती.

## मिळकतप्रेम

इकडे वडिलांनी सुचविले, एवीतेवी सत्याग्रहात गेलास, आता निदान घर-मिळकतीवर दंड वगैरे प्रकारे सरकारी रोष नको म्हणून बेदावापत्र लिहून दे. त्याप्रमाणे केले व वडिलार्जित इस्टेटीवरील हक्क सोडला. मिळकतीबाबत अन्य ठिकाणीही असे प्रकार घडल्याचे माझ्या लक्षात आले. माझा दृढ समज आहे की, मिळकत व मुलगा यामध्ये सामान्यपणे मिळकतीला प्राधान्य मिळते; कारण ती मिळविणे सोपे नसते. तीत इतरांचे हक्कही असतात. कायदेशीर युक्ती करून ती वाचविता येत असेल तर असे का करू नये? खरोखरी माझ्या वडिलांचा मी सर्वांत लाडका मुलगा. माझ्यावरील त्यांची माया कमी झाली असा समज यावरून झाला तर तो त्यांच्यावर अन्याय होईल. बेदावापत्रानंतरही त्यांनी वेळोवेळी माझ्याकरिता माझ्या भावंडापेक्षा जास्त खर्च केला. तेव्हा यामध्ये मिळकतप्रेम एवढीच गोष्ट खरी.

## पहिले भाषण

असहकारितेच्या दिवसांतील अनुभवाने मला सभांचे वावडे होते. त्या वेळी एवढ्या सभा झाल्या त्या मानाने कृती अत्यल्प झालेली. मला भाषण करता येत-नव्हते हे सांगण्याची गरज नाही. छावणीत दाखल झाल्यानंतर दोन दिवसांनी पुण्याचे रघुनाथराव खाडिलकर यांच्याबरोबर नागाव येथे गेलो. त्यांचें सुमारे तासभर भाषण झाले. मला सारखे दिसत होते की, त्यांचे भाषण श्रोत्यांना मुळीच समजत नव्हते. त्या सभेचा उद्देश तर ता. १२ मे च्या अलिबाग येथे होणाऱ्या

तालुक्याचे सामुदायिक सत्याग्रहात सहभागी होण्याकरिता जनतेला आणण्याचा होता. म्हणून ते शहरी भाषण सभेला समजावून देण्याकरिता मी बोललेच पाहिजे असे मला वाटले आणि मला एकाएकी कंठ फुटला. मी स्थानिक असल्याने माझी भाषा त्यांना समजली एवढेच. परत आल्यावर १२ मेच्या सत्याग्रहाची तयारी काय याविषयी छावणीत सहज चर्चा सुरू केली. तेव्हा आढळून आले की, गावोगावच्या पुढाऱ्यांनी लोकांना मोठ्या संख्येने घेऊन येण्याचे आश्वासन दिले आहे एवढेच. लावी पक्षीण आणि तिची पिल्ले हा मराठी तिसरीतील धडा आठवला. तालुक्याच्या नकाशाची चौकशी केली पण तो छावणीत नव्हता. तेव्हा रात्री तीन वाजले होते. घरी जाऊन नकाशा घेऊन आलो व तालुक्याची विभागवार वाटणी करून ते काम आम्ही आपसात वाटून घेतले आणि मगच आम्ही झोपलो. आम्ही त्याप्रमाणे गेलो नसतो तर जनतेला सत्याग्रहाचे आमंत्रण मिळाले नसते. स्थानिक पुढारी व्यक्तिश: हालचाल करण्याबद्दल साशंक होते. मात्र जनता उत्सुक होती. त्यामुळे माझ्यासारख्या अननुभवी स्वयंसेवकांच्या आमंत्रणाने ती हजारोंच्या संख्येने आली आणि ता. १२ मेचा सामुदायिक सत्याग्रह चांगलाच यशस्वी झाला.

या चळवळीत येण्याआधी जनता, खेड्यातील लोक हे सर्व माझ्यापुरते पुस्तकी शब्द; परंतु जुलैच्या पहिल्या आठवड्यात ठाणे तुरुंगात दाखल होईपर्यंत या जनतेचे मला अनेक प्रकारांचे दर्शन झाले आणि ते सर्व लोभस असे आहे. मी, दत्तू (दत्तोपंत बी.ए.,बी.टी.) गोडबोले, राजा चांदोरकर (राजाभाऊ चांदोरकर, रोहे) एक विद्यार्थी असा आमचा तिघांचा गट होता व आमच्याकडे अलिबाग, धरमतर रस्त्याचे उत्तरेचा आणि कनकेश्वर डोंगराचे पूर्वेकडील खारेपाट नावाने ओळखला जाणारा तालुक्याचा विभाग होता. काही कल्पना तर काही अनुभव यावरून मी आमचे वागण्याचे नियम ठरविले. ज्या गावी जाऊ, त्या गावचे देवळात आपला मुक्काम ठेवावयाचा, सत्याग्रहाची पदे म्हणत गावभर हिंडणे, स्थानिक पुढाऱ्यांना भेटून आमचा हेतू व सभा करण्याची इच्छा समजावून सांगणे, कोणी भोजनाचे आपण होऊन आमंत्रण दिले तर तेथे भोजन, नाहीपेक्षा चणे-कुरमुरे, सभेनंतर रात्रौ गावातच मुक्काम, दोनचार दिवसांनी अलिबागला जाणे इत्यादी नियम केले. या वेळचे काही अनुभव सांगणे युक्त ठरेल.

### काही अनुभव

हाशिवरे येथे प्रचारासाठी गेलो असता गावच्या एका पुढाऱ्याच्या ओटीवर बसून आमचा उद्देश त्यास समजावून सांगत होतो. गांधीजी आणि सत्याग्रह याबद्दल जिव्हाळा वाटूनही तो आमचे म्हणणे थंडपणे ऐकून घेत होता. दिवस वैशाखाचे, बिनझाडीचा रखरखीत असा खारेपाट. साहजिकच तहान लागली

म्हणून मी 'थोडे पाणी प्यायला देता का?' म्हणालो. एकाएकी वातावरणात फरक पडला. त्याने आपल्या सुनेला हाक मारली. तिला दूर असलेल्या गावच्या तळ्यावर जाऊन कळशी घासून पाणी आणण्यास सांगितले. (खरे तर घरात पाणी होते.) आणि तो आमच्याशी ओलाव्याने बोलू लागला. कारण मी एक ब्राह्मण नव्हतो, तरुण वकील नव्हतो, तो आगरी शेतकरी नव्हता तर एक माणूस दुसऱ्या माणसाजवळ बोलत होता.

पोयनाडला गेलो. गावच्या बाजारात प्रचार करीत हिंडत होतो. तावडे नावाच्या शिंप्याने ११ वाजता येऊन चौकशी केली. 'माझ्या घरी जेवायला याल का?' विचारले. आम्ही 'हो' म्हटले. तो तयारीला लागला. गावातील पांढरपेशांना आणि आमच्या आप्तांना हे समजले. आमची सत्याग्रहाची भसाड कवने ऐकूनही ते जागे झाले नव्हते. पण आता खडबडून उठले. येऊन म्हणाले, 'त्या शिंप्याकडे का जेवता?' आम्ही उत्तरलो, 'त्याने अगत्याने बोलविले म्हणून.'

शहाबाजेस गेलो. 'या गावी जाऊन प्रचार करून तर या' असे आम्हास अलिबागेत सांगण्यात आले होते, पण त्याचा अर्थ समजला नव्हता. गावात शिरताच 'या बामणानु' या शब्दांत जे थंडे व उपहासात्मक स्वागत झाले, त्याने तर आम्ही थिजलो. आम्ही पदे म्हणत हिंडू लागलो. इतक्यात आमच्यापैकी एकाचा वर्ग-मित्र भेटला. त्याने चौकशी केली. शेवटी विचारले, 'कुठे जेवणार?' आम्ही म्हणालो, 'तुझ्या घरी.' गावात एकाएकी वीज सळसळली. आमच्या रात्रीच्या सभेला घरटी एक मनुष्य आलाच पाहिजे अशी गावपाटलाने हाक मारली. तेव्हापासून आजतागायत शहाबाज हा माझा मित्रगाव आहे. याच गावी १९२९ डिसेंबरमध्ये महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांची परिषद यशस्वीपणे भरली होती.

पेझारीचा अनुभव याहून निराळा. गावात दुपारी बारा वाजता शिरत होतो. पहिल्या घरी नव्या रिवाजाप्रमाणे पाणी मागितले. घरमालक पुढे आला. त्याने बादली, तांब्या दिला आणि आम्हास विहिरीकडे नेऊ लागला व म्हणाला, 'मी मुसलमान आहे.' आम्ही म्हटले, 'तुमच्या घरचे पाणी आम्हाला चालते.' तो म्हणाला, 'नाही, मी तुमचा धर्म बुडविणार नाही.' त्याच दिवशी दुपारी चारच्या सुमारास ज्या देवळात आम्ही उतरलो होतो तेथे दोनचार गावकरी आले. त्यांनी विचारले, 'दुपारी जेवलात कुठे?' आम्ही म्हणालो, 'कोणी घातले नाही, आम्ही जेवलो नाही, चणेकुरमुरे खाल्ले.' त्यांनी विचारले, 'आमच्या घरी जेवाल?' आम्ही म्हणालो, 'जरुर, पण आम्ही शाकाहारी आहोत.' भांडी स्वच्छ घासली गेली. आमच्याकरिता ऊनऊन स्वयंपाक तयार झाला आणि यातून

आमच्या प्रचारातून, भाषणातून नव्हे तर वागणुकीतून जन्माचे सहकारी लाभले. सत्याग्रहात हजारोंनी भाग घेतला. शंभर-दिडशे आगरी तरुण मोठ्या आनंदाने गेले.

**भाषणात काय यावे?**

सभेतील भाषणाचा एक साचा तयार केला. प्रथम स्वराज्य म्हणजे काय हे सांगावयाचे. स्वराज्य–आपले राज्य–प्रत्येकाचे राज्य. प्रत्येकाचे घर असते तसे. स्वराज्यात काय असेल? पिण्यास गोडे पाणी, शिक्षणाची सोय, दवाखाना, रस्ते, इतर सर्व सोयी. हे सर्व प्रत्येक लहानशा खेड्यातही येऊन चालणारे राज्य आपले आहे असे वाटणे म्हणजे स्वराज्य. हे येईपर्यंत त्या गावात स्वराज्य नाही. हे स्वराज्य आज नाही, इंग्रजांचे–परक्यांचे राज्य आहे. ते घालवावे म्हणून सत्याग्रह. ते घालवून त्याच्या जागी स्वराज्य आणावयाचे आहे. घर जसे घरातील सर्वांचे असते तसे स्वराज्य. त्याकरिता सत्याग्रह म्हणजे उघड बंड, पण यात कोणास दुखवावयाचे नाही. भाषणाचा रिपोर्ट घेणारा पोलिस, शिक्षा करणारा मॅजिस्ट्रेट, कोणासही दुखवावयाचे नाही. आपण सत्याग्रह करतो आपले कर्तव्य म्हणून, तो जे करतो ते त्याला आपले कर्तव्य वाटते म्हणून करतो. तेव्हा त्याचा राग करून चालणार नाही. म्हणून गांधींचा सत्याग्रहाचा मार्ग. यातून एका नव्या समानतेवर, माणुसकीवर आधारलेला नव समाज निर्माण करण्याचा स्वावलंबी धडा नकळत शिकविला जात असे. इंग्रज परका म्हणून नाही तर त्याच्या राज्यात स्वराज्य नाही, ते असणार नाही म्हणून सत्याग्रह. भांडण इंग्रजांशी नव्हे, त्याच्या सरकारशी–त्याच्या कार्यपद्धतीशी. सर्व एका परमेश्वराची लेकरे आहोत असे वाटले पाहिजे इ. इ. असा प्रचार आणि समानतेची निरागस वागणूक यातून काही निराळे जन्मास येत होते. आम्ही आणि लोक या परस्परांत एक नवीनच बदल होत होता. आम्ही तीन घरचे तिघे जण, पण आमचा परस्परांत एक नवीनच बदल होत होता. मी वकील नव्हतो, वकिलाचा मुलगा नव्हतो. गोडबोले कॉलेज विद्यार्थी नव्हता, याज्ञिकी करणाऱ्या वडिलांचा मुलगा नव्हता. राजा चांदोरकर एक शाळकरी मुलगा नव्हता. आम्ही तिघे गांधींचे. त्यांच्या सत्यअहिंसेचे सत्याग्रही होतो. तसे वागत होतो.

**जंगल सत्याग्रह**

मिठाचा कायदेभंग संपल्यानंतर छावणी बंद होणार होती, पण आमचे नेते उपाध्ये मास्तर (महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे भावी अध्यक्ष) यांनी ठरविले संगमनेरला न जाता येथेच जंगलसत्याग्रह करू. मी जंगल कायदा वाचला. शेतकऱ्यांना आणि गावकऱ्यांना काय अडचण होते ती समजावून घेतली आणि

आपला सत्याग्रह सविनय आहे, अहिंसात्मक आहे हे लक्षात ठेवून जंगलच्या बंद भागात प्रवेश करून गवत आणावयाचे असे ठरविले. काठी, लाठी, कुऱ्हाड, कोयता ही सर्व विचारपूर्वक त्याज्य ठरविली. सत्याग्रहाचा दिवस व वेळ जाहीर करून मगच सत्याग्रह करावयाचा. असे न केल्याने पनवेल तालुक्यात चिरनेर येथे गोळीबार झाला.

इतर ठिकाणी प्रचार करण्याच्या दृष्टीने उपाध्ये उरणला गेले. येताना अकरा सत्याग्रही घेऊन आले आणि आपण तुरुंगात गेले. प्रत्येक स्वयंसेवक कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने त्याला भाषण करता आले पाहिजे,'आपली चळवळ कशाकरिता आहे व ती कशी करावयाची हे त्याला इतरांस पटवून देता यावे, या हेतूने त्याचे शिक्षण हाती घेतले. गावात कसे वागावयाचे याचे आमच्या ताज्या अनुभवावरून धडे तयार केले. त्याचबरोबर प्रत्येक गावची आर्थिक, सामाजिक, सर्व प्रकारची माहिती मिळावी या दृष्टीने प्रश्नावली तयार केली. थोडक्यात आम्ही नव्याने बनलेल्या पुढाऱ्यांनी, पुढाऱ्यांची टांकसाळ सुरू केली.

आमच्या छावणीत एक सत्याग्रही मुंबईहून आला. दोन दिवसात काही पोलिसांजवळ तो बोलताना आढळला. कदाचित् ओळखही असेल. आम्हा नेते (!) लोकांत खाजगी चर्चा सुरू झाली. एक विचार त्याला काढून टाकावा असा आला. मी म्हणालो, 'आपले हे उघड बंड आहे. यात गुप्त काही नाही. जे खाजगी आहे ते आपण जरूर खाजगी ठेवू शकू आणि तो खरा नसेल तर आपल्याकडील पावसाळ्यातील खेडेगावचा चिखल आणि इतर अडचणी पाहून तो आपोआप कंटाळेल. थोड्या दिवसांनी तो गेलाही पण पोलिसचा व त्याचा काय संबंध हे शेवटपर्यंत कळले नाही. आमचे उघड बंड असल्याने पोलिसासकट सर्वांशी सभ्यपणाने, माणुसकीने वागले पाहिजे हे आमच्या मनात पूर्णपणे बिंबले होते. या वागणुकीमुळे पोलिस व अंमलदार यांचे आमचे व्यक्तिगत संबंध सलोख्याचे होते. मला मानगुटी धरून पकडणारा आणि गावच्या नगरशेटला तुझा जीव पिस्तुलाच्या गोळीच्या किंमतीइतका नाही, असे सांगणारा होम इन्स्पेक्टर हमदुल्ले मरेपर्यंत आठवड्यातून एकदा तरी मजकडे येऊन सुखदु:खाच्या गोष्टी करी.

## सत्याग्रह कोणी करावा

अलिबागेत मा. के. सहस्रबुद्धे म्हणून इंग्रजी शाळेत एक शिक्षक होते. एके दिवशी ते मजकडे आले सत्याग्रहात येतो म्हणून. त्यांच्या आजीने त्यांना वाढविले होते. कारण त्यांचे मातापिता त्यांच्या लहानपणीचे दिवंगत झाले होते हे मला माहीत होते.म्हणून मी विचारले, 'आजीची व्यवस्था काय केली?' ते म्हणाले 'एक सद्गृहस्थ म्हणाले आहेत त्या मजकडे जेवतील म्हणून.' मी म्हणालो, 'पुण्याला वारकऱ्यांना (वारावर जेवणारे) पुष्कळ वेळा 'जेवणे झाली' किंवा

'उशीर आहे' अशा पाट्या पाहाव्या लागतात. तेव्हा त्या सद्गृहस्थाने माझ्यासमोर सांगितले पाहिजे की, ते तुमच्या आजीस दरमहा दहा रुपये देतील.' ते घडले नाही आणि एक स्वयंसेवक कमी झाला. मजवर कोणी टीकाही केली, पण मी योग्य तेच केले अशी माझी खात्री होती व आजही आहे.

असाच एक प्रकार सन १९३२ मध्ये घडला. आम्ही जानेवारीत अलिबागच्या हिराकोटात होतो. चार दिवस ठेवून पोलिसकडे हजेरी देण्याची अट लावून सोडत आणि मग अट पाळली नाही म्हणून खटला भरीत. अशी नोटीस मिळाली तर काय करावे असा प्रश्न चर्चेस आला. पुष्कळांच्या मते उत्तर सोपे होते; अट न पाळणे व तुरुंगवास पत्करणे. आचार्य ढवण म्हणाले, 'तेवढा एकच मार्ग आहे.' मी म्हणालो, 'नाही, अशी परिस्थिती असू शकेल की, अशी मानहानिकारक अट पाळूनही बाहेर राहिले पाहिजे.' तेथून गांधीजींच्या नावे पत्र लिहिले. त्यांचे एका पोस्ट कार्डावर उत्तर आले, 'उसमें अधर्म नहीं धर्म हो सकता है!' किती सावध पण स्वच्छ उत्तर आहे. १९४२ मध्ये काय घडले? रत्नागिरीचे आप्पासाहेब पटवर्धन तुरुंगात होते. त्यांच्या मातोश्री आजारी पडल्या. आप्पासाहेबांचे बाहेर असलेले भाऊ समर्थ होते, जाणते होते. पण आईची शुश्रूषा आपणच करावी असे आप्पासाहेबांच्या मनाने घेतले. त्यांनी सरकारशी पत्रव्यवहार केला व कायदेभंग करणार नाही ही अट मान्य करून ते बाहेर आले. कारण आईची शुश्रूषा हे त्यांना आपले पहिले, आदय कर्तव्य वाटले. असा असतो सत्याग्रह आणि तसा तो असावा.

### सहभोजन

छावणी मोडली. मी घरी राहू लागलो. घरी माझे खेडेगावचे सहकारी कधी कधी येत. एकदा माझ्या वडिलांनी त्या मित्रांना जेवणास थांबण्यास सांग असे सांगितले. मी वडिलांस हळूच सांगितले. आमची पाने अंगणात मांडा, आम्ही एका पंक्तीला बसून जेवू.. त्या दिवसापासून त्या सर्व मंडळींना आमचे स्वयंपाकघरात प्रवेश मिळाला. मग त्यात ब्राह्मणेतर असो की मुसलमान. १९३५ मध्ये मी ठाण्यास वकिलीकरिता गेलो. १९३७ मध्ये उरणचे आमदार भाईजी एक दिवस म्हणाले, 'उदया तुझ्याकडे येतो.' मी म्हणालो, 'या, जेवणासच या.' ते म्हणाले, 'नको, मी जेवून येईन.' त्यावर मी म्हणालो, 'उरणची बस सकाळी ७·३० वाजता सुटते तेव्हा जेवणार? जेवणाला येणार नसाल तर येऊ नका.' ते आले. माझ्या घरात आमच्या नेहमीच्या जेवणाच्या जागी आम्ही शेजारी बसून जेवलो आणि मग त्यांच्याकरिता चहा करण्यास माझ्या पत्नीस सांगितले; कारण कोकणी मुसलमान सामान्यपणे जेवणानंतर चहा पितो. मग भाईजी म्हणाला, 'मी अलिबागेस येतो पण कुठल्याच हॉटेल किंवा खाणावळीत जेवण मिळत नाही. म्हणून शेवटी कोळीवाड्यातील

मलबाऱ्याच्या हॉटेलात जावे लागते. म्हणून जेवणास येणार नव्हतो.' मी सांगितले, 'तुला माहीत नाही पण तुझे वडील अलिबागेत माझ्या वडिलांच्या घरी जेवले आहेत.'

१९४२ साली मी भूमिगत असताना दाढी वाढवून बोहरी वेषात वावरत होतो. एक परिचित भेटले. आग्रहाने मला घरी घेऊन गेले. चहा दिला आणि मग सांगतात, 'कपबशी विसळ, नाहीतर आई रागवेल.' मला त्या गृहस्थाच्या असा राग आला पण नाटक वठविले. कपबशी धुतली.

**भाषण व अटक**

उपाध्ये यांचे रोहचास भाषण व्हायचे होते; पण ते तुरुंगात गेले म्हणून मी गेलो. नेण्याकरिता भालचंद्र कुलकर्णी यांचे मोठे बंधू तसेच एक मराठा शाळाशिक्षक आले होते, एवढे आठवते. धरमतरहून निघालो. नदीला पाणी होते म्हणून नागोठण्यास थांबावे लागले. तेथे दिनाभाऊ नेने यांच्याकडे जेवलो. बसताना त्यांनी मजकडे बघितले. मी सांगितले, 'एका पंक्तीत आमची पाने मांडा.' रोहचास बरोबरीच्यांच्या सांगण्यावरून आबासाहेब मेहेंदळे यांच्या घरी गेलो. त्यांनी विचारता अलिबागच्या काका कुंटे वकिलांचा मुलगा म्हणून सांगितले. भोजनाची योग्य व्यवस्था झाली आणि रात्रीचा मुक्काम शेजारीच असलेल्या देवळात चांगले अंथरूण घालून आबासाहेबांनी केली. 'रात्री तुमची सभा उशिरा होणार तेव्हा हे सोयीचे आहे' असेही म्हणाले; पण देवळातला मुक्काम माझ्याप्रमाणे त्यांच्याही सोयीचा होता. गृहस्थ धोरणी. दुसऱ्या दिवशी उजाडत देवळात चौकशीला आले, आणि हळूच हातात पाच रुपयांची नोट ठेवली. तसेच कोकबनचे रावसाहेब तेंडुलकर. १९३२ च्या चळवळीत मी भूमिगत असताना मला मुंबईस घरी बोलावून घेतले. हिंदु कॉलनीत मी गेलो. त्यांनी चहा आणि शंभर रुपये दिले. ही जुनी माणसे नंतरच्या पिढीपेक्षा जास्त समजुतीची, हवे तर धोरणी म्हणा.

रोहचाच्या भाषणावरून मला पकडले. वडिलांचे स्नेही व नेहमी येणे-जाणे असलेले रावसाहेब कुलकर्णी मामलेदार यांनी सहा महिन्यांची सक्त मजुरी व शंभर रुपये दंड केला. 'आपणास वाईट वाटले' असे ते माझे वडिलांस म्हणाले, पण त्यांच्या शाळकरी मुलाला त्यांचे वर्तन समजले नाही. परिणामी १९३२ साली तो मुलगा त्यांच्या माडीवरच आमची (बेकायदा) पत्रिका सायक्लोस्टाइलवर छापीत असे. यातून गांधीजींच्या सविनय कायदेभंगाचे, अहिंसेचे मर्म समजून येईल. आपण विरोध करतो, उघडपणे करतो पण तो सविनय, अहिंसक असल्याने सरकारी यंत्र चालविणाऱ्यांच्या घरात आपल्या-विषयीची सहानुभूती वाढते.

मला ता. ५ जुलैला पकडले. मी थळला हरिभाऊ महाजन यांच्याकडे गेलो होतो. होम इन्स्पेक्टर हमदुल्ले यांना माझ्या घरी मी थळला गेलो असल्याचे समजले. म्हणून ते टांगा घेऊन थळकडे वळले. ते आम्हास आल्याचे समजले तेव्हा हरिभाऊ व मी एका निवांत घरात जाऊन पुढील व्यवस्थेबद्दल सविस्तर बोलणे केले. त्यांच्या गावात छोटेसे भाषण केले आणि पायरस्त्याने अलिबागेस आलो. अलिबागकरांना माझ्या येण्याची सूचना असल्याने दस्तुरी नाक्यावर लोक जमले होते. त्यांच्यासह मिरवणुकीने मी निघालो. मारुतीच्या नाक्यावर आलो तेव्हा पाठीवर हमदुल्ले यांचा टांगा आला. हे दिवस पावसाळी. थळच्या रस्त्यावर चिखल व पाणी. हमदुल्ले टांग्यात आणि मी पायी पायी पण जवळच्या वाटेने अलिबागेस आलो म्हणून हे जमले. साहजिकच हमदुल्ले यांचा पारा वर चढला.

## सत्याग्रहाचे इंगित

रात्री लॉक-अपमध्ये मुक्काम. शेजारच्या कोठडीत एक तलाठी होता. काही भानगडीत सापडलेला. त्याला सकाळी हॉटेलमधून चहा मिळाला नाही. तेव्हा त्याने पोलिसला विचारले, 'अशा कोणाला पकडले आहे की मागच्या दाराने चहा मिळत नाही. काकासाहेब गाडगीळ; नानासाहेब दामले अशांसारखे या लॉकअपमध्ये आले तेव्हा हरताळ पडला, पण आम्हाला मागच्या दाराने चहा मिळाला, जेवणही मिळाले.' मला पाहून त्याला उलगडा झाला नाही. गावचा पोर तुरुंगात गेला याची गावकऱ्यांना हळहळ वाटली; कारण मी साऱ्या गावाला जवळचा, तर मोठे पुढारी मोठे होते एवढेच. माझ्या हे लक्षात आले व त्यामुळे सत्याग्रह यशस्वी होईल हे गांधीजी कोणत्या आधारावर प्रतिपादित असत ते मला उमजले. ही गोष्ट माझे बंधू प्रभाकर गोव्यात सत्याग्रहास जातो म्हणाले तेव्हा त्यांना सांगितली व म्हणालो, 'काही दिवस गोव्यात राहा, शिक्षक म्हणून कशाला, चणेफुटाणे विकणारा म्हणून. स्थानिक लोक तुम्हास ओळखू देत. मग तुमचा सत्याग्रह प्रभावी होईल. 'अपरिचित किंवा दूरस्थ ठिकाणी भूकंप झाला, दुष्काळ पडला, त्यातून हानी झाली तर आपणास जास्तीत जास्त अनुकंपा वाटते पण परिचिताला असा त्रास झाला तर मन, हृदय हेलावते. हा मनुष्यस्वभाव गांधीजींनी टिपलेला असला पाहिजे.

## तुरुंगात

शिक्षा होऊन ठाण्याच्या तुरुंगात रवानगी झाली. तेथे जुलै ते डिसेंबर होतो. महाराष्ट्रातील, मुंबईतील बडी बडी मंडळी तिथे होती. अहमदाबादहूनही पुढे एक तुकडी आली. आमच्या 'ब' वर्गात निरनिराळे अभ्यासक्रम चालू होते. मी मात्र कोणत्याच वर्गात गेलो नाही. वाचावे, चर्चा करावी, बड्यांचे निरीक्षण करावे असा दिनक्रम होता. वेतकाम शिकलो. शंकरराव देवांच्या हाताखाली

वाढपी झालो. अबीदअली जाफरभाई मुंबईचे एक नेकीचे पुढारी. पुढे केंद्रात मजूरमंत्री झाले. त्यांच्याजवळ ब्रिज शिकलो. अर्थात पत्ते चोरून आणलेले. तर जाबीरअली, हे तय्यबजी या प्रख्यात राष्ट्रवादी कुटुंबाचे जावई, यांच्याजवळ जर्मन शिकलो.

## आत्मतुष्टी

तुरुंगात होतो तरी तिकडम रीतीने महाजन, गोडबोले, याच्याबरोबर माझा तेथील चळवळीबाबत पत्रव्यवहार चालूच होता. हा पत्रव्यवहार केला, इतकेच नाही तर बेचाळीसमध्येच नव्हे तर बत्तीसमध्येही भूमिगत राहून काम केले. हे गांधींच्या धोरणाशी सुसंगत नव्हते तरी चळवळीच्या दृष्टीने करावेसे वाटले व केले. माझ्या एका सहकाऱ्याचे एकदा पत्र आले, 'मी एवढा त्याग, कष्ट करूनही मला गावच्या पुढाऱ्यांची मान्यता (ऑनरेबल रेकग्निशन) मिळत नाही याचा खेद आहे.' मी उत्तर पाठविले, 'तुला तसा खेद का वाटला हे मी समजू शकतो; पण मी नेहमीच माझ्या मनाच्या समाधानाकरिता गोष्टी करतो, त्यामुळे माझी दृष्टी निराळी आहे. माझे ध्येय आत्मतुष्टी. आपल्या मनाचे समाधान हे आहे. ही एक वृत्ती आहे. ती मी नेहमी जोपाशीत आलो. त्यामुळे आजही आत्मतुष्ट आहे.'

तुरुंगातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पुढारी आयुष्याची दहावीस वर्षे सार्वजनिक जीवनात घालविलेले असूनही चळवळीविषयी साशंक होते. माझ्यासारखी अननुभवी तरुण पोरे चळवळी चालवितात कशा आणि जनता त्यांना साथ का देते याचे त्यांना कोडे वाटे. पण माझा १९३०, १९३२, १९४० व १९४२ चा अनुभव असा आहे की, पुढारी जितका अननुभवी तितकी चळवळीची कल्पकता आणि जोर जास्ती. मला नेहमी वाटे की, दर चळवळीत मी शिळा होत आहे.

## बाहेर

तुरुंगातून सुटून आलो. माझा चालू कामाशी संपर्क होता, त्यामुळे काम हाती घेणे शक्य झाले. मात्र हरिभाऊंनी स्वयंसेवकांना मोकळे सोडले होते. त्यांचेवर सत्याग्रही शिस्त सुरू केली. दोन जणांना निराळ्या तऱ्हेने हाताळावे लागले. एक स्थानिक, शंकर नागू त्याचे वडील, ते मला मानीत, त्यामुळे ते जमले, तर दुसरा देवधर. तो होता अंधेरीहून आलेला. त्याला अलिबाग सोडून जा अशी समज दिली; पण तो अलिबाग सोडून वाघ्रणला पोहोचला, परंतु त्याच्या दुर्दैवाने मीही त्याच दिवशी कामानिमित्त तेथे पोहोचलो. त्याला पाहून विचारले, 'इथे कसा?' आणि माझे स्थानिक सहकारी कै. दामुअण्णा पाटील यांना सांगितले 'की रात्रीच्या भाजी व फुले घेऊन मुंबईस जाणाऱ्या मचव्यात याला बसवा.' त्यानंतर पुन्हा तो भेटला नाही. ही अहिंसक तऱ्हा होती असे मी

म्हणणार नाही. पण बरेच दिवस चटावलेल्या गृहस्थाला असेच वागविणे आवश्यक होते.

माझ्या आधी शास्त्रीजी व नाना काणे सुटून अलिबागेस आले, पण आमचा तेथील कारभार पाहून ते दोघेही प्रथम आपली बिघडलेली प्रकृती दुरुस्त करण्याकरिता अन्यत्र गेले.

नंतर काणे परत आले व त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही जिल्ह्यातून स्त्रीसेविकांना आणून ताडी दुकानांच्या लिलावावर यशस्वी तऱ्हेने निरोधन केले. परदेशी कापडही दुकानदारांच्या सहकार्याने अलिबाग, रेवदंडा येथे सील करू शकलो.

## एक धडा

एवढ्यात गांधी-अर्विन करार झाला व चळवळ मागे घेण्यात आली. मला हे आवडले नाही पण पुष्कळांनी सुटकेचा निःश्वास टाकला. मार्चमध्ये होणाऱ्या कराची येथील काँग्रेस अधिवेशनाला जाण्याआधी मी वऱ्हाडात गेलो होतो. अचलपूरजवळ परतवाडा येथे एका जाहीर सभेत चळवळ मागे घेण्याबद्दल नापसंती व्यक्त केली. तेथे नाना नगरनाईक या नावाचे एक कार्यकर्ते होते, पुढे ते आमदार झाले. त्यांनी माझ्या टीकेला समर्पक उत्तर दिले. ते म्हणाले, 'ही टीका करणारे माझे तरुण मित्र अविवाहित असावेत, तसेच उदद्योग न करता त्यांची दुपारची सोय असावी. त्यांचे ठीक, पण मी एक शेतकरी आहे. माझा संसार आहे. शेती आहे. तेव्हा अशी सुटी मिळालेली चांगलीच आणि झालेली तडजोड सन्मान्यही आहे.' आपला संसार, शेती सांभाळून मराठेशाहीत शिलेदारी, बारगिरी करणारे होते त्याची मला आठवण झाली. ते काही खडे सैन्य नव्हते. यामुळे गांधीजींना लोकांची नाडी नीट कळत होती असे मला दिसून आले. माझा दृष्टिकोण पेशेवार सैनिकासारखा भले बिनपगारी असू तर नगरनाईक यांचा नागरिक असून सैनिकाचा.

## प्रांतिक परिषद

कराचीहून परत आलो. जिल्ह्यात थोडा हिंडलो. तो १९३१ चा जून आला. जिल्ह्यात पनवेल येथे प्रांतिक परिषद भरवावी असे ठरले आणि चिरनेरचा गोळीबार व त्यातून चिरनेर खटला या पार्श्वभूमीवर हे साहजिकच होते. स्वागत-मंडळाचा एक चिटणीस या नात्याने प्रचार व निधी गोळा करण्यानिमित्त जिल्हाभर हिंडू लागलो. पनवेलीत आत्मारामशेट आटवणे यांच्या बागेत अधिवेशनाची तयारी होऊ लागली. पनवेलीस स्वागत कचेरीत आलो असता माझे तरुण स्नेही प्रभाकर गुप्ते यांजकडून समजले की, भोजनशाळेत स्पृश्य व अस्पृश्य असे दोन मांडव केले आहेत. तेव्हा स्थानिक

कार्यकर्त्यांबरोबर तेथे गेलो, आणि झालेली व्यवस्था काँग्रेस धोरणात बसणारी नाही हे पटवून ती रद्द करविली.

मध्यंतरी काँग्रेस अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल सासवने येथे आले. त्यांचे वाघ्रण येथे शेतकऱ्यांसमोर भाषण झाले. ते म्हणाले, 'इंग्रज फार फार तर जंगम गोष्टी नेऊ शकेल. तुमची जमीन तर स्थावर आहे. तुम्ही का भ्यावे?' हे शब्द शेतकऱ्यांच्या हृदयाला भिडले.

### सनद काढतो

मी एखादा आश्रम काढावा असे माझ्या काही स्नेह्यांना वाटत होते, तर स्वामी आनंद यांनी सरदारातर्फे मी महाराष्ट्र सेवक समाजात दाखल व्हावे असे सुचविले. मिशनशाळेत असताना ख्रिश्चन होऊ इच्छिणारा आणि झालेल्यांना मिशनऱ्याकडून कशी वागणूक मिळे हे पाहिले असल्याने म्हणा, त्यागाची तयारी नाही किंवा एकांडेवृत्ती असल्याने म्हणा, मी पोटाचा धंदा म्हणून कोर्टाची सनद काढली. यात माझ्या वडिलांनाही बरे वाटले. सनद देताना जिल्हा जज्जाने माझा गांधी सदरा पाहून कोर्टात कोणता पोषाख घालणार अशी पृच्छा केली. १९२९ च्या एप्रिल व आक्टोबर या पहिल्या एल्. एल्. बी च्या परीक्षेत गुणवत्तेत मी पहिला असल्याने मुंबई विदयापीठातर्फे एक सुवर्ण-पदक १९३० च्या एप्रिलमध्ये मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश यांचे हस्ते मिळाले. ते देताना न्यायमूर्तींनी विचारले, 'हे पदक कोणाचे नावे आहे हे माहीत आहे काय?' मी उत्तर दिले, 'होय, लोकमान्य टिळकांना राजद्रोहाबद्दल सहा वर्षांची शिक्षा देणाऱ्या दावर नावाच्या न्यायाधीशाचे नावे.' पुढे हाच गांधी सदरा समाजात प्रतिष्ठेचे प्रतीक बनला आणि आज पुन्हा तो मागे पडला आहे.

१९३२ च्या अगदी सुरुवातीस पनवेल येथील परिषद भरली त्याआधीच काँग्रेस व सरकार यांच्यामध्ये संघर्ष प्रत्यक्षात सुरू झाला होता. परिषद एका दिवसात आटोपली. लोकनायक बापूजी अणे अध्यक्ष होते. मातेचा पदर पेटला असता कोणता सुपुत्र मनात दुसरा विचार आणील असा दृष्टांत देऊन त्यांनी लढ्यात सामील होण्याचे आवाहन केले.

या अधिवेशनाकरिता अलिबागहून हिंदुस्थानी सेवादलाचे १५/१६ स्वयंसेवक आले होते. त्यांच्या शिस्तशीर कामाची प्रशंसा झाली. पण स्वागत-मंडळाचे खजिनदार तेथे भरलेले प्रदर्शन रात्रीकरिता बंद झाल्यावर पनवेलमधील व्यापारीमंडळींना घेऊन आले आणि त्यांनी प्रदर्शन उघडण्याची मागणी केली. पहाऱ्यावरील स्वयंसेवकांनी ते अमान्य केले. त्यातून गलका झाला. माझ्यासारख्यांना जाऊन प्रकरण मिटवावे लागले. पण सर्व जणांनी मान्य केले की स्वयंवसेवकांनी केले तेच योग्य. खादी प्रदर्शनातील स्टॉलवाले म्हणाले, 'या स्वयंसेवकांच्या भरवशावर आम्ही हजारो रुपयांचा माल पडला असताना रात्री

निर्धास्त झोपतो.' भोजन विभागाने या दलाची मदत मागितली. ती मंडळी पहाटे चारपासून रात्रीं दहापर्यंत अविरत काम करीत असल्याने साहजिकच त्यास अशी मदत –कुमक म्हणा– हवी होती. मी हो म्हणालो पण त्यात पाच ब्राह्मण आहेत का हे मला तपासले पाहिजे असे म्हणालो.

## पुन्हा लढा

१९३२ ची चळवळ सुरू झाली ती मुळी सरकारने काँग्रेस संघटना बेकायदा ठरवून आणि निरनिराळ्या कार्यकर्त्यांना ताबडतोब पकडून पोलिसाकडे हजेरी देण्याचे अटीवर सोडून, तुरुंगात जाणे अपरिहार्य करून... त्यामुळे १९३० प्रमाणे प्रचार करणे अशक्यप्राय झाले. हजेरीअट असणारे ती मोडून तुरुंगात जात होते. बेकायदा ठरविलेल्या काँग्रेसतर्फे काम चालू ठेवण्याकरिता काही करू लागताच अटक होत असे. त्यामुळे संघटित काम करावयाचे असेल तर ते गुप्तपणे करणे क्रमप्राप्त झाले आणि यातून उघड बंडाऐवजी संघटित संघर्ष उत्पन्न झाला आणि म्हणून काही कार्यकर्ते, विशेषत: डावी विचारसरणी असणारे भूमिगत झाले. मी गांधी विचार मानणारा असूनही भूमिगत होणे पसंत केले. मुंबईस राहून हे कार्य करीत राहिलो. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी पत्रव्यवहार करीत असे. त्यात स्वदेशीचा प्रचार करण्याचे काम काहीजणांनी हाती घ्यावे म्हणून प्रयत्न केला. पण हे काम हाती घेणारावरही सरकारी संक्रांत वळू लागली. मला मे चे अखेरीस पकडले व पनवेल येथे माझ्यावर माझ्या पत्रावरून खटला भरला. तो मी लढविला व त्यातून सुटलो. पण जेलबाहेर जाऊ शकलो नाही. पुन्हा स्थानबद्ध करून हजेरी देण्याची नोटीस बजावून सोडले. त्या वेळी पावसाळा जोरात होता. मजवर टेहेळणीही होती. पण जुलै महिन्याचे एका रात्री भर पावसात अलिबागहून थळला चालत गेलो व तेथून घोडागाडीने मांडवे येथे जाऊन तेथून तरीने मुंबईस गेलो व वऱ्हाडात पोहोचलो. तेथून पुन्हा अटक करून आणले व अठरा महिने सक्त मजुरी व तीनशे रुपये दंड अशी सजा झाली. सुटून येइपर्यंत चळवळ थंडावली होती. १९३४ मध्ये सरकारने काँग्रेसवरील निर्बंध मागे घेतले व मी काँग्रेस संघटना जिल्ह्यात नव्याने बांधण्याच्या कामास लागलो.



# वामन कृष्ण चोरघडे

जन्म : १६ जुलै, १९१४.

**प्रसिद्ध मराठी कथाकार.**

जन्म नागपूर जिल्ह्यात नारखेड या गावी.

मराठी व अर्थशास्त्र हे विषय घेऊन एम्. ए. आणि बी. टी. या पदव्या मिळविल्या. १९४९ पर्यंत वर्धा येथे महाविदयालयात अध्यापन. त्यानंतर नागपूरच्या कॉमर्स कॉलेजचे उपप्राचार्य. त्यानंतर महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाचे संचालक. याशिवाय अनेक समित्यावर काम. तरूण वयात गांधीवादाकडे आकृष्ट आणि ४२ च्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल तुरुंगवास.

१९३६ साली त्यांचा पहिला कथासंग्रह 'सुषमा' हा प्रकाशित झाला. त्यानंतर सतत ३६ वर्षे कथालेखन. याशिवाय लोकसाहित्य हा एक आवडीचा विषय. व त्यावर विपुल लेखन. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. काका कालेलकर, नर केसरी अभ्यंकर आणि सानेगुरूजी यांची चरित्रे लिहिली आहेत. शिवाय मराठी हिंदुस्तानी कोशही संपादित केला.

'माझी जडणघडण' या त्यांच्या आत्मवृत्तातून पुढील उतारा घेतला आहे.



## जनरल आवारी

वामन चोरघडे

१९३० साल. पंधरा-सोळा वर्षांचे माझे वय. स्वयंसेवकांच्या यादीत नाव नोंदवायला गेलो तो लहान म्हणून मला कोणी घेईना. पाया पडलो तरी कोणी ऐकेना. अभ्यंकर, धर्माधिकारी, पटवर्धन, दातार, तिजारे, कानेटकर ही मला ओळखणारी मंडळी तुरुंगात गेली होती. नव्या मंडळींशी माझी ओळख नव्हती. वानरसेनेत सामील झालो. अभ्यासाव्यतिरिक्त सारा वेळ पोस्टातून डाक आणणे, बुलेटिन चोरून वाटणे अशी कामे करू लागलो. ही कामे करताना आपण लष्कराच्या भाकरी भाजीत आहोत असे अजिबात वाटत नव्हते. हेच देशभक्तीचे काम असेही वाटत नव्हते. खाणेपिणे, लिहिणे, वाचणे सोडून हे काम वेगळे आहे, मोठे आहे, आपल्याला शोभेलसे आहे; अशी ऊर्मी सतत असायची.

नागपूरचा गढवालदिन गाजला. पोलिसांनी अडवलेल्या मिरवणुकीत मी सामील झालो. लाठीमार झाला. मिरवणुकीतील बड्या लोकांना घ्यायला पोलिसांच्या बंद मोटारी आल्या. लाठ्या खाऊनही जे माझ्यासारखे लोक पांगले नाहीत त्यांच्यावर आठदहा पोलिस चवताळून उठले. त्यांपैकी एकाने माझी तंगडी धरली आणि पोलिस कोतवालीपर्यंत (टाऊन हॉल ते कोतवाली हे सुमारे अर्धा फर्लांग अंतर) मेलेल्या कुत्र्याला ओढावे तसे फरफटत नेले. पाठ, खांदे खरचटून गेले. त्यांतून रक्त येऊ लागले. क्रोध आणि तो दबावा या गांधीजींच्या शिकवणुकीमुळे अधिक क्रोध, त्याबरोबर वेदना या दोहोंनी मी नुसता फणफणत, फुस्कारत होतो. मोठ्या मंडळींना निदान मोटारीत घालून नेले. थोडीशी ईर्षाही वाटली. तेवढ्यात आम्हालाही एका बंद मोटारीत कोंबण्यात आले आणि नागपूरपासून सोनेगावच्या पल्याड खापरीच्या रस्त्यावर रात्री दोन अडीचच्या सुमारास आम्हा तीन-चार जणांना मोटारीतून ढकलून पोलिसांची मोटार निघून गेली. तिथून पायी रखडत सकाळी सहा वाजता जेव्हा मी घरी आलो तो खूप शिकून, जाण घेऊन, नेणिवेची बिरुदे झुगारून! मला समजेना! मी कुस्त्यांच्या दंगलीत भाग घेणारा मुलगा. माझ्या उंचीमुळे मला दंगलीत माझ्या दीडपट जोड मिळायची. लाठीकाठी मला उत्तम येत होती. म्हणजे आठ दहा लोक अंगावर आले तरी प्रतिकार करू शकण्याइतकी शक्ती. पण मला जेव्हा पोलिसांनी

पाठीची सालटी निघेपर्यंत फरफटत नेले तेव्हा माझे शरीरबल, माझी लाठीकाठी माझ्या कामास आली नाही. या उद्वेगातून माझा जवळजवळ पुनर्जन्म झाला. मी चळवळीत भाग घेण्याचे सोडून दिले. अभ्यासही सोडला. ज्या सरकारी शाळेत मी जात होतो ती शाळा बंद झाली होती. मी क्रांतिकारकांच्याकडे ओढला गेलो.

जितेंद्रनाथदास ज्या दिवशी हुतात्मा झाला, त्या दिवशी मी मला काही कळत नसताना उपास केला होता. उपास मला नेहमीच सोपे वाटायचे कारण कंदिलाच्या उजेडात रात्री गुपचूप स्वयंपाक करणे मला कधीही आपले वाटले नाही. या जितेंद्रनाथदासाने काय स्फूर्ती दिली काही कळत नाही, पण मी मिळेल तेवढी क्रांतिकारकांची चरित्रे गोळा केली. माझ्या शाळेत मी एक हस्तलिखित मासिक काढीत असे. त्या मासिकात मला समजली ती सगळी चरित्रे लिहून काढली. काही न समजण्याजोगे माझे ते वय. पण त्या हस्तलिखिताचा मी जेव्हा शहीद विशेषांक काढला; तो वाचून मला प्रोत्साहन देणारे माझे मुख्याध्यापक श्री. ना. के. बेहेरे यांनी मला घरी बोलाविले. माझ्या पाठीवर हात फिरवून ते म्हणाले, 'हा अंक प्रकाशित करू नकोस. तो प्रसिद्ध झाला तर पोलिस तो जप्त करतील. लेखणीसाठी तू तुरुंगात जावे हे मला आवडणार नाही. बंदूक, पिस्तुले वापरताना तू मेलास तर तुझ्या सगळ्या कुटुंबाची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे.' मला त्यांचे बोलणे फारसे समजले नाही. त्या वेळी सगळीच माणसे मला समजणार नाही असेच कटाक्षाने बोलत होती. मी चिडत होतो. तरीही समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. माझ्या 'चेतना' हस्तलिखिताचा तो विशेषांक मीच जप्त केला. गुरु बेहेऱ्यांबद्दल मुख्याध्यापक म्हणून माझी भावना भक्तीची होती. तो अंक माझ्या हयातीपर्यंत आणि त्या अंकाचा कागद व शाई टिकेपर्यंत मी जपून ठेवणार आहे. त्याला आज आणि उदया काही महत्त्व नाही, हे मला ठाऊक आहे. दुसरा कुणी काय माझ्या पोटच्या मुलांनाही त्याचा उपयोग नाही हेही मी जाणतो. माझ्या वडिलांच्या अस्थी मी ज्या कोणत्या भावनेने जपून ठेवल्या होत्या तीच भावना या चेतनेपोटी आहे.

परत जनरल आवारींच्या आठवणीवरून अव्हाटा गेलो. सत्याग्रहाच्या प्रत्यक्ष चळवळीतून मी बाजूला झालो. राष्ट्रीय स्वयंसेवकसंघात मी तन-मन-धनाने सामील झालो होतो. हा संघ डॉ. हेडगेवार यांच्या चरणी डोके ठेवून त्यांची वत्सल अनुमती घेऊन मी सोडून दिला. कुस्ती, दांडपट्टा या अत्यंत चिर आणि उपयुक्त अशा गोष्टीवरचे माझे लक्ष उडाले. आणि क्रांतिकारकाचे नाव गाव, शब्द या पायी मी तीन-चार वर्षे खराब केली. भगतसिंगांचे "Gandhi on War Path" हे हस्तलिखित माझ्याजवळ जपून ठेवण्यात धन्यता वाटू लागली. लौकिक दृष्टया माझ्या विपन्नावस्थेचा आणि मानसिक दृष्टया माझ्या

संभ्रमाचा साक्षी अजूनही एक आहे; तो म्हणजे बाबा आमटे! या माणसाला आता एकेरी नावाने संबोधणे हास्यास्पद आहे. तो महर्षी व्हावयाचा आहे कारण त्याला त्याचा मार्ग सापडला. बाबा आपल्या पूर्वसुकृताच्या पुण्याईने आज ऋषी झाला आहे. मी फार ज्ञान मिळविल्यामुळे एकी एक, दुरकी दोन या पोथीनिष्ठ चक्रव्यूहात सापडलो आहे. बाबा त्या वेळी कॉलेजात जात होता. तो दुसऱ्या कॉलेजात, मी दुसऱ्या कॉलेजात. त्याच्या माझ्या स्वभावात, वृत्तीत कसलेही साम्य नव्हते. आज बाबा खूप बदलला आहे. खूप निवळला आहे. त्याच्या मनाच्या स्फटिकाला पैलू पडले आहेत. कारंज्याच्या जैन मंदिरातील हिऱ्याच्या देवमूर्तीसारखे त्याचे तेज लखलखते आहे. पण त्या वेळी बाबा म्हणजे नुसती आग होता. माझ्या खोलीवर यायचा तो एखादया लांडग्यासारखा. बोलायचा नाही. त्याच्या माझ्या संबंधासाठी जणू बोलण्याची गरज नव्हती. झडप घालून त्याला हवी असलेली वस्तू उचलायचा आणि उडी मारून खिसे रिकामा करायचा. त्यात कधी सुरे असत, पिस्तूले असत. ही 'जपून ठेवायला हवीत' असा कुणाला तरी उद्देशून हुकूम दयायचा.

'अरे बाबा, जेवण बिवण झाले का?'

'होय.'

'काय जेवलास?'

''ही रिकामी पिस्तुले इथे टाकली. यांतल्या उरलेल्या गोळया गिळून टाकल्या.'

'म्हणजे?'

'अरे, माझ्या हाती लागलं तेव्हा त्या दोन गोळया नव्हत्या. कुठेतरी सार्थकी लागल्या असतील.'

योगवासिष्ठातल्या सूत्राप्रमाणे तो बोलत असे व मी त्याला भीत असे. मी खरंच भित्रा होतो. माझ्या घरच्या दारिद्र्याने मी सदाचा हबकलेला होतो.

एकदा बाबा कॉलेजात आला. मी संस्कृतच्या वर्गात बसलो होतो. व्हरांड्यात उभा राहून त्याने जोराची शिंक दिली. ती माझ्या ओळखीची होती. म. म. मिराशी शिकवीत होते. पण त्यांच्यापेक्षा बाबाला मी जास्ती भीत होतो. मी निमूटपणे वर्गाबाहेर आलो. बाबाने एक पुस्तक माझ्या हाती दिले. त्यामुळे आमचा कुणाला संशय आला नाही. कसले पुस्तक म्हणून मी उघडून पाहिले. पुस्तकात चिठ्ठी होती. गिचमिड लिहिले होते. 'राजगुरू नागपुरात आला आहे. तू आता आपल्या खोलीवर जा. मी त्याला तुझ्याकडे घेऊन येतो.

असा हा बाबा!

दुसरा एक माझ्याहून थोडा मोठा असा एक मुलगा माझ्यावर प्रेम करू लागला होता. अजात पुत्रालाच बळी देतात याची जाण मला हळूहळू होऊ

लागली होती. हा मुलगा म्हणजे एक वल्ली! तिचे गाजलेले नाव अभिमन्यू. हे लेकरू माझ्यापेक्षा जास्ती बिघडले होते. नातेवाईकांच्या भलेपणावर त्याला दोन वेळ सुखाने जेवायला मिळत होते. म्हणजे त्या वयातली मोठी चिंता त्याला नव्हती, जी मला होती. त्यामुळे तो जितका प्रसन्न असायचा तितका मी भेकड होतो. आपण हे भित्रेपण घेऊन जन्माला आलो अशी लाज मला वाटत होती. मी स्वत:ला देवापुढे लोटून घेतले. त्याच्या इशाऱ्याने माझ्या जीवन-वाफ्यातले पाणी वाहत होते.

हा अभिमन्यू खराखुरा देशभक्त. आपल्या मगदुराप्रमाणे देशाचे कार्य करणारा. देशभक्तांच्या सभांच्या आधी लोक जमविण्यासाठी तो पहाडी आवाजात गाणे म्हणायचा. त्या वेळी लाउडस्पीकर नव्हते. ते काम अभिमन्यूचा आवाज करीत असे. पं. माखनलाल चतुर्वेदीचे—

'मुझे तोडकर हे वनमाली, उस पथमें तू देना फेक,
मातृभूमीहित शीष चढाने जिस पथ जाते लोक अनेक! ''
हे गीत किंवा—
जरां कोई जाके पूछे दफ्तरे शिमला के बच्चोंसे,
भगतदतदास ऐसे और नंबरदार कितने है
चखाऐंगे मजा बरबाद ए गुलशनके गुलची को,
बहार आ जाएगी उस दिन, जब अपना बागबां होगा!

या ओळी अजून मला स्पष्ट ऐकू येतात, आणि माझे थकलेले मन प्रतापच्या चेतनासारखे अन् शिवराजाच्या कृष्णेसारखे फुरफुरू, थयथयू लागते.

हा अभिमन्यू परवा परवापर्यंत मला भेटायचा. फुटक्या मडक्यासारखा झाला होता. शाळेवर बहिष्कार घातल्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्याला पोटासाठी एक अत्यंत हीन दर्जाची चाकरदारी करावी लागत होती. संसाराचे ओझे डोक्यावर होते. मला भेटला तो उराउरी. गुदमरून 'बापू' असे तो पुटपुटला. पूर्वीच्या जोमाने निराश हसला पण दात पडले होते. गडकोटांच्या खिंडारा-सारख्या पडक्या भिंतीवरून रात्री घुबडाचे आवाज प्रतिध्वनित व्हावे तसे त्याचे ते हसणे दिसले. माझ्या डोळ्यांना गळती लागली. त्याच्याहून मी सहस्रपट सुखी होतो. त्याबद्दल त्याच्या मिठीत असताना पुन: लाज वाटली. हा अभिमन्यू आणि बाबा आमटे जे जे काम मला सांगायचे तेच खरेखुरे देशाचे काम आहे ही माझी श्रद्धा होती. खरे तर या अभिमन्यूनेच हे बाबाचे भूत माझ्यावर बसविले होते. तोच मला महात्मा भगवानदीनांकडे घेऊन गेला होता. या ज्ञान व कर्मयोग्याच्या सत्याग्रह आश्रमात मी काही दिवस घालविले. मी तेथे तप तापात राहिलो तो अध्याय अगदीच वेगळा आहे.

एक दिवस दुर्वासासारखा हा तपस्वी, महात्मा भगवानदीन काहीही कारण नसता अकारणच आमच्या अंगावर धावून आला. म्हणाला,

'वह बेअकल मंचरशा (आवारी) जेलमें अपनी अकलसे बेमौत मरेगा। अपने सत्याग्रहवालोंपर क्या बीतेगी वह क्या जाने? सुनता हूँ जेलवालेने उसे पागल करा दिया है। और यहीके पागलखानेमें रखा है। और तुम दोनों साले दो जून भरपेट खाकर खुराटे भरते पडे हो।'

रागाने बोलले आणि रागात खोटेही बोलले. दो जूनच काय पण दोन दोन दिवस आम्हाला खायला मिळत नव्हते. कारण सत्याग्रह आश्रमात स्वयंपाकाला मज्जाव होता. भूक लागली तर आश्रमाच्या बाहेर सडकेवर यावे, कुणाला काही तरी मागावे आणि जे तो देईल ते खाऊन देशाची चिंता करावी. दही विकायला निघालेली एखादी बाई आम्हा कोवळ्या मुलांकडे पाहून आईच्या कणवेने आपल्या मडक्यातले अर्धे दही दयायची. आश्रमात भांडी नव्हती. म्हणून खादीच्या पंचात दही घ्यायचे आणि तिघांना पुरेल अशी वाटणी करून तो चक्का खायचा. भगवानदीनजींच्या वाटणीला फार थोडा चक्का ते घेत. हीच तर त्यांची तपस्या होती.

व्हाईसरॉय विलिंग्डनच्या दडपशाहीचा तो काळ होता. खऱ्या-खोट्या संशयावरून लोकांना तुरुंगात डांबले जात होते. स्वातंत्र्यसैनिकांना धडा शिकविण्याचा तो काळ होता. आवारीजींना नागपूरच्या झेंडा सत्याग्रहात अटक झाली होती. १९३० सालच्या गांधीजींच्या मिठाच्या आंदोलनात ते तुरुंगातच होते. १९३२ च्या लॉर्ड विलिंग्डनच्या दडपशाहीतही ते तुरुंगातच होते. पुढे तह झाला. बहुतेक पुढारी सुटले. आवारींचा या सत्याग्रहाशी संबंध नव्हता. यास्तव सरकारने त्यांना सोडण्याचाही प्रश्न नव्हता. गांधीजींचे अनुयायी सर्व सुटून स्वातंत्र्य मिळविण्याच्या मार्गासंबंधी नवे मनसुबे रचीत होते आणि जनरल आवारी मात्र तुरुंगात छळ सोशीत होते. त्यांना सोडविण्याचा कोणत्याही प्रकारचा प्रयत्न काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी केला नव्हता. आम्हा नागपूरकरांच्या गळ्यातले ताईत, आमचे आराध्य दैवत, आमचे प्रतिपरमेश्वर—नरकेसरी अभ्यंकर यांनाही आवारींबद्दल काही सोयर-सुतक उरलेले दिसत नव्हते.

महात्मा भगवानदीनांच्या आमच्या देखत उच्चारलेल्या त्या शापवाणीने आम्ही पेटलो. ते भगवानदीनासाठी नव्हे तर अभ्यंकरांसाठी! अभ्यंकरांना नागपुरी, वऱ्हाडी, छत्तीसगडी अशा शेकडो प्रकारच्या हजारो शिव्या तास दीडतास मी आणि अभिमन्यूने दिल्या. पण प्रत्यंतर तेच आले. इंग्रज जसे आमच्या लाठ्यांना बधले नाहीत तसेच आमच्या शिव्यांनाही बधले नाहीत. शिव्या संपल्या. तोंडे दुखली. आवारी आपले तुरुंगातच.

एक अशीच सकाळ. भूक सोसता सोसता पहाटे कोठे डोळा लागला होता. तेवढ्यात ते अभिमन्यू कारटे मला हलवू लागले–

'ए बापू, चल ऊठ. चल बरं माझ्याबरोबर.'

'कुठे?'

'आपण पागलखान्यात जाऊ.'

'त्याला अजून वेळ आहे रे! अजून दोन दिवस उपवास पडेल तर जावेच लागेल.'

'फालतू बकबक करू नकोस. चल ऊठ.'

'उठतो बाबा, पण जरा परसदारी जाऊन येतो.'

'गध्या! कालपासून पोटात काही नाही. परसदारी जाऊन काय होणार? आता चलतोस की–'

मी तर भित्राच होतो. निघालो त्याच्याबरोबर. सायकल-टांग्याची ऐपत नव्हती. आपल्याच पायाने चालण्याचे स्वातंत्र्य इंग्रजांनी अनवधानाने राहू दिले होते. पायी रखडत रखडत सकाळी दहाच्या सुमाराला नागपूरच्या पागलखान्याच्या फाटकाशी पोचलो. पहारेकरी आमच्यापेक्षा समजदार होता. तो कडक आवाजात एवढेच म्हणाला– "तुम अंदर नही जा सकते। तुम दोनों को अभी देर है। भागो! नही तो मेरे पास बंदूक है।"

बंदुकीची भीती वाटतच होती. आम्ही परतलो. आणि टेकडीवरच्या गणपतीला प्रदक्षिणा घालतो तसे पागलखान्याच्या विस्तीर्ण परकोटाला प्रदक्षिणा घालू लागलो. या सर्व अन्हिकात दुपार कलली. साडेबार वाजले. ऊन कडकले, भूक भडकली आणि आम्ही दोघेही एकमेकांवर कडकलो. वैतागात पागल-खान्याच्या परकोटाच्या पश्चिम भिंतीच्या रस्त्याशेजारी असलेल्या खुरट्या झाडाखाली उभयतात तह झाल्यासारखे एकमेकाच्या हातात हात घालून मा आणि अभिमन्यूने बसकण घातली.

वारा वाहू लागला. वेळ जाऊ लागला. काय करावे सुचेना. भूक मरायला आली होती आणि आम्ही दोघे रामनाम जपावे तसे आवारीचे नाव घेत बसलो होतो.

दिडदोनच्या सुमारास चारदोन दहीवाल्या नागपूरकडून येताना दिसल्या. दही विकून त्या आपल्या गावाला परत जात असाव्यात. त्यांच्यापैकी कुणाकडे दही असेल आणि ती जर फुकट दही देत असेल तर काय मजा! असा विचार दोघांच्याही मनात आला. विचार चांगला होता; पण तो विचारच. योगायोगाने त्या बायका तंबाखू खायला म्हणून आमच्याच झाडाखाली बसल्या. त्यांच्या गप्पा सुरू होण्याअगोदर अभिमन्यूने त्यांना विचारले, "ए बाई, आमच्या जनरल आवारी साहेबांना या पागलखान्यात कुठं ठेवलं आहे माहीत आहे?" त्या सर्व जणी प्रथम एकमेकाकडे आणि नंतर आमच्याकडे बघतच राहिल्या.

"कोन ग माय हा आवारी? आम्हाले काय मालूम बापा! आम्ही तर रोज या रस्त्यानं येतो पण आम्हाला काय ठावं नाही."

आमच्या दोघांचेही चेहरे पडले. तेवढ्यात एक म्हातारी म्हणाली,

'मी सकारी दही घेऊन इकडून गेली तव्हाभी तुम्ही इथिसाच बसले होते गा! आखिन कोनाले काहून नाही इचारलं?"

'विचारलं बाई, पण सर्व तुमच्या सारखं म्हणाले.'

'काहून ठेवलं गे त्याले पागलखान्यात? तुमचा कोण व्हय थो? मोठा मानूस हाय का?'

आमचे कुणी नाही. सरकारनं त्यांना जेलमधून या इथं आणू ठेवलं. खूपच माणूस मोठा आहे. देशाचं काम करतोय आणि सरकार त्याला खूपच भिते.'

'असं म्हणता! मंग मोठा माणूस असन! पन आमाले काही मालूम नाही बापा! पन एक मालूम हाय. मागं एक राजा इथीसा ठिवला होता –थे पाहा भितीच्या पल्याड त्या कोनूटचात एक घर दिसते.'

माझ्या डोक्यात थोडा प्रकाश पडला. मी झाडावर चढलो. म्हातारीने बोट दाखविले तिकडे पाहिले. एक वेगळासा मोठा वॉर्ड होता. तिथे कोणीही दिसेना. कंपाऊंडची काचा पेरलेली भिंत भरभक्कम उंच होती. तिथून तो वॉर्ड अर्धा फर्लांग तरी असेल. आम्ही अंदाज बांधला की आवारीजींना वेगळेपणानं इथेच ठेवले असले पाहिजे.

या अंदाजाला शकून म्हणून त्या बायांनी आम्हाला दही दिले. हुरूप आला. बाया निघून गेल्या आणि आम्ही त्या वेगळ्या वॉर्डाकडे बघता यावे म्हणून झाडावर चढून बसलो.

जे दिसले, घडले ते चाळीस वर्षांनंतरही स्पष्ट दिसते, आठवते. झाडावर बसून तास दोन तास गेले. वॉर्डात कसलीही हालचाल होईना. आम्ही दोघांनी स्वतःला वेडे म्हणून घेतले. दिवसभराच्या उपासाने डोळे जड व्हायला आले होते. चार साडेचारचा सुमार होता. उन्हे कलू लागली होती. आणि एवढ्यात–

अभिमन्यू एकदम ओरडला, 'बापू! ते बघ आवारीजी."

मी टक लावली. आवारीजी उघडेबंब टॉवेलवजा पंचा गुंडाळून वॉर्डाच्या व्हरांड्यात खांबाला धरून उभे होते. त्यांना ओळखायला उशीर लागला नाही. प्रकृती हट्टीकट्टी होती. चेहरा गुमान बेदरकार! कोंडलेला वाघ टिपण साधायला उभा असावा तसे आवारीजी पागलखान्यातील आयसोलेटेड स्पेशल वॉर्डाच्या व्हरांड्यातील एका खांबाला धरून उभे!

आमच्या दोघातही असा एक संचार झाला; देहाचे भान हरपले; अवसान चढले; हे अवसान मानवी नव्हते एवढे खास! मानवी असते तर पुढे आमच्याने जे घडले ते शक्यच झाले नसते. आम्ही दोघांनी एकाच वेळेला

चित्त्यासारख्या झाडाखाली उडचा घेतल्या आणि भिंतीकडे धूम ठोकली. मी उंच होतो, अभिमन्यू माझ्याहून ठेंगणा होता. कंपाउंडच्या भिंतीच्या आधाराने मी मख्ख घोरपडीसारखा चिकटून उभा राहिलो. अभिमन्यू माझ्या खांद्यावर चढला. चढताना भिंतीच्या काचांवर त्याचे हात टेकले. पाचही बोटे मधोमध कापली जाऊन रक्त वाहू लागले. माझ्या चेहऱ्यावर ते गळू लागले. पण त्या वेळी ते आम्हा दोघांनाही कळले नाही. भिंतीच्यावर डोके जाताच अभिमन्यू जिवाच्या आकांताने पण दबक्या आवाजात ओरडा करू लागला, 'आवारीजी, आवारीजी, आवारीजी!'

पंधरावीस मिनिटे तो हाका देत होता. कपाळावर हात मारून घेत होता. आवारीजी घट्ट उभे होते. डोळे बारीक झाले होते. परिचित आवाज त्यांच्या कानी केला होता. ते इकडेतिकडे भिरभिर बघत होते. त्यांनी आमच्या हाका ऐकल्या नक्की; पण प्रत्युत्तर नव्हते. थोडचा वेळाने ते आपल्या खोलीत गेले आणि निराश होऊन अभिमन्यू खाली कोसळला. रक्त गळतच होते. अभिमन्यू रडू लागला. मला निराश वाटले नाही. त्याला मी सांगितले, 'अभिमन्यू, तू आपल्या हातावर लघवी करून घे.' लहानपणीचा तो जखमेवरील इलाज होता. त्याने तसे केले आणि त्या वेळी माझ्या उंचीचा फायदा घेऊन काचेने आपली बोटे कापून घेत मी भिंतीच्या पलीकडे उडी घेतली. त्या बेहोष अवस्थेतच अभिमन्यूलाही आत घेतले. आम्ही आता पागलखान्यात शिरलो होतो. आपल्याला कोणी पकडील, जाब विचारील याचे भान नव्हते. आमच्या जवळच एका ओळीने समोर दार असलेले पण मागे खिडकी नसलेले तीन-चार संडास बांधलेले होते. त्यांचा आडोसा आम्ही घेतला. आपल्याला कुणी पाहिले तर नाही म्हणून आजूबाजूचा न्याहाळ घेतला. जीव धोक्यात होता पण भान नव्हते. आजवर लहान वयामुळे आमची कोणी कदर केली नव्हती. सत्याग्रहात घेतले नव्हते. पुढाऱ्यांची लहानसहान कामे करावी हीच आमची देशभक्ती होती. इथे जरी आपण पकडले गेलो तरी लहानपणाचा फायदा मिळेल, बेदम मार मिळेल पण कोंडून कोणी ठेवणार नाही, असा अंदाज होता. म्हणून असेल कदाचित, मनात भीतीचा लवलेश नव्हता. ही धुंद वेगळीच असते. ही मस्ती फक्त अनुभविता येते. वर्णन करता येत नाही, जिवाचे मोल कुरवंडी करायची तयारी असली तर शिवाची बुद्धी आणि बोल मनीमुखी येतात!

सगळा प्रकार पाचदहा मिनिटात आटोपला. आमच्याकडे पाठ करून विटामातीच्या आधाराने उभे असलेल्या त्या संडासा या ढुंगणांचा आडोसा घेऊन आम्ही दोघे ज्या वॉर्डाच्या दारातून आवारीजी आत गेले तिकडे टक लावून बसलो. दोनचार मिनिटेच अशी गेली. दार उघडून आवारीजी बाहेर आले.

त्यांच्या हातात एक लोटा होता. पुन्हा एकदा चित्त्यासारखी त्यांनी आजूबाजूला पाहून चाहूल घेतली. दोन पायांचे कोणी नव्हते. झाडावरची पाखरे आमच्या बाजूची होती, त्यांना भ्यायचे काही कारण नव्हते. आवारीजी व्हरांड्याच्या पायऱ्या खाली उतरून अंगणात आले. लिंबाच्या झाडावर चारदोन कावळे ओरडत होते, आपला लोटा सावरीत आवारीजी खाली वाकले. पारशी रंगाचा गोरापान हा माणूस. कसलेल्या हाडापेराचा, बलदंड, निधड्या छातीचा हा हाडाचा देशभक्त! हजार हिकमती अंगात होत्या म्हणून तर तुरुंगातले अधिकारी जेरीस येऊन त्यांनी आवारीजींची पागलखान्यात रवानगी केली होती. पागल म्हणून सिद्ध करून त्यांना रडत-रखडत, सडत-झगडत या जगातून उठविण्याचा त्यांचा मनसुबा सरकारच्या वतीने त्यांनी आखला होता. तो सिद्धीस गेला असता तर—

या 'तर' नंतरची कल्पना आमच्या तरी शक्तीबाहेरची होती.

आवारीजींनी एक लहानसा दगड उचलला आणि झाडावर भांडणाऱ्या कावळ्याकडे अशा बेताने फेकला की दगड नेमका माझ्या बाजूच्या चौथ्या संडासाच्या कवेलूवर पडला. तो इशारा होता, हे मी समजलो आणि मी कसल्यातरी प्रेरणेने मैला साफ करायला मागच्या बाजूचे जे भगदाड ठेवलेले असते, त्यातील रिसेप्टॅकल ओढून आत शिरलो. तेवढ्यात आवारीजी दारातून आत आले आणि त्यांनी कडी लावली. मला बघताच त्यांनी विचारले, 'कसा आलास? का आलास? सत्याग्रह आश्रमाची काय खबर आहे?' या प्रश्नांची उत्तरे दयायला वेळ नव्हता. मी खिडीच्या भोकातून शिरलो. अंगाला जे लागले होते ते सहन करण्याची शक्ती परमहंस वा योगी यांच्यातच असते, असे कुठेतरी मी वाचले होते. मी वर येताच मागोमाग अभिमन्यू आला. आम्हा दोघांना आवारीजींनी उघड्या अंगाने पोटाशी धरले. पुढचा संवाद फुसफुसत्या हिंदीत झाला. आवारीजींचे वक्तृत्व म्हणजे बेभान, अफाट, तोफेसारखे धडाक्याचे आणि मुरारबाजीच्या आवेशाचे! त्यांच्या मनाची अशी काही स्थिती झाली की त्यांना हळू बोलताच येईना. त्यांच्या डोळ्यातून अश्रू गळत होते. अभिमन्यूने त्यांचे डोळे पुसले आणि मी त्यांचे तोंड दाबून धरले व सांगितले, 'हळू बोला. इथे संशय येईल आणि तुमचेच नुकसान होईल.'

काही वेळा अशा असतात की, कोणत्याही वयाचा माणूस कोणालाही उपदेश करू शकतो.

आम्ही फुसफुसलो, 'आवारीजी, तुम्ही आता रडू नका. तुम्हाला इथे आणून ठेवल्याची खबर ही गुप्त आहे. तुम्ही कायमचे पागल ठरण्यापूर्वी इथून बाहेर पडायला हवे. आम्ही आजवर तुमचे ऐकत आलो म्हणून पुढचा उपाय तुम्ही सांगा.'

'एक उपाय मला सुचतो. तुम्ही उदया दुपारी ४-२० ते ४-३० च्या दरम्यान इथं या, मी असाच घुटमळत मैदानात फिरेन. तुमच्याबरोबर फोटोग्राफरला आणा आणि माझे फोटो काढून ते अभ्यंकरांना दया. पुढे काय करायचं ते अभ्यंकरच बघून घेतील.'

'पण आवारीजी यासाठी पैसे कुठून आणायचे? कालपासून आम्हीच तर उपाशी आहोत. तुमच्या नावानं दुपारी दही मिळालं तेवढंच.'

'रेल्वे स्टेशनजवळ बरजोरजीचं दुकान आहे. तुम्ही तिथं जा. माझं नाव सांगा तो पैसे देईल. त्याच्या पैशाने पोटभर जेवा आणि उदया दुपारी ठरल्या वेळी तो देईल त्या माणसाबरोबर इथे येऊन माझे आठ दहा फोटो काढा.'

भेट संपली. आवारीजी दार उघडून बाहेर गेले. आम्ही खुड्डीतून भिंतीच्या बाजूला आलो, धावत पळत तेलंगखेडी तलावावर गेलो. नागवे होऊन प्रथम कपडे धुतले आणि ते सुकेपर्यंत यथेच्छ पाण्यात डुंबत राहिलो. भूक मेली होती. आम्ही भुकेवर जय मिळविला याचेही भान नव्हते. त्या वेळी आम्ही दोघानी ज्या गोष्टी केल्या त्याहून अधिक ब्रह्मसूत्रामध्ये काहीही सांगितले नाही याचा मी आज निर्वाळा देऊ शकतो.

आम्ही तलावाच्या बाहेर आलो. ओले-कोरडे कपडे चढविले. कमरेखाली आणि कमरेवर असे दोनच कपडे अंगात होते. तरी महात्मा भगवानदीन म्हणायचे, 'अरे, किती कपडे वापरता तुम्ही? अंगावर एक कापड हवं. तुम्ही लहान आहात. कमरेखालचे तेवढे वापरून वरचे कपडे तुम्ही कोणाला तरी देऊन टाका.' पण ते त्या वेळेपर्यंत जमले नव्हते.

तेलंगणखेडीवरून आम्ही धावत पळत स्टेशनजवळचे बरजोरजीचे दुकान गाठले. सबंध दिवसाभराचे सुदैव त्या वेळीही अनुकूल होते. बरजोरजी भेटले. त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवला. त्यांनी आमच्या हातावर पाच रुपयांची नोट टेकविली आणि उदया बरोबर ३-३० ला एकतर मी येईन किंवा माझ्या भरवशाचा माणूस देईन असे सांगितले.

त्या वेळचे पाच रुपयें दहा बारा माणसांचे पोट भरवू शकत असत. आमच्या दोन दिवसाच्या उपासाच्या पारण्याला दोन रुपये रग्गड झाले. तीन रुपये आम्ही आमच्या कडसरीला घातले. एकदम रक्कम हरवू नये म्हणून दोन अभिमन्यूजवळ आणि एक माझ्याजवळ ठेवला. स्वतःच्या पोटासाठी खर्च न करता देशासाठी खर्च करण्याची प्रतिज्ञा केली.

दुसऱ्या दिवशी दैव अनुकूल होते. काल शिरलो त्याच मार्गाने आत शिरलो. आवारीजींचे फोटो काढले. लगोलग प्रत्येकी फोटोच्या चार चार प्रती काढल्या आणि रात्री नऊच्या सुमाराला आम्ही दोघे नरकेसरी अभ्यंकरांच्या घरी गेलो.

त्या वेळच्या पुढाऱ्यांच्या आगाऊ भेटवेळा ठरवाव्या लागत नसत. देशभक्त पुढारी हा चोवीस तासांचा पुढारी असे. त्याला त्याचे म्हणून कोणतेही स्वत:चे जीवन नसायचे. अभ्यंकरांनाही ते नव्हते. याचा फायदा घेऊन आम्ही सरळ त्यांच्या घरात घुसलो. कळले, ते जेवायला बसले आहेत. आम्ही सरळ स्वयंपाकघरात गेलो. अभ्यंकर जेवीत होते. लहानपणीच सुमारे पन्नास कोकिळांच्या मुंडचा त्यांनी मुरगळून टाकल्यामुळे त्यांचा आवाज वेदोच्चाराला अनुकूल अशा रेड्यासारखा होता. आम्हाला घुसलेले पाहताच पाण्याच्या घोटाने घास आत ढकलीत ते सौम्यपणे म्हणाले,

'का रे पोट्टेहो, काहून आलात बे? तुमचे तोंड तर खेटरं मारल्यावाणी दिसून राह्यले. पहिले जेवून घ्या मग काय ते सांगा.'

आमचे चेहरे कित्येक दिवस आम्ही आरशात बघितले नव्हते. त्या वेळी आरसा बघण्याची प्रथा नव्हती. मोठे आरसे पानठेलेवाल्याच्या दुकानात असायचे. तिथे उभे राहून चेहरा बघायचा तर दोन पैशाचे पान खावे लागत असे; . पण त्यावेळी त्या दोन पैशात ओंजळभर फुटाणे मिळायचे. पानापेक्षा ते चांगले लागायचे.

आम्ही जवळ जवळ पुढच्या दोन-तीन दिवसाचे जेवून घेतले. बाहेर आलो. अभ्यंकरांना फोटो दिले आणि आमच्या आवारीजींना सोडवा असा हाकारा देऊन त्यांचे दोन पाय आम्ही दोघांनी आमच्या अश्रूंनी भिजविले. अभ्यंकर शांत होते. त्यांनी प्रत्येक फोटोची एकेक प्रत स्वत:जवळ ठेवली आणि आम्हाला म्हणाले,

'लेकहो! लेकरू सांजच्या पायरी झालजूल पडल्या झोपलं पाहिजे आणि तुम्ही भडविच्यांनो आता दहा वाजले तरी जागे. पुढारी तुम्ही का मी बे? आता इथून पळता की मारू गांडीवर लाथ'?

आम्ही जोडे मारलेला चेहरा घेऊन बाहेर पडलो. जेवल्यामुळे खूप शक्ती आली होती. अभ्यंकरांच्या बोलण्यात कोणताही दिलासा आम्हाला दिसला नाही. त्यांच्या घरी खाल्लेल्या मिठाची याद ठेवूनही आम्ही त्यांना माफक शिव्या मोजल्या आणि सरळ दाण्डेकरांकडे गेलो.

आमच्या मनात त्या वेळी दाण्डेकरांचे जे अधिष्ठान होते ते इथे सांगायला हवे. आम्ही त्या वेळी ज्या दाण्डेकरांना पाहिले त्या वेळी दांडेकर म्हणजे भट्टीतून नुकतेच तापवून बाहेर काढलेले लाल लोखंड! पोरसवदा असलेला तरुण नागपूरच्या झेंडा सत्याग्रहात गाजलेला वीर होता. त्याच्या बोलाला वजन होते. वक्तृत्वाचे उधाण होते. समुद्राच्या लाटांचा आवेश होता. कर्णाला जन्मजात कवचकुंडले होती तसेच दाण्डेकरांना ईश्वराने अत्याचार झेलण्याचे सामर्थ्य दिले होते.

रात्री अकराचा सुमार होता. दाण्डेकर घरीच होते. भेटले त्यांना सारे सांगितले. 'देशकाम न करणारे दीडदमडीचे लोक सुटतात अन् मिशा वाढवतात आणि आमच्या आवारीजींना सरकारनं पागल ठरविलं! तुम्ही जर त्यांची सुटका केली नाही तर आम्ही तुम्हाला साक्षी ठेवून मरून जाऊ. सगळे पाप तुम्हाला लागेल.'

दाण्डेकर सचित होते. माझ्या बोलण्याने ते इतके मोकळे झाले, की मोठ्याने हसत आमच्या पाठीवर त्यांनी गुद्दा मारला. पण दुसऱ्या क्षणी गंभीर होत ते म्हणाले,

'गड्यानो, आवारीजी सुटावे असं मलाही वाटतं. सरकारनं त्यांना पागल ठरवलं म्हणूनच तो शहाणा आहे. आम्ही त्याच्याच प्रेरणेने झेंडासत्याग्रहात आपले हाल करून घेतले. पण त्यांना सोडविण्याइतका मी मोठा पुढारी नाही. आजच्या राज्यात जीव स्वस्त झाला आहे. तुम्ही दोघांनी खूप केलं. मी आता तुमच्यात सामील होतो. आपण दोघांचे तिघे होऊ अन् कामाला लागू. तुम्ही आता घरी जा अन् घरदार नसेल तर इथे या माझ्या खोलीत झोपा. जे असेल ते अंथरूण-पांघरूण देतो. गादीबेदी नाही रे बाबांनो! गादयागिरदया मला विकून खाव्या लागल्या. उदया सकाळी उठल्यावर तिघेही आपण शक्य असेल तेवढी दवंडी पिटवू. चिटणीस पार्कात रात्री जाहीर सभा घेऊ आणि लोकांपुढे सगळी हकीकत मांडू.'

सकाळी उठून आमच्याजवळचे तीन रुपये आम्ही कारणी लावले. नागपूरभर दवंडी पिटली.

सभेच्या तयारीला त्या वेळेला पैसा लागत नसे. कष्ट फक्त लागायचे. ते आमच्याजवळ खूपच होते. दवंडी मनापासून पिटल्यामुळे नागपूरच्या महाल विभागातील चिटणीस पार्कमध्ये रात्री साडेआठच्या सुमारास लोकांची ही गर्दी! दांडेकर व्यासपीठावर चढले. तंग विजार, सदऱ्याच्या बाह्या दुमडलेल्या, मिसरूड फुटत असलेले तारुण्य. जुना रुपया वाजतो तसा खणखणीत आवाज आणि दारिद्र्याची भरपाई करायला दिलेले बुलंद वक्तृत्व!

दांडेकरांचे भाषण सुरू झाले. त्यांनी आम्हाला व्यासपीठावर उभे राहायला सांगितले होते. आमच्याबद्दल काही वेळ बोलून ते गरजले—

"हे आवारी! तू जर इटालीत जन्माला आला असतास तर मुसोलिनी झाला असतास, अमेरिकेत जन्मला असतास तर लिंकन झाला असतास; पण तुझा जन्म या मुर्दाड हिंदुस्थानात झाला आहे. या देशातले लोक षंढ आहेत, नपुंसक आहेत. ते तुला असाच मरू देतील—"

दांडेकरांचे वाग्बाण सुरू झाले. त्यांना धर नव्हता. बंध नव्हता लोक ते सगळे ऐकून चेतले होते, पेटले होते. बसल्याचे उभे झाले होते.

रात्रींचे दहा वाजले आणि कुणाला काही कल्पना नसताना निरभ्र आकाशात वीज चमकावी, वारा नसताना नारळीचे नारळ खाली कोसळावे, श्रीकृष्णाचे सुदर्शन त्याच्या हातातून सुटावे, उधळलेला बैल शिंगे रोखून पुढे सरावा तसे मागच्या बाजूने अभ्यंकर –नरकेसरी अभ्यंकर– व्यासपीठावर चढले. उजव्या हातात त्यांनी कुणाचा तरी हात धरला होता. ती व्यक्ती म्हणजे जनरल मंचरशा रुस्तमजी आवारी ही होती. त्यांचा हात धरून आवारीजी वर चढले आणि सगळ्या चिटणीस पार्कची टाळी अशी कडाडली, अशी कडाडली की, जशी वीज कडकडावी! लोकांना उधाण आले पण सभेला बेशिस्तपणा नव्हता.

दांडेकरांनी भाषण संपविले. अभ्यंकरांचे भाषण सुरू झाले–

"घ्या रे गड्यांनो तुमचा आवारी! हे दोन पोट्टे काल रात्री दहा वाजता माझ्या घरी आले. माझं जेवण खराब केलं. दोघांना तर मी घराबाहेर काढलं पण या पोट्ट्यांनी मला काही झोप लागू दिली नाही. आज सकाळपासून जो मोटारीच्या चाकावर बसलो तो आता या न्यू इंग्लिशसमोर मोटार उभी केली. अरे, मी इंग्लंडचा बॅरिस्टर आहे. हा घ्या तुमचा आवारी. मी चाललो माझ्या घरी. आवारीस बोलू द्या. मी बसतो खाली अन् आवारीचे बोलणं सरायच्या अगोदर जर तुमच्यापैकी कोणी उठून गेला किंवा झोपला तर मी सांगून ठेवतो, की मग तो आहे आणि हा मोरू अभ्यंकर आहे."

आवारी बोलायला उठले आणि शब्द काढण्याच्या अगोदर त्यांनी मला व अभिमन्यूला आपल्या कवेत घेतले. ती कव जर धृतराष्ट्राची असती तर तिच्या शक्तीने आमचे पीठ झाले असते. तसे व्हायला आम्ही भीतही नव्हतो आणि दुर्योधन, दुःशासनही आम्ही मारले नव्हते. पण आवारीजींनी आम्हा दोघांच्या पाठीवर जेव्हा थाप मारली तेव्हा गोपालकाल्याच्या दहीहंडीतून अंगभर दूधलाह्या सांडाव्या तसे सुखी सुखी वाटले.

आवारीजींनी बोलायला सुरुवात केली तसे आम्ही खाली बसलो आणि कदाचित आम्हाला करता येण्याजोगे होते ते केले म्हणून असेल किंवा आमची कोवळी शरीरे शिणली म्हणून असेल आम्हाला आवारीजींचे शब्द, लोकांचा जय जल्लोष व टाळ्यांचा कडकडाट काही म्हणता काही ऐकू येईनासे झाले!

आम्ही त्या व्यासपीठावर गाढ झोपी गेलो.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# अप्पा पटवर्धन

जन्म : ४ नोव्हेंबर, १८९४, मृत्यू : १० मार्च, १९७१.

**महाराष्ट्रातील थोर गांधीवादी आणि सर्वोदयी कार्यकर्ते.**

जन्म रत्नागिरीपासून १० मैलांवर असलेल्या आगरगुळे या गावी. माध्यमिक शिक्षण रत्नागिरी येथे. वंगभंग आणि स्वदेशी चळवळ यांचा मनावर परिणाम. शालेय जीवनात सावरकर आणि कवी गोविंद यांच्या कविता पाठ केल्या. इंग्रजी आणि संस्कृत भाषांवर प्रभुत्व. मॅट्रिकच्या परीक्षेत पाचवा क्रमांक मिळविला. बी. ए. च्या परीक्षेत तत्त्वज्ञान विषय घेऊन पहिला वर्ग मिळविला. १९१८ ते १९१९ या काळात पुण्याच्या न्यू पूना कॉलेजात अध्यापन. १९१९ साली एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण. त्याच वेळी रौलट ॲक्ट विरुद्ध महात्मा गांधींनी चालविलेल्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी सत्याग्रहींच्या प्रतिज्ञा पत्रकावर सही करून ते पत्रक सत्याग्रह समितीकडे पाठवले. त्यानंतर गांधीजींची भेट होताच त्यांनी त्यांना यंग इंडियाच्या संपादकीय विभागात घेतले.

१९२१ साली गांधीजींच्या आदेशानुसार रत्नागिरीस परत आले. रत्नागिरीस राष्ट्रीय शाळा सुरू करण्याचा प्रयत्न केला. ती

शाळा बंद पडल्यावर अस्पृश्यतानिवारण आणि खादी प्रचार या कार्याला वाहून घेतले. १९३० च्या सत्याग्रहात भाग घेऊन कारावास सोसला. काही काळ रत्नागिरी जिल्हा काँग्रेसचे नेतृत्व सांभाळले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांनी आपले सारे जीवन विधायक कार्याला वाहून घेतले. गोपुरीचा आश्रम ही त्यांची सामाजिक प्रयोगशाळाच होती. ते म्हणत 'मुंबई युनिव्हर्सिटीचा नामधारी कलापती (एम्.ए.) मी कधीच झालो पण गोपुरी आश्रमात खराखुरा कलापती झालो.'

विनोबांची भूदान चळवळ आणि चलनशुद्धीची योजना राबवण्यात त्यांनी भाग घेतला.

त्यांच्या 'माझी जीवनयात्रा' आत्मवृत्तातील हे प्रकरण.

# भंगीकामाचा सत्याग्रह

अप्पा पटवर्धन

तुरुंगातील माझ्या भंगीकामाची कहाणी बरीच लांबलचक आहे, व दोनतीन वर्षेपर्यंत पसरलेली आहे,. तरीही ती एकाच वेळी संगतवार सांगून टाकणे सोयीचे होईल.

तुरुंगात मी मोठ्या पवित्र भावनेने प्रवेश केला हे यापूर्वी अनेकदा स्पष्ट केलेलेच आहे. पण तुरुगांत दाखल झाल्याच्या दुसऱ्या-तिसऱ्याच दिवशी त्या माझ्या पवित्र भावनेला धक्का देणारी एक जबरदस्त घटना घडली. मी हौदावर स्नान करीत असता एक फाटके कपडे घातलेला काळ्या वर्णाचा कैदी आला आणि माझ्यापाशी पाणी मागू लागला. मी त्याला पॉटभर पाणी घातले. ( तुरुंगात प्रत्येक कैदयाला थाली व पॉट -थाली म्हणजे छोटे घमेले, व पॉट म्हणजे छोटे पिप-अशी दोन भांडी शौचापासून जेवणापर्यंतच्या कामांसाठी मिळतात. ) त्याने पुन्हा मागितले व मी पुन्हा ही घातले. पण मग तो एक डबाच पुढे करून यातही पाणी घाला म्हणू लागला तेव्हा मी त्याला साहजिकपणे म्हटले, 'अरे, तू हात पाय तर धुतलेस. आता तुझे तुला पाणी घ्यायला काय जाते? दुसऱ्याला त्रास किती दयायचा?' त्यावर तो मला म्हणातो, 'नाही हो साहेब, आम्हाला हौदाला शिवायची बंदी आहे. तेवढयासाठीच तुमची आर्जवे करावी लागतांत.'

पुण्यातील हौदांवर हरिजन बायांना प्रथम त्यांचे राखेने घासलेले हांडे धुण्यासाठी आणि नंतर ते भरून घेण्यासाठी सवर्ण स्त्रियांची आर्जवे घटकान् घटका करताना मी पाहत असे. अण्णासाहेब भोपटकरांनी पुणे म्युनिसिपालिटीत १९२१ साली, किंवा त्या सुमाराला, ठराव मांडल्याचे पण तो नापास झाल्याचे मी वाचले होते, की हरिजनांना- त्या काळी 'हरिजन' शब्द नव्हता, 'अस्पृश्यांना'- हौद मोकळे व्हावे. पण तसलाच प्रकार आज १९३० साली आणि खुद्द सरकारी तुरुंगातही चालू असेल अशी कल्पनाही नव्हती.

—"तू कोण?"

"मी कातकरी."

"कातकऱ्यांची तर गावातही शिवाशिव मानीत नाहीत आणि हा तर तुरुंग आहे. मग तुला हौदाला शिवायला हरकत कसली?"

"पण आम्ही कुंडीकाम करतो."

—"कुंडीकाम म्हणजे?"

"हे तुमचे पिसाब-झाडे उचलून आणतो. संडास धुतो. संडास धुवायला पाणी पाहिजे आहे."

—"किती शिक्षा?"

"तीन वर्षे."

—"काय केले होतेस?"

" चोरी. पोट जाळावे लागते त्यासाठी आश्विनात शेतातील भाताच्या ओल्या लोंबी कापून नेल्या होत्या. आधीचे पण दाखले होते, त्यामुळे तीन वर्षे मिळाली." (दाखले म्हणजे आधीच्या शिक्षा.)

कातकऱ्याबद्दल मला विशेष प्रेम वाटत असे. धनुर्धारी राम हे माझे आराध्य दैवत होते. कातकरी आमच्या गावी लहानपणी वानर मारायला येत- हे ही धनुर्धारी रामचंद्राचे 'वानर' हे बहुधा कातकरीच होते अशी माझी समजूत आहे. वानरमाऱ्या कातकऱ्यांच्या मागून आम्ही मुलेही पळत जात असू. आणि त्यांचे अचूक शरसंधान पाहून आम्हाला सादर कौतुक वाटत असे. ते स्वतःला 'वनचे राजे' म्हणवितात आणि पुढला जन्मही कातकऱ्याचाच यावा अशी देवाची प्रार्थना करतात, असे माझ्या वाचनात आले होते. अशा या आत्मगौरवी, बाणेदार कातकऱ्यांना पोटासाठी चोरी करावी लागते, क्षुल्लकशा चोरीबद्दल तीन वर्षांची शिक्षा होते आणि ज्यांनी संडासाचे कधी तोंडही पाहिलेले नाही त्यांच्यावर ते साफ करण्याचा प्रसंग येतो हे सर्व पाहून माझे मन हळहळले. मी विचार केला की आपणही त्यांच्याबरोबर भंगीकाम करावे.

### भंगीकामाची विनंती व नियमांच्या अडचणी

मला अदयाप तुरुंगाचे कोणतेही काम नेमून दिलेले नव्हते. गांधीजींच्या सत्याग्रहाश्रमात मला संडास-सफाई करण्याचा प्रसंग आला नव्हता, पण रत्नागिरीच्या राष्ट्रीय शाळेत मी आश्रमीय पद्धतीचा संडास बनविला होता व त्याची सफाई मी स्वतःच करीत असे, पण क्वचित् विदयार्थीही आपण होऊन करीत. पुढे सांवतवाडीत मी शेतकऱ्याच्या शौचकूपांचा मोठ्या प्रमाणावर प्रचार केला त्याची हकीगत पूर्वी आलीच आहे. त्यामुळे सफाई काम मला अगदीच नवीन नव्हते. त्यानंतर जेलरची भेट झाली तेव्हा मी त्यांना विनंती केली की मला कुंडीकामच दया, मी आनंदाने करीन. जेलर म्हणाले "तुमच्यासारखे लोक येथे भंगीकाम करू लागले तर सध्या महार, मांग कातकरी यासारख्या हलक्या जातींनाच आम्ही ते काम देतो, ते लोक मग शेफारून जातील आणि ' आम्हीच

तेवढ्यांनी ते काम काय म्हणून करावे' असे आम्हाला विचारू लागतील. आम्हाला कुंडीकामासाठी एकूण बारा कैदी पाहिजे असतात. तुमच्यापैकी बारा जण आतील बाहेरील सर्व काम संभाळायला तयार व्हाल तर मी साहेबांना विचारून तुम्हाला ते काम देववीन.''

मी सोबत्यांशी बोललो. पुरे बारा इसम तयार झाले. त्यापैकी बहुतेक जण माझ्याच बराकीत बंद होणारे होते. गिनतीच्या वेळी मी जेलरसाहेबांना सांगितले की, आम्ही बारा सत्याग्रही कैदी मिळून जेलचे सर्व भंगीकाम संभाळायला तयार आहो. त्या वेळी काही न बोलताच जेलर पुढे गेले. पुढच्या भेटीत पुन्हा विचारले. तेव्हा जेलर म्हणतात, ''येत्या सोमवारच्या फालिन् ( फॉल इन् ) मध्ये तुम्हीच साहेबांकडे मागा.'' ( तुरुंगात दर सोमवारी कैद्यांना त्यांच्या सामानासह रांगेत उभे करतात आणि जेलचे सुपरिंटेडेंट आपल्या लव्या-जम्यानिशी फिरून कैद्यांची पाहणी व वास्तपुस्त करतात. त्या साप्ताहिक समारंभाला 'फालिन्' म्हणतात. )

मी सुपरिंटेंडेंट साहेबांकडे अर्ज केला. साहेब म्हणाले, ''आम्हाला तसे देता येत नाही. पण मॅजिस्ट्रेट येतात त्यांच्याकडे तुम्ही अर्ज करा. त्यांनी सांगितले तर आम्हाला द्यायला सोपे जाईल.''

काही दिवसांनी डिस्ट्रिक्ट जज्ज 'मास्तर' नावाचे पारशी गृहस्थ होते, ते जेलला व्हिजिट द्यायला आले. सोबत सुपरिंटेंडेंटही होते. मी त्यांच्याकडे भंगीकामाची परवानगी मागितली. त्यांना कौतुक वाटले. त्यांनी मला माझे नाव, शिक्षण वगैरे विचारले. एक एम. ए. मनुष्य व ब्राह्मण भंगीकाम मागून घेतो याचे त्यांना कौतुक वाटले. सुपरिंटेंडेंकडे पाहून ते म्हणाले, ''यांना भंगीकाम करू द्यायला काही हरकत आहे का?'' सुपरिंटेंडेंट म्हणतात, ''तो अशक्त आहे. त्याला काम देऊन तो आजारी पडला तर?'' जेलच्या व्यवस्थेत आपण हस्तक्षेप करणे बरे नाही, म्हणून मॅजिस्ट्रेट पुढे गेले.

सुपरिंटेंडेंट फर्नांडिस नावाचे ख्रिश्चन होते. पुन्हा भेटले तेव्हा मी त्यांना खडसून विचारले की तुम्हालाच जर विरोध करायचा होता तर तुम्ही मला मॅजिस्ट्रेटकडे भंगीकाम मागायला सांगून झुलवीत का ठेवलेत? त्यावर त्यांनीही खरे ते सांगून टाकले. जेल मॅन्युअलच मला काढून दाखविले– त्यांत नियम होता की संडास-सफाई किंवा झाडू-काम यासारखी मीनिअल् ( परिचर्यात्मक ) कामे ज्या जाती बाहेर करीत नाहीत त्यांना तुरुंगातही देण्यात येऊ नयेत. तो नियम दाखवून ते मला म्हणतात की ''तुम्हाला आम्ही हे काम दिले तर तुमचे ब्राह्मण जातीभाईच 'सरकार आम्हाला धर्मभ्रष्ट करते' म्हणून कांगावा करतील, त्याला सरकारला भ्यावे लागते.'' मी म्हटले, ''पण मी लिहून देतो की बाहेरही मी हे काम केलेले आहे, त्या अर्थी जेलमध्येही नियमानुसारच मला ते द्यायला हरकत

नसावी." त्यावर ते म्हणाले "आम्ही ही जोखीम घेऊ शकत नाही. पण तुम्ही वाटल्यास आय. जी. कडे. अर्ज करा. त्यात हे सर्व लिहा. त्यांनी मान्य केले तर आमची काही हरकत नाही."

मी आय. जी. कडे अर्ज केला. पंधरा दिवसांनी आय. जी. चे उत्तर आले की तसे काम देता येत नाही. सुपरिंटेंडेंटनी आय. जी. चे उत्तर मला दाखविले आणि त्यांचे समर्थन करताना हिंदूधर्मातील विषमतेचा उल्लेख केला. मी म्हटले, "हिंदू धर्मातील दोष मी मान्य करतो. अस्पृश्यता हे पाप आहे, पण बाहेर मी त्या पापापासून अलिप्त राहू शकतो आणि त्याचे प्रायश्चितही करू शकतो. पण इथे तर तुम्ही कातकऱ्यासारख्या वन्य जमातींनाही हे काम करायला लावता आणि ते प्रतिकार करू शकत नाहीत म्हणून त्यांना तुरुंगात अस्पृश्य बनविता, त्यांची सेवा घेण्याची आमच्यावर सक्ती करता. अर्थात आम्हाला सक्तीने पापी बनविता आणि या सर्वाचे खापर पुन्हा आम्हा ब्राह्मणांच्याच माथ्यावर फोडता! पण या सक्तीने चिकटणाऱ्या पापाच्या परिमार्जनासाठी येथे तुरुंगातही मला काही सिव्हिल डिसोबीडियन्स (सविनय कायदेभंग, अर्थात् शिस्तभंग) योजावा लागेल." शिस्तभंगाची गोष्ट ऐकून सुपरिंटेंडेंट दचकून म्हणाले, "तुला काय म्हणायचे-करायचे आहे ते मला लिहून दे."

## मराठी भाषेसाठी सत्याग्रह

मी मराठीत सविस्तर लिहून दिले. सुपरिंटेंडेंट म्हणाले, "इंग्रजीत लिहून दे ना? इंग्रजी तर तू फरडे लिहितोस." (आय. जी. कडे मी इंग्रजीतच अर्ज केला होता). मी म्हटले, "मी इंग्रजी साफ विसरलो आहे." माझ्या मराठी भाषेच्या सत्याग्रहाचे उपाख्यानही येथे जोडावे लागणार ते असे–

आम्ही बरेच राजकीय कैदी तुरुंगात जमलो. राजकीय कैदी म्हणजे तक्रारी कैदी. प्रत्येकाच्या काही ना काही तक्रारी असत. सुपरिंटेंडेंटना आमच्याबद्दल आदर असणारच. म्हणून त्यांनी एकदा आम्हा सर्वच राजकीय कैद्यांना एकत्र आपल्या ऑफिसात बोलावले व आमच्या तक्रारी विचारल्या. संभाषण काही मराठीतून तर अधिकांशाने इंग्रजीतून झाले. परत आल्यावर साताराचा कुळकर्णी नावाचा एक तरुण सत्याग्रही मला म्हणतो, "तुम्ही साहेबाशी इंग्रजीत बोलता आणि आम्हाला दोघांच्याही तोंडाकडे बघत बसावे लागते. इंग्रजी चांगले शिकल्याखेरीज सत्याग्रहात येईल तो मूर्ख, असेच तुम्हाला म्हणायचे आहे ना?" कुळकर्ण्यांचा प्रश्न मला वर्मी झोंबला आणि त्या दिवसापासून मी जेलच्या अधिकाऱ्यांपाशी इंग्रजीत बोलायचे सोडून दिले; एवढेच नव्हे तर त्यांनीसुद्धा आमच्याशी मराठीतच बोलले पाहिजे असा आग्रह धरू लागलो. एकदा ॲक्टिंग कलेक्टर सेमिंग्टन आले. सुपरिंटेंडेंटनी मी राजकीय कैदी असल्याचे त्यांना सांगितल्यावरून त्यांनी 'एनी कंप्लेंट्स्' –काही तक्रार

आहे— अशी विचारणा केली. मी म्हटले, मला इंग्रजी समजत नाही. सुपरिंटेंडेंट म्हणतात, 'यू गो ऑन इन मराठी'– तुम्ही मराठी चालवा. मी म्हटले 'तुम्ही मराठीत विचारलेत तरच मी उत्तर देऊ शकणार.' मला तिढा कैदी ठरवून उभयता ऑफिसर पुढे चालू लागले!

त्याच धोरणानुसार मी माझी भूमिका मराठीत लिहून दिली. माझे मराठी लिखाण सुपरिंटेंडेंटना समजले नसेल म्हणून किंवा अन्य काही कारणास्तव असेल पण त्यांनी जेलच्या रायटरला –जेलरच्या मदतनीस कारकुनाला– माझ्या मराठीचे इंग्रजी भाषांतर करावयाला सांगितले. तो बिचारा काय करणार? त्याने मलाच बोलावले आणि माझ्या सांगण्याप्रमाणे भाषांतर लिहून काढले.

त्याच दिवसापासून माझी रवानगी 'सेपरेट'मध्ये –वेगळ्या छोट्या एकांताच्या बराकीत– झाली.

तुरुंगात माझा संसर्ग अन्य कैद्यांना लागू नये म्हणून मला वेगळा ठेवण्यात आले. तत्पूर्वी मी तुरुंगातील वर्तुळाकार निवासाच्या बाहेर 'कारखान्यात' दिवसभर विणकाम करीत असे. त्याऐवजी आता त्या वर्तुळातच दिवसा एका मोठ्या पण रिकाम्या बराकीत राहावे व रात्रीसाठी एका बारक्या एका कैद्याच्या खोलीत बंद व्हावे अशा तऱ्हेचे एकांतवासाचे जीवन सुरू झाले. कामही नावापुरतेच, तुटकी सुते गाठवून त्यांचे गुंडे करण्याचे असे. वाचन-मननाला भरपूर वेळ मिळे.

तुरुंगामध्ये उपास करणे हा शिस्तभंग समजला जातो. आपला मळ दुसऱ्याकडून साफ करून घेणे व त्याबद्दल त्याचे उपकार मानण्याऐवजी त्याला हीन व अस्पृश्य ठरविणे हे जे पाप अनिच्छया माझ्याकडून घडत होते त्याच्या क्षालनार्थ मी दर रविवारी संपूर्ण उपास करण्यास सुरुवात केली. जेवण घेण्याचेच नाकारीत असे. अधिकारी लक्ष देत ना म्हणून महिनाभर असे केल्यानंतर शनिवार ते सोमवार असा तीन दिवसांचा उपास जेलरला सांगून आरंभिला. रविवारी जेलरला सुटीच असते. पण सोमवारी सकाळी जेलर मला 'उपास लगेच सोडा नाहीपेक्षा सुपरिंटेंडेंट तुम्हाला सक्तीने म्हशीचेही दूध पाजतील' म्हणाले. त्यावर मी म्हणालो, 'उद्या मी उपास सोडणारच आहे. असे असताही सुपरिंटेंडेंट सक्ती करू लागले तर मी उपास सोडीनही.' एवढे मी बोलल्यानंतर पाच मिनिटात मला सुपरिंटेंडेंटकडून बोलावणे आले. 'आत्ताच्या आत्ता उपास सोडा, नाहीपेक्षा आम्ही तुम्हाला सक्तीने दूध पाजू' असे मला सांगण्यात आले.

मी म्हटले, 'तुम्ही सक्तीने कसे पाजणार, पाहू तर खरे.' बरे, दाखवतोच तर' म्हणून सुपरिंटेंडेंटनी दूध, रबरी नळी वगैरे मागविले. मला धरून ठेवायला दोनतीन शिपायांनाही बोलावले. साहेब म्हणाले, "तुमच्या हातात बेड्या घातल्याखेरीज मी दूध पाजणार नाही." मी आश्वासन दिले की बेड्या नसल्या

तरी मी मस्ती करणार नाही. म्हणून एका शिपायाने माझे हात धरून ठेवले आणि सुपरिंटेंडेंटनी नाकातून हातभर लांबीची रबरी नळी आत खुपसली ती घशाच्या खालपर्यंत गेली. घसा पकडल्यासारखे झाले. नळीच्या बाहेरच्या टोकावर एक कप जोडलेला होता. साहेबांनी विचारले, 'आता ओतू दूध?' माझा शब्द उमटत नव्हताच, हात पकडलेले होते, मान हलविणेही बिकट होते; त्या स्थितीतच मान किंचित हालवून मी 'नको' असे दर्शविले. साहेबांनी नळी बाहेर काढली. माझा जिवात जीव परत आला. तरी पण मी म्हटले, "गाईचे दूध पाजाल तर मला उपास करायला हरकत नाही." साहेब म्हणाले, "आम्ही म्हशीचेच पाजणार आणि त्यात अंडीसुद्धा घालू."

मी म्हटले, "तुम्ही मला उपास करू देणार नसाल तर मला शिस्तभंगाचा अन्य काही मार्ग योजावा लागेल. मी जेलचे काम करणार नाही."

"एरवी तरी कामाच्या मोठ्याच राशी उठवतो आहेस?" मीही 'ठीक आहे' म्हणून परत निवासस्थानी आलो. उपास सोडला आणि कामही सोडून दिले. सुपरिंटेंडेंटही वस्ताद! त्यांनी माझ्या कैदी-पुस्तकात शेरा लिहिला की 'कैदी फार अशक्त झाला आहे, सबब त्याचे काम बंद केले आहे.'

महिन्याभराने जेलरने मला विचारले, "आता तुमची प्रकृती हलके काम करण्याइतपत सुधारली आहे, मग काही हलकेसे काम करणार ना?"

मी म्हटले, "शरीर बरे झाले असेल पण मन अधिकच दुबळे बनले आहे. ते कसल्याही कामाला हात लावायला तयारच नाही." विनोदात ते मला थोडेच हरवणार! माझ्या पुस्तकात दुसरा शेरा, वर तांबड्या शाईच्या एक आकड्याखाली पडला की 'काम नाकारल्याबद्दल याला एक महिना एकांत-बंदी देण्यात येत आहे.'

तांबडा आकडा ही शिक्षेची खूण होती. आजवर मी एकांतातच होतो तो माझ्या प्रकृति-स्वास्थ्यासाठी होतो; आता शिक्षा म्हणून! आजवर मला दिवसभर वाचन करायला मोकळीक असे. पण आता दिवसभर पुस्तके काढून घेत. माझे काहीच बिघडले नाही. मी आश्रम भजनावलीतील भजने गुणगुणत राही. स्वतःही काही कवने बनविली. लिहून काढण्याचे साधन नव्हते. पण मनात घोळवून पाठच करून ठेवीत असे. काही वेळ डाव्या हाताच्या बोटाने जमिनीवर अदृश्य बाराखड्या काढीत असे. दोन्ही जेवणापुरता मला खोलीच्या बाहेर बसू देत. शिवाय चार वाजता अर्धा तास अंगणात येरझारा घालायला सांगत. एकांताच्या शिक्षेतही कैद्याला नियमित रोज अर्धा तास मोकळ्यावर सोडावा अशी भूतदयात्मक तरतूद जेलच्या नियमामध्ये असते. यापूर्वी मी जेलमध्ये देशभक्तांना भोगाव्या लागणाऱ्या यमयातनांची वर्णने वाचली होती, परंतु मला ती यमपुरी जिवंतपणी तरी पाहायला मिळालेली नाही, त्यामुळे मरणोत्तर तरी मिळेल की काय याबद्दल जबरदस्त शंका वाटते. परकी ब्रिटिश सरकारसुद्धा

गुन्हेगारांना निर्दयपणे वागवीत नाही, त्याअर्थी दयाधन परमेश्वर पाप्यांना यमयातना भोगायला लावील हे संभवनीय वाटत नाही. यमयातनांचे भय गेले की मग मृत्यूचेही भय सहजीच मोडते. असो.

शिक्षेच्या मुदतीत कैदयाला पत्रे, भेटी इत्यादी सवलती मिळायच्या नसतात, पण माझ्या पाठचे बंधू श्रीपतराव त्या वेळी साबरमतीच्या गांधी आश्रमातच असत. त्यांचे माझ्या नावावर आलेले पत्र मात्र जेलरनी फोडून व वाचून –किंबहुना वाचले म्हणूनच– मला आणून दिले. मी तुरुंगात काम करण्यांचे नाकारल्याचे श्रीपतच्या कानी गेले. गांधीजी त्या काळी येरवडाच्या तुरुंगात नजर कैदी होते. श्रीपतने त्यांना लिहून विचारले की, 'अप्पानी रत्नागिरीच्या तुरुंगात तुरुंगाचे काम करण्याचे नाकारले आहे, ते बरोबर आहे का?' गांधीचींचे श्रीपतीला उत्तर गेले की 'अप्पाला कळवा की, सत्याग्रही कैदयाने तुरुंगात नेमलेले काम चोखपणे केलेच पाहिजे.' तो अभिप्राय श्रीपतने मला कळविला होता, म्हणून ते पत्र जेलरसाहेब मला दाखवायला धावून आले. परंतु मी म्हटले, "माझी भूमिका गांधीजींच्या लक्षात आलेली नाही, म्हणून त्यांनी असे लिहिलेले आहे." म्हणून मी माझ्या निर्धारापासून ढळलो नाही.

माझ्या शिक्षेचा महिना आटपत आला. माझा काम न करण्याचा हट्ट चालू राहिला तर जेलच्या कायदयानुसार माझ्यावर जेल खाते बाहेरच्या मॅजिस्ट्रेट कोर्टात खटला भरण्याचा विचार करीत आहे असे माझ्या कानी आले. मला ते बरे वाटले. त्या खटल्याच्या निमित्ताने माझ्या तक्रारीचा व जेलखात्याच्या अन्यायाचा बोभाटा तरी होईल.

पण जेलरना माझ्याबद्दल कळकळही होती आणि ते प्रयत्नवादीही होते. गंगाधरराव देशपांडे, देवगिरीकर, दास्ताने प्रभृति मंडळी अ, ब वर्गामध्ये होतीच. जेलरनी त्यांना नेऊन गांधींचा अभिप्राय दाखविला आणि 'अप्पा मानीत नाहीत. तुम्ही तरी त्यांना सांगून पहा, नाहीपेक्षा आम्हाला कोर्टात खटला न्यावा लागणार' इत्यादी सांगितले, आणि त्या सर्वांना माझ्याकडे घेऊन आले. गंगाधरराव मला म्हणाले, "हे पहा अप्पासाहेब, सत्याग्रहाच्या सूक्ष्म सिद्धांताची तुम्ही जितकी सूक्ष्म छाननी करता तशी करण्याची किंवा तुमची चूक काढण्याची आमची पात्रताही नाही आणि इच्छाही नाही. आम्ही पडलो शिपाई गडी. आम्हाला धोपट नियम कळतात की सत्याग्रहीने काम केले पाहिजे. तुम्ही एक मार्ग धरावा आणि आम्ही बाजूला राहावे हेही आम्हाला प्रशस्त वाटत नाही. पण आता आपल्या सर्वांच्याच शिक्षा संपत आलेल्या आहेत. म्हणून आमचे म्हणणे की आपण बाहेर गेल्यावर श्रेष्ठ पुढाऱ्यांचा विचार घेऊ या आणि भंगीकामाबाबत सत्याग्रह करण्याचे ठरले तर आपण सर्वांना पुन्हा पुन्हा तुरुंगाच्या वाऱ्या कराव्या लागणारच आहेत, तेव्हा आपण सगळेच करू. तुम्ही

एकटचानीच नव्हे. पण तोपर्यंत उरल्या मुदतीत तुम्ही जेलचे काम करावे असे आम्हाला वाटते."

मी त्यांची सूचना मान्य केली आणि काम करू लागलो. स्वयंपाकात किडी मिळतात अशी मी एक मॅजिस्ट्रेटकडे तक्रार केली होती व त्यांनी बहुधा ती आपल्या शेऱ्यातही घातली असावी. त्याचे उट्टे म्हणून मलाच तांदुळ निवडण्याचे काम देण्यात आले. इतर कैदी निवडायला आलेले तांदूळ, न निवडताही परत पोत्यात भरून पाठवीत. त्यात माझ्यामुळे थोडासा फरक पडला. पण माझी मुदत संपत आलीच होती. २ ऑक्टोबरलाच मी सुटणार अशी वदंता होती पण काम-बंदीमुळे मला एका तिमाहीची बारा दिवस माफी मिळायची ती न मिळाल्याने मी १४ ऑक्टोबर १९३० रोजी सुटलो.

तुरुंगातील भंगीकामाच्या बाबतीतील माझ्या तक्रारीचे विस्तृत प्रतिपादन करणारा एक लेख मी लिहून काढला आणि मला अन्य कामाने मुंबईला जावे लागले. तेव्हा श्री. काकासाहेब खाडिलकरांकडे नेऊन तो 'नवाकाळ' मध्ये छापण्याची विनंती केली. तेही कित्येक वर्षांपूर्वी एक वर्ष साबरमतीच्या तुरुंगात राहून आले होते. त्यांनी तेथील माहिती दिली की हरिजनं, आदिवासी इत्यादी कैदी जादा माफीच्या आशेने ते काम खुशीनेच करतात. आणि माझा लेख प्रसिद्ध करण्याचे नाकारताना म्हणाले, "सध्या स्वराज्याचा लढा निकरावर आलेला असताना असले फालतू सामाजिक प्रश्न उपस्थित केल्याने स्वराज्याच्या आंदोलनाला फाटे फुटतात."

मी हिरमुसला होऊन परतलो. पण यापूर्वीच मी गांधीजींना सविस्तर हकीकतीचे पत्र लिहिले होते, ते त्यांना मिळून त्याचे उत्तर आले की, 'तुमची भूमिका माझ्या लक्षात आली. ही सत्याग्रह करण्याजोगी बाब आहे खरी. पण आता तुम्ही बाहेर आलाच आहा तर पुन्हा तुरुंगात जाल तेव्हा तेथे सत्याग्रह करण्यापूर्वी आधी या गाऱ्हाण्याला वर्तमानपत्रांच्या द्वारा वाचा फोडा ना? मराठी-इंग्रजी सर्व वर्तमानपत्रात दया म्हणजे मलाही वाचायला मिळेल.' मग मी माझा लेख गांधीजींच्या आज्ञेचा उल्लेख करून पुन्हा 'नवाकाळ'कडे पाठविला आणि त्याने तो छापलाही. त्याच्या नकला बलवंत (रत्नागिरी) व केसरी यांच्याकडे पाठविलेल्या त्यांनीही छापल्या. त्याचे इंग्रजी बॉंबे क्रॉनिकलकडे पाठविले. त्यानेही प्रसिद्ध केले ते येरवडयाच्या तुरुंगात गांधीजींना वाचायला मिळाले. ते वाचून गांधीजींनी पुन्हा लिहिले की 'तुमचा लेख वाचला. योग्य आहे. पण पुन्हा सत्याग्रह कराल तो संथपणे ('धीरजथी') करा, तसेच कराल असे दिसते. (माझ्या लेखाच्या सुरावरून त्यांनी ते अनुमान काढले असावे.)

मी विनोबाजींनाही लिहिले होते, पण त्यांचे उत्तर आले की याबाबतीत सरकार विरुद्ध सत्याग्रह करणे योग्य होणार नाही, असा माझा दृढ अभिप्राय आहे. पण गांधीजींचे समर्थन लाभल्यावर प्रश्नच राहिला नाही.

१९३० साल अखेर पुन्हा तीन महिन्यांची शिक्षा घेऊन मी तुरुंगात गेलो, पण प्रथम मला सूत-कताईसाठी उपास करावा लागला व तो आटोपतो तो हिंडलग्याच्या तुरुंगात व 'ब' वर्गात रवानगी झाली, त्याची हकीकत पूर्वी आलीच आहे. हिंडलग्याच्या तुरुंगात मी भंगीकाम मिळण्याबद्दल मागणी केली परंतु 'ब' वर्गीयांना ते काम देता येत नाही असा जबाब मिळाला. त्यानंतर पंधरा-वीस दिवसांत 'गांधी-अर्विन करार' होऊन आम्ही सुटलोही. त्यामुळे भंगीकाम सत्याग्रहही स्थगित राहिला.

'३२च्या प्रारंभी पुन्हा नजरकैदी म्हणून रत्नागिरीच्या तुरुंगात गेलो. तोपर्यंत त्या जेलचे जेलर व सुपरिंटेंडेंट दोघेही बदलले होते. डॉ. साठे हे माझे पूर्वपरिचित (१९१६ साली मुंबईत त्यांचा मुलगा मनोहर याला माझी शिकवणी होती) व सहृदय गृहस्थ होते. यांच्याकडे मी भंगीकामाची मागणी केली. पण नजर-कैद्यांना कामच नसते, त्यामुळे मला नकार मान्य करावा लागला. पण पुढच्या महिन्यात दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा घेऊन मी तुरुंगात तुरुंगाचा नागरिक म्हणून गेलो, तेव्हा पुन्हा मागणी प्रथम जेलरकडे केली. १९३२ साली १९३० पेक्षाही अधिक प्रमाणात पकडापकडी व सत्याग्रह होऊन तुरुंगात गर्दी झाली, म्हणून विसापूरचा कँप-जेल पुन्हा उघडण्यात आला. तेथे भंगीकासाठी 'योग्य' कैद्यांची जरूरी होती; 'त्यासाठी तुमच्याकडून बारा कैदी भंगीकाम करणारे मिळतील का?' अशी जेलरकडे विचारणा आली होती. तिचा उल्लेख करून जेलर मला म्हणाले 'तुम्हाला येथे काम देता येईल असे नाही, पण बारा जण विसापूरला जायला तयार असाल तर पहा.' मी तत्काळ होकार दिला आणि सैन्य-भरती सुरू केली. या वेळी शे-दीडशे गुन्हेगार राजकैदी तुरुंगात आलेले होते. बहुतेक तरुणच होते व शिरोड, मालवण, वेंगुर्ले, मिठबाव व कणकवली येथील सत्याग्रह छावण्यातील चिरपरिचित सोबती तर बहुतेक आलेलेच होते. त्यांच्यामध्ये विसापूरच्या भंगीकामासाठी अहमहमिकाच सुरू झाली. माझ्या-सुद्धा बारा जणांची निवड केली. पण मधुभाऊ भांडारकर (मालवणचे, '३१ सालच्या बाहेरच्या कार्यातील प्रमुख सहकारी) या वेळी तुरुंगात आले होते. त्यांचे म्हणणे पडले की, जिल्ह्यातील इतक्या तरुण मंडळींचा मार्गदर्शक किंवा आधार म्हणून मी रत्नागिरीच्या तुरुंगात राहणे जरूर. विसापूरलाही कोणी जाणता पुढारी जायला पाहिजे, ती जबाबदारी श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी घ्यावी. ते मिठाच्या सत्याग्रहात आले तेव्हापासून इकडेच राहिले होते व जिल्ह्यातील कार्यांचे व कार्यकर्त्यांचे कलिजे बनले होते. इतर सहकाऱ्यांचेही तसेच म्हणणे पडले. ते मान्य करून मी अण्णासाहेब प्रभृति बारा जणांची नावे जेलरकडे दिली.

जेलरनी ती सुपरिंटेंडेंट डॉ. साठे यांना दाखविली. त्यांना कौतुक वाटले व नावे देणारांची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी आम्हाला ऑफिसवर बोलावून घेतले. प्रत्येक 'नामदारा'ला त्यांनी पृथक्-पृथक् प्रश्न विचारून त्यांच्या शारीरिक व मानसिक खंबीरपणाची खात्री करून घेतली. मी ही म्हटले 'येथेच त्यांना भंगीकाम देऊन नंतरच त्यांना पाठवा ना?'

सुपरिंटेंडेंट साहेबांना माझे पटले आणि त्यांनी आमच्या टोळीला भंगी काम देवविले. त्या पहिल्या बारामध्ये मी स्वतः नव्हतो; त्यामुळे तर त्या नवीन उपक्रमाने मी विशेषच भारावून गेलो. माझ्या सोबत्यांनी महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी कामाला प्रारंभ केला. त्यांनी काम केले आणि मी पुढील कवन केले–

(चाल-ने मंजसीं परत ने मातृभूमीला।)

ही धन्य घडी सार्थक शिवरात्रीचें।
हें वैभव सद्धर्माचे ॥धृ.॥

सर्वांभूतीं ईश्वर एकचि नटला। वेदांत शिकवित आला ॥१॥
मद-अभिमानें सत्य झांकुनी गेलें। सच्छास्त्र रूढित दडलें ॥२॥
शिशु-वात्सल्यें माता करि साक्षेपे। शुचिकर्मे झडती पापें ॥३॥
त्या सत्कर्मा विटलिं इंद्रिये स्वैर सन्मतिशि मांडिले वैर॥४॥
निजबांधव जे दीन-धाकुटे अज्ञ। शुचि कर्मे झाले धन्य॥५॥
हरिच्या स्वजनां दूर लोटिलें ज्येष्ठीं। भूमाता झाली कष्टी ॥६॥
शिवदिनिं जाई पाप-शिशिर विलयाला। नवजीवन माधव आला ॥७॥

चाल–हा विजय दया-धर्माचा।
उत्कर्ष वेदशास्त्रांचा। संचार नवस्फूर्तींचा

धन्य गडी ने पाप झाडिती स्वकरीं। कवि गानाचा अधिकारी ॥८॥

(माधव = वसंत ऋतु; महाशिवरात्रीपासून वसंत ऋतु सुरू होतो.)

रविवारी सामान्य कैद्यांना काम नसे. भंगीकाम करणारांना मात्र सुटी नव्हती. मी रविवारी काही वेळ 'कुंडी फाईल' बरोबर काम करीत असे. विसापूर जेलचे बोलावणे आलेच नाही. आम्ही रत्नागिरीतच हे काम करीत राहिलो. दर महिन्याला तुकडीतील स्वयंसेवक बदलत असत आणि नवीन बारा जण भरती होत असत. त्या बारात मला स्वतःला कधीच संधी मिळाली नाही. भंगीकाम करू इच्छिणारांचा क्यूच लांबलचक लागलेला राही. इतरांना परतवून स्वतःचा नंबर लावून घेण्यात पुरुषार्थही नव्हता म्हणून मी मागेच राहिलो.

असे हे काम सुमारे पाचसहा महिने चालले व तेवढ्यात साठ किंवा बहात्तर सत्याग्रही कैद्यांनी भंगीकामाची पाळी केली. आमच्या तुरुंगातील कामाचा बाहेर वर्तमानपत्रातही गाजावाजा झाला असावा. कारण काही

महिन्यांनी आय. जी. कडून सुपरिंटेंडेंट साहेबांकडे विचारणा आली की, 'अशी ही नियमबाह्य गोष्ट कशी केलीत? हा घोटाळा बंद करा आणि तसे केल्याचे इकडे कळवा.' ते पत्र आल्याचे जेलरसाहेबांनी आम्हाला सांगितले, पण त्या वेळी डॉ. साठे (सुपरिंटेंडेंट) रजेवर होते व बदली सुपरिटेंडेंटनी त्यांच्या व्यवस्थेत ढवळाढवळ केली नाही, त्यामुळे आमचे काम आणखी काही आठवडे चालले. पण डॉ. साठे हजर झाल्यावर आमचे हे काम बंद करण्यात आले. मी माझे रविवारचे लाक्षणिक काम मात्र चालूच ठेवले आणि त्यास अधिकाऱ्यांनी आडकाठीही केली नाही.

इतक्यात '३२ सालचा सप्टेंबर महिना उजाडला. हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ देण्याच्या रॅम्से मॅक्डोनल्ड मंत्रिमंडळाच्या जातीय निर्णयाविरुद्ध गांधीजींनी प्राणांतिक उपोषण सुरू केले. देशभर अपूर्व जागृती झाली. सहा दिवसांच्या उपोषणाअंती सुप्रसिद्ध 'येरवडा करार' झाला. ब्रिटिश मंत्रि-मंडळाने त्याला संमति दिली. अखिल भारत हरिजन सेवक संघाची स्थापना झाली, गांधीजींना तुरुंगातूनही हरिजनांचे कार्य चालविण्यास परवानगी मिळाली आणि देशभर हरिजन सेवा कार्याला जोराची उठावणी मिळाली.

त्या चळवळीचा आम्हा सत्याग्रहचांनाही स्पर्श झाल्याखेरीज कसा राहील? तुरुंगात हरिजन व आदिवासी कैद्यांना सक्तीने भंगीकाम करायला लावीत, त्यावर आम्ही आरंभिलेला आपण होऊन उच्चवर्णियांनी ते काम करण्याचा निरुपद्रवी व आत्मक्लेशपर इलाजही सरकारने बंद पाडला, ही गोष्ट आमच्या मनाला खटकू लागली. मी आत्मसमाधानासाठी रविवारी ते काम करीत असे, पण तेही एका प्रकारे चोरटेपणानेच. मी ते सोडून दिले. तात्या करमळकर त्या वेळी माझ्याबरोबर तुरुंगात होते. त्यांच्या या बाबतीतील भावना विशेषच तीव्र होत्या. ते मला म्हणाले, "आपण भंगीकामाची मागणी करणार आणि ते न मिळाल्यास उपास करणार." मी म्हटले, "तुमच्या बरोबर मीही आहेच पण उपास करणे व्यर्थ आहे. त्याऐवजी अल्पाशन करणे अधिक श्रेयस्कर." असे म्हणून आम्ही सुपरिंटेंडेंटच्या परवानगीने आय. जी. कडे अर्ज पाठविला. त्यात लिहिले की "आम्हाला भंगीकाम मिळावे, नाहीपेक्षा एक महिना (मुदत नक्की आठवत नाही) संपताच आम्ही अर्ध्याहून कमी अन्न घेत जाऊ."

महिना भरला आणि आम्ही अल्पाशन सुरू केले. सकाळची 'गंजी' (कांजी) आम्ही घेत नसूच. दोन वेळचा अन्नाहार मी चतुर्थांशावर आणला. बावीस दिवसांमध्ये माझे वजन ९८ पौंडावरून साडे अठ्ठ्याशीवर, म्हणजे साडे नऊ पौंडांनी, उतरले, प्रमाणात अशक्तताही जाणवत होती,-परंतु हलके काम करू शकत होतो. तात्या करमळकर अन्नही पावाहून अधिक घेत व त्यांचे

वजनही कमी घटले होते. आम्ही निश्चिंत होतो. अधिकाऱ्यांनी आम्हांला अलग एकांतात ठेवण्याचा किंवा अन्य कसलाही त्रास दिला नाही.

एके दिवशी सुपरिंटेंडेंटच मला म्हणतात, "तुमच्याविषयी बाहेर जोराची हालचाल सुरू झाली आहे. तुम्हाला काही समजले का?" मला काही समजायला मार्गच नव्हता. त्या दिवशी सायंकाळी मी ऑफिसवर गेलो असता जमादार मलाच विचारतात 'गांधींचा उपास सुटला का?' मी काय सांगणार? पण मी समजलो की गांधी उपास करताहेत आणि त्याचा आमच्या अल्पाशनाशी संबंध असावा.

आम्ही बंद झाल्यानंतर रात्री दहाच्या सुमाराला जेलर सर्कलचा दरवाजा उघडून आत माझ्या बाराकीशी आले व त्यांनी गजातून माझ्या हाती एक तार दिली. तार गांधींची आणि भली लांबलचक चारपाच पृष्ठांची होती. तारेत त्यांनी लिहिले होते—

> तुझ्या अल्पाशनाची बातमी माझ्या कानी आली. तुला साथ देणे माझे कर्तव्य असल्याने मीही सरकारला नोटीस देऊन अनशन सुरू केले. आता सरकारचे असे म्हणणे आहे की, पटवर्धनांची भूमिका आम्हाला मान्य आहे, परंतु त्यांना भंगीकामाची परवानगी देणे प्रांतिक सरकारच्या हातचे नाही. त्याला हिंदुस्थान सरकारची व स्टेट सेक्रेटरीची परवानगी पाहिजे, तद्‌विषयक नियमांत दुरुस्ती व्हावयास पाहिजे. तशी दुरुस्ती करवून घेण्यासाठी आपल्याला मुदत पाहिजे. तोपर्यंत पटवर्धनांनी आपला उपास थांबवावा.
>
> सरकारचे हे म्हणणे मला योग्य वाटते म्हणून मी माझा उपास सोडला आहे आणि तूही आपला सोडावास असे मला वाटते. या तारेचा जबाब तारेनेच दे आणि सविस्तर हकीकतीचे पत्र लिही.

एवढी लांबलचक तार अपरात्री आलेली पाहून माझी छाती दडपूनच गेली होती. माझ्यासाठी गांधींनी आपले प्राण पणाला लावलेले पाहून मी विशेषच भारावून गेलो. माझ्या सत्याग्रहात तात्या करमळकरांचीही भागी आहे, त्यांच्या संमतीविना मी एकट्याने निर्णय घेणे योग्य नाही, याचे मला भानच राहिले नाही. जेलरचाही लगेच जबाब तारेने पाठविण्यासाठी लिहून देण्याचा आग्रह होता. त्यामुळे मी लगेच जबाब लिहून दिला की, तुमच्या आज्ञेप्रमाणे करतो.

सकाळी तात्या करमळकरांची गाठ पडली. या तारातारींची हकीकत रातोरात त्यांनाही कळलीच होती. तुरुंगात एका बराकीतून दुसऱ्या बंद बराकीत बिनतारी संदेश जात येत असतातच! त्यांनी प्रश्न उपस्थित केले की, अल्पाशन थांबवायचे ते किती मुदतीसाठी, सरकारने गांधींकडे खुलासा केला तसा तो आमच्या उत्तरादाखल करायला कोणती हरकत होती, इत्यादी.

मी गांधीजींना सविस्तर हकीकतीचे पत्र लिहिले, त्यांत हे मुद्देही लिहिले. दोन महिने थांबण्याचीही तयारी लिहिली. त्याचेही उत्तर आले की, "तुम्ही निखालसपणे उपास सोडण्याचे मान्य केले. आता मागून हा औपचारिक मुद्दा उपस्थित करण्यात हंशील नाही. मुदतीच्या बाबतीत तर आता महिन्यांचा प्रश्न नाही, काही दिवसांचाच आहे. तुमच्या मनाप्रमाणे नियमात दुरुस्ती होऊन येईल असा विश्वास बाळगा. नीट खा, प्या आणि हरवलेले दहा पौंड वजन भरून काढा. तुम्हाला दूध घ्यायला प्रत्यवाय नाही ना?"

गांधी पक्के मुत्सद्दीही होते! काही दिवसांच्या मुदतीचा व दुधाचा उल्लेख माझे निमित्त करून अधिकाऱ्यांना इशारा म्हणूनच केलेला होता. मीही लिहिले की म्हशीचे दूध मला चालत नाही, आणि तुरुंगात गाईचे कोण देणार? त्याची गरज आहे असेही नाही.

दोन महिने होऊन गेले पण काही कळले नाही. तेव्हा आम्ही पुंन्हा अल्पाशन सुरू केले. त्याची वार्ताहीं गांधीजींच्या कानापर्यंत गेली असे मला पुढे तुरुंगातून सुटल्यानंतर कळले. परंतु चौथ्या की पाचव्या दिवशीच मला भंगी-काम करू द्या असा आय. जी. चा हुकूम आला. या वेळी मात्र मी सांगितले की 'प्रश्न माझा एकट्याचा नाही. तात्या करमळकरनाही काम मिळावयास पाहिजे.' त्यावर जेलरनीच तात्यांनाही काम दिले व आमचा सत्याग्रह यशस्वी तऱ्हेने समाप्त झाला.



# वासुदेव बळवंत गोगटे

जन्म ११ ऑगस्ट १९१०

**महाराष्ट्रातील एक राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते**

जन्म मिरज येथे. प्राथमिक शिक्षण मिरजच्या सरकारी शाळेत. माध्यमिक शिक्षण मिरज आणि सोलापूर येथे. गांधी युगात खादीचे कपडे वापरण्यास सुरुवात. उच्च शिक्षण सांगली आणि पुणे येथे. १९२९ साली पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजात दाखल. त्याच काळात भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव या क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा झाल्यावर त्यांच्या मनात क्रांतीचे विचार घोळू लागले. त्याच सुमारास सोलापूरात मार्शल लॉ आणि गोळीबार यामुळे मन प्रक्षुब्ध. सोलापूरच्या पुढाऱ्यांना फाशीची शिक्षा झाल्याचे कळताच त्याचा बदला घेण्याचा निश्चय केला आणि दोन पिस्तुले विकत घेतली अणि कॉलेजात गव्हर्नर हॉटसन यांच्यावर गोळी झाडली. यासाठी आठ वर्षे कारावास. चार वर्षे येरवडा आणि चार वर्षे सक्कर येथे आणि शेवटी हिंडलगा तुरुंग. १९३७ साली तुरुंगातून मुक्तता. त्यानंतर एल्. एल्. बी. ची पदवी मिळवली आणि हिंदुमहासभेच्या राजकारणात प्रवेश केला. वकिलीचा व्यवसाय.

१९४६ साली पुणे नगरपालिकेत निवडून आले. १९५७ मध्ये पुण्याचे महापौर. १९६० साली विधानपरिषदेत पदवीधर मतदार संघातून निवडून आले.

त्यानंतर सार्वजनिक आणि सहकारी चळवळीत व्यग्र.

'हॉटसनवर रोखलेल्या पिस्तुलातून' या त्यांच्या आत्मवृत्तातून हा उतारा घेतला आहे.

# हॉटसनवर गोळी का झाडली?

वासुदेव बळवंत गोगटे

## खळबळजनक घटना

२२ जुलै १९३१ या दिवशी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात, मुंबई प्रांताचे त्या वेळचे ॲक्टिंग गव्हर्नर, सर अर्नेस्ट हॉटसन यांचा वध करण्याच्या हेतूने मी त्यांच्यावर पिस्तुलाच्या दोन गोळ्या झाडल्या. ही घटना त्या वेळच्या हिंदुस्थानच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी झाली. अनेकांना ते कृत्य केवळ भावनेच्या आहारी जाऊन किंवा रागाच्या भरात घडलेले अगर वेडेपणाचे वाटले असेल. काहींना तसे ते वाटलेही. पण ती केवळ रागाच्या किंवा भावनेच्या भरात घडलेली गोष्ट नसून मनात योजना आखून, देशप्रेमाने प्रेरित होऊन ठरविलेली ती गोष्ट होती. बुद्धिपुरस्सर, जाणून बुजून हॉटसनचा वध करण्याच्या हेतूनेच मी गोळ्या झाडल्या होत्या. हॉटसन यांना मारण्यास मी का उद्युक्त झालो?

## क्षणभगुंर मानवी जीवन

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे दर्शन घेऊन आल्यापासून माझ्या मनात भगतसिंग, राजगुरू या क्रांतिकारकांचेच विचार घोळू लागले. मला सारखे वाटे, "खरोखर मानवी जीवन किती क्षणभंगुर आहे! उगीच आपण त्याचा लोभ धरतो व जगण्याची आशा करतो. आपल्या लहानपणीच आपली आई आपल्याला सोडून गेली. त्यानंतर एका वर्षातच मोठी बहीण वारली. आपल्या डोळ्यांदेखत दोन मोठे भाऊ रोगांना बळी पडले. मग उगीच असे रोगाला बळी पडून मरण्यापेक्षा भगतसिंग, राजगुरूसारखे देशाची सेवा करीत हुतात्मा होऊन का मरू नये!"

## सोलापूरची सैतानशाही

स्वातंत्र्यवीर सावरकरांची आणि माझी पहिली भेट झाली त्या वेळी मी अवघा वीस वर्षांचा असून इंटर आर्टस्च्या वर्गात शिकत होतो. वरील प्रकारचे सशस्त्र क्रांतीचे विचार माझ्या मनात घोळत होते. ते पराकोटीस पोचण्याचे

तात्कालिक कारण म्हणजे कुप्रसिद्ध 'सोलापूर मार्शल लॉ,' त्यातील गोळीबार, जनतेवरील अनन्वित अत्याचार आणि सर्वांवर कळस म्हणजे जनतेच्या अर्जविनंत्यांना डावलून मल्लाप्पा धनशेटी, कुर्बान हुसेन, सारडा आणि शिंदे या चार निरपराध नागरिकांना सरकारने दिलेली फाशीची शिक्षा!

सोलापूरच्या लोकांनी जंगल सत्याग्रह केला व त्या प्रकरणी पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात काही लोक बळी पडले. गोळीबारामुळे जनसमुदाय विलक्षण चिडला व त्याचा प्रतिक्रियास्वरूप परिणाम, काही पोलिसचौक्या जाळण्यात व काही पोलिस मृत्युमुखी पडण्यात झाला.

त्या संदर्भात अशी एक दंतकथा ऐकिवात आहे की, त्या वेळचे सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर मि. नाइट ह्यांच्या हुकूमावरून पोलिसांनी गोळीबार केला. पण ते स्वतःच प्रक्षुब्ध समाजाच्या हाती सापडले होते. त्या वेळी मल्लापा धनशेटी आदींनी लोकांना शांत केले नसते तर कलेक्टरसाहेब जिवंत राहते ना! आणि अशी वस्तुस्थिती असतानासुद्धा मल्लापा धनशेटी ह्यास फाशी दिल्याने जनतेच्या दुःखावर डागण्या दिल्यासारखे झाले.

सोलापूरसारख्या शहरात सहा आठवडे 'मार्शल लॉ' ठेवण्यात आला होता. जंगल सत्याग्रहातील किरकोळ दंगलीसाठी 'मार्शल लॉ' पुकारला जावा हेच गैर व अन्याय्य होते. तशात तो इतका दीर्घकाळ ठेवावा हे तर जास्तच अन्यायकारक होते.

'मार्शल लॉ'च्या अत्याचाराचे यथायोग्य वर्णन कोण करू शकेल? त्या निमित्ताने लष्करी शिपायांनी केलेल्या गोळीबाराची खरी हकीगत अगदी सौम्य का होईना पण छापली म्हणून सोलापूरच्या 'कर्मयोगी' वृत्तपत्राचे संपादक व प्रसिद्ध पुढारी कै. दे. भ. रामभाऊ राजवाडे यांनासुद्धा सरकारने दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. ह्यावरून मूळ अत्याचार किती गंभीर स्वरूपाचे असतील हे ध्यानात येते. आपल्या घराच्या गॅलरीत उभा असलेल्या रानडे नावाच्या मुलाला, दुकान बंद करीत असलेल्या पानपट्टीवाल्याही गोळ्या घातल्या. स्त्रियांची अब्रूही सुरक्षित राहिली नाही. अशा अनन्वित अत्याचारांची चीड कोणाला येणार नाही?

ही घटना १९३० च्या मे महिन्यात घडली. त्यानंतर काही महिन्यांनी सोलापुरातच झालेल्या जाहीर भाषणात पं. जवाहरलाल नेहरूंनी या सर्व अत्याचारांबद्दल सरकारचा जळजळीत निषेध केला. ते म्हणाले. "इतका अत्याचार ज्या कलेक्टरने केला तो अद्याप या ठिकाणी राहतो कसा? त्याला जाऊन समक्ष सांगा की, "तू पापी आहेस, तुला येथे राज्य करण्याचा अधिकार नाही. तू येथून चालता हो."

सोलापूरच्या ह्या अत्याचारांची वृत्ते वाचून आणि ऐकून माझे मन अत्यंत संतप्त झाले. ह्या अत्याचारांच्या बुडाशी त्या वेळी मुंबई प्रांताचे गृहमंत्री असलेले व नंतर ॲक्टिंग गव्हर्नर झालेले 'हॉटसनसाहेब' हेच प्रामुख्याने आहेत अशी माझी समजूत झाली. त्यांनीच हा 'मार्शल लॉ' पुकारावयाचा सल्ला दिला असे म्हटले जात होते. मुंबईत सत्याग्रह्यांवर घोडे घालण्याची कल्पना त्यांचीच, पं. मदनमोहन मालवीय ह्यांनाही अटक त्यांनीच करविली, अशा वार्ता माझ्या कानावर होत्या. सोलापूरच्या अत्याचाराच्या निषेधार्थ सभा, मिरवणुकी, काळी निशाणे, शिष्टमंडळे, ठराव या मार्गांचा काहीही उपयोग झाला नाही.

अन्याय्य व अत्याचारी सरकार ज्या वेळी असे अनन्वित जुलूम करू लागते व त्या जुलुमांची परमावधी होऊन माणुसकीच्या मर्यादा ओलांडल्या जातात तेव्हा राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्यासारख्या देशभक्त तरुणांच्या हातून 'जशास तसे' या न्यायाने शक्य त्या मार्गांनी पाशवी अत्याचारांचा प्रतिशोध घेतला जातो, व तो घेण्याचा प्रयत्न केला जातो, हा इतिहासाचा नेहमीचा अनुभव आहे. अशा परिस्थितीत प्रतिशोध घेण्याची कृत्ये जर समाजात घडली नाहीत तर तो समाज जिवंत नाही असेच म्हणावे लागेल; आणि म्हणूनच हॉटसनला मारून भगतसिंग, राजगुरूप्रमाणे सोलापूरच्या अत्याचारांचा बदला घ्यावयाचा असे मी मनाशी पक्के ठरविले.

लाहोर कटाची हकीकत वाचून माझ्या मनावर असा परिणाम झाला होता की, एखादया अधिकाऱ्यावर हल्ला करून निषेध दाखविण्यासाठी कट करण्याच्या भानगडीत पडू नये. एकाच माणसाने ठरवून ती गोष्ट करावी व त्याचे होणारे परिणाम सोसावेत. म्हणजे एका माणसाला एकच माणूस जातो. माफीचा साक्षीदार वगैरे भानगडी रहात नाहीत. त्याचा प्रयत्न फसला तरी इतर तरुणांवर अपयशाचा अनिष्ट परिणाम होत नाही व राष्ट्राचेही फारसे नुकसान होत नाही. पण कट करून फसला म्हणजे अनेक बुद्धिवान तरुण हकनाक बळी पडतात. हे विचार माझ्या मनात प्रबळ झाल्यामुळे सोलापूरच्या अत्याचारांचा सूड सरकारवर एकट्यानेच घ्यावयाचा असा मी निर्णय घेतला. I consulted none but my conscience.

### मायेचे पाश

लाहोर कटातील हुतात्मा जतींद्रनाथाच्या मृत्यूनंतर त्याचे प्रेत त्याच्या नातेवाइकांस देण्यात आले. त्याची प्रचंड मिरवणूक निघाली. अग्निसंस्कारापूर्वी लोकांनी त्याच्या वडिलांना विचारले, "मुलाचे अखेरचे दर्शन घ्यावयाचे आहे का?"

त्यांनी उत्तर दिले, "नाही."

लोकांच्या आश्चर्यचकित मुद्रा पाहून ते म्हणाले, "तुरुंगात जाताना माझ्या जतीनने हसत निरोप घेतला होता. त्याचा तो हसरा चेहराच अजून माझ्या दृष्टीसमोर आहे, तो तसाच राहू दे. उपवासाने भेसूर झालेला चेहरा पाहण्याची माझी इच्छा नाही!"

वर्तमानपत्रात आलेली ही हकीकत माझ्या वडिलांनी मोठ्याने वाचली. पुत्रवियोगाचे तीव्र दुःख त्यांनी अनुभवले होते. ती हकीकत वाचताच त्यांच्या डोळ्यांतून खळकन पाणी आले. आम्हा दोघा मुलांकडे म्हणजे मी व मोठे बंधू यांच्याकडे पाहून ते म्हणाले, "इतके धैर्य माझे व्हायचे नाही." ते ऐकून माझ्या पोटात धस्स झाले. हुतात्मा होण्याचे विचार माझ्या मनात त्याच वेळी तीव्रतेने घोळत होते. मला वाटले, "आपण फासावर लटकलो तर वडिलांची स्थिती काय होईल? कदाचित् या धक्क्याने त्यांना मृत्यू येईल आणि त्यास आपण जबाबदार होऊ."

आणखी एक प्रसंग असाच आला. कॉलेजला सुट्टी होऊन मी हैदराबादेस माझ्या भावाकडे आलो. माझे वडील तेथेच होते. स्टेशनवर टांगा करून मी घरी आलो. दारातच माझे वृद्ध वडील बसले होते. मला पाहताच त्यांना आनंद झाला. त्यांना मी वाकून नमस्कार केला. मात्र त्याच वेळी मन म्हणाले, 'तू जे बेत रचले आहेस त्यामुळे तुझ्या पित्याचा तू अंत घडवून आणशील. तू जर फांशी गेलास तर ते दुःख त्यांना सहन होणार नाही.' मायेचे पाश मला मागे खेचू पहात होते.

## सर्व बंधने तुटली

परंतु ३० ऑक्टोबर, १९३० या दिवशी माझे वडील अकस्मात् वारले. मी त्या वेळी पुण्यास होतो. त्यामुळे त्यांची व माझी भेट होऊ शकली नाही. दिवाळीसाठी ते मिरजेहून हैदराबादेस जाणार होते. गाडी रात्री १० वाजता मिरजेहून सुटावयाची. नऊ वाजले होते. जेवणखाण आटोपून व सामान बांधून वडील तयार होते. आता फक्त टांगा बोलावून निघावयाचे. इतक्यात समोर राहणारे श्री. गणपतराव उत्तुरकर हे वडिलांकडे आले व म्हणाले, "मला तुमचे एक सर्टिफिकेट हवे आहे!" त्या गृहस्थांनी कॉफीसारखे एक गव्हाचे पेय तयार केले होते. त्यावर त्यांना एक सर्टिफिकेट हवे होते. वडिलांनी सर्टिफिकेट लिहिण्याकरता डोळ्यांवर चष्मा चढविला व टाक हातात घेतला. ते गृहस्थ म्हणाले, "कागदाखाली धरण्यास पुष्टिपत्र देतो, थांबा." एवढ्यात आळस देण्यासाठी माझे वडील मागल्या बाजूस वळकटीवर आडवे झाले तो पटदिशी प्राण गेला. डोळ्यास चष्मा तसाच! कानास टाकही खोचलेला! माझ्या वडिलांना अनायासाचे मरण आले.

त्यांची रक्षा सावडण्यासाठी मी तिसऱ्या दिवशी मिरजेस कृष्णानदीच्या घाटावर गेलो. रक्षा सावडली. नदीत टाकून दिली. मला रडू कोसळले. मायेचे माणूस मला उरले नव्हते. तशाही स्थितीत माझी मनोदेवता म्हणाली, 'आता तुझी सर्व बंधने तुटली. फासावर गेलास तर त्या धक्क्याने वडिलांचा अंत होईल ही भीती आता गेली. आता तुझे कर्तव्य करावयास तू मोकळा झालास! आता तुला कसलीही भीती नाही!!'

खरोखरीच तेव्हांपासून मला मृत्यूची भीतीच वाटेनाशी झाली. हॉटसन साहेबाला मारून सोलापूरच्या अत्याचाराविरुद्ध तीव्र निषेध प्रकट करण्याचा माझा निश्चय कायम झाला.

### प्रतिज्ञा

त्या वेळी मी फर्ग्युसन कॉलेज समोरच्या पाटलांच्या बंगल्यात वरच्या मजल्यावर रहात असे व खाली पाटलांची खानावळ होती तेथे जेवत असे. एके दिवशी रात्री नऊच्या सुमारास जेवत असतानाच काही मित्रांनी बातमी आणली की, 'सोलापूरचे सेशन्स जज्ज मि. एन्. जे. वाडिया यांनी सोलापूरच्या पुढाऱ्यांना फाशीची शिक्षा जाहीर केली.' ही वार्ता ऐकताच मला जेवण सुचेनासे झाले. मी जेवल्यासारखे करून लगेच उठलो, हात धुतले व तसाच फर्ग्युसन कॉलेजच्या मागील टेकडीवर गेलो. काही केल्या मन स्वस्थ होईना. 'राज्यकर्ते एवढे उघड उघड अन्याय करीत असता आपण काय करीत आहो? मातृभूमीसंबंधीचे कोणते कर्तव्य आपण बजावीत आहो? कशाला उगीच राजगुरू आणि भगतसिंगाचे फोटो लावावयाचे? कशाला उगाच त्यांचा जयजयकार करावयाचा?' असे विचार मनात थैमान घालू लागले. शेवटी त्या टेकडीवरच मी एकट्याने परमेश्वराला साक्ष ठेवून शपथ घेतली की, 'हॉटसनसाहेबाचा वध करून सोलापूरच्या पुढाऱ्यांच्या अन्याय्य फाशीचा बदला घेईन. जगाला असे दाखवीन की आम्ही काही मेलेल्या आईचे दूध प्यायलो नाही; आम्हीही सूड घेऊन शकतो.' ही प्रतिज्ञा करून रात्री साडेबारा वाजता मी खोलीवर परत आलो.

### नेमबाजीचा अभ्यास

प्रतिज्ञा केल्यापासून मी त्याच दिशेने उदचोगाला लागलो. मी पुणे लष्करात गेलो व तेथून बावीस रुपयांचे 'वेब्ले अँड स्कॉट' कंपनीचे एक एअर पिस्तोल विकत घेऊन फर्ग्युसनच्या टेकडीवर दूर जंगलात जाऊन नेमबाजीची 'प्रॅक्टीस' सुरू केली.

माझे वडील बंधू हैदराबादेस डॉक्टरी करीत होते. हैदराबाद संस्थानात शस्त्रनिर्बंधाचा कायदा –इंडियन आर्म्स अॅक्ट– लागू नव्हता. तेथे तलवारी, जंबिये, पिस्तुले, बंदुका वगैरे शस्त्रे उघड उघड विकणारी दुकाने होती. तेथूनच

रिव्हॉल्व्हर विकत घेण्याचे मी ठरविले. प्रश्न पडला पैशाचा. कॉलेजच्या खर्चासाठी लागणारे पैसे मला बंधूंकडून मिळत असत. त्या खर्चात मी कमालीची काटकसर करू लागलो. एकच कोट वापरला, छत्री घेतली नाही. इतकेच काय पण चपलाही वापरल्या नाहीत. इतकी काटकसर करूनही पुरेसे पैसे जमले नाहीत. शेवटी मी माझ्या मोठ्या वहिनींकडे खासगी कामासाठी म्हणून चाळीस रुपये मागितले. वहिनींचा माझ्यावर मोठा विश्वास! त्यांनी रुपये ताबडतोब दिले. माझे काम झाले.

मी १२५ रुपयांस एक व दुसरे ८० रुपयांस अशी दोन रिव्हॉल्व्हरे आणि २५० काडतुसेही विकत घेतली. ह्या सर्व गोष्टी मी १९३१ च्या मे महिन्यात केल्या. त्या सुट्टीतच हैदराबादेस मी खऱ्या रिव्हॉल्व्हरने नेमबाजी करण्यास सुरुवात केली. खूप अभ्यासानंतर पंधरावीस यार्डांच्या अंतरावरील नेम सहसा चुकणार नाही इतका विश्वास मला वाटू लागला.

मी इंटरची परीक्षा उत्तीर्ण झालो व जून १९३१ मध्ये पुन: फर्ग्युसन कॉलेजमध्येच ज्युनिअर बी. ए. च्या वर्गात प्रवेश घेतला. पुण्यास आल्याबरोबर मी मनाशी ठरविलेल्या कार्याच्या शोधास लागलो. हॉटसनसाहेबाची गाठ कशी पडणार हा माझ्यापुढील पहिला प्रश्न होता.

## पहिला पवित्रा

२० जुलै, १९३१ ह्या दिवशी पुण्यास मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची बैठक सुरू होणार होती. उद्घाटनासाठी हॉटसनसाहेब तेथे येतील अशी माझी अपेक्षा होती. मी तो प्रसंग साधण्याचे ठरविले. विधिमंडळात प्रवेश मिळविण्यास प्रवेशपत्रिका आवश्यक होती. ती कशी मिळवावी याचा मी विचार करू लागलो. तो मला एक कल्पना सुचली.

कै. तात्यासाहेब केळकरांचा व माझा परिचय होता. ते माझ्या वडिलांचे विदयार्थी होते. एकदा वडील पुण्यास आले असता त्यांनी तात्यासाहेबांशी माझी मुद्दाम ओळख करून दिली होती. त्यांच्याकडे माझे जाणे येणे होते. मी त्यांच्याकडून सरकारनेच प्रकाशित केलेले सिडिशन कमिटी रिपोर्ट किंवा रौलट ॲक्ट कमिटी रिपोर्ट (१९१८) हे, ज्यात हिंदुस्थानातील क्रांतिकारक चळवळीचा विकृत पण संकलित इतिहास आहे, ते पुस्तकही वाचावयास आणले होते.

मी तात्यासाहेबांकडे गेलो व 'विधिमंडळाचे काम कसे चालते हे पाहण्यासाठी मला असेंब्लीत जावयाचे आहे, तर एक पास मिळेल अशी व्यवस्था कराल का?' अशी पृच्छा केली. माझ्या बोलण्यावर त्यांचा विश्वास बसला. त्यांनी मला वृत्तपत्र प्रतिनिधीचा पास देण्याविषयी 'केसरी' कार्यालयाला चिठ्ठी

दिली. तेथील मंडळींनी माझे वय, शिक्षण वगैरे पाहून तात्यासाहेबांना उत्तरवजा चिठ्ठी दिली की, 'की हा तरुण विदयार्थी वृत्तपत्रव्यवसायात संपूर्णपणे अनभिज्ञ आहे. गव्हर्नरच्या महत्त्वाच्या भाषणाचा वृत्तान्त त्याला घेता येणार नाही. त्यासाठी २० जुलै रोजी आपला अनुभवी वार्ताहर जाईल. याला नंतर केव्हा तरी प्रवेशपत्रिका दयावी.

ती चिठ्ठी वाचून तात्यासाहेब मला म्हणाले, 'कार्यालयातील मंडळींचे म्हणणे बरोबर आहे. तू दोन दिवसांनी ये. मी तुला पुन्हा चिठ्ठी देईन.' ते ऐकून मी अवाक् झालो. माझे खरे बेत थिजल्यासारखे झाले. पण मी धीर सोडला नाही. साताराचे रा. ब. काळे हे त्या वेळी मुंबई विधिमंडळाचे सभासद होते. त्यांचे वैयक्तिक कार्यवाह श्री. गोविंदराव पोंक्षे माझ्या चांगल्या ओळखीचे होते. मी त्यांच्याकहे गेलो व त्यांच्याकडून प्रेक्षकांच्या कक्षेतील – Visitors Gallery– प्रवेशपत्रिका मिळविली. केसरीच्या वार्ताहराची प्रवेशपत्रिका मिळाली असती तर मला हॉटसन जवळ मिळाले असते. प्रेक्षकांच्या कक्षेतूनही आपण अचूक नेम मारू मला मला विश्वास वाटत होता. मी दोन्ही रिव्हॉल्व्हर्स दोन्ही खिशांत घालून प्रेक्षकांच्या कक्षेत दि. २० ला जाऊन बसलो. पण हॉटसनसाहेब पहिल्या दिवशी विधिमंडळात आलेच नाहीत व माझी सर्व तयारी फुकट गेली.

### हॉटसनसाहेबांची अचानक भेट

२० जुलैला संधी न मिळाल्यामुळे मी अस्वस्थ होतो. आता ऑगस्ट महिन्यात मुंबई विदयापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी हॉटसनसाहेब येतील तेव्हा संधी साधता येईल असे ठरवून मी स्वस्थ बसलो.

२२ जुलै, १९३१ ह्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास काही स्नेह्यांसमवेत मी टिळक तलावात पोहोण्यासाठी गेलो होतो. पोहणे आटपून अकराच्या सुमारास परत आलो. त्या वर्षी मी फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहात रहात होतो व 'इंडियन जिम्नॅशियम'चा सेक्रेटरी म्हणून निवडून आलो होतो. पोहून परत येऊन वसतिगृहाकडे जात असता कॉलेजच्या मुख्य फाटकावर एक युरोपियन सार्जंट उभा असलेला दिसला. मी मित्राला म्हटले, "आज सार्जंट इथे का उभा? कोण येणार आहे?"

मित्र म्हणाला, "कुणी का येईना! आपल्याला काय करायचे आहे? आपण जेवायला जाऊ. चला, भूक लागली आहे."

पण मला काही गप्प बसवले नाही. मी त्या सार्जन्टला विचारले, "कोण येणार आहे?"

तो म्हणाला, "गव्हर्नरसाहेब येणार आहेत तुमचे कॉलेज पहायला!"

हे ऐकताच मी तडक माझ्या खोलीवर आलो. मित्रमंडळी जेवायला गेली. जरा वेळाने क्लबचा गडी दौलती मला जेवणासाठी बोलवायला आला. त्याला मी म्हणालो, "मी आता जेवायला येत नाही. माझे ताट खोलीवरच पाठवून दे." तो निघून गेला. मी उदयोगास लागलो. ट्रंकेतील दोन्ही रिव्हॉल्व्हर्स काढली. एक निकेल प्लेटेड व दुसरे डार्क ब्ल्यू पेंटेड. ती नीट तपासून पाहिली. दोन्हीही पाच बारांची होती. निकेल प्लेटेड रिव्हॉल्व्हर जोरदार होते. (त्यानेच मी गोळ्या झाडल्या.) दोन्हीत काडतुसे भरली. इतक्यात क्लबचा गडी दौलती याने दारावर टकटक केले. त्याने आणलेले जेवणाचे ताट मी ठेवून घेतले. तो गेल्यावर मी दार पुन्हा गच्च लावून टाकले.

२० जुलैला ज्या संधीची मी वाट पाहिली ती आज आपण होऊन चालून आली. मला आनंद झाला. योगायोगच होता तो!

जेवणाला मी हातही लावला नाही. कारण वेळच नव्हता. धोतराचा काचा मारलेलाच होता. कोट अंगावर चढवला. कोटाच्या उजव्या खिशात निकेल प्लेटेड रिव्हॉल्व्हर व डाव्या खिशात ब्ल्यू पेंटेड रिव्हॉल्व्हर ठेवले. माझ्या खोलीत स्वामी विवेकानंदांचा फोटो होता. विवेकानंदांना मी नमस्कार केला; आणि खोलीतून बाहेर पडलो.

## वाडिया लायब्ररी

फर्ग्युसन कॉलेजचे हे ग्रंथालय पाहण्यासारखे आहे. मुंबईचे सुप्रसिद्ध कोट्याधीश व्यापारी वाडिया बंधू ह्यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली. त्यातून हे ग्रंथालय बांधण्यात येऊन त्याला 'बाई जेरबाई वाडिया लायब्ररी' असे नाव देण्यात आले. लायब्ररीत देणगीदार वाडिया व त्यांची बायको यांची छायाचित्रे होती. ग्रंथालय अत्यंत प्रेक्षणीय असल्यामुळे हॉटसनसाहेब तेथे आल्याशिवाय राहणार नाहीत अशी माझी कल्पना होती. त्यामुळे मी ताबडतोब ग्रंथालयात गेलो. प्रवेशपत्रिकेशिवाय ग्रंथालयात जाता येत नसे. मी कॉलेजचाच विदयार्थी असल्यामुळे माझ्याजवळ प्रवेशपत्रिका होतीच. ती दाखवून पटावर सही करून मी आत गेलो.

आत शिरल्याबरोबर मी समोरच्याच पहिल्या खुर्चीवर जाऊन बसलो. तोच मनात विचार आला की हॉटसनसाहेब कोणते ते एकदा नीट पहावे. मागील कित्येक क्रांतिकारकांची —खुदीराम बोस, चाफेकर बंधू— उदाहरणे अशी घडली की, त्यांना मारावयाचे होते एका साहेबाला, पण ओळखता न आल्यामुळे गोळी झाली गेली दुसऱ्यावर. अशी चूक आपल्या हातून होऊन नये म्हणून मी मुद्दाम हॉटसनसाहेबाचा फोटो जवळ ठेवला होता. पण त्या फोटोची गरजच लागली नाही. ते प्रत्यक्षच हिंडत होते. त्यांना पाहण्यासाठी मी लायब्ररीच्या गॅलरीत

आलो. हॉटसनसाहेब व त्यांचे शरीररक्षक ए. डी. सी. कॅ. पीटो एवढी दोनच युरोपियन पुरुष माणसे त्या 'कंपनी'त होती. बॉडीगार्डचा वेषच विशिष्ट पद्धतीचा होता व त्याच्या कमरेस तलवार आणि रिव्हॉल्व्हर होते. त्यामुळे हॉटसनसाहेब कोणते हे ओळखण्यास अडचण उरली नव्हती. हॉटसनसाहेब, त्यांची पत्नी आणि प्रि. महाजनी वगैरे मंडळी मुख्य इमारत पाहून जिमखान्याकडे जात होती.

### हॉटसन आले!

मी गॅलरीत उभा होतो. माझे दोन्ही हात कोटाच्या खिशात होते. कारण दोन्ही खिशात दोन रिव्हॉल्व्हर्स होती. माझ्याजवळ माझा एक मित्र उभा होता, तो म्हणाला, "गोगटे, तू इंडियन जिम्नॅशियमचा सेक्रेटरी आहेस ना?"

"होय!" मी म्हटले.

"मग जा ना! हॉटसन तिकडेच चालला आहे!"

"जाऊन काय करू?"

"तेथे जाऊन गर्जना कर 'Hotson go back!' हॉटसन परत जा!"

"ते काय म्हणून?"

तो माझ्या कानात म्हणाला, "अरे बाबा! ह्या हॉटसनने फार जुलूम केला आहे. सोलापूरच्या अत्याचारास हाच जबाबदार आहे."

मी नुसते 'बरे' म्हटले! बिचाऱ्या त्या माझ्या मित्राला माझ्या मनातील विचारांची काय कल्पना! तो मला नुसते ओरडून 'हॉटसनचा निषेध कर' असे सांगत होता. माझ्या मनात त्यापेक्षा फार मोठ्याने गर्जायचे होते, हे त्याला काय माहीत?

हॉटसनसाहेब वाडिया लायब्ररीकडे यावयास निघाले. मी झटकन् परतलो. पहिल्याच खुर्चीवर जाऊन बसलो व एक पुस्तक वाचत आहे अशी बतावणी करीत राहिलो. इतक्यात हॉटसनसाहेब व इतर मंडळी आली. त्यांच्याबरोबर ए. डी. सी., प्रि. महाजनी, प्रो. येवलेकर, प्रो. बापूसाहेब कोल्हटकर वगैरे मंडळी होती. दारासमोर चित्रांचा एक फिरता स्टँड होता. त्यावरील चित्रे पाहून मंडळी आत आली, व योगायोग असा की हॉटसनसाहेब अगदी माझ्या खुर्चीसमोर तीन ते चार फूट अंतरावर येऊन उभे राहिले. समोरच्या भिंतीवर वाचनालयाचे देणगीदार श्री. वाडिया व बाई जेरबाई वाडिया यांची मोठी तैलचित्रे टांगली होती, तिकडे हॉटसन पहात होते व प्रि. महाजनींना सांगत होते की, 'वाडिया माझे स्नेही आहेत—'

**फैर झाडली!**

हॉटसनसाहेबांची छाती अगदी माझ्यासमोर होती. सर्वांचे लक्ष भिंती-वरील चित्रांकडे होते. ही संधी योग्य असे समजून मी खिशातून निकेल प्लेटेड रिव्हॉल्व्हर काढले. खुर्ची थोडी बाजूला सारून उठून उभा राहिलो व एकदम पहिली गोळी हॉटसनसाहेबांच्या छातीवर झाडली!

धा ऽ ऽ ड्! ! !

सर्वच मंडळी गोंधळली! तो आवाज अगदी अनपेक्षित होता. हॉटसनने लगेच हात वर केले. प्रसंगावधान फक्त त्यांनीच राखले. क्षणार्धात त्यांनी माझ्यावर झडप घातली, व गळचास हात घालून मला खाली पाडण्याचा यत्न केला. माझ्यामागे खुर्ची असल्यामुळे मला ढकलून देणे सोपे होते. तेही शरीराने धिप्पाड होते. त्या मानाने लहानसा ठेंगू मुलगा. ते मला मागे ढकलीत असतानाच मी रिव्हॉल्व्हरची दुसरी गोळी त्यांच्या छातीवरच झाडली. माझ्या दोन्ही गोळ्या त्यांच्या छातीवरच लागल्या. चुकल्या नाहीत.! पण अंगात चिलखत घातले असल्यामुळेच हॉटसन बचावले!

हॉटसनसाहेबांनी मला खुर्चीवरून ढकलून दिल्यावर मी पाठीवर पडलो. माझ्या डोक्याच्या मागच्या भागास टेंगूळ आले. ह्या धडपडीत हॉटसन-साहेबांच्या हातास लहानशी जखम होऊन थोडे रक्त आले, व त्यांच्या गुडघ्यास चांगलाच मार बसला.

मी खाली पडल्यावर हॉटसनसाहेब माझ्या छातीवर बसले! इतक्यात त्यांचा बॉडीगार्ड कॅप्टन पीटो तलवार म्यानातून काढून धावून आला. माझ्या छातीवर पाय देऊन त्याने गळ्यावर नंग्या तलवारीचे टोक टेकून धरले व माझा उजवा हात पिरगळून त्यातील रिव्हॉल्व्हर काढून घेतले.

दुसरे रिव्हॉल्व्हर डाव्या खिशात होते. त्याचे टोक खिशाबाहेर दिसत होते. त्यामुळे तेही त्याने काढून घेतले. अशा रीतीने मला नि:शस्त्र केल्यावर माझ्या गळ्यावरील तलवार काढून घेण्यात आली. माझ्या छातीवरून दोघेही दूर झाले. मीही ताबडतोब उभा राहिलो.

हॉटसन समोर उभे अन् मीही उभा! माझ्या डाव्या बाजूस प्रि. महाजनी व प्रो. येवलेकर होते. आणि उजव्या बाजूस कॅप्टन पीटो रिव्हॉल्व्हरच्या गोळ्या काढीत होते.

मिनिटभर सर्वत्र स्तब्धताच होती. हॉटसन घाबरलेले होते. आपण जिवावरच्या संकटातून निभावलो ही त्यांची भावना. माझे काही क्षण निराशेच्या परमावधीत गेले. आपण ज्यास मारावयास धावलो तो न मरता आपल्याच छातीवर बसलेला पाहून माझ्या मनाची अवस्था क्षणभर सुन्न झाली. अतिशय

वाईट वाटले. अपयशाच्या धक्क्यामुळे माझ्या हृदयाचे पाणी पाणी झाले. पण लागलीच मनात हा विचार जोराने उसळून आला की, 'तू आपले कर्तव्य केलेस! अपयश आले तरी हरकत नाही. आता पुढील परिस्थितीस धैर्याने तोंड दे.' हा विचार येताच मला उत्साह आला. माझे मन सावरले व मी हॉटसनसाहेबांकडे पाहात ताठ उभा राहिलो.

अखेर ती स्तब्धता प्रो. येवलेकरांनी मोडली. ते मला म्हणाले,

"What is your name? (तुमचे नाव काय?)"

"Gogate! (गोगटे)" मी उत्तर दिले.

"Are you the same boy who is elected as Gymnasium Secretary? (जिम्नॅशियम सेक्रेटरी म्हणून निवडून आलेले गोगटे तेंच का तुम्ही?)"

"Yes! (होय)"

मग हॉटसन मला म्हणाले,

"Why did you fire at me? (तू माझ्यांवर गोळी का झाडलीस?)"

"As a protest against your tyrannical administration in Sholapur (तुमच्या सोलापूरच्या राजवटीचा निषेध म्हणून!)" मी उत्तर दिलें.

"I see!" हॉटसन उद्गारले.

यावर प्रि. महाजनी म्हणाले, "I think the boy should be arrested."

"Yes" हॉटसन म्हणाले.

इतक्यात तेथे पोलिस इन्स्पेक्टर मि. मिल्स आले. त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला व मला सांगितले,

"You are arested" (तुम्हाला अटक करण्यात आली आहे.)"

"All right" मी म्हणालो.

हॉटसनसाहेबांच्या हातास थोडे रक्त आले होते. तिकडे बोट दाखवून प्रि. महाजनींनी विचारले "Are you wounded sir?" हॉटसन छातीवर चाचपून म्हणाले, No, Mr. Mahajani, I am quite safe. The blood on the hand is merely a scratch."

**क्रांती चिरायू होवो**

मिल्ससाहेबांनी माझ्या दंडाला धरून मला बाहेर चलायची सूचना केली मी निघालो.

दारात गेल्यावर एक विचार मनात आला, 'पुन्हा या आयुष्यात हे वाचनालय, हे कॉलेज, हे सोबती काही आपल्याला दिसणार नाहीत! एकदा

बघून तर घ्यावे,' म्हणून मागे वळून सर्व वाचनालयावर नजर टाकली. सर्व मुले अजून स्तब्धच होती. मूक नजरेने मी माझ्या सोबत्यांकडे पाहिले व निघालो.

खाली बागेत मुलांचा खूप मोठा घोळका जमा झाला होता. मनात विचार आला, 'आपण मुलांना उद्देशून 'वंदे मातरम्'ची गर्जना करावी काय? आपण गर्जना केली आणि मुलांनी उत्तर दिले नाही तर? तथापि आपण आपले कर्तव्य करावे ह्या भावनेने मी गर्जना करण्याचे ठरविले, व बागेत पाय टाकताच मोठ्याने ओरडलो, 'वंदे मातरम्'

सर्व मुलांनी प्रचंड प्रतिगर्जना केल्या. "वंदे मातरम्! इन्किलाब झिंदाबाद, क्रांती चिरायू होवो!"

मला ब्रह्मानंद झाला. मुलांनी माझ्याभोवती गराडा घातला. मी त्यांना संदेश दिला, "माझे काम अयशस्वी झाले ते आता तुम्ही पुरे परा. सोलापूरच्या अत्याचाराचा सूड घ्या!!"

तितक्यात कुणीसा कॅमेऱ्याने माझा फोटोही घेतला!

डी. वाय्. एस्. पी. मि. मिल्स यांनी घाईघाईने मला आपल्या मोटारीत बसविले. आम्ही फरासखान्याकडे जाण्यास निघालो. तिसऱ्या गेटपाशी कुलकर्णी नावाचा जमादार उभा होता. त्यासही बरोबर घेतले. आमची मोटार सिमला ऑब्झरव्हेटरीजवळच्या गेटवरील पोल्सिाने थांबविली व मि. मिल्स यांना तो म्हणाला, 'फर्ग्युसन कॉलेजमधून फोन आला आहे, की कॉलेजमध्ये मुले गडबड करीत आहेत. तुम्हाला बोलाविले आहे.' मिल्स साहेबाने तावडतोब एक टांगा बोलाविला. त्या टांग्यात मी व कुलकर्णी जमादार बसलो. जमादारास मिल्ससाहेब म्हणाले, "आरोपीला फरासखान्यात घेऊन जा. मी जरा वेळाने येत आहे."

आमचा टांगा बुधवार चौकात आला. त्या वेळी क्षणभर मला वाटले, जमादाराच्या हाताला हिसडा देऊन पळून जावे. पण लगेच दुसरा विचार आला, 'आपण पळून गेलो तर कॉलेजमध्ये निष्कारण धरपकड होईल. अनेक स्नेही विनाकारणच अटक होतील.' म्हणून तो विचार मी सोडून दिला.

**गोगटे लायब्ररी**

मला पकडून नेल्यावर कॉलेज विद्यार्थ्यांची डोकी भडकली. हॉटसनसाहेब वरून खाली आले. एका बाजूला प्रि. महाजनी त्यांना हार घालीत होते तर दुसऱ्या बाजूला मुले 'Hotsan Shame! हॉटसनचा धिक्कार असो!' अशी गर्जना करीत होते. हॉटसनसाहेब पत्नीसह कसेबसे मोटारीत बसले. तोच एक गुजराती मुलगा त्या मोटारीजवळ आला व चिडून म्हणाला, 'Mr. Hotson you deserved death; unfortunately you escaped! (हॉटसन तू

मरायलाच हवा होतास, पण दुर्दैवाने सुटलास! )" असे म्हणून त्याने बुक्कीने मोटारीचे काचेचे तावदान फोडले. त्याचा हात रक्तबंबाळ झाला! हॉटसनची गाडी चांलू झाली. खवळलेल्या मुलांनी गाडीवर दगड मारण्यास सुरुवात केली. प्रि. महाजनींनी मुलांना धमकाविले, 'मी तुम्हाला कॉलेजमधून काढीन, I will rusticate you!' कुणी तिकडे लक्षच दिले नाही. हॉटसनसाहेबांची गाडी कशीबशी कॉलेजच्या आवाराबाहेर गेली. आणि साहेब सुखरूपपणे 'गव्हर्नमेंट हाऊस' वर पोचले आणि मी फरासखान्यात 'लॉकअप'मध्ये सुखरूप बंद केला गेलो.

नंतर सुमारे साडेबारा वाजता पोलिस माझ्या खोलीची झडती घेण्यासाठी आले. पण एक तासभर मुलांनी त्यांना झडतीच घेऊ दिली नाही.

पुढे दोन-तीन दिवसांनी वाडिया लायब्ररी सकाळी उघडण्यात आली तो आतील सर्व पुस्तकांवर, भिंतींवर, 'गोगटे लायब्ररी', 'गोगटे झिंदाबाद!' असे शाईचे शिक्के मारलेले आढळून आले. पण हे काम कोणत्या विदयार्थ्याने व केव्हा केले याचा तपास पोलिसांना मुळींच लागला नाही. मुलांनी माझे असे स्मारक केलेले ऐकून मला आनंद झाला. धन्यता वाटली.

### कॉंग्रेस कमिटीतील वादळ

ह्या प्रकरणानंतर मुंबईस ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत माझा विषय चर्चेस निघाला. 'माझ्या कृत्याचा जाहीर निषेध केला जावा' असे गांधीजींचे मत होते तर 'ह्या कृत्याचा निषेध केला तरी मूळ हेतूबद्दल अभिनंदन करावे' असे देशगौरव सुभाषचंद्र बोस यांचे मत होते. 'कराची कॉंग्रेसमध्ये भगतसिंग व राजगुरू यांच्या हेतूचे जर अभिनंदन करण्यात आले तर गोगटयांच्या हेतूबद्दल त्यांचे अभिनंदन का करू नये?' असा खडा सवाल त्यांनी म. गांधींना टाकला. तेव्हा त्या वेळी भगतसिंग व राजगुरूंच्या हेतूबद्दल अभिनंदन करण्यात चूक झाली. Then I committed a mistake असे म्हणून म. गांधींनी माझ्या कृत्याचा व माझा निषेध करणारा ठराव त्यावेळी संमत करून घेतला.

तथापि हॉटसनसाहेबावर गोळी झाडण्यात मी कोणताही निषेधार्ह गुन्हा केला आहे असे मला वाटत नव्हते. उलट हॉटसनसाहेबावर मी गोळी झाडली त्या पूर्वी माझी मानसिक अवस्था इतकी तीव्र झाली होती की कदाचित कोणत्याही कारणाने, भीतीने म्हणा अथवा जीविताच्या लोभाने म्हणा, मी हॉटसनला मारण्यासाठी जो लायब्ररीत गेलो होतो, तो गोळी न झाडता जर परत आलो असतो तर खोलीत येऊन मी आत्महत्याच केली असती. कर्तव्यच्युतीपेक्षा मी खास मरण पत्करले असते.

## दादास पत्र—माझी भूमिका

'अंडर ट्रायल' कैदी असताना मी माझ्या हैदराबादच्या बंधूंना माझी मनोभूमिका व्यक्त करणारे पत्र लिहिले. ते असे—

ती. प्रिय दादास सा. न.

या वेळी वास्तविक मी तुला कॉलेजच्या वसतिगृहातून पत्र लिहावयाचा, त्याऐवजी तुरुंगातून लिहीत आहे. पण हीही एक शाळाच नव्हे काय? जीविताचे सार्थक ज्या शाळेत गेल्याने होते ती शाळा हीच खरी शाळा होय. गेल्या काही दिवसांत माझ्या कृतीने मी तुला अत्यंत दु:ख दिले ह्याबद्दल मला फार वाईट वाटते. पण ही गोष्ट टाळणे अपरिहार्य होते. स्वदेशप्रेमाकरिता व्यक्तिप्रेमाचा बळी दयावाच लागतो. शिवाय सर्व काही त्या श्रीहरीच्या इच्छेप्रमाणेच होत असते. आपल्या कुलाचाच इतिहास पहा ना. प्रियतम ती. अण्णांचा संसार एखादया दु:खपर्यवसायी नाटकाप्रमाणे झाला. त्यांतून बोध घ्यावयाचा तो हाच की मानवीं जीवन हे अत्यंत क्षणभंगुर आहे. तेव्हा त्यावरील आसक्ती सोडून हे देहपुष्प श्रीरामाच्या चरणी अर्पण करून त्याचे सार्थक का करू नये? आता प्रश्न इतकाच की, जो उज्ज्वल त्याग मी केला तो बरोबर का चूक? पण हे आपण काय ठरविणार? हा प्रश्न इतिहासाकडे किंवा पुढील पिढीकडे सोपवावा लागेल. मनुष्याच्या मनाला पक्केपणा येणे (ज्याला इंग्रजीत Conviction म्हणतात) ही गोष्ट वयावर अवलंबून नाही. इतिहासात अशी उदाहरणे दिसून येतील की, वयाच्या आठव्या वर्षापासून तो म्हातारपणापर्यंत केव्हाही 'कन्व्हिक्शन' येऊ शकते. असो. हा काही महत्त्वाचा मुद्दा नाही. सर्व काही परमेश्वरी इच्छेनेच होत असते. स्वदेशाकरता आपल्या कुळातील एकतरी आहुती पडली इतके समाधान मनाला असू दे म्हणजे पुरे! मी येथे आनंदात आहे. माझी प्रकृती पण अजूनपर्यंत बरी आहे तेव्हा काहीही काळजी करू नये. Every loss on the material side has a corresponding gain on the spiritual side हे वाक्य अगदी खरे आहे. मनुष्य संसाराच्या मोहाला बळी पडण्याच्या संभव विशेषत: तारुण्यातच असतो. परमेश्वरी कृपेने हे तारुण्य मला एका खडतर तपश्चर्येत घालवावयास मिळणार व मोहाला बळी पडण्याचे टळणार व मी शिक्कामोर्तब झालेला देशभक्त होणार या गोष्टी मला आनंदच देत आहेत. ती. सौ. वहिनींना हे पत्र दाखीव. त्यांना माझा सप्रेम नमस्कार. त्यांचे माझ्यावर खरोखरीच सौ. अक्काप्रमाणे प्रेम आहे. ती. सौ. अक्कालाही फार वाईट वाटले असेल.

सौ. काकूंना व ती. सौ. अक्कालाही हे पत्र दाखव. त्यांना माझा सप्रेम नमस्कार. धाकट्या वहिनींनाही माझा सप्रेम नमस्कार कळव. त्यांचे जीवन

माझ्याप्रमाणेच कष्टमय आहे. ज्या वेळी भेटण्याची अनुज्ञा मिळेल तेव्हा शक्य असल्यास त्यांनाही घेऊन ये. ती. काकांना व सौ. काकूंना सा. न. लहानास आ.

तुझा वासू"

To attain conviction अथवा मताचा पक्केपणा ह्याविषयी ह्या पत्रात जे लिहिले आहे त्यालाही त्यावेळी एक कारण घडले होते. सोलापूरचे प्रसिद्ध डॉक्टर व माझे सख्खे चुलते डॉ. गणेश रामकृष्ण गोगटे ह्यांनी 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या बातमीदाराला दिलेली मुलाखत 'टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झाली होती. तिचा मथळा होता: 'Career ruined by rash act' 'अविचारी कृत्याने आयुष्याचे नुकसान.' त्यांत माझ्या चुलत्यांनी म्हटले होते की, 'मुले लहान असतात. त्यांच्या मताला पक्केपणा –कनव्हिक्शन– आलेला नसतो. काहीतरी मूर्खासारखे कृत्य करतात आणि आपल्या जीविताचा सत्यानाश करून घेतात. वरील विधानाला उद्देशून मी पत्रात लिहिले होते की, मताला पक्केपण येणे हे काही वयावर अवलंबून नसते. शंकराचार्यांना वयाच्या आठव्या वर्षी वाटले की आपण संन्यास घ्यावा. हे त्यांचे मत पक्के नव्हते असे कोण म्हणेल? याच्या उलट आपण अशी कितीतरी माणसे व्यवहारात पाहतो की, ती म्हातारी झाली तरी त्यांच्या मताला पक्केपणा कधीच येत नाही.



म. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२८७२/१
मंत्रालय

# मोरारजी रणछोड देसाई

जन्म २९, फेब्रुवारी, १८९६.

**भारताचे माजी पंतप्रधान**

जन्म सुरत जिल्ह्यात भादेली या गावी. वडील प्राथमिक शिक्षक. वयाच्या पंधराव्या वर्षी वडिलांचे निधन. १९१२ मध्ये मॅट्रिक. उच्च शिक्षण मुंबई येथे. १९१७ मध्ये बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण. १९१८ साली मुंबई राज्यात डेप्युटी कलेक्टर म्हणून निवड. सतत १२ वर्षे सरकारी नोकरी केल्यानंतर राजीनामा देऊन ते गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सामील झाले. त्याबद्दल तीन वेळा कारावास. १९३१ ते ३७ पर्यंत गुजरात काँग्रेस कमिटीचे चिटणीस. १९३७ साली मुंबई प्रातांच्या मंत्री-मंडळात, महसूल खात्याचे मंत्री. १९३९ साली देशातील काँग्रेस मंत्रीमंडळांनी राजीनामा दिल्यावर हे काँग्रेस संघटनेच्या कार्याकडे, परत वळले. १९४२ साली भारत छोडो चळवळीत भाग घेतल्याबद्दल कारावास. १९४६ च्या खेर मंत्रीमंडळात मुंबई प्रांताचे गृह व महसूल मंत्री म्हणून निवड. १९५२ ते ५६ या चार वर्षांत मुंबई प्रांताचे मुख्यमंत्रीपद सांभाळले. १९५६ साली केंद्रीय

मंत्रीमंडळात प्रवेश, त्यानंतर कामराज योजनेखाली राजीनामा १९६७ साली इंदिरा गांधींच्या मंत्रीमंडळात अर्थमंत्री व उप-पंतप्रधान म्हणून नेमणूक. १९६९ नंतर पक्षाच्या दुहीनंतर मंत्रीपदाचा राजीनामा व संघटना काँग्रेसचे लोकसभेतील नेते झाले. २७ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी येताच त्यांना अटक. आणि २८ जानेवारी १९७७ रोजी निवडणुका घेण्याची घोषणा होताच सुटका. त्यानंतर नव्याने स्थापन झालेल्या जनता पक्षाचे (२३ जाने. १९७७) ते पहिले अध्यक्ष म्हणून निवडले गेले. मार्च १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाला बहुमत मिळून जनता पक्षाचे केंद्र सरकार स्थापन झाले आणि मोरारजींची पंतप्रधान म्हणून निवड. निष्ठावान काँग्रेस कार्यकर्ते, निस्पृह आणि उत्कृष्ट प्रशासक म्हणून सर्वत्र लौकिक.

त्यांच्या आत्मवृत्तातून हा उतारा घेण्यात आला आहे. (अनुवाद श्री. सोनूसिंग पाटील)

## तुरुंगाच्या वाऱ्या

मोरारजी देसाई

१९३२ मध्ये दोन वर्षांची शिक्षा मिळाल्यावर प्रथम काही दिवस मला साबरमती तुरुंगात ठेवण्यात आले व नंतर नासिक येथे बदली झाली. माझे अनेक मित्र व सहकारी नासिक तुरुंगात मला भेटले. कानजीभाई देसाई, डॉ. चंदुलाल देसाई, दरबारसाहेब गोपालजी देसाई, काका (न. वि.) गाडगीळ व बाळासाहेब खेर हे त्यात होते. भुलाभाई देसाई, जयप्रकाश नारायण, मिनू मसानी, कुमाराप्पा बंधू, मंगलदास पक्वासा, मूलराज करसनदास, सूरजी वल्लभदास, अमृतलाल शेठ, नारायण स्वामी, अशोक मेहता, जोआकिम अल्वा, केकी भरूचा व इतर काही काळानंतर आमच्यात येऊन दाखल झाले. एका आवारात आम्ही ३५ जण होतो.

चार-पाच दिवस अगोदर त्या आवारातील माझ्या सहकाऱ्यांत एक भांडण झाल्याचे मला नासिकला कळले. तुरुंगाच्या नियमाप्रमाणे आम्हाला वर्तमानपत्रे मिळण्याचा हक्क नसताना काही सत्याग्रहींनी ती चोरटचा मार्गाने तुरुंगात आणली, त्या संबंधीचे भांडण होते. या गोष्टीस कुमाराप्पा बंधूंनी गंभीर स्वरूपाची हरकत घेतली. कारण सत्याग्रही म्हणून आपण तुरुंगाचे नियम मोडू नये असा त्यांचा विश्वास होता व तो बरोबर पण आहे. परंतु माझ्या काही सहकाऱ्यांचा असे नियम पाळण्यावर विश्वास नव्हता व जरी तुरुंगाच्या नियमाप्रमाणे त्यांना परवानगी नसली तरी त्यांना जी वर्तमानपत्रे आवडत होती ती वाचावयास पाहिजे होती. कुमाराप्पा बंधूंपैकी वडील बंधूंनी धमकी दिली की, जर हा चोरटेपणा चालू राहिला तर त्याबद्दल ते तुरुंगाचे अधीक्षक यांना कळवतील. दुसऱ्यांनी ह्या त्यांच्या मनोवृत्तीबद्दल फारच जोराचा विरोध दर्शविला व बराच तणाव निर्माण झाला. तुरुंगाच्या नियमाला धरून जी वर्तमानपत्रे वाचण्यास परवानगी नव्हती अशी पत्रे चोरटचा मार्गाने आणणे अगर ती वाचणे मलाही पसंत नव्हते. ती आली तरी मी ती वाचत नसे. तसेच खाण्याच्या कोणत्याही वस्तू चोरटचा मार्गाने आणलेल्या असल्यास मी त्या घेत नसे. मात्र मला दुसऱ्यांशी त्याबद्दल भांडण करावयाचे नव्हते.

ज्यावेळी ते भांडण विकोपास गेले त्यावेळी ह्या बाबींबद्दल मी कुमाराप्पांशी चर्चा केली व अधीक्षकाकडे कळविण्याची जी त्यांनी धमकी दिली होती, तसे करणे उचित होणार नाही, तिचा पुढे आग्रह धरू नये, असे त्यांचे मी मन वळविले, 'तुरुंगाच्या नियमांच्या उल्लंघनावर नजर ठेवणे अगर त्यासंबंधी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना कळविणे हे आपले काम नाही' असा युक्तिवाद मी त्यांच्याशी केला. अर्थात तुरुंगाच्या नियमांचा भंग करणे हे आपल्या सहकाऱ्यांना उचित नाही. परंतु त्याबद्दल तुरुंगाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी करणे आपणास शोभून दिसत नाही. सत्याग्रहींची ही वागणूक योग्य नव्हे. तेव्हा त्यांनी मला प्रश्न केला की, तुरुंगाच्या अधीक्षकाने त्यांना त्यासंबंधी विचारलेच तर त्यांनी त्याच्याशी अशा तऱ्हेने खोटे बोलावे अशी त्यांच्याकडून कशी अपेक्षा करता? कोणतेही असत्य बोलण्याची गरज नाही. मी उत्तर दिले. 'जर त्यांनी विचारलेच तर तुम्ही त्यांना कोणतीही माहिती देण्यास बांधलेले नाहीत, असे तुम्ही त्या अधीक्षकास सांगावे.' अशा रीतीने आपल्या सहकाऱ्यांना चमत्कारिक परिस्थितीत टाकण्याचे आपणास टाळता येईल व खोटे सांगण्याची गरज पडणार नाही, आपण सर्वजण कैदी म्हणून राहत आहोत व आपसांतील संबंध चांगले ठेवणे हे अगत्याचे आहे. प्रतिबंधित वर्तमानपत्रे आपण स्वत: वाचली नाही म्हणजे पुरे. आपले काही मित्र इतके निग्रही नसतील तर त्यांना उघडे पाडून दुर्बल करावे हे उचित नव्हे. आपण चुकीच्या गोष्टींचे समर्थन करू नये, परंतु त्याचप्रमाणे आपण सरकारचे गुप्तहेर बनू नये. ह्या दोघा भावांशी माझे संबंध फार चांगले असल्यामुळे त्यांच्याशी सहमत होण्याच्या कामी त्यांचे मन वळविण्यात मी यशस्वी झालो व त्यांनी तुरुंगाच्या अधीक्षकांकडे तक्रार करण्याची कल्पना सोडून दिली.

नासिक तुरुंगात मी पोचल्यानंतर अंदाजे ५-६ महिन्यांनी 'क' वर्गाच्या कैद्यात व मुख्य तुरुंगाधिकारी यांच्यामध्ये गंभीर स्वरूपाचा खटका उडाला होता. मुख्य तुरुंगाधिकाऱ्याने कैद्यांवर हल्ला केला होता व काहींना खूप मारहाण केली होती. सत्याग्रह्यांपैकी एक अत्यंत गंभीर अवस्थेत होता. ह्या घटनेमुळे आम्हा सर्वांना मोठी काळजी वाटली व माझ्या आवारातील माझे सहकारी अत्यंत रागावले व खवळले. त्या सर्वांच्या वतीने मी तुरुंगाधिकाऱ्यास भेटण्यास गेलो व त्यांना समजून सांगितले की, तुरुंगाधिकाऱ्यांच्या वर्तणुकीमुळे दखलपात्र गुन्हा झाला आहे. त्या कामी तपास करावा अशी मी त्यांना विनंती केली. मी त्यांना अशीही सूचना केली की, जिल्हा मॅजिस्ट्रेटला रिपोर्ट पाठविण्याचे त्यांचे कर्तव्य आहे आणि दुखापती झालेल्या इसमाच्या दुखापती तपासण्यासाठी सिव्हिल सर्जनला पण बोलाविण्यात यावे. मुख्य तुरुंगाधिकाऱ्याने याविरुद्ध सल्ला दिला. परंतु मी जे त्यांना सांगितले त्यानंतर आपल्या प्रतिष्ठेचा

व नोकरीच्या हितसंबंधाचा काळजीपूर्वक विचार करून जिल्हा मॅजिस्ट्रेटला व सिव्हिल सर्जनला त्यांनी ताबडतोब कळविले. ह्यामुळे लगेच चौकशी झाली व त्या तुरुंगाधिकाऱ्यावर खटला भरण्यात आला. त्यात त्याला अपराधी ठरवून कोर्टाने शिक्षा दिली. ह्या घटनेमुळे तुरुंगाच्या नोकरांवर चांगला परिणाम झाला व त्यामुळे 'क' वर्गाच्या कैद्यांची छळणूक जवळजवळ बंद झाली.

अधीक्षकास भेटण्यास जाण्यापूर्वी माझ्या आवारातील काही मित्र, आपण सर्वांनी निषेध म्हणून उपवास करावा ह्या सूचनेवर भर देत होते. मी त्यांना समजावून सांगितले की, आपल्या अनेकांना लांब मुदतीचे उपोषण झेपणार नाही व जर दोन अगर तीनच लोकांनी बेमुदत उपोषण केले तर त्यांना यश येणार नाही व त्यांची ताबडतोब दुसऱ्या तुरुंगात रवानगी केली जाईल. म्हणून मी म्हणालो की, उपोषण करण्यापेक्षा त्याबाबतीत कायदेशीर कारवाई करण्यासाठी आपण अधीक्षकाचे मन वळविले पाहिजे. मी असेही म्हणालो की, जर त्यांनी ऐकले नाही तर आपण पुढे काय कारवाई करावी ह्याचा विचार करू. माझ्या सहकाऱ्यांचे माझ्याशी सहमत झाले व मी अधीक्षकास भेटण्यास गेलो.

ह्या घटनेनंतर दोन-तीन महिन्यांनी इस्पितळासमोरील त्याच तुरुंगातील दुसऱ्या आवारात आमच्यापैकी अनेकांची बदली करण्यात आली. १९३३ त इस्पितळाच्या आवारात एक गंभीर घटना घडली. त्यामुळे खूपच तणाव निर्माण झाला. सर्वसाधारणपणे प्रत्येक आवार एका शिपायाच्या ताब्यात देण्यात येते व त्याच्या कामात मदत व्हावी म्हणून काही साध्या कैद्यांना पहारेकरी व रक्षक (वॉर्डर) बनविण्यात येते. एके दिवशी काही महत्त्वाच्या कामासाठी शिपायाला आवार सोडून जावयाचे असल्यामुळे तेथे त्याच्यासोबत काम करीत असलेल्या एका कैद्याजवळ त्याने किल्ल्या दिल्या. शिपाई आवारात परत आल्यावर त्याला ह्या कैद्याने सांगितले की, चाव्या हरवल्या गेल्या. शिपायाला धक्का बसला. जर चाव्या सापडल्या नाहीत, तर त्याची नोकरी जाईल. कामावर असलेल्या इस्पितळातील दोन डॉक्टरांकडे त्याने तक्रार केली. चाव्या परत कराव्यात म्हणून त्यांनी त्या कैद्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु चाव्या हरवल्या आहेत हीच गोष्ट तो फिरून फिरून सांगत होता. त्याने कबुली द्यावी म्हणून डॉक्टरांनी त्याला झाडाच्या फांदीला उलटा टांगला. हे बेकायदेशीर व जुलमी कृत्य होते व त्याचे अवलंबन करून डॉक्टरांनी मोठी घोडचूक केलेली होती परंतु तुरुंगातील अधिकारी क्वचितच कायदा व नियम पाळीत असत.

ज्यावेळी ही अमानुष वागणूक त्या कैद्याला दिली जात होती, त्या वेळी काही आजारामुळे जोआकिम अल्वा व नारायण स्वामी हे इस्पितळात होते. त्यांनी हे पाहिले. अल्वांनी ह्या बाबतीत चौकशी व्हावी व हे बेकायदेशीर कृत्य केले त्याबद्दल डॉक्टरांना शिक्षा व्हावी असे पत्र लिहून तुरुंगाधिकाऱ्यास विनंती

केली. तुरुंगाधिकारी ताबडतोब त्या आवारात गेले व अल्वांशी त्यांनी चर्चा केली. ह्या घटनेबद्दल जर चौकशी केली तर तुरुंगात शिस्त राखणे अवघड जाईल असा खुलासा त्यांनी अल्वांकडे केला व त्यांना विचारले की, ह्या घटनेची चौकशी न करता मी काय केले म्हणजे तुमचे समाधान होईल. अल्वांनी तुरुंगाधिकाऱ्यास सांगितले की, समोरच्या आवारात ठेवलेले श्री. किशोरीलाल मश्रूवाला यांचा व देसाईचा सल्ला घ्यावा व ते जो काही निर्णय ह्याबाबतीत देतील तो मला मान्य राहील. (श्री. किशोरीला मश्रूवाला एक अत्यंत प्रसिद्ध गांधीतत्वज्ञानी व लेखक होते.)

तुरुंगाधिकाऱ्याने आम्हाला सल्ल्यासाठी इस्पितळात बोलावले. आम्ही जो सल्ला देऊ तो त्याने मान्य करण्याचे निश्चितपणे कबूल केले. किशोरीलालभाई व मी मिळून ह्या गोष्टीवर विचार विनिमय केला व आम्ही तुरुंगाधिकाऱ्यास सल्ला दिला की, कैदयावर हा हल्ला केल्याबद्दल जे डॉक्टर जबाबदार आहेत त्यांनी अल्वांसमोर त्या कैदयाची माफी मागावी, असे तुम्ही त्यांना सांगा व असे जर झाले तर चौकशी करण्याची गरज व कायदेशीर शिक्षा देण्याचे प्रयोजन राहाणार नाही कारण आमच्या मते आम्ही सुचविलेली शिक्षा पुरेशी आहे. तुरुंगाधिकाऱ्याने आम्हाला सांगितले की, जर त्यांनी डॉक्टरांना त्या कैदयाची माफी मागण्यास सांगितले, तर दुसरे कैदी केव्हाही कोणतीही शिस्त पाळणार नाहीत. मी त्यांना सांगितले की, दुसऱ्या कोणत्याही मार्गाशी अगर कमी शिक्षा दयावी या गोष्टीशी आम्ही सहमत नाही व जर त्यांना आमचा सल्ला नको असेल तर त्यांनी त्याबद्दल कायदेशीर व औपचारिकरीत्या कारवाई करावी व त्यांना पसंत पडेल तसे करावे. शेवटी तुरुंगाधिकाऱ्याने आमचा सल्ला मान्य केला. अल्वा म्हणाले की, डॉक्टरांनी आमच्यासमोर त्या कैदयाची माफी मागावी, तुरुंगाधिकाऱ्याच्या समोर नको. तुरुंगाधिकाऱ्याने डॉक्टरांना तसे करण्यास सांगितले. ह्या शिक्षेमुळे आपली मानहानी झाली असे डॉक्टरांना वाटले व त्यांच्या डोळ्यात अश्रू झाले.

मला हे नमूद केले पाहिजे की, ज्यांना एका वर्षापेक्षा अधिक सजा असते, त्यांनाच नासिक तुरुंगात पाठविण्यात येते. ज्यांच्या काळ्या टोप्या असतात, त्यांना सराईत गुन्हेगार समजण्यात येते व त्यांना सामान्यत: 'दबलिया' म्हणून तुरुंगात ओळखतात. ह्यामुळेच आमचा सल्ला तुरुंगाधिकारी स्वीकारण्यास का कू करीत होता व त्या शिक्षेमुळे (माफी मागितल्यामुळे) डॉक्टरांना एवढे मानहानिकारक वाटले असावे. कैदयाच्या दगलबाजपणाचा जो बळी झाला होता, तो शिपाई चांगला मनुष्य होता व म्हणून त्याच्याविषयी डॉक्टरांना सहानुभूती होती. शिपायाला मदत करण्यासाठी त्यांनी हे बेकायदेशीर कृत्य केले होते. परंतु ते अत्यंत अविचाराने वागले. त्यांची कृती समर्थनीय नव्हती. आम्ही

जी तोड सुचवली होती ती आमच्या मते अशी होती की, त्यामुळे कैद्याला न्याय मिळावा व तुरुंगाधिकाऱ्यांनाही भविष्यात अशा गोष्टी करण्यास दहशत बसावी.

आम्ही तेथे परतण्यापूर्वीच काय घडले ह्याविषयी आवारातील आमच्या सहकाऱ्यांना समजले. आम्ही आत शिरताच आम्ही जे केले त्याविरुद्ध काहींनी जोरदार हरकत घेतली व म्हणाले आम्ही अन्यायाला पाठीशी घालीत आहोत वा आम्ही चुकीने तुरुंगाधिकाऱ्यांना पाठिंबा दिला आहे. आम्ही ही परिस्थिती आमच्या सहकाऱ्यांना समजून सांगतो न सांगतो तेवढ्यात पद्धतीप्रमाणे भेटीसाठी जिल्हा मॅजिस्ट्रेट हे तुरुंगाच्या अधीक्षकाला बरोबर घेऊन आमच्या आवारात आले. ते दोघे कुमाराप्पांच्या कोठडीत जाताच म्हणाले, 'सत्याचा ह्या ठिकाणी खून पडला आहे व गुन्हा दाबून टाकला जात आहे. म्हणून त्याची चौकशी केली पाहिजे.' तुरुंग अधीक्षकाने जिल्हा मॅजिस्ट्रेटला (फौजदारी न्यायाधीश) सांगितले की, ते तसे करतील व त्यांना त्याविषयी कळवतील.

ते निघून गेल्यानंतर ज्यांनी हरकत घेतली होती, त्या आमच्या सहकाऱ्यांनी ती परत घ्यावी म्हणून त्यांचे मन वळविण्याच्या जेलरने प्रयत्न केला. परंतु जेव्हा त्यांनी हे मान्य केले नाही तेव्हा त्यांनी आपली हरकत सोडून द्यावी म्हणून त्यांचे मन वळविण्यासाठी अल्वांना त्या आवारात जेलरने आणले. आमच्या सहकाऱ्यांनी अल्वांना चिथावणी दिली व सांगितले की, जर ही चौकशी त्याने घडवून आणली तर तो तरुण मोठा पुढारी बनेल व नाव कमावेल. त्यानंतर अल्वांनी चौकशी व्हावी म्हणून आग्रह धरला. त्याने मला सांगितले की, तो खोटे बोलणार नाही म्हणून चौकशी मागणी करण्याचा त्याने निर्णय घेतला. मी त्याला म्हणालो, 'तुम्ही स्वखुषीने आमचा सल्ला व निर्णय अगोदरच मान्य केला आहे व डॉक्टरांना त्यामुळे शासन घडविले आहे. आपल्या काही मित्रांनी तुम्हाला चिथावणी दिल्यामुळे ते तुम्ही आता नाकारता असे करणे उचित नाही. याशिवाय तुम्हाला खोटे बोलावे लागणार नाही. जरी अगोदर चौकशीची मागणी केली होती तरी ती पुढे चालू ठेवणे संयुक्तिक वाटत नाही असा जबाब तुम्हाला देता येईल. अशा रीतीने तुम्हाला खोटे बोलावे लागणार नाही. परंतु आपले नाव होईल ह्या पुढच्या आशेने त्या घटनेबद्दल चौकशी व्हावी असा त्याने आग्रह धरला व त्याप्रमाणे त्याने अधीक्षकाला लिहिले. त्यावेळी मी अल्वांना बजावले होते की, त्यांच्या ह्या कृतीने त्यांचा काही फायदा होणार नाही व जर का एखाद्या तुरुंगाधिकाऱ्याने अगर दुसऱ्या अधिकाऱ्याने त्यांची चौकशी केली तर त्यांची बाजू कमकुवत होईल व त्यांचेच चुकले होते असे दाखविले जाईल. परंतु त्यांना हे पटले नाही.

अधीक्षकाने वैद्यकीय तपासणीसाठी अगोदरच संबंधी कैद्याला सिव्हिल सर्जनकडे पाठविले होते. सिव्हिल सर्जनने त्या कैद्याच्या अंगावर माराच्या

निशाण्या नव्हत्या असे प्रमाणपत्र दिले. अल्वाने त्या घटनेविषयी अतिरंजित जबानी दिली. परंतु कैद्याच्या अंगावर माराच्या निशाण्या आढळून न आल्यामुळे अल्वाच्या पुराव्यावर विश्वास ठेवण्यात आला नाही. नारायण स्वामी त्यांच्याबरोबर होते, ते म्हणाले की, मी जे काही पाहिले त्याबद्दल मला काही सांगता येणार नाही. अशा रीतीने त्यांनीही अल्वांच्या म्हणण्याला पुष्टी दिली नाही.

ह्या घटनेनंतर थोड्याच दिवसांनी अधीक्षकाने अल्वांची कोठी तपासली आणि मोठ्या पूर्ण कागदाच्या काही वह्या ताब्यात घेतल्या. त्यात सत्याग्रही कैदी काय करीत होते व तुरुंगाच्या नियमांचा भंग कशा रीतीने केला जात होता याविषयी तपशीलवार वर्णने होती. त्यात अन्न व वर्तमानपत्रे चोरट्या मार्गाने कशी आणली जात, तसेच एका आवारातून दुसऱ्या आवारात कैदी तुरुंगाच्या नियमाविरुद्ध कसे फिरत, ह्याचे पण वर्णन दिलेले होते. माझा उल्लेख करताना अल्वाने लिहिले होते की, तो मला भीत असे व तुरुंगाच्या नियमाविरुद्ध कोणतीही वागणूक मला पसंत नव्हती व त्याबद्दल जर अशा गोष्टीविषयी वादविवाद झाला तर माझ्या सहकाऱ्यांशी कडक रीतीने मी बोलत होतो. अल्वाने भुलाभाई व दुसऱ्यांची चरित्रे पण दोन-तीन वह्यात लिहिली होती. त्या पण अधीक्षक घेऊन गेला. नंतर अधीक्षकाने मला बोलाविले व सर्व काही सांगितले. ह्यानंतर अल्वाने मागितलेल्या चौकशीत त्याची तक्रार खोटी आहे असा अधीक्षकाने निकाल दिला. अशी काही घटना घडली हे डॉक्टरांनी नाकबूल केले व अल्वाच्या बाजूने कोणीही पुरावा दिला नाही. म्हणून जे सत्य होते ते असत्य आहे असे जाहीर झाले. सत्याचा खून झाला आहे व म्हणून चौकशी झालीच पाहिजे अशी तक्रार कुमाराप्पांनी केली होती. किशोरभाई व मी मिळून जो निर्णय दिला होता तो सत्याचा पाठपुरावा करणारा होता. डॉक्टरांनी त्यांचा गुन्हा कबूल केला होता व माझ्या समक्ष कैद्याची माफी मागितली होती. परंतु वस्तुस्थिती समजून न घेता व आपल्या मर्यादा न ओळखता कुमाराप्पांनी सत्य शाबीत करण्यासाठी चौकशीची मागणी केल्यामुळे सत्याचाच खून झाला. अल्वांची जबानी ज्यामुळे खोटी धरण्यात आली त्यापैकी एक कारण ज्यांनी त्याला चिथावणी दिली होती, त्या आमच्या सहकाऱ्यांपैकी एकाची साक्ष हे होय. अल्वा ह्याने आपल्या वह्यात तुरुंगाचे नियम मोडल्याबद्दल जे काही लिहिले आहे, ते सत्य आहे किंवा नाही याविषयी जेव्हा अधीक्षकाने त्यांना विचारले, तेव्हा त्यांनी सांगितले की, ते दोषारोप खोटे आहेत. अशा रीतीने ज्या मित्रांनी अल्वांना चिथावणी दिली होती, त्यांनीच अल्वा हे खोटे बोलणारे इसम आहेत हे सिद्ध करण्यासाठी अधीक्षकाचे हात बळकट केले. या निणर्यामुळे अल्वा यांचा

'ब' वर्ग काढून त्यांना 'क' वर्गात टाकण्यात आले व अलग कोठडीत एकट्यालाच बंद करण्यात आले.

ह्या घटनेनंतर दोन अगर तीन महिन्यांनी माझ्या शिक्षेची मुदत पूर्ण झाली. सुटण्यापूर्वी अधीक्षकांना वस्तुस्थिती मी समजावून सांगितली व म्हटले की, अल्वा याने कोणताही गुन्हा केलेला नव्हता व त्याने जे लिहिलेले होते, ते बरोबर होते, हे मला माहिती असल्यामुळे तुम्ही नियमाप्रमाणे जो निकाल दिलेला आहे, तो बरोबर नाही. म्हणून मी अधीक्षकांना सजा रद्द करण्याची विनंती केली. अधीक्षक माझ्याशी सहमत झाले व त्यांनी अल्वांना भेटण्याची परवानगी दिली. अशा रीतीने मी तुरुंगातून सुटण्यापूर्वी अल्वांची शिक्षा कमी करू शकलो.

सत्याग्रहाचे जे नियम बापूंनी घालून दिलेले होते, त्यांवर माझा विश्वास होता व सत्याग्रही म्हणून आपण तुरुंगात गेल्यामुळे ते पाळणे हे आपले कर्तव्य होते. नियमाप्रमाणे ज्या गोष्टी आपणाला मिळण्याचा हक्क आहे त्यापेक्षा काहीही जास्त आपण मागू नये, यावर पण माझा विश्वास होता म्हणून अधीक्षकाकडून केव्हाही मी उपकाराची अपेक्षा केली नाही. आमच्यापैकी जे अनेक कैदी 'ब' वर्गात होते व जे सक्तमजुरीची शिक्षा भोगीत होते ते तुरुंगाच्या अधिकाऱ्याने जे काम दिलेले होते ते करण्यास बांधलेले होते. परंतु आमच्यापैकी पुष्कळांना तुरुंगात ज्या प्रकारचे काम देण्यात आले होते ते करण्याची त्यांची इच्छा पण नव्हती. त्यात त्यांना गोडी नव्हती व ते काम करण्याची सवय पण नव्हती. मी नियमितपणे दिवसातून सात ते आठ तास सूत कातीत होतो. आम्हाला तुरुंगात देण्यात आलेले काम कताईचे होते. परंतु आमच्यापैकी अनेक जण कताईकरता त्यांना देण्यात आलेल्या पेळूंचा अपव्यय करीत असत व अतिशय थोडी कताई होई. नवीन अधीक्षक व माझे सहकारी यांच्या दरम्यान ह्या बाबतीत मतभेद होता. सत्याग्रही कैद्यांनी काम करावयास पाहिजे होते, परंतु ते त्यांनी केले नाही. म्हणून ते करण्यासाठी मी त्यांचे मन वळवावे असे एकदा अधीक्षकाने मला सांगितले. त्यांनी किती काम करावे हे पण त्यांनी मला विचारले. मी त्यांना सांगितले की ते तुम्ही ठरवावयाचे आहे. आणि मला सूचना करण्याचे कारण नाही. त्यांनी मला विचारले तुमच्या कताईचा वेग काय आहे? तेव्हा मी त्याना सांगितले की, प्रत्येकाचा कातण्याचा वेग सारखा नसल्यामुळे माझ्या वेगाच्या आधारे सर्वसाधारण कैद्याचे काम ठरवण्यात येऊ नये. मी त्यांना म्हणालो की, माझ्या सहकाऱ्यांचा विचार घेऊन किती काम द्यावे ह्याबद्दल मी सूचना करीन.

माझ्या सहकाऱ्यांबरोबर ह्या गोष्टीची मी चर्चा केली व त्यांना सांगितले की, आपणास जे काम दिले आहे ते आपण केले पाहिजे. आपण चांगले सूत

निर्माण केले पाहिजे व आपणास दिलेल्या पेळूंची नासधूस करता कामा नये. विचारविनिमय केल्यानंतर माझ्या सर्व सहकाऱ्यांनी दररोज चारशे वार सूत कातण्याचे व तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडे देण्याचे ठरविले. एवढा ठराविक भाग अधीक्षकाने मान्य केला व काम चांगल्या प्रकारे व्हावे हे पाहण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली. मी माझ्या सहकाऱ्यांना म्हणालो, 'जर तुम्ही स्वखुषीने– तुमच्यावतीने मी हमी स्वीकारली आहे त्याप्रमाणे काम करण्याचे मला आश्वासन देत असाल तर ही जबाबदारी मी घेतो.' माझ्या सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य देण्याचे मला आश्वासन दिले व त्याप्रमाणे त्यानंतर त्यांनी काम केले. अशा रीतीने ह्या वादाचा शेवट गोड झाला.

अधीक्षक हे अशा प्रश्नांवर वेळोवेळी माझ्याशी विचारविनिमय करीत व तुरुंगातील कोठल्याही भागात जाण्याचा मला विशेष हक्क देण्यात आला होता. तथापि ह्या हक्काचा मी उपयोग केला नाही व जरुरीशिवाय कोणत्याही ठिकाणी मी गेलो नाही. परंतु माझ्या सहकाऱ्यांपैकी काहीजण, खालचे तुरुंगाधिकारी असे कानाडोळा करीत असल्यामुळे, तुरुंगात भटकत असत. जेवणाचे काही पदार्थ व इतर गोष्टी चोरट्या मार्गाने आत आणीत असत. एकदा अधीक्षकाने ह्या बाबतीत माझ्यांशी चर्चा केली व अशा वागणुकीबद्दल तक्रार केली. त्याने मला सांगितले की, तुरुंगाचे नियम पाळण्याचे बंधन सत्याग्रह्यांवर आहे व त्यांनी केलेल्या नियमभंगाचे समर्थन मी कसे करून शकेन? ह्या बाबतीत माझ्या काही सहकाऱ्यांशी ते अत्यंत अपमानास्पद रीतीने वागले होते. मी त्याचा उल्लेख केला व म्हणालो, 'मनोदौर्बल्यामुळे सत्याग्रही काही नियमांचा भंग करतात त्याचे समर्थन मी करीत नाही. हे सर्व मित्र स्वतःच्या स्वार्थासाठी तुरुंगात आलेले नाहीत. परंतु ते स्वतः मोठा त्याग करून स्वातंत्र्यलढा जोरात चालू असताना आले आहेत ही गोष्ट खरी ना? आपण सर्व अपूर्ण मानव आहोत व त्यामुळे ते जर दुर्बल बनत असतील, तर ही सर्व परिस्थिती विचारात घेऊन आपण त्यांच्याशी सभ्यपणाने वागले पाहिजे.'

अधीक्षकाने माझ्या लक्षात असे आणून दिले की, महात्मा गांधींनी नियम पाळले, मीपण तसे केले. मग दुसरे कैदी नियम का पाळीत नाहीत? मी त्यांना म्हणालो की, कधीही कोणताही नियम कोणीही मोडला नाही असा पूर्ण दावा मी करू शकत नाही. मी त्यांना विचारले की, तुमचे स्वतःचे उदाहरण घेऊन मी तुमच्याशी चर्चा करू शकतो काय? जेव्हा त्यांनी सांगितले की, मी तसे करू शकतो. तेव्हा मी विचारले, 'तुरुंगाचे प्रमुख म्हणून तुरुंगाचे सर्व नियम तुम्ही पाळलेच पाहिजेत असे तुमच्यावर बंधन आहे व त्याप्रमाणे तुम्ही वागलेही पाहिजे. तुम्ही असा दावा करू शकता का की तुम्ही तुरुंगाच्या नियमाविरुद्ध तुरुंगाची एकही वस्तु वापरली नाही? नियमांच्याविरुद्ध तुम्ही काही कैद्यांचे

श्रम उपयोगात आणता की नाही? त्याने तो आरोप नाकबूल केला नाही. नंतर मी त्यांना म्हणालो की, जर तुम्ही अशा चांगल्या स्थानावर राहून असे नियम मोडता व तुम्हाला कोणी सजा करीत नाही व तुम्ही स्वत:ला पण स्वत:हून शिक्षा करून घेत नाही तर जे लोक कोणताही स्वत:चा स्वार्थ नसताना फक्त ह्या देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून तुरुंगात येतात व ज्या स्वातंत्र्याची तुम्हालाही गोडी आहे, अशा कैद्यांना तुच्छतेने लेखणे योग्य होणार नाही. कष्टमय जीवन तुरुंगात कंठीत असताना जर ते कमकुवत बनले व त्यांनी काही नियमांचा भंग केला, तर अशा तऱ्हेची मनोवृत्ती त्यांच्याविषयी ठेवणे उचित होईल का? चर्चेच्या शेवटी त्यांनी हे मान्य केले की, कैद्यांबद्दल त्यांनी दाखविलेली तुच्छता अयोग्य होती व त्यांनी तसे करावयाला नको होते.

नासिकच्या तुरुंगात असताना, राजकारण, धर्म व दुसऱ्या बाबींविषयी आम्ही आपसात पुष्कळ विचारविनिमय करीत होतो. त्यामुळे माझी श्रद्धा व विश्वास ह्याविषयी माझा दृष्टिकोन स्पष्ट होण्यास मदत झाली. त्यांनी माझी धर्मावरील श्रद्धा व जीवनाची ध्येये दृढ झाली. ईश्वरावर माझी दृढ श्रद्धा होती. तसेच सत्य व अहिंसा ह्या ध्येयांबद्दल व निरिच्छपणे कार्य करण्याबद्दल माझी श्रद्धा वाढीस लागली. तुरुंगात मी अनेक ग्रंथ वाचले. त्यातील एका ग्रंथामधील व्यक्ती आपल्या पूर्व आयुष्यात नास्तिक होती व नंतर ईश्वरावर दृढ विश्वास ठेवणारी बनली. ती व्यक्ती डॉ. अ‍ॅलेक्झिस् कॅरोल ही होय. मी जे ग्रंथ वाचले त्यांतील एक रेनहोल नैबुहरचा 'मॉरल मॅन अँड इम्मॉरल सोसायटी' हा एक होय. 'नीतिमान मानव व अनैतिक समाज' या ग्रंथात वैयक्तिक नीतिमत्ता व सामाजिक नीतिमत्तेसंबंधी विस्तृत विवरण केले आहे. या पुस्तकाने हे सिद्ध केले आहे की, 'मानव' हा आपल्या नीतिमत्तेत किती उंचीवर जाईल याला मर्यादा नाही व आदर्श नीतीमत्ता संपादन करणे शक्य आहे. परंतु सर्व समाजाला आदर्श रीतीने नैतिक बनता येणे शक्य होणार नाही. काही मर्यादेपर्यंत समाज नीतिमान बनू शकतो. मग त्या समाजाची अवस्था कशीही असो, याउलट व्यक्ती ही पूर्णपणे नीतिमान बनू शकते. हा माझा विश्वास ह्या ग्रंथामुळे पक्का झाला.

त्यावेळी समाजवादावर व साम्यवादावर पण काही ग्रंथ मी वाचले. जगात छप्पन्न अगर सत्तावन्न प्रकारचे समाजवाद आहेत, असे त्यावरून मला समजून आले. ह्या सर्व वाचनामुळे महात्मा गांधींची ध्येये व विचारधारा ह्यांच्या सामर्थ्याबद्दल माझी अधिक खात्री झाली.

मी पूर्वी सांगितलेच आहे की, १९३० मध्ये तुरुंगात एकत्र राहिल्यानंतर कानजीभाईशी माझे संबंध अतिशय निकटचे बनले. सख्ख्या भावापेक्षाही अधिक चांगले व जवळचे आमचे संबंध होते. आमच्या खोल्या एकमेकांच्या शेजारी होत्या. परंतु बराच वेळ आम्ही दोघे त्यांपैकी एकाच खोलीत रहात असू.

वादविवाद न करता आम्ही एकमेकांचे विचार जाणत असल्यामुळे आम्ही फार बोलत नसू व अनेक बाबतींत आमचे विचार एकच होते. मंगलदास पक्वासांबरोबर मीही नासिक तुरुंगात एकाच जागी राहिलो. आम्ही अत्यंत जिवलग स्नेही बनलो. काही बाबतीत जरी आमची मते वेगवेगळी होती, तरी आम्ही परस्परांना एवढ्या पूर्णपणे जाणले होते की, कोणालाही आमच्यामध्ये गैरसमज करता येत नव्हता. १९४६ पर्यंत ज्या ज्या वेळी मुंबईला मी जात असे तेव्हा त्यांच्याकडेच मुक्कामाला थांबत असे. १९४६ मध्ये जेव्हा मी मंत्री झालो व मला स्वतःचे घर मिळाले तेव्हा त्यांच्याकडे मुक्कामाला जाण्याचे थांबविले. माझा मुलगादेखील मुंबईला शिकत असताना त्यांच्याकडे राहात असे.

१९३३ च्या ऑक्टोबरच्या सुरुवातीला नियमाप्रमाणे शिक्षेत जी सूट मी कमाविली होती, ती विचारात घेऊन माझी शिक्षा पूर्ण झाल्यामुळे मला तुरुंगातून सोडण्यात आले. त्या वेळी गांधीजींनी सार्वजनिक सत्याग्रहाच्या चळवळीचे वैयक्तिक सत्याग्रहात रूपांतर केले होते व मी वैयक्तिक सत्याग्रह करण्याचे व माझ्या सुटकेनतर परत तुरुंगात जाण्याचे ठरविले.

१९३१ च्या अखेरीस एका आदरणीय व ज्याला माझ्याबद्दल आस्था होती अशा वडीलधाऱ्या मित्राने मला विचारले की, देशाच्याच हिताचा फक्त विचार करीत असताना तुझ्या मुलांच्या व तुझ्या कुटुंबातील इतरांच्या गरजांचा विचार तू करीत नाहीस ही गोष्ट काही चांगली करीत नाहीस. मी उत्तर दिले, 'माझ्या' समोर फक्त एंकच विचार आहे, तो हा की, या देशात जोपर्यंत परकीय सरकार आहे तोपर्यंत कोणताही नागरिक स्वाभिमानाने राहू शकणार नाही अगर त्याची पूर्ण वाढ होणार नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक नागरिकांचे प्रमुख कर्तव्य देशाचे स्वातंत्र्य मिळविणे हे होय. हिंदुस्थानात नव्वद टक्के मुलांना हल्ली शिक्षण मिळते त्यापेक्षा माझ्या मुलांना चांगले शिक्षण मिळत आहे. माझे वडील वारले त्या वेळी माझ्याजवळ काही साधने नव्हती. माझ्या मामाच्या कुटुंबात मी वाढलो व मोफत वसतिगृहाच्या शाळेत माझे शिक्षण झाले. परमेश्वराच्या कृपेने तेव्हा मी माझ्या भावांना शिकविले. म्हणून माझी खात्री झाली आहे की, प्रथम कर्तव्य स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेणे हे होय. माझ्या भावांनी माझ्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविले तर त्यात वावगे काही नाही. स्वातंत्र्यलढ्यात संपूर्ण भाग मी घेतलाच पाहिजे, ह्याबद्दल मनात संदेह नाही व त्यामुळे माझ्या कुटुंबाकडे बेपवाईने जर दुर्लक्ष झाले तर त्याला उपाय नसल्यामुळे प्रथम मी देशासंबंधी माझे जे कर्तव्य आहे ते केलेच पाहिजे. माझ्या मित्राची ह्या माझ्या युक्तिवादामुळे खात्री झाली किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु त्याने या बाबीवर पुढे वादविवाद केला नाही. कोणत्याही प्रकारे माझ्या विचारसरणीत त्याला दोष आढळला नाही असा मी निष्कर्ष काढला.

१९३० व १९३२ च्या सत्याग्रहाकडे मागे वळून पाहता सुरुवातीला जरी भरपूर उत्साह लोकात होता व अनेकांनी त्यात भाग घेतला होता तरी स्वखुषीने तुरुंगात जाणाऱ्यांची संख्या लाख दोन लाखापेक्षा जास्त नसावी. स्वराज्य मिळत नाही तोपर्यंत अखंडपणे तुरुंगात सतत जाण्याचा निश्चय करणारे फारच थोडे लोक होते. तुरुंगात गेल्यानंतर लवकरच सुटका व्हावी अशी आशा बाळगणारे त्यापैकी अनेक होते.

माझ्या मते हे स्वाभाविक होते. ही गोष्ट खरी आहे की ह्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत काँग्रेसच्या प्रचारामुळे व तिच्या पुढाऱ्यांच्या उदाहरणामुळे व ज्या दहशतवादयांनी स्वातंत्र्यासाठी कार्य करताना त्याग केला त्यामुळे स्वातंत्र्य मिळण्याची इच्छा लोकात निर्माण झाली होती. इंग्रजांच्या काळापूर्वी हिंदुस्थानात कधीही सर्व देशासाठी एक सरकार नव्हते. त्यामुळे जरी भूतकाळात देशात सांस्कृतिक एकता होती तरी देश राजकीयदृष्टया सलग नव्हता. म्हणून स्वतंत्र देशामध्ये ज्या प्रकारची प्रखर देशभक्तीची भावना दृष्टोत्पत्तीस येते त्याचा येथे अभाव होता. महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यलढयाची अद्‌वितीय कार्यपद्धती व पूर्णपणे समर्पित जीवनाच्या त्यांच्या वैयक्तिक उदाहरणामुळे देशाच्या स्वातंत्र्य संपादनासाठी जनतेत उत्साह निर्माण झाला होता. परंतु हा उत्साह जीवनाची मुख्य प्रेरणा बनली नाही. म्हणून प्रत्येक लढयाच्या आरंभी लोक भावनावश होत असत व त्यात उत्साहाने सामील होत. परंतु त्याच्या आनुषंगिक परिणामांमुळे ज्या कष्टांना सामोरे जावे लागते ते सहन करण्यासाठी लागणाऱ्या पुरेशा सामर्थ्याची जोपासना त्यांनी न केल्यामुळे तो उत्साह लवकरच ओसरला.

अशा रीतीने १९३० च्या सत्याग्रहाच्या पहिल्या तीन अगर चार महिन्यांत हजारो लोक तरुण व वृद्‌ध, पुरुष व स्त्रिया चळवळीत सामील झाल्या. परंतु थोडयाच महिन्यात हा उत्साह ओसरला. जेव्हा मी चळवळीत सामील झालो व करबंदी मोहिमेत सामील होण्यासाठी लोकांचे मन वळविण्यासाठी चार अगर पाच जिल्हयांत दौरा केला, तेव्हा खेडा व सुरत जिल्हयांतील अनेक शेतकरी मोठया उत्साहाने त्यात सामील झाले. परंतु जानेवारी १९३१ च्या अखेरीला मी जेव्हा तुरुंगातून बाहेर आलो, त्यावेळी लोकांचा उत्साह ओसरलेला दिसला व गांधी-आयर्विन तहावर सहया झाल्याने अनेकांना या सुखदायक बदलामुळे आनंद झाला. ज्यांनी चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला होता अशा अनेकांना गोलमेज परिषदेतून काही विशेष निष्पन्न होईल असे जरी वाटत नव्हते तरी त्यातून काहीतरी निश्चित निर्णय बाहेर पडेल असे वाटत होते. लढण्याच्या कुवतीच्या मर्यादा लक्षात घेता काँग्रेसची शक्ती जपून ठेवण्यासाठी व तिचा

स्वाभिमान वाढविण्यासाठी तहाची चांगली मदत झाली. मी पूर्वी सांगितलेच आहे की, जवाहरलालजी व दुसरे काही पुढारी तहाच्या अटींबाबत बरेच नाराज झालेले होते. परंतु त्यावेळी यापेक्षा काही जास्त करणे शक्य नव्हते ह्याबद्दल सर्वांची खात्री झाली. जर तहावर सह्या झाल्या नसत्या तर लोकांचा उत्साह संपूर्णपणे मावळला असता. पुढच्या लढ्याच्या तयारीला पुरेसा उत्साह राखून ठेवण्यासाठी ह्या तहामुळे संधी मिळाली.

तरीसुद्धा लोकांना जी फलनिष्पत्ती गोलमेज परिषदेपासून अपेक्षित होती तशी त्यातून झाली नाही. म्हणून लोकांची अत्यंत निराशाजनक मनःस्थिती झाली होती. जेव्हा गांधीजी इंग्लंडहून रिकाम्या हाताने परत आले तेव्हा लोकांची सरकारविरुद्धची प्रतिकारशक्ती पुन्हा उफाळली. वर्किंग कमिटीची सभा झाली व गांधीजींना व त्यांच्या सहकाऱ्यांना पुन्हा तुरुंगात पाठविण्यात आले. कायदेभंगाची चळवळ करून अनेक लोक त्यांच्या पाठीमागे तुरुंगात गेले परंतु सहा महिन्यांतच ती हळूहळू संपली.

तुरुंगात असताना चळवळीचा जोर कमी होत आहे, असे आम्ही ऐकत होतो. त्याचा परिणाम असा झाला की, माझ्या अनेक कैदी बंधूंना आपण केव्हा सुटतो व लढ्याचा शेवट केव्हा होतो ह्याविषयी चिंता वाटत असे. आमच्या वादविवादातून निराशेचे व खिन्नतेचे वातावरण असे. अनेकजण महात्मा गांधींना चळवळीची मोडतोड झाल्याबद्दल दोष देत होते. हा नेहमीचा माणसाचा अनुभव आहे की, तो जेव्हा थकतो तेव्हा दुसऱ्याना दोष देतो व आपल्या स्वतःची दुर्बलता कबूल करीत नाही. म्हणून उत्साहाचा भर कमी होणे अपेक्षित होते.

नासिक तुरुंगातून ऑक्टोबर १९३३ मध्ये माझी सुटका झाली हे मी अगोदर सांगितलेच आहे. त्यावेळी बापू वर्ध्याला होते. त्यांना चळवळीविषयी माझ्याशी चर्चा करावयाची होती व काही सूचना करावयाच्या होत्या. बापूंची प्रकृती त्यावेळी चांगली नसल्यामुळे त्यांची काळजी जमनालालजी वाहात असत व त्यांच्या परवानगीशिवाय कोणालाही बापूंना भेटता येत नसे. भेटणाऱ्यांची गर्दी कमी करता यावी म्हणून ही व्यवस्था बापूंच्या संमतीने करण्यात आली होती. म्हणून मी प्रथम जमनालालजींना भेटलो. माझ्या येण्याचे कारण काय असे त्यांनी विचारले व म्हणाले की, ह्यावेळी गांधीजीना त्रास देणं उचित नाही. मी स्वतःहून आलेलो नाही असे मी त्यांना सांगितले. बापूंच्या सांगण्यावरून मी वर्ध्याला आलो आहे व जमनालालजींना मी गांधीजींना भेटू नये असे वाटत असेल तर मी परत जाण्यास अगदी तयार आहे. त्यांचा मी सल्ला घेतो, त्यानंतर, तुम्ही त्यांना भेटू शकता, असे ते म्हणाले. तथापि माझे बोलणे एका तासाच्या

आत संपवावे अशी मला सूचना करण्यात आली. मी गांधीजींकडे जेव्हा गेलो तेव्हा जमनालालजीही हजर होते. तास संपत आला तेव्हा जमनालालजींजवळ मी माझे काम एका तासात आटोपावे असे म्हणून मी जाण्याची परवानगी मागू लागलो. तथापि गांधीजींनी आग्रह केला की, त्यांना पुष्कळ गोष्टी बोलावयाच्या आहेत. तरी मी थांबावे. अधिक अर्धा तास आम्ही बोललो व त्यानंतर मी वर्धा सोडले.

सुमारे चार वर्षे लोटली असतील. जमनालालजींना ह्या घटनेची आठवण होती. ह्या घटनेनंतर म्हणजे या चार वर्षांनंतर १९३७ च्या मेमध्ये बापूंची प्रकृती पुन्हा ढासळली व गुजरातमधील बलसाड गावाजळच्या किनाऱ्यावरील तिथल ह्या ठिकाणी त्यांच्या राहाण्याची व्यवस्था करावयाची होती. सरदार वल्लभभाई पटेलांनी ती व्यवस्था करण्यास मला सांगितले. बापूंना भेटण्यासाठी तिथलला जमनालालजी आले. चार वर्षांपूर्वीच्या घटनेची त्यांना आठवण झाली असावी. ते मला म्हणाले की, बापूंना मला भेटावयाचे आहे. त्यांना अगोदरच्या घटनेबद्दल मी आठवण दिली नाही व म्हणालो की बापूंना कळवून नंतर मी व्यवस्था करतो. मी तसे केले व जमनालालजींना त्यांच्याकडे पाठविले. ते दोघेच तेथे राहिले. त्यांचे बोलणे संपल्यावर जमनालालजी जेव्हा बाहेर पडले, तेव्हा ते मला म्हणाले की, तुम्ही मला धडा शिकविला. मी उत्तर दिले की, त्यांना शिकवण्यासारखे माझ्याकडे काही नाही व त्यांना जे योग्य दिसले त्याप्रमाणे ते वागले व मला जे योग्य दिसले त्याप्रमाणे मी वागलो.

वर्ध्याला गांधीजींची भेट घेतल्यानंतर मी अहमदाबादेस परत आलो व तेथे एक पंधरवडाभर राहिलो. मी सत्याग्रह करणार आहे हे अधिकाऱ्यांना माहीत होते. म्हणून अहमदाबाद सोडून मी चोवीस तासात निघून जावे असा हुकूम त्यांनी माझ्यावर बजावला. मी तसे न केल्यामुळे मला अटक करण्यात आली व हुकुमाचा भंग केला म्हणून सिटी मॅजिस्ट्रेटपुढे माझा खटला चालला. १९२९ मध्ये अहमदाबादला मी ज्यांची सुटका केली (कामाचा चार्ज घेऊन) तोच इसम मॅजिस्ट्रेट होता व त्याने मला दोन वर्षांची सजा दिली. मी गुन्हा कबूल केल्यामुळे मला दोषी ठरविण्यात व शिक्षा देण्यात त्यांना काही अडचण नव्हती. शिक्षा दिल्यानंतर मला साबरमती तुरुंगात नेण्यात आले व नंतर पंधरा ते वीस दिवसांनी येरवड्याच्या तुरुंगात हलविण्यात आले.

येरवड्याच्या ज्या चाळीमध्ये मला नेण्यात आले होते, तेथे पुण्याचे चार सत्याग्रही कैदी होते. इंग्लिश आय्. एम्. एस्. अधिकारी कर्नल मार्टिन हे त्यावेळी तुरुंगाचे अधीक्षक होते. अतिशय निष्ठूर मनुष्य म्हणून त्यांचा बोलबाला होता. सत्याग्रहीशी तो फार कठोरपणाने वागत असे व कमी बोलत असे. संध्याकाळी सहा वाजता तुरुंगात आम्हाला बंद करण्यात येई व दुसऱ्या दिवशी सकाळी ६

वाजता मुक्त करण्यात येई. त्या काळात मी रात्री ९ ला झोपत असे व सकाळी ४ ला उठत असे. म्हणून मला सर्व प्रातविधी कोठडीतच करावे लागत असत. शौच्यासाठी आम्हाला दोन भांडी देण्यात आली होती. ती जरा लहान असल्यामुळे त्या कामासाठी पुरेशी नव्हती. म्हणून त्यांनी मला मोठी भांडी दिली. मला शौचाला बसण्यास सोईचे जावे म्हणून मला दोन लाकडी बैठका अगर विटा दयाव्यात अशी विनंती मी अधीक्षकाला केली. तुसडेपणाने तो मला म्हणाला की, तुम्हाला विटा अगर लाकडी बैठका मिळणार नाहीत. त्याने पुन्हा सांगितले की, जर मला पाहिजे असतील तर तीन भांडी मी घ्यावीत. परंतु विटा मात्र मिळणार नाहीत. त्यांची मेहेरबानी नको असल्यामुळे त्यावर मी काही बोललो नाही, जी दोन भांडी अधीक्षकाकडून मला दिली होती त्यांचा वापर केला. यापुढे अधीक्षकाकडून भविष्यात काही एक वस्तू मागावयाची नाही हाही निर्णय मी घेतला. येरवडयाच्या सात-आठ महिन्यांच्या माझ्या मुक्कामात मला कधीकधी थंडीताप येत असे. जेव्हा साबरमती तुरुंगात माझी पहिली शिक्षा मी भोगीत होतो, त्यावेळी हा रोग मला जडला. परंतु अधीक्षकाला अगर दुसऱ्या अधिकाऱ्याला त्याबद्दल मी बोललो नाही व उपवासाने मी स्वत: बरा झालो. आवारात आम्ही फक्त पाचजण असल्यामुळे आमच्या दरम्यान शांतपणे चर्चा होत असे. त्यामुळे आम्हाला अनेक गोष्टींचे ज्ञान व शिक्षण मिळाले.

मी अगोदरच असे सांगितले आहे की, थोडचा वर्षांपूर्वीच सर्व गीता तोंडपाठ करावी असे मी ठरविले होते व जरी मी प्रयत्न केले तरी ते मी पुढे चिकाटीने चालू ठेवले नाहीत. माझ्या अपयशाची मुख्य कारणे म्हणजे आळस व निश्चयाचा अभाव ही होत. तुरुंगात असतानाच गीता तोंडपाठ करावी हा माझा निश्चय मी पुन्हा नव्याने येरवडचात केला. दररोज एक नवीन अध्याय तोंडपाठ करावयाचा व दुसऱ्या दिवशी जेवढे अध्याय अगोदर तोंडपाठ केलेले होते ते पुन्हा पाठ म्हणावयाचे. त्याचा असा परिणाम झाला की, अठराव्या दिवसाच्या शेवटी कोणतीही अडचण न येता मी सर्व गीता तोंडपाठ म्हणू शकलो. त्या वेळपासून अनेक वर्षे दररोज हा क्रम मी चालू ठेवला. गीतेवरील अनेक भाष्ये मी जरी वाचली होती, तरी काही वर्षे त्यांच्यातील काही श्लोकांचे अर्थ मला लागत नसत. परंतु दररोज गीता पठण केल्यामुळे व त्यावर चिंतन केल्यामुळे व माझ्या जीवनाला ते लागू केल्यामुळे माझे सर्व संशय हळूहळू दूर झाले व तिच्या सत्यतेबद्दल माझी पूर्ण खात्री झाली. मी जर गीता तोंडपाठ केली नसती तर आज मला जेवढी ती समजली आहे तेवढी मला ती समजली नसती. संस्कृतात ज्याला ज्ञान म्हणतात त्याची जाणीव ज्या वेळी कर्म व ज्ञान ह्या दोहोत काही फरक नसतो त्या वेळी होते. इंग्रजीत ज्ञानाला समान अर्थी योग्य व परिणामकारक शब्द नाही. 'नॉलेज' या शब्दाने तो अर्थ ध्यानात येत नाही.

त्याचा अर्थ पूर्ण माहिती! नॉलेज व कर्म या दोहोंत नेहमी एकता नसते. ज्या वेळेला नॉलेज व कर्म ह्यांचे संपूर्ण मीलन होते, त्यावेळी त्याला ज्ञान झाले असे म्हणता येईल.

येरवड्याचे तुरुंगाधिकारी मी ७-८ महिने तेथे असताना आमच्या आवाराला भेट देण्यासाठी नेहमी येत असत. अनेक गोष्टींवर ते माझ्याशी चर्चा करीत असत, तथापि माझ्या युक्तिवादाला त्यांना उत्तर देता येत नाही असे पाहून ते एकदा म्हणाले, 'तुम्ही फार वाद करता.' मी उत्तर दिले, 'तुम्ही विचारासाठी मुद्दे उपस्थित केले म्हणून त्या मुद्द्यांवर वादविवाद करतो.' तुरुंगाधिकारी व कैदी या भूमिकेतून जर तुम्ही वादविवाद करीत असाल तर तो न केलेला बरा. मी तुमच्याशी कोणत्याही बाबीवर वादविवाद करण्यास तयार आहे. तथापि तो वादविवाद समान भूमिकेवरून झाला तरच व्हावा. ह्यामुळे तुरुंगाधिकाऱ्यांशी माझा जो वादविवाद होत असे त्याचा शेवट झाला.

१९३४ च्या मे अगर जूनमध्ये व्यक्तिगत सत्याग्रह जवळजवळ संपत आला होता. त्या वेळेपर्यंत फारच थोडे लोक त्यात भाग घेत होते. म्हणून महात्मा गांधींनी व काँग्रेसने तो मागे घेतला व माझी शिक्षा पूर्ण होण्यापूर्वी मला जुलैत सोडण्यात आले. वाटेत तीन दिवस मुंबईला थांबून मी अहमदाबादेस गेलो.

माझी सुटका होण्यापूर्वी क्वेट्टा येथे झालेल्या धरणीकंपासंबंधात साह्यनिधी उभारण्यासाठी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला जमनालालजी अहमदाबादेस आले होते. ह्या कामी त्यांना मी मदत करावी असे त्यांनी मला सांगितले. मी त्यांना म्हणालो की, जर त्यांनी मला बरोबर नेले व एखादा श्रीमंत मनुष्य अपमानास्पद रीतीने वागला तर मी त्याला बेपर्वाईने उत्तर देण्याचा संभव आहे. त्यामुळे त्यांच्या कामाला अडथळा निर्माण होईल. म्हणून त्यांनी मला बरोबर न घेऊन जाणे हे उचित होईल. तथापि मी असे सांगितले असतानादेखील त्यांनी आग्रह धरल्यामुळे अहमदाबादमधील प्रमुख लोकांच्या भेटीसाठी मी त्यांच्याबरोबर गेलो. एका सद्गृहस्थाने दुसऱ्यांची नावे दिली व सुचविले की, आम्ही त्यांच्याकडे पहिल्यांदा जावे. आदल्या दिवशी ह्या साह्यनिधीविषयी मी जाहीर सभेत बोललो होतो व सर्वांनी ह्याला सढळ हाताने आपले कर्तव्य समजून मदत करावी असे आवाहन केले होते. मी त्यांना असेही म्हणालो की, ह्या फंडासाठी जे लोक तुमच्याकडे येतील ते एक सत्कृत्य करण्यास तुम्हाला मदत करीत आहेत अशी त्यांच्याबद्दल भावना ठेवावी. दैनिक वर्तमानपत्रांत मोठ्या मथळ्यात ही बातमी देण्यात आली होती.

ज्यांना भेटण्यासाठी जमनालालजी व मी गेलो होतो त्यांपैकी एकजण म्हणाला की, एकीकडे श्रीमंतांना जाहीर रीतीने मी ताकीद दिली आहे व

दुसरीकडे त्यांच्या कडूनच निधीला देणग्यांची मागणी मी करीत आहे, ही गोष्ट विचित्र वाटते.

मी उत्तर दिले, 'जर तुम्ही सर्व बातमी वाचली तर मी तसे काहीही बोललेलो नाही व मी जे काय केले ते कर्तव्य म्हणून!' त्यांनी ह्या निधीस देणग्या दयाव्यात असे मी जाऊन सांगितले.

'ज्याप्रमाणे तुम्हाला सार्वजनिक व्यासपीठावरून भाषणे करण्याचा नाद आहे तद्वत आम्हालाही पैसे साठविण्याचा छंद आहे.'

"पैसे मिळविण्याच्या तुमच्या छंदाविषयी माझी तक्रार नाही. सार्वजनिक व्यासपीठावरून बोलण्याचा मला नाद नाही ही गोष्ट तुमच्या ध्यानात यावयास पाहिजे होती. इंग्रजांची सत्ता संपुष्टात आणण्यासाठी लोकमत प्रबळ व्हावे म्हणून मला हे करणे भाग पडत आहे व तुमच्यासारखे लोक ते करीत नाहीत म्हणून मला ते करावे लागते म्हणून तुम्ही जे बोलला ते उचित नव्हते."

ह्या सद्गृहस्थाचे उत्तर असे होते की, आपणास स्वराज्य मिळले असते तर असे कोणी बोलले नसते व आतादेखील आम्हाला तुमच्यासारख्या लोकांची भीती वाटते.

मी टोमणा मारला की, 'जेव्हा आपणास स्वातंत्र्य मिळेल तेव्हा असे बोलण्याचे कोणाला धैर्य होणार नाही. तथापि ह्याक्षणी तुम्ही माझ्या तोंडावर माझा अपमान करीत आहात. तुम्हाला समज नसल्यामुळे ह्याविषयी मला दु:ख वाटत नाही.

वातावरण तंग झाल्यामुळे जमनालालजी व मी निधीची काहीएक वर्गणी गोळा न करता निघून गेलो. माझी भीती खरी ठरली व जमनालालजींनी स्वखुषीने कबूल केले की, मी जे म्हणत होतो ते बरोबर होते. असे असले तरी ह्यानंतरही आम्ही दुसऱ्या ठिकाणी गेलो व काही वर्गणी जमविली.

त्यावेळी अहमदाबादच्या रामपूर विभागातील भाई शंकर नानाभाई यांच्या माडीवर माझ्या भावाकडे मी राहात असे. सन १९३० ते १९३४ च्या दरम्यान बहुतेक काळात मी तुरुंगात अगर दौऱ्यावर असल्यामुळे माझ्या मुलाबाळांकडे मी काही एक लक्ष पुरवू शकलो नाही. त्यावेळी मला तीन मुले होती व माझ्या भावाला एक मुलगी होती. सन १९३४ मध्ये माझी सुटका झाली. नंतर चळवळ मागे घेण्यात आल्यामुळे व ताबडतोब फारसे काम करावयाचे नसल्यामुळे मला माझ्या मुलाबाळांबरोबर राहाण्यास भरपूर वेळ मिळाला. मी त्यांच्याबरोबर खेळत असे व त्यांना काही व्यायामाचे धडे देत असे.

त्यावेळी मी निरीक्षण केले की, मुले भीतिग्रस्त झालेली होती. माझ्या बालपणात ह्या कमजोरीमुळे मला त्रास सहन करावा लागला होता. तेव्हा भीती

किती हानिकारक आहे ह्याची मला जाणीव होती. म्हणून त्यांच्या मनातून भीती काढून टाकण्याचा मार्ग शोधण्याचा मी प्रयत्न केला. आम्ही पहिल्या मजल्यावर राहात होतो. मला एके दिवशी असे आढळून आले की, माझी मुले रात्री तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर जाण्यास भीत होती. त्यांनी स्वत: रात्री तेथे जावे म्हणून मी त्यांना आग्रह करू लागलो. थोड्या दिवसानं त्यांच्या भीतीचा गंड काढून टाकण्यात मी यशस्वी झालो. त्यामुळे मला फार समाधान वाटले.

माझ्या दोन मुली नगरपालिकेच्या शाळेत शिकत होत्या. एके दिवशी त्यांनी सिनेमासाठी माझ्याकडे पैसे मागितले. माझ्या मुलांनी ह्यापूर्वी कधीही अशी इच्छा दर्शविली नव्हती. मी त्यांना विचारले की त्यांना सिनेमाला का जावयाचे आहे. त्यांनी मला सांगितले की, शाळेने चित्रपट पाहण्यासाठी मुलांना घेऊन जाण्याची व्यवस्था केली आहे व त्यासाठी त्यांना घरून पैसे आणण्यास सांगितले आहे. त्यांनी मला सांगितले की, त्यांनी स्वत:हून सिनेमाला जाण्याची इच्छा नाही. मी त्यांना म्हणालो की, आपल्याजवळ पैसे नसल्यामुळे घरून या कामासाठी पैसे मिळण्यासारखे नाहीत असे तुमच्या शिक्षकांना जाऊन सांगा. मुली रडल्या व म्हणू लागल्या की, शिक्षक आम्हाला टोमणा मारतील आणि म्हणतील की, तुम्ही भिकारी आहात त्यामुळे आम्हाला फार दु:ख होईल. तेव्हा मी त्यंना समजून सांगितले की जर शिक्षक असे करतील तर ते चूक होईल.

मी मुलींना सल्ला दिला की, जर तुम्हाला टोमणा मारला तर तुम्ही तुमच्या शिक्षकांना नम्रतेने सांगा की, आम्ही गरीब आहोत. सिनेमासाठी आमच्याजवळ पैसे नाहीत. तुम्ही आणखी म्हणा की, भिकारी व्हावयाचे नाही ह्यासाठी असा खर्च आम्हाला करावयाचा नाही. जर ह्यानंतर शिक्षकांनी पुन्हा तुमच्याकडे तगादा लावला तर मी त्यांच्याशी स्वत: बोलेन. आपण स्वत: खरोखरीच गरीब असल्यामुळे व आपण फक्त आपल्या शक्तीप्रमाणे खर्च करीत असल्यामुळे आपण गरीब आहोत ही गोष्ट मान्य करण्यास आपणास संकोच वाटण्याचे कारण नाही. स्वाभिमानाने राहाण्याचा व जीवनात समाधानी राहाण्याचा हा एकच मार्ग आहे.

माझ्या मुलांना माझा युक्तिवाद मान्य होता की नाही हे मला ठाऊक नाही. परंतु त्यांना न समजल्यामुळे अथवा माझ्याबद्दलच्या आदरामुळे त्यांनी माझ्याकडे पैसे मागण्याचे सोडून दिले. ज्या तऱ्हेने शिक्षकांनी मुलांचा स्वाभिमान दुखविला त्या तऱ्हेने त्यांनी करावयास नको होते व जो खर्च त्यांना झेपत नाही, अशा खर्चात मुलांना त्यांनी नाहक टाकू नये. शिक्षकांना भेटण्याची ज्यावेळी मला संधी मिळाली तेव्हा त्यांना ही गोष्ट मी समजावून सांगितली.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# सदाशिव कान्होजी पाटील.

जन्म १४ ऑगस्ट, १९००, मृत्यू २२ जून १९८२

थोर काँग्रेस कार्यकर्ते आणि प्रभावी वक्ते.

जन्म मालवण. जिल्हा सिंधुदुर्ग येथे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मालवण येथे. विदचार्थी दशेत स्वदेशी चळवळीकडे आकृष्ट. १९१८ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण. १९१९ साली मुंबईच्या सेंट झेविअर्स कॉलेजमध्ये प्रवेश. १९२० साली इंटरच्या वर्गात असताना कॉलेज सोडून असहकारितेच्या चळवळीत प्रवेश. १९२१ ते २४ मालवण येथे राष्ट्रीय शाळेची स्थापना. १९२४ साली इंग्लंडला प्रयाण. तेथे युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये वृत्तपत्रव्यवसायाचा डिप्लोमा कोर्स पूर्ण केला. १९२७ मध्ये मुंबईस परत आल्यावर बॉम्बे क्रॉनिकलकडे दाखल. १९२९ साली मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी. हे पद १७ वर्षे सांभाळले. १९३० च्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल कारावास. १९३० ते ४५ पर्यंत एकूण ८ वेळा कारावास. १९३१ साली बॉम्बे क्रॉनिकल सोडून काँग्रेसच्या चळवळीत पूर्णवेळ सामील. १९३२ साली मुंबई म्युनिसिनपालिटीत नगरपिते म्हणून निवड झाली. ही जागा वीस

वर्षे सांभाळली. १९३३ साली ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सभासद म्हणून निवड. १९३७ ते ४६ मुंबई लेजिस्लेटिव्ह अॅसेंब्लीचे सभासद. १९४६ साली मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून निवड. १९४७ ते ५० घटनासमितीचे सभासद म्हणून निवड. याच काळात काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद. १९५० साली मुंबईचे महापौर. सतत तीन वर्षे महापौर म्हणून निवड. १९५२ साली पार्लमेंटमध्ये निवड. १९५७ ते ६० पर्यंत काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद, १९५७ मध्ये केंद्रीय मंत्रीमंडळात प्रवेश. १९५९ ते ६४ केंद्रीय मंत्रीमंडळात पाटबंधारे आणि विदयुत, वाहतूक आणि दळणवळण शेतकी आणि अन्न या खात्याचे मंत्री. १९६३ मध्ये कामराज योजनेनुसार मंत्रीमंडळाचा राजीनामा. १९६४ साली पुनरपि केंद्रीय मंत्रीमंडळात रेल्वेमंत्री. ६७ साली निवडणुकीत जॉर्ज फर्नांडिसकडून पराभव. त्यानंतर बनासकाठा मधून फेर निवडणूक.

१९६९ साली काँग्रेसपक्षाची दुफळी झाली आणि त्यांनी संघटना काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९८१ साली त्यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबई आणि महाराष्ट्रातील अनेक सार्वजनिक चळवळींत त्यांनी अखेरपर्यंत भाग घेतला.

हा उतारा त्यांच्या अप्रकाशित आत्मवृत्तातून घेतला आहे.

# मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी

स. का. पाटील

मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे अखिल भारतीय काँग्रेसच्या सुमारे शंभर वर्षांच्या इतिहासात एक आगळे आणि वैशिष्टचपूर्ण स्थान आहे. स्वातंत्र्य-संग्रामातील अनेक महत्वाच्या घटना या शहरातच घडल्या. स्वातंत्र्य लढ्यातील बेचाळीसचे अपूर्व असे काँग्रेस अधिवेशन याच शहरात भरले. त्यामुळे मुंबईसारख्या एका बहुरंगी आणि बहुढंगी शहरातील या काँग्रेस संघटनेला एका परीने अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले.

१९२० सालापूर्वी मुंबई शहरात काँग्रेस संघटना अस्तित्वात नव्हती. त्या काळात बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन नावाची एक संस्था अस्तित्वात होती आणि या संस्थेतर्फे काही कार्यक्रम होत आणि त्यात लिबरल पक्षाचे नेते भाग घेत. वास्तविक पाहात इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना मुंबई शहरातच तेजपाल हॉल मध्ये १८८५ साली झाली आणि बंगाली नेते उमेशचंद्र बॅनर्जी हे तिचे अध्यक्ष होते. देशातील सर्व राष्ट्रीय विचारसरणीचे नेते या पहिल्या अधिवेशनाला उपस्थित होते. पण या अधिवेशनात काँग्रेसची घटना तयार करण्यात आली नाही आणि प्रांतिक काँग्रेस संघटनाही स्थापन करण्यात आल्या नाहीत. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर काँग्रेसचे नेतृत्व गांधीजींकडे आले आणि १९२० साली विजयराघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या नागपूर काँग्रेसमध्ये काँग्रेसची रीतसर घटना स्थापन करण्यात आली आणि या घटनेप्रमाणे प्रांतिक काँग्रेस संघटनांची स्थापना करण्यात आली आणि त्याच वर्षी मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीची स्थापना झाली. ब्रिटीश अंमलात त्या काळात जे प्रांत होते त्या प्रांतांत सर्वत्र अशा संघटना स्थापन करण्यात आल्या पण मुंबई प्रांतातील मुंबई या शहराचे एक वेगळे वैशिष्टच होते. या देशातील सर्व प्रांतातील लोक इथे वावरत होते. त्यामुळे या शहराला एक कॉस्मॉपॉलिटन स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे गांधीजींना या शहराच्या संदर्भात एक वेगळा प्रयोग करण्याची इच्छा झाली. या शहराला ते 'छोटा भारत' म्हणत आणि त्यामुळे मुंबई शहरातील काँग्रेसच्या संघटनेला प्रांतिक काँग्रेसचा दर्जा देण्यात आला आणि हा दर्जा आजतागायत कायम राहिला आहे.

त्यावेळी बी.पी.सी.सी. ला स्वतःची अशी वास्तू नसे. फोर्टमधील एका भाडयाच्या जागेत संघटनेचे काम चाले. त्या काळात सरोजिनी नायडू यांचे वास्तव्य मुंबईतच होते. त्यामुळे साहाजिकच त्यांना मुंबई प्रदेश काँग्रेसच्या पहिल्या अध्यक्षा होण्याचा मान मिळाला.

१९२३ मध्ये बी.पी.सी.सी. ने आज जेथे काँग्रेस हाऊस आहे ती जमीन विकत घेतली. १०,००० चौ. यार्डाच्या या जमिनीवर एक जुनी इमारत होती. ही इमारत काँग्रेस संघटनेच्या कचेरीसाठी योग्य अशीच होती. त्यामुळे लागलीच तिची थोडी डागडुजी करून सभेसाठी म्हणून एक छोटा हॉलही तयार करण्यात आला. आणि याच इमारतीला टिळक सदन हे नाव ठेवण्यात आले. त्यानंतर काही वर्षे सरोजिनी नायडू यांच्या अध्यक्षतेखाली बी.पी.सी.सी. ने मुंबई शहरात काँग्रेस संघटनेचे कार्य मोठ्या जोमाने केले. याला कारण सरोजिनी नायडू यांचे प्रभावी आणि आकर्षक व्यक्तिमत्व. त्यामुळे देशांतील एक प्रभावी प्रांतिक काँग्रेस म्हणून मुंबई काँग्रेसचा लौकिक वाढला. १९२३ साली इमारत आणि जमीन यासाठी ३,७५००० रु. दयावे लागले तर आज तिची किंमत ५० लक्ष रुपयांहून अधिक आहे. कालांतराने या जागेत एक स्वतंत्र इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला अर्थात त्या काळात जागेची अशी टंचाई नव्हतीच. रस्त्याच्या बाजूला एक निवासी वसतिस्थान बांधावे असेही ठरले. त्यावेळी या रस्त्याला गिरगाव बँकरोड असे नाव होते. १९३० साली. आजची इमारत बांधली गेली आणि विठ्ठलभाई पटेल यांच्या स्मरणार्थ आम्ही त्याला नाव दिले विठ्ठल सदन निवासी इमारतीला दादाभाई मंझील हे नाव देण्यात आले. नवी इमारत तयार होताच त्यात काँग्रेस कचेरी हलवण्यात आली आणि टिळक सदनाचे निवासस्थानांत रूपांतर करण्यात आले.

सरोजिनी नायडू एकूण सात वर्षे बी.पी.सी.सी. च्या अध्यक्षा होत्या. खरे पाहिले तर त्यांनीच मुंबई प्रदेश काँग्रेसचा पाया घातला. १९२९ पर्यंत मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी फारशी कार्यमग्न नव्हती. पण महात्मा गांधींची राजकीय चळवळ सुरू होताच काँग्रेस संघटनेच्या कार्याला गती आली. सरोजिनी नायडू यांच्याकडे नेतृत्वाला लागणारे सगळे गुण होतेच पण याशिवाय कवियित्री म्हणून त्यांची ख्याती होती. काँग्रेस संघटनेत त्यांना मानाचे स्थान होते. सुरुवातीपासून त्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्य होत्या. त्यांची विनोदबुद्धी अत्यंत तरल होती आणि त्यामुळे त्या हसत खेळत कुणाचीही थट्टामस्करी करीत. त्यांच्या तडाख्यातून गांधीजीही सुटले नाहीत. त्या गांधीजींना मिकीमाऊस म्हणत. पण त्यामुळे गांधीजी कधीच चिडले नाहीत. उलट एक दिवस ते गंमतीने त्यांना म्हणाले मी चक्क तुझ्या प्रेमात पडलोय. सरोजिनी नायडूंचे आणि इतर ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांचे असेच खेळीमेळीचे संबंध होते. सरोजिनी नायडूंचे अनेक भाषांवर

प्रभुत्व होते. आंध्र प्रदेशातील डॉ. नायडू यांच्याशी त्यांचा विवाह झाला होता. त्यामुळे त्यांना तेलगू भाषाही चांगलीच अवगत होती.

१९३५ साली आम्ही जेव्हा राष्ट्रीय काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव साजरा केला त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून मी सरोजिनी नायडू यांना बोलावले होते व त्यावेळी त्यांच्या हस्ते राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ज्या तेजपाल हॉलमध्ये झाली त्या तेजपॉल हॉलवर त्यांच्या हस्ते एक स्मृतिशलाका आम्ही बसवली आणि त्यावरील लेख हा त्यानींच तयार करून दिला. आज तेजपाल हॉल पाडून टाकण्यात आला असला तरी ही स्मृतिशलाका अजून मथुरादास विसनजी हॉलमध्ये जपून ठेवण्यात आली आहे.

सरोजिनी नायडू यांच्यानंतर मुंबई काँग्रेसचे नेतृत्व कुणाला दयावे असा प्रश्न निर्माण झाला. अशा प्रकारची लायक व्यक्ती त्या काळात मुंबई काँग्रेसमध्ये कोणीही नव्हती. पण त्यावेळी एक नवा तारा उदयाला येत होता. त्याचे नाव के. एफ्. नरिमन. ते काँग्रेस कार्यकर्ते असले तरी ते एक यशस्वी वकील असल्यामुळे त्यांचा सगळा वेळ हायकोर्टातच जाई. त्यावेळी ते हार्वे-नरिमन केस चालवीत होते आणि अखेर ती केस नरिमन जिंकले. या केसच्या निकालाकडे साऱ्या देशाचे डोळे लागले होते त्यामुळे या केसच्या निकालामुळे नरिमनचे नाव मुंबईत ज्याच्या त्याच्या तोंडी झाले. त्यामुळे नरिमन यांना बी.पी.सी.सी. चे नेतृत्व घेण्याची विनंती करण्यात आली आणि १९२९ साली नरिमन हे मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यानंतर १९३६ पर्यंत त्यांनी मुंबई काँग्रेसचे नेतृत्व केले. ते रोज सकाळी मुंबई काँग्रेसच्या कचेरीत येत आणि काही वेळा संध्याकाळीही येत. त्यांच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत मुंबई काँग्रेस जोमाने कार्य करती झाली.

पण या सात वर्षांच्या काळात नरिमन काँग्रेसच्या मूळ प्रवाहाशी एकरूप होऊ शकले नाहीत. १९३० साली कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. मुंबईतील तीन लाख काँग्रेस कार्यकर्ते या चळवळीत पकडले गेले. राष्ट्रीय चळवळीतील एक अग्रगण्य शहर मुंबईची साऱ्या देशात ख्याती झाली. १९३४ पर्यंत काँग्रेस संघटना ही बेकायदेशीर संघटना ठरवून सरकारने काँग्रेस कचेऱ्यांना टाळे लावले होते. मुंबई प्रदेशच्या काँग्रेसच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींनी के. एफ्. नरिमन यांचा काँग्रेस कार्यकारिणीत समावेश करण्याचा निर्णय घेतला. या नावाला अर्थातच काहींचा विरोध होता. देशासाठी खस्ता खाल्लेल्या राष्ट्रीय नेत्यांचाच काँग्रेस कार्यकारिणीत आतापर्यंत समावेश करण्यात आला होता. नरिमन हे पारसी जमातीचे आणि त्यावेळी भारतात एकूण ८० हजार पारशी लोकसंख्या होती. आणि त्यातील बहुसंख्य पारशी मुंबईत होते. त्यामुळे एका

सुसंस्कृत अल्पसंख्य जमातीला प्रतिनिधित्व दयावे म्हणून गांधीजींनी नरिमन यांना काँग्रेस वर्कींग कमिटीत घेण्याचा निर्णय घेतला. नरिमन यांचा हा गौरव म्हणजे एकापरीने मुंबई काँग्रेसचा गौरव होता यात शंकाच नाही.

त्यानंतर सरदार पटेल आणि नरिमन यांच्यात मतभेद झाल्यामुळे नरिमन यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर परत मुंबई काँग्रेसच्या नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला. नरिमन यांच्यानंतर त्यांचाच तोलामोलाच अध्यक्ष निवडणे भाग होते. शेवटी अनेक नावांची चर्चा करून आम्ही भुलाभाई देसाई यांना नेते म्हणून निवडण्याचे ठरवले. त्यावेळी भुलाभाई काँग्रेसचे प्राथमिक सभासदही नव्हते. मी याबाबत सरदार वल्लभभाई पटेल यांचा सल्ला घेतला आणि भुलाभाई देसाई यांना काँग्रेसचे प्राथमिक सभासद करून मगच त्यांची मुंबई प्रदेशचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

भुलाभाई हेही मुंबई हायकोर्टातील एक नामवंत बॅरिस्टर. त्यामुळे त्यांनी मला सांगितले की मुंबई काँग्रेसच्या संघटनेची सर्व जबाबदारी मी पाहायची आणि ते फक्त सभेच्या वेळी उपस्थित राहातील. अध्यक्ष या नात्याने नरिमनच्या राजीनाम्यामुळें रिकाम्या झालेल्या जागेवर काँग्रेस वर्किंग कमिटीने भुलाभाईंची सदस्य म्हणून नेमणूक केली. त्यावेळी मुंबईत वर्किंग कमिटीची जी बैठक भरली ती वॉर्डन रोडवरील भुलाभाई देसाई यांच्या निवासस्थानी —त्यांच्या लायब्ररी हॉल मध्ये.

त्यावेळी आयकर खात्याने मुंबई काँग्रेसवर वार्षिक ७२००० रु. आयकर बसवला. मुंबई हायकोर्टात भुलाभाईंनी आमची केस लढवली. आयकराची कटकट कमी करण्यासाठी भुलाभाईंनीच आम्हाला बी.पी.सी.सी. चा ट्रस्ट करण्याची सूचना दिली. आणि त्याप्रमाणे आम्ही त्याचा एक ट्रस्ट बनवला. भुलाभाई मुंबई काँग्रेसचे मित्र आणि हितकर्ते या नात्याने अखेरपर्यंत वावरले. राष्ट्रीय नेत्यांत त्यांना फार महत्त्वाचे स्थान होते आणि म्हणून क्रिप्स मिशनच्या वेळी वाटाघाटींसाठी त्यांना खास पाचारण करण्यात आले होते. त्यानंतर ते आजारी पडले आणि एक महिन्याच्या आतच त्यांचे शोचनीय निधन झाले.

भुलाभाई यांच्या आयुष्यातील नेत्रदीपक घटना म्हणजे सुभाषबाबूंच्या इंडियन नॅशनल आर्मीचा खटला. आझाद हिंद सेनेचे तीन अधिकारी शहानाझ, सेहगल आणि धिल्लाँ यांच्यावर ब्रिटीश सरकारने हा खटला भरला. या खटल्याला केवळ भारताच नव्हे तर आतरराष्ट्रीय वर्तुळातही फार महत्त्व प्राप्त झाले होते. हे तीन आरोपी दोषी ठरते तर परिस्थिती फार बिकट झाली असती. त्यांच्या बचावाची सारी जिम्मेदारी भारतीय काँग्रसने घेतली होती. बचाव पक्षाच्या वकिलांचे नेते म्हणून भुलाभाई देसाई यांची निवड करण्यात आली.

पं. जवाहरलाल नेहरू हेही प्रदीर्घ काळानंतर बकिलाचा काळा झगा घालून कोर्टात उपस्थित होते. या खटल्यातील भुलाभाई यांचा युक्तिवाद अविस्मरणीय असाच होता. त्यांचे शेवटचे भाषण त्यावेळी पुस्तकरूपाने प्रकाशित झाले आणि त्याच्या शेकडो प्रती खपल्या. या खटल्यात ते तिन्ही आरोपी निर्दोष सुटले आणि भुलाभाई देसाई त्यामुळे राष्ट्रीय नेत्यांच्या पंक्तीत जाऊन बसले. हा एकप्रकारे मुंबई काँग्रेसचा गौरव होता कारण ते मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष होते.

भुलाभाई देसाई यांच्यानंतर आम्ही अध्यक्ष म्हणून नगीनदास टी. मास्तर यांची मुंबई काँग्रेसचे नेते म्हणून निवड केली. ते एक नामवंत सॉलिसिटर असून ४० आणि ४२ च्या चळवळीत त्यांनी कारावास सोसला होता. नगीनदास हे सौम्य प्रकृतीचे आणि मनमिळाऊ असल्यामुळे त्यांची कारकीर्द यशस्वी झाली. पण ते दोन वर्षांतच अचानक मृत्यू पावले. आता त्यांच्यानंतर अध्यक्ष कोण म्हणून परत प्रश्न निर्माण झाला. पण यावेळी मुंबई प्रदेशने माझीच एकमताने अध्यक्ष म्हणून निवड केली. १९५७ मध्ये नेहरूमंत्रीमंडळात माझी निवड होईपर्यंत मी सतत १० वर्षे मुंबई प्रदेशचा अध्यक्ष होतो. त्या काळात मी सतत तीन वर्षे मुंबईचा महापौर म्हणून काम केले त्यामुळे माझी जबाबदारी फार अवघड होती. त्याच काळात मी संसद सदस्य म्हणूनही मुंबई तर्फे निवडून आलो. मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे नेतृत्व मी यशस्वी रीतीने पार पाडू शकलो याचे कारण मुख्यत्वेकरून सरदार वल्लभभाई पटेल याचा पाठिंबा आणि मार्गदर्शन. अडचणीच्या वेळी मी प्रसंगी महात्मा गांधींचाही सल्ला घेत असे.



# डॉ. ग. य. चिटणीस

जन्म २० सप्टेंबर १९००, मृत्यु २२ ऑगस्ट १९४९

**महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत आणि लेखक.**

माध्यमिक शिक्षण रत्नागिरी येथे. महाविदयालयीन शिक्षण सेंट झेवियर्समध्ये. त्यानंतर कलकत्त्याला ब्राह्मो समाजात दाखल झाले. काही दिवस कलकत्त्याच्या सिटी कॉलेजमध्ये. त्यानंतर मन्मथदास यांच्या शिलाँग येथील सेवाश्रमात वास्तव्य. त्यानंतर नगरच्या ब्राह्मो समाजात काही काळ घालवून मुंबईत परतले. मुंबईत ब्राह्मो समाजाचा प्रचार आणि सुबोध पत्रिकेत लेखन.

त्यानंतर ब्राह्मो समाजातर्फे ऑक्सफर्डला प्रयाण. तेथे पी.एच्.डी. पदवी संपादन केली. रॉयल एशियाटिक सोसायटी आणि रॉयल सोसायटी फॉर लिटरेचर यांचे सदस्य म्हणून निवड झाली.

त्यानंतर मुंबईस परतल्यावर गुजरात पूरग्रस्तांसाठी काम केले. ब्राह्मो समाजाच्या शतसंवत्सरीच्या निमित्ताने जपानला गेले.

मुंबईत परतल्यावर यूथ लीगशी संबंध. कॉमरेड एम्. एन्. रॉय यांच्याकडे आकृष्ट व रॉय गटात सामील. झाशी येथे भरलेल्या बुंदेलखंड कामगार आणि किसान परिषदेस उपस्थित. त्यानंतर कामगार चळवळीत भाग. काही काळ चित्रा साप्ताहिकाचे संपादक म्हणून काम पाहिले. डॉ. चिटणीसांनी विविध स्वरूपाचे स्फुट लिखाण केले. त्यांनी मराठीत कादंबरी लेखनही केले. सदर उतारा त्यांच्या आत्मवृत्तातून सादर करीत आहोत.

## स्वतंत्रभारत सभा

डॉ. चिटणीस

एके दिवशी सकाळी मुंबई यूथ लीगचे सेक्रेटरी श्री. कोप्पीकर माझ्याकडे आले आणि म्हणाले, 'आमच्या यूथ लीगच्या कार्यकारी मंडळामध्ये कॉमरेड रॉयचा मॅनिफेस्टो आम्ही पास करून घेतला आहे. त्या मॅनिफेस्टोचा मुंबई नि उपनगरांत प्रचार करण्यासाठी आम्ही यूथ लीगच्यातर्फे अनेक सभा भरवणार आहोत. त्यांपैकी पहिली सभा आज रात्री माटुंग्याला भरणार आहे. त्या सभेचे अध्यक्षस्थान तुम्ही स्वीकारावे अशी आमची सर्वांची इच्छा आहे.' मला त्यांची ही विनंती ऐकून जरा आश्चर्यच वाटले. कारण हिंदुस्थानात आल्यापासून मी कोणत्याही राजकीय सभेत भाग घेतला नव्हता. शिवाय रॉयच्या मॅनिफेस्टोची ही काय भानगड आहे ती मला मुळीच माहीत नव्हती. म्हणून मी नकार दिला. परंतु कोप्पीकर हट्ट घेऊन बसले. ते म्हणाले, 'या सभांचं अध्यक्षस्थान जर तुम्ही स्वीकारलं नाहीत, तर मला या सभा भरवणं मुष्किल जाईल. कारण या सभांत कम्युनिस्टांचे दोन गट हजर राहातील आणि त्यांच्यामध्ये लाथाळी सुरू होईल. म्हणून या दोन्ही गटांना आवरून धरणारा निःपक्षपाती अध्यक्ष मला पाहिजे.' ते एवढं बोलल्यानंतर मला नाही म्हणण्याचे जिवावर आले. ठरल्यावेळी मी सभेच्या जागी जाऊन पोचलो. त्या ठिकाणी सर्वच मंडळी मला अनोळखी दिसली. त्या दिवशी बोलणाऱ्या वक्त्यांमध्येसुद्धा सुंदर काबाडीशिवाय मी दुसऱ्या कुणालाच ओळखत नव्हतो. थिऑसॉफिकल सोसायटीत सुंदर असताना माझी आणि त्याची ओळख झाली होती. तथापि तो विलायतेहून परतल्यानंतर त्याच्या वृत्तीत किती तरी फरक झाला होता. पूर्वी त्याच्या डोळ्यात आध्यात्मिक कोमलतेची चमक दिसे. त्याच डोळ्यात मार्क्सपंथी भौतिकवादाचा बेडरपणा शिरला होता. सभेला सुरुवात झाली. मी अध्यक्षस्थानी बसल्यानंतर सुंदर काबाडीने प्रथम बोलायला सुरवात केली. त्याने रॉयच्या मॅनिफेस्टोत असलेली कॉन्स्टिट्युअंट असेंब्लीची कल्पना विशद करून सांगण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर कॉ. शेख बोलायला उठला. या गृहस्थाविषयी जहाल गटामध्ये अनेक अफवा पसरल्या होत्या. तो वर्णाने गोरापान होता आणि त्याचे नाक तरतरीत होते. म्हणून तो खरोखर जातीने काश्मिरी ब्राह्मण असून शेख हे टोपण नाव पोलिसांना चकविण्यासाठी त्याने धारण केले आहे अशी बाजार गप्प काही जणांनी उठवली होती. तो रॉय पक्षाचा असल्यामुळे त्या वेळचे अतिजहालवादी कम्युनिस्ट त्याला पाण्यात पाहात असत. त्यांनी अशी गप्प उठवून दिली की, शेख हा 'सेकंड इंटरनॅशनल'चा हस्तक असून खऱ्या क्रांतिकारक पक्षाला म्हणजे कम्युनिस्टांना हाणून पाडण्यासाठी तो हिंदुस्थानात आला आहे. वस्तुस्थिती अशी होती की, कॉ. रॉय हे प्रथम थर्ड इंटरनॅशनलच्या वतीनेच काम करीत. १९२९ साली त्यांना थर्ड इंटरनॅशनलमधून काढण्यात आले. तेव्हापासून कॉ. रॉयनी आपला स्वतंत्र असा कम्युनिस्ट गट स्थापन केला; पण तो मात्र हिंदुस्थान-पुरताच. हिंदुस्थानच्या बाहेर म्हणजे जर्मनी, अमेरिका, वगैरे देशांमध्ये उजव्या कम्युनिस्टांचा पक्ष अगोदरच स्थापन झाला होता. त्या पक्षाचे नेतृत्व ब्रँण्डलर, थालायूमार, लव्हस्टोन प्रभृति एकेकाळी जगप्रसिद्ध असलेल्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांकडे होते. या पुढाऱ्यांना थर्ड इंटरनॅशनलमधून अगोदरच काढण्यात आले होते. कॉ. रॉय थर्ड इंटरनॅशनलच्या बाहेर आल्यानंतर याच पक्षाला सामील झाले. याच वर्षी म्हणजे १९२९ साली लिऑं ट्रॉट्स्की आणि त्याचा डावा कम्युनिस्ट गट यांची थर्ड इंटरनॅशनलमधून हकालपट्टी झाली होती हे मी जाता जाता सांगून ठेवतो. अर्थात थर्ड इंटरनॅशनलमध्ये फक्त एकच कम्युनिस्टांचा गट शिल्लक राहिला. तो गट म्हणजे सोव्हिएट रशियात सत्तारूढ झालेल्या कम्युनिस्टांचा. या गटाचे नेतृत्व कॉ. जोसेफ स्टालीन याच्याकडे होते. मी वर ज्या सभेचा उल्लेख केला आहे, त्या सभेमध्ये रॉयवादी आणि स्टालीनवादी असे दोनच गट हजर होते. माझा स्वतःचा कल जरी ट्रॉट्स्कीकडे होता, तरी आतापर्यंत राजकरणात प्रत्यक्ष भाग घेण्याचा प्रसंग न आल्याकारणाने मी त्यासंबंधाने सुसंघटित असा विचार कधीच केला नव्हता.

कॉ. शेखचे भाषण संपल्यानंतर कोप्पीकर प्रभृति दोन-तीन वक्त्यांनी रॉयच्या मॅनिफेस्टोवर भाषणे केली. सर्व वक्त्यांची भाषणे संपल्यानंतर या विषयांवर आणखी कुणाला काही बोलायचे आहे किंवा काय असा प्रश्न मी विचारल्याबरोबर कॉ. एस्. व्ही. देशपांडे यांचा धाकटा भाऊ बोलायला उठला. तो बोलायला उठल्याबरोबर माझ्या शेजारी व्यासपीठावर बसलेले रॉयवादी चुळबूळ करू लागले. 'या गृहस्थाला बोलू देऊ नका' अशा अर्थाची खूण कॉ. शेखने मला केली. मला कॉ. शेखचा खूप राग आला. त्याच्याकडे दुर्लक्ष करून कॉ.

देशपांडेला बोलायची परवानगी मी दिली. आपल्या भाषणात कॉ. रॉयच्या मॅनिफेस्टोवर खूपच टीकेची झोड उठवली आणि कॉन्स्टिटचुअंट असेंब्लीच्या कल्पनेची त्याने टिंगल केली. त्याचे भाषण संपल्यानंतर समारोप करताना देशपांडेच्या टीकेचे मी खंडन केले. खरोखर पाहिले असता स्टालीनवादयांचा त्या वेळचा अतिजहालपणा कुणालाही पटण्यासारखा नव्हता. रॉयवादी माझ्यावर बेहद्द खूष झाले. यूथ लीगच्या प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान मला दयायचे असा आपला निश्चयही कोप्पीकरांनी मला बोलून दाखवला. स्टालीनवादी मात्र हिरमुसले होऊन मुकाटयाने घरी गेले.

त्यावेळेपासून जहालवादी चळवळीचा एक पुढारी म्हणून मी एकदम पुढे आलो. ही जी अवास्तव प्रसिद्धी मला मिळाली तिचं मला मनातल्या मनात हसू येई. परंतु माझे विचार मी कधीच कुणाला बोलून दाखवले नाहीत. यूथ लीगतर्फे एकामागून एक सभा भरविण्याचा कोप्पीकरनी तडाखा चालवला होता. प्रत्येक सभेला अध्यक्ष म्हणून माझी नेमणूक हटकून व्हायची. सुंदर काबाडी आणि कॉ. शेख यांना माझ्याविषयी एकाएकी आपलेपणा वाटू लागला. त्यांच्या प्रेमळ नि उत्साही वागणुकीमुळेच मी रॉयवादाकडे हळुहळू झुकू लागलो.

काही दिवसांनी यूथ लीग बेकायदेशीर ठरली आणि आमच्या पाठीमागची एक संस्था नामशेष झाली. अर्थात् आम्हाला दुसऱ्या संस्थेची जरूरी भासू लागली. लवकरच काँग्रेसमध्ये असलेल्या जहालवादयांची 'स्वतंत्र भारत सभा' स्थापन झाली. या संस्थेचा अध्यक्ष म्हणून माझीच निवड करण्यात आली. या संस्थेमध्ये अनेक जहालवादी होते. त्यांपैकी कॉ. वसंतराव कर्णिक, डॉ. शेट्टी, कॉ. ए. एन. शेट्टी, मि. पुतली, मि. एन्. एस्. चेट्टी, डॉ. रंगाचारी यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. कारण अगदी पहिल्या रॉय गटामध्ये या मंडळींचा समावेश झाला होता. स्वतंत्र भारत सभेतर्फे कॉ. रॉयच्या मॅनिफेस्टोचा आम्ही पूर्वीपेक्षा अधिक जोराने प्रचार चालवला. हे काम इतके प्रचंड प्रमाणात वाढले की, आम्हाला दिवसाला तीन तीन सभा उरकाव्या लागत असत. शेवटी आमचा प्रचार एवढा प्रभावी ठरला की ही सभा स्थापन झाल्यापासून पंधरा वीस दिवसांच्या आत ती बेकायदेशीर ठरली. अर्थातच आमचे सर्व काम एकदम थंड पडले.

आमच्या संस्थेतर्फे एक सभा आम्ही दादरला घेतली होती. या सभेचा अध्यक्ष मीच होतो हे काही सांगायला नकोच. ठरलेल्या वक्त्यांची भाषणे झाल्यानंतर माझ्या खुर्चीपाठीमागे बसलेला एक तरुण पुढे आला आणि मला

म्हणाला, 'सर, मला या मॅनिफेस्टोवर भाषण करायचे आहे.' 'सर' हा शब्द ऐकल्याबरोबर मी चपापलो आणि त्याच्याकडे पाहिले. त्याच्या अंगावर मी एकदम ओरडलो. मी म्हणालो, 'नाम्या, तू सभेत जहाल भाषणं करायला कधी शिकलास? आणि तुला या विषयात काय समजतंय? बस खाली.' असे म्हणून मी त्याच्याकडे पाठ फिरवली. तो बिचारा मुकाटचाने बसला. परंतु काही दिवसांनी तो स्टालीनवादयांना जाऊन मिळाला. माझ्या अरेरावी वर्तनाचाच तो परिणाम असावा कदाचित्. नामाला मी लहानपणापासून ओळखत होतो. तो आणि त्याची वडील बहीण माणक कलकत्त्याला प्रथम आपले वडील जयरामनाना वैदय यांच्याबरोबर आली. त्यावेळी नामा आठ-नऊ वर्षांचा असावा. त्या दोघाना कलकत्त्यातील अनेक प्रेक्षणीय स्थळे मी दाखवली होती. पुढे राममोहन स्कूलमध्ये मी शिक्षक असताना ती दोघे माझ्या वर्गात शिकत होती. अर्थात् माझा नि नामाचा गुरु-शिष्याचा संबंध होताच. परंतु जयराम-नानांचा आणि माझा स्नेहसंबंध दाट असल्यामुळे मला ती दोघे आपल्या भावंडांसारखी वाटत. काही दिवसानी नामा मॅट्रिक पास होऊन सेंट झेवियर कॉलेजमध्ये गेला. परंतु कम्युनिस्टांच्या नादी लागल्यामुळे त्याने आपला अभ्यासक्रम मध्येच थांबवला. माणकचे लग्न मुंबईत प्रार्थना समाजात १९२८ साली डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याशी झाले. ब्राह्मविवाहविधि करण्याचे वेळी आपल्याला सप्तपदी हवी असा माणकने हट्ट धरला होता. परंतु सप्तपदी करणे ब्राह्मधर्मतत्वाला अनुसरून नाही अशी जेव्हा मी तिची समजूत घातली तेव्हा तिने हट्ट सोडला. नामा फार दिवस कम्युनिस्टांच्या सहवासात राहिला नाही. जिवाचा बराच आटापिटा केल्यानंतर तो १९३२ साली इंग्लंडला निघून गेला. तिथेही बरीच वर्षे झगडल्यानंतर आपल्या गुणांच्या आणि कर्तबगारीच्या जोरावर 'टाइम' नावाच्या अमेरिकन नियतकालिकाचा इंग्लंडमधील खास प्रतिनिधी तो बनला. हाच पूर्वीचा नामा आज सुरेश वैदय या नावाने प्रसिद्ध आहे.

'स्वतंत्र भारत सभा' बेकायेशीर झाल्यानंतर आमच्या चळवळीत बराच विस्कळितपणा आला. खाजगी रीतीने भेटण्याची आणि विचारविनिमय करण्याची सोय नव्हती. अशा परिस्थितीत काही दिवस गेले. त्यानंतर एक दिवस सुंदर काबाडी माझ्याकडे आला आणि मला म्हणाला, 'आज रात्री माझ्याकडे काही निवडक मंडळी जमणार आहेत. त्यावेळी तुम्ही मि. चेट्टीना घेऊन या. आपण पुढील कार्यक्रमाची काही तरी निश्चित दिशा ठरवू.' ठरल्याप्रमाणे रात्री मी, चेट्टी आणि काणेकर काबाडीच्या घरी गेलो. त्यावेळी काणेकरांचा कल

स्टालीनवादाकडे थोडासा झुकत होता, परंतु मी त्याची फिकीर केली नांही. काणेकरांचे व माझे वैयक्तिक संबंध निकट असल्यामुळे त्यांच्यापासून कोणतीही गोष्ट गुप्त ठेवण्याचे मला कारण नव्हते. आम्ही काबाडीच्या घरी गेलो, त्यावेळी कॉ. शेख, डॉ. शेट्टी, कॉ. कर्णिक, अनंत शेट्टी, आणि पुतली ही मंडळी अगोदरच येऊन बसली होती. माझ्या डाव्या बाजूला एक साधारण स्थूल अंगाचा, धिप्पाड नि वर्णाने काळासावळा असा एक गृहस्थ बसला होता. त्या गृहस्थाची आणि माझी ओळख करून देताना सुंदर म्हणाला, 'हे डॉ. महमूद, लखनौहून आले आहेत. किसान चळवळीत हे काम करतात.' मी रीतसर त्या गृहस्थाशी हस्तांदोलन केले. परंतु नंतर त्याच्याकडे विशेष लक्ष दिले नाही. तो गृहस्थही काही न बोलता स्वस्थ बसून राहिला होता. काही वेळाने सभेच्या कामाला सुरुवात झाली. मी नेहमीप्रमाणे अध्यक्षस्थानी होतो. आरंभी कॉ. शेखने असा ठराव मांडला की, आपला एक स्वतंत्र राजकीय गट असावा. त्या गटाचे अधिष्ठान कॉ. रॉयच्या मॅनिफेस्टोवर आधारलेले असावे. कॉ. शेखच्या ठरावाला कुणी तरी दुजोरा दिला. पण मी कॉ. शेखला विरोध केला. मी म्हटले, 'आपला एक स्वतंत्र राजकीय गट असावा याविषयी कुणाचं दुमत होईल असं वाटत नाही. परंतु कॉ. रॉयचा मॅनिफेस्टो स्वीकारण्यापूर्वी त्यावर चर्चा करून त्यासंबंधी आपणा सर्वांचं एकमत होत आहे की नाही ते आपण प्रथम पाहिलं पाहिजे.: ही मी सूचना करतो त्याला एक विशिष्ट कारण आहे. आपण गेल्या महिना-दोन महिन्यांत या मॅनिफेस्टोचा किती तरी प्रचार केला. त्यावेळी मला असं आढळून आलं की, या मॅनिफेस्टोचा प्रचार करणारा प्रत्येकजण मनाला वाटेल तसा अर्थ लावतो. कित्येकांना तर तो मॅनिफेस्टो समजलेलाच नाही, असं मला वाटतं. म्हणून त्या मॅनिफेस्टोचा स्वीकार करण्याअगोदर आपण एके ठिकाणी बसून त्याच्यावर चर्चा करू. त्यांतील सर्व मुद्द्यांवर जर एकमत झालं तरच आपल्या राजकीय गटानं त्याचा स्वीकार करावा.'

माझे उद्गार ऐकल्याबरोबर कॉ. शेखच्या चेहेरा रागाने लालबुंद झाला. मी कॉ. रॉयच्या मॅनिफेस्टोलाच विरोध करीत आहे अशी त्याने मनाची समजूत करून घेतली. यानंतर बराच कडाक्याचा वादविवाद झाला. तो दोन तीन तास चालला होता. चेट्टी आणि काणेकर यांनी माझी बाजू उचलून धरली, परंतु बाकीच्या कॉमरेडस्नी शेखला पाठिंबा दिला. या वादांतून काहीच निष्पन्न होत नाही असे पाहून मी माझ्या शेजारी बसलेल्या गृहस्थांकडे वळलो आणि त्यांना या प्रश्नावर मत दयायला सांगितले. त्यांनी आपले दोन्ही खांदे उडवून मला म्हटले, 'मला यांत कांही समजत नाही. मी लखनौहून आलेला माणूस आहे. तुमचं तुम्हीच काय ते आपसांत ठरवा.' हे त्यांचे उद्गार ऐकून मला त्यांची खूप चीड आली पण मी त्यांना काही बोललो नाही. शेवटी मी शेखला म्हटले, 'आपण हा

प्रश्न मताला टाकू.' शेखने कबूल केले. माझ्या बाजूला मी, चेट्टी काणेकर आणि आणखी एक इसम अशी चौघांची मते पडली आणि शेखच्या बाजूने शेख, कर्णिक, दोन शेट्टी, पुतली अशी पाच मते पडली. ते पाहून मी खुर्चीवरून उठलो आणि शेखला म्हटले, की 'तुझ्या बाजूला पाच मतं पडलेली आहेत तेव्हा तू या मंडळींचा स्वतंत्र गट स्थापन कर. मी मात्र या गटात सामील होणार नाही.' इतके बोलून मी निघालो. मला पोचविण्यासाठी सुंदर काबाडी जिन्यापर्यंत आला. जिना उतरताना मी सुंदरला म्हटले, 'तू या लखनौच्या माणसाला सभेला कशाला बोलावलंस? मला तर तो अगदी बुद्दू दिसतो.' इतके बोलून मी झपाझप जिना उतरून खाली गेलो. इतक्यात काणेकर आणि चेट्टी हेही जिना उतरून खाली आले. आम्ही आपापल्या घरी गेलो. त्यावेळी मी आणि चेट्टी चौपाटी रोडवर राहात होतो; पण निरनिराळ्या घरात. चेट्टी हे माझे साडू लागतात हे जाता जाता सांगून टाकतो. काणेकर प्रार्थना समाजाजवळील कॉंट्रॅक्टर चाळीत राहात होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी सुंदर नि शेख माझ्या घरी आले आणि म्हणाले, 'आज रात्री आम्ही न्यू इरा हायस्कूलमध्ये जमणार आहोत. त्यावेळेस रॉयच्या मॅनिफेस्टोवर आपण चर्चा करू. तुम्ही चेट्टींना घेऊन या.' चेट्टी नि मी त्या सभेला गेलो. आम्ही मॅनिफेस्टोवर बरीच चर्चा केली. त्या मॅनिफेस्टोमध्ये स्वदेशीचा उल्लेख आला होता. चर्चा करताना स्वदेशी म्हणजे काय असा प्रश्न सुंदरने केला. त्या प्रश्नाचे उत्तर चेट्टीने दिले. डॉ. महंमूद तिथे होतेच. त्यांनी शेवटी 'Swadeshi is a form of taxation' असे म्हणून त्या विषयावर जवळ जवळ अर्धा तास विवेचन केले. ते विवेचन ऐकून मी अगदी थंड झालो. याच माणसाला मी काल बुद्दू म्हटले याचे मला हसू आले. विवेचन करताना डॉ. महंमूद म्हणाले की, 'कॉ. रॉयच्या निकट सहवासात मी बरीच वर्षे असल्यामुळे त्यांचं मन मी चांगलं ओळखू शकतो. या मॅनिफेस्टोचा अर्थ काय तो मला तुमच्यापेक्षा अधिक चांगल्या रीतीनं सांगत येईल.' बराच वेळ चर्चा झाल्यानंतर आमची सभा आटोपली. मी नि चेट्टी घरी जायला निघालो. रस्त्यात बोलताना मी चेट्टींना म्हटले, 'हा विलक्षण डोक्याचा मनुष्य दिसतो मला. 'स्वदेशी' शब्दाचा खरा अर्थ त्याने किती उत्तम रीतीने समजावून सांगितला. मला वाटते, कॉ. रॉयच्या निकट सहवासांत बरीच वर्षं हा असला पाहिजे.' यावर धीम्या वृत्तीचे चेट्टी एकदम उसळून म्हणाले, 'नाही. नाही. तुम्ही म्हणता ते चूक आहे. हा गृहस्थ कॉ. रॉयच असला पाहिजे.' यावर मी मोठ्याने हसलो आणि म्हणालो, 'हे तुम्ही काही तरी सांगता मि. चेट्टी. कॉ. रॉय या गृहस्थापेक्षा कितीतरी मोठा असला पाहिजे. वयानं हा गृहस्थ फार तर चाळीस वर्षांचा असेल.' यावर चेट्टी काही बोलले नाहीत.

त्यानंतर रॉय गटाच्या वारंवार सभा होत. त्या सभांसंबंधाने महत्त्वाचे असे काही सांगण्यासारखे नाही. परंतु १९३१ च्या मार्चमध्ये कराचीला कॉंग्रेसचे अधिवेशन भरणार होते. त्या अधिवेशनामध्ये आमच्या गटाने कोणते धोरण ठेवायचे ,ते ठरविण्यासाठी कर्णिकांच्या घरी आमची सभा भरली होती. डॉ. महंमूद अर्थात् त्या सभेला हजर होतेच. हे धोरण ठरवताना कॉ. रॉयच्या (Decolonisation) प्रबंधावर बरीच चर्चा झाली. 'त्या प्रबंधानुसार आपण कॉंग्रेसमध्ये राहून कॉंग्रेसच्या कार्यक्रमाला जहालवादी कलाटणी दयायची, कॉंग्रेस नेत्यांचा सुधारणावाद लोकांच्या समोर पदोपदी आणून त्याचे खंडन करायचे आणि आपला पक्ष बळकट करून संबंध कॉंग्रेसला क्रांतिकारक बनवायची हे धोरण आपण ठेवले पाहिजे' असे डॉ. महंमूद म्हणाले. त्यावर मी म्हणालो की, 'हे धोरण मुळीच प्रभावी ठरणार नाही. आपण कॉंग्रेसच्या बाहेर जाऊन आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केला पाहिजे. कॉंग्रेस व कॉंग्रेसनेत्यांना अविरत विरोध करून आपला विधायक कार्यक्रम जनतेसमोर ठेवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.' त्यावेळी ट्रॉट्स्कीवादाची सावली माझ्या मनावर बरीच दाट असल्यामुळे मी वरील भूमिका स्वीकारली होती. यावर बराच वादविवाद झाला, परंतु डॉ. महंमूदना माझे मत पटले नाही. तेव्हा मी सभेतून निघून गेलो. चेट्टी मात्र तसेच बसून राहिले होते. अर्थात काही दिवस तरी माझा रॉय ग्रुपशी संबंध राहिला नाही. कराची कॉंग्रेसला चेट्टी, कर्णिक वगैरे बरेच रॉयवादी गेले. मी मात्र तसाच मागे राहिलो.

कॉंग्रेसचे कराचीचे अधिवेशन भरण्यापूर्वी कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक लॅबर्नम रोडवरील मणीभुवनमध्ये भरली होती. या बैठकीला हजर राहाण्यासाठी कमिटीने बाबू सुभाषचंद्र बोस यांना बोलावले होते. कराचीला त्याच सुमारास नवजवान भारत सभेची परिषद भरणार होती. त्या परिषदेचे अध्यक्ष म्हणून सुभाषबाबूंची निवड झाली होती. मुंबईतील नवजवान भारत सभेचा मी अध्यक्ष होतो. त्यावेळी मी आणि चेट्टी मणीभुवनाच्या शेजारीच सरस्वती व्हिलामध्ये राहात होतो म्हणून सुभाषबाबूंना आमच्या घरी चहाला बोलावण्याचे आम्ही ठरवले. सुभाषबाबू आले आम्ही त्यांच्याशी बरीच चर्चा केली. गांधी-आयर्विन कराराबद्दल आम्ही पूर्ण नापसंती दर्शविली. सुभाषबाबूंनाही तो करार पसंत नव्हता. असे दिसले. त्यानंतर आमचा कार्यक्रम आम्ही त्यांच्यापुढे ठेवला. आमच्या चळवळीत नेतृत्व स्वीकारण्याची आम्ही त्यांना विनंती केली. सुभाषबाबू एकदम गंभीर झाले, आणि म्हणाले, 'जहाल चळवळ जितकी पाहिजे तितकी देशामध्ये प्रभावी झालेली नाही. अशा परिस्थितीत मी कॉंग्रेस पुढाऱ्यांबरोबर आतापासूनच जर फटकून वागू लागलो आणि निराळा राजकीय सवता सुभा उभा करण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळे जहाल चळवळीचं नुकसान

होणार आहे.' सुभाषबाबूंचे उद्‌गार ऐकून माझी बरीच निराशा झाली. सुभाषबाबू नि डॉ. महंमूद हे एकाच माळेचे मणी आहेत अशी मी माझ्या मनाची समजूत करून घेतली.

कराचीला ही सर्व मंडळी गेल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी प्रार्थना समाजात कसल्या तरी निमित्ताने स्नेहसंमेलन भरले होते. त्या स्नेहसंमेलनात मला नेहमीप्रमाणे भाग घ्यावा लागला होता. कारण राजकीय चळवळीत जरी मी पडलो होतो, तरी सुद्‌धा प्रार्थनासमाजाशी माझे असलेले पूर्वीचे संबंध अजूनही कायम होते. प्रार्थना समाजातच राजकीय विषयावर अभ्यास-मंडळे मी घेत असे, पण त्याची प्रार्थनासमाजातील मंडळींना विशेषशी माहिती नव्हती. सुबोधपत्रिकेत मात्र माझे जहाल स्वरूपाचे जे लेख येत ते वाचून समाजातील काही बुद्रुक मंडळींना माझा संशय येऊ लागला. परंतु माझा जहालवाद लोकमान्य टिळकांच्या राजकारणापुढे जाणार नाही अशी त्यांची अपेक्षा होती. स्वतंत्र भारत सभेचा आणि काही दिवसांनी नवजवान भारत सभेचा ज्यावेळी मी अध्यक्ष झालो, तेव्हा मात्र समाजातील काही राजकीय सनातन्यांचे दाबे दणाणून गेले. कारण त्यांचा प्रामाणिक समज असा झाला होता की, नवजवान भारत सभा ही दहशतवादयांची संस्था असून तिचे नेतृत्व मी स्वीकारले आहे. त्यांचा हा गैरसमज दूर करण्याचे मला कारणच पडले नाही. कारण या संस्थेसंबंधी स्पष्टपणे मला त्यांनी कधीच विचारले नव्हते. अर्थात वरवर पाहाणाऱ्याला माझे प्रार्थना समाजाशी असलेले संबंध पूर्वी होते तसेच कायम आहेत असा भास होई. त्या संबंधाचा एकेक धागा हळूहळू तुटत चालला होता हे माझ्याही त्यावेळी ध्यानात आले नाही. अर्थात प्रार्थना समाजाच्या प्रत्येक कार्यक्रमात मी पूर्वीच्याच उत्साहाने आणि तळमळीने भाग घेत आहे अशी माझी व इतरांची समजूत होती.

स्नेहसंमेलनाची गडबड राममोहन आश्रमाच्या दुसऱ्या मजल्यावर चालली असता मला खालून कुणी तरी मोठ्याने हाका मारू लागले. मी खिडकीशी येऊन खाली पाहातो तर कॉ. सी. जी. शहा, कॉ. बी. टी. रणदिवे प्रभृति स्टॅलिनवादी कम्युनिस्ट मला खाली येण्याविषयी जोरजोराने हाताने खुणावीत होते. मी तसाच खाली गेलो. कॉ. शहा मला म्हणाले, 'तुमच्याकडे अत्यंत निकडीचे काम आहे. तुम्ही आताच्या आता घरी चला.' ही काय गडबड आहे म्हणून बघण्यासाठी लीला खिडकीत आली. मी तिला खाली येण्याची खूण केली आणि प्रार्थना समाजाच्या बाहेर मिळालेल्या टॅक्सीत बसून आमच्या घरी गेलो. वाटेत माझ्याशी कुणी काहीच बोलेना. त्यांचे काय जरूरीचे काम होते ते न समजल्यामुळे मी गप्प राहिलो होतो. घरी आल्यानंतर आम्ही तसेच दिवाणखान्यांत बसलो. नंतर मी कॉ. शहाला विचारले, 'कॉमरेड, ही गडबड

तरी काय आहे? तुम्ही मला इतक्या तातडीनं कशाला बोलावून आणलंत? की हा तुमचा नवीन तऱ्हेचा विनोद आहे?' तेव्हा कॉ. रणदिवे यांनी आपला चेहेरा पूर्वीपेक्षा अधिक गंभीर केला आणि ते म्हणाले, 'हे पाहा, मी तुम्हाला अत्यंत महत्त्वाची बातमी सांगणार आहे. ती ऐकून तुम्हाला आश्चर्याचा धक्काच बसेल. तुम्ही ज्या डॉ. महंमूदबरोबर आतापर्यंत काम करीत होता ते दुसरे तिसरे कुणी नसून खुद्द मानवेंद्रनाथ रॉय आहेत.' ही बातमी ऐकून मी मनातल्या मनात हादरलोच. परंतु बाहेरून शांतपणाचा आव आणून मी म्हटलं, 'अं! त्यांत काय आहे. डॉ. महंमूद हे कॉ. रॉय आहेत ह्या बातमीमध्ये तुम्हाला इतकं घाबरण्याचं कारण काय? आणि इतक्या तातडीनं ही बातमी सांगण्याइतकं काय महत्त्व आहे? ही बातमी तुम्ही मला पोस्टानं कळवली असती तरी चाललं असतं.' हे उद्गार ऐकल्यानंतर कॉ. रणदिव्यांच्या चेहेऱ्यावर थोडी तिरस्काराची झांक दिसली. ते म्हणाले, 'ही नुसती बातमी सांगण्यासाठीच आम्ही इथं आलो नाही, तर तुम्हाला सावधगिरीची सूचना दयायला मुद्दाम आलो आहोत.' मी म्हटले, 'सावधगिरीची सूचना?' 'होय. सावधगिरीची सूचना.' असे रणदिवेंनी ठासून म्हटले, 'डॉ. महंमूद हे कॉ. रॉय आहेत हे जर तुम्हाला मान्य असेल तर मी असं विचारतो की कॉ. रॉय हिंदुस्थानात आले कसे? त्यांनी पासपोर्ट कसा मिळवला? त्यांनी पासपोर्ट forge केला असं आपण घटकाभर समजू, तरी सुद्धा कराची किंवा मुंबई बंदरात उतरताना त्यांच्यासारखा धिप्पाड गृहस्थ पोलिसांच्या काकदृष्टीतून कसा निसटला? यावर माझे स्वतःचे उत्तर असे आहे की, 'रॅम्से मॅकडोनाल्डच्या मदतीनं कॉ. रॉय हिंदुस्थानांत आले. हे दुसऱ्या शब्दात सांगायचं म्हणजे ते ब्रिटिश साम्राज्यशाहीचे हस्तक आहेत, म्हणूनच ते येऊ शकले.' कॉ. रणदिव्यांचे हे उद्गार ऐकून माझे मन चलबिचल झाले. रॉय गटाच्या धोरणासंबंधाने माझा नुकताच डॉ. महंमूदशी खटका उडाला होता. तेव्हा कॉ. रणदिवेंनी डॉ. महंमूद म्हणजे कॉ. रॉयवर जो आरोप केला त्याचा मला हत्यारासारखा उपयोग करता आला असता. परंतु मी तो विचार मनात मुळीच ठरू दिला नाही. मात्र कॉ. रॉयना ते कराची काँग्रेसहून परत आल्यानंतर हिंदुस्थानात ते कसे आले त्याबद्दल संपूर्ण माहिती विचारायची असा मी मनाशी निश्चय केला.

स्टालीनवादी कम्युनिस्टांशी माझे वैयक्तिक सबंध स्नेहाचे होते. परंतु कॉ. रॉयविरुद्ध ते घाणेरडा प्रचार करू लागले, हे मात्र मला बिलकुल आवडले नाही. स्टालीनवादी कम्युनिस्टांचे धोरण अतिजहालवादी होते. थर्ड इंटरनॅशनल जे हुकूम सोडील त्याची अक्षरशः अंमलबजावणी करणे हे आपले आदय कर्तव्य आहे असे स्टालीनवादी समजत. थर्ड इंटरनॅशनलचं धोरणसुद्धा स्वतंत्रपणे आखले जात नसे. थर्ड इंटरनॅशनलच्या कार्यकारी मंडळावर रशियन

कम्युनिस्टांचे हुकमी बहुमत असल्यामुळे सोव्हिएट रशियाच्या परराष्ट्र धोरणाला पोषक असेच धोरण थर्ड इंटरनॅशनल ठरवीत असे. हेच दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे थर्ड इंटरनॅशनल सोव्हिएट रशियाच्या परराष्ट्रखात्याची एक दुय्यम शाखा होती. १९२८ साली थर्ड इंटरनॅशनलची सहावी काँग्रेस भरली. त्याच कालात रशियाची पंचवार्षिक योजना अंमलात येण्यास सुरुवात झाली. ही योजना यशस्वी व्हायची असेल तर तिच्यासाठी रशियन जनतेने स्वार्थत्याग करण्यास तयार झाले पाहिजे होते. रशियन जनतेमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी सोव्हिएट रशिया हा एकच देश समाजवादी आहे आणि या देशासभोवती साम्राज्यवादी आणि भांडवलशाही राष्ट्रांचे कडे पडले आहे. ही राष्ट्रे सोव्हिएट रशियावर आक्रमण करून तेथील समाजवादाचा कधी विध्वंस करतील त्याचा नेम नाही, म्हणून समाजवादाचे संरक्षण करण्यासाठी संरक्षक साधनांचे विपुल उत्पादन झाले पाहिजे. यासाठी पंचवार्षिक योजना जितक्या लवकर अंमलात येईल तितकी चांगली. या घोषणेला अनुसरून सोव्हिएट रशियाला इतर देशांशी फटकून वागणे प्राप्त होते. म्हणून थर्ड इंटरनॅशनलने जगांतील सर्व कम्युनिस्टांना आपापल्या देशांतील सर्व राजकीय पक्षांशी फटकून वागण्याचा संदेश दिला!

हिंदी स्टालीनवादी त्याप्रमाणे वागू लागले. काँग्रेस ही भांडवलदारांची संस्था आहे आणि तिचा उद्देश भांडवलदारांचे राज्य स्थापन करण्याचा आहे असा प्रचार त्यांनी सुरु केला. तसेच ट्रेड युनियन काँग्रेस ही सुधारणावादी संस्था आहे, ती देशात कामगारांची आणि किसानांची क्रांती करू शकणार नाही असा आरोप त्यांनी त्या संस्थेवर ठेवला. या दोन्ही संस्थांतून बाहेर फुटून त्यांनी कामगार किसानांच्या नावावर एक पक्ष स्थापन केला, आणि लाल ट्रेड युनियन काँग्रेस काढली. या दोन्ही संस्थांमध्ये एकही कामगार किंवा शेतकरी नव्हता हे सांगण्याची जरुरी नाही. स्टालीनवाद्यांचे हे अतिजहालवादी धोरण कुसीनेन नांवाच्या एका सौंदर्यशास्त्राच्या प्रोफेसरने थर्ड इंटरनॅशनलच्या सहाव्या काँग्रेसमध्ये सादर केलेल्या प्रबंधांत ग्रथित केले होते. रॉयनी याच काँग्रेसमध्ये वसाहतीवरील आपला प्रबंध सादर केला होता, परंतु तो प्रबंध काँग्रेसने मान्य केला नाही, इतकेच नव्हे तर दुसऱ्या अनेक कारणांवरून एका वर्षाच्या आतच कॉ. रॉयना थर्ड इंटरनॅशनलमधून काढून टाकण्यात आले, त्यानंतर कॉ. रॉयनी आपले धोरण स्वतंत्रपणे मांडण्यास सुरुवात केली, परंतु ते धोरण मॉस्कोला मान्य नसल्यामुळे जे स्टालीनवादी पूर्वी कॉ. रॉयकडून राजकीय शिक्षणाचे दडे घेत होते ते सर्व कॉ. रॉयवर उलटले नि त्यांच्याविरुद्ध प्रचार करू लागले. कॉ. कुसीनेन आणि कॉ. रॉय यांच्या प्रबंधांतील मुख्य फरक हिंदी राजकीय परिस्थितीच्या पृथक्करणासंबंधाने नसून प्रत्यक्ष कार्यक्रमासंबंधाने होता. कॉ.

कुसीनेनचं म्हणणे असे होते की, हिंदी भांडवलदारांचा वर्ग आपल्या देशात समाजक्रांती होईल या भीतीने ब्रिटिश साम्राज्यशाहीशी तडजोडीचे नेहमीच धोरण ठेविल आणि कोणतीही क्रांतिकारक चळवळ दडपण्याचा प्रयत्न करील. देशातील कामगार नि शेतकरी हेच क्रांतीचे मुख्य आधारस्तंभ होत, आणि याच लोकांचा स्वतंत्र राजकीय पक्ष निर्माण झाला पाहिजे. काँग्रेस हा भांडवलदारांचा पक्ष असल्यामुळे या पक्षाने त्या किंवा इतर पक्षांशी कोणताच संबंध ठेवता कामा नये. लेनिनच्या साम्राज्यशाहीवरील पुस्तकाचा आधार घेऊन कॉ. रॉयनी असा सिद्धांत मांडला की, हिंदुस्थानातील ब्रिटिश भांडवल ज्या प्रमाणात कमी होत जाईल, त्या प्रमाणात ब्रिटिश साम्राज्यशाहीला हिंदी भांडवलाची जरुरी लागेल. म्हणून ब्रिटिश साम्राज्यशाहीला हिंदी भांडवलदारांसंबंधाने उदार धोरण ठेवावे लागेल. या उदार धोरणाच्या चौकटीत हिंदी भांडवलदारांच्या आर्थिक आणि राजकीय अशा सर्व महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याचा संभव असल्यामुळे हिंदी भांडवलशाही क्रांतिकारक चळवळीपासून अलिप्त राहील किंवा तिला विरोधही करील. राष्ट्रीय काँग्रेससंबंधाने कॉ. रॉयचे असे म्हणणे होते की, काँग्रेस हा एक पक्ष नसून ती चळवळ आहे. या चळवळीचे नेतृत्व प्रतिक्रांतिकारक असले तरी त्यात सामील होणारा बहुजनसमाज क्रांतिकारक वृत्तीचा आहे, म्हणून कम्युनिस्टांनी या चळवळीत सामील होऊन त्या चळवळीचे प्रतिक्रांतिकारक नेतृत्व हाणून पाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा प्रकारचा या दोन कम्युनिस्ट पक्षांच्या मतप्रणालीत फरक होता.

कॉ. रॉय कराचीहून आल्यानंतर चेट्टींच्या सांगण्यावरून मी त्यांना भेटायला गेलो. नाही तरी मी आपणहून जाणारच होतो. परंतु कॉ. रॉयचा निरोप आल्यानंतर सर्व काम बाजूला ढकलून मी त्यांच्या भेटीला गेलो. डॉ. महंमूद हेच कॉ. रॉय आहेत हे आम्हा सर्वांना आता कळून चुकले होते. कराचीला पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस वगैरेंची त्यांनी भेट घेतली ती रॉय म्हणूनच घेतली. पंडित जवाहरलालजी युरोपमध्ये असताना त्यांची नि कॉ. रॉयची अगोदरच भेट झाली होती. म्हणूनच त्यांना नव्याने पंडितजींना आपली ओळख करून देण्याचे कारण नव्हते. मला पाहाताच कॉ. रॉय हसू लागले. नंतर ते मला म्हणाले, 'तुमचा ट्रॉट्स्कीवाद पूर्वीइतकाच भडक राहिलेला आहे की आता फिक्कट झाला आहे?' मी या प्रश्नाला काहीच उत्तर दिले नाही. थोड्या वेळाने आम्ही कराची काँग्रेसविषयी बोलू लागलो. बोलता बोलता कॉ. रॉयनी माझ्यापुढे सिगारेटचा डबा केला. मी त्यांना सिगारेट ओढीत नाही म्हणन सांगितले. कॉ. रॉय पुन्हा हसू लागले. परंतु यावेळी त्यांच्या हास्यात बराच उपरोध भरलेला होता. ते म्हणाले, 'अस्सं! एकूण तुम्ही जातिवंत धर्मोपदेशक आहात. बरोबरच आहे, ब्राह्म धर्माच्या प्रचारकानं आपल्या अंगी कोणतंही

व्यसन लावून घेऊ नये. त्यानं फारच सोवळेपणानं राहिलं पाहिजे–नाही? ' असे म्हणून ते मोठ्याने हसू लागले. मला त्यांचा खूप राग आला आणि मी त्यांच्या हातातून सिगारेटचा डबा जवळ जवळ हिसकावून घेतला म्हटले तरी चालेल. त्या डब्यातली एक सिगारेट काढली आणि ती पेटवून संथपणाने मी त्यांच्याकडे पाहात ओढू लागलो. वस्तुस्थिती अशी होती की मला ऑक्सफर्डला असतानाच धूम्रपान करण्याची संवय होती. परंतु हिंदुस्थानांत आल्यानंतर काही दिवसांनी मी ती संवय अजिबात सोडून दिली होती. माझ्या नीतिकल्पना पारंपरिक नीतिकल्पनेपेक्षा अगदीच वेगळ्या असल्यामुळे कॉ. रॉयनी मला दिलेला सोवळेपणाचा टोमणा बिलकुल सहन झाला नाही. या माझ्या रागाचा परिणाम इतकाच झाला की त्या दिवसापासून मी माझी आवडती पाइप पुन्हा ओढू लागलो.

रॉयगटामध्ये मी अशा अगदी अनौपचारिक रीतीने पुन्हा सामील झालो. डॉ. महंमूदशी झालेला खटका मी विसरून गेलो होतो. इतकेच नव्हे तर रॉयच्या मॅनिफेस्टोचा आधार घेऊन रॉयवादाचा प्रचार करण्यात मी पूर्वीपेक्षा अधिक उत्साहाने भाग घेऊ लागलो. पण माझी आंतरिक इच्छा अशी होती की रॉयवादी आणि स्टालीनवादी या दोन्ही गटांनी आपले पूर्वीचे भेद विसरून जाऊन एक संयुक्त राजकीय पक्ष स्थापावा. या दृष्टीने मी बरीच खटपटही केली. मी प्रार्थना समाजामध्ये ज्या सभा बोलावीत असे, त्या सर्वांना मी न चुकता स्टालीनवादयांना बोलावीत असे आणि तेही न चुकता सर्व सभांना हजर राहात. या आमच्या सभा खरोखरच्या सभा नसून खाजगी बैठकी होत्या तरी सुद्धा हजर राहाणाऱ्या दोन्ही सांप्रदायांची इतकी गर्दी होत असे की राममोहन आश्रमाचा तळमजला याला अगदीच अपुरा पडे. हे माझे धोरण कॉ. शेखसारख्या कॉ. रॉयवादयांना मुळीच पसंत पडत नसे. त्यांचा माझा या संबंधाने बराच मोठा वाद होई. परंतु मी माझे धोरण केव्हाही बदलले नाही. या आमच्या बैठकीला कॉ. देशपांडे, रणदिवे, शहा काणेकर प्रभृती मंडळी नियमाने हजर राहात असल्यामुळे चर्चेला नेहमीच रंग चढे. एकदा अशीच एक सभा आम्ही स्टुडंट ब्रदरहुडमध्ये घेतली होती, त्या सभेमध्ये कॉ. रॉय आपली कॉन्स्टिटयुअंट असेंब्लीची कल्पना स्पष्ट करून सांगणार होते. त्या सभेला स्टालीनवादी, रॉयवादी व इतर बरेच लोक हजर होते. त्यावेळी माझे मित्र प्रभाकर पाध्ये हे नेहमी स्टालीनवादयांबरोबर फिरत असल्यामुळे तेही या सभेला हजर राहिले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी नेहमीप्रमाणे मी होतो. सभेतील मुख्य भाषण कॉ. रॉयचे होते. कॉ. रॉयचे भाषण संपल्यानंतर देशपांडे, रणदिवे प्रभृति स्टालीनवादयांनी लहान लहान भाषण करून कॉ. रॉयच्या भूमिकेविषयी नापसंती व विरोध दर्शविला. त्यानंतर एक दोन रॉयवादी बोलले. नंतर कुणीच

बोलायला उभा राहात नाही असे पाहून मी म्हटले, 'श्री. प्रभाकर पाध्ये यांना या विषयावर काही तरी बोलायचे आहे असं मला वाटतं.' हे माझे शब्द ऐकल्याबरोबर पाध्ये उठले आणि त्यांनी एकदम सांगून टाकले की, 'रॉयवादी कार्यक्रम unscientific आहे'. unscientific हा शब्द ऐकल्याबरोबर कॉ. रॉय खवळले आणि त्यांनी पाध्यांचा खरपूस समाचार घेतला.

एके दिवशी कॉ. शेख माझ्या घरी आला आणि म्हणाला, 'रॉयनी काही जरुरीच्या कामासाठी तुम्हाला बोलावलं आहे.' त्यावेळी रॉय पेडर रोडवरील एका बंगल्यांत गुप्तपणाने राहात असत. मी तिथे गेल्यावर कॉ. रॉय म्हणाले, 'युरोपहून नुकतीच आपली कॉमरेड इथे आली आहे. ती सध्या बॅलार्ड पिअरवरील ग्रँड हॉटेलमध्ये उतरली आहे. तिला जाऊन तुम्ही भेटावे अशी माझी इच्छा आहे.' मी रॉयकडून निघालो तो तडक ग्रँड हॉटेलमध्ये गेलो, आणि 'लुइझे गाइझलरची खोली कुठं आहे?' असे मी हॉटेलच्या मॅनेजरला विचारले. लुइझे गाइझलर तिथेच एका युरोपियन गृहस्थापाशी बोलत कोचावर बसली होती. तिच्याकडे मॅनेजरने आपले बोट दाखवले. मी लू कडे गेलो आणि तिला माझी ओळख करून दिली. तिने माझ्याशी जोराने हस्तांदोलन केले. शेजारी असलेल्या गृहस्थांशी दोन औपचारिक शब्द बोलून ती मला घेऊन आपल्या खोलीत गेली. काही वेळ इकडल्या तिकडल्या गप्पा मारल्यानंतर मी तिला माझ्या घरी येऊन राहाण्याची विनंती केली आणि तिने ती आनंदाने मान्य केली. ती म्हणाली, 'आत्ताच आपण निघू या.' तिच्या सामानाची आवराआवर करून तिने ते एका चाकराच्या हवाली केले आणि आम्ही खाली गेलो. लू आपले बिलाचे पैसे चुकते करीत होती. इतक्यात मॅनेजरने मला खूण केली आणि आपल्याकडे बोलावले. तो हलक्या स्वरांत मला म्हणाला, 'हे पाहा, कोणत्याही पुरुषाला एकटच्या असलेल्या स्त्रीच्या खोलीत जाऊ देण्याचा शिरस्ता नाही. तुम्ही तो शिरस्ता मोडलात याचे फार दुःख होतं.' मी त्या मॅनेजरच्या तोंडाकडे थोडा वेळ पाहिले आणि मोठ्याने हसलो. इतक्यात लू माझ्याजवळ येऊन 'काय भानगड आहे' म्हणून विचारू लागली. मी तिला म्हटले, 'भानगड वगैरे काही नाही. हा मॅनेजर शिष्टपणाचा आव आणून मला थोडासा उपदेश करण्याचा प्रयत्न करीत होता. मी तुला पैज मारून सांगतो की कॉमरेड, हे तुझं हॉटेल ब्रिटिशांच्या मालकीचं असलं पाहिजे. कारण असल्या बाबतीत भलताच शिष्टपणा करण्याचं त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही माणसाला धाडस व्हायचं नाही.' हे सर्व मी मॅनेजरला ऐकू येईल इतक्या मोठ्याने बोलत होतो. अर्थात् याला निराळे उत्तर देण्यांची मला मुळीच जरुरी पडली नाही.

काही वर्षांनी मला अगदी नाइलाजास्तव ग्रँड हॉटेलमध्ये जावे लागले. कलाशंकरच्या राजाचा धाकटा भाऊ ब्रजेशसिंग या हॉटेलमध्ये उतरला होता,

अर्थात् त्याची भेट घेण्यासाठी मला तिथे जावे लागले. त्यावेळी ब्रजेश जेवीत होता. जेवतांना त्याने तोंड अगदी आंबट केले होते. जेवता जेवताच तो मला म्हणाला, 'You know, English food is English food. But this food is super English.' इतके बोलून त्याने पुढ्यातली डिश बाजूला केली. मी त्याला म्हटले, 'हे पाहा, आपण जेवायला दुसरीकडे जाऊ आणि या हॉटेलच्या इंग्रजीपणाविषयी म्हणशील तर इथले व्यवस्थापक भलताच शिष्टपणा दाखवतात.' असे म्हणून मी लूच्या वेळी घडलेली हकीगत त्याला सांगितली. ती ऐकल्यावर त्याच्या तोंडावरचा आंबटपणा साफ निघून गेला आणि तो असा खो खो हसत सुटला की त्याचा तोल जाऊन तो खुर्चीवरून पडतो की काय अशी मला भीती वाटली.

लू आमच्या घरी आली, त्यावेळी आमचे घर म्हणजे एक प्रकारचा राजकीय आखाडाच बनला होता. आमच्या राजकारणावरील चर्चा रात्रीं दोन-तीन वाजेपर्यंत चालत. जमलेल्या मंडळींची चहापाण्याची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था करता करता आमचा आचारी तर बेजार होऊन गेला. त्याने एक-दोनदा नोकरी सोडून जाण्याची धमकीसुद्धा आम्हाला दिली होती. विशेषत: आमच्या गटातील काही कॉमरेड्स आणि गिरणी कामगार युनियनमधील काही गिरणी कामगार वेळी-अवेळी येऊन जेवण्यासाठी थांबत त्यावेळी मात्र खरोखर त्याची तिरपिट उडे. परंतु त्यावेळी आमची सर्वांची डोकी क्रांतीच्या विचाराने भडकलेली. तेव्हा एका क्षुल्लक आचाऱ्याच्या सोईचा किंवा गैरसोईचा विचार कोण करतो? शेवटी तो आचारी कंटाळून निघून गेलाच आणि त्याच्या ऐवजी आम्ही एक बाई स्वयंपाक करण्यास ठेवली. तीसुद्धा अशीच कंटाळून गेली. पण तिने आमची नोकरी सोडायच्या अगोदरच मी रॉय गटांतून बाहेर पडलो होतो आणि आमच्यावरील हे संकट टळले.

लू घरी आल्यानंतर तिची आणि कॉमरेड रॉयची कशी भेट करवून दद्यायची याचा आम्हाला विचार पडला. कारण लू ज्या दिवशी आमच्या घरी आली त्याच दिवसापासून आमच्या घरावर पोलिसांचा सक्त पाहारा होता. आमचे घर लॅबर्नम रोडवर होते. या रस्त्याच्या दोन्ही टोकाला गुप्त पोलिसांच्या दोन टॅक्सी नेहमी उभ्या असत. त्याशिवाय आमच्या घरावरून येणारे जाणारे दोन तीन पोलीस बातमीदार होते ते वेगळेच. ही परिस्थिती लक्षात घेऊन मी लूला म्हटले की, 'तू रॉयना भेटण्याच्या भानगडीत न पडता सरळ लखनौला ब्रजेशसिंगाकडे जा. हे सर्वांच्या दृष्टीन हिताचं आहे.' नाही तरी लू मुंबईहून लखनौला जाणारच होती, म्हणून लूने एकदम माझी सूचना मान्य केली आणि त्याप्रमाणे तिने त्या दिवशी जाण्याचीही तयारी केली. ती तयार करीत असताना कॉ. रॉयची चिठ्ठी आली, की 'मला भेटल्याशिवाय लूला लखनौला जाऊ देऊ

नका.' लूला मी ती चिठ्ठी दाखविली. तिने मी वाचल्यानंतर प्रश्नार्थक मुद्रेने माझ्याकडे पाहिले. मी तिला 'नाही' म्हणून मानेनेच सांगितले. पण ती म्हणाली, की 'कॉ. रॉयची चिठ्ठी आल्यावर त्यांना भेटल्याशिवाय जाणं मला बरं दिसत नाही, तेव्हां त्यांना भेटण्याचा मला प्रयत्न करून पाहिलाच पाहिजे.' मी म्हटले, 'ठीक आहे. आपण संध्याकाळी त्यांच्या भेटीला जाऊ.'

संध्याकाळ झाली आणि आम्ही दोघेजण बाहेर पडलो. चालता चालता मी लूला बजावले, की 'तू मागं पाहू नकोस.' काही वेळ चालल्यानंतर मी मागे नज़र टाकली. एक दोन पोलीस बातमीदार येत होते. ते सुद्धा चालतच येत होते. तेव्हा त्यांना झुकांडी देऊन जाणे कठीण नाही असे मला वाटले. आम्ही चालत चालत सेसील रेस्टॉरंटपाशी आलो आणि तिथे उभ्या असलेल्या एका टॅक्सीत बसलो. टॅक्सीवाल्याला चौपाटीच्या बाजूने जायला सांगितले नि नंतर डाव्या बाजूला वळून सँडहर्स्ट ब्रिज ओलांडून लॅमिंग्टन रोडवरून गाडी सरळ पुढे न्यायची असा इशारा मी त्याला दिला. त्यावेळी कॉ. रॉय क्लबरोडवर राहात होते. त्या बाजूला आमची गाडी वळताच मी मागे पाहिले, तो एक टॅक्सी आमचा पाठलाग करीत आहे असा मला संशय आला. म्हणून मी ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितले. आमची टॅक्सी थांबल्याबरोबर पाठीमागून येणारी टॅक्सी थांबली. माझा संशय अधिक दृढ झाला. मी लूला म्हटले की, 'रॉयला भेटण्याची आशा तू सोडून दे. आपण परत घरी जाऊ.' लूने संमती दिल्याबरोबर मी तिला म्हटले की, 'आपण घरी जाण्यापूर्वी आपल्या पाठीमागून येणाऱ्या या लोकांची जरा मजा करू.' असे म्हणून मी ड्रायव्हरला भायखळा स्टेशनवर गाडी न्यायला सांगितली. आमच्या पाठीमागून ती दुसरी टॅक्सी येत होती हे सांगायला नकोच. भायखळा स्टेशनवर येऊन पोचल्यानंतर आम्ही सावकाशपणे आत शिरलो आणि तिकीट ऑफिसजवळ जाऊन व्हिक्टोरिया टर्मिनसचे तिकीट काढले. आमच्या पाठीराख्यांनी आपली टॅक्सी स्टेशनातच थांबवली आणि आम्ही कुठली तिकिटं काढली याची चौकशी करून त्यांनीसुद्दा बोरीबंदरचीच तिकिटे काढली असा माझा तर्क आहे. परंतु त्यांना हे करण्याला जर वेळ लागला आणि ते प्लॅटफॉर्मवर येऊन पोचेपर्यंत आमची गाडी चालू लागली. गाडी चालता चालता त्यांपैकी दोन इसमांनी उडी मारली आणि बाकीचे प्लॅटफॉर्मवर गाडीकडे पाहात उभे राहिले. गाडी सुरू झाल्यावर मी लूला म्हटले, 'आपण बाकीच्या सर्वांना चुकवलं, पण दोन माणसं गाडीत आहेत. त्यांची आपण आणखी थोडी गंमत करू. सँडहर्स्ट रोड स्टेशनवर गाडी आली की ती थांबण्यापूर्वीच आपण दोघं खाली उतरू.' त्याप्रमाणे सँडहर्स्ट रोडवर गाडी थांबते न थांबते तोच आम्ही खाली उतरलो नि स्टेशनच्या बाहेरच्या दरवाजाकडे धावत गेलो. त्याच स्टेशनवरून रस्त्यावर यायला बऱ्याच पायऱ्या लागतात आणि झपझप पावले टाकताना लूची त्रेधा

उडाली. पायऱ्या उतरून खाली आल्यावर पाहातो तर एकच व्हिक्टोरिया तिथे उभी होती. त्या व्हिक्टोरियात आम्ही चढलो आणि ती भरधाव सोडण्यास आम्ही गाडीवाल्याला सांगितले. आमची गाडी चालू झाली त्यावेळी शिल्लक राहिलेले आमचे दोन पाठीराखे स्टेशनच्या पायऱ्यांवर उभे राहून आमच्याकडे पाहात होते. लू त्यांच्याकडे पाहून खदखदा हसू लागली. आणि तिने आपल्या हातातला रुमाल उंच उडवला. लू म्हणाली, 'हे पाहा, आता हे लोक काही पाठलाग करीत नाहीत. तेव्हा आपण रॉयना भेटण्याचा प्रयत्न करू.' मी म्हटले, 'ते नाही जमणार, या लोकांची गंमत करता करता मी अगदी दमून गेलोय आणि मला घरी कधी जाऊन पोचेन असं झालंय.' नंतर आम्ही दोघं घरी आलो. दुसरे दिवशी मणिबेन कारा यांनी लूची आणि रॉयची भेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाला. त्यासाठी मणिबेननी लूला हिंदी स्त्रीचा पेहराव चढवून तिच्या तोंडावर बुरखा ओढल्यामुळे मणिबेनचा प्रयत्न सफल झाला.

याच सुमारास बुंदेलखंड कामगार आणि किसान परिषदेचे दुसरे अधिवेशन झाशीला भरणार होते. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान मी स्वीकारावे अशी कॉ. रॉयची इच्छा होती. कॉ. रॉय हे झाशीला काही दिवस राहिल्यामुळे तिथल्या किसान आणि कामगार कार्यकर्त्यांमध्ये त्यांचे बरेच वजन होते. ते कार्यकर्ते कॉ. रॉयना मि. बॅनर्जी या नावाने ओळखत. अर्थात् मि. बॅनर्जींनी झाशीला पत्रे लिहिली आणि त्यांच्या सूचनेप्रमाणे तिथल्या कार्यकर्त्यांनी परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची मला विनंती केली. मी त्यांची विनंती मान्य केली खरी, परंतु परिषद अगदी थोड्याच दिवसांत भरणार असल्यामुळे माझे अध्यक्षीय भाषण कसे लिहून आणि छापून होणार याची मला काळजी पडली. खरे पाहिले तर मला फक्त बारा-तेरा तासांचाच अवधी होता. कारण दुसऱ्या दिवशी झाशीला जाण्यासाठी मुंबईहून निघणे मला भाग होते. माझी चिंता मी लूला बोलून दाखविली. तेव्हा ती म्हणाली, 'हे पहा कॉमरेड, तू काही चिंता करू नकोस. तू अगोदर भाषणाचा विचार कर. आणि मला भराभर सांगत जा, मी ते लघु-लिपीत लिहून घेईन आणि नंतर टाइप करीन.' लू खरोखर आमच्या घरी थोड्या दिवसांसाठी पाहुणी म्हणून आलेली. तिला असा त्रास देणे बरे नव्हे असे मला वाटले. आणि तसे मी तिला बोलूनही दाखवले. तेव्हा ती एकदम भडकली आणि मला वाटेल ते बोलू लागली. मी तिला एकदम गप्प केले आणि म्हटले, 'तुझ्या म्हणण्याप्रमाणे होऊ दे.' त्या दिवशी रात्री जेवण झाल्यानंतर मी तिला माझे भाषण डिक्टेट केले, तिने ते नंतर टाइप केले. ते भाषण संपूर्ण टाइप होईपर्यंत रात्री तीन वाजले. परंतु लूने हुं का चूं केले नाही. माझे भाषण तयार झाल्यानंतर लूने पुन्हा एकदा ते समग्र वाचून पाहिले आणि ती

मला म्हणाली, 'हें पाहा, कॉमरेड तुझं भाषण चांगलं वठलंय. परंतु मला त्यात एक मोठा दोष दिसतो. रॉयला हे भाषण आवडेल असं मला वाटत नाही.' हे तिचे उद्‌गार ऐकून या भाषणावरून पुन्हा माझा रॉयशी खटका उडणार की काय अशी भीती मला वाटू लागली. म्हणून मी तिला विचारले, 'माझं भाषण रॉयना आवडणार नाही असं तू कां म्हणतेस?' ती म्हणाली, 'तुम्ही आपल्या भाषणात ठिकठिकाणी लिऑं ट्रॉट्स्कीचा जो उल्लेख केला आहे तो रॉयना मुळीच आवडणार नाही. कॉ. रॉय हे कट्टर स्टालीनवादी आहेत. आणि थर्ड इंटरनॅशनलच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत त्यांनी अनेकवेळा ट्रॉट्स्कीला विरोध केला होता. म्हणूनच ट्रॉट्स्कीच्या पोरकट अतिजहालवादाचा (Infanitle ultra leftism) शिक्का ते तुमच्या डोक्यावर मारल्याखेरीज राहाणार नाहीत. काही असलं तरी ट्रॉट्स्कीचा अशा रीतीनं उल्लेख करणं आपल्या 'लाइन' ला धरून होणार नाही असं मला वाटतं.' हे तिचे उद्‌गार ऐकून तिच्या पक्षाभिनिवेशाचे जरी मला कौतुक वाटले, तरी तिचे म्हणणे मला पटले नाही. मी तिला म्हटले, 'कॉमरेड रॉयना आवडो न आवडो, मी कॉ. ट्रॉट्स्कीचा उल्लेख माझ्या भाषणातून वगळायला तयार नाही.' लू काही न बोलता गप्प बसून राहिली. उजाडल्याबरोबर माझे भाषण कॉ. रॉयना दाखविण्यासाठी मी घराबाहेर पडलो.

मी घराबाहेर पडलो तेव्हा माझ्या पाठीमागे एक पोलिसचा बातमीदार होताच. मी गवालिया टँकला ट्रॅममध्ये बसलो. तोही माझ्या मागून ट्रॅममध्ये चढला. मला रॉयना भेटण्याची तर निकड होती. म्हणून या माणसाला टाळायचा कसा याचा विचार मी करू लागलो. टॅक्सी करून जावे तर हा दुसऱ्या टॅक्सीमधून यायचा. अर्थात्‌ ट्रॅमनेच पुढे जावे असा मी निश्चय केला. चर्नी रोड जंक्शनजवळ ट्रॅम आल्यानंतर माझ्या मनात एक विचार आला आणि मी ताबडतोब खाली उतरलो. त्यावेळी उजव्या बाजूच्या बिल्डिंगमध्ये डॉ. मुळगांवकरांचे नर्सिंग होम होते. मी तडक आत इमारतीत शिरलो आणि मागे वळून पाहतो तर तो इसम फुटपाथवर उभा राहून मी ज्या बाजूने आत शिरलो तिकडे पाहात होता. मी लिफ्टमधून तडक पाचव्या मजल्यावर गेलो आणि नर्सिंग होममधून इमारतीच्या दुसऱ्या टोकाला गेलो. तिथे दुसरा लिफ्ट होताच. त्या लिफ्टमधून खाली येऊन बाहेर आलो आणि लॅमिंग्टन रोडच्या बाजूने चालायला लागलो. काही वेळाने मागे वळून पाहिले तर तो इसम त्या इमारतीच्या चर्नी रोडच्या टोकाकडे तसाच उभा होता. मी रॉयकडून परत आलो, तेव्हा तो इसम कुठे दिसेना. बऱ्याच वेळाने मी त्याला दिमावे म्हणून मुद्दाम त्याच्या अंगावरून गेलो. तेव्हा तो पुन्हा माझ्या पाठीमागून चालू लागला.

कॉ. रॉयनी माझे भाषण लक्षपूर्वक वाचले. वाचताना मधून मधून त्यांच्या भुवया वर चढत होत्या. परंतु ते काही बोलले नाहीत. सबंध भाषण वाचून काढल्यानंतर ते मला म्हणाले, 'डॉक्टर, भाषण फार छान आहे. पण हे ट्रॉट्स्कीचे References काढून टाकावे लागतील.' मी म्हणालो, 'तुम्हीच काढा ते.' तेव्हा त्यानी फाउंटन पेनने माझ्या भाषणावर मधून मधून रेघा मारल्या. मला त्यांचे हे करणे आवडले नाही. परंतु मी त्यांना काहीच बोललो नाही. मात्र झाशीला गेल्यावर माझे भाषण जसे आहे तसेच वाचून दाखवायचे असा मी मनाशी निश्चय केला. झाशीला ज्या माणसाकडे मला उतरायचे होते त्याचा पत्ता रॉयकडे होता. तो मी त्यांच्याकडून मागून घेतला आणि परत घरी येऊन प्रवासाला निघण्याची तयारी करू लागलो.

झाशीला कुठे उतरायचे हे मला माहीत असल्यामुळे गाडी झाशी स्टेशनवर आल्यावर मी खाली उतरलो. माझ्या बरोबरच स्टालीनवादी कॉ. श्रीनिवास सरदेसाई गाडीतून उतरले. त्यांना पाहिल्याबरोबर मला आश्चर्यच वाटले. आणि मी ते त्यांना बोलूनही दाखवले. ते म्हणाले, की 'ट्रेड युनियनच्या कामसाठी बीनाला काही दिवसांपूर्वी आलो होतो. आज झांशीला परिषद भरणार आहे, तेव्हा परिषदेला मी आलो आहे,' यानंतर दोघेही श्री. शर्मा यांच्या घरी गेलो. मी त्यांना माझी ओळख करून दिली. तेव्हा ते म्हणाले, 'तुमचे स्टेशनवर स्वागत करण्यासाठी आमची सर्व मंडळी हारतुरे घेऊन गेली आहेत.' मी त्यांना म्हटले, 'गेली असली तर हरकत नाही. पण मला आता चहाची अधिक जरूरी आहे.' चहा पिणे झाल्यानंतर आम्ही परिषदेविषयी बोलू लागलो. त्यांच्या बोलण्यावरून मला असे कळले, की तिथल्या मंडळींना कम्युनिस्टांमध्ये रॉयवादी आणि स्टालीनवादी हे दोन गट आहेत याची कल्पना नव्हती. खरोखर पाहिले असता त्यांचा स्टालीनवादाकडेच अधिक कल होता. परंतु ही अंतर्गत भांडणे त्यांना माहीत नसल्यामुळे त्यांनी गैरसमजाने मला आमंत्रण दिले होते. वस्तुस्थिती काय होती ती माझ्या अपरोक्ष कॉ. सरदेसाईंनी त्या मंडळींना समजून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग जाला नाही.

संध्याकाळी ज्यावेळी खुल्या मैदानात अधिवेशन भरले, त्यावेळी तिथे हजारावर किसान आणि कामगार हजर होते. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. घोलेकर हे स्वागताध्यक्ष होते. त्यांचे भाषण संपल्यावर मी अध्यक्षीय भाषण करण्यास उभा राहिलो. परंतु माझे भाषण होते इंग्रजी. ते जमलेल्या लोकांना समजण्यासाठी हिंदीत अनुवाद करून कुणी सांगायचे याविषयी तिथे थोडी चर्चा झाली. शर्माजींनी सरदेसाईंना अनुवाद करण्यास विनंती केली. परंतु त्यांनी

नकार दिला. बरोबरच आहे. एका कट्टर स्टालीनवादयाने रॉय- वादयाच्या भाषणाचा अनुवाद करायचा हे त्यांच्या दृष्टीने किती तरी मोठे पाप होत. शेवटी श्री. घोलेकर हेच उठले आणि त्यांनी असे ठरवले की, मी भाषणाचा एक परिच्छेद वाचायचा आणि त्याचा अनुवाद त्यांनी केल्यानंतर मग मी दुसरा परिच्छेद वाचायचा. माझे भाषण आणि त्यांचा संपूर्ण अनुवाद याला बरोबर अडीच तास लागले. माझे भाषण पुरे झाल्यानंतर अधिवेशनाचे त्या दिवसाचे काम संपले. दुसऱ्या दिवशी सकाळी विषयनियामक समितीची बैठक भरली त्यावेळेस सरदेसाईंना हजर राहाण्याची विनंती केली. कमिटीमध्ये ठरावांची चर्चा होत असता एक दोनदा सरदेसाईंनी अडवणुकीच्या मार्गाचा अवलंब केला परंतु त्यात त्यांना यश आले नाही आणि सर्व ठराव बहुमताने मंजूर झाले. त्या दिवशी परिषदेचे खुले अधिवेशन भरले. परंतु रॉयवाद आणि स्टालीनवाद यांच्यामधील विरोधाची कुणकुण त्या मंडळींना अगोदरच लागल्यामुळे त्या अधिवेशनाला आदल्या दिवसासारखा रंग भरला नाही. अधिवेशन संपल्यानंतर त्याच रात्री मी मुंबईला येण्यासाठी कानपूरच्या गाडीत बसलो.

मी झाशीहून निघालो त्याच रात्री लू लखनौला जाण्यासाठी मुंबईहून निघाली होती, ती मला कानपूरला भेटली. परंतु आम्हाला बोलायला फारसा अवधी नव्हता. म्हणून एकमेकांचा निरोप घेऊन लू लखनौच्या गाडीत बसली आणि मी मुंबईस येण्यास निघालो.

२१ जुलैच्या पहाटेस मुंबईच्या पोलिसांनी कॉ. रॉयना एकाएकी पकडले. मला नि चेट्टींना पकडण्यासाठी पोलिसांची एक तुकडी आमच्या घरी तिसऱ्या प्रहरी आली. त्या तुकडीमध्ये शुक्ल नावाचे सब-इन्स्पेक्टर होते. हा गृहस्थ माझ्याशी अगदी सभ्यतेने वागला. मला पकडल्याची बातमी घरामध्ये समजताच एकच गोंधळ उडाला. लीला ओक्साबोक्शी रडू लागली. मी तिला धीर देण्यासाठी म्हणालो, 'हे पाहा, मला आता पोलीस ठाण्यावर जायचं आहे, तेव्हा मला प्रथम दाढी केली पाहिजे. तू माझा नवीन सूट बाहेर काढून ठेव.' असे म्हणून मी दाढी करण्यासाठी आत गेलो आणि काही वेळाने नवीन सूट घालून बाहेर आलो. मी बाहेर आल्यावर शुक्लांनी मला विचारले, 'मि. चेट्टी कुठं आहेत?' मी म्हटले, 'ते ऑफिसात आहेत. मी तुम्हाला त्यांचं ऑफिस दाखवतो.' इतक्यात पोलिसांनी अगोदरच आमच्या घराची झडती घेण्याचे काम सुरू केले होते ते संपले. त्यानंतर मी पोलिसांच्या बरोबर टॅक्सीतून चेट्टींच्या ऑफिसात गेलो. मी निघालो त्यावेळी, आमचे घरमालक मि. गोरागांधी हे दुकानावर गेले होते. परंतु त्यांच्या मुलीने वर येऊन कसली गडबड आहे म्हणून चौकशी केली. तिला जेव्हा गडबडीचे खरे कारण कळले, तेव्हा ती म्हणाली, 'वा! तुम्ही त्यांना उगीच

पोलिसांच्या ताब्यात दिलेत. आम्हाला कल्पना असती तर आम्ही त्यांना मागल्या दाराने पळवले असते.' अर्थात् ही हकीगत मला घरी आल्यानंतर कळली.

मी पोलिसांना घेऊन चेट्टींच्या ऑफिसात गेलो. परंतु त्यांच्या ऑफिसमध्ये पोलिसांना घेऊन जाणे बरे नव्हे असे मला वाटले. कारण चेट्टी हे वालचंद हिराचंदच्या कंपनीत अकौंटंट होते आणि मी जर पोलिसांना घेऊन त्यांच्या ऑफिसात गेलो आणि पोलिसांनी त्यांना ऑफिसातच पकडले तर शेटजी चेट्टींना कामावरून कायमचे दूर करतील अशी भीती वाटली. पण नंतर दुसरा एक विचार माझ्या मनात आला. कॉ. रॉय यांना त्यावेळी सरकारने absconder म्हणून ठरवले होते. अर्थात् त्यांना आश्रय देणाऱ्यांनासुद्धा तीनपासून सात वर्षांपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा होणार होती. मी आणि चेट्टी जर सात वर्षं तुरुंगात जाणार असलो तर चेट्टींना शेटजींनी नोकरीवर ठेवले काय नि न ठेवले काय सारखेच. हा विचार मनात आल्यावर माझे मलाच हसू येऊ लागले; आणि निःसंकोचपणे पोलिसांना घेऊन मी त्यांच्या ऑफिसात गेलो. ऑफिसात गेल्यावर चेट्टींना मी सर्व हकीगत समजावून सांगितली. ती ऐकल्यावर ते लगेच उठून मॅनेजरच्या खोलीत गेले. काही वेळाने बाहेर येऊन त्यांनी 'चला' अशी आम्हाला खूण केली आणि आम्ही सर्वजण पोलिस कमिशनरच्या ऑफिसकडे निघालो. पोलिसांना आम्हाला रा. ब. मोहनलाल देसाई यांच्या ऑफिसात नेले.

पाहातो तो त्यांच्या टेबलासभोवती शेख, कर्णिक, मॅस्कॅरीनस, दोन शेट्टी, पुतली हे सर्व बसले होते. आम्ही त्यांच्या शेजारी जाऊन बसलो. इतक्यात शेखनी देसाईंच्या जवळ सिगारेट मागितली. त्यांनी मुकाट्याने आमच्यापुढे टीनचा डबा केला. इतक्यात दुसऱ्या एकाने चहा मागितला. देसाईंनी चहाची ऑर्डर केली. त्यावेळी सी. आय. डी. खात्याचे मि. पेटिगारा हे डेप्युटी कमिशनर होते. त्यांनी आम्हा एकेकट्याला बोलावण्यास सुरुवात केली. ते बाकीच्या कॉमरेड्सशी काय बोलले ते माहीत नाही. माझी पाळी आली आणि मी त्यांच्या ऑफिसात गेलो. आत गेल्यावर त्यांनी उठून हस्तादोलन केले. त्यानंतर त्यांनी मला बराच उपदेश केला. त्याचा सारांश इतकाच होता की, माझ्यासारख्या माणसाने असल्या चळवळीत पडणे चांगले नाही. मला त्यांचा उपदेश आवडला नाही. परंतु मी काहीच बोललो नाही. आणखी अर्धा तास गेल्यानंतर आम्हा सर्वांची जामिनावर मुक्तता करण्यात आली. चेट्टींच्या ऑफिसांतील गृहस्थ आम्हा दोघांसाठी जामीन राहिला होता. चेट्टी आणि मी निघालो, ते थेट घरी आलो. त्यावेळेस डॉ. काशीबाई नवरंगे प्रभृति समाजातील मंडळी लीला व

मनोरमा यांना काही तरी विचारीत होती. आम्हा दोघांना पाहिल्याबरोबर त्यांना आश्चर्य वाटले आणि पोलीस चौकीतून आमची इतक्या लवकर सुटका झाली म्हणून त्यांनी आनंद व्यक्त केला. काही वेळाने ती मंडळी घरी गेली.



## यशवंत कृष्ण परुळेकर

जन्म १८८५, मृत्यू २८ जानेवारी १९७०.

**एक निष्ठावान कॉंग्रेस कार्यकर्ते.**

यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील केळूस या गावी झाला. त्यांचे बालपण अति दारिद्र्यात गेले. प्राथमिक शिक्षण केळूस येथे झाले. पण घरच्या गरिबीमुळे माध्यमिक शिक्षण घेता आले नाही. वेंगुर्ले येथे एका पेढीवर नोकरी केली. नंतर ते मुंबईला एका पेढीवर नोकरीला राहिले. या पेढीचे मालक श्री. नानासाहेब देशपांडे हे स्वातंत्र्यप्रेमी गृहस्थ होते. त्यांच्या सहवासाने यांना राजकारणाचा ओढा निर्माण झाला. १९३२ साली विसापूर जेलमध्ये कारावास भोगत असता तेथे श्री. स. का. पाटील यांची भेट झाली आणि तरुंगातच पाटील यांनी त्यांना इंग्रजी शिकविले.

१९४२ सालच्या लढ्यात त्यांनी कारावास भोगला. तुरुंगातून सुटून आल्यावर त्यांनी पक्षकार्य आणि विधायक कार्याला आपल्याला वाहून घेतले.

१९५१ मध्ये मुंबईच्या नागरिकांतर्फे त्यांचा मुंबईत जाहीर सत्कार करण्यात आला. मराठीतील एक चरित्रकार श्री. पु. बा. कुळकर्णी यांनी त्यांचे चरित्र लिहिले आहे.

पुढील उतारा त्यांच्या आत्मवृत्तातून सादर करण्यात येत आहे.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्रा/२७२/१
मंत्रालय.

## आर्थर रोड ते विसापूर

दादा परुळेकर

इसवी सन १९३२ साली ब्रिटिश सरकारने भारताने सुरू केलेली असंहकारितेची चळवळ नेस्तनाबूत करण्याकरिता सबंध भारतात सर्व पुढारी आणि कार्यकर्ते यांना पकडण्याची मोहीम एकदम सुरू केली होती. मुंबईत बऱ्याच पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना पकडण्याचा सपाटा लाविला.

प्रथमत: पोलीस कमिशनरच्या हुकमाने सर्वांना अचानक प्रत्येकाच्या घरी जाऊन रात्री ३ वाजता पकडले होते. कोणा कोणाला पकडले हे कोणालाही कळणे शक्य नव्हते आणि त्यांना पकडून त्या त्या विभागांतील पोलीस स्टेशनवर आणून बसविले होते. या धरपकडीत माननीय नानासाहेब देशपांडे यांना व मलाही पकडले. माझे मालक माननीयं नानासाहेब देशपांडे यांचा व माझा पूर्वजन्मार्जित काही ऋणानुबंध असला पाहिजे असे त्यांच्या व माझ्यामध्ये घडून आलेल्या अनेक गोष्टी आठवल्या म्हणजे वाटू लागते आणि ते खरेच वाटते.

मी त्यांच्याकडे नोकरीस राहिल्यापासून त्यांनी कधीही मला नोकराप्रमाणे वागविले नाही. घरांतल्या माणसाप्रमाणेच मानले. एवढेच नव्हे तर मजवर स्वत:च्या मुलांच्या प्रेमापलीकडेही प्रेम केले.

त्यांच्याकडे मी नोकरी सदतीस वर्षे केली. या अवधीत कितीतरी सार्वजनिक कार्ये त्यांनी आणि मी मिळूनच केली. कोणतेही सार्वजनिक कार्य असो. प्रत्येक कार्यांत त्यांनी आणि मी मिळून एकदम प्रवेश करावयाचा. दि बॉम्बे कमिशन एजंट्स् ॲसोसिएशन, काळबादेवी सार्वजनिक गणपती उत्सव, इसवी सन १९२० साली कॉंग्रेसप्रवेश, त्याचप्रमाणे अनेक संस्था, अनेक सार्वजनिक फंड गोळा करणे, वगैरे वगैरे अनेक सार्वजनिक कार्ये जोडीने केली. मला नोकर असे न समजता सार्वजनिक कार्यांतील एक सहकारी असेच त्यांनी मानले. सन १९३२ साली आम्हा दोघास एकदम पकडून मुंबईतील भायखळ्याच्या तुरुंगात ठेवले होते. आम्ही भायखळा जेलमधून सुटलो ते देखील एकाच दिवशी. फिरून शिक्षा झाली तीही एकाच दिवशी. आमच्या आयुष्यांतील असे अनेक प्रसंग दाखविता येतील की ते एकाच दिवशी, एकाच वेळी किंवा एकमेकांच्या सहवासात अथवा

सहकार्याने आम्ही अनुभवलेले आहेत. किती आश्चर्यकारक हा योगायोग आहे बरे? मला वाटते, असे प्रसंग घडून यावयाला पूर्वजन्मीचा काही तरी ऋणानुबंध खास असलाच पाहिजे.

ही आमची धरपकड पोलीस कमिशनरच्या हुकुमाने झालेली होती. साधारणपणे पोलीस कमिशनर यांना जास्तीत जास्त १९ दिवसपर्यंत नजरकैदेत ठेवता येत होते.

भायखळा जेलमध्ये काही खोल्या होत्या व एक हॉल होता. मुंबईतील पुढारी आणि चळवळ करणाऱ्या अशा ३०/४० लोकाना पकडून भायखळा जेलमध्ये नेऊन ठेवले होते. प्रत्येक खोलीत रात्री एकाला किंवा तिघाना राहाता येत नसे. दिवसा जास्त माणसे बसली किंवा राहिली तरी हरकत नसे. फक्त रात्रीपुरताच हा निर्बंध होता. एका खोलीत मी व नानासाहेब देशपांडे असे दोघेही राहात असू. आमच्या खोलीच्या बाजूच्या खोलींत माननीय कन्हय्यांलाल मुनशी हे राहात असत. वर उल्लेख केल्याप्रमाणें दिवसा एका खोलींत देशपांडे व मी राहात असू; पण रात्री मात्र आम्हाला दोघाना राहू देत नसत. आम्ही पोलिसांना विचारले की, दोघाना झोपण्यास का देत नाही? तिघाना जर देता, तर दोघाना का नाही? त्या पोलिसाला याचे कारण काय बरे माहित! तो म्हणत असे, असा कायदा आहे. त्यामुळे देशपांडे हे खोलीत झोपत असत आणि मी एका हॉलमध्ये १५/२० मंडळींसोबत झोपत असे. आम्ही. सर्व मंडळी डिटेन्यू म्हणून असल्यामुळे घरचे जेवण आणून जेवण्यास परवानगी असे. आम्ही जेलचेच जेवण जेवीत असून डिटेन्यू असल्यामुळे कामकाज करावे लागत असे. वर्तमानपत्रे व पुस्तके वाचणे, चर्चा करणे आदि तेथील आमचे कार्य असे. आमचे धोतर धुणे, भांडी घांसणे, गरम पाणी करून देणे वगैरे वगैरे कामांसाठी आमच्या तैनातीस चारपाच क्रिमिनल कैदी होते.

भायखळा जेलमध्ये जाऊन ७/८ दिवस झाल्यावर सरकारची धोरणे आमच्या कानी येऊ लागली. विशेषत: वर्तमानपत्रांतून समजू लागली.

सरकारची मान्यता अशी होती की, दोन दोन तीन तीन इसमांना दररोज सोडून कमिशनर यांच्या ऑफिसात न्यावयाचे आणि त्यांच्यापुढे उभे करावयाचे. पोलीस कमिशनर यांनी नोटीस दयावयाची की, त्या कार्यकर्त्याने दररोज पोलीस स्टेशनवर जाऊन हजेरी दयावयाची आणि त्याने पोलीस कमिशनर यांना असे लिहून दयावयाचे की, मी आजपासून कोणत्याही सार्वजनिक कामात बिलकूल भाग घेणार नाही. जो कार्यकर्ता असे लिहून देईल त्यालाच सोडावयाचे, व जो इसम अशी बंधने स्वीकारणार नाही त्याला दोन वर्षांची शिक्षा फर्मावयाची, असे सरकारने आपले धोरण ठरविले होते. इतकी मोठी कठीण

शिक्षा देण्याचा सरकारचा हेतू असा होता की, इतक्या कडक शिक्षेने कार्यकर्ते भिऊन जाऊन बंधने स्वीकारून सुटून जातील. आम्ही भायखळा तुरुंगात असलेल्या मंडळींनी एकविचाराने ठरविले होते की, हा काँग्रेसच्या प्रतिष्ठेचा मोठा प्रश्न आहे. काँग्रेसला कोणत्याही प्रकारे कमीपणा येता कामा नये. अर्थात् वाटेल ती शिक्षा स्वीकारावयाची, असेच आम्ही सर्वांनी ठरविले होते.

साधारणपणे पकडलेल्या १५ व्या दिवशीच प्रथमतः माननीय सय्यद अबदुल्ला ब्रेलवी, क्रॉनिकलचे संपादक आणि माननीय मोतीचंद गिरीधर कापडिया यांना सोडून पोलीस कमिशनर यांच्यापुढे उभे केले. ठरल्याप्रमाणे कमिशनरनी त्यांना विचारले. ती बंधने स्वीकारण्याचे त्यांनी नाकारले, व त्या बंधनांप्रमाणे तुम्ही वागले पाहिजे अशी नोटीस त्यांना देण्यात आली. पण त्याच दिवशी त्या नोटिशीचा त्यांनी भंग केल्यामुळे त्यांना पकडण्यात आले आणि त्या दोघांनाही एक एक वर्षाची शिक्षा कोर्टाने फर्माविली. त्यांना नाशिक जेलमध्ये पाठवून देण्यात आले.

त्यानंतर सुटण्याची पाळी आम्हावर आली. दुसऱ्या वेळी मी, श्री. नानासाहेब देशपांडे, श्री. मणीभाई देसाई आणि श्री. आचरेकर या चौघांना सोडले आणि आम्हा प्रत्येकाला स्वतंत्र रीतीने ठरल्याप्रमाणे चौकीवर हजेरी देण्याची आणि सार्वजनिक कार्यात भाग न घेण्याची नोटीस दिली. पण हा प्रश्न हीनतेचा असल्यामुळे ती अपमानास्पद गोष्ट आम्ही मान्य करण्याचे नाकारले, आणि ती पोलीस कमिशनर यांनी दिलेली नोटीस त्यांच्याचसमोर 'ही अपमानास्पद गोष्ट आम्ही मानण्यास तयार नाही' असे स्पष्टपणे सांगून तेथेच फाडून टाकली. असे हे होणारच. हे पोलीस कमिशनर जाणून होतेच.

मी आणि माननीय देशपांडे आपापल्या घरी गेलो. दुसरे दिवशी हुकूमभंगाबद्दल सरकार आम्हास पकडणार आणि कोर्टापुढे उभे करून दोन वर्षांची शिक्षा देणार हे आम्ही जाणून होतो.

संध्याकाळी मी पोलीस कमिशनर यांच्या ऑफिसातून घरी गेल्यावर किती तरी मंडळी मला रात्रीपर्यंत भेटावयास आलेली होती. रात्री ९ वाजता माझे घरी पोलिस सुपरिंटेन्डेन्ट श्री. गोळे हे मला येऊन भेटले. त्यांना वाटले की, ही मंडळी पकडली जाऊ नये म्हणून बाहेरगावी निघून जातील. मला त्यांनी विचारले की, पुढे तुमचा (माझा) काय विचार?

मी त्यांना सांगितले की, आमचे धोरण ठरलेले आहे: आम्हास दिलेल्या नोटिशीचा भंग हा आम्ही करणारच. आम्ही बाहेर कोठेही निघून जाणार नाही. मात्र व्यवहाराची, बँकेच्या चेक वगैरेची व्यवस्था करावी लागणार, ती करण्याकरिता उद्या आम्ही तुम्हास भेटणार नाही. परवा सकाळीच आठ

वाजता मला आणि नानासाहेब देशपांडे यांना नेण्याकरिता प्रिन्सेस स्ट्रीट, मंगळदास रोड येथील देवकरण मॅन्शनमध्ये नानासाहेब देशपांडे यांचे घरी आपण जरूर यावे आणि मला आणि देशपांडे यांना घेऊन जावे. असे त्यांना सांगितल्यावर दुसऱ्या दिवशी मी आणि देशपांडे यांनी अलग अलग ठिकाणी गुप्त रीतीने गुप्त जागी राहून व्यवहाराच्या बाबतीत जी काय व्यवस्था करावयाची ती सर्व करून टाकली.

पूर्वसंकेतानुरूप ठरल्याप्रमाणे तिसऱ्याच दिवशी नानासाहेब देशपांडे आणि मी अलग अलग ठिकाणांहून निघून तेजपाळ हॉस्पिटलमध्ये येऊन दाखल झालो.

त्या वेळी नानासाहेब देशपांडे यांचे वडील चिरंजीव बळवंतराव हे आजारी असल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आलेले होते. त्यांना भेटण्यासांठी आम्ही गोकुळदास हॉस्पिटलमध्ये गेलो. त्यांना भेटून तेथून आम्ही देशपांडे यांच्या घरी गेलो.

आम्हास अटक होणार आणि शिक्षाही होणार हे आजूबाजूच्या लोकांना समजले होते. मंगळदास रोडवर देशपांडे यांच्या घराच्या खाली पोलिसांची गाडी आम्हास अटक करून नेण्यास आलेली होती. ती गाडी पाहून तेथे सहस्त्रावधी लोक उपस्थित झाले होते. त्या वेळी काही पेढीवाले आणि इतरही काही मंडळींची भाषणे होऊन सर्वांनी आम्हास प्रेमाने आणि जड अंतःकरणाने निरोप दिला.

त्यानंतर गाडीतून आम्हास चौकीवर नेऊन आमच्यावर आरोप ठेवले आणि न्यायालयात आम्हास शिक्षाही झाल्या.

कोर्टात मॅजिस्ट्रेटसमोर प्रथमतः देशपांडे यांना उभे केले आणि त्यांना एक वर्षाची साधी शिक्षा फर्मावण्यात आली. त्यांना नाशिक जेलमध्ये पाठविण्यात आले.

त्यानंतर मॅजिस्ट्रेटसमोर मला उभे करण्यात आले. मला मॅजिस्ट्रेट यांनी विचारले की, तुम्ही गुन्हा केला आहे हे तुम्हास मान्य आहे का? मी नम्रतेने पण स्वाभिमानाने उत्तर दिले की, मी गुन्हा केलेला नाहीच नाही, इतकेच नव्हे तर पोलीस कमिशनर यांनी जी बंधने आम्हावर घातलेली आहेत, ती अपमानास्पद खास आहेत. ही अपमानास्पद असलेली बंधने व निर्बंध कोणीही स्वाभिमानी माणूस केव्हाही सहन करणार नाही. मान्यही करणार नाही. आणि म्हणूनच मी एक स्वाभिमानी मनुष्य असल्यामुळे आणि काँग्रेसचा एकनिष्ठ अनुयायी –सेवक असल्यामुळे काँग्रेसच्या प्रतिष्ठेला यत्किंचितही कमीपणा येता कामा नये याच उच्च भावनेने ही अपमानास्पद बंधने व निर्बंध मी मानणे केव्हाही शक्य नाही.

अशा स्वाभिमानी वागण्याने जर मी गुन्हा केला आहे असे आपणांस नैतिक दृष्टीने वाटत असेल, तर तुमच्या कायदयाप्रमाणे जास्तीत जास्त जी काही शिक्षा मला तुम्हाला दयावयाची असेल ती जरूर दया. मी ती माझ्या सत्वासाठी, काँग्रेसच्या प्रतिष्ठेसाठी व माझ्या स्वाभिमानासाठी मोठ्या आनंदाने सहन करण्यास तयार आहे.

माझी ही विचारसरणी आणि माझे हे भाषण ऐकून मॅजिस्ट्रेट यांना राग आला, आणि मला सव्वादोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा त्यांनी फर्माविली.

माझ्यापूर्वीच्या मंडळीना एक एक वर्ष, दोन दोन वर्षांच्या शिक्षा दिलेल्या असताना मलाच मॅजिस्ट्रेट साहेबांनी सव्वादोन वर्षांची आणि सक्तमजुरीची शिक्षा फर्माविली.

मॅजिस्ट्रेट साहेबांनी दिलेली शिक्षा ऐकून मी घाबरलो तर नाहीच. उलट नम्रतेने आणि स्वाभिमानाने मॅजिस्ट्रेटसाहेब यांना म्हणालो की, मॅजिस्ट्रेट साहेब! यापूर्वीच्या मंडळीना आपण दोन दोन वर्षांच्या शिक्षा फर्माविल्यात असे असताना मला मात्र सव्वादोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा करून आपण माझा मोठा सन्मान केला आहे असे मला वाटते; आणि त्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. स्वाभिमानाने वागताना अशी कडक शिक्षा भोगण्यामध्ये माझ्या स्वाभिमानाचा आणि माझ्या काँग्रेसच्या प्रतिष्ठेचा हा खरोखर सन्मान आहे असेच मी मानतो. असे सांगून मला फर्माविण्यात आलेली शिक्षा भोगण्यास तयार झालो.

मला मॅजिस्ट्रेटसाहेब म्हणाले की, येथे भाषण करावयाचे नाही. मी त्यांना नम्रपणाने पण स्वाभिमाने उत्तरलो की, महाराज! येथे भाषण करावयाचे नाही हे जरी खरे असले, तरी पण माझ्या स्वाभिमानास्तव माझे प्रांजळ विचार व्यक्त करणे हे माझे आदय कर्तव्य होते व आहे.

### आर्थर रोड जेलमध्ये

मला सव्वादोन वर्षांची शिक्षा फर्माविण्यात आल्यानंतर आर्थर रोड जेलमध्ये नेण्याकरिता कोर्टाखाली गाडी तयार ठेवण्यात आलेली होती. कोर्टातून खाली आणल्यावर मला गाडीत बसण्यास सांगण्यात आले.

मला होणारी शिक्षा ऐकण्यास माझे बंधू व इतर पेढयांची मंडळी आलेली होती. खाली येताच मी माझ्या बंधूंना त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून वंदन केले. त्यांनी मला पोटाशी धरून कुरवाळले. झालेली शिक्षा ऐकून त्यांना किती तरी दु:ख झाले. पण करणार काय? न्यायालयाबाहेर जमलेल्या सहस्त्रावधी लोकांनी महात्मा गांधींच्या जयजयकारात मला प्रेमाचा निरोप दिला. नंतर मी जेलच्या गाडीत बसून त्यांच्यापासून अदृश्य झाल्यावर मोठ्या दु:खी अंत:करणाने माझे

बंधू आणि सहस्त्रावधी जमलेल्या लोकांनी कॉंग्रेसचा आणि महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार केला व सर्व मंडळी आपआपल्या घरी निघून गेली. जेलमध्ये मला घेऊन जाणारी गाडी साधारणपणे अर्ध्या तासाने आर्थर रोड जेलच्या दरवाजापाशी जाऊन पोहोचली. जेलचा दरवाजा मोठा आणि विस्तीर्ण होता. त्याला बाहेर कोण आले आहे हे पाहाण्याकरिता लहानसे वर्तुळाकार एक भोक ठेवले होते. त्या भोकाला एक वर्तुळाकार झाकण होते. गाडी तेथे पोहोचताच गाडीवाल्याने त्या भोकातून आत वर्दी दिली. झाले. जेलचा दरवाजा उघडला गेला आणि आम्हास आत घेतले गेले. जेलचा आतला दरवाजा आणि बाहेरचा दर्शन दरवाजा हे दोन्ही दरवाजे बरेच मोठे आहेत. या दोन्ही दरवाजांच्या मध्ये जागा आहे. त्या जागेत जेलचे ऑफिस होते.

मी दर्शनी दरवाजातून आत जाताच दर्शनी दरवाजा बंद करण्यात आला. मी आत जाताच एक मोठा भयाण दिसणारा आणि भयाण वृत्तीचा मनुष्य एकदम माझ्यासमोर येऊन उभा राहिला. तो क्रिमिनल कैदीच होता, पण तो जेलमध्ये वॉर्डर म्हणून होता. गलेलठ्ठ शरीर व डोकीला पिवळ्या रंगाची एक पगडी होती. अंगात कैद्यांसाठीच बनविलेला कोट त्याच्या अंगात होता. जेलसाठीच बनविलेली अर्धी पँट, कमरेला पट्टा, असा त्याचा पोषाख होता. हातात आखूड असा एक लाकडी दांडा होता. तो दिसण्यात भयंकर दिसत होता. मी त्याला पाहाताच भयभीत होऊन गेलो. मी आत जाताच एकदम तो माझ्यासमोर येऊन दरडावून म्हणाला, "खडा क्यँव रहता है?" बैठो." असे म्हणून मला त्याने बसविले. ऑफिसात जाऊन माझ्यासाठी दोन जाड्या कापडाचे कोट, दोन लहान पँटस्, एक जाड्या कापडाची टोपी, एक थाळी, एक पत्र्याचे पॉट, एक पांघरण्यास व एक अंथरण्यास अशा दोन घोंगड्या, इतके सामान घेऊन मजकडे आला आणि मला म्हणाला, "आपका सब कपडा निकालो. एक बंडल बांधो, और ए जेलका कपडा पेहेरो." असे म्हणून ते कपडे मला दिल्यावर मी ते पेहेरले, आणि माझ्या कपड्यांचे बंडल बांधून त्याच्या स्वाधीन केले. जेलच्या कारकुनाने त्या बंडलावर माझे नाव घालून ते बंडल ऑफिसात नेऊन ठेवले. मग जेलच्या आतला दरवाजा उघडून त्या वॉर्डरने आणि जेलच्या एका शिपायाने मला आत नेऊन जेलच्या बराकीत नेऊन सोडले. मी मला नेमून दिलेल्या जागी जाऊन बसलो. मला तेथे सुंभ वळण्याचे काम दिले होते. जेवणाची वेळ होताच मला बाजरीच्या ठराविक वजनाच्या दोन भाकऱ्या आणि भाजीचे पाणी एक पावशेर मापाइतके मला आणून दिले. मी असे अन्न कधीच पाहिलेले नव्हते. तोंडात जाईना. शेवटी त्या दोन्ही भाकरी आणि ते पाणी बाहेर ठेवलेल्या एक पिंपात मी नेऊन टाकले. जेलमध्ये कडक आणि जेलच्या

ठराविक पद्धतीने वागावे लागते. रात्री झोपण्याच्या वेळी कैदयांना आत बराकीत ठेवण्यात येते. संख्या किती आहे याची नोंद करण्यात येते आणि त्या बराकीच्या दरवाजाला कुलूप लावले जाते. नऊ वाजल्यानंतर कोणीही हू की चू काहीही करता कामा नये. सकाळी सहा वाजता जेलचा शिपाई येऊन दरवाजा खोलतो, संख्या मोजतो, त्यांची नोंद करतो आणि कैदयांना बाहेर काढतो. प्रत्येकाला आपल्या घोंगडयांची वळकटी हातात घेऊन बाहेर उन्हात नेऊन वाळत घालावी लागते. रात्री आणि सकाळी पोलीस कैदयांची संख्या मोजण्यास आला की दोन दोन इसमांनी जोडीजोडीने गुडघ्यावर उकिडवे ढोपरात खाली मान घालून बसावे लागते व त्यानंतर तो शिपाई कैदयांची संख्या मोजतो. सकाळी दहा वाजता अंघोळीस एका हौदावर आम्हास नेण्यात आले. सर्व कैदयांनी जोडीजोडीने बसावयाचे आणि आठ आठ इसमांनी म्हणजे चार जोडयांनी हौदावर एका एका बाजूला चार चार असे जाऊन उभे राहावयाचे. या आठांची आंघोळ झाली की दुसरे आठ यावयाचे. अशी आठ आठ इसमांच्या तुकडीने आंघोळ करावयाची असते. सर्वांनी पैरण व चड्डी काढून ठेवून लंगोटा पेहरावयाचा आणि आंघोळ करावयाची. ही आंघोळ सुद्धा पाच पॉट पाणी घेऊन उरकावयाची असते. या आंघोळीची सुद्धा एक फार्स पद्धती आहे. आम्हा-बरोबर जो वॉर्डर होता त्याची आंघोळीच्या वेळची पद्धती मजेदार अशी असे. वॉर्डर तोंडातून जे जे बोलेल त्या त्या शब्दाप्रमाणेच वागावयाचे असते. आणि जर का त्या वागण्यात मागेपुढे केले गेले तर त्याला मार बसावयाचा. आंघोळीच्या वेळची ती एक विचित्र ड्रिल असते. वॉर्डर पुढीलप्रमाणे बोलतो, व त्याप्रमाणे कैदयांनी करावयाचे. वॉर्डर म्हणतो –आगे चलो, खडे रहो, वांक नीचे, लेव पाणी, डालो आंगपर. पीछे चलो. ही त्याची ड्रिलची भाषा असते. आणि त्याच्या शब्दाप्रमाणे कैदयाने कृती करावयाची असते. लघवीला किंवा शौचास कोणास जावयाचे असल्यास वॉर्डर पेसाब, वॉर्डर तट्टी असे ओरडून सांगून त्याने परवानगी दिल्यावरच जागेवरून उठून जावयाचे असते. ही अत्यंत कडक शिस्त जेलच्या कारभाराच्या दृष्टीने योग्य अशीच असते. जेलमध्ये चहा मिळत नसतो. सकाळी ठराविक माप भरून कांजी मिळत असते. जेलमध्ये अशी वागणूक असते की, कोणास आपली शिखा म्हणजे शेंडी ठेवता येत नाही किंवा जानवे ठेवता येत नाही. असे करण्यात जेलचा एक हेतु असतो व आहे. मी जेलमध्ये गेल्यावर दुसऱ्याच दिवशी सकाळी ९ वाजता एका वॉर्डरला एक शिपाई मजकडे घेऊन आला. त्याच्या हातात हजामतीचे कात्री वगैरे सामान होते. मजकडे त्या वॉर्डरला आणून तो शिपाई त्या वॉर्डरला म्हणाला की, इसका शिखा काटो. म्हणजे शेंडी कापून टाक. असे म्हणताच व तो पुढे झालेला पाहाताच मी घाबरलो. माझी शिखा कापली जाणार म्हणून मला दुःख झाले!

शेंडी हिंदुत्वाची एक खूण आहे, असे माझे मत होते. त्या शिपायाचे नाव दाजी असे होते. मी त्या दाजीला आर्जवाने म्हणालो की, दाजीबा, मी तसेच तूही हिंदू आहेस माझी शेंडी कापू नकोस. मी तुझा आभारी होईन. असे म्हणताच त्याला माझी दया येऊन शेंडी कापण्याचे बंद केले. या प्रसंगी त्या शिपायाचे मजवर किती तरी उपकार झाल्यासारखे मला वाटले. माझ्याबरोबर आणखीही काही राजकीय कैदी होते. साधारणपणे तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी आम्हांपैकी साधारणपणे तीस इसमांच्या एका तुकडीला अहमदनगर जिल्ह्यातील सुप्रसिद्ध विसापुर जेलमध्ये नेण्याचे ठरविले गेले, आणि संध्याकाळी आम्हास आॅर्थर रोड जेलमधून रात्री १२ च्या गाडीने कोणाला जाग लागू न देता एका स्वतंत्र डब्यात भायखळा स्टेशनवर गाडीत बसवून, पुणे मार्गाने विसापुर येते नेण्यात आले.

## विसापुर जेलमधील माझा कारावास

मागील आठवणीत सांगितल्याप्रमाणे आर्थर रोड जेलमधील आम्हा काही मंडळींना भायखळा स्टेशनवर गाडीतील एका स्वतंत्र डब्यात बसवून विसापुरला नेण्यात आले. साधारणपणे ही गाडी सकाळी ५ वाजता पुणे स्टेशनवर येऊन पोहोचली. गाडी स्टेशनवर येताच त्या गाडीला जोडलेला आम्ही बसलेला डबा गाडीपासून निराळा सोडवून साईडला काढून ठेवला, व ती गाडी दौंडला गेली. आमचा जो डबा साईडला काढून ठेवला होता, त्या बाजूस पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. आमच्या डब्याच्या बाजूला कोणालाही परस्थ माणसाला फिरकू देत नसत.

अशाही स्थितीत स्टेशनवर चहा विकणारा एक इसम चहाच्या दोन किटल्या घेऊन आमच्या डब्यापाशी आला, आणि त्याने निर्धाराने आम्हा सर्वांना चहा पाजला आणि तो निघून गेला.

सुमारे १२ वाजता एका गाडीला आमचा डबा जोडला आणि गाडी निघाली. दौंड स्टेशनवर आमचा डबा बाजूला काढून दौंड मनमाडकडे जाणाऱ्या गाडीला जोडला. आणि ती गाडी साधारणपणे ४ वाजता विसापुर स्टेशनवर येऊन पोहोचली. आमच्या सोबत गाडीत काही पोलीस होते. गाडीतून उतरल्यावर स्टेशनवरून विसापुर जेलकडे आम्हास नेण्यात आले. जेलच्या ऑफिसात आमची नोंदणी होऊन आतील बरॅकमध्ये आम्हास नेऊन ठेवण्यात आले. हा विसापुर जेल टेम्पररी जेल होता. पक्का मजबूत बांधलेला नव्हता. खेडयांतील गुरांचे गोठे ज्याप्रमाणे असतात, त्याचप्रमाणे ह्या बरॅक्स होत्या. तेथे प्रथमतः आम्हीच गेलेले होतो. आमच्यानंतर त्या जेलमध्ये मागाहून गुजराथ, मुंबई, महाराष्ट्र आणि कर्नाटक या ठिकाणची मिळून दोन हजार राजकीय कैदी मंडळी होती. या जेलमध्ये मी माझी सव्वादोन वर्षांची शिक्षा पुरी केली. या

जेलमध्ये आम्हास कामे पुरविण्याकरिता दाणा फाईल, भाजी फाईल, जंगल फाईल, बरॅक स्वच्छता फाईल, खोदकाम, फाईल, घंटी फाईल, रस्ता तयार करणारी फाईल, भोजन फाईल, वगैरे वगैरे प्रकारच्या फाईली तयार करून त्यांच्या फाईलीच्या कामावर आमची निवड होऊन आम्हाकडून कामे करून घेत असत. कामे करून घेण्याची वेळ सकाळी ७ ते १०-३० व दुपारी १२ ते ४ या वेळात सक्तमजुरीची कामे करून घेत असत. प्रत्येक फाइलीबरोबर दोन दोन शिपाई असत.

एके दिवशी सत्याग्रह करण्याचा मजवर प्रसंग आला. दुपारी १२ वाजता आमची फाईल कामाला निघाली. एका जागेपासून बऱ्याच अंतरावरच्या दुसऱ्या जागी घमेल्यांतून माती टाकावयाचे काम होते. खाली पायांखालील जमीन उन्हाने तापलेली, आणि डोकीवर १२ वाजण्याचे प्रखर ऊन. त्यामुळे त्रास झाला. तहान तर फार लागली. पाणी देण्याकरिता मी पोलीसकडे मागणी केली. पण त्याने दिले नाही. दोन तीन वेळा मागणी केली असतानासुद्धा तो गर्विष्ठ शिपाई माझ्या विनंतीकडे लक्षच देईना. शेवटी मी त्याला निकराने आणि स्पष्टपणाने बजाविले की, हे पहा शिपाई दादा! मला फार तहान लागलेली आहे. पाण्याविना माझे प्राण जाण्याच्या तयारीत आहेत. तुमच्या गर्विष्ठ मनाला माझ्या प्राणाची काहीच किंमत वाटत नाही. तेव्हा मी तुम्हास स्पष्टपणे बजावून सांगतो की, मला पिण्याला पाणी आणून देईपर्यंत मी बिलकूल घमेल्याला हात लावणार नाही. असे बजावून हातातील घमेले फेकून देऊन बाजूला जाऊन बसलो. शिपायाचा हुकूम कोणी न मानल्यास वरिष्ठ अधिकारी कडक शिक्षा फर्मावीत असतात, हे मला जरी माहीत होते, तरी पण मनाने एकदा निर्धार आणि निर्णय घेतल्यामुळे होणाऱ्या शिक्षेची मी बिलकूल पर्वा केली नाही.

झाले. जे व्हावयास पाहिजे होते तेच झाले. मी घमेले फेकून देऊन सत्याग्रह केल्यावर बाकीच्या सहकाऱ्यांनाही आपआपली घमेली फेकून देऊन तेही माझ्याबरोबरच स्वस्थ बसले. काम करण्यास कोणीही तयार होईना. यात त्या पोलिसाचीच चुकी असल्यामुळे हातात नाक धरून शरणागत होऊन त्याने जेलमध्ये जाऊन बालडीभर पाणी आणून आम्हास ते प्यावयास दिले. आम्ही ते पाणी पिऊन मग सर्वजण आपआपल्या कामाला लागलो. ही सारी हकीकत कामावरून जेलमध्ये गेल्यावर तेथे असलेल्या दोन हजार लोकांना कळली व त्यांनी माझे अभिनंदन केले.

असाच आणखी एक प्रसंग घडून आला. तो असा की, दुपारी बारा वाजता आम्ही जंगलात कामावर गेलो. जंगलातील झाडे उपटून काढून जमीन साफ करावयाची होती. डोकीवर आणि पायांखाली प्रखरतर ऊन. ऊन सहन होईना.

माझ्या नाकातून एकसारखे रक्त वाहू लागले आणि त्यामुळे मी जंगलातच मूर्च्छित होऊन पडलो. श्वासोच्छवास बंद झाला. सर्व मंडळी घाबरून गेली. शिपाईही घाबरून गेला. मला लोकांनी उचलले आणि लांबवर असलेल्या एका वडाच्या छायेखाली माझा देह नेऊन ठेवला. डोकीवर एकसारखे पाणी मारीत राहिले. वारा घालू लागले. बऱ्याच वेळाने मी सावध झालो, आणि सोबतच्या मंडळींनी हळू हळू मला बरॅकमध्ये नेऊन झोपविले. संध्याकाळी डॉक्टरला दाखवून मला औषध दिले. तेथील हवेमुळे आणि कामाचे कष्ट सहन न झाल्यामुळे मी आजारी पडलो आणि जेलमध्ये साधारणपणे माझे ३८ पौंड वजन घटले.

जेलचा नियम असा आहे की, कैदी जेलमध्ये दाखल होताच ४/६ दिवसात त्याचे वजन केले जाते. त्याच्या आंगावरच्या खुणांची नोंद केली जाते. कारण प्रसंगी नकळत सुटताना कैदयांची अदलाबदल होऊ नये, आणि सुरवातीस असलेले वजन टिकविले पाहिजे. घटल्यास शक्ती येण्याकरिता त्याला पावशेर दूध, गव्हाची पोळी, एंक मूद भात असा खुराक त्याला दिला पाहिजे.

सर्वांनाच बाजरी-जोंधळ्याची भाकरी मिळत असल्यामुळे ते कंटाळत. त्यांना भात, दूध, गव्हाची पोळी मिळत नसे. मी सात नंबरच्या बॅरेकमध्ये होतो. आरंभापासून शेवटपर्यंत माझ्यासोबत श्री. ईश्वरभाई पटेल, श्री. राधाकिसन, श्री. राजाराम पंडित, वेलजीभाई, बाप्पालाल चोबेजी, केवलरामभाई ही सी वॉर्डातील मंडळी ठेवण्यात आली होती. मला मिळालेल्या पौष्टिक खुराकामधील थोडा थोडा भात व लहान लहान गव्हाच्या पोळीचा तुकडा मी त्यांना देत असे. त्यांना ते मोठे परब्रह्म वाटे. तेथे गेल्यावर माझी शिखा कापण्याचा प्रसंग पुन्हा विसापुर येथे माझ्यावर ओढवला. माझी शिखा कापू नये, म्हणून मी तेथेही सत्याग्रह केला. शिपाई, हवालदार, जेलर सुपरिन्टेन्डेन्ट या सर्वांनी मला समजावण्याचे प्रयत्न केले. पण मी माझे म्हणणे सोडण्यास तयार नव्हतो. तेथे सुपरिन्टेन्डेन्ट एक जर्मन होते. त्यांचे नाव "क्विन" असे होते. ते अंत:करणाचे फार मायाळू होते. शेवटी सुपरिंटेन्डेन्ट आणि माझ्यात मानाची तडजोड ठरली. ती ही की, माझी शिखा मोठी जाड आणि लांबच लांब होती, तिच्याऐवजी ती अगदी लहान आकाराची ठेवून बाकीची कापून टाकावी. अधिकारी असताना सुद्धा सुपरिंटेन्डेन्ट क्विन यांनी माझी विनंती मान्य केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानले. बरॅक्सचे वर्णन मी वर केलेच आहे. त्या गुरांच्या गोठ्यासारख्या होत्या. प्रत्येक बरॅकमध्ये कोंडवाड्याप्रमाणे साधारणपणे दोन रांगा करून शंभर कैदयांना ठेवीत असत. रोज रात्री त्या बरॅकला बाहेरून कुलूप केले जात असे. एका एका रांगेला पन्नास पन्नास प्रमाणे झोपावयाचे असे. बरॅक बंद केल्यानंतर आम्हावर पाहणी करण्याकरिता आत एक वॉचमन आणि एक वॉर्डर असे. दोन

इसम असत. बरोबर नऊ वाजता घंटेचा आवाज होताच सर्व कैदयांनी आपापल्या जागेवर झोपावयाचे. अंथरण्यासाठी एक घोंगडी आणि पांघरण्यासाठी एक घोंगडी अशा दोन घोंगडया मिळत असत. कोणी कोणाबरोबर बोलावयाचे नसे. प्रत्येक बरॅकमध्ये शौचास जाण्यासाठी व्यवस्था व लघवीसाठी व्यवस्था केलेली होती. पण जर कोणा कैदयास लघवीस किंवा शौचास जावयाचे असेल तर त्या इसमाने "वॉर्डर पेसाब" "वॉर्डर तट्टी" असे झोपलेल्या जागेवरून ओरडावयाचे आणि तो आवाज ऐकून त्या वॉर्डरने "ज्याव" असे म्हटले तरच उठून लघवीस किंवा शौचास जावयाचे; नाहीपेक्षा झोपलेल्या जागेवरून उठावयाचे नाही. प्रत्येक तासातासाने तो वॉर्डर कैदयांची संख्या मोजीत असतो. त्या बिचाऱ्या वॉर्डरला आकडे कोठचे येणार! पण तो मोजीत असतो. मोजणे त्याचे कर्तव्य असते. प्रत्येक तासातासाने जेलच्या राउन्डमध्ये रात्री सर्व बरॅक्सवर देखरेख करण्या- करिता व सर्व व्यवस्था ठीक आहे ना, कैदयांची संख्या बरोबर आहे ना, ही तपासणी करण्याकरिता जेलचा शिपाई प्रत्येक बरॅककडे येतो व आल्यावर बरॅकमधील वॉर्डरने कैदी मोजून शिपायाला बरोबर असल्याचे सांगावयाचे असते. शिपाई आल्यावर त्या वॉर्डरची कैदी मोजण्याची पद्धत मजेदार असते.

"एक, दोन, तीन, चार, पंधरा, वीस, पन्नास, शंभर अशी मोजणी करून हगरीमुत्री बराबर साब" असे म्हणावयाचे. अशा रीतीने पोलिसास सांगितले जाते आणि अशा रीतीने सर्व बरॅक्स मोजून झाल्यावर सर्व व्यवस्थित असल्याची त्या शिपायाने आपल्यावरील हवालदार किंवा सुभेदारास वर्दी दयावयाची व सर्व व्यवस्थित आहे असे सुपरिंटेन्डेन्टला कळावे म्हणून त्या हवालदाराने किंवा सुभेदाराने मध्यवर्ती ठिकाणाहून मोठयाने ओरडून सांगावयाचे की, **"ऑलस् बेल."** इंग्रजीत त्याचा अर्थ ऑल वेल. पण इंग्रजीचा अपभ्रंश ऑलस वेल असे ओरडून कळविले जाते. क्वचित् प्रसंगी काही गडबड झाल्यास मध्यवर्ती जागी असलेली घंटा जोराजोराने वाजविली जाते. तो आवाज एकताच सर्व अधिकारी व सर्व शिपाई असलेल्या परिस्थितीत लगेच धावून येतात व चौकशी आणि पाहाणी करतात. कोणी कैदयाने गुन्हा केल्यास त्याला शिक्षा फर्माविल्या जातात. शिक्षा पुढील प्रकारच्या असतात –आडा बेडी, दंडाबेडी, गंजी पकडा, अंधारकोठडी, हातबेडी, हातपायबेडी, घंटीवर धान्य दळणे, वेताच्या छडीचा उघडया अंगावर मार, वगैरे.

बरॅक्सच्या बाहेर कैदयांना शौचास जाण्यासाठी शंभर लोकांकरिता साधारणपणे बांबूच्या तट्टयांचे तीन बाजू तट्टयांनी बंद व चौथी दर्शनी बाजू उघडी ठेवलेली असे खुले दहा संडास दगडांनी उभारलेले असत. सकाळी मोजणी झाल्यावर सर्व कैदयांनी आपापले बिछाने हातात घेऊन बाहेर पडून पटांगणात

बिछाने वाळत टाकावयाचे आणि जोडीजोडीच्या रांगेने बरॅक्सच्या बाजूस बसावयाचे. जवळ- जवळ अर्ध्या तासात सर्व कैदयांनी आपला शौचविधी उरकावयास पाहिजे असतो. अमुक मिनिटांत त्याने उठलेच पाहिजे, नाहीपेक्षा त्याला सक्तीने बाहेर यावे लागते. मलविसर्जन झाल्यावर पाणी तेथे घ्यावयाचे नसते. अर्धनग्न स्थितीच त्या बाहेर बसलेल्या कैदयांच्या समोरून जाऊन दुसरीकडे पाणी घ्यावयाचे व बाहेर ठेवलेल्या मातीच्या ढिगातून हातात माती घेऊन आपल्या मैल्यावर ती टाकावयाची. अशा प्रकारे अर्ध्या तासात हे शौचाचे कार्य उरकून घेतले पाहिजे.

जेवण ठराविक वजनाच्या म्हणजे प्रत्येकी पाच औंस वजनाच्या बाजरी किंवा ज्वारीच्या दोनच ठराविक आकाराच्या दोन भाकरी, मूग किंवा चणाडाळ, किंवा तूरडाळ यांची अगदीच पाण्यासारखी आमटी आणि तीही एक लहानसे मापटे, असे खोराक असे. चार वाजता कामावरून बरॅक्समध्ये परत यावयाचे. प्रत्येकाने आपला लंगोटा घेऊन शंभर शंभरच्या तुकडीने तलावावर आंघोळीस जावयाचे असते. प्रत्येकाने – मग तो लहान असो किंवा मोठा, म्हातारा असो, त्याने आपली चड्डी सोडून लंगोटा नेसावयाचा आणि तलावाच्या पाण्यात २/३ बुडचा मारून बाहेर यावयाचे. सर्वच जण आपआपले लंगोटे पेहेरून वस्त्रविहीन स्थितीत असणार, तेथे कोण कोणाला लाजणार बरे! अर्ध्या तासाच्या आत आंघोळ करून घरी परत यावयाचे. नंतर जेवण अर्थात् भाकऱ्या खाऊन मग बसावयाचे. ६ वाजता मोजणी व्हावयाची. मोजणी होताना सर्वांनी जोडीजोडीने गुडघ्यावर पण खाली मान घालून बसावयाचे असते. औषधपाण्याची व्यवस्था तर औरच. जेलच तो. डॉक्टर्सना आजाऱ्याची काय पर्वा! औषध देणारा हाताखाली एक वॉर्डर असावयाचा. औषधाच्या म्हणून ५/६ बाटल्या भरून ठेवलेल्या असत. एक तांबडचा रंगाचे, दुसरे सफेत रंगाचे, तिसरे पिवळचा रंगाचे, चौथे गुलाबी रंगाचे, पांचवे हिरव्या रंगाचे, अशा रंगांच्या बाटल्या असतात. डॉक्टर यांनी ज्या रंगाचे पाणी दचावयास सांगावयाचे त्या रंगाचे पाणी वॉर्डरने आजाऱ्यास दचावयाचे असते. पाण्याने गुण कसा येणार! प्रत्येक पंधरा दिवसांनी कैदयाचे वजन केले जात असते. प्रत्येक कैदयाला तीन महिन्यात एकदाच आप्त मंडळींची भेट घेता येते, आणि तीन महिन्यात दोन पत्रे घरी पाठविता येतात. लिहिलेली पत्रे जेलचे ऑफिसर प्रथम वाचतात आणि नंतरच ती पाठविली जातात. घराकडून आलेली पत्रे ऑफिसातच ठेवली जातात आणि ज्याचे ते पत्र असेल त्यास आतून बरॅकमधून बोलावण्यात येते. शिपाई त्याला बोलावून आणतो. तो ऑफिसकडे आल्यावर ज्याप्रमाणे खेडचापाडचात अस्पृश्याला कोणी शिवत नाहीत, खळयाच्या बाहेर बसवितात व त्याच्याबरोबर बोलतात त्याच्याप्रमाणे त्या कैदयाला ऑफिसच्या बाहेर लांब बसवितात. मांडी

घालून बसावयाचे नसते. गुडघ्यावर बसावयाचे असते. अशा रीतीने तो बसल्यावर त्याला त्याच्या घराहून आलेले पत्र वाचावयास देण्यात येते. ते पत्र तो वाचून पाहून परत ऑफिस कारकुनाला देतो, आणि तो कैदी परत जेलच्या आत जातो.

ती महिन्यांनी एकदा भेटणाऱ्या मंडळीस भेट घेण्याची परवानगी असते. आगाऊ विचारावे लागते. परवानगी आल्यावर अमुक दिवशी येणार असल्याचे कळवावयाचे असते. आलेल्या मंडळींनी जेलच्या बाहेर बऱ्याच अंतरावर बसून ऑफिसात आल्याचे कळवावयाचे असते. मग त्या मंडळींना बोलावण्यात येते. ती मंडळी आल्यावर त्या कैद्याला काही अंतरावर बसवून आलेल्या मंडळींशी ८/१० मिनिटे घरगुती खुशालीच्या गोष्टी करता येतात व मुलाखत संपते. हे सर्व अनुभव मी स्वतः भोगलेले आहेत, हे सांगणे नकोच.

एके दिवशी जेलमध्ये एका राजकीय कैद्याला फटके मारण्यात आले. त्यासाठी जरूर ती तालीम एका शिपायास काही दिवस देण्यात येत होती. फटक्यांची शिक्षा अंमलात आली ती अत्यंत गुप्तपणे! अगदी एका बाजूस एकान्त ठिकाणी त्या कैद्यास नेऊन फटक्याची शिक्षा अंमलात आणण्यात आली. वेळ सायंकाळी चार वाजण्याची होती. त्याच दरम्यान महात्माजी सुटल्याची बातमी पसरविण्यात आली होती. सारे लोक त्या बातमीच्या आनंदात होते. शिक्षा भोगणाऱ्या त्या कैद्याचे केविलवाणे ओरडणे त्या गडबडीतही आमच्या कानी पडल्याशिवाय राहिले नाही. सारे जण हवालदिल व बेहोष होऊन गेले! सर्वांना चीड आलेली होती. सर्वांनी आरडाओरड करण्यास सुरवात केली. जेलचे अधिकारी घाबरून गेले. शांतता कशी प्रस्थापित करावी हे समजेना. रात्रौ बारा वाजून गेले तरी गडबड शांत होईना. शेवटी सुपरिन्टेंडेंट क्वीन्स यांनी बरॅकमधील प्रमुख पुढाऱ्यास एकत्र बोलावून त्यांच्याशी समजुतीच्या गोष्टी केल्या व त्या दिवसापासून श्री. एस्. के. पाटील, श्री. फुलचंद शहा वगैरे आमच्या पुढाऱ्यांच्या संमतीशिवाय कोणतीही गोष्ट करावयाची नाही. श्री. पाटील आदि पुढाऱ्यांनी सर्व कैद्यांची योग्य प्रकारे समजूत घातली व गंभीर झालेला मामला शांत झाला.

विसापुर जेलमध्ये असता माननीय श्री. एस्. के. पाटील यांची मातुःश्री निधन पावल्याची बातमी येऊन थडकली. मातेच्या निधनामुळे श्री. पाटील यांना झालेल्या दुःखाची कल्पना कोणालाही करता येण्यासारखी होती. मला ती दुःखद बातमी समजताच त्यांना ताबडतोब भेटून माझ्यापरीने त्यांचे सांत्वन करण्याचा मी प्रयत्न केला.

श्री. एस्. के. पाटील यांचा जेलमध्ये मला सहवास लाभला हे मी माझे भाग्य समजतो. आम्हाला एकमेकांबद्दल आत्यंतिक आदर. निदान एक दिवसाआड एकमेकांस भेटून आम्ही सुखदु:खांच्या गोष्टी आपुलकीच्या भावनेने करीत असू. माझ्यावर त्यांचा भारी लोभ होता व ते आपल्या कर्तबगारीने आज उच्चपदावर गेले असले तरी तो लोभ, तो प्रेमळ बंधुभाव आजतागायत कायम आहे.

आमच्या जेलमध्ये रामचंद्र या नावाचा एक मालवणकडील वॉर्डर होता. मी व श्री. पाटील आम्ही दोघेही मालवणकडचे. यामुळे त्याला आमच्याबद्दल आपलेपणा वाटत असे व तो आमच्याशी प्रेमादरभावाने वागत असे.

आता स्वराज्यामध्ये काँग्रेसचे शासन सुरू झाल्यापासून देशातील सर्व कारागृहांतील बंदीजीवनाची पाहणी होऊन त्यात बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत. हल्लीच्या बंदीजनांस स्वजनांपासून ताटातूट व स्थानबद्धता यापलीकडे आम्ही भोगलेल्या असंख्य यातना, हालअपेष्टा आदि क्लेश भोगावे लागत नसल्याने आपण बंदीशाळेत आहो असे वाटतच नाही. हल्ली बंदीशाळांतून सामान्यत: राजबंदी नसतातच. राहाता राहिले गुन्हेगार. या वर्गातील बंदीजनांना चहा मिळतो. स्वत:चे कपडे मिळतात. कामाचा त्रास पूर्वीच्या मानाने पुष्कळच कमी. कामाबद्दल वेतन मिळते. वेतनाचे पैसे साठविता येतात. रजा मिळते. ठराविक दिवसांनी घरी रजेवर यावयास मिळते. या सवलती इतक्या प्रमाणबाह्य झाल्या आहेत की, त्या उपभोगणाऱ्यांना बंदी म्हणून संबोधताच येणार नाही!

या सर्व सोयी-सवलती उपभोगावयास मिळतात, पोटापाण्याचा उदचोग शोधण्याची काही चिन्ता नको, म्हणून अनेक लोक हल्ली हेतुपुरस्सर गुन्हे करून बंदीशाळेत येतात असे कळते!

यापूर्वीच्या जमान्यातील बंदीजीवनात दिल्या जात असलेल्या निष्ठूर व अमानुष वागणुकीत अवश्य सुधारणा व्हावयास हवी होती, ही गोष्ट मला पूर्णपणे मान्य आहे. परंतु कारागृहात सध्या मिळत असलेल्या सवलती प्रमाणाबाहेर झाल्या आहेत. कारागृहात बंदयाला अटकेत ठेवण्याचा प्रधान हेतु जो कारागृहाविषयी त्याच्या मनात लज्जा, भीती, दहशत आदि उत्पन्न करण्याचा असतो, तो एका बाजूसच राहून तो बंदी कारागृहातच येण्याची इच्छा करतो! नव्हे येतो! चालू राजवटीत अशा प्रकारचे हे विकृत चित्र पाहावयास मिळत आहे!

आता आगामी अडसष्टाव्या आठवणीत ब्रिटिश राजवटीत आमच्या समवेत बंदीजीवनाचा अनुभव घेतलेल्यांपैकी एका सहकारी देशभक्ताच्या एकंदर

जीवनावर त्याच्या कारावासाचा काय परिणाम झाला ते निवेदन करून स्वातंत्र्यपूर्वकाळच्या आणि आजच्या बंदीजीवनात किती भिन्नता आली आहे, त्या वेळेचे बंदीजीवन किती दुःसह होते, आणि आजचे किती सुसह्य, नव्हे –आकर्षक झाले आहे याचे कल्पनाचित्र आपल्या डोळचांपुढे उभे करून पाहाण्याची वाचकास विनंती करितो.

या परस्परविरोधी दृश्यांची कल्पनाचित्रे आपल्या मनश्चक्षूंपढे तुलनेसाठी आणणे ही कल्पनाच किती मनोवेधक आहे बरे!

विसापुर बंदीशाळेत ग्रंथपाल म्हणून माझी नेमणूक मागील आठवणीत लिहिल्याप्रमाणे करण्यात आली. माझे वजन सुमारे ३८ रत्तल घटले होते. शरीर अगदीच कृश झालेले होते. वजन घटल्यावर दूध, गव्हाची रोटी आणि भात मिळालाच पाहिजे असे असले, तरी मी होऊन त्या वस्तूंची मागणी केलेली नव्हती. पण माझी प्रकृती पाहून माननीय एस्. के. पाटील, फुलचंद बापूजी शहा यांनी सुपरिन्टेन्डेन्ट यांना सांगून मला त्या वस्तू देण्याची व्यवस्था केली, आणि त्या वस्तू मिळू लागल्यामुळे त्या वस्तूंचा उपयोग मी कसा काय करीत होतो हें मागे सांगितलेच आहे.

माझे वजन घटल्यामुळे मला बाहेर कामावर न पाठविता जेलमध्ये जी लायब्ररी होती तिची जबाबदारी माननीय पाटील आणि फुलचंद बापूजी शहा यांनी मजवर सोपविली होती. माझ्यापूर्वी या कामगिरीवर साताऱ्याचे माननीय गोखले हे होते. मी लायब्ररियन असल्यामुळे या जेलमध्ये जी मंडळी शिक्षा भोगण्यास येत असत ती आपल्यासोबत वाचनासाठी सुंदर सुंदर आणि महत्त्वाची पुस्तके आणीत असत, अर्थात् ती लायब्ररीत येत असत व अनुक्रमाप्रमाणे वाचण्यास मिळत असत. मी ती महत्वाची पुस्तके वाचीत असे, आणि अशा पुस्तकांमधून एका चोपडीत त्या त्या विषयावर नोटस् करून घेत असे. साधारणपणे दोनशेपन्नास पुस्तके मी वाचली. परदेशी राज्याच्या घटनाही वाचल्या. मला कादंबऱ्या, नाटके वगैरे वाचण्याचा नाद बिलकूल नाही. ही जी महत्त्वाची पुस्तके वाचली त्यांच्या नोटस्वरून बाहेर आल्यावर मी नवाकाळ वगैरे वर्तमानपत्रांत लेख लिहिले आहेत. मी लायब्ररीचे काम व्यवस्थित ठेवून सर्वांना पुस्तके वाचण्यास देत असे. मी लायब्ररीत असल्यामुळे बरीच पुस्तके वाचून कितीतरी ज्ञान मला मिळविता आले. हा एक मला मोठचात मोठा लाभ सहजासहजी मिळाला.

### माझे इंग्रजी शिक्षण

मी लायब्ररीत असताना माननीय एस्. के. पाटील व फुलचंद बापूजी शहा हे रोज लायब्ररीत येत असत. एके दिवशी पाटील हे लायब्ररीत आल्यावर मला

म्हणाले की, दादा! येथे असलेल्या मुदतीत तुम्ही इंग्रजी शिकून का बरे घेत नाही? ही फार नामी संधी आहे.

मी त्यांना म्हणालो, माझी तयारी आहे आणि त्यासाठी वाटेल तो त्रास सहन करण्यास मी तयार आहे. पण मला शिकविण्याचे काम कोण पत्करणार? त्यावर पाटील मला म्हणाले, त्याची तुम्हास काळजी नको. ती जबाबदारी मी पत्करतो. तुम्ही तयार तर व्हा. झाले. माननीय पाटील हे एवढ्यावरच थांबले नाहीत. तर दुसऱ्याच दिवशी जरूर ती पुस्तके आणवून त्यांनी मला इंग्रजीचे धडे शिकविण्यास लगेच सुरवात केली. त्यांनी मला प्रत्येक इंग्रजी शब्दाचा अर्थ समजावून दयावा आणि तो मी माझ्या चोपडीवर उतरून घ्यावा. दिवसा तर मला काम असे. संध्याकाळी ६ वाजता जेल बंद झाल्यावर हा लायब्ररीचा तंबू बाहेर असल्यामुळे त्या लायब्ररीत रात्री मी अभ्यास करीत असे. रात्री शब्दार्थ तोंडपाठ करीत असे. माननीय पाटील हे दररोज पाऊण तास मला शिकवीत असत. दररोज रात्री १२ वाजेपर्यंत अभ्यास करीत बसावयाचे, त्याचप्रमाणे पहाटेस ४ वाजता उठून आंघोळ वगैरे करून परत अभ्यासास बसावयाचे. रात्री व पहाटेस अभ्यास करताना मला झोप यावयाची. पण अभ्यास तर केलाच पाहिजे; न केल्यास माझे गुरुजी पाटील रागावतील म्हणून नेटाने अभ्यास करीत असे.झोप उडून जावी आणि अभ्यास करता यावा म्हणून मी रात्री आणि पहाटेस माझ्या डोळ्यांना कापुराची पूड लावून झोप घालवीत असे. आणि अशा प्रकारच्या खडतर प्रयत्नाने मी विसापुर जेलमध्ये इंग्रजी चौथ्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण घेतले. जेलचे सुपरिन्टेन्डेन्ट माननीय क्वीन्स यांना माझ्याबद्दलचा अप्रतिम आदर. माझ्या वागणुकीबद्दल व कार्याबद्दल पाटील यांनी त्यांना पूर्ण माहिती दिलेली होती. त्यामुळे माझ्याबद्दल त्यांना फार आदर वाटत असे. जेलच्या राऊंडवर ते रोज येत असत, आणि त्या वेळी मुद्दाम लायब्ररीच्या तंबूमध्ये येऊन मोडक्या तोडक्या मराठी भाषेत अभ्यासाबद्दल चौकशी करीत, व मधून मधून इंग्रजीही शिकवीत. अशा प्रकारे विसापुर जेलमध्ये इंग्रजी चार इयत्तेपर्यंत शिक्षण केले. पण बाहेर आल्यानंतर निरंतरचा अभ्यास करण्याचे सुटल्यामुळे पुढे ज्ञान वाढविता आले नाही. अशा प्रकारे माननीय पाटील यांनी मला इंग्रजी शिक्षण दिले. अर्थात् ते माझे गुरुजी आहेत.

केशव घुर्ये हा काँग्रेसच्या चळवळीत धडाडीने भाग घेत असता सन १९३२ च्या चळवळीत त्यालाही पकडले होते. त्याला विसापुर जेलमध्ये आणले होते.

काही दिवसांनी तो आजारी पडला. जेलची औषधे कसली असणार? योग्य उपचार होऊ शकला नाही. आणि एके दिवशी संध्याकाळी ७ वाजता

जेलच्या हॉस्पिटलात तो निधन पावला. केशव सर्वांचा आवडता, आनंदी व खेळाडू वृत्तीचा होता. त्यामुळे तो पाटील यांचाही आवडता होता. पाटील यांचे त्याच्यावर फारच प्रेम असे. रात्रीच त्याचा अंत्यसंस्कार करण्याचे ठरले! सर्व बरॅकमधून १५/२० मंडळी बाहेर घेतली. सर्वांनी मिळून रात्री त्याची प्रेतयात्रा काढून नदीकिनारी चिता तयार करून त्या चितेवर केशवला अग्नी देण्यात आला. पाटील यांनी आपल्या मंडळींबरोबर मलाही बाहेर घेतले होते. सर्वांच्या आवडत्या केशव घुर्येला मंत्राग्नी मीच दिला. नंतर दुसरे दिवशी पाटील आणि मी नदीकिनारी जाऊन रक्षा भरणे व अस्थि काढणे वगैरे कामे केली. दुसरे दिवशी केशवच्या वडिलांना घेऊन भलोबा देसाई हे आले. त्यांचे सांत्वन करणे कठीण झाले. त्यांचे समाधान करून भलोबाकडे अस्थी देऊन त्यांना मुंबईला पाठवून दिले. केशवच्या निधनाबद्दल सर्वजण हळहळले. केशव घुर्ये बलिदानाने अजरामर झाला.

## मला दादा हे नाव कसे प्राप्त झाले?

मागे लिहिल्याप्रमाणे शिक्षा झाल्यानंतर आम्हा राजकीय कैद्यांना विसापुर जेलमध्ये नेण्यात आले. तेथे मुंबई, गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे ठिकाणची मिळून सुमारे दोन हजार मंडळी होती.मुंबईहून जाताना मजबरोबर केवलराम जोशी, राजाराम पंडित, चोबेजी, शामजी भाई, ईश्वरभाई पटेल वगैरे मंडळी होती. आम्ही सर्व एका बरॅकमध्ये होतो. तेथे आलेल्या मंडळीत वयाने मीच एकटा मोठा असल्यामुळे गुजराती लोकांच्या पद्धतीप्रमाणे स्वतःपेक्षा वडील माणसाला अथवा आजोबाला दादा म्हणतात, त्याचप्रमाणे माझ्यासोबत असलेले केवलराम जोशी यांनी मला दादा म्हणून संबोधण्यास सुरवात केली, आणि मग सर्वच जण मला दादा याच नावाने संबोधू लागले. अशा रीतीने कारागृहात मला दादा असे म्हणण्याची प्रसिद्धी मिळाली. पुढे बाहेर आल्यानंतरही माझा जेथे जेथे प्रवेश असे अशा सर्वच सार्वजनिक ठिकाणी माझे दादा हे नाव रूढ झाले. माझे पाळण्यातले नाव यशवंत कृष्ण परुळेकर आहे. पण विसापुर जेलमध्ये जो एकदा मला दादा असे म्हणण्याचा प्रारंभ झाला, तो पूर्णपणे रूढ होऊन आज सबंध मुंबई शहरात आणि सर्व कार्यकर्त्यांत मला दादा असे प्रेमाने म्हणतात.

## माझी मुक्तता

माझ्या शिक्षेची मुदत पुरी होताच मला विसापुर जेलमधून मुक्त करण्यात आले. मुक्तता होताच दौंड-पुणे मार्गे मुंबईस न येता नानासाहेब देशपांडे यांचे

चिरंजीव मंगेशराव देशपांडे यांच्या खास आग्रहामुळे मनमाड-नाशिक मार्गे आलो. मंगेशराव हे नाशिक येथे इमारती बांधण्याचे काम करीत असत. त्यांच्या खास आग्रहामुळे मी नाशिकला गेलो. त्या वेळी माझ्याबरोबर ईश्वरभाई पटेल आणि चिंचणकर हेही सुटलेले होते. तेही मजबरोबर नाशिकला आले. नाशिकला एक दिवस राहून आम्ही मुंबईला आलो.

तो भाद्रपद महिना असावा असे वाटते. माझे मालक नानासाहेब देशपांडे यांच्याप्रमाणे त्यांच्या पत्नीचेही मजवर अतिशय प्रेम होते. तिचे नाव सौ. लक्ष्मीबाई. आम्ही तिली वहिनी असे म्हणत असू. तिने मजकरिता अनंताचा प्रसाद आणि माझे कपडे नाशिकला मंगेशराव यांचेकडे पाठवून दिलेले होते. मी अमुक दिवशी सुटणार आहे तिला माहीत होते.

मुंबईस बोरीबंदर स्थानकावर आम्ही सायंकाळी चारच्या सुमारास उतरलो. त्या वेळी माझ्या सत्कारासाठी तेथे प्रमुख असा व्यापारी वर्ग व इतर शेकडो मंडळी उपस्थित होती. माझे वडील बंधू विठ्ठलराव हेही स्टेशनवर आलेले होते. हा सर्व माननीय नानासाहेब देशपांडे यांचाच प्रताप होता. त्यांनीच हे सर्व घडवून आणले होते. गाडीतून उतरताच अनेकांनी हार घालून माझा मोठा सत्कार केला.

मी गाडीतून उतरताच मला माझे बंधू दिसताच प्रथम मी त्यांच्या चरणी माझे मस्तक ठेवले. लगेच त्यांनी मला उचलून पोटाशी धरले. नंतर जमलेल्या मंडळींनी तेथे तयार ठेवलेल्या मोटरीत बसवून मोठ्या मिरवणुकीने मला माननीय नानासाहेब देशपांडे यांच्या पेढीवर नेले आणि तेथे अनेकांनी माझ्या सत्काराची भाषणे केली व नंतर मला माझ्या घरी हमालवाडीत पोहोचविले.

माझ्या मालकीणबाई सौ. लक्ष्मीबाई यांनी माझ्या सुटकेनिमित्त आनंद व्यक्त करण्यासाठी पेढीवर जमलेल्या सर्व मंडळीना पेढे वाटले.

माझे मालक माननीय नानासाहेब देशपांडे यांना व मला एकाच दिवशी शिक्षा झाल्या होत्या. त्यांना एक वर्षाची आणि मला सव्वादोन वर्षांची शिक्षा झालेली होती. देशपांडे यांना नाशिक जेलमध्ये ठेवले होते. त्यांना 'ब' वर्ग दिला होता. मला विसापुर जेलमध्ये ठेवून 'सी' वर्ग दिला होती. त्यांच्या सुटकेनंतर ते घरी आल्यावर नानासाहेब यांची धर्मपत्नी त्यांना म्हणाली की, "तुम्ही सुटून आलात, ठीक झाले. पण माझा यशवंत आला नाही." असे म्हणून तिने अश्रु ढाळले. माझा यशवंत जेव्हा सुटून येईल त्याच वेळी मी सर्वांना आनंदाने पेढे वाटीन असे ती म्हणाली. त्याप्रमाणे मी सुटून आल्यावर तिने पेढे वाटले. त्यांचे

किती हे माझ्यावर अप्रतिम प्रेम! मला याबद्दल आनंद वाटतो. तुरुंगातून सुटून आल्यावर मी बराच रोडलेला असल्यामुळे मला लोकांनी एकदम ओळखले नाही. माझे ३८ पौंड वजन कमी झालेले होते. माझ्या मालकीण बाईने आपल्या स्वत:च्या मुलांबाळांइतकेच मला प्रेमाने वागविले. नानासाहेब देशपांडे यांच्या सर्व मुलांचे व घरांतील सर्व मंडळीचे माझ्यावर अप्रतिम प्रेम होते.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर

जन्म २५ नोव्हे. १८९६ मृत्यू २७ जुलै १९७५

**महाराष्ट्रातील गांधींवादी कार्यकर्ते**

जन्म पुणे येथे. शालेय शिक्षण मुंबई व पुणे येथे. १९२० साली पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजातून पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याच वर्षी पुणे येथील कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून काही काळ काम केले. १९२१ साली ते चित्रशाळेत नोकरीस राहिले. २१-२२ साली दारु-दुकानावर पिकेटिंग केल्याबद्दल दंडाची शिक्षा. १९२७ साली चित्रमयजगतचे संपादक म्हणून नियुक्ती. १९३० साली त्यांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला व शिरोडा येथे या लढ्याचे नेतृत्व केले. त्यात सहा महिन्यांचा कारावास. त्यानंतर परत अटक. १९३२ साली राजद्रोहात्मक भाषणाबद्दल अटक आणि १॥ वर्षाचा कारावास. १९३४ साली परत कारावास. १९३५ ते ५७ पर्यंत कायदेमंडळांतील निवडणूक मंडळाचे सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. पुणे जिल्हा आणि महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपद. १९५५ ते ५९ या काळात अ. भा. काँग्रेस कमिटीचे सदस्य. १९४०

साली वैयक्तिक सत्याग्रहात भाग. सहा महिने कारावास. त्यानंतर ४२ च्या लढ्यात कारावास.

१९५८ साली म. गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष. या काळात विधायक कार्याबरोबर विपुल ग्रंथरचना केली. एकूण ५५ पुस्तके लिहिली. १९४६ साली धुळे येथे भरलेल्या पत्रकार संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पुढील उतारा त्यांच्या आत्मवृत्तातून सादर करण्यात येत आहे.

# २६ जानेवारी १९३४

त्र्यं. र. देवगिरीकर

पुण्यासच २६ जानेवारीला शनिवारवाड्यापुढे वैयक्तिक सत्याग्रह करावयाचे मी ठरविले. श्री. तळेगावकर माझ्या बरोबर येण्यास तयार होईनात. मी मागाहून येईन असे म्हणू लागले.

मी २६ तारखेला सत्याग्रह करणार आहे असे समजताच आचार्य वि. प्र. लिमये मजकडे आले व म्हणाले, मी तुमच्या बरोबर येणार आहे. मी त्यांना म्हटले, तुमची प्रकृती ठीक नाही, तेव्हा सत्याग्रहाला येण्याचा विचार करू नका. ते म्हणाले, मी अविचार करण्याचे ठरविले आहे. दुसरे एक स्वयंसेवक शनिवारांत राहणारे श्री. दिवेकर होते, त्यांनीही आमच्या दलात दाखल होण्याचे कबूल केले. नंतर श्री. हरिभाऊ फाटकांचा निरोप आला व त्यांनीही आपली सत्याग्रहात येण्याची इच्छा प्रकट केली.

सत्याग्रह करावयाचा ठरल्यानंतर कलेक्टर साहेबांना आम्ही नोटिसा पाठविल्या. पण त्या नोटिसा सरकारला होत्या; जाहीर नव्हत्या. सभेला लोक कसे जमणार? त्या वेळी ज्ञानप्रकाश व केसरीकडे सभेचा मजकूर मी माझ्या सहीने पाठविला. ज्ञानप्रकाशाचे संपादक कै. कृ. ग. लिमये होते. त्यांनी 'सदद्य:स्थिती' वर व्याख्यान होणार आहे असे प्रसिद्ध करण्याचे कबूल केले. आमच्या सत्याग्रहाची बातमी कोणी देणार नाही याची आम्हांला कल्पना होती. पण केसरीने 'सदद्य:स्थिती' वर व्याख्यान आहे ही बातमी प्रसिद्ध करण्यास नकार दिला. मला असा निरोप आला की, आम्ही सत्याग्रह करणार नसलो तरच ही बातमी प्रसिद्ध करू. अर्थात् मी ते मान्य केले नाही व केसरीत बातमी आली नाही. केसरीसारख्या पत्राने साध्या सभेची बातमी देऊ नये व ज्ञानप्रकाशने दयावी हा काळाचाच महिमा होता. पण संपादकांची वैयक्तिक दृष्टीही त्यात नव्हती असे नाही.

सत्याग्रह ६ वाजता होणार होता. चित्रशाळेत आम्ही जमलो आणि सभेला कोणीच भीतीने येणार नाही असे वाटल्यामुळे जे जे परिचित वाटेत

भेटतील त्यांना त्यांना घेऊन शनिवारवाड्याकडे निघालो. पण सरकारने सभेविषयी वाटणारी आमची भीती दूर केली होती. शनिवारवाड्याच्या मैदानाभोवती पाच पन्नास लाल डगल्याचे घोडेस्वार मोठ्या शिस्तीत चौफेर उभे होते आणि शेदीडशे युनिफॉर्ममधील पोलीस तेथे दंग्याच्या निवारणार्थ उभे ठेवले होते! तो सारा कडेकोट बंदोबस्त पाहून लोक कुतूहलाने तेथे जमा झाले. पण सभेच्या स्थानी येण्याऐवजी ते दूर दूरच उभे होते. ते कदाचित् लाठीहल्ला होईल, कदाचित् गोळीबार होईल व निष्कारण आपणही पकडले जाऊ या गोष्टीला भीत असावेत. म्हणून आमच्या बरोबरचे पांच-पन्नास लोक व साध्या पोषाखांतील तितकेच पोलीस एवढीच सभेला हजेरी. जनता किती भयभीत झाली होती याची त्यावरून कल्पना आली.

सभेला सुरुवात झाली. कायदा मोडला जाईल अशा आशयाचे भाषण मी तयार केले होते व तिघांच्या हाती दिले होते. प्रथम सद्य:स्थितीबद्दल बोलायचे व नंतर ते भाषण वाचायचे असे ठरले. आचार्य लिमये, नंतर दिवेकर; त्यांच्या मागून हरिभाऊ फाटक व शेवटी मी असा क्रम लावला होता. आचार्य लिमये यांचे भाषण व वाचन झाले. शेवटी मी अर्धा तास बोललो आणि सभा संपली. त्या वेळी श्री. कर्णिक हे इन्टिलिजन्स शाखेचे प्रमुख पोलीस अधिकारी होते. ते एरवी अत्यंत सौम्य असत; पण त्या दिवशी ते जरा करडे झाले होते. आम्हा चौघाना पकडले. मला पकडल्यावर श्री. ना. ग. गोरे हे माझे अभिनंदन करावयास आले. श्री. कर्णिक त्यांना म्हणाले, 'तुम्हांलाही अटक केली आहे.' श्री. गोरे नुकतेच सुटून आले होते व त्यांची फेर अटक ही एक आपत्तीच होती. पण त्याहीपेक्षा माझ्या भावाजवळ मी सामानसुमानाची थैली दिली होती, ती त्याने मजजवळ देताच त्यालाही अटक केली. हे पाहून मी कर्णिकना विचारले, 'हे काय चालवले आहेत तुम्ही?' ते मला म्हणाले, 'थोडा वेळ थांबा. गर्दी टाळण्याकरिता त्यांना अटक केली आहे.' आम्हाला शनिवारवाड्याजवळील पोलीस चौकीत नेले व तेथून फरासखान्यांत. फरासखान्यांत गेल्यावर त्या दोघांना सोडले व आम्हा चौघांना फरासखान्यांतल्या तळघरातल्या कोठडीत बंद करून टाकले.

फरासखान्याची ती कोठडी म्हणजे एक नरकवासाचीच जागा आहे. अत्यंत घाणेरडी, वाऱ्याला बंदी असणारी, कुबट घाण येणारी अशी ती कोठडी होती. श्री. हरिभाऊ फाटक हे अत्यंत बेचैन झाले. ते व आचार्य लिमये रात्रभर जागे होते आणि ते जागे म्हणून आम्ही तुरूंगवासाला सरावलेले असूनही जागेच राहिलो. आम्हाला मुख्य चिंता होती ती खटला केव्हा सुरू होईल याची. कारण एकदा शिक्षा झाली व येरवड्याला पोहोचलो म्हणजे त्या अंधार-कोठडीतील

यमयातना संपणार होत्या. सुदैवाने दुसऱ्या दिवशीच आम्हाला खटल्याकरिता नेले व चौघांनाही शिक्षा झाल्या. मला व दिवेकरांना ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली व आचार्य लिमये व हरिभाऊ हे पहिलेच गुन्हेगार असल्यामुळे त्यांना तीन तीन महिने सश्रम कारावासाच्या शिक्षा झाल्या. श्री. दिवेकर यांना 'क' वर्ग दिला व आम्हा तिघांना 'ब' वर्ग मिळाला.

येरवड्याला पोहोचल्यावर आम्हाला फाशी गेटाशेजारील आठ खोल्यांच्या एका यार्डात ठेवण्यात आले. प्रत्येकाला एकेक खोली दिली होती. जागा चांगली होती. थोडीशी फुलझाडेही तेथे होती. पाण्याची तक्रारही नव्हती. काम मामुली होते. पण वर्दीबद्दल सक्ती होती.

काही दिवसांनी श्री. मोरारजी देसाई यांना आमच्यात आणून दाखल केले. त्यांना गुजरातेत दोन वर्षांची शिक्षा झाली होती. श्री. तळेगांवकरांनी सत्याग्रह केला नाही; पण माझ्याबरोबर त्यांनी कऱ्हाडला जे भाषण केले होते त्याबद्दल त्यांच्यावर खटला होऊन त्यांना सहा महिने शिक्षा झाली व तेही आमच्यात आले. मलाही कऱ्हाडला खटल्याकरिता नेतील की काय अशी भीती वाटू लागली. पण श्री. तळेगावकर म्हणत की, कऱ्हाड पोलिसांनी त्यांना असे सांगितले की, माझ्यावर दुसरा खटला होणार नाही. पण ते खोटे ठरले.

**कऱ्हाडचा खटला**

तो रविवारचा दिवस होता. रविवार म्हटला की, शिक्षेत शिक्षा. सकाळी ९ वाजता सकाळचे जेवण व दुपारी ३ वाजता रात्रीचे जेवण घ्यावे लागे अगर कोठडीत ठेवावे लागे. चार चे सुमारास बंदी होई. येरवड्यास लालखान व विलायतखान अशा अत्यंत खाष्ट शिपायांची जोडी होती. लालखान खोली बंद करताना मजकडे मिस्किलपणे पाहून म्हणाला, 'देवगिरीकर कोण आहे?' एवढे बोलून तो निघून गेला. आमच्या खोल्या अगदी लागून होत्या. आम्ही तर्क केला की, कऱ्हाडला सकाळी मला खटल्याकरिता नेणार त्याची ही प्रस्तावना आहे आणि झालेही तसेच.

सोमवारी सकाळी मला लालखानने सांगितले की, तयार व्हा, ऑफिसात जायचे आहे. स्नान व नास्ता उरकून बाडबिस्तारा व थालिपॉट घेऊन मी ऑफिसात गेलो. श्री. कटेली हे जेलर होते. त्यांनी मला सांगितले, तुमच्यावर खटला चालणार आहे व पोलीस तुम्हाला घेऊन जाणार आहेत. त्यांनी पोलिसांना बोलाविले व मला त्यांच्या स्वाधीन केले. ते मला बेड्या घालू लागले व दोरांनी जखडू लागले. मी कटेलींना म्हणालो, 'मी 'ब' वर्गाचा कैदी आहे व

बेड्या घालण्याचे व दोर बांधण्याचे कारण नाही.' कटेलीने उत्तर दिले, 'आमची सत्ता जेलच्या बाहेर नाही. मी पोलिसांना काही सांगू शकत नाही.' पोलीस बेड्या घालू लागले. तेव्हा मात्र कटेली म्हणाले, 'तुरुंगाच्या बाहेर तुम्हाला काय करायचे ते करा, इथे बेड्या घालू नका.' मी सुस्कारा सोडला.

तुरुंगाच्या दारातून बाहेर पडल्यावर पोलिसांनी मला बेड्या घातल्या नाहीत. मी त्यांना कारण विचारले. ते म्हणाले, 'आम्ही जर बेड्या घालण्याचा फार्स केला नाही तर हेच जेलचे अधिकारी आमच्या विरुद्ध तक्रार करतील. आता आम्ही आमचे मालक आहोत.'

येरवड्याच्या तुरुंगातून बाहेर पडताना माझ्या अंगावर जेलचाच पोषाख होता. पायाने पुणे स्टेशन गाठावयाचे होते. डोक्यावर सामानसुमान घेतले व मधल्या वाटेने मार्ग आक्रमू लागलो. पुण्याच्या स्टेशनवर पोहोचलो; तेव्हा ओळखीचे कोणी भेटतात का म्हणून इकडे तिकडे पाहू लागलो. त्या वेळच्या जी. आय्. पी. च्या प्लॅटफॉर्मवर बऱ्याच बिल्ले लावलेल्या स्वयंसेवकांची गर्दी दिसली. पुण्यात सायन्स कॉन्फरन्स होती व अध्यक्षांच्या स्वागताकरिता लोक जमले होते. पण माझ्या कोणीच ओळखीचा दिसेना. माझा कैद्याचा पोषाख पाहून कोणी विचारपूस करतील हीही शक्यता नव्हती. लोक आम्हाला टाळत व सरकारला भीत.

पोलिसांसमवेत दुपारी १२ वाजता निघणाऱ्या गाडीत आम्ही तिसऱ्या वर्गात चढलो. डब्यात कै. प्रो. एम्. टी. पटवर्धन म्हणजेच माधव ज्यूलियन दिसले. मी फर्ग्युसन कॉलेजात असताना ते पर्शियनचे प्रोफेसर होते. प्रत्यक्ष ओळख नव्हती. मनात चुळबूळ चालली होती. त्यांच्याशी बोलावे, पण ते बोलण्याची चिन्हे दिसेनात. शेवटी तासाभराने मीच त्यांना हाक मारली व पोलिसांना भिण्याचे कारण नाही, ते आपलेच आहेत असे म्हणालो. ते सांगलीला विलिंग्डन कॉलेजला चालले होते. त्यांचा धीर चेपला व ते मजजवळ येऊन बसले. त्या वेळी आजच्यासारखी गाड्यांत गर्दी नव्हती. डबा जवळ जवळ रिकामाच होता. प्रो. पटवर्धन हे बडोद्याला शिक्षक होते व तेथे माझे एक नातेवाईक होते. त्या गोष्टी निघाल्या, फर्ग्युसन कॉलेजच्या आठवणी निघाल्या. आम्ही गप्पा मारीत होतो. माझे जेवण झाले नव्हते. जेलचा खानाही मी बरोबर घेतला नव्हता. जवळ पैसे कोठले असणार? प्रो. पटवर्धनांनी फळे व फराळाचे आणून दिले. मला त्याबद्दल धन्यता वाटली.

मला पकडायला आलेले पोलीस हे लवकरच मित्र बनले. त्यांनी आपल्यातील भाकरीभाजी मला दिली. कऱ्हाडला पोहोचलो तेव्हा संध्याकाळ

होत आली होती. स्टेशनपासून गाव तीन मैल आहे. पोलीस म्हणाले, 'आम्हाला तुमच्या मोटारभाड्याचे पैसे दिले नाहीत, तेव्हा पायाने गेले पाहिजे.' मला ती धिंडका कशीशीच वाटली. काँग्रेसची पुण्याई खर्ची घालण्याचे मी ठरविले. पोलिसांना सांगितले की, मोटारवाल्यांना 'देवगिरीकरांना' खटल्याकरिता पकडून आणले आहे सांगा व त्यांना गावापर्यंत पोहोचवण्यास सांगा. कऱ्हाडला कोणाची मोटार सर्व्हिस होती कोणास ठाऊक? पण त्यांनी माझे नाव ऐकताच मोफत नेण्याचे कबूल केले. त्यावेळी एस्. टी. असती तर ते शक्य झाले नसते.

स्टँडवर पोहोचलो व तेथून मामलेदार कचेरीतील कच्च्या कैद्यांच्या कोठडीत मला नेले, पण त्या कोठड्यांवरील पोलीस अधिकारी वॉरंटाशिवाय मला आत घेईना. पुण्याच्या पोलिसांना काय करावे हे सुचेना. मीच त्यांना म्हटले, 'चला आपण मामलेदारांच्या घरी जाऊ व वॉरंट घेऊन येऊ.' पोलीस तयार झाले. इतक्यात मला पकडून आणल्याची बातमी गावात पसरली. मामलेदारसाहेब पंतांच्या गोटात राहात असत. अंतर सुमारे एक मैलाचे असावे. आमची मिरवणूकच निघाली. पाच-पन्नास मुले मागे पुढे अशा थाटात आम्ही मामलेदारांच्या बिऱ्हाडी पोहोचलो. वाटेत पांडुअण्णा शिराळकरांचे घर लागले. त्यांना सारी हकीकत सांगितली. मला जेवण, अंथरूण पांघरूण व गडवा वगैरे लॉकअपमध्ये पाठवा असे त्यांना सांगितले.

मामलेदारसाहेबांच्या घरी गेलो तेव्हा साहेबांची स्वारी क्लबात गेल्याचे समजले. पुनः त्यांच्या दारात लोकांच्या घोळक्यात त्यांची वाट पाहात बसलो. काही वेळाने 'साहेब' आले. ते हुद्द्याने साहेब असतील; पण तो गृहस्थ अत्यंत जुनाट होता. एक पंचा नेसलेला उघडाबंब तो साहेब कसला, भटजीच होता. मला पाहताच तो म्हणाला, 'अरे राम्या पाहुणे आले आहेत. त्यांना चहापाणी काही दिलेस का नाहीस?' राम्या नव्हताच तो येणार कोठून? राम्याला दोन शिव्या हासडून ते म्हणाले, 'मी या पोलिसांना तुमच्यावर खटला भरू नका असे सांगत होता. पण माझे ऐकतो कोण? आता तुम्हाला तळेगांवकराइतकीच शिक्षा मी देईन.' तेव्हा मला शिक्षा काय होणार हे समजले. पण मी साहेबांना म्हणालो, 'तुमच्या कोठड्या फार गलिच्छ दिसतात. मला कोठे तरी दुसरीकडे ठेवा.' 'छे हो, आमच्या कोठड्या फार चांगल्या आहेत. एखादा दुसरा ढेकूण आणि चार दोन डांस असतील नसतील.' मी त्यांना शिराळकरांकडून अंथरूण पांघरूण, जेवण वगैरे आणण्याबद्दल विचारले. त्यांनी होकार दिला. पोलिसांनाही ह्यांनी सांगितले यांना शिराळकरांकडे जाऊ द्या. कोठडीत ठेवण्याचे हुकूमही साहेब महाशयानी दिले.

शिराळकरांच्या घरी पोहोचलो, तेव्हा अंधार झाला होता. बाहेर शे-पन्नास माणसे जमली होती. त्यांच्या घरी थोडा वेळ थांबून आम्ही मामलेदार

कचेरीच्या तुरुंगात पोहोचलो. पोलिसांनी खोली उघडून दिली. त्या खोलीचे वर्णन शब्दांनी करणे अशक्य आहे. खोलीत घाण साठली होती, जमिनीवरील पोपडे पृथ्वी सपाट नसून ती उंचवटयाची आहे याची जाणीव करून देत होते आणि कोपऱ्यांतून लघ्वी व शौचाची घाण येत होती. त्या खोलीत जाण्याचे मी नाकारले. पहाऱ्यावरील पोलिसांना सांगितले, खोली साफ झाल्याशिवाय मी आत जाणार नाही. पोलीस दमदाटी करू लागले. पण मी बधलो नाही. शेवटी त्यांच्यातीलच एकाने खोली साफ केली; पाणी टाकले आणि मी त्या नरकतुल्य खोलीत प्रविष्ट झालो. काही वेळाने शिराळकराकडील जेवण व अंथरूण-पांघरूण आले. जेवण झाले, सतरंजी टाकली. तीवर पांढरी चादर आंथरली आणि हाताची उशी करून झोपेची आराधना करू लागलो. खोलीत दिवा नव्हताच.

इतक्यात ढेकणांनी माझ्यावर हल्ला केला. ढेकणांच्या सहवासात आम्ही दिवस काढले नव्हते असे नाही; पण कऱ्हाडच्या लॉकअपमधील ढेकणांचा हल्ला मी अजून विसरलो नाही. इंजेक्शनच्या नळीत डॉक्टर जशी लस खेचून घेतात, तसे ते ढेकून शीर्षासन करून माझ्यातील रक्त शोषून घेऊ लागले. मला अंथरुणावर पडणे अशक्य झाले. मी गजाजवळ येऊन उभा राहिलो. पण तेथेही ढेकूण मला सोडीनात. पायावर, अगावर, डोक्यावर चढून ते आपली रक्तपिपासा शमवीत होते. मी एकेक पाय झाडी व कधी कधी तपश्चर्या करावी, त्याप्रमाणे एका पायावर उभा राही. घंटेचे ठोके पडत होते व तासांमागून तास जात होते. मला वेड लागण्याची पाळी आली. सारी रात्र मी उभा राहून काढली. आज सुद्धा कऱ्हाडची आठवण झाली म्हणजे त्या ढेकणांची आठवण होते.

खटला केव्हा सुरू होतो व मी परत येरवड्यास केव्हा जातो याची मला आतुरता लागली होती. पण कऱ्हाडची मामलेदार कचेरी संध्याकाळी चार वाजता सुरू होते व रात्री आठपर्यंत चालते असे समजले. मला हा प्रकार कळेनाच. पण साहेबांना सकाळी फिरती तै म्हणून दुपारी काम सुरू होते असे मला सांगण्यात आले.

माझा खटला सुरू झाला. श्री. गणपराव अळतेकर मला मदत करण्यास येऊन बसले. कऱ्हाडची इतर काही मंडळी मधून मधून येऊन मला भेटून गेली. साळवी नावाच्या फौजदारांनी सरकारतर्फे खटला भरला होता. त्यांनी दोन साक्षीदार पुढे आणले. पण ते दोघेही साक्षीदार मी कायदा मोडण्यास प्रोत्साहन दिल्याचे सांगेनात. खात्यात नुकताच आलेला एक तरुण म्हणाला, मी भाषणात आयर्लंडचा इतिहास सांगून लोकांना रक्तपात करण्यास चिथावणी दिली. मी त्याला त्याने घेतलेला माझ्या भाषणाचा रिपोर्ट वाचण्यास सांगितले. त्यात तर उलट मी रक्तपात आपण करता कामा नये असे म्हटल्याचे त्याने लिहून घेतले

होते. त्यावर तो गोंधळला. त्याची साक्ष फुकट गेली. दुसराही साक्षीदार साळवींना उपयोगी पडणारा ठरला नाही. त्यावर श्री. अळतेकर म्हणाले, 'हा सारा खटला खोटा आहे व श्री. देवगिरीकरांना सोडून दिले पाहिजे.' श्री. साळवी त्यावर त्यांना म्हणाले, 'तुम्ही वकीलपत्र घेतले नसल्यामुळे तुम्हाला बचाव करता येणार नाही.' आणि आम्ही सत्याग्रही बचाव करण्याच्या विरुद्ध होतो. श्री. अळतेकरांचा नाइलाज झाला. साळवी महाशय म्हणाले, 'मी उदया दुसरे साक्षीदार आणतो.' पण दुसऱ्या दिवशीही त्यांना साक्षीदार मिळाले नाहीत. ते स्वतःच साक्षीदार झाले व म्हणाले, 'ज्या अर्थी देवगिरीकर हे कऱ्हाडला आले, त्या अर्थी त्यांनी भाषण केले व ज्या अर्थी ते सत्याग्रही आहेत त्या अर्थी त्यांचा उद्देश कायदेभंगाला प्रोत्साहन देण्याचाच होता.' यावर मी काहीच बचाव केला नाही व काय शिक्षा दयायची असेल ती दया व मोकळे व्हा, असे म्हणालो. पण सर्वांची खात्री झाली की मला अन्यायाने शिक्षा दिली जात आहे. खुद्द मामलेदारही शिक्षा दिल्यावर तसे म्हणाले. पण पोलीस महाशयांना आपली बहादुरी दाखवावयाची होती व मला शिक्षा देववावयाची होती. माझी खात्री होती की, त्या निकालावर अपील केले असते तर मी निर्दोष सुटलो असतो. पण अपील करावयाचे नाही असा आम्हाला आदेश.

श्री. साळवी यांचे माझ्यावरील रोषाचे कारण मात्र कळले नाही. मी पहिल्या दिवशी मामलेदार साहेबांना ढेकूण पुराण सांगितले. माझी प्रकृती जागरणाने ठीक नाही असेही सांगितले. श्री. तळेगावकरांना साळवींनी वकिलांच्या खोलीत राहू दिले होते; पण मला ते ती परवानगी देईनात. मामलेदार म्हणाले, 'यांना इस्पितळात घेऊन जा.' मला इस्पितळात नेले; पण तेथे साळवींनी डॉक्टरांना आगाऊच हुकूम दिला होता की, इस्पितळात जागा नाही असे कळवा. मी इस्पितळातून परत आलो. मला रात्र दिसू लागली. पोलिसांना न भिणाऱ्या मला ढेकणांनी मात्र घाबरवले. याच खोलीत मला पुनः जावे लागणार होते. इतक्यात कोठडी नं. १ मध्ये खुनाच्या खटल्याचे सहा आरोपी होते. त्यांना माझी दया आली. ते म्हणाले, 'तुम्ही आमच्यात या. येथे ढेकूण आहेत; पण आपल्या सात जणांत ते वाटले जातील. तुम्हाला झोप येईल.' मामलेदारांना विनंती केली व त्यांनी मला त्या दुर्दैवी आरोपीत निजावयास परवानगी दिली. गजाजवळ डोके टेकून मी निजलो आणि मला काही तास झोप आली.

दुसरे दिवशी सकाळी उठलो व प्रातर्विधीबद्दल चौकशी करू लागलो. पोलीस म्हणाले, 'आम्ही या साऱ्या कैदयांच्या दंडांना दोर बांधतो व त्यांना एकदमच शौचाला घेऊन रानात जात असतो. तुम्हांलाही आम्ही तसेच नेणार

आहो.' काय ती मानवतेची विटंबना! मी त्या गोष्टीला साफ नकार दिला. पोलिसांना सांगितले तुमच्या अधिकाऱ्यांना घेऊन या. अधिकाऱ्यांनी मोठ्या औदार्याने मामलेदार कचेरीतील संडासात जाण्याची परवानगी दिली.

आज स्वातंत्र्याचा काळ आहे. पण आजच्याही काळात आरोपीना गुरासारखे दावणीला बांधून शौचाला नेतात की काय हे मला सांगता येणार नाही. तुरुंगांची सुधारणा आमच्या सरकारने केली; पण लहानसहान लॉक-अप्समध्ये व कच्च्या कैदखान्यात काही सुधारणा झाली असेल असे वाटत नाही. कोण त्यांची गाऱ्हाणी मांडणार? हा प्रश्न केवळ महाराष्ट्राचा नाही, साऱ्या हिंदुस्थानचा आहे.

त्यानंतर आंघोळीचा प्रश्न. तेथील कैद्यांनी सांगितले आम्हाला आठवड्यांतून एकदा आंघोळीकरिता नेतात. पाण्याची टंचाई हे कारण असतेच; पण मानवतेबद्दल अनास्था हेही कारण असतेच. जेवणाबद्दल तशाच तक्रारी होत्या.

मला शिक्षा झाली, तेव्हा पाच वाजले असतील. तो दिवस बुधवारचा होता. मला येरवड्यास जाण्याची निकड वाटत होती. पण साळवी महाशयांची इच्छा माझा आणखी छळ व्हावा अशी होती. ते मामलेदारांना म्हणाले, 'आपली पार्टी दर बुधवारी जाते व पार्टी गेली आहे. आता पुढील बुधवारी यांना पाठवू.' मी हे ऐकताच चरकलोच. पण श्री. पांडुअण्णा शिराळकर पुढे येऊन म्हणाले, 'देवगिरीकर व पोलीस पार्टीच्या प्रवासाचा सारा खर्च मी देतो. त्यांना आता पाठवून द्या.' त्याचा परिणाम झाला आणि श्री. शिराळकरांना खर्च न पडता माझी स्टेशनवर रवानगी झाली. माझ्या खुनी व दरवडेखोर बांधवांचा निरोप घेतला व त्या लॉकअपमधून बाहेर पडलो. बुधवारी पार्टी गेल्याची निव्वळ थापच होती.

काही काही दिवस अत्यंत दुर्भाग्याचे असतात. तसा तो दिवस कऱ्हाडहून कोरेगांपर्यंतच संध्याकाळची गाडी जात होती. तेथून दुसरी गाडी पहाटे निघे. मी कोरेगांवला पोहोचलो तेव्हा रात्रीचे आठ वाजले असतील. पोलीस म्हणाले येथे एक म्हातारी कैद्यांच्याकरिता जेवण तयार करते, पण ती वेळ आता टळून गेली आहे. तेव्हा तुम्हाला उपाशीच राहिले पाहिजे. इतक्यात कोणी एक रेल्वेचे नोकर आले. ते म्हणाले, येथे एक रेल्वेच्या गार्ड्स्करिता खानावळ आहे. तेथे जाऊन पाहा जेवण मिळते का? आम्हालाही पुष्कळ वेळ होता व मानवतेची परीक्षा पाहण्याचा तो एक सुंदर प्रसंग होता. पोलिसांच्या समवेत मी रेल्वे- रुळाच्या कडेकडेने त्या रेल्वे-खानावळीत पोहोचलो. चौकशी केली. आतूनच एक गलेलठ्ठ गृहस्थ ओरडले, 'जेवण वगैरे सर्व संपले आहे. आला तसे परत जा.' पण

पोलिसांचे व खानावळवाल्यांचे हे संभाषण आतून खानावळवाल्याची बायको ऐकत होती. तिने मी एक सभ्य गृहस्थ आहे असे पाहिले व नवऱ्याला सांगितले, 'नाही म्हणू नका. जेवण शिल्लक आहे. त्यांना मी वाढते.' दुसरा एखादा प्रसंग असता तर मी तसाच निघून गेलो असतो. पण त्या बाईची दयार्द्रता पाहून मी नकार दिला नाही जेवण चांगले होते. त्यांनी पैसेही घेतले नाहीत. मी त्या बाईचे मनातल्या मनात आभार मानले.

स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर एक सतरंजी पसरली व मी लवंडलो पहाटे गाडी आली व मी पुण्यास पोहोचलो. सकाळ झाली होती. पुण्याच्या स्टेशनवर धावाधाव चालली होती. मला समजले की, स्टेशनपलीकडील राजाबहादुर गिरणीला आग लागली आहे. त्या आगीचा धूरही आता दिसत होता. वर्तमानपत्र उघडले, त्यांत श्री. विष्णु रंगनाथ रबडे हे मरण पावल्याची बातमी वाचली. श्री.रबडे हे पुण्यात असहकारितेच्या चळवळीत कॉलेज सोडणारे पहिले तरुण होते. ते टिळक विदयापीठात प्राचार्य होते. मला दु:ख झाले. याशिवाय आणखी एक-दोन दु:खदायक बातम्या कानी आल्या. मी पुन: पदयात्रा करीत येरवडयात दाखल झालो. सर्वांना घडलेली हकीकत सांगितली. पण एक गोष्ट समजली नव्हती. मला सहा सहा महिन्यांच्या दोन शिक्षा झाल्या होत्या. कऱ्हाडची शिक्षा पुण्याची शिक्षा संपल्यावर सुरू होणार की काय हे मला समजले नाही. पण शेवटी जेलच्या अधिकाऱ्यांनी त्याचा निकाल सरकारला लिहून दिला. त्याचा निष्कर्ष इतकाच; मला एकूण आठ महिने तुरुंगात काढावे लागणार.

## पुनः येरवडयात

येरवडयात परतल्यावर आमचा कार्यक्रम व्यवस्थितपणे चालू झाला. श्री. फाटक व श्री. लिमये एक महिन्याने आम्हा पाच जणांचे ते एक सुखी कुटुंबच होते. आम्हाला जेलच्या कैदयांच्या दररोज तीन बंडया शिवण्याची वर्दी होती. दुपारी सूतकताई करीत असू. तेथे असताना कधी कधी अधिकाऱ्यांच्या बरोबर आमचे खटके उडत व कधी कधी आपसातही उडत. त्या वेळेपासूनच श्री. मोरारजी देसाई हे मंत्री महामंत्री वगैरे होणार याची स्पष्ट कल्पना आम्हाला आली होती. ते म्हणत मी मंत्री झाल्यावर तुरुंगात सुधारणा करीन व तशा सुधारणा त्यांनी केल्याही. त्यांना अधिकाराची जशी आवड होती, तशी सेवेचीही. तुरुंगात चोवीस तास एकत्र असल्यानंतर एकमेक एकमेकांना घरच्या गोष्टीही सांगत.

एके दिवशी लिमये व फाटक सुटले व आम्ही तिघे जण शिल्लक राहिलो. नंतर तळेगावकरही सुटले. मी आणि मोरारजीच शिल्लक राहिलो. त्या वेळचा

श्री. मोरारजींचा एक स्वभावाचा नमुना सांगण्यासारखा आहे. आम्हाला तीन बंडया शिवाव्या लागत. माझे काम ७५ मिनिटांत संपे; पण मोरारजींना ९० मिनिटे लागत. ते आपल्याकडून मला हरवण्याचा दररोज प्रयत्न करीत; पण मी त्यांना एकदाच सांगून टाकले की, मी तुम्हाला माझ्यापुढे कधीही जाऊ देणार नाही. त्याचे त्यांना वैषम्य वाटले.

एके दिवशी रागाच्या भरात ते म्हणाले, 'तुम्ही टाके कमी घालता म्हणून तुमचे काम लवकर संपते.' मी म्हणालो, 'छे, हे काही तरीच तुम्ही म्हणता.' त्यावर ते म्हणाले, 'तुम्ही खोटे बोलता.' मला ते सहन झाले नाही व त्यांच्या हाती बंडया देऊन म्हटले, 'तुम्हीच माझे व तुमचे टाके मोजा.' त्यांनी टाके मोजले व त्यात माझे टाके जास्तच भरले. माझ्यावर त्यांनी खोटे बोलण्याचा आरोप लादल्यामुळे मी त्यांच्याशी बोलेनासा झालो. आम्ही तेथे दोघेच होतो व परस्परांशी बोलत नव्हतो. किती विचित्र परिस्थिती होती ती. जीवन असह्य होऊ लागले. त्याची जाणीव श्री. मोरारजींना झाली व दोन दिवसांनी त्यांनी माझी माफी मागितली. मला माफी नको होती. पण त्यांच्याकडून अपमानही करून घ्यावयास नको होता. असे एकदोन खटके तरी त्यांचे व माझे उडाले. पण श्री. मोरारजी भाईंचे अंत:करण मोठे होते. ते म्हणत मी रात्रीच्या प्रार्थनेनंतर दिवसात झालेल्या गोष्टींचा विचार करतो व चूक झाली तर क्षमा मागतो. पण असले लहान सहान प्रसंग सोडले तर आमच्या मनात काही शिल्लक उरत नसे.

आम्ही दोघेच जण अशा स्थितीत असता, बाहेर सुटकेच्या बातम्या फैलावू लागल्या. एके दिवशी दुपारी पावसाच्या सरींवर सरी कोसळत होत्या. त्याच वेळी लालखान आला व मोरारजींना म्हणाला, 'आवरा तुमचे व चला ऑफिसात.' श्री. मोरारजींनी सामान आवरले. ते म्हणाले, 'मलादुसऱ्या कोणत्या तरी जेलात नेणार असतील.' मी म्हणालो, 'आता कसला जेल? आता तुम्ही सुटलात.' श्री. मोरारजींना पुण्याची माहिती नव्हती. मी त्यांना श्री. गणेशशास्त्री जोशी यांच्या घरी जा, तेथे जेवा व रात्रीच्या गाडीने अहमदाबादला जा म्हणून सांगितले. त्यांनी ते मान्य केले. श्री. मोरारजी सुटल्यानंतर त्या वार्डात मी एकटाच राहिलो शेजारी फाशी-गेट होते. त्या वार्डात व आमच्या वार्डात फक्त एक भिंत आड होती. फाशी जाणारे कैदी आदल्या दिवशी भिंतीवर चढत, फुले वगैरे मागत, देवाची पूजा करीत व रामनामाचा मोठमोठ्याने जप करीत. शेवटच्या दिवसात ते देवभक्त बनत.

एकदा असेच झाले. एक फाशीवाला संध्याकाळी जेल-शिपायांच्या परवानगीने भिंतीवर आला. आम्ही त्याला फुले वगैरे दिली. सूर्योदयापूर्वी तो

'बाबांनो, येतो, रामराम' करीत फाशीकरिता नेला गेला. ज्या दिवशी फाशी असेल त्या दिवशी फाशी दिल्याशिवाय जेल उघडत नाहीत. आम्ही फाशीच्या जागेपासून अगदी जवळ होतो. आम्ही खटला ऐकला. मला त्या दिवशी इतके दु:ख झाले की, मी जेवणही घेतले नाही. श्री. मोरारजी म्हणाले, 'असे करून कसे चालेल?' त्यानंतर फाशी ही आमच्या नित्याची गोष्ट झाली.

मला पुण्याच्या पोलिसांची चांगली माहिती होती. त्यांची माझ्यासंबंधी काय कल्पना होती हे मला ठाऊक होते. पण श्री. काकासाहेब गाडगीळ मला एक-दोनदा भेटून गेले व तुमच्या सुटकेचा हुकूम सुटला आहे असे सांगून गेले. मला ते खरे वाटत नव्हते. मी एक दोन दिवस त्या आठ खोल्यात एकटाच होतो. १९३२ पासून सत्याग्रहींनी गजबजलेला तुरुंग ओस पडला होता. 'क' वर्गातही कोणी नव्हते; मग 'ब' वर्गात कोण असणार? येरवड्याच्या साऱ्या तुरुंगात मी एकटाच राजबंदी उरलो होतो. तेव्हा माझी रवानगी युरोपियन वॉर्डात करण्यात आली. महात्माजींना त्याच वॉर्डात ठेवले होते. माझ्या शिक्षेचे दोन महिने जावयाचे होते.

युरोपियन वॉर्ड अत्यंत व्यवस्थित होता. निजण्याकरिता ओटे, जेवण वगैरे चांगले असे. पण तेथली शिस्त फार कडक असे. युरोपमधील भिन्न भिन्न भाषा बोलणारे गोरे कैदी तेथे असत. त्यांच्या साहसाच्या गोष्टीही मोठ्या मनोरंजक असत. जेलचे कायदे मोडणे, लाचलुचपत करणे वगैरेंत ते कोणाला हार जाणारे नव्हते. तेथे गेल्यावर माझ्या मागे एक नवाच उपद्रव लागला. त्या कैद्यांना दिवसांतून चारदा परेड करावी लागे. अर्धा अर्धा तास राइट लेफ्ट करीत त्यांना घुमवत आणि मलाही परेड करण्याचा हुकूम झाला. मी राजबंदी म्हणून तक्रार केली; पण माझे ऐकतो कोण? आठ दिवसांनी जेव्हा तपासणी होते, त्या वेळी अर्ज करायचा असतो. मला परेडमधून माफी मिळाली; पण दहा दिवसांनंतर. मी त्या फाजील शिस्तीला अगदी कंटाळलो. दोन वर्षांची शिक्षा परवडली, पण दोन महिन्यांची ही शिक्षा नको असे झाले. आमच्यावर परब नावाचे वॉर्डर होते. ते जितके कडक दिसत, तितकेच ते स्वास्थ्यप्रिय होते. तुरुंगात दारूच्या बाटल्याही येत. हजारो रुपये पुरलेले सापडत. तेथे काय मिळत नव्हते हाच प्रश्न होता.

एके दिवशी एक बोहरी कैदी माझ्याविरुद्ध तक्रार करू लागले. त्यांनी आपल्या बुटाच्या दुकानाचा विमा उतरवला व दुकानाला आग लावून विम्याचे पैसे मागितले होते. त्यांना या फसवणुकीबद्दल तीन वर्षे शिक्षा झाली होती. त्यांची इच्छा मी त्याच्या बंड्या शिवून द्याव्यात अशी होती. अर्थातच मी नकार

देत असे. ते त्या गृहस्थाला असह्य झाले व त्यांनी माझ्या खोलीत कांदा आहे अशी तक्रार केली. मीही घाबरलो सदर गृहस्थ माझ्या खोलीत कांदा आणून नंतर तक्रार करावयास कमी करणार नाहीत ह्याची मला कल्पना होती. अर्थातच माझ्या खोलीची झडती झाली नाही; पण सदर गृहस्थांना ८ दिवस कोठडी-बंदीची शिक्षा झाली.

त्या युरोपियन वॉर्डात इतके भयंकर बदमाष कैदी होते की, कोणाला कोणत्या वेळी गोत्यात आणतील याचा नेमच नव्हता. तेथून मला बदला म्हणून केलेले माझे प्रयत्न सफल झाले नाहीत.

एकदा आषाढी एकादशी आली. त्या आवारात रताळी लावली होती. सखाराम नावाचा एक वॉर्डर मजकडे आला. तो महात्मा गांधींचा वॉर्डर होता. माणूस सज्जन होता. तो म्हणाला, 'तुम्ही एकादशी करा, मी तुम्हाला चांगली रताळी आणून देतो.' मी त्याला सांगितले, "चोरीची रताळी खाऊन मला एकादशीचे पुण्य मिळवावयाचे नाही." पण त्या लोकांना अशा गोष्टी करण्यात काही चूक आहे असे वाटतच नसे.

व्हॉलन्स्की नांवाचा एक श्वेत रशियन तेथे होता. श्वेत रशिया हा रशियन क्रांतिविरोधी होता. मि. व्हॉलन्स्की हा त्या क्रांतीनंतर हिंदुस्थानात आला. बंगलोरला त्याने एका पार्शी गृहस्थाबरोबर कपडे रंगवण्याच्या धंद्याचा करार केला. पण तो करार त्याने मोडल्यामुळे त्याला शिक्षा झाली. मि. व्हॉलन्स्की अत्यंत सज्जन गृहस्थ होता. त्याचे व माझे बरेच सख्य जमले. त्याचे सुटकेचे दिवस जवळ आले डोते. त्याने पुण्यातील एका गृहस्थाबरोबर नोकरीस राहण्याचे कबूल केले. मी सुटल्यावर व्हॉलन्स्कीने एरंडवण्याच्या चर्चजवळ एक कारखाना सुरू केला. तो अत्यंत हुशार होता.

काही दिवस त्याचे काम चांगले चालले होते. पुढे मालकाशी त्याचे बिनसले. मी वासुकाकांना सांगून चित्रशाळेच्या पी. वाय्. सी. जवळील जागेत त्याला काम करण्यास संधी दिली. त्याला दोनशे रुपये महिन्याला चित्रशाळा देत असे. पण त्याच्या महत्त्वाकांक्षेला चित्रशाळा काय पुरी पडणार? मी व्हॉलन्स्कीला स्वतःचेही दोनशे रुपये दिले. तो पुण्याहून मुंबईस गेला आणि तेथे म्युझियममध्ये नॅचरल हिस्ट्री सेक्शनवर त्याची नेमणूक झाली. त्याने सजवलेला तो विभाग आजही विदयमान आहे. पुढे मि. व्हॉलन्स्कीचे काय झाले हे मला समजले नाही.

युरोपियन वॉर्डात गांधींच्या चार खोल्या मी नेहमी पाहात असे. त्या खोल्यांत किती तरी इतिहास घडला होता. माझी सारी शिक्षा भोगून झाली

होती. सरकारच्या बदललेल्या धोरणाचा मला लाभ झाला नव्हता. बाहेर मध्यवर्ती कायेमंडळाच्या निवडणुकांची तयारी चालली होती. गोकुळ अष्टमीचा तो दिवस होता. त्या दिवशी मी येरवडा तुरुंगातील अखेरचा राजबंदी सुटलो.



# माधवराव खंडेराव बागल

जन्म २८ मे, १८९६.

कोल्हापूर संस्थानात ब्रिटिश अमदानीत जनमत जागृत करण्याचे आणि प्रजापरिषदेची स्थापना करण्याचे कार्य माधवराव बागल यांनी केले. भाषण स्वातंत्र्याच्या मागणीपासून तो जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीसाठी अखंड लढा दिला आणि त्यासाठी अनेक वेळा कारावास भोगला. १९३२ साली त्यांनी कोल्हापुरात काँग्रेस कमिटीची स्थापना केली. आणि 'हंटर' या साप्ताहिकाचे संपादन केले. १९३८ साली त्यांनी कोल्हापुरातच शेतकऱ्यांचा पहिला मोर्चा आयोजित केला. १९४२ साली पेरी मंत्रिमंडळाच्या काळात त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. १९४२ साली प्रजापरिषद सिव्हिक बोर्डाचे अध्यक्ष. १९४४ साली त्यांना परत स्थानबद्ध करण्यात आले आणि भाववाढ चळवळ सुरू केल्याबद्दल कारावास.

दक्षिण महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व संस्थानांत प्रजा-परिषदेची चळवळ त्यांनी संघटित केली आणि त्याचे नेतृत्व केले. कोल्हापुरात कामगार चळवळीचा श्रीगणेशा त्यांनीच केला आणि

सर्व कामगार संघटनांचे एकीकरण करून १९४१ साली कोल्हापूर संयुक्त राष्ट्रीय कामगार संघाची त्यांनी स्थापना केली.

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात [illegible] अग्रभागी होते. १९५२ साली त्यांनी जगदंबेच्या मंदिरात हरिजनांसमवेत प्रवेश केला.

माधवराव हे उत्तम चित्रकार आणि शिल्पकार असून त्यांनी त्याचे जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षण घेऊन डिप्लोमा मिळवला आहे. १९३५ साली महाराष्ट्र चित्रकार संमेलनाचे ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले.

माधवराव हे उत्तम लेखक असून कला, समाजवाद या विषयावरच्या ग्रंथाबरोबर त्यांनी कथा कादंबरी या क्षेत्रातही आपले नैपुण्य प्रकट केले आहे. पुढील उतारा त्यांच्या आत्मवृत्तातून घेतला आहे.

## राजकीय झगड्यास सुरवात

मा. खं. बागल

ती नोटीस राजद्रोहाच्या आरोपाची होती. १८-८-३८ या दिवशी रविवार वेशीसमोरील पटांगणात केलेल्या भाषणाबद्दलची. दे. भ. शंकरराव देव यांचे व्याख्यान होते. अध्यक्ष मी होतो. समारोपाचेवेळी बोलताना रागाच्या आवेशात थोडे जहाल शब्द गेले.

'आम्ही तक्रारी करतो ते काही महाराजांचा सूड घ्यावा म्हणून नव्हे. पण त्यांना बदसल्ला देणारे, नीच हरामखोर सल्लागार आमचे रडगाणे, त्यांना ऐकू जाऊ देत नाहीत. कोल्हापुरात कायदेभंग न होता स्वराज्याचे हक्क मिळावे व छत्रपतींची कीर्ती वाढावी अशी आमची अंतःकरणापासूनची इच्छा आहे. त्यांच्या लौकिकासाठी मला खडी फोडावयास लागली तरी माझी तयार आहे.'

माझा रोख अधिकृत सल्लागार अधिकाऱ्यांवर नव्हता, पण तो अपशब्द त्यांनी आपल्या अंगावर ओढून घेतला. याचमुळे बत्तीस तासात माफी मागा नाहीतर राजद्रोहाच्या आरोपावर केस घातली जाईल अशा अर्थाची नोटीस होती.

विचाराचे काहूर उठले त्या नोटीशीने. मोठा पेचप्रसंग उद्‌भवला माझ्या सार्वजनिक आयुष्यांत. माफी का खटला? मनाची भयंकर ओढाताण चालली. लौकिकासाठी सद्सद्विवेक बुद्धीला मारू की लोकनिंदेची पर्वा न करता सद्सद्विवेकबुद्धी दाखवील तो मार्ग स्वीकारू? मनाची धरसोड होऊ लागली. माफी मागितली तर लोक काय म्हणतील! कुत्सित टीकाकार माझ्याकडे बोट दाखवून हसू लागतील. भ्याड भ्याड म्हणून सहकारी टाकून देतील. आधीच असे आरोप मजवर काही करीत होते. त्यांना आयतेच फावणार. व्यासपीठावरून व्याख्यान देताना लोक मला हिणवणार! लोकांचा विश्वास जाणार.

भीरु! भीरु! भीरु! कानात हाच शब्द सारखा घुमू लागला. लोकांची ती भेदक दृष्टी मला बसल्या जागी भेडसावू लागली. पण काय असेल ते असो या बाहेरच्या सर्व उपाधींना फेकून देणारी जोरदार अंतःप्रेरणा मला बजावीत होती.

हीच तुझ्या कसोटीची वेळ आहे. सत्याचा मार्ग तू सोडू नकोस. नाहीतरी लोकमत कधी स्थिर राहिले आहे! महात्मा गांधींनी आपली चूक कबूल करण्याचे धैर्य नाही का अनेकवेळा दाखवले. लोकनिंदेची पर्वा त्यांनी कुठे केली. आज निंदा करणारे काही कालाने स्तुती करतील. खरे कारण त्यांना समजले व ते समजून घेण्याजोग्या मन:स्थितीत आले म्हणजे 'केले तेच बरे केले' असे म्हणतील.

चूक माझी होती! माफी मागणे योग्य होते! मी माझ्या सद्सद्विवेक-बुद्धीच्या उलट काही वागत नाही ही माझी पूर्ण खात्री होती. माझ्या मनाला ती काही बोचणी नव्हती. नव्हे तेच मला समाधान होते.

१८ ऑगस्ट १९३८ चा दिवस! माझ्या हाती राजद्रोहाची नोटीस व त्याच दिवशी जादा गॅझेट काढून कायदे मंडळाची घोषणा. माझ्या अटकेने लोकमत क्षुब्ध होऊ नये म्हणून कायदेमंडळाची घोषणा!

मी माफी मागायचे ठरवले ते भीतीमुळे मात्र नव्हे. पण तशी इतरांची खात्री पटवणे मला त्यावेळी शक्य नव्हते. माझ्या मनाची तयारी तुरुंगात जाण्याची होती. तसे मी जाहीरही केले होते. 'मला खडी फोडावयास लागली तर मी फोडीन' हे जाहीरपणे मी बोललोही होतो. पण या प्रसंगासाठी तुरुंगात जाणे मला काही इष्ट वाटेना. निव्वळ त्या अपशब्दाच्या प्रमादासाठी केस घालून घेऊन तुरुंगात जाणे व निर्भयतेचे सर्टिफिकेट मिळवणे मला कोणत्याही दृष्टीने शहाणपणाचे वाटेना. तुरुंगात जायचे पण ते कशासाठी? अशा प्रश्नावर जाण्याने लोकहित ते काय साधणार? भ्यालो नाही एवढाच लौकिक आणि त्यासाठी शिक्षा! खोटचा लोकप्रियतेला भाळलो तर पुढे काहीच चांगले काम व्हायचे नाही. अखेर सद्सद्विवेकबुद्धीनेच जिंकले. मी दिलगिरी प्रदर्शित केली.

लोकांचा गैरसमज पुढे योग्यवेळी माझ्या कृतीने मी धुवून काढीन अशी मला खात्री होती. तसा माझा निश्चय होता. या माझ्या कृत्याबद्दल निपाणीस कटकोळ यांनी जाहीर सभेत अभिनंदन केले. माफीमुळे कज्ज्याखटल्याच्या यातायातीतून निसटून नेहमीच्या दिनचर्येस लागलो.

### पाटील–पिंगळे विवाह

करवीर व्याख्यान मालेतर्फे आमदार आत्माराम पाटील व पिंगळे या मराठा–ब्राह्मण विवाहाचे अभिनंदन करण्यात आले. अभिनंदनाचे भाषण माझे व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे झाले. मालेचा अध्यक्ष मीच होतो. विचार करण्याजोगी गोष्ट! मालेच्या कार्यकारी मंडळातील ब्राह्मण सभासदांना ही गोष्ट आवडली नाही. सरळ अर्थ, राजकीय सुधारणा पाहिजे, सामाजिक सुधारणा नको! पांढरपेशा वर्गातील ही मनोवृत्ती मला अनेकवेळा दिसून आली. वरच्या वर्गाला आवडेल, वरच्या वर्गाचे श्रेष्ठत्व राहील, अशी चळवळ चालली

तरच त्याला प्रोत्साहन दयायचे, अशी वृत्ती अदयाप या वरच्या वर्गात नेहमी डोकावते.

खालच्या बहुसंख्य श्रमजीवी वर्गाची स्थिती सुधारावी, त्यांची गुलामगिरी झडाघी हाच माझ्या सार्वजनिक चळवळीचा पहिल्यापासूनचा हेतू होता. देवाधर्माविरुद्ध बोलणे लोकांना आवडत नाही हे जाणूनही, जगदंबा देवालयातील रामाच्या पारावर याच विषयावर बोलत असे.

हिंदु सभावाल्यांबद्दल मी नेहमीच उलट बोलत होतो. त्यांची चळवळ धार्मिक आवरणाखाली आपले वार्गिक वर्चस्व ठेवण्याची, परंपरेच्या हक्काचे रक्षण करणाऱ्या कुढया मनोवृत्तीचीच होती.

### क्षात्रजगद्गुरु

हे हिंदुसभावाले क्षात्रजगद्गुरुंचा उपयोग स्वार्थासाठी करून घेऊ लागले होते व तो उपयोग ते जाणून बुजून करूनही देत होते. त्यांना खूष करण्याने पांढरपेशांच्या पत्रात त्यांचा गौरव व प्रसिद्धी होत होती. त्यांचे वाचन चांगले आहे. अभ्यासू आहेत, वक्तृत्व व भाषाशैली आकर्षक व खोचदार आहे. पण या गुणांचा उपयोग ज्यासाठी शाहू महाराजांनी त्यांना जवळ केले, आणि संस्थानांतील मोठ्या योग्यतेच्या जागेवर नेऊन बसवले, त्यासाठी त्यांनी आपल्या जागेचा उपयोग प्रामाणिकपणे केला नाही. त्यांना आखून दिलेल्या ध्येयात व त्यांच्या आचरणांत मनस्वी अंतर पडले. राजाराम महाराजांना खूष करण्याकरता कोल्हापुरच्या स्वराज्याच्या चळवळीस त्यांनी विरोध केला. संस्थान विलीन होताच छत्रपतीशी बेपर्वाईने वागून काँग्रेसच्या मागे लागले. पूर्वीचे कपडे टाकून खादी स्वीकारली. धर्मकारण टाकून राजकारणात सोईस्कर मार्गाने शिरले. संन्यस्तवृत्ती टाकून राजविलासी बंगले उठवले. आता ते कौन्सिलात आहेत! पीठाचे उत्पन्न धर्मकार्यासाठी वापरावयाचे असता स्वतः साठीच त्याचा वापर सुरू केला. त्यांच्या या वागणुकीबद्दल ८-७-५० रोजी बिंदु चौकात निषेध करण्यात आला. 'या गादीवर स्थापन झालेल्या गृहस्थाश्रमी पुरुषाच्या कुटुंब संरक्षणार्थ दरसाल रुपये बाराशे नक्तीने या संस्थानातून दिले जातील, बाल ब्रह्मचारी असल्यास त्याचे कुटुंबास दरमहा पन्नास रुपये देण्यात यावे' ही सनदेतील वाक्ये यांनी पूर्ण धाब्यावर बसवली. याचा सभेत उल्लेख करून क्षात्रजगद्गुरुचा निषेध करण्यात आला.

राजाराम महाराजांच्या राजवटीत क्षात्रजगद्गुरुनी भाई लोकांवर निष्कारण टीका केली. ती मला आवडली नाही. त्याला उत्तर म्हणून बेळगांवच्या 'आघाडी' पत्रात मी काही मजकूर पाठवला. संपादक डी. एस्. जाधव

यांनी खास अंक काढून त्यात तो घेतला. या अंकावर महाराष्ट्रातील बहुतेक मराठी पत्रांतून उलट सुलट टीका आली. अदचाप लोकांत निर्भयवृत्ती आली नव्हती. राजेशाहीचा दाब भरपूर होता. क्षात्रजगद्गुरु छत्रपतींनी निर्माण केलेले. दरबारात खडी ताजीम मिळत होती. मग संस्थानात त्यांच्यावर कोण टीका करणार! जवळ जवळ राजद्रोहच. घरी शिव्या, बाहेर स्तुती. ही जनतेतील सर्व साधारण मनोवृत्ती. हे पीठ धार्मिक गुलामगिरी काढून टाकण्याला काही उपयोगी नाही. गुलामगिरी शेंडीवाल्या भटाची जाऊन तेथे पटकेवाल्याची आल्याने खालच्या समाजाचा फारसा काही फायदा होण्याजोगा नव्हता. म्हणून ही सर्वच पीठे नष्ट झाली पाहिजेत. इतर धर्मपीठांचे गुरु जसे सुखासीन झाले तसे हे ही झाले आहेत. तेव्हा माझा रोख तात्विकत:च जगद्गुरुविरुद्ध होता व तसा मी उघड प्रचारही करीत होतो. पण पुढे राजकीय प्रक्षोभक चळवळीमुळे हा प्रश्न मागे पडला.

## हवेरीचे लग्न

यावेळी हवेरी लिंगायत व वधू अस्पृश्य यांच्या विवाहाचा प्रश्न पुढे आला. हा समारंभ मी शक्य तितका मोठा करण्याचे ठरवले. कारण त्यालाही मतप्रचाराचे स्वरुप होते. आमंत्रण पत्रिका माझ्याच नावाने वाटल्या होत्या. काहीची इच्छा त्या मुलीला लिंगायत धर्माची दीक्षा दयावी अशी होती. हवेरीचाही काही निश्चय झाला नव्हता. पण त्यांनी माझ्या म्हणण्याला मान दिला.

अस्पृश्यांना आहे त्या परिस्थितीतच बरोबरचे समजून त्यांचे बरोबर सर्व व्यवहार करणे व वागणे हाच मार्ग बरोबर असे मला वाटले. धर्मांतराची कल्पना मला मान्य नव्हती. कारण त्यातही अमका एक धर्म दुसऱ्या धर्माहून श्रेष्ठ ही भावना आहे. एकाने दुसऱ्यास पावन करून घेणे यात स्वत:च्या श्रेष्ठपणाची भावना आहेच. अस्पृश्यांना शुद्ध करून घेणे, किंवा लिंगायत करून घेणे हा त्यांचा अपमानच होय. रजिस्टर पद्धतीने लग्न करणे सर्वांत उत्तम. हेतू पटवून दिल्यानंतर हवेरीना ही गोष्ट मान्य झाली. तेव्हा रजिस्टर पद्धतीने लग्न करून मगच लोक जागृती करता समारंभ ठरवला.

लग्न समारंभ ब्राह्मण पुरोहिताने केला काय आणि कोणत्याही जातीच्या पुरोहिताने केला काय, हे संस्कार अंधश्रद्धा व निरर्थक संस्कार कायम ठेवतात. जी बडबड खालच्या वर्गाला समजत नाही व अर्थाअर्थी जिचा वधुवरांच्या कल्याणाशी काही संबंध नाही, ती कशाला चालू ठेवायची? रजिस्टर पद्धतीने लग्ने होऊ लागल्यास निरर्थक खर्चास तर फाटा देता येईलच पण त्याच बरोबर

समाजही एका धार्मिक गुलामगिरीतून मुक्त होईल. म्हणून जाहीर कार्यक्रम रामाचे पारावर करण्याचे ठरवले. माळ घातल्यानंतर धार्मिक बडबड करण्याबद्दल कोणी तरी सुचवले. मीच त्याला विरोध केला. या सोंगाची मला जरुरी वाटली नाही. देवदर्शनाला जाण्याचे एकाने सुचवले. त्यालाही मी विरोध केला.

हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून मी चळवळ केली होती. अस्पृश्यांचे हातात हात घालून मीच जगदंबा मंदिर प्रवेश केला होता. पण तो अस्पृशयांचा देवालयात जाताना अपमान होत होता म्हणून. त्यांना देवालयात मज्जाव होता म्हणून. इतर हिंदूंना जो हक्क भोगता येत होता तो अस्पृश्यांना भोगता येत नव्हता म्हणून. आता तो प्रश्न उभा नव्हता. त्याच देवपूजेत अस्पृश्यांनी घुटमळून राहणे म्हणजे धार्मिक गुलामगिरीत गुटफळून राहणेच होय. म्हणून मी देवदर्शनही रहित केले.

### डिग्रजकर इनामदार व अस्पृश्य स्त्री

या दोन लग्नांनंतर कोल्हापूरच्या उच्च मराठ्यांच्यात खळबळ उडवून देणारा माझ्या अध्यक्षतेखाली झालेला विवाह म्हणेजे डिग्रजकर इनामदारांचा एका वन्य जातीतील स्त्रीशी झालेला होय. डिग्रजकर ह्यांचा राजघराण्याशी संबंध असल्यामुळे हा संबंध थोर समजले गेलेल्या मराठ्यांना फार झोंबला. लग्नाला त्यांच्यापैकी कोणीच हजर नव्हते. लग्न होऊ नये म्हणूनही पुष्कळ प्रयत्न झाला. पण गंगावेस मैदानात सत्यशोधक विवाह पद्धतीने हा विधी पार पडला. लग्नाला खर्च असा कहीच आला नाही. परस्परांच्या गळ्यात हार घालण्याकरता आला असेल तोच.

तथापि या निव्वळ धार्मिक आणि सामाजिक चळवळीत गुंतून पडण्यात मला समाधान वाटत नव्हते. मनाची धाव राजकीय चळवळीकडे होती.

### भाषणबंदी व लेखनबंदी

मला राजकारण थोडेबहुत समजू लागल्यापासून 'भाषणबंदी' हा एक दरबारचा आम्हा प्रजाजनावर मोठा अन्याय वाटे. कारण कसलीही चळवळ हाती घेतली, मग ती सामाजिक असो किंवा धार्मिक असो, तरी ही भाषणबंदी आड येतेच. सर्व प्रचारकार्याला, जागृतीला, लोकांच्या गाऱ्हाण्यांना तोंड फोडायला, संघटनेला अडथळा येतो. भाषणबंदी म्हणजे मानवी प्रगतीला, विचार विनिमयाला, संस्कृतीला खीळ! मानवतेची पिछेहाट! एकमेकांच्या अनुभवातून जगाचे पाऊल पुढे पडत असते. अनुभव परस्परांना सांगून, त्यावर चर्चा झाल्याखेरीज, त्यात सुधारणा कशा करता येणार? तेव्हा ही सभाबंदी

काढून टाकण्यासाठी अर्ज, विनंत्या, ठराव व भाषण या द्वारा मी सारख्या खटपट करीत होतो.

लेखन साधनांवर सरकारने यापूर्वीच गदा घातली होती. माझे व माझ्या वडिलांच्या संपादकत्वाखाली चाललेले 'हंटर' पत्र ५००० ची जामिनकी लादून बंद पाडले होते. सनदशीर मागण्या प्रसिद्ध करण्यापलिकडे त्या पत्राने काही केले नव्हते. नंतर डी. एस्. जाधवांना पुढे करून 'आघाडी' काढले. ते बंद केले. नंतर 'धडाडी' नावाचे काढले. तेही बंद केले. ही मुस्कटदाबी सहन करून स्वस्थ बसणे म्हणजे गुलामगिरीत आनंद मानणे व ती मुकाटचाने सहन करणेच होय. यातून आता वाट कशी काढावी या विचारात होतो.

संस्थानात असंतोषाचा जोर वाढतच चालला होता. काँग्रेसही संस्थानी राजकारणाकडे थोडे लक्ष देऊ लागली होती. बाहेरच्या चळवळीचाही संस्थानी जनतेवर परिणाम होत होता. खुद्द कोल्हापूर शहरात सभाबंदीमुळे सुशिक्षित वर्गात असंतोष उत्पन्न झाला होता. तो प्रकट करण्याचे धाडस मात्र त्यांच्यांत नव्हते.

मी सभा स्वातंत्र्य मिळावे म्हणून सनदशीर मार्गाची परकाष्ठा करून पाहिली. अर्ज विनंत्यांची भेंडोळी पाठवली. शेकडो सहचांचे अर्ज पाठवले, ठराव पाठवले, २६ ऑगस्ट १९३८ ला मी, शंकरराव जोशी व मुल्ला असे डेप्युटेशन घेऊन गेलो. संस्थानाबाहेरील पत्रांनी आम्हास खूप पाठिंबा दिला. पण दिवाण सुर्वे यांनी सभाबंदी उठवण्यास अनुकूलता दाखवली नाही. उलट ते म्हणाले की, या हट्टामुळे आश्वासन दिलेले कायदेमंडळ दुरावेल. भाषण स्वातंत्र्य हा तर प्रजेचा मूलभूत हक्क. याला अडथळा आणून घटना ती कसली देणार? मला चीड आली. स्वस्थ बसवेना. उलट निश्चय अधिकच वाढला. हा प्रश्न धसाला लावायचे ठरवले. त्यासाठी जे दिव्य करावे लागेल ते करायचे. सर्वस्व पणाला लावायचा प्रसंग आला तरी लावायचा. पण माघार घ्यावयाची नाही असा निश्चय केला. पण याला खाली खेचणारे दुसरे मन होतेच. यावेळी घरचा प्रश्न उभा राही.

## बायको आणि मूल

माझी तयारी झाली. पण बायको आणि मूल याची वाट काय? झोप उडून गेली. या विचारात कित्येक रात्री मला जागून काढाव्या लागल्या. मन सारखे डळमळू लागले. असे करता करता एके मध्यरात्री निश्चय कायम झाला.

बायको मुलाचा, घरादाराचा, इस्टेस्टीचा प्रश्न नसतो कोणा समोर! या मोहात गुंतून राहिलो तर यातून सुटका कशी होणार! त्रास न होता, झीज न सोसता, ऐषारामाचा त्याग न करता सुखासुखी देशसेवा कशी होईल! कोणत्या

देशसेवकाला कष्टाचा मार्ग चुकवता आला आहे! लोकसेवा आणि राजसेवा करणे कसे शक्य आहे?

, याच वेळी दुसरा विचार उभा राही. माझ्या मुलाला कोण पाहणार? माझ्या खेरीज त्याला कोणाचा आधार नव्हता. भाऊ विभक्त होते. बायको क्षयातून उठलेली! अशक्त आणि दुर्बल! इतर आप्तसंबंधी असून नसून सारखे. फार तर तोंडची सहानुभूती. तीही चोरून दाखवणार. त्याच्या आईने काय करायचे! मुलाला आईच्या ठिकाणी मीच होतो. सर्व काही उसाभर मीच करीत आलो. क्षय पुन: उलटेल ही भीती! अशा स्थितीत मी तुरुंगात गेलो तर मग यांचे काय होणार! यांतून बायकोचा निभाव कसा लागणार?

याच वेळी माझे परमस्नेही कृष्णराव मालपेकर यांचे पत्र आले. 'तुमच्या देशभक्तीसाठी तुम्ही तुमच्या कुटुंबाचा बळी देण्याचा तुम्हाला अधिकार नाही. त्यांच्या पालन पोषणाची पत्करलेली जबाबदारी तुम्हाला टाकता येणार नाही. स्वत:च्या मुलांना दरवेशी बनवून देशकार्य करणे मला पाप वाटते.'

याला मीच मनाशी उत्तर देऊ लागलो 'तुकाराम महाराजांनी देवापायी सर्व संसारावर लाथ मारली. बायकापोरांकडे पाहिले नाही. मग ते पापीच का? जनतेला ईश्वर मानल्यावर त्या देवापायी सर्वसंग परित्याग नको का करायला! म. गांधींनी नाही का ही बंधने बाजूस सारली. जवाहरलालजींनी नाही का सुखावर लाथ मारली. मग मी कोण! सर्व लोकसेवक याच अवस्थेतून गेले असणार! ते चुकले काय?

माझे मूल, माझी बायको, म्हणजेच काय जग आहे! असंख्य बायकापोरे अन्नान्न करीत तडफडत असताना माझ्याच मुलापुरता मी का विचार करावा? ही पण कोतीच बुद्धी नव्हे काय! करवीर राज्यातल्या दरिद्री मुलांना, माझ्या आत्माहुतीपासून जर एखादा घास जास्त मिळेल तर माझ्या बायको मुलांतच गुरफटून बसणे बरोबर होईल काय? व्यापक ध्येयासाठी मी माझ्या स्वार्थाला व मोहाला बाजूस टाकायला नको काय?

मुलाला व बायकोला टाकून जाण्याखेरीज आता दुसरा मार्ग उरला नव्हता. लोकांना सांगू काय की मी तुरुंगात जात आहे. माझ्या मुलाचा संभाळ करा म्हणून? छे छे किती मानहानीची गोष्ट ही! लोकांनी तरी ही जबाबदारी का घ्यावी! कोणी सांगितले आहे मला हा मार्ग पत्कर म्हणून? माझीच इच्छा ना?

## पत्नीचा पाठिंबा

बायको गाढ झोपली होती. मूल शांतपणे निद्रावश झाले होते! काय यांना टाकून जायचे! अंगावर झर्रकन् काटा उभा राहिला. अश्रू प्रवाह आवरेना. तो

थांबविल्यानंतर बायकोवरच हा प्रश्न सोपवावा, आपला निश्चय तिला कळवावा व ती अनुमति देते की काय पाहावे म्हणून मी तिला उठवले. मध्यान्ह उलटून गेली होती. सर्वत्र सामसूम. पण भावनेचे वादळ उठले होते. ती म्हणाली 'असल्या वेळी, असं काय विचारायचं आहे ते?'

'माझ्यासमोर शांत चित्तानं बस. अगदी कसलाही संकोच न धरता काय ते सांग. माझ्या ध्येयाला तू मदत करशील काय? खडतर दिव्यातून जाणे तुला निभेल काय? मला तुरुंग येणार हे निश्चित. मी तो आनंदाने भोगीन. त्याची आता माझ्या जीवनाला आवश्यकता आहे. सांग तू बबनचा सांभाळ करशील? तुझ्या प्रकृतीची काळजी घेऊ शकशील?

माझ्या तळमळीची तिला जाणीव होती. ती थोडा वेळ स्तब्ध बसली आणि शांतपणे वीरपत्नीला शोभेसे माझ्या पत्नीने मला उत्तर दिले. 'जा तुम्ही! आमच्या मोहात गुंतून पडू नका. बाबा आणि मी दोघच आहोत! मी त्याचा संभाळ करीन. आमची काळजी करू नका. तुमच्या मनाची कुचंबणा करून राहण्याने तुम्हाला स्वास्थ लाभणार नाही! तुम्हाला सुख मिळणार नाही. जा तुम्ही.'

इतक्या निश्चयाचे, धीराचे व करारीपणाचे उत्तर तिच्याकडून मिळेल असे मला वाटले नाही. ती गांगरून जाईल असे मला वाटले. मी गहिवरून आलो, कृतज्ञतेने भरून आलो. मानापमानाचा प्रश्न बाजूस सारून तिचे पाय धरावेत असे मला वाटले!

अदचाप तिच्या शब्दांवर विश्वास बसेना. खात्री करून घेण्याकरिता पुन: विचारले 'खरंच ना हे? मग माझी शपथ घे पाहू? तुझ्या कुंकवाची घे!' कुंकवाची शपथ तिने दिली. एवढचाने माझे समाधान झाले नाही. तिच्या-माझ्या दोघांच्याही जीवनाहून आम्हाला प्रिय अशा जिवाची मी कठोर होऊन शपथ मागितली. बाबा शांत झोपला होता. सुखनिद्रेत दंग होता. आमचे काय चालले आहे. याची काय कल्पना त्याला. मी त्याची शपथ मागितली. 'घे बाळ दौलतची शपथ घे' 'अदचाप विश्वास नाही वाटत? बरं त्याची घ्या' अश्रू आवरून तिने शपथ घेतली. डोळ्यात टिपूसही दिसू दिले नाही. तिने बाबाची शपथ घेतली.

झाले! माझी सर्व भीती गेली. आता मी प्रत्यक्ष काळालाही भिणार नाही. मग तुरुंगाची, नव्हे माझ्या जिवाची ती काय कथा! माझ्या वीर पत्नीने माझे ध्येय निश्चित केले. ती जर कचरती तर कोण जाणे माझा निश्चय एखादेवेळी ढळलाही असता. म्हणून माझ्या जनसेवेचे बरेचसे श्रेय तिच्याच पदरी पडेल. पण जगाला त्याची काय ओळख! नाव माझे. ती जगाआडच! स्त्रीच्या त्यागाची, करारीपणाची जगाला काय कल्पना! तिचे सर्व किरकोळ दोष मी विसरलो. ती मला पूज्य वाटू लागली.

## पूर्वतयारी

बायकोने मनाची तयारी दाखविल्यामुळे मला मोठा धीर आला. आता माझा बळी पडला तरी हरकत नाही. असा निश्चय करून, या तयारीचे दुसरे किती मिळतात ते शोधू लागलो. ओळखीच्या मंडळीत १०/२० ही निघाले नाहीत. पांढरपेशे, वकील, व धनिक यापैकी कोणीही पुढे झाले नाहीत. खालसा मुलखात तुरुंगात जाऊन आलेले कार्यकर्ते म्हणाले, 'खालसात वाटल्यास चला. पण येथे आम्हास येता येणार नाही. येथे नुसते तुरुंगात जाऊन भागणार नाही. आमच्या घरादारावर नांगर फिरवला जाईल. आमच्या गणगोतांना व मित्रांना त्रास होईल. तेव्हा माफ करा.' गावातले प्रमुख असे कोणीही मिळाले नाही. हवेरी व महादेव गायकवाड हे केव्हाही तयार होतेच. पण त्यांचा दर्जा केवळ कार्यकर्त्यांचा. शाहुपुरीतील एक दुकानदार रामभाऊ शेटे, विदयार्थी दशेतले रत्नाप्पा कुंभार, शिरोळ पेटयांतील एक मुख्य व प्रसिद्ध मराठे नानासाहेब जगदाळे, जमीनदार दिनकरराव देसाई यांची मात्र मोलाची भर पडली. आणखी दोघा तिघांनी नावे दिली पण पुढे त्यांनी ती मागे घेतली. एकूण आकडा साताबाहेर गेला नाही. एवढयांच्याच जोरावर एका विशिष्ट पद्धतीने जागृती करून लढ्याला तोंड फोडायचे ठरवले.

प्रथम मी पुण्यास जायचे. तेथून सभाबंदीचा हुकूम मागे घेण्याबद्दल महाराजांना वर्तमानपत्रद्वारे विनंती करायची. त्याला थोडी मुदत दयायची. त्या मुदतीत उत्तर आले नाही तर, ठराविक दिवशी, ठराविक वेळी, ठराविक गाडीने सभाबंदी मोडण्यासाठी स्टेशनवर उतरायचे. शिक्षा, दंड, तुरुंग जो प्रसंग येईल तो प्रथम मी अंगावर घ्यायचा. त्यानंतर तो प्रकार एकएकाने दिवस जाहीर करून असाच करावयाचा. यामुळे जनतेत जागृती होऊन कायदेभंगास स्वयंसेवक मिळू शकले असते.

## शिरोळ शेतकऱ्यांचा उठाव

पण हा प्रयोग करून पाहण्याचे कारणच पडले नाही. शिरोळ पेटयांत शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावरच उठाव देता येण्याजोगी परिस्थिती निर्माण होऊ लागली. 'सारा कमी करा' या सनदशीर मागणीचा सरकार विचार करेना. यामुळे शेतकऱ्यांत असंतोष वाढत चालला होता. संस्थानात भाषण बंदी! म्हणून शिरोळ पेटयाच्या शेतकऱ्यांनी मिरजेच्या घाटावर सभा घेण्याचे ठरवले. त्यांनी मला मुद्दाम बोलावले होते. घाटावर लोक जमल्यावर मिरज दरबारने बंदी केली. प्रजा आणि राजा या लढयात संस्थानिक आपली जात टाकून कसे एक होतात त्याचा हा अनुभव आला.

पण या बंदीमुळे लोकांचा उत्साह अधिकच वाढला. खालसा मुलखाची सरहद्द जवळंच २/३ मैलांवर लागत होती. त्या हद्दीतील धामणी गावच्या शेतवडीत जाऊन सभा भरवण्याचे तेथेच ठरवले. आलेले सर्व लोक तसेच चालत निघाले. रानांवनांतून खाच खळग्यांतून वाट काढीत आम्ही निघालो. उन्ह होते पण शेतांतून जोंधळ्याचे पीक उंच वाढले होते. जाताना त्यांच्या सावलीचा गारवा मिळत होता. जवळ कृष्णामाई वहात होती. श्री शिवाजी महाराजांच्या व म. गांधींच्या जयघोषाने तो भाग आम्ही दुमदुमून टाकला. शहरात जेथे दहा कार्यकर्ते मिळायची अडचण तेथे उत्साहाने, निश्चयाने व एक ध्येयाने शेकडो शेतकरी चालले होते. हे पाहून मला तर हर्षवायू होण्याची वेळ आली. एवढे लोक पाठीवर असल्यावर आता भीती कशाची! माझ्या अंगी हजार माणसाचे बळ आले.

श्री. तात्यासाहेब शिखरे यांचे अध्यक्षतेखाली सभेला सुरवात झाली. मी या संधीचा भरपूर फायदा घेतला. लोकांना एकीचे महत्त्व पटवून दिले. सभाबंदीमुळे कशी कुचंबणा होते ते दाखवून दिले. सभाबंदी उठवा व सारा कमी करा या मागण्या एकत्रित करून संघटितपणे सरकारकडे मागणी करण्याचे सभेत ठरले. हा झगडा देताना आपली घरेदारे जप्त होतील, जमिनी सरकारजमा होतील, तुरुंगवास भोगावा लागेल; या सर्व कष्टाची तयारी करा म्हणून बजावले. कोणत्याही प्रसंगाला आपण डगमगणार नाही, अशा अर्थाच्या शपथा कृष्णामाईला व उभ्या पिकाला साक्षी ठेवून त्यांचेकडून घेवविल्या. अशा प्रकारे भावी चळवळीचा पाया या सभेत घातला गेला.

सभाबंदीमुळे प्रचार सभा संस्थानी सरहद्दीत घेणे अशक्य झाले म्हणून संस्थानाबाहेर सरहद्दीला लागून या सर्व सभा घ्याव्या लागल्या. आमची चळवळ-अगदी सनदशीर व कायदेशीर होती. अर्ज-विनंत्या-ठराव एवढाच कार्यक्रम यावेळी आखला होता. शक्य तो कायदा मोडायचा नाही असे धोरण ठरवले होते.

## माधवराव भोसल्यांनी पारडे फिरवले

टाकळीवाडीहून शिरोळला येण्याच्या दोन वाटा होत्या. कुरुंदवाडहून येणारी एक व दुसरी नृसिंहवाडीवरून जाणारी. सभा आटोपून शिरोळला पोहोचायला संध्याकाळ होऊन गेली. मी कुरुंदवाडच्या वाटेने आलो. जयसिंगपूरला आगगाडी पकडून कोल्हापुरला जायचे. पण वेळ थोडा उरला होता. टांग्याने गाडी पकडता आली नसती. म्हणून देसाईंच्या एका खासगी मोटारने गेलो. त्यामुळे अगदी वेळेवर स्टेशनवर पोहोचलो. मागाहून समजले की दुसऱ्या वाटेवर सबंध पोलीस पार्टी प्रत्येक टांगा व सर्व्हिसची मोटार थांबवून मी आत आहे का पहात होती. चौकशी करीत होती. त्या दुसऱ्या वाटेने येतो तर

पोलीसांच्या हाती पडलो असतो. पण मोटार मिळाल्याने मी स्टेशन हद्दीत येऊन पोचलो. स्टेशन आवारात संस्थानी सरकारचा अंमल चालत नव्हता. जयसिंगपूर स्टेशनवर गाडीचे क्रॉसिंग असे. एक गाडी कोल्हापुरला व दुसरी मिरजेला जाते. मी कोल्हापूरचे तिकीट काढून गाडीत पाय टाकला. इतक्यात माधवराव भोसले नावाच्या कार्यकर्त्याने मला डब्यातून खाली ओढले, व सांगितले की कोल्हापूर स्टेशनवर एक संबंध पोलीस पार्टी तुम्हाला पकडण्यासाठी उभी आहे. तुम्ही आता तिकडे जाऊ नका, सरळ मिरजेसच जा.

मी यावेळी खेड्यावर जागृती करण्यासाठी सारखा हिंडत होतो. अशा वेळी सरकारच्या स्वाधीन होणे म्हणजे पुढची सर्व चळवळ मारण्यासारखेच होते. अद्याप लोकांची तयार झाली नव्हती. तेव्हा तुरुंगात जायचे तर लोकात भरपूर जागृती करून गेलो तरच त्याचा फायदा. म्हणून मी शिखरे यांचेबरोबर मिरजेस गेलो व त्यांच्या घरी मुक्काम ठोकला. या वेळेपासून माझ्या व घरच्या मंडळींच्या ताटातुटीस सुरुवात झाली. चळवळीचे ऑफिस शिखऱ्यांचेच घरी उघडले गेले. सर्व कार्यकर्त्यांना त्यांच्या घराने आधार दिला. पत्रव्यवहार तेथून चालू झाला. माधवराव भोसले यांचेकडून हा आकस्मिक इशारा पोचला नसता तर माझ्या आयुष्याला व या चळवळीला कोणते स्वरूप आले असते कोण जाणे. पुढे झाली इतकी जागृती व संघटना खास झाली नसती. या प्रसंगामुळे माझा उत्साह वाढला. लढ्याची तयारी करण्याकरिता मी अविश्रांत हिंडू लागलो. मोठ्या शक्तीबरोबर आता उघड सामना द्यावा लागणार असल्याने लोकांची शक्ती वाढवणे भागच होते. शिखऱ्यांचे घर हे आमचे हेडक्वार्टर झाले!

सरकारनेही आपली कुत्री आमच्या मागोमाग सोडली होती. काही सरकारी काही निमसरकारी अशी होती. पोटार्थी अस्पृश्य त्यात होते. पगारी आणि आश्रितांचा हा संच मोटारी करून आम्हाला त्रास देण्याकरता व सभा उधळण्याकरता बरोबर हिंडू लागला. पण आमचा प्रचार संस्थानी सरहद्दी-बाहेर राहून आतल्या खेड्याच्या लोकांना बाहेर बोलावून होत असल्यामुळे त्यानां दंगा करण्याचे स्वातंत्र्य मिळू शकले नाही. ती ब्रिटिश हद्द असल्यामुळे कायद्याची त्यांनाच भीती होती. या सभा ब्रिटिश हद्दीत नसत्या तर त्यांनी अतिप्रसंग केलाच असता. तोही अनुभव पुढे आला.

### राजधानीत मोर्चा

संस्थानाभोवतालची बहुतेक सर्व खेडी झाल्यावर आता कायदेभंगाच्या तयारीने राजधानीत जाण्याचे ठरवले. लोकांच्या मागण्या निश्चित केल्या. त्या त्यांना चांगल्या समजावून दिल्या. त्या मागण्यांची हजारो पत्रके छापून घेतली. लोकांच्या हातात दिली. कारण आत गेल्यानंतर त्यांच्यांत विसंगती निर्माण होऊ

नये अशी आगाऊ सर्व तयारी केल्यानंतर मोर्चा जाण्याची नक्की तारीख जाहीर केली. २५ डिसेंबर १९३८ हा मोर्चाचा पहिला दिवस ठरवला.

राजधानीत जाणाऱ्या मोर्चेवाल्यांना पुढील संकटाची पूर्ण जाणीव दिली. मोर्चाच्या लोकांना कोल्हापूरपर्यंत निर्विघ्नपणे पोचवण्यासाठी मिरज स्टेशनवरच गाडीत बसवण्यात आले. गाडीत संस्थानी अंमलदारांनां काही करता येत नव्हते, व स्टेशन आवारातही काही करता येत नव्हते. याचा आमच्या चळवळीला फार फायदा झाला.

कोल्हापुरच्या आताच्या चळवळीचे वैशिष्टच हे होते की, चळवळीचा उगम शेतकऱ्यांच्या पोटापाण्याच्या प्रश्नांतून झाला होता. नाराज पांढरपेशांच्या महत्त्वाकांक्षेतून झाला नव्हता. सुशिक्षितांनी, पांढरपेशांनी आणि भांडवल-वाल्यांनी किंवा मराठा जमीनदारांनी यात भाग घेतला नव्हता. वरचा नोकरपेशा वर्ग व भावनेने छत्रपतिनिष्ठ असलेला वर्ग यात सामील नव्हता. ही चळवळ खालच्या कष्टकरी शेतकऱ्यांची होती. ती एक जगण्याची धडपड होती. काँग्रेसचा व या चळवळीचा प्रत्यक्ष असा काही संबंध नव्हता. त्यांच्या प्रोत्साहनाने ही चळवळ उभारली ही समजूत चुकीची होती.

सूत्रे आपल्या हाती ठेवण्याचा प्रयत्न त्यांचा झालाच नाही असे नाही. पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना यश झाले नाही. शिखरे त्यावेळी दक्षिणी लोकसभेचे सेक्रेटरी होते व शंकरराव देव काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद होते. तेव्हा बाहेरच्या राजकीय संस्थेचा आम्हाला पाठिंबा असावा, सहानुभूति असावी असे आम्हास वाटणे साहजिक होते. नाहीतर आमचे खून पडूनही बाहेर आवाज उठला नसता. सरकारला आम्हाला चिरडून टाकताना कसलीच भिती वाटली नसती. तेव्हा बाहेरच्यांच्या चिथावणीने आम्ही चळवळ चालू केली असा काही आरोप करतात तो चूक आहे.

### कायदेभंगाला सुरवात

आतापर्यंत राजकीय मागण्याविषयी विशेषतः सभाबंदी उठवण्यासाठी मी अनेक लेख लिहिले होते. अर्ज, विनंती, ठराव, डेप्युटेशन हे सर्व सनदशीर प्रकार झाले होते. त्याचा सरकारवर काहीही परिणाम झाला नाही. कायदेभंगाखेरीज सरकार वळत नाही हे आता निश्चित झाले होते. या वेळी तुरूंग टाळणे लोक जागृती मारून टाकण्यासारखेच होते. माझ्या तुरुंगात जाण्याने आता लोकांत विश्वास उत्पन्न होणार होता. धैर्य चढणार होते. संघटना मजबूत होणार होती. म्हणून मला हा काळ कायदेभंगाला अत्यंत योग्य असा वाटला. याचमुळे माझी भीती समूळ नाहीशी झाली होती. मी तुरुंगाला हपापलो होतो. कितीतरी वर्षांची माझी मनीषा तृप्त होणार होती.

मिरजेच्या स्टेशनवर येताच मिरजेच्या लोकांनी सत्कार केला. येथे चार शब्द बोललो. जयसिंगपूर, हातकणंगले, रुकडी या स्टेशनवर गर्दी असल्याचे समजले म्हणून गाडीस जादा डबे जोडले. ही आमचीच स्पेशल ट्रेन होती असे म्हटले तरी चालेल. नेहमीपेक्षा गाडी कितीतरी मोठी होती. माझ्या डब्याच्या दोन्ही बाजूला भगवे झेंडे लावले होते. गाडी अगदी हळू हळू चालली होती. चालत असतानाही लोक आत घुसत. शेतकरी कुतुहलाने गाडीकडे पहात. जयजयकाराचा प्रतिध्वनि त्यांच्या तोंडून सारखा उठत होता. गाडीतून आम्ही त्यांच्यावर पत्रकाचा वर्षाव करीत होतो. आम्हाला लोक मिळू नयेत म्हणून अधिकाऱ्यांचे प्रयत्न सारखे चालले होते. लोकांना आधिमधी रस्त्यात अडवून धरण्यात येत होते. त्यांतून कितीतरी निसटून स्टेशनवर पोहचले होते. आगगाडीत येतील त्यांना घेत होतो. तिकीटाची हमी आम्ही घेतली होती. प्रत्येक स्टेशनवर जमावात वाढ होत चालली होती. प्रत्येक स्टेशनवर आमचे स्वागत होत होते. गाडी कोल्हापूर स्टेशनवर येऊ लागली. खिडकीतून बाहेर पाहतो तो जनसमुदायाचे थवेच्या थवे प्लॅटफार्म सोडून गाडीच्या समोरे आले होते. उचंबळून आलेल्या लोकांच्या उत्साहाला गाडी थांबवू शकली नाही. पोलीस आवरू शकले नाहीत. मी बरेच दिवसांनी कोल्हापुर हद्दीत पाय टाकला होता. तो आता तुरुंगात जाण्यासाठी. यामुळे लोकांच्या डोळ्यांतून प्रेमाचा ऊत आला होता. माझे स्नेही व प्रेम करणारे मोठ्या कष्टाने डब्यांत शिरून मला कडकडून भेटले. भाविक लोक पायावर पडण्यासाठी व हार घालण्यासाठी धडपड करू लागले. साहित्यिक प्रो. ना. सी. फडके सरकारी नोकर असूनही भेटण्यास व जमावाचा फोटो घेण्यास आले होते. त्यांना त्याबद्दल पुढे बराच त्रास झाला.

## जनतेचे विराट स्वरूप

माझ्या डोळ्यांना व्यक्ती दिसत नव्हत्या. जनतेचे विराट स्वरूप तेवढे दिसत होते. स्त्री-पुरुष, लहान मोठे या स्वरूपात विलीन झाले होते. एवढ्या प्रचंड जनसमुदायासमोर मी पकडला जाणार होतो. या कल्पनेमुळेच आनंदाने व अभिमानाने माझी छाती भरून येत होती. माझ्यावर त्या सर्वांच्या भावना खिळून राहिल्या होत्या. माझ्या जन्माचे आज सार्थक होणार होते! अंगावर रोमांच लहरी उठत हत्या. स्वराज्य मंदिराची घंटाच जणू माझ्या जयजयकाराने वाजत होती. मी माझी कुढी भावना नष्ट झाली होती. तो आमच्या ध्येयाचाच दुंदुभिनाद होता. माझे मीपण मी विसरून गेलो होतो. भरल्या पुरासारखा जनसंमर्द जिकडे तिकडे पसरला होता. व त्या महापुराचा सारा ओघ माझ्याकडे धाव घेऊन फोफावू लागला होता. त्या लोकगंगेच्या प्रवाहात मी वहात चाललो होतो. तो जयजयकार माझा नव्हता. बागल या क्षुल्लक कीटकाचा नव्हता!

संस्थानी प्रजेची दबून राहिलेली भावना माझे नाव घेऊन किंचाळचा फोडून बाहेर पडत होती. बंधनांतून मुक्त होत होती. स्वातंत्र्याची बाहेर पडण्याची ती धडपड होती. गुलामगिरीच्या श्रृंखला तुटत चालल्या होत्या. त्याच्या आशेचे व शक्तीचे मी एक प्रतीक झालो होतो. माझी पण स्थिती तीच झाली होती. समाज! फक्त समाज! अफाट समाज. मूर्तिमंत ईश्वराचे ते विराट स्वरुप! त्या दिव्य आणि भव्य स्वरुपात मी विलीन झालो होतो. देहाची, मनाची, स्वार्थाची व भीतीची सर्व बंधने तुटून पडली होती. यावेळी मनाच्या उच्च पातळीत मी जाऊन बसलो होतो. इतर गोष्टी मला दिसत नव्हत्या. वस्तुस्थितीचे वर्णन माझ्या हातून बरोबर होणे जवळ जवळ अशक्य असल्याने 'ज्ञानप्रकाश' मधून आलेला मजकूरच मी खाली देत आहे.

'पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणे भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली सुमारे तीन हजार शेतकरी शिरोळ, जयसिंगपूर, हातकणंगले वगैरे गावाहून येथे कोल्हापूर राजवाड्यावर मोर्चा नेण्यासाठी पावणे बारा वाजता गाडीने पोहोचले. त्या पूर्वीही दोन तीन गाड्यांनी नि मोटारीने येथे बरेच शेतकरी आले होते. अगदी गरीब असलेले शेकडो शेतकरी आपआपल्या गावांहून पायी आले होते. आज या शेतकऱ्यांचे मोर्चाचे वेळी कसलाही गोंधळ उडू नये व शक्यतो लोकांची गर्दी कमी व्हावी म्हणून मेजर बाबासाहेब निंबाळकर, चीफ् पोलीस ऑफिसर यांनी पोलीस बंदोबस्त शहरात खूपच दांडगा नि कडक ठेवला होता. सर्व पोलीस लाठीबाज असून स्टेशनकडे जाणाऱ्यांवर त्यांनी चांगलेच नियंत्रण ठेवले होते. प्रत्येक नाक्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची टेहळणी होतीच. पोलीसांच्या मदतीस लालडगला रिसाल्याचे, घोडेस्वारांचे लहानसे दळ कर्नल खानविलकर यांच्या नेतृत्वाखाली सज्ज होते. नाकेबंदी करण्यास घोडेस्वार नि लाठीबाज पोलीस यांचा काही काळ उत्तम उपयोग झाला. पण भाई बागल यांच्या भगव्या झेंड्याने नटलेली 'मोर्चा-ट्रेन' हजारो लोकांच्या जयजयकारात स्टेशनमध्ये घुसताच त्यांना पहावयास आतूर झालेल्या नागरिकांचा उत्साह अमर्याद होऊन सर्व दिशांनी लोक पोलीसांची फळी फोडून आत गेले व स्टेशन पुढील सर्व पटांगण गांधी टोप्या, फेटे नि हॅट्स यांनी फुलून गेले. प्लॅटफॉर्मवर गर्दी फार होऊ नये म्हणून प्लॅटफॉर्म तिकिटे बंद करण्यात आली होती. पण त्याचाही मुळीच उपयोग झाला नाही. सर्व फलाट आणि पलीकडील रेल्वे-रस्ताही माणसांनी भरून गेला होता. रुळावरील माणसांची दाटी बाजूस सारून इंजिनला आपला रस्ता काढताना आज खरोखरीच नाकीनऊ आले!

'गाडीची वेळ ११-२० होती. पण प्रत्यक्ष आगमन ११-४५ नंतर झाले. कोल्हापूर स्टेट वेटिंग रुमसमोर भाई बागलांचा भगवा झेंडा लावलेला. तिसऱ्या

वर्गाचा डबा उभा राहताच प्रमुख नागरिक, विद्यार्थी नि व्यापारी तिकडे घुसले व त्यांनी अभिवादनपूर्वक भाई बागलांना हारांनी भरून काढले. इतर लोक "शिवछत्रपती महाराज, प्रजा स्वातंत्र्य, भारत-माता नि जवाहर-बागल की जय!" असा प्रचंड गजर करून सर्व वातावरण दुमदुमून सोडीत होते. फलाटावरील हे स्वागत आणि फोटो झाल्यावर भाई बागल स्टेशनपुढील पटांगणात बसून राहिलेले शेतकरी, विद्यार्थी नि नागरिक यांच्या दहा हजारांवरील समुदायापुढे शेतकऱ्यांच्या मोर्चाचा हेतू नि जनतेच्या मागण्या यासंबंधी भाषण करण्यास उभे राहिले. व्याख्यानास टेबलखुर्चीची जी उणीव होती ती रेल्वे बस सर्व्हिसच्या मोटारीने भरून काढली.'

—ज्ञानप्रकाश

"श्री. बागल यांच्या वाणीने काम सुरू केल्याबरोबर सर्वत्र शांतता नांदू लागली. श्री. बागल म्हणाले —

'आज येथे मी व्याख्यान दयायला आलो नसून शेतकऱ्यांच्या व गरीब रयतांच्या मागण्या मागण्यास आलो आहे. श्री छत्रपती व भगवा झेंडा यांचा पूर्ण आदर व मान राखून आपली गाऱ्हाणी आपल्या महाराजांच्या कानी घालण्यास आपण आलो आहोत. शेतसारा कमी करा व शेतकऱ्यांना कायमची भाकर दया, ही पहिली मागणी आहे. दुसरी मागणी भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य इत्यादी मानवी मूलभूत हक्काची होय. छत्रपतींची प्रजा म्हणजे जनावरे नसून, त्यांना माणुसकी आहे आणि म्हणून माणुसकीचे हक्क आम्हाला दया. हे मागण्यास आम्ही आलो आहोत. तिसरी मागणी जबाबदार राज्यपद्धतीची. लोकांनी निवडलेल्या व्यक्तींचे बहुमत असलेली, आपले राज्य छत्रपतींच्या नेतृत्वाखाली चालविण्याची मुभा देणारी राज्यपद्धती आम्हाला हवी व बदलत्या कालमानानुसार आमच्या मागण्या मान्य करा असे आमचे रास्त म्हणणे आहे.' श्री. बागल यांचे भाषण झाल्यानंतर शेतकरी लोकांना चारांच्या रांगेने उभे राहण्याची व्यवस्था सुरू होऊन अदमासे सव्वा वाजता मोर्चास प्रारंभ झाला. मोर्चाबरोबर पुढेमागे पोलीसांचा गराडा होताच. शिवाय प्रारंभी गर्दी हटवण्यास घोडदळ सज्ज होतेच. या मिरवणुकीचे दृश्य पाहणाऱ्यास अचाट आणि अजस्त्र वाटावे असेच होते. शाहूपुरी पोस्ट ऑफिसांपासून ते दाभोळकरांच्या बंगल्यापर्यंत हा जनसंमर्दाचा सांधलेला सडा पाहून विस्मयाने मानवी मन थक्क झाल्यास नवल नाही.'

### अटक

'... शिरगांवकर यांचे बंगल्याजवळ मिरवणूक थांबल्याचे कळल्याचे कळताच एकच कल्लोळ उडाला. हा कल्लोळ शांत होताच श्री. माधवराव बागल

यांना अटक करून नेल्याची बातमी सर्वत्र फैलावली. मोर्चाबरोबर प्रातांधिकारी व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट वगैरे अधिकारी होते.

—'विद्याविलास'

माझ्या अटकेनंतर मोर्चा सुर्वे दिवाणांच्या बंगल्यावर गेला. तेथे त्यांनी आपल्या मागण्या दिवाणांना कळवल्या व त्यांनी त्यांची कशीबशी समजूत केली वगैरे वृत्तांत मला अटकेत वाचण्यास मिळाला.

दुसरे दिवशी सकाळी माझी पत्नी व बाळ दौलत भेटण्यास आले. बायकोला साहजिकच घुटमळल्यासारखे झाले. तथापि तिने आपल्या डोळ्यांतील पाणी मोठ्या कष्टाने आवरल्याचे दिसत होते. पण निश्चय ढळला होता असे मात्र नाही: कारण पुढे तिने माझ्या कल्पनेबाहेर धैर्य दाखवले. मी घरच्या मोहाने कदाचित् जामीन देईन म्हणून तिने तसे न करण्याचा निरोप श्री. उत्तमराव शेणोलीकर यांचेकडून पाठवला.

## कोल्हापूर सेंट्रल जेलमध्ये

पोलीस हेड्क्वार्टरनंतर मला सेंट्रल जेलमध्ये नेण्यात आले. तुरुंग पाहण्याचा हा पहिलाच प्रसंग. तुरुंगाजवळून अनेक वेळा गेलो असेन. पण तुरुंगाच्या आतील प्रकाराची काही बरोबर कल्पना नव्हती. गावातून कैदी कामावर जाताना व परतताना तेवढे पाहिलेले. त्यांचे दावणीत मीही केव्हातरी बांधला जाईन असे वाटत होते. तरी प्रत्यक्ष खालच्या जिण्याची सवय नसल्यामुळे हा अनुभव त्रासाचा व कष्टाचा वाटणे साहजिकच आहे. माझ्या मनाची जरी पूर्ण तयारी झाली होती. तरी या अगदी निराळ्या वातावरणात पडल्यामुळे व या नव्या आयुष्याचा कसलाही संबंध नसल्यामुळे माझे धैर्य जरी खचले नव्हते तरी अगदी चमत्कारिक होऊन गेले. वातावरणात मला गुदमरून गेल्यासारखे झाले.

आतला देखावा भीषणच होता. एखाद्या जुनाट किल्ल्यावरच्या भव्य दरवाज्याप्रमाणे हत्तीच्या टकरीनेही उघडला जाणार नाही असा घणगंभीर दरवाजा होता तो. शोभेसाठी, पण आतील हेतू दाखवण्यासाठीच जणू हत्तीचे साखळदंड दारावर लोंबत होते. दरवाज्यावर संगिनी अडकवलेल्या इन्फंट्रीचा पहारा होता. पहारेकऱ्यांचा तो लष्करी गणवेश. त्यांचे ते भावनाशून्य चेहरे व दारासमोर चाललेली त्यांची यांत्रिक हालचाल त्या भेसूरपणात भरच घालीत होती. इकडे मी पहात होतो इतक्यात एका भयसूचक घंटेने नव्या नाटकास सुरवात झाली. यमाचे दार उघडल्याप्रमाणे लोखंडी बेड्यांचा खणखणाट होता तो. पुराणकालच्या राक्षसांनी शत्रुंचा सूड उगवण्याकरता मानवांना जड शृंखलांनी बांधलेली चित्रे पाहतो ना आम्ही, तसेच. राज्ययंत्राचे बळी त्या

दारातून बाहेर पडत होते. लोंढाच लागला होता त्यांचा. त्या प्रवाहाचा उगम लोखंडी अरुंद अशा दिंडीतून होता. डोक्यावर विद्रुप टोपी, अंगात एक आखुड बंडी,, खाली लंगोटी किंवा चड्डी, खांदयावर घोंगडे व पायात साखळदंड, चालताना त्या बेडचा एकमेकांवर आपटून असंतोषाचा आवाजच जणु काढीत होत्या. आम्ही पण सत्तेचे गुलाम म्हणून त्या रडत असाव्यात. त्यांच्यामागे, त्यांच्यावर हुकमत चालवणारा, काळा डगला, पिवळी पगडी, हातात दंडुका घेतलेला वार्डर, मागे खांदयावर बंदुक टाकलेला खाकी कपडयाचा पोलीस.

मला आत आणले त्यावेळी हा चित्रपट चालू होता. हेड्क्वार्टर्सच्या पोलीसांनी मला सेंट्रल जेलच्या पोलीसच्या ताब्यात दिले. तेथे जेलच्या एका ऑफिसर समोर तेथल्या कैदयाने माझ्या अंगावरचे कपडे, जिनसा वगैरेंची मोजदाद करून त्यांची नोंद केली. चेहरेपट्टी, उंची, खाणाखुणा टिपून घेतल्या व कैदयांच्या नेहमीच्याच खोलीत पाठवून दिले. मी अटकेत म्हणून जरी होतो तरी गुन्हेगार कैदयांचेच खोलीत कोंडून ठेवले!

कैदयाचे जेवण आले. एक खोलगट थाळी, भात त्यातच, सांबारेही त्यांतच आणि भाकरीही त्यातच. शौचाला नेतो. तसले टमरेल पाणी पिण्याला. सकाळी नुसता झुणका-भाकर. तो भाकरीवरच घ्यायचा. दोन-तीनशे, कैदयांच्या भाकरी अर्ध्या तासात बडवून तयार व्हायच्या. मोठ्या, कच्च्या केव्हा जळक्या असायच्या! संध्याकाळी भाताचे होंडके व पारदर्शक सांबारे! न झेपण्याजोगे तिखट. एवढया मोठ्या शिताचा भात जन्मात खाल्ला नसेल. पाहूनच गरगरू लागले! निव्वळ कल्पना आणि अनुभव यांत बराच फरक असतो. आता हे जिणे कसे निभावणार! तुरुंगातून बाहेर पडेपर्यंतच आम्ही खलास होणार असे वाटू लागले. जेवण पहिल्या दिवशी तर काहीच गेले नाही. तसेच ठेवून टाकले. संध्याकाळी सहा वाजता माझ्या खोलीस कुलूप पडले. नंतर डेप्युटी जेलरची फेरी झाली. मला ज्या भागात ठेवले होते त्याला गुमानी म्हणत. दिवाणी आरोपी विशेषतः तेथे कोंडीत. तेथेच एका बाजूला अगदी लहान खोल्यांत फांशीचे गुन्हेगार कोंडून ठेवीत. हातपाय मोकळेपणाने झाडता येण्याजोगीही त्या खोलीची लांबी रुंदी नव्हती. माझी खोली मोठी होती. मी राजकीय गुन्हेगार. माझा सहवास दुसऱ्यास लागू नये म्हणून मला अगदी एकटेच ठेवले होते. ती खोली मोठी होती, म्हणजे चांगली होती असे नव्हे. तो भाग आवाराच्या गलिच्छ बाजूस होता. भिंतीपलीकडे सर्व शौचकूपच! हवा खेळायला जागा नव्हती! किल्ल्याच्या खंदकाचा तो एक कोपरा होता. खोली कोंदट होती तशीच दमटही होती. कोपऱ्यात गजाबाहेर चावी होती. तिचा ओलावा आत चढला होता. बाजूस पलीकडे अगदी अंधारी खोली होती. तिची लोटझाड नव्हती. दिवसाही अंधारच

मध्ये लोखंडी गज. त्या खोलीतून केव्हा कोण प्राणी शिरकाव करील सांगता येणार नाही. रात्री खोलीत दिवा ठेवण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे खोलीत साप, विंचू, बेडक्या आल्यास स्पष्ट दिसण्याजोगे नव्हते. तसे प्रसंग आले काही वेळा. हिरवे किडके साप, विंचू, बेडूक नेहमी आढळत. मारायला काठी नाही. जवळ सोबत नाही. पोलीसाला हाक मारल्यास त्याला कुलूप काढण्याचा अधिकार नाही. त्याला जेलरची परवानगी पाहिजे. ती परवानगी मिळेपर्यंत, प्राचीन युद्धनीती मानून त्या प्राण्यांनी हल्ला करता कामा नये. इतर गुन्हेगारांना दुसऱ्या कैद्याचा सहवास तरी मिळे, मला तोही नव्हता! या इतर प्राण्यांची मैत्री सहजासहजी जमण्याजोगी नव्हती. खोलीत अंधार, एकांत आणि भयाणता! सर्वांहून मोठा गुन्हेगार होतो मी. म्हणून खास वागणूक मिळावी. शिक्षेपूर्वीची दीक्षा ही! पुढच्या नाटकाची नुसती सुरवात होती. रात्र पडू लागली. खोलीला भीषण स्वरूप येऊ लागले. सर्वत्र सामसूम झाली. कैद्यांचे बोलणे बंद झाले. साताचे पुढे बोलायचे नाही. बेड्यांचा आवाज करायचा नाही अशी ताकीद होती. पोलीसांच्या येरझाराही बंद पडल्या. मी बिछाना पसरला. खाली घोंगडे, उशाला घोंगडे, वर घोंगडे गादीची व मच्छरदाणीची सवय. घोंगडे अंगाला रुतू लागले. खाली पलंगपोस नव्हता. घोंगड्याचे आत चादर नव्हती. त्यामुळे कूस बोचू लागली. या पहिल्या सलामीनंतर घुंगुरट्यांनी रणशिंग फुंकले. मच्छरदाणीची ढाल नसल्यामुळे त्यांचा हल्ला मुकाट्याने सहन करावा लागला. तोंडावर पांघरुण घ्यावे तर गुदमरल्यासारखे वाटू लागले व तोंडाला बोचू लागले. यावेळी बाहेर कुठे जायचे नसले तरी, आपण कडीकुलपात आहोत, पोलीसांच्या पाहाऱ्यात आहोत ही कल्पना असह्य होत होती. गजामधून निळ्या आकाशाचा थोडासा तुकडा दिसे. त्यावर छपरावरचे वाळलले गवत वाऱ्याने डुलत होते. मला हेवा वाटला त्या गवताच्या झुपक्याचा. त्याच्या स्वातंत्र्याचा. त्या उंचावरून त्यांना भोवतालचा भाग दिसत असेल. ते पाहूनच ते आनंदाने डुलताहेत. आहे का त्यांचे स्वातंत्र्य मला. निर्जीव वस्तूही माझ्याहून आनंदी आणि स्वतंत्र आहेत नाही? मनाच्या या भराऱ्या फार उड्या मारू लागल्या म्हणूनच की काय ढेकणांनी चावे घेण्यास सुरवात केली. खालून वरून आजूबाजूच्या बारमधून त्यांच्या तुकड्या चाल करून येवू लागल्या. काही पॅराशूटप्रमाणे वरच्या तक्तपोशीतून एकदम खाली उतरत. पूर्वी याच खोलीत १०/१५ कैदी असत. आता मी एकटाच सापडलो त्यांच्या तावडीत. प्रथम माऱ्यासाठी हात पाय आपटले. पुढे अगदी हैराण होऊन हातपाय झाडू लागलो. पुढे थकलो पण कोणी दया केली नाही, शरण आलेल्यास पुनः हैराण करायचे नाही ही युद्धनीती त्यांनी स्वीकारली नाही. माझी ही शोचनीय स्थिती कोणातरी मित्राच्या कानावर घालावी म्हणून जीव धडपडू लागला. पण जवळ

कोणीच नव्हते. मग सहानुभुतीचा शब्द कुठला कानावर पडणार. पण शब्दासाठी भुकेलेल्या कानाला थोडा खाऊ मिळाला. किती पण मनाला आनंद वाटला त्याने. चावीच्या पाण्याचा टप् टप् टप् असा कर्णमधुर आवाज त्या स्थितीतही मनाला रिझवू लागला. कसले गोड संगीत त्यात साठवले होते कोण जाणे. बाहेरच्या जगात अशा क्षुल्कक गोष्टीकडे कधीतरी लक्ष वेधले असते का? थकून थकून अगदी सकाळच्या प्रहरी थोडा डोळा लागतो इतक्यात उठण्याचा बिगुल झाला.

सकाळच्या बिगुलमुळे खडबडून जागा झालो. पोलीसांचे जागा धरण्याचे नंबर झाले. थोडयाच वेळात प्रातर्विधीस जाणाऱ्या कैदयांच्या बेडयांचा खणखणाट सुरू झाला. दोनतीनशे कैदी. १०/१५ मिनिटांत सर्व आटोपते घ्यायचे. समोर दुसरा कैदी उभा. थोडा उशीर झाला की वार्डर ओढून काढणार. जागा थोडया, वेळ ठराविक. आणि माणसे जास्त. तो सर्व प्रकार अंगावर शहारे आणण्याजोगा होता. लाजलज्जा सोडून सर्वांनी, अंगाला अंग लागून उघडया जागेत दुसऱ्या देखत बसायचे. जवळ पाण्याचे टमरेल नाही. त्या तशा गलिच्छ अवस्थेत, लहान मुलासारखे उठून एका हौदावर टमरेल मोकळे होण्याची वाट पहात उभे रहायचे. बाथरुममध्ये दार लावून आंघोळ करणाऱ्याच्या मनावर हे भयंकर दृश्य काय परिणाम करील याची कल्पनाच करावी! हे असले दिव्य करावे लागेल यांची अंधुकही कल्पना नव्हती मला. अगदी शुद्ध पाशवी प्रकार! कितीही लाजलो तरी निसर्गाबरोर कशी टक्कर देणार? अखेर सर्व लज्जा टाकून व स्वतःचे डोळे मिटून कार्यक्रम उरकावा लागला.

### कैदी व मी

आरोपी व कैदी एकाच वेळी बसत. प्रथम बाहेरकामास जाणाऱ्या सक्तमजुरीच्या कैदयांना मोकळे करीत. मागाहून इतर कैदी व आरोपी जात. यामुळे शिक्षा झालेल्या लोकांशी अटकेत असताना फारसा संबंध येऊ शकला नाही. तथापि अन्न पुरवणारे कैदी, व्यवस्था पाहणारे वार्डर, औषधपाणी देणारे कंपौंडर-कैदी, यांचा थोडाबहुत संबंध येई. मात्र बहुतेक कैदयांना, मला भेटावे, मला पहावे, माझ्या बरोबर बोलावे असे वाटे. त्यासाठी त्यांची फार धडपड चाले. संधी साधून त्यातला कोणीतरी माझेकडे धाव घेई. माझे पायावर डोके ठेवी. मला जरा आड कोपऱ्याला उभा करून कडकडून भेटे. मी कोणीतरी थोर माणूस आहे अशा भावनेने ते माझ्याशी वागत. माझा तसा काही गुन्हा नव्हता पण लोकांसाठीच मी तुरुंगात आलो ही गोष्ट त्यांना समजल्यामुळे त्यांना माझ्याविषयी अत्यंत आदर वाटे. त्यांना मी देवासारखा वाटे. मी मात्र खजील होई. त्यांच्या डोळयांवाटे वर्षाव होणारे प्रेम मला दिसत असे. डोळयांची भाषा जिव्हेपेक्षा अधिक बोलते. अधिक परिणाम करते. त्या मूकशब्दाचे पडसाद

अंत:करणात खोल खोल उठतात. हृदयाची भाषा ती. पण अद्याप त्या कैद्यांच्या सान्निध्यात मी गेलो नव्हतो. दूरच होतो त्यांच्यापासून. पण त्यातूनही जे जे जवळ आले, त्यांचा मला कधीही विसर पडणार नाही.

याच अटकेच्या काळात संक्रांतीचा सण आला होता. तुरुंगात कसली संक्रांत! मग तुरुंग कसला तो. पण त्यांतही मोठ्या मुष्कीलीने पोलीसांकडून काहींनी तिळगूळ पैदा केले. दोनप्रहरी ठराविक वेळी दार उघडताच जाग्यावर असलेल्या कैद्यांपैकी बरेच माझ्याकडे धावतच आले. त्यांनी तिळगुळाचा हात पुढे केला. पण माझ्या हातावर ते ठेवीनात. त्यांनी आपल्या हातानी ते जेव्हा माझ्या तोंडांत घातले तेव्हा त्यांचे समाधान झाले. तोंडात तिळगूळ घालून त्यांनी प्रेमभरे आलिंगन दिले. आणि भक्तिभावाने पायावर डोके ठेवले.

माझ्या हातून त्यांचे काहीही चांगले झालेले नव्हते. कसलेच उपकार झाले नव्हते. मी लोकांसाठी तुरुंगात आलो आहे या एकाच समजुतीमुळे त्यांचे अंत:करण मजकडे ओढले गेले. त्यांच्या प्रेमामुळे माझा जीव कितीतरी हलका पडला.

अद्याप मला शिक्षा व्हायचीच होती. पण तुरुंगातला दिनक्रम, तुरुंगातले जीवन, तेथले लोक, तेथले नियम, पद्धती, वागणूक, माझ्या ओळखीची होऊ लागली. कटु वाटलेले अन्नही घशाखाली उतरू लागले. सवयीने पुढे घोंगडीवर झोप येऊ लागली. गुन्हेगार, पापी, क्रूर व भयंकर वाटणारे कैदी आवडू लागले. हृदयाने माझ्याहून ते कितीतरी थोर त्याची साक्ष घडोघडी अनुभवास येऊ लागली.

### पहिला खटला

माझ्यावर डि. मॅजिस्ट्रेट यांचे कोर्टांत क्रि. प्रो. कोडच्या १०७ कलमाखाली खटला भरण्यात आला होता. ता. ४ डिसेंबर १९३८ रोजी जगदाळे यांच्या वाड्यात म्हणे एक सभा भरली होती त्या सभेत १५/२० लोक हजर होते. त्यात मी होतो व साराबंदी करून कायदा मोडण्याचे त्या सभेत ठरले, असा पोलीस सबइन्स्पेक्टरने रिपोर्ट केला व त्यावरून मला अटक करण्यात आली. मला अटक केली त्यावेळी मला वारंट दाखवण्यात आले नव्हते. केस का घालण्यात आली ते सांगण्यात आले नव्हते. माझी केस माझे बालपणीचे मित्र नानासाहेब देव वकील चालवीत होते. या खटल्यात मी खालीलप्रमाणे कैफियत दिली होती.

### कैफियत

ता. ४ रोजी... शिरोळ येथे जगदाळे यांच्या वाड्यात सभा भरली ही गोष्ट सर्वथैव खोटी आहे. त्यावेळी मी कोल्हापुरास होतो व त्या सुमारास माझे

एका आप्तांची बायको वारल्याचे समजल्यामुळे भेटीस गेलो होतो. श्री. श्रेष्ठी वकील यांचे घरी खासगी वाटाघाटीस गेलो होतो. सभाबंदीचा कायदा मोडण्याचे सरकारी साराबंदी करण्याचे धोरण मी व माझ्या सहकारीबंधूंनी केव्हाच ठरवले नव्हते. व्यक्तिशः मी गेली १० वर्षे सनदशीरपणे चळवळ करीत आलो आहे. स्वातंत्र्यदाते पुण्यश्लोक शिवछत्रपतींच्या गादीविषयी माझ्या अंतःकरणात आत्यंतिक आदर वसत असल्यामुळे व राजर्षि शाहू छत्रपतींचे मजवर व माझे घराण्यावर उपकार असल्याने करवीर दरबारविरुद्ध लोकांच्या हक्काच्या मागणीसाठी कायदेभंगाचा प्रसंग येऊ नये अशी माझी प्रामाणिक इच्छा होती. म्हणून मी लेख. अनावृत्त पत्राद्वारे श्रीमन् महाराजसाहेबांकडे माझे विचार, सादर केले. फाळाबंदी करण्याचे मी ठरवले असते तर त्यासाठी उघड प्रचार करणे भाग होते... अटकेच्या वेळीही मी शांततेचा व सनदशीर मार्ग अवलंबण्याचा उपदेश करीत असताना मजकडून शांतता भंग होईल म्हणून पाच हजारांचा जामीन मागण्यात आला. अनत्याचार, शांतता व शिस्त राखण्याचा प्रयत्न करणाऱ्या मजवरच १०७ कलम लागू केले आहे. एवढेच माझे सांगणे आहे.

केस चालवावी अशी माझी स्वतःची इच्छा नव्हती. पण माझ्या हितचिंतकांनी ती आपल्या जबाबदारीवरच चालवली होती. केसचा निकाल माझ्या उलट होणार या कल्पनेने मी तयारी केलीच होती. बायकोला भाड्याचे घर सोडून माहेरी राहण्यास जा म्हणून सांगितले होते.

माझ्या अटकेनंतर पुनः ता. १५ ला मोठा मोर्चा आला. अत्यंत बिकट परिस्थितीत कमालीची शांतता मोर्चेवाल्यांनी राखली. मोर्चाचा पुढाकार त्यावेळचे शिपाई गडी खानदानी मराठे नानासाहेब जगदाळे यांनी घेतला होता व त्यांनी आपले काम चोख रीतीने बजावले. या मोर्चास मागण्यांचा विचार करण्याचे आश्वासन दिले गेले. त्यामुळे लोक परत गेले.

मला अटकेत वर्तमानपत्रे वाचायला मिळत असत, त्यामुळे दुसऱ्या मोर्चाची हकीकत वाचून कारागृहांतील शारीरिक त्रासही हलका वाटू लागला. तसेच माझ्या अटकेमुळे कोल्हापुरात व कोल्हापुराबाहेरील खेड्यावर पडलेल्या हरताळाच्या बातम्या वाचूनही एक प्रकारचे समाधान वाटत होते. लोक जागे आहेत त्यांनी कच खाल्ली नाहीं व योग्य मार्ग दाखवल्यास ते पुढाऱ्यामागे जाऊ लागतील असा विश्वास वाटू लागला.

## महाराजांची आश्वासने

दुसऱ्या मोर्चाचे वेळी महाराजांकडून खालील आश्वासने मिळाली होती– (१) शेतसारा ब्रिटिश हद्दीइतका करण्यात येईल. (२) भाषण

स्वातंत्र्यावरील निर्बंध काढून टाकण्यात येतील. (३) नागरिक स्वातंत्र्याचे हक्क १५ दिवसांत जाहीर केले जातील व सर्व राजबंदी सोडण्याचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात येईल.

या आश्वासनाला धरून मला प्रथम दिवाणसाहेबांनी आपल्या बंगल्यावर बोलावून घेतले. मी दुसऱ्या बाहेरच्या लोकांच्या तंत्राने चालतो असा आरोप केला. वस्तुत: मी कोणाच्या तंत्राने वागणारा नव्हतो. कोणाचे बाहुले झालो नव्हतो. योग्य सल्ला मिळाल्यास घ्यावा मग तो कोणाकडूनही येवो या धोरणानेच मी वागत होतो. महाराजांची भेट झाल्यावर तुम्हाला जे बोलायचे ते बोला असे सांगून पुन: मला जेलमध्ये पोचवण्यात आले.

## महाराजांची भेट

अपेक्षेप्रमाणे दुसरे दिवशी २३/१/३९ ला मला वाटाघाटीसाठी म्हणून महाराजांच्याकडे नेण्यात आले. महाराज दिवाण सुर्वे यांच्याच बंगल्यावर आले होते. बहुतेक कौन्सिलर्सही हजर होते. पोलीस ऑफिसर निंबाळकर हेही हजर होते.

'अहो बागल तुम्ही राजनिष्ठ आहात की नाही?' असा महाराजांनी प्रथमच प्रश्न केला. त्यावर आमची चळवळ केव्हाही महाराजांविरुद्ध नाही किंवा महाराजांच्या लौकिकासाठी व प्रजेच्या कल्याणासाठी कसलाही त्याग करावा लागला तरी तो करण्याच्या आम्ही आणाशपथा घेतल्या आहेत. हे सांगितल्यावर महाराजांना बरे वाटले व त्यांनी मोठ्या प्रेमाने माझा हात आपल्या हातात घेऊन सांगितले, 'माझ्या मनातली सर्व शंका दूर झाली हे तुम्ही निश्चित समजा. ही बसलेली मंडळी मी जशी माझी समजतो, तसे तुम्हाला माझ्यापैकीच समजतो. माझी इच्छा तुम्ही म्यु. पालिटीचे अध्यक्ष व्हावे, वाटल्यास मी तुम्हाला इलाखा पंचायतीचे अध्यक्ष करतो. या वेळी या दोन्ही संस्था सरकारच्याच ताब्यात होत्या. ती जागा तुम्ही पत्करा. यापुढे तुम्ही बाहेरच्या लोकांचे नादी लागू नका. मी तुमचा राजा आहे. माझ्या प्रजेने मला लाथांनी मारले तरी चालेल. ती माझी मुले आहेत; पण बाहेरच्यांनी लुडबुड केलेली मला खपणार नाही. 'लाथांनी मारले तरी चालेल' या महाराजांच्या वाक्याने मला गहिवरून आले. मी महाराजांना म्हणालो, मला कसल्याही जागेची, मानाची व पगाराची आशा नाही. जनतेचा सेवक म्हणूनच मी आजन्म राहू इच्छितो. लोकांच्या तक्रारी घेऊन आलो म्हणजे महाराजांनी माझी भेट घ्यावी म्हणजे झाले. आज पहिली गोष्ट म्हणजे जनतेला नागरिक हक्क द्यावेत. भाषणबंदी तात्काळ उठवावी.

भाषणबंदी प्रश्नावर एक कौन्सिलरच उलट गेले! त्यांचे म्हणणे की, 'आम्ही कोल्हापुरच्या लोकांपुरती भाषणबंदी उठवू पण बाहेरच्या लोकांना परवानगी देणार नाही. ते वाटेल ते बरळून जातात. त्यांना पकडणे त्रासाचे होते, ते बेजबाबदार रीतीने बोलून जातात.' यावर मी त्यांना सांगितले की, याने कायदेभंगाचा प्रश्न निकालात जात नाही. या प्रश्नासाठी बाहेरचे लोक संस्थानात येऊन कायदेभंग करू लागतील. असे होणे दरबारलाही बरे नव्हे. तरी सर्रहा भाषणबंदी काढून टाकून तो कायदा अजिबात रद्द करावा.

या प्रश्नावर मुलाखत फिसकटून, आमची रवानगी पुन: तुरुंगात होणार असे मला वाटू लागले. पण मला हा हेका सोडून चालण्याजोगे नव्हते. जवळ जवळ वीस वर्षे ही भाषणबंदी उठण्यासाठी मी धडपडत होतो. सर्व उपाय केले, अर्थात् सगळे सौम्य, सनदशीर व कायदेशीरच उपाय होते ते. ठराव, व्याख्याने व अर्ज याप्रकारे खेड्यावर जागृति करीत आलो होतो. साऱ्याच्या प्रश्नाहूनही मी सभा-स्वातंत्र्याला अधिक महत्त्व देत होतो. अगदी प्राथमिक मानवी हक्क मिळवणे हे अत्यंत महत्त्वाचे होते.

रा. ब. दत्तोबा भोसले यांनी अगदी वेळीच चर्चेला योग्य अशी कलाटणी दिली व बाहेरच्या लोकांनी गैरवाजवी टीका केल्यास ती तुम्ही आवरू शकाल काय असे विचारले. मी त्यांना एवढेच सांगितले की, एखादचा सभेत कोणीही इसम व्यक्तिविषयक अशी टीका करू लागला तर ती थांबविण्याचा मी प्रयत्न करीन, एवढेच आश्वासन मी देऊ शकेन यापेक्षा मला काही करता येणार नाही. 'काही हरकत नाही, अशी शक्य तो खटपट तुम्ही करा म्हणजे झाले' असे महाराजांनी बोलून मुलाखतीचा शेवट गोड केला.

## सुटकेनंतरचा सत्कार

अटकेतून सुटताच कार्यकर्त्यांना व शिखऱ्यांना भेटण्याकरिता मिरजेस गेलो. मिरजेहून परत शिरोळला जाताना वाटेत उदगावच्या लोकांनी अडवले. त्यांनी तेथे सत्कार केला. तोपर्यंत शिरोळने मिरवणुकीची तयारी केली होती. तीही फार धांदलीने. लोकांना आनंदाचे भरते आले होते. मिरवणुकीसाठी बैलाची गाडी पुढे आणली. त्याला बऱ्याच जोडचा जोडल्या होत्या. मिरवणूक सुरू होताच जोडचा वाढू लागल्या व अगदी थोडचा वेळात त्यांची संख्या साठ सत्तरपुढे गेली. गावात स्त्री-पुरुषांचा उत्साह अवर्णनीय होता. घरांघरांतून फुलांचे, कागदांचे, कापडांचे हार घेऊन पुरुष उभे होते. बायका, मुली पंचारती घेऊन ओवाळायला पुढे येत होत्या. गाडीपुढे बैलांच्या पायावर बायका पाण्याच्या घागरी ओतीत होत्या. त्यामुळे रस्त्यावर पाणी झाले होते. ओवाळणीत येणाऱ्या

नारळ, केळी, फळे, फुले व बत्तासे यांनी गाडी भरू लागली. त्या मिरवणुकीत जनतेच्या प्रेमाचा तो अवर्णनीय प्रकार पाहून कृतज्ञतेने माझे हृदय भरून येत होते. पुढे पुढे तर प्रत्येक खेडे या प्रकारच्या सत्कारात चढाओढ करू लागले. वाजंत्री, बँड, आतषबाजी, तोरणे, माला-पताका यांची त्यात भर पडू लागली. प्रत्येक गाव आपले वैशिष्ठ्य दाखवू लागले. थैल्या मिळू लागल्या. बैलजोड्यांची संख्या अडीचशेपर्यंत गेली. शिरोळची सभा आटपून लगेच कोल्हापूर शहरात आलो. सभेची वेळ टळून गेली होती. तरी हजारो लोक तिष्ठत बसलेच होते. त्या सभेच्या रिपोर्टरचे वर्णन खाली देत आहे. 'आठचे सुमारास श्री. माधवराव बागल सभास्थानी आले. तेव्हा "बागल महाराज की जय!" इत्यादी जयघोष नि टाळ्या यांनी सर्व वातावरण दुमदुमून गेले होते. भाई बागल टेबलावर उभे राहताच त्यांना पाच पन्नास संघ नि चाहते यांनी हार घालून फुलवून काढले.' नंतर श्री. बागल म्हणाले—

"माझ्या शेतकरीबंधूंनी माझे जे स्वागत केले त्या ऋणांतून जन्मांतरीही मी मुक्त होणार नाही. माझे इतर बंधू तुरुंगात आहेत तोपर्यंत माझी सुटका मला अभिनंदनीय वाटत नाही. मी राजनिष्ठ राहीन असे महाराजांना वचन दिले आहे. त्याचा अर्थ मी प्रजाबंधूशी बेइमान होईन असा मात्र नाही. राजा-प्रजा ही दोन्ही एकच आहेत असे मी मानतो. आणि माझी प्रजानिष्ठा हीच राजनिष्ठा आहे. भगवा झेंडा हे स्वातंत्र्य चिन्ह आहे आणि छत्रपतींची गादी हे स्वातंत्र्यस्थान आहे. आमची चळवळ छत्रपतींची किर्ती आणि लौकिक नि सुख वाढवण्यासाठीच आहे. आम्ही कोणाच्याही ओंजळीने पाणी पिऊन त्यांच्या आहारी जाणार नाही. आपला कावा साधून कोणी आमच्यावर 'ब्राह्मण्य' लादू पाहतील तर त्या क्षणी त्यांना धक्के मारून बाहेर घालवण्यास मी मागेपुढे पाहणार नाही. काही थोर काँग्रेस भक्त संघटना आणि सनदशीर चळवळ कशी करावी याचे स्वार्थत्यागपूर्वक शिक्षण देत आहेत, त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. काही लोक भगवा झेंडा आणि तिरंगी झेंडा यांच्यात भेद पाहून, आम्हात भांडणे लावू पहात आहेत. पण ही दोन्ही स्वातंत्र्याचीच चिन्हे आहेत. ती दोन्हीही आम्हास सारखीच पूज्य आहेत.'

सभाबंदी आता उठलीच होती. अटक होण्यापूर्वीच्या सर्व सभा मला नाइलाजाने संस्थान सरहद्दीबाहेरच कराव्या लागल्या. आतील खेड्यांना भेट देता आली नाही. म्हणून लागलीच संस्थानभर दौरा काढण्याचे ठरले. मोठमोठ्या प्रमुख अशा गावच्या सभांच्या तारखा व वेळा ठरवून प्रोग्राम छापून टाकला. रोज ३/४ ते ७/८ पर्यंत सभा होत. सभेच्या गावी जाताना मध्ये जी गावे लागत त्या गावचे लोक स्वयंस्फूर्तीने मिरवणूक, सत्कार, सभा बळजबरीने पार

पाडीत. ही प्रेमाची सक्ती मोडता येत नसे. मिरवणुकीसारखे प्रकार नकोत असे कितीही सांगितले व आगावू कळवले तरी नुसत्या सभेने त्यांचे समाधान होत नसे.

कोल्हापूरच्या इतिहासात यापूर्वी अशा मिरवणुकी, अशी लोकजागृति व उत्साह खात्रीने दिसून आला नसेल. तुंबून धरलेले धरण फुटावे त्याप्रमाणे लोकांक्षेचा व आशेचा बांध जणु फुटला होता. माझी मिरवणूक म्हणजे लोकयशाची मिरवणूक असा त्यांना भास झाला होता. आतापर्यंतच्या सभा-बंदीमुळे पडलेले दडपण नाहीसे झाल्यामुळे दावे तुटलेल्या वासराप्रमाणे त्यांना नाचावे बागडावे असे झाले होते. मी येणार त्या ठराविक वेळेपासून हजारो लोक रस्त्यावर, सगळ्या लव्याजम्यासकट तिष्ठत बसलेले असत. कोनेकोपरे, छपरे माणसांनी फुलून गेलेली असत. एखादया संतपुरुषासाठी मेळावा जमावा त्याप्रमाणे स्त्री-पुरुषांचा जमाव भक्तिभावाने सभेस येई. राजे लोकांना हेवा वाटावा अशा मिरवणुकी निघत. काही काही गावी तर लोक मोटारीच्या आडवे पडून अगदी हट्टाग्रह करून मला ओढून आपल्या गावी नेत. माझ्या नावाच्या जयजयकाराने तर माझे कान सुन्न झाले. मी या मिरवणुकीकडे त्रयस्थाच्या भूमिकेवरूनच पहात होतो. पोलीस पाटील, तलाठी, कारकून, अंमलदार व शिलेदार यांच्या हुकमतीखाली सदासर्वदा मान खाली घालून राबणारा, नमणारा, हुकमाचा ताबेदार समाज–' मुक्त झाला असे वाटून हुरळला होता. याचमुळे माझ्या विषयीची त्यांची आत्मियता पराकोटीला पोचली होती. त्यांना मला 'कुठे ठेवू' असे झाले होते. डोक्यावर घेऊन नाचावेसे झाले होते. काही ठिकाणी तसे नाचवलेही पण. माझ्यामुळे त्यांच्या भावनोद्वेगाला एक वाट मिळाल्यासारखे झाले होते.

हा एवढा आतापर्यंत कोणालाही न मिळालेला मान जो मला संस्थानी शेतकऱ्यांकडून मिळाला त्या मानाला मी पात्र होतो काय? नाही! मुळीच नाही! मी काय केलं होतं? विशेष असा कोणता त्याग केला होता? दहा पंधरा वर्षे मनात तळमळत होतो व थोडाबहुत भीत भीत काही प्रयत्न करीत होतो एवढेच. पुष्कळांना वाटले की या मिरवणुकीने माझे डोके भडकले, मला आकाश ठेंगणे झाले! ज्यांना या सक्तीच्या सोहळ्यातून जावे लागले असेल व ज्यांच्या हृदयात जनतेविषयीची कृतज्ञता बुद्धी जागी असेल, त्यांनाच माझ्या मनःस्थितीची खरी कल्पना येऊ शकेल. जनतेच्या या उपकाराने, भक्तीने व गौरवाने माझ्या डोक्यावर इतकी जबाबदारी पडली, की त्या बोजाने मी चिरडून जातो की काय असे मला वाटू लागले. त्यांनी मला न झेपेल इतक्या मानाच्या जागी नेऊन बसवले होते. सर्व सात्विक गुणाचा आरोप मजवर करून त्यांनी मला

शिखरावर बसवले होते. माझ्यासारख्या यःकश्चित माणसाला हे निभणार कसे? जनतेच्या माझ्याविषयीच्या अपेक्षा खऱ्या कशा ठरणार? थरकाप होई माझ्या जिवाचा! खरोखरी हा काटेरी मुकुटच माझ्या डोक्यावर जनतेने चढवला होता. जनतेची ही भक्ती पाहून मला घबराट सुटे! काही सुचेनासे होई.

## भावनावशतेत ध्येयच्युत झालो नाही

या मनःस्थितीचा अतिरेख घोसरवाड या गावी झाला! मिरवणुकीनंतर मी व्यासपीठावर चढलो. माझ्या तोंडातून शब्द फुटेना. काय केले मी म्हणून लोकांनी मला असे डोक्यावर घेऊन नाचवावे! मला देव करावे! मला कृतज्ञतेचे हुंदके आवरता येईनात. आईला मिठी मारून मनसोक्त रडून घ्यावे, त्याप्रमाणे त्या विराटस्वरुपी मातेला कवटाळून मी ओक्साबोक्शी रडू लागलो! अश्रुंचा प्रवाह डोळ्यांवाटे सारखा वहात होता. हुंदके येत होते. 'सांगा सांगा तुम्ही का असे मला नाचवता? काय केले मी तुमचे! कशी झेपवू ही जबाबदारी मी आता!'

लोकांच्या डोळ्यांतूनही अश्रू वाहू लागले. सेव्य आणि सेवक एकरुप झालो. माझा जीव हलका पडला! या उन्मादाचा भर ओसरल्यानंतर चार शब्द बोललो. पण खरी भाषा अश्रुंचीच होती.

माझ्या स्वभावातले हे मोठे वैगुण्य आहे. माझ्या अंतःकरणात उचंबळणाऱ्या भावना मला दडवता येत नाहीत. प्रयत्न केला तरी ते शक्य होत नाही. आनंदाच्या भावना आवरता येत नाहीत, दुःखाच्या आवरता येत नाहीत. रागाच्या आवरता येत नाहीत. वर्तमानपत्र वाचताना आनंदाची बातमी वाचली, कादंबरीतील दुःखाचा प्रसंग वाचला तरी माझे अंतःकरण भरून येते.

एकदा साक्षीचा प्रसंग आला. साक्षीसाठी पन्हाळगडावरील तुरुंगातून मला करवीरी आणले. मी आलो आहे असे समजताच मला पाहण्यासाठी माझा नोकर माझ्या मुलाला घेऊन आला. पण परवानगी घेतली नसल्यामुळे मुलाला जवळ घेता आले नाही. तो दूरवरून मजकडे पहात होता. त्यामुळे मन आवरेना. आतील कालवाकालव मर्यादेबाहेर गेली. मला घेऊन आलेला पोलीस हे पाहून म्हणाला, 'साहेब, तुम्ही कच्च्या दिलाचे दिसता. पुढाऱ्याने ही सगळी बंधने, हे मायामोह तोडले पाहिजेत. मन कठोर केले पाहिजे!

त्याला काय उत्तर देणार मी! मी खजील झालो. हा गुण चांगला की वाईट याचा निर्णय मला देणार नाही. पण मी जरी असा हळवा होतो तरी मोहाला वश होऊन कर्तव्यच्युत मात्र झालो नव्हतो. माझ्या क्षयी बायकोला व बाळाला —ज्याचे मीच आईप्रमाणे पालनपोषण केले त्या माझ्या एकुलत्या एक

लाडक्या मुलाला व आजारी बायकोला टाकून मी तुरुंगात पाय टाकला होता. 'माफी मागा व बाहेर चला, आम्ही बाहेर नेतो' असे आश्वासन देता येणारे तुरुंगात आले असताही त्या मोहाला बळी पडलो नाही आणि असेही वाटते की, जर मी असा भावनामय नसतो तर गरीब शेतकऱ्यांसाठी घरादाराचा मोह तोडण्यासही तयार झालो नसतो. प्रसंगी कठोर झालो नसतो. कष्ट व त्रास जो थोडाबहुत पडला तो सहन करण्याची ताकद माझ्यात आली नसती. याच एका वृत्तीमुळे त्यांच्यासाठी झगडण्यास मी तयार झालो.



# पुंडलीक कातगडे

जन्म : १८९५, मृत्यु : ४ सप्टेंबर १९८५

याचे मूळ घराणे हावेरी (कर्नाटक) येथील. पुंडलीकांचे बालपण मिरज येथे गेले. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मिरज येथे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे शिक्षण अर्धवट सोडले. त्यानंतर गंगाधरराव देशपांडे यांच्याकडे त्यांचे मदतनीस म्हणून राहिले व त्यांच्याच आदेशानुसार म. गांधींच्या चंपारण्य जिल्ह्यांतील सत्याग्रह पर्वात सामील. त्यानंतर राजेंद्रप्रसादांच्या बरोबर बिहारमध्ये विधायक कार्य. तेथून बिहार सरकारने हद्‌पार केल्यावर म. गांधींच्या साबरमती येथील आश्रमात दाखल.

पुंडलीकजी यांनी स्वातंत्र्य चळवळीत अनेक वेळा कारावास भोगला. राष्ट्रभाषेच्या प्रचाराचे काम केले. त्यानंतर कर्नाटकात हुदली या खेड्यात ग्रामसेवेचा आदर्श म्हणून या गावाची प्रगती करण्यासाठी प्रयत्नशील. ते ४२ च्या लढ्यात भूमिगत झाले होते.

बेळगाव महाराष्ट्रात सामील व्हावा यासाठी झालेल्या चळवळीत पुंडलीक अग्रभागी होते. सांप्रत त्यांचे हुदली येथेच वास्तव्य आहे. प्रस्तुत उतारा त्यांच्या 'पुंडलीक' या आत्मवृत्तातून सादर करण्यात आला आहे.

## साबरमती आश्रमातील शिक्षण

पुंडलीक कातगडे

चंपारण्यातील हकीकत मुंबईमध्ये थोडक्यात सांगत असताना मी गांधीजींना सांगितले होते की, 'हिंदुस्थान संरक्षण कायदयाखाली माझ्यावर सरकारने काढलेली हद्दपारीची नोटीस मोडून मी तीन वर्षे तुरुंगात जाण्यास तयार होतो. शिकारपूर स्टेशनवर त्या नोटिशीच्या दुसऱ्या प्रतीवर सही करून देताना In order to obey instructions from Gandhiji I have to obey this notice असे लिहून मग त्यावर माझी सही केलेली आहे. त्या वेळी लागलीच माझे हे बोलणे संपते न संपते तोच 'तुरुंगाच्या कामाचा अनुभव तुम्हाला साबरमतीस मिळेल' असे गांधीजी मला म्हणाले होते.

पाच दिवस मुंबईत राहिल्यानंतर मला आणि मणींद्रभाईंना गांधीजींनी साबरमती आश्रमात जाण्यास सांगितले. ती. रा. रा. गंगाधरराव यांनीही 'एक वर्ष सहा महिने त्यांच्या आश्रमात राहून ये' अशा शब्दात गांधीजींच्याच म्हणण्याला दुजोरा दिला.

मी व मणींद्रभाई मिळून पुढे एक दोन दिवसात साबरमतीस जाण्यासाठी निघालो. आम्ही ज्या दिवशी आश्रमात पोहोचलो त्या दिवशी तेथे खिरीसारखे काहीतरी उत्तम पक्वान्न केले होते. 'रात्री तुम्हाला गाडीत झोप मिळाली नसेल; तेव्हा तुम्ही आता वाटल्यास थोडीशी विश्रांती घ्या' असे मगनलालजींनी आम्हाला सांगितले. गांधीजीही एकच दिवस उशीराने मुंबईहून साबरमतीस आले. तोपर्यंत आम्ही दोघे (मी व मणींद्रभाई) मुंबईतल्याप्रमाणेच आराम जेवण करून आश्रमभर हिंडून गप्पा मारीत वेळ काढीत होतो. गांधीजी आश्रमात येऊन पोहोचताच आपल्या कामाला लागले.

आश्रमातील काम अगदी घड्याळाप्रमाणे चालले होते. आश्रमाचे व्यवस्थापक श्रीमान् मगनलाजली म्हणजे या आश्रमाचे आत्मा होते. आश्रमामध्ये एखादया विजेसारखे ते चोहोकडे सर्व कामात लक्ष घालीत देखरेख करीत फिरत असत. आळस हा त्यांच्या गावीही नव्हता. रोज चार तासांपेक्षा त्यांना अधिक झोप मिळत असावी असे मला दिसले नाही. आश्रमातील प्रत्येक काम –लहानमोठे कोणतेही– श्रीमान् मगनलालभाईंना येत असे हा त्यांचा विशेष होता. सुतारीची आवश्यकता भासताच ती त्यांनी शिकून घेतली. विणकाम वगैरे

तर त्यांना येत होतेच. आश्रमामध्ये प्रार्थना चालविण्यास संगीताचे थोडेतरी ज्ञान आवश्यक आहे असे दिसून येताच त्यांनी स्वतः प्रयत्नपूर्वक आपल्या मोठेपणी संगीत शिकण्यास प्रारंभ केला व त्या शास्त्रामध्ये अ[illegible] बराच प्रवेश करून घेतला. आश्रमातील लोकांपैकी कोणाच्याही बाबतीत त्यांच्याकडून पक्षपात होत नसे; पण आश्रमातील काम अगदी काटेकोरपणे इतके व्यवस्थित करून घेताना इतके कठोर बोलत असत की ऐकणाऱ्याच्या मनामध्ये त्यामुळे क्षोभ उत्पन्न होत असे. त्यांना भिऊन जे लोक वागत असत त्यांच्यावर त्यांचे फार प्रेम असे. काम चुकल्यामुळे आश्रमाचे नुकसान झाल्याचे त्यांना इतके वाईट वाटत नसे पण कामाचा चुकारतट्टूपणा करण्यासाठी त्यांना फसविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्यांना भयंकर चीड येत असे.

त्यांच्या हाताखाली काम करणारे दुसरे एक कार्यकर्ते श्रीमान् छोटालालजी म्हणून होते. तेही सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करणारेच होते. एका आखूड पंचाशिवाय त्यांच्या अंगावर मी कधीच दुसरा कपडा पाहिला नाही. ते दे. भ. श्री. अर्जुनलाल शेट्टी यांचे शिष्य. त्यांना शिक्षा झाल्यावेळी श्री. छोटालालजींनाही अटक झालेली होती आणि असे सांगतात की पोलीसांनी त्यांना तीन महिनेपर्यंत झोप येऊ दिली नाही. प्रत्येक अर्ध्या तासाला त्यांच्या खोलीमध्ये त्यांना काठीने डिवचून उठविले जात असे. शिवाय त्या दिवसात त्यांना एकलकोंडे ठेवण्यात आले होते. त्याचा परिणाम छोटालालजींच्या प्रकृतीवर इतका अनिष्ट झाला होता की त्यांना कधीही पुढे हसता आले नाही. एक दोघे म्हणत असत की त्यांच्या ओठांवर हसण्याची छटा एक दोन वेळा आलेली आपण पाहिलेली आहे. आश्रमामध्ये मगनलालजींचे ते उजवे हातच होऊन बसल्यामुळे त्यांना कितीतरी वेळा इतरांना कामे सांगावी लागत असत. पण ते काम योग्य वेळी सुरू झालेले नाही असे पाहताच ते काम स्वतःच सुरू करीत असत; आणि एकदा त्यांनी सुरू केलेले काम संपविल्याशिवाय ते दुसरीकडे लक्ष घालीत नसत. आपले हातून सुरू झालेले काम अर्धवट दुसऱ्याच्या हाती दिलेले त्यांना खपत नसे. पू. बापूजीही त्यांना बोलावून आणण्यास जेव्हा कोणाला सांगत असत, त्या वेळी 'छोटेलालजींच्या हाती आता या वेळी काही काम नसेल तरच त्यांना मी बोलविले आहे म्हणून सांगा' असे सांगण्यात विसरत नसत. गप्पा मारीत किंवा आपल्या गत आयुष्याच्या गोष्टी इतरांना सांगत ते कधीही बसत नसत. दुसऱ्याच्या मतावर किंवा कृतीवर ते टीका कधी करीत नसत. पू. काकासाहेब कालेलकर यांच्याकडे ते कधी कधी सहज आल्यास ते सांगतील तेवढे ऐकून घेत व कदाचित् केव्हातरी एखादा छोटासा प्रश्न विचारीत. विणकाम शिकविण्याचे काम आणि आश्रमातील पुस्तकालयाची व्यवस्था ही दोन

कामे खास त्यांच्याकडे होती. त्याशिवाय मगनलालजी सांगतील ती कामे ते करीत असत. आपल्या हातून दुसऱ्याला त्रास पोहोचू नये अशी ते शक्य तेवढी काळजी घेत असत. कामात लक्ष कसे घालावे हे कोणास उदाहरण देऊन सांगावयाचे झाले तर पू. बापूजी छोटालालजींचे उदाहरण देत असत.

त्यांना काही दिवस राजगोपालाचार्य यांच्या आश्रमामध्ये विणकामाची व्यवस्था व पद्धती लावून देण्यासाठी पाठविण्यात आले होते. तेथील विणकरांमध्ये ते काम करीत होते तोपर्यंत त्यांनी आपला आहार त्या विणकरांच्या आहाराप्रमाणेच ठेविलेला होता. पुढे ते पुष्कळ वर्षांनंतर तापाने वर्धा आश्रमामध्ये आजारी पडले असताना आपल्याला दुसऱ्याची सेवा घ्यावी लागते व दुसऱ्याला त्रास दयावा लागतो म्हणून विहिरीमध्ये उडी घेऊन त्यांनी जीव दिला व आपली इहलोकची यात्रा संपविली. असो.

पू. गांधीजी आश्रमात आल्यानंतर तीन चार दिवसांनी मला वाटले की, 'पहाटे चारपासून आश्रमातील सर्व लोक आपापल्या कामाला लागतात. मुंबईमध्ये ज्याप्रमाणे एखादया माणसाची भेट घ्यावयाची म्हणजे आधी वेळ ठरवून घेतल्यावाचून आणि ती आपण पाळल्यावाचून त्याची भेटच होऊ शकत नाही त्याप्रमाणे आश्रमातही आगाऊ वेळ ठरवून घेतल्यावाचून कोणीही मनुष्य भेटण्या-बोलण्याला मिळणे कठीण होते; आणि आम्ही मात्र (मी व मणींद्रभाई) खाऊन आराम झोपतो व फिरतो हे काही बरे दिसत नाही, म्हणून मी स्वत:च एके दिवशी सकाळी नास्ता झाल्यानंतर कामाची घंटा होताच पू. गांधीजींकडे गेलो व 'मला काही तरी काम दया' असे त्यांना सांगितले. त्यांनी मला (समोरून मगनलालजी जातच होते) 'त्या मगनलालजींकडे जा, ते काम देतील,' असे उत्तर दिले.

मध्यंतरी एका गोष्टीचा उल्लेख करून मगच आपण मगनलालजींकडे जाऊ. आश्रमात आल्यानंतर तिसरे किंवा चवथे दिवशी मला पू. गांधीजींनी आपल्याबरोबर सायंकाळी फिरावयास नेले. वाटेत त्यांच्याशी मी बोलण्याला सुरवात करण्यापूर्वी त्यांनीच मला तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले की,

१. 'चंपारण्यातून परवा मुंबईस आल्यानंतर मी थोडक्यात चंपारण्यातील हकीकत सांगण्यास तुम्हाला सांगितले होते पण तुम्ही वीस मिनिटे घेतलीत. माझी घाई होती याच्याकडे मी तुमचे लक्ष वेधले होते. तथापि इतका वेळ तुम्हाला लागला. असल्या बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष देण्यास शिकले पाहिजे.: आता फिरावयास आपण जाताना मला चंपारण्यातील हकीकत वाटेल तेवढ्या पाल्हाळाने सांगा; मला ते सर्व ऐकावयाचे आहे.

२. 'दुसरी गोष्ट मुंबईमधील सायंकाळच्या भोजनाची. तुम्ही मुंबईस तुमच्या परिचितांना भेटावयास जाऊन येत होता. हे योग्यच होते. पण जातानाच सायंकाळी येथे केव्हा भोजन करतात, आपण केव्हा परत आले पाहिजे, याची चौकशी करून तुम्ही जावयास पाहिजे होते. आपल्यासाठी दुसऱ्यांना वाट पहात बसावे लागेल, अशी पाळी कधी आणू नये. तुम्हाला सोडून भोजनास बसणेही इतरांना अवघडच की नाही? त्या दिवशी कोणासही काही न विचारता तुम्ही उपाशीच झोपलात हे मला आवडले; पण असले प्रसंग आपल्यावर कधी येऊच नयेत, अशी काळजी घेण्यात आपण इतरांचीही सेवा करीत असतो.

३. 'आणि तिसरी गोष्ट अशी की तुम्ही तुमच्या मित्राला मुंबईमध्ये मला भेटण्यासाठी घेऊन आलात ते ठीक झाले. मलाही त्यांना भेटण्यात आनंद झाला; यात तुमची चूक नव्हती; पण मला आगाऊ येऊन काहीच न विचारता एकदम त्यांना माझ्याकडे घेऊन आलात. एखादया वेळी मला सवड नसते. समोर येऊन उभ्या राहिलेल्या मनुष्याबरोबर बोलावे हे लागणारच ना? तेव्हा, केव्हाही आपण ज्यांच्याकडे जातो त्यांना सवड आहे किंवा नाही याची चौकशी करून मग कोणासही त्यांच्याकडे घेऊन जावे, किंवा आपण त्यांचा वेळ घ्यावा. या गोष्टी ध्यानात ठेवा.'

पू. गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे मी श्री. मगनलालजी यांच्याकडे गेलो व त्यांना 'मलाही काहीतरी काम देण्यास गांधीजींनी सांगितले आहे' असे म्हटले. त्यांनी मला आपल्याबरोबरच तसेच बोलत बोलत नेले. वाटेत नाव, गाव, चंपारण्याची थोडीशी माहिती मला ते विचारीत होते. 'सकाळचा नास्ता घेतला काय? स्नान झाले काय?' असे प्रश्न विचारले. आम्ही बोलत बोलत ओळीने दहा पायखाने असलेल्या ब्लॉकजवळ येऊन उभे राहिलो. ते सर्व उघडून दाखवून, श्री. मगनलालजी मला म्हणाले की, 'एवढे आठ दहा पायखाने साफ करण्याचे काम तुम्ही हाती घ्या.' 'पायखाना साफ कसा करावा,' पुढे ते मला म्हणाले, 'हे तुम्हाला माहीत नसेल. म्हणून मी सांगतो त्याकडे लक्ष दया.' (मी त्यांच्या तोंडाकडे न पाहताच ऐकून घेत होतो.) 'हे पायखाने नवीन पद्धतीचे आहेत. आत एका पेटीमध्ये किंवा खोक्यामध्ये माती ठेवलेली असते. खाली दोन बालड्या असतात. एकीमध्ये मल पाडावयाचा आणि दुसऱ्या बालडीमध्ये मूत्र पाडावयाचे. मूत्राचे शिंतोडे अंगावर उडू नयेत म्हणून पुढच्या बालडीवर एक खोलगट, मध्ये भोक असलेली पत्र्याची तबकडी ठेवलेली असते. मल व मूत्र आणि आपण उपयोग करीत असलेले पाणी यांचे एकत्रीकरण झाले म्हणजे घाण फार होते आणि साफ करण्यासही त्रास व किळस येते. शौचविधि झाल्यानंतर मलावर खोक्यातील माती घालावयाची म्हणजे वास काहीच येत नाही. मूत्राच्या

बालडीमध्ये मात्र माती घालावयाची नाही. त्या बालडीत शौचानंतरचे सांडपाणी पडत असल्याने लघवीची घाण वर येत नाही. दोन्ही बालड्या ठेवलेली जागा रोजच्या रोज धुऊन काढली पाहिजे. पायखान्याची खोली देखील एक बालडी पाणी ओतून झाडून काढीत असावे. प्रत्येक पायखान्यातील दोन्ही बालड्या रोज घासून स्वच्छ केल्या पाहिजेत. पाय-खान्यातील पेटीमध्ये माती पुरेशी आहे किंवा नाही याकडे लक्ष असावे. पायखान्याभोवतीची जागा एक दिवसाआड झाडली तरी चालते. पायखान्यातील मल व मूत्र त्या जागेत (अंगुलिनिर्देशाने ती जागा दाखवीत ते म्हणाले) थोडासा खोल खड्डा काढून त्यात घालून वर माती घालावी. एक खड्डा या आठ दहा पायखान्यांना चार दिवस पुरू शकतो. तो खड्डा किती रुंद व किती खोल काढाल त्यावरच अवलंबून असणार. पूर्वी ती जागा अशा खड्ड्यासाठी वापरलेली आहे तीच पुन्हा उकरली जाऊ नये यासाठी काहीतरी खूण करून ठेवावी.' असे सांगून मगनलालजी आपल्या कामाला झपाझप पावले टाकीत जाऊ लागले.

'पण हे काम मी आजपासूनच करावयाचे की उद्यापासून?' मी त्यांच्याबरोबर पळत पळत जात असताना विचारले.

'आजचे काम झालेले आहे. उद्यापासून करा. हल्ली हे काम कोण कोण करीत होते त्यांना शोधून काढा व त्यांच्याकडून अधिकची माहिती घ्या.' 'आज मला मग काहीच काम नाही?' मी अधिक खात्री करून घेण्याच्या हेतूने विचारले. तो झटकन ते बोलून गेले की, 'मी सर्व आश्रमातील कामातून फेरी मारीत आहे. वाटल्यास माझ्याबरोबर हिंडा.' विणकामाचे माग, सुताचे कोठार, चरखा कारखाना, पुस्तकालय, ऑफीस, स्वयंपाकगृह या सर्व ठिकाणी ही स्वारी फिरली. 'घोडे ओझ्याने मेले आणि शिंगरू येरझाऱ्याने मेले' असे म्हणतात ना, तशी माझी स्थिती झाली होती. विणकामामध्ये सर्व मागांजवळ मिनिट दोन मिनिटे ते उभे राहिले. छोटेलालजींना काही सूचना दिल्या.

छोटेलालजी त्या भागाचे व्यवस्थापक असले तरी त्यांना स्वतःला एक माग घालून दिलाच होता. फावल्या वेळी तेही आपल्या मागावर विणत असत. सुताच्या कोठारात गेले व ते कसे रचून ठेवावे हे स्वतः काम करून तेथील लोकांना त्यांनी सूत रचून दाखविले. लाजेने मीही तेथे असेतोपर्यंत त्या कामाला थोडासा हातभार लावला. चरखा कारखान्यात ते गेले. तेथे स्वतः सुतारी काम करावयास बसले; कारण त्या वेळी त्यांचे स्वतःचे असे काही तरी चरख्यावर प्रयोग चालेले होतेच. विणकामाला त्या वेळी गिरणीचे सूत वापरीत असत. तेवढी उणीव त्यांना भरून काढावयाची होती. पुस्तकालयात छोटालालजींना ते घेऊन गेले व ती सर्व पुस्तके झाडून पुसून ठेवावयास त्यांना सांगितले; आणि 'या

कामी पुंडलीकजी –कारण आजच्या दिवस ते मोकळेच आहेत– तुम्हाला मदत करतील' असेही त्यांनी सांगून टाकले. आणि शेवटी स्वयंपाकघरात गेले व तेथे हातपाय धुवून फुलक्या लाटण्यास बसले.

मी माझ्या खोलीमध्ये पू. काकासाहेबांच्या बरोबर त्यांच्याच घरी गेलो व अंथरुणावर स्वस्थ बसून विचार करू लागलो. 'देशभक्तीमध्ये माझ्याच नशिबी हे भंग्याचे काम कोठून आले? यात मला कोणते शिक्षण मिळणार आहे? यांनी सांगितलेले सर्व काम रोज करावयाचे म्हणजे निदान चार तास तरी खर्च करावे लागतील. त्यातल्या त्यात आपले गावचे तरी येथे कोणी नाही, ही समाधानाची गोष्ट आहे. पण काही झाले तरी यांच्या परीक्षेमध्ये नापास होऊन बेळगावास जाणे योग्य होणार नाही. दे. भ. गंगाधररावांच्याकडून आलेल्या मनुष्याला असे वागविणे हे या व्यवस्थापकाला शोभते काय? गांधीजींना काय? त्यांना पुष्कळ कामे! असल्या क्षुल्लक कामाकडे लक्ष देण्यास त्यांना सवड तरी कशी मिळणार?' असे एक ना दोन, शेकडो विचार मनामध्ये येऊन गेले. पण त्याच्या उपयोग काय?

मला हे काम दिले गेले असल्याबद्दल मी पू. श्री. काकासाहेब कालेलकर यांच्याकडेसहज बोलून पाहिले; पण ते मला म्हणाले की, 'तुमच्या अंगावर पडेल ते व येईल तसले काम मनःपूर्वक करून दाखवावे.'

दुसऱ्या दिवसापासून मी या पायखान्याच्या कामास प्रारंभ केला. हे काम सकाळी आठ वाजता सुरू व्हावयाचे ते दहा वाजता संपत असे. खड्डे खणणे व संडासामधील खोक्यांमधून माती भरणे ही कामे दोनप्रहरी व्हावयाची. त्याला अर्धा पाऊण तास लागत असे. पहिल्या दिवशी हे काम झाल्यानंतर साबरमती नदी पोहून पलीकडे मी गेलो व तेथे रडत बसलो. परंतु रडण्यासही सवड नव्हती. कारण, नाहीतर भोजनाला जाण्याची वेळ चुकावयाची! कितीही साबण लावून हात धुतले तरी हाताला दुर्गंधी येत असल्याची उगाचच शंका यावयाची. म्हणून भात व डाळ चमच्याने खाण्यास प्रारंभ केला. एक दोन दिवस गेल्यानंतर अर्थात् ही भावना थोडी कमी होऊ लागली.

तिसरे दिवशी माझे काम संपते न संपते तोच श्री. मगनलालजी माझे काम पहाण्यास संडासाजवळ हजर! बालड्या उचलून त्यांनी त्यांचा वास घेऊन पाहिला. सर्व संडासांमध्ये हिंडून पाहिले. आणि एका संडासामध्येच उभे राहून तेथील मलाची बालडी हातात घेऊन मला ते म्हणाले की, 'उत्तम काम झाले आहे. पण काही गोष्टींकडे यापेक्षा अधिक लक्ष द्यावयास पाहिजे. बालडीला वासही न येईल अशी खटपट केली पाहिजे. वाळूने आणि आपल्या हातात गवत धरून बालडी जरा नेटाने दाबून घासावी आणि स्वच्छ झाल्यानंतर पुन्हा त्यात

नवीन माती तळाला पसरून मगच बालडी ठेवावी. संडासाच्या आतील भागात कोपऱ्यांतून केर दडून बसलेला असतो. त्याला तेथन हुसकावा आणि खोक्यामध्ये माती भरत असताना ती खाली पडते तीही झाडून काढावी. किंवा संडास झाडण्यापूर्वी प्रथम माती भरण्याचेच काम करावे आणि संडासामध्ये जाऊन आल्यानंतर मलावर माती घालण्यास कोणी विसरत असेल तर त्याचे स्मरण ठेवून, माती घालण्यास त्यांना सायंकाळच्या प्रार्थनेनंतर तेथेच सांगावे. कारण आपण तेथेच सर्वांना एकत्रित भेटू शकतो. शिवाय कोण माती घालण्यास विसरले आहेत हे आपल्याला समजले नसले तरी सर्वसामान्यपणेही आपण तेथे तसे सांगू शकतो. आणि हे पहा, दोनप्रहरी एखादे वेळी संडासाकडे फेरीमारून कोणी मलावर माती घालण्यास विसरून गेले असल्यास आपण स्वतःच माती घालून जावे. बाकी आपले काम उत्तम आहे.' असे सांगून ते निघून गेले. चार पाच दिवसांनंतर फिरावयास गेल्यावेळी पू. बापूजींनी मला विचारिले की, 'तुम्ही कोणते काम करता?'

'पायखाने साफ करण्याचे.' मी खाली पहातच त्यांना उत्तर दिले. 'सौभाग्य की बात है.' गांधीजी उद्‌गारले. मी 'हूं' सुद्धा म्हटले नाही. पण तेच पुढे म्हणू लागले की, 'समाजाची केवढी सेवा आपले भंगी बंधु करीत असतात! आणि समाज त्यांनाच अस्पृश्य मानतो. ते काम घाण किंवा ओंगळपणाने होत असेल तर त्यात आपण सुधारणा केली पाहिजे.'

'हे मात्र मला पटते.' मी मध्येच बोलून गेलो. आणि 'हे काम मी किती दिवस करावयाचे आहे?' मी विचारले. 'फार नाही; एक जन्म.' हे गांधीजींचे शब्द ऐकताच मी हादरूनच गेलो. मला वाटले की, मी भंग्याचे पोटी जन्माला आल्यासारखे झाले. निदान मी या आश्रमात असेपर्यंत तरी मला याच कामात रहावे लागणार. पण बोलावयाचे कोणाजवळ?

पुन्हा पुढे चार सहा दिवस गेल्यानंतर गांधीजीनीच मला विचारले की, 'कसे काय चालले आहे तुमचे काम?'

'आता ठीक आहे. इतका वास किंवा किळसही येत नाही.' मी समाधानाने उत्तर दिले. फिरणे संपून अगदी आश्रमापाशी आल्यानंतर आम्ही आपापल्या घरी खोलीकडे जाण्याच्या वेळी गांधीजी मला म्हणाले की, 'उदया काम बदलून घ्या. आता दुसऱ्या कामाचा अनुभव'. या त्यांच्या बोलण्याने मला बरे वाटले असले तरी आता उदया दुसरे कोणते काम येते कोणास ठाऊक? या चिंतेमध्ये मी रात्र घालविली. दुसरे दिवशी पहाटे प्रार्थना संपताच श्री. मगनलालजींनी म्हटले की, आश्रमात पाणी भरण्याचे काम आजपासून पुंडलीकजी करतील.' मला वाटले की संडासाचे काम असून शिवाय या कामाची त्यात भर तर पडली

नाही ना! 'माझ्याकडे संडास साफ करण्याचे काम आहे' असे मी तेथेच त्यांना सांगितले व उत्तराची अपेक्षा करीत थोडा वेळ थांबलो.

ते काम आता दुसरे करतील.' मगनलालजी म्हणाले.

मी एकंदर चौदा दिवस हे संडास साफ करण्याचे काम केले असेल. हा अनुभव आता मला मौल्यवान् वाटतो.

## आश्रमातील पाणी भरण्याचे काम

श्री. मगनलालजींनी मला आश्रमात दोन तीन ठिकाणी हिंडवून कोठे कोठे व किती पाणी भरावयाचे ते दाखविले. पाणी भरावयाची भांडी रोज आतून बाहेरून घासावयाची असत. त्याचबरोबर इमामसाहेब –आफ्रिकेत गांधीजींच्या-बरोबर असलेले त्यांचे सहकारी– यांच्या बिऱ्हाडीही मला पाणी भरावयाचे असे. रसोडा – स्वयंपाकगृहामध्ये एक पंचवीसतीस घागरींचा मोठा हंडा होता. तोही रोज सकाळी घासावयाचा असे. सबंध दिवसामध्ये सर्व मिळून चाळीस पंचेचाळीस पोहरे पाणी लागत असे. हे सर्व पाणी विहिरीतून रहाटावरून ओढावे लागत असे. हे सर्व काम मी अगदी चोख व काहीही आळस न करता करीत असे. एकदा त्याबद्दल मगनलालजींनी माझी वाहवा देखील केली. पण एके दिवशी मला वाटले की, 'मोठा हंडा रोज कशाला घासावयास पाहिजे? बाहेरून अगदी लखलखीत करून आतून एक दिवस नाही घासला म्हणून काय होते? पाणी तुडुंब भरल्यानंतर आज तो हंडा आतून घासला आहे किंवा नाही मगनलालजींना कसे कळणार?' पण त्याच दिवशी अगदी भोजनाच्या वेळी मगनलालजी त्या हंड्याजवळ आले व मला त्यांनी विचारले की, 'हा हंडा बाहेरून इतका सुंदर घासला आहे, तसाच आज आतून घासलेला आहे ना?'

'त्यात थोडेसे पाणी शिल्लक होते. आणि म्हणून मी आतील बाजू न घासता त्या पाण्याचाही उपयोग करून घेतला आहे.' खोटे बोलावे की खरे सांगावे याचा विचार करीत करीत मी वस्तुस्थिति सांगून मोकळा झालो.

'ते सर्व पाणी ओतून टाकून तो हंडा आतून घासा व नंतर तो पुन्हा भरा.' श्री. मगनलालजी म्हणाले.

मग मात्र मला चीड आली. मी लागलीच गांधीजींच्याकडे गेलो व त्यांच्याकडे तक्रार केली. सर्व हकीकत त्यांना सांगितली व म्हटले की, 'हे मगनलालजी भारी त्रास देतात. एखाद्याला किती छळावयाचे?

'त्यांतील पाणी स्वयंपाकाला घेतात ना? आतापुरते एक दोन डोल ताजे पाणी त्यांना आणून द्या आणि भोजन वगैरे झाल्यानंतर सावकाशीने तो हंडा धुऊन पाणी भरा. तोपर्यंत अर्धा हंडा तरी खपून जाईल. आणि भरावयाचा तोही

अर्धाच भरा. उदया सकाळपर्यंत पाणी पुरले म्हणजे झाले. भोजन झाल्यानंतर भांडी घासण्यासाठी त्याच हंडयांतील पाण्याचा उपयोग करण्यास सर्वांना सांगावे म्हणजे त्यातील बरेचसे पाणी संपूनही जाईल.' गांधीजी म्हणाले.

मी रागारागाने ते सर्व पाणी टाकून दिले व पुन्हा तो हंडा भरून ठेवण्याचे ठरविले. परंतु हंडा अगदी भरत भरत आला होता त्या वेळी माझा क्रोध कमी झाला होता; म्हणून शेवटच्या दोन तीन घागरी कमीच घातल्या होत्या.

इमामसाहेबांच्या घरीही पाणी भरावयास मी जात असल्यामुळे माझा त्यांचा पुष्कळच परिचय झाला होता. त्यांची पत्नी, दोन मुली व ते इतकीच मंडळी त्यांच्या कुटुंबात होती. त्यांची मुलगी अमीना नेहमी उदयोगामध्ये असावयाची. इमामसाहेब हे गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील सहकारी होते. त्यांचा स्वभाव अत्यंत शांत होता. गांधींच्या वाढदिवसादिवशी सायंकाळी गांधीजींच्या समक्ष गांधीजींच्या आयुरारोग्याबद्दल ईश्वराची प्रार्थना करण्यात आली. प्रार्थनेनंतर काही मंडळींची छोटी छोटी भाषणेही झाली. त्यात इमामसाहेबांनी ईश्वराची प्रार्थना करून गांधीजींची आपल्या सत्य-अहिंसा तत्त्वांवरील श्रद्धा कायम राहू दे' अशी मागणी ईश्वरापाशी केली होती.

हे पाणी ओढण्याचे काम माझ्या इतके अंगवळणी पडले होते की पन्नास साठ पोहरे पाणी ओढणे मला अगदी हातचा मळ झाला होता. मात्र हे श्रमाचे काम असल्यामुळे भूक खूपच लागत असे. भातापेक्षा गुजराथी फुलके खाणेच मला आवडत असे. मी व मणींद्रभाई आम्ही दोघेही फुलके पुष्कळच खात होतो. फुलके करण्यास इतरांना श्रम करावे लागतात तसे भाताचे नाही. 'फुलक्यांपेक्षा भात खा' अशी सूचना श्री. मगनलालजींनी आम्हा दोघांना केली. आम्ही दोघांनीही त्यांना काहीही उत्तर दिले नाही. पण आपला भोजनातील फुलकेच खाण्याचा नित्यक्रम पूर्ववत्च चालू राखला. शेवटी मगनललाजींनी ही तक्रार पू. गांधीजींपर्यंतही नेली. एके दिवशी प्रार्थना झाल्यानंतर पू. गांधीजींनी स्वतःच सर्वांसमक्ष आम्हाला त्याविषयी विचारले. माझे काम, आणि महाराष्ट्रातील लोकांचा आहार, याविषयीची माहिती सांगून मी म्हटले की, 'मला भात अधिक खाववत नाही. पण कधी कधी वाटते की तुपाशिवाय अधिक फुलक्या खाणे योग्य होईल काय?'

'फुलक्या चांगल्या चावून खाल्या जातील तर कमी लागतील आणि तितके इतरांचे श्रम वाचतील' असा युक्तिवाद मगनलालजींचा होता. पण गांधीजींनी 'त्यांना फुलक्याच अधिक लागत असतील तर त्या मानाने त्यांना तूपही अधिक वाढले जावे' असाच निर्णय दिला.

हे पाणी ओढण्याचे काम जवळ जवळ मी एक महिना केले असावे. त्यानंतर मला दळण्याचे काम देण्यात आले.

## आश्रमातील दळण्याचे काम

सकाळी कामाची घंटा झाल्यानंतर मी माझ्या पाणी ओढण्याच्या कामाला प्रारंभ करणार होतो, पण मगनलालजींनी मला सांगितले की, 'आजपासून दळण्याचे काम करीत जा.' जात्यावर बसून काम करीत असलेल्या मंडळीकडून माहिती घेण्यास मला बजावून ते निघून गेले. गुजराथेमधील जाती, विशेषतः आश्रमातील जाती, निराळयाच प्रकारची होती. फुट सव्वा फूट उंच अशा लाकडाच्या बैठकीवरच जाते बसविलेले असावयाचे. ते जाते हलके किंवा जड करता यावे अशी व्यवस्था त्यात असे. जात्यावर दोघे बसले तर जरा काम करण्यास सोपे जात असे. सकाळी दोन तीन तास व सायंकाळी दोन तास दळावे लागत होते. दळताना माझ्या डोक्यात इतके विचारांचे काहूर माजून जात होते की कधी कधी त्या विचाराच्या वेगाबरोबर माझा जात्याचा वेगही भलता वाढत असे. मला वाटत असे की– 'या दळत बसण्याने देशाला स्वातंत्र्य कसे मिळणार? आजपर्यंत घरोघर बायका दळण्याचे काम करीत आल्या आहेतच की! आणि माझ्या देशभक्तीच्या वेळीच माझ्यानशिबीच हे कसे आले? दळत बसण्याने इंग्रजांविषयी देशात अप्रीती कशी उत्पन्न होणार? जितका अधिक वेळ किंवा अधिक धान्य दळू तितके अधिक जवळ स्वराज्य येते काय?

अशा रीतीने मी खूपच विचार करीत असे. पायखाना साफ करणे, पाणी ओढणे, दळणे वगैरे कामे करण्यानेच स्वराज्याची तयारी होत आहे असे प्रतिपादणारा कोणी आपल्याशी बोलत आहे अशी कल्पना करूनच की काय माझे विचार खूप जोराने दौडत असत. पण ते जात्याच्या गतीप्रमाणे पुन्हा पुन्हा त्याच जागी येत असत.

चार पाच जाती एका मोठ्या खोलीमध्ये ठेवलेली होती. प्रत्येक जात्यावर दोघे दोघे दळण्यास बसत असू. जोडीदार कोणी मिळाला नाही तर ते जाते एकट्याने चालवावयाचे असे. बहुतेक कोणीतरी जोडीदार मिळत असे. या आठ दहा मंडळींमध्ये दळताना निरनिराळ्या विचारांवर खूपच वाद चालत असे. तो ऐकावयास मला मिळत असे. त्यामुळेच गुजराथी भाषेचाही परिचय झाला. त्यांच्या चर्चेमध्ये मीही हिंदीमध्ये भाग घेत असे. मी चर्चेमध्ये भाग घेतला तर मग हिंदीमध्येच वादविवाद चाले. पू. गांधीजी आठवड्यातून तीन चार वेळा तरी दळण्याच्या भागात येऊन जात असत. 'कैसा चला है काम?' असे सहज विचारून मिनिट दोन मिनिटे तेथे उभेही रहात असत.

श्री. मगनलालजी मात्र रोज येत असत व सर्व जात्यांवरील पीठ चिमटीमध्ये घेऊन बरोबर होत आहे किंवा नाही हे पहात असत. मला एकदा ते म्हणाले की, 'पुंडलीकजी, या कामात तुम्ही नवीन आहात. वारंवार मधून मधून पीठ बारीक पडते आहे किंवा नाही ते पाहून कमी अधिक घास करावा. किंवा मधली चकती लहान मोठी करावी. पीठ फार जाड असल्यास ते पुन्हा दळावे लागते व मग दळताना फार त्रास होतो.' मी खाली पहात व जात्यावरील हात न थांबविता त्यांचे सर्व बोलणे ऐकून घेतले. 'पीठ किती बारीक यावयास पाहिजे? हे माझे पीठ पहा.' एकदा नीट समजावून घेऊ या; मग त्यांची उगाच भगभग नको या बुद्धीने मी म्हटले.

श्री. मगनलालजींनी माझे पीठ पाहिले आणि समोरच्या दुसऱ्या जात्याकडे बोट करून ते मला म्हणाले की, 'तुमचे पीठ याच्यापेक्षा बारीक यावयास पाहिजे. त्या जात्यावरील पीठ पहा. उठा जरा.'

मी ते पीठ पाहून परत माझ्या जात्याकडे येण्यापूर्वी मगनलालजी स्वतःच जात्यावर दळावयास बसले होते. दहापाच मिनिटे दळून ते मला म्हणाले की, 'पहा आता पीठ, इतके बारीक पीठ पडावयास पाहिजे.' एखादया वेळी ते सहज जरी जात्यावर बसले तरी बोलत बोलत अर्धा अर्धा तास उठत नसत. ते आले की मला तरी भीति वाटत असे. "माझ्याच का पाठीमागे ही स्वारी लागली आहे?" असे माझ्या मनात कितीतरी वेळा येऊन गेले असेल. चार सहा दिवसांत दळण्याच्या कामाचीही संवय झाली. मनातील क्षोभही कमी झाला.

पू. गांधीजींबरोबर मी फिरावयास जात असे त्या वेळी मी त्यांना माझ्या शंका विचारीत असे. आपल्या मनाची तयारी करण्यासाठी आपल्या मनातील स्वतःविषयी व भिन्न भिन्न कामाविषयी उच्चनीचपणा वाटत असतो तो काढून टाकण्यास या सर्व कामांतून जाण्याने मदतच होत असते असेही ते एकदा म्हणाले होते. या कामाविषयीचा माझ्या मनातील तिरस्कार व्यक्त न करता मी त्याला एक सौम्य शंकेचे स्वरूप देऊन विनयाने माझी शंका म्हणून मी गांधीजींना प्रश्न केला तरी ते त्या प्रश्नामागील भूमिका बरोबर मांडूनच मला ते समजावून सांगत असत. पण एकंदरीत पायखाना साफ करणे किंवा पाणी ओढणे या कामापेक्षा हे दळणाचे काम सोपे होते, म्हणून मी त्यात सुखी होतो. पुढे पुढे तर मी एकटाच असलो म्हणजे दळताना मी पदेही म्हणत असे. एक गुजराथी लठ्ठ दांडगा मुलगा आश्रमात रहावयास आला होता. आश्रमात आल्यानंतरच त्याने लिहिणे वाचणे शिकण्यास प्रारंभ केला. स्वभावाने तो अत्यंत शांत पण एककल्ली होता. त्याला एकदा मगनलालजींनी आपले स्वतःचे कपडे स्वच्छ ठेवीत जा असे सांगितले असता, 'मी काही वॉशिंग कंपनी काढलेली नाही. आमचे कपडे घाण असू देत.'

असे उत्तर त्याने दिले होते. नाश्ता किंवा न्याहारी आणि दोन्ही वेळचे भोजनापूर्वी आश्रमात घंटा वाजवीत असत. म्हणून एकदा या गुजराथी मुलाला भूक लागली असताना त्याने केव्हातरी मधल्या वेळीच घंटा वाजविली आणि रसोडा (स्वयंपाकगृह) मध्ये स्वतः जाऊन उभा राहिला. सायंकाळी प्रार्थना आटोपल्यानंतर, मध्येच कोणी घंटा वाजविली याची विचारपूस झाली. त्या वेळी त्याने स्वतःच आपण घंटा वाजविल्याचे –आपण तसे का केले याच्या कारणासहित– सांगितले होते. हा मुलगा सकाळी चार तास, तिसऱ्या प्रहरी दोन तास न बोलता दळत असे. तास तास दळताना हात बदलतही नसे. या स्वारीची व माझी जात्यावर दोस्ती जमली. तो गुजराथी बोलत असे व मी हिंदीमध्ये बोलत असे. दळण्याच्या कामावरही स्वारी बेहद्द खूष होती. 'काम वाटल्यास करीत नाही म्हणून सांगावे पण एकदा ते आपण स्वीकारल्यानतर मग अगदी बरोबर प्रामाणिकपणे केले पाहिजे' असे दळत असताना तो रोज एकदा तरी म्हणत असे. हे कामही मी जवळ जवळ एक महिनापर्यंत केले असावे. एके दिवशी सकाळी नाश्ता करून मी जात्याकडे निघालो होतो, इतक्यात मगनलालजी माझ्याकडे आले व म्हणाले की, 'तुम्ही आश्रम झाडण्याचे काम घ्या. सर्व आश्रम सायंकाळपर्यंत झाडून काढण्याचे काम संपवून टाका म्हणजे झाले.' प्रत्येक ठिकाणचा स्वतंत्र झाडू त्या त्या ठिकाणी आहे. जागा झाडून झाल्यानंतर तो झाडू शेवटी झाडूनच जागच्या जागी ठेवा. झाडणीमधील काड्या, गवत किंवा जे काही असेल ते सुटून पडू लागल्यास ते केरात जाऊ न देता पुन्हा त्या झाडणीमध्ये बांधावे. आठवड्याला एकदा सर्व झाडण्या घट्ट नीट बांधून घ्याव्यात. झाडणीवर पाणी पडलेले असल्यास ती उन्हात टाकून वाळवून घ्यावी. झाडणी झिजून गेली असल्यास तिनेच झाडत बसू नये. कोठीमधून दुसरी झाडणी मागून घ्यावी. केर कोठेही कोपऱ्यात लावून ठेवू नये. सर्व केर एकत्रित करून उकीरड्यावर रोजच्या रोज गेला पाहिजे. वाटेत हिंडता फिरता कागदाचा कपटा कोठे पडला असल्यास तो पाहून तसेच न जाता, तो केराच्या डब्यात नेऊन टाकावा. ठिकठिकाणी ठेविलेले केराचे डबे रोजच्या रोज मोकळे करावेत आणि त्यांची जागा थोडी अदलून बदलून सरकवावी.' असे सांगून श्री. मगनलालजी निघून गेले. छोटेलालजींनी मला एकदा चोहोकडे हिंडून कोणकोणता भाग झाडावयाचा असतो हे दाखविले. त्यात जाता येताना रस्ताही दाखवून ठेवला होता. हे केर काढण्याचे काम मी पंधरा दिवस केले. रस्ते उभ्याने जाडता यावेत म्हणून स्वतंत्र पद्धतीच्या झाडण्या केलेल्या होत्या. मधून मधून मगलालजींची फेरी झाली म्हणजे 'अमुक खोलीमध्ये केर बरोबर निघालेला नाही' असे सांगून जाण्यास ते कधी विसरत नसत. मी ती खोली नंतर जाऊन पुन्हा झाडली किंवा नाही हेही पहाण्याची त्यांना सवय होती.

एकदा मी रस्ता झाडीत असताना त्याच्याजवळचा साबरमती तुरुंगाला जाणारा रस्ता म्युनिसिपालिटीची एक हरिजन बाई झाडीत होती. तिने आपले मूल जवळच्या झाडाला टांगलेल्या झोळीत निजविले होते. रस्ता झाडीत झाडीत ती बाई बरीच लांब गेली. होती. इतक्यात ते मूल त्या झोळीत रडू लागले. ती झोळी मी हलविली, तिला झोका दिला, तरी ते काही केल्या थांबेना. मग त्या मुलाला झोका थांबवून बोलाविल्यावर मात्र ते हसू लागले. ती बाई परत येईपर्यंत मी त्या मुलाला हलवीत व खेळवीत उभा होतो. चार पाच मिनिटांच्या आतच ती बाई आली. इतक्यात मगनलालजी तेथूनच कोठेसे गेले. त्यानी हे पाहिले असल्यामुळे मी एकदम दचकलो. मला वाटले की, 'आपले काम सोडून हे काय करीत आहा?' असे ही स्वारी मला म्हटल्यावाचून रहाणार नाही. पण झाला तो प्रकार अगदीच उलटा. त्यांना मी स्वाभाविकत: केलेली ही गोष्ट फारच आवडली. त्यांनी ती गांधीजींनाही सांगितली. पू. काकासाहेबांना तर मी स्वत:च ती सांगितली होती.

सबंध आश्रम झाडून होईपर्यंत म्हणजे कमरेचा काटा ढिला होता असे. आणि त्यात सबंध दिवस खर्च होत असे. काही वाचन वगैरे करण्यास तर मुळीच सवड होत नसे. थोडीशी सवड मिळाली तरी शरीर थकून गेलेले असल्यामुळे काहीच लक्ष लागत नसे. पण या कामातही मी रुळल्यानंतर तेही अंगवळणी पडले. थोडक्या वेळात ते कसे उरकून घ्यावे याचा विचार मी करू लागलो. सकाळी कामाची घंटा वाजण्यापूर्वीच मी झाडण्याच्या कामाला प्रारंभ करीत असे. वेळेवर जाता येता कागदाचे कपटे उचलून दूर फेकण्यास न विसरले तर जाण्यायेण्याचा रस्ता रोज झाडण्याचे कारण नसे. एखादे दिवशी पाऊस पडला तर रस्ता झाडण्याचे कारण नसले तरी पडव्या फार घाण होत असल्यामुळे त्या दोन वेळा झाडाव्या लागत. कोठेतरी केर किंवा घाण झालेली असली तर जो तो माझ्याकडे टक लावून पहात असे. मला तो एक अपमानच वाटत होता. आणखी चार खोल्या अधिक झाडाव्या लागल्या तरी पत्करल्या पण वाटेल त्यांनी वाटेल तेथे घाण करावी आणि ती घाण पाहून ज्याने त्याने माझ्याकडे 'याला हे जबाबदार' या बुद्धीने पहावे याचे मला कसेसेच वाटत असे. पण या कामातूनही मी मगनलालजींच्या दृष्टीने उत्तीर्ण होऊन बाहेर पडलो.

## आश्रमातील विणकामाचे शिक्षण

विणकामात मला घालण्यापूर्वी सूत सोडविणे, सूत भिजविणे, नवार करणे, कांड्या भरणे, कापडाला घड्या घालणे, कापड विणून झाल्यानंतर त्यावरील सुताची लांडी टोके कापून काढणे, या कामामध्ये काही दिवस काढल्यानंतर मला एक स्वतंत्र हातमाग देण्यात आला. नवार विणण्यामध्ये

विणाईमधील रचना, माहिती व तत्त्व मूलतः येऊन गेले होतेच. विणकामाच्या इमारतीमध्येच एका कोपऱ्यात आश्रमाचे पुस्तकालय होते. त्याला लागूनच माझा माग होता. माझे सर्व लक्ष त्या पुस्तकालयाकडे होते. छोटेलालजींबरोबर पुस्तके झाडीत असताना मी सर्व पुस्तके पाहून घेतली होती. प्रत्यक्ष मागावर बसेपर्यंत इतर कामात चुकारतट्टूपणा करून वाचन करण्यास वेळ चोरून काढता येणेच शक्य नव्हते. पण मी मागावर बसू लागल्यापासून मांडीवर पुस्तक ठेवून त्यातील भाग वारंवार पहात तो पाठ करता येणे शक्य होते. उपनिषदे पाठ करण्याची माझी इच्छा पुष्कळ दिवसांची माझ्या मनात होतीच. तशा प्रकारचे पाठांतर करण्यास मागावर बसून पुष्कळच वेळ चोरता येण्यासारखा होता. मी या आश्रमातील मागावर बसूनच दशोपनिषदे वाचली. त्यापैकी काही अर्धवट पाठही केली. हिंदी व्याकरणाचाही अभ्यास मी तेथेच अधिक वाढविला. या गोष्टी श्री. मगनलालजींना दिसत नव्हत्या. असे नाही. हे असे करणे योग्य नाही असे एकदा छोटेलालजींनी मला सांगितले आणि त्यांच्या स्वभावाप्रमाणे मला पुन्हा ते त्याविषयी बोलले नाहीत. त्याच वेळी श्री. शंकरलालजी बँकर हेही विणकाम शिकत होते. त्यांनी दोन महिन्यात विणकामाचा अभ्यासक्रम पुरा करून घेतला. श्री. मगनलालजींनी एकदा मला खोलीत बोलावून घेतले व मला म्हणाले की, 'आश्रमातील श्रमाची कामे तुम्ही इतकी चांगली व मनापासून केलीत आणि विणकामासारखी कमी श्रमाची कामे करण्यास अंगचोरपणा का करता? आपण स्वतः विणून तयार केलेले कापड एकदा डोळाभर पहाण्याच्या आनंद तरी घ्या. पुनः तुम्ही वाचन करीत बसलेले मी मागावर पाहिले तर बापूजींकडे तुम्हाला नेणे भाग आहे.'

'विणकाम करताना मी रामनाम करीत बसलो तर तुम्हाला चालेल की नाही?' मी त्यांना उलट एक प्रश्न विचारला.

'चालेल' असे त्यांनी उत्तर दिल्यानंतर मी त्यांना विचारले की, 'मग मी उपनिषदांतील एक ऋचा पाहून घेऊन ती घोकीत विणण्याचे काम केले तर त्यात काय बिघडले?

'पण तुम्ही काहीच विणत नाही ना! माझी तर ही तक्रार आहे.'

मी उपनिषदे पाठ करीत विणण्याचे कबूल करून आलो. पण तसे विणताना त्याकडे लक्ष नसल्यामुळे एका बाजूला जोराने व दुसऱ्या बाजूला हळू ठोका बसल्यामुळे वीण तिरकी बसत गेली. ही तिरकी वीण चांगली वीत दीड वीत पर्यंत झालेली, ती सहज पू. गांधीजींच्या नजरेला आली. त्यांनी हसून म्हटले की, 'ती सर्व वीण उकलून काढा. सूत नाश करू नका. वेळ गेला तरी चालेल.' ते सर्व उकलून काढण्यात तीन चार दिवस गेले व त्याचा मला फारच त्रास झाला.

—

याच सुमारास मद्रासकडून एका विणकाम शिक्षकाची मागणी आश्रमाकडे आलेली होती. पू. गांधीजींनी मला तिकडे पाठविण्याचे ठरविले आहे असे मला कोणीतरी सांगितले. मला त्यातले काय येते? मी मद्रासला जाऊन काय करणार? उगाच आपली फजिती मात्र व्हावयाची! असे अनेक विचार माझ्या मनात येऊन गेले. म्हणून मी फिरावयाच्या वेळी गांधीजींना सांगितले की, 'मी मागावर जरी आज तीन चार महिने बसत असलो तरी मी काहीही काम केलेले नाही. तेव्हा मद्रासच्या बाजूला दुसऱ्या कोणाला तरी पाठवावे.'

'मद्रासला जाऊन तेथील लोकांना तसे सांगून परत आश्रमात आलात तरी चालेल. पण तुम्ही मद्रासला जाच!'

'मलाच जावे लागणार असेल तर मला आठ पंधरा दिवसांचा अवधी द्यावा. मी सर्व शिकून घेतो व नंतर मी जाण्यास तयार आहे.'

त्याप्रमाणे मी श्री. मगनलालजी यांना भेटलो व त्यांच्याकडून माग घालण्याकाढण्याची मापे वगैरे घेऊन आठ दहा दिवस खटपट केली. त्याच्या नोट्स् तयार केल्या. दोन तीन माग मी माझ्या हाताने बसविले. श्री. मगनलालजींनीही माझ्यासाठी पुष्कळ वेळ खर्च केला. पण माझीही तयारी होऊन मी मद्रासला जाण्यास सिद्ध होईपर्यंत दुसऱ्या मनुष्यास पाठविण्यातही आले होते. मला मात्र तेव्हापासून रोज अमुक इतके कापड विणावेच लागू लागले. त्या वेळी आश्रमात गिरणीचेच सूत वापरीत असल्यामुळे विणकाम त्या मानाने सोपे होते.

मी ज्या वेळी विणकामात गेलो त्याच दिवसांमध्ये आश्रमात एक 'मार्जन मंडळ' स्थापन झाले होते. 'मार्जन मंडळ' म्हणजे भांडी घासण्याची जबाबदारी घेणारे मंडळ. या मंडळाचे अध्यक्ष श्री. विनोबाजी भावे होते, व मी काही दिवस चिटणीस होतो. भोजन शक्य तितके एका वाढीनेच देण्याची वहिवाट होती. पण त्याशिवाय कोणाला काही पुन्हा अधिक घ्यावेसे वाटल्यास एक कोणीतरी वाढावयास मागे रहात असे. त्या दिवसात सर्वांना वाढण्याचे काम पू. गांधीजी स्वतःच करीत असत. आणि प्रत्येकाने आपली ताटवाटी घेऊन टेबलापुढे जावयाचे व पाहिजे ते मागून घ्यावयाचे. कोणाला कोणता जिन्नस किती पाहिजे हे गांधीजींना पाठ झाले होते. मला अमुक अमुक इतके पाहिजे आहे असे सांगण्यापूर्वीच 'गांधीजी आपल्याला इतक्या रोटल्या ना?' असे विचारीत असत. एखादी रोटली कमी मागितली तर 'आज एक रोटली कमी का?' असे गांधीजी विचारावयाचेच!

गांधीजींचा नातू व आणखी एक दोन मुले गांधीजींनी हातात जो जिन्नस वाढावयास आणला असेल तो तेवढा सोडून इतर जिन्नस मागावयाची! आणि

गांधीजी टेबलापर्यंत गेले म्हणजे त्यांच्या हातातील जिन्नस मागावयाचा!

एकदा गांधीजींचा नातू रसिक याने पंक्तीमध्ये तूप अधिक मागितले. पण गांधीजींनी त्याला अधिकचे तूप घातले नाही. 'आपण जो येथे आश्रमात पैसा खर्च करतो तो सार्वजनिक पैसा आहे. तो फार बेताने व काळजीपूर्वक खर्च केला पाहिजे. तुला अधिकचे तूप घातले तर मला सर्वांना घालावे लागेल. कारण ही सर्व माणसे तुझ्याइतकीच मला जवळची आहेत.' अशा प्रकारे नातवाला उद्देशून गांधीजी बोलू लागले. पण रसिक आपला हट्ट सोडेना. रसिकाने 'मी आज सायंकाळपर्यंत उपवास करणार आहे' असे बोलून आपल्यापुढील ताट मागे सारले. गांधीजींनी मग ते ताट उचलून नेले. पुढे तास दोन तासानंतर रसिकला विशेष भूक लागल्यामुळे तो तुपाशिवाय जेवण्यास तयार झाला तरी गांधीजींनी त्याला सायंकाळपर्यंत जेवण दिले नाही. संध्याकापर्यंत न जेवण्याची प्रतिज्ञा पालन करावी. प्रतिज्ञा एकदा केल्यावर ती मोडू नये असेच त्याच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आज जरी त्या लहान मुलाला काही समजत नसले तरी त्याच्या मनावर त्याचे संस्कार चांगले होतात हीच भावना त्याच्या बुडाशी होती. असो. या बाबतीत रसिकच्या वतीने केलेली 'बा'ची मध्यस्थी कामाला आली नाही. जवळ जवळ एका वाढीनेच भोजन करण्याची प्रथा असल्याने सर्वांची जेवणे आटोपण्यापूर्वी स्वयंपाकाची भांडी मोकळी करून प्रत्येकापुढे एक एक आळीपाळीने घासण्यासाठी ठेवण्यात येत असत. आणि भांडीं चांगली घासली जात आहेत की नाहीत हे पाहण्याचे काम 'मार्जन मंडळा'चे असे. भांड्यामध्ये आपले तोंड दिसले पाहिजे असेच अध्यक्ष म्हणत असत. अध्यक्षांच्या नापसंतीमुळे रोज एकदोघांनातरी भांडे पुन्हा घासावे लागे. अशाप्रकारे पुन्हा भांडे घासावे लागण्याची पाळी माझ्यावर अध्यक्षांनी पुष्कळदा आणलेली होती. मी त्यांना एकदा रागाने म्हटले होते की, 'तुम्ही स्वतःच काळे असल्यामुळे तुमचे तोंड त्यात कसे दिसावे?' पण अध्यक्ष अगदी शांतपणे मला म्हणाले की, 'तोंड भांड्यात दिसण्याच्या दृष्टीने काळा रंग अधिक चांगला.' या ठिकाणी गणित व्यस्त आहे. चुलीवर ठेवावयाच्या भांड्यांना बाहेरून राख लावण्याचे काम ते भांडे घासून ठेवण्याच्या वेळीच करावयाचे असे. भांड्याला राख लावण्याला जो कोणी विसरेल त्यालाच दुसरे दिवशी ते जळके भांडे घासावयास दयावयाचे. भांडी घाशीत असताना मंडळाचे अध्यक्ष एखादया विषयाची चर्चा चालू करीत असत. चुलीवर ठेवून जळलेली भांडी घासण्याची पाळी काकासाहेब, नरहरिभाई, बँकर, महादेवभाई या मंडळींवर आली असली व ते भांडी घासावयास बसले असले म्हणजे त्या दिवशी 'मार्जन मंडळा'च्या चर्चेला मोठा रंग चढत असे. एकदा मलाच वाटले की या आश्रमात राहून कामात अंगचोरपणा करून वेळ काढून वाचनात खर्च करण्यापेक्षा आपण गांधीजींना विचारून वाचनास

स्वतंत्रपणे वेळ मागून घ्यावा. त्याप्रमाणे मी गांधीजींना भेटून विचारले. ते म्हणाले, 'तुम्हाला वाचनास रोज किती तास पाहिजेत?'

'तीन तास पुरे होतील.' मी म्हटले.

'इतका वेळ मी तुम्हाला सहज देऊ शकेन. चार वाजता झोपून उठल्यानंतर तोंड वगैरे धुण्यास किती वेळ लागतो?'

'पंधरा मिनिटे तरी लागतात.' मी म्हटले.

गांधी :— साडेचार वाजता प्रार्थना सुरू होते. मी म्हणतो तेथे तुम्हाला दहा मिनिटे तरी मिळतील.'प्रार्थनेनंतर नाश्ता किती वाजता होतो? प्रातर्विधि आटोपून नाश्ता करावयास जाण्याच्या वेळेपर्यंत किती वेळ तुम्हाला मिळू शकेल?

मी :— फार तर पंधरा मिनिटे मिळू शकतील.

गांधी :— पहा. एवढ्यातच पंचवीस मिनिटे झाली!

अशा रीतीने प्रत्येक दोन कार्यक्रमांमधील वेळाचा हिशेब करून त्यांनी मला जवळ जवळ साडेतीन तास काढून दिले.

'पण असे,' मी म्हटले, 'वाचनाकडे लक्ष कसे लागेल?'

'तेच शिकणे महत्त्वाचे आहे! आपली इतर कामे अगदी लक्षपूर्वक आपण करू लागलो तर आपल्याला आपले मन कोणत्याही गोष्टीवर, त्यात मग वाचनावरही, ते वाटेल तेव्हा झटकन् एकाग्र करता येते. शिवाय जीवनामध्ये वाचनाला इतकेसे महत्त्व नाही. मननाला अधिक महत्त्व आहे, आणि त्याहीपेक्षा आचाराला खरे महत्त्व आहे. वाचलेल्या किंवा पटलेल्या गोष्टीचे मनन व त्याहीपेक्षा त्याचे प्रत्यक्ष आचरणच आपल्याला जीवनामध्ये उपयोगी पडत असते. आणि आश्रमाच्या सर्व कामातून तुम्ही गेल्यानंतर स्वतंत्रपणे केवळ वाचनासाठी सहा महिने या आश्रमात रहा. पण आपल्या कार्यक्रमात-हाती घेतलेल्या कार्यांत-उदासीनता येऊ देऊ नये.'

तेव्हापासून मी माझ्या कामाविषयींची तक्रार पुन्हा गांधीजींपर्यंत नेण्यास मगनलालजींना संधी दिली नाही. आणि त्या दिवसामध्ये माझे वाचनही कमी झाले असे नाही.

### प्रार्थनेस दोन्ही वेळा हजर राहण्याचा आग्रह

आश्रमातील दोन्ही वेळच्या प्रार्थनेस प्रत्येकाने अवश्य हजर राहिले पाहिजे असा मगनलालजींचा आग्रह असे. प्रार्थना चालू असताना त्यांचे स्वतःचे लक्ष, प्रार्थनेपेक्षा प्रार्थनेस आज कोण कोण हजर नाहीत, त्यांना गैरहजर राहण्यास तसे योग्य कारण आहे किंवा नाही, याकडे असे व याचाच ते अधिक विचार करीत असत. आणि दिवसभरामध्ये त्यांना भेटून विचारल्याशिवाय

मगनलालजी रहावयाचे नाहीत. मी पहाटेच्या प्रार्थनेस कधीच जात नसे. साबरमतीची थंडी भयंकर; आणि मला कपडे बेताचेच असत. आणि त्याशिवाय आळसही माझ्या मदतीला येत असे. श्री. मगनलालजींनी मला एक दोन वेळा पहाटेची प्रार्थना न चुकविण्याबद्दल सांगितले.

मला जाग येत नाही; कामाने थकून जातो; तेव्हा मला कोणी उठवील तर मी प्रार्थनेस जरूर हजर राहीन.' मी त्यांना सरळ सांगून टाकले.

'बाहेर कोणत्याही पडवीमध्ये तुम्ही झोपा म्हणजे तुम्हाला उठविण्यस सोपे जाईल. मी स्वत: उठवीन.' मगनलालजी म्हणाले.

'मला पू. काकासाहेबांच्या सहवासाचाही फायदा घ्यावयाचा आहे. मी त्यांच्या घरीच झोपणार.' मगनलालजींना निरुत्तर करण्यासाठी मी उत्तर दिले.

त्या दिवसात काकासाहेब कालेलकर क्षयाच्या भावनेने आजारी होते. म्हणून त्यांना कोणीही लवकर उठवीत नसत. त्यांची झोपमोड करावयाची नाही अशी काळजी सर्व लोक घेत असत. मी त्यांच्याकडे झोपण्यास राहिलो तर मलाही कोणी जागे करणार नाही हे मला पक्के माहीत होते. मगनलालजींनाही ते कळून चुकले होते. शेवटी त्यांनी कंटाळून गांधीजींकडे तक्रार केली. त्यांच्याकडून बोलावणे आले. त्यांच्यापुढेही मी माझी तीच कारणे सांगितली. पण गांधीजी म्हणाले की, 'ठीक, तुम्हाला प्रार्थनेच्या पूर्वी आपोआप कोठेही झोपला तरी जागे होता येईल, मात्र तशी तुमची इच्छा पाहिजे.'

'माझी इच्छा प्रार्थनेला हजर राहाण्याची नाही असे नाही.'

'मग तुम्ही असे करा की चार वाजता घंटा वाजविण्याचे काम तुम्ही करीत जा. ज्या दिवशी तुम्ही ते करू शकणार नाही त्या दिवशी मी स्वत: करीन. एवढ्या मोठ्या माणसाला मी कसा त्रास द्यावा? असे माझ्या मनात येऊ लागले. त्यामुळे पाणेतीनलाच मी आपोआप दचकून जागा होत असे. दार उघडताना दाराच्या आवाजाने पू. काकासाहेब यांची झोपमोड होईल व ते आजारी पडतील या भीतीने मी मग बाहेरच झोपू लागलो. मी जागा झालो नाही अशा समजुतीने एकदा गांधीजी घंटा वाजविण्यासाठी घंटेजवळ येत होते. आणि मीही दुसऱ्या बाजूने घंटेकडेच चाललो होतो. एकदम पळत जाऊन मीच घंटा वाजविली. त्या वेळी गांधीजी खूपच हसले. त्या दिवशी मी त्यांना सांगितले की, 'आपण आता कधीही घंटेची काळजी करू नये. मी ती अगदी वेळेवर वाजवीत जाईन.' पण ते काम पुढे जगन्नाथभाई या नावाच्या एका मनुष्याकडे गेले आणि मी प्रार्थना कधीही चुकविली नाही. प्रार्थनेमध्ये गांधीजी कधी कधी बोलतही असत. पण अमुक दिवशी बोलतील व अमुक दिवशी बोलणार नाहीत असे मात्र सांगता येत नसे. कोठेतरी बाहेर फिरतीवर जाऊन आले म्हणजे मात्र हकीकत

सांगण्यासाठी म्हणून ते खात्रीने बोलत असत. हा मात्र नियमच झाल्याप्रमाणे झाले होते.

## संगीताचे महत्त्व

संगीताविषयी गांधीजींच्या मनात फार मोठा पक्षपात असे. संगीतामध्ये कितीतरी गुण आहेत असे त्यांचे मत होते. खरा संगीतज्ञ अनुदार असणार नाही असे त्यांना वाटे. संगीत शिकण्यासाठी सहज संधी जर कोणास मिळत असेल तर त्याने ती फुकट दवडू नये असे त्यांचे सांगणे असे. आश्रमामध्ये मुद्दाम महिना पाऊणशे रुपये पगार व शिवाय त्यांच्या कुटुंबाची राहाण्याची वगैरे व्यवस्था करून देऊन पंडित नारायणराव खरे (हे आमच्या मिरजेचे होते) यांची योजना केली होती. पं. खरे प्रथम एक संगीतज्ञ या नात्याने नोकरी धरण्याच्या दृष्टीने जरी आश्रमात आले असले तरी पुढे त्यांनी आश्रमाची शिकवण व तत्वे आपल्या आचरणात उतरविण्याची मन:पूर्वक खटपट केली व त्यात त्यांना यशही बरेच आले. प्रार्थनेमध्ये पं. खरे उत्तम पद म्हणून व भजन सर्वांकडून म्हणवून घेऊन संगीत ऐकवीत असले तरी प्रार्थनेला त्यांनी बैठकीचे स्वरूप कधी येऊ दिले नाही. आणि त्यांचे केवळ संगीत ऐकण्यासाठी कोणी प्रार्थनेला जात असतील –असा एकही मनुष्य आश्रमात असेल– असे मला तरी वाटत नाही. साबरमती आश्रमाचे ते एक सभासद व घटकच बनून गेले होते. अर्थात् त्यांच्या कुटुंबालाही तेच वळण लागले होते.

एकदा साबरमती स्टेशन मास्तरांची बदली झाली. त्यांचा मान करण्यासाठी साबरमती स्टेशनवरील नोकर लोकांनी रात्री गाणे बजावणे, पानसुपारी व सभा वगैरेंचा कार्यक्रम आखलेला होता. एका वेश्येलाही मुद्दाम गाण्यासाठी बोलाविण्यात आले होते. रात्री अकरा वाजता त्या नोकरांपैकी कोणाच्या तरी मनात आले की, आश्रमातील पं. खरे यांना बोलावून त्यांचे गाणे करवावे. इतरांनाही ही कल्पना पसंत पडली. आणि चार पाच प्रतिष्ठित मंडळी मिळून आश्रमात पंडित खरे यांना बोलवावयास ते आले. साबरमती स्टेशनपासून आश्रम एक मैल तरी दूर आहे. त्या मंडळींनी पं. खरे यांना मध्यरात्री जागे केले व गाण्याला येण्याविषयी विनंती केली. त्या लोकांचा उत्साहभंग होऊ नये म्हणून पं. खरे हे आपला तंबोरा घेऊन त्यांच्याबरोबर स्टेशनवर गेले. त्या लोकांनाही आनंद झाला. त्याबद्दल पैसे मागण्याचा वगैरे काही प्रश्नच नव्हता. पण पं. खरे तेथे पोहोचले त्या वेळी एका वेश्येचे गाणे चालले होते. 'तिचे गायन संपल्यानंतर आपल्याला पुढे घेऊन जाऊ, तोपर्यंत इकडे बसा,' असे पं. खरे यांना त्या लोकांनी मोठ्या विनयाने सांगितले. पं. खरे यांना ही गोष्ट पसंत पडली नाही असे समजून त्यांच्यापैकी एक गृहस्थ म्हणाले की, 'आपण तोपर्यंत पुढेही जाऊन बसू शकता!'

मग तर पं. खरे यांचे पित्तच खवळले. त्यांनी आपला तंबोरा त्यांच्याकडून मागून घेतला व तो खाकोटीमध्ये मारून त्यांनी थेट साबरमती आश्रमाचा रस्ता धरला. 'आपण मला बोलावण्यास आला नसता तर बरे झाले असते. आपण रस्ता चुकलात' एवढेच त्यांना सांगून ते परत आश्रमात आले. रात्री अर्थात् या गोष्टीची आश्रमातील कोणासच बातमी लागलेली नव्हती. सकाळी ही बातमी आश्रमातील सर्व मंडळीना त्याचप्रमाणे पू. गांधीजींनाही समजली. सायंकाळच्या प्रार्थनेनंतर पू. गांधीजींनी पं. खरे यांची मुक्तकंठाने स्तुती केली. 'रात्री स्टेशनवरचे लोक बोलावावयास आल्यावेळी त्यांच्या निमंत्रणाला मान देऊन पं. खरे स्टेशनवर गायनासाठी गेले हे चांगले केले आणि तेथे गेल्यानंतर तेथील गलिच्छ प्रकार पाहून परत आले हे त्याहीपेक्षा चांगले केले. शिवाय त्या लोकांना एक शब्दही टाकून किंवा तोडून न बोलण्याचा संयम पंडितजींनी केला ही अत्यंत उत्कृष्ट वागणूक होय' असा शेरा गांधीजीनी मारला.

संगीत प्रत्येकाने शिकावे असे गांधीजींचे मत असल्यामुळे आश्रमामध्ये किती तरी मंडळी संगीत शिकावयास लागली होती. कोण कोणत्या बुद्धीने संगीत शिकत होते हे कोणासही कळणे कठीण होते. पण माझा उद्देश मला माहीत होता. शारीरिक कष्टाच्या कामातून तितकीच सुटका व आराम मिळेल या धोरणानेच मी संगीतामध्ये माझे नाव दिले होते. विनोबाजींचे बंधू बाळकोबाही त्या वेळी आमच्याबरोबर संगीत शिकत असत. आम्ही दोघे मिळून चार पाच चीजा शिकलेले असू. मला त्याशिवाय संगीताचा थोडा नादही होता. ती. रा. रा. गंगाधरराव यांचे कोठे व्याख्यान असले तर मी प्रथम एखादे हिंदी पद टेबलावर उभे राहून बरेच वेळा म्हटले आहे.

आश्रमामध्ये अशा प्रकारे संगीत शिकणारे लोक बरेच झाल्यानंतर, एक दिवस, आश्रमातील सर्व कामे बंद ठेवून एक जलसा करण्यात आला. एका हॉलमध्ये एक मोठे व्यासपीठ मांडून दोन्ही बाजूला दोन तंबोरे वाजविणारे बसविण्यात आले. प्रत्येकाने त्या दोन तंबोऱ्यांच्या मध्यभागी गवयासारखे बसून आपल्याला येईल ते पद म्हणून दाखवावयाचे अशी योजना होती. माझ्या मनात हा जलसा चुकवावयाचा होता. म्हणून मी एकटाच मागावर बसून विणण्याचे काम करू लागलो. जलसा सुरू होण्यापूर्वी माझी चौकशी झालीच. मला मागावरून बोलावून घेण्यात आले. गवयासारखे बसून गाण्यास मला लाज वाटत होती. पण पू. काकासाहेब यांनी जेव्हा गाऊन दाखविले तेव्हा मात्र सर्वांचीच भीती गेली. संगीत शास्त्र या नात्याने काकासाहेबांना पुष्कळांपेक्षा अधिक कळत असेल पण त्यांचा आवाज वगैरे अनुकूल नव्हता. पण अगदी न लाजता त्यांनीही जेव्हा पद म्हणून दाखविले तेव्हा कोणी कोणास हसावयाचे कारणच शिल्लक

राहिले नाही. मग मीही एक दोन पदे म्हणून दाखविली. या जलशाला गांधीजी हजर होते. या जलशाच्या अनुभवानंतर ज्या पाच सहा लोकांनी संगीत शिकण्याचा जरूर प्रयत्न करावा असे मुद्दाम सांगण्यात आले होते त्यात माझेही नाव होते. या जलशामध्ये पू. 'बा'नी भाग घेतला होता.

## बॅ. सावरकरांची जप्त पुस्तके

आश्रमामध्ये बॅ. सावरकरांची जप्त पुस्तके मी वाचीत असे ही गोष्ट गांधीजींना समजली. त्यांनी मला म्हटले की, 'ती पुस्तके वाचण्यास मुळीच हरकत नाही. पण सरकारला तुम्ही आगाऊ कळविले पाहिजे की, 'मी ही जप्त पुस्तके वाचीत आहे, व ती माझ्याकडे आहेत.' आणि याचे जे परिणाम होतील तेही भोगण्यास तयार झाले पाहिजे. आणि बॅ. सावरकरांची पुस्तके वाचून एवढाही धोका स्वीकारण्यास आपण तयार होऊ नये काय? नाही तर ती पुस्तके जेथून आणलीत तेथे परत पाठवा.' मी ती पुस्तके परत माझ्या मित्राकडे पाठवून दिली. त्यांपैकी बराच भाग मी वाचून संपविलेला होता. गांधीजींचे ते सांगणे आज मला नीट समजते.

आश्रमामध्ये एकदा आजारी पडण्याचे पीकच माजले होते. रोज सकाळी सर्व आजाऱ्यांना पहाण्यासाठी गांधीजी एक फेरी आश्रमामध्ये घालीत असत. मीही त्यांच्याबरोबर केव्हा केव्हा जात असे. एके दिवशी प्रार्थना झाल्यानंतर मी सहज विनोदाने म्हटले की, 'या गुजराथी लोकांना आजारी पडावयास काय झाले? आमचा महाराष्ट्रीय पहा, एक तरी आजारी पडला आहे का! पण त्याच दिवशी रात्री मलाच बराच ताप भरला. सकाळी गांधीजींच्या फेरीमध्ये ते माझ्या खोलीमध्ये आले. बाहेरून मोठ्याने हाका मारीतच ते आले. 'कहाँ है? महाराष्ट्रीय पेहलवान कहाँ है? मालूम हो गया कि लोक क्यों बिमार होते है?' मग माझ्याजवळ येऊन बसले. अंगावरून हात फिरविला. आपल्या खोलीतून काही मोसंबी पाठवून दिली. ओळीने तीन चार दिवस ते माझा ताप उतरेपर्यंत रोज सकाळी माझ्याकडे येऊन दोन तीन मिनिटे बसत असत. त्यांच्याबरोबर केव्हा केव्हा मगनलालजीही येत असत.

या माझ्या आजारीपणामध्ये माझ्या मनात पडल्या पडल्या एक कल्पना आली की गांधींना भेटावयास कोण कोण येत असतात, त्यांच्याशी चर्चा काय चालते, लोकांच्या शंका काय असतात, हे जर ऐकावयास मिळेल तर बरे होईल. पण चोरून ऐकण्यापेक्षा गांधीजींना आपण स्वतः स्पष्टपणे विचारून त्यांच्या परवानगीने त्यांच्या खोलीत एका कोपऱ्यात बसावे. पुन्हा वाटले की, मी असे गांधीजींना विचारणे योग्य होईल किंवा नाही, हे प्रथम कोणास तरी विचारावे.

श्री. महादेवभाईंचा या बाबतीत सल्ला घ्यावा असे वाटल्यामुळे त्यांच्या खोलीत गेलो. पण त्यांच्याशी दुसरेच काहीतरी बोलून परत आलो. पू. काकासाहेबांच्या घरी मी रहात असलो तरी त्यांनाही याबद्दल विचारले नाही, कारण त्याला नसते फाटे फुटत बसावयाचे अशी शंका मनात डोकावून गेली. म्हणून दोनप्रहरी प्रथम दुरून पाहिले की गांधीजींच्या खोलीत दुसरे कोणी आहे किंवा काय. ते एकटेच खोलीमध्ये पलंगावर पत्रे वाचीत बसले आहेत याची खात्री करून घेतली व मी एकटाच त्यांच्याकडे गेलो. त्यांना माझी कल्पना व इच्छा स्पष्टपणे सांगितली. त्या वेळी ते म्हणाले की, 'वास्तविक याची काही आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. मग इतरांना का आळीपाळीने तसे माझ्या खोलीत बसण्यास बोलावू नये? शिवाय मी काम करीत असताना केवळ माझ्याकडे टक लावून कोणी पहात बसेल तर मला भीतीच वाटेल. माझी खोलीही लहान असल्यामुळे एखादयाला कायम बसण्यासही तशी जागा नाही. पण तुम्ही बसलात तर त्यात तुम्हाला पुष्कळ माहितीही होईल ही गोष्ट खरी आहे.'

'मी फक्त महिना पंधरा दिवसच तसे बसू इच्छितो. आश्रमातून बेळगावास जाण्यापूर्वी मला ही संधी मिळावी.'

'मला असे आजपर्यंत कोणी विचारले नव्हते. तुम्ही तसे माझ्याकडे केव्हाही बसू शकता. पण खोलीत जागा कमी असल्यामुळे खोलीच्या दरवाजात बसा आणि हातात चरखा घेऊन सूत कातीत बसा. मात्र ती जागा जोडे सोडण्याची असल्यामुळे माझ्याकडे येणारे लोक तुमच्या सभोवती जवळच जोडे सोडणार त्याबद्दल तुमच्या मनाला काही वाटू देऊ नका.'

'मला जोडे सोडतात तेथे बसण्याची इच्छा नाही. मी असे बसण्याची इच्छा दाबून टाकतो.'

'सरते शेवटी महाराष्ट्रीय तो महाराष्ट्रीय! जोडे ठेवण्याच्या जागेला बसावयास तयार व्हावयाचा नाही.' गांधीजी म्हणाले व खूप हसले. आज मला वाटते की ती संधी मी दवडावयास नको होती. तेथे बसण्याचे मी कबूल केले असते तर मला एक विशेष अनुभव मिळाला असता. हिंदुस्तानातील अनेक बिकट प्रश्नांवरील वाटाघाटी मला ऐकावयास मिळाल्या असत्या.

आश्रमामध्ये सर्वांनी वेळेवर कामे केली पाहिजेत हा श्री. मगनलालजींचा कटाक्ष होता. मग यात ते कोणालाही अपवाद मानीत नसत. पू. काकासाहेब रोज भोजनाला येण्याच्या बाबतीत उशीर करीत असत. त्या वेळी रसोडयाला लागूनच फळचा मारून एक खोली करून त्या खोलीमध्येच गांधीजी बसत असत. पू. श्री. काकासाहेब भोजनास उशीरा येऊन बसले होते. त्यांचे भोजन जवळ

जवळ संपतच आले होते. इतक्यात श्री. मगनलालजी म्हणाले की, 'काकासाहेब! आपण न चुकता रोज भोजनाला विलंब करीत आहा.'

'मी रोज उशीराने ठरल्यावेळी न चुकता येत असेन तर मग माझी तीच वेळ समजून मला नियमित वेळेवर येणारा असेच का मानीत नाही?' असे काकासाहेबांनी थोडे विनोदाने व थोडे मगनलालजींना निरुत्तर करण्याच्या मिस्किलपणाने म्हटले.

हे काकासाहेबांचे शब्द गांधीजींच्या कानांवर गेले आणि त्यांनी मगनलालजींना विचारले की, 'मगनलाल, हे उत्तर कोणी दिले?' मगनलालजीही काही बोलले नाहीत काकासाहेब तर आपले ताट हातात घेऊन आपल्या खोलीकडे गेले.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# यशवंतराव बळवंत चव्हाण

जन्म : १२ मार्च १९१३, मृत्यू : २५ नोव्हेंबर १९८४

**महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय नेते.**

जन्म देवराष्ट्रे या सांगली जिल्ह्यातील खेड्यात एका शेतकरी कुटुंबात. वडील कोर्टात बेलीफाची नोकरी करीत. प्राथमिक शिक्षण कऱ्हाड येथे व उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे. कायद्याची परीक्षा पास झाल्यानंतर काही काळ वकिली केली. १९३० सालच्या चळवळीत भाग घेतला. १९३२ साली पहिला कारावास. या काळात रॉयवाद्यांच्या संपर्कात आले. पण नंतर दुसऱ्या महायुद्धात रॉयवाद्यांची युद्धविषयक भूमिका अमान्य झाल्यामुळे काँग्रेसमध्ये राहिले. १९४२ सालच्या चळवळीत भूमिगत व कारावास. १९४६ साली विधिमंडळात निवड. १९४८ साली प्रांतिक काँग्रेस कमिटीचे चिटणीस. १९५२ साली मुंबई राज्यात स्थनिक स्वराज्य व पुरवठा खात्याचे मंत्री. त्यानंतर द्विभाषिक मुंबई राज्याचे १९५६ साली मुख्यमंत्री. १९६० साली महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निवड. त्यानंतर १९६२ ते ६६ भारताचे संरक्षणमंत्री, ६६ ते ७० गृहमंत्री आणि ७० ते ७४

अर्थमंत्री ही महत्त्वाची पदे भूषविली. चरणसिंग मंत्रीमंडळात उपपंतप्रधान. त्यानंतर फायनान्स कमिशनचे अध्यक्ष. एक कुशल संघटक, उत्तम प्रशासक आणि वाङ्मय आणि कला यांचे प्रेमी. लोकमान्य टिळकांनंतर महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणाच्या तोडीचा राष्ट्रीय पातळीवरचा नेता झाला नाही. पुढील उतारा त्यांच्या आत्मवृत्तातून घेतला आहे.

# माझे विद्यापीठ

यशवंतराव बळवंत चव्हाण

गांधीजी १९३१ च्या अखेरीस, डिसेम्बरच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईस परतले, तेव्हा त्यांच्यापुढे अनेक महत्त्वाच्या समस्या वाढून उभ्या होत्या. त्यांच्या स्वागतासाठी देशातील अनेक नेते मुंबईस आले होते. पं. जवाहरलालजी यासाठीच मुंबईस निघाले असता त्यांना वाटेतच अटक झाली. १९३१ च्या मध्यात हिंदुस्थानचा व्हाईसरॉय बदलून गेला होता. लॉर्ड आयर्विनच्या जागी लॉर्ड विलिंग्डन यांनी व्हाईसरॉय-पदाची सूत्रे हाती घेतली होती. या विलिंग्डनसाहेबाची हिंदुस्थानला पूर्ण ओळख होती. कारण त्यांनी मुम्बई आणि मद्रास येथील गव्हर्नरपदाची सूत्रे सांभाळली होती. इंग्लंडमधील हुजूर पक्षाचे ते समर्थक होते. भारतातील राष्ट्रीय चळवळीसंबंधी त्यांना काडीचीही सहानुभूती नव्हती, असा त्यांचा लौकिक होता. दडपशाहीच्या तंत्रात ते मोठे वाकबगार होते, अशीही त्याची कीर्ती झाली होती.

गांधी-आयर्विन कराराने काँग्रेसची व गांधीजींची शक्ती जनमानसात वाढली होती. जनतेच्या अंतःकरणातले त्यांचे हे स्थान दडपशाहीच्या मार्गाने कमी करण्याचा व्यूह या माणसाने रचला होता.

गांधीजी मुम्बईमध्ये येताच वर्किंग कमिटीची बैठक झाली. उत्तर प्रदेशात व इतरत्र चालू असलेल्या किसान-चळवळी, पं. नेहरुंची अटक, वगैरे प्रश्नांचा विचार करून गांधीजींनी लॉर्ड विलिंग्डनच्या भेटीची मागणी केली. त्याला तातडीने नकार देऊन ४ जानेवारी रोजी महात्माजींनाच अटक करण्यात आली व त्यांना येरवडयाच्या तुरुंगात रवाना केले. सरकारच्या या आक्रमक धोरणाविरुद्ध सर्व देशभर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाली.

जिल्हयाजिल्हयांतील प्रमुख पुढारी मंडळींनाही असेच अचानक पकडून काँग्रेसविरुद्ध एक प्रकारचे युद्धच ब्रिटिश सत्तेने पुकारले. आमच्या जिल्हयातील पुढारीही पकडले गेले. आमच्या जिल्हयातले आणि गावातले आम्ही इतर कार्यकर्ते एकत्रित आलो आणि पुढे कोणत्या पद्धतीने कार्य करावे, याबद्दल विचारविनिमय व चर्चा सुरू झाल्या.

मी यंदा माझ्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार नाही, असे मी माझ्या घरी सांगून टाकले. माझ्या आईचे म्हणणे होते, की मी निदान मॅट्रिकची परीक्षा झाल्यानंतर काय करावयाचे, ते करावे. पण मी तिला खरे ते सर्व सांगितले. माझ्या सर्व मित्रांची या नव्या चळवळीत काम करण्याची तयारी झालेली आहे. गांधीजी तुरुंगात आहेत आणि अशा वेळी मी माझ्या मित्रांपासून अलग होऊ शकत नाही. तिला माझे म्हणणे पटले नाही, पण परत तिने मला आग्रह करण्याचे सोडून दिले. गणपतरावांनी गेले वर्षभर माझे वाढते संबंध पाहिले होते. त्यांनी मला सांगितले,

"तुला आता तुझ्या सहकाऱ्यांबरोबर राहायला पाहिजे."

त्यांचा पाठिंबा पाहून मला धीर आला आणि मी मित्रांना माझा निर्णय कळविला. सर्व कार्यकर्त्यांना सांगितले की,

'मी तुमच्या सर्वांबरोबर आहे. जरूर तर आघाडीवर राहीन.'

मी आमच्या शाळेतील काही मित्र जमा केले. त्यांमध्ये श्री. पांडूतात्या डोईफोडे, विंगकर बंधू, अनंतराव कुलकर्णी, अहमद कच्छी आणि शांताराम इनामदार, त्याचप्रमाणे हल्लीचे रावसाहेब (पण त्यावेळचा मधू) गोगटे असे अनेक तरुण लोक होते.

मी अहमद कच्छी या मुसलमान मित्राबद्दल यापूर्वी थोडे लिहिले आहे. हा मित्र कायदेभंगाच्या चळवळीत काम करू शकणार नव्हता. तरीही त्याच्याशी माझी गाढ मैत्री जमली होती. त्याला देशासाठी काही तरी करावे, अशी हौस होती. पण स्वतःला अधिक काही करता येत नाही, तर निदान जे करतात, त्यांना साहाय्यभूत व्हावे, असे त्याला वाटे. ही त्याची मर्यादा पाहून त्याने शक्य तेवढेच करावे, असा मी त्याला सल्ला दिला. आमच्या दोघांच्याही वाचनाच्या आवडी-निवडी सारख्या होत्या. त्याला आवडलेली पुस्तके तो मला आणून देत असे. तो वर्षातून एक-दोन वेळा मुंबईस आपल्या नातेवाइकांकडे जात असे. त्या वेळी तो चांगली मराठी व गुजराती पुस्तके तेथून आणीत असे. त्याची मातृभाषा गुजराती होती. मला आठवते, १९३१ सालच्या मध्यावर मुंबईत त्या वेळी गाजत असलेले 'माझे रामायण' हे तुळजापूरकर यांचे पुस्तक तो माझ्यासाठी आठवणीने घेऊन आला. आज हे पुस्तक कोणाच्या लक्षात आहे की नाही, हे मला माहीत नाही, पण त्या वेळी आम्हाला ते फार वाचनीय वाटले आणि आवडलेही. लेखनाची शैली आत्मकथेच्या स्वरूपाची होती. त्याच वेळी (माझी आठवण आहे की,) प्रसिद्ध व लोकप्रिय गुजराती कवी श्री. कलापि यांची काही कवितेची पुस्तकेही तो घेऊन आला. आठवड्यातील दोन-तीन तास त्यातील सुंदर कल्पना व सौंदर्यस्थळे तो गुजरातीतून मराठीत करून मला सांगत असे. माझ्यावर त्याचा लोभ होता. तो

आमच्या हायस्कूलमधील अत्यंत हुशार विदयार्थी म्हणून प्रसिद्ध होता. मी शिक्षण अर्धवट टाकून चळवळीत पडतो आहे, याची तो चिंता करीत असे. पण माझे करणे अयोग्य होते, असे मात्र त्याला वाटत नव्हते.

अशा या बदललेल्या वातावरणात आमच्या कराड तालुक्यातल्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक २०-२२ जानेवारीच्या सुमारास तांबवे येथे आम्ही भरवली. त्या ठिकाणी बरेच कार्यकर्ते जमले होते. त्या कार्यकर्त्यांमध्ये काशिनाथपंत देशमुख आणि राघूआण्णा लिमये हे प्रमुख होते. या बैठकीत काही महत्त्वाचे कार्यक्रम ठरले. ग्रामीण जंगल सत्याग्रह संघटित करावयाचा आणि जितके जास्तीत जास्त सत्याग्रही कारागृहात पाठविता येतील, तितके पाठवावयाचे, असा निर्णय झाला आणि त्याची जबाबदारी राघूआण्णा लिमये व काशिनाथपंत देशमुख यांनी आपल्यावर घेतली. माझ्यावर त्यांनी पहिली जबाबदारी टाकली, ती ही, की २६ जानेवारीचा दिवस हा सर्व ठिकाणी संस्मरणीय ठरेल, अशा रीतीने साजरा होईल, अशी योजना करावयाची. मी या कामाची जबाबदारी घेतली आणि कराडला परतलो. साधनांची थोडी-फार जुळवाजुळव केली आणि कराड तालुक्यातील प्रमुख गावी २६ जानेवारीला जाहीर झेंडावंदन व्हावे, अशा तऱ्हेची योजना आखली.

खुद्द कराड शहरातील २६ जानेवारीची तयारी करण्याचे काम मी माझ्या मित्रांच्या गटाकडे सोपविले. तालुक्याच्या महत्त्वाच्या चार-दोन गावांना कार्यक्रम संघटित करण्यासाठी मी दोन दिवसांची सायकल रपेट केली. दिनांक २५ जानेवारीला संध्याकाळी कराडला परतल्यानंतर आखलेल्या कार्यक्रमाची कल्पना माझ्या मित्रांनी मला दिली. ती अशी की, शहरातील सर्व प्रमुख ठिकाणी रात्रीचे झेंडे लावावयाचे. त्यांत म्युनिसिपल कचेरीवर तिरंगी झेंडा लावणे ही मुख्य कल्पना होती. आमच्या मित्रमंडळींनी कायदेभंगासंबंधी लिहिलेली पत्रके व गांधींच्या अटकेबद्दल सरकारच्या निषेधाच्या घोषणा रात्री गावातील प्रमुख ठिकाणी चिकटवायच्या व हायस्कूलमधल्या आम्ही मुलांनी हायस्कूलच्या प्रांगणात असलेल्या झाडावर झेंडा चढवून दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता झेंडावंदन करायचे. त्याप्रमाणे आम्ही कामाला लागलो. एका गटाने रात्री ११ च्या पुढे गुप्तपणे जाऊन म्युनिसिपल कचेरीवर झेंडा चढविला. हे मोठे कठीण काम होते. पण म्युनिसिपालिटीचे रक्षकच आम्हाला सामील असल्यामुळे ते सोपे झाले. त्याचप्रमाणे सर्व गावामध्ये आणखी काही प्रमुख ठिकाणी झेंडे लावले. बुलेटिन्स् चिकटविण्याच्या कामामध्ये मदत करण्यासाठी म्हणून मी आणि तात्या डोईफोडे गावात हिंडत होतो. त्यावेळी कराड शहरातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे चावडी-चौक. तात्या डोईफोडे त्या चौकात गेल्यानंतर

बुलेटिन चिकटविण्याच्या कामात गुंतलेला असतानाच पोलिसांनी त्याला पाहिले व पकडले. असे काहीसे होईल, अशी अपेक्षा होतीच. त्यामुळे आम्ही त्याची फारशी चिंता केली नाही. आम्ही आमच्या दुसऱ्या कामाला लागलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता ठरल्याप्रमाणे आम्ही आमच्या हायस्कूलच्या पटांगणातील झाडाभोवती जमलो. आमच्यापैकी एकाने झाडावर चढून झेंडा फडकाविला आणि आम्ही सर्वांनी ध्वजवंदन करून झेंड्याला सलामी दिली. 'वंदे मातरम्'च्या घोषणा दिल्या. नंतर राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रम समाप्त केला आणि आपापल्या घरी परतलो. परंतु शाळेच्या तपासणीसाठी आलेले एज्युकेशनल इन्स्पेक्टर समोरच्या बहुलेकरांच्या बंगल्यात मुक्कामास होते. त्यांनी आमचा झेंडावंदनाचा हा कार्यक्रम चालू असतानाच तपशीलवार पाहिला होता. त्यांनी हे सर्व पाहिल्यानंतर शाळेच्या प्रमुख अध्यापकांकडे चौकशी सुरू केली.

इकडे पांडूतात्या डोईफोडे यांना पोलिसांनी पकडल्यानंतर आणखी कोण कोण साथीदार आहेत, याची चौकशी केली. तेव्हा मी समजून चुकलो की, माझे नाव सांगितले जाणार आणि अटक होण्याच्या तयारीनेच शाळेत जायला पाहिजे. त्याप्रमाणे ११ वाजता मी नित्याप्रमाणे शाळेत गेलो. शाळा सुरू झाली. आणि माझ्या वर्गात बसलो. शाळेचा तास चालू होता. पण माझे त्यात लक्ष नव्हते. शाळेचा चालू असलेला तास संपण्यापूर्वीच हेडमास्तर एका पोलिस अधिकाऱ्याला घेऊन आमच्या वर्गात आले. त्यांनी मला बाहेर बोलावून घेतले.

आम्ही हेडमास्तरांच्या कचेरीत गेल्यानंतर पोलिस अधिकाऱ्याने सकाळच्या झेंडावंदनाची आणि बुलेटिनची वगैरे माहिती विचारली. तात्या डोईफोडे यांनी माझे नाव सांगितले असल्याची गोष्ट मला सांगितली. त्यांना मी सांगितले,

"हो, मी हे सर्व केले आहे. आणि असे करत राहण्याचा आमचा निर्धार आहे."

पोलिस अधिकाऱ्याने हेडमास्तरांना सांगितले,

"मी ह्या विद्यार्थ्याला अटक करतो आहे आणि घेऊन जातो आहे. त्याच्या पालकांना कळवा."

... आणि अशा रीतीने माझी पहिली शास्त्रशुद्ध अटक झाली.

सबंध दिवसभर पोलिस-कचेरीत मला बसवून ठेवले. ते अधूनमधून माझ्याजवळ येत व माझ्याकडून काही अधिक माहिती मिळते का, याची चौकशी करीत. परंतु मी त्यांना काहीही अधिक सांगायचे टाळत होतो. दिवसभर प्रयत्न करूनही माझ्याकडून काही जास्त माहिती मिळत नाही, असे पाहिल्यानंतर रात्र

होताच त्यांनी मला तुरुंगाच्या एका कोठडीत ढकलले.

माझ्या घरच्या मंडळींना ही बातमी कळलीच होती. पण त्यांना करता येण्याजोगे काहीच नव्हते.

ती पहिली रात्र मी कशी काढली, याची माझी आठवण अगदी ताजी असल्यासारखी आहे.

दहा बाय् बाराची खोली. अंधाराने भरलेली. पोलिस कस्टडीच्या बाहेर व्हरांड्यात असलेल्या खांबावरच्या दिव्याचे जे काही क्षीण प्रकाशकिरण त्या कोठडीपर्यंत पोहोचत, तेवढाच काय तो प्रकाश. मी खोलीच्या आजूबाजूला पाहिले, तर माझ्याशिवाय आणखी दोन माणसे त्यात होती.

मला वाटले होते, कदाचित मला तात्या डोईफोडे यांच्याबरोबर ठेवतील, परंतु तात्या त्यांत नव्हते. दोन्हीही सामान्य, नित्याचे कैदी असावेत. परंतु त्यांतला एक मोठा धिप्पाड गृहस्थ असावा, असे वाटत होते. त्याच्या हातांत व पायांत बेड्या होत्या. पण त्या मला दुसऱ्या दिवशी दिसल्या.

या नव्या गुदमरणाऱ्या वातावरणात सुरुवातीला मला झोप आली नाही. पण गेले चार-पाच दिवस मी इतका फिरत होतो आणि दिवसभर उपाशी असल्यामुळे इतका थकलो होतो, की नंतर झोप केव्हा लागली, हे मला कळलेच नाही.

सकाळी जागा झालो, तेव्हा माझ्या खोलीतील त्या दोन लोकांना मी पाहिले. आम्ही नंतर एकमेकांशी बोललो. तेव्हा एक निराळाच अनुभव आला. हा माणूस कुठल्या तरी संस्थानातील कैदी होता. कराडच्या मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत त्याच्यावर दुसरा खटला होता, म्हणून त्यासाठी त्याला तेथे आणला होता. अंगावर शिक्षा झालेल्या कैद्याचे कपडे होते. हातांत आणि पायांत बेड्या होत्या.

मी त्याला विचारले,

"हे सर्व असे का?"

त्याने सांगितले,

"मी तुरचीचा कृष्णा धनगर आहे."

नाव ऐकताच माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. तुरचीचा तात्या आणि कृष्णा ही एक जोडी त्यावेळी नामांकित होती. त्यांच्यापैकी हा असावा.

त्याचे व्यक्तिमत्त्व फार आकर्षक होते. उणा-पुरा सहा फूट उंच, गोरापान, नाक-डोळे अतिशय तरतरीत, हनुवटीवर अणकुचीदार दिसणारी बरीच वाढविलेली दाढी, हातापायांत खळखळ वाजणाऱ्या त्याच्या बेड्या.

हे त्याचे रूप पाहून माझी तबियत मोठी खूश झाली. माझ्या मनात उगीचच विचार येऊन गेला, की 'राजसंन्यास' नाटकाच्या शेवटच्या प्रवेशात बंदी असलेल्या संभाजीचे चित्र असेच काहीसे असले पाहिजे.

मी कराड जेलमध्ये असेतोपर्यंत कृष्णाची आणि माझी मोठी दोस्ती झाली. त्यालाही आम्हा मंडळीच्या चळवळीबद्दल काहीसे कौतुक होते. तो बाहेर चाललेल्या गोष्टींच्या हकीकती विचारू लागला आणि मीही त्या सांगू लागलो.

काही दिवस गेल्यानंतर एके दिवशी मला आणि तात्या डोईफोडे यांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले. आम्हाला आमच्यावरचे आरोप वाचून दाखविण्यात आले. आम्ही गुन्हा कबूल केला. मॅजिस्ट्रेटचे काम सोपे होते. त्याने तातडीने आम्हाला अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावली आणि खटल्याचे काम संपले.

एक मिनिटापूर्वी आम्ही कच्चे कैदी होतो. आता पक्के झालो होतो. त्या वयात अठरा महिने घरापासून आणि गावापासून दूर राहण्याची कल्पना मलाही थोडीशी अस्वस्थ करणारी वाटली. आमच्या काँग्रेस पक्षातर्फे हजर असलेल्या वकिलांनी मला सांगितले,

"तुम्हाला जास्त शिक्षा केली आहे, त्याचे कारण इतरांना दहशत बसावी."

हे कदाचित शक्यही असेल, पण आता अठरा महिने राहणे भागच आहे, तेव्हा हे आनंदाने स्वीकारले पाहिजे, असे मी माझ्या मनाला सांगू लागलो.

शिक्षेच्या दुसऱ्या दिवशी आई आणि घरची सर्व मंडळी भेटायला आली. त्यांच्याबरोबर आमच्या मराठी शाळेतले एक जुने शिक्षकही आले होते पोलिसांनी मला कोठडीतून बाहेर काढले आणि त्यांच्या पहाऱ्यातच मला फौजदार कचेरीकडे नेण्यात आले. फौजदारांच्या उपस्थितीतच आईची भेट झाली. मला पाहताच आईच्या डोळ्यांत पाणी आले. मी वयाने पोरसवदा, त्यातून शिक्षा अशी दीर्घ मुदतीची. त्यामुळे आईचे रडणे स्वाभाविकच होते. मास्तर आमचे सांत्वन करीत होते. मध्येच ते मला म्हणाले,

"फौजदारसाहेब दयाळू आहेत. माफी मागितलीस, तर सोडून देतील."

"काय बोलता तुम्ही, मास्तर? माफी मागायची? माफी मागायचे काही एक कारण नाही. तब्येतीची काळजी घे, म्हणजे झाले. देव आपल्या पाठीशी आहे." आई हे बोलली आणि उठूनही गेली.

आमची भेट संपली.

आईच्या या स्वाभिमानी गुणाचा ठेवा अंतःकरणात जतन करून मी कोठडीत परत आलो. मनाने मी निश्चिंत झालो.

आज हा प्रसंग आठवतो, तेव्हा आईचा हा मोठेपणा मला किती उदात्त वळण देऊन गेला, हे जाणवते.

नंतर माझ्या खोल्या बदलण्यात आल्या. मी ज्यावेळी जेलमध्ये होतो, त्याच वेळी आमच्या कराडमधले प्रसिद्ध समाजसेवक बाबूराव गोखले यांनाही अटक होऊन अशीच काही तरी एक वर्षाची शिक्षा झाली होती. तेही याच जेलमध्ये होते. मला माझ्या कृष्णा धनगराच्या खोलीतून काढून बाबूरावांच्या खोलीत एक दिवसासाठी ठेवण्यात आले. एक-दोन दिवसांत आमची येरवड्यास रवानगी होणार होती.

एका संध्याकाळी पोलिस पहाऱ्यात आम्ही रेल्वेने पुण्याकडे निघालो. वाटेत वेगवेगळ्या स्टेशनवर ठिकठिकाणचे आमच्यासारखे अटक केलेले कायदेभंगाचे सत्याग्रही आमच्या या ताफ्यात येऊन मिसळत होते. आम्ही पुणे स्टेशनवर पोहोचेपर्यंत जवळजवळ ही संख्या आठ-दहा झाली.

पुण्याहून सकाळी येरवडा जेलमध्ये जाण्यासाठी आलेल्या मोटारीतून आम्ही जेलकडे निघालो. जेलच्या दारासमोर गाडी उभी राहिली आणि आम्ही सर्व मोटारीतून खाली उतरलो. वाघ्याच्या जबड्यासारखा असलेला तो जेलचा दरवाजा मी प्रथम पाहिला आणि मनाशी म्हटले, आता या जबड्यात प्रवेश करायलाच पाहिजे. जेलचे तपासनीस पुढे आले आणि त्यांनी प्रत्येक कैद्याची पाहणी केली. त्यांपैकी फक्त बाबूराव गोखले यांना 'बी' क्लास असल्यामुळे दरवाज्यातून आत घेतले, आणि आम्हा बाकीच्यांना पुन्हा गाडीत बसायला सांगून हुकूम सोडला,

"या लोकांना कॅम्प जेलमध्ये घेऊन जा."

मी तर आश्चर्यचकित झालो. मी त्या दरवाज्याच्या आत जायच्या तयारीत असताना हा कॅम्प जेल पुन्हा कसला काढला, या विवंचनेत राहिलो.

येरवडा जेलच्या पाठीमागेच, पण सर्व जेलला चक्कर टाकून आल्यानंतर जे मोकळे मैदान होते, त्यामध्ये तारेच्या काटेरी कुंपणाचे एक मोठे वर्तुळ बांधून तयार केले होते आणि आत सर्वत्र तंबूच्या बराकी उभ्या हत्या.

त्या बराकी पाहून मला काहीसे हलके वाटले. माझ्या मनाशी विचार येऊन गेला, की हा तर सोपा जेल आहे. आमच्या आधी आलेले शे-दोनशे लोक त्या एवढ्या मोठ्या कॅम्प जेलमध्ये इतस्ततः हिंडताना पाहिले. त्यांच्या अंगावरचे कपडे पाहून ते आमच्यासारखेच सत्याग्रही असावेत, हे उघड होते. या

कॅम्प जेललाही असेच मोठे काटेरी तारेच्या कुंपणाचे प्रवेशद्वार होते. त्यातून त्यांनी आम्हाला आत घेऊन शिक्षा झालेल्या कैदयांचा पेहराव आम्हाला दिला आणि आमचे कपडे व इतर सामान आपल्या ताब्यात [illegible]. कोणीतरी येऊन आमच्या हातामध्ये जेलची जेवणाची थाळी, पाणी [illegible]ण्याचे भांडे आणि बिस्तरा आणून दिला. काखेत आपापला बिस्तरा आणि थाळी घेऊन आमची रपेट आत निघाली आणि आम्ही कॅम्प जेलचे बराक गावचे रहिवासी म्हणून मुक्कामासाठी बराकीमध्ये प्रवेश केला.

या कॅम्प जेलमध्ये मी १९३२ च्या फेब्रुवारीमध्ये आलो व तेथे संपूर्ण एक वर्ष होतो आणि त्यानंतरचे तीन महिने विसापूर जेलमध्ये होतो. अठरा महिन्यांच्या शिक्षेपैकी पंधरा महिने मला प्रत्यक्ष जेलमध्ये काढावे लागले आणि १९३३ च्या मे महिन्यामध्ये सुटून मी बाहेर आलो.

जेलमध्ये पंधरा महिन्यांचे माझे जीवन म्हणजे माझ्या जीवनातला एक अत्यंत उत्तम काळ होता, असे आजही मला वाटते. त्याचे कारण मी आता सविस्तरपणाने सांगू शकतो. मी एक गोष्ट कबूल केली पाहिजे की, माझ्या जीवनात भावनाशीलता कमी होऊन विचारांची खोली वाढविण्याची प्रक्रिया या जेलमध्येच सुरू झाली.

पहिले आठ दिवस मी असेतसेच काढले. तुरुंग हळूहळू भरत होता. एका आठवडयाच्या आत त्या जेलमध्ये जवळजवळ हजाराच्या वर कार्यकर्ते आले. या लोकांची वेगवेगळया बराकींमध्ये वाटणी करून त्यांची व्यवस्था लावण्याचे काम आम्हा सत्याग्रहींपैकी ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आपल्या हाती घेतले. बराकींना नंबर देण्यात आले. या लोकांची त्यामध्ये बराक नंबर १२ या एका महत्वपूर्ण बराकीची निमिर्ती झाली. ही बराक नंबर १२ मी जन्मभर विसरू शकणार नाही. जी प्रमुख माणसे जेलमध्ये आली होती, त्यांतील निवडक व नामवंत माणसांना या बराकीत घ्यायचे, असे कोणी तरी पुढाकार घेऊन ठरविले आणि त्याच मंडळींनी हायस्कूल व कॉलेज शिक्षण अर्धवट सोडून यावा लागलेल्या विदयार्थ्यांना याच बराकीत ठेवावे, असे सुचविले. त्यामुळे माझी या बराकीत निवड झाली आणि या बराकीतील आमचा बंदिस्त जीवनक्रम सुरू झाला.

प्रत्येक बराकीत शंभर माणसे राहतील, अशी व्यवस्था होती. बारा नंबरच्या बराकीमध्ये अगदी निवडक शंभर माणसे होती. त्यामध्ये प्रमुख नावे सांगावयाची झाली, तर आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन यांची नावे प्रथम सांगावी लागतील. तसेच या बराकीचे सुरुवातीला तेच प्रमुख होते, असे म्हटले तरी चालेल. रावसाहेबांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि इंग्रजीवरचे प्रभुत्व यामुळे नवीनच आलेल्या जेल अधिकाऱ्यांनी त्यांना ऑफिसमध्ये येऊन कामात

मदत करण्याची विनंती केली. रावसाहेबांनी ती मान्य केली आणि ते रोज ऑफिसमध्ये जाऊ लागले. रावसाहेबांच्या ऑफिसमध्ये जाण्यामुळे एक उत्तम फायदा झाला. त्यांनी अधिकाऱ्यांची मने वळवून राजबंदयांना वाचण्यासाठी सर्व तऱ्हेची, सर्व विषयांवरील पुस्तके मिळविण्याची व्यवस्था केली मुंबई, पुणे येथील कार्यकर्त्यांच्या व जाणत्या मित्रांच्या सहकार्यामुळे लायब्ररीतून आणि इतरही काही ठिकाणांहून नानाविध पुस्तके जेलमध्ये येऊ लागली. राष्ट्रीय चळवळीतील काही लोकांनी तर अशा तऱ्हेने राजकीय कैदयांना पुस्तके पुरविण्याचे काम हेच आपले राष्ट्रीय काम मानले होते. त्यामुळे थोडयाच दिवसात बारा नंबरच्या बराकीमध्ये एक चांगल्यापैकी लायब्ररी स्थापन झाली, असे म्हटले, तरी हरकत नाही. अर्थात या पुस्तकांचे महत्त्व मला पहिल्या प्रथम समजले नाही. ही गोष्ट खरी.

जाणते लोक बराकीत येऊन विविध विषयांवर चर्चा होऊ लागल्या आणि जेलमध्ये आमचे वास्तव्य अधिक समृद्ध व सुसंघटित होऊ लागले. आमच्या दिनचर्या नियमाने बांधल्या गेल्या.

आम्हाला खरे तर सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या होत्या. पण आम्हा सर्वांना देण्यासारखे कठीण कामच तेथे नव्हते. पाच-पन्नास लोकांच्या गटाला ते दोन-चार तास जेलबाहेर घेऊन जात आणि कुठेतरी दगड एकत्र करून नवीन रस्ता बांधण्याचे काम त्यांनी सुरू केले होते, तेथे कामाला लावत. पण तो रस्ता कधीच पुरा झाला नाही.

पुढे तर त्यांनी हे बाहेरील कामही बंद केले. बराकीमध्येच कापडी पट्टे विणण्याचे काम आम्हाला त्यांनी शिकविले. दररोजचा आमच्या विणकामाचा जो ठराविक वाटा होता, तो बराकीतल्या बराकीत पुरा केल्यानंतर आम्हाला बाकी सर्व दिवस मोकळा होता.

बराकीतल्या लोकांच्या आता अधिक ओळखी होऊ लागल्या. तेव्हा माझ्या लक्षात आले की, महाराष्ट्रातील फार महत्त्वाची माणसे या बराकीत राहायला आली आहेत. पुण्याचे श्री. अतीतकर, आयुर्वेदतज्ज्ञ मामा गोखले, श्री. वि. म. भुस्कुटे होते. श्री. एस्. एम्. जोशी होते. तसेच त्यात टिळक महाराष्ट्र विदयापीठात व पुण्याच्या आयुर्वेद विदयालयात शिकणारे काही विदयार्थी होते. तसेच अहमदनगरच्या राष्ट्रीय शाळेतीलही विदयार्थी बरेच होते. कोणी अंडरग्रॅज्युएट होते, तर कोणी मॅट्रिकपर्यंत शिकलेले होते, कोणी मॅट्रिक परीक्षेला बसणारे माझ्यासारखे चार-सहा जण होते. या दृष्टीने हा एक मोठा वेगळ्या स्वरूपाचा संच तेथे जमला होता, असे मला वाटू लागले.

या सर्व मंडळींची ओळख-पाळख व्हायला आठवडा, दोन आठवडे गेले.

बराकीत अंथरुणाला अंथरुण लागून बिस्तरे टाकले गेले होते आणि प्रत्येकाचा बिस्तरा म्हणजे जणू काही होस्टेलची रूम, असे त्याचे स्वरूप असे. कामाशिवाय असलेला वेळ आपापल्या बिस्तऱ्यावर बसून किंवा वाचन करून घालवावयाचा, असा कार्यक्रम चालू होता. हळू हळू त्यातून एक संघटित स्वरूप निर्माण झाले. समविचाराची माणसे एकत्र आली. शारीरिक खेळांची, किंवा पत्ते वगैरे बैठ्या खेळांची आवड असणारी माणसे एकत्र आली. गंभीर वाचन करून वैचारिक चर्चा करणाऱ्यांचा एक स्वतंत्र ग्रूप तयार झाला. शंभर माणसांच्या छोटेखानी समान घटकांमध्ये त्यांची वेगवेगळी अशी अंगे प्रस्थापित झाली.

आचार्य भागवत यांनी एकदा मला आणि माझ्याइतकेच शिक्षण झालेल्या लोकांना एकत्र बोलाविले आणि सांगितले,

"तुम्ही तुमचा येथील वेळ, बुद्धी आणि मन संस्कारित करण्याच्या प्रयत्नांत घालवा. परीक्षेला बसता येईल किंवा नाही, हे सांगता येत नाही; पण एवीतेवी तुम्ही देशभक्तीच्या कार्यात उडी टाकलेली आहे, तेव्हा होणाऱ्या परिणामाची पर्वा करू नका. पण जेव्हा केव्हा वेळ मिळेल, तेव्हा येथे असलेल्या माणसांची ओळख करून त्यांच्या सहवासाचा लाभ घ्या. तसेच येथे उपलब्ध होणारी पुस्तके वाचून त्यांचाही उपयोग करून घ्या."

मला तर हेच हवे होते. म्हणून माझ्यासारखीच असणारी जी तरुण मुले होती, त्यांच्याशी मी याबाबत बोललो. त्यामध्ये पांडूतात्या डोईफोडे होते, सेनापती बापट यांचे चिरंजीव वामन बापट होते, पुण्यातील प्रसिद्ध डॉक्टर लागू यांचे कनिष्ठ बंधू होते, सोलापूरचे भोसले होते, माझे कऱ्हाडचे मित्र कोपर्डेकर होते. आम्ही विचार केला की, आपण एखादचा वर्गासारखे एकत्रितपणे काही नवीन काम सुरू करू या आणि त्यासांठी येथे असलेल्या विद्वान मंडळींची मदत घेऊ या.

या वेळपर्यंत आणखी काही नवे सत्याग्रही आमच्या बराकीत भरती होत होते. त्यामध्ये माझे मित्र राघूअण्णा आले, शिवाय ह. रा. महाजनी हेही आले. कर्नाटकामधली एक-दोन ज्ञाती मंडळीही या बराकीची सदस्य होती. ह. रा. महाजनी माझ्या जिल्हयातले, म्हणून चांगलेच परिचित होते. मी त्यांना आचार्य भागवतांनी मला दिलेला सल्ला सांगितला, 'तुम्ही या कामात सहकार्य कराल काय', असे विचारले. ते स्वत: वाङ्मयविशारद होते. संस्कृतचे मोठे पंडित होते. आधुनिक शास्त्रांचेही वाचन ते करीत होते. आम्ही तर आमच्या जिल्हयामध्ये त्यांच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानामुळे 'महाजनीशास्त्री' या नावानेच त्यांना संबोधीत होतो. महाजनींनी सुचविले, की या सर्व विदयार्थी मंडळींना जमवून कालिदासाचे 'शांकुतल'चे वाचन करू या. त्यांच्याजवळ ते पुस्तक होते व ते

बरोबरच घेऊन आले होते. आणि मग दुसऱ्या दिवसापासून आमचा हा शांकुतल' वाचनाचा वर्ग सुरू झाला. कालिदासाची आणि माझी जुनी ओळख 'मेघदूता' पासून होती. आता महाजनींसारखा पटाईत संस्कृततज्ज्ञ आणि उत्तम शिक्षक आम्हाला 'शाकुंतल' शिकवू लागल्यामुळे हा वाचन-वर्ग बराच लोकप्रिय झाला. त्यामुळे आम्हा विदयार्थ्यांखेरीज इतर मंडळीही त्या वर्गाला येऊन बसू लागली.

अशा तऱ्हेचे अनेक बौद्धिक व शैक्षणिक वर्ग बराकीच्या वेगवेगळ्या कोनाकोपऱ्यांत सुरू करण्याचे प्रयत्न झाले.

आमचे 'शाकुंतला'चे वर्ग सुरू झाल्यानंतर काही दिवसांनी आचार्य भागवतांनी आम्हाला शेक्सपियरचे एक नाटक शिकविण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे त्यांनी निवड केली 'ज्यूलिअस सीझर' या नाटकाची. आम्हा विदयार्थ्यांचे इंग्रजी शिक्षण मॅट्रिकपर्यंतचे होते, तेव्हा शेक्सपियरच्या अभ्यासासाठी ते उपयोगी पडू शकेल की नाही, याची आम्हाला शंका होती, पण आचार्य भागवत हे हाडाचे शिक्षक होते. त्यांनी फार परिश्रम घेऊन नाटकाची पार्श्वभूमी, ज्यूलिअस सीझरचे इतिहासातले महत्त्व आणि या नाटकातील इतर व्यक्तिरेखा व सौंदर्यस्थळे इतक्या कौशल्याने सांगायला सुरुवात केली की, शाकुंतलचा वर्ग जसा लोकप्रिय झाला. तसाच हाही झाला. ज्यूलिअस सीझरच्या आणि शाकुंतलच्या या वर्गाच्या कीर्तीमुळे इतर विद्वान मंडळींनीही अशा प्रकारचे वर्ग बराकीत सुरू केले.

हे दोन्ही प्रयोग जवळ जवळ महिनाभर चालू होते. त्यानंतर आमचाही आत्मविश्वास वाढला. इतर इंग्रजी पुस्तके वाचण्याची आमची इच्छा जागी झाली. कधी इतरांच्या शिफारशीवरून, तर कधी आपल्या आवडीवरून, आम्ही पुस्तके निवडू लागलो व वाचू लागलो. वाचनाची दिशा आणि खोली बदलू लागली.

या जेलच्या वर्ष, सव्वा वर्षाच्या संपूर्ण मुक्कामात पुढच्या विदयार्थी-जीवनात जितके वाचले नसेल, तितके मी वाचून घेतले.

राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी संबंध याचाही आता बराकीमध्ये चर्चेच्या रूपाने व्यासंग सुरू झाला होता.

आचार्य भागवत हे कट्टर गांधीवादी म्हणून प्रसिद्ध होते आणि गांधीवादाची ते बौद्धिक दृष्टया उकल करून सांगत असत. महात्मा गांधी हे निव्वळ राजकीय पुढारी आहेत, असे नसून मानवी विचारांच्या परिपक्वतेत भर घालणारी अशी नवी दृष्टी त्यांनी आपल्या तत्वज्ञानाने दिली आहे, असे ते सांगत असत. गांधीवादी विचार हा भारतीय संस्कृतीतून निर्माण झालेला एक नवीन जीवन-दृष्टिकोण आहे आणि त्या विचारांना जशी काही मूलभूत आर्थिक

सिद्धांताची बाजू आहे, तशीच राजकीय बाजूही आहे. तसेच त्या विचारांना काही शास्त्रीय पायाही आहे. किंबहुना ते जीवनाचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. अहिंसा आणि सत्य हे नुसते दोन शब्द नसून एकाच तत्वप्रणालीच्या दोन बाजू आहेत. आचार्य भागवत आपले हे विचार मोठ्या आक्रमक पद्धतीने मांडत असत आणि मग यावरती चर्चा व वाद सुरू होत असे.

आम्ही सर्वच कार्यकर्त्यांनी गांधींचे राजकीय नेतृत्व मान्य केलेले होते; परंतु सर्वांनीच त्यांचे तत्त्वज्ञान स्वीकारलेले होते किंवा सर्वांना ते समजलेले होते, असे म्हणता येण्यासारखे नव्हते. या चर्चांमुळे विचारांतील मूलभूत फरक आणि त्यांतील फरकांच्या सूक्ष्म छटा ध्यानात यायला मदत झाली. आचार्य भागवत प्रतिपादतात, त्या अर्थाने मी गांधीवाद स्वीकारला आहे काय? असा प्रश्न मी स्वतःला विचारू लागलो आणि त्याचे उत्तर होकारार्थी येईना. माझ्या मनात हा संघर्ष पुढे कित्येक वर्षे चालणार होता, याचीही मला यावेळी कल्पना नव्हती.

गांधीवादाच्या चर्चेबरोबरच समाजवाद आणि मार्क्सवाद याही विचारांची बराकीतील या वर्गात चर्चा सुरू झाली आणि त्याला पोषक असे वाङ्मयही आम्हा लोकांना वाचण्यासाठी मिळू लागले. आमचे राजकीय शिक्षण हे या पद्धतीने नियमित, सातत्याने व मोठ्या तीव्रतेने सुरू झाले. काय वाचावे, आणि काय वाचू नये, असे वाटावे, इतक्या पुस्तकांचा साठा तेथे जमला होता. एस्. एम्. जोशी, ह. रा. महाजनी ही तरुण मंडळी गांधीवाद स्वीकारलेल्यांपैकी दिसत नव्हती. त्यांच्या मनात त्यासंबंधी अनेक शंका होत्या व ते त्या वेळोवेळी विचारत असत. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी समाजवादाचा विचार आवश्यक नाही का, असे प्रश्न उभे करीत आणि त्यांचे हे प्रश्न बरोबर आहेत, असे मला वाटे.

वि. म. भुस्कुटे हे मार्क्सवादाचे नवे भोक्ते होऊ घातले होते. त्यांच्या मताने निव्वळ समाजवादाची पोकळ भाषा बोलून काही काम भागणार नाही, तर समाजवादाचा शास्त्रीय विचार करून त्या विचाराची पद्धती राजकीय लढ्यात स्वीकारल्याशिवाय हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार नाही, असे विचार ते मांडत.

गांधीवाद, समाजवाद व मार्क्सवाद या तिन्ही गोष्टींपेक्षाही वेगळा दृष्टिकोण ठेवून विचार करणारीही मंडळी होती. त्यांचे म्हणणे असे, की हे असे तात्त्विक आग्रह निरर्थक आहेत. टिळक, गांधी यांनी स्वराज्याची जी मागणी केली आहे, त्या मागणीसाठी ते जे सांगतील, ते आचरणात आणून इंग्रजांशी लढत राहिले पाहिजे आणि हेच आपणा सर्वांचे काम आहे. तत्त्वज्ञानाच्या घटपटादी वादामध्ये पडण्यात काही अर्थ नाही. यामुळे उगीच बुद्धिभेद होतो आणि माणसे एकमेकांपासून दूर जातात.

आमच्या बराकीत चाललेल्या विविध विचारांचे हे धावते चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर माझे विचारविश्व बनत होते. केव्हा केव्हा असे होई की, ज्यांचे म्हणणे ऐकावे, त्यांचे म्हणणे बरोबर आहे, असे वाटे. पण मग सगळ्यांचेच म्हणणे बरोबर कसे असेल? कोणते तरी एकच म्हणणे बरोबर असेल. मग ते कोणते? याचा निर्णय आपणच आपल्या मनाशी केला पाहिजे. शेवटी मी मनाशी ठरविले, की कोणताही निर्णय, कोणी सांगितले, म्हणून आपण स्वीकारावयाचा नाही. विचारांच्या क्षेत्रातील निर्णय हा आपला आपणच केला पाहिजे आणि त्यासाठी आपण वाचन केले पाहिजे. चिंतन केले पाहिजे. जेलमध्ये तर वाचन केलेच पाहिजे; परंतु जेलच्या बाहेर गेल्यानंतरही वाचन व चिंतन सुरू ठेवले पाहिजे. प्रत्यक्ष जनतेत काम करीत असताना आलेल्या अनुभवाच्या आधारे यासंबंधीचे निर्णय घेतले पाहिजेत.

प्रथमतः मला अवघड वाटणाऱ्या आणि माझ्या काहीशा आवाक्याच्या बाहेर असणाऱ्या पुस्तकांच्या वाचनाला मी हात घातला. इंग्रजी शब्दकोशाचा वारंवार उपयोग करून आणि अवतीभोवतीच्या मित्रमंडळींशी चर्चा करून मी बरट्रँड रसेल यांचे 'रोड्स् टु फ्रीडम' हे पुस्तक वाचले. जवळ जवळ एक महिनाभर मी हे पुस्तक वाचत होतो. या पुस्तकाच्या वाचनामुळे विचारांच्या दिशा किती व्यापक आहेत, याचा अंदाज आला. आणि स्वातंत्र्याचा हा प्रश्न केवळ हिंदुस्थानपुरता मर्यादित नसून सर्व मानवजातीमध्येच या प्रकारच्या विचाराने खळबळ माजविली आहे, याचीही कल्पना आली. शास्त्रीय दृष्टीने विचार कसा करावा, याचा पहिला अनुभव मला रसेलच्या या पुस्तकाच्या वाचनातून आल्यासारखा झाला.

या पुस्तकाच्या वाचनानंतर आपण आणखी काही इंग्रजी पुस्तके वाचू शकू, असा आत्मविश्वास माझ्या मनात आला. आणि त्याप्रमाणे गांधीजींच्या जीवनावर, लेनिनच्या जीवनावर असलेली पुस्तके मी पाहू लागलो.

मार्क्सवादाच्या मला समजणाऱ्या वाङ्मयाबरोबर रशियन राज्यक्रांती-बद्दलही मी बरेचसे वाचले. 'टेन डेज, दॅट शुक द वर्ल्ड' हे जॉन रीड् यांचे पुस्तक बाराव्या बराकीत फार लोकप्रिय झाले होते. मी त्या पुस्तकावरील चर्चा आणि त्याचे प्रत्यक्ष वाचन या दोन्ही तऱ्हांनी पुस्तक समजावून घेण्याचा प्रयत्न केला. रशियन राज्यक्रांतीची सगळी कहाणी रोमांचकारी आहे. आणि त्यातील लेनिनचे कार्य जागतिकदृष्ट्या ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची फार मोठी छाप माझ्या मनावर पडली. रशियन राज्यक्रांती ज्या प्रकाराने झाली, त्या प्रकारे इतर देशांत राज्यक्रांती होईल की नाही, हे सांगणे अवघड आहे. किंबहुना हे काम जरा अवघड आहे, अशीच त्यावेळी माझी भावना

होती. परंतु लेनिन यांच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करून निर्णय घेण्याच्या शक्तीबद्दल अचंबा वाटत राहिला. आणि लेनिनसंबंधी वाटणारी आदराची भावना तेव्हापासून जी मनात बसली, ती त्यानंतरही आजपर्यंत वाढत राहिली आहे.

लेनिनसंबंधीच्या गोष्टी डॉक्टर शेट्टी आणि ह. रा. महाजनी यांच्याशी बोलत असतानाच त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय या हिंदी कम्युनिस्ट नेत्याचा उल्लेख केला आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्यांनी देशत्याग करून कशा प्रकारे वनवास पत्करला, आणि हे वनवासाचे जीवन भटकत काढत असताना मेक्सिकोमध्ये त्यांनी कम्युनिझमचा स्वीकार कसा केला, त्याचप्रमाणे रशियन राज्यक्रांतीनंतरच्या बांधणीच्या काळात आंतरराष्ट्रीय कम्युनिझमच्या प्रसारानिमित्त उभारलेल्या संघटनेत रॉय यांनी लेनिनच्या बरोबर काही वर्षे काम कसे केले, या संबंधीच्या हकीकती त्यांनी मला विस्ताराने सांगितल्या. या हिंदी नावासंबंधी मला एक नवी जिज्ञासा वाटू लागली. डॉक्टर शेट्टी हे या सत्याग्रहात जेलमध्ये आले असले, तरी ते मानवेंद्रनाथ रॉय यांचे वैचारिक साथी होते, असे नंतर त्यांनी आम्हांला सांगितले. त्याचप्रमाणे मानवेंद्रनाथ रॉय हे त्यावेळी जेलमध्ये होते, तरी तेथून आपल्या सर्व मित्रमंडळींशी ते पत्रव्यवहाराने कसा संबंध ठेवतात, आणि आपले विचार कळवीत असतात, याची काहीशी गुप्त माहितीही त्यांनी मला सांगितली.

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नावाशी माझी पहिली ओळख अशी झाली आणि पुढे त्यांच्या विचारांशी असलेला संबंध काहीसा वाढत गेला. परंतु प्रथमच मी त्यांच्यासंबंधी येथे ऐकले, म्हणून मी याचा उल्लेख या ठिकाणी करीत आहे.

जेलमधून बाहेर पडल्यानंतर मी माझ्या अनेक सहकारी मित्रांच्या सोबतीमुळे आणि आग्रहामुळे काही काळ रॉय यांच्या विचारांचा पाठपुरावा केला होता. पण ती पुढची कहाणी आहे.

या राजकीय स्वरूपाच्या पुस्तकांच्या वाचनाबरोबरच वाङ्मयविषयक पुस्तकांचे वाचनही मी सुरू केले. मराठी वाङ्मयाच्या वाचनाची माझी आवड जुनी होती. तिला आता नवा अर्थ प्राप्त झाला. आचार्य भागवतांच्या बिछान्याभोवती रोज संध्याकाळी आम्हा अनेक जिज्ञासू सत्याग्रहींचा गराडा पडलेला असे.

आचार्य भागवत हे सर्वंकष बुद्धीचे गृहस्थ होते. प्रखर विद्वत्ता आणि तितकीच परखड वाणी ही त्यांची दोन मोठी आयुधे होती आणि ते अनेक विषयांवर तासन् तास बोलत असत. आणि ते निव्वळ ऐकूनसुद्धा कोणी मनुष्य बहुश्रुत, ज्ञानी झाला असता!

आचार्य भागवतांच्या श्रोत्यांतला मी एक कायमचा श्रोता होतो. बोलण्यापेक्षा ऐकण्यावरं मी तेव्हापासून अधिक भर देऊ लागलो.

एकदा बोलेता बोलता सहज त्यांनी बॅरिस्टर सावरकर यांच्यासंबंधी उल्लेख केला. त्यांच्या हिंदुत्ववादी राजकारणावर त्यांनी सपाटून टीका केली. आचार्य भागवतांनी सावरकरांनी केलेल्या हिंदुत्वाच्या व्याख्येसंबंधी विश्लेषण केले, या हिंदुत्वाच्या पायावर जर आम्ही राजकारण उभे करण्याचा प्रयत्न केला, तर भारताचे रहिवासी असलेल्या अनेकविध धर्मांतील लोकांची एकता कशी साधणार? जनतेची एकता हा स्वातंत्र्याचा प्राण आहे. या हिंदुत्वाच्या आग्रहामुळे जनता एकसंध राहू शकणार नाही, म्हणून हा प्रतिगामी विचार आहे. भागवतांच्या टीकेचा हा सारांश होता. मला ही टीका पटली. ओघाओघाने कोणी तरी त्यांना विचारले,

"साहित्यिक म्हणून सावरकरांबाबत तुम्हाला काय वाटते?

मघाशी त्यांच्यावर राजकीय टीका करणारे आचार्य भागवत एकदम बदलून गेले. त्यांच्या मनामध्ये, त्याचप्रमाणे बोलण्यामध्ये एक प्रकारचा हळुवारपणा निर्माण झाला आणि त्यांनी सांगितले,

"मला अत्यंत प्रिय आहेत, ते कवी सावरकर."

एवढेच नव्हे, तर दुसऱ्या दिवसापासून सावरकरांचे 'गोमंतक' आणि 'कमला' यांचे प्रकट वाचन सुरू करणार असल्याचे जाहीर करून ज्यांना कोणाला यायचे असेल, त्याने यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आता 'गोमंतक' आणि 'कमला' या काव्यांच्या वाचनासाठी आम्ही सर्व मंडळी दररोज जमू लागलो.

सावरकरांच्या या काव्याचा आस्वाद घेण्याची संधी मला प्रथमच मिळाली. त्यांतील 'कमला' काव्याची गोडी तर अवीट आहे. त्याची भाषा, त्यातल्या भावना आणि त्याच्यामध्ये असलेली देशप्रेमाची उत्कटता ही तरुण मनाला मोहून टाकणारी होती. मी यापूर्वीच सावरकरांची कविता का वाचू शकलो नाही, याचे मला आश्चर्य वाटू लागले.

या सामुदायिक वाचनानंतर इतरही काही पुस्तकांच्या सामुदायिक वाचनाची पद्धतही आमच्या बराकीमध्ये रूढ झाली. याचे नेतृत्वही भागवत यांच्याकडे होते. ते उत्तम शिक्षक असल्यामुळे आपल्याला जे आवडते आणि माहीत आहे, ते सर्वांना सांगून जाणते करावे, हा त्यांचा स्वभावधर्म होता आणि त्यामुळे ते मोठ्या आनंदाने हे काम करीत असत. या तऱ्हेने शिक्षण देण्याची त्यांना हौस होती, पण त्याचबरोबर अर्धवट, अपुऱ्या तऱ्हेने वाचन करणाऱ्या लोकांवर त्यांचा राग होता.

मला एकदा आठवते, एक चांगले वकील असलेले गृहस्थ 'गीतांजली' वाचत होते. त्यांना काही शंका उद्‌भवल्या, म्हणून ते आचार्य भागवत यांना विचारू लागले.

"आचार्यजी, मी 'गीतांजली' वाचतो आहे, परंतु त्यातला दाऊ (Thou) आणि हिम (Him) याचा नेमका अर्थ काय?'

आचार्यांच्या डोळ्यात आग उभी राहिली.

"तुम्ही रवींद्रनाथांची 'गीतांजली' वाचता आहात आणि त्यातल्या दाऊ (Thou) आणि हिमचा (Him) अर्थ तुम्हांला कळत नसेल, तर वाचायचे बंद करा!" असे तुसडे उत्तर देऊन ते मोकळे झाले. जिज्ञासूला शिक्षित करावे, परंतु दांभिकपणाने वाचन करणाऱ्यांचा तिरस्कार करावा, अशी त्यांची मनोवृत्ती होती.

मी भुस्कुटे यांच्याकडेही जाऊन बसत असे आणि त्यांच्याकडून मार्क्सवादाचा विचार समजावून घ्यायचा प्रयत्न करी. भुस्कुटे हे आचार्यांसारखे प्रतिभासंपन्न विद्‌वान नव्हते. परंतु त्यांनी आपला मार्क्सवादाचा अभ्यास अत्यंत परिश्रमपूर्वक आणि अत्यंत प्रामाणिकपणाने चालू केला होता. त्यावरील काही ग्रंथाचे मराठी वाचकांसाठी भाषांतर करण्याच्या कामातही ते गुंतले होते. असहकाराच्या चळवळीत त्यांची वाढ झाली होती. त्यामुळे गांधीवादाच्या परंपरेत ते वाढले होते. परंतु ३२ सालच्या या जेलमधील वास्तव्यात त्यांच्या विचारात परिपूर्ण बदल झाला होता. साम्यवादाचा स्वीकार केल्याशिवाय हिंदुस्थानचे आणि जगाचे प्रश्न सुटणार नाहीत, असे त्यांचे म्हणणे असे. त्यांच्याजवळची समाजवादासंबंधीची काही सोपी सोपी पुस्तके त्यांनी आम्हाला वाचायला दिली. त्यातली बरीचशी पुस्तके वाचायला आणि समजायला अवघड असणारी अशी होती. पण त्यांनी दिलेली 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ही पुस्तिका मी त्यांच्याजवळ बसूनच समजावून घेऊन अभ्यासली.

मार्क्सच्या विचारांचे, पुसट का होईना, दर्शन व्हायला 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ही पुस्तिका पुरेशी आहे, असे माझे तेव्हापासून मत बनले आहे. इतिहासाच्या विकासाकडे एका नव्या दृष्टीने पाहण्याची नजर मार्क्सने जगाला दिली, असा माझा समज झाला आहे आणि तो आजही कायम आहे. मार्क्सच्या पद्‌धतीने हिंदुस्थानचे प्रश्न सुटतील की नाही, याचा माझा निर्णय तेव्हा होत नव्हता. वाटे, की मार्क्सच्या विचाराकडे पाठ न फिरविता हिंदुस्थानने आपले प्रश्न आपल्या अनुभवातूनच सोडविले पाहिजेत.

आज मात्र माझी अशी स्पष्ट भावना झाली आहे की, आज एकोणिसाव्या शतकातल्या मार्क्सच्या विचारांच्या फार पुढे जग गेलेले आहे. मार्क्सवादी

म्हणणाऱ्या मंडळींनाही नवीन जगाशी जमवून घ्यावे लागेल, अशी आजची परिस्थिती आहे. पण यामुळे मार्क्सने जगाला दिलेल्या विचारधनाचे महत्त्व कमी होत नाही. किंबहुना त्याने दिलेल्या मूलभूत दृष्टिकोनाची वाट पुसतच आजच्याही विचारवंतांना जावे लागत आहे. गौतम बुद्ध आणि येशू ख्रिस्त यांच्यानंतर एवढ्या मोठ्या मानव समाजाच्या जीवन-पद्धतीवर परिणाम करणारा कोणी तत्ववेत्ता झाला असेल, तर तो मार्क्सच, हे कबूल करावे लागेल.

१२ व्या बराकीतील आमचे हे शिक्षण आणि वाचन दिवसेंदिवस असेच वाढत राहिले. त्यातून नवे स्नेही लाभले. महाराष्ट्राच्या विविध विभागांमधून आलेल्या लोकांच्या ओळखीपाळखी झाल्या. सोलापूरचे अनंतराव भोसले हे या ठिकाणी मला एक नवे मित्र मिळाले. आमचे राघूआण्णा लिमये हेही वाचत असत. परंतु त्यांची वृत्ती फार खोलात शिरण्याची नव्हती. मला ते नेहमी म्हणत,

"इतके काय वाचत बसतोस? स्वराज्यासाठी लढायचे, एवढी साधी गोष्ट तुला-मला समजली, एवढी पुरे आहे."

मी त्यांना म्हणे,

"आपण जेव्हा बाहेर जाऊ, तेव्हा तुमचा सल्ला मी मानेन. पण आज येथे असलेल्या वेळेचा उपयोग करून मला जितके वाचता येईल, तेवढे वाचून, समजून घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे."

राघूअण्णांनी १२ व्या बराकीत 'चला-खेळू या' नावाचा क्लब सुरू केला आणि त्यामध्ये हुतूतू, आट्यापाट्या, खो-खो, इत्यादी खेळ संध्याकाळच्या वेळेला बराकीच्या बाहेरच्या मोकळ्या जागेत आम्ही खेळत असू. बराकीतला अत्यंत आनंदाचा वेळ म्हणजे आंघोळीचा. आंघोळीसाठी आम्हाला प्रत्येक बराकीत छोटे छोटे घाट बांधून दिले होते. तेथे मुबलक पाणी मिळे. बादल्याच्या बादल्या अंगावर ओतून घेऊन आम्ही स्नान करीत असू. घरची मंडळी भेटीला येत, तेव्हा साबण, दंतमंजन अशी काही साधने घेऊन येत असत, तेव्हा ही सगळी व्यवस्था ठीक होती. कपडे उत्तम, स्वच्छ ठेवण्याची स्पर्धाच बारा नंबरच्या बराकीत सुरू झाली होती, असे म्हटले, तरी चालेल. काही मंडळी या स्पर्धेत आघाडीवर असत. अगदी जेलचे कपडे असले, तरी ते परीटघडीचे करून वापरणारेही काही लोक होते. या शर्यतीत मी पुढे नव्हतो, पण फार मागेही नव्हतो. मध्यावर कोठे तरी असेन.

जेलमध्ये दररोज संध्याकाळी सर्व तऱ्हेच्या भाज्यांचा एक संमिश्र काढा मिळत असे आणि तो खाल्ल्यानंतर दात काळे पडत असत. हा काढा म्हणजे दातांच्या आरोग्याचा मोठाच शत्रू होता, असे म्हटले, तरी चालेल.

जेलमध्ये असताना एक वेळ मला माझे वडील बंधू गणपतराव भेटायला आले होते. एकदा आई पण भेटायला आली होती. पाच-दहा मिनिटांच्या अशा या भेटीत कसलेच समाधान वाटत नसे. परतु नजरभेटीचा जो आनंद होता, तो काही कमी समाधानकारक नव्हता. माझी प्रकृती सामान्यतः उत्तम आहे, या गोष्टीचा आईला आनंद वाटत असे. गणपतरावांनी माझ्यासाठी काही पुस्तके आणली होती.

अधून मधून अशा भेटीमुळे मानसिक समाधान लाभत असे.

शेवटी शेवटी मात्र जेलमध्ये एकाकी वाटू लागले. वाचन जरी करत होतो. तरी शेवटी वाचन तरी किती करणार?

या जेलमध्ये झालेल्या महाराष्ट्राच्या राजकारणावरच्या चर्चाही मोठ्या अर्थपूर्ण असत. मात्र महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीसंबंधाने येथील पुढारी मंडळी ज्या चर्चा करत, त्यावरून या शहरी पुढाऱ्यांचा ग्रामीण समाजाबद्दल केवढा गैरसमज आहे, याची मला कल्पना आली. यातले बरेचसे उच्चभ्रू प्रवृत्तीचे लोक असत. सत्याशोधक चळवळीसंबंधी आणि महात्मा फुले यांच्याबद्दल या लोकांना कमी माहिती आहे, असे मला वाटते. यामध्ये अपवाद म्हणून समाजवादी विचारसरणीची जी मंडळी होती, त्यात एस्. एम्. जोशी, ह. रा. महाजनी, भुस्कुटे ही मंडळी काहीशी समजूतदारपणाने बोलत असत.

एस्. एम्. जोशी हे विशेषतः तरुण कार्यकर्त्यांच्या चळवळीकडे आणि त्यांच्या प्रश्नांकडे मोठ्या आत्मीयतेने पाहात असत. ते त्या वेळी 'यूथ लीग'चे पुढारी होते. बारा नंबरच्या बराकीमध्ये एके दिवशी संध्याकाळी युवक चळवळीच्या संबंधाने त्यांचे एक सुरेख व्याख्यान झाल्याची मला आठवण आहे. त्यांची त्या विषयाची तळमळ आणि स्वातंत्र्यासंबंधी असलेल्या भावनेची तीव्रता, सर्व जातींच्या मंडळींना एकत्र घेण्याची वाटणारी गरज या त्यांच्या विचारसरणीने माझ्या मनात त्यांच्याबद्दल जिव्हाळा निर्माण झाला. दररोज चाललेल्या वादाच्या खटपटीत ते फारसे भाग घेत नसत. प्रसंगोपात्त ते वादात पडत. परंतु जेव्हा पडत, त्यावेळी मोठ्या हिरिरीने पडत. त्यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल मला फार मोठा आदर वाटण्यासारखा अनुभव या काळात आला. जेलमध्ये त्यांनी सत्याग्रहींचे केस कापण्याचे आणि दाढी करण्याचे काम आपणहून आपल्याकडे मागून घेतले आणि हळहळू ते यात थोडे फार तज्ज्ञ झाले, असे म्हणायला हरकत नाही. ते काम ते मोठ्या आनंदाने आणि हसत खेळत करीत असत. त्यामुळे एस्. एम्. जोशी हे बाराव्या बराकीतील एक लोकप्रिय व्यक्तिमत्त्व होते.

याच वेळी आमच्याबरोबर कोल्हापूरचे वीर माने बारा नंबरच्या बराकीत होते. ते बोलण्यात ओबडधोबड, कमी शिकलेले, परंतु देशसेवेची अत्यंत तीव्र जाणीव असलेले कार्यकर्ते होते. त्यांनी मुद्दाम आमच्या जेलचे संडास साफ करण्याचे काम मागून घेतले होते. एस्. एम्. जोशी, वीर माने यांच्यासारखी माणसे आमच्यात होती, याचा आम्हांला अभिमान वाटे. वीर माने आणि माझी ओळख पुढे कोल्हापूरला शिक्षणासाठी गेल्यावर अधिक वाढली आणि आमची मैत्री वाढत राहिली.

आमच्या १२ नंबरच्या बराकीमध्ये नुसते चर्चा, वक्तृत्व आणि शिक्षण एवढेच काम चालू होते, असे नाही, तर पुढे पुढे तेथे बराकीचे बुलेटिन निघू लागले. आपल्याला वाटणारे विचार कागदावर किंवा स्लेट पाटीवर लिहून बराकीतील सर्व मंडळींत ते फिरवावे, अशी प्रथा सुरू झाली. ह. रा. महाजनी आपल्याजवळ असलेल्या स्लेट पाटीवर दोन्ही बाजूंनी आपल्या सुरेख अक्षरात त्या दिवसाचा त्यांचा विचार लिहून ठेवत असत आणि तो सर्व बराकीत फिरवला जाई. 'बजरंग' या टोपण नावाखाली ते असे लेख लिहीत. त्यांच्या लेखनातील ते कौशल्य पाहिल्यावर त्यावेळी माझ्या मनाची खात्री झाली की, पुढे ते प्रसिद्ध लेखक होतील. आणि झालेही तसेच. पुढे महाराष्ट्रात 'लोकसत्ता'चे एक प्रभावी संपादक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. त्यांच्या पत्रकारितेचा श्रीगणेशा बराक क्रमांक १२ मध्ये असा झाला होता.

अशा तऱ्हेने जेलमध्ये आमचे दिवस चालले होते. १९३१ साल संपले आणि ३२ उजाडले. यावेळी घडलेली आणखी एक महत्त्वाची घटना म्हणे ३२ सालामध्ये महात्मा गांधीजींनी केलेला 'कम्युनल ॲवार्ड' संबंधीचा आमरण उपवास. या उपवासाचा आमच्यावर खूप परिणाम झाला. यासंबंधी बराकीमध्ये चर्चा सुरू झाली. शेड्यूल कास्टना स्वतंत्र मतदार संघ देण्याची योजना ब्रिटिश सरकारने जाहीर केली. त्यामुळे देशात मतभेदाचे वातावरण निर्माण झाले. राजकीयदृष्टचा एक समाज दुसऱ्या समाजापासून अशा कारणाने वेगळा करून राष्ट्रात दुही पेरण्याचा एक मार्ग, म्हणजे स्वतंत्र मतदार संघ देणे, ही गोष्ट हिंदुस्थानला अनुभवाने माहिती होती. मुसलमान समाजाला वेगळा मतदार संघ देऊन, त्याचा परिणाम देशाच्या जीवनामध्ये एक मोठी दुफळी निर्माण होण्यात झाला होता, याचा अनुभव होता.

हिंदू समाजातून पुन्हा एकदा त्यांच्यांतला अस्पृश्य मानला जाणारा समाज राजकीय दृष्टीने कायमचा बाजूला करण्याचा या ब्रिटिश सत्तेने टाकलेला एक डाव आहे, असे आपले मत राष्ट्रीय विचाराच्या मंडळींनी जाहीर केले. आणि हे थांबवले पाहिजे, असा निर्धार व्यक्त केला. ते कसे थांबविणार, हा मोठा प्रश्न

होता. महात्मा गांधीजींनी यासाठी उपोषण केले होते. हरिजनांसाठी स्वतंत्र मतदार संघाची योजनाच मुळातून काढून टाकली पाहिजे, असा त्यांचा निर्धार होता.

उपोषण सुरू झाल्यानंतर या प्रश्नाची देशात विशेष चर्चा सुरू झाली आणि सबंध देश चिंतेत पडला. उपोषणाचे दिवस जसजसे जाऊ लागले, तसतशी चिंता अधिक वाटू लागली. महात्मा गांधींचे झालेले वय लक्षात घेता त्यांच्या जीवनास धोका आहे, असे लोकांना वाटू लागले. मग मध्यस्थांच्या खटपटी सुरू झाल्या.

डॉक्टर आंबेडकर यांचे मन वळवून काही तडजोड काढावी, असा प्रयत्न सुरू झाला. डॉक्टर आंबेडकरांनी गांधीजींनी भेट घ्यावी, असे प्रयत्न सुरू झाले. या संदर्भात आमच्या जेलमध्ये झालेल्या चर्चा मला आठवतात. हरिजन समाज, विशेषत:, डॉक्टर आंबेडकरांना मानणारा समाज हा संपूर्णतः स्वातंत्र्याच्या लढ्याच्या बाहेर होता. ही गोष्ट मी लहानपणापासून पाहात आलो होतो. त्याचे केवढे घोर परिणाम होतात, हे आता अधिक लक्षात आले. काही लोकांच्या मते आंबेडकरांनी तातडीने येऊन महात्मा गांधीजींच्या सूचना मान्य करून त्यांना उपोषण सोडण्यास सांगावे, असे होते. काही जे अतिरेकी होते, ते म्हणत असत की, इंग्रजांचे व त्यांचे हितसंबंध जुळते असल्यामुळे ते काही असे करणार नाहीत.

महात्मा गांधीजींच्या प्राणाला धोका जरूर होता ; तरीही हे असे बोलणे अनुदारपणाचे होते, असे मला त्यावेळीही वाटले, डॉक्टर आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल राष्ट्रीय चळवळीत त्यावेळी बरेच अन्यायकारक गैरसमज होते. त्यांच्या विद्वत्तेबद्दल सर्वांनाच आदर असे, पण दलित समाजाचे प्रतिनिधी म्हणून ज्या अनुभवातून ते गेले होते, त्यानुसार त्यांची राजकीय मते बनली होती. त्यांच्या जीवनाच्या प्रेरणा आणि वेदना समजून घेण्याची आत्यंतिक आवश्यकता होती. आम्ही सगळेच महात्मा गांधीजींचे अनुयायी होतो, त्यामुळे सगळ्यांना काळजी वाटू लागली. आम्ही सगळे सकाळ-संध्याकाळ सामुदायिक प्रार्थना करीत होतो. हिंदुस्थानातील ही दुफळी बंद होऊन राष्ट्रीय प्रवाह हा पूर्ववत राहावा, यासाठी योजिलेला गांधीजींचा हा अखेरचा उपाय आहे, याची आम्हाला कल्पना आली. आपल्या स्वातंत्र-चळवळीत काही अपुरेपणा आहे, हेही सर्वांच्या ध्यानात आले.

दलित समाजाच्या मनात राष्ट्रीय भावना निर्माण व्हावी, यासाठी काही महत्त्वाची पावले उचलल्याशिवाय हे घडणार नाही, अशी मनोमन जाणीव झाली. सुदैवाने बाहेरच्या लोकांच्या प्रयत्नांना यश आले. विशेषत:, डॉक्टर आंबेडकरांच्या मनाच्या मोठेपणामुळे त्यांनी आपले विचार सोडून देऊन प्रसिध्ध

पुणे करारावर सही केली आणि हिंदू समाजाची व राष्ट्रीय जीवनाची ही फाळणी या प्रकारे वाचविली. डॉक्टर आंबेडकरांनी गांधीजींचे प्राण वाचविले, याबद्दल मला डॉक्टर आंबेडकरांच्याबद्दल मनात रुजलेली आदराची भावना दुणावली.

या जेलमध्ये असताना दुसरी एक नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, गांधीजी शेजारी येरवडा जेलमध्ये असताना आम्हा कॅम्पवासी सत्याग्रहींना गांधीजींचे चुकूनही दर्शन होत नसे किंवा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क साधता येत नसे. आमच्या कॅम्प जेलच्या प्रमुख प्रतिनिधींनी हा प्रश्न जेल प्रमुख अधिकाऱ्यांसमोर मांडला आणि त्याने याबाबतीत गांधीजींशी चर्चा केली. त्यानुसार अधूनमधून दरमहा किंवा दर दोन महिन्यांनी कॅम्प जेलचे निवडक दोन प्रतिनिधी गांधीजींना भेटण्यासाठी पाठवावयाचे, असे ठरले. आणि पुढे असे लोक जाऊन गांधीजींना भेटत असत आणि तेथून परत आल्यानंतर त्यांची काय चर्चा झाली, याची माहिती प्रत्येक बराकीत जाऊन देत असत. अर्थात या भेटीमध्ये राजकीय चर्चा न करण्याचे तत्त्व गांधीजींनी स्वीकारले होते. त्यामुळे विधायक कार्यासंबंधीची किंवा काही वैचारिक प्रश्नांसंबंधीची चर्चा करणे एवढेच शक्य होते. मला आठवते, गांधीजींचे चिरंजीव श्री. रामदास गांधी आमच्या कॅम्प जेलमध्ये होते. ते एक वेळ कॅम्प जेलचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधीजींच्या भेटीस गेले व त्यांनी येऊन भेटीत काय झाले, याचा वृत्तांत आम्हाला सांगितला.

सत्याग्रहींच्या मनात एक विचार असे की, या सत्याग्रहाचा शेवट कसा होणार, याचा काही अंदाज गांधीजींनी दिला काय? हे समजून घेण्यासाठी आणि त्यासंबंधी काही तरी ऐकायला मिळेल, अशा आशेने अशा भेटणाऱ्यांच्या परतीनंतर त्यांच्याभोवती सत्याग्रहींची गर्दी होत असे. गांधीजींनी काही अंदाज दिला का? गांधीजी आनंदी आहेत का? त्यांची प्रकृती बरी आहे ना? अशा तऱ्हेचे प्रश्न विचारत असत.

माझे मित्र गौरीहर सिंहासने शेजारच्या तेरा नंबरच्या बराकीमध्ये स्थानबद्ध होते, त्यांना दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झाली होती. त्यांना बराच काळ जेलमध्ये राहायचे असल्यामुळे त्यांनी त्या बराकीत अनेक मित्र जमा केले होते आणि एका अर्थाने त्यांचे ते एक प्रमुख मानले जात होते. त्यांच्या या कर्तबगारीचे मला कौतुक वाटत होते.

एक दिवस त्यांनी मला निरोप पाठविला, की कॅम्प जेलच्या मार्फत गांधीजींना भेटायला जाणाऱ्या मंडळींत या खेपेला त्यांच्या बराकीने त्यांचे नाव सुचविले आहे. मला आनंद झाला. गांधीजींच्या आदेशावरून आम्ही कारागृहात आहोत आणि असे कारागृहात असताना आपली नाही, तरी निदान आपल्या मित्राची गांधीजींशी भेट होत आहे याचा मला आनंद वाटला.

ठरल्याप्रमाणे सिंहासने गेले आणि गांधीजींची भेट घेऊन आले. त्यांनी या सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांच्यात त्यांच्या कुटुंबियांमध्ये निर्माण झालेले प्रश्न त्यांनी गांधीजींना विचारले. गांधीजींनी त्यांना सल्ला दिला,

'सत्याग्रहात भाग घेणे ही गोष्ट तुम्ही तुमच्या मनाने जर स्वीकारली असेल, तर आता तुमच्या कुटुंबियांवर अवलंबून राहण्याचा तुम्हाला काही अधिकार नाही. तुमचे जीवन तुमचे तुम्ही घडविले पाहिजे. त्याचा बोजा तुमच्या एकत्र कुटुंबावर टाकण्याचा तुम्हाला अधिकार नाही.'

ही हकीकत मला सिंहासने यांनी गांधीजींची भेट घेऊन आल्यानंतर सांगितली. सिंहासने यांचे शिक्षण तसे फार झालेले नव्हते. पण राजकारणातल्या कामाची त्यांची निष्ठा इतकी प्रबल होती, की त्यांनी गांधीजींचा शब्द पुरा करावयाचे आपल्या मनाशी ठरविले.

ही आठवण मला नेहमी आनंदित करते, ती यासाठी की, गांधीजींची जेलमध्ये भेट मिळविली, म्हणजे आपण स्वराज्य मिळविले, अशा आनंदात सिंहासने होते आणि माझ्या मित्राच्या आनंदात मी सहभागी होतो.

या जेलमध्ये काढलेले एक वर्ष म्हणजे माझ्या मताने माझे एक प्रकारे विदयापीठीय जीवन होते. १९३२ साल उजाडले आणि शिक्षेपैकी एक वर्षाचा कालावधी झाला. एक वर्ष संपल्यानंतर या जेलमधून आमची बदली विसापूर जेलमध्ये होणार, असे जाहीर झाले. विसापूर जेल, म्हणजे अत्यंत कष्टदायी जेल, अशी त्याची ख्याती होती. हवामान चांगले नाही, पाण्याची कमतरता फार, कडक बंदोबस्त व कठोर अधिकारी असलेला जेल, अशी या जेलची ख्याती होती. आम्ही विचार केला, एक वर्ष तर आनंदात गेले. राहिलेले दिवस थोडे दुःखात जातील, तर काय बिघडले म्हणून आम्ही मनाची तयारी केली. ठरलेल्या दिवशी सकाळी विसापूर जेलमध्ये जाणाऱ्या माणसांचे गट करण्यात आले आणि मी ज्यात होतो, असा शंभर माणसांचा गट कॅम्प जेलच्या दाराशी असलेल्या पोलिसांच्या मोटारीत बसण्यासाठी निघाला. त्या जेलच्या दारातून बाहेर आल्यानंतर मी एकदा परत पाठीमागे फिरून त्या जेलकडे पाहिले. घर सोडताना जसे दुःख होते, त्याच्यापेक्षा काहीसे जास्त दुःख मला हा जेल सोडताना होत होते. ही एक वर्षाची जेलची आनंददायी संगत जन्मभर लक्षात राहील, अशी होती. तेथे भेटलेली माणसे, तेथे वाचलेली पुस्तके, तेथे झालेल्या चर्चा, त्यांतून आलेली नवी जाण, या सर्व जीवनाला शक्ती देणाऱ्या व पोषक गोष्टी होत्या, त्यामुळे माझ्या मनामध्ये कृतज्ञतेचा भाव आला आणि माझे डोळे अक्षरशः भरून आले. माझे मला आश्चर्य वाटले.

दुसऱ्या दिवशी आम्ही विसापूरला पोहोचलो. विसापूर जेल दौंड आणि मनमाड या रेल्वे लाईनवर असलेल्या विसापूर स्टेशनपासून दोन-तीन मैलांवर आहे. एखादद्या ओसाड वाटणाऱ्या माळावर बांधलेला हा जुना जेल बऱ्याच लांबून पाहिल्यावर मनामध्ये एक प्रकारची भीती निर्माण करतो. परंतु आम्ही तेथे पोहोचल्यानंतर मात्र आमच्या ध्यानात आले की, गेले वर्षभर तेथे राहणाऱ्या सत्याग्रहींनी त्याला अतिशय वेगळे रूप दिलेले आहे. जेल अधिकाऱ्यांची आणि सत्याग्रहींची एक सहकाराची भावना तेथे निर्माण झाली होती. गुजरात आणि मुंबई येथून आलेले अनेक प्रमुख नेते आणि कार्यकर्ते या जेलमध्ये गेले वर्षभर राहात होते. या जेलला अनेक बराकी होत्या आणि प्रत्येक बराकीला सत्याग्रहींतून एक प्रमुख 'स्पोक्समन' निवडला जात असे. त्या बराकीतील सत्याग्रही कैदद्यांचे जे प्रश्न असतील, ते हा पुढारी सोडवून घेत असे. पत्रव्यवहार, पुस्तके मागविणे, आजारपणासाठी लागणारी औषधे मिळविणे अशा स्वरूपाचे हे प्रश्न असत. मी ज्या बराकीत होतो, त्या बराकीचे पुढारी बडोदद्याचे प्रसिद्ध काँग्रेस नेते श्री. मगनभाई पटेल हे होते. अत्यंत सज्जन मनुष्य, मनमिळाऊ स्वभाव, मृदु व मधुर भाषण करण्याची सवय, यामुळे सगळद्यांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता.

आम्ही तेथे गेल्यानंतर थोडद्याच दिवसात येरवडद्यातील बाराव्या बराकीचे रूप या विसापूरच्या बराकीस देण्याचा प्रयत्न केला. मुंबईचे प्रसिद्ध नेते स. का. पाटील त्यावेळी विसापूर जेलमध्ये होते. त्यांनी जेलमध्ये अतिशय व्यवस्थित आणि संपन्न अशी लायब्ररी उभी केली होती. शेकडो जुनी पुस्तके दररोज परत जात आणि शेकडो जुनी पुस्तके येत, असा हा सहकार्याचा संबंध येथे प्रस्थापित झालेला मी पाहिला.

आमच्या या बराकीमध्ये कॅम्प जेल १२ मधील बराकीतीलही काही मित्र होते. तात्या डोईफोडे, दयार्णव कोपर्डेकर आणि मी होतो. योगायोगाने ह. रा. महाजनीसुद्धा या बराकीत आले होते. त्यामुळे वाचानाच्या, चर्चेच्या बैठकी येथेही सुरू झाल्या. या बराकीमध्ये राहिल्यानंतर गुजराती मित्रांच्या सहवासामुळे गुजराती बोलणे आम्हाला समजू लागले आणि गुजराती भाषेशी नजीकची ओळख विसापूर जेलमध्ये झाली. त्याचा उपयोग पुढे मला मी द्विभाषिक राज्याचा मुख्यमंत्री झाल्यानंतर फार झाला.

ह. रा. महाजनींनी एक दिवस मला सूचना केली,

"आपण गेले वर्ष, सव्वा वर्ष विविध विषयांवरील पुस्तके वाचतो आहोत, अभ्यासतो आहोत, तेव्हा त्यांचे आपल्या मनावर झालेले परिणाम आणि

आपल्या विचारांच्या दिशा इतर लोकांना सांगण्यासाठी बराकीतील मित्रांपुढे एक व्याख्यान दे."

—आणि माझ्या आठवणीप्रमाणे 'गांधीवाद' हा विषय घेऊन मी ३५ ते ४० मिनिटांचे एक भाषण त्या बराकीत दिले. गांधीवादाचे जे वेगवेगळे पैलू होते, त्यांची माझ्या वाचनामधून आणि चिंतनामधून मला जी समज आली होती, तिची मी मांडणी केली. आणि भाषणाच्या शेवटी हे स्पष्ट केले की, मला जो समजला आहे, तो गांधीवाद असा आहे. ही माझी जीवननिष्ठा आहे, असे मी प्रामाणिकपणे म्हणू शकत नाही; पण एक गोष्ट मान्य केली पाहिजेल, की गांधीवादाची सर्वांत महत्त्वाची देणगी —जी मानवी जीवनाला नित्य उपयोगी पडणारी अशी आहे, ती म्हणजे साध्य, साधन, शुचिता. गांधीवादाचे राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम कोणी स्वीकारो अगर न स्वीकारो, पण साध्य, साधन, शुचितेचा सिद्धांत हा नुसता तत्त्वतः श्रेष्ठ वाटतो, असे नव्हे, तर व्यवहारतः दैनंदिन आचारासाठीही अत्यंत उपयोगी पडणारा सिद्धांत आहे.

असा एखादा नेमका विषय घेऊन त्यावर बोलण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग होता. माझे ते पाऊण तासाचे भाषण झाल्यानंतर अनेकांनी माझे अभिनंदन केले. विशेषतः, ह. रा. महाजनी आणि निपाणीचे अनंतराव कटकोळ --जे गांधीवादी म्हणून प्रसिद्ध होते, त्यांनी माझे फार कौतुक केले. त्यांच्या कल्पनेपेक्षा, माझ्या वयाच्या आणि शिक्षणाच्या मानाने मी केलेली विषयाची मांडणी त्यांना फार मोलाची वाटली. आणि मला समाधान वाटले की, गेले वर्ष, सव्वा वर्ष आपण जे वाचतो आहोत, त्याचा काही ना काही उपयोग झाला आहे. यापुढे आपण जे वाचू, त्यासंबंधाने असेच बोलत गेले पाहिजे, असा विचार माझ्या मनाशी येऊ लागला. आयुष्यातील हा माझा पहिला महत्त्वाचा अनुभव म्हणून त्याची ही नोंद मी केली आहे.

१९३३ च्या मे महिन्यात आमची शिक्षेची मुदत संपली व आम्ही सजा होण्यापूर्वीचे आमचे घरचे कपडे अंगावर चढवून, विसापूर स्टेशनवर येऊन दाखल झालो. तात्या डोईफोडे आणि मी एकदम जेलमध्ये आलो होतो आणि दोघेही परत चाललो होतो. घरचे कपडे अंगावर घालताच काही क्षण मला चुकल्या चुकल्यासारखे वाटू लागले. पण फक्त थोडा वेळ. जेलचे अधिकारी तिकिटे वगैरे काढून देण्याकरता स्टेशनवर आले होते. त्यांच्या मदतीने तिकिटे काढून घेतली आणि दौंडहून पुण्याला जाणाऱ्या गाडीत बसलो आणि या तऱ्हेने कारागृहातील एक लांब मुदतीचा मुक्काम संपवून आम्ही आता आमच्या घरच्या वाटेला लागलो होतो.

घरी परत आल्यानंतर घरच्या माणसांना फार दिवसांनी भेटल्यामुळे

आनंद वाटला. नित्याच्या जीवनामध्ये मी रुळत होतो. तोपर्यंत आमच्या घरात एका नव्या पिढीचे आगमन झाले होते.: आमच्या थोरल्या बंधूंना मुलगा झाला होता आणि आम्ही सारेजण नव्या बाळाच्या कौतुकात रमलो होतो. आनंदात मग्न होतो. याच वेळी माझे जुने मित्र अहमद कच्छी यांना बऱ्याच दिवसांनंतर भेटावे, म्हणून त्यांच्या घरी गेलो. कारण मी जेलमध्ये असताना त्यांनी एक-दोन वेळा पत्राने माझ्याशी संबंध ठेवला होता. मी घरी गेल्यानंतर त्यांच्या वडिलांनी सांगितले,

"तो अतिशय आजारी असून मरणोन्मुख आहे."

हे ऐकून मला वाईट वाटले. ते मला त्याच्या खोलीत घेऊन गेले. तेव्हा खरोखरच मी अहमदला जे पाहिले, ते त्याचे त्याचे सुरेख, गौरवर्णी धडधाकट शरीर मला कुठेही दिसून आले नाही. फक्त हाडांचा सापळा पडल्यासारखा तो मला दिसू लागला. त्याच्या डोळ्यांत मात्र तेज होते. त्यामुळे ती आपली व्यक्ती आहे, हे मनाशी पटले. मी त्याचा हात हातात घेतला, तेव्हा किंचितसे हास्य मला त्याच्या डोळ्यांत दिसले. कोठल्या तरी दुर्धर रोगाने तो आजारी होता आणि फक्त काही दिवसांचाच सोबती होता. मला भरून आले; पण मी तेथे न थांबता उठून बाहेर आलो. इतका सुस्वभावी, बुद्धिमान, राष्ट्रप्रेमी तरुण मुलगा मृत्यूच्या जबड्यात इतक्या लवकर जावा, याचे दुःख माझ्या मनात होते. मी त्याच्या वडिलांशी विशेष न बोलता निघून आलो.

जेलमधून परत आल्यानंतर जन्ममृत्यूच्या या परस्परविरोधी दर्शनाने नवजीवनाकडे आनंदाने व आशेने पाहण्याची दृष्टी. तर अंतिम काळाच्या छायेमुळे माझ्या मनामध्ये विषण्णता आणि गांभीर्य अशा संमिश्र भावनांचा कल्लोळ उडाला.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# दत्तात्रय बळवंत लोहार

जन्म १५ जुलै १९१२

**एक निष्ठावान काँग्रेस कार्यकर्ते.**

यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील बिळाशी या गावी झाला. हे लोहार या बलुतेदार कुटुंबातील प्राथमिक शिक्षण बिळाशी येथे. १९२८ साली बिळाशीच्या बर्डेमास्तर या शिक्षकांच्या प्रेरणेमुळे स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याची प्रेरणा. १९३० साली म. गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. १९४२ सालच्या लढ्यात सांगली जिल्ह्यातील गावोगावच्या पाटलांनी पाटीलकीचा राजीनामा दयावा म्हणून चळवळ आरंभली. त्यांनतर भूमिगत होऊन प्रतिसरकारच्या चळवळीत गुप्तपणे भाग घेतला. त्यानंतर ऑक्टोबर १९४४ मध्ये ते पोलिसांचे स्वाधीन झाले. त्यानंतर सहा महिने कारावास भोगल्यानंतर सुटका.

आता कीर्तने करत गावोगाव जनजागृतीचे कांम करतात. प्रस्तुत उतारा त्यांच्या आत्मवृत्तातून घेतला आहे.

## ४२ च्या लढ्यात

द. ब. लोहार

किणीचा शामराव पाटील जैन याला मजले येथे एक बंदूक आहे असे कळले. ती काढण्याकरता निमशिरगावचे पी. बी. पाटील, जिनपाल खोत यांनी ठरविले. त्याकरता आपल्याकडे एक बंदूक संरक्षणाकरता असावी, त्या शिवाय कार्यक्रम पार पाडता येणार नाही असे त्यांना वाटले. शिवाय आमची त्यांना मदतही हवी होती. म्हणून शामराव आमच्या भागात आला. पण त्याला आमची कोणी दाद लागू दिली नाही. त्याने आमच्याकरता निरोप ठेवला व परत गेला. त्याप्रमाणे मी, दत्तू सोनार आणि मारुती हवलदार असे तिघे किणीला गेलो. तेथे शामरावची गाठ पडताच तो मजल्याला बंदूकवाल्याच्या घराची टेहेळणी करायला गेला. आम्ही वडगावला श्रेष्ठी यांच्याकडे राहिलो. चार दिवसांनी शामराव सर्व जुळणी करून परत आला. आमच्याजवळ एक बंदूक व दोन रिव्हाल्वर होते. शामराव, त्याचे दोघे मित्र व आम्ही तिघे असे सहाजण निघाले. वडगावातून तीन सायकली भाड्याने घेतल्या आणि प्रत्येकी डबलसीटने निघालो. मजले तेथून सुमारे पंधरा मैल असावे. चार मैल गेलो. आणि आमची सायकल पंक्चर झाली. चांदणे टिपूर होते. आता काय करावे? एक वाजला होता. आम्ही तीन्ही सायकली दोघांच्या स्वाधीन करून त्यांना परत पाठविले आणि आम्ही चौघे निघालो. कार्यक्रम दोन ते चारच्या आत उरकणे जरूर होते.

तिकडे पी. बी. पाटील दहा बारा लोकांना घेऊन गावाबाहेर एका टेकडीचे आड बसले होते. आम्हाला सायकलींनी दगा दिल्याने वेळेवर गेलो नाही. त्यांनी पाच वाजेपर्यंत वाट पाहिली आणि परत आले. आम्ही निमशिरगावला गेलो. रेल्वे फाटकाजवळच दिवस उगवला. शेवटी पी. बी. यांच्या मळ्यात गेलो. तेथे सर्वांच्या गाठी पडल्या. आमचा ठरलेला कार्यक्रम फसला.

पी. बी. यांच्या वडलांना तीन बायका. पण मुलगा हा एकटाच. पी. बी. मळ्यात आल्याचे कळताच सावत्र आई मळ्यात आली. तिने पी. बी. चे पटापट मुके घेतले. सावत्र आई मुलावर इतके प्रेम करू शकते हे आम्ही प्रथमच पाहात होतो. नंतर जेवून झोपलो.

सायंकाळी आमचा ग्रुप फुटला. दत्तू सोनार कोल्हापूरला गेला. मी , मारुती हवालदार आणि शामराव किणीला आलो. सकाळी न्याहारी केली आणि किणी सोडली.

## पोलिसाची गाठ पडली

दिवसा परगावातून बंदुका घेऊन उघडपणे जाणे धोक्याचे म्हणून आम्ही लाकडी दांडयाची सोळा काडयांची छत्री घेतली. नळी छत्रीत घातली तरी चार बोटे ती बाहेर डोकावत होती. ती दिसू नये म्हणून तिला लंगोटा गुंडाळला. हळू हळू सातवेच्या रानात आलो. त्या सातव्याला नऊ पोलीस आणि एक जमादार अशी पार्टी होती. म्हणून आडमार्ग धरला. एक माणूस आमच्या मागोमाग येत होता. त्याने तुम्ही कोण, कुठे गेला होता, कोणत्या गावचे, छत्रीचा दांडा निखळलाय काय? अशी चौकशी करू लागला. त्याला आमची आणि आम्हाला त्याची शंका आली होती. त्याच्या पायातील चप्पलवरून तो पोलिस आहे हे आम्ही ओळखले होते. त्याने गावात जाण्याचा रस्ता धरला आणि आम्हाला मुक्काम करा, निदान पाणी तरी प्या, आमच्या घरी चला म्हणून चांगलीच गळ घालू लागला. त्याचे म्हणणे आम्ही मानले नाही. अखेरीस तो आमच्या आडवा आला आणि त्याने छत्रीला हात घातला. त्याबरोबर मारूती हवलदार यांनी त्याच्यावर पिस्तूल रोखले. त्याबरोबर त्याने रस्ता सोडला आणि झपाटयाने गावाकडे गेला. इतक्यात एक शेतकरी भेटला. तो म्हणाला, बाबांनो तो पोलीस आहे. आता तो पार्टी घेऊन येईल. तुम्ही या कोल्हापूरच्या बाजूला वळा. तेवढेच अंतर वाढेल. त्याबरोबर आम्ही मार्ग बदलला आणि त्या भागातील आरळेच्या रानात शिरलो. त्याला सातवे आरळे म्हणतात. आमच्या भागातील आरळयाला घोडावलीचे आरळे किंवा चरण आरळे म्हणतात. आम्ही दोघेही सटकलो. इकडे पोलीस गावच्या पश्चिमेला पळत आहेत ते आम्ही पाहिले. आम्ही थेरगावकडे जाणार असा त्यांचा अंदाज असावा. थेरगावच्या शिवेपर्यंत पोलीस गेले. त्यांना आमचा माग लागेना. मग मागे फिरले. ते आम्ही पाहात होतो. इतक्यात दिवस मावळला. लागलीच आम्ही बंदूक जोडली आणि डोंगरातील बाजूने थेरगाव गाठले. रामूदादांची तेथे गाठ पडली. हशा पिकला. त्याकाळी अनोळखी सामान्य शेतकरी सुद्‌धा आमचा बचाव करीत असे. पण काही पोलीस मात्र आमच्या जिवाशी खेळत होते. इकडे मास्तर आमच्या भागात आले. त्यांनी बाबूरावदादा, गणपतराव यांच्या विचारे कार्यक्रम आखला. त्यांचा निरोप येताच आम्ही भागात गेलो. शितूरात सर्वांच्या गाठी पडल्या. एकूण पंचवीस लोक जमलो. जास्तीत जास्त लोक जमविले. कशाला?

### चला वाटेगाव

कदाचित पोलीसांबरोबरही मुकाबला करावा लागेल म्हणून तयारी केली. काहीही होवो. जायचेच.

वाटेगाव कुरूंदवाड सरकारच्या ताब्यातील संस्थानी गाव. तेथे बाजीराव फौजदार पार्टीसह होता. त्याच्या जिवावर एक दिगंबर नावाचा ब्राह्मण आमची पाठपुरवणी करत होता. तो क्रिमिनल गुन्हेगारांचा हस्तक होता. सतत पोलिसांजवळ मुक्कामास असे. त्यामुळे पत्र्या लावता येईनात. कारण तो सांबाच्या पिंडीवर बसला होता. सापडेना. त्याची वाटेगावला मजबूत विहीर होती. त्याचा वाटेकरी महादू ठोंबरे हा पैलवान होता. त्या दिगंबराचे नुकसान करायचे ठरले. कारण तो फारच शेफारला होता. आम्ही पंचवीस तीसजण आणि वाटेगावचे पंचवीसजण असा जमाव करून रात्री दहाच्या सुमारास त्याच्या विहिरीवर पोचलो. पहारीने वरवंटा पाडण्यास सुरवात केली. वस्तीवाल्याने महादू ठोंबरे याला बोलावून आणले. एकजण दिगंबरला बोलवायला गेला. दिगंबरने फौजदारकडे धाव घेतली. पण फौजदार आला नाही. त्याचे काय झाले ते कळले नाही.

वरवंटा चुन्यात बळकट बांधला होता. लवकर हालेना. दोन तीन तास खटपट करून पाडता येईल तेवढा पाडला. वाटेकरी ठोंबरे म्हणाला, माझे नुकसान होत आहे. मास्तर म्हणाले, त्याला आमचा नाइलाज आहे. तू तुझे नुकसान मालकाकडून भरून घे. किंवा त्याला वाटा देऊ नकोस. अखेर आम्ही दमलो. आणि रातोरात परतलो.

वाटेगावचे इतर ब्राह्मण आम्हाला मदत करीत. हा दिगंबर मात्र आमच्या विरोधी होता. पुढे त्याच्यावर सर्व ब्राह्मणांनी बहिष्कार घातला. तशात या दिगंबरची म्हैस मेली. पण बहिष्कारामुळे ती महारांनी नेली नाही. दोन दिवसांनी कुजून तिची दुर्गंधी सुटली. मग हा दिगंबर कराडला रहायला गेला. मग गावातील लोकांनी महारांना सांगून ती घाण काढून टाकली.

दुष्ट मनुष्य आपले प्राणही धोक्यात घालून दुसऱ्याच्या सुखात विघ्न आणतो. माशी घासात पडते आणि स्वत: मरून जेवणारास वमन घडविते. असा हा दिगंबर विघ्न संतोषी होता. त्यामुळे त्याला गाव सोडावे लागले.

॥हसत कर्म करावे भोगावे रडत तेच परिणामी॥
॥इस हातसे दे और उस हातसे ले, हेच खरे॥

### पुढे काय?

आमचे बाबूराव रामचंद्र पाटील यांना दत्तोबा कुलकर्णी कुठरेकर आणि बंडू पाटील यांनी पकडून दिल्याचे मागे आलेच आहे. बाबूराव पाटील कराड

जेलला होते. तेथे यशवंतराव चव्हाण, रामानंद भारती हेही होते. बाबूराव चव्हाण कुंभारगावकर यांनाही अटक झाली होती. आता पकडून देणाऱ्याकडे पाहिले पाहिजे असे ठरविले. काय करायचे? तर पत्र्या लावायच्या. मग पंचवीस तीस लोकांचा जमाव करून दत्तोबा कुलकर्णीला गाठण्याकरता कुठऱ्याला गेलो. पण दत्तोबा घरी नव्हता. सारा गाव जमला. दत्तोबाच्या सोप्याला गाडीभर कडबा होता. त्याला आम्ही आग लावली. सोपा पेटू लागला. आम्हाला घर पेटवायचे नव्हते. दत्तोबा असेल तर त्याने यावे, माफी मागावी असा हेतू होता. पण तो कराडला गेल्याचे खात्रीलायक समजले. मग आग विझविली आणि परत फिरलो. नंतर दत्तोबा घरी आल्यावर त्याला झाला प्रकार कळला. त्याने त्याच रात्री कराड गाठले. तो पुन्हा गावाकडे परतला नाही.

## ढेबेवाडीची बंदूक काढली जुलै १९४३

एकदा मी व दत्तू सोनार, मारुती हवलदार, बापूराव शेडगे, आण्णा भटजी असे कोल्हापूरला असताना राशीवड येथे बंदूक आहे असे कळले. लगेच रात्री नऊ वाजता बाहेर पडलो. पण ती बातमी चुकीची होती. चार दिवस भटकून मसाईच्या पठाराने साळशीवरून भागात आलो. बाबूराव दादा, गणपतराव पाटील यांना सर्व हकीकत सांगितली. त्यांनी आम्हाला खुळ्यातच काढले. तुम्हाला बंदुका हव्या आहेत तर इतक्या लांब कशाला गेला होता? कोल्हापूर काय, राशिवडे काय, निमशिरगाव काय इकडे भटकून आलात. आपल्याला जवळच बंदुका असताना इतक्या लांब भटकण्याचे कारण नव्हते असे म्हणून हासू लागले.

मग आमचे मन बघण्याकरता म्हणाले, बापूसाहेब आगलावे भेंडवडेकर आणि उखळचे पटवर्धन या दोघांच्या बंदुका काढाव्यात असे सुचविले. पण आमच्याजवळ जेव्हा बंदुका नव्हत्या तेव्हा ते विश्वासाने आम्हाला देत असत. यांच्या बंदुका काढणे हे व्यवहाराला धरून तर नव्हतेच पण ते विश्वासघाताचे कृत्य होते. मग आमच्यात आणि क्रिमिनल फराऱ्यात फरक काय राहिला. आम्हाला मित्र द्रोह करायचा नव्हता. म्हणून आम्ही अशा गोष्टीला नकार दिला. हे ऐकून त्यांनाही समाधान वाटले. त्यांनी आमची परीक्षाच पाहिली म्हणा ना. मग काय करावे?

अखेर ढेबेवाडीची बंदूक काढावी असे ठरले. त्याच दिवशी बर्डे मास्तर व बाबूजी पाटणकर आमच्या भागात आले. त्यांना गणपतराव म्हणाले, मास्तर या मुलांना बंदुका हव्या आहेत. त्याकरता उद्याला जाऊ या. मग सर्वांनी पाचगणीला मुक्काम केला. दुसरे दिवशी लवकरच ढेबेवाडी गाठली. सकाळी साडे नऊचा सुमार. एका डॉक्टरच्या दवाखान्यात पोचलो. डॉक्टर आपली डबल

बारी बंदूक कोपऱ्यात उभी करुन पेशंट तपाशीत होते. गणपतराव आत गेले आणि कोपऱ्यातली बंदूक उचलली. आणि हातात घेऊन उभे राहिले. आम्ही आमच्या बंदुका, रिव्हाल्वर हातात घेवून आत बाहेर उभे राहिलो डॉक्टर गडबडले. आमच्याकडे ते फेरा फेराने बघू लागले. एक नाही. दोन नाही. भाषाच नाही. जास्त वेळ थांबायचे नाही. काम तर बिनबोभाट झालेले. येतो म्हणून बाहेर पडलो. आड मार्गाने निगून चाललो. एक दोन चुणचुणीत मुले आमच्या मागून येत होती. त्यांना जवळ बोलावून दहा बारा भाकरी व चटणी आणायला सांगताच ती गावात गेली. लगेच पुन्हा दहा बारा मुले जमा होवू आमचे जवळ बसायला आली. हे पाहून बाबूराव दादा म्हणाले, शिपाई आले. सर्व लोक बावरले. बापूराव शेडगे म्हणाले, कोठे आहेत, शिपाई? दादा म्हणाले, ही मुले म्हणजेच दत्ताचे शिपाई. ते आमचे काम ऐकत नाहीत. पण दत्ताचे मात्र ऐकतात.

मुलांना गाणी, गोष्टी, बातम्या आवडतात. त्यांना जिज्ञासा असते. उत्सुकता असते. त्यांना गोष्टी ऐकून आनंद वाटतो. त्याच्या परिणामांची त्यांना कल्पना नसते, मात्र त्यांची महत्वाकांक्षा वाढत असते. ते प्रश्न विचारतात आणि जिज्ञासा तृप्त करून घेतात. त्याकरता त्यांच्या प्रश्नांचे उत्तर देऊन समाधान करावे लागते. काही लोकांना ती कटकट वाटते. पण त्यामुळे ती नाराज होतात. मी बोलण्याचा कंटाळा करीत नाही. इतर मंडळी जेवून आडवी झाली होती. गप्पागोष्टीत माझा बराच वेळ गेला. चार वाजले. मुलांचा निरोप घेऊन आम्ही निघालो.

शिताप्याच्या वाडीवर आलो. तेथे एका माणसाची गाठ पडली. दादा त्याला म्हणाले, तंबाखू खाणार का? बोलता बोलता त्याला सर्व हकीकत कळली. त्याने आम्हाला आनंदाने आपल्या घरी जेवायला नेले. थोडया वेळात आम्हाला मांसाहारी आणि बर्डे मास्तर, बाबूरावदादा यांना शाकाहारी जेवण दिले. कारण ते मांसाहार करीत नसत. म्हणून त्यांना भात, पिठले, दूध दिले. नंतर गोटेवाडी गाठली तेथे मुक्काम केला. येळगावला पोलीस पार्टी आल्याखेरीज त्यांना गोटेवाडीला येता येत नाही. गोटेवाडी हे ठिकाण त्यादृष्टीने निर्धास्त होते. दुसरे दिवशी निघालो.

इकडे गिल्बर्ट दिवस रात्री सशस्त्र पार्टी घेऊन आमच्या मुगाव्यावर फिरत होता. बक्षिसे लावत होता. बेधडक कोठेही शिरत होता. त्याचवेळी कराडचा वालावलकर फौजदार वारणेत निघाला होता. भूमिगतांना शोधत होता. नक्की बातमी काढून हजार दोन हजार पोलीस दहा पंधरा मैलांच्या टापूत वर्तुळ करून तो भाग वेढायचा. भोयाने जाळे टाकावे तसे पोलिसांचे जाळे पसरायचे आणि

वर्तूळ पुरे करीत एकत्र व्हायचे. म्हणजे मग एखादे चिंगूळ सापडले तर धरायचे. अशी त्यांची योजना होती.

आता आम्ही सशस्त्र होतो आणि पोलिसात व आमच्यात फरक होता. ते पगारी नोकर होते. भाडोत्री होते. आम्ही परकी सत्ता झुगारून भारत स्वतंत्र व्हावा. या पवित्र उद्देशाने, स्वयंप्रेरणेने, बिनपगारी, 'करेंग या मरेंगे' या ध्येयाने बाहेर पडलो होतो. त्यांना पावसाळी रेनकोट तर आम्हाला घोंगडी होती. त्यांना मुक्कामाला देवळे तर आम्हाला गोर गरीब अशा डोंगरातील धनगरांचे गोठे, आम्हाला झाडांचा आसरा तर त्यांना सिमेंटच्या व मंगलोरी कौलांच्या सरकारी इमारती. आमच्या मोटारीला तांब्याभर पाणी व भाकरी तर त्यांच्या मोटारीला पेट्रोल. आमची मोटार दिवसारात्री दऱ्यात खोऱ्यात डोंगरात चिखलात नदी नाल्यात जंगलात झाडा झुडुपात कोठेही शिरे. तिला अडथळा माहीत नाही. तिचा आवाज होत नसे. हशाच पिकला तर दरीत घुमणार त्यांच्या मोटारीला उजेड लागे. तरच ती रस्त्यावरून चांगली पळणार. आमच्या मोटारीला पाऊस पाणी अंधाऱ्या रात्रीची वाट फार सोईची.

इतक्यात बाळकोबा उंडाळकर हे तुरुंगातून उंडाळचाला पॅरोलवर आल्याचे कळले. म्हणून आम्ही उंडाळेचा रस्ता धरला. कारण त्यांना भेटायचे ठरले. म्हणून उंडाळेची वाट चालू लागलो.

### उंडाळे येथील गोळीबार

पाच वाजत आले होते. उंडाळे मैलभर राहिले असेल. त्याच वेळी वालावलकर कराडहून पन्नास पोलिसांची पार्टी घेऊन मोटारीने वारणेत जाण्यासाठी निघाले होते. आम्ही एका मोठ्या ओढ्यात उतरून पलीकडे जाणार, इतक्यात आमच्या मागून वालावकराची मोटार आली. तिचा आवाज ऐकून मागे पाहिले तर मोटारीच्या टपावरही बरेच पोलीस बसलेले दिसले. अचानक गाठ पडली. मोटार थबकत थबकत येऊन लागली. आम्ही झाडांचा, खबदाडीचा, घायाळाचा आश्रय घेऊ लागलो. तोपर्यंत मोटारीतून आवाज आला. फायर!

आम्ही पळून जाऊ अशी त्यांची कल्पना असावी. पण ताबडतोब बर्डे मास्तरांनीही आम्हाला हुकूम दिला. अरे बघता काय? चला करा फायर! पुढे म्हणाले, पळून जाताना पाठीत गोळ्या लागून मरण्यापेक्षा समोरून छातीवर गोळ्या झेलून मरू या. लक्षात ठेवा. क्रांतीच्या वाटेवर रक्ताच्या रांगोळ्या घालाव्या लागतात.

इतक्यात आच्या बंदूकीतून चार पाच गोळ्या सुटल्यासुद्धा काही रिव्हाल्वरच्याही गोळ्या सुटल्या. आणिबाणीचा क्षण होता.

शेख काकांची दहा बारी बंदूक जड असल्याने ती त्यांना पेलत नसे. इतर कोणी तरी सांभाळीत असे. त्यांनी ती आपणाकडे घेऊन सज्ज होईपर्यंत पोलीस गाडी फर्रर्र फर्रर्र करीत तशीच पुढे सुसाटत गेली आणि नजरेआड झाली. शेख काकांच्या बंदूकीचा पोलिसांना वचक होता. तिला भिऊनच पोलीस उधळले. एका भयंकर प्रसंगातून आम्ही आणि पोलीस बचावलो.

आता उंडाळयाला जायचे राहिले. आड मार्गाने मनवाकडे निघालो. मनवा येथे एकाजवळ बंदूक होती. ती काढायचे ठरले.

## मनवाची बंदूक काढली

दिवस बुडून रात्र झाली होती. मनवाच्या बंदूकीचा मालक गांजाचा मक्तेदार होता. दुकान घरातच होते. मनवात पोचलो. आमच्याजवळ चरणातील मुगुटराव हवलदाराचा पोशाख होता. पट्टा होता. तो चंदभाईला चढवला. त्याच्याजवळ बंदूक होतीच. तो इंग्रज सरकारचा बनावट हवालदार बनला. हे आमचे हवलदार त्या गांजाच्या दुकानात गेले आणि म्हणाले, तुझी बंदूक आण पाहू! बरेच दिवसात ठाण्यात बंदूक आणून दाखविली नाहीस. दंड म्हणून थोडी गांजा दे. त्याने मूठभर गांजा दिली. बंदूक ताब्यात घेतली. गाव अनोळखी. ती बंदूक गांजा घेऊन नांदगावमार्गे निघालो. रात्री नऊ वाजून गेले होते.

## नांदगावच्या पोलिसांची धावपळ

नांदगावच्या रस्त्यावर गावा जवळच पोलीस ठाणे होते. तेथे दोन चार बत्त्या लावून त्याच्या भोवती पोलीस बसलेले दिसले. बर्डे मास्तर म्हणाले, पोलीस आमच्यावर चढाई करतात तशी आपण तरी का करू नये? या पोलिसांना पळवून लावू या. त्यांनाही आमची दहशत वाटली पाहिजे. नुकतेच मोठ्या संकटातून सुटलो होतो. आता पुन्हा तसला प्रकार नको असे आमच्यातील काहींचे म्हणणे पडले. पण बर्डे मास्तर म्हणाले, रात्रीची वेळ आहे. आमचा पोलिसांना अंदाज नाही. आम्ही त्यांना दिसत नाही. त्यांना आम्हावर चढाई करता येणार नाही. मग आम्ही कबूल केले आणि अंधाराचा पायदा घेऊन चार पाच बार काढले. त्याबरोबर कोंढाळे करून बसलेल्या पोलिसांत धावपळ उडाली. त्यांनी ठाणे सोडले. आणि पळापळीला सुरवात झाली आणि आमच्या विरूद्ध बाजूला अंधारात वाट मिळेल तिकडे पळाले. जिकडे तिकडे सामसूम झाले.

आता आम्ही पाचुंब्रीची वाट धरली. तेथे मुक्काम केला. पण वालावलकर आमच्या मागे लागणार. पोलीस गप्प बसणार नाहीत, असा अंदाज करून पहाटे लौकर उठून पणुंब्रेची वाट धरली. लोहार वाडीला गेलो. तेथे नुकताच एका

घरावर दरोडा पडला होता. त्या घरातील लोक रडत होते. त्यांनी आम्हाला आपल्या दरोडयाचा तपास करा म्हणून विनंती केली. मास्तर म्हणाले, आमच्यामागे पोलिसांचा ससेमिरा आहे. तुम्ही उदया पणुंब्र्याला या असे सांगून पणुंब्र्याला गेलो. दरोडयाचा तपास केला आणि संशयावरून दोघांना पकडून ताब्यात घेतले. ते सुरवातीला कबूल होईनात. पण यांना पत्र्या लावू या म्हणताच त्यांनी दरोडा घातल्याचे कबूल केले. सर्व माल त्यांच्याकडून ताब्यात घेतला आणि एका टॉवेलखाली झाकून ठेवला. इतक्यात लोहारवाडीचे ते लोक आले. आम्ही जेवत होतो. त्यातील एकाला अरे तो टॉवेल आण बगू असे सांगताच त्याने टॉवेल उचलला, तर त्या खाली दरोडयातील दाग दागिने पैसे आडके त्याने पाहिले. तो थक्क झाला. त्याला विचारले सर्व माल आहे का? तो म्हणाला एक पैसा सुद्धा कमी नाही. तो माल त्यांच्या स्वाधीन केला. त्यांनी आमचे आभार मानले आणि माल घेऊन आनंदाने निघून गेले.

आमची पोलिसांना चांगलीच दहशत बसली. वालावकरांनी त्यावेळेपासून आमचा नाद सोडला. कदाचित् सामुदायिक छाप्यात येत असल्यास न कळे. तरी आम्ही सावधपणे वागत होतो. पोलिसांनाही भीती होतीच. एकादयाने जिवावर उदार होऊन गोळी घातलीच तर त्याला फाशी होईल नाहीतर सुटेल. पण आपण मात्र बायका मुलांना मुकू. म्हणून जेवढयास तेवढे अधिकाऱ्यासमोर नाचत. पण साप म्हणतो देवा, माणसाची आणि माझी गाठ पडू देऊ नको. तसे पोलीस म्हणत देवा, आमची आणि कॉंग्रेसवाल्या भूमिगतांची गाठ पडू देऊ नको. याचा अर्थ असा नव्हे की, सरकार नमले किंवा पोलीस कारवाई कमी झाली. मात्र आमच्यातील आत्मविश्वास खूप वाढला.

## कामेरीची मिटिंग

उभ्या हिंदुस्थानात चळवळ फोफावतच चालली होती. सरकारने आपली शक्ती पणाला लावली होती. आमच्या भागात इंग्रज सरकार विरूद्ध आमचे प्रतिसरकार यांच्यात शह प्रतिशह डावपेच चालले होते. एकमेकांवर कुरघोडी करीत होते. सरकारने धरपकड, गोळीबार, सामुदायिक दंड, कोर्टातून खटले भरून शिक्षा ठोठावणे असे प्रकार जोरात सुरू केले. मालमत्ता, इस्टेटी जप्त करू लागले. जिकडे तिकडे पोलिसी राज्याचे स्वरूप आले. त्यामुळे लोकांत घबराट निर्माण झाली. काही गोळीबाराला बळी पडले, जखमी झाले, तरूंगात गेले. अशा परिस्थितीत जे जहाल वृत्तीचे होते ते खंबीर राहिले.

पण जे मवाळवृत्तीचे होते, सुखवस्तू होते, ज्यांना रानवारा माहीत नाही, ज्यांच्या प्रकृतीला हे मानवणार नव्हते अशांना हा लढा धोक्याचा वाटू लागला. काहींचा धीर सुटला. आपण मोठ्या चक्रव्यूहात सापडलो आहोत, यातून पार

होता येणे कठीण आहे, या करता हजर होणे बरे असे त्यांना वाटू लागले. म्हणून यावर विचार करण्यासाठी जहाल आणि मवाळ अशा प्रमुख कार्यकर्त्यांची मिटिंग कामेरीला बोलावली. त्या मिटिंगला बर्डे मास्तर, जोशीकाका, नाथाजी लाड, कासेगावकर वैद्य हे हजर राहिले. ही मिटिंग ता. ३ जून १९४३ ला भरली होती.

तेथे काही कार्यकर्त्यांनी आपली बाजू मांडली की, अच्युतराव पटवर्धन हे आपले नेते आहेत. आम्ही त्यांची भेट घेतली. त्यांनी आम्हाला हजर व्हायचा संदेश दिला आहे. त्यांनी तसे लेखी टपाल दिले होते. परंतु पोलिसांच्या भयाने ते पत्र आम्ही नष्ट केले. तरी आपण हजर होऊ या. आता अच्युतराव कलकत्त्याला गेले असल्याने त्यांची भेट होणार नाही.

या त्यांच्या म्हणण्याला बर्डे मास्तर यांनी ठामपणे विरोध केला. ते म्हणाले, महात्मा गांधींनी 'करा किंवा मरा' असा संदेश दिला आहे. त्याप्रमाणे आम्ही कार्य करत आहोत. अशा अवस्थेत अच्युतराव यांनी हजर होण्याचा आदेश दिला यावर आमचा विश्वास बसत नाही. आता आमच्या पुढे दोनच पर्याय आहेत, एक सरकारी यंत्रणा बंद पाडण्याकरता कहीही करा असा किशोरीलाल मश्रूवाला यांचा संदेश पाळून कार्य करीत राहणे. किंवा कार्य करता करता जरूर तर मरून जाणे. अद्याप कार्याचे फळ जे स्वराज्य ते मिळालेले नाही आणि अद्याप आम्ही मेलोही नाही. म्हणून चळवळ बंद करणे आणि हजर होणे या दोन्ही गोष्टींना आमचा सक्त विरोध आहे. तरी पण अच्युतराव यांची आम्ही कसेही करून भेट घेतो. मग त्यांचा काय आदेश आहे ते पाहून निर्णय घेऊ. हा निर्णय बहुतेकांना पसंत पडला.

नंतर बर्डे मास्तर आणि जोशीकाका हे अच्युतराव यांची भेट घेण्याकरता मुंबईला जायला निघाले. बर्डे मास्तर महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या वर्किंग कमिटीत सभासद होते. त्यामुळे त्यांचा एस्. एम्. जोशी व अच्युतराव यांच्याशी परिचय झालेला होता.

इकडे सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी येथे पोलिसांचा धुमाकूळ चालू होता. चोहोकडे नाकेबंदी होती. त्यांच्या वेढ्यातून निसटून जायचे म्हणून थेरगावकडून जायचे ठरविले आणि आम्ही त्यांना घालविण्याकरता एके दिवशी बाहेर पडलो.

### भयानक पुरात उडी, जुलै १९४३

पावसाळ्याचे दिवस, पुष्प नक्षत्राचा पाऊस बळावला होता. वारणा आणि कडवी या नद्या दुथडी भरून मर्यादेबाहेर वाहत होत्या. पावसाचे थैमान

चालू होते. मी, दत्तू सोनार, गोविंदा कॉंग्रेस, बर्डे मास्तर, जोशीकाका नेर्ले मागे टाकून थेरगावचा रस्ता धरला. चार वाजले होते. रस्त्यात कोणी भेटत नव्हते. पक्षी घरट्यात कुडकुडत होते. नदी नाले उतार देईनात, कसे तरी सरूडला विरोबाच्या देवळाजवळ पोचलो. पुढे दोन तीन फर्लांगावर वारणा आणि कडवी याचा संगम होता. जिकडे तिकडे पाणीच पाणी. आज पाच वाजताच आंबेकरी घरी गेले होते. तेथे पोचायला रात्री आठ वाजले आता या संगमातून थेरगावला कसे जायचे? नाव नाही. पूर तर भयानक. पाणी खळबळाट करीत फुंफाटत वाहात होते. पण बर्डे मास्तर फार धाडशी. त्यांना दत्तू सोनार जोडीदार मिळाला. पाऊस तर ओततच होता. थंडीने दात थडथडत होते. बर्डे मास्तर व दत्तू सोनार यांनी कपडे काढले. लंगोटा कसला आणि पाण्यात उडी घेतली: भय नाही. गेले. पाण्यातून अंधार कापीत गेले. मध्येच पाण्यातून आवाज आला. दत्तू आलास का? आलो. वैरी न चिंती ते मनात येऊ लागले. आम्ही नदीकाठी बसलो होतो. ते दोघे त्या भयाण पाण्यात काळोखात कोठे गेले? कसे गेले? गेले का नाहीत? पोचले असतील का? आम्हाला त्याचे कोण उत्तर देणार! पाण्यात पोहोताना भ्याले की संपले. प्रवाहाच्या रोखाने ते नेईल तसे, त्याचा अंदाज घेऊन पोहावे लागते. त्याला अफाट धाडस लागते. त्यांना हे जमेल का? त्यांच्यापेक्षा आम्हालाच भीती वाटू लागली. आम्ही देवाचा धावा सुरू केला.

तिकडे ते दोघे थेरगावात लुकलुकणाऱ्या दिव्याच्या रोखाने पैलतिरी गेले. त्यांनी काकूचे घर गाठले. तेथे हे दोघे उघडेबंब भुताप्रमाणे हजर झाले. यांना पाहून साऱ्यांनी तोंडात बोटे घातली. त्यांनी लागलीच आंबेकऱ्यांना बोलावले. त्यांनी हे कॉंग्रेसवाले आहेत याची खात्री करून घेतली आणि बॅटऱ्या घेऊन नाव सोडली. त्या भयाण रात्री आम्ही बसलो होतो तेथे नाव आली. आम्ही नावेतून थेरगावला गेलो. सर्वांनी निःश्वास टाकला.

आंबेकरी म्हणाला, अशावेळी इतर कोणीही असते तरी नाव सोडली नसती आणि इतक्या पाण्यातून पोहत रात्रीच्यावेळी कोणी आलेही नसते. तुम्ही फार मोठे धाडस केले. तुम्ही जिवावरचा खेळ खेळलात. आम्ही विचारले, फौजदार असता तर काय केले असते? तो म्हणाला, सांगू? प्रथम त्याला समजावून सांगितले असते. ऐकला तर ठीक. ऐकेचना तर नाव सोडायची आणि शेवरीत अडकवून टाकायची. मनात म्हटले असते, बसा येथे बोंबलत. यातले त्यांना काय कळते?

आम्ही दुसरे दिवशी परत फिरलो. बर्डे मास्तर आणि जोशी काका व दत्तू सोनार मुंबईला जायला कोल्हापूरकडे रवाना झाले.

## अच्युतराव यांची भेट

कोल्हापूरला गेल्यावर त्यांनी शेतकऱ्यांचा पोशाख केला. चंची, पानतंबाखू घेतली आणि रेल्वेने कुर्डूवाडीला गेले. नंतर पुन्हा रेल्वेनेच मुंबईला गेले. तेथे प्रथम एस्. एम्. जोशी यांची गाठ घेऊन नंतर त्यांच्या मदतीने अच्युतराव यांची भेट घेतली. त्यांना बर्डे मास्तरांनी भेटीचा उद्‌देश सांगितला. ही भेट अर्थातच गुप्तपणे झाली. सर्वच वारंटवाले होते. अच्युतराव म्हणाले, मी चळवळ बंद करा, हजर व्हा असा कोणाला आदेश दिला नाही. म्हणून प्रतिसरकारचे कार्य धडाडीने पुढे चालवा. तसे लेखी पत्र बर्डे मास्तर यांनी त्यांचेकडून घेतले आणि भागात आले.

मास्तरांनी सातारा जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची मिटिंग पणुंब्रे येथे घेण्याचे नक्की केले. त्याप्रमाणे ता. ३ ऑगस्ट १९४३ रोजी मिटिंग भरली. बर्डे मास्तर यांनी अच्युतरावांचे लेखीपत्र मिटिंगपुढे ठेवले. ते वाचून सर्वांची तोंडे बंद झाली. वादळ शमले. कार्य पुढे चालू ठेवण्याचे ठरले. त्याच मिटिंगमध्ये १५ ऑगस्ट १९४२ चा लढा सुरू होऊन वर्ष होत आल्याने तो दिवस कार्य करून साजरा करायचे नक्की केले.

सुरूलकवठे ते मलकापूरपर्यंतच्या भागातील तारा तोडण्याचे ठरले. कार्यकर्त्यांना भाग वाटून दिला. त्याप्रमाणे सतराशे तारेचे डांब पाडले. तारा तोडल्या. ता. २० ऑगस्ट १९४३.

## तासभर तळ्यात

एकदा मी, दत्तू, मारूती हवलदार असे तिघे भेडसगावला गेलो. तेथे हणमंतराव कुलकर्णी व त्यांचे बंधू बाबूराव यांच्याकडे जेवण करायचे ठरले. त्यांची मातोश्री आमच्यावर फार प्रेम करी. केव्हाही गेलो तरी ती आम्हाला जेवल्याशिवाय सोडत नसे. आजही त्यांनी जेवणाचा आग्रह केला. जेवण तयार होईपर्यंत आंघोळ उरकावी म्हणून आम्ही तिघेही बाहेर पडलो. जवळच तळे होते. तेथे कपडे काढून तळ्यात उतरलो.

इतक्यात पंधरा पोलिसांची पार्टी येत असलेली एका तरूणीने पाहिले. ती तळ्याकडे पाण्याला येत होती. तिने आम्हाला ओळखले तिने झपाट्याने पाय उचलले आणि आम्हाजवळ येऊन पोलीस पार्टी आली. तुम्ही पाण्यात जा असे म्हणाली.

आम्ही दचकून मागे पाहिले तर पार्टीही तळ्यावर आली. आम्ही पाण्यात आत शिरलो. पोहू लागलो. पार्टी तळ्याच्या काठावर येऊन बसली. आम्हाला वाटले की, पोलिसांनी आम्हाला ओळखले आहे. म्हणून ते काठावर बसले आहेत. आम्ही पाण्यात जात आणि आंघोळीचे, अंग घासण्याचे, पोहण्याचे सोंग करून

कडेला येत. पुन्हा पाण्यात जात. पाण्याला येणाऱ्या जाणाऱ्या आया, बहिणी, तरूण पुरूष काळजीत पडले. अशा वेळी कोणी नुसते डोळ्याने खूण केली असती तरी पुरे होते. लागलीच पोलिसांनी आम्हाला गोळीने टिपले असते अगर अटक केली असती. पण आमची वेळ बरी. तसे काही घडले नाही. कारण लोकांची आम्हावर कृपा होती. श्रद्धा होती. लोक आम्हाला जपत. पार्टी मात्र सहज आली होती. त्यांनी आम्हाला ओळखले नाही. थोड्या वेळाने ती आली तशी गेली. ती गेल्याबरोबर आम्ही पाण्यातून बाहेर आलो. कपडे केले. गावात जाऊन जेवण केले. आणि पसार झालो. यालाच दैव म्हणतात.

## वसंतराव दादांनी तुरुंग फोडला २४ जुलै १९४३

लवकरच सांगलीहून मोठी बातमी आली की, वसंतराव पाटील यांनी सांगलीचा तुरुंग फोडला. सांगली हे पटवर्धनांचे संस्थान. जवळच पद्माळे हा वसंतराव दादांचा गाव. ते आपल्या साथीदारांसह सांगली जेलला होते गणेश दुर्गातील राजवाड्यात जेल होता. आण्णा पत्रावळे, जिनपाल खोत हे तरुणही त्या जेलला होते. आमच्या गाडी गवंड्या टपाल लुटीत पत्रावळे सहभागी होता. तर किणीच्या शामराव बरोबरच्या कामात पी. बी. पाटील यांच्या निमशिर-गावच्या मळ्यात जिनपाल खोत याची भेट झाली होती.

तुरुंगात असताना एके दिवशी वसंतराव पाटील आणि त्यांचे चौदा साथीदार यांनी पोलिसांच्या हातातल्या सात बंदुका हस्तगत केल्या आणि किल्ल्याच्या तटावरून बाहेर पाण्याने भरलेल्या खंदकात उड्या घेतल्या. त्या दिवशी शनिवार सांगलीचा बाजार, अशा अवस्थेत भर दुपारी तुरुंग फोडून बाहेर पडले. गर्दीतून वाट काढीत पुलावरून सांगलीवाडीकडे पळत सुटले. पोलिसांची धावपळ उडाली. ते पाठलाग करू लागले. ते पुढे आणि पोलीस मागे अशी शर्यत लागली. कृष्णा वारणा या नद्यांना महापूर आलेला होता. जिकडे तिकडे पाणीच पाणी, काळ्या रानात गुडघा गुडघाभर चिखल. चिखलातून पाय उपशीत हरीपूर संगमाच्या बाजूला वारणेच्या पात्राकडे निघाले. वारणेचे पात्र जवळ आले. आता दादांनी एका झाडाचा आश्रय घेतला. पोलीस आणि क्रांतीवीर या दोघांत गोळीबाराला सुरवात झाली. इतक्यात वसंतराव दादांच्या खांद्यातून पोलीसांनी झाडलेली गोळी आरपार गेली. दादांचा उपाय थकला. रक्ताची धार लागली.

आण्णा पत्रावळे याने हात वर करून शरणागती पत्करली. पण हीन वृत्तीच्या गुलाम पोलिसाने त्याला गोळी घातली. पत्रावळे ठार झाला. त्यातूनही जिनपाल खोतासह काही साहसी वीरांनी वारणेत उड्या टाकल्या आणि पोहत पलीकडे निघाले. त्यातील बाबूराव जाधव हा पोहून जात असताना त्यालाही

पोलिसांनी पाण्यातच गोळी घातली. तो पाण्यातच ठार झाला. वाहून गेला. त्याच्या प्रेताचाही पत्ता लागला नाही. जे नदीपार झाले ते भूमिगत झाले. बाकीचे पकडले गेले. पत्रावळे आणि जाधव ठार झाले. दादा जखमी झाले. या तिघांच्या रक्ताने वारणा लालेलाल झाली. तिला रक्ताचे अर्ध्य मिळाले. ती पवित्र झाली. धन्य त्या वीरांची माऊली की असे पुत्र प्रसवली. या प्रसंगावर नाभिराज आडमुठे गुरुजींनी लिहिले आहे.

।।कडाडले अंबर पेटले पर सत्तेच्या गोळीने।
कोट छातीचा फोडुन गेली न्हाली धरणी रक्ताने।।
।।कृष्णामाई सवे वारणा गर्जत आल्या भेटीला।
जल देवींनी पूजन करुनी फुले वाहिली चरणाला।।

हे कोणी क्रिमिनल गुन्हेगार नव्हते. देशाकरता तळहाती शीर घेऊन बाहेर पडलेले वीर होते. त्यात त्यांचा स्वतःचा स्वार्थ नव्हता. ते ध्येयवादी क्रांतीकारक होते. परकीय सत्तेशी त्यांचा झगडा होता. स्वातंत्र्य हे त्यांचे ध्येय होते. त्याकरता त्यांची अंतःकरणे भारून गेली होती. स्वतःकरता काय हवे होते त्यांना? हे पोलिसांना, विशेषतः आमच्या भारतीय परंतु इंग्रजांच्या गुलाम पोलीसांना कळायला नको होते काय? या शिवाय शरणागताला गोळी घालायची नाही असा संकेत आहे. युद्धमान राष्ट्रे सुद्धा हा संकेत पाळतात. मालकाने उभारलेल्या मळयावर उभे राहून पाखरे हाकताना चुकून दगड लागला आणि एकादे पाखरू घायाळ झाले तरी माणूस हळहळतो. त्याची माणुसकी जागी होते. तो त्याला पाणी पाजतो. त्याच्या अंगावरून हात फिरवतो. त्याला कुरवाळतो. पण हे सुसंस्कृत विचारी माणसाचे काम. हीन वृत्तीच्या गुलामाला त्याचे काय? पत्रावळे आणि जाधव गेले. कुठे?

।।रणी झुंजता प्राण गेले। देव लोकी जाऊन ठेले।
स्वर्गीचे राज्य प्राप्त झाले। वंदय झाले तेथेहि।।

१९४२ च्या 'करेंगे या मरेंगे' या चळवळीत अशा रीतीने दहा हजार कार्यकर्ते ठार झाले असा अधिकृत आकडा आहे. कोणी फासावर गेले, कोणी गोळीला बळी पडले, कित्येक जन्माचे अधू झाले. त्याकाळी इंग्रज सरकारकडून देश भक्तांना, क्रांतीकारकांना फाशी गोळीचाच सर्वोच्च पुरस्कार मिळे आणि राजनिष्ठांना राव साहेब, राव बहादूर, खान बहादूर अशा पदव्या मिळत.

## कुठरे येथील बंदूक, ७ सप्टेंबर १९४३

आता आमच्याजवळ सहा बंदुका, दोन रिव्हाल्वर शिवाय शेख काकांची एक बंदूक अशी हत्यारे होती. मारुती हवलदार, दत्तू सोनार, गणपतराव पाटील,

तुकाराम शितूरकर, बापूराव शेडगे, यांनी एकेक बंदूक घेतली. चांदभाईला बंदूक हवी होती. तपास करता पाटण तालुक्यात कुठरे येथे एका मिलीटरीवाल्याजवळ बंदूक आहे असे समजले. सर्वांनी विचार केला आणि कुठऱ्याला जायचे ठरले. पेटलोंढहून डोंगराडोंगराने चारचे सुमारस कुठऱ्याला पोचलो. गौरीचा सण होता. पाऊस उघडला होता. पुरुष मंडळी पान तंबाखू खात बसली होती. मुली, बाळी, म्हाताऱ्या बायका हातात हात घालून फेर धरुन गात होत्या. आदल्या दिवशी बाबूजी पाटणकर आणि कुंभारगावचा एक बातमीदार आमची वाट पहात बसले होते. गावात गेल्या गेल्या आम्ही बंदूकवाल्याचे घर वेढले. आमच्या बंदुका लोड केल्या. आम्ही लोकांपासून लांब सावधपणे उभे होतो. कारण लोकांनी मिठ्या मारल्यातर काय घ्या? एक परीट पैलवान आम्हाला बघून पळत आला. पण बंदूक बघून मागे पळाला. लोकांनी तुम्ही कोण आहात, तुम्हाला काय पाहिजे म्हणून विचारले. आम्ही काँग्रेसवाले आहोत, आम्हाला मिलिटरी-वाल्याची बंदूक हवी आहे असे सांगितले.

तिकडे मिलिटरीवाल्याला आमच्या लोकांनी पकडून त्याच्याजवळ बंदूकीची मागणी सुरु केली. त्याच्या जवळ बंदूक असल्याची नक्की बातमी आम्हाला होती. पण तो कबूल होईना. तो म्हणे बंदूक पोलीस ठाण्यात ठेवली आंहे. ती घरी नाही. शेवटी त्याला धक्के दयायला सुरवात केली. तेव्हा त्याची मुकी बायको ओरडू लागली. सारा गाव लांब अंतरावरुन पाहात होता. त्याला कबूल करण्याचे सर्व प्रयत्न केले. पण तो मिलिटरीत शिक्षण घेतलेला, मारीन किंवा मरेन अशी जिद्द असलेला असा होता. शेवटी त्याला पत्र्या लावण्याचे सोंग आमचे लोक करु लागताच एक शिक्षक पुढे आले व म्हणाले, मला परवानगी असेल तर मी प्रयत्न करुन बघतो. तुम्ही एकटेच या अशी त्यांना परवानगी दिली. त्यांनी पुष्कळ सांगून पाहिले. शेवटी तो म्हणाला. मास्तर, बंदुक आहे पण जीव गेला तरी देणार नाही. त्याने बंदूक दयावी म्हणून सर्व प्रयत्न झाले. पण बंदूक काही केल्या देईना. तो काही आमचा शत्रू नव्हता. पण त्याला सोडून देऊन जावे तर हा घरातील बंदूक घेऊन आमच्यावर पाठीमागून बार काढू लागला तर काय करावे? म्हणून त्याचे हात पाय बांधून चांगला दोन मैलांवर नेऊन टाकावा आणि आपण निघून जावे असा बेत करुन त्याचे हात पाय बांधले. त्यात एका चिव्याची काठी अडकवली आणि आम्ही म्हणालो, चला याचा डोंगरात नेऊन कडेलोट करु या. असे म्हणून उचलताच त्याची विधवा भावजय घाबरली. तिला ते खरे वाटले. तिने थांबा असे म्हणून बंदूक ठेवल्याचे ठिकाण दाखवले. आम्ही सर्व घर तपासले होते. परंतु मागच्या पडक्या सोप्यातील तुराटीच्या ढिगात त्याने बंदूक ठेवली होती. ते तेवढे आम्ही पाहिले नव्हते.

आता ती बंदूक हस्तगत केली. त्याचे हातपाय सोडले. आता तो हरला होता. त्याला आम्ही नंतर प्रेमाने काडतुसे मागितली. बंदूक गेल्यावर काडतुसे काय करायची म्हणून पाच काडतुसे आमच्या पुढे आणून ठेवली. ती बघताच आमचे धाबे दणाणले. हत्तीला घालतात तसली टीचभर लांब आणि खुरप्याच्या मुठी सारखी अशी ती होती. असली बंदूक मिळाल्याने आम्हाला अत्यानंद झाला. बर्डे मास्तर यांनी त्याला पाच रुपये काढून दिले. पण ते तो घेईना. अखेर त्याने समाधानाने घेतले. सहाच्या सुमारास आम्ही निघालो. आता मुसळधार पाऊस सुरु झाला. कराडला बातमी गेली तर पोलीस पाठलाग करतील म्हणून झपाट्याने निघालो. सकाळपासून डोगंर तुडवीत होतो. भुकेने जीव कासावीस झाला होता. वरून सारखा पाऊस ओतत होता. अखेरीस गुढ्याला आलो. देवळात थांबलो. आमचा अन्नदाता आप्पा पाटील याने पोळ्या, आमटी, दूध गोळा केले. जेवणे झाली. अंगावरील कपडे भिजले होते. ते अंगावरच वाळले. नंतर आपापल्या सोईनुसार पांगलो.

**बुडता बुडता वाचलो.**

एके दिवशी बाबूराव दादा, गणपतराव पाटील व मी वारणेतल्या कोतोली या गावात मुक्काम केला. तेथे एका घरी सत्यनारायणाची पूजा होती. पुरण पोळीचे जेवण होते. जंगम पूजा सांगत होते. प्रसाद शिजत होता. पाटील बाहेर गेले. त्यांनी मला खुणावून बाहेर बोलावून घेतले व म्हणाले, येथे जेवायला थांबायचे नाही. आपण बिळाशीच्या मळीला जाऊ या. तेथे आपणाला भेटायला लोक येणार आहेत. त्यांची भेट घेऊन परत येऊ. जंगम स्वामी आणि बाबूराव दादा म्हणाले, प्रसाद घ्या आणि मग जा. पण पाटील ऐकेनात. मग देवाला दाखवल्या शिवाय नैवेदय बाजूला काढून ठेवला आणि आम्हाला प्रसाद दिला. तो खाऊन आम्ही निघालो. त्या दिवशी अमावास्या होती. रात्र काळोखी. तरी आम्ही बाहेर पडलो. नदीला उतार नव्हता. पाटील म्हणाले, खाली महार गवंडाला उतार असतो. तेथून उताराने जाऊ या. ते ठिकाण खाली अर्ध्या मैलावर होते.

मी म्हणालो, इतक्या खाली जाऊन वळसा घालून येण्यापेक्षा येथून पोहून गेलो म्हणजे पल्ला वाचेल. पाटील म्हणाले, माझे सगळे कपडे चप्पल वगैरे तू घेणार का? मी कबूल केले. दरडाला जाऊन सर्व कपडे चप्पल डोकीला गुंडाळले. पलीकडे किजळावर घुबडांचा घुघुत्कार आणि पिंगळ्यांची किलबिल चालली होती. भयाण अंधारात भेसूर आवाज भयात भर घालीत होता. पाटील म्हणाले, दत्ता बोजा जास्ती होतो. शिवाय त्यात रिव्हॉल्वर, काडतुसे आहेत. पण मी त्यांचे एकले नाही. दोघांनी पाण्यात झेप घेतली. पात्र रुंद होते. हात मारल्याने

बोजा हेलकावू लागला. त्या बोजामुळे मी एक गटंगळी खाल्ली. दुसरी खाल्ली. आणि मेलो म्हणताच पाटलांनी बोजा टाक म्हणताच मी टाकला. धीर सुटला. भ्यालो. माझ्या किनारा गाठण्याच्या धडपडीने आणि पोहताना मारलेल्या हाताने गोठेडे विसकटले. पोहत पुढे गेलो. पाटलांना उतार लागला. त्यांनी छाती इतक्या पाण्यात उभे राहून मला हात दिला. अंग भितीने थरथरत होते. पाच दहा मिनिटे उभे राहून वस्तीवर गेलो. दुसरे दिवशी बाबूराव दादांना भेटलो. कपडे पाण्यात बुडाल्याने दुसरे करणे भाग होते. दादांनी कोकरूडहून दुसरे दोन सदरे आणवले. मग बुडणाऱ्या लोकांकडून नदीत गाठोडचाचा तपास केला. पण ते सापडले नाही. त्यात रिव्हाल्वर महत्त्वाचे होते.

## चुकलिया वर्म फेरा पेडे

पुढे चार महिन्यानी पाणी उतरल्यावर ते गाठोडे एका मुलाला रेडा धुताना सापडले. त्याचे कुजून तुकडे झाले होते. त्यातील रिव्हाल्वर मिळाले, आम्ही पाहत होतो. पाण्यात दूर खाली. पण गाठोडे बळकट बांधले असल्याने ते एक कासराभर अंतरावरच बुडाले होते. नेमका तेथे आम्ही तपास केला नव्हता. चुकलीया वर्म फेरा पडे अशी म्हण आहे. माणसाच्या जीवनाचेही तसेच आहे. वर्म चुकले असाच फेरा पडतो आणि मनुष्य गोते खातो.

## पाच रुपये दंड

मी, बापूराव शेडगे, दत्तू सोनार, मारुती हवलदार असे चौघे एकदा मुंबईला गेलो. तेथे पांगून राहात असे. एका मारुती हवलदारांचे पाहुणे दगडू पाटील यांच्याकडे सर्वजण जमलो. दगडू पाटलांनी रजा काढली व फिरायला जाऊ या म्हणाले, आम्ही पायी पायी निघालो. फिरत फिरत वाळकेश्वरावर जाऊन मुंबई पाहिली. चौपाटीवर आलो. तेथे लघवी करावी का नको म्हणत लघवीला बसलो. ती पुरी होण्यापूर्वी एक साध्या ड्रेसातील मनुष्य आला. त्याने माझ्या डोक्यावर वेताची काठी ठेवली आणि एक दोन तीन म्हणत उभा राहिला. अदयाप लघवी पुरी झाली नव्हती. पण भीतीने दचकून उभा राहिलो. हा कोणी पोलीस तर नव्हे? काही समजेना. तो म्हणाला येथे लघवी करायची नाही. मी जोरात बोलू लागलो. शेडगे म्हणाले, अरे ही मुंबई आहे. आपला भाग नव्हे! जरा जपून बोल. इतक्यात तो इसम म्हणाला, चला कोर्टात. दंड भरून सुटाल.

मी म्हणालो तुम्ही कोण?

पोलीस.

मग ड्रेस का नाही?

सी. आय. डी. ला कोणताही ड्रेस चालतो.

आम्हाला अधिक वाढवायचे नव्हते तसे झाल्यास आमचे बिंग बाहेर पडून सरकारला आयते घबाड मिळाले असते. होय नाही करता त्याला पाच रुपये देऊन घालविले. कारण 'वखत पडे बाका तो गद्धे को कहना पडता है काका'

या मुंबईत आमच्या भागातील लोक नोकरी धंदयानिमित्त कामाला फार होते. त्यांनी आम्हाला खूप प्रेमाने वागविले. पुन्हा काही दिवस राहून भागात आलो.

## छाप्यात अडकलो, ऑक्टोबर १९४३

मी, बापूराव शेडगे आणि दत्तू सोनार या तिघांचा मालेवाडीला मुक्काम होता. तेथे डोंगरावर चोपडाई देवी आहे. तेथून इकडे किनरेवाडी आरळ्यापर्यंत, तिकडे कोतोली नेर्ले कोकरूड पर्यंतचा भाग दिसतो. दिवस उगवायच्या आत आम्ही देवळाजवळ येऊन हिम्मतबहाद्दरांच्या रेठऱ्याकडे निघालो. पुढे नजर टाकली तर पोलीसच पोलीस. काही फिरत आहेत, काही उभे आहेत, त्यांनी रेठरे व्यापले होते. हा अचानक छापा होता. पण तो कोठून कोठ पर्यंत आहे! आम्ही छाप्याच्या आत आहोत का बाहेर! जर छाप्याच्या आत असलोच तर अडकलोच आहोत. बाहेर असलो तर बरे झाले. पळावे तर पंचाईत. सुमारे दीड हजार पोलीस असावेत. शिट्टी वाजली की संपले. दिवस उगवायची वेळ. आम्ही लपत छपत उंचावरून एका ओघळात शिरलो. दाट घाणेरीत गुपचुप बसलो. दगड मारून ससा उठवावा तसे पोलीस अंदाजाने जाळीत दगड फेकून पहात असत. असा एकदा दगड बसलाच तर चालेल. पण पळत असताना गोळीला बळी पडणे नको.

छापा रात्री बारा पासून वर्तुळ करून घालीत. सकाळी उठून लोक जाऊ लागले की, त्यांना बसवून ठेवीत. गाव तपासत. गावात कोणी भूमिगत आहेत का याची चौकशी करीत. मग कोणाला ठाण्यावर नेत. कोणाला दम देऊन सोडत. कोणाला लाथा घालत. असे प्रकार करून निघून जात. तो पर्यंत आम्ही घाणेरीत पडून राहिलो. पण पोलीस गेले किंवा गावात आहेत हे कोणीतरी गाठ पडल्याशिवाय कळण्यास मार्ग नाही. खात्री झाल्याशिवाय गावात एकदम जाणे धोक्याचे. दहा वाजता दबकत वाटेवर आलो. इतक्यात त्या पाय वाटेवरून एक तरूण विरळेला निघाला होता. त्याला थांबवला. आम्हाला लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण ओळखत. त्या तरुणाला म्हटले, असाच रेठऱ्याला जा आणि पोलिसांची चौकशी करून परत ये. त्याप्रमाणे तो गेला आणि तासाभरात परत आला आणि म्हणाला, पोलीस एक तासापूर्वी कोतोलीला गेले. रेठऱ्याला पोलिसांना कोणी सापडले नाही. पण कोतोली नेर्लेकडे कोणी सापडला असल्यास काही माहिती नाही.

मग अंदाज घेत कोतोलीकडे सरकलो आणि साताळीच्या पठारावरून शिराळे खुर्द गाठले. पोलीस छापा कोतोली, डोंगरातील वाड्या, नेर्ले, रेठरे, जोंधळेवाडी या सर्व आवारात पडला होता. त्या छाप्यात आण्णा भटजी सापडला होता. पण दैव योगाने जिवंत निसटला होता. आम्ही हारुगडे वाडीतून नदीकाठी जाऊन बसलो. आणि आण्णा भटजीला बोलाविणे पाठविले. तो दोन तासांनी आला.

## आण्णा भटजी पिंजरात

तो आला आणि गळ्यात पडून म्हणाला, गड्यांनो वाचलो म्हणून ही भेट. नाहीतर मेलोच होतो. आम्ही हसत होतो. तो सांगत होता. मी रात्री माईंगडेवाडीत जेवून निवांत झोपलो होतो. रात्र वाढली. तीन ते साडेतीनचे सुमारास एक म्हातारी मला हळूच हालवून जागे करू लागली. मी उठलो. तिने मला कानात सांगितले. पोलिसांनी सारा गाव भरला आहे. मी त्यावर चौकशी करवली. घर मालक हरीबाने घराबाहेर ओल सावलीला उभे राहून पाहिले. त्याने मला येऊन सांगितले. पोलीस गल्लो गल्ली, परड्या परड्यातून बंदूक भाला घेऊन फिरत आहेत. आता या कोंडीतून मी बाहेर कसा पडणार? ती म्हातारी गल्लीतून घिरट्या घालून यायची आणि मला म्हणायची, बाबा, आता तू कसा वाचणार? ज्या प्रमाणे बंका कुंभाराच्या आव्यात मांजरीची पिल्ली सापडली म्हणून मांजरी आव्या भोवती मँव मँव करत फिरत होती, त्या प्रमाणे ती माता अर्ध्या तासाने येई आणि बाळा तू कसा वाचणार? असे म्हणे. पण माझे लक्ष नव्हते. त्या घराच्या पाठीमागे दहा बारा पिंजराच्या होळ्या होत्या. पण पिंजरात गवताच्या गंजीत पोलीस भाले खुपसून पाहात. पण आता उघड्यावर बसण्यापेक्षा नशिबावर हवाला ठेवून मागच्या दाराने लपत होळीजवळ गेलो. दोन होळीच्या मध्ये बसलो आणि हरीबाला माझ्या अंगावर होळी ढकल म्हणालो. त्याप्रमाणे त्याने केले. तेथे म्हतारी आली. तिने हळून हाक मारली. आता मात्र मी तिच्यावर रागावलो आणि पुन्हा आलीस तर खबरदार म्हणालो. मग मात्र ती पुन्हा आली नाही.

मी होळीत श्वास रोखून बसलो. पोलिसांनाही आमची भीती असे. एखाद्याने गोळी झाडून अंधाराचा फायदा घेऊन निसटला तर काय घ्या? म्हणून जरी त्यांना चार चार कासऱ्यावर उभे केले होते, तरी ते भीतीने एका ठिकाणी गोळा होत आणि उजाडेल केव्हा याची वाट पाहात. मी चार वाजता होळीत शिरलो होतो. दिवस उगवला. आठ वाजले. आणि या होळीत भाला खुपस, त्या होळीत खुपस असे करीत पोलीस जवळ आले. मला फाशीची वेळ जवळ आली असे वाटले. माझ्या शेजारच्या होळीत भाला खुपसला. जोराने मार

असे सांगून एक अधिकारी पुढे गेला. श्वास घ्यायला जरूर तेवढ्या काड्या माझ्या तोंडावर होत्या. त्यातून मला दिसत होते.

एक पोलीस माझ्या जवळ आला. त्याने माझ्यापासून चार बोटे अंतरावर खसकन बाजूला होळीत भाला खुपसला. मी दचकलो. मला आवरले नाही आणि लघवीने माझा लंगोटा भिजला. लगेच त्याने माझ्या दुसऱ्या बाजूला खुपसला. त्या दोन्ही भाल्याच्या माऱ्यामध्ये मी होतो. 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीप्रमाणे मी वाचलो. कंसाच्या भीतीने देवकीचा गर्भ बंदी शाळेत जिरला. तसे पिंजराच्या बंदी शाळेत माझे परसाकडचे जिरले. पोलीस निघून गेले. पार्टी नेर्ल्याकडे गेली. तरी मी पिंजरातून बाहेर आलो नाही. ज्यांना माहीत होते त्यांनी अकराचे दरम्यान काका काका म्हणून हाक मारली. मग मी बाहेर पडलो. नंतर म्हातारी आली आणि माझ्या तोंडावरून हात फिरवून बाळा जगलास असे म्हणून माझे त्या माऊलीने मुके घेतले. त्यानंतर तुमचा निरोप आल्याने इकडे आलो. आमचा हशा पिकला. मग आम्हींही आमची घडलेली हकीकत सांगितली. आज इतका धुमाकूळ झाला तरी आमचा एकही माणूस त्यांना सापडला नाही. आम्ही सर्वजण सुखरूप होतो. मात्र या छाप्यात आमच्या शिवाय इतर कोणीही जोडीदार पोलिसांच्या वर्तुळात नव्हते.

## पकडून देणाऱ्यास गाठले

आम्हाला बापूसाहेब भेंडवडेकर यांची मदत असे. त्यांच्याकडे आम्ही वेळोवेळी मुक्काम करीत असू. एकदा बापूभाई भेंडवड्याला निघाला होता. वाटेत लोळवण्याच्या लोकांची गाठ पडली. त्यांनी त्याला लोळवण्याला नेले. तेथे तो चार दिवस राहून आला. त्यामुळे हे एक नवीन ठिकाण आम्हाला मिळाले. आम्ही येऊ जाऊ लागलो.

रामानंद भारतींना पकडून देणाऱ्याचा आम्हाला सूड घ्यायचा होता. पण ते अद्याप जमले नव्हते. मरळी भागात म्हावशी हा गाव आहे. तेथील विठू बुवा आम्हाला मदत करीत. एके दिवशी विठू बुवा आमच्याकडे आले. त्यांनी आमच्या नेत्यापुढे हा विषय मांडला. सर्वांच्या संमतीने बेत नक्की केला. वाटाड्या विठू बुवा होतेच. आम्ही गेलो. एकदम गावात शिरलो नाही. मग युक्ती केली. चांदभाईला ड्रेस चढवला. तो पोलीस जमादार बनला. दिवस मावळताच हा आमचा जमादार चांदभाई ज्या पाटलाने रामानंद भारतींना पकडून दिले होते, त्याच्या घरी गेला. पाटील तंबाखू खात माच्यावर बसला होता. तो या जमादाराला पाहाताच उठला. त्याने चांदभाईला आत बोलावले. पण या नाटकी जमादाराने त्यालाच बाहेर बोलावले व म्हणाला, पाटील गावाबाहेर भाऊसाहेब उभे आहेत. त्यांनी तुम्हाला ताबडतोब बोलाविले आहे. कोठेतरी लांब छापा

घालायचा बेत आहे. आम्ही गावाबाहेर वाट पाहात होतो. पाटील घाईने जमादाराबरोबर आला. त्याने पाहिले तर पोलिसांऐवजी आमची गाठ पडली. हे निराळे प्रकरण दिसताच पाटील भ्याला. घाबरला. त्याची बोबडी वळली. त्याला बोलता येईना त्याला आम्ही धमकावले. रामानंदांना पकडून दिल्याचे बक्षिसाचे रुपये देणार, का पत्र्या लावल्या पाहिजेत. म्हणताच तो गयावया करू लागला. त्याने रुपये देण्याचे कबूल केले. त्याने ताबडतोब घरी जाऊन पैसे आणले आणि आमच्या स्वाधीन केले. मग त्याला सक्त ताकीद देऊन आम्ही परत फिरलो.

## पोलिसाला लघवी झाली

डोंबारणीची बैठक जेथे असेल तेथे मी अधून मधून जात असे. डोंबारणीला आमचा विश्वास पटल्यावर तिला आम्ही बोलावू तेथे येऊन बैठक करी. ती डोंगरातसुद्धा येई. कोकरुडला त्यांचा मुक्काम होता. तेथे कायमपणे पोलीस पार्टी होती. एकदा मी, बर्डे मास्तर व दत्तू सोनार कोकरुडच्या मळीला होतो. तेथे कोकरुडला डोंबारणीची बैठक असल्याचे कळले. बर्डे मास्तर व दत्तू सोनार बैठकीला आले नाहीत. मग मी एकटाच गेलो. मी प्रथम तपास केला तर गावात पार्टी नाही, बैठकीला लांडगे नावाचा पोलीस हजर आहे व तो माच्यावर बसला आहे असे समजले. मग मी पुढे गेलो. तेथील सर्व लोक मला ओळखत होते. मला बघताच गुलाबराव देशमुख यांनी आत नेले आणि त्याच माच्यावर बसविले. मला बघून लोक कुजबुजू लागले. माझे घोंगडे व हातात रिव्हॉल्वर बघून लांडगे पोलीस दचकला. हे कोण म्हणून त्याने कोणालातरी विचारले. मी बिळाशीचा दत्तू लोहार. काँग्रेसचा फरारी असे त्याला कळताच त्याला आवरले नाही आणि त्याला चड्डीत लघवी झाली. तो ओघळ गुलाबराव देशमुखांच्या मांडीखाली आला. त्यामुळे त्यांचे धोतर भिजले. हे त्या लांडगे पोलिसाने पाहिले. तो ओशाळला आणि नम्रतेने मला नमस्कार केला व उठून निघाला. मी त्याला उठू देत नव्हतो. पण तो आम्हाला सामील आहे असे होऊन त्याला नोकरीला मुकावे लागले असते. म्हणून भिऊन बाहेर गेला. त्याला ती भीती, तर हा बाहेर जाऊन शिट्टी वाजवील आणि पार्टी येऊन मला पकडतील ही मला भीती. म्हणून मीही त्याच्या पाठोपाठ बाहेर पडून मुक्काम गाठला. काँग्रेसवाले कारणाशिवाय पोलिसांना त्रास देत नाहीत हे लांडगे याला माहीत होते. त्यामुळे तेव्हापासून तो भागात निर्भयपणे फिरू लागला.

## एका तलाठ्याची गंमत

बाळू काका देशपांडे हा पणुंब्रेवारुणचा. तो शितूर खेडे या गावी तलाठी होता. त्याचा मुक्काम देवळात चावडीत असे. संस्थानातून व जहागिरीच्या

गावातून देवळे सुंदर आणि त्यांना इनामही भरपूर असे. त्यामुळे चावडीपेक्षा देवळे ही मुक्कामाला चांगली. आम्ही पार्टी आल्याचे कळताच डोंगरात निसटत असू. तसे आम्ही गेलो की, बाळू काका म्हणे, बघा पोलीस आले म्हणजे काँग्रेस डोंगरात पळते आणि ते गेले म्हणजे आम्हाला दम देते. जेव्हा आमच्याजवळ बंदुका नव्हत्या, मात्र भाले कुऱ्हाडी असत त्यावेळची ही हकीकत. पुढे आम्ही जेव्हा तलाठ्याचे नाक कापले, तेव्हा बाळू काका भ्याले आणि हु का चू करायचे सोडून दिले. तरीपण एकदा आम्ही त्याची गंमत करायचे ठरविले आणि त्याला गाठले. बर्डे मास्तर म्हणाले, काका काँग्रेस कशी पळते ते दाखवतो जरा थांबा आणि आम्हाला म्हणाले, अरे याला पत्र्या लावा. हे ऐकताच काकाला हिव भरल्यासारखी थंडी वाजून आली, ते थडथडू लागले.

पत्र्या लावणे म्हणजे चवड्याजवळ पाय बांधायचे आणि तळ पाय काठीने झोडपायचे. यालाच पत्र्या लावणे म्हणतात. पत्र्या लावणे म्हणजे तळ पायात खिळे मारणे असा काहींचा चुकीचा समज आहे. शेवटी काका गयावया करू लागले. त्यांना आम्ही काही करणार नव्हतो. फक्त गंमत करायची होती. तेव्हापासून काका आमचे स्नेही झाले. पुढे काकांची गाठ पडली म्हणजे आमच्यात हशा पिके. बाबूराव दादा काकाला विनोदाने म्हणत, काका तुमच्या आशिर्वादावर आम्ही निवांत असतो.

## अशी एक आजी

एकदा दुपारी एक वाजता मी, दत्तू सोनार, मारुती हवलदार असे तिघे मालेवाडीत गेलो. एक आजी सोपा लोटत होती. ती म्हणाली, बाबांनो जेवला का? आम्ही अजून नाही म्हटले. मग जेऊन जा असे म्हणाली. आम्ही जेवलो. जेवल्यानंतर आम्ही थांबत नसू. तेथून सात आठ मैलांवर कोठेतरी दूर जाऊन झोपत असू. आजी म्हणाली, आता उन्हाची थोडी विश्रांती घ्या, आम्ही म्हणालो आजी, तुमच्याच मळीला कानसा नदीकाठी किंजळाच्या सावलीला जातो. ही कानसा नदी छोटीशी आहे. ती उदगिरीच्या डोंगरात उगम पावून कांडवण, मालगाव, विरळे, जांबूर, मालेवाडी, थावडे यांच्यापुढे वारणेला उजवीकडून मिळते. तेथे मळीला जाऊन बसलो. इकडे पंचवीस तीस पोलीस मालेवाडीत पाटलाच्या घरी गेले. त्या पाटलाला आम्ही आजीच्या घरी जेवत असल्याचे माहित होते. त्याने आपल्या बायकोला आजीच्या घरी पाठवले. ती आजीला भेटून म्हणाली. पोलीस देवळात आले आहेत, सावध रहा. तिने लोक जेवून गेले आहेत असा परत निरोप दिला. पण आजीला चैन पडेना, तिने पार्टी नदीकडे तपासाला जाईल, म्हणून पाटीत थोड्या भाकरी ठेवल्या. वर फडके झाकले

आणि झपाट्याने नदीला आली व आम्हाला म्हणाली, लेकांनो, गावात पार्टी आली आहे उठा!

ती आजी गेल्या बारा वर्षांनंतर आजच मळीला आली होती, तेही फक्त आम्हाला वाचविण्यासाठी. असा आम्हाला जनतेचा, आया-बहिणींचा पाठिंबा होता. कोंबडी पिलांना पंखाखाली घेऊन शत्रूला तोंड देण्याकरता जागरूक बसते ना? तशी जनता आम्हाला संरक्षण देत होती. हे उत्स्फूर्त होते. त्यांना कोणी शिकवले नव्हते. आम्ही खरे तर त्यांचे कोणी नात्यातले नव्हतो. तरी ते आम्हाला वाचवीत होते. अशा या आजी, आयाबहिणींचे ऋण कसे फिटणार? त्या आजीच्या प्रेमाने आम्ही भारावून गेलो. काय म्हणावे या आजीच्या प्रेमाला?

•



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# श्रीपाद रघुनाथ जोशी

जन्म मुरगुड, जिल्हा कोल्हापूर. २३ जाने. १९२०

प्राथमिक शिक्षण मुरगुड येथे. त्यानंतर वाई आणि पुणे येथे. १९३८ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण. १९३८ साली वर्धा येथे काकासाहेब कालेलकर यांच्याकडे गेले. तेथील आठ वर्षांच्या वास्तव्यात हिंदी, उर्दू, गुजराती आणि बंगाली भाषांचे शिक्षण. याच सुमारास म. गांधींचे सान्निध्य. १९४१ साली वर्धा अध्यापनमंदिरात उर्दूचे अध्यापन.

१९४२ च्या लढ्यात ४४ साली अटक. वर्षभर कारावास. पण सहा महिन्यांत सुटका. याबाबत तुरुंगात विविध प्रकारचे लेखन. त्यानंतर हिंदुस्तानी प्रचार संघटनेचे काम केले. १९४६ पासून पुण्यात वास्तव्य आणि पूर्णवेळ लेखन व्यवसायाला वाहून घेतले. १९५५ ते ६१ आणि १९६६ ते ८० या काळात गारगोटी मौनी विदयापीठ आणि पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत अनुवादकाचे काम. मी पाहिलेले गांधींजी हे पुस्तक भारतातील सर्व भाषांत भाषांतरित. हिंदी-मराठी, मराठी-हिंदी आणि उर्दू-मराठी शब्दकोश तसेच अन्य ललित लेखन त्यांनी केले आहे. पुढील उतारा त्यांच्या उलगाउलग या आत्मवृत्तातून घेतला आहे.

## एका वेगळ्या जगाचे दर्शन

श्रीपाद जोशी

ऐ इश्क न छेड आ-आ के हमें, हम भूले हुओंको याद न कर।
पहले ही बहुत नाशाद हैं हम, तू और हमें नाशाद न कर॥
किस्मतका सितम ही कम तो नहीं, ये ताजा सितम ईजाद न कर।
यूँ जुल्म न कर, बेदाद न कर, ऐ इश्क हमें बरबाद न कर॥

—अख्तर शीरानी

१९४२ सालची भारतव्यापी 'चले जाव' (क्विट इंडिया) ही चळवळ सुरू झाली तेव्हा तिच्यात आपण सहभागी झालेच पाहिजे असे मला वाटू लागले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्याच्या मूलभूत प्रेरणेनेच मी उच्च शिक्षणाचा नाद सोडून देऊन त्या लढ्याच्या पूर्वतयारीसाठी वर्ध्याला गेलो होतो. परंतु प्रत्यक्ष लढा सुरू झाल्यावर मात्र माझ्यापुढे एक वेगळाच प्रश्न उभा राहिला. कोणत्याही राजकीय पक्षाशी माझा विशेष संबंध आला नव्हता. त्यामुळे अशा चळवळीचे नेतृत्व, संचालन करणाऱ्या लोकांशी माझा फारसा परिचय नव्हता. सामुदायिक किंवा वैयक्तिक सत्याग्रह एवढा एकच मार्ग मला उपलब्ध होता. परंतु या आंदोलनाचे स्वरूप इतके भिन्न होते की त्यात अशा प्रकारच्या सत्याग्रहाला फारसे स्थान असणार नाही, हे उघड दिसत होते.

माझी ही अडचण अगदी अनपेक्षितपणे दूर झाली. 'करा किंवा मरा' हा ८ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजींनी दिलेला आदेश ऐकून काकासाहेबांमधील जुना क्रांतिकारक जागा झाला; आणि अहिंसेच्या मार्गाचा त्याग न करताही ब्रिटिश सत्तेला विध्वंसक कृत्यांच्या द्वारे कसे सळो की पळो करून सोडता येईल या दिशेने त्यांचे विचारचक्र सुरू झाले. दळणवळणाची साधने या ब्रिटिश सत्तेच्या नाड्या होत्या. त्याच तोडून टाकावयाच्या, मात्र तसे करताना जीवहत्या, निदान मानवी प्राणहानी होणार नाही याची खबरदारी घ्यायची, हे सूत्र त्यांनी निश्चित केले. श्री. किशोरलाल मश्रूवाला यांची भूमिकाही काहीशी अशीच होती. त्यामुळे श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांच्यासारख्या विधायक कार्यात असलेल्या काही गांधीवाद्यांनी विध्वंसनाच्या अथवा घातपाताच्या कामात सक्रिय सहकार्य दिले.

स्वत: काकासाहेब वयोमान व शरीरप्रकृती यांच्या मर्यादांमुळे तोडफोडीचे काम करू शकत नव्हते. म्हणून मुख्यत: गांधीवादी कार्यकर्त्यांना या बाबतीत मार्गदर्शन करण्याचे त्यांनी ठरवले. त्याप्रमाणे त्यांनी नागपूरला कार्यकर्त्यांच्या एका गुप्त बैठकीत मार्गदर्शन केलेही. त्या बैठकीला मी त्यांच्याबरोबर हजर राहिलो होतो. महाराष्ट्रात ठिकठिकाणी जाऊन अशा बैठका घेण्याची त्यांची योजना होती. त्या दृष्टीने काही पत्रकेही तयार करण्यात आली होती. ती पत्रके घेऊन मी पुण्याला जावे आणि बैठकीची पूर्वतयारी करावी, असे त्यांनी मला सांगितले. त्याप्रमाणे मी पुण्यास आलो. परंतु एवढ्यात वर्ध्याला काकासाहेब पकडले गेले. म्हणून मग मी पुण्याच्या मंडळींबरोबर काम करायचे ठरवले. लिखाणाचा थोडाफार अनुभव असल्यामुळे गुप्त पत्रके तयार करण्याचे काम मी स्वीकारले. काही हिंदी-उर्दू पत्रकेही मी त्या काळात स्वहस्ते सायक्लोस्टाइल यंत्रावर चक्रमुद्रित केल्याचे मला स्मरते. पत्रके लिहिण्याव्यतिरिक्त चळवळीची माहिती जमवून अहवाल तयार करणे, बंद खोलीतील बैठकीत भाषणे देणे, खेड्यापाड्यात जाऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे यांसारखी काही कामेही मी त्या काळात केली. त्या निमित्ताने एकदा सासवड-इंदापूर भागात मी गेलो होतो. सासवडला मुक्काम असताना गुप्त पोलिसांना आपला सुगावा लागला असण्याची शंका आल्यावर रात्रीच्या अंधारात एका जुनाट वाड्यातून दुसऱ्या वाड्यात आणि तिथून रानात जाऊन लपण्याची पाळी आमच्यावर आली होती. त्यावेळी आचार्य भागवतांचे भाचे डॉ. दत्ता जोशी व प्रख्यात गायक पं. विनायक रामचंद्र आठवले हे माझ्याबरोबर होते.

पुण्यास मी माझे चुलते श्री. ह. मो. जोशी यांच्या घरी राहात होतो. स्वत: माझे चुलते, त्यांची मुलगी गोदावरी व त्यांच्याकडे राहाणारा माझा धाकटा भाऊ श्याम हे तिघे पकडले जाऊन येरवड्याची हवा खात होते. घरात एकटी काकीच उरली होती. शनवारातील घरावर पोलिसांची बारीक नजर होती. परंतु एक तर मी पुण्यात तसा अपरिचित होतो ; आणि त्या भागातल्या गुप्त पोलिस अधिकाऱ्यांना आमच्या कुटुंबाविषयी विशेष स्नेहभाव वाटत होता. त्यामुळे तीन-साडेतीन महिने मी सहज बाहेर राहू शकलो.

पण अखेर ९ डिसेंबर १९४२ रोजी दुपारी मी पकडला गेलो. घरी जेवायचे पान वाढले होते. काकीला 'लगेच येतो' असे सांगून मी नेहमी प्रमाणे मुंबईच्या गुप्त आकाशवाणीसाठी तयार केलेला आंदोलनाचा अहवाल विजारीच्या खिशात घालून ट्रेनिंग कॉलेजच्या पिछाडीस असलेल्या बिवलकरांच्या खोलीवर गेलो. 'सुनीता' या गाजलेल्या कादंबरीचे लेखक कै. श्रीकृष्ण बिवलकर हे त्यावेळी केसकर हे नाव धारण करून या खोलीत रहात

होते. ते चळवळीच्या कामांचे समन्वयन करीत होते. ९ डिसेंबरला पुण्यात मोठ्या प्रमाणात चिमूर दिन साजरा करण्याचे ठरविण्यात आले होते. वर्धा जिल्ह्यातील चिमूर व अष्टी या गावात ब्रिटिश पोलिसांनी व महार पलटणीने स्थानिक लोकांवर जे भयंकर अत्याचार केले होते त्यांच्या निषेधार्थ तो दिन योजण्यात आला होता. खबरदारीचा उपाय म्हणून पुण्याच्या पोलिसांनी ता. ८ च्या रात्रीच शहरभर धरपकड व झडत्या यांचे सत्र सुरू केले होते. त्यात त्यांना ही खोली मिळाली होती. तिथे ते सापळा लावून बसले होते. त्यात मी अडकलो.

घरी काकी व इंदू माझी वाट पाहात होत्या. कॉलेजात शिकणारा माझा मामेभाऊ श्याम गुळवणी मला सहज भेटायला म्हणून तिथे गेला; तेव्हा मी बाहेर जाऊन बराच वेळ झाल्याचे त्याला कळले, माझा शोध घेण्यासाठी इंदूने त्याला आपली लेडीज सायकल देऊन बिवलकरांच्या खोलीवर पाठवले; आणि तोही त्या जाळ्यात अडकला; आणि स्थानबद्ध झाला. बिचाऱ्या सायकललाही फरासखानावास घडला.

सुदैवाने आम्हाला पकडताच अथवा फरासखान्यात नेल्यानंतर लागलीच आमची अंगझडती घेण्याची बुद्धी पोलिसांना झाली नाही. त्यामुळे माझ्या जवळचे कागद सुरक्षित राहिले होते. ते कसे नष्ट करायचे याचा विचार करीत असता काकासाहेबांनी पूर्वी कधीतरी त्यांच्या तरुणपणातला जो एक मजेदार अनुभव मला सांगितला होता तो मला आठवला. त्यावेळी ते सावरकरांच्या दहशतवादी गटात काम करीत होते. तुरुंगातील आपल्या एका मित्राला भेटायला ते गेले असता पोलिस अधिकाऱ्याला त्यांचा संशय आला. त्यांच्या खिशात एक महत्त्वाची चिठ्ठी होती. आपली झडती घेतली गेल्यास ती पोलिसांना मिळू नये म्हणून सहजपण खिशात हात घालून त्यांनी त्या चिठ्ठीचे बारीक बारीक तुकडे केले होते. त्याच युक्तीचा वापर करून मी त्या अहवालाचे बारीक तुकडे केले आणि शौचाच्या निमित्ताने संडासात जाऊन ते पाण्याबरोबर वाहून जातील अशी व्यवस्था केली. त्यामुळे रात्री आम्हाला कोठडीत टाकण्यापूर्वी जेव्हा आमची अंगझडती घेण्यात आली तेव्हा माझ्याजवळ त्यांना काहीच मिळाले नाही.

रात्री आम्हाला फरासखान्याच्या तळघरातल्या एका खोलीत कोंडण्यात आले. त्या कोठडीवर पाटी होती: 'सहा पुरुषांसाठी'. शेजारच्या कोठडीवर 'सहा स्त्रियांसाठी' अशी पाटी होती; पण तिथे स्त्रियांऐवजी पोलिस चौकी जाळण्याच्या आरोपाखाली पकडण्यात आलेली शाळकरी मुले होती! सहा-जणांसाठी असणाऱ्या कोठडीत आम्हा पस्तीस जणांना कोंबण्यात आले होते. डिसेंबरची कडाक्याची थंडी आणि तळघरातील लादी! खूप आरडा-ओरडा

केल्यावर एका खोलीसाठी मंजूर असणारी सहा फाटकी घोंगडी आम्हाला देण्यात आली. समोर व वरती गजाच्या भिंती आणि अंगात एका सदऱ्याखेरीज काही नाही. एकमेकांच्या शरीराची जी ऊब आम्हाला मिळाली तिनेच बहुधा थंडीपासून आमचे रक्षण केले असावे.

दिवसातून फक्त एकदा, सकाळी प्रातर्विधीसाठी आम्हाला कोठडीतून बाहेर काढण्यात येई. त्यानंतर जेवणासाठी, म्हणजे एक भाकरी व कोरडी चटणी किंवा पिठले खाण्यासाठी, थोडावेळ दार उघडले जाई. बाकी सबंध दिवस व रात्र कोठडीत बंद. लघ्वीसाठी खोलीतच एक बादली ठेवण्यात आली होती. रात्री तिची घाण नाकात भरू लागली की, हळूच कुणीतरी मिस्किलपणे विनोद करी, "रातराणी फुलली बरं का!" खोलीत उवा, पिसवा, ढेकूण यांचे साम्राज्य होते. आमच्या शरीराला पाण्याचा स्पर्श न झाल्यामुळे आमचे कपडे उवांनी भरून गेले. पण त्या आधी आमच्यापैकी कुणीच ऊ कशी असते ती प्रत्यक्ष पाहिली नसल्यामुळे आपल्याला काय चावतय ते बरेच दिवसपर्यंत कुणाच्या लक्षातच आले नाही. एवढे सारे असूनही आम्ही मजेत होतो. गप्पा-गोष्टी, गाणी, भजने, प्रार्थना, नाना प्रकारच्या भेंड्या, आठवणी वगैरे मनोरंजनाची अनेक साधने आपल्याजवळ असल्याची जाणीव आम्हाला त्या वेळी झाली.

सुदैवाने पोलिसांनी आमच्यापैकी कुणाला फार मारहाण केली नाही. मात्र रात्री सामसूम झाल्यावर वरच्या मजल्यावर पोलीस लोक फौजदारी गुन्हेगारांना बेदम बडवून काढीत. त्यांच्या करुण किंकाळ्यांनी आम्ही भेदरून जावे, आणि पोलिसांना हवा होता तसा कबुली जबाब दयायला तयार व्हावे, हा त्यात हेतू होता. परंतु त्यांचा तो हेतू साध्य झाला नाही. त्यांना आमच्याकडून फारसे काही मिळाले नाही.

ता. २१ डिसेंबर रोजी मला घराच्या झडतीसाठी आमच्या घरी नेण्यात आले. तेव्हाच घरच्या लोकांना आमचा पत्ता लागला. तोपर्यंत सगळा आणीबाणीचा अंधारच होता. भावी संकटाची चाहूल ओळखून इंदूने महत्वाची कागदपत्रे हलविली होती. त्यामुळे पोलिसांच्या हाती काहीच लागले नाही. मात्र भावनेच्या भरात मी एक मूर्खपणा करून बसलो जो आम्हाला (निदान मला तरी!) चांगलाच भोवला. इंदूला मी फरासखान्यात स्फुरलेली एक कविता लिहून दिली. ती कविता अशी होती:—

जाऊ नको विसरून सखये!
जाऊ नको विसरून.
हृदये अपुली एक जाहली
आणभाक होऊन, सखये।।

दुरावली आपुली शरीरे
मन एकचि परि तयांतिल झुरे
तव विरहातुनि गीत हे स्फुरे
गे, ऐक ध्यान देऊन॥ १ ॥
युगा मागुनी युगे लोटतिल
विश्वहि सारे बदलुनि जाइल
प्रेमभाव परि अभंग राहिल
ही आस मनी ठेवून॥ २ ॥
वियोग रजनी सरुनी जाइल
मीलन-रवि उदयाचलि येइल
जीवन अपुले विकसित होइल
ही खूणगाठ बांधून॥ ३ ॥

काव्यगुणांच्या दृष्टीने ही कविता अगदीच सामान्य होती. परंतु माझे हृद्गत ती व्यक्त करीत होती. म्हणून इंदूने ती जपून ठेवली. आमच्या प्रेमप्रकरणाचा आमच्या वाडचात बराच बोभाटा झाला असला तरी खुद्द इंदूच्या घरच्या मंडळींना त्याचा सुगावा लागला नव्हता. पण इंदूच्या आईला थोडा संशय येऊ लागला होता. तिने एकदा इंदूच्या पुस्तकांची तपासणी केली असता तिला ही कविता सापडली; आणि त्या कुटुंबाला आमचे गुपित कळले. इंदूने एका पत्रातून ही सारी हकीगत मला कळविली. ती लिहिते, "सारे समजल्यामुळे आई खूप चिडली आहे. पण वडील काहीच म्हणत नाहीत. आई रोज खूप टाकून बोलते. त्यामुळे मला इतका कंटाळा आला आहे म्हणून सांगू! म्हणून येत्या २६ तारखेला (सत्याग्रह करून) तुरुंगात जाण्याचा मी विचार करते आहे." इंदूचे कुटुंब कोकणी-भाषी कारवारी सारस्वत. सुखवस्तू. तिचा थोरला भाऊ आय्. सी. एस्. असून कलेक्टर होता. याचा अर्थ असा की, आर्थिक दृष्टचा मी त्यांच्या पासंगालाही पुरत नव्हतो. त्या मुद्दचावर हे लग्न मोडले असते तर ते मी समजू शकलो असतो. परंतु त्यांचा मुख्य विरोध जातीबाहेर लग्न करण्याला होता. सारस्वत आणि कायस्थ जातींना ब्राह्मण लोक तुच्छ लेखत असले तरी त्यांच्या दृष्टीने ब्राह्मणच खालच्या दर्जाचे होते. या बाबतीतली सनातनी लोकांची भूमिका मला कळत होती. परंतु इंदूच्या घरची मंडळी तशी सुधारकी मतांची होती. इंदूच्या भगिनी शांताबाई या तर कट्टर समाजवादी. खुद्द त्यांचाही प्रेमविवाह या चळवळीतच ठरला होता. त्यांनीही या लग्नाला मोडता घालावा, हे मला विचित्र वाटले. त्यांनी श्रीमंती-गरिबीचा प्रश्न उपस्थित केला नसला तरी मी त्यांच्याइतका किंवा त्यांच्यापेक्षा श्रीमंत असतो तर त्यांनी

हे लग्न निश्चित मोडले नसते, असा विचार माझ्या मनात येऊन गेला, आणि आयुष्यात प्रथमच आपल्या गरिबीचा मला तिटकारा आला. या घटनेचा एक वेगळाच परिणाम माझ्यावर झाला. गरिबी हे नेहमीच वरदान नसते, तो कधी कधी शापही बनू शकतो, याची दाहक जाणीव मला झाली; आणि गरिबीच्या कचाटयातून आपण आपली सुटका करून घेतली पाहिजे, असे माझ्या मनाने घेतले. मात्र कालांतराने माझ्या प्रयत्नात यशस्वी होऊन जेव्हा मी थोडा बहुत सुखवस्तू बनलो तेव्हा श्रीमंतीची निःसारता मला प्रकर्षाने जाणवू लागली श्रीमंती-गरिबीचा तो संघर्ष मला अगदीच हास्यास्पद वाटतो. कारण माणसाचे सुख त्या संघर्षाच्या पलीकडे कुठेतरी असल्याचे मला अनुभवाने आढळून आले आहे.

## तुरुंगातील बावीस महिने

घराची झडती झाल्यावर मला एकटयालाच फरासखान्यातून शुक्रवार पेठेतील खडकावरच्या सबजेलमध्ये नेऊन टाकण्यात आले; आणि इतरांना येरवडयाला नेण्यात आले. सबजेलमध्ये बहुतेक सर्वच सराईत गुन्हेगार होते. त्यांपैकी अधिकांश भुरटया चोऱ्या करणारे, खिसेकापू, गुप्तरोगांनी पोखरलेले, हातभट्टीवाले क्यौरे होते. त्यांचे ते घाणीने भरलेले किळसवाणे जग पाहून प्रथम मी हबकलोच. पण नंतर हळू हळू त्या लोकांशी माझी दोस्ती जमली; आणि एक वेगळेच विश्वदर्शन मला घडले. त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्यात माझे मन रमू लागले. शिवाय बहुधा रोजच इंदू येऊन मला भेटून जात होती. त्यामुळे सबजेलमधील जीवन पुष्कळच सुसह्य झाले. तिथे मिळणारी गरम भाकरी व ताजी आमटी मला खूप आवडली. अगदी घरी जेवल्यासारखे वाटे.

मला सबजेलमध्ये का नेले होते याचा उलगडा लौकरच झाला. पोलिसांना माझ्याकडून कबुली जबाब लिहून घ्यायचा होता. अण्णा फणसे या कोवळ्या तरुणालाही याच कारणासाठी तिथे ठेवण्यात आले होते. पण त्याला दुसऱ्या कोठडीत घातले होते. सरकारविरोधी पत्रके तयार करीत असल्याचा गुन्हा मी पूर्वीच कबूल केला होता. त्यामुळे तसा कबुली जबाब देण्यास माझी तयारी होतीच. त्यात एक स्वार्थही होता. घरची चार माणसे (गुळवणीसह) आधीच स्थानबद्ध झालेली असल्यामुळे बेमुदत स्थानबद्धतेत राहाण्यापेक्षा पत्रकांच्या आरोपा- खाली चारसहा महिन्यांची शिक्षा भोगून बाहेर पडावे, या हेतूने मी तो निर्णय घेतला होता. पण माझा तो अंदाज फसला. एका मॅजिस्ट्रेटसमोर कबुलीजबाब लिहून दिल्यावर मला येरवडयाच्या तुरुंगात इतर सहकाऱ्यांमध्ये नेऊन टाकण्यात आले. आपल्यावर लौकरच खटला भरला जाईल, अशी माझी अपेक्षा होती. परंतु सुमारे नऊ महिने मला तसेच अधांतरी ठेवल्यावर सरकारने

एका प्रचंड कटाच्या खटल्यात मला गोवले. त्याचे नाव होतें, 'महाराष्ट्र कटाचा खटला' या तथाकथित कटात सर्वश्री अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, एस्. एम्. जोशी, नानासाहेब गोरे, शिरुभाऊ लिमये, सदाशिव बागाईतकर, श्रीकृष्ण विबलकर, राम तेलंग, दत्ता देशमुख, भाई कडू, किशाभाऊ पटवर्धन वगैरे चाळीस आरोपी होते. वस्तुतः या लोकांशी माझा काहीही संबंध नव्हता. अनेकांना तर मी ओळखतही नव्हतो. पण सरकारने मला त्यांच्यांत गोवले खरे. कॅपिटॉल बॉंब कटाचा खटला यशस्वी होण्यावर आमच्या कटाचे भवितव्य अवलंबून होते. परंतु तोच खटला कोलमडल्यामुळे आमचा खटलाही उभा राहू शकला नाही. मग आमच्यापैकी काही जणांवर व्यक्तिशः खटले भरण्यात आले; आणि इतरांना स्थानबद्ध करण्यात आले. या साऱ्या प्रकरणात सोळा महिने फुकटच निघून गेले होते. त्यानंतर माझ्यावरील खटल्यात मला ता. १३-४-४४ रोजी १ वर्ष सक्त मजुरी आणि दोनशे रुपये दंड अशी शिक्षा मिळाली. दंड न भरल्यास तीन महिने सक्तमजुरी भोगायची होती. कॉमरेड फडके हे माझे (मोफतचे) वकील होते. त्यांनी या शिक्षेवर अपील केले. त्याचा निकाल लागून माझी शिक्षा सहा महिन्यांची झाली; आणि दंड पन्नास रुपये झाला. दंड न भरल्यास एक महिना सक्तमजुरी. मी दंड न भरल्यामुळे मला सात महिने काढावे लागले असते. परंतु मला अठ्ठावीस दिवसांची सूट (रेमिशन) मिळाली; आणि मी सहा महिन्यांनंतरच ता. १४-१०-४४ रोजी सुटलो. खरे म्हणजे माझ्यासारख्या गांधीवादी समजल्या जाणाऱ्या कार्यकर्त्याने शिक्षेवर अपील करणे तत्वनिष्ठेशी विसंत होते. त्याबद्दल अनेक सहकाऱ्यांनी माझी निभर्त्सनाही केली. ती मी निमूटपणे सहन केली. मी मनाने खूपच दुबळा झालो होतो. एकतर तुरुंगात सोळा महिने निष्कारण काढावे लागल्याने मी कंटाळून गेलो होतो. त्यात पुनः इंदूला माझ्यापासून दूर करण्यात तिच्या घरचे लोक यशस्वी झाल्याच्या बातम्या कानावर आल्याने मी काहीसा निराशही झालो होतो. आमचे लग्न होण्यापूर्वीच फिसकटले होते. काही कारण नसताना त्या प्रकरणात मला बदनाम व्हावे लागले होते. ज्यांना सर्व स्थिती माहीत नव्हती त्यांना मीच इंदूला नादी लावले होते, असे वाटत होते. त्यामुळे केव्हा एकदा तुरुंगातून बाहेर पडतो, असे मला झाले होते. त्या वातावरणातून मला शक्य तितक्या लौकर मुक्त व्हायचे होते.

हयात इक मुस्तकिल गमके सिवा कुछ भी नहीं।
खुशी भी याद आती है तो आँसू बनके आती है।।

**—'साहिर'**

सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या राजबंदयांना त्यावेळी सामान्यतः नवार (नाडा) विणण्याचे काम दिले जाई. ते काम कंटाळवाणे असले तरी तसे त्रासाचे

नव्हते. पण त्यात सगळा दिवस जाई. मला लेखन-वाचनाला वेळ मिळेल असे काम हवे होते. भंगीकाम हे अशा प्रकारचे काम होते. सकाळी दोन-तीन तास ते काम केले की सबंध दिवस मोकळा मिळे. म्हणून मी भंगीकामाची मागणी केली. दिल्लीला असताना ते काम मी केले होते. त्यानिमित्ताने भंग्यांच्या सहवासात राहाण्याची संधी मिळावी, अशीही माझी इच्छा होती. परतु सवर्णांना व बिगर आदिवासींना भंगीकाम देण्याची प्रथा नव्हती. अस्पृश्यतानिवारणाचे साधन किंवा प्रतीक म्हणून ते काम मिळविण्यासाठी कै. अप्पासाहेब पटवर्धनांना १९३२ साली तुरुंगात सत्याग्रह करावा लागला होता. माझीही त्यासाठी सत्याग्रह करायची तयारी होती. परंतु तुरुंगाधिकाऱ्यांनी त्यातून एक मधला मार्ग काढला. कुंडीकाम (भंगीकाम) करणाऱ्यांवर देखरेख करून मी तुरुंगाच्या आवारात सफाई ठेवावी आणि उरलेल्या वेळात झाडूवाल्याचे काम करावे, असे ठरले. त्याप्रमाणे मी काम करू लागलो. त्यामुळेच लेखनवाचनासाठी मला पूर्वीप्रमाणेच भरपूर वेळ मिळू लागला.

या बावीस महिन्यांच्या कारावासात स्वतंत्र, अनुवादित व संपादित अशा विविध प्रकारांचे पुष्कळ लिखाण मला करता आले. किमान दोन हजार पृष्ठे भरतील एवढे लेखन मी केले. काकासाहेबांच्या गुजराती पुस्तकांची व लेखांची मराठीत व हिंदीत भाषांतरे हा मुख्य लेखनप्रकार होता. 'सुरंगा' ही स्वतंत्र कादंबरी व काही कथाही त्यावेळी मी लिहिल्या. 'जीवनविहार' (मनोहर), 'जीवन आणि समाज' (काँटिनेंटल), 'ब्रह्मदेशचा प्रवास' (देशमुख), 'जीवनसंस्कृती' (महाराष्ट्र ग्रंथ भांडार), 'समाज आणि समाजसेवा' (कोपर्डेकर) ही काकासाहेबांची अनुवादित पुस्तके तर मी तुरुंगात असतानाच प्रसिद्ध झाली होती. 'अंतरीचे बोल' व 'सामाजिक प्रश्न' (देशमुख), 'हिंदूचे समाजकारण' (सुलभ), 'जीवनसाहित्य' (सस्ता साहित्य), 'जीवन विहार' (वोरा), 'मराठी हिंदुस्तानी कोश' (हिंदुस्तानी प्रचार सभा), वगैरे नंतर वेळोवेळी प्रसिद्ध झालेली अनेक पुस्तके मी तुरुंगात तयार केली होती.

या लिखाणातून मला तशी फारशी अर्थप्राप्ती झाली नव्हती. त्याचे कारण असे की, मी साहित्याच्या क्षेत्रात अगदी नवखा होतो. स्वतंत्र लिखाणालाच फारसा मोबदला मिळत नसे; मग भाषांतराला असा कितीसा मोबदला मिळणार? मला सरासरीने दर पानाला चार आणे मोबदला मिळाला. परंतु काकासाहेबांचे चिरंजीव प्रा. सतीश कालेलकर यांचा त्याबाबतीत काहीतरी गैरसमज झाला असावा. मराठी प्रकाशन-व्यवसाय नुकताच आधुनिक युगात प्रवेश करीत होता. मूळ लेखकाची लेखी परवानगी, त्याला द्यायची रॉयल्टी वगैरे गोष्टींविषयी अधिक गंभीरपणे विचार अद्यापि होऊ लागला नव्हता. मी

पुस्तक तयार करून देत होतो; आणि काकासाहेबांच्या विचारांविषयी वाटणाऱ्या आकर्षणामुळे प्रकाशक ते छापून काढीत होते. त्यांनाही त्या व्यवहारात फार मोठी प्राप्ती होत नव्हती. त्यांना हातातोंडाची गाठ कशी पडेल याचीच चिंता असे. त्यामुळे ते अनुवादकाला काय देणार? परंतु ऑक्सफोर्डमध्ये शिकलेल्या सतीशभाऊंना त्या परिस्थितीची कल्पना नसल्यामुळे अनुवाद प्रकाशित करून मी अमाप पैसा मिळवीत असणार आणि काकासाहेबांना त्यांच्या रॉयल्टीपासून वंचित ठेवीत असणार अशी त्यांची समजूत झाली असावी. म्हणून त्यांनी काकासाहेबांचा एक फतवा श्री. वामन चोरघडे यांच्या मार्फत तुरुंगात माझ्यापर्यंत पोचविला. त्याचा सारांश असा होता की चोरघडे, सतीश व पांडुरंग देशपांडे या तिघांच्या संमतीशिवाय कोणीही कालेलकरांच्या साहित्याचे प्रकाशन करू नये. हा फतवा वृत्तपत्रांतूनही प्रसिद्ध झाला असण्याची शक्यता आहे. वस्तुतः काही दिवसांपूर्वीच माझ्या चुलतबंधूंच्या पत्रातून काकासाहेबांनी माझ्याकडे एक निरोप पाठविला होता. त्यांच्या साहित्याच्या अनुवाद करणे हे मी माझे जीवनध्येय समजावे, अशा अर्थाचा तो निरोप होता. नवा फतवा काढताना त्यांना या निरोपाचे बहुधा विस्मरण झाले असावे; किंवा मी अनुवाद करावेत, पण ते परस्पर प्रकाशित करू नयेत, असे त्यांना वाटले असावे. खरे म्हणजे त्यावेळीं माझ्याखेरीज काकासाहेबांच्या साहित्याचे भाषांतर कुणीच करीत नव्हते. त्यामुळे तो फतवा माझ्यासाठीच होता, हे उघड होते. त्या अपमानास्पद फतव्यामुळे मी अनुवादाचे काम थांबवले. त्यानंतर पुन: कुणीच ते काम पुढे चालवले नाही. त्यांच्या या वृत्तीमुळे माझेही स्वारस्य कमी झाले; आणि सुमारे एक हजार पानांचे हिंदी भाषांतराचे हस्तलिखित त्यांच्या स्वाधीन करून मी त्या भाषांतराच्या नावाने आंघोळ केली. ते माझे हस्तलिखित बहुधा अजूनही काकासाहेबांच्या कचेरीत पडून असावे.

कच्च्या कैदेत असताना श्री. मधूकाका कुलकर्णी (श्रीविदया प्रकाशन) यांची माझ्यावर भक्ती जडली; आणि लिखाणाच्या कामात त्यांनी मला खूप मदत केली. ते त्यावेळी काँटिनेंटल प्रकाशन संस्थेत काम करीत होते. त्यामुळे काँटिनेंटलचे मालक श्री. अनंतराव कुलकर्णी यांच्याशी माझा पत्राने परिचय झाला; आणि तुरुंगातून सुटल्यावर त्या परिचयाचे स्नेहात रूपांतर झाले. श्री. रा. ज. देशमुख, श्री. दयार्णव कोपर्डेकर, श्री. गो. वा. कुलकर्णी वगैरे इतर प्रकाशकांशीही या निमित्ताने परिचय झाला. परंतु त्यांचे संबंध व्यावसायिक पातळीपर्यंतच मर्यादित राहिले. त्यांचे स्नेहात रूपांतर झाले नाही. अनंतरावां-प्रमाणे मधूकाकांचाही स्नेह काळाबरोबर वाढत गेला. माणसे जोडण्याच्या ज्या कौशल्यामुळे ते कालांतराने यशस्वी प्रकाशक बनले त्याची चुणुक त्या काळातील त्यांच्या वागणुकीतून दिसून येत होती.

तुरुंगात असताना मी उर्दू आणि बंगालीचा अधिक अभ्यास केला. पुढे आचार्य भागवत यांच्याबरोबर आंतरभारतीचे काम करताना या अभ्यासाची मला चांगली मदत झाली; आणि त्याला पुढची दिशाही मिळाली. शिक्षा झाल्यावर मी मराठी भाषी सहकाऱ्यांना सोडून मुद्दाम विजापूरच्या कन्नड-भाषी कैदयांत जाऊन राहिलो. त्यांना मी हिंदी शिकवायचे आणि त्यांच्याकडून कन्नड शिकायचे, असा कार्यक्रम सुरू झाला. सहा महिन्यांच्या अभ्यासाने मला कन्नड बोलायला व वाचायला येऊ लागले. पुढे सवय सुटल्यामुळे बोलणे विसरले पण वाचन टिकून राहिले. कालांतराने माझ्या कन्येने कन्नड (कूर्ग) भाषी तरुणाशी लग्न केल्याने कन्नडभाषी बनण्याचे माझे स्वप्न तिच्या रूपाने साकार बनले. कन्नड बराकीत माझ्यावरील प्रेमामुळे पंढरपूरचे तरुण सेवादल सैनिक श्री. राजाभाऊ हरदास हेही येऊन राहिले होते.

या कालखंडात गांधीजींना माझी आठवण असल्याचे मला समजल्याने माझे मनोधैर्य पुष्कळच वाढले. पाचगणीहून ता. १०-७-४४ रोजी माझ्या चुलत्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले होते, I remember Shripad well. He is brave and will go through the mill cheerfully. Please give him my love when you next meet him." (श्रीपादची मला चांगली आठवण आहे. तो शूर आहे; आणि सगळ्या आपत्तींना तो आनंदाने तोंड देईल. तुम्ही त्याला भेटाल तेव्हा त्याला माझे आशीर्वाद सांगा.)

स्वतःच्या शूरपणाबद्दल माझ्या मनात मुळीच भ्रम नव्हता. परंतु गांधीजी आपल्याला विसरले नाहीत, या जाणिवेने माझे मन थरारले. आनंदाने व कृतज्ञतेने भरून आले. माणसे जोडण्याचे त्यांचे कसबही लक्षात आले.

तुरुंगातले माझे बावीस महिने पुष्कळच सार्थकी लागले, असे म्हणण्यास हरकत नाही. स्वतःचा काही अपराध नसताना, केवळ संकोचाने अथवा भिडेने मला ज्या प्रेमप्रकरणात होरपळून निघावे लागले, बदनाम व्हावे लागले, ज्यामुळे माझी मनःशांती भंग पावली, ते घडले नसते तर हा कारावास खूपच सुखकर झाला असता. 'शकील' बदायूनीच्या प्रख्यात गझलमधील काही शेर मला राहून राहून आठवत होते:—

ऐ मुहब्बत, तेरे अंजाम पै रोना आया।
जाने क्यों आज तेरे नाम पै रोना आया।।
यूँ तो हर शाम उम्मीदों में गुजर जाती थी।
आज कुछ बात है जो शाम पै रोना आया।।
कभी तकदीरका मातम, कभी दुनियाका गिला।
मंजिले इश्कमे हर गाम पै रोना आया।।

जब हुआ जिक्र जमाने में मुहब्बतका शकील।
मुझको अपने दिले नादाँ पै रोना आया।।

तुरुंगातले सुरुवातीचे दिवस इतके उत्तम गेले होते की, नेहमी १०८ पौंड असणार माझे वजन ११२ पौंडापर्यंत वाढले होते. परंतु नंतर ते ९७ पौंडापर्यंत घसरले. यावरून मानसिक अस्वास्थ्यांचा शरीरावरही किती परिणाम झाला होता ते दिसून येते. तरीपण तुरुंगवासामुळे एका वेगळ्या जगाचे दर्शन घडले, मोठमोठ्या पुढाऱ्यांना जवळून परखण्याची संधी मिळाली, इतकेच नव्हे तर स्वत:चे मनही वेळोवेळी तपासता आले, हा मोठाच लाभ मी समजतो. असा लाभ वारंवार मिळत नसतो.

कफसमें रहके भी अक्सर बहार का दामन।
नजरसे चूम लिया हमने एहतरामके साथ।।

—तांबाँ

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र 2८2 / 9
मंत्रालय.



# स्वामी रामानंद तीर्थ

जन्म : ३ ऑक्टोबर १९०३, मृत्यू : २२ जानेवारी. १९७२.

**हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील थोर नेते.**

यांचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकट भगवान खेडगीकर. त्यांचे संगोपन आणि प्राथमिक शिक्षण त्यांचे चुलते श्री. रामभाऊ खेडगीकर यांनी केले. श्री. खेडगीकर हे विख्यात कामगार पुढारी आणि इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेसचे एक संस्थापक. सोलापूर येथे माध्यमिक शाळेत असतानाच राष्ट्रीय चळवळीकडे आकृष्ट. टिळक महाविदयापीठाची बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण. त्यानंतर लोकशाहीचा विकास या विषयावर प्रबंध लिहून एम. ए. ची पदवी मिळवली १९२७ साली श्री. एस्. एम्. जोशी यांचे मदतनीस म्हणून काम पाहाताना दिल्लीत थंडीच्या बाधेने आजारी. त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्यात हिपरगा येथील राष्ट्रीय शाळेचे प्राचार्य म्हणून काम पाहू लागले. त्यानंतर १९३१ साली संन्यासाश्रम ग्रहण केला.

त्यानंतर हैद्राबादच्या राजकीय आणि सामाजिक जागृतीच्या कार्यात भाग. २७ ऑक्टोबर १९३८ रोजी निझामी

राजवटीत प्रथम सत्याग्रह केला. त्यानंतर हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून नेमणूक. नंतर ते स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष झाले. यानंतर दोन तीन वेळा तुरुंगवास.

शेवटी हैद्राबादच्या स्वातंत्र्याचा लढा स्टेट काँग्रेसने पुकारला: या लढ्यात त्यांना कारावास ( १५ ऑगस्ट १९४७). या लढ्याचा शेवट पोलीस कारवाईत झाला आणि १६ सप्टेंबर १९४८ रोजी स्वामींची मुक्तता झाली. १९५२ साली स्वामीजी स्टेट काँग्रेसचे पुनरपि अध्यक्ष झाले. लोकसभेत खासदार या नात्याने त्याचे कार्य उल्लेखनीय. १९५६ साली मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर ते राजकारणातून निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या अखेरचा काळ विधायक कार्यात घालवला.

प्रस्तुत उतारा त्यांच्या हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी या आत्मपर पुस्तकातून सादर करण्यात येत आहे.

## प्रखर कसोटी

रामानंद तीर्थ

त्यानंतर निष्क्रियतेचा दीर्घ काळ लोटला. राष्ट्रीय परिषद विसर्जित केल्यामुळे त्या नावाने आम्ही काम करू शकत नव्हतो व स्टेट कॉंग्रेसला मागेच रामराम ठोकला होता. त्यामुळे आम्हाला काम करायला संघटना अशी उरलीच नव्हती. कोणत्या नात्याने आम्ही एकत्र येऊन काम करावे हेच कळेना. आमच्यासमोर फक्त वाटाघाटींचाच प्रश्न होता. आमच्यापुढे एक मोठाच पेच निर्माण झाला होता. कार्यकर्ते अधीर झाले होते. पुन्हा लढा सुरू झाला पाहिजे, असे त्यांना वाटत होते. कारण कोणत्याही स्वाभिमानी समाजाला तो एकच मानाचा मार्ग मोकळा असतो. पण मध्येच एकदम वाटाघाटीही बंद करता येण्यासारख्या नव्हत्या. त्या आणखी काही महिने तशाच चालू होत्या. 'राष्ट्रीय' या शब्दाचा अभिप्रेत अर्थ काय यावर बरीच कडक शाब्दिक चकमक उडाली. संघटनेत मुसलमानांची संख्या पुरेशी नाही, या सबबीवर सरकारने' नॅशनल या शब्दाला विरोध केला. संघटनेचे स्वरूप राष्ट्रीय आहे किंवा नाही हे संघटनेतील व्यक्तीवरून न ठरविता संघटनेच्या उद्‌दिष्टांवरून ठरविले जावे असे आम्ही सरकारला उत्तर दिले. एकूण तो प्रश्न सुटण्याची सर्व आशा संपूर्णपणे नष्ट झाल्यामुळे पुन्हा एकदा बंदी हुकमाचा भंग करण्याखेरीज अन्य मार्गच उरला नव्हता आणि म्हणून बंद पडलेल्या राष्ट्रीय परिषदेच्या कार्यकारिणीचे सदस्य महात्माजींकडून अंतिम आदेश प्राप्त करून घेण्याकरिता त्यांच्याकडे गेले. लढा अटळ होता.

१९४० च्या ऑगस्ट महिन्यात आम्ही २०-२५ जण महात्माजींच्या झोपडीत त्यांच्यासमोर मोठ्या दाटीवाटीने जाऊन बसलो. आम्ही आमचा दृष्टीकोन त्यांच्यासमोर मांडला व पुन्हा लढा चालू करण्यास त्यांची परवानगी मागितली. आमचे म्हणणे अगदी शांतपणे ऐकून घेतल्यानंतर ते काही काळ विचारमग्न झालेल दिसले. जणू काही अगदी नवा असा मार्ग, आजपर्यंत आम्ही कधीही न ऐकलेला मार्ग ते आम्हाला सांगू इच्छित होते, असे वाटले.

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अस्तित्व मान्य करून घेण्यासाठी पुन्हा लढा चालू करण्याशिवाय आमच्यापुढे दुसरा मार्ग नव्हता असे त्यानी सांगितले. तसे करण्याचा एकच मार्ग होता, तो म्हणजे आम्ही स्वतः कॉंग्रेसचे सदस्य आहोत.

अशी घोषणा करावयाची. प्रण या खेपेस लढा जरा अधिक तीव्र स्वरूपाचा राहील, तो अनिश्चित कालपर्यंत चालण्याची शक्यता आहे. त्यासाठी अधिकाधिक त्यागाची तयारी ठेवावी लागेल, कदाचित मृत्यूलाही तोंड दयावे लागेल, असे त्यांनी सांगितले. "तुमच्यापैकी काहीजणांची डोकीही जातील" असे सांगून या सर्वांसाठी आमची तयारी आहे काय? असे त्यांनी आम्हाला विचारले. ही किंमत देण्याची आमची तयारी असल्याचे आम्ही सांगितले. पण एवढ्या आश्वासनाने महात्माजींचे समाधान होणार नव्हते. त्यांच्या मनात अधिक गंभीर असा विचार घोळत असला पाहिजे. "नाही" असे म्हणून त्यांनी मान हलविली व विचारले, "आत्मबलिदानासांठी तुम्ही तयार आहात काय? तुमच्या सुटकेसाठी मी सरकारला लिहिणार नाही अथवा मध्यस्थी करणार नाही. जगाशी तुमचा संबंध पूर्णपणे तुटेल. तुमच्याजवळ इतके सामर्थ्य आहे काय?" आणि शेवटी त्यांनी हा प्रश्न विचारला, "अहिंसा हा धर्म या दृष्टीने तुमचा अहिंसेवर विश्वास आहे काय?"

महात्माजींच्या प्रश्नांच्या या भडिमाराने आम्ही जरासे चकितच झालो. सत्याग्रह मार्गावरील आमच्यासारख्या नवख्या प्रवाश्यांना त्यांनी अशा प्रश्नांनी बेजार करावे याच आम्हाला आश्चर्य वाटले. आमच्यापैकी पुष्कळांनी अहिंसा आपल्या जीवनाचा धर्म बनविण्याचा विचार केला नव्हता. हिंदुस्थानातील इतर ठिकाणच्या लोकांना ज्या कसोटचा त्यांनी लावल्या त्याच आम्हाला लावाव्यात. अशी आमच्यातर्फे आम्ही वकिली करण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थच होता. आम्ही धोरण या दृष्टीने अहिंसेचा स्वीकार केला होता. अगदी प्रामाणिकपणे हे आम्हाला कबूल करावेच लागले. अहिंसेची ही अट इतक्या कडकपणे आमच्यावर त्यांनी लादू नये, असा आमच्यांपैकी काही तरुण मंडळींनी पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहिला. पण महात्माजी काही ऐकायला तयार नव्हते. ते म्हणाले, "अहिंसा हे तत्त्व म्हणून अहिंसेचा स्वीकार करणाऱ्यांनाच बंदी हुकूम मोडण्यास मी परवानगी देईन. इतरांनी केवळ विधायक कार्यक्रम हाती घ्यावा. स्टेट काँग्रेसचे दोन विभाग राहू दया. एक विधायक कार्य करणाऱ्यांचा व दुसरा हैद्राबाद स्टेट काँग्रेस स्थापन करण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी लढा देणाऱ्यांचा". "माझा संख्येवर भर नाही" ही गोष्ट त्यांनी अगदी स्पष्ट केली. या खेपेस त्यांच्या अटी पूर्ण करणारा एक जरी सत्याग्रही निघाला तरी चालेल, असे त्यांनी सांगितले. पण वर सांगितलेल्या अटींत कोणतीही सवलत देण्यास ते तयार नव्हते. यामुळे आम्हाला वाईट वाटले. आमच्यापैकी काहीजण जरा चिडलेही. आमच्या अंत:करणातील वेदना महात्माजी जाणत होते. पण या प्रसंगी "मी सांगतो तोच मार्ग अगदी योग्य आहे." असे त्यांनी सांगितले. या प्रश्नावर

आम्ही पुन्हा विचार करून दुसऱ्या दिवशी आमचा निर्णय त्यांना कळवावा असेही त्यांनी सुचविले.

वर्ध्याच्या सर्किट हाऊससमोरील हिरवळीवर बसून आम्ही महात्माजींच्या सूचनेवर कितीतरी चर्चा केली, त्यावर आमचा किती वादविवाद झाला हे मला आता अगदी स्पष्टपणे आठवते. ज्यांना लढा नकोच होता त्यांना हायसे वाटले. पण लढा द्यावा असे वाटणाऱ्यांचा मात्र हिरमोड झाला. हा घाव माझ्या मात्र अगदी वर्मी बसला. विधायक कार्यक्रमाचा उपयोग केवळ कातडी बचावण्यासाठी, केवळ स्वतःची सुटका करून घेण्यासाठीच आहे का? असा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला. मन जरा गोंधळून गेले; जरा प्रक्षुब्ध झाले. पण प्रक्षुब्ध मन काय काम करू शकणार? मग मी जरा शांत झालो. एकटाच कोपऱ्यात जाऊन बसलो व महात्माजींच्या शब्दावर शांतपणे विचार करू लागलो. तरी तत्त्व म्हणून अहिंसेवर माझा विश्वास आहे, असे मला वाटेना. महात्माजींनी लावलेल्या कसोटीला मी उतरतो की नाही, याचा विचार करीत ती रात्र घालविली. रात्रभर मी अस्वस्थ होतो. मी काय करावे यासंबंधीचा निर्णय घेण्याइतके धैर्य व सामर्थ्य अगदी पहाटे मला लाभले. दुपारी जेव्हा आम्ही महातमजींच्या झोपडीत गेलो तेव्हा मी त्यांना सांगितले की, मी जरी पूर्ण अहिंसावादी नसलो तरी त्या तत्त्वानुसार जन्मभर वागण्याचा प्रयत्न करीन त्यांनी माझ्या दृष्टीला दृष्टी भिडविली. जणू त्या दृष्टीतून माझ्या अंतरंगात शिरून त्यांना काही शोधायचे होते. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले व हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी हुकूम मोडण्याची तुला परवानगी देईन असे त्यांनी मला सांगितले. तो वैयक्तिक स्वरूपाचा सत्याग्रह राहील असे ते म्हणाले. माझ्यानंतर आणखी ज्यांना सत्याग्रह करावा वाटेल त्यांनी प्रथम महात्माजींची भेट घ्यावी व त्यांचे समाधान करून त्यांची अनुमती घेऊनच सत्याग्रह करावा असे त्यांनी कळविले.

माझ्या आयुष्यातील हा अत्यंत मोलाचा क्षण होता. मी अगदी आदरपूर्वक महात्माजींच्या चरणाना स्पर्श करून त्यांना नमस्कार केला. त्यांनी माझ्या पाठीवर थाप मारली व आणखी एखादा आठवडाभर त्यांच्याबरोबर राहण्यास सांगितले. मी मान्य केले. निदान प्रतीकात्मक आंदोलनाला तरी मान्यता मिळाली यावर समाधान मानून माझी मित्रमंडळी सेवाग्रामहून निघाली.

सेवाग्राम येथील माझ्या आठ दिवसांच्या मुक्कामात मी महात्माजींच्या अगदी निकट संपर्कात आलो. महात्माजींचा इतका निकट सहवास मला पूर्वी कधीच लाभला नव्हता. जेव्हा त्यांना सवड मिळे त्यावेळी केव्हाही मला बोलावीत व त्यांना काय वाटे हे सांगत. सत्यासाठी प्राण अर्पण करावयास माझी तयारी आहे का, असे पुन्हा ते मला विचारीत. "केवळ बंदी हुकूमच तुम्हाला

मोडावयाचा नाही. सध्या त्यात काहीसा अधिक गंभीर असा अर्थ विहीत आहे. ती चळवळ आत्मसमर्पणाच्या वृत्तीचे प्रतीक बनली पाहिजे. मला अधिक दृढ श्रद्धेचे सत्याग्रही हवे आहेत.'' इत्यादी वाक्यांनी महात्माजी आपले अंतःकरणच जणू माझ्यापाशी मोकळे करीत आहेत, असे भासले. त्यांच्या अंतरंगातील खोलवरचे विचार ते माझ्यापुढे का व्यक्त करीत असावेत याचे मला कधीकधी आश्चर्य वाटायचे. सबंध देशासाठीच सत्याग्रहयांचे एक नवे तंत्र ते विकसित करीत होते व सत्याग्रहयांपैकी सर्वश्रेष्ठ असे विनोबा भावे यांची निवड ते पहिला सत्याग्रही म्हणून करणार होते, याची मला त्या वेळी कल्पनाही येऊ शकली नाही. एकूण आपल्या भेदक नजरेने त्यांनी माझ्या अंतरंगाचा ठाव घेतला. आपले समाधान झाल्याचे सांगून हैद्राबादला परत जाऊन बंदी हुकुमाचा भंग करण्याची त्यांनी मला परवानगी दिली. मी हैद्राबाद स्टेट काँग्रेसचा सदस्य आहे, अशी मला घोषणा करायची होती. सरकारकडे पाठविण्याच्या पत्राचा मजकूर त्यांनी मला तयार करून दिला. त्यांचे आशीर्वाद घेऊन मी सेवाग्राम सोडले.

या घटनेवर वरचेवर मी खूपच विचार केला. माझ्या ठिकाणची अर्धवट, अस्थिर, चंचल असलेली श्रद्धा महात्माजींनी दसपट दृढ केली. आपल्या कामासाठी महात्माजींना ज्यांचा उपयोग करून घ्यायचा असे त्या व्यक्तींच्या सामर्थ्याची तशीच त्यांच्या दौर्बल्याची महात्माजींना पूर्ण कल्पना असे. त्या सामर्थ्यात ते भर घालायचे आणि आवश्यक ते बल आले आहे, अशी खात्री झाल्यानंतर महात्माजी त्यांना जाऊ देत. सत्याग्रहाच्या मोहिमेवर निघणाऱ्याला लागणारे पाथेय, त्यांच्या सहवासात घालविलेल्या एका आठवड्याच्या मुक्कामात मला मिळाले.

महात्माजींकडून अंतिम आदेश घेण्यासाठी हैद्राबादहून सेवाग्रामला जाण्यापूर्वी या खेपेच्या सत्याग्रहासाठी महात्माजींच्या कसोटीला उतरणाऱ्या व्यक्तींना भेटण्याचे काम कुणाकडे तरी सोपविणे आवश्यक होते. किमान अशी पाच-सहा तरी माणसे मिळतील, याची मला खात्री होती. हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यालयात त्या वेळी श्री. जे. के. प्राणेशाचार्य काम करीत होते. त्यांनी महात्माजींना पत्र लिहून सत्याग्रह करण्याची आपली तयारी दर्शवून त्यांनी परवानगी मागितली होती. माझ्या दृष्टीसमोर काही व्यक्ती होत्या. त्यांना त्यासंबंधीची कल्पना दिल्यास ते स्वतःच त्या बाबतीत हालचाल करतील या उद्देशाने त्यांना भेटून त्यांना आवश्यक ती कल्पना दद्यावी, असे मी श्री. प्राणेशाचार्यांना सांगितले. या कामासाठी श्री. प्राणेशाचार्यांइतकी योग्य अशी दुसरी व्यक्ती मला मिळाली नसती. श्री. प्राणेशाचार्यांनी देशकार्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते आणि त्यांना स्पष्ट असा दृष्टिकोन होता. पुढील काळात हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे सरचिटणीस या नात्याने त्यांच्याशी माझा जो घनिष्ठ

संबंध आला त्या वेळी त्यांचे विचार मला उपयोगी वाटले. खरे पाहता पंधरा वर्षांहूनही अधिक काळ आम्हाला एकत्रच काम करावे लागले होते. त्या काळात श्री. प्राणेशाचार्यांमध्ये एक विशेष हातोटी मला दिसून आली. गुंतागुंतीच्या प्रश्नांची उकल करून त्यातून योग्य मार्ग ते काढीत असत. वैयक्तिक सत्याग्रहासाठी हैद्राबाद कर्नाटकात प्रचार करीत असतानाच प्राणेशाचार्यांना सरकारने अटक केली व १६ महिने तुरुंगात डांबले. त्यांच्यापूर्वी काही दिवसच मला सरकारने डांबून ठेवले होते.

या खेपेस सत्याग्रहीच्या यादया तयार करावयाच्या नव्हत्या. प्रत्येकाने महात्माजींना भेटायचे, त्यांच्या कसोटीला उतरायचे व त्यांनी परवानगी दिल्यानंतरच सत्याग्रह करावयाचा होता. असे असल्यामुळे मला पूर्वतयारी करिता अधिक काळ वाट पाहण्याची गरज नव्हती. हैद्राबाद स्टेट काँग्रेस व सरकार यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध करावयाचा होता. तो एका पुस्तिकेच्या स्वरूपात प्रसिद्ध करून ती पुस्तिका चोहोकडे पाठविण्याचे आम्ही ठरविले.. संस्थानाबाहेरील एका मुद्रणालयात ती पुस्तिका छापून घेऊन जवळजवळ लपूनछपूनच त्या छापील प्रती संस्थानात आणल्या होत्या. एवढे झाल्यावर माझा मार्ग मोकळा होता. हैंद्राबाद संस्थानचे त्या वेळचे पंतप्रधान सर अकबर हैदरी यांना मी एक पत्र लिहिले. मी सत्याग्रह करण्यास का प्रवृत्त झालो व या वेळच्या सत्याग्रहाचे स्वरूप त्याच्या प्राप्तीविषयीची स्पष्ट कल्पना इत्यादी गोष्टी मी त्या पत्रात नमूद केल्या होत्या. ते पत्र अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे व त्या पत्रास एक प्रकारचे ऐतिहासिक महत्त्वही प्राप्त झाल्यामुळे मी ते पत्र पूर्णपणेच येथे उदधृत करतो.

"शक्य तितक्या मर्यादेपर्यंत हैद्राबाद स्टेट काँग्रेसने निझाम सरकारचे समाधान करण्याचा प्रयत्न करूनही, सरकारने स्टेट काँग्रेसला दुराग्रहाने विरोध करण्याची जी भूमिका स्वीकारली आहे, त्यामुळे मला कायेदभंग करण्याखेरीज गत्यंतर उरले नाही असे मोठ्या खेदाने आपल्याला कळवावे लागत आहे. सरकारने स्टेट काँग्रेसला रीतसर कार्य करणे अगदी अशक्य करून टाकले आहे; काँग्रेसने पुढे मांडलेली प्रत्येक सूचना फेटाळून लावली; म्हणून आमच्या व्यक्तिस्वातंत्र्यात हस्तक्षेप करणाऱ्या नियमांचा व कायदयांचा भंग करण्याखेरीज आम्हाला आता अन्य मार्ग उरला नाही.

काँग्रेस सदस्यांची संख्या दहा हजाराहून अधिक आहे. आम्हाला पाठिंबा देणारे असंख्य लोक आहेत. पण ज्यांची संपूर्ण अहिंसेवर श्रद्धा आहे आणि वाटेल तो त्याग करण्याची ज्यांची तयारी आहे अशांनीच वैयक्तिक कायदेभंग करावा असे आम्ही ठरविले आहे. तसेच

कायदेभंगाची ही कृती मी व माझे दहा-पंधरा सहकारी यांच्यापुरतीच मर्यादित ठेवणे आम्हाला इष्ट वाटते. हा मार्ग आम्ही यासाठी निवडला की, आम्हाला हे दाखवायचे आहे की, कुठल्याही हिंसेपासून आम्ही अगदी अलिप्त राहिलो आहोत व निझामाच्या आश्रयाखाली जबाबदार राज्यपद्धतीसाठी आम्ही देत असलेल्या लढ्यात दुष्ट बुद्धीला थारा नाही व जाती वा धर्म इत्यादींचा विचार न करता सर्वांच्यासाठीच हा लढा आहे, हेही आम्हाला दाखवावयाचे आहे.

जर अधिकाऱ्यांनी आमच्या मताभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घातला नसता आणि आमचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शांततायुक्त मार्गाने संघटितपणे प्रयत्न करण्यावर बंदी घातली नसती, तर आज योजिलेला मार्ग आम्ही अवलंबिला नसता. सरकारच्या या धोरणावर आपण विचार करावा आणि आखलेला कार्यक्रम स्थगित करण्यास आम्हाला साहाय्य करावे असे आपणास सुचविणे म्हणजे मृगजलामागे लागण्यासारखे होणार असले, तरी आम्ही आपणास तशी नम्रपणे विनंती करू इच्छितो. या पत्राचे उत्तर एका आठवड्यात यावे अशी अपेक्षा करतो.''

मला अटक केल्यानंतर काही कार्यकर्ते महात्माजींकडे गेले व त्यांनी सत्याग्रह करण्याची परवानगी मागितली. त्यांच्यापैकी केवळ पुढील चौघानांच परवानगी मिळाली. श्री. अच्युतराव देशपांडे, श्री. हिरालाल कोटेचा, श्री. मोतीलाल मंत्री व श्री. देवराम चव्हाण. या चौघांच्या सत्याग्रहाची सूचना निजाम सरकारला देताना ही शेवटचीच सत्याग्रह करणारी तुकडी राहिली, यानंतर कोणी सत्याग्रह करणार नाही, ही गोष्ट महात्माजींनी सरकारला कळविली होती. या सत्याग्रहींना सोडले तरी त्यांनीच पुन्हा सत्याग्रह करावा अशी महात्माजींची योजना होती.

माझ्या पत्रामुळे ११ सप्टेंबर १९४० ला बरीच रात्र झाल्यानंतर मला अटक झाली. साऱ्या सुलतान बाजार भागाभोवती पोलिसांचे कडे पडले होते. मला गार झोप लागली होती. शेजारच्या घरातून पोलिस अधिकारी माझ्या निवासस्थानी शिरले, व त्यांनी मला जागे केले. मला आवश्यक ते सामान घेण्यास एका क्षणाचाही वेळ न देता त्यांनी मला एका गाडीत नेऊन बसविले व भरधाव वेगाने गाडी सोडली. ते मला कुठे घेऊन चालले होते, हे त्या वेळी तरी मला कळले नव्हते. त्या वेळी फक्त 'गीते'चीच मला साथ होती. पहाट होण्यापूर्वी किती तरी अगोदरच, चोहोकडे काळोख दाटला असतानाच त्यांनी मला एका खोलीच्या बराकीत डांबून टाकले होते. एका उंच टेकडीवर असलेल्या तुरुंगाची

ती एक हवेशीर ऐसपैस अशी कोठडी होती. या तुरुंगाच्या पायथ्याखाली भल्यामोठ्या भिंतीचे कुंपण होते. या स्थळासंबंधी मला काहीच माहिती नसल्यामुळे मी आपला नुसती कल्पनाच करीत राहिलो. मला निजामाबादच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते व सार्वजनिक सुरक्षा कायदद्याखाली मला अटक करण्यात आली होती, हे मला नंतर कळले.

### स्थानबद्धतेतील अध्यात्मसाधना

निजामाबाद तुरुंगात मला नेऊन ठेवल्यापासून बाहेरच्या घडामोडींचा विचार करणेच मी सोडून दिले. आता दोन तीन वर्षे किंवा त्याहूनही अधिक काळ तुरुंगात राहावे लागणार, हे मी जाणले होते. म्हणून बाहेर काय चालले आहे, याची चिंता करून काहीच लाभ नव्हता. मला कुठे ठेवण्यात आले आहे, हे कुणालाच माहीत नव्हते. त्यामुळे बराच काळ कुणाशी पत्रव्यवहारही होण्या-सारखा नव्हता. एका दृष्टीने मला हा बरच वाटला. दैनंदिन उपयोगाच्या वस्तू मला देण्यात आल्या होत्या. पण त्याची कुणालाच कल्पना नव्हती. कोणीही कैदी त्या आवारात येऊ शकत नव्हता. जेलर, वार्डर आणि रात्रीचा पहारेकरी यांखेरीज इतर कुणाही व्यक्तीचा चेहरा मला दिसत नसे.

एका टेकडीवर खूप उंचीवर माझी खोली होती. विपुल नैसर्गिक सौंदर्याने नटलेला तो परिसर होता. खारी, साप, निरनिराळ्या प्रकारचे विंचू हे माझ्या खोलीत नेहमी यायचे. विविध रंगाची फुलपाखरे आणि विविध तऱ्हांचे पक्षी हे माझे तेथील सोबती बनले. माझ्याविषयी एक प्रकारची आत्मीयता त्यांना वाटत असावी असे दिसले. नेहमी दूर राहूनच ते आपल्या सुंदर सहवासाचा आनंद मला देत. अशा शुद्ध सात्त्विक वातावरणात साहजिक मी आध्यात्मिक क्षेत्राकडे वळलो. दररोज केवळ एक वेळ भाजी व भात एवढा सैपाक करण्यात व अर्धा तास टकळीवर सूत कातण्यात जेवढा वेळ जाईल, तेवढा वेळ वजा जाता मी सर्व वेळ चिंतनात, ध्यानमग्न अवस्थेत घालवू लागलो. या दृष्टीने पंधरा महिन्यांचे माझे तेथील वास्तव्य मला अत्यंत लाभदायी ठरले. तो सर्व काळ उपवास, प्रार्थना, ध्यान इत्यादी साधनेत उपयुक्ततेत घालविला, येथेच मी उपनिषदे वाचली. या स्थानबद्धतेच्या काळातच उर्दू शिकायला आरंभ केला. 'अलीफ बे' पासून आरंभ करून मी सात क्रमिक पुस्तके संपविली. बाहेरच्या जगाचा जवळ जवळ मला विसरच पडला होता.

मला अटक झाल्यानंतर महात्माजींनी केवळ सहाच जणांना सत्याग्रह करायला परवानगी दिली होती. इतरांनी विधायक कार्यापुरतेच आपले क्षेत्र मर्यादित ठेवावे, असा सल्ला त्यांनी दिला होता. पण या आदेशांचे काटेकोरपणे पालन झाल्यासारखे दिसले नाही. त्याचे कारण एवढेच की, विधायक कार्यात

कार्यकर्त्यांना तितकीशी गोडी वाटत नव्हती. तशात श्री. गोविंदभाई श्रॉफ व त्यांच्यासारख्या निवडक प्रमुख कॉंग्रेसवाल्यांना अटक करण्यात आली होती व जवळजवळ पावणेदोन वर्षे त्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. तिन्ही प्रांतांतील जे लोक बाहेर उरले होते, त्यांनी पुन्हा प्रांतिक परिषदांच्या नावाखाली थोडेबहुत काम करण्यास आरंभ केला. एकूण हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अस्तित्व केवळ प्रतीकात्मक स्वरूपात टिकून राहिले होते. तिचे सहा-सात सदस्य होते, ते सारे स्थानबद्ध होते.

माझ्या कारावासाचा प्रदीर्घ काळ मी आध्यात्मिक साधनेत घालविला. मी स्वतःवरच प्रयोग चालविले व अंतर्यामातून मला स्फूर्ती मिळत गेली. मी विचारमग्न होऊन स्वतःशीच बोलत असे. कधी कधी गुरू व शिष्य या दोन्ही भूमिका मीच वठवीत असे. अशा रीतीने मी स्वतःच पाठ घेत होतो. त्याचा परिणाम असा झाला की, माझ्यात काही मूलभूत प्रवृत्तीचे संवर्धन मी करू शकलो. तेव्हापासून त्या प्रवृत्ती माझ्या आचरणात मार्गदर्शक ठरल्या आहेत.

स्टेट कॉंग्रेसचे नाममात्र अस्तित्व टिकविण्यात फारसे औचित्य नाही अशा प्रकारे असंबद्ध, काहीतरी बोलले जात होते. बेकायेशीर अवस्थेत कुठलीही संस्था उभी करता येणे शक्य नसते. आपली शक्ती संघटित करण्यासाठी लोकांना एखादे खुले व्यासपीठ लागते. यापुढे स्टेट कॉंग्रेसच्या पुनरुज्जीवनाचा विचार सोडून दयावा असे सर्रास बोलले जाऊ लागले. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या अस्तित्वाचा हक्क प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने सुरू केलेल्या प्रतीकात्मक सत्याग्रहाचे महत्त्व बाहेर असणाऱ्यांपैकी कुणालाही वाटत नव्हते असे दिसले. थोडासा वैचारिक गोंधळ निर्माण झाल्यासारखे वाटले. सारांश, मी किंवा कोणीही काही करू शकत नव्हतो. मध्यंतरीच्या काळात महाराष्ट्र परिषदेचे सुद्धा पुनरुज्जीवन झाले होते. मधून मधून काही लोक आपला आवाज उठवून स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्याची मागणी करीत होते.

देशात वैयक्तिक सत्याग्रहाला अगदी जोर चढला होता. कॉंग्रेसने युद्धाला असलेला आपला विरोध स्पष्ट केला होता. हिंदुस्थानचा स्वाभिमान डिवचला गेला होता. स्वातंत्र्य आंदोलनाला जोर चढत असता आम्हाला बराच काळपर्यंत स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. देशातील राजकीय परिस्थिती थोडीशी निवळल्यानंतर हैद्राबाद सरकारने एकदम मला व इतर सत्याग्रहींना सोडण्याचा हुकूम काढला. पण औरंगाबादच्या कार्यकर्त्यांना त्यांनी सोडले नाही. कारण त्यांना त्या वेळच्या सरकारी आदेशपत्रात त्यांना भयंकर स्वरूपाचे कम्युनिस्ट असे म्हटले होते.

माझ्या सुटकेनंतर लगेच मी महात्माजींना पत्र लिहिले. पुढे मी कोणता

मार्ग अवलंबावा याविषयी त्यांचे मार्गदर्शन मला हवे होते. महात्माजी बार्डोली येथे होते. एका आठवडयानंतर सेवाग्राम येथे मला त्यांनी भेटायला बोलाविले. आमच्या प्रश्नाविषयी आम्ही चर्चा केली. कोणत्याही प्रांतिक परिषदेत न जाता सुटकेनंतर असलेल्या स्थितीतच मी राहावे असा त्यांनी मला सल्ला दिला. कदाचित एका नव्या तंत्राचा ते अवलंब करू इच्छीत होते. मी घाई करू नये असे त्यांनी मला सांगितले. एका राष्ट्रव्यापी आंदोलनाचा ते विचार करीत असल्याचे त्यांच्या बोलण्यावरून सूचित होत होते. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी ती शेवटची उडी ठरणार होती. पण त्यांनी त्या वेळी आपल्या मनाचा थांग लागू दिला नाही. पण त्यांच्या मनात खूप जोराची खळबळ माजल्यासारखी मला दिसली. एखादा ज्वालामुखी जसा आतल्या आत धुमसत असतो तसे ते सारखे बोलत होते. त्यांनी मला एक निवेदन तयार करायला सांगितले. त्यात त्यांनी थोडीशी दुरुस्ती करून 'हरिजन'च्या पुढील अंकात ते आपल्या टीपेसह प्रकाशित केले. त्या टीपेत हैद्राबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविण्याची सरकारला त्यांनी विनंती केली होती. त्यांच्या मते आहे त्या परिस्थितीत सरकारने किमान स्वरूपात करण्या-सारखी गोष्टी हीच होती. मी दिलेले निवेदन पुढीलप्रमाणे होते.

> "२ मार्च १९४० ला ज्या हैद्राबाद स्टेट काँग्रेसवर सरकारने बंदी घातली होती, त्या स्टेट काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी सप्टेंबर १९४० मध्ये महात्माजींच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक सत्याग्रह केला. निझाम सरकारने १६ डिसेंबर १९४१ ला त्यांची बिनशर्त मुक्तता केली. सुटल्याबरोबर मी एक निवेदन प्रगट केले. त्यात मी असे म्हटले होते की, सरकारने जरी आम्हाला मुक्त केले आहे तरी उपरिनिर्दिष्ट बंदी मात्र उठविली नाही. म्हणून बंदी हुकूम उठविण्याची आमची मागणी मान्य होईपर्यंत सत्याग्रह चालू ठेवणे आम्हाला अत्यंत अपरिहार्य व अवश्य होते. आमच्या सुटकेनंतर आम्ही महात्माजींशी विचारविनिमय केला. हैद्राबाद संस्थानातील सद्यःस्थितीची आम्ही त्यांना स्पष्ट कल्पना दिली व आमचा दृष्टिकोणही त्यांच्यापुढे मांडला. युद्धाची आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी आम्हाला या घटकेस पुन्हा सत्याग्रह करण्यापासून परावृत्त करून आमची शक्ती पूर्णपणे विधायक कार्यक्रमावर केंद्रित करण्याचा सल्ला दिला आहे. विधायक कार्यक्रमाचे महत्त्व व त्या कार्यक्रमाचे सामर्थ्य आम्हाला अधिकाधिक पटू लागले आहे. म्हणून आम्ही महात्माजींच्या सल्ल्यानुसार अगदी प्रामाणिकपणे वागावयाचे ठरविले आहे. त्यासाठी आम्ही सर्व लोकांना व विशेषतः कार्यकर्त्यांना असे आवाहन करतो की, त्यांनी आता आपली सारी शक्ती विधायक कार्याला लावावी. या आणीबाणीच्या प्रसंगी निझाम सरकारला

पेचात टाकत आहोत असेसुद्धा दिसता कामा नये. तथापि अशा तऱ्हेने सत्याग्रह स्थगित करणे म्हणजे आमच्या ध्येयात काही बदल झाला आहे असे नव्हे. निझाम व आसफजाही घराण्याच्या छत्राखाली जबाबदार राज्यपद्धतीची प्राप्ती हे जे आमचे ध्येय ते आहेच."

निझाम सरकारने बंदीहुकूम परत घ्यावा असे मला फार वाटते. निझामच्या छत्राखाली जबाबदार राज्यपद्धतीसाठी लोकांनी घटनात्मक चळवळ चालविली तर ती रोखून ठेवण्याची इच्छा सरकार करू शकत नाही. जर हैद्राबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविली नाही तर नुकतीच सत्याग्रहींची जी सुटका केली त्या सुटकेत काही अर्थ नाही."

सेवाग्राम ८-२-४२ एम्. के. जी.

पण सरकारने प्रतिसाद दिला नाही. मी महात्माजींना पुन्हा भेटलो. आता घाई करण्याची आवश्यकता नाही असे त्यानी मला सांगितले. अखिल भारतीय स्वरूपाच्या आंदोलनाला आता आरंभ व्हावयाचा आहे. हैद्राबादचा लढा त्या मोठ्या आंदोलनाचाच एक भाग बनेल. हे सारे बोलणे १९४२ च्या मे महिन्यात झाले. म्हणजे ४२ चे 'भारत छोडो' आंदोलन सुरु होण्याच्या काही महिनेच पूर्वी.

## 'भारत छोडो' आंदोलन

मला आठ महिन्यांची जी मोकळीक मिळाली ती हैद्राबादच्या दृष्टीने फारशी महत्वाची नव्हती. १९४२ च्या मे महिन्यात मी जेव्हा सेवाग्रामला गेलो त्या वेळी मी महात्माजींना एक विनंती केली. मराठवाड्याच्या सहकाऱ्यांवर कोणताही रीतसर खटला न भरता सरकारने त्यांना जे बेमुदत स्थानबद्ध करून ठेवले होते त्याच्या निषेधार्थ प्रायोपवेशन करण्यासाठी महात्माजींची मी परवानगी मागितली. तेव्हा मी उपवासासारखा कोणताही मार्ग अवलंबू नये असा त्यांनी मला सल्ला दिला; व पर्यायाने त्यांनी असे सुचविले की, राष्ट्रविमोचना-साठी एका अंतिम लढ्याचे आवाहन ते देत असल्यामुळे स्थानबद्ध असलेल्यांच्या सुटकेची आशा आता सोडून दिले पाहिजे. पहाटे त्यांच्याबरोबर मी फिरायला जात असे. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर जे एक विलक्षण तेज झळकत असे. तसे तेज मी पूर्वी कधी पाहिले नव्हते. ते सारखे बोलत असत अन् विलक्षण आवेशाने बोलत असत. या खेपेस सेवाग्रामला माझा दहा दिवस मुक्काम होता. बहुतेक सर्व काँग्रेस नेते सेवाग्रामला येऊन महात्माजींचा सल्ला घेऊन गेले होते. काँग्रेस कार्यकारिणीची एक बैठकही त्या वर्षी तेथेच भरली होती. तेथेच हैद्राबादचा संपूर्ण प्रश्न महात्माजींनी स्वतःच कार्यकारिणीसमोर मांडला. मलाही थोडा वेळ त्यासंबंधी बोलण्याची परवानगी दिली होती. ते झाल्यानंतर मी हैद्राबादला परत जावे व मुंबईला भरणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनाच्या

वेळी मी उपस्थित राहावे असे मला सांगण्यात आले.

या घटकेपर्यंत संस्थानातील प्रजाजनांनी आपापल्या संस्थानातील सरंजामशाही एकतंत्री राजवटीविरुद्ध स्वतंत्रपणे लढे दिले होते. जबाबदार राज्यपद्धतीच्या प्राप्तीसाठीच वेळोवेळी, त्या त्या ठिकाणच्या लोकांनी हे लढे दिले होते हे जरी खरे असले तरी त्या चळवळीला एक सुसंघटित रूप देऊन दीर्घकाळपर्यंत ती चळवळ टिकविण्याचे एकसूत्री प्रयत्न झाले नव्हते. अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषद ही तशी सुसंघटित अशी संस्था नव्हती. परिषदेच्या घटकात अदयापि सुसंलग्नता दृढता आली नव्हती. ज्या वेळी एखादया विषयाला महत्त्व प्राप्त होई, त्या विषयावर लोकांचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न ही परिषद करीत असे. काही संस्थानांत स्वातंत्र्य आंदोलनाला चांगलाच जोर चढला होता; तर काही संस्थानात ती चळवळ सहज दडपून टाकण्यात आली होती. अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषद म्हणजे भारतातील विविध भागातील कार्यकर्त्यांना एकत्र येण्याचे ठिकाण एवढेच तिचे स्वरूप बनले होते. वस्तुत: हिंदी संस्थानी प्रजेविषयी कळकळ असणाऱ्या काही काँग्रेसवादयांचीच ही कल्पना होती. याबाबतीत डॉ. पट्टाभि सीतारामय्या व इतर काहीजणांनी विशेष लक्ष घातले होते. तरीसुद्धा या परिषदेला काही प्रातिनिधिक स्वरूप असे नव्हते. किंवा तिचे कार्य चालण्यासाठी एखादी घटनाही त्या परिषदेला नव्हती. १९३९ मध्ये लुधियाना येथे या परिषदेचे एक अधिवेशन भरले होते. त्यानंतर १९४२ पूर्वी पुन्हा कधी त्या परिषदेचे अधिवेशन भरल्याचे मला आठवत नाही.

पण कसे का होईना, हिंदी संस्थानांतून आपापल्या प्रजापरिषदेमार्फत व संस्थानी प्रजासंघटनेमार्फत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्यामध्ये एक प्रकारचा भातृभाव निर्माण झाला होता.पुढे पंडित जवाहरलाल नेहरू त्या परिषदेचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली हळूहळू ती एक प्रभावी संघटना बनत चालली होती. त्या संस्थेत अधिक चैतन्य येत चालले होते. त्या संघटनेची काही थोडे सदस्य असलेली एक स्थायी समिती होती. त्या स्थायी समितीच्या मधूनमधून बैठकी होत असत व ती चळवळीचे मार्गदर्शन करीत असे. पण साऱ्या देशाच्या स्वातंत्र्यआंदोलनावरच सगळ्यांचे लक्ष केंद्रित झाल्यामुळे संस्थानी प्रजेच्या चळवळीचे महत्त्व कमी झाले. तथापि हा दुजाभाव आता नाहीसा करून देशाच्या स्वातंत्र्यासाठी आता एकच आंदोलन असावे वाटू लागले. एकाच भूमीवरील लोकांमध्ये असलेल्या या कृत्रिम सीमा नष्ट करण्यात आल्या. संस्थानी प्रजाजनांनाही आता देशव्यापी चळवळीच्या कक्षेत आणण्याची महात्माजींची इच्छा होती. म्हणून अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या

बैठकीबरोबरच अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेच्या स्थायी समितीची बैठकही बोलावण्याचे ठरले.

घटनात्मक दृष्टीने हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे सर्व अधिकार श्री. नानल यांच्याकडेच होते तरी श्री. नानल राजकीय क्षेत्रातून जवळजवळ निवृत्त झाल्यासारखेच होते. मुंबईला झालेल्या बैठकीस मी काही सहकाऱ्यांबरोबर गेलो होतो. तेथील चर्चेत आम्ही भाग घेतला. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीपूर्वी एक दिवस अगोदर महात्माजी व पंडित नेहरुंनी आमच्या पुढे भाषण केले. 'भारत छोडो' चळवळीचा गर्भितार्थ महात्माजींनी आम्हाला समजावून सांगितला व भारतीय या नात्याने संस्थानी प्रजाजनांनीसुद्दा त्या चळवळीत भाग घेऊन त्याग व हालअपेष्टांचा वाटा उचलायचा आहे असे त्यांनी सांगितले. यापुढे आता एकच चळवळ राहाणार. या त्यांच्या घोषणनेने आम्हाला आनंद झाला. आमची मने उल्हसित झाली. आतापर्यंत संस्थानिकांच्या कृपाछत्राखाली जबाबदार राज्यपद्धती प्राप्त करून घेणे एवढाच आमच्या समोर प्रश्न होता. पण आता यापुढे भारतीय स्वातंत्र्य हे ध्येय व त्याबरोबर भारतीय संस्थानांनी स्वतंत्र भारतात विलीन व्हावे ही मागणी. आम्हाला अशी घोषणा करावयाची होती की, आम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत आणि म्हणून संस्थानिकांशी आमची राजनिष्ठा नाही. एवढेच नव्हे तर शेवटी आपणसुद्धा ब्रिटिश राजाशी आपली निष्ठा सोडून स्वतंत्र भारताशी एकनिष्ठ आहोत अशी प्रतिज्ञा संस्थानिकांकडून घ्यावयाची होती. सर्वसाधारणपणे या मुख्य धोरणानुसार राष्ट्रव्यापी चळवळीशी आमची चळवळ संलग्न होणार होती. राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप दुसऱ्या दिवशीच ठरणार होते. आमच्यापुढे मांडलेल्या सूचनेस आमच्यापैकी प्रत्येकाने मान्यता दिली. तथापि काहीजणांनी थोडीशी कुरबूर सुरू केली. संस्थानी प्रजाजनांना आपापला मार्ग आखण्यास मुभा असावी असे त्यांना वाटत होते. पण त्यांचा आवाज अगदीच क्षीण होता. त्यांचे म्हणणे कोणी ऐकून घेण्यासारखे नव्हते. वर सुचविलेल्या मार्गानुसार स्थायी समितीसमोर मांडावयाचा एक ठराव लिहून काढण्यासाठी एक समिती नियुक्त झाली. त्या समितीने केलेला ठरावाचा आराखडा पंडित नेहरुंना पसंत पडला नाही. त्यांनी स्वतःच एक मसुदा तयार केला व महात्माजींच्या अनुमतीसाठी त्यांच्याकडे पाठविला. त्या ठरावात कुठे कुठे थोडासा बदल हवा आहे असे महात्माजींना वाटले म्हणून आपण रात्री त्यात योग्य तो बदल करून दुसऱ्या दिवशी तो समितीला देऊ असे त्यांनी समितीला सांगितले.

अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक ठरल्याप्रमाणे भरली व 'भारत छोडो' हा ठराव पास करून ती संपलीही. अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेच्या स्थायी समितीने पास करावयाच्या ठरावात योग्य तो बदल

करण्यास महात्माजींना वेळच मिळाला नव्हता. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीच्या गडबडीत महात्माजींना व इतर पुढाऱ्यांनाही थोडीसुद्धा उसंत मिळाली नाही. ठरावाचा मसुदा जवळजवळ तयार आहे असे महात्माजींनी आमच्यापैकी एकाजणाला सांगितले होते. पण पुढाऱ्यांना लवकरच अटक करणार आहेत या अफवा आमच्या कानावर येत होत्याच. अपरात्रीच महात्माजींच्याकडे जाऊन ठरावाचा अंतिम मसुदा घेऊन यावा अशी आमच्यापैकी काहीजणांची इच्छा होती. पण तसे करणे अनावश्यक वाटले. महात्माजींनी जे आदल्या दिवशी सांगितले होते, त्या अनुरोधाने बैठकीस आलेल्यांपैकी प्रत्येकाने पुढील कृतीच्या कार्यक्रमाची रूपरेखा आखावयाची होती. इतर संस्थानांतील प्रतिनिधी कार्यक्रम आखण्याच्या कामात मग्न झाले होते. पण हैद्राबाद संस्थानातील जनता चळवळ येथे दुबळी ठरली. एक निश्चित कार्यक्रम आखण्याची मी खूप धडपड केली; पण तेथे आलेल्या इतर मंडळींना त्या कामात काहीच गोडी नसल्यामुळे मी कोणताच कार्यक्रम आखू शकलो नाही. या क्रांतीच्या कक्षेतून हैद्राबाद वगळले जाणार की काय अशी मला शंका वाटू लागली. ते श्रेयस्कर होईल काय? हैद्राबादच्या जनतेत काही सामर्थ्य नाहीच का? मी स्वतंत्र भारताचा नागरिक आहे, असे म्हणणारा एकही मनुष्य हैद्राबादेत नाही का? हैद्राबाद संस्थानातील लोकांची चळवळ इतकी दुबळी व शरणागतीची आहे का? अशा तऱ्हेच्या अनेक प्रश्नांनी माझ्या मनात प्रचंड काहूर माजले. सरतेशेवटी आठ ऑगस्टला दुपारी मी महात्माजींना एक पत्र लिहिले; व त्यात हैद्राबाद संस्थानात असलेल्या परस्परविरोधी विचारप्रवाहांमुळे हैद्राबाद एकमुखी निर्णय घेऊन काही करू शकेल असे वाटत नसल्याचे त्यांना कळविले. काही व्यक्तींनाच त्या क्रांतीत इतरांच्या बरोबर भाग घेऊन आपल्या शक्तीनुसार काम करण्यास ते परवानगी देतील काय? असाही प्रश्न मला भेडसावू लागला; पण एखादया संस्थानातून तीन जरी व्यक्ती निघाल्या; तरी त्या या क्रांतीत सहभागी होऊ शकतात असे महात्माजींनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनातील संस्मरणीय भाषणात निःसंदिग्धपणे स्पष्ट केले होते.

मला केव्हाही अटक होण्याची शक्यता होती. त्या आधीच या चळवळीचे स्वरूप हैद्राबादेतील प्रमुख काँग्रेसजनांना कळवावे, या उद्देशाने मी एक निवेदन तयार केले. त्यात या चळवळीचे ध्येय व स्वरूप स्पष्ट केले होते. ते निवेदन किमान ५० काँग्रेसजनांकडे पाठविले. त्या लोकांनी मनात आणले असते, तर ते चळवळ सुरू करू शकले असते.

दुसऱ्या दिवशी सकाळी काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांना अटक करून

कुठेतरी अज्ञात स्थळी पाठविण्यात आले. कित्येक प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांनाही अटक झाली होती व इतरांनाही आपापल्या प्रांतात जाताच अटक केली जाईल, असे बोलले जात होते. संस्थानातील लोकानाही तेथे गेल्यानंतर अटक करण्यात येणार होती. आमच्यापैकी कुणालाही इतरांचे काय झाले हे कळले नाही. दूरध्वनीवरून संपर्क साधणे शक्य नव्हते. सरतेशेवटी ज्याना अद्यापि अटक झाली नव्हती, अशा अनेकांनी गुप्तपणे फोर्ट विभागात जमावे व स्थायी समितीची औपचारिक बैठक पुन्हा भरूच न शकल्यामुळे त्या समितीपुढे येणारा ठराव तेथे पास करून घ्यावा अशी सूचना आली. अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे सरचिटणीस श्री. बलवंतराय मेहता तेथे आमची वाट पाहात बसले होते. आम्ही दहाबारा लोक जमलो होतो. निरनिराळ्या संस्थानातील प्रजापरिषदेतर्फे संस्थानिकांकडे पाठवावयाच्या पत्राचा मसुदा तयार करून अर्ध्या तासात आम्ही तेथून पांगलो. आमच्यापैकी कुणालाही अटक होण्यापूर्वी संस्थानिकाना ती पत्रे सुरक्षितपणे पोचतील अशी व्यवस्था आम्ही केली पाहिजे असे आमच्यात ठरले होते.

मी त्याच दिवशी रात्री सोलापूरला गेलो व अज्ञातपणे एका लहानशा बोळातील एका खोलीत उतरलो. माझ्या पाचसहा मित्रांखेरीज ते ठिकाण इतरांना ठाऊक नव्हते. श्री. राघवेंद्र राव दिवाण हे माझे बरोबर सोलापूरला होते. मुंबईला घेतलेल्या निर्णयाची हैद्राबादेतील आमच्या सहकाऱ्यांना पूर्ण माहिती करून देण्याच्या उद्देशाने मी त्यांना हैद्राबादला पाठवून दिले. त्यांच्या बरोबर निजामाकडे पाठविण्याच्या पत्राचा मसुदासुद्धा सहकाऱ्यांच्या अवलोकनार्थ पाठवून दिला. हैद्राबाद संस्थानच्या हद्दीत शिरल्याबरोर मला अटक होणार याची मला खात्री होती, म्हणून माझ्या सहकाऱ्यांनी चळवळीचे पूर्ण स्वरूप समजून घ्यावे अशी माझी इच्छा होती. मी काही प्रमुख पुढाऱ्यांना मला भेटण्यासाठी सोलापूरला येण्याविषयीही लिहिले होते. पण सोलापूरला येऊन मला भेटावेसे कुणालाच वाटले नाही. तथापि पत्राचा मसुदा त्यांना पोहोचला होता. श्री. दिवाण सोलापूरला परतले. ते पत्र निझामाकडे पाठविणे कितपत इष्ट होईल. यावर विचार करून पुढचा निर्णय घ्यावा लागेल, असे हैद्राबादच्या नेत्यांना वाटत होते, असे दिवाणांनी येऊन सांगितले. हे मोठे चमत्कारिक वाटले. मध्यंतरीच्या काळात श्री. नानल परभणीहून हैद्राबादला आले होते. या प्रश्नावर काळजीपूर्वक विचार करून त्यांनी मला सांगितले की, ते पत्र पाठविलेच पाहिजे व चळवळीला आरंभ झालाच पाहिजे. आपली प्रकृती दिवसेंदिवस झपाट्याने बिघडत चालल्यामुळे आपण स्वतः चळवळीत भाग घेण्यास असमर्थ असल्याचे त्यांनी मला कळविले. अध्यक्ष या नात्याने असलेले

आपले सर्व अधिकार त्यांनी लेखी माझ्याकडे सोपविले. अशा रीतीने हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या वतीने कृती करण्यास मला अधिकारपत्र दिले. असे अधिकार पत्र प्राप्त करून मी सकाळी मद्रास मेलने सोलापूरहून हैद्राबादला निघालो. माझ्याबरोबर पण अज्ञातपणे माझे तीन साथीदारही होते. त्यांच्यापैकी प्रत्येकाजवळ निझामाला लिहिलेल्या, माझी सही असलेल्या, पत्राची प्रत होती. ही दक्षता घेणे आवश्यकच होते, कारण आमच्या प्रत्येकाला अटक होण्याचा धोका होताच. गुलबर्ग्याच्या स्टेशनवर गाडी येताच प्लॅटफॉर्मच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत सशस्त्र पोलीस उभे असलेले मी पाहिले. पण त्यांनी मला अटक केली नाही. मी वाडीला गाडी बदलली, तरी मला अटक झाली नाही. संध्याकाळी पाचला मी नामपल्लीवर उतरून स्टेशनबाहेर येऊन टांगा ठरवीत असताना तेथे डेप्युटी पोलीस कमिशनर माझ्याजवळ आला व मला अटक केली आहे, असे त्याने सांगितले. पोलीस मला घेऊन जात असलेले माझ्या तीन साथीदारांनी पाहिले. माझे पत्र इच्छित स्थळी पोहोचविले जाईल या विचाराने मला आनंद झाला. मी सही केलेले पत्र मी हैद्राबादला पोहोचताक्षणीच निझामाकडे पाठविले गेले पाहिजे होते; पण ते होऊ शकले नाही. मी एक प्रत डॉ. मेलकोटे यांना देण्यासाठी श्री. दिवाणांकडे दिली होती. मला हैद्राबादला पोहोचताच जर अटक झाली, तर त्यावर आपली सही करून डॉ. मेलकोटे ते पत्र निझामाकडे पाठविण्यास तयार होते.

निझामाला लिहिलेले पत्र पुढीलप्रमाणे होते.

> 'हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या वतीने मी हे पत्र आपणास सादर करू इच्छितो. संस्थानी प्रजाजनांची, वर्ण-जात पंथनिरपेक्ष अशी सेवा करण्याच्या ध्येयाने बद्ध.झालेली स्टेट काँग्रेस ही एक राष्ट्रीय संस्था आहे. आपण या पत्राचा शांतपणे विचार करावा अशी अत्यंत नम्रपणे मी विनंती करू इच्छितो.
>
> हैद्राबाद सरकारने, का कुणास ठाऊक, संस्थानात नागरी स्वातंत्र्याची गळचेपी केली व काही काळापूर्वी स्टेट काँग्रेस ही संस्था बेकायदेशीर आहे असे जाहीर' केले. त्यामुळे नैसर्गिक सार्वजनिक जीवनाच्या निकोप व सुसंगत विकासावर विघातक असा परिणाम झाला. स्टेट काँग्रेसविरुद्ध असलेले आक्षेप सिद्धही झाले नाहीत किंवा मान्य झाले नाहीत. स्टेट काँग्रेसने आपल्यावरील बंदी हुकूम अमान्य करून त्या संस्थेला चिरडून टाकण्याच्या प्रयत्नावर मात करून अस्तित्व टिकविले आहे. अस्तित्व टिकविण्याच्या दिव्यातून जाताना पुष्कळजण सोडून गेले. त्यामुळे या पत्राची किंवा काँग्रेसकडून यापुढे होणाऱ्या कृतीची जबाबदारी

जुन्या सदस्यावर पडत नाही ही गोष्ट नमूद केली पाहिजे.

माननीय निजामाच्या छत्राखाली संपूर्ण जबाबदार राज्यपद्धतीची मागणी व नागरी स्वांतत्र्याचे रक्षण या दोन गोष्टीवर कुठल्याही बिकट परिस्थितीतसुद्धा आम्ही भर दिला एवढेच नव्हे तर स्टेट कॉंग्रेसच्या कार्यक्रमात त्या गोष्टींना अग्रस्थान देण्यात आले आहे. त्यामुळे आता त्याची वरचेवर उल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

भारताचे प्रादेशिक व राजकीय ऐक्य अबाधित राखण्यावर स्टेट कॉंग्रेसचा भर आहे. आपला साम्राज्यवाद टिकविण्यासाठी ब्रिटनने जरी हिंदुस्थानात विविध राज्यप्रणाली निर्माण केल्या व टिकविल्या असल्या तरी एकच राज्यपद्धतीखाली सर्वभाग आणून हिंदुस्थानचा समान विकास होणेच भारताला हितावह आहे, असे स्टेट कॉंग्रेस मानते. तसेच भारतातील प्रातांतील सरकारांनी व संस्थानातील सरकारांनी स्वतंत्र भारताच्या संघराज्याशी एकनिष्ठ राहिले पाहिजे असे स्टेट कॉंग्रेस मानते.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील पेचप्रसंगाने हेच सिद्ध झाले आहे की, भारताच्या निरनिराळ्या भागाच्या संरक्षणाकरिता व विकासाकरिता भारताचे ऐक्य व अखंडत्व टिकविणे नितांत आवश्यक आहे. सध्या देशापुढे निर्माण झालेल्या गंभीर समस्यांना तोंड देण्यासाठी देशात असलेल्या अर्थोत्पादनाच्या सर्व साधनांचा पूर्णपणे उपयोग करून घेणे अपरिहार्य बनले आहे.

सध्या अस्तित्वात असलेले बेजबाबदार एकसत्ताक मध्ययुगीन सरकार सर्व मानवी अथवा भौतिक साधनांचा आपल्या देशाच्या संरक्षणासाठी उपयोग करू शकत नाही. हे सरकार जाऊन त्या सरकारच्या जागी लोकशाही प्रातिनिधिक सरकार अस्तित्वात यायला हवे या सर्व गोष्टींचा व हितांचा काळजीपूर्वक विचार करून स्टेट कॉंग्रेस या निर्णयाला आली आहे की, स्टेट कॉंग्रेसने घेतलेली भूमिका ही अगदी संयुक्तिक, अखंडनीय अशी आहे. म्हणून स्टेट कॉंग्रेस पुढील मागण्या आग्रहाने मांडू इच्छिते.

१. माननीय निझामाच्या छत्राखाली लगेच संपूर्ण जबाबदार राज्यपद्धती प्रदान करणे व त्याचबरोबर स्वतंत्र भारताच्या संघराज्यात दाखल होण्यास तयार असल्याची घोषणा करणे.

२. संपूर्ण नागरी स्वातंत्र्य देऊन हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविणे.

३. सर्व राजकीय बंदयांची मुक्तता करणे.

अगदी शांततेने हाताळले जाण्यासारखे हे प्रश्न असताही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना नुकतीच घिसडघाईने विनाकारण अटक करून, गुंतागुंतीचे करून टाकण्यात आलेले आहेत ही खरोखर मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांना काल रेल्वे प्लॅटफॉर्मवर गाडीतून उतरत असतानाच अटक केल्याने परिस्थिती अधिक चिघळली. स्वामी रामानंद या मागण्या आपणास सादर करण्यासाठी आपणाकडेच जाणार होते. असो. वरील मागण्या मान्य करून हा प्रश्न शांततेने निकालात काढावा असे स्टेट काँग्रेस अत्यंत नम्रतापूर्वक निवेदन करू इच्छिते.

आपल्या राष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी सरकार शहाणपणाने व दूरदृष्टीने वागेल असा स्टेट काँग्रेसला मनोमन विश्वास वाटतो.

अशा रीतीने हैद्राबाद काँग्रेसच्या वतीने अधिकृतपणे चळवळीची दिशा दाखविण्यात आली, पण सर्वसामान्य लोकांना व विशेषत: कार्यकर्त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता होती. परिणामकारक असे मार्गदर्शन होऊ शकले नाही. बहुतेक कार्यकर्त्यांनी स्वत:च पुढाकर घेऊन वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवरून आपलाच असा एक कार्यक्रम आखला. हिंदी संस्थानातील प्रजेच्या संदर्भात 'भारत छोडो' या चळवळीचे महत्त्व कोणते यासंबंधी गोंधळ माजल्यासारखा दिसत होता. प्रतिगामी व्यक्तींनी एक चमत्कारिक विचार प्रसृत केला होता आणि एक विपर्यस्त (विपरीत) सूत्र त्यांनी तयार केले होते. 'भारत छोडो' याचा अर्थ जर देशाचे स्वातंत्र्य असा आहे, तर मग हैद्राबादच्या स्वातंत्र्याची मागणीही का करू नये? आणि मग रेसिडेंटला हैदराबाद सोडून जाण्यास का सांगू नये? याचाच अर्थ असा की मग हैद्राबाद हे ब्रिटिश अधिसत्तेपासूनही मुक्त होईल. काही प्रमुख काँग्रेसजनांनीसुद्धा या कल्पनेचे स्वागत केल्यासारखे दिसले. 'आझाद हैद्राबाद म्हणजे सार्वभौम स्वतंत्र राज्य' या कल्पनेचाच तो विस्तार होता. याचा अर्थ भारतीय ऐक्याचा भंग व साऱ्या राष्ट्रीयत्वाचाच चक्काचुराडा करणे, असा होता. हा साम्राज्यवादी डाव होता. आमची चळवळ हाणून पाडण्यास सिद्ध झालेल्या हैद्राबाद सरकारने शक्य तितक्या लोकांना या जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न केला. 'भारत छोडो' ही घोषणा इत्तिहादुल मुसलमीन नेत्याना आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी फारच चांगली वाटली. भारत छोडोवाले लोक जर 'आझाद हैद्राबाद'च्या कल्पनेला मान्यता देत असतील तर 'भारत छोडो' चळवळीला ते पाठिंबा देणार होते. हैद्राबाद स्टेटच्या वतीने डॉ. मेलकोटे यांनी १८ ऑगस्ट १९४२ ला निजामाला

लिहिलेल्या पत्रात मांडलेल्या मूलभूत कल्पनेशी संपूर्णपणे विसंगत व विरोधी ही भूमिका होती. त्या पत्रात तर स्पष्टपणे असे म्हटले होते की, हैद्राबादने स्वतंत्र भारताशी आपली निष्ठा राखली पाहिजे, आणि भारताचा अविभाज्य घटक बनले पाहिजे.

चुकीच्या कल्पना प्रसारित केल्या जात होत्या असे कार्यकर्त्यांना वाटत होते. या कल्पनेमागील खोडसाळपणा ज्याना समजला त्यांनी 'आझाद हैद्राबाद'ला विरोध केला. त्यांनी स्पष्ट विचारांनी योग्य दिशेने चळवळ चालविली. तरीसुद्धा चुकीच्या मार्गदर्शनामुळे सत्याग्रहींच्या काही तुकडयानी 'हैद्राबाद छोडो' अशा घोषणासुद्धा दिल्या. स्टेट काँग्रेसचे सदस्य म्हणून पुन्हा एकदा जवळ जवळ ४०० लोकांना अटक करण्यात आली. संस्थानभर तरूण कार्यकर्त्यांनी स्वतःच पुढाकार घेतला व विखुरलेली शक्ती संघटित करून आगेकूच केली. पंडित नरेंद्रजींकडे निदान १०० सत्याग्रही पाठविण्याचे काम सोपविले होते. ती कामगिरी त्यांनी पार पाडली, पण काही महिन्यांच्या अवधीत सत्याग्रहींची संख्या संपुष्टात आली आणि देशातील इतर भागाप्रमाणे येथेही चळवळ थंडावली.

मी चंचलगुडा कारागृहाच्या चार भिंतींआड बंदिस्त असताना, हैद्राबाद जनता आंदोलन राष्ट्रीय आंदोलनाच्या मार्गाने चालवून साऱ्या भारताशी मनाने व कृतीने ऐक्य साधण्याचा मार्ग घालून देणाऱ्या युवकांचा मला मोठा अभिमान वाटत होता.



★.★ ★★★★★★★★★

# दत्तात्रेय महादेव सुतार

जन्म ८ ऑगस्ट १९०८

जन्म वेणगाव ता. कर्जत जि. रायगड येथे. प्राथमिक शिक्षण चौक येथे नंतर माध्यमिक शिक्षण ठाणे येथे. शाळेत असताना सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याच्या कार्यक्रमात भाग घेतला.

१९२९ साली मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर गांधींच्यां चळवळीत भाग घेतला. १९३० साली सहा महिने कारावास. १९४० साली ठाणे जिल्हा कॉंग्रेस कमिटीचा चिटणीस. त्याच वर्षी युद्धप्रयत्नाला जाहीर विरोध केल्याबद्दल अटक आणि कारावास. १९४२ साली भूमिगत कार्य व नंतर अटक. विसापूर येथे कारावास. १९३१ साली नवाकाळ पत्राचे वार्ताहर. १९३४ साली कॉंग्रेस सोशालिस्ट पार्टीचे चिटणीस. १९४० मध्ये युद्धविरोधी पत्रक काढल्याबद्दल अटक आणि कारावास.

१९४५ साली धनुर्धारी साप्ताहिकात प्रवेश त्यानंतर केळूस्कर यांच्याबरोबर सहसंपादक १९५९ पर्यंत. १९४७ साली ठाणे जिल्हयात लोकमित्र हे साप्ताहिक चालवले. १९६१ ते ७०

नशाबंदी मंडळाच्या कल्याणयात्रा या मासिकाचे कार्यकारी संपादक. १९६८ साली पत्रकार संघाचे अध्यक्ष. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही हिरिरीने भाग घेतला. हा उतारा त्यांच्या आत्मवृत्तातून घेतला आहे.

## कॉंग्रेसचा अखेरचा लढा

द. म. सुतार

अधिवेशनाचा मंडप पावसाचे दिवस लक्षात घेऊन भक्कम ताडपत्र्यांचा उभारला होता. एकूण थाट मुंबईच्या पाहुण्यांचे स्वागत करण्याच्या प्रथेस अनुकूल असाच होता. अधिवेशनात होणारे ठराव हे फार महत्त्वाचे ठरणार याची जाणीव सर्वच कॉंग्रेस कार्यकर्त्यांना असल्याने त्यांची फार मोठी उपस्थिती अधिवशेनात होती. ऑगस्ट १९४२ सात, आठ, नऊ या तारखांना हे अधिवेशन भरणार असल्याचे जाहीर झाले होते. रोज ठाण्याहून मुंबईला यावयाचे व परत जावयाचे हा त्रास वाचविण्यासाठी या अधिवेशनाच्या काळात मी दादरला शिवाजी पार्क भागात दीक्षित निवासामध्ये राहणारे शा. पु. कान्हेरे यांच्याकडे रहाण्यास गेलो. बाळासाहेब दांडेकर आणि कान्हेरे यांचा दाट स्नेह असल्याने दांडेकरांनीच तसे सुचविले होते. माझा कान्हेरे व त्यांच्या सौभाग्यवती शशीताई यांच्याशी थोडाफार परिचय होताच, पण या मुक्कामाने कान्हेरे कुटुंबियांशी झालेली माझी जवळीक पुढे सारखी वाढतच गेली. पुण्याहून या अधिवेशनासाठी अ.लेल्या इंदू चिपळूणकर या तेथून जवळच रहात होत्या. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत ८ ऑगस्टच्या संध्याकाळी महात्मा गांधी बोलावयास उठले तेव्हा हजारो प्रतिनिधीचा व प्रेक्षकांचा समुदाय जिवाचे कान करून त्यांचे भाषण ऐकत होता. आपल्या भाषणात म. गांधींनी सरकारबरोबर होणारा हा अखेरचा लढा असल्याने 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी यापुढे वागावयाचे आहे असे सांगितले. तसेच या लढ्यात कोणी कोणाचा पुढारी नाही व कोणी कोणाचा अनुयायी नाही; सत्य आणि अहिंसा यांचे कसोशीने पालन करावयाचे असल्याची जाणीव त्यांनी करून दिली. लढ्याचे स्वरूप काय राहील याची योजना, कल्पना त्यांच्या भाषणात नव्हती. याचे एक कारण आपणाला व्हॉइसरॉयना भेटण्याची संधी मिळेल असे त्यांना मनोमन वाटत होते. म. गांधींनी जेवढे सत्याग्रह केले, उपोषणे केली त्याच्या अगोदर आपला लढा, आपले उपोषण कशासाठी आहे याची पूर्ण कल्पना ते सरकारला वाटाघाटींच्याद्वारे करून देत. प्रत्यक्ष भेट न झाल्यास पत्ररूपाने ते आपला मनोदय विरुद्ध पक्षाला कळवीत. दांडी मार्चच्या वेळेचे व्हॉइसरॉयना त्यांनी लिहिलेले पत्र ऐतिहासिक

ठरले. या खेपेस गांधींनी तशी इच्छा व्यक्त केली असताही व्हॉइसरॉयचे त्यांना वाटाघाटीसाठी बोलावणे येणार नव्हते. 'भारत-छोडो' म्हणून गोवालिया टँकच्या मैदानात मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून महात्मा गांधींनी ब्रिटिश सत्तेला 'चले जाव' असा आदेश दिला. 'छोडो भारत' ही आंदोलनाची घोषणा ठरणार होती. इंग्रजीत 'क्विट इंडिया' हा समर्पक शब्द योजण्यात आला होता. त्या दिवशी गांधीजींचे प्रभावी भाषण झाले व शेवटी हा माझा शेवटचा लढा आहे, असे त्यांनी गंभीरपणे सांगितले. या खेपेच्या गांधींच्या भाषणाचा विशेष म्हणजे ते काँग्रेसच्या अधिवेशनात झालेले असले तरी साऱ्या भारतवासीयांना उद्देशून ते बोलत होते. तुम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक आहात, कोणाचे गुलाम नाही, असे स्पष्टपणे त्यांनी सांगताच सारे श्रोते प्रभावित झाले. अधिवेशन संपताच आता पुढे काय, लढ्याचे स्वरूप कोणते असेल याचा विचार करीतच सारेजण घरोघर गेले. मी दादरच्या निवासस्थानी आलो.

दुसरा दिवस म्हणजेच ९ ऑगस्टची तारीख उजाडली ती अगदी अनपेक्षित, क्षुब्ध वातावरणात. वर्तमानपत्रात ८ तारखेच्या अधिवेशनाची कसलीच वार्ता नव्हती. मी दादर स्टेशनकडे जाण्यास निघालो तर रस्त्यात ठिकठिकाणी कडेकोट पोलिस बंदोबस्त व माणसांचे घोळके आपआपसात चर्चा करताना दिसत होते. म. गांधी व वर्किंग कमिटीचे सारे सदस्य यांना अटक करून अज्ञात स्थळी नेले असल्याची वार्ता कर्णोपकर्णी समजली. गोवालिया टँक मैदानावरील काँग्रेस अधिवेशनाच्या मंडपाला पोलिसांनी गराडा घातला असून तिकडे कोणालाही जाऊ देत नसल्याचे कळले. त्या गर्दीत ओळखीचे समाजवादी कार्यकर्ते भेटले. त्यांनी विजय नगर समोरील इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील खोलीत चलण्यास सांगितले. तेथे पाहिले तर दाटीवाटीने पंधरावीस तरुण समाजवादी कार्यकर्ते बसले होते. बंडू गोरे त्यात प्रमुख होता. ती जागाही त्याच्या वडील भावाची होती. 'करेंगे या मरेंगे' आंदोलन पुढे कसे चालवावयाचे याचे बेत चालले होते. कोणी कोठे जाऊन रहावयाचे, भूमिगत अवस्थेत एकमेकांशी संपर्क कसा साधावयाचा याबद्दल बोलणी चालली होती. काँग्रेसचे पहिल्या व दुसऱ्या श्रेणीचे सर्व कार्यकर्ते, श्रेष्ठ सदस्य सारे गजाआड झाले होते. सरकारने फार मोठे जाळे देशभर टाकून त्यात असंख्य कार्यकर्ते भारत संरक्षण कायद्याखाली पकडले होते. वृत्तपत्रांवर 'छोडो भारत' आंदोलनाबाबत, तसेच अटक केलेल्या पुढाऱ्यांबाबत कसलेही वृत्त छापण्याची बंदी घातली. खुद्द मुंबईत त्या दिवशी बंद व हरताळ सर्वत्र पाळण्यात आला. सभा मिरवणुकांना बंदी असली तरी उत्स्फूर्तपणे लोक जमाव करून हिंडत फिरत होते. सामुहिक कार्यक्रमांचे वृत्त जागोजागी खडूने लिहून ठेवण्यात येत होते. आमच्या त्या सभेनंतर मी खाली रस्त्यावर आलो. सैरभैर मानसिक अवस्थेत मी हिंडत फिरत

असता पालघरचे आमदार बाबूराव दांडेकर भेटले. त्यांनी त्यांच्याबरोबर मला जेवणासाठी त्यांचे मेहुणे, अत्तराचे प्रसिद्ध व्यापारी कृ. ह. ढमढेरे यांच्या घरी नेले. तेथे गेल्यावर आता पुढे काय याबाबत बोलणी झाली. म. गांधींनी देशापुढे अधिकृत असा कार्यक्रम ठेवला नव्हता. खरे तर त्यांनी तसा कार्यक्रम लोकांपुढे मांडण्याची संधीच सरकारने हिरावून घेतली होती. ऑ. इं. काँग्रेस कमिटीच्या ऐतिहासिक ठरलेल्या भाषणात आपला पुढील कार्यक्रम ठरविण्याअगोदर आपण व्हॉइसरॉयना भेटणार, पत्र लिहिणार असल्याचे ते म्हणाले होते. पण आपल्याला अटक होणार याबाबत त्यांनाही काही जाणीव असल्याची शक्यता त्यांच्या भाषणातील, आता यापुढे तुमचे तुम्हीच पुढारी, हा लढा अखेरचा आहे, अशा वाक्यांवरून दिसून येत होती. निश्चित कार्यक्रमाच्या अभावी अहिंसेचे पथ्य पाळून सरकारला विविध मार्गांनी सतावणे, राज्यकारभार चालविणे अशक्य करून टाकणे, हाच कार्यक्रम कार्यकर्त्यांनी अनुसरला.

## काही काळ भूमिगत

मी ठाण्यास जाऊ नये, तेथे गेल्यास निश्चित अटक होईल, असे मला सांगण्यात आले. मी दुसऱ्या दिवशी पुण्यास जाण्याचा निर्णय घेतला. पण त्याच्या अगोदर पोलीसांनी सहजासहजी ओळखू नये म्हणून अंगावरील खादीच्या कपड्यांऐवजी साधे गिरणीच्या कापडाचे तयार कपडे खरेदी केले. टोपीही बदलली. त्या दिवशी सायंकाळी शिवाजीपार्क मैदानावर कस्तुरबा गांधींचे व्याख्यान होणार असे जाहीर झाल्याने तेथे लोक गोळा होऊ लागले. पण पोलिसांनी त्या जागेला वेढा घातला. मैदानाकडे येणाऱ्या लोकांच्या दिशेने ते अश्रूधूराची नळकांडी फेकू लागले. पोलिस आणि जनता यांत संघर्षच पेटला होता. अश्रूधूर डोळ्यात जाऊन डोळे चुरचुरू लागले. दीक्षित निवासाच्या गच्चीवरून तो रोमांचकारी भीषण प्रसंग मी पाहिला. कान्हेरे यांच्या घरी सांगून मी पुण्यास गेलो. कार्यकर्त्यांना भेटणे, त्यांच्या घरी राहणे धोक्याचे होते. प्रथम थोडा वेळ एस्. पी. कॉलेजसोबरील उरसळ बिल्डींगमध्ये तेव्हा तेथे रहात असलेले भ. दि. गांगल यांच्या बिऱ्हाडी गेलो. त्या घराच्या गच्चीवरून सभोवार पहात असता टिळक रोडवरून फिरत असलेले लष्करी रणगाडे दृष्टीस पडले. मुंबईप्रमाणेच पुण्यात दंगली झाल्या. लष्करी पोलिस सर्वत्र हिंडत असताना दिसत होते. त्या दिवशी रात्री टिळकरोडवरील बादशाही बोर्डींगमध्ये राहिलो. मी पुण्यास गेल्यावर तेथे मधून मधून जेवणास जात असे; तसेच माझे स्नेही मोहन गोगटे तेथे रहात. त्यामुळे व्यवस्थापक मला ओळखत. मी तेथे एक रात्र राहिलो. दरम्यान भूमिगत असलेल्या शिरूभाऊंशी संपर्क साधला. त्यांनी फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील जैन बोर्डींगमध्ये राहण्याची सोय केली. तेथून काही

निरोप घेऊन मुंबईस आलो. मुंबईस मी दादरला कान्हेरे यांचेकडेच तेव्हा रहात होतो. बाळासाहेब कान्हेरे हे इंग्लंडून इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगची परीक्षा ऊत्तीर्ण होऊन ग्रीव्हज कॉम्पटनमध्ये नोकरी करीत. ते राष्ट्रीय बाण्याचे, खादी वापरणारे, त्यांच्या पत्नीही राष्ट्रीय वृत्तीच्या असल्याने मला त्यांनी उदार आश्रय दिला होता.याच काळात पुन्हा पुण्यास गेलो असता माझा मुक्काम तेव्हा पुण्यास डेक्कन जिमखान्यावर अरुणोदय बंगल्यात रहात असलेले ठाण्याचे राजाभाऊ भावे यांच्याकडे होता. त्यावेळी ठिकठिकाणचे कार्यकर्ते गुप्त पत्रके काढीत. त्यात मी सहाय्य करावे असा शिरूभाऊंकडून मला निरोप आला होता. मी पुण्यात रहात असताना ठाण्यात मी उघडपणे वावरू शकेन का? अशी चौकशी ठाण्याशी संपर्क साधून केली तेव्हा मी ठाण्यास येऊ नये असे मला सांगण्यात आले. याच काळात पालघरला मोठी मिरवणूक निघून त्या मिरवणुकीवर पोलिसांनी हल्ला केल्यामुळे गोळीबारात कार्यकर्त्यांचा मृत्यु व अनेक जखमी झाले होते. सातपाटी या समाजवादी कार्यकर्त्यांच्या गावी पोलिसांनी बरीच दहशत बसविली होती. तेथील कार्यकर्ते धर्माजी पांडुरंग तांडेल हे मुंबईस माहिम भागात रहात. त्यांनी मला सातपाटीला जाऊन तेथील कार्यकर्त्यास भेटण्यास सांगितले. मी प्रथम पालघरला बाबूराव दांडेकरांच्या स्वराज्य भुवनात गेलो. तेथे सौ. रमाबाई दांडेकर भेटल्या. त्या ठाणे जिल्हा भगिनी मंडळाच्या कॉंग्रेस कार्यकर्त्या होत्या. पालघरच्या गोळीबाराने व नंतरच्या पोलिसांच्या दंडेलीने तेथे किती घबराट पसरली होती हे पाहिले. तेथून मी टांग्यातून सातपाटीला गेलो. तेथेही पोलिसी दहशतीचेच वातावरण होते. हा सारा व इतरत्र होणारा प्रवास खादीचे कपडे अंगावर नसताना होत असे. मी वक्ता या नात्याने कधीच कोठे गेलो नसल्याने माझ्या जिल्ह्यातही परिचितां-शिवाय मला कोणी ओळखत नसे त्यामुळे हिंडण्याफिरण्यात धोका फार नव्हता. ठाण्याचे मारुति कुमार हे तरुण कार्यकर्ते धाडसी स्वभावाचे व कसल्याही प्रसंगी माघार घेणारे नसल्याने भूमिगत राहून घातपाताच्या कामात गुंतलेले असत.

### रस्त्यात अटक नि स्थानबद्ध

भूमिगत अवस्थेत सर्व अनावश्यक भेटी वर्ज्य असत. अगदी खात्रीचे घर असल्याखेरीज, तसेच ज्या घरचे लोक पोलिसांची अवकृपा झाली तरी बेफिकीर असत अशांच्या घरी मुक्काम करता येत असे. एकदा पुण्याहून मुंबईस काही निरोप घेऊन आल्यावर मधला दुपारचा वेळ कोठे घालवावयाचा हा प्रश्न पडला. त्यावेळी फोर्ट भागातील एका सिनेमा थिएटरात सिनेमा पाहण्यात तो वेळ घालवला. माझ्या काही दिवसांच्या अनुभवाने एक गोष्ट माझ्या लक्षात आली

की, भूमिगत कार्यकर्त्यांच्या कामाला आवश्यक असणारा बेडरपणा, धडाडी नि मुख्य म्हणजे सत्या-सत्याचा पदोपदी विचार न करणे हे मला जमणारे नव्हते. पुण्यात मी राजाभाऊ भावे यांच्याकडे कधी कधी रहायचो. त्यांच्याकडे रेडिओ होता. मी त्या रेडिओवरून जपानी बातम्या ऐकाव्या व त्या लिहून दयाव्या, असे मला सुचविण्यात आले. एकदा मला एका भूमिगत नेत्याने सांगितले की, शंकरराव देव यांनी तुरुंगातून असा निरोप पाठविला आहे की, पोलिसांना बेसावध गाठून त्यांच्या बंदुका ताब्यात घ्याव्या. माझा या बातमीवर विश्वासच बसेना. कारण शंकरराव देव असे काही सांगतील हे मला पटलेच नव्हते. एक दिवशी मला निरोप आला की, ठाण्याजवळच्या कळवा या गावी गोपाळ पाटील व सौ. कावेरी पाटील यांच्या घरावर पोलिसांनी धाड घालून बरीच मारहाण केली. याबाबत त्यांच्या घरच्या माणसाना भेटणे आवश्यक होते. हे निरोप कोणा मध्यस्थामार्फत मारुती कुमार पाठवित असे. तो निधडया छातीचा भूमिगत होता. त्याने मला एकदा जुहू ताराच्या समुद्र किनाऱ्यावर भरदुपारी भेटीस बोलाविले. मी तेथे गेलो. ती वेळ सागराच्या ओहोटीची होती. आजूबाजूला पाहिले. तो कोठेच दिसत नव्हता. जरा दूरवर एका खडकावर बसून तो मला खुणावत होता. मी त्याच्याजवळ गेल्यावर तुला येथे दिवसा एकटे यायला पोलिसांची भीती कशी वाटत नाही, असे विचारताच तो म्हणाला अरे, हा सारा कोळीवाडा आपला आहे. पोलिस इकडे येऊच शकणार नाही आणि आलाच तर, असे म्हणून त्याने सदऱ्याआड लपविलेला चाकू काढून दाखवला. मी क्षणभर अवाक् झालो. माझा कोणत्याही लहान मोठ्या प्राणघातक शस्त्राशी संबंध आला नव्हता. अशा या मारुती कुमारने मला ठाण्यास बोलाविले. मी रात्री कोळी-वाडयाच्या एका टोकाला असलेल्या त्याच्या गुप्त निवासस्थानी गेलो. तेथे काही बोलणे झाल्यावर मध्य रात्रीनंतर ठाण्याच्या स्टेशन जवळच्या पुलाखालून गावाकडे आलो. सरळ स्टेशनच्या पुलावरून येणे धोक्याचे असल्याने रुळावर उभ्या असलेल्या मालगाडयांच्या आडून स्टेशन रस्त्यावरील हेगडे यांच्या घरी आलो. ठाण्यात त्या वेळी अनेक विदयार्थी व विदयार्थीनी भूमिगतांशी संबंध ठेऊन त्यांचे निरोप संबंधीत कार्यकर्त्यास पोहचवीत व प्रसंगी घातपाताला आवश्यक अशा मालाची नेआण करीत. कुसुम हेगडे (आता कुसुम कुलकर्णी) अशा अनेकांपैकी एक होती. त्या घरी रात्री काही तास झोप घेऊन भल्या पहाटेसच मी परत स्टेशनकडे चाललो होतो. सरळ मोठ्या रस्त्याने न जाता गल्लीबोळातून जाताना मला ओळखणाऱ्या एका साध्या वेषातील पोलिसाने हटकले व क्षणार्धात पकडले आणि रस्त्यावरून तसेच चालत ठाण्याच्या फौजदार कचेरीत नेले. ही फौजदार कचेरी त्या काळात फार कुप्रसिद्ध होती. पोलिस अधिकारी हॉल हा संशयित मुलाना पकडून येथे आणून मारपीट करी असा

त्याचा लौकिक होता. मुलांचा संबंध गुप्त पत्रके वाटण्यातच जास्त असे. या गुप्त पत्रकांचा छडा लावण्याचा पोलीस नेहमी प्रयत्न करीत. या पोलिस अधिकाऱ्याचा लौकिक माझ्या कानावर आला होता. आता मला त्याच्यापुढे उभे केल्यावर मी कोठे रहातो, कोठून आलो, काय काय केले याबाबत तो प्रश्नांची सरबत्ती करील तेव्हा काय काय उत्तरे दयावयाची याच विचारात मी गढून गेलो होतो. मी ठाण्यास आलो तो दादरहून कान्हेरे यांच्या घरून आलो. पण ते निवासाचे ठिकाण पोलिसाना सांगण्याची माझी इच्छा नव्हती. मला पकडल्याचे पोलिसानी वरच्या अधिकाऱ्याला कळविले. मला कचेरीत नेल्याबरोबर खुर्चीवर बसण्यास सांगितले. बरेचसे पोलिस मला ओळखणारेच होते. थोडयाच वेळात त्यांनी बाहेरून कॉफी मागविली. पुढे काय घडणार या विचारमग्न मानसिक अवस्थेत मी ती कॉफी घेतली. इतक्यात फौजदार कचेरीसमोर एक टांगा आला. त्या टांग्यात पोलिस पहाऱ्यात मला बसण्यास सांगितले नि सरळ ठाणे तुरुंगात आणून पोहोचविले. मी मोठयाच संकटातून सुटलो. पोलीस अधिकाऱ्यांनी प्रश्न विचारून मला सतावले असते तर माझी पंचाईतच होती. आधीच तोतरा आणि थोडासा बहिरा, प्रश्नोत्तराचे स्थळ पोलिस कचेरी, गुप्त पत्रकाशी माझा संबंध असल्याची त्यांची माहिती, अशा परिस्थितीत प्रश्नोत्तरे झाली असती तर फार कठीण परिस्थिती होती. पण हे सारे टळून मी पूर्वपरिचित अशा ठाणे तुरुंगात तिसऱ्यांदा प्रवेश केला होता. मागील दोन्ही खेपात तुरुंगात येण्याअगोदर कोर्टापुढे उभे रहाण्याचे सव्यापसव्य करावे लागले होते. या खेपेस सरळ भारत संरक्षण कायदयान्वये 'स्थानबद्ध' म्हणून तुरुंगात आणून ठेवले होते.

तीस सालची अटक पहाटे ३ वाजता झाली; चाळीस साली खोलीची झडती सकाळ उजाडता नि लगेच अटकही झाली. इजाबिजा आणि तिजा म्हणतात त्याप्रमाणे ही तिसरी अटकही सूर्यादयापूर्वीच झाली. या योगायोगाचे मला नवल वाटले. पहिल्या व दुसऱ्या अटकेनंतर निश्चित कालावधीची शिक्षा असल्याने सुटका कधी होणार हेही निश्चित होते. आता या खेपेस मात्र सुटका कधी होणार हे निश्चितपणे सांगता येत नव्हते. स्थानबद्धतेत अनिश्चितता होती. या खेपेस शिक्षा नसल्याने कामाचा प्रश्न नव्हता. पण त्याचबरोबर कैदयाला कपडे पुरविण्याची सरकारची जबाबदारीही संपली होती. स्थानबद्धांना घरचे कपडे, घरचे अन्न, पुस्तके-लेखनसामुग्री घरी पाठविण्याची पत्रे व मुलाखती यात सवलती हे सारे होते तरी स्थानबद्धात 'अ' वर्ग निर्माण करून या राजबंदयातही सरकारने आपल्या परीने श्रेष्ठ-कनिष्ठ वर्ग निर्माण केले होते. सर्वसाधारण वर्गात असलेल्या अनेकांनी आपआपले उत्पन्नाचे आकडे व समाजातील स्थान याचे आधारावर 'अ' वर्गात बदली करून घेतली तरी असेही अनेक निघाले की, ते सामान्य राजबंदयांबरोबरच राहिले. वैयक्तिक

सत्याग्रहाच्या वेळी कारागृहातील वातावरण उच्च दर्जाच्या कैद्यांचे होते. त्यावेळी सत्याग्रहींची निवड होत असल्याने कमीत कमी काही पात्रता अंगी असलेले कार्यकर्ते तुरुंगात आले होते. बेचाळीसच्या आंदोलनाचे तसे नव्हते. स्वातंत्र्येच्छू नागरिकांचा तो एक कुंभमेळाच होता. सोळा-सतरा वर्षांच्या तरुणांपासून तो सत्तरी ओलांडलेल्या वृद्धांनी आपणहून प्राणार्पण करण्यापासून तो कारागृहप्रवेशापर्यंत सर्वस्वत्यागाची तयारी दाखविली होती. तुरुंगात सर्व थरातील लोकांचे अजब मिश्रण दिसत होते. या स्वातंत्र्यप्राप्तीच्या अखेरच्या संघर्षात घातपाती भूमिगत चळवळीचा जोरदार प्रभावी प्रवाह मिसळल्यामुळे सरकार चिडल्यासारखे झाले होते. या भूमिगत हिंसक प्रवाहाचा छडा लावण्यासाठी आपले काही गुप्तहेर देशभक्तीचा बुरखा पांघरून स्थानबद्ध राजबंदीत सामील झाले होते. तुरुंगात त्यांचा पूर्वइतिहास माहित असलेल्यांनी त्यांना लगेच ओळखले नि परिणामी त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला. काही कच्च्या दिलाच्या कैद्यांनी माफीपत्रेही सरकारला लिहून दिली. या त्यांच्या माफीपत्राची माहिती तुरुंगाच्या कचेरीत काम करणाऱ्यांकडून आम्हाला कळत असे. अशांची फारच केविलवाणी अवस्था तुरुंगातून बाहेर पडेपर्यंत तर होईच, पण बाहेर पडल्यावरही त्यांच्या माफीपत्राची वार्ता लोकांत पसरे व त्यांना काही काळ तरी नामुष्कीचे जीवन पत्करावे लागे. असे प्रकार फार थोडे, अपवादात्मक असे घडत. ठाणे तुरुंगात असे एक-दोन प्रकार घडले. सुखासीन जीवनात वाढलेल्यांना तुरुंगातील वातावरणाशी मिळते जुळते घेणे फारच कठीण जाई व असे लोकही माफीपत्राद्वारे आपली सुटका करून घेत. पण हे सारे प्रकार एकूण स्वातंत्र्य सैनिकांच्या संख्येच्या मानाने नगण्य होते. पण ते घडले हे नमूद करणे आवश्यक आहे.

### स्थानबद्धांच्या सहवासात

ठाणे तुरुंगात काही स्थानबद्ध स्वतःच्या पैशाने दूध घेत असत. राजबंद्याना हे दूध वाटण्याचे काम वॉर्डर करी; पण त्या वॉर्डरवर दूध घेणाऱ्यांच्या वतीने देखरेख करण्याचे काम माझ्यावर सोपविण्यात आले होते. दूध आणून देणारा भव्या दुधाचा हंडा तुरुंगाच्या आवारात देई. ते दूध तुरुंगाच्या रुग्णालयातील चुलीवर प्रथम तापवून घ्यावे लागे. ते तापत असताना त्यावर साय ठेवू नये म्हणून दूध उकळेपर्यंत ते सारखे मोठ्या चमच्याने ढवळीत असे. नंतर दूध घेण्याऱ्यांना ते वाटले जाई. या कामामुळे मला अनेक स्थानबद्धांना रोजच सकाळी भेटावे लागत असे. ठाणे तुरुंगातून पुढे वरळी तुरुंगात जाईपर्यंत हे काम मी केले. ठाणे तुरुंगात नव्याने परिचय झालेले अनेक कार्यकर्ते होते. बदलापूरचे डॉ. लक्ष्मणराव चाफेकर हे त्यांपैकी एक होत. ते बदलापूरजवळच्या पाटगाव या आदिवासी भागात शिक्षणाचे काम करीत होते. त्यांना व

त्यांच्याबरोबर दोन-तीन आदिवासींना स्थानबद्ध करण्यात आले होते. घाटकोपरचे जोशी म्हणून एक कार्यकर्ते पकडले गेले होते. तुरुंगात स्थानबद्धांना स्वतःचा सैंपाक करण्यासाठी शेगडया बाळगण्याची परवानगी होती. कांहींनी या सवलतीचा लाभ घेऊन शेगडया मागविल्या होत्या. जोशींची शेगडी ही त्यांच्या एकटयापुरती न रहाता ती दंहापंधरा लोकांना आपलीच शेगडी वाटे व जोशीही त्याबद्दल कधी कुरकुर करीत नसत. सामुदायिक जीवनाचा एक पाठच या स्थानबद्धांना मिळत होता. ठाणे म्युनिसिपालिटीने 'छोडो भारत' ठरावाचे अभिनंदन करून त्या ठरावाला पाठिंबा दिला होता. ज्या सभासदांनी या ठरावाला पाठिंबा दिला त्यांना अटक झाली. ठाणे टेंभी नाक्यावरील शेट मोहन विश्राम हे त्यांपैकी एक होते. त्यांना त्यांच्या घरून रोज जेवणाचा डबा येत असे. तो डबा त्यांच्या एकटयापुरताच नसून अनेकांना त्यातून घरगुती जेवण मिळत असे. बोर्डीचे कॉंग्रेसनिष्ठ झाईवाला यांच्या पत्नी तेव्हा ठाण्याच्या सरकारी शाळेत शिक्षिका होत्या. स्थानबद्ध झाईवालांसाठी जेवणाचा डबा त्या पाठवीत. त्या डब्यातून वि. ना. खानोलकरांना व मला खादयपदार्थ मिळत. या घरून अन्न मिळण्याच्या सवलतीच्या दुरुपयोगाचाही एक प्रकार तुरुंगाधिकाऱ्यांनी उघडकीस आणला. जिल्हा कॉंग्रेसचे एक माननीय नेते आमच्याबरोबर होते. त्यांना घरून जेवणाचा डबा येई. हा डबा परत करताना ते नेते त्यांना जेलच्या वॉर्डरकडून जेलमधील भाज्या'डब्यात घालून डबा परत पाठवीत. घरी परत जाणारा डबा जड का लागतो हे पाहाण्यासाठी दारावरील शिपायाने तो उघडून पाहिल्यावर त्याला त्या भाज्या आढळल्या. त्याने जेलरला तो डबा दाखविला. जेलरने आमच्या बराकीतील दोन-तीन स्थानबद्धांना कचेरीत बोलावून तो डबा दाखविल्यावर त्यांनी माना खाली घातल्या. बेचाळिसच्या आंदोलनात तरूण मिसरूड न फुटलेली मुले तुरुंगात आली होती. ती बहुतेक सारी घातपाताच्या कार्यक्रमात गुंतलेल्या कार्यकर्त्यांना मदत करणारी नि मुख्यतः गुप्त पत्रिका वाटणारी होती. या मुलांना तुरुंगात पाठविण्यापूर्वी पोलीस मारपीटही करीत. भिवंडीहून आलेल्या अशाच एका मुलाने त्याचा परिचय झाल्यावर मला सांगितले की, घरी आईने मला कधी मारले नाही, पण पोलीसांनी मात्र माझ्या फाडफाड थोबाडीत मारल्या. त्याला त्या माराचे मानसिक दुःखच फार वाटले व ते कोणाला तरी सांगावे, अशी त्याची ती व्यथा मला सांगण्यामागे भावना होती. मी ज्यांना दुधाचे वाटप करी त्यात तो एक होता.

### बराकीतील अशांतता

ठाणे तुरुंगात स्थानबद्धांची भरती होतच होती. मारुती कुमार असाच एक दिवस आत आला. आल्या आल्या त्याने मला एका रविवारी सारा तुरुंग

हिडवून दाखविला. वॉर्डर व पोलिस यांच्याशी त्याने संबंध जुळविले होते. ठाण्याच्या जेलमध्ये बराकीच्या आवारात आम्हा स्थानबद्धांना बरेच स्वातंत्र्य असे, नव्हे आम्ही ते बळकाविले होते. प्रत्येक महिन्यास पंधरा तारखेस ध्वजवंदन होई. एकदा तर एकाने तुरुंगातील अगदी मोठ्या झाडाच्या शेंड्यावर राष्ट्रीय झेंडा लावला. या ध्वजारोहणाने तुरुंगाचा अधिकारीवर्ग खडबडून जागा झाला. हा झेंडा उतरविण्यापूर्वी सर्व राजबंदीना त्यांच्या बराकीत सक्तीने पाठविण्यात आले. यानंतरच्या एका झेंडावंदनाचे प्रसंगी फार मोठा गंभीर प्रसंग निर्माण झाला. सारे स्थानबद्ध, झेंडावंदनासाठी गोळा झाले आणि जेलचे पोलिस झेंडावंदन करून देत नव्हते. स्थानबद्धांवर लाठीहल्ला झाला. मग सारे बंदी हट्टाला पेटून बैठक मारून बसले. कलेक्टरपर्यंत या संघर्षाची वार्ता गेली. तेव्हा फरूकी नांवाचा समजूतदार जिल्हाधिकारी होता. तो आला. त्याने स्थान-बद्धांच्या नेत्यांची समजूत घातली व एका मोठ्या संघर्षाचा अनर्थ टळला. राजकीय स्वरूपाच्या कार्यक्रमांना ते मोठ्या प्रमाणावर झाले तर कडक विरोध करणारे पोलिस सांस्कृतिक कार्यक्रमांकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत, नव्हे त्यांच्या संमतीनेच ते घडत. तुलसी विवाहाचा कार्यक्रम आमच्या बराकीच्या आवारात थाटात झाला. स्थानबद्धात आपसात संघर्ष निर्माण होणारे प्रसंगही घडले. एकजण माफी मागून सुटला होता. बाहेर जाताना त्याने आपल्या जवळची साखर व इतर पदार्थ स्नेही राजबंदींना देऊ केले. त्याच्या माफीची आधीच वाच्यता झाली असल्याने त्याची साखर मातीत फेकून देण्यात आली; त्याच्या तोंडाला काळे फासण्याचा प्रयत्न होऊन शेम शेमच्या घोषणा झाल्या. जेल पोलिसांनी त्याला संरक्षण देऊन ऑफिसात नेले व पोलिस पहाऱ्यातच त्याची सुटका झाली.

## वडिलांचे निधन, पॅरोलवर सुटका

एक दिवस मला ऑफिसातून बोलावणे आले. का आणि कशाकरिता बोलाविले याचा विचार करीत मी तेथे गेलो. मला पहाताच जेलरने 'तुमचे वडील फार आजारी असल्याने तुमच्या मित्रांनी तुम्हाला पॅरोल मिळावा असा अर्ज केला आहे व तो मंजूर झाला असून तुम्ही ताबडतोब बाहेर पडण्याची तयारी करा' असे सांगितले. मी परत बराकीत येऊन माझे सामान इतर सहकाऱ्यांच्या स्वाधीन केले व वडील आजारी असल्याने पॅरोलवर पंधरा दिवसासाठी जात असल्याचे सांगितले. काहींनी मला धीर दिला तर काहींनी बाहेरच्या निकटवर्ती माणसाना सांगण्यासाठी महत्त्वाचे निरोप सांगितले. माझे लक्ष त्यांच्या बोलण्याकडे फारसे नव्हते. घरची परिस्थिती डोळ्यांपुढे उभी राहिली. बाहेर भूमिगत असताना एकदा मी वाडीबंदर गुड्स डेपोत काम करीत असलेल्या माझ्या मोठ्या भावाला भेटून माझी खुशाली आई-वडिलाना कळविली होती.

त्यानंतर घरच्या माणसांशी अगर इतरांशी मी पत्रव्यवहाराने संबंध ठेवला नव्हता. बाहेरुन काही मागविलेही नव्हते. आपणामुळे कोणाला त्रास उपद्रव नको, हीच भावना यामागे होती. तुरुंगाबाहेर आल्यावर मला नेण्यास आलेल्या माणसाबरोबर मी दांडेकर यांच्या निवासस्थानी गेलो. तेथे मला माझ्या वडिलांचे चौक मुक्कामी निधन झाल्याची दु:खद वार्ता समजली. ते वृत्त ऐकताच जी कुशंका माझ्या मनात वारंवार येत होती तीच खरी ठरली. मला एकाएकी रडू कोसळले. मी मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर इतर चार चौघा मुलांसारखा वागेन, लग्न करीन, नोकरी करून चार पैसे मिळवीन, ही आई-वडिलांची अपेक्षा मी पुरी केली नाही याची जाणीव या वेळी तीव्रतेने झाली. माझ्या वैचारिक भूमिकेवर ते येऊ शकत नव्हते व त्यांच्या व्यावहारिक अपेक्षा मी पुऱ्या केल्या नव्हत्या. असे असूनही मला त्यांनी कधीही 'तू अमूक एक कर' असा आग्रह व किंवा आदेश दिला नव्हता. उलट एकतीस साली साबरमतीला गांधींच्या आश्रमात जाण्याला परवानगी देऊन प्रवासासाठी पैसेही दिले. पण त्याच वेळेपासून मी घरापासून व नातेवाईकांपासून व्यावहारिकदृष्टचा दूर जात होतो. वडिलांपुरता तो दुरावा आता संपला होता. मी चौकला गेलो. वडिलांच्या निधनाच्या ११ व्या दिवशी रात्री स्थानिक भजनी मंडळातर्फे कीर्तन ठेवले होते. रीतिप्रमाणे तेराव्या दिवशी आप्तेष्टांचे व पाली गावाच्या आमच्या शेतीवरील कुळांचे भोजन झाले. दुसऱ्या दिवशी खिन्न व उदास मनाने मी आईचा व आप्तेष्टांचा निरोप घेऊन जड अंत:करणाने परतलो. लगेच मनश्चक्षूंपुढील सारे चित्र पालटले. दत्ता ताम्हणे यांचे वडिल बंधू अण्णा ताम्हणे यांना भेटलो. त्यांचा भूमिगत कार्यकर्त्यांशी संपर्क होता. त्यांनी तेव्हा भूमिगत असलेले भिवंडीचे प. स. तथा काका भागवत यांच्याशी माझी भेट घडवून आणण्याची व्यवस्था केली. भागवतांनी नंतर मला तेव्हा बॉंबे सेंट्रल बसस्थानकासमोरील भूमिगतांच्या जागेत रहात असलेले नानासाहेब गोरे यांचे भेटीस नेले. माझी पॅरोलची मुदत संपल्यावर परत तुरुंगात न जाता भूमिगत होण्याची तयारी आहे का? असे गोरे यांनी विचारले. मी त्याबाबत पूर्वीच विचार केला असल्याने पुन्हा भूमिगत होण्यास नकार दिला. याच पॅरोलच्या काळात बाहेर मोकळे असलेल्या काही कार्यकर्त्यांबरोबर मी पुण्यास जाऊन आलो.

### तक्क्यातून आक्षेपार्ह वाङ्मय

पंधरा दिवस संपताच पुन्हा तुरुंगात जाण्याची तयारी केली. तयारी अशी फारशी नव्हतीच. या खेपेस वादविवेचनमालेची सर्व पुस्तके राजबंदीना वाचण्यासाठी मी बरोबर घेतली. माझे स्नेही बाळासाहेब कान्हेरे यांनी तो पुस्तकांचा संच घेऊन दिला. याशिवाय बाहेरून काही आक्षेपार्ह वाङ्मय, भूमिगत

वसंत बापटांनी भाई कोतवालांवर केलेला पोवाडा, काही भूमिगत पत्रिका, तुरुंगात न्यावयाचे होते. त्यासाठी मी एक खूपसा कापूस भरलेला तक्क्या बरोबर घेतला. तो उसवून त्यात ते आक्षेपार्ह वाङ्मय भरले. मच्छरदाणीही घेतली. कारण ठाणे तुरुंगात डासांचा फारच उपद्रव होता. ही सर्व तयारी होता होता उशीर झाला. त्यातच जाताना घरी जेऊन जा, असा सौ. लिलाताई गांगलांचा आग्रह असल्याने थोडेसे खाऊन टांग्यात बसून तुरूंगाचा रस्ता पकडला. तुरूंगाच्या दारात आलो तो तुरूंगाची कचेरी बंद झाली होती. पहाऱ्यावरच्या शिपायाने त्याला मी पॅरोलची मुदत संपल्याचे वॉरंट दाखविताच आत घेतले व जुजबी तपासणी होऊन मच्छरदाणी, कपडे, तक्क्यासह माझी रवानगी आमच्या बराकीत करण्यात आली. बरोबरची पुस्तके मात्र दुसऱ्या दिवशी तपासणी होऊन मिळतील, असे सांगण्यात आले. पुस्तकांची मला धास्ती नव्हती. ती मिळणारच होती. बरोबरचा तक्क्या आत लगेच नेऊ देतात की नाही याचाच धसका होता. पण तक्क्या सहजासहजी आत आला. त्याच रात्री तक्क्या उसवून घरून आणलेले आक्षेपार्ह वाङ्मय राजबंदींच्या स्वाधीन केले. त्यांना मोठा खजिनाच मिळाल्याचा आनंद झाला. दुसऱ्या दिवशी वादविवेचन मालेची पुस्तकेही आली. तुरूंगात पुष्कळ तरुण मुले होती. त्यांचे अभ्यासवर्ग चालत. त्यासाठी या पुस्तकांचा उपयोग झाला. याच मुलांपैकी काहीनी दिवाळीत एक हस्तलिखित मासिक काढायचे ठरविले व माझ्याकडे संदेश मागितला. मी लिहून दिले. 'प्राप्त परिस्थितीत प्राप्त कर्तव्य आनंदाने करणाराला रोजचीच दिवाळी' मोरू नाचणे या स्थानबद्ध मुलाने हा संदेश आपल्या पुस्तकावर लिहून ठेवल्याचे मला तुरूंगातून सुटल्यावर सांगितले.

तुरूंगात सारेच काही अस्थिर असते. बाहेरून येणाऱ्या बातम्या मानसिक अस्थिरता निर्माण करीत. तुरूंग-बदलीची वार्ता ही सर्वात सनसनाटी निर्माण करी. एक दिवस कोणी म्हणाले की ठाण्याचे बरेचसे कैदी लौकरच वरळीच्या तात्पुरत्या उभारलेल्या तुरूंगात हलविणार. लगेच कोणा कोणाला धाडणार याची चर्चा सुरू झाली. काहीना ठाणे तुरुंग बराचसा सोयीस्कर होता. तुरुंग अधिकारी विचारीत नाहीत तोवर ते पाठवितील तेथे जावयाचे,असा माझा या बाबतीत विचार असे. नव्या ठिकाणी बदली झाली तर बदल म्हणून, नव्या कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी होतील, यासाठी तुरुंगबदल हा मी नेहमीच स्वागतार्ह मानी. एके दिवशी तुरुंगाच्या आवाराबाहेर असलेल्या पोलिसांच्या गाडीत बसवून आमची रवानगी वरळीच्या बी. डी. डी. च्या ११७-११८ या सिमेंटच्या चाळीत झाली. या चाळी कामगार विभागात खास कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या आहेत. प्रशस्त आकाराच्या एका चौकोनी खोलीत एका कामगाराचे कुटुंब, या हिशेबाने या असंख्य चाळी एकापुढे एक अशा बांधलेल्या आहेत.

समोरा समोरच्या दोन खोल्यामधल्या मोकळ्या जागेने विभागलेल्या, तसेच चाळीच्या आजुबाजूस मोकळी जागा असलेल्या या सिमेंटच्या चाळीच्या दोन चाळीभोवती काटेरी तारांचे मोठ्या उंचीचे कुंपण घालून त्यांचा तुरुंग, बनविण्यात आला होता. आरंभी या तारातून विदयुत प्रवाह वहात असे. कोणी तारेला स्पर्श करून ती ओलांडून जाऊ नये म्हणून ही खबरदारी घेतली होती. या काटेरी तारांच्या कुंपणाबाहेर सशस्त्र पोलीस पहारा करीत. या वरळीच्या तुरुंगात खूपच मोकळे मोकळे वाटू लागले. इमारतींच्या आत पोलिसांचा कसलाच उपद्रव नव्हता.

**एक खटकणारी आठवण**

जेवणाचे कंत्राट मुंबईतील राष्ट्रीयवृत्तीच्या हॉटेल-व्यवसाय करणाराकडे देण्यात आले होते. सायंकाळी सारे बंदी दोन चाळीमधील रिकाम्या जागेत एकत्र होत, सांघिक खेळ खेळत, गप्पा मारीत वेळ घालवीत. तारापलिकडे उभ्या असलेल्या आपल्या परिचितांशी मोठ्या आवाजात बोलण्याचीही संधी काही साधीत. या वरळी तुरुंगात मुंबईतील बरेच तरुण, काही शाळेत वरच्या वर्गात शिकणारे विदयार्थी, देशप्रेमाने सरकारच्या रोषास बळी पडून आले होते. भारदस्तपणा येण्याइतपत त्यांचे वय व शिक्षणही झाले नव्हते. आपल्या बरोबरीच्या व वयाने मोठ्या असलेल्यांची थट्टामस्करी तारुण्यसुलभ वृत्तीने करणारा असाच एक मुलगा होता. कोणाच्या डोक्यावर उगीचच टिचक्या मार, काही कारण नसता उगीचच एकादयाची टिंगल कर, हा त्याचा स्वभावच होता. लहान मुलगा म्हणून सर्व त्याच्या खोडयांकडे दुर्लक्ष करीत. पण त्याचा खोडकरपणा कमी व्हावा असे मात्र सर्वांना वाटे. एके दिवशी दुपारी मी पाण्याने भरलेले टमरेल घेऊन संडासाकडे दोन खोल्यांच्या मधल्या वाटेने जात होतो. तो मुलगा समोरून आला आणि त्याने माझ्या हातातील पाण्याने भरलेल्या टमरेलावर आपला हात जोराने आपटला. क्षणार्धात ते पाण्याचे भांडे खाली पडले; मोठा आवाज झाला, आणि काय झाले हे समजण्याच्या आत माझा तोच डावा हात त्याच्या गालावर बसला. टमरेल जितक्या अनपेक्षितपणे खाली पडले तितक्याच अनपेक्षितपणे मी त्याच्या थोबाडीत मारण्याचे, माझ्या हातून आयुष्यातील पहिलेच हिंसक कृत्य घडले. खोल्यात बसलेले काही सहकारी बाहेर आले. तो मुलगा मुकाटपणे आपल्या खोलीत जाऊन बसला. या प्रकाराने मलाच नंतर वाईट वाटले. मी त्या मुलाच्या वडिलधाऱ्या सहकाऱ्यांजवळ खेद व्यक्त करून त्या मुलाची माफी मागावी असे मला वाटत असल्याचे म्हणालो. त्यांनी सांगितले की, कृपा करून तसे काही करू नका. आता त्याला खूपच पश्चाताप झाला असून तो चांगला सुधारेल. तुमच्या माफी मागण्याचा मात्र उलट परिणाम

होईल. मी स्वस्थ बसलो. पुढे काही घडलेच नाही, अशा वृत्तीने त्या मुलाने दिवाळीत घरून आलेले रुचकर निनाव नावाचे पक्वान्न मला दिले आणि तुरुंगातून सुटल्यावर घरी बोलावून नेऊन आईची मला ओळख करून दिली. त्याच्याशी माझे संबंध स्नेहाचे राहिले.

### रात्रीच्या चहाची लज्जत

वरळीच्या तुरुंगाची, तुरुंग नव्हेच, सिमेंटच्या खोल्यांची, आठवण तेथील ढेकणांमुळे कायमची राहिली. हे ढेकूण रात्री झोप लागू देत नसत. या खोल्यांत विजेचे दिवे नसल्याने प्रत्येक खोलीसाठी रॉकेलचा कंदील दिलेला असे. या कंदीलातील रॉकेल अंगाला फासून झोपण्याचा प्रयोग बदलापूरहून आलेले एक गोसेवक करीत. रॉकेलच्या उग्र वासाने ढेकूण त्यांच्या आसपास फिरत नसत. सकाळी त्या गृहस्थांच्या अंगावरील रॉकेलचा वासही नाहीसा होई. याच कंदीलाचा उपयोग मी चहा करण्यासाठी करीत असे. कंदीलाच्या काचेच्या वरचे टोपण बाजूस सारून त्यावर ॲल्युमिनियमच्या पातेलीत दोन तीन कप पाणी घालून ते उकळण्याची वाट पहात गप्पा मारीत आम्ही बसत असू. बऱ्याच वेळाने पाण्याला उकळी आली असे समजून त्यास साखर आणि चहाची पावडर टाकून नंतर तो चहा घेत असू. आमच्यात एक केमिकल इंजिनिअर होता. त्याने बाहेरून बरेचसे लहान मोठे दगड आणून त्यांची वाटोळी उतरंड तयार केली. त्यात खाली टिनचे झाकण, त्यात कंदीलातील रॉकेल ओतून एक गावठी स्टोव्हसारखा प्रकार केला. एकदा रात्री अचानक झालेल्या पोलीस तपासणीत तो उघडकीस आला व सगळे खडे दगड बाहेर गेले. याही चुलीवर रात्री चहा होत असे. वरळीच्या तुरुंगात आम्ही असतानाच रेशनिंग सुरू झाले. ते होण्यापूर्वी जेलरने आम्हाला आमच्याच पैशाने साखर विकत घेण्याची सूचना केली. मी एक मोठा डबाभर साखर घेतली नि ती पुढे अनेक महिने आम्हा चहाप्रेमींना चहाची लज्जत देत होती.

बेचाळीसच्या तुरुंगवासात मी बाहेर कोणाशी पत्रव्यवहार केला नव्हता. कारण या चळवळीचे स्वरूप वेगळे असल्याने भूमिगत असताना पकडलेल्यांशी संबंध ठेवणाराना पोलिसांचा त्रास होत असे. स्थानबद्धाना आपल्या पैशाने आवश्यक अशा वस्तू विकत घेता येत. त्यासाठी मी माझी सायकल विकावयास सांगून ते आलेले पैसे तुरूंगात मागविले. याबाबतची पत्रे मी राजाभाऊ भावे यांना मधून मधून पाठवीत असे व त्यांचेकडून तत्परतेने उत्तरे मिळत व आवश्यक ते सहाय्य होई. मित्रपरिवाराचा मजवर फार लोभ असल्याचा अनुभव मी तुरुंगात असताना घेतला तसाच तुरुंगाबाहेरही मला मिळाला. वरळीला सकाळी प्रत्येकाला साखर व दूध स्वतंत्र मिळे व चहाची पावडर घालून उकळते

पाणी देत. दुपारचा चहा असाच मिळे. ठाण्याच्या तुरुंगात खराब अन्नाबाबत वारंवार तक्रारी करण्याची पाळी येई. वरणात चक्क किडे तरंगताना आढळले की, ते तसेच टाकून कोरडी भाकरी चपाती खावी लागे व मग तुरुंगाधिकाऱ्यांबरोबर संघर्ष निर्माण होत. असे काही घडले की, जेलच्या रोजच्या ठराविक ठशाच्या कंटाळवाण्या जीवनात जरा वेगळाच जोश निर्माण होई. ठाण्याच्या नि वरळीच्या तुरुंगात वाचनचिंतन यासाठी अनुकूल असे वातावरणच नव्हते. सारे लक्ष दुसऱ्या जागतिक युद्धाच्या बातम्या व काँग्रेसची बाहेरील चळवळ इकडे असे. या वरळीच्या चाळीत आमची खोली दुसऱ्या मजल्यावर होती. मध्यरात्री चाळीच्या मधल्या खिडकीशी एकदा उभा राहून बाहेर पाहू लागलो तो रात्रीची पाळी संपवून कामगार घराकडे परतत असताना पाहिले. मुंबईत वेगवेगळ्या सामाजिक-आर्थिक स्तरांवरचे लोक अलग अलग भागात राहतात, हे आधी माहीत असतानाही या वरळीच्या चाळीमुळे या विविध स्तरांची बरीच ओळख पटली. एका खोलीतील कामगारांचा संसार, हे मन अवस्थ करणारे चित्र आहे. पोट आणि परिस्थिती माणसाला कोणत्या अवस्थेला नेते याची कल्पना या चाळी आणून देतात.

### येरवड्याच्या माळरानावर

वरळीच्या चाळ-तुरुंगाचा परिचय होऊन चारपाच महिने होतात न होतात तोच पुन्हा बदलीच्या वार्तांच्या वावड्या हवेत उडू लागल्या. काही राजबंद्यांची रवानगी येरवड्याला करणार, या बातमीच्या पाठोपाठ तिकडे जाणाऱ्या कैद्यांच्या नावाची यादी आली आणि माझे नाव त्या यादीत होते. वरळीहून पोलिसांच्या मोटारीतून आम्हाला भायखळा स्टेशनवर आणून तेथून पॅसेंजर गाडीने खडकीस उतरविण्यात आले. येरवडा तुरुंगाची भव्य दारे माझ्यासाठी दुसऱ्यांदा खुली झाली. पण याही खेपेस येरवड्याच्या मुख्य कारागृहाबाहेर उभारलेल्या बराकीवजा तंबूतच मुंबईहून आलेल्यांची रवानगी झाली. वरळीच्या कुंद वातावरणातून येरवड्याच्या माळरानावरील कापडी बराकीत फार मोकळे वाटू लागले. १२ वर्षांनी मी पुन्हा या माळरानावर आलो. पण या कालावधीचा परिणाम तुरुंगाच्या वातावरणावर झालेला होता. पहिल्या खेपेस आलो तेव्हा 'क' वर्ग आणि सक्तमजुरी होती. आता नुसतीच स्थानबद्धता असल्याने सक्तमजुरी नव्हती. तसेच खाण्याच्या पदार्थांतही चांगला बदल आढळला. या माळरानावरील तंबूत रोज सायंकाळी सामुदायिक प्रार्थना होत असे. वाचन, लेखन, चिंतन म्हणजे तुरुंगवास, असे जे समीकरण १९४०-४१ च्या नाशिकरोडच्या कारागृहात आढळले त्याचा अनुभव या खेपेस ठाणे, वरळी, येरवडा येथे आला नाही. सारे लक्ष्य बाहेरच्या बातम्यांवर असे. तुरुंगातील कडक

शिस्तही जाणवत नसे. एका मोठ्या जमावास एकत्र कोंडून ठेवण्यापलिकडे तुरुंगाधिकारी फारसे काही करीत नसत. माझा आधीच परिचय असलेल्या दत्ता जोशीला स्थानबद्धांच्या या मेळाव्यात पाहिले. त्याच्याशी गप्पागोष्टी झाल्या. पुण्यात घडलेल्या एका घातपाताच्या संदर्भात त्याला अटक झाली होती. घातपाताची कृत्ये करणारे युवक कार्यकर्ते साऱ्या महाराष्ट्रभर विखुरले होते. त्यांना पकडण्यात पोलीस यशस्वी होत. पण पुराव्याच्या आधारे त्यांच्यावर निश्चित आरोप ठेऊन, त्यांना कोर्टासमोर उभे करून शिक्षा ठोठावण्याइतका खात्रीलायक पुरावा पोलिसांना मिळत नसे आणि पुष्कळदा तेही त्या भानगडीत न पडता संशयित इसमाना स्थानबद्ध करून मोकळे होत. महाराष्ट्रात घातपाताचा मोठा खटला अण्णासाहेब सहस्रबुद्धे व त्यांचे सहकारी यांचेवर करण्याचा फार मोठा प्रयत्न सरकारकडून झाला; पण साक्षीदारांच्या व निश्चित पुराव्याच्या अभावी सरकारला तो विचार सोडून दयावा लागला.

## स्थानबद्धाची पोलिसांच्या हातावर तुरी

तुरुंगात राजबंदीच्या चालणाऱ्या गप्पात साहसी स्वरुपाच्या अशा अनेक घातपाताच्या घटनांचे वर्णन असे. 'छोडो भारत' आंदोलन सुरू होऊन आता एक वर्ष उलटले होते व त्याची दाहकता कमी होऊ लागली होती. येरवड्याच्या या कापडी बराकीत असताना एक दिवस रात्री आमच्या तंबूपासून जरा दूर अंतरावर असलेला एक रिकामा तंबू पाहता पाहाता मोठा जाळ होऊन पेटला नि त्याची राख झाली. ही आग कशी लागली ते कळलेच नाही. तंबूत विजेचे दिवे असत. या विदयुत तारातून वाहणाऱ्या विजेच्या खंडित प्रवाहामुळेच ही आग लागली, असा निष्कर्ष काढण्यात आला तरी तुरुंगाधिकाऱ्यांचे मत स्थानबद्धांपैकीच कोणी तरी ती आग लावली असेच होते. काल सायंकाळी होता नि आता नाही, अशी त्या तंबूची अवस्था झाल्यावर तीन चार दिवसांतच आमची रवानगी येरवड्याहून विसापूर तुरुंगात झाली. विसापूर तुरुंगात नेताना आम्हा स्थानबद्धांना पोलिसांच्या नेहमीच्या पद्धतिनुसार हातकड्या घालण्यात आल्या नव्हत्या. पुणे स्टेशनवर आम्ही सारेजण एकत्र घोळक्यात बसून गप्पा मारीत होतो. माणसांचे कुतुहूल साधारणपणे कोणत्याही मोठ्या रेल्वे स्टेशनवर जास्तच जागृत असते. तशात बंदिस्त कारावासातून आलेल्या पोलिस पहाऱ्यातील उतारूंना तर अधिकच कुतुहल असते. आपल्या भोवतालची दृश्ये ते नजरेने टिपत असतात व योगायोगाने कोणी ओळखीचा दिसतो का हे त्यांची नजर शोधीत असते. त्याचप्रमाणे अशा स्थानबद्धाच्या मेळाव्याकडे कौतुकाने, आदराने पहाणारेही पुष्कळ लोक आढळत. स्टेशनवर दौंडमार्गे मनमाडकडे जाणारी पॅसिंजर गाडी येताच आम्हाला आमच्यासाठी खास राखून ठेवलेल्या

डब्यात बसविण्यात आले व गाडी सुटली. गाडी सुटताच कैद्यांची गिनती सुरू झाली. हवालदारांनी पुन्हा पुन्हा गिनती केली. पण त्यात एक कैदी कमी असल्याचे आढळले. साऱ्या शिपायांची धांदल उडाली. गाडी चालूच होती. कोणीतरी एकाने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन सुटका करून घेतली होती. यानंतर मात्र येरवड्याहून ज्या स्थानबद्धाना विसापूरला आणण्यात आले त्या सर्वांनाच बेड्यात हात अडकवूनच यावे लागले.

विसापूरच्या तुरुंगाच्या दारात पाऊल टाकताच प्रथमच तुरुंगात आलेल्याना 'मी येथे पूर्वी आलो होतो' सांगताना माझ्या देशभक्तीला मीच उजाळा देत होतो आणि थोडाफार सुखावत होतो. बारा वर्षांच्या काळानंतर पुन्हा येथे आलो पण एकूण परिस्थितीत फारसा फरक पडला नव्हता. एक गोष्ट मात्र फार जाणवली व ती म्हणजे ३० साली आम्हाला तुरुंगाला लागून असलेल्या तळ्यावर आंघोळीला नेत. आता ती पद्धत बंद झाली होती. तुरुंगाच्या बराकीबाहेरच पाण्याचा साठा मोठ्या टाक्यातून करण्यात आला होता व तेथेच आमच्या आंघोळी, कपडे धुणे होत असे. विसापूरचे सारेच वातावरण उदासवाणे होते. या सहारा वाळवंटासारख्या वातावरणात एकच विसाव्याचे स्थान होते व ते म्हणते पंधरावीस मिनिटे तळ्याच्या पाण्यात करता येणारी मनसोक्त आंघोळ. हा आनंद आता हिरावून घेण्यात आला होता विसापूरचे मुख्य तुरुंगाधिकारी डॉ. नूलकर हे १९४०-४१ साली मी नाशिकरोड तुरुंगात असताना तेथे जेलचे डॉक्टर होते. त्यावेळी मी कानाच्या दुखण्याचे किती हैराण झालो होतो हे त्यांनी पाहिले होते. विसापूरला त्यांची भेट होताच त्यांनी पहिला प्रश्न माझ्या कानाच्या दुखण्याचा विचारला. सर्वच तुरुंगाधिकारी माझ्याशी चांगले वागले. मला त्यांच्यापासून कसलाच उपद्रव झाला नाही. हे माझ्यापुरतेच नव्हते तर जे कैदी सामान्यतः तुरुंगाची शिस्त पाळीत त्यांनाही तुरुंगाधिकाऱ्यांनी सतावले नाही. १९३० साल मात्र याला अपवाद होते. विसापूर तुरुंगात ठाणे, येरवडा, वरळीपासून जे काही राजबंदी माझ्याबरोबर होते यात मोरू नाचणे हा माध्यमिक शिक्षण पुरे न केलेला तरुण विद्यार्थी होता. विसापूरला भा. रा. भागवत यांचा निकट परिचय झाला व पुढेही टिकला. या परिचयाचे कारण भागवतांची शालीन वृत्ति हे होतेच पण त्याचबरोबर त्यांचे चहावरील प्रेम हे आमच्या मैत्रीचे खास कारण ठरले. साथी पीटर अल्वारिस, मुंबईचे काँग्रेसचे पदाधिकारी व पत्रकार गो. बा. महाशब्दे, मधु लिमये, भिवंडीचे काका भागवत, बाबू भावे अशी अनेक मंडळी होती. या विसापूरची वाईट हवेचा तुरुंग ही ख्याती होती. या ख्यातीचा मला स्वतःलाच मलेरियाचा दीर्घ काळ राहिलेला आजार जडून प्रत्यय आला. दर दिवसाआड मलेरियाचा ताप येऊ लागला. त्यामुळे अशक्तपणा वाढला. या आजारात साथी पीटर अल्वारिस यांनी

व इतर मित्रांनी फार आपुलकीने मदत केली. ताप थांबण्याचे चिन्ह दिसेना तेव्हा डॉक्टरांनी माझी पॅरोलवर सुटका व्हावी असा सरकारकडे अहवाल पाठविला. काही दिवसांतच आजारपणामुळे माझी सुटका झाली. सुटका झाली तरी ती पॅरोलवर असल्याने पुन्हा आत यावे लागणार असल्याने मी माझी पुस्तके व इतरही सामान सहकाऱ्यांजवळ तुरुंगातच ठेवले. सुटल्यावर मी प्रथम विसापूरहून जवळच असलेल्या श्रीरामपूरच्या साखर कामगार युनियनच्या कचेरीत गेलो. तेथे एक दिवस राहून नंतर ठाण्यास रवाना झालो.

## तुरुंगातून सुटका

तीस साली, एकेचाळीस साली मी तुरुंगातून सुटलो तेव्हा जसा निर्धन होतो तसाच याही खेपेस होतो. १९४३ च्या डिसेंबरमध्ये तुरुंगातून बाहेर आलो तेव्हा राहण्यास जागा नाही, खिशात पैसा नाही, अशीच अवस्था होती. माझे वडील बंधू तेव्हा चौकला राहण्यास गेले होते. मी दत्ता ताम्हणे यांच्याकडे सामान ठेवून चौकला जावे अशा विचारात असताना माझे हितचिंतक स्नेही राजाभाऊ भावे यांनी मला त्यांच्या घरी राहण्यास बोलाविले. जनता-जनार्दनाच्या रूपात ईश्वर पहावयाचा, असे मानले तर माझ्या त्यावेळपर्यंतच्या व नंतरच्याही अडचणीच्या प्रसंगी या ईश्वराने माझी काळजी वाहिली आहे. राजाभाऊ भावे यांनी मला त्यांच्या घरी रहावयास तर नेलेच शिवाय लगेच ठाणे-मुंबईचा रेल्वेचा तिमाही पासही काढून दिला. आजारपणामुळे माझी पॅरोलवर मुक्तता झाली होती. बाहेर आल्यावर डॉक्टरांचे औषध सुरू झाले. आजाराने आलेला अशक्तपणा काही दिवसानी गेला. पुन्हा तुरूंगात जाण्याचा दिवस जवळ येत असताच मला तुरूंग अधिकाऱ्यांचे पत्र आले की, सरकारने तुमची सुटका केली असल्याने तुम्ही आता विसापूर तुरूंगात येण्याची आवश्यकता नाही. याच वेळी ठाणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी पालघरचे बाबूराव दांडेकरांचीही तुरूंगातून मुक्तता झाली होती. सुटकेचा दिवस शिक्षा झाली नसल्याने निश्चित नव्हता. तरीपण अनपेक्षितपणे लौकर सुटका होण्याचे कारण विसापूरच्या तुरूंगात जडलेला मलेरियाचा ताप हे असले तरी बाहेरच्या वातावरणात 'छोडो-भारत' आंदोलन आस्ते आस्ते बंद पडत चालले होते हेही होते. म्हणूनच ज्यांच्यासंबंधी घातपाताची कृत्ये केल्याचा कसलाच पुरावा नव्हता अशा अनेक लहानमोठ्या कार्यकर्त्यांची सुटका या काळात होत होती. माझी सुटका झाली तरी अजूनही असंख्य कार्यकर्ते तुरुंगातच होते. ठाण्याच्या पारसिक बोगद्याजवळील टाटा कंपनीचा विद्युत् वाहिनी तारेचा स्तंभ पाडण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून जे तरुण पकडले गेले होते त्यांची सुटका अद्याप झाली नव्हती. माझ्याबरोबर विसापूर तुरुंगात असलेला याच

गटातील मोरू नाचणे याची तुरुंगातील खुशाली त्याच्या आई वडिलांना कळविण्याचे काम माझ्याकडे आले होते. त्यांचा माझा आधी काहीच परिचय नव्हता. त्यांच्या मुलाच्या आधी माझी सुटका व्हावी व त्याच्या खुशालीचे वृत्त सांगण्याची पाळी माझ्यावर यावी हे मला त्यावेळी बरेच जाणवले. स्थानबद्धांच्या सुटकेचे हुकूम देताना प्रत्येकाची स्वतंत्ररीत्या चौकशी केली जात असल्याने कोणी आधी, कोणी मागाहून असे सुटत. १९३० सालच्या सत्याग्रहाचा शेवट गांधी-अर्विन करारामुळे झाला व त्या करारातील तरतुदीमुळे सगळ्या सत्याग्रहींची एकदम सुटका झाली. तसा प्रकार १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहात घडला नाही आणि 'छोडो-भारत' क्रांती आंदोलनातही अशी सार्वत्रिक सुटका झाली नाही.



# नारायण गणेश गोरे

जन्म १५ जून १९०७

**समाजवादी कार्यकर्ते आणि लेखक**

जन्म रत्नागिरी जिल्ह्यात हिंदळे या गावी. शिक्षण पुणे येथे. बी. ए. एल्. एल्. बी. पर्वतीमंदिर अस्पृश्यतानिवारण कार्यापासून राजकारणात भाग. १९५० मध्ये महाराष्ट्र यूथलीगचे चिटणीस. १९३६ ते ३९ अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य. त्यानंतर काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थापनेत पुढाकार कमिटीचे सदस्य. त्यानंतर काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थापनेत पुढाकार. १९४८ ते ५३ समाजवादी पक्षाचे सहचिटणीस. १९५७ साली संयुक्त महाराष्ट्र समितीच्या तर्फे संसदेत निवड. १९६७ ते ६८ पुणे महानगरपालिकेचे महापौर. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत अनेक वेळा भाग घेऊन कारावास सोसला. गोवाविमोचन चळवळीत जन्मठेपेची शिक्षा. पण १९५७ मध्ये सुटका.

यांनी विपुल लेखन केले. समाजवादाचा ओनामा त्यांचे पहिले पुस्तक. जुन्या हैद्राबाद संस्थानात गुलबर्गा येथे फेब्रुवारी ते डिसेंबर १९४२ पर्यंत शिक्षा भोगत असता लिहिलेली दैनंदिनी

'कारागृहाच्या भिंती' या नावाने प्रकाशित झाली. याशिवाय कथा, ललित लेख, वैचारिक लेख, नेहरूंच्या आत्मवृत्ताचे भाषांतर तसेच जनवाणी, रचना जनता आणि साधना या नियतकालिकांचे संपादन.

जनता राजवटीत ते ब्रिटनमध्ये हायकमिशनर म्हणून काम पाहत होते.

हा उतारा त्यांच्या 'कारागृहाच्या भिंती' या पुस्तकातून सादर करण्यात येत आहे.

# कारागृहाच्या भिंती

नानासाहेब गोरे

१ ऑगस्ट

एक वर्षाची सजा कायम झाली; आज टिळकांची पुण्यतिथि आहे! आजच्या दिवशी झालेल्या शिक्षेचे भय कसले?

लोकमान्यांचे निधन होऊन आज बावीस वर्षे पुरी झाली. त्यांचे कार्य अद्यापि यशस्वी झालेले नाही. एकोणीसशेवीस साली, त्यांच्या निधनाच्या दिवशी ज्या यात्रेचे प्रस्थान ठेवण्यात आले ती महायात्रा अद्यापि इष्ट स्थलाप्रत पोचलेली नाही. आता थोडा मार्ग काढावयाचा आहे, पण तो अडचणींनी भरलेला आहे. विरोध कळसाला पोचलेले आहेत. युद्धात फसवे स्वरूप आलेले आहे. वास्तविक जे स्वातंत्र्याला नेहमीच विरोध करीत आले त्यांनाही आज आम्हीही स्वातंत्र्यप्रेमी आहोत पण काय करावे? महायुद्धाची अडचण आहे, अशी सबब सांगता येत आहे आणि कम्युनिस्टांसारखे कट्टर स्वातंत्र्यवादी भ्रांतिचक्रात गवसून काँग्रेसलाच विरोध करण्यास पुढे सरसावले आहेत. आता कम्युनिस्टांपासून सरकारपर्यंत एकच फळी खडी झाली आहे. अशी एकजूट हिंदुस्थानात कधी तरी दिसली असेल काय? हिंदुस्थानात काय, दुनियेतल्या कोणत्याही देशात असा प्रसंग घडलेला नसेल. या सगळ्यांचे घाव झेलून काँग्रेसला पुढे जावयाचे आहे. हे काँग्रेसच्या थोरवीचे एक उत्कृष्ट गमकच आहे असे म्हटले पाहिजे. कालच्या क्रॉनिकलमध्ये मागच्या युद्धासंबंधी लोकमान्यांचा उतारा देऊन ब्रेलवींनी मोठीच कामगिरी बजावली आहे.

"I must impress upon the attention of the Government the popular view that Home Rule and Home Defence must go together. Pressure official or unofficial and pecuniary inducement may perhaps secure for the occasion the Persian hordes who accompanied Xerxes the then Satrap of the East, to Greece. But the enthusiasm of the Greek citizens who defeated those hordes cannot be purchased by money. For that the hearts of the people must be touched, and these can

only be touched by granting the Home Rule."
*10th June 1918.*
हे शब्द आणि परवाचा वर्धा-ठराव यात जुळ्या भावंडाइतके साम्य नाही काय? मग काँग्रेसने लोकमान्यांचे धोरण सोडले असा वावदूकपणा करणाऱ्यांच्या आरडाओरडीकडे लक्ष देण्याचे काय कारण आहे?

आज पुण्याला केळकर-अणे, सावरकर इत्यादींची मजलस आहे. त्यात सालाबादप्रमाणे काँग्रेसला सडकून शिव्या देण्याचे पुण्यकर्म उरकण्यात येईलच! ......

७ ऑगस्ट

आजपासून मुंबईला ऑल इंडियाच्या बैठकीला प्रारंभ होईल. नवीन ठराव काहीही असला तरी तो पास हा होईलच. सत्याग्रहाचा प्रसंग येणार काय? इंग्लंड व अमेरिका या देशांतील वृत्तपत्रांच्या थैमानावरून सत्याग्रह अपरिहार्य दिसतो. परवा मॅक्सवेलने जे कागद प्रसिद्ध केले त्यांचा हेतुही काँग्रेसला बदनाम करावे, तिची छीथू करावी हाच आहे. पण त्यामुळे काँग्रेसचे बालाग्रही वाकडे होणार नाही. इंग्लंड अमेरिकेतली कुत्री ती काय? त्यांना छू म्हणण्याचा अवकाश, भुंकावयास तयार आहेत. त्यांना उत्तम खादय मिळाले आहे यात शंका नाही. 'हिंदू'ने तो मजकूर प्रसिद्ध करण्यास नकार दिला ही शाबासकी देण्यासारखी गोष्ट आहे खरी.

या सत्याग्रहाच्या ठरावापासून गांधीजींचेच विचार माझ्या मनात घोळत असतात. वादळ उठवण्याची आणि शमविण्याची धमक म्हाताऱ्याच्या अंगी अदयापि आहे. त्यांच्या डोक्यावर विरोधाची मुसळधार पडत असताही ते स्थितप्रज्ञाप्रमाणे शांत आहेत. एकादयाच्या अंगी रणावेश चढावा त्याप्रमाणे ते वागत आहेत. १९२० सालची हकीगत मला ठाऊक नाही. १९३० साली दांडीकडे कूच करताना ते ज्या आवेशाने बोलत-चालत तोच आवेश या वेळी त्यांच्या अंगी संचरलेला आहे. वीर पुरुषाचे गुण त्यांच्या अंगी आहेत हे निःसंशय. त्यांच्याशी तुलना करता जवाहरलालही फिके पडतात. मग वीर सावरकरादि मंडळींची तर वर्णने खालील श्लोकाने करता येतील,

तावद्गर्जन्ति शास्त्राणि जंबुकाः विपिने यथा
न गर्जति महाशक्तिः यावव्देदांतकेसरी ॥ १ ॥

सर्व जग त्यांनी हालवून सोडले आहे. सगळीकडे विचारमंथन सुरू आहे. कोलाहल उडाला आहे. प्रत्यक्ष सत्याग्रह सुरू झाल्यावर कोणती परिस्थिती उद्भवेल, त्यासंबंधीही मनात विचार येतात, पण ते अदयापि पक्क झालेले नाहीत......

परवाच्या वृत्तपत्रात पी. सी. जोशींचे 'म्हणणे' वाचले. गेल्या आठवड्यात सुमतीला लिहिलेल्या एका पत्रात मी व्यंजनेने म्हटले होते, For the communists this war has suddenly assumed the form of a peoples' war though the people have no control over it! जवळ जवळ हेच शब्द – अर्थात व्यंजनेचे रूपांतर रडगाण्यात करून पी. सी. ने लिहिले आहेत. आम्ही प्रवाहाविरुद्ध पाणी तोडीत जात आहो असेही त्याने लिहिले आहे. ही तर कम्युनिस्टांची नेहमीची खोड आहे. १९३० साली तरी कोठे ते प्रवाहानुकूल चालले होते?

परवा संध्याकाळी अंगणामध्ये हिंडत असता पूर्वेच्या भिंतीवर पश्चिमेकडून आलेले ऊन माझ्या दृष्टीस पडले. हवेच्या ओल्या थरातून पाझरून आलेले ते संध्याकाळचे ऊन अधिकच पिवळसर आणि कोवळे दिसत होते. क्षणात मला मागे आपण दोघे कॉलेजच्या टेकड्यांवरून अशाच उन्हात हिंडत असू त्याची आठवण झाली. तुरुंगाचे वातावरण लुप्त झाले. टेकडीवरील ते खडबडीत काळे कातळ, कातळांतील खवल्यांत जमलेले नुकत्याच पडून गेलेल्या पावसाच्या सरीचे पाणी, अधूनमधून मातीच्या आसऱ्याने वाढलेले गवत, पलीकडच्या टेकडीवरील वेडीवाकडी खैराची झाडे आणि त्यावर पसरून फुलणाऱ्या वेलांची ती उग्रगंधी पांढरी सफेत फुले, किती तरी गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. मला वाटते गेल्या आठ वर्षांत आपण तिकडे फिरकलोही नाही. सूर्य बुडाल्यानंतर ढगांच्या पोटांवरील परावर चढलेली सोनेरी गुलाबी डूब फिकी होत चालली असता, छोट्यामोठ्या तारकांची जुईजाईची फुले वर उमलू लागताना आपण अलीकडे कोठे पाहिली आहेत? वर्डस्वर्थने The world is too much with us या सॉनेटमध्ये म्हटल्याप्रमाणे आपली स्थिती झाली आहे.

जगाच्या विस्तीर्ण आणि वेगवान् पात्रात आम्ही दोघेही जणू बुडून गेलो आहोत. निसर्गाचा केवळ एक भाग जो मानव त्याच्याशीच आमचे सारे व्यवहार चालू आहेत. मानवेतर अशी जी विशाल आणि विविध सृष्टि तिच्याशी बोलण्याला आम्हाला वेळच राहिलेला नाही! तिच्या सामोरे आम्ही दोघांनी उभे राहावे, तिला डोळे भरून पहावे आणि मनात प्रसन्न होऊन तिच्या दर्शनापासून नवीन जीवनाचा प्रसाद पावून परत फिरावे असे अनेकदा वाटते पण तो योग येत नाही. माझ्या प्रवासात मला अनेकदा निसर्गाचे दर्शन घडते. पण ते धावते दर्शन. त्या दर्शनापासून उद्भवणारी पर्युत्सुकता निवविण्यासाठी जो प्रियजनांचा सहवास हवा तो कोठे असतो? सुमति परवा सुटीत पन्हाळ्यास गेली होती. तेथून

तिने सह्याद्रीचे गंभीर रूप पाहिले असेल आणि तिला माझी आठवण झाली असेल. आनंदाच्या संपूर्ण उपभोगासाठी सखीजनांची आवश्यकता आहे. त्यांचे सहकार्य लाभले नाही तर मनाचे कोने नि कोपरे आनंदाने भरून जात नाहीत. कोणत्या तरी कोपऱ्यात पोकळी रहाते. आनंद अपर्याप्त रहातो, हुरहूर लागून रहाते.

८ ऑगस्ट

मुंबईस ऑल इंडिया काँग्रेस कमिटीपुढे मांडण्यात येणारा ठराव काल वाचावयास मिळाला. तो जवाहरलालांनी लिहिलेला आहे हे सांगण्याची आवश्यकताच नाही. त्या ठरावावर मी अगदी बेहद्द खूष आहे. इतकी डौलदार, प्रौढ, ठाशीव शब्दयोजना, एवढी व्यापक, दिलदार आणि त्याचबरोबर तर्कशुद्ध व स्वाभिमानी भूमिका व्यक्त करणारा हिंदुस्थानामध्ये जवाहरलालांवाचून कोण आहे? युद्ध सुरू झाल्यापासूनचे काँग्रेसचे सर्वच ठराव (फक्त १९४० चा मुंबईचा ठराव वगळून) उत्कृष्ट आहेत. त्यांचे वाचन म्हणजे उत्तम राजकीय शिक्षण होय. केवळ ठराव करणाऱ्या पक्षाची भूमिका त्यांच्या वाचनाने समजते असे नाही, तर इतिहासाचे मूल सूत्र वाचकांच्या हाती येते. उत्तम ठरावाची ही कसोटीच समजावी. मला राहून राहून वाटते की हाच निर्णय रामगडला जर काँग्रेसने घेतला असता तर केवढी बहार झाली असती! ब्रिटिशांचा सहवास आम्हाला याही बाबतीत बाधला आहे. आम्ही नेहमी उशीर करीत असतो.

वर्ध्याच्या आणि या ठरावात राजकीय सत्ता ही अखेर श्रमजीवी जनतेची आहे असे स्पष्ट शब्द आलेले आहेत. ही देखील अत्यंत अभिनंदनीय प्रगती आहे. यात भावी समाजरचनेची व शासनपद्धतीची सूचना आहे. इतर पक्षांच्या मानाने काँग्रेस हीच एक जनतेची संस्था आहे यात शंका नाही. पण काँग्रेसने मंत्रिमंडळ हातात असल्यापासून जर जनतेकडे आणि विशेषत: सैन्याकडे अधिक लक्ष दिले असते तर एव्हाना आम्ही हिंदुस्थानचे स्वामी झालो असतो.

जिनासारख्या दुराराध्याचे समाधान या ठरावाने होणार नाही. पण राज्यघटनेची जी कल्पना या ठरावात व्यक्त झाली आहे ती मुसलमानी जनतेने स्वीकारावी अशीच आहे. याहून वेगळे म्हणजे हिंदुस्थानाचे एक शकल त्यांना हवे असेल तर ते कोणी स्वेच्छया देऊ करणार नाही.

आमच्या पक्षाने या ठरावाला संपूर्ण पाठिंबा दयावा. पक्षाचे कार्यकारी-मंडळ तसाच ठराव करील याविषयी मला शंका वाटत नाही. पण प्रतिकाराचा कार्यक्रम कोणता? देव सुचवील तो! आमच्या राष्ट्रीय प्रतिकारातले हे एक मोठे दुर्बलस्थान आहे! ......

९ ऑगस्ट

काय अधीर मनाने मी हल्ली क्रॉनिकलची वाट पहात बसलेला असतो! पण बातम्यांच्या बाबतीत क्रॉनिकल म्हणजे औरच आहे. कालच्या अंकात परवाच्या बैठकीविषयी काही नाही. आज अंकच बंद. म्हणजे उदद्या मला काही तरी वाचावयास मिळणार. अजून पुरे चोवीस तास जावयाचे आहेत!......

१० ऑगस्ट

सर्व दिवसभर मी वर्तमानपत्राची चातकाप्रमाणे वाट पाहात होतो. शेवटी अगदी संध्याकाळी ते हाती पडले. पण क्रॉनिकलच ते. त्यात फक्त मुंबई व अहमदाबाद येथील अटकेच्या बातम्या आहेत. इतर प्रांतांतील काहीच वृत्त नाही. ऑल इंडिया कमिटीतली भाषणेही त्रुटित आहेत. एकंदरीत वृत्तपत्र पाहून माझे समाधान झाले नाही. आज आणखी काय काय बातम्या येतात पाहू......

१४ ऑगस्ट

गुलबर्गा तुरुंगात येऊन आज सहा महिने झाले. योगायोग असा की, मी येथे पाऊल ठेवले तो दिवस शुक्रवारचा होता आणि तारीख १४ होती; आजही शुक्रवार आहे आणि तारीख १४ आहे. अर्धे सवंत्सर पूर्ण झाले, अदयापि अर्धेअधिक जावयाचे आहे. तुरुंगवासाचा पूर्वार्ध संपून आता उत्तरार्ध सुरू झाला आहे.

बाहेरही महायुद्धाचा उत्तरार्धच सुरू आहे. वैयक्तिक सत्याग्रह झाला तो पूर्वार्ध, ऑगस्ट लढा हा उत्तरार्ध. गेल्या चार दिवसांच्या बातम्या ऐकून मनात आलेले विचार मिश्र स्वरूपाचे होते. लोकमताचा वारा किती जोरदार आहे आणि तो कोणत्या दिशेने वाहातो आहे ते समजून आले.

येथल्या एकाकी जीवनाचा केव्हा केव्हा इतका कंटाळा येतो की बोलता सोय नाही. काहीच करू नये असे वाटते. एकलकोंडेपणात जीव गुदमरून जात आहे असे वाटते आणि आणखी सहासात महिने कसे जातील अशी चिंता उत्पन्न होते. तरीही हे दिवस गेलेच की नाही? तसेच पुढचेही जाणार. पण मनाची कितीही समजूत घातली तरी येरवडा इत्यादी ठिकाणी डांबून पडलेले लोक आपणापेक्षा खासच नशीबवान् असा विचार मनात आल्यावाचून मात्र राहात नाही. ते मित्रमंडळींच्या मेळाव्यात गप्पाविनोद करीत, सुखदु:खांची वाटणी करून दिवस काढीत आहेत. मी मात्र एकादया निर्वासिताप्रमाणे एका कोपऱ्यात येऊन पडलो आहे!

१५ ऑगस्ट

काल सुमति व शुभा अचानक भेटावयास आल्या. त्या रविवारी येतील अशी माझी कल्पना होती. शुभा एकादया गेंदाप्रमाणे प्रफुल्ल दिसत होती. तिचे बोलणे तर आठवीत राहावे असेच आहे. मी तिला म्हटले, "परकर काय, पोलका काय, थाट आहे बुवा." तेव्हा तो प्रेमूताईने शिवला अशी बातमी देऊन तिने मला विचारले, "तुम्हाला आवडला का पण?" निरोप घेताना मी तिचे दोन्ही पापे घेतले, तेव्हा ती म्हणाली, "दोन्हीकडचे गोडच आहेत नि किती घेतले तरी सरायचेच नाहीत." तिच्या वयाच्या मानाने ती खरोखरच उत्तम बोलते. इतक्या वयात सहसा न सुचणारी वाक्यरचना, विनोद तिच्या तोंडी आहेत.

सुमति नेहमीप्रमाणेच शांत, गोड होती. तिने सांगितलेल्या बातम्याही उत्साहवर्धक होत्या......

"आपला हिंदुस्थान" छापल्या, बांधल्यावर कसे दिसेल ते पाहिले. छपाई, बांधणी इत्यादी उत्तम झाली आहेत. कागदही उंची वापरला आहे. माझा अनुवाद कसा उतरला आहे ते मीच काय सांगणार? अनुवाद करताना अनुभव असा येतो की, काही इंग्रजीच्या लकबी मराठीत आणताच येत नाहीत. प्रत्येक भाषेत काही विशिष्ट अशी ठेवण, लकब किंवा मोडणी असतेच की ती परभाषेत उतरविताच येत नाही. तो भाषेचा जणू सुगंध आहे. मोगरा, जाई जुई, कुंद, चमेली सारी शुभ्र सुवासिक फुलेच ना? पण प्रत्येकाचा गंध वेगळा; वाक्सुमनांचेही तसेच आहे.

१७ ऑगस्ट

श्री. महादेवभाई देसाई यांच्या आकस्मिक मृत्यूची बातमी ऐकावयास मिळाली. माझे मन त्यामुळे अवस्थ झाले आहे. हृदयव्यथेने त्यांना मृत्यू आला हे खरे सुद्धा वाटत नाही. मी त्यांना अनेकवार पाहिले आहे. त्यांची घाटघवीत सतेज मूर्ति, त्यांचा बुद्धिमान हसरा चेहरा मला स्पष्ट दिसत आहे. त्यांच्याकडे बोट दाखवून कोणीही बिनदिक्कत म्हणावे की, "आदर्श चिटणीस पाहावयाचा असेल तर यांच्याकडे पाहा." गांधीजींच्याशी ते सायुज्यता पावले होते. सावलीप्रमाणे ते त्यांच्या पाठोपाठ असत. विस्तृत वाचन, उत्तम लेखन, जबरदस्त कामाचा उरक इत्यादी गुणांच्या बळावर ते किती तरी वरपर्यंत चढले असते. पण अंगचे हे सर्व गुण त्यांनी ज्याला विभूति मानले त्या व्यक्तीच्या सेवेला त्यांनी वाहिले होते त्यांची निवड चुकली होती असे कोण म्हणेल? आज जिचा त्रिखंड डंका झडत आहे अशा एका महान् विभूतीच्या सहवासात त्यांनी आपली जवळजवळ दोन तपे घालविली. महादेवभाईंच्या मरणाने गांधीजींना अपार दुःख होईल. त्यांचा उजवा हातच उखडल्याप्रमाणे त्यांना वाटेल. मनुष्य कितीही थोर

असो तो केवळ स्वसामर्थ्याच्या बळावर थोर होऊ शकत नाही. त्याचे साथी, सहकारी यांचा भरभक्कम टेकू त्याला लागत असतो. गांधीजींना प्राप्त झालेल्या गौरवाला महादेवभाईंचा अव्यभिचारी सेवाभाव फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत झाला आहे याविषयी मला शंका वाटत नाही. असा चिटणीस, असा सहकारी, असा मित्र मिळणे परम भाग्य होय आणि म्हणून तो गमावणे हे परम दुर्भाग्य होय.

त्यांच्या मृत्यूमुळे गांधीजींचे वैयक्तिक नुकसान झालेच आहे. पण आम्हा सर्वांचे एक कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. बापूजींच्या चरित्राचे अनेक पैलू महादेवभाईंच्याकडून जगाला दिसावयास हवे होते आणि त्यांनी ते वेळ मिळता तर दाखवलेही असते. महादेवभाईंनी लिहिलेले गांधीजींचे चरित्र ही वाङ्मयांतील एक अपूर्वाईची चीज ठरली असती. पण ते घडावयाचे नव्हते हेच खरे.

२१ ऑगस्ट

गेल्या दहाबारा दिवसातील स्वदेशातल्या बातम्या वाचल्या म्हणजे जे विचार मनात येतात ते येथे नमूद करणेही मुष्किल आहे. विचार डोक्यात गर्दी करीत आहेत, ते कागदावर उतरविण्यासाठी हात सळसळत आहेत, पण......

२३ ऑगस्ट

काल मोठ्या आशेने मी मुस्लीम लीगचा ठराव वाचावयास घेतला. एकएक ओळ वाचून लागलो तसतसे मन निराशेने व्याप्त होत चालले. शेवटपर्यंत तो ठराव वाचणे म्हणजे एक दिव्यच होते. कोठे काँग्रेसचे ठराव, कोठे लीगचे ठराव! एकाही ओळीत किंवा परिच्छेदात उदार दृष्टी, सहिष्णुता, अभिजातपणा यांचा मागमूस लागत असेल तर शपथ! सगळी येथून तेथून शिवीगाळ, दरडावण्या, हेकटपणा, मनगटशाही आणि सत्यापलाप. काय हिंदुस्थानचे दुर्दैव आहे पाहा! सोन्यासारखी संधी चालून येत आहे पण आम्हाला आमच्या कल्याणाचा मार्ग दिसत नाही. हा लीगचा ठराव वाचल्यावर माझ्या मनाला असे वाटू लागले की, इंग्रजांचा व आमचा लढा केव्हा संपेल तो खरा, पण तो संपल्यावरदेखील यादवीवाचून काम भागेल असे दिसत नाही. आमच्या नशिबी (होय नशिबी!) स्वातंत्र्य लिहिलेलेच नाही की काय, कोणास कळे! जनमत म्हणजे एक अजब चीज आहे. फॅसिझमचा उदय, लीगचे प्रस्थ ही पाहिली म्हणजे अगदी पोकळ छा छू कार्यक्रमावर केवढाल्या संस्था उभारता येतात त्याचे प्रत्यंतर पटते. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये. आम्ही तर्कशुद्ध वर्ग पाडण्याचे प्रयत्न करतो, तर्कशुद्ध इतिहासाचा विकास समजून सांगण्याचा

प्रयत्न करतो ते सर्व व्यर्थ वाटते. मला वाटते हिटलरनेच लिहून ठेवले आहे की, 'There is no limit to peoples' capacity for self delusion.' पाकिस्तान म्हणजे काय, त्याची व्याप्ति किती, त्यांतल्या अल्पसंख्यांकाचे काय करणार, मागे राहिलेले मुसलमान कोठे जाणार, कोणी काही विचार करण्यास, प्रश्न करण्यास तयारच नाही. बस, पाकिस्तान झिंदाबाद! येथे माणूस काय करणार? येथे सारा युक्तिवाद फुकट आहे.

२८ ऑगस्ट

येत्या असेंब्लीच्या अधिवेशनाच्या बैठकीत प्रारंभीच सन्माननीय अणे हे सरकारपक्षाचे नेते म्हणून सरकारच्या प्रस्तुतच्या नीतीचे समर्थन करणारे भाषण करणार अशी वार्ता वाचावयास मिळाली! विवेकभ्रष्टानां भवति विनिपात: शतमुखः। मी उगीचच आशा बाळगून होतो की, रामस्वामींच्या पाठोपाठ तरी अणे-सरकार ही दुक्कल बाहेर पडेल. पण नाही. लोकमान्यांची पुरी बेअब्रू केल्याशिवाय हा ब्राह्मण काय ऐकतो होय?

१ सप्टेंबर

युद्धाला आज तीन वर्षे पुरी झाली नि चौथे वर्ष लागले. प्रत्येक नवे वर्ष मागच्यास बरे म्हणवीत आहे. शेवटी इंग्लंड, अमेरिका, रशिया, चीन, यांचा विजय होईल असे मला खात्रीने वाटते; पण तो शेवट इंग्लंडने आपले धोरण विशाल केले तर लवकर साध्य होईल. सांप्रत वेळेला सोन्याचे मोल आहे. कारण युद्धाचा एक दिवस म्हणजे हजारो मानवांचा, अलोट संपत्तीचा नाश होय. पराक्रमासाठी आम्हीही उतावीळ आहो पण येथे मनगटे चावीत महिनोन् महिने खितपत पडलो आहोत. ही मानवी शक्ति अमेरिकेच्या हुशार यंत्रज्ञांनी निर्माण केलेल्या हजारो विमानांच्या व टँक्सच्या बरोबरीची आहे असे महात्माजी म्हणाले होते, ते बोलताना कसे पटत नाही? इंग्रजी वर्तमानपत्रांचा गैरसमज करून घेण्याचा व पसरवण्याचा अट्टाहास पाहिला की, डोके फिरण्याची पाळी येते. त्यायोगे ते आमचा व आमच्याबरोबर स्वतःचाही घात करून घेत आहेत इतकेही त्यांना कळू नये काय? त्यांच्या अल्प स्वार्थाने परार्थ झाकून टाकला आहे. त्यांच्या डोळ्यांवरचे हे पटल कोण दूर करणार? "जीर्णमंगे सुभाषितम्" असे मोठ्या खेदाने म्हणण्याची पाळी आली आहे.

२ सप्टेंबर

हिंदुमहासभेचा ठराव वाचला. ठीक आहे. १ ऑक्टोबरचे घोडा मैदानही जवळच आहे. या हिंदुमहासभेतले जहाल गट करताहेत तरी काय? की सगळेजण लष्करी शिक्षण घेण्यासाठी आघाडीवर गेले? तसे असेल तर ते परत येईपर्यंत

हिंदुमहासभा बोलण्यावाचून काही करील असे दिसत नाही! १९४१ साली ३१ मार्चची अशीच मुदत सांगितलेली होती, तो वायदाही वायबारच ठरला. आता हा दुसरा वायदा! तथापि हिंदुमहासभेचा ठराव प्रगतिकारक आहे हे देखील कमी महत्त्वाचे नाही.

३ सप्टेंबर

येथे कधी कधी मोठी हृदयद्रावक दृश्ये पाहावयास व हकीगती ऐकावयास मिळतात. एक मुसलमान तरुण कैदी आहे. दोन्ही डोळ्यांनी आंधळा आहे. काळी टोपी आहे म्हणजे वीस वर्षांच्या वर शिक्षा झालेली आहे. त्याच्यावर खुनाचा आरोप शाबीत झालेला आहे. दोन्ही डोळ्यांनी अंध मनुष्याने खून केला असेल ही गोष्ट प्राय: असंभवनीय वाटते. तथापि त्याच्यावर गुन्हा शाबीत झाला आहे खरा. त्याची म्हातारी आई आहे. आई हेच त्याचे सर्वस्व आणि एवढा मुलगा हे तिचे सर्वस्व. तो आहे परगावचा, पण त्याची कायमची बदली आता येथे झालेली असल्याने आईही तेथून उठून येथेच मुक्कामाला आली आहे. ती बाहेर गावात भीक मागून उदरनिर्वाह करते. अगदी पिकलेपान आहे. तीही आंधळीच आहे. काठी टेकीत आयुष्याच्या असह्य भाराखाली दुमडलेल्या कमरेने ती मृत्यूशी झुंज खेळत आहे. दर आठ पंधरा दिवसांनी ती आपल्या मुलाला भेटावयास येते, ती आली म्हणजे न्यायनिष्ठुर तुरुंगाचे जबडे देखील नियम जरा बाजूला सारून उघडतात. एका बाजूने कोणाचा तरी हात धरून आई येते, दुसऱ्या बाजूने कोणाचा तरी हात धरून मुलगा येतो. मायलेकरे अगदी जवळजवळ बसतात. कारण समोर मुलगा आला आहे हे आईला त्याच्या तोंडावरून हात फिरविल्याशिवाय कसे समजणार? तो अर्भक असताना त्याला मांडीवर घेऊन त्याच्या मऊ मऊ आंगोपांगावरून हात फिरवताना तिला तो आनंद होत होता तोच जीवनाच्या टाकीचे घाव खाऊन खरबरीत झालेल्या त्याच्या मुखावरून हात फिरविताना तिला आजही होत आहे. तू आता केव्हा सुटणार? असे ती त्याला दर वेळी विचारते आणि मी आता चारदोन महिन्यात येतोच आहे बाहेर, असे तो तिला आश्वासन देतो. आपले विचारणे आणि सांगणे व्यर्थ आहे हे त्या दोघांनाही समजलेले नसेल असे नाही. पण निराशेच्या नजरेला नजर भिडविणे दोघांनाही अशक्य वाटत असावे. म्हणून निराशा आपल्याबरोबर चालत आहे हे ठाऊक असूनही ती आशेच्या जीर्णशीर्ण पदराचे टोक बळकट धरून चालली आहेत, अंधारात एकमेकास साद देत आहेत. त्याची ती वृद्ध आई, ती आशेची मूर्तिमंत करुण प्रतिमा मुलाला भेटू लागली की मला एका चित्राची आठवण होते आणि एक निबंध स्मरतो. चित्राचे नाव "Hope" आणि निबंधाचे नाव "Mother" (हे नाव बरोबर आहे की नाही शंका वाटते, पण लेखन वॉशिंग्टन आयर्व्हिंगचे

आहे यात संदेह नाही.)

११ सप्टेंबर

काल श्रावणी अमावास्या होती. सगळा महिना कर्नाटकी, तेलंगी व मराठी हिंदू लोकांनी "पोथी ठेवली" होती, तिची समाप्ती काल रात्री झाली. रोज बंद झाल्यावर रामविजय इत्यादी प्राकृत ग्रंथ वाचण्यात येत. मग आरती वगैरे होई. कालची सारी रात्र तर भजन, तमाशा, विडचा, चहा इत्यादी कार्यक्रम चालू होते. सोंगेही आणलेली होती. एकीकडे "तुळसीमाळा गळां कर ठेवुनी कटीं। कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं।। म्हणणे झाल्यावर लगेच डफ तुणतुण्याच्या बाजात "सेज केली पण वायां गेली। राजसा।। उडवा पतंग" इत्यादी लावण्याही सुरू झाल्या! (पतंग उडवण्याला Sexual Symbolism चे स्वरूप कसे काय प्राप्त झाले? Stekel चे Meaning of dream symbolism हा लेख वाचूनही याचा उलगडा झाला नाही.) तमाशाची गंमत अशी की, तिन्ही कोठचात तमाशांची सर्व जबाबदारी महारमांगांनी उचलली होती. "ब्राह्मणाघरी लिवणं, मराठ्याघरी दाणं अन् महाराघरी गाणं" अशी म्हण बाहेर ऐकली होती तिची आठवण झाली. मराठा कोठीतला तमाशा सर्वांत उत्तम होता. नाच्यापोऱ्याचे काम एका मुसलमान छोकऱ्याने केले! मी जरा वेळ पाहात उभा राहिलो होतो. पण माझे मन त्यात रमले नाही. एक गोष्ट माझ्या दृष्टीला ठळकपणे दिसून आली ती ही की, नाच्या पोऱ्याने आपल्या साजशृंगारात मनगटी घडचाळ आणि चष्मा यांना प्रामुख्याने स्थान दिले होते. आधुनिक स्त्रीला या दोन वस्तूंशिवाय आधुनिक म्हणणे शक्य नाही असे या मंडळीचे ठाम मत असावे हे यावरून उघडच आहे!

१२ सप्टेंबर

चर्चिलचे भाषण वाचले. वाचताना कानशिले लाल होत होती. अमेरिकेच्याही वरकडी चर्चिलने केली आहे. या भाषणाबद्दल चर्चिलला धन्यवाद दिले पाहिजेत. काँग्रेस तुरुंगात पडली असता तडजोडीसाठी वळवळणाऱ्या अनेक क्षुद्र कीटकांना त्याने आपल्या झाडूच्या एका फटकाऱ्याने जमीनदोस्त केले आहे. देशाचे वैरी कोण ते त्याने स्पष्ट दाखवून दिले आहे. देशात शंभर ठिकाणी चळवळ होऊन जे कार्य व जागृती झाली नसती ती चर्चिलच्या या भाषणाने झाली आहे. काँग्रेसला आणखी हजारो, लाखो अनुयायी त्याने आपल्या करणीने मिळवून दिले आहेत. अशी भाषणे वारंवार व्हावयास हवीत. शासनकर्त्यांचे हे खरेखुरे अंतरंग आहे. ते जितके अधिक स्पष्टपणे लोकांना दिसेल तितके लोक अधिक सावध होतील. डायर, बर्कनहेड आणि चर्चिल या

त्रयींचे आम्ही नित्य आभारी असावयास हवे. आमच्यातील मरगळ, लत-कोडगेपणा, दास्यवृति, षंढता नाहीशी करण्याबद्दल ते अग्रगण्य होत.

मला हे भाषण वाचल्यापासून एक भीती वाटत आहे ती ही की, गांधीजी उपवास तर सुरू करणार नाहीत? त्यांच्या मनाला या भाषणामुळे डागण्या दिल्याप्रमाणे होईल. पण असल्या लोकांना उपवासाने वठणीवर आणता येईल अशी गांधीजी कल्पना करून घेतील काय? गांधीजींनी मुळी देखील या बाबतीत जिवाला लावून घेऊ नये.

१७ सप्टेंबर

कोर्टातील हेलपाटे सुरू आहेत. पण आता महत्त्व वाटण्याची ती चीज राहिली नाही. कोर्टाच्या समोरच्या पटांगणात हरळी उगविली आहे, तिच्यात शेकडो चिमुकली पिवळी फुले आहेत, हरळीवर पडलेल्या नाजूक उन्हात तऱ्हतऱ्हेच्या पाकोळ्या लिकलिक करीत हिंडत आहेत आणि चतुर भिरभिरत आहेत. पश्चिमेला दिसणाऱ्या किल्ल्याच्या तटापासून तो स्टेशनपर्यंत पसरलेले सगळेच्या सगळे नभोवितान वर दिसते आहे. माळरानावरचा मोकळा वारा वाहातो आहे. हे दृश्य तुरुंगातल्या माणसाला मोठे सुखद वाटावे असेच आहे. बाहेरचे वर्तमानही स्फुरण चढवणारे आहे. या वेळी मी असल्या मुर्दाड गावी खितपत पडावयास नको होते. भेरी-तुतारी तिकडे निनादत आहेत.

'तुडुम् तुडुम् मग झडे नगारा
एल्गाराचा देत इषारा'

मोठे अचाट कृत्य घडत असता त्यात सहभागी होण्याची तळमळ लागलेल्याला एकीकडे कोंडून पडावे लागले म्हणजे जसे गुदमरल्यासारखे वाटेल तसे मला वाटत आहे. माझे सहकारी आणि माझे देशबांधव नचिकेताप्रमाणे मृत्यूच्या दरबारात जाण्यासाठी निघालेले आहेत हे मला दिसत नाही काय? या वेळी माझ्या पायातील ही शृंखला मोठी जाचक झालेली आहे. पण...?

२ ऑक्टोबर

आज गांधीजींचा ७५ वा वाढदिवस आहे. तुकारामाच्या एका अभंगाची आठवण झाली.

> काय वानूं आता न पुरे हे वाणी। मस्तक चरणीं ठेवीतसें। थोरीव सांडिली आपली परिसें। नेणें शिवो कैसें लोखंडासी। जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती उपकारें। भूतांची दया हें भांडवल संतां। आपुली ममता नाहीं देहीं। तुका म्हणे सुख पराचिया सुखें। अमृत तें मुखें स्त्रवतसे।

गांधीजी लोकोत्तर पुरुष आहेत, युगकर्ते आहेत, त्रिखंडविख्यात आहेत,

झुंजार आहेत या गोष्टींपेक्षा हिंदुस्थानातील जनता त्यांना पित्यासमान मानते ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे. मला वाटते आज जगात स्टॅलिन व्यतिरिक्त एकही असा सर्वाधिकारी नाही की, ज्याला ही अनन्य सामान्य पदवी प्राप्त झालेली आहे. पण मी गांधीजींना स्टॅलिनपेक्षाही अधिक गुण देईन. कारण स्टॅलिन हा अधिकारचिन्हांकित आहे. गांधीजींच्या हाती काही म्हटल्या काहीच नाही. रामगड काँग्रेसच्या वेळी ऑ. इं. काँ. कमिटीत केलेल्या भाषणात ते जे म्हणाले होते त्याची मला आठवण झाली. "माझ्या म्हणण्याला तुम्ही होकार दिला आणि नंतर तुम्ही तुमचा शब्द मोडला तर मी तुमचे काय करू शकणार आहे? तुमचे शासन करण्यासाठी मजपाशीकाय साधन आहे? काहीही साधन नाही. एका प्रेमाव्यतिरिक्त मजपाशी दुसरे कोणतेही साधन नाही." आपल्या लेकराबाळांची पित्याला जशी अहर्निश चिंता असावी त्याप्रमाणे त्यांना अहर्निश देशाची तळमळ लागलेली आहे. जनतेला खावयास मिळेल कसे, तिला शिक्षण मिळेल कसे, ती स्वयंपूर्ण बनेल कशी, तिची प्रतिष्ठा वाढेल कशी, ती स्वाभिमानी कशी बनेल, ती प्रतिकारसंपन्न कशी होईल असे प्रश्न त्यांच्या मनात सदैव घोळत असतात. त्याचमुळे ब्रह्मचर्य, चरखा, खादी, ग्रामोदयोग, शिक्षण, सफाई, अन्नपाणी, गृहस्थाश्रम इत्यादी समाजाला स्पर्श करणाऱ्या अनेक विषयांवर त्यांनी मनन केलेले आहे. पुरुषसूक्तात हजारो तोंडांनी, हजारो हस्तपादादि अवयवांनी संपन्न अशा ज्या समाजपुरुषाचे वर्णन केलेले आहे त्याचे ते निस्सीम उपासक आहेत. त्यांचा ईश देवळारावळात कोंडलेला नाही. तो जनतात्मा आहे. ते थोर राष्ट्रोपासक आहेत. त्यांची राष्ट्रोपासना निर्वैर आहे आणि म्हणूनच ती उच्चतम आहे.

उपनिषत्कालापासून अव्याहत चालत आलेल्या भारतीय संस्कृति-वेलीचे हे अत्यंत मधुर आणि पक्व फळ आहे. अद्‌वैतवेदांत हा गांधीजींच्या सर्व कृतींचा आणि उक्तींचा नि:संशय आधार आहे. असे अहिंसामय समर्पित जीवन हे अद्‌वैत वेदान्ताव्यतिरिक्त केवळ अशक्य आहे.

आज त्यांना पंचाहत्तरावे वर्ष लागत आहे. ते शंभर वर्षे जगोत!

पण आज त्यांच्या मनात काय कोलाहल चालेला असेल! हा विचार मानत आला की, माझे मन धाकधूक करू लागते. हिंदुस्थानातली परिस्थिती पाहून त्यांना काय वाटत असेल? या सर्व गोष्टी ते निमूटपणे सहन करू शकतील काय? देशाभोवती जे पाश करकचून आवळले गेले आहेत, ते तोडण्याकरता देश हातपाय झाडीत आहे, दात पिशीत आहे.... त्यामुळे मला अशी भीती वाटते की, गांधीजी या वेळी एकादद्या दिव्यात तर उडी घेणार नाहीत?....



# दिगंबरराव बिंदू

जन्म १८९६, मृत्यू १९८१

**हैद्राबादच्या स्वातंत्र्यसंग्रामातील नेते**

जन्म भोकर. (नांदेड जिल्हा, मराठवाडा) येथे झाला. नांदेड आणि पुणे येथे शिक्षण घेतल्यानंतर वकिलीची परीक्षा दिली. हैद्राबादच्या विवेकवर्धिनी या संस्थेत अध्यापकाचे काम करीत असता त्यांचा हैद्राबादच्या सार्वजनिक जीवनाशी संबंध आला. त्यानंतर हैद्राबादला निजाम विजय या साप्ताहिकाच्या संपादनाचे काम स्वीकारले. 'नागरिक' या सरकारी रोषास बळी पडलेल्या साप्ताहिकातही नियमित लेखन.

हैद्राबादच्या जनतेत जागृती करण्याच्या कार्यात बिंदू यांनी पुढाकार घेतला. स्टेटस् रिफॉर्मस् असोसिएशन (१९२०), तसेच गणेशोत्सवाची चळवळ त्यांनी सुरू केली. परतूर येथे महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन त्यांनी भरवले. हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या संस्थापकांपैकी ते एक प्रमुख कार्यकर्ते यासाठी दोन वर्षांचा कारावास सोसला. १९३८ साली कारावासातून सुटल्यावर त्यांनी राजकीय चळवळीला वाहून घेतले. निझाम सरकारने स्टेट

काँग्रेसवरील बंदी उठवल्यावर त्यांची स्टेट काँग्रेसच्या कार्यकरिणीवर निवड. १९४७ साली रामानंद तीर्थ यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या स्टेट काँग्रेसच्या अधिवेशनात हैद्राबाद संघराज्यात सामील व्हावे यासाठी तीव्र लढा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

हैद्राबाद संस्थान मुक्त झाल्यावर पुनर्रचित स्टेट काँग्रेसचे ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले. १९७० साली स्टेट काँग्रेस भारतीय काँग्रेसमध्ये विलीन. हैद्राबादच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत यशस्वी आणि पहिल्या मंत्रीमंडळात त्यांची गृहमंत्री म्हणून निवड १९५७ साली राज्यपुनर्रचनेनंतर झालेल्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. त्यानंतर ते राजकारणातून जवळजवळ निवृत्त झाले.

नोव्हेंबर १९८१ ला नागपूर येथे त्यांचे निधन झाले. 'हैद्राबाद राज्याचे विसर्जन' या त्यांच्या अप्रकाशित आत्मवृत्तातून हा उतारा सादर करण्यात येत आहे.

## अखेरचा लढा

दिगंबरराव बिंदू

या लढ्याचा शेवट आमच्या आणि हैद्राबाद सरकारच्या तडजोडीने घडून येईल असे आम्हाला कधीच वाटले नाही. १५ ऑगस्ट (१९४७) जवळ येत चालला तसतसे निजाम सरकार दडपशाहीची शस्त्रे परजू लागले. निजाम सरकारने एक फर्मान काढून राष्ट्रध्वजाला वंदन करणे हा कायद्याने शिक्षापात्र 'गुन्हा' ठरविला. त्यामुळे लढ्याचा प्रारंभ ध्वजवंदनाने होणे क्रमप्राप्त ठरले!

१५ ऑगस्ट १९४७ ला दिल्ली, मुंबई आदी ठिकाणी राष्ट्रीय ध्वजाला समारंभपूर्वक मानवंदना देण्यात आली. भारताच्या गव्हर्नर जनरलांनी पंतप्रधान व इतर मंत्री यांना समारंभपूर्वक शपथ देऊन स्वतंत्र राष्ट्र व त्याचे सरकार अस्तित्वात आल्याचे घोषित केले. त्याच दिवशी हैद्राबाद येथे रामानंदतीर्थ आणि डॉ. मेलकोट यांनी राष्ट्रध्वजास वंदन करून सत्याग्रह केला. हैद्राबाद राज्यात इतरत्रही जिल्हा व तालुका समित्यांच्या वतीने स्थानिक नेत्यांनी असाच सत्याग्रह केला. संस्थानाबाहेर स्वातंत्र्योत्सव मोठ्या प्रमाणात चालू असतानाच निजाम सरकार मात्र हजारो कार्यकर्त्यांना राष्ट्रध्वजास वंदन केल्याच्या 'गुन्ह्यावरून' तुरुंगात पाठवीत होते.

आमच्या स्वातंत्र्य-युद्धाला तोंड पडले ते असे!

सप्टेंबर महिन्यात (१९४७) लढा सुरू होऊन एक महिना पूर्ण झाला. मुंबईहून पंजाबमेलने आम्ही दिल्लीस रवाना झालो. राहण्याची सोय लागल्या-नंतर आम्ही सरदार पटेल यांच्या निवासस्थानी गेलो. त्यांचे चिरंजीव डाह्याभाई पटेल यांची भेट झाली. त्यांनी सरदारांना आम्ही आल्याची सूचना देऊन नंतर त्यांच्याकडे आम्हाला नेले. आम्ही सरदारजींना लढ्याची परिस्थिती निवेदन केली. 'स्वामीजी आणि इतर कार्यकर्ते यांना अटक झाली आहे, आम्ही बाहेर राहून कार्य करीत आहोत' असे सांगितले. लढा चालविण्यासंबंधी आम्हाला सूचना मिळाव्यात अशी विनंतीही आम्ही त्यांना केली.

ते म्हणाले, 'आपली परिस्थिती लक्षात घेऊन जे काय करता येईल ते करा. पण, लढा मात्र सतत चालू ठेवा. लढा थंड पडला तर आम्हीही थंड पडू. लॉर्ड माउंटबॅटन गेल्यानंतर मात्र अवश्य भेटा. त्यावेळी आम्हाला तुमची

आवश्यकता भासेल. पण, तत्पूर्वी देखील अधून-मधून भेटण्यास हरकत नाही. माझ्याने होईल तेवढे साहाय्य मी करीन."

त्यांनी लगेच आपले खाजगी चिटणीस श्री. शंकर यांना बोलावून घेतले आणि सांगितले की, 'ही मंडळी जेव्हा जेव्हा येतील तेव्हा त्यांना भेट मिळण्यास अडचण पडणार नाही अशी व्यवस्था करा.'

सरदारजींची भेट घेतल्यानंतर फुलचंदजींचे (गांधी) एक परिचित उदद्योगपती डालमिया यांच्याकडे गेलो. इंडियन एक्सप्रेस या पत्राचे मालक गोयंकाजी तेथेच बसलेले होते. ते म्हणाले, 'तुम्ही सरदारांना भेटला हे चांगले केले. पण व्ही. पी. मेनन यांचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. मी तो करून देतो.' त्यांनी ताबडतोब मेनन यांना फोन लावला. नंतर आम्ही त्यांच्या घरी गेलो. या परिचयाने त्यांना खूप आनंद झाला. हळुहळू माझा आणि मेनन यांचा स्नेह वाढत गेला. ते राजकारणी व चतुर गृहस्थ आहेत हे कळावयास मला उशीर लागला नाही. ते पूर्वी व्हाइसरॉयचे रिफार्म्स ॲडव्हाइजर होते. नव्याने स्थापन करण्यात आलेल्या स्टेटस् डिपार्टमेंटची जबाबदारी आता त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. काळात मेनन यांच्या स्नेहाचा मला बराच उपयोग झाला.

एकदा दिल्लीच्या सेक्रेटरिएटमध्ये मी त्यांना भेटायला गेलो असताना ते आपल्या खोलीत नव्हते. शिपायाने सांगितले की 'ते पाच-दहा मिनिटांत येतील, तुम्हाला बसवून घेण्यास सांगितले आहे.' शिपायाने मला एका हॉलमध्ये नेले. 'प्रिन्सेस रिसेप्शनरूम' असे त्या हॉलच्या दर्शनी भागावर लिहिले होते. मी त्या शिपायाला म्हणालो, 'ही राजे-रजवाडे यांची बसण्याची जागा आहे.' शिपायाने उत्तर दिले, 'याच ठिकाणी तुम्हाला बसवा असे साहेबांनी सांगितले आहे.' समोरच असलेल्या एका सोफ्यावर त्याने मला बसविले. बाजूस बसलेल्या माणसास सहजच कोठून आलात? असा प्रश्न केला. त्याने सांगितले, 'मी ध्रांगध्रा संस्थानाचा महाराजा आहे.' जवळच इतर संस्थानचे राजेही बसले होते. मेनन आले ते सरळ माझ्याकडेच. ते आल्यावर इतरांप्रमाणे मीही उठून उभा राहिलो. 'आपण खोलीत बसून बोलू या' असे सांगून मेनन मला आपल्या खोलीत घेऊन गेले. जाताना जमलेल्या राजेरजवाडयांना उद्देशून ते म्हणाले, 'मी प्रथम यांच्याशी बोलून घेतो; नंतर क्रमाने आपल्याशी बोलेन.' मला या वागणुकीचे आश्चर्य वाटले. माझा भाव ओळखून आपल्या जागेवर बसता बसता मेनन म्हणाले, 'नव्याने उदयास येणाऱ्या लोकशक्तीचे तुम्ही प्रतिनिधी आहात. त्यामुळे तुमचे महत्त्व अधिक.' त्यानंतर त्यांनी हैदराबादच्या संबंधात बरीच महत्त्वाची माहिती दिली.

आमच्या कार्यकर्त्यांचे मनोधैर्य कायम ठेवण्यास या माहितीचा बराच उपयोग झाला.

मुंबईत परतल्यावर ॲक्शन कमिटीची एक बैठक घेतली आणि दिल्लीला झालेल्या विचारविनिमयाचा आढावा समितीपुढे मांडला. त्यावेळी माडपारी रामचंद्रराव यांनी अशी सूचना केली की स्टेट काँग्रेसचे मध्यवर्ती कार्यालय मुंबईच्या ऐवजी मद्रास येथे असावे. कारण, त्या योगे तेलंगणभागाशी निकटचा संपर्क साधता येईल. ही सूचना सर्वांनी मान्य केली. कार्यालय मद्रास येथे हलविण्याचे निश्चित झाले.

मद्रासला आमचे कार्यालय व्यवस्थित सुरू झाल्यानंतर एके दिवशी बॅ. विनायकराव विद्यालंकार आमच्या कार्यालयात आले. त्यांनी एक योजना लढ्याला पाठिंबा देण्याच्या निमित्ताने तयार केली होती. संस्थानच्या सर्व वकिलांना कोर्टावर बहिष्कार घालण्याचे आवाहन या योजनेनुसार करण्यात आले होते. 'प्लीडर्स प्रोटेस्ट कमिटी' या संघटनेच्या वतीने हे आंदोलन सुरू होणार होते. रजाकारांनी केलेल्या अत्याचाराची माहिती मिळताच वकील मंडळी त्या त्या स्थळी जात, माहिती मिळवीत. ही माहिती भारत सरकारकडे पाठविण्यात येत असे. पुढे के. एम्. मुनशी यांची हैदराबादचे एजंट जनरल म्हणून नेमणूक झाल्यावर त्यांच्याकडेही ही माहिती पाठविण्यात येत असे. माहितीचा सतत ओघ भारत सरकारकडे चालू झाल्याने हैद्राबादचा प्रश्न अत्यंत निकडीचा आहे ही भारत सरकारची समजूत दृढ होण्यास बरेच साहाय्य झाले.

"जैसे थे' कराराचे निमित्त करून वेळ काढण्याचा निजामाचा प्रयत्न दीर्घकाळ चालूच राहिला. पुष्कळदा तर अगदी क्षुल्लक कारणावरून वाटाघाटीत खंड पडत असे. अशाच एका वाटाघाटीच्या वेळी हैद्राबादचे त्यावेळचे मुख्यमंत्री लायक अली सरदार पटेल यांच्याकडे चर्चेला गेले होते. निजामाचे कायद्याचे सल्लागार सर वॉल्टर मॉंक्टन त्यांच्या समवेत होते. संस्थानी विभागाचे सचिव मेननही तेथे उपस्थित होते. बोलणी चालू असताना लायक अली मध्येच सर वॉल्टर मॉंक्टन यांचा सल्ला घेत. किंवा सर वॉल्टर त्यांना अधून मधून सूचना देत. त्यामुळे वाटाघाटीत खंड पडे. काही काळ असा गेल्यानंतर सरदारांनी मध्येच विचारले, 'हे गृहस्थ आहेत तरी कोण?' निजामाचे कायद्याचे सल्लागार अशी लायक अलींनी यासंबंधी माहिती देताच सरदारजी म्हणाले, 'यांचा सल्ला घरी घेत जा. येथे बोलण्यात व्यत्यय नको!" या इषाऱ्याने लायक अली बरेच वरमले. (स्वत: व्ही. पी. मेनन यांनी ही माहिती नंतर मला दिली.)

वाटाघाटीचा हा घोळ चालू असतानाच संस्थानात रजाकरांचे अत्याचार सारखे वाढत होते. निजामाच्या हाती असलेली सत्ता रजाकार संघटनेकडे

संक्रमित होत असलेली दिसत होती. शेवटी एकदाचा 'जैसे थे करार' झाला. मेनन यांच्या चतुराईने इतर संस्थानाशी झालेल्या करारापेक्षा हैदराबादच्या या कराराला निराळे स्वरूप दिले. संरक्षण आणि परराष्ट्रसंबंध संपूर्णपणे भारत सरकारच्या अख्त्यारीत ठेवण्याचे महत्वाचे कलम या करारात होते. या करारावर निजामाने सही करू नये असा कासिम रझवीचा आग्रह होता. तथापि, करार केवळ एका वर्षासाठी असल्याने व बोलारम् येथील भारतीय फौजा परत घेण्याचे भारत सरकारने मान्य केल्याने निजामाने या करारावर सही केली.

तथापि, हैद्राबादचा प्रश्न त्यामुळे सुटला नाही!

याच सुमारास मी आणि गोविंददास श्रॉफ दिल्लीस गेलो असताना महात्मा गांधीची भेट घेतली. महात्माजी नुकतेच नौखालीहून परत आले होते. बिर्ला भवनात त्यांचा मुक्काम होता. आम्ही ज्या गाडीने दिल्लीस पोचलो त्याच गाडीत आंध्रचे कालेश्वररावही होते. रात्री साडेनऊ वाजता कालेश्वरराव आमचा शोध काढीत आमच्या मुक्कामी आले. त्यांनी निरोप दिला. 'उद्या सकाळी सात वाजता गांधीजींनी तुम्हाला भेटीला बोलावले आहे.' आम्ही दुसरे दिवशी गांधीजींना भेटलो.

गांधीजींना जे सांगावयाचे ते अगदी खरे खरे सांगावयाचे मग त्याचे परिणाम काहीही होवोत असे आम्ही ठरविले होते. बोलण्याची जबाबदारी अर्थात् माझ्यावर होती. लढ्याची सुरवात आणि आतापर्यंतची वाटचाल याविषयी सारांश रूपाने माहिती मी गांधीजींना दिली. 'आम्ही निजामाला मानत नाही. निजामानेही रजाकारांच्या अत्याचाराला मुक्त वाव दिला आहे. अशा परिस्थितीत लढा शांततामय आणि अहिंसक राहू शकत नाही. आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना रजाकारांचा सशस्त्र प्रतिकार करण्यास सांगितले आहे. आमची शक्ती आहे तेवढ्या प्रमाणात आम्ही सशस्त्र प्रतिकार करीत आहोत. तथापि, निजामाचे सामर्थ्य मोठे आहे. या वातावरणात लोकांचे रक्षण करण्याची जबाबदारी भारत सरकारची आहे. आम्ही रजाकारांचा सशस्त्र मुकाबला करू.'

अहिंसेचा आजन्म पुरस्कार करणाऱ्या महात्म्याजवळ आमच्या सशस्त्र प्रतिकारासंबंधाने मी बोलून तर गेलो. त्यांची प्रतिक्रिया एकदम प्रतिकूल राहील याविषयी माझी खात्री होती.परंतु, सत्य प्रकट करणे भाग होते. आम्ही दोघेही महात्माजी यावर काय म्हणतात याची उत्सुकतेने वाट पहात होतो.

गांधीजी शांतपणे म्हणाले, 'तुम्ही करता ते ठीक आहे. पण माझे म्हणणे असे आहे की, भारत सरकारने हैदराबादवर फौज रवाना करावी. काश्मीरबाबतही मी हाच सल्ला दिला होता. निजाम सरकार आणि भारत सरकार जोवर तहाची बोलणी करीत आहेत तोपर्यंत भारत सरकारला हे

काहीच करता येणार नाही.' त्यावर मी म्हणालो, 'ही बोलणी ढोंगीपणाची आहेत. या निमित्ताने आपली निरंकुश सत्ता भारत सरकारने मान्य करावी अशी निजामाची इच्छा आहे. संपूर्ण राज्यात अराजक माजले आहे. राज्यकारभार विस्कळित झाला असून लोकांचे जीवित, वित्त आणि अब्रू धोक्यात आहे. भारत सरकारने फौजा पाठविण्यास दिरंगाई करणे अक्षम्य ठरेल."

त्यावर गांधीजींनी प्रश्न केला, 'सरदार व जवाहर यांना भेटला काय?' 'आम्ही भेटणार आहोत' असे सांगताच गांधीजी म्हणाले, 'भेटा, अगदी अवश्य भेटा. आणि मला जे सांगितले तेच त्यांनाही सांगा.'

मी विचारले, 'तडजोडीच्या वाटाघाटी रेंगाळत राहिल्या तर मध्यंतरीच्या काळात आम्ही काय करावे?' भारत सरकारला वाटाघाटीत गुंतवून ठेवून जनतेचे नैतिक धैर्य खच्ची करणे हे निजामाचे सध्याचे धोरण आहे. स्वस्थ बसणे आम्हाला शक्य होणार नाही.'

गांधीजी लगेच म्हणाले, 'दरम्याच्या काळात काय करावे या प्रश्नाचे उत्तर मजजवळ आहे. परंतु ते मी तुम्हाला सांगणार नाही. जवाहर किंवा सरदार यांना सांगेन. तुम्ही त्यांना भेटाल तेव्हा मी तुम्हाला काय म्हणालो तेही अवश्य सांगा.'

गांधीजींचा निरोप घेतल्यावर आम्ही सायंकाळी नेहरू आणि सरदार पटेल यांना भेटलो. त्यांना वस्तुस्थिती निवेदित केली. त्याचप्रमाणे महात्मा गांधींची प्रतिक्रियाही त्यांना सांगितली.

आमचा मुक्काम मुंबईला असतानाच सरदार पटेल आपल्या मुलाकडे मुंबईला मुक्कामाला होते. स्वामीजी दिल्लीहून परत आले होते (निजामाशी 'जैसे थे' करार झाल्यानंतर निजाम सरकारने स्वामीजींची तुरुंगातून मुक्तता केली होती). दिल्ली भेटीने त्यांचे समाधान झालेले दिसले. मुंबईला सरदार पटेल यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या फिरण्याच्या वेळात आम्ही गेलो. पुन्हा सरदारांची भेट कधी होईल याची निश्चिती नसल्याने स्वामीजींनी त्यांची भेट घेतली. सरदारांचे व स्वामीजींचे बोलणे झाले. त्यांना त्यांच्या निवासस्थानावर पोचवून आम्ही परतलो. माधवबागेजवळ ठक्करनिवासात एक खाणावळ होती. त्याठिकाणी स्वामीजींसाठी काही पदार्थ घेऊन मी बिऱ्हाडी परतलो तेव्हा स्वामीजी बरेच अस्वस्थ दिसले.

मी त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली तेव्हा ते म्हणाले, 'प्रकृती ठीक आहे. पण दुसरीच एक भानगड होऊन बसली आहे. गोविंददास आणि वैशंपायन यांनी राजीनामे दिले आहेत." या राजीनाम्यांच्या कारणांची चौकशी केली असताना

असे समजले की, लढ्याचे स्वरूप अहिंसक असावे की हिंसक असा सकाळी स्वामीजींनी सरदारांना प्रश्न विचारला होता. 'काँग्रेसचे धोरण अहिंसेचे आहे' असे सरदारांनी त्यावर उत्तर दिले होते. ही गोष्ट स्वामीजींनी आपल्या सहकाऱ्यांना सांगितली व लढ्याचे स्वरूप हिंसक नसावे असा आदेश दिला. त्यानंतर या दोघांनी राजीनामे दिले.

हे भलतेच काहीतरी होऊन बसले होते. मी स्वामीजींना सांगितले, 'तुम्ही हैदराबादी परत जा. तुम्हाला अटक होईलच. पुढचा कार्यभाग आम्ही सांभाळून घेऊ.' माझे म्हणणे स्वामीजींना पटले. ते हैदराबादला रवाना झाले व मी सर्व कार्यकर्त्यांना घेऊन चौपाटीवर गेलो. तेथे आम्ही अनौपचारिकपणे विचार-विनिमय केला. कार्यकर्त्यांना मी सांगितले, 'अॅक्शन कमिटीचा पराजय हा निजामाचा विजय असे सध्याचे समीकरण आहे. निजामाला विजय मिळेल असे सध्या आपण काहीच करू नये. पूर्वीसारखे काम करू या; आखलेले कार्यक्रम अमलात आणू या.'

कार्यकर्त्यांना माझी भूमिका पटली आणि निर्माण झालेले तात्त्विक वादळ तेथेच शांत झाले.

इकडे, हैदराबाद संस्थानच्या सरहद्दीत प्रवेश करताच स्वामीजींना निजामी पोलिसांनी अटक केली आणि त्यांना गुलबर्गा येथील तुरुंगात बंदिस्त केले (२६ जानेवारी, १९४८)

आम्ही लढ्याचे जे निरनिराळे कार्यक्रम घेतले ते बरेच परिणामकारक ठरले. झेंडावंदनाच्या कार्यक्रमात संघटनेचे सर्वव्यापी स्वरूप दिसून आले. दुसरा कार्यक्रम जंगलसत्याग्रहाचा. त्या काळात शेतात असलली शिंदीची झाडे तोडणे हा गुन्हा होता. ही झाडे तोडणे हा लढ्याच्या कार्यक्रमाचा एक भाग होता. तद्नुसार हजारो शिंदीची झाडे कापून फेकून देण्यात आली. वहितीला रानही मोकळे झाले व सरकार-विरोधही झाला. या कार्यक्रमापायी परभणी जिल्ह्यात एक कार्यकर्ता मारला गेला. तिसरा कार्यक्रम हैदराबाद राज्याला वेगळे ठेवणारी, विशेषाधिकाराची निशाणी असलेली करोडगिरी. सरहद्दीवरच्या गावांत जागोजाग असलेली करोडगिरीची नाकी आणि इमारती यांना उध्वस्त करण्यात आमच्या कार्यकर्त्यांनी यश मिळविले. लढ्याच्या शेवटच्या पर्वात तर कित्येक गावांनी आपण निजामाच्या राजवटीतून मुक्त झाल्याचे घोषित केले, व लगतच्या प्रांतातील मुलकी अधिकाऱ्यांनी आपल्या प्रांतांचा एक भाग म्हणून त्या त्या भागाचे प्रशासन करावे अशी मागणी केली. तेलंगण, कर्नाटक आणि मराठवाडा या तिन्ही भागांत अशी 'स्वतंत्र नगरे' अनेक ठिकाणी उदयास आली आणि पोलीस कारवाई होईपर्यंत आमच्या कार्यकर्त्यांच्या हाती तेथील प्रशासन

राहिले. ही ठाणी परत घेण्याचे निजामी लष्कर आणि पोलीस यांचे प्रयत्न आमजनतेने संघटित होऊन हाणून पाडले. अशा 'मुक्त' झालेल्या अनेक गावांत मी जाऊन आलो. तेथे भाषणेही केली. सरहद्दीवरील कार्यकर्त्यांच्या प्रत्येक शिबिराला मी एकदा तरी भेट दिली आहे.....................

..................... मद्रास येथे असतानाच मेजर जनरल रुद्र हे एकदा भेटावयास आले होते. ते इंग्रजी भाषेत बोलत होते त्यामुळे ते कोणत्या प्रातांचे आहेत हे कळण्यास मार्ग नव्हता. तरी ते ख्रिस्ती आहेत एवढे समजले. मे. ज. रुद्र यांना हैदराबादेस जाऊन सर्व विभागाची पाहणी करावयाची होती. सर्व बाजूंनी प्रवेश करताना लष्कराच्या मार्गात कोणकोणत्या अडचणी येऊ शकतील यांचा अंदाज त्यांना घ्यावयाचा होता. ज्या भागात जावयाचे त्या भागातील आमच्या कार्यकर्त्यांचा परिचय व्हावा या हेतूने ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांच्या नावे मी पत्रे दिली. नंतर साध्या वेषात ते हैद्राबादला (संस्थानातील सर्व विभागात) जाऊन आले. परतल्यावर त्यांनी पुढची योजना आखली.....................

.....................पोलिस कारवाई झाली तेव्हा प्रत्येक भागातील लष्कराबरोबर आमचे कार्यकर्ते होते. लष्कराचे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांचा खूपच उपयोग झाला.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# मोहन धारिया

जन्म १४ फेब्रुवारी १९२५

जन्म रायगड जिल्ह्यातील रायगड किल्ल्याजवळच्या नाते या गावी. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण महाड येथे. शाळेत असताना सेवादलात दाखल. महाविदयालयीन शिक्षणासाठी पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजात दाखल झाले. पण ४२ च्या चळवळीत कॉलेजला रामराम ठोकून चळवळीत सामील. काही काळ कारावास. त्यानंतर पुणे येथे स. प. कॉलेजमध्ये प्रवेश. या काळात विदयार्थी चळवळीत भाग. तसेच मोटार वाहतुक कामगार आणि पोस्ट कर्मचारी यांच्या चळवळीचे नेतृत्व. स्वतंत्र जंजिरा संस्थानच्या हंगामी सरकारची स्थापना करण्यात पुढाकार. म्हसळे आणि श्रीवर्धन तालुक्याचा कारभार हाती घेतला. त्यानंतर पुणे येथे वकिलीचा व्यवसाय. या काळात प्रजासमाजवादी पक्षात प्रवेश. नंतर यशवंतराव चव्हाणांच्या आग्रहावरून महाराष्ट्र काँग्रेस संघटनेत निवडणूक यंत्रणेचे आणि कार्यालयाचे प्रमुख. १९६२-१९६४ साली राज्यसभेवर निवड. १९७१ साली पुणे शहरातून लोकसभेवर निवड. संसदेत यंगटर्कचे एक प्रमुख. संसदेतर्फे लीडर्स

एक्चेंज प्रोग्राममध्ये अमेरिकेचा दौरा. १९७१ साली लोकसभेवर पुन्हा निवड. इंदिरा गांधीच्या मंत्रीमंडळात नियोजन राज्यमंत्री म्हणून निवड. विरोधी पक्षीयांबरोबर राष्ट्रीय पातळीवर चर्चा करण्याच्या प्रश्नावरुन १९७५ साली मंत्री मंडळाचा राजीनामा. १९७५ साली आणीबाणी जाहीर झाल्यावर कारावास. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत जनता पक्षातर्फे संसदेत निवडून आले आणि मोरारजी मंत्री मंडळात वाणिज्य मंत्री म्हणून नेमणूक.

प्रस्तुत उतारा त्यांच्या सफर या आत्मवृत्तातून सादर करण्यात येत आहे.

## स्वतंत्र जंजिरा संस्थान

मोहन धारिया

भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आणि स्वतंत्र भारत पाहण्याचे भाग्य ज्या महाभागांना लाभले त्यांमधील आपण एक आहोत याचा सार्थ अभिमान मला नेहमीच वाटतो. स्वतंत्र भारतामध्ये विलीन होण्यास काही संस्थानिक तयार नव्हते. हैदराबाद संस्थान त्यामध्ये अग्रभागी होते. कुलाबा जिल्ह्यामधील जंजिरा संस्थानच्या सिद्दीनेही विलीनीकरणास नकार दिला आणि पाकिस्तानमध्ये विलीनीकरण करण्याच्या कारवाया सुरू केल्या. जंजिरा संस्थान अरबी समुद्राच्या काठावरच होते आणि श्रीवर्धन-जंजिरा- मुरुड बंदरामार्फत कराचीबरोबर सरळ सबंध ठेवणे शक्यही होते. ही वार्ता आम्हाला समजली. भारताच्या दृष्टीने ही घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची होती. भारत सरकारकडून अथवा मुंबईच्या शासनाकडून कोणतीही हालचाल दिसेना. आमचे रक्त उसळले. नानासाहेब पुरोहित व आम्ही काही सहकारी मित्रांनी सशस्त्र हल्ला करून संस्थान ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला; आणि त्याप्रमाणे पावले टाकण्यास सुरुवात केली. महाड-माणगाव तालुक्याला लागूनच जंजिरा संस्थानातील म्हसळे तालुका होता. म्हसळे तालुक्याच्या सरहद्दीवर खामगाव येथे आमची लष्करी छावणी उघडली. स्वतंत्र जंजिरा संस्थानचे हंगामी सरकार तेथे सुरू झाले.

नानासाहेब पुरोहित त्या हंगामी सरकारचे पंतप्रधान होते, सदाशिव बागाईतकर गृहमंत्री, मी परराष्ट्रमंत्री, जनार्दन भोकरे संरक्षणमंत्री याप्रमाणे आमचे मंत्रिमंडळ तयार झाले. शिवाजीराव सावंत, राजाभाऊ चांदोरकर, हरीभाऊ भडसावळे, रामभाऊ साठे (तळेकर), आझाद हिन्द सेनेतील श्रीपत गणपत चौधरी, केशव खांबेटे (म्हसळे), मदन आबा सावंत (अंबेत), याप्रमाणे अन्य सहकारीही आमच्याबरोबर होते. आमच्या सैन्यामध्ये सुमारे पंधराशे शेतकरी व लष्करातून निवृत्त झालेले शिपाई (चाकरमाने) सहभागी झाले. काही पिस्तुले, रायफल्स व उखळी बंदुका आम्ही पैदा केल्या. हल्ल्याची तयारी पूर्ण होत असतानाच सिद्दीला आमच्या हालचालींचा सुगावा लागला आणि त्याने संस्थानातील एक कर्तबगार डी. एस. पी. इसहाक पठाण यांच्या

नेतृत्वाखाली भलीमोठी पोलिसांची एक सुसज्ज तुकडी म्हसळ्याला रवाना केली. त्यांच्याजवळ ३०३ च्या उत्कृष्ट नव्या बंदुका व इतर आधुनिक साधने होती. संख्येने आम्ही भारी असलो तरी एवढ्या मोठ्या सुसज्ज पोलिसबळाला आणि त्यांच्या आधुनिक शस्त्रास्त्रांना तोंड देऊन यशस्वी होणे केवळ अशक्य होते. तसा संघर्ष झाला असता तर आमचे अगदी पानिपत झाले असते. एकेक दिवस आमच्या दृष्टीने मोलाचा होता. फार काळ एक हजार सैनिकांची व्यवस्था ठेवणेही आमच्या दृष्टीने आवाक्याबाहेरचे होते. या परिस्थितीवर गनिमी कावा करूनच मात करणे शक्य होते.

हंगामी सरकारच्या मंत्रिमंडळाची बैठक झाली. नवीन आलेला अधिकारी पुरोगामी विचारांचा आहे असे वृत्त आम्हाला मिळाले होते. म्हसळे गावात मुसलमानांची संख्या अधिक होती. नुकताच तेथील एक व्यापारी नारायण शेठ याचा खून झाला होता, आणि दोन्ही समाजांतील वातावरण तंग होते. गोड बोलून दमदाटी करून त्या अधिकाऱ्याने पोलिस पार्टीसह शांतपणे निघून जावे म्हणून प्रयत्न करावा अथवा त्याला वाटाघाटीत गुंतवून शिताफीने हल्ला करावा असे ठरले. माझ्या नेतृत्वाखाली एक सशस्त्र शिष्टमंडळ म्हसळ्याकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. आमच्याबरोबर एक अर्धा टनी छोटीशी मोटार होती. जाण्यापूर्वी आमच्या हेर खात्यामार्फत संपूर्ण माहिती आम्ही मिळविली आणि सर्वांचा निरोप घेऊन आम्ही म्हसळ्याकडे कूच केले. वाटाघाटी यशस्वी झाल्या तर ठीकच; नाहीपेक्षा डोळे उघडे ठेवून सिंहाच्या गुहेत केलेला तो प्रवेश होता. सर्वांना त्याची जाणीव होती. त्यामुळे गंभीर वातावरणातच सर्वांना भेटून, त्यांच्या शुभेच्छा घेऊन भारतमातेचा जयजयकार करीत आम्ही निघालो होतो. म्हसळे गावात शिरण्यापूर्वी बाहेर आम्ही थांबलो. तेथे गावातील आमच्या सहकारी मित्रांना बोलावून घेतले. पुढील कारवाई करण्याच्या उद्दिष्टाने जागोजागी माणसे पेरण्याची व्यवस्था केली. नकाशे व योजना तयार केली. सर्व सूचना दिल्या आणि भारतमातेचे पुण्यस्मरण करून पोलिस कचेरीवर हजर झालो. माझ्याबरोबर जनार्दन भोकरे, शिवाजी सावंत, श्री. मुळे आदी सहकारी होते. मी सेवा दल अधिकाऱ्याचा वेष धारण केला होता. सहा बारी भरलेले पिस्तुल माझ्या कंबरपट्ट्यावर दिमाखाने विराजमान झाले होते. इतर सहकारीही सशस्त्र होते.

तिथे पोहोचलो आणि डी. एस. पी. ची भेट मागितली. त्याने आम्हाला आत बोलावून घेतले आणि तुम्ही कोण? तुमचे काम काय आहे? असे पोलिसी खाक्यात जरा दरडावूनच विचारले. 'जंजिरा संस्थानच्या हंगामी सरकारचा मी परराष्ट्रमंत्री आहे.' असे रुबाबात सांगून इतरांची ओळख करून देत असतानाच

तो खवळला. "मी हंगामी सरकार वगैरे काही जाणत नाही. तुम्ही मुकाट्याने परत जा, नाहीतर माझ्या गोळ्यांनाच तुम्हाला तोंड द्यावे लागेल." असा निर्वाणीचा इशारा त्याने दिला. त्याचा हात उजव्या हाताकडील टेबलाच्या खणाकडे जाऊन लागला. फार वेळ घालविण्यात अर्थ नव्हता. माझ्या पिस्तुलावर हात ठेवून मी ताडकन बोलावयास सुरुवात केली. "तुमचा हात ज्या ड्रॉवरकडे जात आहे तिथे सहा बारी पिस्तूले असून त्यामध्ये चार गोळ्या बाकी आहेत. तुमच्या पाठीमागील कपाटात ३०३ च्या बारा रायफल्स व सुमारे दोन हजार गोळ्या आहेत. तुमच्या घरी उशीखाली एक पिस्तूल असून ते संपूर्ण भरलेले आहे."

त्याच्या सर्व शस्त्रास्त्रांची गणती देऊन त्याच्या पोलिस दलाची व कोण कोठे आहे यासंबंधी दिलेली माहिती ऐकून तो अवाक झाला. ड्रॉवरकडे जाणारा हात रोखला गेला. माझी पट्टी पुढे चालू झाली. आमच्याकडे असलेल्या तुफान शस्त्रास्त्रांचा पाढा वाचण्यास मी सुरुवात केली. रायफल्सच काय पण चांगले बॉम्ब्स, टॉमी गन्स, मशीनगन्स आदी साहित्य आमच्याजवळ असून आमचे एक हजाराचे खडे सैन्य जय्यत तयार आहे याची त्याला जाणीव दिली. त्याच्यासारख्या शूर अधिकाऱ्याकडे अशा प्रकारे येणे म्हणजे सिंहाच्या जबड्यात आपले शरीर स्वतःहून देणे, आत्मसमर्पण करून घेणे याची जाणीव असूनही काही महत्त्वाच्या कारणासाठीच हा धोका पत्करला आहे, असे मुद्दाम सुचविले. त्याचा लालबुंद चेहरा हळूहळू निवळत होता. इतका धोका यांनी का पत्करला असेल असे त्याच्याही मनात आले असावे. खोटा आव आणून "तो फिर, आपको क्या कहना है?' अशी त्याने विचारणा केली. त्याचे अवसान ढळत आहे हे मी हेरले. त्याच्या कपाळावरील स्वेदबिंदूने ते अधिक स्पष्ट केले. त्याची परवानगी न घेताच एका खुर्चीवर विराजमान झालो आणि त्याच आत्मविश्वासात पुढील निवेदन सुरू केले.

"जंजिरा संस्थान भारतात विलीन होण्यास तयार नसल्यामुळे ते ताब्यात घेण्यासाठी आम्ही आलो आहोत. त्यासाठी हंगामी मंत्रिमंडळ आम्ही तयार केले आहे. परंतु एकाच अडचणीपुढे आम्ही थोडे हताश झालो आहोत. आपणास माहीतच आहे की, म्हसळे गावात बहुसंख्य वस्ती मुसलमान बंधुभगिनींची आहे. आपले सर्व पोलिस व आपण मुसलमान समाजाचे आहात. दुर्दैवाने आमचे सैन्यात सर्वच हिंदू धर्मीय आहेत. संस्थानाचा सिद्दीही मुसलमान आहे. नुकतीच म्हसळे गावात दंगल झाली आहे. अशा परिस्थितीत आम्ही हल्ला केला तर हिंदूंनी मुसलमानांवर हल्ला केला असा अर्थ लागण्याची शक्यता आहे. तुम्ही शूर आहात, आमच्या हल्ल्याचा प्रतिकार सर्व सामर्थ्यानिशी तुम्ही कराल. त्या लढाईत आमचे काही सैनिक तुमच्या गोळ्यांना बळी पडले तर मुसलमानांनी

हिंदूना मारले अशी भावना सर्वत्र फैलावेल. आमचे सामर्थ्य लक्षात घेता आम्ही यशस्वी होणार यात शंका नाही. परंतु आम्हाला हिंदु-मुसलमानांचे हत्याकांड नको आहे. आम्ही समाजवादी आहोत. हिंदु-मुस्लिम ऐक्यावर आणि समानतेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. तुम्ही पुरोगामी विचार करणारे अधिकारी आहात असे आम्हाला समजले. तुमच्याबरोबर वाटाघाटी करून सर्व अनर्थ टाळता आला तर प्रथम प्रयत्न करावा म्हणूनच सर्व हत्याकांड टाळण्यासाठी, म्हसळे गावातील मुसलमान माता व भगिनींचे वैधव्य टाळण्यासाठी हा धोका आम्ही पत्करला. माझे लग्न होऊन अद्याप एक महिनाही पूर्ण झाला नाही, तरीही काही चांगला मार्ग काढता आला तर पराकाष्ठा करावी म्हणून माझ्या हंगामी सरकारने मला इथे पाठविले आहे.''

त्याचा सर्व राग आता मावळला होता. सर्वांना बसण्यासाठी त्यांनी खुर्च्या मागविल्या आणि चहा घेणार का? अशी पृच्छा केली. आम्हीही होकार दिला. इतक्या गंभीर परिस्थितीतून जंजिरा संस्थान मुक्तीचा हा खडतर प्रवास करीत असताना घशाला चांगलीच कोरड पडली होती. आता थोड्या मोकळेपणाने आमची बोलणी सुरू झाली. 'कोणत्याही परिस्थितीत जंजिरा संस्थान पाकिस्तानमध्ये सामील होण्याची शक्यता नव्हती; पुढील काळाची दिशा ओळखून सिद्दीने शहाणपण दाखविणेच इष्ट ठरेल; किमान तुमच्यासारख्या चाणाक्ष अधिकाऱ्याने ती जाणीव देणेच सर्वांच्या हिताचे आहे; संभाव्य संघर्ष आणि अनर्थ टाळण्यासाठी तुम्ही होऊनच येथून निघून जाऊन सिद्दीला स्पष्ट सल्ला देणे आवश्यक आहे.' वगैरे विचार आम्ही मांडले. आश्चर्य असे की, त्या भल्या अधिकाऱ्याला आमचा सल्ला रास्त वाटला. मुसलमानांच्या केसालाही धक्का लागणार नाही असे त्यांनी वचन घेतले आणि तेथील स्थानिक मुसलमान पुढाऱ्याना चर्चेसाठी बोलावून घेतले, आमची ओळख वगैरे साठी. त्यानंतर त्यांनी मुसलमान नेत्याबरोबर बोलणी केली. हा मार्ग मंजूर करणे म्हणजे आत्मघात करणे असे स्थानिक मुसलमान नेत्यांना वाटले. त्यांनी फेरविचारासाठी दुपारपर्यंत वेळ मागून घेतली आणि पहिली बैठक संपवून आम्ही बाहेर पडलो.

गावाबाहेर जाऊन मित्रांशी संधान बांधले, झालेला वृत्तान्त आमच्या खामगाव छावणीकडे पाठविण्याची व्यवस्था केली. आतापर्यंत झालेल्या चर्चेमधून खूपच पल्ला आम्ही गाठला होता. तरीही खरी परीक्षा नंतरच होती. शांतपणे डबे सोडले, भोजन केले आणि परत दुपारच्या बैठकीसाठी पोलिस स्टेशनवर हजर झालो. आम्ही पोहोचण्यापूर्वीच मुसलमान नेते तेथे हजर झाले होते. आम्ही पोहोचताक्षणीच त्यांनी जोरजोरात कांगावा सुरू केला. 'केसालाही धक्का लागणार नाही असे हे सांगतात. परंतु आमची घरे जाळण्यास सुरुवात झाली

आहे; यांच्यावर आपला विश्वास नाही; हे शुद्ध काफिर आहेत.' या भाषेत आमची संभावना सुरू झाली. घरांची जाळपोळ करण्याचा कार्यक्रम आम्ही केव्हाही ठरविला नव्हता व ते कांगावा करीत आहेत असे मी निक्षून सांगितले. परंतु तो अधिकारी पुन्हा खवळला होता. 'कोठे आग लागली आहे ते सांगा,' असा मी आग्रह धरताच 'दोन मैलांवर आजच एक वाडा जाळण्यात आला' असे सांगण्यात आले. 'हे शक्य नाही' असे म्हणताच त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाण्याचा निर्णय घेण्यात आला. हे खरे असेल तर त्या जळणाऱ्या घरातच तुम्हाला गोळ्या घालून मारले जाईल असा स्पष्ट इशारा डी. एस्. पी. ने दिला. पोलिसांनी आम्हाला घेरले आमचा तो प्रवास सुरू झाला. आम्हाला त्या अवस्थेत नेताना आमच्या हेर मंडळींनी पाहिले आणि ती बातमी मुख्य कॅम्पवर पोचविण्यासाठी ते रवाना झाले.

हा आपला शेवटचा प्रवास आहे अशी छटा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उमटली होती. फारशी गडबड करण्याची शक्यता नव्हती. तसे केले असते तर आमच्या मुडद्याशिवाय काही उरले नसते. प्रसंग मोठा बाका होता. थोड्या वेळातच जळणाऱ्या वाड्याचे दर्शन झाले आणि काळजात चर्र झाले. जनार्दन भोकरेने नजरेनेच खुणावले की, आता धडगत नाही. पू. आईवडिलांचे, नातेवाइकांचे, तीन-चार आठवड्यांपूर्वीच लग्न झालेल्या माझ्या प्रेमळ पत्नीचे, ईश्वराचे आणि भारतमातेचे स्मरण केले आणि आनंदाने छातीवर गोळ्या झेलण्याच्या निर्धाराने पावले पुढे सरकू लागली.

जळणाऱ्या वाड्याजवळ पोहोचलो आणि डी. एस. पी. ची सिंहगर्जना झाली. 'अब क्या कहना है? कहो, नहीं तो ईश्वर का आखरी नाम लो.' मुसलमान नेत्यांचा आवाज तर त्याहीपेक्षा अधिक चढला होता. ईश्वराचे नाव घेण्याखेरीज अन्य काही मार्ग नव्हता. कदाचित त्या बिकट प्रसंगी त्यानेच प्रेरणा दिली असावी. तेथे एक बारा-तेरा वर्षांचा छोटा मुलगा आमच्याकडे व वाड्याकडे पाहात होता. त्याच्या तोंडातून कदाचित सत्य बाहेर पडेल असे वाटले आणि मी त्याला शांतपणे विचारले, "काय रे बाळ, काय झाले?" क्षणार्धात त्याच्या तोंडातून उद्‌गार बाहेर पडले, "क्या कहूँ? चाचाको बारबार कहा, खुद का मकान इस तरह मत जला दो। मगर उन्होंने माना नहीं और मकान जला दिया।" डी. एस. पी. ने ते ऐकले. त्या मुलाला जवळ बोलावून घेतले आणि पुन्हा तोच प्रश्न विचारला. त्या मुलानेही तेच उत्तर पुन्हा दिले. डी. एस. पी. ने मुलाकडे काकाची चौकशी केली. तो थोड्या अंतरावर होता. त्याला बोलाविण्यात आले. इतके पोलिस, डी. एस. पी. व नेते पाहून तो चांगलाच भेदरला. डी. एस. पी. ने खड्या आवाजात विचारणा करताच त्यानेही स्वतःच

तो वाडा जाळल्याचे मान्य केले आणि 'माझी काही तक्रार नाही, मला त्याबद्दल सर्व पैसे मिळाले आहेत' असा खुलासाही सादर केला. सर्व बनाव धूर्त डी. एस. पी. च्या ध्यानात यावयास मुळीच वेळ लागला नाही.

त्या मुसलमान नेत्यांनीच ते सर्व कारस्थान केले होते. कटू शब्दात हजेरी घेतल्याबद्दल त्याने आमची क्षमा मागितली व कोणत्याही मुसलमान बंधु-भगिनींना अथवा त्यांच्या मालमत्तेला मुळीच धक्का लागणार नाही असे वचन दया म्हणून मागणी केली. मी शपथेवर वचन दिले, इतकेच नव्हे तर असा काही प्रकार होण्यापूर्वी आम्ही जिवंत दिसणार नाही असा त्याला दिलासा दिला. त्याने आमच्यावर पूर्ण विश्वास ठेवण्याचा सल्ला त्या मुसलमान नेत्यांना दिला आणि पोलिस पार्टीसह मुरुडला ताबडतोब रवाना होण्याचा निर्णय तेथेच जाहीर केला. त्या मृत्यूच्या भयाण जबडचातून परतत असताना आम्हाला पुनर्जन्म देणाऱ्या त्या कोवळचा बालकाचे मी दर्शन घेतले. ईश्वराचे आभार मानले आणि परत म्हसळचाची वाटचाल सुरू केली. बेदरकारपणे स्वातंत्र्याच्या आंदोलनात उतरलो असताना पुन्हा एकदा नशिबाने खैर केली आणि प्रत्यक्ष मरणाच्या दाढेतून परत खेचून घेतले. त्या लहान मुस्लिम मुलाच्या रूपाने ईश्वरानेच आपले दर्शन दिले होते.

ठरल्याप्रमाणे डी. एस. पी. पठाण पोलिस तुकडीसह निघून गेले. आमच्या शिष्टमंडळाने केलेली शिष्टाई पूर्णपणे सफल झाली. त्याप्रमाणे मुख्य कॅम्पला कळविण्याची व्यवस्था केली. तरीही पूर्व-काळजी म्हणून रातोरात स्थानिक अधिकाऱ्यांना नजरकैद करण्याची आम्ही व्यवस्था केली. निरनिराळचा मार्गाने आमच्या मुक्ति-सेनेने म्हसळे येथे प्रवेश केला. तेथील नागरिकांनी व आम्ही त्यांचे समारंभपूर्वक स्वागत केले. छत्रपतींच्या काळात व त्यानंतर सिद्दीच्या गुलामगिरीतील भारतभूमीचा हा तुकडा सुमारे चारशे वर्षानंतर प्रथमच स्वतंत्र झाला. नागरिकांच्या आनंदाला उधाण आले. आम्ही त्याच दिवशी श्रीवर्धन तालुका ताब्यात घेण्याची योजना रातोरात केली होती. त्यामुळे म्हसळे येथे फार वेळ थांबणे अवघड होते. सर्व पॅसेंजर गाडचा ताब्यात घेतल्या. म्हसळे येथे राजाभाऊ चांदोरकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याचा तात्पुरता कारभार चालविण्यासाठी एक समिती नेमून व अधिकारीवर्गाला भारतमातेशी निष्ठेने राहण्याची शपथ देऊन काही तासांतच श्रीवर्धनचा ताबा घेतला. श्रीवर्धन स्वतंत्र झाल्यामुळे आनंदाने सर्व गाव बेहोष झाले. स्वातंत्र्याचा सोहळा साजरा करण्यासाठी रात्री प्रचंड सभा आयोजित करण्यात आली. श्रीवर्धन हे पेशव्यांचे मूळ गाव. अटकेपार झेंडे लावणाऱ्या पेशव्यांना श्रीवर्धन सर करणे शक्य झाले नव्हते. तो मान व ते भाग्य प्रथम आम्हालाच लाभावे असा संकेत असावा.

श्रीवर्धन तालुक्याच्या कारभारासाठी हरिभाऊ भडसावळे यांच्या नेतृत्वाखाली एक स्थानिक समिती नियुक्त करण्यात आली. अधिकाऱ्यांना रीतसर शपथा देण्याचा विधी झाला आणि मुरूड तालुका ताब्यात घेण्याच्या दृष्टीने कशी चाल करावी हा विचार सुरू केला. त्या दिवशी रात्री आमच्या भोजनाची व्यवस्था बेंद्रे नामक व्यापाऱ्याच्या घरी करण्यात आली होती. सभा असल्यामुळे आम्ही भोजन उरकून घेतले. रेडिओ चालू होता. रात्रीच्या बातम्या सुरू झाल्या आणि शोकजनक बातमीने आमच्यावर प्रचंड वज्राघात केला. त्या दिवशी सायंकाळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची क्रूर हत्या झाली होती. आमच्या ध्येयासाठी त्या थोर महात्म्याने आपली आहुती दिली होती. स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी जीवनभर लढलेला महान योद्धा धारातीर्थी पडला. सत्य, अहिंसा, सत्याग्रहाचा संदेश देणाऱ्या संताने 'हे राम' करीत समाधी घेतली. सर्व देशाला, पददलित समाजाला व मानवतेला प्रकाश देणारी दिव्य ज्योत अमर झाली. चारशेपेक्षा अधिक वर्षे पारतंत्र्यात खितपत पडलेले म्हसळे व श्रीवर्धन हे दोन तालुके त्या दिवशी स्वतंत्र करून स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या दिवंगत राष्ट्र-पित्याला आम्ही आमची आदरांजली समर्पित केली होती. ३० जानेवारी १९४८ हाच तो दिवस होता.

श्रीवर्धन येथील रात्रीच्या त्या ऐतिहासिक सभेला सारे गाव लोटले. श्रीवर्धनच्या आयुष्यातील मुक्त स्वातंत्र्यात भरलेली ती सर्वांत प्रचंड पहिली सभा होती. महात्मा गंधींच्या दुर्दैवी निधनाच्या बातमीमुळे सर्व समारंभावर दुःखाचे सावट आले होते. एकाच वेळी महात्मा गांधीजींना आदरांजली देण्याची व स्वातंत्र्याचा सोहळा साजरा करण्याची पाळी आमच्यावर व श्रीवर्धनकरांवर आली. सुख आणि दुःख, दैव आणि दुर्दैव, प्रकाश आणि अंधार, पौर्णिमा आणि अमावास्या, सुकाळ आणि दुष्काळ सर्व एकाच वेळी पाहण्याचा सुयोग आणि दुर्योग आमच्यावर आला. मानवी शांततेच्या आणि एकात्मतेच्या इतिहासात ३० जानेवारी १९४८ हा दिवस सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. आमच्याही जीवनात हा ऐतिहासिक दिवस नेहमीच अमर राहील.

सुमारे आठ दिवस आम्ही श्रीवर्धन व म्हसळे तालुक्यावर राज्य केले. श्रीवर्धन हीच आमची हंगामी राजधानी होती. सिद्दीच्या मालकीची भाताची कोठारे भरलेली होती. गरिबांना सर्व भाताचे, मंत्र्यांच्या हस्ते वाटप करून ठिकठिकाणी स्वातंत्र्योत्सव साजरा झाला. नारळांच्या व सुपारींच्या कमानी उभारून ठिकठिकाणी झालेले आमचे स्वागत चिरकाल स्मरणात राहील. शहाळ्यांचे गोड पाणी, लुसलुशीत गोड खोबरे आणि सोनेरी सोनकेळी हाच आमचा आहार झाला होता. काही उपद्व्यापी घटकांनी जातीय दंगल माजविण्याचा प्रयत्न केला, परंतु आम्ही तो हाणून पाडला. हिंदु-मुस्लिम ऐक्य

वाढावे आणि अल्पसंख्याकांना संरक्षण मिळावे यासाठी आम्ही घेतलेली दक्षता पाहून आम्हाला काफिर म्हणणारेच आमचे निष्ठावान मित्र झाले. सत्तेमार्फत किती जलद मित्रपरिवर्तन होते त्याचा तो उत्कृष्ट मासला होता. आम्ही मात्र पूर्वी काही घडलेच नाही या आविर्भावात, दिलेल्या शपथेप्रमाणे त्यांना पूर्ण संरक्षण दिले आणि आमच्या वर्तनातूनच त्यांच्या जवळ गेलो. श्रीवर्धन येथील एका इसमाकडे बॉंब व इतर खूप शस्त्रास्त्रे आहेत असा सुगावा आम्हाला लागला. त्याला अटक करून वठणीवर आणणे क्रमप्राप्त झाले. त्याच्या घरातील खानदानी श्रीमंती आणि लावण्य नजरेत भरण्यासारखेच होते. त्याच्या कुटुंबियांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही अशी पूर्ण व्यवस्था आम्ही केली. नि:पक्षपाती धोरण आणि चारित्र्यपूर्ण व्यवस्थेतून केवळ आठ दिवसांच्या आत आम्ही मुसलमान समाजातील मायबहिणींचा विश्वास संपादन करू शकलो.

श्रीवर्धन व म्हसळे तालुके स्वतंत्र केल्यानंतर भारत सरकारला तारा पाठवून हा भाग भारतात विलीन करा अशी विनंती आमच्या हंगामी सरकारने केली होती. बोर्ली पंचायतची खाडी ओलांडून मुरूड तालुका ताब्यात घेण्याच्या योजना चालू होत्या. तेवढ्यात सिद्दीने मुंबईला जाऊन भारतात विलीनीकरण करण्याच्या करारावर सही केली. हल्ला करून मुरूड तालुका स्वतंत्र करण्याचे प्रयोजन उरले नाही. आमच्या लढ्याला अपेक्षेपेक्षाही उज्ज्वल यश मिळाले. कुलाब्याचे त्या वेळचे कलेक्टर झुल्फिकारअली झुबेरी असंख्य पोलिसांसह तेथे आले व त्यांनी म्हसळे व श्रीवर्धनच्या कब्जाची मागणी केली. आम्हीही आनंदाने कब्जा दिला. कारण भारत सरकारने मुक्त भागाचा कब्जा घ्यावा अशी आमचीच मागणी होती. म्हसळे व श्रीवर्धन तालुके स्वतंत्र केले तेव्हा तेथील खजिना, कचेऱ्यामध्ये दोन अडीच लाख रुपये शिल्लक होते. त्याची देखभाल व हिशोब स्थानिक सल्लागारांकडेच सुपूर्त करण्यात आला होता. आम्ही फक्त एक चलाखी केली. तेथील महत्त्वाची शस्त्रास्त्रे हलविली. हैदराबादच्या मुक्तिसंग्रामासाठी त्यांची फारच गरज होती. आम्ही आठ दिवसांचे राज्य केले. स्वत: स्वतंत्र केलेल्या प्रदेशावर राज्य करण्याची कल्पनाही रोमहर्षक असते. आम्ही तर प्रत्यक्ष राज्य केले होते. श्रीवर्धन आणि म्हसळे तालुक्यांचा ताबा कलेक्टर श्री. झुबेरीकडे दिला आणि आमची औट घटकेची ऐतिहासिक कारकीर्द संपली! मंत्रिपदाची खुर्ची खेचून नेणारी घटना खटकणारी असली तरीही कर्तव्यपूर्तीच्या आणि विजयाच्या धुंदीत ते दु:ख जराही जाणवले नाही.

शेकडो वर्षांनंतर स्वतंत्र झालेल्या जनतेने, हिंदु-मुसलमान बंधू-भगिनींनी साश्रू नयनांनी आम्हाला प्रेमाने निरोप दिला. विजयश्रीच्या माळा गळ्यात

घालून आम्ही महाडला परत आलो. मी घरी पोहोचलो आणि तेथील वातावरण पाहून हृदय चर्रर होऊन कापत गेले. एखादयाचा अचानक मृत्यू व्हावा अशी दु:खाची सावट तेथे पसरलेली होती. मला पाहताच सर्वांचे चेहरे फुलले. मी जिवंत आहे हे पाहून त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. म्हसळयाला डी. एस्. पी. बरोबर वाटाघाटीसाठी गेलो असताना, सायंकाळी जवळच आग लागलेल्या वाडयाकडे जेव्हा नेण्यात आले त्याच ठिकाणी आम्हाला गोळया घालून ठार मारल्याची बातमी महाडला पोहोचली होती. ३१ डिसेंबर ४७ ला माझे लग्न व महिन्याभरातच हा प्रकार घडल्यामुळे सर्वजण हवालदिल झाले होते व ते स्वाभाविकच होते. म्हसळयातून आम्हाला जळत्या वाडयाकडे नेले असून आता काही धडगत नाही असा निरोप खामगावला मुख्य छावणीवर गेला होता. त्याच वेळी आमच्या कॅम्पमध्ये असलेले एक डॉक्टर महत्वाचा निरोप आल्यावरून महाडला गेले आणि घाईघाईत त्यांना मिळालेली माहिती त्यांनी आमच्या घरी पोहोचविली त्यातूनच पुढील सर्व घोटाळा निर्माण झाला. अर्थात माझ्या पूजनीय वडिलांचा ईश्वरावर आणि त्यांचे गुरु श्रीअनंत महाराज यांच्यावर जबरदस्त विश्वास होता. बातमी मिळाल्यानंतरही त्यांनी फारसा गाजावाजा केला नाही. माझी पत्नी माहेरी होती. तिला काही कळू दिले नाही. वडिलांनी प्रभूवर हवाला ठेवून सर्वांना शांत ठेवले. मंत्री म्हणून म्हसळे व श्रीवर्धनला मी मोठ्या दिमाखाने वावरत असताना माझ्या आई-वडिलांना आणि नातेवाइकांना ते आठ दिवस किती तापदायक व यातानामय गेले असतील त्याची कल्पनाच केलेली बरी.

भारतामधील संस्थानांचे विलीनीकरण झाल्यानंतर येथील प्रतिनिधी प्रांताच्या व मध्यवर्ती विधि-मंडळावर घेण्याचा प्रश्न निर्माण झाला. हे प्रतिनिधी प्रत्यक्ष निवडणूक करूनच घेण्यात यावेत असा आग्रह समाजवादी पक्षाने धरला. मध्यवर्ती शासनाने हा रास्त आग्रह मान्य केला नाही व हे प्रतिनिधी नेमण्याचा निर्णय घेतला. हा सरळ सरळ लढाऊ जनतेचा व लोकशाहीचा उपमर्द होता. निवडणुका घेतल्या असत्या तर संस्थाने स्वतंत्र करण्यात आघाडीवर राहिलेले नेते व पक्ष यांचेच उमेदवार निवडून आले असते. काँग्रेसला ते सोयीचे नव्हते. या अन्यायाविरुद्ध सत्याग्रह करण्याचे ठरले. पुण्याला लक्ष्मी रोडवर नानासाहेब गोरे यांच्या व कौन्सिल हॉलवर माझ्या नेतृत्वाखाली दोन तुकडयांनी सत्याग्रह केला. महाराष्ट्रामधील निरनिराळया संस्थानांतील कार्यकर्ते त्यामध्ये सहभागी झाले. सत्याग्रहाबद्दल आम्हाला एक महिन्याची शिक्षा झाली. नानासाहेब व इतर सहकारी मित्रांच्या समवेत येरवडा जेलमध्ये वाचन, खेळ, चर्चा, गाणी आदी कार्यक्रमांत महिना कसा संपला ते आम्हाला समजलेही नाही.

संस्थानांचे विलीनीकरणासाठी दिलेला लढा, संस्थानांतील जनतेला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असला पाहिजे. म्हणून केलेला सत्याग्रह, पुढे १९६७ साली संस्थानिकांचे तनखे व सवलती रद्द होण्यासाठी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीत उठविलेला बुलंद आवाज आणि त्या आशयाची मंजूर झालेली आणि सुप्रसिद्ध दहा कलमी कार्यक्रमाचा भाग ठरलेली माझी सूचना, तिच्या अंमलबजावणीसाठी सर्व आदेश झुगारून देऊन राज्यसभेमध्ये आम्ही मंजूर करून घेतलेला ठराव आणि त्यामुळेच शासनाला करावी लागलेली घटना-दुरुस्ती या सर्व प्रकरणी आलेले संबंध लक्षात घेता भारतातील संस्थानिक व माझा काहीतरी पूर्वऋणानुबंध निश्चित असला पाहिजे असे माझे प्रामाणिक मत झाले आहे. संशोधकांना हे क्षेत्र अद्यापि खुले असून तेथे संशोधन करण्यास खूप वाव आहे असे सहज मनात येते.



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# श्रीधर रंगनाथ कुळकर्णी

जन्म डिसेंबर १९१६

**स्वातंत्र्यसैनिक, मराठीचे प्राध्यापक आणि लेखक**

जन्म डिसेंबर १९१६. पेडगाव. जि. परभणी, मराठवाडा, प्राथमिक शिक्षण पेडगाव, परभणी व हिंगोली येथे. बी. ए. ची परीक्षा उस्मानिया विद्यापीठातून उत्तीर्ण. एम् ए. (नागपूर) पी. एच्. डी. (उस्मानिया)

१९४० साली पुण्याच्या दैनिक लोकशक्ति मध्ये सहसंपादक म्हणून नेमणूक. १९४२ च्या चळवळीत हैद्राबाद, मुंबई व मद्रास इलाख्यातील आंध्रभागात संघटनात्मक कार्य. तीन वर्ष कारावास. या कालावधीत तुरुंगातून फरारी झाल्याबद्दल परत कारावास. १९४६ साली तुरुंगातून सुटका झाल्यावर लोकशक्ती दैनिकात दाखल. १९४७ साली राजकीय कार्य करण्यासाठी हैद्राबाद येथे स्थलांतर. पुन्हा अटक. तेरा महिन्याचा कारावास. त्यानंतर काही काळ दोनतीन ठिकाणी किरकोळ नोकऱ्या केल्यावर उस्मानिया विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक (१९५१) आता निवृत्त. या काळात प्राचीन मराठी वाङ्मयाचे संशोधन आणि

लेखन. अनेक ग्रंथ प्रकाशित. पुढील उतारा त्यांच्या नवरात्र संपले! या आत्मवृत्तातून सादर करण्यात येत आहे.

## आपुले मरण

श्रीधर रंगनाथ कुळकर्णी

तसं पाहिलं तर तो काही पहिलाच प्रसंग नव्हता! मरणाला सामोरे जाण्याचे अनेक प्रसंग त्यापूर्वी आले होते. तरीही तो प्रसंग निराळा होता, अगदी वेगळा होता.

पूर्वी असे प्रसंग आले त्यावेळी हातात "काहीतरी" होतं. चार-दोघांना लोळविल्याशिवाय आपण 'शत्रू'च्या हाती पडणार नाही याची खात्री असे. शिवाय मरण हे त्याप्रसंगी महत्त्वाचं नसे. हाती घेतलेलं काम तडीस नेणं अधिक महत्त्वाचं. मृत्यू आलाच तर त्याला मिठी मारण्याची तयारी होती, एवढंच.

पण, हा प्रसंग अगदी वेगळा होता. नुसतंच मरावं असं दिसत होतं. हात-पाय न हलविता, प्रतिकार न करता मृत्यूला सामोरं जाणं जिवावर आलं होतं. आणि सामोरं जाण्याचा प्रश्न होता कुठं? मृत्यूच क्षणाक्षणानं आमच्या जवळ येत होता, आम्हाला दाढेत धरणार होता. अलगद, अगदी सहज अजगराच्या जबड्यात जनावर ढकलं जावं तसा.

विषाद होता तो असहायतेचा!

१९४८ चा सप्टेंबर महिना उजाडला तरी आम्ही तुरुंगातच! दोन स्वातंत्र्य-दिन आले आणि गेले. आमचा तुरुंगवास मात्र कायम. पहिला स्वातंत्र्यदिन साजरा केला हैदराबादच्या तुरुंगात. १४ ऑगस्टच्या रात्री जागलो. ऐन-मध्यरात्री नवहिंद राष्ट्र झेंड्याला प्रणाम केला. मनोमन, मानसपूजा करावी त्याप्रमाणं आणि कुसुमाग्रजांच्या शब्दांत थोडा बदल करून वाहत्या वाऱ्यासंगं निरोप धाडला.

श्वासांनो, जा वायूसंगे ओलांडुन भिंत
स्वातंत्र्याच्या नव्या ध्वजाला सांगा प्रणिपात!

हैदराबादच्या तुरुंगात पुढं गर्दी वाढली. 'बडे बडे लोक' आले आणि आम्हां पोरासोरांना गुलबर्ग्याच्या तुरुंगात जावं लागलं. तुरुंग म्हटला की तो कोणत्याही गावीचा असला तरी सारखाच. पण, सरकारी खर्चानं प्रवास घडला. तेवढीच हवा पालट. नव्या ओळखी झाल्या, नवे मित्र लाभले. तेवढंच बरं वाटलं. पण, तुरुंगातले देखील बरे दिवस नियतीला खपले नाहीत. आमच्यापैकी एकजण

अगदी उजाडता त्या तुरुंगातून पळून गेला आणि सरकारला आमच्या 'सुरक्षितते'ची काळजी वाटू लागली! आमचं पार्सल हैदराबादमार्गे औरंगाबादला रवाना झालं, आम्ही 'हरसूलकर' बनलो. दुसरा स्वातंत्र्यदिन औरंगाबादजवळच्या हरसूल तुरुंगात आम्ही साजरा केला, पहिल्या स्वातंत्र्य-दिनासारखाच!

अटक होऊन तेरा महिने होऊन गेले होते. हे महिने अगदी वर्षासारखे काढले. त्या हिशेबानं पाहिलं तर पांडवांचा वनवास आणि अज्ञातवास मिळून जेवढा कालावधी होतो तेवढा वनवास आम्ही भोगला होता. तरीही आमची मुक्तता झाली नव्हती त्याअर्थी आमची श्रेणी पांडवांच्यापेक्षा वरची होती यात शंकाच नाही.

'पाहे प्रसादाची वाट' हा अभंग सतत तेरा महिने आळवूनही स्वातंत्र्याची खिरापत आमच्या वाटचाला आली नव्हती. पहिल्या स्वातंत्र्यदिनी तुरुंगवासाचं विशेष वाटलं नाही. शतकांच्या पारतंत्र्यातून राष्ट्र मुक्त झाल्याचा आनंद होता. दिल्लीवर तिरंगा लागला, हैदराबादेवर लवकरच लागेल अशी आशा होती. थोडाफार कालावधी लागेल एवढाच! १९४८ चा ऑगस्ट उलटल्यानंतर मात्र मनाची उभारी खचली. आपला जन्म पारतंत्र्यात झाला. आपले मरणही बहुधा याच अवस्थेत होईल अशी शंका येऊ लागली. भरीत भर म्हणजे तुरुंगाबाहेर असलेल्या आप्तेष्टांविषयी चिंता वाटावी अशी परिस्थिती निर्माण झाली. तशी अधिकृतपणे मिळणारी वृतपत्रे फारशी बोलकी नसत. तुरुंगाच्या दारासारखी दिसणारी ही वृत्तपत्रे विशेष बातम्या देत नसत. आमचं मनःस्वास्थ बिघडू नये याची सरकारला कोण काळजी! भेटी-गाठीतून कपडयांना गुंडाळलेल्या शिळयापाक्या वर्तमानपत्रांतून मिळणाऱ्या बातम्या मात्र फार भयंकर असत. देवाला सोडलेला पोळ उभं पीक नासतो त्याप्रमाणं सरकारनं पाळलेले रज़ाकार लोकजीवन उध्वस्त करीत होते.

लोकांचं भौतिक आणि नैतिक बळ पार खलास झालं होतं. 'आता दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' हाच काय तो आधार उरला होता. जगदीश्वर निर्विकार. त्याचा प्रतिद्वंदी दिल्लीश्वर देखील तसाच असल्याचा संशय बळावत चालला होता. एकूण या दोहोंपैकी एकही संकटकाळी धावून येईल असा विश्वस नव्हता. 'मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास' हे जगाला पटविण्यात 'वैष्णवजन' असलेले दिल्लीश्वर दंग होते. 'कठिण वज्रास भेदू ऐसे' ही दिल्लीश्वराची 'दुजी मूर्ती' पाहण्यासाठी हैदराबादच्या जनतेची उत्कंठा शिगेस पोचली होती. तसं काही घडेल असं चिन्ह दिसत नव्हतं!

तरीही आशा वेडी असते ना!

दुष्काळात अधिकमासाची भर पडावी त्याप्रमाणं मध्येच एक झंझावात सुटला.

आणि आशेचा क्षीण 'अहेवतंतू' देखील तुटला. कोणे एके सकाळी कोणीतरी वदंता आणली.

११ सप्टेंबरला तुरुंगावर हल्ला होणार आणि सर्व राजबंदयांना अग्निसमाधी मिळणार! विजापूरच्या गोलघुमटात एकाच शब्दाचे पडसाद अनेक येतात त्याप्रमाणे या वदंतेचे पडसाद अनेकमुखी होऊन तुरुंगात घुमू लागले. वाईट बातम्या कधी खोट्या ठरत नसतात. हेच खरं!

आम्ही सारेच हबकलो होतो. कोणी बोलून दाखवत होतं. न बोलता शहाणे ठरणारे, धैर्याचे मुखवटे घेऊन वावरणारे काही कमी नव्हते. खरं विचाराल तर सारेच घाबरले होते. मनातली भीती चटकन् बोलून दाखवितो तो अनुयायी आणि भीतीवर तत्त्वज्ञानाची कलाकुसर रंगवतो तो पुढारी असं कुठं तरी वाचलं होतं. या दिवसात ते प्रत्ययाला आलं.

आपणच आपले मित्र आणि शत्रू आहोत असं गीता सांगते. गौतमबुद्धाचं देखील याच अर्थाचं एक वचन आहे. मला वाटतं आपल मन 'डबलरोल' वठविणाऱ्या नटासारखं असतं. शत्रूची आणि मित्राची भूमिका आळीपाळीनं वठविण्यात मनासारखा कुशल नट शोधून सापडणार नाही.

तसं पाहिलं तर जे कानावर आलं होतं ते खोटं वाटावं अशी परिस्थिती त्या काळात नव्हती. दहा वर्षांपूर्वी याच औरंगाबादच्या तुरुंगात अशाच प्रकारची रंगीत तालीमही झाली होती. १९३८ साली हैदराबाद संस्थानाच्या इतिहासात प्रथमच लोकांनी चळवळ सुरू केली होती. स्टेट कॉंग्रेस, हिंदूसभा, आर्यसमाज या संस्थांच्या वतीनं अनेक सत्याग्रहींनी सत्याग्रह करून तुरुंगवास स्वीकारला होता. आर्यसमाजाचे सत्याग्रही तर देशाच्या अनेक भागांतून आले होते. या सत्याग्रहींना दहशत बसावी म्हणून असेल वा अन्य कोणत्या कारणांनी असो सत्याग्रहींच्या बराकीत जळते पलिते फेकण्यात आले होते.

एवढं मात्र खरं की या पलित्यांच्या आधारानं बराकीत प्रवेश मिळविणारा अग्नी बराच कणवाळू तरी असला पाहिजे अथवा अहिंसेचे व्रत धारण करणारा तरी असला पाहिजे. कारण, या आगीच्या खेळात कोणीच दगावलं नाही की कुणास साधी इजासुद्धा झाली नाही असं निजाम सरकारनं त्यावेळी जाहीर केलं होतं.

गेल्या दहा वर्षांत त्यामानानं बरीच प्रगती झाली होती. रजाकारांची भक्कम संघटना राजाश्रयावर वाढत होती. सरकारला अडचणीत टाकणाऱ्या

कोणत्याही कृत्याची जबाबदारी या संस्थेवर सहज टाकता येण्यासारखी होती. म्हणूनच—

म्हणूनच आमचं होऊ घातलेल अग्निशयन संभवनीय वाटत होतं.

आमचे पहारेकरी तर त्या दिवशी भारी खुषीत होते. गुराच्या बाजारात कसायानं 'माल' पहावा त्याप्रमाणे त्यांनी आमची पाहणी चालविली होती. आमच्या कानांवर पडावं अशा बेतानं ते आपसात बोलतही होते:

'चलो भाई आज तो अखरी दिन है पहरेका'

'हां भाई कलसे तो कामही नही रहेगा.'

'कैसे बाते करते हो आप भी—'

'क्यूँ? क्या हुआ?'

'अजी हजरत, लाशों का पंचनामा, जलाना, दफनाना, लेना-देना पूरा कारोबार होने तक तो पहरा देनाच पडेगा.'

'अरे हाँ भूलीच गया था! जरूर, उस वख्ततक तो हमारी जिम्मेदारी हैही"

सायंकाळची जेवणं झाली. बराकीत बंद होण्यापूर्वी थाळ्या धुणं, पाणी भरून घेणं, वाळत घातलले कपडे उचलणं इत्यादी कामे चालू होती. पहारेकऱ्यांची खुषी फेसाळून वहात होती.

'खाँ आखरी खाना खा गये बेचारे!'

'अब दिन निकलनेसे पहले इनका फैसला!'

'रिडो सुना आज का?'

'नही भाई कुछ खास बात?'

'अरे हंगामा है. पाकिस्तान की फौज दिल्ली जा रही है!'

'अच्छा?'

'सिर्फ पच्चीस मील तै करना है—'

'बहोत खूब!'

'कल दिन निकलतेही उधर दिल्ली की फतेह, इधर इनका कत्‌ले आम!'

'मैं सोचता हूँ बिना वजेह इन बकरों को इतने दिन खिलाई हमारी सरकार!'

'अरे तुम्हारी तो अकल मारी गई है यार!'

'कैसे?'

'बगैर खिलाये भला गोष्त भी जादा कैस मिलेगा?'

कित्येक दिवसांच्या अफवांवर हा शिक्कामोर्तब होता. आधल्याच रात्री जन्मठेपेची शिक्षा झालेले कैदी 'धर्मयुद्धा'च्या आघाडीवर लढण्यासाठी सोडले

होते. बराकी बंद झाल्या. भीषण शांतता चोहोकडे पसरली. कोणालाच बोलावसं वाटत नव्हतं. झोप उडाली. मरणाला अक्षरशः रात्रच आडवी होती. क्षणाक्षणानं मृत्यू जवळ येत होता. आम्ही काही तासांचे सोबती. या जगातली ही शेवटची रात्र. ही रात्र संपण्यापूर्वी सर्वांचंच जीवन संपुष्टात येणार—

अवघे काही तास

त्यानंतर—

अग्नी, ज्वाला, धूर......

+ + +

'धूर फार झालाय् किसनगुरू, समिधा ओल्या दिसतात.'

'जावईबापूंच्या डोळ्यांना सारखं पाणी येतंय्.'

'तसा थोडासा त्रास होणारच. म्हटलं आहे ना, आधी कष्ट मग फळ!'

'अहो, चालतं-बोलतं फळ पडलंय् पदरात. आता का कष्ट?'

+ + +

'असं सारखं काय पाहता? आजच लग्न झालंय् की काय?'

'हूँ.'

'हुं! देखल्या देवा दंडवत. घरात असलं म्हणजे हे असं. एकदा पाठ फिरली की तुमचे गांधी, नेहरू यांच्या आपलं मागे लागता. घरात असं सारखं पाहणं बरं दिसतं का?'

'बरं दिसतंय् म्हणून तर पाहतोय्. ज्ञानेश्वरीत—'

'तुरुंगात तुम्ही वाचली ज्ञानेश्वरी तेवढी पुरे. आज ज्ञानेश्वरी नको.'

'ऐकून तर घेशील! ज्ञानेश्वरीत म्हटलं आहे—'

'सारखं बायकोकडे पहावं, ती पाठमोरी झाली की सभेला नाही तर तुरुंगात जावं'

'तसं नाही ग, ज्ञानेश्वरीत म्हटलं आहे –तेथ हरु म्हणे हे नेणिजे। देवी जैसे का रुप तुझे। तैसे हे नित्यनूतन देखिजे'

'म्हणजे काय? शंकर पार्वतीला म्हणतात. प्रत्येक वेळी तुझं रुप नवं दिसतं. तसं–'

'चला. काहीतरीच—'

+ + +

'अगदी खरं सांगाल?'

'खोटं कधी बोललोय् तुझ्याजवळ?'

'पुन्हा नाही ना जाणार मला सोडून?'

'अग, आता तुरुंगात जायचं कामच पडणार नाही. युद्ध संपलंय्. स्वराज्य आज ना उद्या मिळणारच! तुरुंगाचं आता कामच नाही.'

'बरं झालं बाई, प्रश्नच मिटला म्हणायचा!'

+ + +

"क्षमा कर सुमा, क्षमा कर. वाटलं होतं पुन्हा एकदा पट मांडू आपण. पण...

'अब तो हम डाल चुके हैं गलेमें झोली!"

+ + +

'कसली ही फिरती वलयं? घोटाळणाऱ्या जीवनाशेचे पाश? आपण काही तासांचे सोबती. मन घट्ट केलंच पाहिजे.

डमडमत डमरू ये, खणखणत शूल ये
शंख फुंकीत ये, येई रूद्रा
खणखणत शूल ये
खणखणत शूल ये

+ + +

खण्, खण् धडल् धम, धडल धम्

महात्मा गांधी की जय, इन्किलाब जिंदाबाद. आला वाटतं हल्ला. 'ऊर्ध्वमूलमधःशाख :—

'सरदार पटेल की जय!' 'पंडित नेहरूकी जय!' झालंय् काय या लोकांना. शांतपणानं मरू देखील देत नाही.

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्–

'महात्मा गांधी की जय!

'भाइयों एक खुषखबरी—'

जेलर आलेला दिसतो. आता कसली खुशखबरी? जळून मरायचं की गळफास लावून एवढंच उरलंय'

'भाइयो, यूनियन की फौजोने औरंगाबाद घेर लिया है। आप लोक जल्दी रिहा होंगे।'

'सरदार पटेल की जय!'

आश्चर्य! महान् आश्चर्य! खरं का हे सारं? की चेष्टा? क्रूर चेष्टा तर नव्हे?

बराकी निस्तब्ध झाल्या. जेलरनं पुन्हा तीच बातमी सांगितली. शिवप्पानं मला खांद्यावर घेतलं. शंकराने तांडव करावं तसा तो नाचू लागला.

अन् कत्ले आम होणार होता त्याचं काय?
गंगाचरणला विचारलं, 'अरे भई, मरेंग नही अपन?'

'छोडो यार मरने की क्या बात कर रहे हो. अब तो जिंदगी, नई जिंदगी, रोशनी, स्वतंत्रता का प्रकाश!'

बराकी बऱ्याच उशीरानं उघडल्या. आम्ही एकमेकांना कडकडून भेटलो. आम्ही मरून जिवंत झालो! पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात आलो.

काही वेळाने पहारेकरी आले. कालच 'कत्लेआम' ची बडबड करणारेही त्यात होते. त्यांचा नूर पालटलेला होता. शान उतरलेली होती. मान खाली झाली होती. चेहरे कबरीतून उकरून काढलेल्या माणसांसारखे दिसत होते.

'अरे हजरत क्या हुआ, कत्ले आम होनेवाला था ना?'

'शर्मिदा क्यूँ करते हो सरकार!'

'सरकार? हं ऽ ऽ काल होते बकरे अन् आज एकदम सरकार!'

'दिल्ली फतेह हुई या नही?'

'सरकार हम पेटके बंदे. वो हरामजादा × × × उसने सब सत्यानास किया. हम को तो कहीं का न रखा!'

'अच्छा?'

'यकीन मानिये सरकार!'

तुरुंग दणाणून गेला होता. मुक्त जीवन फेसाळून निघालं होतं. क्षीण डोळ्यांत तेज चढलं होतं दुबळ्या देहांना बारा हनुमंताचं बळ मिळालं होतं. तुकारामाचं वचन जिव्हेवर घोळत होतं. 'आपुले मरण पाहिले म्यां डोळां'

बुरजावरून गुरखे सैनिक साद घालीत होते.

जय हिंद! जय हिंद!

\+ + +

१९४७ च्या ऑगस्ट महिन्यात ब्रिटिश सरकारनं भारताला स्वातंत्र्य दिलं. एका राष्ट्राची दोन शकलं झाली. पाकिस्तान नव्यानं उदयाला आलं. उर्वरित देश हिंदुस्थान या नावानं स्वतंत्र झाला. देशाचे दोन तुकडे करून ब्रिटिश राजनीतीचं समाधान झालं नाही. भारतातील अनेक संस्थाने प्रत्यक्षात ब्रिटिश सत्तेची गुलाम म्हणून वावरत असली तरी या सत्ता संक्रमणाच्या कालात आपण स्वतंत्र व्हावे अशी ईर्षा या संस्थानिकांच्या नामधारी राजेरजवाड्यांच्या मनात निर्माण झाली. ब्रिटिशांशी आमचे करार-मदार झाले होते. तशाच प्रकारचे करार बरोबरीच्या नात्याने स्वतंत्र भारताने त्यांच्याशी करावेत असा त्यांचा आग्रह होता. देश स्वतंत्र झाल्यावरही स्वतंत्र राष्ट्र या नात्यानं स्वतःचे अस्तित्व कायम ठेवू इच्छिणारांचे अग्रणी होते हैदराबादचे निजाम.

निजामाला स्वतंत्र राहावयाचं होतं. तसं त्यानं जाहीरही केलं होतं. हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील झालं पाहिजे ही जनतेची मागणी निजामाला मान्य नव्हती. हैदराबाद स्टेट कॉंग्रसने त्यासाठी ७ ऑगस्ट ४७ पासून सत्याग्रह सुरू केला. सर्व संस्थानभर सत्याग्रह चालू झाला. या काळात संस्थानात एका संघटनेस विशेष महत्त्व आलं होतं. ही संघटना म्हणजे मजलिस इत्रेहादुलमुसलमीन. कासिम रझवी हे या संघटनेचे प्रमुख होते. हैदराबाद संस्थानात केवळ निजामाची नव्हे तर मुसलमानांची अधिसत्ता नांदली पाहिजे. सर्व मुसलमानांनी धर्माच्या रक्षणार्थ निजामाच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे ही या संघटनेची घोषणा. सरकारचं पाठबळ असल्यामुळं या संघटनेनं संस्थानातील जनतेला 'त्राही भगवान्' करून सोडले होते.

काही झालं तरी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्याचा अविभाज्य घटक होता. एक घटक या नात्यानं सार्वभौम सत्ता म्हणून नव्हे—त्याचं अस्तित्व समर्थनीय होतं. सार्वभौम सत्ता या नात्यानं स्वतंत्र भारताच्या पोटात आपला सवता सुभा उभा करण्याची निजामाची महत्त्वाकांक्षा होती. स्वतंत्र भारताला ते एक आव्हान होतं. भारत सरकारनं वाटाघाटी सुरू केल्या. वाटाघाटी तशा वर्षभर रेंगाळल्या. परंतु नंतर मात्र घटना एवढ्या वेगानं घडत गेल्या की, काय होणार याची पूर्ण कल्पना येण्यापूर्वीच निजामाची राजवट कोसळून पडली.

११-१२ सप्टेंबर १९४८ च्या सुमारास औरंगाबाद शहराला वेढा बसला. १३ सप्टेंबरला भारतीय फौजांनी औरंगाबाद शहर आपल्या ताब्यात घेतलं. त्याच दिवशी गुरखा सैनिकांची नेमणूक तुरुंगाच्या बुरजांवर झाली. दुसरे दिवशी कुलदीप सिंग नावाचे लष्करी अधिकारी आमच्या तुरुंगात आले. मुलकी राज्यवस्था आमच्या सुटकेची व्यवस्था करील असं आश्वासन त्यांनी दिलं.

पुढं हैदराबाद शहर देखील भारतीय फौजांनी काबीज केलं.

एक मोठं पर्व पूर्ण झालं—

सुटका लवकरच होणार या कल्पनेनं होणारा आनंद बंदिवासाशिवाय कळणार कसा? कळत न कळत थोडी विषादाची छटाही या आनंदाला होती. कडव्या वालाच्या उसळीसारखी. इतके दिवस, वर्षांवर, बरोबर असलेले सहकारी दुरावणार याचा विषाद जाणवत होता. भांडारकरांच्या संस्कृत पुस्तकातला एक श्लोक आठवत होता—

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महादधौ
समेत्य च व्यपेयातां तद्वद्भूतसमागमः ॥

चळवळीच्या लाटेसरशी वेगवेगळ्या भागातले आम्ही तुरुंगात एकत्र आलो होतो. स्वराज्याच्या लाटेनं आता आम्ही दूरवर फेकले जाणार होतो.

—पुन्हा क्वचितच भेटण्यासाठी!

सुटकेला विलंब लागला. पण, सुटलो एकदाचे!

तुरुंगाच्या बाहेर एखादया जत्रेचं स्वरूप आलं होतं. विदयार्थी असताना अष्टमी-नवमीच्या हरसूलच्या देवीच्या दर्शनाला जात असे—

—योग असा की मी सुटलो त्या दिवशी नवरात्रातली अष्टमी होती.

तुरुंगाच्या दाराशी कोणी तरी कार्यकर्त्यानं हातातलं सामान घेतलं. एका तांग्यात ते ठेवलं. राजाबाजारात आमची उतरण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गाडीच्या वेळेला स्टेशनवर पोचविण्याची व्यवस्थाही हीच मंडळी करणार होती. कित्येक महिन्यातले सहकारी पांगत होते. निरोप घेणं-देणं चालू होतं.

तांगेवाला नमूनेदार होता. त्याचा उत्साह उफाळून आला होता. गेले दोन दिवस तो राजबंदयांची ने-आण करीत होता. आपल्या हातून एवढीच देशसेवा घडते याचं त्याला समाधान होतं. आम्ही त्याच्या तांग्यातून प्रवास करीत होतो याचा त्याला अभिमान होता. हौसेनं, प्रेमानं, सेवाभावानं तो आणि त्याचा लाडका घोडा घरचं खाऊन 'लष्कर'ची चाकरी करीत होते. त्यानं राजा-बाजारात आम्हाला पोचवून निरोप घेतला.

—पंढरीहून आलेल्या वारकऱ्यांना भाविकाने सामोरे जावे त्याप्रमाणं.

पोटांत कुठं तरी कालवलं. वाटलं. एवढ्या श्रद्धेला आपण पात्र ठरतो तर? ओबडधोबड दिसणाऱ्या माणसात नांदणाऱ्या डौलदार माणूसकीस वंदन केलं. भारावलेल्या चित्रानं सामान्यांत दिसून येणाऱ्या असामान्यत्वास मनोमन अभिवादन केलं!



★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

# अप्पा पंत

जन्म १९१२

**औंध संस्थानचे राजे भवानराव पंतप्रतिनिधी यांचे चिरंजीव. १९४८ ते ७५ या काळात परराष्ट्रात भारताचे राजदूत.**

ऑक्सफर्डहून एम्. ए. व बॅरिस्टर होऊन १९३७ साली औंधला परतले. १९४७ साली औंध भारतात विलीन झाले. त्यावेळी पं. जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना ब्रिटिश पूर्व आफ्रिकेत भारताचे हायकमिशनर म्हणून नेमले. या पाच वर्षांत त्यांना न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्रात परतंत्र देशाचे पर्यायी प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर सिक्कीम व भूतान येथे पोलिटिकल ऑफिसर. इंडोनेशिया, नॉर्वे, कैरो येथे भारताचे राजदूत. त्यानंतर इंग्लंडमध्ये हायकमिशनर म्हणून काम केल्या-नंतर १९७२ ते ७५ पर्यंत इटलीत भारताचे राजदूत म्हणून काम केले. म. गांधी, पं. नेहरु, नासर, सादात, सुकार्नो, दलाई लामा, जोमो केन्याटा अशा मोठमोठ्या व्यक्ती त्यांनी जवळून पाहिल्या.

प्रस्तुत उतारा त्यांच्या मोमेंट इन टाईम (रुपांतर नलिनी पंत– एक प्रवास एक शोध.) या आत्मपर ग्रथांतून घेतला आहे.



## माझ्या आयुष्यात गांधीजी

औंध स्वराज्यदान प्रयोगाविषयी अजून एकही पुस्तक लिहिले गेलेले नाही. ते व्हायला पाहिजे असे पुष्कळ लोक म्हणतात. गांधीजींवर प्रबंध लिहिणाऱ्या एखादया पीएच.डी.च्या विदयार्थ्याला किंवा कोणत्याही जिज्ञासू वाचकाला गांधीजींच्या आशीर्वादाने सुरू झालेल्या औंध स्वराज्यदानाची माहिती नवी व उद्‌बोधक वाटेल.

या प्रयोगाची सुरुवात १९३८ मध्ये झाली. तत्पूर्वी एक वर्ष मी इंग्लंडमधील शिक्षण संपवून भारतात परत आलो होतो. बाबांची इच्छा मी त्यांना राज्यकारभारात मदत करावी अशी होती. त्याकरिता त्यांनी मला म्हैसूर संस्थानात चार महिने राज्यकारभाराचे शिक्षण घेण्यासाठी पाठवले होते. म्हैसूरचे संपन्न संस्थान कोणीकडे व औंध कोणीकडे! म्हैसूरसारखी राजवट औंधमध्ये आणणे अशक्यप्राय होते. जनतेच्या मनातली अस्वस्थता घालवावयाची असेल तर जनतेला राज्यकारभारात खुलेपणाने भाग घेऊ देणे हाच एक उपाय दिसत होता. जी अर्धी भाकरी मिळत होती तिचे योग्य वाटप सर्वांच्या मतानुसार झाले तर जनतेला स्वतःची जबाबदारी कळेल, आपल्याकडे पैसा किती आहे ते कळेल व तो काटकसरीने वापरण्याची बंधनेही कळतील. त्यांना काम करावयाला हुरूप येईल व आपल्यावर कोणी अन्याय करते आहे, असे वाटणार नाही. या भावनेने प्रेरित होऊन मी सर्वांशी बोलणी केली. बाबांशी स्पष्ट बोललो. बाबा एकदम म्हणाले, 'जनतेला जो राजी राखतो तो राजा'.

नुकताच आटपाडीहून एक मोर्चा आला होता. आटपाडी भाग सदा दुष्काळी मुलूख. सरकारी तिजोरीतच पैसा कमी असल्यामुळे आटपाडीला पुरेशी दुष्काळी मदत पोहोचत नव्हती. चिथवणारे होतेच. आटपाडीहून दोन-तीन हजार मंडळी झेंडे लाठया, काठया घेऊन औंधकडे निघाली असे कळले. झाले. औंधला घबराट निर्माण झाली. काय होईल? त्या मंडळींनी घातपात केला तर? ए.जी.जी.ला तार करावी का? फौज मागवावी का? शिपायांना बंदुका घेऊन उभे करावे का? मला वाटले, मंडळी इतक्या लांबून—साठ मैलांवरून येणार, आपलीच माणसे आहेत. वाड्यात स्वयंपाक करावयास सांगितला व मंडळी येण्याच्या सुमाराला वेशीवर स्वागताला जावयाचे ठरवले. वेशीवर माझ्या-

बरोबर बापट, कुंडलकर, पाठकमास्तर सर्व मंडळी निघाली. कोणी म्हणाले, 'लाठ्या तरी घेऊन जा'. अर्थात आम्ही नेल्या नाही. आम्हाला वेशीवर सामोरे आलेले बघताच मंडळींचा अर्धा राग ओसरला. 'गांधीजीकी जय' 'नेहरूजीकी जय' या घोषणांबरोबरच 'अप्पासाहेब महाराजकी जय' असे तुरळक आवाज ऐकू येऊ लागले. वाड्यात येऊन अंबाबाईच्या नवरात्र मंडपात जेवणे होईपर्यंत सर्वच राग ओसरला. मंडळी म्हणाली, 'महाराजांकडे गाऱ्हाणे घेऊन आलो आहो. त्यांची आमची भेट करवा.' बाबांनी त्यांची ताबडतोब भेट घेतली. भेटीअखेर सर्वांचे डोळे ओले झाले होते. वादळ चहाच्या पेल्यातले ठरले!

पण त्या वादळाने अशांतीचे मूळ गवसले व ते उपटावयास पाहिजे हे कळले.

१९३८ च्या डिसेंबरमधल्या एका सकाळी मी वर्ध्याला चाललो होतो. गांधीजींशी बोलावयाला. मनात गर्दी करीत असलेल्या कल्पनांच्या कापसाचे वळवून सूत बनवावयाला. १९३८ च्या नोव्हेंबरमध्ये बाबांच्या वाढदिवसा-निमित्त जो दरबार भरला होता. त्यात बाबांनी घोषणा केली होती की, औंध जनतेने निवडणुकी घेऊन निवडलेल्या प्रतिनिधींच्या हाती सत्ता सोपवावयाचे त्यांनी ठरवले आहे, इतकेच नव्हे तर खजिन्याच्या किल्ल्याही ते त्यांच्याच हाती देणार आहेत, नियुक्त सरकार जितका तनखा त्यांना देईल तितकाच ते घेणार आहेत. त्यावेळी इतर काही संस्थानांतूनही घटनात्मक अधिकार देण्यात आले होते. पण संपूर्ण सत्ता जनतेला प्रदान करण्याचे हे पहिलेच उदाहरण होते.

ब्रिटिश सरकार या वेळी त्यांच्या अंमलाखालील "ब्रिटिश इंडिया"त प्रांतिक स्वराज्याचा प्रयोग करीत होते, तर पाचशे हिंदी संस्थानांत पिढीजाद एकतंत्री राजेशाही चालली होती. हा विसंवाद मजेदार होता व समस्या निर्माण करणाराही होता. संस्थानांतूनही राजवट थोडी उदारमतवादी व्हावी– निदान जनता गप्प राहण्यापुरती– अशी "समज" जरी संस्थानांना होती तरी संस्थाने ही स्वातंत्र्याच्या चळवळीच्या बाबतीत उदासीन राहतील अशी ब्रिटिश राजवटीची अपेक्षा होती. तेव्हा बाबांनी घेतलेला निर्णय व्हॉइसरॉयना क्रांतिकारक वाटला यात नवल नव्हते. विशेषतः गांधीजींच्या आशीर्वादाने तो घेतला गेला याबद्दल तर त्यांना रागच आला.

असो. अशा या स्वराज्यदानाची सांगता कशा प्रकारे करावी याचा सल्ला घेण्याकरता मी गांधीजींकडे चाललो होतो. बरोबर पंडित सातवळेकर, कुंडलकर, मॉरिस फ्रीडमन वगैरे मंडळी होती.

येथे थोडे मागे जाऊन हे नमूद केले पाहिजे की औंधमध्ये "लेजिस्लेटिव असेंब्ली" (विधान सभा) १९१९ मध्येच स्थापन झालेली होती. त्यानंतर

१९३६ साली असेंब्लीला काही अधिकारही प्राप्त झालेले होते. तेव्हा १९३८-३९ साली त्याची पुढली पायरी संपूर्ण स्वराज्यदान हे ओघानेच आले.

पंडित सातवळेकर बाबांचे स्नेही. ते त्यावेळेस औंधला राहात होते. "स्वाध्याय" व वेदांची व उपनिषदांची भाषांतरे हा त्यांचा व्यवसाय अखंड चालू होता. त्यांचे चिरंजीव व माझे स्नेही वसंतराव त्यांना मदत करीत. पंडितजी स्वतः उत्तम चित्रकार होते. ही त्यांची कला त्यांच्या धाकट्या चिरंजीवाने, माधवने घेतली. निस्पृहता व स्पष्ट बोलणे हा त्यांचा विशेष गुण. औंध जनतेबद्दल त्यांना आपुलकी वाटत होती. औंध स्वसत्ताक व्हावे, पण त्याबरोबर बाबांचे नावही मोठे व्हावे ही त्यांची इच्छा होती. मी इंग्लंडहून परत आल्यावर माझ्या मनात खरोखरच औंध जनतेची सेवा करावयाची आहे, याची त्यांना खात्री पटली होती, त्यांनी एकदा गांधीजींनाही लिहिले होते, 'या राजपुत्राची इंग्लंडहून आल्यावर वागणूक मी पाहतो आहे. भारतातल्या संस्थानिकांनी कसे वागावे याबद्दल आपली जी मते आहेत त्याबरहुकूम त्याचे वागणे आहे. आपण त्याला एकदा जरूर भेटीला बोलवावे.' गांधीजींनी पंडितजींना "बरे" म्हणून लिहिले होते व त्याच सुमारास बाबांनी स्वराज्यदानाची घोषणा केली.

वर्ध्याला स्टेशनवर जमनालाल बजाज मला घेण्याकरता आले होते. त्या वेळी वर्ध्याची सडक कच्ची होती. १९२१ च्या जुन्या फोर्ड मॉडेलमध्ये बसून धक्के व धूळ खात आमचा प्रवास झाला. त्या दोन तासांच्या प्रवासात गाडीबरोबर माझ्या मनात विचारही खडखडत होते. इंग्लंडच्या आठवणी अजून ताज्या होत्या. हिटलर व मुसोलिनी यांच्या लष्करी दडपशाहीने पाहता पाहता वाढविलेले वर्चस्व भीतिदायक होते. आशियात जपानचा उगवता सूर्य झळा देतच वर येत होता. म्युनिक करारानंतर तर युरोपमधल्या सर्व उदारमतवादी शक्तींनी या पाशवी शक्तींपुढे शरणागती पत्करली आहे, हे स्पष्ट झाले होते. अशा या जागतिक पार्श्वभूमीवर गांधीजींची अहिंसा कुठवर टिकेल? हिटलर व मुसोलिनी यांच्याशी अहिंसेने मुकाबला होऊ शकेल काय? असे पुष्कळांच्या मनात घोळणारे प्रश्न माझ्याही मनात घोळत होते. इतरांप्रमाणे मलाही वाटत होते की, ब्रिटिशांची गोष्ट वेगळी गली आहे, त्यांच्यात उदारमतवादी नीतिमूल्ये अजून जागी आहेत. त्यांच्याशी अहिंसक लढा चालू शकेल, हिटलर-मुसोलिनीशी नाही. दुसरी एक शंका मनात येत होती, ती ही की हे गांधीजी आम्हाला कोणत्या त्रेतायुगात परत नेऊ इच्छितात? औदयोगिकरणाला त्यांचा एवढा विरोध का? औदयोगिकरणाशिवाय प्रगती कशी साधायची?

भारतात कॉलेजमध्ये असताना गांधीजींच्या विचारप्रणालीने आम्हाला स्पर्शही केला नव्हता. त्यांचे उपास, त्यांचे लढे, आपल्या सहकाऱ्यांकडून त्यांनी

अपेक्षिलेले यमनियम आम्हाला आकलनच होत नसत. पण १९३८ म्हणजे १९२९ नव्हे. महात्मा गांधींचे नाव लोहचुंबकासारखे आम्हाला आता आकर्षित करी. त्यांची आता थोडयाच वेळात भेट होणार म्हणून मी उत्सुक झालो व अस्वस्थही झालो आणि मनात आणखी एक शंका येऊन गेली की, हे गांधीजींबद्दलचे आकर्षण त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानात आहे की, त्या तत्त्वज्ञानाच्या साहाय्याने ते आज जी एक शक्ती व भारताच्या अस्मितेची नवी जाणीव निर्माण करू शकले आहेत त्यात आहे? अहिंसा हे (सत्ता मिळविण्याचे) साधन आहे की साध्य आहे? ध्येय म्हणून मी अहिंसा पत्करू शकेन काय?

मी उलटसुलट विचारांचा मनात निर्णय लागण्यापूर्वीच मी सेवाग्रामात पोहोचून गांधीजींच्या कुटीत दाखल झालो. गांधीजींचा वक्तशीरपणा प्रख्यात आहे. पाव मिनिट इकडे तिकडे त्यांना चालत नसे. भेटणाऱ्याची वेळ झाली की, ते वाक्यसुद्धा अर्धवट सोडीत. या काटेकोर वक्तशीरपणामुळेच कामाचा प्रचंड डोंगर उपसूनही त्यांना कोणासही भेटण्यास वेळ मिळे.

मी आत गेलो तेव्हा ते सूत कातीत होते. त्यांनी मला खुणेनच समोर बैस म्हणून सांगितले. मी त्यांना अभिवादन करताना मनोमन प्रार्थना केली की, त्यांच्या स्फूर्तीचा माझ्या मनात योग्य पडसाद उमटू दे!

त्यांनी प्रथम बाबांची चौकशी केली. 'एकदा-दोनदा बघितले आहे, पण कधी बोलणे-चालणे झाले नाही', ते म्हणाले व नंतर थोडया थट्टेच्या सुरात म्हणाले, 'तुझ्या वडिलांच्या सत्तात्यागाबद्दल तूही खरोखरच उत्सुक आहेस का?' मी म्हटले, 'सत्तात्याग बाबांना करावयाचा आहे, सत्ता त्यांची आहे माझी नाही, त्यांनी मला येथे धाडले आहे.' नंतर ते म्हणाले, 'सत्ता काही थोडया हातांत केंद्रित करावयाची असली तर ती केवळ हिंसेनेच शक्य आहे. म्हणून समाजात खरी शांतता नांदावी अशी इच्छा असेल तर सत्तेचे (राजकीय व आर्थिक सत्तेचे) विकेंद्रीकरणच व्हावयास पाहिजे. खऱ्या अहिंसक समाजात "सरकार" ही चीजच राहणार नाही. जनताच स्वतःचे शासन करील. तुझे वडील खरोखरच अहिंसक समाज निर्माण करू इच्छितात का? नुसता सत्तात्याग करून नव्हे, तर खेडयापाडयातल्या जनतेच्या हातात सत्ता देऊन? मी पुन्हा' म्हणालो, 'हा प्रश्न आपण माझ्या वडिलांनाच विचारला पाहिजे.' गांधीजींची मुलाखत संपल्यावर मी बाहेर आलो. पंडित सातवळेकर, महादेव देसाई, जमनालाल बजाज, जयरामदास दौलतराम, बाबू राजेंद्रप्रसाद सर्व तेथे होतेच. त्यांच्याशी विचारविनिमय केला व असे ठरवले की, मी औंधला परत जाऊन बाबांना घेऊन यावे.

मी औंधला गेलो तो बाबा आटपाडीला गेल्याचे कळले. तेथे वाड्यात जातो तर कळले की, बाबा बोरे खायला मळ्यात गेले आहेत. तेथे गेलो व त्यांना सेवाग्रामचा वृत्तांत सांगून म्हणालो, 'आपल्याला सेवाग्रामला यावयास हवे.' बाबा म्हणाले, 'चला केव्हा जावयाचे?' कारभारी दर्शने म्हणाले, 'ए.जी.जी.ला कळवावयास हवे.' बाबा म्हणाले, 'कळवा मग, आम्ही निघालो!'

आम्ही पुण्याला येऊन तेथून वर्ध्यालाही पोहोचलो व पुढली बोलणी सुरू झाली. या घटनेला एक अदृश्य योगायोग कारणीभूत झाला. 'आम्हाला भेटून आमचा सल्ला घेतल्याखेरीज पुढे जाऊ नये' अशी ए.जी.जी.ची उलट तार औंधला आली. ती आम्ही पुण्याला असेपर्यंत आम्हाला पोहोचती तर इतका स्पष्ट मनाई हुकूम आल्यानंतर बाबा कदाचित पुढे जाते ना. पण औंधचे कारभारी पैशाचा अपव्यय होऊ नये म्हणून जपणारे. त्यांनी ती तार पाकिटात घालून सेवाग्रामला धाडली! तोपर्यंत बोलणी संपून पुढील कार्यवाहीही ठरली होती.

औंधला परत आल्यावर ए.जी.जी.ने भेटायला बोलावले. बाबा गेले. ए.जी.जी. धुश्शातच होते. 'आम्हाला न विचारता आपण गांधीजींना भेटावयास गेला व त्यांच्या सल्ल्याने राज्यघटनेचा मसुदा तयार केला असे ऐकतो. हे आम्हाला मुळीच आवडलेले नाही. याचे दुष्परिणाम होतील, लक्षात ठेवावे.'

बाबाही रागीट. त्यांनी उत्तर दिले, 'माझ्या मुलांना (प्रजेला) मी त्यांचा संसार करावयास परवानगी देत आहे. यात मी कोणाची चोरी केली नाही, कोणाविरुद्ध कारस्थाने केली नाहीत की, कोठल्या राज्यघटनेविरुद्ध काही केलेले नाही. संस्थान मला अंबाबाईने दिले आहे. ही प्रेरणा पण तिनेच मला दिली आहे. आपल्याला काय करावयाचे असेल ते करावे' असे म्हणून ते रागाने उठलेच व उपरणे ओढून पुन्हा रागाने खांद्यावर लपेटले व एकदम पाठमोरे वळले व निघाले. बाबांच्या ह्या दर्शनाने ए.जी.जी.ही चकित झाला असावा. त्याने पुढे होऊन बाबांचा हात धरून त्यांना पुन्हा खाली बसवले व सामोपचाराच्या गोष्टी केल्या.

पण औंधबद्दल ब्रिटिश राजवटीला शंकाकुशंका येतच राहिल्या.

वर्ध्याच्या भेटीत औंधमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची नवी राज्य-घटना तयार झाली व नंतर गांधीजींनी मला विचारले, 'ही राज्यघटना राबवायला तू तयार आहेस काय? तू इंग्लंडात राहून आला आहेस. शहरात राहून, गरीब जनतेच्या पिळवणुकीचा विचार न करता स्वतःचा ऐषआराम व चैन एवढेच बघणार आहेस की, तुमच्या राज्यातील जनतेची सेवा करणारा प्रथम क्रमांकाचा सेवक होणार आहेस?' अर्थात त्यांनी असे म्हटल्यावर 'मला

खेड्यात राहून काम करावयास आवडेल' असे म्हणणे क्रमप्राप्तच होते. नंतर ते म्हणाले, 'मी सांगितलेल्या गोष्टी तू निमूटपणे पाळशील काय?' 'ही तर एक प्रकारची हुकूमशाहीच झाली. आपण हुकूमशहा आहात काय?' मी म्हणालो. ते गंमतीने हसले पण त्यांनी मुद्दा सोडला नाही.

'अहिंसा पाळावयाची असेल तर मनाला काही शिस्त अवश्य आहे. अहिंसेचे व्रत घ्यावयाचे असेल तर पुढीलप्रमाणे गोष्टी करायला हव्यातच. एक तर कोठल्याही प्रसंगी कोणत्याही कारणाने मनाचा तोल जाऊ दयावयाचा नाही. राग, लोभ, हेवा, द्वेष यांचा अगदी निर्धारपूर्वक त्याग करायचा. नवसमाज निर्मितीच्या कार्यात तुला खरोखरच भाग घ्यावयाचा असेल तर तुला गरिबातल्या गरीब माणसाशी, समाजातल्या उपेक्षित व्यक्तीशी संवाद साधला पाहिजे, त्यांची सुखदु:खे, त्यांच्या इच्छाआकांक्षा यांच्याशी एकरूप व्हायला हवे. हे करावयाचे म्हणजे राजवाड्यातील राजविलासी जीवन व्यतीत करणे उपयोगाचे नाही. एवढेच नव्हे तर साध्या सुखासीन जीवनाचाही त्याग करायला हवा. जे औंधमधला साधा शेतकरी खाऊ शकेल तेच तू खावयाचे, स्वत: कातलेल्या सुताचाच कपडा वापरावयाचा, महिना पन्नास रुपयांपेक्षा जास्त स्वत:वर खर्च करायचा नाही.'

मी म्हणालो, 'हा प्रयोग करून पाहण्याची माझी तयारी आहे. पण या प्रयोगाची गरज आहेच हे मला आधी पटले पाहिजे.'

गांधीजी म्हणाले, 'जोवर समाजातल्या तळाच्या घटकाशी एकरूप होण्याची शक्ती येत नाही तोवर माणसाच्या हातून समाजपरिवर्तनाचे कार्य घडणार नाही. दुसऱ्या पातळीवरून बाहेरून समाजात कार्य करता येत नाही. त्यात बुडले पाहिजे. सभोवतालची मने त्यांच्या आशा-आकांक्षा, काळज्या, भीती त्यांच्या पातळीवरून त्यांच्यातला एक होऊन अनुभवली पाहिजे. तरच त्यांच्या जीवनज्योतीला स्पर्श करून ती उजळता येईल.'

जगात चाललेली पिळवणूक, दडपशाही व त्यामुळे होणारे संघर्ष आणि हा जनताजनार्दनात "विरून" जाण्याचा आदेश यांचा संबंध काय हे मला कळले नाही. हे "विरणे" होईपर्यंत होणारा अन्याय तसाच सहन करावयाचा काय? ते म्हणाले, मुळीच नाही, कुवतीप्रमाणे कोठल्याही अन्यायाशी झगडलेच पाहिजे. शक्यतो शांततेने व अहिंसेने, पण ते शक्य नसेल तर हिंसेनेसुद्धा! परंतु हिंसेने प्रतिकार झाला तर त्यातून आणखी हिंसा निर्माण होते, अन्यायाचे मूळ खुडले जात नाही. माझा प्रयत्न अहिंसेने माणसाची प्रकृतीच बदलण्याचा आहे. ज्या प्रतिकारात राग, द्वेष, भीती नाही तो प्रतिकार यशस्वी झालाच पाहिजे.' दक्षिण आफ्रिकेतल्या त्यांच्या लढ्याचे उदाहरण त्यांच्या या श्रद्धेमागे होते.

त्यांचे म्हणणे असे की, अहिंसेने तुमची स्वतःची मानवी मूल्ये जागी राहतात व तुमच्या प्रतिपक्षाची बदलतात.

अहिंसेने किंवा आणखी कशामुळे का होईना भारताला स्वराज्य मिळाले. पण सत्तेच्या हस्तांतराच्या सोहळ्याला गांधीजी उपस्थित राहिले नाहीत. त्यांचे मन दुःखाने जड झाले होते. त्यांची अहिंसेवरची श्रद्धा अढळच राहिली, त्यांना दुःख झाले ते हेच की ज्या जनमनपरिवर्तनावर त्यांनी विश्वास ठेवला होता ते झालेले नव्हते. जनतेने त्यांना धोका दिला होता. याबद्दल त्यांनी स्वधर्मानुसार स्वतःलाच दोष दिला. १९१९ नंतर जी जी मंडळी त्यांचे सच्चे शिपाई बनू चाहत होती त्यांना खरेखुरे अहिंसक सत्याग्रही शिक्षण दयायला त्यांनी सुरुवात केली होती.

असो. 'आपण घालून दिलेली बंधने मी पाळीन' असे मी त्यांना वचन दिले व औंध सोडीपर्यंत माझा वेष लांडी चड्डी, अर्ध्या बाह्यांचा शर्ट व टोपी असा असावयाचा. पंढरी बनवून देईल त्या चपला मी वापरीत असे. अजूनही त्याच वापरतो. उत्तम असतात त्या. चार टोप्या, चार चड्ड्या व चार शर्ट एवढ्याचे सूत कातणे माझ्या हातून होत असे. बाकी कधी कधी कोट, पायजमे, वगैरे लागत असत, तेवढ्यापुरती खादी मला विकत घ्यावी लागे. ती शक्य तितकी कमी घ्यावी लागावी म्हणून मी जरा आखूडच कोट व पायजमे वापरी. हा माझ्या स्नेह्यांच्या चेष्टेचा विषय असे. पण तिकडे माझे लक्षच नसे. खाण्यात मला पुढे पुढे बदल करावा लागला. कारण व्हेजिटेबल प्रोटीन्स मला पचेनाशी झाली. १९४२ साली लग्न झाल्यानंतर आणखी "सुधारणा" झाली. मी सुरवारी वापरू लागलो. पण त्या औंधच्या शिंप्याने शिवलेल्या माझ्या खास नमुन्याच्या असत. औंधच्या खास वाक्प्रचाराप्रमाणे त्या "नामांकित" असत. १९४८ साली नैरोबीला जाताना इंग्लंडहून परत आल्यापासून प्रथमच मी बंद गळ्याचा कोट व चांगल्या सुरवारी शिवल्या व कँपमधल्या "लीच अँड वेबर्नी"मधून दोन बऱ्यापैकी सूट शिवले. आता गेली कित्येक वर्षे मी खादी वापरलेली नाही व सूतही कातले नाही. आता कातावेसे वाटणारही नाही.

कपड्यांचे व जेवण्या-खाण्याचे खरे म्हणजे मला "बंधन" असे नव्हतेच. आम्ही सर्वच माणसे साधीसुधीच होतो व आहोत. बाबा व आई यांनी केव्हाच खादी वापरावयास सुरुवात केली होती. भावंडांचे कपडेही खादीचेच असत, जेवण साधेच असे. मोठ्या वाड्यात राहात होतो. खायला-प्यायला भरपूर होते. करावयाला नव्या नव्या गोष्टी होत्या. पण ऐषाराम व ऐदीपणा कधी नव्हता. बाबांची शिस्तच तशी होती.

गांधीजींनी घालून दिलेल्या दंडकांचे मनःपूर्वक पालन करावयाचे मी ठरवले होते व १९४२ सालापर्यंत ते करीत होतो. बेचाळीसच्या चळवळीत गांधीजींना व इतर सर्वच नेत्यांना तुरुंगात दडपल्यावर आमचे आम्ही नेते झालो. स्वतःच्या हातून हिंसा घडली नाही. जेथे जमेल तेथे हिंसक मार्गांना कलाटणी देण्याचा प्रयत्नही केला, पण अनेकदा दुसऱ्यांनी चालवलेल्या हिंसक चळवळींमध्ये अपरिहार्यपणे मी एक अकर्ता घटक झालो. म्हणून १९४४ साली गांधीजींना पुन्हा भेटल्यावर जेव्हा ते थोड्या खेदाने म्हणाले, 'अप्पा तुम भी इसमे थे!' तेव्हा शपथ मोडल्याच्या आत्यंतिक जाणिवेने शरमिंदा झालो.

गांधीजींनी एकदा मला बाबांच्या विरुद्ध सत्याग्रह करायला पाहिजे असे सुचवले होते. १९३९ साली औंध राज्यघटना अंमलात आली. १९४० मध्ये बाबांनी सत्तात्याग केला असला तरी अजून त्यांचे मन सत्तेत घुटमळते आहे असे मला वाटत होते. या बाबतीत मी काय करावयास पाहिजे याबद्दल मनाचा निश्चय होत नव्हता. मॉरिस फ्रीडमन, फ्रान्सिस वॉटसन या माझ्या स्नेह्यांशी मी हे बोललो व मॉरिस हे गांधीजींजवळ बोलला. गांधीजी म्हणाले, 'अप्पाला असे वाटत असेल तर त्याने वडिलांविरुद्ध सत्याग्रह करावयास पाहिजे.' अस्वस्थ मनःस्थितीतच मी किन्हईला गेलो व बलभीमबुवांच्या वाडीत राहिलो. मनातले वादळ शांत होईना. अंबाबाईवर हवाला ठेवून स्वस्थ राहिलो. मन शांत झाल्यावर आपोआप वाटले की, बाबांना गृहस्थाश्रमाची बंधने अडवीत आहेत. फारसा पैसा मुळातच नाही. मोठा प्रपंच व तो अजून सगळाच मार्गी लागावयाचा. यामुळे बाबांना सत्ता व संपत्ती यांचा पुरा त्याग करवत नव्हता व तो तुम्ही तसा करा, अशी मीच–त्यांच्या लाडक्या मुलाने–अडवणूक करणे म्हणजे त्यांचे जीवितच धोक्यात घालणे होते. शिवाय माझी अहिंसा तरी तितक्या प्रतीची होती काय? मी सत्याग्रह केला नाही.

गांधीजी नवा भारत घडवीत होते. त्यांनी साध्य केलेल्या अनेक गोष्टी आमच्यासमोर होत्या. हिंदू-मुसलमान दंगेधोपे होत तेव्हा गांधीजी त्यांच्यांत जाऊन बसत व शांतता निर्माण करीत. ही त्यांच्या अतुलनीय व्यक्तिमत्वाचीच किमया आहे असे पुन्हा पुन्हा वाटे. आमच्यासारख्या साध्यासुध्या माणसांना राग, द्वेष झपाटणार नाहीत व त्यांच्या हातून हिंसा होणार नाही हे कसे शक्य होते?

पण तो काळच असा होता की, गांधीजींच्या परिसाने भारताच्या कोन्याकोपऱ्यात अनेक मनांच्या लोखंडाचे सोने झाले होते व गांधीजींच्या तत्त्वांनुसार पूर्ण शांततेने, अहिंसक सत्याग्रहाने, कष्ट व हालअपेष्टा सोसून अन्यायाचे निराकरण करणारी माणसे ठिकठिकाणी निघत होती. अहिंसक

सत्याग्रहाने राजकीय पातळीवर काय घडू शकते ते सर्वांना विदित आहेच. भारताच्या त्या वेळच्या परिस्थितीमुळे व ब्रिटिशांशी मुकाबला असल्याने अहिंसक लढा आमच्या पचनी पडला यात शंका नाही.

खरी परीक्षेची वेळ आली ती गांधीजींच्या वधानंतर व असल्या परीक्षेला आम्ही कधी बसणारच नाही की काय अशी परिस्थिती आज येऊन ठेपलेली आहे. विकेंद्रीकरणाच्या धोरणाने सुरू झालेली आर्थिक व सामाजिक सत्ता आज पुन्हा जास्त जास्त केंद्रित झाली आहे. प्रगतीच्या नावाखाली मोठमोठे प्रकल्प उभे राहिले आहेत. शहरे मोठमोठी होत जात आहेत. राष्ट्राच्या अस्तित्वाकरिता अहिंसेचा त्याग वारंवार करावा लागला आहे. एवढेच नव्हे तर अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठीही हिंसेचा अश्रय घेतलेला आहे की गांधीजीची शिकवण अळवावरच्या पाण्याप्रमाणे ठिबकून नाहीशीच झाली काय? की गांधीजींची तत्वे जनताजनार्दनाला पेलण्यासारखी नाहीतच व त्यांची तत्त्वप्रणाली टिकून राहिलीच तर ती ठेवणाऱ्या व्यक्तीच फक्त असतील, समाज कधीच नसेल?

स्वराज्य मिळाल्यानंतर त्यात आपल्याला आता काही कर्तव्य नाही असे गांधीजींनी ठरवले. त्यांचे कार्य निराळे होते. आपल्याप्रमाणे सबंध काँग्रेसने सत्तापराङ्मुख होऊन विधायक, रचनात्मक कार्यक्रमाला जुंपून घ्यावे असे त्यांचे मत होते. मृत्यूपूर्वी त्यांनी कार्यकर्त्यांची एक बैठक सेवाग्रामला बोलावली होती व तेथे ''सर्वोदया''चा जन्म होणार होता.

सर्वोदयाचा जन्म झाला, पण तेव्हा गांधीजी गेलेले होते. पूर्वीच्या ऋषी-मुनींसारखी सर्वोदयात अशी शक्ती निर्माण व व्हायला हवी की, जी कार्यकर्त्यांना अंकुश लावून वा वेसण घालून सर्वोदयी मार्गावर ठेवील. सर्वोदयाला ती पात्रता कधी आली काय किंवा येईल काय?

विनोबाजी गांधीजींचे सच्चे चेले आहेत व त्यांच्याही पलीकडे ते गेले आहेत.

मार्टिन लूथर किंग हा त्यांचा दुसरा शिष्य म्हटला पाहिजे. देवाच्या द्वारी मन लागलेले. मनात राग, द्वेष नाही. कणखरपणाने वर्णद्वेषाशी झुंझावयाला तो उभा राहिला. आपल्या खंबीर नेतृत्वाने त्याने कितीकांची मने वळवली. महात्मा गांधींप्रमाणे अत्याचारानेच त्याचा बळी घेतला. त्यांच्या या अंतिम त्यागाचे फलित काय?

सिसिलीमधला डॅनिली डोल्सी यानेही गांधीजींकडूनच प्रेरणा घेतलेली. तेथल्या गरीब शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध तो लढला.


विनोबांचे असे म्हणणे आहे की, अहिंसेचा प्रभाव मनःशांतीतूनच निर्माण होणार. संस्था निर्माण करून, शिकवून अहिंसक सत्याग्रही तयार करणे योग्य नाही व तसे ते करता येतही नाही. खरी अहिंसा माणसाच्या मनात आत्मप्रेरणेनेच निर्माण व्हावयास पाहिजे, असे ते मानतात. माणूस स्वतःच जागरूक राहून मनातला राग, द्वेष, लोभ या जळमटांना दूर करील, मी–माझे या अस्मितेचा लोप करावयाला शिकेल तेव्हाच खरी अहिंसा प्रभावी ठरेल.

गांधीजींचेही तेच मत होते. पण सर्व जगाला मानवी मूल्ये पुन्हा तपासून पाहण्याला लावण्याची शक्ती त्यांच्यात होती व ते ते करीत होते.

स्वत्व नाहीसे केल्यानेच समत्व येथे. जेथे राग आहे, द्वेष आहे, जेथे मी-तू आहे, दुसऱ्यावर मात करण्याची ईर्षा आहे, अहंमन्यता आहे, भीती आहे तेथे अहिंसेवर निष्ठा नाही व म्हणून अहिंसा नाही.

***********

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
प्रा/२०२
१
ग्रंथालय


RAMESH
UMROTKAR